भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय



दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८

(सन १९०८ चा अधिनियम क्रमांक ५)

[महाराष्ट्र राज्यास लागू असलेला]

[३० एप्रिल १९९१ रोजी यथाविद्यमान]

The Code of Civil Procedure, 1908

(Act. No. 5 of 1908)

[In its application to the State of Maharashtra]

[As in force on the 30th April 1991]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.

१९९३

[किंमत : रु. १५.५०]

प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३० एप्रिल १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला दि कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजर, १९०८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड २, अंक २, दिनांक २० जून १९९१ यातील पृष्ठे ६१ ते ४४१मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २० जून १९९१.

के. एल. मोहन पुरिया
सचिव, भारत सरकार.

PREFACE

This edition of the Code of Civil Procedure, 1908 as on the 30th April 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 2, dated 20th June 1991 on pages 61 to 441.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 20th June 1991.

K. L. MOHAN PURIA
Secretary to the Government of India.

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८

कलमांचा क्रम

प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, प्रारंभ आणि विस्तार.

२. व्याख्या.

३. न्यायालयांची दुय्यमता.

४. व्यावृत्ती.

५. महसुली न्यायालयांना संहिता लागू करणे.

६. द्रव्यविषयक अधिकारिता.

७. प्रांतीय लघुवाद न्यायालये.

८. इलाखा शहर लघुवाद न्यायालये.

भाग पहिला

सर्वसाधारण दावे

न्यायालयांची अधिकारिता आणि प्राङ्न्याय

९. बाध नसेल तर, न्यायालयांनी सर्व दिवाणी दाव्यांची संपरीक्षा करणे.

९क. ज्या बाबतीत एखाद्या दाव्यात अंतरिम अनुतोषाशी संबंधित अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अधिकारितेस हरकत घेण्यात येईल त्या बाबतीत अशा प्रश्नाचा निर्णय न्यायालयाने प्रारंभिक वाद म्हणून करणे.

१०. दाव्याची स्थगिती.

११. प्राङ्न्याय.

१२. पुढील दाव्यास रोध.

१३. परदेशी न्यायनिर्णय केव्हा निर्णायक नसेल.

१४. परदेशी न्यायनिर्णयांच्या संबंधात गृहीतक.

दावा दाखल करण्याचे स्थळ

१५. कोणत्या न्यायालयात दावे दाखल करावेत.

१६. दाव्याची विषयवस्तू जेथे असेल तेथे दावे दाखल करावेत.

१७. वेगवेगळ्या न्यायालयांच्या अधिकारितेत असलेल्या स्थावर मालमत्तेसाठी दावे.

१८. जेव्हा न्यायालयांच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा अनिश्चित असतात तेव्हा दावा दाखल करण्याचे स्थळ.

१९. व्यक्ती किंवा जंगम मालमत्ता या संबंधीच्या दुष्कृतीबद्दलच्या भरपाईसाठी दावे.

२०. अन्य दावे प्रतिवादी राहात असतील तेथे किंवा वादकारण उद्भवले असेल तेथे दाखल करावेत.

२१. अधिकारितेला आक्षेप.

२१क. दावा चालवण्याच्या स्थळाबाबतच्या आक्षेपावरून हुकूमनामा रद्द करण्याच्या दाव्यास आडकाठी.

२२. जे दावे एकापेक्षा अधिक न्यायालयात मांडता येतात ते दावे वर्ग करण्याची शक्ती.

२३. अर्ज कोणत्या न्यायालयाकडे करता येईल.

२४. दावे वर्ग करण्याची आणि काढून घेण्याची सर्वसाधारण शक्ती.

२५. दावे वर्ग करण्याची सर्वोच्च न्यायालयाची शक्ती.

दावे सुरू करणे

२६. दावे सुरू करणे.

समन्स व शोध

२७. प्रतिवादींना समन्स.

२८. प्रतिवादी अन्य राज्यात राहात असेल त्या बाबतीत समन्सांची बजावणी.

२९. परदेशी समन्सांची बजावणी.
३०. शोध घेण्याची व तत्सम आदेश देण्याची शक्ती.
३१. साक्षीदारांना समन्स.
३२. कसुरीबद्दल शिक्षा.

न्यायनिर्णय व हुकूमनामा

३३. न्यायनिर्णय व हुकूमनामा.

व्याज

३४. व्याज.

दावा खर्च

३५. दावा खर्च.
३५क. खोटचा किंवा तापदायक हक्कमागणीच्या किंवा बचावतक्रारीच्या संबंधात भरपाईदाखल खर्च.
३५ख. विलंब केल्याबद्दल खर्च.

भाग दुसरा

अंमलबजावणी

सर्वसाधारण

३६. आदेशांना लागू असणे.
३७. ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला त्याची व्याख्या.

कोणत्या न्यायालयांना हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करता येईल

३८. कोणत्या न्यायालयांना हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता येईल.
३९. हुकूमनामा वर्ग करणे.
४०. हुकूमनाम्याचे दुसऱ्या राज्यातील न्यायालयाकडे हस्तांतरण.
४१. अंमलबजावणी कार्यवाहीचा निष्कर्ष प्रमाणित करणे.
४२. हस्तांतरित हुकूमनाम्याची अंमलबजावणी करत असताना न्यायालयाला असलेल्या शक्ती.
४३. ही संहिता जेथे लागू नसेल अशा ठिकाणच्या दिवाणी न्यायालयांनी काढलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी.
४४. ही संहिता जेथे लागू नसेल अशा ठिकाणच्या महसूल न्यायालयांनी काढलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी.
४४क. प्रतियोगी राज्यक्षेत्रातील न्यायालयांनी काढलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी.
४५. हुकूमनाम्यांची भारताबाहेर अंमलबजावणी.
४६. आज्ञापत्रे.

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाने निर्णीत करावयाचे प्रश्न

४७. हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाने निर्णीत करावयाचे प्रश्न.
४८. निरसित केले.

हस्तांतरिती व कायदेशीर प्रतिनिधी

४९. हस्तांतरिती.
५०. कायदेशीर प्रतिनिधी.

अंमलबजावणीची कार्यपद्धती

५१. अंमलबजावणी करवून घेण्याच्या न्यायालयाच्या शक्ती.
५२. प्रतिनिधीविरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी करवून घेणे.
५३. वडिलार्जित मालमत्तेचे दायित्व.
५४. संपदेची वाटणी करणे किंवा हिस्सा तोडून देणे.

अटक व स्थानबद्धता

५५. अटक करून स्थानबद्ध करणे.
५६. पैशाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना, स्त्रियांना अटक करण्यास किंवा स्थानबद्ध करण्यास मनाई.

५७. निर्वाह भत्ता.
५८. स्थानबद्धता व सुटका.
५९. आजारपणाच्या कारणावरून सुटका.

जप्ती

६०. हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जप्तीस आणि विक्रीस पात्र असलेली मालमत्ता.
६१. शेतमालाला अंशतः सूट देणे.
६२. राहत्या घरातील मालमत्तेचे अभिग्रहण.
६३. निरनिराळ्या न्यायालयांच्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करताना जप्त केलेली मालमत्ता.
६४. जप्तीनंतर मालमत्तेचे खाजगीरीत्या केलेले अन्यक्रामण रद्दबातल ठरणे.

विक्री

६५. खरेदीदाराचा क्रमप्राप्त हक्क.
६६. निरसित केले.
६७. पैसे देण्याबद्दलच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जमिनीचे विक्री व्यवहार करण्याबाबतचे नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

(कलमे ६८ ते ७२निरसित केली.)

मत्तेची वाटणी

७३. दरखास्ती विक्रीच्या उत्पन्नाची हुकूमनामाधारकांमध्ये हिस्सेराशीने वाटणी करणे.

अंमलबजावणीस प्रतिकार

७४. अंमलबजावणीस प्रतिकार.

भाग तिसरा

आनुषंगिक कार्यवाही

आयोगपत्रे

७५. आयोगपत्रे काढण्याची न्यायालयाची शक्ती.
७६. दुसऱ्या न्यायालयाच्या नावे आयोगपत्र.
७७. विनंतीपत्र.
७८. परदेशी न्यायालयांनी काढलेली आयोगपत्रे.

भाग चौथा

विशिष्ट प्रकरणांतील दावे

शासनाने किंवा आपल्या पदीय नात्याने लोक अधिकाऱ्यांनी अथवा त्यांच्या विरुद्ध लावलेले दावे.

७९. शासनाने किंवा त्याच्या विरुद्ध लावलेले दावे.
८०. नोटीस.
८१. अटक व जातीने उपस्थित रहाणे यापासून सूट.
८२. हुकूमनाम्याची अंमलबजावणी.

अन्यदेशीयांनी लावलेले आणि परदेशी राज्यकर्ते, राजदूत आणि दूत यांनी किंवा त्यांच्या विरुद्ध लावलेले दावे

८३. अन्यदेशीयांना केव्हा दावा दाखल करता येईल.
८४. परदेशी राज्यांना केव्हा दावा दाखल करता येईल.
८५. परदेशी राज्यकर्त्यांच्या वतीने खटला भरण्यास किंवा त्यात बचाव देण्यास शासनाने खास नेमलेल्या व्यक्ती.
८६. परदेशी राज्यकर्ते, राजदूत व दूत यांच्या विरुद्ध दावे.
८७. परदेशी राज्यकर्त्यांचे दाव्यातील पक्षकार म्हणून अभिधान.
८७क. "परदेशी राज्य" व "राज्यकर्ता" यांच्या व्याख्या.

पूर्वीच्या भारतीय संस्थानांच्या राज्यकर्त्यांच्या विरुद्ध दावे

८७ख. कलम ८५ व ८६ हे पूर्वीच्या भारतीय संस्थानांच्या राज्यकर्त्यांना लागू होणे.

अंतर्वाद

८८. कोणत्या बाबतीत अंतर्वाद दावा दाखल करता येईल.

भाग पाचवा

विशेष कार्यवाही

लवाद

८९. निरसित केले.

विशेष प्रकरण

९०. न्यायालयाच्या मतासाठी प्रकरण सादर करण्याची शक्ती.

सार्वजनिक उपद्रव आणि जनतेला बाधक अशी अन्य गैरकृत्ये

९१. सार्वजनिक उपद्रव व जनतेला बाधक अशी अन्य गैरकृत्ये.

९२. सार्वजनिक धर्मादाय.

९३. इलाखा नगराबाहेर महाधिवक्त्याच्या शक्तींचा वापर.

भाग सहावा

पूरक कार्यवाही

९४. पूरक कार्यवाही.

९५. अपुऱ्या कारणाच्या आधारे अटक, जप्ती किंवा मनाई हुकूम मिळवण्याबद्दल भरपाई.

भाग सातवा

अपिले

मूळ हुकूमनाम्याविरुद्ध अपिले

९६. मूळ हुकूमनाम्याविरुद्ध अपील.

९७. प्रारंभिक हुकूमनाम्याविरुद्ध अपील केलेले नसताना, अंतिम हुकूमनाम्याविरुद्ध अपील करण्याबाबत.

९८. दोन किंवा अधिक न्यायाधीशांनी अपिलांची सुनावणी केली असेल त्या बाबतीत निर्णय.

९९. गुणावगुण किंवा अधिकारिता यावर परिणाम न करणारी चूक किंवा नियमबाह्य गोष्ट झाल्यास कोणताही हुकूमनामा फिरवू किंवा बदलू नये.

अपिली हुकूमनाम्याविरुद्ध अपील

९९क. खटल्याच्या निर्णयावर बाधक परिणाम होत नसेल तर कलम ४७ खालील कोणताही आदेश फिरवू नये किंवा त्यात फेरबदल करू नये.

१००. दुसरे अपील.

१००क. विवक्षित प्रकरणी आणखी पुढे अपील नाही.

१०१. दुसरे अपील इतर कोणत्याही कारणावरून नाही.

१०२. विवक्षित दाव्यांमध्ये दुसरे अपील नाही.

१०३. तथ्यविषयक वादमुद्दा निर्णीत करण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

आदेशांच्या विरुद्ध अपिले

१०४. ज्यांच्या विरुद्ध अपील करता येते असे आदेश.

१०५. इतर आदेश.

१०६. कोणत्या न्यायालयांनी अपिलांची सुनावणी करावी.

अपिलांसंबंधी सर्वसाधारण उपबंध

१०७. अपील न्यायालयाच्या शक्ती.
१०८. अपिली हुकूमनामे व आदेश यांच्याविरुद्ध केलेल्या अपिलांतील कार्यपद्धती.

सर्वोच्च न्यायालयाकडे अपिले

१०९. सर्वोच्च न्यायालयाकडे अपिले केव्हा करता येतात.

(११० ते १११-क निरसित केले.)

११२. व्यावृत्ती.

भाग आठवा

निर्देशन, पुनर्विलोकन व पुनरीक्षण

११३. उच्च न्यायालयाकडे निर्देशन.
११४. पुनर्विलोकन.
११५. पुनरीक्षण.

भाग नववा

न्यायिक आयुक्तांचे न्यायालय सोडून अन्य उच्च न्यायालयांच्या संबंधी विशेष उपबंध

११६. हा भाग फक्त विवक्षित उच्च न्यायालयांनाच लागू असणे.
११७. उच्च न्यायालयांना संहिता लागू करणे.
११८. दावा खर्च निश्चिती करण्यापूर्वी हुकूमनाम्याची अंमलबजावणी.
११९. अनधिकृत व्यक्तींनी न्यायालयास उद्देशून निवेदन करावयाचे नाही.
१२०. उच्च न्यायालय मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करत असता उपबंध लागू नाहीत.

भाग दहावा

नियम

१२१. पहिल्या अनुसूचीतील नियमांची परिणामकता.
१२२. नियम करण्याच्या विवक्षित न्यायालयांच्या शक्ती.
१२३. विवक्षित राज्यांमध्ये नियम समितीची स्थापना.
१२४. समितीने उच्च न्यायालयाला अहवाल देणे.
१२५. नियम करण्याची इतर उच्च न्यायालयांची शक्ती.
१२६. नियम मान्यतेस अधीन असणे.
१२७. नियमांची प्रसिद्धी.
१२८. नियमांद्वारे कोणत्या बाबींसाठी उपबंध करता येतील.
१२९. आपल्या मूळ दिवाणी अधिकारितेसंबंधीच्या कार्यपद्धतीबाबत नियम करण्याची उच्च न्यायालयांची शक्ती.
१३०. कार्यपद्धतीखेरीज अन्य बाबींच्या संबंधात नियम करण्याची अन्य उच्च न्यायालयांची शक्ती.
१३१. नियमांची प्रसिद्धी.

भाग अकरावा

फिरकीळ

१३२. विवक्षित स्त्रियांना जातीने उपस्थित राहण्यापासून सूट.
१३३. अन्य व्यक्तींना सूट.
१३४. हुकूमनाम्यांच्या अंमलबजावणी व्यतिरिक्त अन्यथा अटक.
१३५. दिवाणी आदेशिकेखालील अटकेपासून सूट.

१३५क. दिवाणी आदेशिकेखाली अटक होण्यापासून किंवा स्थानबद्ध होण्यापासून विधानमंडळाच्या सदस्यास सूट.

१३६. अटक करावयाची व्यक्ती अथवा जप्त करावयाची मालमत्ता जिल्ह्याच्या बाहेर असेल त्याबाबतीतील कार्यपद्धती.

१३७. दुय्यम न्यायालयांची भाषा.

१३८. पुरावा इंग्रजीत नोंदवून घेण्यास सांगण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

१३९. शपथपत्रावरील शपथ कोणी द्यावयाची.

१४०. जहाजी मालाची वाचवणावळ इत्यादीसंबंधीच्या वादात न्यायसहायक.

१४१. किरकोळ कार्यवाही.

१४२. आदेश व नोटिसा लेखी असणे.

१४३. डाकहशील.

१४४. प्रत्यास्थापनाकरिता अर्ज.

१४५. जामीनदाराचे दायित्व बजावून घेणे.

१४६. प्रतिनिधींकडून किंवा त्यांच्याविरुद्ध कार्यवाही.

१४७. अपंग व्यक्तींची संमती किंवा करार.

१४८. मुदत वाढविणे.

१४८क. सावधानपत्र दाखल करण्याचा अधिकार.

१४९. न्यायालय फी-तील तूट भरून काढण्याची शक्ती.

१५०. कामकाज वर्ग करणे.

१५१. न्यायालयाच्या अंगभूत शक्तींची व्यावृत्ती.

१५२. न्यायनिर्णय, हुकूमनामे किंवा आदेश यांची दुरुस्ती.

१५३. दुरुस्त्या करण्याच्या सर्वसाधारण शक्ती.

१५३क. अपील संक्षिप्तरीत्या फेटाळले असेल त्याबाबतीत हुकूमनाम्यात किंवा आदेशात दुरुस्ती करण्याची शक्ती.

१५३ख. संपरीक्षेची जागा हे खुले न्यायालय मानावयाचे.

(१५४, १५५, १५६ निरसित केले).

१५७. निरसित अधिनियमांखालील आदेश चालू राहाणे.

१५८. दिवाणी प्रक्रिया संहितेचा व इतर निरसित अधिनियमांचा निर्देश.

अनुसूच्या

पहिली अनुसूची—कार्यपद्धतीचे नियम

परिशिष्ट क.—वादकथने

परिशिष्ट ख.—आदेशिका

परिशिष्ट ग.—शोध, तपासणी व कबुली

परिशिष्ट घ.—हुकूमनामे

परिशिष्ट ङ.—अंमलबजावणी

परिशिष्ट च.—पूरक कार्यवाही

परिशिष्ट छ.—अपील, निर्देशन व पुनर्विलोकन

परिशिष्ट ज.—संकीर्ण.

दुसरी अनुसूची—[निरसित]

तिसरी अनुसूची—[निरसित]

चौथी अनुसूची—[निरसित]

पाचवी अनुसूची—[निरसित]

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८

(१९०८ चा अधिनियम क्रमांक ५)

(३० एप्रिल, १९९१ रोजी अंमलात असल्याप्रमाणे)

दिवाणी न्यायालयांच्या कार्यपद्धतीसंबंधीचे कायदे एकत्रित करणे आणि त्यात विशोधन करणे यासाठी अधिनियम.

[२१ मार्च, १९०८]

ज्याअर्थी, दिवाणी न्यायालयांच्या कार्यपद्धतीसंबंधीचे कायदे एकत्रित करणे आणि त्यात विशोधन करणे हे समयोचित आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

प्रारंभिक

संक्षिप्त नाव, प्रारंभ आणि विस्तार.

१. (१) या अधिनियमास, "दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८" असे म्हणावे.

(२) १ जानेवारी, १९०९ रोजी तो अंमलात येईल.

---

१. हा अधिनियम, वऱ्हाड कायदे अधिनियम, १९४१ (१९४१ चा ४) द्वारे वऱ्हाडला लागू करण्यात आला आणि अनुसूचित जिल्हे अधिनियम, १८७४ (१८७४ चा १४), कलमे ५ आणि ५ क अन्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे पुढील अनुसूचित जिल्ह्यांनादेखील लागू करण्यात आला :—

(१) जलपायगुडी, काचार (नॉर्थ काचार हिल्स वगळून), गोवळपाडा (इस्टर्न डुआर्स सह) कामरूप, दारांग, नौगांग (मिकिर हिल ट्रॅक्ट्स वगळून), शिवसागर (मिकिर हिल ट्रॅक्ट्स वगळून) आणि लखिमपूर (दिब्रूगड फ्रॉंटियर ट्रॅक्ट्स वगळून) हे जिल्हे: **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ ५ आणि **भारताचे राजपत्र,** १९१४, भाग एक, पृष्ठ १६९०.

(२) दार्जीलिंग जिल्हा आणि हजारीबाग जिल्हा, रांची, पालामाऊ आणि छोटा नागपूर मधील मानभूम : कलकत्ता राजपत्र, १९०९, भाग एक, पृष्ठ २५ आणि **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ ३३.

(३) कुमाव आणि गढवाल प्रांत आणि तराई परगणे (फेरबदलांसह) : उत्तर प्रदेश राजपत्र, १९०९, भाग एक, पृष्ठ, ३ आणि **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ ३१.

(४) डेहराडून मधील जौन्सारबावर परगणा आणि मिर्झापूर जिल्ह्यातील अनुसूचित भाग : उत्तर प्रदेश राजपत्र, १९०९, भाग एक, पृष्ठ ४ आणि **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ ३२.

(५) कूर्ग : **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ ३२.

(६) पंजाबातील अनुसूचित जिल्हे : **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ ३३.

(७) मद्रासमधील सर्व अनुसूचित जिल्ह्यांना कलमे ३६ ते ४३ : **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ १५२.

(८) मध्यप्रांतातील अनुसूचित जिल्हे : आधीच अंमलात असेल तेवढा आणि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी स्थावर मालमत्तेची जप्ती व विक्री करण्यास प्राधिकार देत असेल तेवढा वगळून हा हुकूमनामा अशा मालमत्तेची विक्री करण्याचा निदेश देणारा नसेल : **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ २३९.

(९) अजमेर-मेरवाडा कलमे १ आणि १५५ ते १५८ वगळून : **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग दोन, पृष्ठ ४८०.

(१०) धालभूम परगणा, कोल्हणमधील छाईबासा नगरपालिका आणि सिंगभूम जिल्ह्यातील पोरहाट इस्टेट : कलकत्ता राजपत्र, १९०९, भाग एक, पृष्ठ ४५३ आणि **भारताचे राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ ४४३.

**

संथाळ परगणे व्यवस्था विनियम, (१८७२ चा ३) याचे कलम ३(३) (क) अन्वये कलमे ३८ ते ४२ व १५६ आणि पहिल्या अनुसूचीतील आदेश एकवीस, नियम ४ ते ९ हे संथाळ परगण्यांत अंमलात असल्याचे जाहीर करण्यात आले आहे आणि बाकीचा अधिनियम, संथाळ परगणे न्याय विनियम, १८९३ (१८९३ चा ५) याच्या कलम १० मध्ये निर्देश केलेल्या दाव्यांच्या चौकशीसाठी लागू आहे : पहा **कलकत्ता राजपत्र,** १९०९, भाग एक, पृष्ठ ४५.

पंथ पिपलोदा कायदे विनियम, १९२९ (१९२९ चा १), कलम २ द्वारे पंथ पिपलोदामध्ये तो अंमलात असल्याचे जाहीर केले आहे; खोंडमाळ कायदे विनियम, १९३६ (१९३६ चा ४), कलम ३ आणि अनुसूची याद्वारे खोंडमाळ जिल्ह्यात अंमलात असल्याचे जाहीर केले आहे; आणि अंगुल कायदे विनियम, १९३६ (१९३६ चा ५) कलम ३ आणि अनुसूची यांद्वारे अंगुल जिल्ह्यात अंमलात असल्याचे जाहीर केले आहे.

ओरिसा विनियम, १९५९ (१९५९ चा ५), कलम २ द्वारे तो कोरापूत आणि गंजम एजन्सी जिल्ह्यांना लागू केलेला आहे.

१९६५ चा विनियम ८, कलम ३ व अनुसूची द्वारे लखदीव, मिनिकॉय आणि अमिनदिवी बेटांना आणि १९६५ चा अधिनियम ३०, कलम ३ द्वारे गोवा, दमण व दीव यांना (१५ जून, १९६६ रोजी व तेव्हापासून) बदलांसह लागू करण्यात आला आहे.

१९५० चा अधिनियम ३०, कलम ३ द्वारे त्याचा मणीपूर राज्यावर विस्तार करण्यात आला व तो तेथे अंमलात आणण्यात आला. (१ जानेवारी, १९५७ रोजी व तेव्हापासून).

[१][(३) त्याचा विस्तार,—

(क) जम्मू व काश्मीर राज्य ;

(ख) नागालँड राज्य व जनजाति क्षेत्रे

याव्यतिरिक्त, संपूर्ण भारतभर आहे:

परंतु संबंधित राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या संहितेचे उपबंध किंवा त्यांपैकी कोणताही उपबंध त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा पूरक, आनुषंगिक किंवा परिणामरूप फेरफारांसह संपूर्ण नागालँड राज्य किंवा अशी जनजाति क्षेत्रे यांमध्ये सर्वत्र किंवा त्यांच्या एखाद्या भागास लागू करू शकेल.

स्पष्टीकरण.—या खंडामध्ये "जनजाति क्षेत्र" याचा अर्थ, २१ जानेवारी, १९७२ च्या लगतपूर्वी संविधानाच्या पहाव्या अनुसूचीच्या परिच्छेद २० मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे आसामच्या जनजातिक्षेत्रांमध्ये समाविष्ट असलेली राज्यक्षेत्रे असा आहे.

(४) अमिनदिवी बेटे आणि आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी, पश्चिम गोदावरी व विशाखापट्टणम् ही अभिकरण क्षेत्रे आणि लक्षद्वीप हे संघराज्यक्षेत्र यांच्या संबंधात ही संहिता लागू केल्यामुळे, या संहितेच्या लागू होण्यासंबंधी अशी बेटे, अभिकरण क्षेत्रे किंवा, प्रकरणपरत्वे, असे संघराज्यक्षेत्र यांमध्ये त्या त्या काळी जो कोणताही नियम किंवा विनियम अंमलात असेल तो लागू होण्यात बाध येणार नाही.]

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(१) "संहिता" यात नियमांचा समावेश आहे ;

(२) "हुकूमनामा" याचा अर्थ, ज्या अभिनिर्णयाद्वारे तो व्यक्त करणारे न्यायालय दाव्यातील सर्व अथवा त्यांपैकी कोणत्याही विवाद्य बाबींच्या संबंधात पक्षकारांचे अधिकार जेथवर निर्णायकपणे ठरवते तेथवर त्या अभिनिर्णयाची रीतसर अभिव्यक्ती असा आहे आणि हुकूमनामा प्रारंभिक किंवा अंतिम असू शकेल. या संज्ञेत, वादपत्र नाकारणे आणि [२]*** कलम १४४ च्या कक्षेत कोणताही प्रश्न निर्णीत करणे याचा अंतर्भाव आहे असे मानण्यात येईल, पण त्यात,—

(क) आदेशावरील अपिलाप्रमाणे ज्यावर अपील होऊ शकते असा कोणताही अभिनिर्णय, किंवा

(ख) अनुपस्थितीमुळे दिलेला फेटाळण्याचा आदेश,

यांचा अंतर्भाव असणार नाही.

स्पष्टीकरण.— दावा संपूर्णपणे निकालात काढण्यापूर्वी जेव्हा आणखी काही कार्यवाही करावयाची शिल्लक असते तेव्हा, दिलेला हुकूमनामा प्रारंभिक असतो. जेव्हा अशा अभिनिर्णयामुळे दावा पूर्णपणे निकालात निघतो तेव्हा, तो हुकूमनामा अंतिम असतो. तो अंशत: प्रारंभिक आणि अंशत: अंतिम असू शकेल ;

(३) "हुकूमनामाधारक" याचा अर्थ, ज्या व्यक्तीच्या नावाने हुकूमनामा काढण्यात आला आहे किंवा अंमलबजावणीक्षम असा आदेश काढण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(४) "जिल्हा" याचा अर्थ, मूळ अधिकारिता असलेल्या प्रधान दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा असा आहे (त्यास यात यापुढे "जिल्हा न्यायालय" असे संबोधलेले आहे) आणि त्यात उच्च न्यायालयाच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांचा अंतर्भाव होतो;

[३][(५) "परदेशी न्यायालय" याचा अर्थ, जे न्यायालय केंद्र शासनाच्या प्राधिकारान्वय स्थापन झालेले नाही किंवा चालू राहिलेले नाही असे भारताबाहेरच्या ठिकाणी असलेले न्यायालय;]

(६) "परदेशी न्यायनिर्णय" याचा अर्थ, परदेशी न्यायालयाचा न्यायनिर्णय, असा आहे;

(७) "सरकारी वकील" या संज्ञेत, या संहितेअन्वये सरकारी वकिलाची म्हणून स्पष्टपणे नेमून दिलेली सर्व अथवा त्यांपैकी कोणतीही कार्ये करण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा आणि सरकारी वकिलाच्या निदेशान्वये कार्य करणाऱ्या कोणत्याही वकिलाचाही अंतर्भाव होतो ;

[४][(७क) "उच्च न्यायालय" याचा अंदमान व निकोबार या बेटांच्या संबंधातील अर्थ कलकत्ता येथील उच्च न्यायालय असा आहे ;

(७ख) "भारत" याचा अर्थ, कलमे १, २९, ४३, ४४, [५][४४क,] ७८, ७९, ८२, ८३ आणि ८७क या व्यतिरिक्त इतरत्र, जम्मू व काश्मीर राज्य वगळून भारताचे राज्यक्षेत्र, असा आहे] ;

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २ द्वारे बदलोदाखल करण्यात आले.

२. "कलम ४७ किंवा" हा मजकूर, सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ३ (एक) द्वारे वगळण्यात आला.

३. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ४ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या क्रमांक ४ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९५२ चा अधिनियम ४२, कलम ४ आणि अनुसूची ३ यांद्वारे समाविष्ट करण्यात आला.

(८) "न्यायाधीश" याचा अर्थ, दिवाणी न्यायालयाचा पीठासीन अधिकारी, असा आहे ;

(९) "न्यायनिर्णय" याचा अर्थ, हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या कारणांचे न्यायाधीशाने दिलेले निवेदन, असा आहे;

(१०) "निर्णीत ऋणको" याचा अर्थ, ज्या व्यक्तीविरूद्ध हुकूमनामा काढण्यात आला आहे किंवा अंमलबजावणीक्षम आदेश काढण्यात आला आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(११) "कायदेशीर प्रतिनिधी" याचा अर्थ, मृत व्यक्तीच्या संपदेचे कायद्याप्रमाणे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती असा आहे, आणि त्यात मृत व्यक्तीच्या संपदेच्या व्यवहारामध्ये हस्तक्षेप करणारी कोणतीही व्यक्ती आणि जेव्हा पक्षकार प्रातिनिधिक भूमिकेत असताना दावा लावील किंवा त्याच्या विरूद्ध दावा लावला जाईल, तेव्हा अशा दावा लावणाऱ्या किंवा विरुद्ध दावा लावला गेलेल्या पक्षकाराच्या मृत्युनंतर ती संपदा जिच्याकडे प्रक्रांत होते अशा व्यक्तीचाही समावेश होतो;

(१२) मालमत्तेचे "दरम्यानचे लाभ" याचा अर्थ, अशा मालमत्तेचा गैरकब्जा ज्या व्यक्तीकडे असेल तिला प्रत्यक्षात मिळालेले, किंवा सर्वसाधारण तत्परता दाखवली असती तर जे मिळाले असते, असे उत्पन्न व अशा उत्पन्नावरील व्याज असा आहे, मात्र गैरकब्जा असलेल्या व्यक्तीने केलेल्या सुधारणांमुळे होणाऱ्या उत्पन्नाचा त्यात समावेश होत नाही ;

(१३) "जंगम मालमत्ता" यात वाढत्या पिकांचा समावेश होतो ;

(१४) "आदेश" याचा अर्थ, हुकूमनाम्याव्यतिरिक्त दिवाणी न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयाची रीतसर अभिव्यक्ती, असा आहे ;

(१५) "प्लीडर" याचा अर्थ, न्यायालयात दुसऱ्यासाठी उपस्थित राहून त्याची वकिली करण्यास हक्कदार असलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यात अधिवक्ता, वकील आणि उच्च न्यायालयाचा न्यायवादी यांचा समावेश होतो ;

(१६) "विहित" याचा अर्थ, नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(१७) "लोक अधिकारी" याचा अर्थ, पुढीलपैकी कोणत्याही वर्णनात मोडणारी व्यक्ती असा आहे, ते असे :

(क) प्रत्येक न्यायाधीश ;

(ख) [१][अखिल भारतीय सेवेचा] प्रत्येक सदस्य ;

(ग) [२]***शासकीय नोकरी करत असलेला, [३][संघराज्याच्या] भूसेनेतील, [४][नौसेनेतील किंवा वायुसेनेतील] प्रत्येक राजादिष्ट किंवा राजपत्रित अधिकारी ;

(घ) न्यायालयाचा अधिकारी म्हणून न्यायालयात कोणत्याही कायदेविषयक किंवा तथ्यविषयक बाबीवर अन्वेषण करणे किंवा त्याबाबत अहवाल देणे, अथवा कोणताही दस्तऐवज तयार करणे, अधिप्रमाणित करणे किंवा ठेवणे, अथवा कोणत्याही मालमत्तेचा ताबा घेणे किंवा तिचा विनियोग करणे, अथवा कोणत्याही न्यायिक आदेशिकेची अंमलबजावणी करणे किंवा कोणतीही शपथ देणे किंवा दुभाष्याचे काम करणे किंवा सुव्यवस्था राखणे हे ज्याचे कर्तव्य आहे असा प्रत्येक अधिकारी, आणि यांपैकी कोणतेही कर्तव्य पार पाडण्यासाठी न्यायालयाने खास प्राधिकृत केलेली प्रत्येक व्यक्ती ;

(ङ) ज्यायोगे कोणत्याही व्यक्तीला बंदिवासात टाकण्याची किंवा ठेवण्याची शक्ती प्राप्त होते असे कोणतेही अधिकारपद जी जी व्यक्ती धारण करते अशी प्रत्येक व्यक्ती ;

(च) शासकीय अधिकारी म्हणून, अपराध होऊ न देणे, अपराधांची खबर देणे, अपराध्यांना न्यायप्रक्रियेखाली आणणे, अथवा सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता किंवा सोय राखणे हे ज्याचे ज्याचे कर्तव्य आहे असा प्रत्येक अधिकारी ;

(छ) अधिकारी म्हणून शासनाच्या वतीने एखादी मालमत्ता ताब्यात घेणे, स्वीकारणे, ठेवणे किंवा खर्चून टाकणे, अथवा शासनाच्या वतीने कोणतेही सर्वेक्षण करणे, मूल्यनिर्धारण किंवा संविदा करणे, अथवा एखाद्या महसुली आदेशिकेची अंमलबजावणी करणे, अथवा शासनाच्या द्रव्यविषयक हितसंबंधांवर परिणाम करणाऱ्या कोणत्याही बाबीसंबंधी अन्वेषण करणे किंवा त्यावर

---

१. "भारतीय मुलकी सेवा" या मजकुराऐवजी, सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ३ (दोन) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

२. सन १९३४ चा अधिनियम ३५, कलम २ द्वारे "बादशहाच्या इंडियन मरिन सर्व्हिससह" हा मजकूर निरसित करण्यात आला.

३. अनुकूलन आदेश १९५० द्वारे "बादशहाच्या" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

४. सन १९३४ चा अधिनियम ३५ कलम २ आणि अनुसूची याद्वारे "किंवा नौसेनेतील" या शब्दांऐवजी दाखल करण्यात आला.

अहवाल देणे, अथवा शासनाच्या द्रव्यविषयक हितसंबंधांबाबतचा कोणताही दस्तऐवज करून देणे, तो अधिप्रमाणित करणे किंवा ठेवणे, अथवा शासनाच्या आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण करणाऱ्या कोणत्याही कायद्याचा व्यतिक्रम होण्यास प्रतिबंध करणे हे ज्याचे ज्याचे कर्तव्य आहे असा प्रत्येक अधिकारी; आणि

(ज्) शासनाच्या सेवेत असलेला किंवा त्याजकडून वेतन घेणारा, अथवा कोणतेही लोककर्तव्य केल्याबद्दल फीच्या किंवा कमिशनच्या रूपात ज्याला पारिश्रमिक मिळते असा प्रत्येक अधिकारी ;

(१८) "नियम" याचा अर्थ, पहिल्या अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेले अथवा कलम १२२ किंवा कलम १२५ याखाली केलेले नियम आणि नमुने, असा आहे ;

(१९) "महामंडळामधील शेअर" यामध्ये, रोखा, ऋण पुंजरोखा, ऋणपत्रे किंवा बंधरोखे यांचा समावेश होतो असे मानण्यात येईल ; आणि

(२०) "स्वाक्षरित" यामध्ये, न्यायनिर्णय किंवा हुकूमनामा यांची बाब सोडून एरव्ही, मुद्रांकिताचा अंतर्भाव होतो.

[१]* * * * *

न्यायालयांची दुय्यमता.

३. या संहितेच्या प्रयोजनांसाठी, जिल्हा न्यायालय हे उच्च न्यायालयास दुय्यम आहे आणि जिल्हा न्यायालयापेक्षा कनिष्ठ श्रेणीचे प्रत्येक दिवाणी न्यायालय व प्रत्येक लघुवाद न्यायालय हे उच्च न्यायालय व जिल्हा न्यायालय यांना दुय्यम आहे.

व्यावृत्ती.

४. (१) विरुद्ध असा कोणताही विनिर्दिष्ट उपबंध नसेल तर, सध्या अंमलात असलेला कोणताही विशेष अथवा स्थानिक कायदा अथवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे किंवा त्याखाली प्रदान केलेली कोणतीही विशेष अधिकारिता किंवा शक्ती अगर विहित केलेली कोणतीही विशेष कार्यपद्धती यांवर या संहितेतील कोणत्याही गोष्टीमुळे मर्यादा पडते किंवा अन्यथा परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

(२) विशेषत: आणि पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या विधानाच्या व्यापकतेला बाध न येता, शेतजमिनीचा खंड अशा जमिनीतील उत्पन्नातून वसूल करण्यासाठी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली जमीनधारकास अथवा जमीनमालकास जो कोणताही उपाय उपलब्ध असेल त्यावर या संहितेतील कोणत्याही गोष्टीमुळे मर्यादा पडते किंवा अन्यथा परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

महसुली न्यायालयांना संहिता लागू करणे.

५. (१) कोणत्याही महसुली न्यायालयांना लागू असलेल्या एखाद्या विशेष अधिनियमितीमध्ये ज्या कार्यपद्धतीविषयक बाबींसंबंधी काहीही उपबंध नसतील त्यांच्या बाबतीत, जेव्हा ती न्यायालये या संहितेच्या उपबंधांद्वारे नियंत्रित होत असतील तेव्हा, राज्य शासनाला [२]* * * * शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे जाहीर करता येईल की, या संहितेअन्वये त्या उपबंधांपैकी जे कोणतेही भाग स्पष्टपणे लागू केलेले नाहीत ते त्या न्यायालयांना लागू होणार नाहीत किंवा केवळ राज्य शासन [३]* * * * विहित करील अशा फेरफारांसह त्यांना लागू होतील.

(२) पोटकलम (१) मधील "महसुली न्यायालय" याचा अर्थ, कृषि प्रयोजनांसाठी वापरल्या जाणाऱ्या जमिनीचा खंड, महसूल अथवा लाभ यांच्या संबंधातील दावे किंवा इतर कार्यवाही विचारार्थ स्वीकारण्यासाठी कोणत्याही स्थानिक कायद्यान्वये अधिकारिता असलेले न्यायालय, असा आहे परंतु, असे दावे किंवा कार्यवाही हे दिवाणी स्वरूपाचे दावे किंवा कार्यवाही असल्यामुळे त्यांची संपरीक्षा करण्यासाठी या संहितेअन्वये मूळ अधिकारिता मिळालेल्या दिवाणी न्यायालयाचा त्यात समावेश होत नाही.

द्रव्यविषयक अधिकारिता.

६. अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केलेले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, यामध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, कोणत्याही न्यायालयास, ज्या दाव्यांच्या विषयवस्तूची रक्कम अथवा मूल्य हे त्याच्या मूळ अधिकारितेच्या ज्या द्रव्यविषयक मर्यादा असतील (तशा असल्यास,) त्यापेक्षा अधिक असेल, त्या दाव्यासंबंधी अधिकारिता देण्याचे कार्य घडेल अशा प्रकारे प्रवर्तित होणार नाही.

प्रांतीय लघुवाद न्यायालये.

७. प्रांतीय लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७ या खाली, [४][किंवा वऱ्हाड प्रांत लघुवाद न्यायालये कायदा, १५०५ याखाली] घटित केलेल्या न्यायालयांना अथवा [५][उक्त अधिनियमाच्या किंवा

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे समाविष्ट केलेला खंड (२१) हा सन १९५१ चा अधिनियम २, कलम ४ द्वारे वगळण्यात आला.

२. सन १९२० चा अधिनियम ३८ कलम २ आणि अनुसूची एक, भाग एक याद्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल च्या पूर्वमंजुरीसह" हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ आणि अनुसूची एक, भाग एक याद्वारे "पूर्वोक्त पूर्वमंजुरीसह" हा मजकूर वगळण्यात आला.

४. सन १९४१ चा अधिनियम ४, कलम २ आणि अनुसूची तीन द्वारे समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाचे कलम २ व अनुसूची तीन द्वारे "त्या कायद्याअन्वये" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

कायद्याच्या अन्वये] लघुवाद न्यायालयाच्या अधिकारितेचा वापर करणाऱ्या न्यायालयांना, [१][अथवा, [१][भारताच्या ज्या कोणत्याही भागावर या अधिनियमाचा विस्तार नाही त्या भागातील] जी न्यायालये समतुरूप अधिकारिता वापरतात अशा न्यायालयांना] पुढील उपबंध लागू होणार नाहीत, ते असे—

(क) संहितेच्या प्रधानांगापैकी जितका भाग—

(एक) लघुवाद न्यायालयांच्या दखलगिरीतून वगळलेले दावे;

(दोन) अशा दाव्यांतील हुकूमनाम्यांची अंमलबजावणी;

(तीन) स्थावर मालमत्तेविरुद्ध झालेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी,

यांच्याशी संबंधित आहे तितका भाग; आणि

(ख) पुढील कलमे म्हणजे—

कलम ९;

कलमे ९१ व ९२;

कलमे ९४ आणि ९५ [१][ही जेथवर ती—

(एक) स्थावर मालमत्तेच्या जप्तीचे आदेश;

(दोन) मनाई हुकूम;

(तीन) स्थावर मालमत्तेच्या प्रापकाची नेमणूक, किंवा

(चार) कलम ९४ चा खंड (ङ) यामध्ये निर्देशिलेले वादकालीन आदेश यांना प्राधिकृत करतात किंवा त्यांच्याशी संबंधित आहेत तेथवर ती कलमे], आणि कलमे ९६ ते ११२ व ११५.

इलाखा शहर लघुवाद न्यायालये.

८. कलमे ३४, ३८ ते ४१, ७५, खंड (क), (ख) आणि (ग), ७६, [४][७७, १५७ व १५८] यांमध्ये, आणि इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८२ (१८८२ चा १५) याद्वारे उपबंधित केली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, या संहितेच्या प्रधान भागातील उपबंध कलकत्ता, मद्रास आणि मुंबई या शहरांमध्ये स्थापन झालेल्या कोणत्याही लघुवाद न्यायालयातील कोणत्याही दाव्याला अथवा कार्यवाहीला लागू होणार नाहीत :

[५][परंतु,—

(१) फोर्ट विल्यम, प्रकरणपरत्वे, मद्रास आणि मुंबई येथील न्यायव्यवस्थेच्या उच्च न्यायालयांना वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे निदेशित करता येईल की, 'इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८२' (१८८२ चा १५) याच्या व्यक्त उपबंधांशी आणि अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेले असतील असे बदल व अनुकूलन यांच्याशी विसंगत नसतील असे कोणतेही उपबंध अशा न्यायालयातील दावे किंवा कार्यवाही अथवा अशा दाव्यांचा किंवा कार्यवाहींचा वर्ग यांना लागू होतील;

(२) 'इलाखा शहर लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२' (१८८२ चा १५) याच्या कलम ९ खाली उक्त न्यायालयांपैकी कोणत्याही न्यायालयाने आतापर्यंत केलेले सर्व नियम हे कायदेशीर केलेले आहेत असे मानण्यात येईल.]

---

१. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे "भाग ख राज्यांतील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९२६ चा अधिनियम १, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

४. सन १९७६ चा अधिनियम, १०४, कलम ४ द्वारे "७७ आणि १५५ ते १५८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९१४ चा अधिनियम १, कलम २ द्वारे जादा दाखल करण्यात आला.

भाग पहिला

सर्वसाधारण दावे

न्यायालयांची अधिकारिता आणि प्राङ्न्याय

बाध नसेल तर, न्यायालयांनी सर्व दिवाणी दाव्यांची संपरीक्षा करणे.

९. न्यायालयांना (यात अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या अधीनतेने) ज्या दाव्यांची दखल घेण्यास स्पष्टपणे वा उपलक्षितपणे बाध असेल त्या दाव्यांव्यतिरिक्त, दिवाणी स्वरूपाच्या सर्व दाव्यांची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असेल.

[१][स्पष्टीकरण पहिले.]—ज्या दाव्यामध्ये मालमत्तेवरील अथवा एखाद्या पदावरील अधिकार वादास्पद झाला असेल—मग असा अधिकार हा धार्मिक विधी किंवा संस्कार यासंबंधीच्या प्रश्नांच्या निर्णयावर सर्वस्वी अवलंबून असला तरीही—तो दिवाणी स्वरूपाचा दावा होय.

[२][स्पष्टीकरण दुसरे.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, पहिल्या स्पष्टीकरणामध्ये निर्देशिलेल्या पदाशी कोणतीही फी संलग्न आहे किंवा नाही अथवा असे पद विशिष्ट जागेशी संलग्न आहे किंवा नाही ही गोष्ट गौण आहे.]

ज्या बाबतीत एखाद्या दाव्यात अंतरिम अनुतोषाशी संबंधित अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अधिकारितेस हरकत घेण्यात येईल त्या बाबतीत अशा प्रश्नाचा निर्णय न्यायालयाने प्रारंभिक वाद म्हणून करणे.

[१][९-क. (१) या संहितेमध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी जर कोणताही अंतरिम अनुतोष—मग तो स्थगिती आदेशाच्या रूपाने असो किंवा मनाई-हुकुमाच्या रूपाने, (न्यायालय) धारकाच्या नेमणुकीच्या रूपाने किंवा अन्य प्रकारे असो—दिला जावा यासाठी किंवा तो रद्द केला जावा यासाठी कोणत्याही दाव्यामध्ये केलेल्या कोणत्याही अर्जाच्या सुनावणीच्या वेळी जर दाव्यामधील पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराने असा दावा दाखल करून घेण्याच्या न्यायालयाच्या अधिकारितेस हरकत घेतली तर, अंतरिम अनुतोष देणारा आदेश देण्यापूर्वी किंवा तो रद्द करण्यापूर्वी न्यायालयाने अशा अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अधिकारितेसंबंधीच्या वादप्रश्नाचा प्रारंभिक वादप्रश्न म्हणून निर्णय देण्याचे काम केले पाहिजे. अशा कोणत्याही अर्जाची न्यायालयाने, शक्य तितक्या शीघ्रतेने सुनावणी करून तो निकालात काढला पाहिजे आणि कोणत्याही परिस्थितीत दाव्याची सुनावणी स्थगित करता कामा नये.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा कोणत्याही अर्जाच्या सुनावणीच्या वेळी न्यायालयास, त्याने अधिकारितेच्या प्रारंभिक वादप्रश्नाचा निकाल देईपर्यंत, त्यास आवश्यक वाटेल असा अंतरिम अनुतोष मंजूर करता येईल]

दाव्याची स्थगिती.

१०. जर एखाद्या दाव्यामधील वादप्रश्न हा, त्याच पक्षकारांमध्ये अथवा त्याच हक्कान्वये वाद लढणाऱ्या ज्या पक्षकारांच्या पोटी ते अगर त्यांच्यापैकी कोणीही हक्क सांगत असतील त्या पक्षकारांमध्ये पूर्वी सुरू केलेल्या दाव्यातदेखील प्रत्यक्षपणे आणि सारतः वादग्रस्त असेल आणि असा दावा त्याच

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५ द्वारे मूळ स्पष्टीकरणास, स्पष्टीकरण पहिले असा क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

१. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ६५, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

न्यायालयामध्ये किंवा ज्या प्रकारची दाद मागितली आहे ती मंजूर करण्याची अधिकारिता असलेल्या [१][भारतातील] अन्य कोणत्याही न्यायालयामध्ये, अथवा [२][केंद्र शासनाने [३]* * *] स्थापन केलेल्या किंवा चालू ठेवलेल्या आणि तशीच अधिकारिता असलेल्या [१][भारताच्या] सीमेबाहेरील कोणत्याही न्यायालयामध्ये अथवा [४][सर्वोच्च न्यायालयापुढे] प्रलंबित असेल तर, कोणत्याही न्यायालयाने त्या दाव्याची संपरीक्षा पुढे चालू करता कामा नये.

स्पष्टीकरण.—एखादा दावा परदेशी न्यायालयात प्रलंबित आहे म्हणून, त्याच वादकारणावर आधारलेल्या दाव्याची संपरीक्षा करण्यास [१][भारतातील] न्यायालयांना प्रतिबंध होणार नाही.

११. जर एखाद्या दाव्यातील किंवा वादप्रश्नातील प्रत्यक्षपणे व सारतः वादग्रस्त असलेली बाब त्याच पक्षकारांमधील अथवा त्याच हक्कान्वये वाद लढणाऱ्या ज्या पक्षकारांच्या पोटी ते अगर त्यांच्यापैकी कोणीही हक्क सांगत असतील त्या पक्षकारांमधील पूर्वीच्या दाव्यातसेही वादग्रस्त असून, अशा नंतरच्या दाव्याची अगर ज्यामध्ये असा वादप्रश्न मागाहून उपस्थित करण्यात आला असेल त्या दाव्याची संपरीक्षा करण्यास सक्षम असलेल्या न्यायालयात तो (पूर्वीचा) दावा लावलेला असेल आणि अशा न्यायालयाने त्या बाबीची सुनावणी करून तिचा निर्णय केला असेल तर, कोणत्याही न्यायालयाने अशा कोणत्याही दाव्याची किंवा वादप्रश्नाची संपरीक्षा करता कामा नये. प्राङ्न्याय.

स्पष्टीकरण पहिले.—"पूर्वीचा दावा" या शब्दप्रयोगाद्वारे प्रस्तुत दाव्यापूर्वी निर्णीत केलेला दावा निर्दिष्ट होईल.—मग तो प्रस्तुत दाव्याच्या पूर्वी मांडलेला असो किंवा नसो.

स्पष्टीकरण दुसरे.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी, एखाद्या न्यायालयाची सक्षमता ही, अशा न्यायालयाच्या निर्णयावर अपील करण्याच्या अधिकारासंबंधीचे कोणतेही उपबंध विचारात न घेता, निर्धारित केली जाईल.

स्पष्टीकरण तिसरे.—वर निर्देशित केलेली बाब ही पूर्वीच्या दाव्यामध्ये एका पक्षकाराने अभिकथन केलेली असली पाहिजे आणि दुसऱ्या पक्षकाराने ती स्पष्टपणे किंवा उपलक्षितपणे नाकारलेली तरी असली पाहिजे किंवा कबूल तरी केलेली असली पाहिजे.

स्पष्टीकरण चौथे.—जी कोणतीही बाब अशा पूर्वीच्या दाव्यामध्ये बचावाचे किंवा आक्षेपाचे आधारकारण करता आली असती किंवा करावयास पाहिजे होती ती अशा दाव्यात प्रत्यक्षपणे आणि सारतः वादग्रस्त आहे असे मानण्यात येईल.

स्पष्टीकरण पाचवे.—वादपत्रामध्ये मागितलेला जो कोणताही अनुतोष हुकूमनाम्याद्वारे स्पष्टपणे मंजूर झालेला नसेल तो, नाकारण्यात आला आहे असे या कलमाच्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल.

स्पष्टीकरण सहावे.—जेव्हा व्यक्ती सार्वजनिक अधिकार अथवा त्यांच्यासाठी किंवा इतरांसाठी सामायिकपणे सांगितला जाणारा खाजगी अधिकारात याबाबत प्रामाणिकपणे वाद लढतात तेव्हा, अशा अधिकारात हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्ती असा वाद लढणाऱ्या व्यक्तींच्या पोटी अधिकार सांगतात असे या कलमाच्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल.

[५][**स्पष्टीकरण सातवे.**—या कलमाचे उपबंध हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीस लागू होतील व कोणताही दावा, वादप्रश्न किंवा पूर्वीचा दावा यासंबंधी या कलमात असलेल्या निर्देशांचा अर्थ, अनुक्रमे हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीची कार्यवाही, अशा कार्यवाहीत उद्भवणारा प्रश्न आणि त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी केलेली पूर्वीची कार्यवाही यांचे निर्देश म्हणून लावण्यात येईल.

स्पष्टीकरण आठवे.—एखादा वादप्रश्न निर्णीत करण्यास सक्षम असलेल्या, मर्यादित अधिकारितेच्या[१] न्यायालयाने जर अशा वादप्रश्नाची सुनावणी करून अंतिम निर्णय केला तर, तो नंतरच्या दाव्याला प्राङ्न्याय म्हणून प्रवर्तित होईल—मग असे मर्यादित अधिकारितेचे न्यायालय अशा नंतरच्या दाव्याची अथवा ज्यामध्ये असा वादप्रश्न मागाहून उपस्थित करण्यात आलेला आहे अशा दाव्याची संपरीक्षा करण्यास सक्षम नव्हते असे असले तरी हरकत नाही.]

१२. जेव्हा वादीस कोणत्याही विशिष्ट वादकारणांच्या संबंधात आणखी दावा मांडण्यास नियमांद्वारे प्रतिबंध करण्यात आला असेल तेव्हा, ही संहिता लागू असणाऱ्या कोणत्याही न्यायालयात त्याला अशा वादकारणाच्या संबंधात दावा मांडण्याचा हक्क असणार नाही. पुढील दाव्या रोध.

---

१. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ३ द्वारे "राज्य" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल केला.

२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिलाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "किंवा बादशहाच्या प्रतिनिधीने" हा मजकूर वगळण्यात आला.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिज मॅजस्टी इन कौन्सिलपुढे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ६ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

परदेशी न्यायनिर्णय केव्हा निर्णायक नसेल.

१३. परदेशी न्यायनिर्णय हा, त्याद्वारे जी बाब त्याच पक्षकारांमध्ये अगर त्याच हक्कान्वये लढणाऱ्या ज्या पक्षकारांच्या पोटी ते अगर त्यांच्यापैकी कोणीही हक्क सांगत असतील त्या पक्षकारांमध्ये अभिनिर्णीत झाली असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधी पुढील प्रकरणांव्यतिरिक्त एरव्ही निर्णायक ठरेल,—

(क) तो न्यायनिर्णय सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने घोषित केलेला नसेल तेव्हा;

(ख) तो प्रकरणाच्या गुणावगुणांनुसार दिलेला नसेल तेव्हा;

(ग) तो आंतरराष्ट्रीय कायद्यासंबंधीच्या चुकीच्या दृष्टिकोनावर किंवा जेथे [१][भारताचा] कायदा लागू होतो अशा प्रकरणी तो कायदा विचारात न घेता निर्णय दिलेला आहे असे त्या कार्यवाहीवरून सकृतदर्शनी दिसून येत असेल तेव्हा;

(घ) ज्या कार्यवाहीमध्ये तो न्यायनिर्णय मिळवलेला असेल ती, नैसर्गिक न्यायाची तत्त्वे न पाळता केली असेल तेव्हा;

(ङ) तो न्यायनिर्णय कपटाने मिळवलेला असेल तेव्हा;

(च) ज्यायोगे [१][भारतामध्ये] अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचा भंग होत असेल अशी हक्कमागणी त्याद्वारे मान्य करण्यात आली असेल तेव्हा.

परदेशी न्याय-निर्णयांच्या संबंधात गृहीतक.

१४. जो दस्तऐवज परदेशी न्यायनिर्णयाची प्रमाणित प्रत असल्याचे दिसते असा कोणताही दस्तऐवज हजर करण्यात आल्यावर, दप्तरावरून विरुद्ध काही दिसून येत नसेल तर, न्यायालयाने असे गृहीत धरले पाहिजे की, असा न्यायनिर्णय सक्षम अधिकारितेच्या न्यायालयाने घोषित केलेला आहे; पण त्याला अधिकारिता नव्हती असे शाबीत करून, असे गृहीतक खोडून काढता येईल.

दावा दाखल करण्याचे स्थळ

कोणत्या न्याया-लयात दावे दाखल करावेत.

१५. प्रत्येक दावा, त्याची संपरीक्षा करण्यास सक्षम असलेल्या सर्वांत कनिष्ठ न्यायालयात दाखल करावा लागेल.

दाव्याची विषय-वस्तू जेथे असेल तेथ दावे दाखल करावेत.

१६. कोणत्याही कायद्याद्वारे विहित केलेल्या द्रव्यविषयक किंवा इतर मर्यादांच्या अधीनतेने—

(क) भाडे किंवा लाभ यांच्यासह किंवा त्याशिवाय स्थावर मालमत्ता परत मिळविण्यासाठी

(ख) स्थावर मालमत्तेचे विभाजन करण्यासाठी,

(ग) स्थावर मालमत्तेवर गहाण किंवा प्रभार असेल त्या बाबतीत पुरोबंध, विक्री किंवा विमोचन यासाठी,

(घ) स्थावर मालमत्तेवरील अन्य कोणताही अधिकार किंवा तीमधील हितसंबंध निर्धारित करण्यासाठी,

(ङ) स्थावर मालमत्तेसंबंधी केलेल्या दुष्कृतीबद्दलच्या भरपाईसाठी,

(च) प्रत्यक्षात अटकावणीखाली किंवा जप्तीखाली असलेली जंगम मालमत्ता परत मिळवण्यासाठी

करावयाचे दावे, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये ती मालमत्ता आहे त्या न्यायालयात दाखल करावे लागतील :

परंतु, प्रतिवादीने किंवा त्याच्या वतीने, धारण केलेल्या मालमत्तेसंबंधी अनुतोष मिळविण्यासाठी किंवा त्या मालमत्तेबाबत केलेल्या दुष्कृतीबद्दल भरपाई मिळवण्यासाठी दावा लावावयाचा असून, अपेक्षित अनुतोष सर्वस्वी त्याच्या व्यक्तिगत आज्ञापालनातच मिळवता येण्यासारखा असेल तेव्हा, तो दावा, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये ती मालमत्ता असेल त्या न्यायालयात अथवा ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये प्रतिवादी प्रत्यक्षात आणि स्वेच्छेने राहत असेल, किंवा धंदा करीत असेल, किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत असेल त्या न्यायालयात दाखल करता येईल.

स्पष्टीकरण.—या कलमामध्ये "मालमत्ता" याचा अर्थ, [१][भारतामध्ये] असलेली मालमत्ता, असा आहे.

वेगवेगळ्या न्यायालयांच्या अधिकारितेत असलेल्या स्थावर मालमत्तेसाठी दावे.

१७. जेव्हा वेगवेगळ्या न्यायालयांच्या अधिकारितेत असलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधी अनुतोष मिळविण्यासाठी किंवा तिच्या बाबतीत केलेल्या दुष्कृतीबद्दलच्या भरपाईसाठी दावा लावावयाचा असेल तेव्हा, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये मालमत्तेचा कोणताही भाग असेल अशा कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येईल :

परंतु, दाव्याच्या विषयवस्तूच्या मूल्याच्या बाबतीत, संपूर्ण हक्कमागणी अशा न्यायालयाच्या अख-त्यारीत येईल.

---

१. सन १९५१ चा अधिनियम २, कलम-३ द्वारे "राज्य" या शब्दाऐवजी हा शब्द व्याकरणिक फेर-फारांसह दाखल करण्यात आला.

जेव्हा न्यायालयांच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा अनिश्चित असतात तेव्हा दावा दाखल करण्याचे स्थळ.

१८. (१) स्थावर मालमत्ता दोन किंवा अधिक न्यायालयांपैकी कोणाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये येते हे अनिश्चित आहे असे जेव्हा अभिकथन केलेले असेल तेव्हा, त्यांपैकी कोणत्याही एका न्यायालयास, अभिकथित अनिश्चिततेला आधार आहे अशी त्याची खात्री पटल्यास, त्या आशयाचे निवेदन नमूद करता येईल आणि त्यानंतर त्या मालमत्तेसंबंधीचा कोणताही दावा विचारार्थ घेऊन तो निकालात काढण्याची कार्यवाही करता येईल, आणि जणू काही ती मालमत्ता त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये असावी तशाच प्रकारे दाव्यातील त्याचा हुकूमनामा परिणामक होईल :

परंतु, दाव्याच्या स्वरूपासंबंधी व मूल्यासंबंधी अधिकारिता वापरण्यास ते न्यायालय सक्षम असेल अशाच प्रकारचा तो दावा असला पाहिजे.

(२) जर पोटकलम (१) अन्वये निवेदन नमूद केलेले नसेल, आणि अशा मालमत्तेसंबंधीच्या दाव्यातील हुकूमनामा अथवा आदेश हा मालमत्ता जेथे आहे तेथे अधिकारिता नसलेल्या न्यायालयाने काढलेला आहे असा आक्षेप अपील न्यायालयासमोर किंवा पुनरीक्षण न्यायालयासमोर घेतला गेला तर, अपील न्यायालयाने किंवा पुनरीक्षण न्यायालयाने दावा दाखल करण्याचे वेळी त्यासंबंधी कोणत्या न्यायालयाला अधिकारिता आहे याबाबत अनिश्चितता बाळगण्यास रास्त आधार नव्हता आणि परिणामी त्या बाबतीत न्याय झालेला नाही असे त्याला वाटत नसेल तर, तो आक्षेप मान्य करता कामा नये.

व्यक्ती किंवा जंगम मालमत्ता यासंबंधीच्या दुष्कृतीबद्दलच्या भरपाईसाठी दावे.

१९. व्यक्ती अथवा जंगम मालमत्ता यांच्याबाबत केलेल्या दुष्कृतीबद्दलच्या भरपाईसाठी दावा लावावयाचा असेल त्या बाबतीत, जर दुष्कृती एका न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये केलेली असेल आणि प्रतिवादी दुसऱ्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये राहत असेल, किंवा धंदा करीत असेल, किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करत असेल तर, वादीच्या विकल्पानुसार उक्त दोहोंपैकी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येईल.

उदाहरणे

(क) दिल्ली येथे राहत असलेला 'क' हा 'ख' ला कलकत्त्यामध्ये मारहाण करतो. 'ख' ला 'क' च्या विरुद्ध कलकत्ता किंवा दिल्ली या दोहोंपैकी कोठेही दावा दाखल करता येईल.

(ख) दिल्ली येथे राहत असलेला 'क' हा कलकत्त्यामध्ये 'ख' च्याबाबत अब्रुनुकसानकारक निवेदने प्रसिद्ध करतो. 'ख' ला 'क' च्या विरुद्ध कलकत्ता किंवा दिल्ली या दोहोंपैकी कोठेही दावा दाखल करता येईल.

अन्य दावे प्रतिवादी राहात असतील तेथे किंवा वादकारण उद्भवले असेल तेथे दाखल करावेत.

२०. पूर्वोक्त मर्यादांच्या अधीनतेने, प्रत्येक दावा अशा न्यायालयात दाखल केला जाईल की, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये,—

(क) प्रतिवादी, किंवा जेव्हा एकापेक्षा अधिक प्रतिवादी असतील तेव्हा त्यांच्यापैकी प्रत्येक प्रतिवादी, दाव्याच्या प्रारंभाच्या वेळी प्रत्यक्षपणे आणि स्वेच्छेने राहत असेल, किंवा धंदा करत असेल, किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करत असेल ; किंवा

(ख) जेव्हा एकापेक्षा अधिक प्रतिवादी असतील तेव्हा त्यांच्यापैकी कोणताही प्रतिवादी दाव्याच्या प्रारंभाच्या वेळी प्रत्यक्षपणे आणि स्वेच्छेने राहत असेल, किंवा धंदा करत असेल किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करत असेल, मात्र, अशा बाबतीत न्यायालयाने अनुज्ञा दिलेली असली पाहिजे, किंवा पूर्वोक्तप्रमाणे जे प्रतिवादी राहत नसतील, किंवा धंदा करत नसतील, किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करत नसतील त्यांनी असा दावा दाखल केला जाण्यास मूकसंमती दिलेली असली पाहिजे ; किंवा

(ग) पूर्णतः किंवा अंशतः वादकारण उद्भवले असेल.

[१]* * * *

[२][स्पष्टीकरण].—जर महामंडळाचे एकमेव किंवा मुख्य कार्यालय [३][भारतात] असेल तर त्या ठिकाणी किंवा जेथे त्याचे एखादे दुय्यम कार्यालयही असेल तेथे उद्भवणाऱ्या कोणत्याही वादकारणाच्या बाबतीत, अशा ठिकाणी महामंडळ धंदा करते असे मानले जाईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७ (एक) द्वारे 'स्पष्टीकरण पहिले' वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७(दोन) द्वारे, "स्पष्टीकरण दुसरे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. "राज्यात" या शब्दाऐवजी हा शब्द, सन १९५१ चा अधिनियम २, कलम ३ द्वारे घातला.

उदाहरणे

(क) 'क' हा कलकत्त्यातील एक व्यापारी आहे. 'ख' दिल्लीमध्ये धंदा करतो. 'ख' हा आपल्या कलकत्त्यातील अभिकर्त्यांच्या मार्फत 'क' चा माल विकत घेतो आणि तो ईस्ट इंडियन रेल्वे कंपनीकडे सुपूर्द करण्याची 'क' ला विनंती करतो. त्याप्रमाणे 'क' तो माल कलकत्त्यामध्ये सुपूर्द करतो. 'क' हा मालाच्या किमतीसाठी 'ख' च्या विरुद्ध, जेथे वादकारण उद्भवले त्या कलकत्त्यामध्ये किंवा 'ख' जेथे धंदा चालवतो त्या दिल्लीमध्ये दावा दाखल करू शकेल.

(ख) 'क' सिमल्याला, 'ख' कलकत्त्याला आणि 'ग' दिल्लीला राहतो. 'क', 'ख' आणि 'ग' बनारस येथे एकत्र आले असता, 'ख' आणि 'ग' हे मागणीप्रदेय अशी एक संयुक्त वचनचिठ्ठी लिहून ती 'क' कडे सुपूर्द करतात. 'क' हा जेथे वादकारण उद्भवले त्या बनारसमध्ये 'ख' आणि 'ग' च्या विरुद्ध दावा दाखल करू शकेल; तो त्यांच्याविरुद्ध जेथे 'ख' राहतो त्या कलकत्त्यामध्ये किंवा जेथे 'ग' राहतो त्या दिल्लीमध्ये देखील दावा करू शकेल. पण यांपैकी प्रत्येक बाबतीत, जर तेथे न राहणाऱ्या प्रतिवादीने आक्षेप घेतला तर, न्यायालयाच्या अनुज्ञेशिवाय दावा पुढे चालविता येणार नाही.

अधिकारितेला आक्षेप.

२१. [(१) दावा लावण्याच्या स्थळाबाबतचा कोणताही आक्षेप, मूळ न्यायालयात शक्य तितकी लवकरची संधी साधून आणि वादप्रश्न निश्चित झाले असतील अशा सर्व प्रकरणी अशा निश्चितीच्या वेळी किंवा तत्पूर्वी घेतलेला नसेल तर, आणि परिणामी न्याय झालेला नसेल तर, कोणत्याही अपील किंवा पुनरीक्षण न्यायालयाने असा आक्षेप मान्य करता कामा नये.

[(२) न्यायालयाच्या अधिकारितेच्या द्रव्यविषयक मर्यादांच्या संदर्भात न्यायालयाच्या सक्षमतेविषयीचा कोणताही आक्षेप, असा आक्षेप मूळ न्यायालयात शक्य तितकी लवकरची संधी साधून व वादप्रश्न निश्चित झाले असतील अशा सर्व प्रकरणी अशा निश्चितीच्या वेळी किंवा त्यापूर्वी घतलेला नसेल तर, आणि परिणामी न्याय झालेला नसेल तर, कोणत्याही अपील किंवा पुनरीक्षण न्यायालयाने मान्य करता कामा नये.]

(३) न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांच्या संदर्भात न्यायालयाच्या सक्षमतेविषयीचा कोणताही आक्षेप, असा आक्षेप अंमलबजावणी न्यायालयात शक्य तितकी लवकरची संधी साधून घेतलेला नसेल तर, आणि परिणामी न्याय झालेला नसेल तर, कोणत्याही अपील किंवा पुनरीक्षण न्यायालयाने मान्य करता कामा नये.]

दावा चालवण्याच्या स्थळाबाबतच्या आक्षेपावरून हुकूमनामा रद्द करण्याच्या दाव्यास आडकाठी.

[२१क. त्याच पक्षकारांमधील किंवा त्याच हक्कान्वये वाद लढवणाऱ्या ज्या पक्षकारांच्या पोटी ते किंवा त्यांच्यापैकी कोणीही हक्क सांगत असतील त्या पक्षकारांमधील पूर्वीच्या दाव्यामध्ये काढलेल्या हुकूमनाम्याच्या विधिग्राह्यतेस दाव्याच्या स्थळाबाबतच्या आक्षेपावर आधारलेल्या कोणत्याही कारणावरून आव्हान देण्यासाठी दावा दाखल करता येणार नाही.

स्पष्टीकरण.—"पूर्वीचा दावा" याचा अर्थ, हुकूमनाम्याच्या विधिग्राह्यतेबाबत ज्या दाव्यामध्ये प्रश्न उपस्थित केला असेल त्या दाव्यामधील निर्णयाच्या पूर्वी निर्णीत केलेला दावा, असा आहे, मग पूर्वी निर्णीत केलेला तो दावा, ज्या दाव्यामध्ये असा हुकूमनाम्याच्या विधिग्राह्यतेबाबत प्रश्न उपस्थित केला आहे असा दावा मांडण्यापूर्वी सुरू केलेला असो वा नसो.]

जे दावे एकापेक्षा अधिक न्यायालयात मांडता येतात ते दावे वर्ग करण्याची शक्ती.

२२. जेव्हा एखादा दावा दोन किंवा अधिक न्यायालयांपैकी कोणत्याही एका न्यायालयास दाखल केला जाऊ शकतो आणि तो अशांपैकी एका न्यायालयात दाखल केलेला असेल तेव्हा, कोणत्याही प्रतिवादीस दुसऱ्या पक्षकारांना नोटीस देऊन नंतर, शक्य तितकी लवकरची संधी साधून आणि वादप्रश्न निश्चित झाले असतील अशा सर्व प्रकरणी अशा निश्चितीच्या वेळी किंवा तत्पूर्वी, तो दावा दुसऱ्या न्यायालयाकडे वर्ग करून मिळावा म्हणून अर्ज करता येईल आणि ज्या न्यायालयाकडे हा अर्ज केला असेल त्या न्यायालयाने, इतर पक्षकारांचे आक्षेप (तसे आक्षेप असल्यास) विचारात घेतल्यानंतर, अधिकारिता असलेल्या अनेक न्यायालयांपैकी कोणत्या न्यायालयात दावा दाखल करावा ते ठरविले पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८ द्वारे मूळ कलम २१ ला त्याचे पोट कलम (१) असा क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२३. (१) जेव्हा अधिकारिता असलेली अनेक न्यायालये एकाच अपील न्यायालयास दुय्यम असतील तेव्हा, कलम २२ खाली करावयाचा अर्ज अपील न्यायालयाकडे करावा लागेल. अर्ज कोणत्या न्यायालयाकडे करता येईल.

(२) जेव्हा अशी न्यायालये वेगवेगळ्या अपील न्यायालयांना, पण एकाच उच्च न्यायालयास दुय्यम असतील तेव्हा, असा अर्ज उक्त उच्च न्यायालयाकडे करावा लागेल.

(३) जेव्हा अशी न्यायालये वेगवेगळ्या उच्च न्यायालयांना दुय्यम असतील तेव्हा, ज्या न्यायालयात, दावा आणलेला आहे ते ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये असेल त्या उच्च न्यायालयाकडे असा अर्ज करावा लागेल.

२४. (१) पक्षकारांपैकी कोणाचाही अर्ज आल्यावर आणि (इतर) पक्षकारांना नोटीस देऊन, त्यांच्यापैकी ज्यांना आपले म्हणणे मांडण्याची इच्छा असेल त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर किंवा अशी नोटीस न देता, आपण होऊन, उच्च न्यायालयास किंवा जिल्हा न्यायालयास कोणत्याही टप्प्याला,— दावे वर्ग करण्याची आणि काढून घेण्याची सर्वसाधारण शक्ती.

(क) आपणापुढे प्रलंबित असलेला कोणताही दावा, अपील किंवा इतर कार्यवाही त्यास दुय्यम असलेल्या आणि त्यांची संपरीक्षा करण्यास किंवा ते निकालात काढण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे संपरीक्षा करण्यासाठी किंवा निकालात काढण्यासाठी वर्ग करता येईल, अथवा,

(ख) आपणास दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेला कोणताही दावा, अपील किंवा इतर कार्यवाही तेथून काढून घेता येईल, आणि—

(एक) स्वतःच त्याची संपरीक्षा करता येईल किंवा निकालात काढता येईल; किंवा

(दोन) आपणास दुय्यम असलेल्या आणि त्यांची संपरीक्षा किंवा निकाल करण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे संपरीक्षा करण्यासाठी किंवा निकालात काढण्यासाठी वर्ग करता येईल; किंवा

(तीन) ज्या न्यायालयाकडून तो काढून घेतला होता त्याच्याकडे संपरीक्षा करण्यासाठी किंवा निकालात काढण्यासाठी पुन्हा वर्ग करता येईल.

(२) जेव्हा कोणताही दावा किंवा कार्यवाही पोटकलम (१) खाली वर्ग केलेली असेल किंवा काढून घेतलेली असेल तेव्हा, जे न्यायालय [१][त्यानंतर अशा दाव्यांची किंवा कार्यवाहीची संपरीक्षा करणार असेल] त्या न्यायालयास, वर्ग करण्याच्या आदेशाच्या बाबतीतील कोणत्याही विशेष निदेशांच्या अधीनतेने, त्याची पुन्हा संपरीक्षा करता येईल किंवा ज्या टप्प्याला तो वर्ग केला गेला किंवा तो काढून घेतला गेला तेथपासून पुढे कार्यवाही चालू करता येईल.

[२][(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) अपर व सहायक न्यायाधीशांची न्यायालये ही जिल्हा न्यायालयाला दुय्यम असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) "कार्यवाही" यामध्ये, हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीचा समावेश होतो.]

(४) या कलमासाठी लघुवाद न्यायालयाकडून वर्ग करण्यात किंवा काढून घेण्यात आलेला कोणताही दावा चालविणारे न्यायालय, अशा दाव्याच्या प्रयोजनार्थ, लघुवाद न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.

[३][(५) या कलमाखाली एखादा दावा किंवा कार्यवाही, ज्या न्यायालयाला त्यांची न्यायचौकशी करण्याची अधिकारिता नसेल त्या न्यायालयाकडून वर्ग करता येईल.]

[४][२५. (१) एखाद्या पक्षकाराचा अर्ज आल्यावर आणि पक्षकारांना नोटीस देऊन, आणि त्यांच्यापैकी ज्यांना आपले म्हणणे मांडण्याची इच्छा असेल त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, कोणत्याही टप्प्याला सर्वोच्च न्यायालयास, न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी या कलमाखाली आदेश काढणे इष्ट आहे अशी त्याची खात्री झाल्यास, कोणताही दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही एका राज्यातील उच्च न्यायालयाकडून किंवा अन्य दिवाणी न्यायालयाकडून अन्य कोणत्याही राज्यातील उच्च न्यायालयाकडे किंवा अन्य दिवाणी न्यायालयाकडे वर्ग करण्यात यावी असा निदेश देता येईल. दावे वर्ग करण्याची सर्वोच्च न्यायालयाची शक्ती.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम १०(एक) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (दोन) द्वारे पोटकलम (३) ऐवजी दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १० (तीन) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे कलम २५ ऐवजी दाखल करण्यात आले.

(२) या कलमाखालील प्रत्येक अर्ज चालना-अर्जाद्वारे करावा लागेल व त्याच्या पुष्टयर्थ शपथपत्र जोडावे लागेल.

(३) ज्या न्यायालयाकडे असा दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही वर्ग करण्यात आली असेल त्या न्यायालयाने, वर्ग करण्याच्या आदेशामध्ये कोणतेही विशेष निदेश असल्यास त्यांच्या अधीनतेने, त्याची एकतर पुन्हा संपरीक्षा केली पाहिजे किंवा ज्या टप्प्याला त्याच्याकडे तो दावा, अपील किंवा अन्य कार्यवाही वर्ग करण्यात आली असेल त्या टप्प्यापासून त्यावर पुढे कार्यवाही चालू केली पाहिजे.

(४) या कलमाखालील कोणताही अर्ज फेटाळताना, तो अर्ज क्षुल्लक कारणास्तव अथवा त्रास देण्याच्या हेतूने केलेला आहे असे सर्वोच्च न्यायालयास वाटले तर, त्यास, ज्या कोणत्याही व्यक्तीने अर्जास विरोध केला असेल त्या व्यक्तीला भरपाई म्हणून अर्जदाराने, त्या प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त दोन हजार रुपयांइतकी रक्कम द्यावी, असा आदेश देता येईल.

(५) मुळात ज्या न्यायालयात कोणताही दावा, अपील किंवा कार्यवाही दाखल करण्यात आली होती त्या न्यायालयाने अशा दाव्यास, अपीलास किंवा कार्यवाहीस जो लागू करावयास हवा होता तोच कायदा या कलमाखाली वर्ग केलेल्या कोणत्याही दाव्यास, अपीलास किंवा अन्य कार्यवाहीस लागू असेल.]

दावे सुरू करणे

दावे सुरू करणे.

२६. प्रत्येक दावा वादपत्र दाखल करून किंवा विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने सुरू करावा लागेल.

समन्स व शोध

प्रतिवादींना समन्स.

२७. रीतसर दावा सुरू करण्यात आला असेल तेव्हा उपस्थित होऊन दाव्याला उत्तर देण्याकरिता प्रतिवादीवर समन्स काढता येईल आणि ते विहित रीतीने बजावता येईल.

प्रतिवादी अन्य राज्यात राहात असेल त्या बाबतीत समन्सची बजावणी.

२८. (१) अन्य राज्याकडे समन्स बजावताना ते त्या राज्यात अंमलात असलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा न्यायालयाकडे व अशा रीतीने पाठवता येईल.

(२) असे समन्स ज्या न्यायालयाकडे पाठवण्यात आले असेल त्या न्यायालयाने त्यास ते समन्स मिळाल्यानंतर, जणू काही ते त्याच न्यायालयाने काढलेले असावे त्याप्रमाणे कार्यवाही सुरू केली पाहिजे आणि नंतर, ते समन्स काढणाऱ्या न्यायालयाकडे त्यासंबंधातील त्याच्या कामकाजाच्या दप्तरासह (तसे दप्तर असल्यास) परत पाठविले पाहिजे.

[१][(३) बजावणीसाठी अन्य राज्यात पाठवलेल्या समन्सची भाषा पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दप्तराच्या भाषेहून वेगळी असेल तर,—

(क) समन्स काढणाऱ्या न्यायालयाची भाषा हिंदी असेल तर, हिंदीमधील, किंवा

(ख) अशा दप्तराची भाषा हिंदी किंवा इंग्रजी याहून वेगळी असेल तर, त्या दप्तराचा हिंदी किंवा इंग्रजीमधील,

अनुवादही त्या पोटकलमाखाली पाठवलेल्या दप्तराबरोबर पाठविला पाहिजे.]

परदेशी समन्सांची बजावणी.

[१][२९. (क) भारताच्या ज्या भागास या संहितेचे उपबंध लागू नाहीत अशा कोणत्याही भागात स्थापन झालेल्या कोणत्याही दिवाणी किंवा महसूल न्यायालयाने, किंवा

(ख) केंद्र शासनाच्या प्राधिकारान्वये भारताबाहेर स्थापन केलेल्या किंवा चालू ठेवलेल्या कोणत्याही दिवाणी किंवा महसूल न्यायालयाने, किंवा

(ग) भारताबाहेरील ज्या न्यायालयास या कलमाचे उपबंध लागू होतील असे केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित केले असेल अशा इतर कोणत्याही दिवाणी किंवा महसूल न्यायालयाने,

काढलेली समन्से व अन्य आदेशिका, जेथे या संहितेचा विस्तार आहे त्या राज्यक्षेत्रांतील न्यायालयांकडे पाठवता येतील आणि ती समन्से जणू काही अशा न्यायालयांनी काढलेली असावीत त्याप्रमाणे बजावता येतील.]

शोध घेण्याची व तत्सम आदेश देण्याची शक्ती.

३०. विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधीनतेने, न्यायालयास कोणत्याही वेळी स्वत: होऊन किंवा कोणत्याही पक्षकाराने केलेल्या अर्जावरून,—

(क) परिप्रश्न सुपूर्द करणे व त्यांची उत्तरे देणे, दस्तऐवज व तथ्ये दाखल करून घेणे, दस्तऐवज किंवा पुरावा म्हणून सादर करण्याजोगा दस्तऐवज किंवा इतर महत्त्वाच्या वस्तू शोधून काढण्याची

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम, १२ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ६ द्वारे बदली दाखल करण्यात आले.

व्यवस्था करणे, त्यांचे निरीक्षण करणे, ते हजर करणे, ते अडकवून ठेवणे व परत करणे यांच्याशी संबंधित अशा सर्व बाबींकरिता आवश्यक व वाजवी असतील असे आदेश देता येतील ;

(ख) साक्ष देण्यासाठी किंवा दस्तऐवज अथवा उपरोक्तप्रमाणे अशा इतर महत्त्वाच्या वस्तू हजर करण्यासाठी ज्यांची समक्ष हजेरी आवश्यक आहे, अशा व्यक्तींवर समन्से काढता येतील ;

(ग) कोणतेही तथ्य शपथपत्राच्ये शाबीत करण्याचा आदेश देता येईल.

३१. कलमे २७, २८ व २९ यांचे उपबंध, साक्ष देण्यासाठी किंवा दस्तऐवज अथवा इतर, साक्षीदारांना समन्स. महत्त्वाच्या वस्तू हजर करण्याकरिता काढलेल्या समन्सांना लागू होतील.

३२. कलम ३० खाली ज्या व्यक्तीवर समन्स काढण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीला कसुरीबद्दल शिक्षा. न्यायालयास समक्ष हजर राहण्याची सक्ती करता येईल आणि त्या प्रयोजनार्थ,—

(क) तिच्या अटकेचे वॉरंट काढता येईल;

(ख) तिची मालमत्ता जप्त करून तिची विक्री करता येईल;

(ग) तिच्यावर जास्तीत जास्त पाचशे रुपयांइतका द्रव्यदंड बसविता येईल;

(घ) तिच्या उपस्थितीसाठी प्रतिभूती सादर करण्याचा आदेश देता येईल आणि कसूर झाल्यास, तिची दिवाणी तुरुंगात रवानगी करता येईल.

न्यायनिर्णय व हुकूमनामा

३३. प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाने निकालपत्र दिले पाहिजे आणि निकालपत्र दिल्यानंतर हुकूमनामा काढला पाहिजे. न्यायनिर्णय व हुकूमनामा.

व्याज

३४. (१) हुकूमनामा पैसे देण्यासंबंधी असल्यास आणि तसा असेल तेथवर, न्यायालयास न्यायनिर्णय ज्यासंबंधी झाला आहे त्या मुद्दल-रकमेवर ज्या दराने व्याज आकारणे रास्त आहे असे त्यास वाटेल अशा दराने, दावा दाखल करण्यापूर्वीच्या कोणत्याही कालावधीबद्दल अशा मुद्दल-रकमेवर देववलेल्या कोणत्याही व्याजाशिवाय [1][आणखी, दाव्याच्या दिनांकापासून हुकूमनाम्याच्या दिनांकापर्यंत व्याज आकारण्याचा व तसेच, हुकूमनाम्याच्या दिनांकापासून प्रदानाच्या दिनांकापर्यंत, किंवा न्यायालयास योग्य वाटेल अशा तत्पूर्वीच्या दिनांकापर्यंत न्यायालयास रास्त वाटेल त्याप्रमाणे,] दरसाल दर शेकडा जास्तीत जास्त ६ अशा दराने अशा मुद्दल-रकमेवर अतिरिक्त व्याज आकारण्याचा आदेश देता येईल : व्याज.

[1][परंतु, अशाप्रकारे ज्यासंबंधी न्यायनिर्णय झाला आहे त्या रकमेच्या संबंधातील दायित्व वाणिज्यिक व्यवहारातून उद्भवलेले असेल तर, अशा अतिरिक्त व्याजाचा दर, दरसाल दर शेकडा ६ पेक्षा अधिक होऊ शकेल, परंतु संविदागत व्याजदरापेक्षा किंवा संविदेमध्ये कोणताही दर नमूद करण्यात आला नसेल तर, वाणिज्यिक व्यवहाराच्या संबंधात, राष्ट्रीयीकृत बँकांकडून ज्या दराने पैसे कर्जाऊ किंवा उधार देण्यात येतात त्या दरापेक्षा अधिक होणार नाही.

स्पष्टीकरण पहिले.—या पोटकलमात, "राष्ट्रीयीकृत बँक" यांचा अर्थ, बँक कंपन्या (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० (१९७० चा ५) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे समनुरूप नवीन बँक, असा आहे.

स्पष्टीकरण दुसरे.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, एखादा संव्यवहार हा, ज्याच्यावर दायित्व येते अशा पक्षकाराचा उद्योग, व्यापार किंवा धंदा याच्याशी निगडीत असला तर, तो वाणिज्यिक संव्यवहार ठरेल.]

(२) अशा हुकूमनाम्यामध्ये, [1][अशा मुद्दल-रकमेवर] हुकूमनाम्याच्या तारखेपासून प्रदानाच्या तारखेपर्यंत किंवा तत्पूर्वीच्या इतर तारखेपर्यंत अतिरिक्त व्याज देण्याच्या संबंधात कोणताही निर्देश करण्यात आला नसल्यास, न्यायालयाने असे व्याज देवदण्यास नकार दिला आहे, असे समजण्यात येईल आणि त्याकरिता वेगळा दावा दाखल करता येणार नाही.

---

१. सन १९५६ चा अधिनियम ६६, कलम २ द्वारे विवक्षित शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम १३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

दावा खर्च

दावा खर्च.

३५. (१) विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या आणि मर्यादांच्या, व त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधांच्या अधीनतेने, सर्व दाव्यांचा खर्च व तदनुषंगिक खर्च देवदणे हे न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयाधीन असेल, आणि असा खर्च कोणी किंवा कोणत्या मालमत्तेमधून आणि कोणत्या मर्यादेपर्यंत द्यावा हे ठरवण्याची व उपरोक्त प्रयोजनांकरता आवश्यक ते सर्व निदेश देण्याची न्यायालयास संपूर्ण शक्ती असेल. न्यायालयाला दाव्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता नाही ही गोष्ट अशा शक्तीच्या आपराच्या आड येणार नाही.

(२) कोणताही दावा खर्च निकालानुसार असणार नाही असा निदेश न्यायालयाने दिल्यास, न्यायालयाने त्याची कारणे लेखी नमूद केली पाहिजेत.

[1]* * * * *

खोटया किंवा तापदायक हक्कमागण्यांच्या किंवा बचावतक्रारींच्या संबंधात भरपाईदाखल खर्च.

[2][३५क. (१) [3][दरखास्तीतील अंमलबजावणीची कार्यवाही धरून,] पण [4][अपील किंवा पुनरीक्षण कार्यवाही वगळून] कोणत्याही दाव्यात किंवा इतर कार्यवाहीत जर कोणत्याही पक्षकाराने दाव्यातील हक्कमागणीस किंवा बचावतक्रारीस अशा कारणावरून हरकत घेतली की, ती हक्कमागणी किंवा बचावतक्रार अथवा तिचा कोणताही भाग हा, हरकतदाराचा संबंध येतो तेथवर, ज्या पक्षकाराने ती दाखल केली असेल त्या पक्षकाराला ते खोटे अथवा तापदायक असल्याचे माहीत आहे, आणि त्यानंतर जर, हरकतदारापुरती अशी हक्कमागणी किंवा बचावतक्रार संपूर्णत: किंवा अंशत: अमान्य करण्यात आली, सोडून देण्यात आली अथवा मागे घेण्यात आली तर, न्यायालयास [5][त्याला तसे योग्य वाटल्यास] अशी हक्कमागणी किंवा बचावतक्रार खोटी किंवा तापदायक आहे असे ठरवण्याबद्दलची आपली कारणे नमूद करून नंतर, ज्या पक्षकाराने अशी हक्कमागणी किंवा बचावतक्रार दाखल केली असेल त्या पक्षकाराने हरकतदाराला भरपाई म्हणून खर्च द्यावा असा आदेश देता येईल.

(२) कोणत्याही न्यायालयाने [6][तीन हजार रुपये] किंवा आपल्या आर्थिक अधिकारितेच्या मर्यादा यांपैकी कमी असेल त्या रकमेपेक्षा अधिक रकमेचा असा कोणताही आदेश काढता कामा नये :

परंतु, 'प्रांतिक लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८७' (१८८७ चा ९) या अन्वये [7][8][किंवा भारताच्या कोणत्याही भागात उक्त अधिनियमाचा विस्तार नाही अशा भागात] अंमलात असलेल्या समनुरूप कायद्यान्वये] लघुवाद न्यायालयाची अधिकारिता वापरणारे असून जे न्यायालय [9][असा कोणताही अधिनियम अथवा कायदा याअन्वये] स्थापन करण्यात आलेले नाही अशा कोणत्याही न्यायालयांच्या अधिकारितेच्या आर्थिक मर्यादा दोनशे पन्नास रुपयांपेक्षा कमी असतील तर उच्च न्यायालय अशा न्यायालयास, या कलमाखाली जास्तीत जास्त दोनशे पन्नास रुपयांपर्यंत आणि अधिकारितेच्या आर्थिक मर्यादेपलीकडे जास्तीत जास्त शंभर रुपयांपर्यंत कितीही रक्कम दावाखर्च म्हणून निवाडयाने देवविण्याची शक्ती देऊ शकेल :

परंतु, आणखी असे की, या कलमाखालील दावाखर्च म्हणून जी रक्कम निवाडयाने देवविण्याची शक्ती कोणत्याही न्यायालयास किंवा कोणत्याही वर्गातील न्यायालयास आहे त्यावर उच्च न्यायालयास मर्यादा घालता येईल.

(३) या कलमान्वये एखाद्या व्यक्तीविरुद्ध आदेश काढण्यात आला असेल तर तेवढया कारणावरून अशा कोणत्याही व्यक्तीस, तिने दाखल केलेली कोणतीही हक्कमागणी किंवा बचावतक्रार यांच्या संबंधातील फौजदारी दायित्वामधून सूट मिळणार नाही.

---

१. पोटकलम (३) हे, सन १९५६ चा अधिनियम ६६, कलम ३ द्वारे वगळण्यात आले.

२. कलम ३५क हे १९२२ चा अधिनियम ९, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले. या अधिनियमाच्या कलम १(२) अन्वये ते, कोणतेही प्रांतिक शासन, कोणत्याही प्रांतात कोणत्याही विनिर्दिष्ट तारखेपासून अंमलात आणू शकते. ते त्याप्रमाणे मुंबई, बंगाल, उत्तर प्रदेश, पंजाब, बिहार, मध्यप्रांत, आसाम, ओरिसा व तामिळनाडूमध्ये अंमलात आणले आहे.

३. सन १९५६ चा अधिनियम ६६, कलम ४ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

४. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम १४ (एक) द्वारे "अपील वगळून" या ऐवजी दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम १४ (दोन) द्वारे "एक हजार रुपये" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

६. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ७ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

७. विधि अनुकूलन (क्र. २) आदेश, १९५६ द्वारे "भाग ख राज्यात" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

८. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ७ द्वारे, "त्या अधिनियमान्वये" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

(४) खोटी किंवा तापदायक हक्कमागणी किंवा बचावतक्रार यांच्याबाबतीत या कलमान्वये देववियलेली कोणतीही भरपाईची रक्कम ही, अशी हक्कमागणी किंवा बचावतक्रार यांच्यासंबंधात नुकसानी किंवा भरपाई मिळवण्याकरता मागाहून लावलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये हिशेबात घेतली जाईल.]

[१][३५ख. (१) दाव्याच्या सुनावणीसाठी किंवा त्यामधील एखादी कार्यवाही करण्यासाठी निश्चित केलेल्या कोणत्याही तारखेस जर दाव्यातील पक्षकाराने,— विलंब केल्याबद्दल खर्च.

(क) त्याने त्या तारखेस जी कार्यवाही करणे या संहितेद्वारे किंवा लीखाली आवश्यक होते ती कार्यवाही करण्यास कसूर केली तर, किंवा

(ख) अशी कार्यवाही करण्यासाठी किंवा पुरावा हजर करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी तहकुबी मिळवली तर,

न्यायालयास, कारणे नमूद करून, त्या कारणास्तव एक आदेश काढून त्याद्वारे, अशा पक्षकाराने दुसऱ्या पक्षकारास त्या तारखेस न्यायालयात हजर होण्यासाठी जो खर्च आला असेल त्याबाबत त्या दुसऱ्या पक्षकाराची प्रतिपूर्ती करण्यास न्यायालयाच्या मते वाजवी मर्यादेपर्यंत पुरेशी होईल अशी खर्चाची रक्कम द्यावी असे फर्माविता येईल—

(क) असा खर्च देण्याचा आदेश वादीला दिलेला असेल त्याबाबतीत, वादीकडून लावण्यात आलेला दावा;

(ख) असा खर्च देण्याचा आदेश प्रतिवादीला दिलेला असेल त्याबाबतीत, प्रतिवादीकडून केला जाणारा बचाव,

व अशा आदेशाच्या तारखेनंतर लगेच पुढच्या दिवशी असा खर्च आधी देणे ही, असा दावा किंवा बचाव पुढे चालविण्यासाठी पूर्वशर्त असेल.

स्पष्टीकरण.—वेगवेगळ्या प्रतिवादींकडून किंवा प्रतिवादींच्या गटांकडून वेगवेगळे बचाव देण्यात आले असतील त्याबाबतीत, असा खर्च देण्यासंबंधी न्यायालयाने ज्यांना आदेश दिला असेल अशा प्रतिवादींना किंवा प्रतिवादींच्या गटांना बचाव पुढे चालू ठेवायचा असल्यास त्यांना आधी असा खर्च देणे ही पूर्वशर्त असेल.

(२) पोटकलम (१) खाली जो खर्च देण्याचा आदेश देण्यात आला असेल तो खर्च दिला तर, दाव्यामध्ये काढलेल्या हुकूमनाम्याद्वारे देववियला जाणाऱ्या रकमेमध्ये त्याचा समावेश करण्यात येणार नाही; पण असा खर्च दिला नाही तर, अशा खर्चाची रक्कम व तो ज्यांच्याकडून येणे असेल त्या व्यक्तींची नावे व पत्ते नमूद करणारे आदेशपत्र तयार करण्यात येईल व अशाप्रकारे काढलेल्या आदेशाची अशा व्यक्तींच्या विरुद्ध अंमलबजावणी केली जाईल.]

भाग दुसरा

अंमलबजावणी

सर्वसाधारण

[२][३६. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसंबंधी या संहितेत असलेले उपबंध (हुकूमनाम्याखालील प्रदानासंबंधातील उपबंध धरून) लागू होत असतील तेथवर, आदेशाच्या अंमलबजावणीला (आदेशाखालील प्रदानालासुद्धा) लागू होत असल्याचे मानण्यात येईल.] आदेशांना लागू असणे.

३७. "ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला ते न्यायालय" हा शब्दप्रयोग किंवा तशा अर्थाचे शब्द यामध्ये, हुकूमनाम्यांच्या अंमलबजावणीच्या संबंधात, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,— ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला त्याची व्याख्या.

(क) अंमलबजावणी करावयाचा हुकूमनामा अपील अधिकारितेचा वापर करून काढण्यात आला असेल तर, प्रारंभिक न्यायालय, आणि

(ख) प्रारंभिक न्यायालय अस्तित्वात असण्याचे किंवा त्याला हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याची अधिकारिता असण्याचे बंद झाले असेल त्याबाबतीत, ज्या दाव्यामध्ये हुकूमनामा काढण्यात आला असेल तो दावा जर हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता अर्ज करण्याच्या वेळी दाखल करण्यात आला असता तर, ज्या न्यायालयास अशा दाव्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता प्राप्त झाली असती ते न्यायालय,

यांचा समावेश असल्याचे मानण्यात येईल.

[३][स्पष्टीकरण.—ज्या दाव्यामध्ये हुकूमनामा काढला असेल तो दावा दाखल केल्यानंतर किंवा हुकूमनामा काढण्यात आल्यानंतर कोणत्याही क्षेत्र प्रारंभिक न्यायालयाच्या अधिकारितेतून दुसऱ्या कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेकडे वर्ग करण्यात आले, एवढ्याच केवळ कारणावरून त्या प्रारंभिक

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम १५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ द्वारे कलम ३६ ऐवजी बदली दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

न्यायालयाला हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याची अधिकारिता असण्याचे बंद होणार नाही; परंतु, अशा प्रत्येक प्रकरणी, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी अर्ज करण्याच्या वेळी अशा दुसऱ्या न्यायालयास उक्त दाव्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असेल तर, त्यास हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याचीही अधिकारिता असेल.]

कोणत्या न्यायालयांना हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करता येईल

कोणत्या न्यायालयाला हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता येईल.

३८. हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला असेल त्या न्यायालयाला किंवा तो अंमलबजावणीसाठी ज्या न्यायालयाकडे पाठवण्यात आला असेल त्या न्यायालयाला, त्याची अंमलबजावणी करता येईल.

हुकूमनामा वर्ग करणे.

३९. (१) ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला असेल त्या न्यायालयास, हुकूमनामाधारकाच्या अर्जावरून तो हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पुढील बाबतीत [१][सक्षम अधिकारितेच्या] अन्य न्यायालयाकडे पाठवता येईल :—

(क) ज्या व्यक्तीच्या विरुद्ध तो हुकूमनामा काढण्यात आला असेल ती व्यक्ती वस्तुतः व स्वेच्छेने अशा अन्य न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये राहात असेल किंवा धंदा करीत असेल किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः काम धंदा करीत असेल तर, किंवा

(ख) अशा व्यक्तीची, ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला त्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये अशा हुकूमनाम्याची फेड करण्यास पुरेल इतकी मालमत्ता नसेल आणि अशा अन्य न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये तिची मालमत्ता असेल तर; किंवा

(ग) ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला त्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांच्या बाहेर असलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री किंवा सुपूर्दगी करण्यासाठी हुकूमनाम्याद्वारे निदेश देण्यात आला असेल तर, किंवा

(घ) ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला अशा न्यायालयास इतर कोणत्याही कारणास्तव (जे त्याला लेखी नमूद करावे लागेल) अशा अन्य न्यायालयाने हुकूमनाम्याची अंमलबजावणी करावी असे वाटत असेल तर.

(२) ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला त्या न्यायालयास स्वतः होऊन हुकूमनामा अंमलबजावणीसाठी सक्षम अधिकारितेच्या कोणत्याही दुय्यम न्यायालयाकडे पाठवता येईल.

[१][(३) हुकूमनामा एखाद्या न्यायालयाकडे वर्ग करण्यात यावा असा अर्ज करण्यात आला असेल त्यावेळी, ज्या दाव्यामध्ये असा हुकूमनामा काढण्यात आला असेल त्या दाव्याची संपरीक्षा करण्यास त्या न्यायालयास अधिकारिता होती असे असेल तर, ते न्यायालय सक्षम अधिकारितेचे न्यायालय होय असे या कलमाच्या प्रयोजनार्थ मानण्यात येईल.]

हुकूमनाम्याचे दुसऱ्या राज्यातील न्यायालयाकडे हस्तांतरण.

४०. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी तो दुसऱ्या राज्यात पाठवण्यात आल्यास, त्या राज्यात अंमलात असलेल्या नियमांन्वये विहित करण्यात आले असेल अशा न्यायालयाकडे तो पाठवण्यात येईल व तशा विहित पद्धतीने त्याची अंमलबजावणी करण्यात येईल.

अंमलबजावणीच्या कार्यवाहींचा निष्कर्ष प्रमाणित करणे.

४१. ज्या न्यायालयाकडे हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पाठवण्यात आला असेल त्या न्यायालयाने हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला असेल त्या न्यायालयाला अशी अंमलबजावणी झाल्याचे वृत्त अथवा प्रथमोक्त न्यायालय त्याची अंमलबजावणी करू शकले नाही तर, कोणत्या परिस्थितीमुळे तसे घडले त्यासंबंधीचे वृत्त कळविले पाहिजे.

हस्तांतरित हुकूमनाम्याची अंमलबजावणी करत असताना न्यायालयाला असलेल्या शक्ती.

४२. [१][(१) आपणाकडे पाठवण्यात आलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करत असताना, जणू काही तो हुकूमनामा त्या न्यायालयानेच काढलेला असावा त्याप्रमाणेच शक्ती असतील. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीची आज्ञा करणाऱ्या किंवा त्या कामी अडथळा आणणाऱ्या सर्व व्यक्ती, जणू काही, तो हुकूमनामा त्या न्यायालयानेच काढलेला असावा त्याप्रमाणे, अशा न्यायालयाकडून शिक्षा भिठण्यास पात्र असतील आणि अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना त्या न्यायालयाने दिलेला आदेश, जणू काही, तो हुकूमनामा त्या न्यायालयानेच काढलेला असावा त्याप्रमाणे अपिलाच्या बाबतीत त्याच नियमास अधीन असेल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम १८ (एक) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १८(दोन) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम १९ द्वारे मूळ कलम ४२ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा क्रमांक दिला.

[१][(२) पोटकलम (१) च्या उपबंधांच्या व्यापकतेला बाध न येता, त्या पोटकलमाखालील न्यायालयाच्या शक्तींमध्ये, ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला असेल त्या न्यायालयाच्या शक्तीमध्ये पुढील शक्तींचा समावेश असेल, त्या अशा :—

(क्) कलम ३९ खाली हुकूमनामा दुसऱ्या न्यायालयाकडे अंमलबजावणीसाठी पाठविण्याची शक्ती;

(ख्) कलम ५० खाली मयत निर्णीत ऋणकोच्या कायदेशीर प्रतिनिधींच्याविरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याची शक्ती ;

(ग्) हुकूमनाम्याच्या जप्तीचा आदेश देण्याची शक्ती.

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शक्तींचा वापर करून आदेश काढणाऱ्या न्यायालयाने, ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला असेल त्या न्यायालयाकडे त्या आदेशाची एक प्रत पाठविली पाहिजे.

(४) ज्या न्यायालयाकडे हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पाठविला असेल त्या न्यायालयाला या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे पुढीलपैकी कोणतीही शक्ती दिली जाते असे मानण्यात येणार नाही :—

(क्) हुकूमनामा ज्याच्याकडे वर्ग केला असेल त्याच्या विनंतीवरून अंमलबजावणीचा आदेश देण्याची शक्ती;

(ख्) एखाद्या पेढीविरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्याच्या बाबतीत, आदेश एकवीस, नियम ५० च्या पोटनियम (१) मधील खंड (ख्) किंवा खंड (ग्) यांमध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्ती सोडून अन्य कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यास परवानगी देण्याची शक्ती.]

ही संहिता जेथे लागू नसेल अशा ठिकाणच्या दिवाणी न्यायालयांनी काढलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी.

[२][४३. भारताच्या ज्या कोणत्याही भागात या संहितेचे उपबंध लागू नसतील तेथे स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही दिवाणी न्यायालयाने किंवा भारताच्या बाहेर कंद्र शासनाच्या प्राधिकारान्वये स्थापन केलेल्या किंवा चालू ठेवलेल्या कोणत्याही न्यायालयाने काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याची अंमलबजावणी, तो ज्या न्यायालयाने काढला त्याच्या अधिकारितेत होणे शक्य नसेल तर, ही संहिता ज्या राज्यक्षेत्रांवर विस्तारित आहे त्यातील कोणत्याही न्यायालयाच्या अधिकारितेत, यापुढे उपबंधित केलेल्या पद्धतीने, त्याची अंमलबजावणी करता येईल.]

ही संहिता जेथे लागू नसेल अशा ठिकाणच्या महसूल न्यायालयांनी काढलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी.

[१][४४. राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की भारताच्या ज्या कोणत्याही भागात या संहितेचे उपबंध लागू नसतील तेथील कोणत्याही महसूल न्यायालयाचे हुकूमनामे किंवा अशा हुकूमनाम्यांपैकी कोणत्याही वर्गातील हुकूमनामे हे जणू काही त्या राज्यातील न्यायालयाने काढलेले असावेत त्याप्रमाणे त्या राज्यात त्यांची अंमलबजावणी करता येईल.]

प्रतियोगी राज्यक्षेत्रातील न्यायालयांनी काढलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी.

[४][४४क. (१) [५]* * * कोणत्याही प्रतियोगी राज्यक्षेत्रातील वरिष्ठ न्यायालयांपैकी कोणत्याही न्यायालयाच्या हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आल्यास, तो हुकूमनामा जणू काही त्या जिल्हा न्यायालयाने काढलेला असावा त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी [६][भारतात] करता येईल.

(२) हुकूमनाम्याच्या प्रमाणित प्रतीसोबत, त्या हुकूमनाम्याची फेड किंवा समायोजन झाले असल्यास ती किती आहे हे नमूद करणारे अशा वरिष्ठ न्यायालयाचे प्रमाणपत्र दाखल करावे लागेल आणि असे प्रमाणपत्र, या कलमाखालील कार्यवाहीच्या प्रयोजनार्थ, कितपत अशी फेड किंवा समायोजन झाले याचा निर्णायक पुरावा असेल.

(३) या कलमान्वये हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या जिल्हा न्यायालयाच्या कार्यवाहीस कलम ४७ चे उपबंध, हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत दाखल करण्यात आल्यापासून लागू होतील, आणि

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम १९ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ८ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

४. सन १९३७ चा अधिनियम ८, कलम २ द्वारे बदली दाखल करण्यात आले.

५. "युनायटेड किंग्डम किंवा" हा मजकूर सन १९५२ चा अधिनियम क्रमांक ७१, कलम २ द्वारे वगळण्यात आला.

६. "राज्यांमध्ये" या शब्दाऐवजी हा शब्द, सन १९५१ चा अधिनियम २, कलम ३ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

तो हुकूमनामा कलम १३, खंड (क्) ते (च्) यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपवादांपैकी कोणत्याही अपवादात मोडतो असे त्या जिल्हा न्यायालयाची खात्री होईल अशा प्रकारे दाखवून दिल्यास, त्या न्यायालयाने अशा कोणत्याही हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस नकार दिला पाहिजे.

[१][**स्पष्टीकरण पहिले.**—"प्रतियोगी राज्यक्षेत्र" याचा अर्थ, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या कलमाच्या प्रयोजनार्थ प्रतियोगी राज्यक्षेत्र म्हणून घोषित करील असा भारताबाहेरील कोणताही देश किंवा राज्यक्षेत्र असा आहे; आणि अशा कोणत्याही राज्यक्षेत्राच्या संबंधात "वरिष्ठ न्यायालय" याचा अर्थ, उक्त अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील ती न्यायालये, असा आहे.

स्पष्टीकरण दुसरे.—वरिष्ठ न्यायालयाच्या संबंधात "हुकूमनामा" याचा अर्थ, कर किंवा तत्सम स्वरूपाचे इतर आकार यांच्या संबंधात अथवा द्रव्यदंड किंवा इतर शास्ती यांच्या संबंधात देणे असलेली रक्कम सोडून अन्य एखादी पैशांची रक्कम ज्याअन्वये देणे असेल असा कोणताही हुकूमनामा किंवा न्यायनिर्णय असा आहे, परंतु काही झाले तरी, त्यात लवाद-निवाडयाचा समावेश होणार नाही—मग तो हुकूमनामा किंवा न्यायनिर्णय म्हणून बजावणीयोग्य असला तरी हरकत नाही.]

हुकूमनाम्यांची भारताबाहेर अंमलबजावणी.

[२][४५. या भागामधील पूर्वगामी कलमांपैकी जेवढया उपबंधान्वये न्यायालयास हुकूमनामा अंमलबजावणीसाठी दुसऱ्या न्यायालयाकडे पाठविण्याचा अधिकार देण्यात आला आहे तेवढया उपबंधांच्या बाबतीत, केंद्र शासनाच्या प्राधिकारान्वये [३][भारताबाहेर] स्थापन झालेल्या [४]* * * * ज्या न्यायालयास हे कलम लागू आहे असे राज्य शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे घोषित केले असेल अशा कोणत्याही न्यायालयाकडे हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पाठविण्याचा अधिकार कोणत्याही राज्यातील यायालयाला त्या उपबंधान्वये दिला जातो असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.]

आज्ञापत्रे.

४६. (१) ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला ते न्यायालय, हुकूमनामाधारकाच्या अर्जावरून ज्या ज्या वेळी त्यास योग्य वाटेल त्या त्या वेळी, अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यास सक्षम होऊ शकेल अशा अन्य कोणत्याही न्यायालयास आज्ञापत्र काढून, त्याला निर्णीत ऋणकोच्या मालकीची आणि आज्ञापत्रात विनिर्दिष्ट केलेली अशी कोणतीही मालमत्ता जप्त करण्यास फर्मावू शकेल.

(२) ज्या न्यायालयाकडे आज्ञापत्र पाठवण्यात येईल त्या न्यायालयाने हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना करावयाच्या मालमत्तेच्या जप्तीसंबंधात विहित केलेल्या रीतीने मालमत्तेच्या जप्तीची कार्यवाही सुरू केली पाहिजे :

परंतु, आज्ञापत्रानुसार होणारी कोणतीही जप्ती दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ चालू राहणार नाही—मात्र ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला असेल त्या न्यायालयाच्या आदेशान्वये जप्तीची मुदत वाढवलेली असेल तर किंवा ज्या न्यायालयाने जप्ती आणली असेल अशा न्यायालयाकडे हुकूमनामा अशा जप्तीच्या समाप्तीपूर्वी वर्ग करण्यात आला असेल आणि अशा मालमत्तेच्या विक्रीचा आदेश मिळवण्याकरिता हुकूमनामाधारकाने अर्ज केलेला असेल तर गोष्ट वेगळी.

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाने निर्णीत करावयाचे प्रश्न

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाने निर्णीत करावयाचे प्रश्न.

४७. (१) ज्या दाव्यामध्ये हुकूमनामा काढण्यात आला असेल अशा दाव्यातील पक्षकारांमध्ये किंवा त्यांच्या प्रतिनिधींमध्ये निर्माण होणारे सर्व प्रश्न आणि हुकूमनाम्याची अंमलबजावणी, तो काढून टाकणे किंवा त्याची पूर्ती यांच्या संबंधातील सर्व प्रश्न, स्वतंत्र दावा न लावता हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाकडून निर्णीत करण्यात येतील.

[५]* * * * * * *

(३) कोणतीही व्यक्ती एखाद्या पक्षकाराचा प्रतिनिधी आहे किंवा नाही यासंबंधी प्रश्न उपस्थित झाल्यास, असा प्रश्न, या कलमाच्या प्रयोजनार्थ, त्या न्यायालयाकडून निर्णीत करण्यात येईल.

[६][**स्पष्टीकरण पहिले.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या वादीचा दावा फेटाळण्यात आला असेल तो वादी आणि ज्या प्रतिवादीच्याविरुद्ध दावा फेटाळण्यात आला असेल तो प्रतिवादी हे दाव्यातील पक्षकार होत.

स्पष्टीकरण दुसरे.—(क्) या कलमाच्या प्रयोजनार्थ, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये मालमत्तेची विक्री झाल्यास तीमधील खरेदीदार हा, ज्या दाव्यामध्ये तो हुकूमनामा काढण्यात आला असेल त्या दाव्यातील पक्षकार असल्याचे मानण्यात यईल ; आणि

---

१. सन १९५२ चा अधिनियम ७१, कलम २ अन्वये स्पष्टीकरण १ ते ३ ऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे मूळ कलम ४५ ऐवजी बदली दाखल करण्यात आले.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारतातील कोणत्याही राज्यात" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

४. "किंवा चालू ठेवलेल्या" हा मजकूर, अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे वगळण्यात आला.

५. पोटकलम (२) हे सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ४७ (एक) द्वारे वगळण्यात आले.

६. वरील अधिनियमांच्या कलम ४७ (दोन) द्वारे मूळ स्पष्टीकरणाऐवजी दाखल करण्यात आले.

(ख) अशा खरेदीदाराकडे किंवा त्याच्या प्रतिनिधीकडे अशा मालमत्तेचा ताबा सुपूर्द करण्या-संबंधीचे सर्व प्रश्न हे, हुकूमनाम्याची अंमलबजावणी, तो काढून टाकणे किंवा त्याची पूर्ती याच्या संबंधातील प्रश्न आहेत असे या कलमाच्या अर्थानुसार मानण्यात येईल.]

४८. [विवक्षित प्रकरणी अंमलबजावणीस रोध.] 'मुदत अधिनियम, १९६३' (१९६३ चा ३६)—कलम २८ द्वारे निरसित. (१ जानेवारी १९६४ रोजी व तेव्हापासून)

हस्तांतरिती व कायदेशीर प्रतिनिधी

हस्तांतरिती.

४९. निर्णीत ऋणकोला मूळ हुकूमनामाधारकाच्या विरुद्ध जे समन्यायिक हक्क (काही असल्यास) बजावून घेता आले असते त्या हक्कांच्या अधीन राहून हुकूमनाम्याच्या प्रत्येक हस्तांतरितीला तो हुकूमनामा धारण करावा लागेल.

कायदेशीर प्रतिनिधी.

५०. (१) हुकूमनाम्याची संपूर्ण पूर्ती होण्यापूर्वीच निर्णीत ऋणको मृत्यू पावल्यास, हुकूमनाम ज्या न्यायालयाने काढला असेल त्या न्यायालयाकडे हुकूमनामाधारकाला, मृत व्यक्तीच्या कायदेशीर प्रतिनिधीविरुद्ध त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासंबंधी अर्ज करता येईल.

(२) अशा कायदेशीर प्रतिनिधीच्या विरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यात आल्यास, मयत व्यक्तीची जेवढी मालमत्ता त्याच्या हाती आली असेल आणि तिचा यातसर विनियोग करण्यात आलेला नसेल, तेवढ्या मर्यादेपर्यंत तो जबाबदार असेल आणि, असे दायित्व निश्चित करण्यासाठी, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयास स्वत: होऊन किंवा हुकूमनामाधारकाच्या अर्जावरून, त्यास योग्य वाटतील असे हिशेब सादर करण्याची अशा कायदेशीर प्रतिनिधीस सक्ती करता येईल.

अंमलबजावणीची कार्यपद्धती

अंमलबजावणी करवून घेण्याच्या न्यायालयाच्या शक्ती.

५१. विहित करण्यात येतील अशा शर्ती व मर्यादा यांच्या अधीनतेने, न्यायालयास, हुकूमनामा धारकाच्या अर्जावरून, असा आदेश देता येईल की,—

(क) हुकूमनाम्याने विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता सुपूर्द करून;

(ख) कोणतीही मालमत्ता जप्त करून आणि तिची विक्री करून किंवा जप्त न करता तिची विक्री करून;

(ग) [१][कलम ५८ खाली अटक व स्थानबद्धता अनुज्ञेय असेल त्या बाबतीत, त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपेक्षा अधिक नसलेल्या मुदतीपर्यंत] अटक करून आणि तुरुंगात डांबून;

(घ) प्रापकाची नेमणूक करून; किंवा

(ङ) ज्या प्रकारची वाढ मंजूर करण्यात आली असेल तिच्या स्वरूपानुसार आवश्यक असेल अशा इतर पद्धतीने,

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करावी :

[२][परंतु, हुकूमनामा पैसे देण्यासाठी असेल त्याबाबतीत, निर्णीत ऋणकोला कारागृहात का पाठवू नये यासंबंधी कारण दर्शविण्याची त्याला संधी देण्यात आल्यानंतर, जर—

(क) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस अडथळा करण्याच्या किंवा विलंब लावण्याच्या उद्दिष्टाने अथवा त्यामुळे तसा परिणाम होणार असल्याने—

(एक) निर्णीत ऋणको फरारी होण्याची किंवा न्यायालयाच्या स्थानिक मर्यादा सोडून बाहेर जाण्याची शक्यता आहे; किंवा

(दोन) हुकूमनामा ज्या दाव्यामध्ये काढण्यात आला तो दाखल करण्यात आल्यानंतर आपल्या मालमत्तेचा कोणताही भाग त्याने अप्रामाणिकपणे हस्तांतरित केलेला आहे, लपवलेला आहे किंवा हलवलेला आहे किंवा त्याच्या मालमत्तेच्या संबंधात कोणतेही दुर्भावपूर्ण कृत्य केलेले आहे, किंवा

(ख) हुकूमनाम्याची रक्कम किंवा तिचा कोणताही अधिकांश भाग देण्याइतकी त्याची ऐपत असून किंवा हुकूमनाम्याच्या तारखेनंतर त्याला ती प्राप्त झाली असूनही, त्याने ती रक्कम देण्यात नकार दिलेला आहे किंवा त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे ; किंवा

(ग) ज्या रकमेसाठी हुकूमनामा काढलेला आहे, त्या रकमेसाठी त्या रकमेचा हिशेब देण्यास निर्णीत ऋणको विश्वासाश्रित नात्याने बांधलेला असेल,

अशी न्यायालयाची सकारण खात्री पटवून ती कारणे त्याने लेखी नमूद केल्याशिवाय, निर्णीत ऋणकोला तुरुंगामध्ये डांबून ठेवून हुकूमनाम्याची अंमलबजावणी करावी असा आदेश देता येणार नाही

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २१ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९३६ चा अधिनियम २१, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आला

स्पष्टीकरण.—खंड (ख्) च्या प्रयोजनार्थ, निर्णीत ऋणकोच्या ऐपतीची मोजदाद करताना त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या किंवा कायद्याइतकी प्रभावी असलेल्या रूढीच्या द्वारे किंवा त्याखाली, ज्या मालमत्तेला हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये होणाऱ्या जप्तीपासून सूट मिळालेली असेल अशी कोणतीही मालमत्ता हिशेबातून वगळली जाईल.]

प्रतिनिधीविरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी करवून घेणे.

५२. (१) मयत व्यक्तीचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून एखाद्या पक्षकाराविरुद्ध हुकूमनामा काढण्यात आला असेल आणि मयत व्यक्तीच्या मालमत्तेमधून पैशाचे प्रदान करण्यासाठी हुकूमनामा काढण्यात आला असेल त्याबाबतीत, अशी कोणतीही मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता येईल.

(२) निर्णीत ऋणकोच्या कब्जात अशी कोणतीही मालमत्ता राहिलेली नसेल आणि मयत व्यक्तीची जी मालमत्ता त्याच्या कब्जात आल्याचे शाबीत झाले आहे अशा मालमत्तेचा त्याने यथोचितरीत्या विनियोग केला असल्याबद्दल तो न्यायालयाची खात्री पटवू शकला नाही तर त्याबाबतीत, जेवढचा मालमत्तेच्या बाबतीत तो न्यायालयाची खात्री पटवून देऊ शकला नसेल तेवढचा मर्यादेपर्यंत, हुकूमनामा जणू काही व्यक्तिशः त्याच्या विरुद्ध केलेला असल्याप्रमाणे त्या रीतीने त्यांच्याविरुद्ध त्याची अंमलबजावणी करता येईल.

वडिलार्जित मालमत्तेचे दायित्व.

५३. कलम ५० व कलम ५२ च्या प्रयोजनार्थ, ज्या बाबतीत हुकूमनामा काढण्यात आला असेल असे एखाद्या मयत पूर्वजाचे ऋण फेडण्यास हिंदू कायद्यानुसार दायी असलेली जी मालमत्ता त्याच्या मुलाच्या किंवा अन्य वंशजाच्या हाती असेल ती मालमत्ता ही, मयताची कायदेशीर प्रतिनिधी म्हणून त्याच्या मुलाच्या किंवा अन्य वंशजाच्या हाती आलेली मालमत्ता असल्याचे मानण्यात येईल.

संपदेची वाटणी करणे किंवा हिस्सा तोडून देणे.

५४. जेव्हा शासनाला महसूल देण्यास दायी म्हणून निर्धारित झालेल्या अविभक्त संपदेची वाटणी करण्याकरता किंवा अशा संपदेतील हिस्सा तोडून त्याचा अलग कब्जा देण्याकरता हुकूमनामा काढलेला असेल तेव्हा, संपदेची वाटणी करण्याची किंवा तो हिस्सा तोडून देण्याची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्याने किंवा जिल्हाधिकाऱ्याने याबाबतीत प्रतिनियुक्त केलेल्या त्याच्या हाताखालील कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याने अशा संपदेची वाटणी, किंवा तिच्यातील हिश्श्यांचा अलग कब्जा यासंबंधात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याला (तसा कायदा असल्यास) अनुसरून केली पाहिजे.

अटक व स्थानबद्धता

अटक करून स्थानबद्ध करणे.

५५. (१) हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना निर्णीत ऋणकोला कोणत्याही वेळी व कोणत्याही दिवशी अटक करता येईल, आणि व्यवहार्य असेल तितक्या लवकर, त्याला न्यायालयासमोर हजर केले पाहिजे, आणि स्थानबद्ध करण्याचा आदेश देणारे न्यायालय जेथे असेल त्या जिल्ह्याच्या दिवाणी कारागृहात, किंवा अशा दिवाणी तुरुंगात योग्य अशी जागा नसेल तर, अशा जिल्ह्याच्या न्यायालयांकडून ज्या व्यक्तींना स्थानबद्ध करण्याचा आदेश दिला जातो त्या व्यक्तींना स्थानबद्ध करण्यासाठी राज्य शासन नियत करील अशा इतर कोणत्याही ठिकाणी त्याला स्थानबद्ध करता येईल :

परंतु, पहिले म्हणजे, या कलमान्वये अटक करण्याच्या प्रयोजनार्थ, सूर्यास्तानंतर व सूर्योदयापूर्वी कोणत्याही राहत्या घरात प्रवेश करता कामा नये :

परंतु, दुसरे म्हणजे, राहते घर निर्णीत ऋणकोच्या वापरात आहे आणि त्याने आत प्रवेश करू देण्यास नकार दिला किंवा कोणत्याही प्रकारे प्रतिबंध केला असे झाल्याखेरीज अशा राहत्या घराचा बाहेरील दरवाजा फोडून उघडता येणार नाही. मात्र अटक करण्यास प्राधिकृत असलेल्या अधिकाऱ्यास कोणत्याही राहत्या घरात यथोचितरीत्या प्रवेश मिळाला असेल त्या बाबतीत, निर्णीत ऋणको ज्या खोलीत सापडू शकेल असे त्याला सकारण वाटत असेल अशा कोणत्याही खोलीचा दरवाजा त्यास फोडून उघडता येईल :

परंतु, तिसरे म्हणजे, निर्णीत ऋणको नसलेल्या आणि स्थानिक रिवाजानुसार चारचौघात न वावरणाऱ्या एखाद्या स्त्रीच्या प्रत्यक्ष वापरात ती खोली असेल तर, अटक करण्यास प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने, तिला तेथून निघून जाण्याची मोकळीक आहे असे तिला कळविले पाहिजे, आणि तेथून निघून जाण्यासाठी तिला वाजवी वेळ देऊन व निघून जाण्यासाठी योग्य ती सोय पुरवून नंतर, अटक करण्यासाठी त्या खोलीत त्याला प्रवेश करता येईल :

परंतु, चौथे म्हणजे, ज्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये निर्णीत ऋणकोला अटक करण्यात आली असेल तो हुकूमनामा पैशाच्या प्रदानासंबंधीचा हुकूमनामा असेल आणि निर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याची रक्कम व अटकेचा खर्च त्याला अटक करणाऱ्या अधिकाऱ्यास दिला तर त्या बाबतीत, अशा अधिकाऱ्याने त्याला ताबडतोब सोडून दिले पाहिजे.

(२) राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की, ज्या कोणत्याही व्यक्तीला किंवा ज्या वर्गातील व्यक्तींना अटक करण्यामध्ये लोकांना धोका संभवतो किंवा त्यामुळे लोकांची गैरसोय होऊ शकेल अशा व्यक्ती किंवा अशा वर्गातील व्यक्ती राज्य शासनाकडून याबाबतीत विहित करण्यात येईल अशी कार्यपध्दती अनुसरण्यात आल्याशिवाय हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये अटक केली जाण्यास पात्र होणार नाहीत.

(३) पैसे देण्यासंबंधीच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये निर्णीत ऋणकोला अटक करण्यात येऊन त्यास न्यायालयासमोर हजर करण्यात आले असेल तर आपणास दिवाळखोर म्हणून जाहीर करण्यात यावे यासाठी त्याला अर्ज करता येईल असे न्यायालयाने त्याला कळविले पाहिजे आणि त्याने अर्जाच्या विषयाच्या संबंधात कोणतेही दुर्भावपूर्ण कृत्य केलेले नसेल आणि त्या त्या काळी अंमलात असलेल्या दिवाळखोरीसंबंधीच्या कायद्याच्या उपबंधांचे त्याने पालन केले असेल तर, त्याला [१][सोडून देता येईल.]

(४) आपणांस दिवाळखोर म्हणून घोषित करण्यात यावे यासाठी अर्ज करण्याचा स्वत:चा इरादा निर्णीत ऋणकोने व्यक्त केला आणि आपण एक महिन्याच्या आत अशा प्रकारे अर्ज करू व अर्जावरून होणाऱ्या किंवा ज्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये त्याला अटक करण्यात आली होती त्या हुकूमनाम्यांवरून होणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी, त्याला बोलावण्यात येईल तेव्हा आपण हजर होऊ अशी हमी देणारी प्रतिभूती त्याने न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने सादर केली तर त्या बाबतीत, न्यायालय त्याला अटकेतून [२][मुक्त करू शकेल], व तो अशा प्रकारे अर्ज करण्यास आणि हजर होण्यास चुकला तर, न्यायालयास प्रतिभूतीची रक्कम वसूल करावी असा निदेश देता येईल किंवा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी दाखल त्याची दिवाणी कारागृहात रवानगी करता येईल.

पैशाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना स्त्रियांना अटक करण्यास किंवा स्थानबद्ध करण्यास मनाई.

५६. या भागात काहीही अंतर्भूत असले तरी, पैसे देण्याबद्दलच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना, न्यायालयाने एखाद्या स्त्रीला अटक करण्याचा किंवा तिला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्याचा आदेश देता कामा नये.

निर्वाहभत्ता.

५७. राज्य शासन निर्णीत ऋणकोंना त्यांच्या निर्वाहासाठी द्यावयाच्या व त्यांचा दर्जा, वंश व राष्ट्रीयत्व यानुसार क्रमाक्रमाने वाढणाऱ्या मासिक भत्त्यांच्या श्रेणी निश्चित करू शकेल.

स्थानबद्धता व सुटका.

५८. (१) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये दिवाणी तुरुंगात स्थानबद्ध केलेल्या प्रत्येक व्यक्तीला,—

(क) हुकूमनामा [३][एक हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या प्रदानाकरिता असेल तर जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत, आणि]

[४][(ख) हुकूमनामा पाचशे रुपयांपेक्षा अधिक पण जास्तीत जास्त एक हजार रुपये एवढ्या रकमेच्या प्रदानासाठी असेल तर, जास्तीत जास्त सहा आठवड्यांच्या कालावधीपर्यंत]

अशाप्रकारे स्थानबद्ध करून ठेवता येईल :

परंतु,—

(एक) त्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यासाठी काढलेल्या अधिपत्रात उल्लेखिलेली रक्कम दिवाणी तुरुंगाच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे भरल्यास, किंवा

(दोन) तिच्याविरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्याची अन्यथा संपूर्णत: पूर्ती करण्यात आल्यास, किंवा

(तीन) ज्या व्यक्तीच्या अर्जावरून तिला अशा प्रकारे स्थानबद्ध करण्यात आले असेल तिच्या विनंतीवरून, किंवा

(चार) ज्या व्यक्तीच्या अर्जावरून तिला अशाप्रकारे स्थानबद्ध करण्यात आले असेल तिने निर्वाहभत्ता देण्यात कसूर केल्यास,

[५][उक्त स्थानबद्धतेचा कालावधी] संपण्यापूर्वी अशा स्थानबद्धतेतून तिची सुटका केली पाहिजे :

परंतु आणखी असे की, न्यायालयाचा आदेश असल्याखेरीज, खंड (दोन) किंवा खंड (तीन) अन्वये तिची अशा स्थानबद्धतेतून सुटका करता कामा नये.

[६][(१क) शंकानिरसनार्थ असे जाहीर करण्यात येते की, हुकूमनाम्याची एकूण रक्कम पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल तर त्या बाबतीत, पैसे देण्यासंबंधीच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्याचा आदेश काढता येणार नाही.]

---

१. "सोडून दिले पाहिजे" या मजकुराऐवजी हा मजकूर, सन १९२१ चा अधिनियम ३, कलम २ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २२ (एक) (क्) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमांच्या कलम २२ द्वारे खंड (एक) (ख्) ऐवजी बदलीदाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २२ (दोन) (एक) (ग्) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम २२ (दोन) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

(२) या कलमान्वये स्थानबद्धतेतून सुटका केलेला निर्णीत ऋणको, त्याची मुक्तता झाली एवढ्याच कारणावरून आपल्यावरील ऋणातून मुक्त होणार नाही, परंतु ज्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत त्याला दिवाणी तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले होते, त्या हुकूमनाम्याखाली त्याला पुन्हा अटक करता येणार नाही.

आजारपणाच्या कारणावरून सुटका.

५९. (१) निर्णीत ऋणकोच्या अटकेसंबंधी अधिपत्र काढण्यात आल्यानंतर कोणत्याही वेळी त्याच्या गंभीर आजारपणाच्या कारणावरून न्यायालयास ते रद्द करता येईल.

(२) अटक करण्यात आलेल्या निर्णीत ऋणकोची प्रकृती दिवाणी तुरुंगात डांबून ठेवण्यायोग्य नाही असे न्यायालयाचे मत झाल्यास न्यायालयाला त्याची सुटका करता येईल.

(३) निर्णीत ऋणकोला दिवाणी तुरुंगात पाठवण्यात आले असेल त्या बाबतीत,—

(क) राज्य शासनास, त्या ऋणकोला कोणताही संक्रामक किंवा संसर्गजन्य रोग आहे या कारणावरून, किंवा

(ख) त्याची तुरुंगात रवानगी करणाऱ्या न्यायालयास किंवा ते न्यायालय ज्या न्यायालयास दुय्यम असेल अशा कोणत्याही न्यायालयास, त्याला कोणतेतरी गंभीर दुखणे झालेले आहे या कारणावरून,

त्याची सुटका करता येईल.

(४) या कलमान्वये सुटका केलेल्या निर्णीत ऋणकोला पुन्हा अटक करता येईल. परंतु दिवाणी तुरुंगातील त्याच्या स्थानबद्धतेचा एकूण कालावधी कलम ५८ मध्ये विहित केलेल्या कालावधीपेक्षा अधिक होता कामा नये.

जप्ती

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जप्तीस आणि विक्रीस पात्र असलेली मालमत्ता.

६०. (१) पुढील प्रकारची मालमत्ता हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जप्त केली जाण्यास आणि विकली जाण्यास पात्र असते, ती म्हणजे— जमिनी, घरे, किंवा इतर इमारती, माल, पैसा, बँक नोटा, धनादेश, विनिमयपत्रे, हुंड्या, वचनचिठ्ठ्या सरकारी रोखे, बंधरोख किंवा पैशासंबंधीच्या अन्य प्रतिभूती, ऋणे, महामंडळातील शेअर्स, आणि यात यापुढे उल्लेखिलेल्याखेरीज, निर्णीत ऋणकोच्या मालकीची अथवा ज्या मालमत्तेचा किंवा जिच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याची त्याला शक्ती असून ती शक्ती स्वत:च्या लाभासाठी तो वापरू शकत असेल अशी अन्य सर्व स्थावर वा जंगम विकाऊ मालमत्ता—मग ती निर्णीत ऋणकोने स्वत:च्या नावे धारण केलेली असो अथवा त्याच्यासाठी विश्वस्त-व्यवस्था म्हणून किंवा त्याच्या वतीने अन्य व्यक्तीने धारण केलेली असो :

परंतु, पुढील प्रकारच्या बाबी अशा जप्तीला किंवा विक्रीला पात्र असणार नाहीत, त्या अशा :—

(क) निर्णीत ऋणको, त्याची पत्नी व मुले यांना जरूर असलेले पेहरावयाचे कपडे, स्वयंपाकाची भांडी, गाद्या आणि बिस्तरा, आणि धार्मिक रूढीनुसार कोणत्याही स्त्रीला जे काढून देता येत नाहीत असे अंगावरील दागदागिने;

(ख) कारागिरांची हत्यारे, आणि निर्णीत ऋणको शेतकरी असेल तर त्याची शेतीकामाची अवजारे आणि त्याला शेतकरी म्हणून आपली उपजीविका करणे शक्य व्हावे यासाठी न्यायालयाच्या

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जप्तीस आणि विक्रीस पात्र असलेली मालमत्ता.

६०. (१) पुढील प्रकारची मालमत्ता हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जप्त केली जाण्यास आणि विकली जाण्यास पात्र असते, ती म्हणजे,— जमिनी, घरे, किंवा इतर इमारती, माल, पैसा, बँक नोटा, धनादेश, विनिमयपत्रे, हुंड्या, वचनचिठ्ठ्या, सरकारी रोखे, बंधरोखे किंवा पैशासंबंधीच्या अन्य प्रतिभूती, ऋणे, महामंडळातील शेअर्स, आणि यात यापुढे उल्लेखिलेल्याखेरीज, निर्णीत ऋणकोच्या मालकीची अथवा ज्या मालमत्तेचा किंवा जिच्या उत्पन्नाचा विनियोग करण्याची त्याला शक्ती असून ती शक्ती स्वत:च्या लाभासाठी तो वापरू शकत असेल अशी अन्य सर्व स्थावर वा जंगम विकाऊ मालमत्ता—मग ती निर्णीत ऋणकोने स्वत:च्या नावे धारण केलेली असो अथवा त्याच्यासाठी विश्वस्त-व्यवस्था म्हणून किंवा त्याच्या वतीने अन्य व्यक्तीने धारण केलेली असो :

परंतु, पुढील प्रकारच्या बाबी अशा जप्तीला किंवा विक्रीला पात्र असणार नाहीत, त्या अशा :—

(क) निर्णीत ऋणको, त्याची पत्नी व मुले यांना जरूर असलेले पेहरावयाचे कपडे, स्वयंपाकाची भांडी, गाद्या आणि बिस्तरा, आणि धार्मिक रूढीनुसार कोणत्याही स्त्रीला जे काढून देता येत नाहीत असे अंगावरील दागदागिने;

(ख) कारागिरांची हत्यारे, आणि निर्णीत ऋणको शेतकरी असेल तर त्याची शेतीकामाची अवजारे आणि त्याला शेतकरी म्हणून आपली उपजीविका करणे शक्य व्हावे यासाठी न्यायालयाच्या

मते आवश्यक असतील अशी गुरेढोरे आणि बी-बियाणे आणि शेतमालापैकी किंवा कोणत्याही प्रकारच्या शेतमालापैकी जो भाग लगतनंतरच्या कलमामधील उपबंधान्वये या दायित्वापासून मुक्त असल्याचे जाहीर करण्यात आलेले असेल असा भाग;

(ग) [१][शेतकऱ्याच्या किंवा मजुराच्या किंवा घरगडयाच्या] मालकीची आणि त्याच्या भोगवटयात असलेली घरे आणि इतर इमारती (त्यांची सामग्री आणि जागा आणि लगतची तदंगभूत व त्यांच्या उपयोगासाठी आवश्यक असेल अशी जमीन यासहित);

(घ) हिशेबवह्या;

(ङ) नुकसानीसाठी दावा लावण्याचा नुसता अधिकार;

(च) वैयक्तिक सेवा घेण्याचा कोणताही अधिकार;

(छ) शासनाच्या [२][किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा अन्य कोणत्याही मालकाच्या] निवृत्तिवेतनधारकांना अनुज्ञेय असलेली, अथवा [३][केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने] या संबंधात शासकीय राजपत्रात [४] अधिसूचित केलेल्या कोणत्याही सेवा, कुटुंब निवृत्तिवेतन निधीतून द्यावयाची निवृत्तिवेतने आणि उपदाने आणि राजनैतिक निवृत्ति-वेतने..

[६][(ज) कामगारांचे आणि घरगडयांचे वेतन-मग ते पैशांच्या स्वरूपात द्यावयाचे असो अगर वस्तूंच्या स्वरूपात द्यावयाचे असो,

* * * * *

मते आवश्यक असतील अशी गुरेढोरे आणि बी-बियाणे आणि शेतमालापैकी किंवा कोणत्याही प्रकारच्या शेतमालापैकी जो भाग लगतनंतरच्या कलमामधील उपबंधान्वये या दायित्वापासून मुक्त असल्याचे जाहीर करण्यात आलेले असेल असा भाग;

(ग) [१][शेतकऱ्याच्या किंवा मजुराच्या किंवा घरगडयाच्या] मालकीची आणि त्याच्या भोगवटयात असलेली घरे आणि इतर इमारती (त्यांची सामग्री आणि जागा आणि लगतची तदंगभूत व त्यांच्या उपयोगासाठी आवश्यक असेल अशी जमीन यांसहित);

(घ) हिशेबवह्या;

(ङ) नुकसानीसाठी दावा लावण्याचा नुसता अधिकार;

(च) वैयक्तिक सेवा घेण्याचा कोणताही अधिकार;

(छ) शासनाच्या [२][किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा अन्य कोणत्याही मालकाच्या] निवृत्तिवेतनधारकांना अनुज्ञेय असलेली, अथवा [३][केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने] या संबंधात शासकीय राजपत्रात [४][अधिसूचित केलेल्या कोणत्याही सेवा, कुटुंब निवृत्तिवेतन निधीतून द्यावयाची] निवृत्तिवेतने आणि उपदाने आणि राजनैतिक निवृत्ति-वेतने;

[५][(छछ) महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रामध्ये केंद्र शासनाने किंवा पूर्वीच्या हैदराबाद राज्याच्या शासनाने किंवा इतर कोणत्याही राज्य शासनाने पूर्वीच्या सेवांमुळे किंवा सध्याच्या विकलतांच्या-मुळे किंवा अनुकंपा भत्ता म्हणून मंजूर केलेले किंवा पुढे चालू ठेवलेले, जे खंड (छ) मध्ये अंतर्भूत करण्यात आलेले नाही असे कोणतेही निवृत्तिवेतन;]

(ज) कामगारांचे आणि घरगडयांचे वेतन-मग ते पैशांच्या स्वरूपात द्यावयाचे असो अगर वस्तूंच्या स्वरूपात द्यावयाचे असो;

* * * * * * *

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २३ द्वारे "शेतकऱ्याच्या" ऐवजी घातले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २३ (एक) (ख) द्वारे समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

३. अनुकूलन आदेश १९३७ द्वारे मूळ मजकुरा-ऐवजी दाखल करण्यात आला.

४. अशा अधिसूचनेकरिता, भारताचे राजपत्र १९०९, भाग एक, पृष्ठ ५ पहा.

६. पूर्वीचे खंड (ज) आणि (झ) या ऐवजी सन १९३७ चा अधिनियम क्रमांक ९ कलम २ द्वारे दाखल. १ जून १९३७ पूर्वी दाखल केलेल्या वादातून उद्भवणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीबाबत या कलमा-द्वारे केलेल्या विशोधनांचा परिणाम होणार नाही. त्याच अधिनियमाचे कलम ३ पहा.

७. सन १९४३ चा अधिनियम क्रमांक ५, कलम २ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

५. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ६५ कलम ६(अ) द्वारे समाविष्ट.

[1][(झ) [2][पोटगीच्या हुकूमनाम्याहून अन्य कोणत्याही हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना] पगाराच्या रकमेपैकी [3][पहिले [चारशे रुपये] आणि उर्वरित रकमेच्या दोन-तृतीयांश] इतक्या मर्यादे-पर्यंतची रक्कम :

[4][परंतु, पगारापैकी जप्तीस पात्र असलेल्या अंशाचा कोणताही भाग एकूण चोवीस महिन्यांच्या कालावधीपर्यंत जप्तीखाली असेल तर,—मग तो सातत्याने असो किंवा अधून मधून असो—अशा अंशास आणखी बारा महिन्यांची मुदत संपेपर्यंत जप्तीपासून सूट राहील, आणि अशी जप्ती एकाच हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये करण्यात आली असेल त्या बाबतीत, जप्ती एकूण चोवीस महिन्यांच्या कालावधीपर्यंत चालू राहिल्यानंतर त्या अंशास त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीतील जप्तीमधून अंतिम रीत्या सूट मिळेल.]]

[4][(झक्) पोटगीबाबतच्या कोणत्याही हुकूम-नाम्याची अंमलबजावणी करताना पगाराचा एक तृतीयांश.]

[5][(ञ) ज्या व्यक्तींना वायुसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४५), किंवा भूसेना अधिनियम, १९५० (१९५० चा ४६), किंवा नौसेना अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६२) लागू होतो अशा व्यक्तींचे वेतन व भत्ते.]

(१९२५ चा १९.) (ट्) ज्या निधीला भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, [6][१९२५] हा त्या त्या काळी लागू असेल अशा कोणत्याही निधीमध्ये भरल्या जाणाऱ्या व त्यातून काढल्या जाणाऱ्या सर्व सक्तीच्या ठेवी वा इतर रकमा—जेवढचा मर्यादेपर्यंत त्या रकमा जप्तीपात्र नसल्याचे उक्त अधिनियमाद्वारे जाहीर करण्यात आले असेल तेवढचा मर्यादेपर्यंत;

[7][(ट्क्) ज्या निधीला "लोक भविष्यनिर्वाह निधी अधिनियम, १९६८ (१९६८ चा २३.)" हा त्या त्या काळी लागू असेल अशा कोणत्याही निधी-मध्ये भरल्या जाणाऱ्या सर्व ठेवी व त्यातून काढल्या जाणाऱ्या इतर रकमा—जेवढचा मर्यादेपर्यंत त्या रकमा जप्तीपात्र नसल्याचे उक्त अधिनियमाद्वारे जाहीर करण्यात आले असेल तेवढचा मर्यादेपर्यंत;

---

१. सन १९४३ चा अधिनियम क्रमांक ५, कलम २ द्वारे पूर्वीचा खंड व परंतुक याऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. सन १९७३ चा अधिनियम २६, कलम २ द्वारे "पहिले शंभर रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २३(एक) (ग्) (एक) द्वारे "पहिले चारशे रुपये आणि उर्वरित रकमेच्या दोन-तृतीयांश" हा मजकूर "दोनशे रुपये आणि उर्वरित रकमेच्या निम्या रकमेइतक्या" या मजकुराऐवजी घातला.

४. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ६६, कलम ६ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम (२३) (एक) (ओ) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

६. सन १९३७ चा अधिनियम क्रमांक ९, कलम २ द्वारे "१८९७" ऐवजी दाखल करण्यात आला.

७. सन १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४, कलम २३ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ पासून.)

(ट्ख्) निर्णीत ऋणकोच्या आयुर्विमापत्राखाली द्यावयाच्या सर्व रकमा;

(ट्ग्) भाडे व जागा यांच्या नियंत्रणासंबंधी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याचे उपबंध जेथे लागू होतात अशा निवासी इमारतीच्या पट्टेदाराचा हितसंबंध;]

[1][(ठ्) कोणत्याही [2][शासकीय कर्मचाऱ्याला] अथवा रेल्वे कंपनीच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला मिळणाऱ्या वित्तलब्धींचा भाग असणाऱ्या ज्या भत्त्याला [3][समुचित शासन] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जप्तीपासून सूट दिल्याचे जाहीर करील असा कोणताही भत्ता आणि [4][असा कोणताही कर्मचारी] निलंबित झालेला असताना त्याला निर्वाहासाठी दिले जाणारे कोणतेही अनुदान किंवा भत्ता;]

(ड्) उत्तरजीवित्वाच्या मार्गाने अपेक्षित असलेला उत्तराधिकार किंवा अन्य केवळ समाश्रित किंवा संभाव्य अधिकार किंवा हितसंबंध;

(ढ्) भविष्यात मिळावयाच्या पोटगीचा अधिकार;

(ण्) हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना करावयाच्या जप्तीच्या दायित्वातून ज्या भत्त्याला सूट मिळाली असल्याचे [5][कोणत्याही भारतीय कायद्याद्वारे] जाहीर केलेले असेल असा कोणताही भत्ता; आणि

(त्) जेव्हा निर्णीत ऋणको हा जमीन महसूल भरण्यास जबाबदार असणारी व्यक्ती असेल तेव्हा, तिला त्या त्या काळी लागू असणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये ज्या मालमत्तेला अशा महसुलाच्या

(ट्ख्) निर्णीत ऋणकोच्या आयुर्विमापत्राखाली द्यावयाच्या सर्व रकमा;

[6][(ट्ख्ख्) हैदराबाद राज्य आयुर्विमा व भविष्य निर्वाह निधीबाबतच्या नियमांनुसार दिलेल्या व खंड (ट्क्) किंवा (ट्ख्) मध्ये ज्यांचा अंतर्भाव झालेला नाही अशा विमापत्रान्वये देय रकमा.

स्पष्टीकरण.—शासकीय कर्मचाऱ्याला देय असलेल्या कोणत्याही रकमेस या खंडान्वये किंवा खंड (छ्छ्) अन्वये जप्तीमधून सूट देण्यात आलेली असेल अशा बाबतीत, त्या शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूमुळे ती रक्कम इतर कोणत्याही व्यक्तीला देय आहे ही वस्तुस्थिती असली तरीही त्या रकमेला जप्तीपासून सूट मिळेल;]

(ट्ग्) भाडे व जागा यांच्या नियंत्रणासंबंधी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याचे उपबंध जेथे लागू होतात अशा निवासी इमारतीच्या पट्टेदाराचा हितसंबंध;

(ठ्) कोणत्याही [2][शासकीय कर्मचाऱ्याला] अथवा रेल्वे कंपनीच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला मिळणाऱ्या वित्तलब्धींचा भाग असणाऱ्या ज्या भत्त्याला [3][समुचित शासन] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जप्तीपासून सूट दिल्याचे जाहीर करील असा कोणताही भत्ता आणि [4][असा कोणताही कर्मचारी] निलंबित झालेला असताना त्याला निर्वाहासाठी दिले जाणारे कोणतेही अनुदान किंवा भत्ता;]

(ड्) उत्तरजीवित्वाच्या मार्गाने अपेक्षित असलेला उत्तराधिकार किंवा अन्य केवळ समाश्रित किंवा संभाव्य अधिकार किंवा हितसंबंध;

(ढ्) भविष्यात मिळावयाच्या पोटगीचा अधिकार;

(ण्) हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना करावयाच्या जप्तीच्या दायित्वातून ज्या भत्त्याला सूट मिळाली असल्याचे [5][कोणत्याही भारतीय कायद्याद्वारे] जाहीर केलेले असेल असा कोणताही भत्ता; आणि

(त्) जेव्हा निर्णीत ऋणको हा, जमीन महसूल भरण्यास जबाबदार असणारी व्यक्ती असेल तेव्हा, तिला त्या त्या काळी लागू असणाऱ्या कोणत्याही कायद्यान्वये ज्या मालमत्तेला अशा महसुलाच्या

---

१. मूळ खंडाऐवजी हा खंड सन १९३७ चा अधिनियम क्रमांक ९, कलम २ द्वारे दाखल करण्यात आला.

२. सन १९४३ चा अधिनियम ५, कलम २ द्वारे "लोक अधिकाऱ्याला" याऐवजी बदली दाखल करण्यात आला.

३. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल" या शब्दांऐवजी बदली दाखल करण्यात आला.

४. सन १९४३ चा अधिनियम क्रमांक ५, कलम २ द्वारे "असा कोणताही अधिकारी वा सेवक" या ऐवजी बदली दाखल करण्यात आला.

५. अनुकूलन आदेश १९३७ द्वारे भारतीय परिषदा अधिनियम, १८६१ व १८९२ अन्वये संमत केलेला कोणताही कायदा याऐवजी बदली दाखल करण्यात आला.

६. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ६५ कलम ६(ब्) द्वारे समाविष्ट.

थकबाकीच्या वसुलीसाठी करावयाच्या विक्रीपासून सूट दिलेली असेल अशी कोणतीही जंगम मालमत्ता;

[१][स्पष्टीकरण पहिले.—खंड (छ), (ज), (झ) (झक), (ठ) आणि (ण) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात द्यावयाच्या रकमांना प्रत्यक्ष त्या प्रदेय होण्यापूर्वी किंवा त्यानंतरही जप्तीमधून किंवा विक्रीमधून सूट असेल आणि पगाराच्या बाबतीत त्याचा जप्तीपात्र अंश, तो प्रत्यक्ष प्रदेय होण्यापूर्वी किंवा त्यानंतरही जप्तीस पात्र असेल.]

[१][[२][स्पष्टीकरण दुसरे.—खंड (झ) आणि (झक) मध्ये] "पगार" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीला तिच्या नोकरीत ती कामावर असताना किंवा रजेवर असताना, खंड (ठ) च्या उपबंधान्वये जप्तीपासून सूट मिळाली असल्याचे जाहीर केलेला कोणताही भत्ता वगळता मिळणारी एकूण मासिक वित्तलब्धी, असा आहे.]

[३][स्पष्टीकरण तिसरे.—खंड (ठ) मधील "समुचित शासन" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) केंद्र शासनाच्या सेवेतील कोणतीही [४][व्यक्ती], अथवा [५][एखाद्या रेल्वे प्रशासनाचा] किंवा कटक प्राधिकरणाचा किंवा प्रमुख बंदराच्या बंदर प्राधिकरणाचा कोणताही कर्मचारी यांच्या संबंधात केंद्र शासन ;

[६]* * * * *

(तीन) अन्य कोणताही [७][शासकीय कर्मचारी] किंवा अन्य कोणत्याही [८]*** स्थानिक प्राधिकरणाचा कर्मचारी याच्या संबंधात, राज्य शासन;

[९][स्पष्टीकरण चौथे.—या परंतुकाच्या प्रयोजनार्थ, "मजुरी" यामध्ये बोनसचा समावेश आहे, आणि "मजूर" यामध्ये कुशल, अकुशल किंवा निमकुशल मजुरांचा समावेश आहे;

स्पष्टीकरण पाचवे.—या परंतुकाच्या प्रयोजनार्थ, "शेतकरी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, मालक म्हणून

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २३ द्वारे "स्पष्टीकरण एक ऐवजी बदली दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ पासून)

२. सन १९३७ चा अधिनियम ९ कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४ कलम २३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ पासून)

४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९७३ चा अधिनियम ५ कलम २ द्वारे "लोकअधिकारी" याऐवजी बदली दाखल करण्यात आला.

६. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "संघरेल्वे" या ऐवजी बदली दाखल करण्यात आला.

७. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे खंड (दोन) वगळण्यात आला.

८. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "रेल्वेच्या किंवा" हा मजकूर वगळण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ पासून)

९. सन १९७६ चा अधिनियम १०४ कलम २३ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ पासून)

थकबाकीच्या वसुलीसाठी करावयाच्या विक्रीपासून सूट दिलेली असेल अशी कोणतीही जंगम मालमत्ता;

स्पष्टीकरण पहिले.—खंड (छ), (ज), (झ), (झक), (ठ) आणि (ण) मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात द्यावयाच्या रकमांना प्रत्यक्ष त्या प्रदेय होण्यापूर्वी किंवा त्यानंतरही जप्तीमधून किंवा विक्रीमधून सूट असेल आणि पगाराच्या बाबतीत त्याचा जप्तीपात्र अंश, तो प्रत्यक्ष प्रदेय होण्यापूर्वी किंवा त्यानंतरही जप्तीस पात्र असेल.

स्पष्टीकरण दुसरे.—खंड (झ) आणि (झक) मध्ये "पगार" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीला तिच्या नोकरीत ती कामावर असताना किंवा रजेवर असताना, खंड (ठ) च्या उपबंधान्वये जप्तीपासून सूट मिळाली असल्याचे जाहीर केलेला कोणताही भत्ता वगळता मिळणारी एकूण मासिक वित्तलब्धी, असा आहे.

स्पष्टीकरण तिसरे.—खंड (ठ) मधील "समुचित शासन" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे:—

(एक) केंद्र शासनाच्या सेवेतील कोणतीही [४][व्यक्ती], अथवा [५][एखाद्या रेल्वे प्रशासनाचा] किंवा कटक प्राधिकरणाचा किंवा बंदराच्या बंदर प्राधिकरणाचा कोणताही कर्मचारी यांच्या संबंधात केंद्र शासन;

[६]* * * * *

(तीन) अन्य कोणताही [७][शासकीय कर्मचारी] किंवा अन्य कोणत्याही [८]*** स्थानिक प्राधिकरणाचा कर्मचारी याच्या संबंधात, राज्य शासन;

[९][स्पष्टीकरण चौथे.—या परन्तुकाच्या प्रयोजनार्थ, "मजुरी" यामध्ये बोनसचा समावेश आहे, आणि "मजूर" यामध्ये कुशल, अकुशल किंवा निमकुशल मजुरांचा समावेश आहे;

स्पष्टीकरण पाचवे.—या परंतुकाच्या प्रयोजनार्थ, "शेतकरी" या शब्दप्रयोगाचा अर्थ, मालक म्हणून

किंवा कूळ म्हणून किंवा भागीदार म्हणून अगर शेतमजूर म्हणून जी व्यक्ती स्वत: जातीने जमीन कसते आणि आपल्या चरितार्थासाठी शेतजमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नावरच मुख्यत्वेकरून अवलंबून असते अशी व्यक्ती, असा आहे.

स्पष्टीकरण सहावे.—स्पष्टीकरण पाचच्या प्रयोजनार्थ, जर एखादा शेतकरी,—

(क) स्वत: मेहनत करून, किंवा

(ख) आपल्या कुटुंबातील व्यक्तीची मेहनत घेऊन; किंवा

(ग) रोख रकमेत किंवा वस्तुरूपात (पिकाचा वाटा सोडून) किंवा दोन्ही प्रकारे मजुरी द्यावयाच्या बोलीवर लावलेल्या नोकरांच्या किंवा मजुरांच्या मार्फत, जमीन कसत असेल तर, ती जमीन तो जातीने कसतो असे मानले जाईल.]

[१][(१क) त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये मिळणाऱ्या सुटीचा फायदा एखाद्या व्यक्तीने करार करून सोडून दिल्यास तो करार रद्दबातल ठरेल].

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, [२]*** घरे आणि इतर इमारती (त्यांची सामग्री आणि जागा आणि त्यांच्यालगत अंतर्भूत असणाऱ्या व त्यांच्या उपभोगासाठी आवश्यक असलेल्या जमिनी यांसहित) यांना, अशा कोणत्याही घरांचे, इमारतींचे, जागेचे किंवा जमिनीचे भाडे वसूल करण्याकरिता काढलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीतील जप्तीपासून किंवा विक्रीपासून सूट मिळाली असल्याचे

[२] ***मानण्यात येणार नाही.

[१] * * *

किंवा कूळ म्हणून किंवा भागीदार म्हणून अगर शेतमजूर म्हणून जी व्यक्ती स्वत: जातीने जमीन कसते आणि आपल्या चरितार्थासाठी शेतजमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नावरच मुख्यत्वेकरून अवलंबून असते अशी व्यक्ती, असा आहे.

स्पष्टीकरण सहावे.—स्पष्टीकरण पाचच्या प्रयोजनार्थ, जर एखादा शेतकरी,—

(क) स्वत: मेहनत करून, किंवा

(ख) आपल्या कुटुंबातील व्यक्तीची मेहनत घेऊन, किंवा

(ग) रोख रकमेत वा वस्तुरूपात (पिकाचा वाटा सोडून) किंवा दोन्ही प्रकारे मजुरी द्यावयाच्या बोलीवर लावलेल्या नोकरांच्या किंवा मजुरांच्या मार्फत, जमीन कसत असेल तर, ती जमीन तो जातीने कसतो असे मानले जाईल.]

[१][(१क) त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये मिळणाऱ्या सुटीचा फायदा एखाद्या व्यक्तीने करार करून सोडून दिल्यास तो करार रद्दबातल ठरेल.

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे [२]*** घरे आणि इतर इमारती (त्यांची सामग्री आणि जागा आणि त्यांच्यालगत अंतर्भूत असणाऱ्या व त्याच्या उपभोगासाठी आवश्यक असलेल्या जमिनी यांसहित) यांना, अशा कोणत्याही घरांचे, इमारतींचे, जागेचे किंवा जमिनीचे भाडे वसूल करण्याकरिता काढलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीतील जप्तीपासून किंवा विक्रीपासून सूट मिळाली असल्याचे

[२] ***मानण्यात येणार नाही.

शेतमालाला अंशत: सूट देणे.

६१. राज्य शासनाला, [१]* * * शासकीय राजपत्रात सर्वसाधारण किंवा विशेष आदेश प्रसिद्ध करून त्याद्वारे असे जाहीर करता येईल की, राज्य शासनाच्या मते शेतमालाचा किंवा कोणत्याही वर्गाच्या शेतमालाचा जितका हिस्सा, जमिनीची नीट मशागत होण्यासाठी आणि निर्णीत ऋणको व त्याचे कुटुंब यांच्या भरणपोषणासाठी पुढील हंगामापर्यंतची बेगमी म्हणून आवश्यक असल्याचे राज्य शासनाला वाटेल तितक्या हिश्श्याला, सर्व शेतकऱ्यांच्या बाबतीत किंवा एखाद्या वर्गातील शेतकऱ्यांच्या बाबतीत, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना होणाऱ्या जप्तीच्या किंवा विक्रीच्या दायित्वातून सूट मिळेल.

राहत्या घराबद्दल मालमत्तेचे अभिग्रहण.

६२. (१) जंगम मालमत्तेच्या अभिग्रहणाचा निदेश देणाऱ्या किंवा ते प्राधिकृत करणाऱ्या अशा, या संहितेखालील कोणत्याही आदेशिकेची अंमलबजावणी करणाऱ्या कोणाही व्यक्तीला कोणत्याही राहत्या घरात सूर्यास्तानंतर आणि सूर्योदयापूर्वी प्रवेश करता येणार नाही.

(२) राहते घर निर्णीत ऋणकोच्या वापरात आहे आणि त्याने आत प्रवेश करू देण्यास नकार दिला किंवा अन्य कोणत्याही प्रकारे प्रतिबंध केला असे झाल्याखेरीज अशा राहत्या घरचा दरवाजा फोडून उघडता येणार नाही, मात्र अशा कोणत्याही आदेशिकेची अंमलबजावणी करणाऱ्या व्यक्तीला कोणत्याही राहत्या घरात यथोचित रीत्या प्रवेश मिळाला असेल त्या बाबतीत, अशी कोणतीही मालमत्ता ज्या खोलीत आहे असे त्याला सकारण वाटत असेल अशा कोणत्याही खोलीचा दरवाजा फोडून त्यास उघडता येईल.

(३) जेव्हा राहत्या घरातील खोली एखाद्या स्त्रीच्या प्रत्यक्ष वापरात असून, ती स्थानिक रिवाजानुसार चारचौघात वावरणारी नसेल तर, आदेशिकेची अंमलबजावणी करणाऱ्या व्यक्तीने, त्या स्त्रीला

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २३ द्वारे समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी १९७७ पासून).

२. "(क)" हा कंस, "किंवा" हा शब्द आणि खंड (ख) हे सन १९१४ चा अधिनियम क्रमांक १०, कलम ३ आणि अनुसूची दोन द्वारे निरसित करण्यात आला.

३. "गव्हर्नर जनरल इन कौन्सिलाच्या पूर्व मंजुरीने" हा मजकूर, सन १९२० चा अधिनियम क्रमांक ३८, कलम २ आणि अनुसूची भाग एक द्वारे वगळण्यात आला.

तेथून निघून जाण्याची मोकळीक आहे असे तिला कळविले पाहिजे, आणि तेथून निघून जाण्यासाठी तिला वाजवी वेळ देऊन व निघून जाण्यासाठी योग्य ती सोय पुरवून नंतर, ती मालमत्ता सक्तीने ताब्यात घेण्यासाठी तिला त्या खोलीत प्रवेश करता येईल. माल, त्याच वेळी ती मालमत्ता चोरटेपणाने हलवली जाऊ नये म्हणून, या उपबंधाशी सुसंगत असेल अशा हरप्रकारे तिने खबरदारी घेतली पाहिजे.

निरनिराळ्या न्यायालयांच्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करताना जप्त केलेली मालमत्ता.

६३. (१) जेव्हा कोणत्याही न्यायालयाच्या ताब्यात नसलेली मालमत्ता एकाहून अधिक न्यायालयांच्या हुकूमनाम्यांच्या अंमलबजावणीत जप्तीखाली असेल तेव्हा, त्यापैकी सर्वोच्च श्रेणीच्या न्यायालयाने अशी मालमत्ता ग्रहण केली पाहिजे किंवा तिची रोख वसुली केली पाहिजे आणि त्यावरील कोणत्याही हक्क मागणीवर आणि तिच्या जप्तीबाबतच्या कोणत्याही आक्षेपावर निर्णय दिला पाहिजे किंवा, जेव्हा अशा न्यायालयामध्ये श्रेणीचा फरक नसेल तेव्हा, प्रथम ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार मालमत्ता जप्त झाली होती त्या न्यायालयाने ही कार्यवाही केली पाहिजे.

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, अशांपैकी कोणत्याही एका हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाने केलेली कोणतीही कार्यवाही विधिबाह्य होते असे मानले जाणार नाही.

[१][स्पष्टीकरण.—पोटकलम (२) च्या प्रयोजनार्थ, "न्यायालयाने केलेली कोणतीही कार्यवाही" यामध्ये हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमधील विक्रीमध्ये मालमत्ता खरेदी करणाऱ्या हुकूमनामाधारकाला तो स्वतः देणे असलेल्या खरेदी किंमतीएवढ्या रकमेची वजावट मंजूर करणाऱ्या आदेशाचा समावेश होत नाही.]

जप्तीनंतर मालमत्तेचे खाजगी रीत्या केलेले अन्यक्रामण रद्दबातल ठरणे.

६४. जेव्हा एखादी जप्ती आणण्यात आली असेल तेव्हा, जप्त केलेल्या मालमत्तेचे किंवा तिच्यातील कोणत्याही हितसंबंधाचे खाजगी रीत्या केलेले कोणतेही हस्तांतरण किंवा सुपूर्दगी आणि अशा जप्तीशी विसंगत असे कोणतेही ऋण, अधिलाभांश किंवा अन्य पैसा यांचे निर्णीत ऋणकोला केलेले प्रदान हे जप्तीअन्वये अंमलबजावणीयोग्य अशा सर्व हक्कमागण्यांच्या पुढे रद्दबातल ठरेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनार्थ, जप्तीखाली बजावणीयोग्य अशा हक्कमागण्यांमध्ये मत्तेचे हिस्सेराशीने वितरण करण्याबाबतच्या हक्कमागण्यांचा समावेश आहे.

विक्री

खरेदीदाराचा क्रमप्राप्त हक्क.

६५. जेव्हा स्थावर मालमत्ता हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना विकली गेली असेल आणि अशी विक्री कायम झाली असेल त्या बाबतीत, विक्री कायम झाल्यापासून नव्हे तर, ती मालमत्ता विकली गेली त्या वेळेपासून ती खरेदीदाराकडे निहित झाली असल्याचे मानण्यात येईल.

६६. [२]* * * * * *

पैसे देण्याबद्दलच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जमिनीचे विक्री व्यवहार करण्याबाबतचे नियम करण्याची राज्य शासनाची शक्ती.

६७. [३][(१)] जमिनीमधील एखाद्या प्रकारचे हितसंबंध, राज्य शासनाच्या मते, इतके अनिश्चित किंवा अनिर्धारित असतील की, त्याचे मूल्य ठरवणे अशक्य आहे अशा बाबतीत, राज्य शासनास [४]* * शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पैसे देण्याबद्दलच्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करताना, अशा हितसंबंधांची विक्री करण्यासंबंधी शर्ती लादण्याकरता कोणत्याही स्थानिक क्षेत्रांसाठी नियम करता येतील.

[५][(२) ज्या तारखेस ही संहिता एखाद्या स्थानिक क्षेत्रात अंमलात आली त्या तारखेस तेथे हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करताना जमिनीची विक्री करण्याबाबत कोणतेही विशेष नियम अंमलात असतील तर, राज्य शासनास [६]* * * शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असे नियम अंमलात असल्याचे जाहीर करता येईल किंवा तत्सम अधिसूचनेद्वारे फेरबदल करता येतील.

अशा तऱ्हेने चालू ठेवलेले किंवा फेरबदल केलेले नियम या पोटकलमाद्वारे दिलेल्या शक्तींचा वापर करून काढण्यात आलेल्या प्रत्येक अधिसूचनेमध्ये दिले जातील.]

[५][(३) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात आला पाहिजे.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २४ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९८८ चा अधिनियम ४५ चे कलम ७ द्वारे कलम ६६ निरसित करण्यात आले.

३. सन १९१४ चा अधिनियम १, कलम ३ द्वारे मूळ कलम ६७ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा क्रमांक नव्याने देण्यात आला.

४. "गव्हर्नर जनरल इन कौन्सिलाच्या पूर्वमंजुरीने" हा मजकूर, सन १९२० चा अधिनियम क्रमांक ३८, कलम २ आणि अनुसूची एक, भाग एक द्वारे वगळण्यात आला.

५. सन १९१४ चा अधिनियम १, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

६. सन १९८३ चा अधिनियम २०, कलम २, अनुसूची द्वारे पोटकलम (३) समाविष्ट करण्यात आले.

स्थावर मालमत्तेविरुध्द हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करण्याची शक्ती जिल्हाधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करणे.

६८-७२. दिवाणी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९५६ (१९५६ चा ६६) च्या कलम-७ द्वारे निरसित.

मत्तेची वाटणी

दरखास्ती विक्रीच्या उत्पन्नाची हुकूमनामाधारकांमध्ये हिस्सेराशीने वाटणी करणे.

७३. (१) जेव्हा मत्ता न्यायालयांच्या ताब्यात असेल आणि अशी मत्ता मिळण्यापूर्वी, निर्णीत ऋणकोविरुद्ध काढण्यात आलेल्या पैसे देण्यासंबंधीच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजाणीसाठी एकाहून अधिक व्यक्तींनी न्यायालयाकडे अर्ज केलेला असून त्यांना त्यांची फेड करून मिळालेली नसेल तेव्हा, रोखवसुलीचा खर्च वजा जाता शिल्लक राहिलेली मत्ता अशा सर्व व्यक्तींमध्ये हिस्सेराशीन वाटली जाईल :

परंतु, त्याबद्दलच्या शर्ती पुढीलप्रमाणे :—

(क) जेव्हा एखादी मालमत्ता ही गहाणास किंवा प्रभारास अधीन ठेवून विकण्यात येईल तेव्हा गहाणधारक किंवा प्रभारकर्ता अशा विक्रीपासून मिळणाऱ्या कोणत्याही अतिरिक्त रकमेतील हिस्सा मिळण्यास हक्कदार असणार नाही;

(ख) जेव्हा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना विकली जाण्यास पात्र असलेली एखादी मालमत्ता गहाणास किंवा प्रभारास अधीन असेल तेव्हा, न्यायालयास, गहाणधारकाच्या किंवा प्रभारकर्त्याच्या संमतीने असा आदेश देता येईल की, ती मालमत्ता गहाण किंवा प्रभार यापासून मुक्त अशा अवस्थेत विकली जावी आणि गहाणधारकाचा किंवा प्रभारकर्त्याचा विकलेल्या मालमत्तेत जो हितसंबंध होता तोच त्याला विक्रीच्या उत्पन्नात देण्यात यावा ;

(ग) जेव्हा एखाद्या स्थावर मालमत्तेवरील भार चुकता करण्यासाठी तिची विक्री करण्याचा आदेश देणाऱ्या हुकूमनाम्याची अंमलबजाणी करताना ती विकली जाईल तेव्हा, विक्रीच्या उपन्नाचा विनियोग पुढीलप्रमाणे केला जाईल :—

पहिल्यांदा, विक्रीचा खर्च भागवण्यासाठी ;

दुसऱ्यांदा, हुकूमनाम्यान्वये देय असलेली रक्कम चुकती करण्यासाठी ;

तिसऱ्यांदा, नंतरचे भार असल्यास त्यावर देय असलेल्या व्याजाच्या व मुद्दलाच्या रकमा चुकत्या करण्यासाठी ; आणि

चौथ्यांदा, निर्णीत ऋणकोविरुद्ध पैसे देण्यासंबंधी काढलेले हुकूमनामे धारण करणाऱ्या ज्या व्यक्तींनी अशा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी याप्रमाणे विक्री करण्याचा आदेश देणाऱ्या न्यायालयाकडे मालमत्तची विक्री होण्यापूर्वी अर्ज केला असून, त्यांना त्यांची फेड करून मिळालेली नसेल अशा हुकूमनामाधारकांमध्ये हिस्सेराशीने वाटण्यासाठी.

(२) या कलमान्वये हिस्सेराशीने वाटल्या जाण्यास पात्र असलेल्या सर्व मत्ता किंवा त्यांपैकी कोणतीही मत्ता, ती स्वीकारण्याचा हक्क नसलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द केली गेली तर, याप्रमाणे हक्कदार असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, अशा व्यक्तीला ती मत्ता परत करण्यास भाग पाडण्यासाठी दावा दाखल करता येईल.

(३) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे शासनाच्या कोणत्याही अधिकारावर परिणाम होत नाही.

अंमलबजावणीस प्रतिकार

अंमलबजावणीस प्रतिकार.

७४. जर न्यायालयाची अशी खात्री पटली की, स्थावर मालमत्तेचा कब्जा मिळवण्यासाठी दिलेल्या हुकूमनाम्याच्या धारकाला किंवा हुकूमनाम्याची अंमलबजाणी करताना विकलेल्या स्थावर मालमत्तेच्या खरेदीदाराला, त्या मालमत्तेचा कब्जा मिळवताना, निर्णीत ऋणकोकडून किंवा त्याच्या वतीने अन्य व्यक्तीकडून प्रतिकार करण्यात किंवा अटकाव करण्यात आला आणि असा प्रतिकार किंवा अटकाव कोणत्याही न्याय्य कारणाशिवाय केलेला आहे, तर, हुकूमनामाधारकाच्या किंवा खरेदीदाराच्या विनंतीवरून न्यायालयास, निर्णीत ऋणकोला किंवा अशा अन्य व्यक्तीला दिवाणी कारागृहात तीस दिवसांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीपर्यंत स्थानबद्ध करून ठेवण्याचा आदेश देता येईल आणि तसेच, ती मालमत्ता हुकूमनामाधारकाच्या किंवा खरेदीदाराच्या कब्जात देण्यात यावी असाही निदेश देता येईल.

भाग तिसरा

आनुषंगिक कार्यवाही

आयोगपत्रे

आयोगपत्रे काढण्याची न्यायालयाची शक्ती.

७५. विहित केल्या जातील अशा शर्तींच्या आणि मर्यादांच्या अधीनतेने, न्यायालयास खालील गोष्टींसाठी आयोगपत्र काढता येईल :—

(क) कोणत्याही व्यक्तीची तपासणी करणे;

(ख) स्थानिक अन्वेषण करणे;

(ग) हिशेब तपासणे किंवा त्याचा मेळ घालणे; किंवा

(घ) विभाजन करणे;

[१][(ङ) शास्त्रीय, तांत्रिक स्वरूपाचे किंवा तज्ञांकरवी अन्वेषण करणे;

(च) जी मालमत्ता लवकर किंवा स्वाभाविकपणे नाश पावणारी असून दाव्याचा निकाल लागेपर्यंत जी न्यायालयाच्या ताब्यात असेल त्या मालमत्तेचा विक्रीव्यवहार करणे;

(छ) कोणतेही उप-साधक काम करणे.]

दुसऱ्या न्यायालयाच्या नावे आयोगपत्र.

७६. (१) कोणत्याही व्यक्तीची तपासणी करण्यासाठी काढावयाचे आयोगपत्र, ते काढणारे न्यायालय ज्या राज्यात असेल त्या राज्याव्यतिरिक्त अन्य राज्यात असलेल्या आणि तपासणी करावयाची व्यक्ती ज्या ठिकाणी रहाते तेथे अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाच्या नावे (मात्र-ते उच्च न्यायालय नसावे) काढता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये एखाद्या व्यक्तीची तपासणी करण्यासाठी काढलेले आयोगपत्र मिळालेल्या प्रत्येक न्यायालयाने त्यानुसार त्या व्यक्तीची तपासणी केली पाहिजे किंवा करवून घेतली पाहिजे, आणि आयोगपत्राची रीतसर अंमलबजावणी झाली की, त्याखाली घेतलेल्या पुराव्यासह ते आयोगपत्र, ज्या न्यायालयाने ते काढले होते त्या न्यायालयाकडे परत केले पाहिजे, मात्र आयोगपत्र काढण्याबाबतच्या आदेशात अन्यथा निदेश दिला असेल तर त्या बाबतीत, आयोगपत्र अशा आदेशावरहुकूम प्रतिवेदनासह परत केले पाहिजे.

विनंतीपत्र.

७७. आयोगपत्र काढण्याऐवजी अशा न्यायालयास [भारतात] राहात नसलेल्या अशा कोणत्याही ठिकाणी राहणाऱ्या साक्षीदाराची तपासणी करण्यासाठी विनंतीपत्र काढता येईल.

परदेशी न्यायालयांनी काढलेली आयोगपत्रे.

[७८. विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या आणि मर्यादांच्या अधीनतेने, साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी काढलेल्या आयोगपत्रांची अंमलबजावणी करणे आणि आयोगपत्रे प्रतिवेदनांसह परत करणे यासंबंधीचे उपबंध खालील न्यायालयांनी काढलेल्या किंवा त्यांच्या सांगण्यावरून काढलेल्या आयोगपत्रांना लागू होतील :—

(क) भारतातील ज्या कोणत्याही भागात या संहितेचे उपबंध लागू नाहीत अशा भागात असलेली न्यायालये, किंवा

(ख) केंद्र शासनाच्या प्राधिकाराखाली भारताबाहेर स्थापन झालेली किंवा चालू राहिलेली न्यायालये ; किंवा

(ग) भारताबाहेरील कोणत्याही राज्याची किंवा देशाची न्यायालये.]

भाग चौथा

विशिष्ट प्रकरणांतील दावे

शासनाने किंवा अधिपत्याने लोक अधिकाऱ्यांनी अथवा त्यांच्या विरुद्ध लावलेले दावे

शासनाने किंवा त्याच्याविरुद्ध लावलेले दावे.

[७९. शासनाने किंवा शासनाविरुद्ध लावलेल्या दाव्यामध्ये खालील अधिकाऱ्यांचा वादी किंवा प्रकरणपरत्वे, प्रतिवादी म्हणून नामोल्लेख केला जाईल :—

(क) केंद्र शासनाने किंवा केंद्र शासनाविरुद्ध लावलेल्या दाव्यांच्या बाबतीत, [भारतीय संघराज्य], आणि

(ख) राज्य शासनाने किंवा राज्य शासनाविरुद्ध लावलेल्या दाव्यांच्या बाबतीत, राज्य.]

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम २६ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ३ द्वारे "राज्यांसाठी" याऐवजी दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी दाखल करण्यात आला.

४. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी दाखल करण्यात आला.

५. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "भारताचे डोमिनिअन" याऐवजी दाखल करण्यात आला.

नोटीस.

८०. [१][(१)] [२][पोटकलम (२) मध्ये अन्यथा उपबंधित केलेले असेल त्याव्यतिरिक्त,] एखाद्या लोक अधिकाऱ्याने आपल्या पदीय नात्याने जी कोणतीही कृती केली असल्याचे दिसते तिच्या संबंधात, [३][शासनाविरुद्ध (जम्मू व काश्मीर राज्याचे शासन धरून)] किंवा अशा लोक अधिकाऱ्याविरुद्ध [४][कोणताही दावा,—

(क) [५][रेल्वेशी संबंधित असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही,] केंद्र शासनाच्या विरुद्ध करावयाच्या दाव्याच्या बाबतीत, त्या शासनाचा सचिव,

[६][[७][(क्क)] केंद्र शासनाच्या विरुद्ध करावयाच्या रेल्वेशी संबंधित असलेल्या दाव्याच्या बाबतीत, त्या रेल्वेचा महाव्यवस्थापक]

[८]* * * * *

[९][(ख्ख्) जम्मू व काश्मीर राज्य शासनाच्या विरुद्ध करावयाच्या दाव्याच्या बाबतीत, त्या शासनाचा मुख्य सचिव किंवा याबाबतीत त्या शासनाने प्राधिकृत केलेला इतर कोणताही अधिकारी.]

(ग) [१०][इतर कोणत्याही राज्य शासनाच्या] विरुद्ध करावयाच्या दाव्याच्या बाबतीत, त्या शासनाचा सचिव किंवा त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी [८]* * *

[८]* * * * * *

याच्याकडे,] वादकारण, वादीचे नाव, वर्णन आणि निवासस्थान व त्याने कोणत्या प्रकारचा अनुतोष मागितला आहे ते नमूद करणारी लेखी नोटीस [११][सुपूर्द करण्यात येऊन अथवा त्याच्या कार्यालयाकडे पोचती करण्यात येऊन] आणि लोक अधिकाऱ्याच्या बाबतीत, त्याच्याकडे सुपूर्द करण्यात येऊन किंवा त्याच्या कार्यालयात पोचती करण्यात येऊन, लगतनंतरचे दोन महिने संपेपर्यंत [११][दाखल करता येणार नाही.]

[११][(२) एखाद्या लोक अधिकाऱ्याने आपल्या पदीय नात्याने जी कोणतीही कृती केली असल्याचे दिसते तिच्या संबंधात, शासनाविरुद्ध (जम्मू व काश्मीर राज्याचे शासन धरून) किंवा अशा लोक अधिकाऱ्याविरुद्ध तातडीने किंवा तावडतोब अनुतोष मिळवण्याकरिता करावयाचा दावा, पोटकलम (१) द्वारे आवश्यक असलेली कोणतीही नोटीस न देता, न्यायालयाच्या परवानगीने दाखल करता येईल; मात्र दाव्यामध्ये जो अनुतोष मागितला असेल त्याच्यासंबंधात कारण दाखवण्याची शासनाला किंवा, प्रकरणपरत्वे, लोक अधिकाऱ्याला वाजवी संधी दिल्याखेरीज न्यायालयाने, अंतरिम किंवा अन्य प्रकारचा कोणताही अनुतोष मंजूर करता कामा नये:

परंतु, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जर, दाव्यामध्ये तातडीने किंवा तावडतोब अनुतोष मंजूर करण्याची आवश्यकता नाही अशी न्यायालयाची खात्री पटल्यास, न्यायालयाने पोटकलम (१) च्या आवश्यकतांचे पालन करून वादपत्र सादर केले जाण्यासाठी ते वादपत्र परत केले पाहिजे.

(३) एखाद्या लोक अधिकाऱ्याने आपल्या पदीय नात्याने जी कोणतीही कृती केली असल्याचे दिसते तिच्या संबंधात शासनाविरुद्ध किंवा अशा कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध दावा मांडलेला असून, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोटिशींमध्ये,—

(क) नोटीस बजावणाऱ्या व्यक्तीने, समुचित प्राधिकरणास, किंवा त्या लोक अधिकाऱ्यास ओळखता येईल अशा प्रकारे वादीचे नाव, वर्णन व निवासस्थान नमूद केलेले असेल, आणि

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २७ द्वारे मूळ कलम ८० ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा क्रमांक नव्याने देण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम २७(२) द्वारे मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. सन १९६३ चा अधिनियम २६, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (५ जून, १९६४ रोजी व तेव्हापासून).

४. सन १९४८ चा अधिनियम ६, कलम २ द्वारे खंड (क्क्) म्हणून समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

६. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे खंड (क्क्) ला (ख्) असे अक्षर दिले.

७. वरील आदेशाद्वारे पूर्वीचा खंड (ख्) निरसित झाला.

८. सन १९६३ चा अधिनियम क्रमांक २६, कलम ३ (ख्) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

९. वरील अधिनियमाच्या कलम ३ (ग) द्वारे "राज्य शासनाचा" याऐवजी दाखल करण्यात आला.

१०. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "आणि" हा शब्द आणि खंड (घ) वगळण्यात आला.

११. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २७ (ख) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

अशी नोटीस पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या समुचित प्राधिकरणाकडे सुपूर्द करण्यात आलेली किंवा त्याच्या कार्यालयात पोचती केलेली असेल तर, आणि

(ख) वादकारण व वादीने मागितलेला अनुतोष सारत: नमूद करण्यात आला असेल तर,

पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोटिशीत केवळ एखादी चूक किंवा उणीव असल्याच्या कारणावरून दावा फेटाळता कामा नये.]

अटक व जातीने उपस्थित राहणे यापासून सूट.

८१. एखाद्या लोक अधिकाऱ्याने आपल्या पदीय नात्याने जो कोणतीही कृती केली असल्याचे दिसते तिच्या संबंधात त्याच्याविरुद्ध दाखल केलेल्या दाव्यामध्ये,—

(क) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीव्यतिरिक्त एरव्ही, प्रतिवादीस अटक करता येणार नाही किंवा त्याची मालमत्ता जप्त करता येणार नाही; आणि

(ख) प्रतिवादी स्वत: कामावर हजर न राहिल्याने शासकीय सेवेचे नुकसान होईल अशी न्यायालयाची खात्री झाल्यास, न्यायालयाने त्यास जातीने उपस्थित राहण्यापासून सूट दिली पाहिजे.

हुकूमनाम्याची अंमलबजावणी.

८२. [१][(१) एखाद्या लोक अधिकाऱ्याने आपल्या पदीय नात्याने जी कोणतीही कृती केली असल्याचे दिसते तिच्या संबंधात, शासनाने किंवा त्याच्याविरुद्ध किंवा लोक अधिकाऱ्याने किंवा त्याच्याविरुद्ध लावलेल्या दाव्यामध्ये, भारतीय संघराज्याच्या किंवा एखाद्या राज्याच्या किंवा, प्रकरणपरत्वे, त्या लोक अधिकाऱ्याच्या विरुद्ध हुकूमनामा काढण्यात आल्यास पोटकलम (२) च्या उपबंधांचे अनुसरण केल्याखेरीज अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता कामा नये.]

(२) अशा कोणत्याही हुकूमनाम्यावर, [२][अशा हुकूमनाम्याच्या] तारखेपासून मोजण्यात आलेल्या तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत हुकूमनाम्याची पूर्ती करण्याचे राहून गेले नसल्यास, अंमलबजावणीचा आदेश देता येणार नाही.

[३][(३) जर एखादा आदेश किंवा निवाडा,—

(क) उपरोक्त अशा कोणत्याही कृतीच्या संबंधात न्यायालयाने किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाने [४][भारतीय संघराज्य] किंवा एखादे राज्य किंवा एखादा लोक अधिकारी याच्याविरुद्ध दिलेला असेल तर, आणि

(ख) हा जणू काही एखादा हुकूमनामा असावा त्याप्रमाणे, या संहितेचे उपबंध किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याअन्वये त्याची अंमलबजावणी होण्यासारखी असेल तर,

पोटकलमे (१) व (२) चे उपबंध त्या आदेशाच्या किंवा निवाड्याच्या संबंधात, त्या हुकूमनाम्याला लागू होतात त्याप्रमाणे लागू होतील.]

[५][अन्य देशीयांनी लावलेले आणि परदेशी राज्यकर्ते, राजदूत आणि दूत यांनी किंवा त्यांच्याविरुद्ध लावलेले दावे

अन्य देशीयांना केव्हा दावा दाखल करता येईल.

८३. भारतात राहणाऱ्या शत्रुदेशीय व्यक्तींना केंद्र शासनाच्या परवानगीने, आणि तसेच मित्र-देशीय व्यक्तींना ते जणू काही भारताचे नागरिक असावेत त्याप्रमाणे, दाव्याची संपरीक्षा करण्यास अन्यथा सक्षम असलेल्या कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येईल, पण अशी परवानगी न घेता भारतात राहणाऱ्या किंवा परदेशात राहणाऱ्या शत्रुदेशीय व्यक्तींना अशा कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.

स्पष्टीकरण.—जेथील शासनाचे भारताशी युद्ध चालू असेल अशा एखाद्या परकीय देशात राहणारी व त्या देशामध्ये केंद्र शासनाकडून त्या बाबतीत दिले जाणारे लायसन्स जवळ नसताना धंदा करणारी प्रत्येक व्यक्ती, या कलमाच्या प्रयोजनार्थ, परकीय देशामध्ये राहणारी शत्रुदेशीय व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल.

परदेशी राज्यांना केव्हा दावा दाखल करता येईल.

८४. परदेशी राज्याला कोणत्याही सक्षम न्यायालयात दावा दाखल करता येईल :

परंतु, अशा राज्याच्या राज्यकर्त्याला किंवा अशा राज्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याला शासकीय पदाधिकारी म्हणून मिळालेला खाजगी अधिकार बजावून घेणे हे अशा दाव्याचे उद्दिष्ट असले पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २८ (एक) द्वारे मूळ मजकूराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २८(ख) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

३. सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ३२, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "डॉमिनिअन ऑफ इंडिया" याऐवजी बदली दाखल करण्यात आला.

५. सन १९५१ चा अधिनियम २, कलम १२ द्वारे पूर्वीचे शीर्षक आणि कलमे ८३ ते ८७ याऐवजी दाखल करण्यात आला.

परदेशी राज्यकर्त्याच्या वतीने खटला भरण्यास किंवा त्यात बचाव देण्यास शासनाने खास नेमलेल्या व्यक्ती.

८५. (१) एखाद्या परदेशी राज्याच्या राज्यकर्त्याच्या विनंतीवरून किंवा केंद्र शासनाच्या मते, अशा राज्यकर्त्याच्या वतीने काम चालवण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या विनंतीवरून केंद्र शासनाला अशा राज्यकर्त्याच्या वतीने कोणताही दावा चालविण्यासाठी किंवा त्यामध्ये बचाव देण्यासाठी आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तींना नियुक्त करता येईल, आणि अशा प्रकारे नियुक्त केलेल्या व्यक्ती म्हणजे राज्यकर्त्याच्या वतीने या संहितेनुसार ज्यांना उपस्थित होता येईल किंवा कृती करता येतील किंवा अर्ज करता येईल असे मान्यताप्राप्त अभिकर्ते होते असे मानण्यात येईल..

(२) या कलमाखाली करावयाची नियुक्ती एखाद्या विनिर्दिष्ट दाव्याच्या किंवा निरनिराळ्या विनिर्दिष्ट दाव्यांच्या प्रयोजनार्थ, अथवा अशा राज्यकर्त्याच्या वतीने खटला चालवण्यासाठी किंवा त्यात बचाव करण्यासाठी वेळोवेळी आवश्यक असेल अशा सर्व दाव्यांच्या प्रयोजनार्थ करता येईल.

(३) या कलमान्वये नियुक्त केलेल्या व्यक्तीस अशा कोणत्याही दाव्यामध्ये किंवा दाव्यांमध्ये जणू काही, ती स्वतःच त्यामधील एक पक्षकार असावी त्याप्रमाणे उपस्थित होण्यास व अर्ज करण्यास आणि कृती करण्यास इतर कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करता येईल.

परदेशी राज्यकर्ते, राजदूत व दूत यांच्याविरुद्ध दावे.

८६. (१) केंद्र शासनाच्या सचिवाने लेखी प्रमाणित केलेल्या त्या शासनाच्या संमतीशिवाय कोणत्याही परदेशी राज्याच्या [१]***विरुद्ध दावा दाखल करावयाचा असल्यास, त्या दाव्याची संपरीक्षा करण्यास अन्यथा सक्षम असलेल्या न्यायालयात, तो दावा दाखल करता येणार नाही :

परंतु, एखाद्या व्यक्तीस, ती ज्याच्याकडून स्थावर मालमत्ता धारण करीत असेल किंवा धारण करीत असल्याचा दावा सांगत असेल अशा [२][एखाद्या परदेशी राज्याच्या] विरुद्ध त्या मालमत्तेच्या भाडेकरूस दावा दाखल करता येईल.

(२) अशी संमती एखाद्या विनिर्दिष्ट दाव्याच्या किंवा निरनिराळ्या विनिर्दिष्ट दाव्यांच्या संबंधात अथवा कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गातील किंवा वर्गातील सर्व दाव्यांच्या संबंधात देता येईल, आणि तीमध्ये, कोणताही दावा किंवा दाव्यांचा वर्ग यांच्याबाबतीत कोणत्या न्यायालयात [३][त्या परदेशी राज्याच्या] विरुद्ध दावा दाखल करता येईल ते विनिर्दिष्ट करता येईल, मात्र [३][त्या परदेशी राज्याने],—

(क) [४][त्याच्या] वर दावा लावू इच्छिणाऱ्या व्यक्तीच्याविरुद्ध न्यायालयात दावा दाखल केलेला आहे, किंवा

(ख) [५][स्वतः] किंवा दुसऱ्यामार्फत न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये व्यापार चालवलेला आहे, किंवा

(ग) त्या मर्यादांमध्ये आपल्या कब्जात स्थावर मालमत्ता बाळगलेली आहे आणि अशा मालमत्तेच्या संदर्भात किंवा त्यावर आकारलेल्या पैशाकरिता त्याच्याविरुद्ध दावा दाखल करावयाचा आहे, किंवा

(घ) या कलमान्वये [६][त्याला] देण्यात आलेला विशेषाधिकार स्पष्टपणे किंवा गर्भितपणे सोडून दिला आहे ;

असे केंद्र शासनाला वाटल्याखेरीज अशी संमती देता कामा नये.

[७][(३) केंद्र शासनाच्या सचिवाने लेखी प्रमाणित केलेल्या त्या शासनाच्या संमतीशिवाय, कोणत्याही परदेशी राज्याच्या मालमत्तेविरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता कामा नये.]

(४) या कलमातील पूर्ववर्ती उपबंध [८][परदेशी राज्याच्या संबंधात जसे लागू होतात तसे],—

[९][(क) एखाद्या परदेशी राज्याचा कोणताही राज्यकर्ता ;]

[१०][(कक)] एखाद्या परदेशी राज्याचा कोणताही राजदूत किंवा दूत;

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम २९ (एक) (क) द्वारे "शासकाविरुद्ध" हा शब्द वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २९(एक)(ख) द्वारे "एखाद्या शासकाच्या" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २९(दोन)(क) द्वारे "त्या शासनाच्या" किंवा, प्रकरणपरत्वे "त्या शासनाने" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २९(दोन)(ख) द्वारे "शासनाच्या" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २९ (दोन)(ग) द्वारे "शासकाने स्वतः" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम २९(दोन)(घ) द्वारे "शासकाला" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम २९(तीन) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या कलम २९(चार)(ग) द्वारे "परदेशी राज्याच्या शासकासंबंधात ते जसे लागू होतात तसे" याऐवजी बदली दाखल करण्यात आला.

९. वरील अधिनियमाच्या कलम २९(चार)(कक) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

१०. वरील अधिनियमाच्या कलम २९(चार)(क) द्वारे खंड (क) ला खंड (कक) असे नवीन अक्षर देण्यात आले.

(ख) कोणत्याही कॉमनवेल्थ देशाचा कोणताही उच्च आयुक्त; आणि

(ग) केंद्र शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशी, [१][त्या परदेशी राज्याच्या कर्मचारीवर्गापैकी अथवा परदेशी राज्याचा राजदूत किंवा दूत याच्या] अथवा कॉमनवेल्थ देशाच्या उच्च आयुक्ताच्या कर्मचारीवर्गापैकी किंवा लवाजम्यापैकी कोणतीही व्यक्ती, यांच्या संबंधात लागू होतील.

[२][(५) या संहितेखाली पुढील व्यक्तींना अटक करण्यात येणार नाही; त्या अशा :—

(क) कोणताही परदेशी राज्याचा राज्यकर्ता ;

(ख) कोणताही परदेशी राज्याचा राजदूत किंवा दूत;

(ग) कोणत्याही कॉमनवेल्थ देशाचा उच्च आयुक्त;

(घ) केंद्र शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशी, परदेशी राज्याच्या कर्मचारीवर्गापैकी अथवा परदेशी राज्याचा राज्यकर्ता, राजदूत किंवा दूत यांच्या अथवा कॉमनवेल्थ देशाच्या उच्च आयुक्ताच्या कर्मचारीवर्गापैकी किंवा लवाजम्यापैकी कोणतीही व्यक्ती.

(६) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारची कोणतीही [संमती मिळवण्यासाठी केंद्र शासनाला विनंती करण्यात येईल त्याबाबतीत, अशा विनंतीस पूर्णतः किंवा अंशतः रुकार देण्याचे नाकारण्यापूर्वी केंद्र शासनाने विनंती करणाऱ्या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिली पाहिजे.]

परदेशी राज्यकर्त्यांचे दाव्यातील पक्षकार म्हणून अभिधान.

८७. परदेशी राज्याच्या राज्यकर्त्यास त्याच्या राज्याच्या नावाने दावा दाखल करता येईल व त्याच नावाने त्याच्याविरुद्ध दावा दाखल करावा लागेल :

परंतु, कलम ८६ मध्ये निर्दिष्ट केलेली संमती देताना केंद्र शासनाला असा निदेश देता येईल की, त्या राज्यकर्त्यावर एखाद्या अभिकर्त्याच्या नावाने किंवा अन्य एखाद्या नावाने दावा दाखल करण्यात यावा.

"परदेशी राज्य" व "राज्यकर्ता" यांच्या व्याख्या

८७क. (१) या भागामध्ये,—

(क) "परदेशी राज्य" याचा अर्थ, केंद्र शासनाने ज्याला मान्यता दिलेली आहे असे भारताबाहेरील कोणतेही राज्य, आणि

(ख) "राज्यकर्ता" याचा परदेशी राज्याच्या संबंधातील अर्थ, केंद्र शासनाने त्या राज्याचा प्रमुख म्हणून त्या त्या काळी ज्या व्यक्तीला मान्यता दिलेली असेल ती व्यक्ती, असा आहे.

(२) प्रत्येक न्यायालयाने,—

(क) केंद्र शासनाने एखाद्या राज्याला मान्यता दिलेली आहे किंवा दिलेली नाही;

(ख) केंद्र शासनाने एखाद्या व्यक्तीला एखाद्या राज्याचा प्रमुख म्हणून मान्यता दिलेली आहे किंवा दिलेली नाही ;

या गोष्टीची न्यायिकत: दखल घेतली पाहिजे.

पूर्वीच्या भारतीय संस्थानांच्या राज्यकर्त्यांच्या विरुद्ध दावे

कलमे ८५ व ८६ही पूर्वीच्या भारतीय संस्थानांच्या राज्यकर्त्यांना लागू होणे.

८७ख. [३][(१) संविधानाच्या प्रारंभापूर्वी जे वादकारण उद्भवले त्यावर पूर्णतः किंवा अंशतः आधारलेला असा, कोणत्याही पूर्वीच्या भारतीय संस्थानाच्या राज्यकर्त्याने किंवा त्याच्याविरुद्ध लावलेला कोणताही दावा अथवा अशा दाव्यातून उद्भवणारी कोणतीही कार्यवाही यांच्या बाबतीत, कलम ८५ व कलम ८६ ची पोटकलमे (१) व (३) यांचे उपबंध एखाद्या परदेशी राज्याच्या राज्यकर्त्याच्या संबंधात लागू होतात तसेच अशा संस्थानाच्या राज्यकर्त्याच्या संबंधात लागू होतील.]

(२) या कलमात,—

(क) "पूर्वीचे भारतीय संस्थान" याचा अर्थ, केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या कलमाच्या प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट करील असे कोणतेही भारतीय संस्थान, असा आहे ; * * *

[४][(ख) "संविधानाचा प्रारंभ" याचा अर्थ, २६ जानेवारी, १९५० हा दिवस असा आहे, आणि

(ग) "राज्यकर्ता" याला पूर्वीच्या भारतीय संस्थानाच्या संबंधात संविधानाचा अनुच्छेद ३६३ मध्ये "अधिपती" शब्दाला दिल्याप्रमाणे अर्थ आहे.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम २९ (चार) (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (१ जानेवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. वरील अधिनियमाच्या कलम २९(पाच) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९७२ चा अधिनियम ५४, कलम ३ (क) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

४. "आणि" हा शब्द, वरील अधिनियमाच्या कलम ३(ख)(एक) द्वारे वगळण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३(ख)(दोन) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

अंतर्वाद

कोणत्या बाबतीत अंतर्वाद दावा दाखल करता येईल.

८८. जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडे तीच ऋणे, तीच रक्कम किंवा इतर जंगम किंवा स्थावर मालमत्ता यासंबंधी परस्पराविरुद्ध हक्कमागण्या करीत असतील आणि ती दुसरी व्यक्ती उपखर्च व परिव्यय वगळता एरव्ही त्यात स्वत:साठी कोणत्याही हितसंबंधाची मागणी करीत नसून न्याय्य हक्कदारास ती रक्कम देण्यास किंवा ती मालमत्ता सुपूर्द करण्यास तयार असेल तेव्हा, अशा दुसऱ्या व्यक्तीस ती रक्कम कोणत्या व्यक्तीस द्यावी किंवा ती मालमत्ता सुपूर्द करावी त्यासंबंधी निर्णय मिळवण्यासाठी आणि स्वत:चे दायित्वनिराकरण करून घेण्यासाठी सर्व मागणीदारांच्या विरुद्ध अंतर्वाद दावा दाखल करता येईल :

परंतु, ज्यामध्ये सर्व पक्षकारांचे अधिकार योग्य प्रकारे निश्चित करता येतील असा कोणताही दावा प्रलंबित असेल तर, असा कोणताही अंतर्वाद दावा दाखल करता येणार नाही.

भाग पाच

विशेष कार्यदाही

लवाद

८९. [लवाद] लवाद अधिनियम, १९४० (१९४० चा १०), कलम ४९ व तिसरी अनुसूची याद्वारे निरसित.

विशेष प्रकरण

न्यायालयाच्या मतासाठी प्रकरण सादर करण्याची शक्ती.

९०. जेव्हा कोणत्याही व्यक्ती एखादे प्रकरण न्यायालयाच्या मतासाठी सादर करण्याचे लेखी मान्य करतील तेव्हा न्यायालयाने विहित रीतीने त्याची संपरिक्षा केली पाहिजे व त्याचा निर्णय केला पाहिजे.

[1][सार्वजनिक उपद्रव आणि जनतेला बाधक अशी अन्य गैरकृत्ये]

सार्वजनिक उपद्रव व जनतेला बाधक अशी अन्य गैरकृत्ये.

९१. (१) [2][सार्वजनिक उपद्रव किंवा जनतेला बाधक ठरणारे किंवा ठरण्याची शक्यता असणारे अन्य गैरकृत्य यांच्या बाबतीत, प्रतिज्ञापन व मनाईहुकूम मिळण्यासाठी किंवा प्रकरणाच्या परिस्थितीनुसार समुचित असेल अशा अन्य प्रकारचा अनुतोष मिळण्यासाठी—

(क) महा अधिवक्त्याला, किंवा

(ख) न्यायालयाच्या परवानगीने दोन किंवा अधिक व्यक्तींना मग अशा सार्वजनिक उपद्रवामुळे किंवा अन्य गैरकृत्यामुळे अशा व्यक्तींना विशेष नुकसान पोचलेले नसले तरीही हरकत नाही—

दावा दाखल करता येईल.]

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, त्याच्या उपबंधांव्यतिरिक्त एरव्ही, दावा लावण्याचा जो कोणताही अधिकार अस्तित्वात असेल त्यावर मर्यादा पडते किंवा त्यास अन्यथा बाध येतो असे मानण्यात येणार नाही.

सार्वजनिक धर्मादाय.

९२. (१) धर्मादाय किंवा धार्मिक स्वरूपाच्या सार्वजनिक कारणासाठी निर्माण केलेल्या कोणत्याही व्यक्त किंवा आन्वयिक विश्वस्तव्यवस्थेचा भंग झाला असे कोणतेही प्रतिज्ञापन करण्यात आले असेल त्या बाबतीत, किंवा अशा कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या प्रशासनासाठी न्यायालयाचा निदेश आवश्यक समजण्यात येत असेल त्या बाबतीत, महाअधिवक्ता किंवा त्या विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंधित असून ज्यांनी [3][न्यायालयाची परवानगी] मिळवलेली असेल अशा दोन किंवा अधिक व्यक्ती यांना, मूळ अधिकारिता असलेल्या प्रमुख दिवाणी न्यायालयात अथवा विश्वस्तव्यवस्थेची संपूर्ण विषयवस्तू किंवा

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ३० (एक) द्वारे व पूर्वीच्या शीर्षाऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. वरील अधिनियमाच्या कलम ३०, (दोन) द्वारे पोटकलम (१) साठी बदली दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

३. वरील अधिनियमाच्या कलम ३१ (एक) द्वारे "महाअधिवक्ता याची लेखी परवानगी" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

तिचा कोणताही भाग ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादामध्ये आहे अशा ज्या अन्य कोणत्याही न्यायालयास राज्य शासनाने, याबाबतीत शक्ती दिलेल्या असतील त्या न्यायालयात, पुढील प्रकारचा हुकूमनामा मिळवण्यासाठी दावा दाखल करता येईल—मग तो दावा विवादित असो वा नसो;—

(क्) एखाद्या विश्वस्तास काढून टाकणारा;

(ख्) नवीन विश्वस्ताची नेमणूक करणारा;

(ग्) विश्वस्ताकडे एखादी मालमत्ता निहित करण्यासाठी;

[1][(गग्) ज्या विश्वस्तास काढून टाकण्यात आले आहे त्याला किंवा ज्या व्यक्तीचे विश्वस्तपद संपुष्टात आले आहे तिला, तिने आपल्या कब्जातील कोणतीही विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता अशा मालमत्तेच्या कब्जात हक्कदार असलेल्या व्यक्तीच्या कब्जात द्यावी असा निदेश देणारा;]

(घ्) हिशेब व चौकशी यासंबंधी निदेश देणारा;

(ङ्) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेपैकी किंवा त्यातील हितसंबंधापैकी किती हिस्सा विश्वस्तव्यवस्थेच्या एखाद्या विशिष्ट उद्दिष्टाकरिता नेमून देण्यात यावा ते घोषित करणारा;

(च्) विश्वस्तव्यवस्थेची संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा एखादा भाग भाडयाने देण्यासाठी, विक्रीसाठी, गहाण ठेवण्यासाठी किंवा अदलाबदल करण्यासाठी प्राधिकार देणारा;

(छ्) एखादी योजना ठरवून देणारा; किंवा

(ज्) प्रकरणाच्या स्वरूपानुसार आवश्यक असेल असा आणखी किंवा इतर प्रकारचा अनुतोष मंजूर करणारा.

(२) धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८६३ (१८६३ चा २०) याद्वारे [1][[2][अथवा १ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी भाग 'ख' राज्यांमध्ये जो समाविष्ट होतो अशा राज्यक्षेत्रांमध्ये] अंमलात असलेल्या कोणत्याही समनुरूप कायद्यामध्ये] उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणताही अनुतोष मागण्यासाठी त्यात निर्देशिलेल्या अशा कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेबाबत लावावयाचा दावा, त्या पोटकलमाच्या उपबंधाचे अनुसरण केल्याशिवाय दाखल करता येणार नाही.

[3][(३) पुढीलपैकी एका किंवा अनेक परिस्थितीत धर्मादाय किंवा धार्मिक स्वरूपाच्या सार्वजनिक प्रयोजनार्थ निर्माण केलेल्या व्यक्त किंवा उपलक्षित विश्वस्तव्यवस्थेच्या मूळ प्रयोजनांमध्ये न्यायालयास फेरफार करता येईल आणि अशा विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा किंवा त्याच्या उत्पन्नाचा किंवा त्याच्या कोणत्याही अंशाचा तत्सम प्रयोजनासाठी वापर करण्यास परवानगी देता येईल, ती अशी :—

(क्) विश्वस्तव्यवस्थेची मूळ प्रयोजने संपूर्णत: किंवा अंशत :—

(एक) शक्य तेथवर पार पाडण्यात आली असतील त्या बाबतीत; किंवा

(दोन) पार पाडता येणे मुळीच शक्य नसेल किंवा विश्वस्तव्यवस्थेची निर्मिती करणाऱ्या संलेखामध्ये दिलेल्या निदेशाच्या अनुसार पार पाडता येणे शक्य नसेल किंवा, असा संलेख नसेल तर विश्वस्तव्यवस्थेच्या आशयानुसार पार पाडता येणे शक्य नसेल त्या बाबतीत; किंवा

(ख्) विश्वस्तव्यवस्थेच्या मूळ प्रयोजनांमध्ये, विश्वस्तव्यवस्थेच्या योगे उपलब्ध होणाऱ्या मालमत्तेच्या केवळ एखाद्या भागाचाच वापर करण्याचे उपबंधित करण्यात आले असेल त्या बाबतीत;

(ग्) विश्वस्तव्यवस्थेच्या योगे उपलब्ध होणारी मालमत्ता आणि त्यासारख्याच प्रयोजनांसाठी वापरण्याजोगी अन्य मालमत्ता एकत्रितपणे अधिक परिणामकारकपणे वापरता येऊ शकत असेल, आणि विश्वस्तव्यवस्थेचा आशय आणि सर्वसाधारण प्रयोजनार्थ तिची उपयुक्तता लक्षात घेऊन, त्या दिशेने तिचा योग्यप्रकारे विनियोग करता येण्यासारखा असेल त्या बाबतीत; किंवा

(घ्) मूळ प्रयोजने संपूर्णत: किंवा अंशत: ज्या क्षेत्राच्या संदर्भात विहित केली होती ते क्षेत्र अशा प्रयोजनार्थ तेव्हा एक युनिट म्हणून ओळखले जात होते, परंतु ते आता तसे राहिलेले नसेल त्या बाबतीत; किंवा

(ङ्) मूळ प्रयोजने विहित करण्यात आल्यानंतर संपूर्णत: किंवा अंशत :—

(एक) त्यासाठी अन्य मार्गाने पुरेसे उपबंध करण्यात आले असतील; किंवा

(दोन) समाजाला निरुपयोगी किंवा हानिकारक म्हणून ती संपुष्टात आली असतील; किंवा

---

१. सन १९५६ चा अधिनियम ६६, कलम ९ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९५१ चा अधिनियम २, कलम १३ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

३. विधि अनुकूलन आदेश (क्रमांक २), १९५६ द्वारे "भाग ख राज्यांमधील" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

४. सन १९७६ चा अधिनियम क्र. १०४, कलम ३१ (दोन) द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

(तीन) कायद्यानुसार ती धर्मादाय असण्याचे बंद झाले असेल; किंवा

(चार) विश्वस्तव्यवस्थेचा आशय लक्षात घेता, विश्वस्तव्यवस्थेच्या योगे उपलब्ध होणाऱ्या मालमत्तेचा विनियोग करण्याची योग्य व परिणामकारक रीत घालून देण्याच्या दृष्टीने अन्य कोणत्याही प्रकारे ती संपुष्टात आली असतील त्याबाबतीत.]

इलाखा नगराबाहेर महाअधिवक्त्याच्या शक्तींचा वापर.

९३. महाअधिवक्त्यास कलमे ९१ व ९२ अन्वये देण्यात आलेल्या शक्ती, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, इलाखा नगराबाहेर जिल्हाधिकाऱ्यास किंवा राज्य शासन याबाबतीत नेमील अशा अधिकाऱ्याला देखील वापरता येतील.

भाग सहावा

पूरक कार्यवाही

पूरक कार्यवाही.

९४. न्यायाची उद्दिष्टे विफल होऊ नयेत याकरिता, जर तसे विहित करण्यात आले तर न्यायालयास,—

(क) प्रतिवादीने आपल्या उपस्थितीकरता जामीन का देऊ नये यासंबंधी कारण दाखवण्यासाठी त्याला अटक करून न्यायालयासमोर आणण्यासाठी वॉरंट काढता येईल, आणि त्याने कोणत्याही जामीनादेशाचे अनुपालन करण्यात कसूर केल्यास त्याला दिवाणी कारागृहात पाठवता येईल;

(ख) प्रतिवादीच्या मालकीची कोणतीही मालमत्ता हजर करून ती न्यायालयाकडे सोपवण्याकरता जामीन देण्याचा निदेश देता येईल किंवा कोणतीही मालमत्ता जप्त करण्याचा आदेश देता येईल;

(ग) तात्पुरता मनाईहुकूम देता येईल आणि आज्ञाभंग झाल्यास त्याबद्दल दोषी असलेल्या व्यक्तीला दिवाणी तुरुंगात पाठविता येईल आणि तिची मालमत्ता जप्त करण्यात व विकण्यात यावी असा आदेश देता येईल;

(घ) कोणत्याही मालमत्तेचा प्रापक नेमता येईल आणि त्याची मालमत्ता जप्त करून आणि तिची विक्री करून त्याद्वारे त्याला आपली कर्तव्ये पार पाडावयास लावता येईल;

(ङ) न्यायालयास न्याय्य व सोयीस्कर वाटतील असे अन्य आंतर्वार्धिक आदेश काढता येतील.

अपुऱ्या कारणाच्या आधारे अटक, जप्ती किंवा मनाईहुकूम मिळवण्याबद्दल भरपाई.

९५. (१) ज्यामध्ये खटपूर्व कलमान्वये अटक किंवा जप्ती घडवून आणली असेल किंवा तात्पुरता मनाईहुकूम काढण्यात आला असेल अशा दाव्यामध्ये,—

(क) अशी अटक, जप्ती किंवा मनाईहुकूम अपुऱ्या कारणावरून करण्यात आला आहे असे न्यायालयास वाटले तर, किंवा

(ख) वादीचा दावा निष्फळ झाला आणि तो दाखल करण्यामागे कोणतेही वाजवी किंवा संभाव्य कारण नव्हते असे न्यायालयास वाटले तर,

त्याबाबतीत प्रतिवादीला न्यायालयाकडे अर्ज करता येईल, आणि अशा अर्जावरून न्यायालयास वादीच्या विरुद्ध, प्रतिवादीला [१][झालेला खर्च व पोचलेली हानी (लौकिकाची हानी धरून)] त्याबद्दल त्यास वाजवी वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त एक हजार रुपये इतकी रक्कम आपल्या आदेशाद्वारे देवविता येईल :

परंतु, न्यायालयाने त्याच्या आर्थिक अधिकारितेच्या मर्यादांपेक्षा अधिक रक्कम या कलमान्वये देवविता कामा नये.

(२) अशा अर्जाचा निर्णय करणाऱ्या आदेशामुळे, अशी अटक, जप्ती किंवा मनाईहुकूम यांच्या संबंधातील भरपाईसाठी कोणताही दावा लावण्यास आडकाठी होईल.

भाग सातवा

अपिले

मूळ हुकूमनाम्याविरुद्ध अपिले

मूळ हुकूमनाम्याविरुद्ध अपील.

९६. (१) या संहितेच्या प्रधानांगामध्ये किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये अन्यथा स्पष्टपण उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, मूळ अधिकारितेचा वापर करणाऱ्या कोणत्याही न्यायालयाने काढलेल्या प्रत्येक हुकूमनाम्याविरुद्ध अशा न्यायालयांच्या निर्णयांवरील अपिलांची सुनावणी करण्यास प्राधिकृत असलेल्या न्यायालयाकडे अपील करता येईल.

(२) एकतर्फी काढलेल्या मूळ हुकूमनाम्याच्याविरुद्ध अपील करता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ३२ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

(३) पक्षकारांच्या संमतीनिशी न्यायालयाने काढलेल्या हुकूमनाम्याच्या विरुद्ध अपील करता येणार नाही.

[१][(४) लघुवाद न्यायालयाकडून दखलपात्र अशा स्वरूपाच्या कोणत्याही दाव्यामध्ये हुकूमनामा काढलेला असताना, मूळ दाव्यातील वादविषयक रक्कम किंवा मूल्य तीन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल त्या बाबतीत, कायदेविषयक प्रश्नाव्यतिरिक्त एरवी, त्यावर अपील करता येणार नाही.]

प्रारंभिक हुकूमनाम्याच्या विरुद्ध अपील केलेले नसताना, अंतिम हुकूमनाम्याच्या-विरुद्ध अपील करण्याबाबत.

९७. या संहितेच्या प्रारंभानंतर काढलेल्या कोणत्याही प्रारंभिक हुकूमनाम्यामुळे व्यथित झालेल्या एखाद्या पक्षकाराने अशा हुकूमनाम्याच्या विरुद्ध कोणतेही अपील केले नाही तर, अंतिम हुकूमनाम्याच्या विरुद्ध जे कोणतेही अपील दाखल करण्यात येईल त्यामध्ये त्या हुकूमनाम्याच्या योग्यायोग्यतेबाबत त्याला वाद उपस्थित करता येणार नाही.

दोन किंवा अधिक न्यायाधीशांनी अपिलाची सुनावणी केली असेल त्या बाबतीत निर्णय.

९८. (१) दोन किंवा अधिक न्यायाधीशांच्या न्यायपीठाने अपिलाची सुनावणी केली असेल त्या बाबतीत, अपिलाचा निर्णय अशा न्यायधीशांच्या किंवा अशांपैकी बहुसंख्य न्यायाधीशांच्या (तसे असल्यास) मतानुसार केला पाहिजे.

(२) ज्या हुकूमनाम्याच्या विरुद्ध अपील करण्यात आले असेल त्यात बदल करण्याच्या किंवा तो फिरवण्याच्या न्यायनिर्णयाबाबत बहुसंख्याक न्यायाधीश सहमत न झाल्यास, असा हुकूमनामा कायम करण्यात येईल :

परंतु, अपिलाची सुनावणी करणारे न्यायपीठ, [२][दोन किंवा अन्य समसंख्येइतके न्यायाधीश मिळून बनलेले असून, ते न्यायाधीश न्यायपीठावरील न्यायाधीशांपेक्षा अधिक न्यायाधीश मिळून बनलेल्या न्यायालयाचे असतील] आणि न्यायपीठावरील न्यायाधीशांचा कायदेविषयक मुद्यावर मतभेद झाला तर, कोणत्या कायदेविषयक मुद्यावर त्यांचा मतभेद झाला ते त्यांना नमूद करता येईल आणि त्यानंतर इतर न्यायाधीशांपैकी एका किंवा अधिक न्यायाधीशांकडून केवळ त्याच मुद्यावर अपिलाची सुनावणी झाली पाहिजे, आणि ज्या न्यायाधीशांनी अपिलाची सुनावणी केली असेल त्या न्यायाधीशांच्या—ज्यांनी अपिलाची पहिली सुनावणी केली असेल त्यांच्यासहित—बहुमतानुसार (तसे असल्यास) अशा मुद्याचा निर्णय करण्यात येईल.

[३][(३) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटमधील कोणत्याही उपबंधांमध्ये फेरफार होतो किंवा त्यावर अन्यथा परिणाम होतो असे समजण्यात येता कामा नये.]

गुणावगुण किंवा अधिकारिता यांवर परिणाम न करणारी चूक किंवा नियमबाह्य गोष्ट झाल्यास कोणताही हुकूमनामा फिरवू किंवा बदलू नये.

९९. ज्यामुळे प्रकरणाचे गुणावगुण किंवा न्यायालयाची अधिकारिता यांवर परिणाम होत नाही अशा प्रकारचे पक्षकारांचे किंवा वादकारणांचे कोणतेही अपसंयोजन [४][किंवा असंयोजन] अथवा दाव्यामधील कोणत्याही कार्यवाहीतील अशी कोणतीही चूक, उणीव किंवा नियमबाह्यता या कारणावरून कोणताही हुकूमनामा अपिलांती फिरवण्यात किंवा बदलण्यात येता कामा नये किंवा कोणतेही प्रकरण फेरचौकशीसाठी परत पाठवण्यात येता कामा नये :

[५][परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट आवश्यक पक्षकाराच्या असंयोजनाच्या बाबतीत लागू होणार नाही.]

अपिली हुकूमनाम्याविरुद्ध अपील

चुकल्याच्या निर्णयावर बाधक परिणाम होत नसेल तर, कलम ४७ खालील कोणताही आदेश फिरवू नये किंवा त्यात फेरबदल करू नये.

[६][९९-क. कलम ९९ च्या व्यापकतेला बाध न येता, कलम ४७ खालील कोणताही आदेश अशा आदेशाच्या संबंधातील कोणत्याही कार्यवाहीत कोणतीही चूक, उणीव किंवा नियमबाह्य गोष्ट घडल्यास फिरविण्यात किंवा त्यात सारभूत फेरबदल करण्यात येता कामा नये. मात्र अशा चुकीमुळे, उणिवेमुळे किंवा नियमबाह्य गोष्टीमुळे खटल्याच्या निर्णयावर बाधक परिणाम झालेला असेल तर गोष्ट वेगळी.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ३३ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. वरील अधिनियमाच्या कलम ३४ द्वारे बदली दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

३. सन १९२८ चा अधिनियम १८, कलम २ आणि अनुसूची १ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४, कलम ३५ (एक) द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

५. वरील अधिनियमाच्या कलम ३५ (दोन) द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

६. वरील अधिनियमाच्या कलम ३५ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

[१][१००. (१) या संहितेमधील प्रधानांगामध्ये किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये स्पष्टपणे उपबंधित केले नसल्यास, एखाद्या प्रकरणी महत्त्वाचा कायदेविषयक प्रश्न गुंतलेला आहे अशी उच्च न्यायालयाची खात्री पटल्यास, उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयाने अपिलांती काढलेल्या प्रत्येक हुकूमनाम्याच्या विरुद्ध उच्च न्यायालयाकडे अपील करता येते. दुसरे अपील.

(२) एकतर्फी काढलेल्या अपिली हुकूमनाम्याच्या विरुद्ध या कलमाखाली अपील होऊ शकते.

(३) या कलमाखालील अपिलामधील अपील अर्जात, अपिलात उद्भवणारा महत्त्वाचा कायदे-विषयक प्रश्न नेमकेपणाने नमूद करावा लागेल.

(४) एखाद्या प्रकरणी सारभूत असा कायदेविषयक प्रश्न गुंतलेला आहे, अशी उच्च न्यायालयाची खात्री पटल्यास, त्याने त्या प्रश्नाची निश्चित मांडणी केली पाहिजे.

(५) अशा प्रकारे मांडणी केलेल्या प्रश्नाच्या संबंधात अपिलाची सुनावणी करण्यात येईल आणि अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, त्या प्रकरणी अशा प्रकारचा कायदेविषयक प्रश्न गुंतलेला नाही असा युक्तिवाद करण्यास उत्तरवादीला मुभा दिली जाईल :

परंतु, न्यायालयाने मांडणी न केलेल्या अन्य कोणत्याही महत्त्वाच्या कायदेविषयक प्रश्नाच्या बाबतीत, त्या प्रकरणी, असा प्रश्न गुंतलेला आहे अशी न्यायालयाची खात्री पटल्यास, कारणे नमूद करून, त्यावरील अपिलाची सुनावणी करण्याची न्यायालयाची शक्ती या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे हिरावली जाते किंवा संकोच पावते असे मानले जाणार नाही.]

[२][१००-क. कोणत्याही उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंटमध्ये किंवा कायद्याहतक्याच प्रभावी असलेल्या अन्य कोणत्याही संलेखात किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अपिली हुकूमनाम्यावरील किंवा आदेशावरील कोणत्याही अपिलाची उच्च न्यायालयाच्या एखाद्या न्यायाधीशाने एकटघानेच सुनावणी करून निकाल दिला असेल त्या बाबतीत, अशा अपिलात अशा एकटघा न्यायाधीशाने दिलेल्या न्यायनिर्णयाच्या, निर्णयाच्या किंवा आदेशाच्या विरुद्ध अथवा अशा अपिलात काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याविरुद्ध आणखी पुढे अपील करता येणार नाही.] विवक्षित प्रकरणी आणखी पुढे अपील नाही.

१०१. कलम १०० मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणावरून दुसरे अपील करता येणार नाही. दुसरे अपील इतर कोणत्याही कारणा-वरून नाही.

१०२. लघुवाद न्यायालयाकडून दखलपात्र अशा स्वरूपाच्या कोणत्याही दाव्यामध्ये मूळ दाव्या-तील विषयवस्तूची रक्कम किंवा मूल्य [३][तीन हजार रुपयांहून] अधिक नसेल तेव्हा दुसरे अपील करता येणार नाही. विवक्षित दाव्यांमध्ये दुसरे अपील नाही.

[४][१०३. कोणत्याही दुसऱ्या अपिलांमध्ये अपिलाच्या निकालासाठी आवश्यक असलेला जो बादमुद्दा— तथ्यविषयक वाद-मुद्दा निर्णीत करण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

(क) निम्न अपील न्यायालयाने किंवा प्रारंभिक न्यायालय आणि निम्न अपील न्यायालय या दोघांनी निर्णीत केलेला नसेल ; किंवा

(ख) कलम १०० मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा कायदेविषयक प्रश्नावरील निर्णयामुळे अशा न्यायालयाने किंवा न्यायालयांनी चुकीच्या पद्धतीने निर्णीत केलेला असेल,

असा कोणताही बादमुद्दा उच्च न्यायालयास दफ्तरांतर्गत पुरावा पुरेसा असल्यास निर्णीत करता येईल.]

आदेशांच्या विरुद्ध अपिले

१०४. पुढील आदेशांच्या विरुद्ध अपील करता येते आणि या संहितेच्या प्रधानांगामध्ये किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले नसल्यास इतर कोणत्याही आदेशांच्या विरुद्ध अपील करता येणार नाही. :— ज्यांच्याविरुद्ध अपील करता येते असे आदेश.

[५]* * * *

[६][(च्च्) कलम ३५क खालील आदेश;]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ३७ द्वारे कलम १०० साठी बदली दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. वरील अधिनियमाचा कलम ३८ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

३. वरील अधिनियमाच्या कलम ३९ द्वारे, "एक हजार रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

४. वरील अधिनियमाच्या कलम ४० द्वारे कलम १०३ साठी बदली दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

५. सन १९४० चा अधिनियम १०, कलम ४९ आणि अनुसूची ३ द्वारे खंड (क्) ते (च्) वगळण्यात आले.

६. सन १९२२ चा अधिनियम ९, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आला. पहा—पूर्वीच्या कलम ३५क ची तळटीप

[१][(च्च्क्) कलम ९१ किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ९२ मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा दावा दाखल करण्यास परवानगी नाकारणारा कलम ९१ किंवा ९२ खालील आदेश;]

(छ) कलम ९५ खालील आदेश.

(ज) द्रव्य दंड बसविताना अथवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना करावयाची अटक किंवा स्थानबद्धता सोडून एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला अटक करण्याचा किंवा दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्याचा निदेश देणारा या संहितेच्या कोणत्याही उपबंधाखालील आदेश;

(झ) नियमांखाली काढलेल्या ज्या आदेशावर अपील करण्यास नियमांनुसार स्पष्टपणे मुभा आहे असा कोणताही आदेश:

[२][परंतु, खंड (च्च्) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही आदेशाच्या बाबतीत, एकतर असा आदेश काढावयास नको होता किंवा कमी रकमेच्या प्रदानासंबंधीचा आदेश काढावयास हवा होता, या व्यतिरिक्त कोणत्याही कारणावरून अपील करता येणार नाही.]

(२) या कलमाखालील अर्पिलामध्ये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या विरुद्ध अपील करता येणार नाही.

इतर आदेश.

१०५. (१) न्यायालयाने त्याच्या मूळ किंवा अपील अधिकारितेचा वापर करून काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या विरुद्ध, अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केलेले नसल्यास, अपील करता येणार नाही;

मात्र, हुकूमनाम्याच्या विरुद्ध अपील केले असेल त्या बाबतीत, प्रकरणाच्या निकालावर परिणाम करणारी अशी कोणत्याही आदेशातील कोणतीही चूक, उणीव किंवा नियमबाह्य गोष्ट ही अपीलअर्जामध्ये हरकतीचे कारण म्हणून पुढे मांडता येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [३]* * * ज्या प्रतिप्रेषण आदेशाच्या विरुद्ध अपील होऊ शकते त्या आदेशामुळे व्यथित झालेल्या एखाद्या पक्षकाराने त्याविरुद्ध अपील न केल्यास त्यानंतर त्याला त्या आदेशाच्या यथातथ्यपणासंबंधी हरकत घेता येणार नाही.

कोणत्या न्यायालयांनी अपिलांची सुनावणी करावी.

१०६. कोणत्याही आदेशाच्या विरुद्ध अपील करण्यास मुभा असेल त्या बाबतीत, ज्या दाव्यामध्ये असा आदेश काढण्यात आला असेल त्या दाव्यातील हुकूमनाम्याच्या विरुद्ध ज्या न्यायालयाकडे अपील होऊ शकेल त्या न्यायालयाकडे, किंवा जेव्हा असा आदेश अपील अधिकारितेचा वापर करून (उच्च न्यायालयाव्यतिरिक्त) अन्य न्यायालयाने काढला असेल तर, उच्च न्यायालयाकडे अपील करता येते.

अपिलांसंबंधी सर्वसाधारण उपबंध

अपील न्यायालयाच्या शक्ती.

१०७. (१) विहित करण्यात येतील अशा अटींच्या व शर्तींमर्यादांच्या अधीनतेने, अपील न्यायालयास—

(क) प्रकरण अंतिमरीत्या निर्णीत करण्याची;

(ख) प्रकरण प्रतिप्रेषित करण्याची;

(ग) वादमुद्दे काढून ते संपरीक्षेसाठी पाठवण्याची;

(घ) जादा पुरावा घेण्याची किंवा असा पुरावा घ्यावयास लावण्याची;

शक्ती असेल.

(२) पूर्वोक्तानुसार अटींच्या व शर्तींमर्यादांच्या अधीनतेने, अपील न्यायालयास मूळ अधिकारिता असलेल्या न्यायालयांमध्ये मांडलेल्या दाव्यांच्या संबंधात या संहितेद्वारे त्या न्यायालयांना देण्यात आलेल्याच शक्ती असतील आणि याद्वारे त्यांना नेमून देण्यात आल्याप्रमाणे जवळ जवळ तशीच कर्तव्ये पार पाडावी लागतील.

अपिली हुकमनामे व आदेश यांच्याविरुद्ध केलेल्या अपिलांतील कार्यपद्धती.

१०८. मूळ हुकमनाम्याविरुद्ध करावयाच्या अपिलासंबंधीचे या भागामधील उपबंध—

(क) अपिली हुकूमनामे, आणि

(ख) या संहितेखाली आणि ज्यामध्ये निराळ्या कार्यपद्धतीसाठी उपबंध करण्यात आलेले नाहीत अशा कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्याखाली काढलेल्या आदेशाच्या विरुद्ध केलेल्या अपिलांना शक्यतेथवर लागू होतील.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ४१ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. सन १९२२ चा अधिनियम ९, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आला. पहा : पूर्वीच्या कलम ३५क ची तळटीप.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४ कलम ४२ द्वारे विवक्षित मजकूर वगळण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

[1][१०९. संविधानाचा भाग पाचवा—प्रकरण चौथे यामधील उपबंध व भारतातील न्यायालयाच्या सर्वोच्च न्यायालयाविरुद्ध केल्या जाणाऱ्या अपिलांच्या संबंधात सर्वोच्च न्यायालयाकडून वेळोवेळी करण्यात येतील असे नियम आणि यात यापुढे समाविष्ट असलेले उपबंध यांच्या अधीनतेने, जर उच्च न्यायालयातील एखाद्या दिवाणी कार्यवाहीत,— करता येतात.

(एक) त्या प्रकरणी सर्वसाधारण महत्त्वाचा असा सारभूत कायदेविषयक प्रश्न गुंतलेला आहे; व

(दोन) उच्च न्यायालयाच्या मते तो प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने निर्णीत करणे आवश्यक आहे;

असे उच्च न्यायालयाने प्रमाणित केले तर, त्या कार्यवाहीतील कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा अंतिम आदेश याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करता येते.].

११०. [विषयवस्तूंचे मूल्य] 'दिवाणी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९७३' (१९७३ चा ४९) कलम ३ द्वारे निरसित.

१११. [विवक्षित अपिलांना आडकाठी.] 'अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे निरसित.

[2][१११-क. [फेडरल कोर्टाकडे अपिले.] 'फेडरल कोर्ट अधिनियम, १९४१', (१९४१ चा २१) कलम २ द्वारे निरसित.

११२. [3][(१) या संहितेतील कोणत्याही गोष्टीमुळे,— व्यावृत्ती.

(क) संविधानाचा अनुच्छेद १३६ किंवा इतर कोणताही उपबंध याखाली सर्वोच्च न्यायालयास असलेल्या शक्तींवर परिणाम होतो, किंवा

(ख) सर्वोच्च न्यायालयाने, त्याच्याकडे अपिले सादर करण्यासाठी किंवा त्या न्यायालयासमोर अपिलांचे काम चालवण्यासाठी त्याने केलेल्या आणि त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही नियमांना बाध येतो,

असे समजण्यात येता कामा नये.]

(२) या कलमातील कोणतीही गोष्ट, फौजदारी किंवा नौ-अधिकरणी किंवा उप-नौ-अधिकरणी अधिकारितेतील कोणत्याही बाबीस किंवा युद्धलूटविषयक न्यायालयांच्या आदेशांच्या आणि हुकूमनाम्यांच्या विरुद्ध केलेल्या अपिलास लागू होत नाही.

भाग आठवा

निर्देशन, पुनर्विलोकन व पुनरीक्षण

११३. विहित करण्यात येतील अशा अटींच्या व मर्यादांच्या अधीनतेने, कोणत्याही न्यायालयास एखाद्या प्रकरणाचे परिकथन तयार करून ते उच्च न्यायालयाचे मत घेण्याकरिता त्याकडे निर्देशित करता येईल आणि उच्च न्यायालयास त्यावर त्यास योग्य वाटेल असा आदेश काढता येईल: उच्च न्यायालयाकडे निर्देशन.

[4][परंतु, न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये, एखादा अधिनियम, अध्यादेश किंवा विनियम यांच्या अथवा एखाद्या अधिनियमात, अध्यादेशात किंवा विनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही उपबंधांच्या विधिग्राह्यतेसंबंधीचा प्रश्न गुंतलेला असून, ते प्रकरण निकालात काढण्यासाठी त्या प्रश्नाचा निर्णय होणे जरुरीचे आहे अशी न्यायालयाची खात्री पटली, आणि असा अधिनियम, अध्यादेश, विनियम

---

१. सन १९७३ चा अधिनियम ४९, कलम २ द्वारे पूर्वीचे कलम १०९ ऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. सन १९३७ च्या अनुकूलन आदेशाद्वारे समाविष्ट करण्यात आला.

३. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ पोटकलम (१) ऐवजी दाखल.

४. सन १९५१ चा अधिनियम २४, कलम २ द्वारे जादा दाखल.

किंवा उपबंध बेकायदेशीर किंवा अप्रवर्ती आहे, पण ते न्यायालय ज्या उच्च न्यायालयास दुय्यम असेल अशा उच्च न्यायालयाने किंवा सर्वोच्च न्यायालयाने तो तसा असल्याचे घोषित केलेले नसेल तर, न्यायालयाने आपले मत व त्यासंबंधीची कारणे नमूद करून त्या प्रकरणाचे परिकथन तयार केले पाहिजे, आणि उच्च न्यायालयाच्या मताकरिता ते निर्देशित केले पाहिजे.

स्पष्टीकरण.—या कलमात, "विनियम" याचा अर्थ, बंगाल, मुंबई किंवा मद्रास संहितेतील कोणताही विनियम अथवा 'सर्वसाधारण वाक्‌खंड अधिनियम, १८९७' किंवा एखाद्या राज्याच्या सर्वसाधारण वाक्‌खंड अधिनियमामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणताही विनियम, असा आहे.] १८९७ चा एक.

पुनर्विलोकन.

११४. पूर्वोक्तानुसार शर्तींच्या व मर्यादांच्या अधीनतेने,—

(क) ज्या हुकूमनाम्याविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध अपील करण्यास या संहितेनुसार मुभा आहे, पण ज्याच्याविरुद्ध अपील दाखल करण्यात आलेले नाही असा हुकूमनामा किंवा आदेश,

(ख) ज्या हुकूमनाम्याविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध अपील करण्यास या संहितेनुसार मुभा नाही असा हुकूमनामा किंवा आदेश, किंवा

(ग) लघुवाद न्यायालयाकडून आलेल्या निर्देशनावरील निर्णय,

यामुळे आपणास झळ पोचली आहे असे मानणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, ज्या न्यायालयाने हुकूमनामा किंवा आदेश काढला असेल अशा न्यायालयाकडे अशा न्यायनिर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी अर्ज करता येईल आणि न्यायालयास त्यावर स्वत:ला योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

पुनरीक्षण.

११५. [१][(१)] उच्च न्यायालयास त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयाने ज्या प्रकरणाचा निर्णय केलेला आहे व ज्यासंबंधी त्याच्याकडे अपील होऊ शकत नसेल अशा कोणत्याही प्रकरणाची कागदपत्रे मागविता येतील, आणि जर अशा दुय्यम न्यायालयाने,—

(क) कायद्यानुसार त्याकडे निहित नसलेल्या अशा अधिकारितेचा वापर केला आहे, किंवा

(ख) अशाप्रकारे निहित झालेल्या अधिकारितेचा वापर करण्यात कसूर केली आहे, किंवा

(ग) आपल्या अधिकारितेचा वापर करताना बेकायदेशीर किंवा महत्त्वाच्या बाबतीत नियमबाह्य कृती केली आहे,

असे दिसत असेल तर, उच्च न्यायालयास त्या प्रकरणी स्वत:स योग्य वाटेल असा आदेश काढता येईल :

[१][परंतु, उच्च न्यायालयाने, एखाद्या दाव्याच्या किंवा अन्य कार्यवाहीच्या ओघात काढण्यात आलेला कोणताही आदेश किंवा एखादा वादमुद्दा निर्णीत करणारा कोणताही आदेश,—

(क) जर तो आदेश, पुनरीक्षणासाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराच्या बाजूने काढण्यात आला असता तर त्यामुळे दाव्याचा किंवा अन्य कार्यवाहीचा अंतिम रीत्या निकाल लागला असता, किंवा

(ख) तो आदेश अंमलात राहू दिल्यास, न्याय निष्फळ ठरेल किंवा ज्या पक्षकाराच्या विरुद्ध तो काढण्यात आला असेल त्या पक्षकाराला त्यामुळे भरून न येण्याजोगी हानी सोसावी लागेल,

अशा बाबीव्यतिरिक्त एरव्ही, या कलमान्वये बदलता कामा नये किंवा फिरवता कामा नये.]

[१][(२) उच्च न्यायालयाकडे किंवा त्यास दुय्यम असणाऱ्या कोणत्याही न्यायालयाकडे ज्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या विरुद्ध अपील करता येत असेल तो हुकूमनामा किंवा आदेश उच्च न्यायालयाने या कलमान्वये बदलता कामा नये किंवा फिरवता कामा नये.

स्पष्टीकरण.—या कलमातील "ज्या प्रकरणाचा निर्णय केलेला आहे असे कोणतेही प्रकरण" या शब्दप्रयोगात एखाद्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या ओघात काढलेला कोणताही आदेश किंवा एखादा वादमुद्दा निर्णीत करणारा कोणताही आदेश समाविष्ट आहे.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ४३ द्वारे कलम ११५ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा क्रमांक नव्याने देण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. वरील अधिनियमाच्या कलम ४३ (क) द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४३(ख) द्वारे समाविष्ट करण्यात आला.

भाग नववा

[१][२[न्यायिक आयुक्ताचे न्यायालय सोडून अन्य] उच्च न्यायालयांच्या] संबंधी विशेष उपबंध,

हा भाग विवक्षित उच्च न्यायालयांनाच लागू असणे.

११६. हा भाग २[न्यायिक आयुक्ताचे न्यायालय सोडून अन्य] केवळ उच्च न्यायालयांनाच लागू आहे.

उच्च न्यायालयांना संहिता लागू करणे.

११७. या भागात किंवा दहाव्या भागात किंवा नियमांमध्ये उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, या संहितेचे उपबंध अशा उच्च न्यायालयांना लागू असतील.

दावाखर्च निश्चिती करण्यापूर्वी हुकूमनाम्याची अंमलबजावणी.

११८. आपल्या मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करून काढलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी, दाव्यात आलेला खर्च आकारणी करून निश्चित केला जाण्यापूर्वी करण्यात यावी असे अशा कोणत्याही उच्च न्यायालयाला वाटले तर, त्या न्यायालयास, दावाखर्चाशी संबंधित असेल तेवढचा अंशाव्यतिरिक्त बाकी हुकूमनाम्याची अंमलबजावणी ताबडतोब करण्यात यावी, आणि दावाखर्चाशी संबंधित असेल तेवढचा अंशाच्या बाबतीत, आकारणी करून खर्चाची रक्कम निश्चित करण्यात आली की, लगेच हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यात यावी, असा आदेश देता येईल.

अनधिकृत व्यक्तींनी न्यायालयास उद्देशून निवेदन करावयाचे नाही.

११९. या संहितेतील कोणत्याही गोष्टींमुळे कोणतीही व्यक्ती अन्य व्यक्तीच्या वतीने, न्यायालय आपल्या मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करीत असता त्यास उद्देशून निवेदन करण्यास, अथवा न्यायालयाला त्याच्या सनदेद्वारे देण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून त्याने त्या व्यक्तीला तसे प्राधिकृत केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, साक्षीदारांची तपासणी करण्यास, अथवा अधिवक्ते, वकील आणि न्यायवादी यांच्यासंबंधी नियम करण्याच्या उच्च न्यायालयाच्या शक्तींमध्ये हस्तक्षेप करण्यास प्राधिकृत होते असे मानण्यात येणार नाही.

उच्च न्यायालय मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करत असता उपबंध लागू नाहीत.

१२०. (१) उच्च न्यायालय त्याच्या मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करीत असताना, पुढील उपबंध म्हणजे कलमे १६, १७ व २० त्यास लागू होणार नाहीत.

* * * * *

भाग दहावा

नियम

पहिल्या अनुसूचीतील नियमांची परिणामकता.

१२१. पहिल्या अनुसूचीतील नियम या भागातील उपबंधांनुसार रद्दबातल होईपर्यंत किंवा बदलले जाईपर्यंत या संहितेच्या प्रधानांगात अधिनियमित केलेले असावेत त्याप्रमाणे परिणामक राहतील.

नियम करण्याच्या विवक्षित न्यायालयांच्या शक्ती.

१२२. ४[५[न्यायिक आयुक्तांचे न्यायालय सोडून अन्य] उच्च न्यायालयांना] ६*** वेळोवेळी, त्यांची स्वतःची कार्यपद्धती व त्यांच्या अधीक्षणाखाली असलेल्या दिवाणी न्यायालयांची कार्यपद्धती विनियमित करणारे नियम पूर्वप्रसिद्धीनंतर करता येतील, आणि अशा नियमाद्वारे, पहिल्या अनुसूचीतील सर्व किंवा कोणतेही नियम रद्दबातल करता येतील, त्यात फेरबदल करता येतील किंवा भर घालता येईल.

---

१. सन १९५१ चा अधिनियम २, कलम १४ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश (क्रमांक २), १९५६ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

३. सन १९०९ चा अधिनियम ३, कलम १२७ आणि अनुसूची तीन द्वारे पोटकलम (२) निरसित करण्यात आले.

४. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे बदली दाखल करण्यात आला.

५. विधि अनुकूलन आदेश, (क्रमांक २) १९५६ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

६. "आणि लोअर बर्माच्या मुख्य न्यायाधीशाना" हा मजकूर सन १९२३ चा अधिनियम ११, कलम ३ आणि अनुसूची दोन द्वारे निरसित करण्यात आला.

विवक्षित राज्यांमध्ये नियम समितीची स्थापना.

१२३. (१) [१[कलम १२२ मध्ये) निर्दिष्ट केलेल्या उच्च न्यायालयाच्या [२]* * * बैठकीचे जे नित्याचे ठिकाण आहे अशा नगरात] 'नियम समिती' नावाची एक समिती स्थापन करण्यात येईल.

(२) अशी प्रत्येक समिती पुढील सदस्य मिळून बनलेली असेल, ते असे :—

(क) ज्या नगरामध्ये समितीची स्थापना करण्यात आली असेल तेथील उच्च न्यायालयाचे तीन न्यायाधीश व त्यांपैकी एकाची जिल्हा न्यायाधीश किंवा [३]* * * * खंड न्यायाधीश म्हणून निदान तीन वर्षांची सेवा झालेली असली पाहिजे,

[४][(ख) त्या न्यायालयात नाव नोंदणी झालेले दोन विधि व्यवसायी,)

[५][(ग)] उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश, [६]* * *

[७]* * * * * * *

(३) अशा प्रत्येक समितीच्या सदस्यांची नेमणूक [८][उच्च न्यायालयाने] केली पाहिजे व तसेच त्याने त्यांच्यातील एकास अध्यक्ष म्हणून नामनियुक्त केले पाहिजे :

[९]* * * * * * *

(४) अशा कोणत्याही समितीच्या प्रत्येक सदस्याने, याबाबतीत [८][उच्च न्यायालयाकडून] विहित करण्यात येईल इतक्या कालावधीपर्यंत पद धारण केले पाहिजे ; आणि जेव्हा कोणताही सदस्य सेवानिवृत्त होईल, राजीनामा देईल, मृत्यू पावेल किंवा ज्या राज्यामध्ये ती समिती स्थापन करण्यात आली असेल त्या राज्यात तो राहण्याचे बंद होईल किंवा त्या समितीचा सदस्य म्हणून काम करण्यास असमर्थ होईल तेव्हा सदर [८][उच्च न्यायालयास] त्याच्या जागी दुसऱ्या व्यक्तीस नेमता येईल.

(५) अशा प्रत्येक समितीचा एक सचिव असेल व तो [८][उच्च न्यायालयाकडून] नेमला जाईल आणि [१०][राज्य शासनाकडून] या बाबतीत उपबंधित करण्यात येईल तितके पारिश्रमिक त्याला मिळेल.

समितीने उच्च न्यायालयाला अहवाल देणे.

१२४. प्रत्येक नियम समितीने ज्या नगरात तिची स्थापना करण्यात आली असेल तेथील उच्च न्यायालयाकडे, पहिल्या अनुसूचीतील नियम रद्दबातल करण्याच्या, त्यात फेरबदल करण्याच्या किंवा त्यात भर घालण्याच्या अथवा नवीन नियम करण्याच्या प्रस्तावावर अहवाल दिला पाहिजे, आणि कलम १२२ अन्वये कोणतेही नियम करण्यापूर्वी उच्च न्यायालयाने असा अहवाल विचारात घेतला पाहिजे.

नियम करण्याची. इतर उच्च न्यायालयांची शक्ती.

१२५. कलम १२२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या न्यायालयाहून अन्य उच्च न्यायालयास, त्या कलमाद्वारे दिलेल्या शक्ती [११][[१२][राज्य शासन] निर्धारित करील अशा] रीतीने व अशा शर्तींच्या अधीनतेने, वापरता येतील :

परंतु, अशा कोणत्याही उच्च न्यायालयास, इतर कोणत्याही उच्च न्यायालयाने केलेले कोणतेही नियम आपल्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये लागू करणारा नियम पूर्वप्रसिद्धीनंतर करता येईल.

---

१. सन १९१६ चा अधिनियम १३, कलम २ आणि अनुसूची द्वारे "कलकत्ता, मद्रास, मुंबई, अलाहाबाद, लाहोर आणि रंगून यांपैकी प्रत्येक शहरात" हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. "आणि मुख्य न्यायालयाच्या" हा मजकूर, सन १९२३ चा अधिनियम क्रमांक ११, कलम ३ आणि अनुसूची दोन द्वारे वगळण्यात आला. सन १९२५ चा अधिनियम क्रमांक ३२ द्वारे तो पुन्हा समाविष्ट करण्यात आला व अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे नंतर पुन्हा वगळण्यात आला.

३. सन १९२३ चा अधिनियम क्रमांक ११, कलम ३ आणि अनुसूची दोन द्वारे "(ब्रह्मदेशामध्ये) हा मजकूर निरसित करण्यात आला.

४. सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २, कलम १६ द्वारे मूळ खंड (ख) आणि (ग) ऐवजी दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाद्वारे खंड (घ) व (ङ) ला अनुक्रमे खंड (ग) व (घ) असे अक्षर नव्याने देण्यात आले.

६. "आणि" हा शब्द, सन १९७८ चा अधिनियम क्रमांक ३८, कलम ३ आणि दुसरी अनुसूची याद्वारे वगळण्यात आला.

७. खंड (घ) हा वरील अधिनियमाचे कलम ३ आणि दुसरी अनुसूची याद्वारे वगळण्यात आला.

८. सन १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४, कलम ४४ (एक) द्वारे "मुख्य न्यायमूर्तींनी किंवा मुख्य न्यायाधीशाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

९. वरील अधिनियमाच्या कलम ४४ (दोन) द्वारे परंतुक वगळले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

१०. "प्रकरणपरत्वे गव्हर्नर जनरल इन कौन्सिलकडून किंवा लेफ्टनंट गव्हर्नरकडून" या मजकुराऐवजी हा मजकूर, अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे दाखल केला.

११. "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल ठरवील" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९२० चा अधिनियम ३८, कलम २ आणि अनुसूची एक, द्वारे बदली दाखल केला.

१२. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "कर्गच्या न्यायिक आयुक्त न्यायालयाबाबत गव्हर्नर जनरल इन कौन्सिल आणि इतर बाबतीत लेफ्टनंट गव्हर्नर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[१] [१२६. पूर्ववर्ती उपबंधांखाली केलेले नियम, त्या नियमांद्वारे ज्या न्यायालयाच्या कार्यपद्धतीचे नियमन केले जात असेल ते न्यायालय ज्या राज्यात असेल त्या राज्याच्या किंवा जर ते न्यायालय कोणत्याही राज्यात नसेल तर केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेस अधीन असतील.] नियम मान्यतेस अधीन असणे.

१२७. अशा प्रकारे केलेले आणि [२] [मान्य केलेले] नियम [३] [शासकीय राजपत्रात] प्रसिद्ध करण्यात येतील आणि प्रसिद्धीच्या तारखेपासून किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य तारखेपासून, ज्या न्यायालयाने ते केले असतील त्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये, ते जणू काही पहिल्या अनुसूचीत समाविष्ट असावेत त्याप्रमाणे तितकेच परिणामक व प्रभावी होतील. नियमांची प्रसिद्धी.

१२८. (१) असे नियम या संहितेच्या प्रधानांगातील उपबंधांशी विसंगत नसतील. परंतु त्यांच्या अधीन राहून नियमांमध्ये दिवाणी न्यायालयांच्या कार्यपद्धतीसंबंधीच्या कोणत्याही बाबींसाठी उपबंध करता येतील. नियमाद्वारे कोणत्या बाबींसाठी उपबंध करता येतील.

(२) विशेषत:, आणि पोटकलम (१) अन्वये देण्यात आलेल्या शक्तींच्या व्यापकतेला बाध येता, अशा नियमांद्वारे पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबींसंबंधी उपबंध करता येतील :—

(क) सर्वसाधारणपणे किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट क्षेत्रापुरते, डाकेने किंवा इतर कोणत्याही रीतीने समन्से, नोटिसा किंवा इतर आदेशिका यांची बजावणी, आणि अशा बजावणीबद्दलचा पुरावा;

(ख) पाळीव पशुपक्षी व अन्य जंगम मालमत्ता जप्तीखाली असताना तिचे जतन करणे व ती सांभाळून ठेवणे, असे जतन व सांभाळ यांबद्दल द्यावयाची फी, अशा पशुपक्ष्यांची व मालमत्तेची विक्री, व अशा विक्रीपासून मिळणारे उत्पन्न;

(ग) प्रतिहक्कमागणीच्या स्वरूपातील दाव्यांमधील प्रक्रिया, व अधिकारितेच्या प्रयोजनार्थ अशा दाव्यांचे मूल्यांकन;

(घ) ऋणांची जप्ती व विक्री यांच्या जोडीला किंवा त्यांच्याऐवजी, दिलेल्या गारनिशी व भारकारी आदेशासंबंधीची कार्यपद्धती;

(ङ) प्रतिवादी कोणत्याही व्यक्तीकडून—मग ती दाव्यातील पक्षकार असो वा नसो—अंशदान किंवा हानिरक्षण मिळण्यास हक्कदार असल्याचा दावा सांगत असेल अशा प्रकरणातील कार्यपद्धती;

(च) पुढील बाबतीतील संक्षिप्त कार्यपद्धती,—

ज्या दाव्यांमध्ये वादी—

(एक) व्यक्त किंवा उपलक्षित संविदेच्या आधारे; किंवा

वसूल करावयाची रक्कम ही पैशांची निश्चित रक्कम असेल किंवा द्रव्यदंडाव्यतिरिक्त अन्य ऋणाच्या स्वरूपात असेल त्या बाबतीत एखाद्या अधिनियमितीच्या आधारे; किंवा

जेव्हा मुख्य ऋणकोविरुद्ध केवळ एखाद्या ऋणाच्या किंवा पैशाच्या रूपात निर्धारित झालेल्या देण्याच्या बाबत दावा सांगितला असेल तेव्हा, हमीच्या आधारे, किंवा विश्वस्त-व्यवस्थेच्या आधारे,

प्रतिवादीकडून येणे असलेले किंवा पैशांच्या रूपात निर्धारित झालेले देणे, व्याजासहित किंवा त्याविना नुसते वसूल करू पाहात असेल अशा दाव्यांमधील; अथवा

(दोन) ज्या भाडेकरूची मुदत संपली आहे किंवा सोडून जाण्याबद्दल नोटीस देऊन ज्याची मुदत रीतसर संपवण्यात आली आहे किंवा भाडे न दिल्यामुळे जो भाडेकरू भाडेपट्टा गमावून बसण्यास पात्र ठरला आहे अशा भाडेकरूविरुद्ध किंवा अशा भाडेकरूच्या पोटी हक्क सांगणाऱ्या व्यक्तींच्या विरुद्ध मालकाने ती स्थावर मालमत्ता परत मिळवण्याकरता, भाडे किंवा दरम्यानचे उत्पन्न यांच्या मागणीसह किंवा त्याविना लावलेल्या दाव्यांमधील;

(छ) प्रारंभकारी समन्सच्या स्वरूपाची कार्यपद्धती;

(ज) दावे, अपिले व इतर कार्यवाही यांचे एकत्रीकरण;

(झ) कोणत्याही न्यायिक, न्यायिकवत् आणि न्यायिकेतर कर्तव्यांचे कोणताही प्रबंधक, प्रोथोनोटरी किंवा मास्टर अथवा न्यायालयाचा अन्य अधिकारी याजकडे प्रत्यायोजन; आणि

(ञ) दिवाणी न्यायालयांचे कामकाज चालवण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असतील असे सर्व नमुने, नोंदवह्या, पुस्तके, नोंदी व हिशेब.

---

१. पूर्वीच्या कलमाऐवजी हे कलम अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे दाखल करण्यात आले.

२. सन १९१७ चा अधिनियम २४, कलम २ आणि अनुसूची एक द्वारे "मंजूर केलेले" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. "प्रकरणपरत्वे भारताच्या राजपत्रात किंवा स्थानिक शासकीय राजपत्रात" या मजकुराऐवजी हा मजकूर, अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे दाखल केला. काटेकोरपणे पाहता, "प्रकरणपरत्वे शासकीय राजपत्र किंवा शासकीय राजपत्रात" असा मजकूर बदली दाखल करायला हवा; परंतु, नंतरचे शब्द अनावश्यक ठरतात म्हणून वगळण्यात आले आहेत.

आपल्या मूळ दिवाणी अधिकारिते-संबंधीच्या कार्य-पद्धतीबाबत नियम करण्याची उच्च न्यायालयांची शक्ती.

१२९. या संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [1][न्यायिक आयुक्ताचे न्यायालय सोडून अन्य कोणत्याही उच्च न्यायालयास, आपल्या मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करताना अवलंबावयाच्या कार्यपद्धतीचे नियमन करण्यासाठी त्याची स्थापना करणारे लेटर्स पेटंट [2][किंवा आदेश] [3][किंवा अन्य कायदा] यांच्याशी विसंगत नसलेले स्वत:ला योग्य वाटतील असे नियम करता येतील, आणि यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे या संहितेच्या प्रारंभकाळी अंमलात असलेल्या अशा कोणत्याही नियमांच्या विधिग्राह्यतेवर परिणाम होणार नाही.

कार्यपद्धतीखेरीज अन्य बाबींच्या संबंधात नियम करण्याची अन्य उच्च न्यायालयांची शक्ती.

[4][१३०. [5][ज्या उच्च न्यायालयास कलम १२९ लागू होते असे न्यायालय वगळून अन्य] उच्च न्यायालयास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, कार्यपद्धतीखेरीज अन्य कोणत्याही बाबींच्या संबंधात, [6][एखाद्या *** राज्याचे] उच्च न्यायालय [7][संविधानाच्या अनुच्छेद २२७] खाली आपल्या अधिकारितेखालील राज्य-क्षेत्रांपैकी जो भाग एखाद्या इलाखा शहराच्या सीमांमध्ये समाविष्ट नसेल अशा कोणत्याही भागाकरिता अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात जो नियम करू शकले असते, असा कोणताही नियम करता येईल].

नियमांची प्रसिद्धी

१३१. कलम १२९ किंवा कलम १३० यानुसार केलेले नियम [8][शासकीय राजपत्रात] प्रसिद्ध करण्यात येतील व प्रसिद्धीच्या तारखेपासून किंवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य तारखेपासून ते कायदा म्हणून प्रभावी होतील.

भाग अकरा

संकीर्ण

विवक्षित स्त्रियांना जातीने उपस्थित राहण्यापासून सूट.

१३२. (१) स्थानिक रूढी व रीतीरिवाज यांनुसार ज्या स्त्रियांना लोकांपुढे येण्याची सक्ती करता कामा नये अशा स्त्रियांना न्यायालयात जातीने उपस्थित राहण्यापासून सूट मिळेल.

(२) या संहितेद्वारे ज्या कोणत्याही प्रकरणी स्त्रियांच्या अटकेस मनाई करण्यात आलेली नाही अशा कोणत्याही प्रकरणी आदेशिकेची अंमलबजावणी करताना, अशा स्त्रियांना यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही उपबंधामुळे अटकेपासून सूट मिळते असे समजण्यात येता कामा नये.

अन्य व्यक्तींना सूट.

१३३. [9][(१) पुढील व्यक्तींना, न्यायालयात जातीने उपस्थित राहण्यापासून सूट मिळण्याचा हक्क आहे :—

(एक) भारताचा राष्ट्रपती;
(दोन) भारताचा उप राष्ट्रपती;
(तीन) लोकसभेचा अध्यक्ष;
(चार) केंद्रीय मंत्री;
(पाच) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश;
(सहा) राज्यांचे राज्यपाल व संघराज्यक्षेत्रांचे प्रशासक;
(सात) राज्य विधानसभांचे अध्यक्ष;
(आठ) राज्य विधान परिषदांचे सभापती;
(नऊ) राज्यांचे मंत्री;
(दहा) उच्च न्यायालयांचे न्यायाधीश; आणि
(अकरा) कलम ८७-ख ज्यांना लागू असेल अशा व्यक्ती.]

---

१. विधी अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

२. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २, कलम १७ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

४. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे पूर्वीच्या कलमाऐवजी दाखल करण्यात आला.

५. "सम्राटांनी लेटर्सपेटंटद्वारे स्थापन केलेले नसेल अशा" या मजकुराऐवजी हा मजकूर अनुकूलन आदेश, १९५० द्वारे बदली दाखल करण्यात आला.

६. "अशारीतीने स्थापन केलेले" या मजकुराऐवजी वरील आदेशाद्वारे दाखल करण्यात आला.

७. "भाग-क" हा मजकूर विधी अनुकूलन (क्रमांक २) आदेश, १९५६ द्वारे वगळण्यात आला.

८. "भारत सरकारचा अधिनियम, १९३५, कलम २२४" या मजकुराऐवजी हा मजकूर, अनुकूलन आदेश, १९५० द्वारे बदली दाखल करण्यात आला.

९. "प्रकरणपरत्वे, भारताच्या राजपत्रात किंवा स्थानिक शासकीय राजपत्रांत" या मजकुराऐवजी हा मजकूर अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे बदली दाखल केला. काटेकोरपणे पहाता, "प्रकरणपरत्वे, शासकीय राजपत्र किंवा शासकीय राजपत्रात" असा मजकूर बदली दाखल करायला हवा; परंतु नंतरचे शब्द अनावश्यक ठरतात म्हणून वगळण्यात आले आहेत.

१०. सन १९५६ चा अधिनियम ६६, कलम १२ द्वारे पोटकलम (१) ऐवजी बदली दाखल करण्यात आला.

(२) * * * * *

(३) * * * कोणत्याही व्यक्तीने अशी सूट मिळण्याच्या विशेष हक्काची मागणी केल्यास आणि परिणामी आयोगपत्राद्वारे तिची तपासणी करावी लागल्यास, तिच्या पुराव्याची मागणी करणाऱ्या पक्षकाराने आयोगपत्राचा खर्च दिला नाही तर, त्या व्यक्तीला त्या आयोगपत्राचा खर्च द्यावा लागेल.

हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी व्यतिरिक्त अन्यथा अटक.

१३४. या संहितेखाली अटक केलेल्या सर्व व्यक्तींना कलमे ५५, ५७ व ५९ यांचे उपबंध शक्य तेथवर लागू होतील.

दिवाणी आदेशिकेखालील अटकेपासून सूट.

१३५. (१) कोणत्याही न्यायाधीशाला, दंडाधिकाऱ्याला किंवा अन्य न्यायिक अधिकाऱ्याला, तो त्याच्या न्यायालयाकडे जात असताना, तेथील कामकाजाच्या वेळी न्यायासनावर असताना किंवा न्यायालयातून परत जात असताना अटक करता येणार नाही.

(२) जेव्हा कोणतीही बाब तीवर अधिकारिता असणाऱ्या किंवा अशी अधिकारिता स्वतःला आहे असे सद्भावपूर्वक समजणाऱ्या न्यायाधिकरणापुढे प्रलंबित असेल तेव्हा, त्यातील पक्षकार, त्यांचे वकील, मुखत्यार, महसुली एजंट व मान्यताप्राप्त प्रतिनिधी व समन्सचे अनुपालन करणारे त्यांचे साक्षीदार यांना, न्यायालयाचा अवमान केल्याबद्दल अशा न्यायाधिकरणाने काढलेल्या आदेशिकेखेरीज अन्य दिवाणी आदेशिकेखाली, ते अशा बाबीच्या प्रयोजनार्थ, अशा न्यायाधिकरणाकडे जात असताना किंवा तेथील कामकाजास हजर असताना किंवा अशा न्यायाधिकरणाकडून परत येत असताना अटक होण्यापासून सूट राहील.

(३) पोटकलम (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे निर्णीत ऋणकोला, तातडीने अंमलबजावणी करावयाच्या आदेशाखाली, किंवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून त्याला तुरुंगात का पाठवू नये याचे कारण दाखवण्यासाठी असा निर्णीत ऋणको हजर राहील तेव्हा अटक होण्यापासून सूट मागता येणार नाही.

दिवाणी आदेशिकेखाली अटक होण्यापासून किंवा स्थानबद्ध होण्यापासून विधानमंडळाच्या सदस्यांस सूट.

[1][१३५क. (१) एखादी व्यक्ती,—

(क) जर ती—

(एक) संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा, किंवा

(दोन) राज्याच्या विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा, किंवा

(तीन) संघराज्य क्षेत्राच्या विधानसभेचा

सदस्य असेल तर, संसदेच्या अशा सभागृहाची किंवा, प्रकरणपरत्वे, विधानसभेची किंवा विधानपरिषदेची कोणतीही सभा चालू असताना ;

(ख) जर ती—

(एक) संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या, किंवा

(दोन) राज्याच्या किंवा संघराज्य क्षेत्राच्या विधानसभेच्या, किंवा

(तीन) राज्याच्या विधानपरिषदेच्या

कोणत्याही समितीचा सदस्य असेल तर, अशा समितीची कोणतीही सभा चालू असताना;

(ग) जर ती—

(एक) संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा, किंवा

(दोन) राज्याच्या विधानसभेचा किंवा ज्या राज्यामध्ये दोन सभागृहे असतील त्या राज्याच्या विधानपरिषदेचा,

सदस्य असेल तर, तिला संसदेच्या सभागृहांची किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य विधान मंडळाच्या सभागृहांची संयुक्त बैठक, सभा, परिषद अथवा, प्रकरणपरत्वे, संयुक्त समिती चालू असताना, आणि अशी सभा, बैठक किंवा परिषद होण्यापूर्वीचे आणि झाल्यानंतरचे चाळीस दिवस दिवाणी आदेशिकेखाली अटक किंवा कारागृहात स्थानबद्ध करता येणार नाही.]

(२) पोटकलम (१) खाली स्थानबद्धतेतून मुक्त केलेली व्यक्ती उक्त पोटकलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, पुन्हा अटक होण्यास आणि पोटकलम (१) च्या उपबंधांखाली तिची मुक्तता झाली नसली तर, ती ज्या स्थानबद्धतेस पात्र ठरली असती अशा आणखी स्थानबद्धतेस पात्र असेल.]

---

१. सन १९५६ चा अधिनियम ६६, कलम १२ द्वारे पोटकलम (२) वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम १२ द्वारे "अशी सूट देण्यात आलेल्या" हा मजकूर वगळण्यात आला.

३. कलम १३५ क हे सन १९२५ चा अधिनियम २३, कलम ३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

अटक करावयाची व्यक्ती अथवा जप्त करावयाची मालमत्ता जिल्ह्याच्या बाहेर असेल त्याबाबतीतील कार्यपद्धती.

१३६. (१) जेव्हा या संहितेतील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीशी संबंधित नसलेल्या कोणत्याही उपबंधाखाली एखाद्या व्यक्तीला अटक करण्यात यावी अथवा एखादी मालमत्ता जप्त करण्यात यावी असा अर्ज करण्यात आला असेल आणि ज्या न्यायालयाकडे असा अर्ज करण्यात आला असेल त्या न्यायालयाच्या स्थानिक मर्यादांबाहेर ती व्यक्ती राहत असेल किंवा तेथे ती मालमत्ता स्थित असेल तर, त्या न्यायालयास, स्वविवेकानुसार, अटकेचे अधिपत्र किंवा जप्तीचा आदेश काढता येईल आणि ज्याच्या स्थानिक मर्यादांमध्ये अशी व्यक्ती राहते किंवा अशी मालमत्ता आहे त्या जिल्हा न्यायालयास अधिपत्राची किंवा आदेशाची प्रत व सोबत अटक किंवा जप्ती यांच्या संभाव्य खर्चाची रक्कम पाठविता येईल.

(२) जिल्हा न्यायालयाने अशी प्रत किंवा रक्कम त्यास मिळाल्यानंतर स्वतःच्या अधिकाऱ्यांकरवी किंवा आपणास दुय्यम असलेल्या न्यायालयाकरवी अटक किंवा जप्ती करविली पाहिजे आणि ज्या न्यायालयाने असे अटकेचे वॉरंट किंवा जप्तीचा आदेश काढला असेल अशा न्यायालयास ते वृत्त कळविले पाहिजे.

(३) या कलमाखाली अटक करणाऱ्या न्यायालयाने अटक केलेल्या व्यक्तीला, ज्या न्यायालयान् अटकेचे वॉरंट काढले होते त्या न्यायालयाकडे पाठविले पाहिजे. मात्र आपणास या उत्तरोक्त न्यायालयाकड का पाठवण्यात येऊ नये यासंबंधी त्या व्यक्तीने पूर्वोक्त न्यायालयाची खात्री पटेल अशा प्रकारे कारण दाखवून दिले तर, अथवा उत्तरोक्त न्यायालयातील तिच्या उपस्थितीकरिता किंवा त्या न्यायालयाकडन तिच्याविरुद्ध काढण्यात येईल. अशा कोणत्याही हुकूमनाम्याच्या पूर्तीकरिता तिने पुरेशी प्रतिभूती दिली तर दोन्ही बाबतीत, अटक करणाऱ्या न्यायालयाने त्या व्यक्तीला सोडून दिले पाहिजे.

(४) या कलमाखाली अटक करावयाची व्यक्ती किंवा जप्त करावयाची जंगम मालमत्ता बंगाल-मधील फोर्ट विलयम येथील अथवा मद्रास किंवा मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या[१] * * * साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये असेल त्याबाबतीत, अटकेच्या अधिपत्राची किंवा जप्तीच्या आदेशाची प्रत, आणि अटकेच्या अथवा जप्तीच्या संभाव्य खर्चाची रक्कम, प्रकरणपरत्वे, कलकत्ता, मद्रास, [२][किंवा मुंबई] येथील लघुवाद न्यायालयाकडे पाठविली पाहिजे आणि त्या न्यायालयाने, अशी प्रत व रक्कम मिळाल्यानंतर, जणू काही ते जिल्हा न्यायालय असावे त्याप्रमाणे कार्यवाही सुरू केली पाहिजे.

दुय्यम न्यायालयांची भाषा.

१३७. (१) या संहितेच्या प्रारंभानंतर उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयाची जी भाषा असेल ती भाषा ही, राज्य शासन अन्यथा निदेशित करीपर्यंत, अशा दुय्यम न्यायालयाची भाषा असण्याचे चालू राहील.

(२) राज्य शासनास, अशा कोणत्याही न्यायालयाची भाषा कोणती असेल ते आणि अशा न्याया-लयाकडे पाठवावयाचे अर्ज व तेथील कामकाजाचे वृत्त कोणत्या लिपीत लिहावे ते घोषित करता येईल.

(३) पुराव्या नोंदवण्याव्यतिरिक्त अन्य एखादी गोष्ट अशा कोणत्याही न्यायालयात लेखी स्वरूपात करण्यास हे न्यायालय फर्मावील किंवा मुभा देईल त्याबाबतीत, असे लिखाण इंग्रजीत करता येईल; पण एखादा पक्षकार किंवा त्याचा वकील इंग्रजीबाबत अनभिज्ञ असेल तर, त्याच्या विनंतीवरून न्यायालयाच्या भाषेतील अनुवाद त्याला उपलब्ध करून दिला पाहिजे, आणि न्यायालयाने अशा अनुवादाचा खर्च देण्याच्या संबंधात त्यास योग्य वाटेल असा आदेश काढला पाहिजे.

पुराव्या इंग्रजीत नोंदवून घेण्यास सांगण्याची उच्च न्यायालयाची शक्ती.

[३]१३८. (१) [४][उच्च न्यायालयास] शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या किंवा त्यामध्ये दिलेल्या वर्णनात मोडणाऱ्या कोणत्याही न्यायाधीशाच्या संबंधात असा निदेश देता येईल की, ज्या प्रकरणी अपील करण्याची मुभा आहे अशा प्रकरणांमधील पुराव्या त्याने इंग्रजीमध्ये व विहित पद्धतीने नोंदवून घ्याव्या.

(२) न्यायाधीश पुरेशा कारणामुळे पोट कलम (१) मधील निदेशाचे पालन करू शकला नाही तर, त्याने ते कारण नमूद केले पाहिजे आणि खुल्या न्यायालयात त्याच्या सांगण्यावरहुकम पुराव्या लेखी नोंदवून घेण्याची व्यवस्था केली पाहिजे.

शपथपत्रावरील शपथ कोणी द्यावयाची.

१३९. या संहितेखालील कोणत्याही शपथपत्रांच्या बाबतीत,—

(क) कोणतेही न्यायालय किंवा दंडाधिकारी, अथवा

[५][(कक) 'लेखप्रमाणक अधिनियम, १९५२' खाली नेमलेला कोणताही लेखप्रमाणक, किंवा]

(ख) उच्च न्यायालय याबाबतीत ज्यास नेमील असा कोणताही अधिकारी किंवा अन्य व्यक्ती; किंवा

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे 'किंवा लोअर बर्माच्या मुख्य न्यायालयाच्या' हा मजकूर गळण्यात आला.

२. वरील आदेशाद्वारे "मुंबई किंवा रंगून" या मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

३. कलम १३८ आसामला लागू असल्याप्रमाणे. पहा :—दिवाणी प्रक्रिया (आसाम विस्तारण) अधिनियम, १९४१

४. सन १९१४ चा अधिनियम ४, कलम २ आणि अनुसूची भाग एक द्वारे "लेफ्टनंट गव्हर्नरास" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

५. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ४६ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

(ग्) राज्य शासनाने याबाबतीत सर्वसाधारणपणे किंवा विशेषेकरून शक्ती प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही न्यायालयाने नेमलेला कोणताही अधिकारी,

जबानीदारास शपथ देववू शकेल.

जहाजी मालाची वाचवणावळ इत्यादींच्या संबंधीच्या वादात न्यायसहायक.

१४०. (१) जहाजी मालाची वाचवणावळ, जहाजांची खेचणावळ किंवा त्यांची परस्पर टक्कर यासंबंधीच्या कोणत्याही नौ-अधिकरणी किंवा उप-नौअधिकरणी वादात न्यायालयास,—मग ते त्यांच्या मूळ अधिकारितेचा वापर करीत असो वा अपील अधिकारितेचा वापर करीत असो,—स्वत:ला योग्य वाटल्यास ते निदेशित करील किंवा विहित असेल अशा रीतीने आपल्या सहाय्याकरता दोन सक्षम न्यायसहायकांना बोलावता येईल आणि अशा वादातील कोणत्याही पक्षकाराने विनंती केल्यास बोलाविले पाहिजे आणि अशा न्यायसहायकांनी त्यानुसार हजर राहून न्यायालयास मदत केली पाहिजे.

(२) अशा प्रत्येक न्यायसहायकाला त्याच्या उपस्थितीसाठी, न्यायालय निदेशित करील अशा किंवा विहित करण्यात येईल अशा पक्षकाराकडून, निदेशित किंवा विहित करण्यात येईल तितकी फी मिळेल.

किरकोळ कार्यवाही.

१४१. या संहितेमध्ये दाव्याच्या संबंधात उपबंधित केलेली कार्यपध्दती लागू करता येईल तेथवर, दिवाणी अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयातील सर्व कार्यवाहीमध्ये अनुसरण्यात येईल.

[१][स्पष्टीकरण.—या कलमात "कार्यवाही" यामध्ये ९ व्या आदेशाखालील कार्यवाहीचा समावेश होतो, पण संविधानाच्या अनुच्छेद २२६ खालील कोणत्याही कार्यवाहीचा समावेश होत नाही.]

आदेश व नोटिसा लेखी असणे.

१४२. या संहितेच्या उपबंधांखाली कोणत्याही व्यक्तीवर बजावावयाचे किंवा तिला द्यावयाचे आदेश व नोटिसा लेखी असल्या पाहिजेत.

डाकहशील.

१४३. या संहितेखाली काढलेली व डाकेने पाठवलेली नोटीस, समन्स किंवा पत्र यावर डाकहशील आकारणीयोग्य असल्यास ते आणि त्यांची नोंदणी फी, त्यातील पत्रव्यवहार करण्यापूर्वी निश्चित करण्यात येईल त्या मुदतीत भराबी लागेल :

परंतु, राज्य शासनास [२]* * * असे डाकहशील किंवा फी अथवा दोन्हीही माफ करता येईल किंवा त्याच्याऐवजी आकारावयाच्या न्यायालय फीचे प्रमाण विहित करता येईल.

प्रत्यास्थापनाकरिता अर्ज.

१४४. (१) एखादा हुकूमनामा [३][किंवा आदेश] [४][कोणत्याही अपिलात, पुनरीक्षणात किंवा अन्य कार्यवाहीत बदलण्यात आला असेल किंवा फिरवण्यात आला असेल अथवा त्या प्रयोजनार्थ मांडलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये तो रद्द ठरवण्यात आला असेल अथवा त्यात फेरबदल करण्यात आला असेल तर व तेथवर, ज्या न्यायालयाने असा आदेश किंवा हुकूमनामा काढला असेल त्या न्यायालयाने], प्रत्यास्थापनाच्या किंवा अन्य कोणत्याही लाभास हक्कदार असलेल्या कोणत्याही पक्षकाराच्या विनंतीवरून अशा प्रकारे प्रत्यास्थापन घडवून आणले पाहिजे की, जेणेकरून असा हुकूमनामा [५][किंवा आदेश] काढला नसता अथवा [६][त्याचा जो भाग बदललेला आहे, फिरवलेला आहे, रद्द ठरवलेला आहे किंवा ज्यात फेरफार केलेला आहे] तो तसा केला नसता तर, पक्षकार जसे राहिले असते त्याचप्रकारे ते शक्य तेथवर पूर्वपदावर येतील, आणि या प्रयोजनार्थ न्यायालयास दावा खर्चाच्या परताव्याचे आणि [७][असा हुकूमनामा किंवा आदेश बदलल्यामुळे, फिरवल्यामुळे, रद्द ठरवल्यामुळे किंवा त्यात फेरफार केल्यामुळे परिणामी] जे योग्यप्रकारे देय होईल ते व्याज, ती नुकसानभरपाई, भरपाई आणि दरम्यानचे लाभ यांच्या प्रदानाचे आदेश यांसुद्धा कोणतेही आदेश काढता येतील.

[८][स्पष्टीकरण.—पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ "ज्या न्यायालयाने हुकूमनामा किंवा आदेश काढला असेल ते न्यायालय" या संज्ञेत पुढील न्यायालयांचा समावेश असल्याचे मानले जाईल :—

(क्) अपील किंवा पुनरीक्षण अधिकारितेचा वापर करून हुकूमनामा किंवा आदेश बदलला किंवा फिरवला असेल त्या बाबतीत, प्रारंभिक न्यायालय ;

(ख्) हुकूमनामा किंवा आदेश स्वतंत्र दाव्याद्वारे रद्द करण्यात आला असेल त्या बाबतीत, असा हुकूमनामा किंवा आदेश ज्याने काढला ते प्रारंभिक न्यायालय ;

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ४७ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांच्या पूर्वमंजुरीने" हा मजकूर सन १९२० चा अधिनियम क्रमांक ३८, कलम २ आणि अनुसूची एक, भाग एक द्वारे वगळण्यात आला.

३. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ६६, १३ द्वारे समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ४८ (एक) द्वारे बदली दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

५. वरील अधिनियमाच्या कलम ४८ (एक) (ख्) द्वारे "त्याचा जो भाग बदललेला आहे किंवा फिरवलेला आहे" या मजकुराऐवजी बदली दाखल केला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ४८(ग्) द्वारे "बदलल्यामुळे किंवा फिरवल्यामुळे परिणामी" या मजकुराऐवजी बदली दाखल केला.

७. वरील अधिनियमाच्या कलम ४८ दोन द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

(ग्) प्रारंभिक न्यायालय अस्तित्वात असणे बंद झाले असेल अथवा हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करण्याची अधिकारिता त्याला असणे बंद झाले असेल त्या बाबतीत, ज्या दाव्यात हुकूमनामा किंवा आदेश काढण्यात आला असेल तो दावा या कलमाखाली प्रत्यास्थापनाचा अर्ज करण्याच्या वेळी दाखल करण्यात आला असता तर ज्या न्यायालयास अशा दाव्याची संपरीक्षा करण्याची अधिकारिता मिळाली असती ते न्यायालय.]

(२) पोटकलम (१) खालील अर्जाद्वारे जो कोणताही प्रत्यास्थापन स्वरूपाचा अथवा अन्य प्रकारचा अनुतोष मिळू शकेल असा कोणताही अनुतोष मिळवण्यासाठी कोणताही दावा दाखल करता येणार नाही.

जामीनदाराचे दायित्व बजावून घेणे.

१४५. कोणत्याही व्यक्तीने,—

(क्) कोणत्याही हुकूमनाम्याच्या अथवा त्याच्या कोणत्याही भागाच्या अनुपालनासाठी, किंवा

(ख्) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत ताब्यात घेतलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या प्रत्यास्थापनासाठी, किंवा

(ग्) कोणत्याही दाव्यामध्ये किंवा कोणत्याही तदनुषंगिक कार्यवाहीमध्ये न्यायालयाने काढलेल्या आदेशान्वये एखादी रक्कम भरण्यासाठी किंवा कोणत्याही व्यक्तीवर लादलेल्या कोणत्याही शर्तीचे पालन करण्यासाठी,

[१][प्रतिभूती सादर केली असेल किंवा हमी दिली असेल] त्याबाबतीत [१][हुकूमनाम्यांच्या अंमलबजावणीसाठी यात यापुढे उपबंधित केलेल्या रीतीने म्हणजे,—

(एक) जर तिने स्वतःला व्यक्तिशः दायी धरले असेल तर, तिच्या विरुद्ध त्या मर्यादेपर्यंत;

(दोन) जर तिने प्रतिभूती म्हणून कोणतीही मालमत्ता सादर केली असेल तर, प्रतिभूतीच्या मर्यादेपर्यंत मालमत्तेची विक्री करून;

(तीन) खंड (एक) व खंड (दोन) या दोहोंखाली ते प्रकरण येत असेल तर, त्या खंडांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत,

हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करता येईल आणि अशी व्यक्ती, कलम ४७ च्या अर्थानुसार पक्षकार असल्याचे मानण्यात येईल :]

परंतु, प्रत्येक प्रकरणी न्यायालयास पुरेशी वाटेल अशी नोटीस जामीनदारास दिलेली असली पाहिजे.

प्रतिनिधींकडून किंवा त्यांच्याविरुद्ध कार्यवाही.

१४६. या संहितेखाली किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्याविरुद्ध कोणतीही कार्यवाही किंवा अर्ज करता येत असेल त्याबाबतीत, तिच्यापोटी हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्याविरुद्ध, कार्यवाही किंवा अर्ज करता येईल.

अपंग व्यक्तींची संमती किंवा करार.

१४७. अपंग असलेली कोणतीही व्यक्ती ज्या दाव्यांमध्ये पक्षकार असेल अशा सर्व दाव्यांमध्ये, कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात तिच्या वादमित्राने किंवा वादार्थ पालकाने न्यायालयाच्या स्पष्ट संमतीनिशी दिलेली कोणतीही संमती किंवा केलेला करार जणू काही अशी व्यक्ती अपंग नसावी आणि तिनेच अशी संमती दिलेली असावी किंवा असा करार केलेला असावा त्याप्रमाणे तितकाच प्रभावी व परिणामक असेल.

मुदत वाढवणे.

१४८. या संहितेद्वारे विहित केलेली किंवा मुभा दिलेली कोणतीही कृती करण्यासाठी न्यायालयाने कोणताही कालावधी निश्चित केलेला असेल किंवा मंजूर केलेला असेल त्याबाबतीत, प्रारंभी निश्चित केलेला किंवा मंजूर केलेला कालावधी समाप्त झाला असला तरीसुद्धा, न्यायालयास स्वविवेकानुसार वेळोवेळी असा कालावधी वाढविता येईल.

सावधानपत्र दाखल करण्याचा अधिकार.

[१][१४८ क. (१) न्यायालयात दाखल केलेल्या किंवा दाखल करावयाचा असलेल्या एखाद्या दाव्यामध्ये किंवा कार्यवाहीमध्ये अर्ज केला जाणे अपेक्षित असेल किंवा करण्यात आला असेल त्याबाबतीत, अशा अर्जाची सुनावणी होण्याच्या वेळी न्यायालयासमोर उपस्थित राहण्याचा अधिकार सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्यासंबंधात सावधानपत्र दाखल करता येईल.

(२) पोटकलम (१) खाली सावधानपत्र दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत, ज्या व्यक्तीने सावधानपत्र दाखल केले असेल त्या व्यक्तीला (तिचा यात यापुढे 'सावधानपत्रकर्ता' म्हणून निर्देश करण्यात आला आहे) पोटकलम (१) खाली ज्या व्यक्तीने अर्ज केला असेल किंवा जिच्याकडून अर्ज येणे अपेक्षित असेल अशा व्यक्तीवर पोचदेय नोंदणी डाकेने नोटीस बजावावी लागेल.

(३) पोटकलम (१) खाली सावधानपत्र दाखल करण्यात आल्यानंतर, कोणत्याही दाव्यामध्ये किंवा कार्यवाहीमध्ये कोणताही अर्ज दाखल करण्यात आला तर त्याबाबतीत, न्यायालयाने सावधानपत्रकर्त्यावर अर्जाची नोटीस बजावली पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ४९ (एक) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४९(दोन) द्वारे बदली दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५० द्वारे समाविष्ट.

(४) अर्जदारावर कोणत्याही सावधानपत्राची नोटीस बजावण्यात आली असेल त्याबाबतीत, त्याने केलेल्या अर्जाची नक्कल व त्याचप्रमाणे अर्जाच्या पुष्टयर्थ त्याने दाखल केलेला असेल किंवा तो दाखल करील अशा कोणत्याही कागदपत्राच्या किंवा दस्तऐवजाच्या नकला त्याने सावधानपत्रकर्त्यांच्या खर्चाने त्याला तावडतोब पुरविल्या पाहिजेत.

(५) पोटकलम (१) खाली सावधानपत्र दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत असे सावधानपत्र, ज्या तारखेस ते दाखल केले असेल त्या तारखेपासून नव्वद दिवसांचा कालावधी संपण्यापूर्वी, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला अर्ज करण्यात आला नाही तर, असे सावधानपत्र उक्त कालावधीनंतर अंमलात राहणार नाही.]

न्यायालय फीतील तूट भरून काढण्याची शक्ती.

१४९. न्यायालय फीच्या संबंधात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याद्वारे कोणत्याही दस्तऐवजाकरिता विहित केलेली कोणतीही न्यायालय फी अजिबात देण्यात आलेली नसेल अथवा तिचा एखादा भाग देण्यात आलेला नसेल तर, न्यायालयास, स्वविवेकानुसार, ज्या व्यक्तीकडून अशी फी येणे असेल त्या व्यक्तीला कोणत्याही टप्प्याला अशी न्यायालय फी संपूर्णत: किंवा, प्रकरणपरत्वे, अंशत: भरण्याची मुभा देता येईल, आणि असा भरणा झाल्यानंतर, ज्या दस्तऐवजाच्या संबंधात अशी फी प्रदेय होती तो दस्तऐवज जणू काही अशी फी प्रथमपासून भरण्यात आलेली असावी अशा प्रकारे तितकाच प्रभावी व परिणामक असेल.

कामकाज वर्ग करणे.

१५०. अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, एखाद्या न्यायालयाचे कामकाज अन्य कोणत्याही न्यायालयाकडे वर्ग केले जाईल त्याबाबतीत, ज्या न्यायालयाकडे कामकाज अशा प्रकारे वर्ग केलेले असेल त्या न्यायालयास, ज्या न्यायालयाकडून कामकाज अशाप्रकारे वर्ग करण्यात आले असेल त्या न्यायालयाला या संहितेद्वारे किंवा त्याखाली, ज्या शक्ती प्रदान करण्यात आल्या असतील व जी कर्तव्ये नेमून दिली असतील अनुक्रमे त्याच शक्ती असतील व तीच कर्तव्ये पार पाडावी लागतील.

न्यायालयाच्या अंगभूत शक्तींची व्यावृत्ती.

१५१. या संहितेमधील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायाची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता किंवा न्यायालयाच्या कार्यवाहीचा दुरुपयोग टाळण्याकरिता आवश्यक असतील ते आदेश काढण्याच्या न्यायालयाच्या अंगभूत शक्ती मर्यादित होतात किंवा त्यावर अन्यथा परिणाम होतो असे मानण्यात येणार नाही.

न्यायनिर्णय, हुकूमनामे किंवा आदेश यांची दुरुस्ती.

१५२. न्यायनिर्णय, हुकूमनामे अगर आदेश यामधील लेखनप्रमाद किंवा आकडेमोडविषयक चुका अथवा अभावित चूकभुलीमुळे त्यामध्ये उद्भवणाऱ्या चुका न्यायालयास कोणत्याही वेळी स्वत: होऊन किंवा पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून दुरुस्त करता येतील.

दुरुस्त्या करण्याच्या सर्वसाधारण शक्ती.

१५३. न्यायालयास, कोणत्याही बेंळी आणि त्यास योग्य वाटेल अशा दावाखर्चविषयक अटींवर किंवा अन्यथा, दाव्यातील कोणत्याही कार्यवाहीमधील कोणताही दोष किंवा चूक सुधारता येईल, आणि अशा कार्यवाहीमुळे उद्भवलेला व त्यावर अवलंबून असलेला खराखुरा प्रश्न किंवा वादमुद्दा निश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात येतील.

अपील संक्षिप्त रीत्या फेटाळले असेल त्याबाबतीत हुकूमनाम्यात किंवा आदेशात दुरुस्ती करण्याची शक्ती.

[1][१५३क. अपील न्यायालयाने, आदेश ४१ मधील नियम ११ खाली अपील फेटाळल्यास, ज्या हुकमनाम्याच्या किंवा आदेशाच्या विरुद्ध अपील करण्यात आले असेल त्या हुकूमनाम्यात किंवा आदेशात दुरुस्ती करण्याची कलम १५२ खाली न्यायालयाला असलेली शक्ती मुळात ज्या न्यायालयाने हुकूमनामा किंवा आदेश काढला असेल त्या न्यायालयाला वापरता येईल—मग अपील फेटाळल्यामुळे परिणामी, मूळ न्यायालयाने काढलेला हुकूमनामा किंवा, प्रकरणपरत्वे, आदेश कायम होत असला तरी हरकत नाही.

संपरीक्षेची जागा हे खुले न्यायालय मानावयाचे.

१५३ख. कोणत्याही दाव्याची संपरीक्षा करण्यासाठी ज्या जागेत कोणतेही दिवाणी न्यायालय भरत असेल ती जागा हे खुले न्यायालय असल्याचे मानण्यात येईल व त्या ठिकाणी जितके लोक मावतील तेवढ्या मर्यादेपर्यंत सर्वसामान्य जनतेला तेथे प्रवेश असेल :

परंतु, पीठासीन न्यायाधीशास कोणत्याही विवक्षित प्रकरणाची चौकशी किंवा संपरीक्षा चालू असताना कोणत्याही टप्प्याला त्यास योग्य वाटल्यास असा आदेश देता येईल की, सर्वसाधारण जनतेला किंवा एखाद्या विशिष्ट व्यक्तीला न्यायालय वापरीत असलेल्या कक्षामध्ये किंवा इमारतीकडे येता येणार नाही किंवा आत येता येणार नाही किंवा तेथे थांबून राहता येणार नाही.]

१५४. [अपील करण्याच्या विद्यमान अधिकाराची व्यावृत्ती] निरसन व विशोधन अधिनियम, १९५२ (१९५२ चा ४८) कलम २ व अनुसूची पहिली याद्वारे निरसित.

१५५. [विवक्षित अधिनियमांचे विशोधन] निरसन व विशोधन अधिनियम, १९५२ (१९५२ चा ४८) कलम २ व अनुसूची पहिली याद्वारे निरसित.

१५६. [निरसने] द्वितीय निरसन व विशोधन अधिनियम, १९४८ (१९४८ चा १७) कलम ३ व अनुसूची दुसरी याद्वारे निरसित.

---

१ सन १९७६ चा अधिनयम १०४, कलम ५१ द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

निरसित अधिनियमांखालील आदेश चालू राहणे.

१५७. १८५९ चा अधिनियम क्रमांक ८ याखाली अथवा कोणत्याही दिवाणी प्रक्रिया संहितेखाली किंवा त्यात विशोधन करणाऱ्या कोणत्याही अधिनियमाखाली अथवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमितीखाली प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, केलेल्या घोषणा व नियम, नेमलेल्या जागा, दाखल केलेले करार, विहित केलेल्या श्रेणी, तयार केलेले नमुने, केलेल्या नेमणुका व दिलेल्या शक्ती या संहितेशी सुसंगत असतील तेथवर, जणू काही त्या या संहितेखाली आणि याबाबतीत त्याद्वारे शक्ती दिलेल्या प्राधिकाऱ्याने अनुक्रमे प्रसिद्ध केलेले, नेमलेले, दाखल केलेले, विहित केलेले, तयार केलेले व दिलेले असावे त्याप्रमाणे तितकेच प्रभावी व परिणामक असतील.

दिवाणी प्रक्रिया संहितेचा व इतर निरसित अधिनियमांचा निर्देश.

१५८. या संहितेच्या प्रारंभापूर्वी पारित केलेल्या प्रत्येक अधिनियमामध्ये किंवा काढलेल्या प्रत्येक अधिसूचनेमध्ये सन १८५९ चा अधिनियम क्रमांक ८ किंवा कोणतीही दिवाणी प्रक्रिया संहिता किंवा त्यात विशोधन करणारा कोणताही अधिनियम किंवा याद्वारे निरसित केलेली कोणतीही अधिनियमिती याचा अथवा त्यामधील कोणत्याही प्रकरणाचा किंवा कलमाचा निर्देश केलेला असेल तेव्हा, तो या संहितेचा किंवा तिच्या समनुरूप भागाचा, आदेशाचा किंवा कलमाचा किंवा नियमाचा निर्देश आहे असे व्यवहार्य असेल तेथवर मानण्यात येईल.

पहिली अनसूची

आदेश पहिला

दाव्यांमधील पक्षकार

नियम—

१. वादी म्हणून कोणाकोणाला सामील करून घेता येईल.
२. स्वतंत्र संपरिक्षा करण्याचा आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.
३. प्रतिवादी म्हणून कोणाकोणाला सामील करून घेता येईल.
३.क. प्रतिवादींना सामील करण्यामुळे संपरीक्षेमध्ये गोंधळ उद्भवणारा असेल किंवा तिला विलंब लागणार असेल तर त्या बाबतीत स्वतंत्र संपरीक्षचा आदेश देण्याची शक्ती.
४. न्यायालय संयुक्त पक्षकारांपैकी एका किंवा अनेक पक्षकारांच्या बाजूने अथवा त्यांच्या विरुद्ध न्यायनिर्णय देऊ शकेल.
५. जो अनुतोष मागितला असेल त्यामध्ये प्रतिवादी सर्वांशांनी हितसंबंधित असलाच पाहिजे असे नाही.
६. एकाच संविदेस दायी असणाऱ्या पक्षकारांना सामील करून घेणे.
७. क्षतिपूरण कोणाकडून करवून घ्यावे याविषयी वादीला शंका असेल तेव्हा.
८. एकाच हितसंबंधार्थ सर्वांच्या वतीने एका व्यक्तीस दावा दाखल करता येईल किंवा बचाव करता येईल.
८.क. एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या संस्थेला मत मांडण्यास किंवा कार्यवाहीत भाग घेण्यास परवानगी देण्याची न्यायालयाची शक्ती.
९. अपसंयोजन व असंयोजन.
१०. चुकीच्या वादीच्या नावे दावा.
न्यायालय पक्षकारांची नावे खोडून टाकू शकेल किंवा जोडा दाखल करू शकेल.
प्रतिवादी जादा दाखल करून घेतल्यास वादपत्रात दुरुस्ती करणे.
१०.क. एखाद्या वकिलाला आपल्याला उद्देशून वादकथन करावे अशी विनंती करण्याची न्यायालयाची शक्ती.
११. दावा चालवणे.
१२. अनेक वादी किंवा प्रतिवादी यांच्यापैकी एकाची इतरांकरिता उपस्थिती.
१३. असंयोजन किंवा अपसंयोजन या संबंधातील आक्षेप.

आदेश दोन

दाव्याची रचना

१. दाव्याची रचना.
२. दाव्यामध्ये संपूर्ण हक्कमागणी समाविष्ट असणे.
हक्कमागणीचा एखादा भाग सोडून देणे. अनेकांपैकी एखाद्या अनुतोषाकरता दावा दाखल करण्यात कसूर.
३. वादकारणांचे संयोजन.
४. केवळ स्थावर मालमत्ता परत मिळविण्यासाठी विवक्षित हक्कमागण्या एकत्रित करणे.
५. निष्पादक, प्रशासक किंवा वारसदार यांनी किंवा त्यांच्याविरुद्ध केलेल्या हक्कमागण्या.
६. वेगवेगळ्या संपरिक्षा करण्याचा आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.
७. अपसंयोजनाच्या संबंधातील हरकती.

आदेश तीन

मान्यताप्राप्त अभिकर्ते व प्लीडर

१. उपस्थिती, इत्यादी व्यक्तिशः किंवा मान्यताप्राप्त अभिकर्त्यांमार्फत किंवा प्लीडरमार्फत होऊ शकते.
२. मान्यताप्राप्त अभिकर्ते.
३. मान्यताप्राप्त अभिकर्त्यांवर आदेशिका बजावणे.
४. प्लीडरची नेमणूक.
५. प्लीडरवर आदेशिका बजावणे.
६. बजावणी स्वीकारण्यासाठी अभिकर्ता.
नेमणूक लेखी असावी व ती न्यायालयात दाखल करावी.
न्यायालय, आपल्या अधिकारितेमध्ये बजावणी स्वीकारण्यासाठी अभिकर्त्यांची नेमणूक करण्याचा आदेश देऊ शकेल.

आदेश चार

दावे दाखल करणे

१. दावा वादपत्राद्वारे सुरू करणे.

२. दाव्यांची नोंदवही.

आदेश पाच

समन्स काढणे व बजावणे

समन्स काढणे

१. समन्स.

२. समन्सला जोडावयाची प्रत किंवा निवेदन.

३. प्रतिवादीने किंवा वादीने जातीने उपस्थित रहावे, असा आदेश न्यायालयास देता येईल.

४. विवक्षित मर्यादांच्या आत न राहण्याऱ्या पक्षकारास जातीने हजर राहण्याचा आदेश देऊ नये.

५. समन्स वादमुद्दे निश्चित करण्यासाठी किंवा अंतिम निकालासाठी असणे.

६. प्रतिवादीने उपस्थित राहण्यासाठी दिवस निश्चित करणे.

७. प्रतिवादी ज्या दस्तऐवजांवर विसंबून राहिला असेल, असे दस्तऐवज हजर करण्याचा आदेश देण्यासाठी समन्स.

८. अंतिम निकालासाठी समन्स काढले असता, प्रतिवादीने आपले साक्षीदार हजर करावेत असे त्याला निदेश देणे.

समन्स बजावणे

९. बजावणीसाठी समन्स सुपूर्द करणे किंवा रवाना करणे.

१०. बजावणीची पद्धती.

११ निरनिराळ्या प्रतिवादींवर समन्स बजावणी.

१२. व्यवहार्य असेल तेव्हा, प्रतिवादींवर व्यक्तिशः किंवा त्याच्या अभिकर्त्यावर बजावणी करणे.

१३. प्रतिवादी ज्यांच्यामार्फत धंदा चालवीत असेल अशा अभिकर्त्यावर समन्स बजावणी करणे.

१४. स्थावर मालमत्तेसंबंधीच्या दाव्यांमध्ये प्रभारी अभिकर्त्यावर बजावणी करणे.

१५. कोणत्या बाबतीत प्रतिवादीच्या कुटुंबातील प्रौढ व्यक्तींवर समन्स बजावता येईल.

१६. ज्या व्यक्तीवर समन्स बजावले असेल त्या व्यक्तीने पोचपावतीवर सही करणे.

१७. प्रतिवादीने समन्स घेण्यास नकार दिल्यास किंवा तो न सापडल्यास त्या बाबतीतील कार्यपद्धती.

१८. समन्स बजावण्याची वेळ व पद्धती पृष्ठांकित करणे.

१९. समन्स बजावणाऱ्या अधिकाऱ्याची तपासणी.

१९.क. समन्सची व्यक्तिशः बजावणी करून त्याशिवाय त्याचवेळी डाकेने समन्स पाठविणे.

२०. पर्यायी बजावणी.
पर्यायी बजावणीचा परिणाम,
पर्यायी बजावणी केली असेल त्या बाबतीत स्थित राहण्याची वेळ निश्चित करणे.

२०.क. (निरसित केले.)

२१. प्रतिवादी अन्य न्यायालयाच्या अधिकारितेत राहत असेल त्या बाबतीत समन्सची बजावणी.

२१.क. न्यायालयास, अन्य पद्धतीव्यतिरिक्त किंवा अन्य पद्धतीऐवजी नोंदणीकृत डाकेने बजावणी करण्याचा आदेश देता येईल.

२२. बाहेरच्या न्यायालयांनी काढलेल्या समन्सची इलाखा शहरात बजावणी.

२३. ज्या न्यायालयाकडे समन्स पाठवण्यात आले असेल त्या न्यायालयाचे कर्तव्य.

२४. तुरुंगात असलेल्या प्रतिवादीवरील बजावणी.

२५. प्रतिवादी भारताच्या बाहेर राहत असेल व त्याचा अभिकर्ता नसेल त्या बाबतीत बजावणी.

२६. परकीय राज्यक्षेत्रात राजकीय प्रतिनिधी किंवा न्यायालय यांच्यामार्फत बजावणी.

२६.क. परदेशाच्या अधिकाऱ्यांना समन्स पाठवणे.

२७. मुलकी लोक अधिकाऱ्यांवर अथवा रेल्वे कंपनीचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी यांवर बजावणी करणे.

२८. भूसैनिक, नौसैनिक व वायुसैनिक यांच्यावर बजावणी करणे.

२९. बजावणीसाठी ज्या व्यक्तीकडे समन्स सुपूर्द केले असेल किंवा पाठविले असेल त्या व्यक्तीचे कर्तव्य.

३०. समन्स ऐवजी पत्र पाठविणे.

आदेश सहा

सर्वसाधारणतः वादकथने

१. वादकथन.
२. वादकथनामध्ये महत्त्वाची तथ्ये नमूद करावयाची; पुरावा नव्हे.
३. वादकथनाचे नमुने.
४. आवश्यक असेल तेव्हा तपशील द्यावयाचा.
५. आणखी व अधिक चांगले निवेदन किंवा तपशील.
६. पूर्ववर्ती शर्त.
७. विचलन.
८. संविदेची नाकबुली.
९. दस्तऐवजाचा आशय नमूद करणे.
१०. दुर्भाव, जाणीव, इत्यादी.
११. नोटीस.
१२. उपलक्षित संविदा किंवा नाते.
१३. कायद्यांची गृहीतके.
१४. वादकथनावर सही करणे.
१४क. नोटीस बजावण्याकरिता पत्ता.
१५. वादकथनांचे सत्यापन.
१६. वादकथने काढून टाकणे.
१७. वादकथनातील सुधारणा.
१८. आदेश निघाल्यानंतर सुधारणा करण्यात कसूर.

आदेश सात

वादपत्र

१. वादपत्रात अंतर्भूत असावयाचे तपशील.
२. पैशांबाबतच्या दाव्यामध्ये.
३. दाव्यातील विषयवस्तू ही स्थावर मालमत्ता असेल त्या बाबतीत.
४. वादी प्रतिनिधी म्हणून दावा दाखल करील तेव्हा.
५. प्रतिवादीचा हितसंबंध व दायित्व दाखविणे.
६. मुदतीबाबतच्या कायद्यामधून सूट मिळण्याकरिता आधार कारणे.
७. मागावयाचा अनुतोष स्पष्टपणे नमूद करणे.
८. वेगवेगळ्या कारणांवर आधारलेला अनुतोष.
९. वादपत्र स्वीकृत करून घेतल्यानंतरची कार्यपद्धती.
संक्षिप्त निवेदन.
१०. वादपत्र परत करणे.
वादपत्र परत करतानाची कार्यपद्धती.
१०क. वादपत्र परत करण्यात आल्यानंतर ज्या न्यायालयात ते दाखल करावयाचे त्या न्यायालयास उपस्थित राहण्याची तारीख निश्चित करण्याची न्यायालयाची शक्ती.
१०ख. योग्य त्या न्यायालयाकडे दावा वर्ग करण्याची अपील न्यायालयाची शक्ती.
११. वादपत्र फेटाळणे.
१२. वादपत्र फेटाळल्यानंतरची कार्यपद्धती.
१३. वादपत्र फेटाळल्यामुळे नवीन वादपत्र सादर करण्यास केव्हा प्रतिबंध होत नाही.

वादपत्रात ज्याचा भरवसा ठेवला ती कागदपत्रे

१४. ज्या आधारे वादीने दावा दाखल केला असेल तो दस्तऐवज व अन्य दस्तऐवजांची यादी.
१५. वादीच्या कब्जामध्ये किंवा नियंत्रणाखाली नसलेल्या दस्तऐवजाच्या बाबतीत निवेदन.
१६. गहाळ झालेल्या परक्राम्य संलेखावर आधारलेले दावे.
१७. दुकानवही हजर करणे.
मूळ नोंद चिन्हांकित करून परत करणे.
१८. वादपत्र दाखल करताना हजर न केलेल्या दस्तऐवजाची अग्राह्यता.
१९. वादपत्र किंवा मूळ विनंती अर्ज याबरोबर पत्ता दाखल करणे.
नोंदीव पत्ता.
२०. दाखल करावयाच्या पत्त्याचे स्वरूप.
२१. पत्ता देण्यात कसूर केल्याचा परिणाम.
कसूर केव्हा क्षमापित करता येईल.
२२. पक्षकार नोंदीव पत्त्यावर सापडला नाही तर अनुसरावयाची कार्यपद्धती.
२३. पक्षकाराने प्लीडर नेमला असेल अशा बाबतीत आदेशिकेची बजावणी.

२४. नोंदीव पत्त्यातील बदल.
२५. नियम न्यायालयावर बंधनकारक नसणे.
२६. आदेश एकविसावा, नियम २२ या खालील नोटिशीबाबत प्रयोज्यता.

आदेश आठ

प्रतिवादपत्र, बजावट व प्रतिहक्कमागणी आणि त्रयस्थ व्यक्तीबाबत कार्यपद्धती.

१. प्रतिवादपत्र.
२. नवीन तथ्यासंबंधी विशेषकरून वादकथन केले पाहिजे.
३. इन्कार विनिर्दिष्ट असावा.
४. उडवाउडवीचा इन्कार.
५. स्पष्ट इन्कार.
६. बजावटीचा तपशील प्रतिवादपत्रात देणे.
बजावटीचा प्रभाव.
६क. प्रतिवादीची प्रतिहक्कमागणी.
६ख. प्रतिहक्कमागणी नमूद करणे.
६ग. प्रतिहक्कमागणी वगळणे.
६घ. दावा बंद पडल्याचा प्रभाव.
६ङ. प्रतिहक्कमागणीस उत्तर देण्यात वादीची कसूर.
६च. प्रतिहक्कमागणी सफल झाल्यास प्रतिवादीला अनुतोष मिळणे.
६छ. प्रतिवादपत्रासंबंधीचे नियम लागू असणे.
७. वेगवेगळ्या कारणांवर आधारलेला बचाव, बजावट किंवा प्रतिहक्कमागणी.
८. बचावाचे नवीन आधारकारण.
८क. ज्या दस्तऐवजांच्या आधारे प्रतिवादीने अनुतोष मागितला असेल ते कागदपत्र सादर करण्याचे प्रतिवादीचे कर्तव्य.
९. नंतरची वादकथने.
१०. न्यायालयाने मागवलेले प्रतिवादपत्र सादर करण्यात पक्षकाराने कसूर केल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.
११. पक्षकारांनी पत्ता दाखल करणे.
नोंदीव पत्ता.
नोंदीव पत्ता दाखल करण्यात कसूर केल्याचे परिणाम.
कसूर केव्हा क्षमापित करता येईल.
कसूर केल्यामुळे काढलेला हुकूमनामा रद्द ठरवता येईल.
१२. आदेश सातवा याचे नियम २० व २२ ते २६ यांची प्रयोज्यता.
१३. प्रतिवादीला बजावटी व्यतिरिक्त वादीच्या हक्कमागणी विरुद्ध प्रतिहक्कमागणी मांडता येईल.
१४. प्रतिहक्कमागणी मांडणाऱ्या प्रतिवादीने प्रतिवादपत्रामध्ये तसे स्पष्टपणे नमूद करणे.
१५. प्रतिहक्कमागणीमध्ये वादीबरोबर इतर व्यक्तींचाही समावेश असेल अशाबाबतीत, प्रतिवादीने प्रतिवादपत्राच्या शीर्षकामध्ये आणखी शीर्षक दाखल करावयाच्या आणि आपल्या प्रतिवादपत्राच्या प्रती दाव्यात यापूर्वीच पक्षकार असलेल्या व्यक्तींना द्यावयाच्या.
१६. दाव्यात अगोदरच पक्षकार नसणाऱ्या व्यक्तीविरुद्ध प्रतिहक्कमागणी असेल तेव्हा समन्स बजावणे.
१७. प्रतिहक्कमागणी बजावण्यात आली असता दाव्यातील प्रतिवादी खेरीज इतर व्यक्तीने उपस्थित राहणे.
१८. प्रतिहक्कमागणीला उत्तर.
१९. दाव्यामध्ये मांडण्यास परवानगी दिलेल्या प्रतिहक्कमागणीवरील हरकती.
२०. दावा स्थगित करण्यात आला, तहकूब करण्यात आला, किंवा फेटाळण्यात आला तरीही प्रतिहक्कमागणीवर कार्यवाही करता येणे.
२१. प्रतिहक्कमागणीला उत्तर देण्यात कसूर केल्यास प्रतिहक्कमागणी न्यायानिर्णयासाठी स्थगित ठेवता येईल.
२२. बजावट किंवा प्रतिहक्कमागणी सिद्ध केली असेल अशा वेळेचा न्यायनिर्णय.

त्रयस्थ पक्ष कार्यपद्धती

२३. त्रयस्थ पक्ष नोटीस.
नोटिशीचा नमुना आणि बजावणी.
नोटीस बजावणीचा परिणाम.
२४. त्रयस्थ पक्षाची उपस्थिती आणि उपस्थितीत कसूर केल्याचे परिणाम.
२५. त्रयस्थ पक्ष उपस्थित राहण्यात कसूर करील अशा वेळेचा हुकूमनामा.
२६. त्रयस्थ पक्षाची उपस्थिती आणि निदेशनासाठी अर्ज.
२७ द्यावयाचे निदेशन.
२८. दावा खर्च.
२९. त्रयस्थ पक्ष नोटीस बजावण्यात आलेला पक्षकार दुसऱ्या एखाद्या व्यक्तीविरुद्ध त्रयस्थ पक्ष नोटिस काढण्यासाठी अर्ज करू शकेल.
३०. सहप्रतिवादीविरुद्ध हक्कमागणी करणारा प्रतिवादी.

आदेश नऊ

पक्षकारांची उपस्थिती व अनुपस्थिती यांचा परिणाम

१. प्रतिवादीने उपस्थित राहून जाब द्यावा यासाठी समन्समध्ये निश्चित केलेल्या दिवशी पक्षकाराने उपस्थित राहणे.
२. खर्च देण्यास वादीने कसूर केल्याच्या परिणामी समन्स बजावण्यात आले नसेल त्या बाबतीत दावा फेटाळणे.
३. कोणताही पक्षकार उपस्थित राहिला नाही तर दावा फेटाळणे.
४. वादीला नवीन दावा आणता येईल किंवा न्यायालयाला दावा पुन्हा फाईलवर घेता येईल.
५. समन्स बजावणी न होता परत आल्यानंतर वादीने नवीन समन्ससाठी तीन महिन्यांपर्यंत अर्ज न केल्यास दावा फेटाळणे.
६. फक्त वादीच उपस्थित राहतो त्या बाबतीतील कार्यपद्धती.
समन्स रीतसर बजावलेले असेल अशा बाबतीत.
समन्स रीतसर बजावलेले नसेल अशा बाबतीत.
समन्स बजावलेले असेल पण योग्य वेळच्या आत बजावलेले नसेल अशा बाबतीत.
७. तहकूब केलेली सुनावणी ज्या दिवशी व्हावयाची त्या दिवशी प्रतिवादी उपस्थित झाला आणि मागील अनुपस्थितीबद्दल त्याने सबळ कारण दिले तर त्या बाबतीतील कार्यपद्धती.
८. फक्त प्रतिवादीच उपस्थित राहतो त्या बाबतीतील कार्यपद्धती.
९. अनुपस्थित राहिल्याच्या कारणास्तव वादीविरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्यामुळे नवीन दाव्यास रोध.
१०. निरनिराळ्या वादींपैकी एक किंवा अनेक वादी अनुपस्थित असतील त्याबाबतीतील कार्यपद्धती.
११. निरनिराळ्या प्रतिवादींपैकी एक किंवा अनेक प्रतिवादी अनुपस्थित असतील त्या बाबतीतील कार्यपद्धती.
१२. जातीने उपस्थित राहाण्यासाठी ज्या पक्षकारास आदेश देण्यात आला असेल तो पुरेसे कारण न दाखवता अनुपस्थित राहिल्यास त्याचा परिणाम.

एकतर्फी हुकूमनामे रद्द करणे

१३. प्रतिवादीच्या विरुद्ध काढलेला एकतर्फी हुकूमनामा रद्द करणे.
१४. विरुद्ध पक्षकाराला नोटीस दिल्याखेरीज कोणताही हुकूमनामा रद्द करता येणार नाही.
१५. या आदेशाचे उपबंध अपिलांना लागू असणे.

आदेश दहा

न्यायालयाकडून पक्षकारांची तपासणी

१. न्यायालयातील अभिकथने कबूल करण्यात आली आहेत की नाकबूल करण्यात आली आहेत यासंबंधी खात्री करून घेणे.
२. पक्षकाराची अथवा पक्षकाराच्या सोबत्याची मौखिक तपासणी.
३. तपासणीचा आशय लेखी नमूद करणे.
४. उत्तर देण्यास प्लीडरने नकार दिल्यास किंवा तो असमर्थ ठरल्यास त्याचा परिणाम.

आदेश अकरा

शोध व निरीक्षण

१. परिप्रश्नाद्वारे शोध.
२. विशिष्ट परिप्रश्नपत्रिका सादर करावयाच्या.
३. परिप्रश्नपत्रिकांचा खर्च.
४. परिप्रश्नपत्रिकांचा नमुना.
५. महामंडळ.
६. परिप्रश्नांच्या हरकती उत्तराने देणे.
७. परिप्रश्नपत्रिका रद्द ठरवणे आणि काढून टाकणे.
८. उत्तराचे शपथपत्र दाखल करणे.
९. उत्तराच्या शपथपत्राचा नमुना.
१०. कोणताही आक्षेप घ्यावयाचा नाही.
११. उत्तर देण्याचा किंवा खुलासेवार उत्तर देण्याचा आदेश.
१२. दस्तऐवजांच्या शोधासाठी अर्ज.
१३. दस्तऐवजांबाबत शपथपत्र.
१४. दस्तऐवज हजर करणे.
१५. वादकथने किंवा शपथपत्रे यामध्ये निर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांचे निरीक्षण.

१६. हजर करण्याची नोटीस.
१७. नोटीस दिलेली असेल तेव्हा निरीक्षण करण्याची वेळ.
१८. निरीक्षणाचा आदेश.
१९. सत्यापित प्रती.
२०. अकाली शोध.
२१. शोधांबाबतच्या आदेशांचे पालन न करणे.
२२. परिप्रश्नांच्या उत्तरांचा उपयोग संपरीक्षेच्या वेळी करणे.
२३. नियमावली अज्ञान व्यक्तींना लागू असणे.

आदेश बारा

कबुली

१. हकीकत कबूल असल्याविषयी नोटीस.
२. दस्तऐवज कबूल करण्यासाठी नोटीस.
२क. दस्तऐवज कबूल करण्यासाठी नोटीस बजावल्यानंतर ते नाकबूल करण्यात आले नाही तर ते मान्य करण्यात आल्याचे समजण्यात यावयाचे.
३. नोटिशीचा नमुना.
३क. कबुलीची नोंद करण्याची न्यायालयाची शक्ती.
४. तथ्ये कबूल करण्यासाठी नोटीस.
५. कबुलीचा नमुना.
६. कबुलीच्या आधारे न्यायनिर्णय.
७. स्वाक्षरीविषयक शपथपत्र.
८. दस्तऐवज हजर करण्यासाठी नोटीस.
९. खर्च.

आदेश तेरा

दस्तऐवज हजर करणे, ते अडकवून ठेवणे व ते परत करणे

१. वादमुद्द्यांच्या निश्चितीच्या वेळी किंवा त्यापूर्वी कागदोपत्री लेखी पुरावा सादर करावा.
२. कागदपत्र हजर न केल्याचा परिणाम.
३. असंबद्ध किंवा अग्राह्य दस्तऐवज नाकारणे.
४. पुराव्यामध्ये स्वीकारलेल्या दस्तऐवजांवरील पृष्ठांकने.
५. पुस्तकातील, हिशेबातील आणि अभिलेखातील स्वीकारलेल्या नोंदीच्या प्रतीचे पृष्ठांकन.
६. पुराव्यामध्ये अग्राह्य म्हणून नाकारलेल्या दस्तऐवजांवरील पृष्ठांकन.
७. स्वीकृत दस्तऐवज अभिलेख म्हणून ठेवणे व नाकारलेले दस्तऐवज परत करणे.
इंग्रजी किंवा न्यायालयाच्या भाषेव्यतिरिक्त अन्य भाषेतील किंवा देवनागरी खेरीज अन्य लिपीतील दस्तऐवज.
८. न्यायालय कोणताही दस्तऐवज अडवून ठेवण्याचा आदेश देऊ शकेल.
९. स्वीकृत दस्तऐवज परत करणे.
१०. न्यायालयाला स्वतःच्या अभिलेखातून किंवा अन्य न्यायालयांकडून कागदपत्रे मागविता येतील.
११. दस्तऐवजाच्या संबंधातील उपबंध मूर्त वस्तूंना लागू.

आदेश चौदा

वादमुद्द्यांची निश्चिती आणि कायदेविषयक वादमुद्द्यांच्या आधारे किंवा संमत वादमुद्द्यांच्या आधारे दाव्यांची निर्णिती.

१. वादमुद्दे ठरविणे.
२. न्यायालयाने सर्व वादमुद्द्यांवर न्यायनिर्णय अधिघोषित करणे.
३. ज्यावरून वादमुद्दे ठरविता येतील असे साहित्य.
४. वादमुद्दे ठरविण्यापूर्वी न्यायालय साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करू शकेल.
५. वादमुद्दे विशोधित करण्याची किंवा ते खोडून टाकण्याची शक्ती.
६. तथ्यविषयक किंवा कायदेविषयक प्रश्न मतैक्याने वादमुद्द्याच्या स्वरूपात मांडता येतील.
७. करारनामा सद्भावपूर्वक केलेला आहे त्याबद्दल न्यायालयाची खात्री पटल्यास त्यास न्याय-निर्णय अधिघोषित करता येईल.

आदेश पंधरा

पहिल्या सुनावणीच्या वेळी दावा निकालात काढणे

१. पक्षकारांमध्ये वादमुद्दा नसेल तर.
१. अनेक प्रतिवादींपैकी एकाशी वादमुद्दा नसेल तर.
३. पक्षकारांमध्ये वादमुद्दा असेल तर.
४. पुरावा हजर न करणे.

आदेश पंधरा-क

दाव्यामध्ये पट्टाकाराने बचाव काढून टाकणे

आदेश सोळा

साक्षीदारांना समन्स काढणे व त्यांची हजेरी

१. साक्षीदारांची यादी आणि साक्षीदारांना समन्से काढणे.
१क. साक्षीदारांना समन्सशिवाय हजर करणे.
१ख. न्यायालयास, समन्ससाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराद्वारेच समन्स बजावले जाण्यास परवानगी देता येईल.
२. समन्ससाठी अर्ज केल्यावर साक्षीदारांच्या खर्चाची रक्कम न्यायालयात भरणे.
तज्ञ.
खर्चाचे प्रमाण.
खर्च भेट साक्षीदारांना देणे.
३. साक्षीदाराला खर्च देणे.
३क. शासन ज्यामध्ये पक्षकार नाही अशा दाव्यांमध्ये साक्षीदार म्हणून बोलावलेल्या लोक-सेवकांसाठी विशेष उपबंध.
४. भरलेली रक्कम अपुरी असेल अशा बाबतीतील कार्यपद्धती.
एक दिवसापेक्षा अधिक काळ थांबवून ठेवलेल्या साक्षीदारांचा खर्च.
५. समन्समध्ये हजर राहण्याची वेळ, ठिकाण व प्रयोजन विनिर्दिष्ट करणे.
६. दस्तऐवज हजर करण्यासाठी समन्स.
७. न्यायालयात हजर असणाऱ्या व्यक्तींना पुरावा देण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास फर्माविण्याची शक्ती.
७क. बजावणीकरिता पक्षकाराकडे दिलेले समन्स.
८. समन्स कसे बजावले जाते.
९. समन्स बजावणीसाठीचा वेळ.
१०. समन्सचे अनुपालन करण्यात साक्षीदाराने कसूर केल्यास त्या बाबतीतील कार्यपद्धती.
११. साक्षीदार उपस्थित झाल्यास जप्ती मागे घेता येईल.
१२. साक्षीदार हजर न राहिल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.
१३. जप्तीची पद्धत.
१४. दाव्याच्या संबंधात तिऱ्हाईत असलेल्यांना साक्षीदार म्हणून न्यायालयास स्वत:हून बोलावून घेता येईल.
१५. समन्सद्वारे बोलावलेल्या व्यक्तीने पुरावा अथवा दस्तऐवज हजर करणे हे तिचे कर्तव्य.
१६. त्यांना केव्हा जाता येईल.
१७. नियम १० ते १३ यांची प्रयुक्ती.
१८. पकडून आणलेला साक्षीदार पुरावा देऊ शकत नसेल किंवा दस्तऐवज हजर करू शकत नसेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.
१९. कोणताही साक्षीदार विवक्षित सीमांमध्ये राहत असल्याखेरीज त्याला जातीने हजर राहण्याचा आदेश न देणे.
२०. न्यायालयाने फर्माविले असता पक्षकाराने पुरावा देण्यास नकार दिल्यास त्याचा परिणाम.
२१. साक्षीदारांच्या संबंधातील नियम समन्सद्वारे बोलावलेल्या पक्षकारांना लागू असणे.

आदेश सोळा-क

कारागृहांमध्ये बंदीवान केलेल्या किंवा स्थानबद्ध केलेल्या साक्षीदारांची हजेरी

१. व्याख्या.
२. पुरावा देण्यासाठी कैद्यांनी उपस्थित राहावे म्हणून फर्माविण्याची शक्ती.
३. खर्चाची रक्कम न्यायालयात भरणे.

४. नियम २ च्या प्रवर्तनातून विवक्षित व्यक्तींना वगळण्याची राज्य शासनाची शक्ती.
५. कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याने विवक्षित प्रकरणी आदेशाचे पालन करू नये.
६. कैद्याला न्यायालयात बंदोबस्तानिशी आणावयाचे.
७. कारागृहातील साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढण्याची शक्ती.

आदेश सतरा

तहकुबी

१. न्यायालय वेळ देऊन सुनावणी तहकूब करू शकेल.
तहकुबीचा खर्च.
२. निश्चित केलेल्या दिवशी पक्षकार हजर न राहिल्यास त्या संबंधातील कार्यपद्धती.
३. कोणत्याही पक्षकाराने पुरावा इत्यादी दाखल केला नाही तरीही न्यायालय काम पुढे चालवू शकेल.

आदेश अठरा

दाव्याची सुनावणी व साक्षीदारांची तपासणी

१. सुरू करण्याचा अधिकार.
२. बाजू मांडणे व पुरावा हजर करणे.
३. अनेक वादमुद्दे असतील त्या बाबतीतील पुरावा.
३क. पक्षकाराने अन्य साक्षीदारांपूर्वी उपस्थित व्हावयाचे.
४. साक्षीदारांची तपासणी खुल्या न्यायालयात करावयाची.
५. अपीलपात्र प्रकरणांमध्ये पुरावा कसा घ्यावा.
६. जबानी केव्हा भाषांतरित करून सांगावयाची.
७. कलम १३८ खालील पुरावा.
८. न्यायाधीशाने पुरावा लिहून घेतला नसेल त्याबाबतीत टाचण काढणे.
९. पुरावा इंग्रजीतून केव्हा घेता येईल.
१०. कोणताही विशिष्ट प्रश्न व उत्तर लिहून घेता येईल.
११. हरकत घेण्यात आलेले व न्यायालयाने मुभा दिलेले प्रश्न.
१२. साक्षीदाराच्या वागणुकीसंबंधीचे शेरे.
१३. अपिलास अपात्र प्रकरणी पुराव्याचे टाचण.
१४. [निरसित केले.]
१५. दुसऱ्या न्यायाधीशासमोर घेतलेल्या पुराव्यावर कार्यवाही करण्याची शक्ती.
१६. साक्षीदारांची ताबडतोब तपासणी करण्याची शक्ती.
१७. न्यायालयास, साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची तपासणी करता येईल.
१७क. पूर्वी माहीत नसलेला किंवा योग्य ती तत्परता दाखवूनही जो हजर करता आला नाही असा पुरावा हजर करणे.
१८. न्यायालयाची तपासणी करण्याची शक्ती.

आदेश एकोणीस

शपथपत्र

१. कोणताही मुद्दा शपथपत्राद्वारे शाबीत करण्याचा आदेश देण्याची शक्ती.
२. जबानीदारास उलटतपासणीसाठी हजर राहण्याचा आदेश देण्याची शक्ती.
३. शपथपत्रे कोणत्या बाबीपुरती मर्यादित असतील.

आदेश वीस

न्यायनिर्णय व हुकूमनामे

१. न्यायनिर्णय केव्हा अधिघोषित करावयाचा.
२. न्यायाधीशाच्या पूर्वाधिकाऱ्याने लिहिलेला न्यायनिर्णय अधिघोषित करण्याची शक्ती.
३. न्यायनिर्णय स्वाक्षरित करावयाचा.
४ लघुवाद न्यायालयाचे न्यायनिर्णय.
अन्य न्यायालयांचे न्यायनिर्णय.
५. न्यायालयाने प्रत्येक वादमुद्द्यावर आपला निर्णय नमूद करावयाचा.
५क. पक्षकारांचे प्रतिनिधित्व प्लीडरांनी केलेले नसेल तर अशा प्रकरणी अपील कोठे होऊ शकते यासंबंधीची माहिती न्यायालयाने त्या पक्षकारांना कळवणे.
६. हुकूमनाम्यातील मजकूर.

६क. कोणकोणत्या प्रकारचा अनुतोष मंजूर करण्यात आला आहे ते न्यायनिर्णयाच्या अखेरच्या परिच्छेदामध्ये नेमक्या शब्दात निर्दिष्ट करावयाचे.
६ख. न्यायनिर्णयाच्या टंकलिखित प्रती केव्हा उपलब्ध करावयाच्या.
७. हुकूमनाम्याची तारीख.
८. हुकूमनाम्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी न्यायाधीशाचे पद रिक्त केले असल्यास त्या बाबतीतील कार्यपद्धती.
९. स्थावर मालमत्ता परत मिळण्यासाठी हुकूमनामा.
१०. जंगम मालमत्ता सुपूर्द करण्यासाठी हुकूमनामा.
११. हुकूमनाम्याद्वारे रक्कम हप्त्याहप्त्यांनी देण्याचा निदेश देता येईल.
हप्त्याहप्त्यांनी रक्कम देण्याचा हुकूमनामा आल्यानंतरचा आदेश.
१२. मालमत्तेचा कब्जा व दरम्यानचे नफे यासाठी हुकूमनामा.
१२क. स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या किंवा भाडेपट्टयाच्या संविदेचे विनिर्दिष्ट पालन होण्याकरिता हुकूमनामा.
१३. प्रशासनासंबंधीच्या दाव्यामधील हुकूमनामा.
१४. अग्रक्रमाच्या दाव्यातील हुकूमनामा.
१५. भागीदारीच्या विसर्जनासाठी दाखल केलेल्या दाव्यामधील हुकूमनामा.
१६. प्रकर्ता व अभिकर्ता यांच्यामधील हिशेबासंबंधीच्या दाव्यातील हुकूमनामा.
१७. हिशेबाच्या संबंधातील विशेष निदेश.
१८. मालमत्तेच्या विभाजनासाठी किंवा तीमधील एखाद्या हिश्शाच्या अलग कब्जासाठी दाखल केलेल्या दाव्यामधील हुकूमनामा.
१९. वजावटीला किंवा प्रतिहक्कमागणीला परवानगी देण्यात आली असेल त्या बाबतीतील हुकूमनामा.
वजावट किंवा प्रतिहक्कमागणी याच्याशी संबंधित हुकूमनाम्याविरुद्ध अपील.
२०. न्यायनिर्णय व हुकूमनामा यांच्या प्रमाणित प्रती पुरवणे.

आदेश बीस क

खर्च

१. विवक्षित बाबींच्या संबंधातील उपबंध.
२. उच्च न्यायालयाने केलेल्या नियमांच्या अनुसार खर्च देववणे.

आदेश एकवीस

हुकूमनामा व आदेश यांची अंमलबजावणी
हुकूमनाम्याखालील प्रदान

१. हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली पैसे देण्याच्या पद्धती.
२. न्यायालयाच्या मार्फतीशिवाय हुकूमनामाधारकास प्रदान.

हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करणारी न्यायालये

३. एकापेक्षा जास्त अधिकारिता क्षेत्रांमध्ये असलेल्या जमिनी.
४. लघुवाद न्यायालयाकडे वर्ग करणे.
५. वर्ग करण्याची पद्धती.
६. जेव्हा आपल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी दुसऱ्या न्यायालयाने करावी अशी न्यायालयाची इच्छा असेल त्या वेळेची कार्यपद्धती.
७. हुकूमनाम्याच्या प्रती, इत्यादी स्वीकारणाऱ्या न्यायालयाने शाबिती दाखल करून घेणे.
८. हुकूमनामा किंवा आदेश ज्या न्यायालयाकडे पाठवण्यात आला असेल त्याच्याकडून त्याची अंमलबजावणी.
९. अन्य न्यायालयाने वर्ग केलेल्या हुकूमनाम्यांची उच्च न्यायालयाकडून अंमलबजावणी.

अंमलबजावणीसाठी अर्ज

१०. अंमलबजावणीसाठी अर्ज.
११. तोंडी अर्ज.
लेखी अर्ज.
११क. अटकेच्या अर्जामध्ये कारणे नमूद करावयाची.
१२. न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जात नसलेली जंगम मालमत्ता जप्त करण्यासाठी अर्ज.
१३. स्थावर मालमत्ता जप्त करण्यासाठी केलेल्या अर्जात विवक्षित तपशील अंतर्भूत असणे.
१४. विवक्षित प्रकरणी जिल्हाधिकाऱ्याच्या नोंदवहीमधील प्रमाणित उतारा मागविण्याची शक्ती.

१५. संयुक्त हुकूमनामाधारकांकडून अंमलबजावणीसाठी अर्ज.
१६. हुकूमनाम्याच्या हस्तांतरितीकडून अंमलबजावणीसाठी अर्ज.
१७. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज मिळाल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.
१८. प्रतिहुकूमनाम्याच्या बाबतीत अंमलबजावणी.
१९. एकाच हुकूमनाम्याखाली प्रतिहक्कमागणीच्या बाबतीतील अंमलबजावणी.
२०. गहाणविषयक दाव्यांमध्ये प्रतिहुकूमनामे आणि प्रतिहक्कमागण्या.
२१. एकाच वेळी अंमलबजावणी.
२२. विवक्षित प्रकरणी अंमलबजावणीविरुद्ध कारणे दाखवा नोटीस.
२२क. विक्रीपूर्वी परंतु विक्रीचा जाहीरनामा बजावल्यानंतर न्यायनिर्णीत ऋणको मृत्यू पावल्यास, विक्री रद्द न ठरवणे.
२३. नोटीस दिल्यानंतरची कार्यपद्धती.

अंमलबजावणी करण्यासाठी आदेशिका

२४. अंमलबजावणी करण्यासाठी आदेशिका.
२५. आदेशिकेवर पृष्ठांकन.

अंमलबजावणीची स्थगिती

२६. न्यायालयास अंमलबजावणी केव्हा स्थगित करता येईल.
न्यायनिर्णीत ऋणकोला प्रतिभूती देण्यास फर्माविण्याची किंवा त्यांच्यावर शर्ती लादण्याची शक्ती.
२७. सोडून दिलेल्या न्यायनिर्णीत ऋणकोचे दायित्व.
२८. हुकूमनामा काढणाऱ्या न्यायालयाचा किंवा अपील न्यायालयाचा आदेश, ज्या न्यायालयाकडे अर्ज करण्यात आला असेल त्यावर बंधनकारक असेल.
२९. हुकूमनामाधारक आणि न्यायनिर्णीत ऋणको यांच्यामध्ये दावा प्रलंबित असेपर्यंत अंमलबजावणीची स्थगिती.

अंमलबजावणीची पद्धती

३०. पैशाच्या प्रदानासंबंधीचा हुकूमनामा.
३१. विनिर्दिष्ट जंगम मालमत्तेकरिता हुकूमनामा.
३२. दांपत्य अधिकाराच्या प्रत्यास्थापनाचे यथोक्त पालन करण्यासाठी किंवा मनाई हुकूमासाठी हुकूमनामा.
३३. दांपत्य अधिकाराच्या प्रत्यास्थापनाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत न्यायालयाचा विवेकाधिकार.
३४. दस्तऐवजाचे निष्पादन किंवा परक्राम्य संलेखाचे पृष्ठांकन याकरिता हुकूमनामा.
३५. स्थावर मालमत्तेकरिता हुकूमनामा.
३६. भाडेकरूंच्या भोगवटचात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या सुपूर्दगीचा हुकूमनामा.

अटक व दिवाणी कारागृहात स्थानबद्धता

३७. न्यायनिर्णीत ऋणकोला, दिवाणी कारागृहातील स्थानबद्धतेच्या विरुद्ध कारणे दाखवण्याची परवानगी देण्याचा विवेकाधिकार.
३८. न्यायनिर्णीत ऋणकोला न्यायालयासमोर उपस्थित करण्याचा निदेश देण्यासाठी अटकेचे वॉरंट.
३९. निर्वाहभत्ता.
४०. नोटिशीला अनुसरून न्यायनिर्णीत ऋणको उपस्थित झाल्यावरची किंवा त्याला अटक केल्यानंतरची कार्यवाही.

मालमत्ता जप्त करणे

४१. न्यायनिर्णीत ऋणकोची त्याच्या मालमत्तेच्या संबंधात तपासणी.
४२. ज्याची रक्कम मागाहून निश्चित करण्यात यावयाची असेल, असे भाडे किंवा दरम्यानचे नफे किंवा अन्य बाब याकरिता काढलेल्या हुकूमनाम्याच्या बाबतीत जप्ती.
४३. न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जामधील शेतमालाव्यतिरिक्त अन्य जंगम मालमत्तेची जप्ती.
४३क. जंगम मालमत्तेची अभिरक्षा.
पशुधन जप्त करणे.
४३ख. [पशुधन जप्त करणे.]
४४. शेतमालाची जप्ती.
४४क. शेतमाल जप्त करण्यात आला असेल तेव्हा जप्तीच्या वॉरंटाची प्रत जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवणे.
४५. जप्तीखालील शेतमालाच्या संबंधातील उपबंध.
४६. न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जामध्ये नसलेले ऋण, शेअर आणि अन्य मालमत्ता यांची जप्ती
४६क. गारमिशीस नोटीस.

४६ ख. गारनिशीविरुद्ध आदेश.
४६ ग. विवादग्रस्त प्रश्नांची संपरीक्षा.
४६ घ. ऋण लवस्थ पक्षाचे असेल तेव्हाची कार्यपद्धती.
४६ ङ. लयस्थ पक्षाच्या संबंधात आदेश.
४६ च. गारनिशीने प्रदाम करणे ही विधिग्राह्य ऋणमुक्तता असेल.
४६ छ. दावा खर्च.
४६ ज. अपिले.
४६ झ. परक्राम्य संलेखांना लागू होणे.
४६ ञ.
४६ ट. } [मूळ टीपा नाहीत. असे केंद्रीय नियमदेखील नाहीत.]
४७. जंगम मालमत्तेतील हिस्श्याची जप्ती.
४८. शासनाचा किंवा रेल्वे कंपनीचा अथवा स्थानिक प्राधिकरणाचा कर्मचारी याचा पगार किंवा भत्ते यांची जप्ती.
४८ क. खाजगी कर्मचाऱ्यांचे पगार किंवा भत्ते यांची जप्ती.
४९. भागीदारी मालमत्तेची जप्ती.
५०. भागीदारी संस्थेविरुद्धच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी.
५१. परक्राम्य संलेखांची जप्ती.
५२. न्यायालयाच्या किंवा अशासकीय अधिकाऱ्यांच्या अभिरक्षेत असलेल्या मालमत्तेची जप्ती.
५३. हुकूमनाम्यांची जप्ती.
५४. स्थावर मालमत्तेची जप्ती.
५५. हुकूमनाम्याच्या पूर्ततेनंतर जप्ती दूर करणे.
५६. हुकूमनाम्याअन्वये हक्कदार असलेल्या पक्षकारास नाणी किंवा चलनी नोटा देण्याबाबत आदेश.
५७. जप्तीची समाप्ती.

हक्कमागण्या व हरकती यासंबंधी अभिनिर्णय

५८. मालमत्तेसंबंधीच्या हक्कमागण्या व तिच्या जप्तीसंबंधीच्या हरकती यांचा अभिनिर्णय.
५९. विक्रीस स्थगिती.
६०.
६१.
६२.
६३. } [मूळ नियम ५८, ५९, ६०, ६१ व ६२ याऐवजी नियम ५८ व ५९ दाखल करण्यात आले.]

विक्री–सर्वसाधारण

६४. जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री करण्याचा आणि हक्कदार व्यक्तीस उत्पन्न देण्याचा आदेश देण्याची शक्ती.
६५. विक्री कोणाकडून व कशी करावयाची.
६६. जाहीर लिलावाद्वारे करावयाच्या विक्रीचा जाहीरनामा.
६७. जाहीरनामा काढण्याची पद्धती.
६८. विक्रीची वेळ.
६९. विक्रीला तहकुबी किंवा अटकाव.
७०. (निरसित केले.)
७१. कसूर करणारा खरेदीदार, फेर–विक्रीतील तोट्याबद्दल जबाबदार.
७२. हुकूमनामा धारकाने परवानगीशिवाय बोली बोलावयाची नाही किंवा मालमत्ता विकत घ्यावयाची नाही.
हुकूमनामाधारक खरेदी करील तेव्हा हुकूमनाम्याची रक्कम हीच दिलेली किंमत म्हणून समजणे.
७२ क. गहाणधारकाने न्यायालयाच्या परवानगीशिवाय विक्रीच्या वेळी बोली न बोलणे.
न्यायालयाने गहाणधारकास बोली बोलण्याची परवानगी दिली असेल तेव्हा न्यायालयाने राखीव किंमत निश्चित करावयाची.
७३. अधिकाऱ्यांनी बोली बोलणे किंवा खरेदी करणे यावर निर्बंध.

जंगम मालमत्तेची विक्री

७४. शेतमालाची विक्री.
७५. वाढत्या पिकांच्या संबंधात विशेष उपबंध.
७६. परक्राम्य संलेख व निगमांचे शेअर्स.
७७. जाहीर लिलावाद्वारे विक्री.
७८. नियमबाह्यतेमुळे विक्रीला बाध नाही, परंतु नुकसान पोचलेली कोणतीही व्यक्ती दावा दाखल करू शकेल.
७९. जंगम मालमत्ता, ऋणे व शेअर्स यांची सुपूर्दगी.
८०. परक्राम्य संलेख व शेअर्स यांचे हस्तांतरण.
८१. अन्य मालमत्तेच्या बाबतीत निहित होण्याचा आदेश.

स्थावर मालमत्तेची विक्री

८२. कोणती न्यायालये विक्रीचा आदेश देऊ शकतील.
८३. न्यायनिर्णीत ऋणकोला हुकूमनाम्याची रक्कम उभी करता यावी म्हणून विक्री पुढे ढकलणे.
८४. खरेदीदाराने रक्कम अनामत भरणे व कसूर झाल्यास फेरविक्री.
८५. खरेदी रक्कम संपूर्णपणे चुकती करण्याची मुदत.
८५ क. अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्याकडे हस्तांतरित केली असेल, तेव्हा वजावट करणे.
८६. प्रदानात कसूर झाल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.
८७. फेरविक्रीची अधिसूचना.
८८. सहहिस्सेदाराच्या बोलीस अधिमान देणे.
८९. रक्कम जमा केल्यानंतर विक्री रद्द ठरवण्यासाठी अर्ज.
९०. नियमबाह्य गोष्ट किंवा कपट या कारणावरून विक्री रद्द ठरवण्यासाठी अर्ज.
९१. न्यायनिर्णीत ऋणकोला विक्रेय हितसंबंध नाही या कारणावरून विक्री रद्द ठरवण्याकरिता खरेदीदाराने केलेला अर्ज.
९१ क. अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्यांकडे हस्तांतरित केली असेल, त्याबाबतीत अनामत रकमा कशा ठेवावयाच्या.
९२. विक्री केव्हा अबाधित व्हावयाची किंवा रद्द व्हावयाची.
९३. विवक्षित बाबतीत खरेदीची किंमत परत करणे.
९४. खरेदीदारास प्रमाणपत्र.
९५. न्यायनिर्णीत ऋणकोच्या भोगवटचात असलेल्या मालमत्तेची सुपूर्दगी.
९६. भाडेकरूंच्या भोगवटचातील मालमत्तेची सुपूर्दगी.

हुकूमनामाधारक किंवा खरेदीदार यांच्याकडे कब्जा सुपूर्द करण्याला प्रतिकार

९७. स्थावर मालमत्तेचा कब्जा देण्यास प्रतिकार किंवा अडथळा.
९८. अभिनिर्णयानंतरचे आदेश.
[९८ न्यायनिर्णीत ऋणकोने केलेला प्रतिकार किंवा अडथळा.]
९९. हुकूमनामाधारक किंवा खरेदीदार यांच्याद्वारे कब्जा काढून घेतला जाणे.
[९९. खऱ्याखुऱ्या दावाधारकाकडून प्रतिकार किंवा अडथळा.]
१००. बेदखल करण्यात आल्याची तक्रार करणारा अर्ज आल्यावर दाव्याचा आदेश.
१०१. निर्णीत करावयाचे प्रश्न.
१०२. दावा प्रलंबित असताना ज्यांच्याकडे हस्तांतरण करण्यात आले त्या हस्तांतरितीला नियम लागू नसणे.
१०३. आदेश हुकूमनाम्याप्रमाणे समजणे.
१०४. नियम १०१ किंवा १०३ खालील आदेश प्रलंबित दाव्याच्या निकालाच्या अधीन असणे.
१०५. अर्जाची सुनावणी.
१०६. एकतर्फी, इत्यादी काढलेले आदेश रद्द करणे.

आदेश बावीस

पक्षकारांचा मृत्यू, विवाह आणि दिवाळखोरी

१. दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास, पक्षकारांच्या मृत्यूनंतर दावा अवसान न होणे.
२. अनेक वादी किंवा प्रतिवादी यांपैकी एखाद्याचा मृत्यू झाल्यास आणि दावा चालू ठेवण्याचा अधिकार टिकून राहिल्यास, त्या संबंधातील कार्यपद्धती.
३. अनेक वादींपैकी एकाचा किंवा एकमेव वादीचा मृत्यू झाल्यास त्या संबंधातील कार्यपद्धती.
४. अनेक प्रतिवादीपैकी एकाचा किंवा एकमेव प्रतिवादीचा मृत्यू झाल्यास त्या संबंधातील कार्यपद्धती.
४क. कोणीही कायदेशीर प्रतिनिधी नसेल तेव्हाची कार्यपद्धती.
५. कायदेशीर प्रतिनिधी संबंधीच्या प्रश्नाचा निर्णय.
६. सुनावणी नंतर मृत्यू झाल्यास दावा समाप्त न होणे.
७. स्त्री पक्षकारांच्या विवाहामुळे दावा समाप्त न होणे.
८. बादीच्या दिवाळखोरीमुळे दाव्यावर केव्हा रोध येतो.
अभिहस्तांकितीने दावा पुढे चालू न ठेवल्यास किंवा प्रतिभूती न दिल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.
९. दावा समाप्त झाल्यास किंवा तो फेटाळला गेल्यास होणारा परिणाम.
१०. दाव्यातील अंतिम आदेशापूर्वी अभिहस्तांकन झाल्यास त्या बाबतीतील कार्यपद्धती.
१०क. पक्षकाराच्या मृत्यूबद्दल न्यायालयास कळवणे हे प्लीडरचे कर्तव्य.
११. हा आदेश अपिलांना लागू करणे.
१२. हा आदेश कार्यवाहींना लागू करणे.

आदेश तेवीस

दावे मागे घेणे व त्यांचे समायोजन करणे

१. दावा मागे घेणे किंवा दाव्यातील हक्कमागणीचा काही भाग सोडून देणे.
१क. प्रतिवादींना वादी म्हणून स्थानापन्न करण्याची परवानगी केव्हा देता येईल.
२. पहिल्या दाव्यामुळे मुदत कायद्यावर परिणाम न होणे.
३. दाव्यांची तडजोड.
३क. दाव्यास रोध.
३ख. न्यायालयाच्या परवानगीशिवाय प्रातिनिधिक दाव्यात कोणताही करार किंवा तडजोड न करणे.
४. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीतील कार्यवाहीवर परिणाम न होणे.

आदेश चौवीस

न्यायालयात प्रदान

१. प्रतिवादीने दाव्यातील हक्कमागणीच्या पूर्ततेकरिता रक्कम जमा करणे.
२. रक्कम जमा करण्याबद्दलची नोटीस.
३. जमा केलेल्या रकमेवर नोटीस दिल्यानंतर वादीला व्याज न देणे.
४. जमा केलेली रक्कम वादीने अंशत: पूर्तता म्हणून स्वीकारल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.
त्याने ती रक्कम संपूर्णत: पूर्तता म्हणून स्वीकारल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.

आदेश पंचवीस

दावाखर्चासाठी प्रतिभूती

१. वादीकडून खर्चासाठी प्रतिभूती केव्हा घेता येईल.
[भारताबाहेरील निवास]
२. प्रतिभूती देण्यात कसूर झाल्यास त्याचा परिणाम.
३. खटल्यामध्ये वित्त सहाय्य करणाऱ्या लयस्थ व्यक्तीस पक्षकार बनविण्याची आणि त्या व्यक्तीकडून प्रतिभूती मागण्याची शक्ती.

आदेश सव्वीस

आयोगपत्रे

साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे

१. साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी कोणत्या प्रकरणी न्यायालयास आयोगपत्रे काढता येतील.
२. आयोगपत्रासाठी आदेश.
३. साक्षीदार न्यायालयाच्या अधिकारितेतील क्षेत्रात राहत असेल तेव्हा.
४. कोणत्या व्यक्तींच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढता येईल.
५. भारतामध्ये नसलेल्या साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र किंवा विनंतीपत्र.
६. न्यायालयाने आयोगपत्रानुसार साक्षीदारांची तपासणी करणे.
७. साक्षीदारांच्या जबान्यांसह आयोगपत्र परत पाठविणे.
८. पुराव्यामध्ये जबान्या केव्हा वाचता येतील.

स्थानिक अन्वेषणाकरिता आयोग

९. स्थानिक अन्वेषण करण्याकरिता आयोगपत्रे.
१०. आयुक्तांची कार्यपद्धती.
प्रतिवृत्त व जबान्या दाव्यामध्ये पुरावा असणे.
खुद्द आयुक्ताची जातीने तपासणी होऊ शकणे.

शास्त्रोक्त अन्वेषण करणे, प्रशासी कार्य करणे आणि जंगम मालमत्तेची विक्री करणे यासाठी आयोगपत्रे

१०क. शास्त्रोक्त अन्वेषणासाठी आयोगपत्र.
१०ख. प्रशासी कार्य करण्यासाठी आयोगपत्र.
१०ग. जंगम मालमत्तेच्या विक्रीसाठी आयोगपत्र.

हिशेब तपासण्यासाठी आयोगपत्रे

११. हिशेब तपासण्यासाठी किंवा समायोजित करण्यासाठी आयोगपत्र.
१२. न्यायालयाने आयुक्ताला आवश्यक ते अनुदेश देणे.
कामकाजवृत्त व प्रतिवृत्त हा पुरावा असणे.
न्यायालयास आणखी चौकशी करण्याचा निदेश देता येईल.

विभाजन करण्यासाठी आयोगपत्र .

१३. स्थावर मालमत्तेचे विभाजन करण्यासाठी आयोगपत्र.
१४. आयुक्तांची कार्यपद्धती.

सर्वसाधारण उपबंध

१५. आयोगपत्राचा खर्च न्यायालयात भरणे.
१६. आयुक्ताच्या शक्ती.
१६क. आयुक्तांच्या समोर हरकत घेतलेले प्रश्न.
१७. आयुक्तासमोर साक्षीदारांची हजेरी व तपासणी.
१८. पक्षकारांनी आयुक्तासमोर उपस्थित राहणे.

विदेशी न्यायाधिकरणांच्या विनंतीवरून काढलेली आयोगपत्रे

१८क. आदेश अंमलबजावणीच्या कार्यवाहीस लागू असणे.
१८ख. आयोगपत्र परत करण्यासाठी न्यायालयाने मुदत निश्चित करणे.
१९. साक्षीदाराची तपासणी करण्यासाठी कोणत्या प्रकरणी उच्च न्यायालयास आयोगपत्र काढता येईल.
२०. आयोगपत्र काढण्याकरिता अर्ज.
२१. आयोगपत्र कोणाच्या नावे काढता येईल.
२२. आयोगपत्र काढणे, त्यांची अंमलबजावणी करणे व ती परत करणे आणि पुरावा विदेशी न्यायालयाकडे पाठवणे.

आदेश सत्तावीस

शासनाकडून किंवा शासनाविरुद्ध किंवा पदीय नात्याने लोक अधिकाऱ्यांकडून किंवा त्यांच्याविरुद्ध दावे

१. शासनाकडून किंवा शासनाविरुद्ध दावे.
२. शासनाच्यावतीने काम चालविण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्ती.
३. शासनाने किंवा त्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या दाव्यांमधील वादपत्रे.
४. आदेशिका स्वीकारण्यासाठी शासनाचा अभिकर्ता.
५. शासनाच्यावतीने उपस्थित रहाण्यासाठी दिवस निश्चित करणे.
५क. लोक अधिकाऱ्याविरुद्ध दाखल केलेल्या दाव्यात शासनाला पक्षकार म्हणून सामील करून घेणे.
५ख. शासन किंवा लोक अधिकारी यांच्याविरुद्ध दाव्यांमध्ये समझोता करण्यासाठी सहाय्य करणे हे न्यायालयाचे कर्तव्य.
६. शासनाच्याविरुद्ध दाखल केलेल्या दाव्याशी संबंधित प्रश्नांना उत्तर देऊ शकणाऱ्या व्यक्तींची उपस्थिती.
७. लोक अधिकाऱ्यास शासनाकडे निर्देश करणे शक्य व्हावे म्हणून मुदत वाढवणे.
८. लोक अधिकाऱ्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या दाव्यांतील कार्यपद्धती.
८क. विवक्षित प्रकरणी शासन किंवा लोक अधिकारी यांच्याकडून प्रतिभूती मागता न येणे.
८ख. "शासन" व "शासकीय वकील" यांच्या व्याख्या.

आदेश सत्तावीस-क

संविधानाचा अर्थ लावण्यासंबंधीचा किंवा कोणत्याही सांविधिक संलेखाच्या विधिग्राह्यतेसंबंधीचा कोणताही सारभूत कायदेविषयक प्रश्न अंतर्भूत असलेले दावे

१. महान्यायवादीस किंवा महाधिवक्त्यास नोटीस.
१क. एखाद्या सांविधिक संलेखाच्या विधिग्राह्यतेसंबंधीच्या दाव्यामधील कार्यपद्धती.
२. न्यायालय शासनास पक्षकार म्हणून सामील करून घेऊ शकेल.
२क. कोणत्याही सांविधिक संलेखाच्या विधिग्राह्यतेबंसधीच्या दाव्यामध्ये शासनास किंवा अन्य प्राधिकरणास प्रतिवादी म्हणून समाविष्ट करून घेण्याची न्यायालयाची शक्ती.
३. दावा खर्च.
४. हा आदेश अपिलांना लागू करणे.

आदेश अठ्ठावीस

भूसैनिक किंवा नौसैनिक किंवा वायुसैनिक यांच्याकडून किंवा त्यांच्या विरुद्ध दावे

१. ज्यांना रजा मिळू शकत नाही असे अधिकारी, भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक त्यांच्यावतीने दावा लावण्यास किंवा त्यात बचाव देण्यात कोणत्याही व्यक्तीला प्राधिकृत करू शकतील.
२. अशाप्रकारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस जातीने काम करता येईल किंवा प्लीडरची नेमणूक करता येईल.
३. अशाप्रकारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीवरील किंवा तिच्या प्लीडरवरील बजावणी ही सुयोग्य बजावणी असणे.

आदेश एकोणतीस

महामंडळाकडून किंवा त्यांच्या विरुद्ध दावे

१. वादकथन स्वाक्षरित व सत्यापित करणे.
२. महामंडळावर बजावणी.
३. महामंडळाच्या अधिकाऱ्यास जातीने हजर राहण्यास फर्माविण्याची शक्ती.

आदेश तीस

भागीदारी संस्थांनी आणि स्वत:च्या नावाव्यतिरिक्त अन्य नावाने धंदा चालवणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्याविरुद्ध लावलेले दावे

१. भागीदारी संस्थेच्या नावे भागीदारांवर दावा लावणे.
२. भागीदारांची नावे उघड करणे.
३. बजावणी.
४. भागीदारांच्या मृत्यूनंतर दाव्याचा अधिकार.
५. नोटीस कोणत्या नात्याने बजावली ते.
६. भागीदारांची उपस्थिती.
७. भागीदार असल्याखेरीज उपस्थिती नाही.
८. सनिषध उपस्थिती.
९. सहभागीदारांमधील दावे.
१०. स्वत:च्या नावाव्यतिरिक्त अन्य नावाने धंदा चालवणाऱ्या व्यक्तीविरुद्ध दावा.

आदेश एकतीस

विश्वस्त, मृत्युपत्रव्यवस्थापक व प्रशासक यांच्याकडून किंवा त्यांच्याविरुद्ध दावे

१. विश्वस्त, इत्यादीकडे निहित असलेल्या मालमत्तेच्या संबंधीच्या दाव्यामध्ये लाभाधिकाऱ्याचे प्रतिनिधित्व.
२. विश्वस्त, मृत्युपत्रव्यवस्थापक व प्रशासक यांना पक्षकार म्हणून सामील करून घेणे.
३. विवाहित मृत्युपत्रव्यवस्थापिकेच्या पतीला सामील करून न घेणे.

आदेश बत्तीस

अज्ञान व्यक्ती किंवा मनोविकल व्यक्ती याच्याकडून किंवा याच्याविरुद्ध दावे

१. अज्ञान व्यक्तीने वादमित्रामार्फत दावा लावणे.
२. वादमित्राशिवाय दावा दाखल केला असेल त्या बाबतीत, वादपत्र फाईलीतून काढून घेणे.
२क. न्यायालयाला खर्चाकरता प्रतिभूती देण्यासाठी वादमित्राला भाग पाडता यईल.
३. दाव्यामध्ये अज्ञान प्रतिवादीकरिता न्यायालयाने दाव्यापुरता पालक नियुक्त करणे.
३क. अज्ञान व्यक्तीविरुद्ध काढलेला हुकमनामा तिच्या हितसंबंधास बाध आल्याखरीज रद्द न ठरवणे.
४. वादमित्र म्हणून कोण काम चालवू शकेल किंवा दाव्यापुरता पालक म्हणून कोण नेमला जाऊ शकेल.
५. वादमित्राने किंवा दाव्यापुरत्या पालकाने अज्ञान व्यक्तीचे प्रतिनिधित्व करणे.
६. अज्ञान व्यक्तीच्या बाजूने काढलेल्या हुकूमनाम्यानुसार वादमित्राने किंवा दाव्यापुरत्या पालकाने मालमत्ता स्वीकारणे.
७. वादमित्र किंवा दाव्यातील पालक यांच्याकडन करार किंवा तडजोड.
८. वादमित्राची निवृत्ती.
९. वादमित्राला काढून टाकणे.
१०. वादमित्राला काढून टाकणे, इत्यादी नंतर कार्यवाही स्थगित करणें.
११. दाव्यापुरता पालक निवृत्त होणे, त्याला काढून टाकणे किंवा त्याचा मृत्यू होणे.
१२. अज्ञान वादी किंवा अर्जदार सज्ञान झाल्यानंतर त्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.
१३. अज्ञान सहवादी सज्ञान झाल्यावर दावा प्रत्यादिष्ट करू इच्छित असेल ती बाब.
१४. गैरवाजवी किंवा अयोग्य दावा.
१५. नियम एक ते चौदा (नियम २-क खेरीज करून) विकलमनाच्या व्यक्तींना लागू असणे.
१६. व्यावृत्ती.

आदेश बत्तीस क

कुटुंबविषयक बाबींशी संबंधित असलेले दावे

१. आदेश लागू असणे.
२. कार्यवाही कक्षांतर्गत चालवणे.
३. समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न करणे हे न्यायालयाचे कर्तव्य.
४. कल्याणकार्यविषयक तज्ञांचे सहाय्य.
५. तथ्यांबाबत चौकशी करण्याचे कर्तव्य.
६. कुटुंब या शब्दाचा अर्थ.

आदेश तेहतीस

निर्धन व्यक्तींकडून दावे

१. निर्धन व्यक्ती म्हणून दावे दाखल करता येतील.
१क. निर्धन व्यक्तींच्या साधनसंपत्तीच्या संबंधात चौकशी.
२. अर्जातील मजकूर.
३. अर्ज सादर करणे.
४. अर्जदाराची तपासणी.
अभिकर्त्यांकडून प्रतिनिधित्व करण्यात आल्यास अर्जदाराची तपासणी आयोगपत्राद्वारे करण्यात यावी असा आदेश न्यायालयास देता येईल.
५. अर्ज फेटाळणे.
६. अर्जदाराच्या निर्धनपणाचा पुरावा घेण्याच्या दिवसाची नोटीस.
७. सुनावणीची कार्यपद्धती.
८. अर्ज स्वीकारल्यास त्याबद्दलची कार्यपध्दती.
९. निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याची परवानगी मागे घेणे.
९क. प्रतिनिधी नसलेल्या निर्धन व्यक्तींसाठी न्यायालयाने प्लीडर नेमून देणे.
१०. निर्धन व्यक्ती यशस्वी झाल्यास त्या बाबतीतील खर्चाबाबत.
११. निर्धन व्यक्ती अयशस्वी झाल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.
११क. दावा समाप्तीच्या बाबतीतील कार्यपद्धती.
१२. न्यायालय फीच्या प्रदानासाठी राज्य शासन अर्ज करू शकेल.
१३. राज्य शासनास पक्षकार समजणे.
१४. न्यायालय फीच्या रकमेची वसुली.
१५. निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यासाठी परवानगी नाकारल्यामुळे मागाहून तशाच स्वरूपाचा अर्ज करण्यास रोध.
१५क. न्यायालय फीची रक्कम भरण्यासाठी मुदत मंजूर करणे.
१६. खर्च.
१७. निर्धन व्यक्तींद्वारे बचाव.
१८. निर्धन व्यक्तींना मोफत कायदाविषयक सेवा उपलब्ध करून देण्याची शासनाची शक्ती.
१९. न्यायालयाच्या परवानगीशिवाय नादार व्यक्तीने दाव्यात तडजोड करावयाची नाही.

आदेश चौतीस

स्थावर मालमत्तेच्या गहाणासंबंधी दावे

१. पुरोबंध, विक्री व विमोचन या संबंधीच्या दाव्यातील पक्षकार.
२. पुरोबंधासंबंधीच्या दाव्यात प्रारंभिक हुकूमनामा.
३. पुरोबंधासंबंधीच्या दाव्यामधील अंतिम हुकूमनामा.
४. विक्रीबद्दलच्या दाव्यांमधील प्रारंभिक हुकमनामा.
पुरोबंध दाव्यामध्ये विक्रीचा हुकूमनामा देण्याची शक्ती.
५. विक्रीच्या दाव्यामधील अंतिम हुकूमनामा.
६. विक्रीच्या दाव्यामध्ये गहाणावर देय असलेल्या शिल्लक रकमेची वसुली.
७. विमोचनाच्या दाव्यामधील प्रारंभिक हुकूमनामा.
८. विमोचनाच्या दाव्यामधील अंतिम हुकूमनामा.
८क. विमोचनाबद्दलच्या दाव्यात गहाणावर देय असलेल्या शिल्लक रकमेची वसुली.
९. काहीही देय असल्याचे आढळले नसल्यास किंवा गहाणदारास अतिप्रदान करण्यात आले असल्यास हुकूमनामा.
१०. हुकूमनाम्यानंतरचा गहाणदाराचा दावाखर्च.
१०क. दरम्यानच्या लाभाचे प्रदान करण्याचा निदेश गहाणदाराला देण्याची न्यायालयाची शक्ती.

११. व्याजाचे प्रदान.
१२. पूर्ववर्ती गहाणास अधीन असलेल्या मालमत्तेची विक्री.
१३. उत्पन्नाचे उपयोजन.
१४. गहाण ठेवलेली मालमत्ता विक्रीस आणण्यासाठी विक्रीबद्दलचा दावा आवश्यक असणे.
१४क. एकाच हुकूमनाम्यात प्रारंभिक आणि अंतिम हुकूमनामा असलेल्या संयुक्त हुकूमनाम्याच्या संबंधातील विशेष उपबंध.
१५. स्वत्वाधिकारलेखाचा निक्षेप करून ठेवलेले गहाण आणि प्रभार.

आदेश पस्तीस

अंतर्वाद

१. अंतर्वाद दाव्यातील वादपत्र.
२. मागणी करण्यात आलेल्या गोष्टीचे न्यायालयात प्रदान करणे.
३. प्रतिवादी वादीवर दावा दाखल करीत असेल त्याबाबतची कार्यपद्धती.
४. पहिल्या सुनावणीच्या वेळीची कार्यपद्धती.
५. अभिकर्ते आणि कुळे यांना अंतर्वाद दावे सुरू करता येणार नाहीत.
६. वादीच्या खर्चाचा प्रभार.

आदेश छत्तीस

विशेष प्रकरण

१. न्यायालयाच्या अभिप्रायासाठी प्रकरणाचे निवेदन करण्याची शक्ती.
२. विषयवस्तूंच्या मूल्यांचे कथन केव्हा केले पाहिजे.
३. करार दाखल करून त्याची दावा म्हणून नोंद करणे.
४. पक्षकार न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणे.
५. प्रकरणाची सुनावणी आणि ते निकालात काढणे.
६. नियम ५ अन्वये देण्यात आलेल्या हुकूमनाम्यावर अपील नाही.

आदेश सदतीस

संक्षिप्त प्रक्रिया

१. हा आदेश ज्यांना लागू व्हावयाचा ती न्यायालये आणि ते दाव्यांचे वर्ग.
२. संक्षिप्त दावे दाखल करणे.
३. प्रतिवादीच्या उपस्थितीसाठी कार्यपद्धती.
प्रतिवादीवर समन्स प्राधिलेख बजावणे व प्रतिवादीची उपस्थिती.
न्यायनिर्णयासाठी समन्स.
प्रतिवादीने बचावाच्या परवानगीसाठी अर्ज करणे.
सुनावणी व न्यायनिर्णय.
उपस्थितिपत्र दाखल करण्यातील किंवा बचावासाठी परवानगी मागण्यातील विलंब क्षमापित करता येईल.
४. हुकूमनामा रद्द करण्याची शक्ती.
५. विपत्र, इत्यादींचा न्यायालयाच्या अधिकाऱ्याकडे भरणा करण्याचा आदेश देण्याची शक्ती.
६. अवमानलेले विपत्र किंवा चिठ्ठी यांच्या अस्वीकाराची अधिटिप्पणी करण्याच्या खर्चाची वसुली.
७. दाव्यांमधील कार्यपद्धती.

आदेश अडतीस

न्यायनिर्णयापूर्वी अटक करणे व जप्त करणे

न्यायनिर्णयापूर्वी अटक करणे

१. उपस्थित राहण्याबद्दल प्रतिभूती देण्यास प्रतिवादीला कोणत्या बाबतीत आज्ञा करता येईल.
२. प्रतिभूती.
३ आबंधनातून मुक्त करण्यात यावे यासाठी जामीनदाराने केलेल्या अर्जाबरील कार्यपद्धती.
४. प्रतिवादीने प्रतिभूती देण्यात किंवा नवीन प्रतिभूति शोधण्यात कसूर केल्यास त्याबाबतीत कराव्याची कार्यपद्धती.

न्यायनिर्णयापूर्वीची जप्ती

५. प्रतिवादीला मालमत्ता हजर करण्याबद्दल प्रतिभूती देण्याची आज्ञा केव्हा करता येईल.
६. कारण दाखवण्यात आलेले नसल्यास किंवा प्रतिभूती देण्यात आलेली नसल्यास जप्ती.
७. जप्ती करण्याची पद्धती.
८. न्यायनिर्णयापूर्वी जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेवरील हुक्कमागणीचा अभिनिर्णय.
९. प्रतिभूती दिल्यास किंवा दावा फेटाळल्यास जप्ती दूर करणे.
१०. न्यायनिर्णयापूर्वीच्या जप्तीमुळे तिऱ्हाईतांच्या अधिकारांवर परिणाम होणार नाही किंवा हुकूमनामाधारकाला विक्रीसाठी अर्ज करण्यास प्रतिबंध होणार नाही.
११. न्यायनिर्णयापूर्वी जप्त केलेली मालमत्ता हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना पुन्हा जप्त न करणे.
११क. उपबंध जप्तीला लागू असणे.
१२. कृषि उत्पन्न न्यायनिर्णयापूर्वी जप्त करता येण्याजोगे नसणे.
१३. लघुवाद न्यायालयाने स्थावर मालमत्ता जप्त न करणे.

आदेश एकोणचाळीस

तात्पुरते मनाईहुकूम आणि वादकालीन आदेश

तात्पुरते मनाईहुकूम

१. ज्या प्रकरणामध्ये तात्पुरते मनाईहुकूम देता येतील ती प्रकरणे.
२. संविदेच्या भंगाची पुनरावृत्ती किंवा भंग करण्याचे चालू ठेवणे निरुद्ध करण्यासाठी मनाईहुकूम.
२क. मनाईहुकूमाची अवज्ञा अथवा भंग केल्याचा परिणाम.
३. मनाईहुकूम देण्यापूर्वी न्यायालयाने विरुद्ध पक्षकाराला नोटीस देण्याविषयी निदेश देणे.
३क. मनाईहुकूमासाठी करण्यात आलेला अर्ज न्यायालयाने तीस दिवसांच्या आत निकालात काढावा.
४. मनाईहुकूमाचा आदेश काढून टाकता येईल, त्यात बदल करता येईल किंवा तो रद्द ठरविता येईल.
५. महामंडळाला देण्यात आलेला मनाईहुकूम त्याच्या अधिकाऱ्यांवर बंधनकारक असणे.

वादकालीन आदेश

६. अंतरिम विक्रीचा आदेश देण्याची शक्ती.
७. दाव्याची विषयवस्तू अटकावून ठेवणे, तिचे जतन करणे, पाहणी करणे, इत्यादी.
८. अशा आदेशासाठी करावयाचा अर्ज नोटिशीनंतर करणे.
९. दाव्याची विषयवस्तू असलेली जमीन पक्षकाराच्या तात्काळ कब्जात केव्हा देता येईल.
१०. न्यायालयात पैसा, इत्यादींचा निक्षेप करणे.
११. न्यायालयाच्या आदेशांचा भंग करणाऱ्या आणि न्यायालयाला दिलेल्या अभिवचनांचा भंग करणाऱ्या पक्षकारासंबंधीची कार्यपद्धती.

आदेश चाळीस

प्रापकांची नियुक्ती

१. प्रापकांची नियुक्ती.
२. पारिश्रमिक.
३. कर्तव्ये.
४. प्रापकाच्या कर्तव्यांची बजावणी.
५. जिल्हाधिकाऱ्याची प्रापक म्हणून केव्हा नियुक्ती करता येईल.

आदेश चाळीस-क

सावधानपत्र नियम

आदेश एकेचाळीस

मूळ हुकूमनाम्यांवरील अपिले

१. अपिलाचा नमुना.
ज्ञापनाबरोबर काय दाखल करावे.
ज्ञापनाचा आशय.
२. अपिलात कोणती कारणे घेता येतील.
३. ज्ञापन फेटाळणे किंवा त्यात दिशोधन करणे.

३क. उशीर क्षमापित करण्यासाठी अर्ज.
४. सर्व वादींना किंवा प्रतिवादींना सामाईक अशा कारणावरून हुकूमनामा देण्यात आला असेल तेथे अनेक वादींपैकी किंवा प्रतिवादींपैकी एकाला संपूर्ण हुकूमनामा फिरवून घेता येईल.

कार्यवाहीची आणि अंमलबजावणीची स्थगिती

५. अपील न्यायालयाने दिलेली स्थगिती.
६. ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचा आदेश होईल त्या प्रकरणी द्यावयाची प्रतिभूती.
७. [निरसित केले.]
८. हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना दिलेल्या आदेशावरील अपिलामध्ये शक्तींचा वापर.

अपील स्वीकृत केल्यानंतरची कार्यपद्धती

९. अपिलाच्या ज्ञापनाची नोंदणी.
अपील नोंदवही.
१०. अपीलकर्त्याने खर्चासाठी प्रतिभूती द्यावी असे अपील न्यायालयाला फर्मावता येईल.
अपीलकर्ता भारताबाहेर निवास करत असेल तेथे.
११. निम्न न्यायालयाकडे नोटीस न पाठवता अपील खारीज करण्याची शक्ती.
११क. नियम ११ अन्वयेची सुनावणी कोणत्या मुदतीच्या आत समाप्त करण्यात यावी.
१२. अपिलाच्या सुनावणीसाठी दिवस.
१३. ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले, त्या न्यायालयाला अपील न्यायालयाने नोटीस द्यावयाची.
कागदपत्र अपील न्यायालयाकडे पाठवणे.
ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आलेले असेल त्या न्यायालयातील निशाण्यांच्या प्रती.
१४. अपिलाच्या सुनावणीच्या दिवसाची नोटीस प्रसिद्ध करणे व ती बजावणे.
स्वत: अपील न्यायालयालाच नोटीस बजावण्याची व्यवस्था करता येईल.
१५. नोटिशीचा मजकूर.
१५क. खटल्याअभावी फेटाळणे.

सुनावणीची कार्यपद्धती

१६. प्रारंभ करण्याचा अधिकार.
१७. अपीलकर्त्याच्या कसुरीबद्दल अपील फेटाळणे.
१८. अपीलकर्त्याने खर्चाची रक्कम ठेव म्हणून ठेवण्यात कसूर केल्यामुळे नोटीस बजावण्यात आली नसेल अशा बाबतीत अपील फेटाळणे.
१८क. खटल्याअभावी फेटाळणे.
१९. कसुरीमुळे फेटाळण्यात आलेले अपील पुन्हा स्वीकृत करणे.
२०. सुनावणी तहकूब करण्याची आणि हितसंबंधित असणाऱ्या व्यक्तींना उत्तरवादी करण्याचे निदेश देण्याची शक्ती.
२१. ज्याच्या विरुद्ध एकतर्फी हुकूमनामा देण्यात आलेला आहे त्या उत्तरवादीच्या अर्जावरून पुन्हा सुनावणी करणे.
२२. सुनावणी झाल्यानंतर उत्तरवादीला, त्याने स्वतंत्र अपील दाखल केलेले असावे त्याप्रमाणे हुकूमनाम्यास आक्षेप घेता येईल.
आक्षेपाचा नमुना व त्यास लागू करण्यायोग्य उपबंध.
२३. अपील न्यायालयाने प्रकरण परत पाठवणे.
२३क. इतर बाबतीत प्रकरणे परत पाठवणे.
२४ अभिलेखांतर्गत पुरावा पुरेसा असेल अशा बाबतीत अपील न्यायालयाला, प्रकरणाचा अंतिम निर्णय करता येईल.
२५. अपील न्यायालयाला कोठे वादमुद्दे काढता येतील व ते वादमुद्दे ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या न्यायालयाकडे संपरीक्षेसाठी निर्देशित करता येतील.
२६. निष्कर्ष आणि पुरावा अभिलिखित करणे.
निष्कर्षाबाबतचे आक्षेप.
अपिलाचा निर्णय.
२६क. प्रकरण परत पाठविण्यासंबंधीच्या आदेशामध्ये पुढच्या सुनावणीचा दिनांक नमूद केला पाहिजे.
२७. अपील न्यायालयात जादा पुरावा सादर करणे.
२८. जादा पुरावा घेण्याची पद्धत.
२९. मुद्दे निश्चित व अभिलिखित करावयाचे.

अपिलातील न्यायनिर्णय

३०. न्यायनिर्णय केव्हा व कोठे उद्घोषित करावयाचा.
३१. न्यायनिर्णयातील मजकूर, त्याचा दिनांक व त्यावरील सही.
३२. न्यायनिर्णयाद्वारे काय निदेश देता येईल.
३३. अपील न्यायालयाची शक्ती.
३४. भिन्न मते नोंदवणे.

अपिलातील हुकूमनामा

३५. हुकूमनाम्याचा दिनांक व त्यातील मजकूर.
न्यायनिर्णयापेक्षा भिन्न मत असणाऱ्या न्यायाधीशाने हुकूमनाम्यावर सही करण्याची गरज नाही.
३६. न्यायनिर्णयाच्या व हुकूमनाम्याच्या प्रती पक्षकारांना देण्यात याव्यात.
३७. ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले असेल त्याला हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत पाठवण्यात यावी.
३८. अपील कार्यवाहींच्या कालावधीत नोंदणीकृत पत्ता अधिकृत असेल.

आदेश बेचाळीस

अपिलातील हुकूमनाम्यावरील अपिले

१. कार्यपद्धती.
२. न्यायालयाने तयार केलेल्या प्रश्नावर अपिलाची सुनावणी करण्याचा निदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.
३. आदेश एकेचाळीसचा नियम १४ लागू करणे.

आदेश त्रेचाळीस

आदेशांवर करण्यात आलेली अपिले

१. आदेशांवर करण्यात आलेली अपिले.
१क. हुकूमनाम्यांविरुद्ध करण्यात आलेल्या अपिलातील अपीलयोग्य नसलेल्या आदेशांना आक्षेप घेण्याचा अधिकार.
२. कार्यपद्धती.

आदेश चव्वेचाळीस

निर्धन व्यक्तींची अपिले

१. निर्धन व्यक्ती म्हणून कोणाला अपील करता येईल.
२. न्यायालय फी भरण्यासाठी मुदत मंजूर करणे.
३. अर्जदार निर्धन व्यक्ती आहे किंवा कसे याबद्दल चौकशी.

आदेश पंचेचाळीस

सर्वोच्च न्यायालयाकडे करावयाची अपिले

१. "हुकूमनामा" या संज्ञेची व्याख्या.
२. ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याबद्दल तक्रार करावयाची आहे त्या न्यायालयाकडे अर्ज.
३. मूल्य किंवा योग्यता या विषयीचे प्रमाणपत्र.
४. [निरसित केले.]
५. [निरसित केले.]
६. प्रमाणपत्र नाकारल्यास त्याचा परिणाम.
७. प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर आवश्यक असलेली प्रतिभूती व निक्षेप.
७क. केंद्र किंवा राज्य शासन किंवा शासनाकडून बचाव करण्यात येणारे शासकीय कर्मचारी यांच्याकडून प्रतिभूती न मागणे.
८. अपील स्वीकृत करणे व त्यावरील कार्यपद्धती.
९. प्रतिभूतीचा स्वीकार रद्द करणे.
९क. मृत पक्षकारांच्या बाबतीत नोटीस अनावश्यक करण्याची शक्ती.
१०. आणखी प्रतिभूती देण्याचा किंवा रक्कम प्रदान करण्याचा आदेश देण्याची शक्ती.
११. आदेशाचे अनुपालन करण्यात झालेल्या कसुरीचा परिणाम.
१२. शिल्लक निक्षेप रकमेचा परतावा.

आदेश पंचेचाळीस—चालू

१३. अपील प्रलंबित असतानाची न्यायालयाची शक्ती.
१४. प्रतिभूती अपुरी असल्याचे आढळल्यास ती वाढवणे.
१५. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश अंमलात आणण्याची कार्यपद्धती.
१६. अंमलबजावणीशी संबंधित आदेशावरील अपील.
१७. [निरसित केले.]

आदेश सेहेचाळीस

निर्देशन

१. उच्च न्यायालयाकडे प्रश्नाचा निर्देश करणे.
२. न्यायालयाला उच्च न्यायालयाच्या निर्णयावर सभाश्रित असलेला हुकूमनामा देता येईल.
३. उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय पाठवणे व तदनुसार प्रकरण निकालात काढणे.
४. उच्च न्यायालयाकडे निर्देश करण्याचा खर्च.
४क. कलम ११३ च्या परंतुकान्वये उच्च न्यायालयाकडे निर्देश करणे.
५. निर्देश करणाऱ्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यात फेरबदल करणे, इत्यादीची शक्ती.
६. लघुवादविषयक अधिकारितेबाबतच्या प्रश्नाचा उच्च न्यायालयाकडे निर्देश करण्याची शक्ती.
७. लघुवादविषयक अधिकारितेसंबंधीच्या चूकभुलीमुळे करण्यात आलेल्या कार्यवाहीचे कागदपत्र पुनरीक्षणासाठी सादर करण्याची जिल्हा न्यायालयाची शक्ती.
८. आदेश एकेचाळीस, नियम ३८ लागू होणे.

आदेश सत्तेचाळीस

पुनर्विलोकन

१. न्यायनिर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी केलेला अर्ज.
२. [निरसित केले.]
३. पुनर्विलोकनाच्या अर्जाचा नमुना.
४. अर्ज केव्हा फेटाळता येईल.
अर्ज केव्हा मंजूर करता येईल.
५. दोन किंवा अधिक न्यायाधीश असतील अशा न्यायालयात पुनर्विलोकनाचा अर्ज.
६. अर्ज केव्हा फेटाळावयाचा.
७. फेटाळण्याबाबतचा आदेश अपीलयोग्य नसणे.
अर्ज मंजूर केल्याबद्दलच्या आदेशास आक्षेप.
८. मंजूर करण्यात आलेल्या अर्जाची नोंदणी आणि फेरसुनावणीचा आदेश.
९. विवक्षित अर्जास रोध.
१०. आदेश एकेचाळीसचा नियम ३८ लागू असणे.

आदेश सत्तेचाळीस क

पुनरीक्षण

१. आदेश एकेचाळीसाचा नियम ३८ लागू असणे.

आदेश अठ्ठेचाळीस

संकीर्ण

१. आदेशिका काढणाऱ्या पक्षकाराच्या खर्चाने तिची बजावणी करावयाची.
बजावणीचा खर्च.
२. आदेश व नोटिसा कशा प्रकारे बजावावयाच्या.
३. परिशिष्टांमधील नमुन्यांचा वापर.

आदेश एकोणपन्नास

सनदी उच्च न्यायालये

१. उच्च न्यायालयाच्या आदेशिका कोणास बजावता येतील.
२. सनदी उच्च न्यायालयांच्या संबंधातील व्यावृत्ती.
३. नियम लागू होणे.
४. अपील सादर केल्यानंतर न्यायालय फी स्वीकारण्याची उच्च न्यायालयाच्या प्रबंधकाची शक्ती.

आदेश पन्नास

प्रांतिक लघुवाद न्यायालये

१. प्रांतिक लघुवाद न्यायालये.

आदेश एकावन्न

इलाखा शहर लघुवाद न्यायालये

१. इलाखा शहर लघुवाद न्यायालये.

पहिल्या अनुसूचीची परिशिष्टे

नमुने

परिशिष्ट " क "

१. दाव्यांचे सरनामे.
२. विशिष्ट प्रकरणांमध्ये पक्षकारांचे वर्णन.
३. वादपत्रे.
४. प्रतिवादपत्रे.

परिशिष्ट " ख " आदेशिका.

परिशिष्ट " ग " शोध, तपासणी व कबुली.

परिशिष्ट " घ " हुकूमनामे.

परिशिष्ट " ङ " अंमलबजावणी.

परिशिष्ट " च " पूरक कार्यवाही.

परिशिष्ट " छ " अपील, निर्देशन व पुनर्विलोकन.

परिशिष्ट " ज " संकीर्ण.

पहिली अनुसूची

आदेश पहिला

दाव्यांमधील पक्षकार

[1][१. (क्) एकच कृती किंवा संव्यवहार अथवा कृतींची किंवा संव्यवहारांची मालिका यांच्या संबंधात किंवा त्यामधून उद्भवणारा अनुतोष मिळण्याचा कोणताही अधिकार संयुक्तपणे काही व्यक्ती मिळून त्यांच्या ठायी किंवा अलग अलगपणे किंवा वैकल्पिकपणे त्यांपैकी कोणाच्या तरी ठायी अस्तित्वात आहे असे अभिकथन करण्यात आले असेल त्या बाबतीत; आणि

(ख्) अशा व्यक्तींनी स्वतंत्र दावे आणले तर कोणताही कायदेविषयक किंवा तथ्यविषयक सामाईक प्रश्न उद्भवण्याची शक्यता असेल, त्याबाबतीत—

अशा सर्व व्यक्तींना एकाच दाव्यामध्ये वादी म्हणून सामील करून घेता येईल.]

वादी म्हणून कोणाकोणाला सामील करून घेता येईल.

[2][२. वादींना कोणत्याही प्रकारे सामील करून घेण्यामुळे दाव्याच्या संपरीक्षेमध्ये गोंधळ उद्भवेल किंवा तिला विलंब लागेल असे न्यायालयाला वाटल्यास, न्यायालयाला वादींना त्यांचे निवड करण्यास सांगता येईल किंवा स्वतंत्र संपरीक्षा करण्याचा आदेश देता येईल किंवा त्याला समयोचित वाटेल असा अन्य आदेश काढता येईल.

स्वतंत्र संपरीक्षा करण्याचा आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.

[3][३. (क्) एकच कृती किंवा संव्यवहार अथवा कृतींची किंवा संव्यवहारांची मालिका यांच्या संबंधातील किंवा त्यामधून उद्भवणारा अनुतोष मिळण्याचा कोणताही अधिकार संयुक्तपणे काही व्यक्ती मिळून त्यांच्या ठायी किंवा अलग अलगपणे किंवा वैकल्पिकपणे त्यांपैकी कोणाच्या तरी ठायी अस्तित्वात आहे असे अभिकथन करण्यात आले असेल त्याबाबतीत; आणि

(ख्) जर अशा व्यक्तींविरुद्ध स्वतंत्र दावे आणले तर कोणताही कायदेविषयक किंवा तथ्यविषयक सामाईक प्रश्न उद्भवण्याची शक्यता असेल त्याबाबतीत—

अशा सर्व व्यक्तींना एकाच दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील करून घेता येईल.]

प्रतिवादी म्हणून कोणाकोणाला सामील करून घेता येईल.

[4][३क. प्रतिवादींना कोणत्याही प्रकारे सामील केल्यामुळे दाव्याच्या[3] संपरीक्षामध्ये गोंधळ उद्भवेल किंवा तिला विलंब लागेल असे न्यायालयास वाटल्यास त्यास स्वतंत्र संपरीक्षा करण्याचा आदेश देता येईल किंवा न्यायाच्या दृष्टीने समयोचित असेल असा अन्य आदेश काढता येईल.]

प्रतिवादींना सामील करण्यामुळे संपरीक्षेमध्ये गोंधळ उद्भवणार असेल किंवा तिला विलंब लागणार असेल तर त्याबाबतीत, स्वतंत्र संपरीक्षेचा आदेश देण्याची शक्ती.

४. (क्) अनुतोष मिळण्यास हक्कदार असल्याचे आढळून येईल अशा एका किंवा अनेक वादींच्या बाजूने तो किंवा ते पक्षकार जो अनुतोष मिळण्यास हक्कदार असतील, त्याकरिता;

(ख्) दायी असल्याचे आढळून येईल अशा एका किंवा अनेक प्रतिवादींच्या विरुद्ध त्यांच्या संबंधित दायित्वानुसार,—

कोणत्याही सुधारणेशिवाय न्यायनिर्णय देता येईल.

न्यायालय संयुक्त पक्षकारांपैकी एका किंवा अनेक पक्षकारांच्या बाजूने अथवा त्यांच्या विरुद्ध न्यायनिर्णय देऊ शकेल.

५. प्रत्येक प्रतिवादी त्याच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या कोणत्याही दाव्यात जो अनुतोष मागितलेला असेल, त्यामध्ये सर्वांशांनी हितसंबंधित असला पाहिजे असे नाही.

जो अनुतोष मागितला असेल त्यामध्ये प्रतिवादी सर्वांशांनी हितसंबंधित असलाच पाहिजे, असे नाही.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५२ (एक) द्वारे बदली दाखल केले.
२. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५२ (दोन) द्वारे बदली दाखल केले.
३. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५२ (तीन) द्वारे समाविष्ट केले.

एकाच संविदेत दायी असणाऱ्या व अलग अलगपणे दायी असलेल्या व्यक्तींपैकी सर्वांना किंवा त्यांपैकी कोणालाही तसेच विनियमपत्रे, हुंड्या आणि वचनचिठ्ठ्या यांतील पक्ष असलेल्यांना सुद्धा एकाच दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामील करून घेता येईल.

एकाच संविदेत दायी असणाऱ्या व अलग अलगपणे दायी असलेल्या पक्षकारांना सामील करून घेणे.

७. आपणास कोणत्या व्यक्तीकडून क्षतिपूरण मिळविण्याचा हक्क आहे याविषयी वादीला शंका असेल तेव्हा, तो दोन किंवा अधिक प्रतिवादींना सामील करून घेऊ शकेल, त्यायोगे त्या प्रतिवादींपैकी कोण आणि किती मर्यादेपर्यंत दायी आहे ते सर्व पक्षकारांपुरते आपसात ठरवता येईल.

क्षतिपूरण कोणाकडून करवून घ्यावे याविषयी वादीला शंका असेल तेव्हा.

[१][८. (१) एका दाव्यामध्ये सारखाच हितसंबंध असणाऱ्या अनेक व्यक्ती असतील त्याबाबतीत,—

(क) अशा व्यक्तींपैकी एका किंवा अधिक व्यक्तींना न्यायालयाच्या परवानगीने याप्रमाणे हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींच्या वतीने किंवा त्यांच्या लाभार्थ दावा दाखल करता येईल, किंवा त्यांच्याविरुद्ध दावा दाखल केला जाऊ शकेल, अथवा अशा दाव्यामध्ये त्यांना बचाव करता येईल.

(ख) अशा व्यक्तींपैकी एका किंवा अधिक व्यक्तींनी याप्रमाणे हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींच्या वतीने किंवा त्यांच्या लाभार्थ दावा दाखल करावा किंवा त्यांच्याविरुद्ध दावा दाखल केला जावा अथवा अशा दाव्यात त्यांनी बचाव करावा असा निदेश न्यायालयास देता येईल.

[१][(१) एका दाव्यामध्ये सारखाच हितसंबंध असणाऱ्या अनेक व्यक्ती असतील त्याबाबतीत, अशा व्यक्तींपैकी एका किंवा अधिक व्यक्तींना न्यायालयाच्या परवानगीने, याप्रमाणे हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींच्या वतीने किंवा त्यांच्या लाभार्थ दावा दाखल करता येईल किंवा त्यांच्याविरुद्ध दावा दाखल केला जाऊ शकेल अथवा अशा दाव्यामध्ये त्यांना बचाव करता येईल. समुचित प्रकरणांमध्ये, अशा व्यक्तींपैकी एका किंवा अधिक व्यक्तींनी, याप्रमाणे हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींच्या वतीने किंवा त्यांच्या लाभार्थ दावा दाखल करावा किंवा त्यांच्याविरुद्ध दावा दाखल केला जावा किंवा अशा दाव्यात त्यांनी बचाव करावा, असा निदेश न्यायालयास देता येईल. पण, अशा प्रकरणांमध्ये न्यायालय अशा सर्व व्यक्तींना एकतर व्यक्तिशः नोटीस बजावून किंवा व्यक्तींच्या संख्येमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव अशाप्रकारे नोटीस बजावणे, वाजवी रीत्या व्यवहार्य नसेल तर, न्यायालय, प्रत्येक प्रकरणी निदेश देईल त्यानुसार सार्वजनिक जाहिरात देऊन त्याद्वारे दावा दाखल केला असल्याची नोटीस वादीच्या खर्चाने देईल.]

[सोबतील पृष्ठावर पुन्हा उद्धृत केलेल्या सन १९७६ च्या केंद्रीय अधिनियम १०४ च्या कलम ९७ चे पोटकलम (१) पहावे.]

एकाच हितसंबंधार्थ सर्वांच्या वतीने एका व्यक्तीस दावा दाखल करता येईल किंवा बचाव करता येईल.

(२) पोटनियम (१) खाली परवानगी किंवा निदेश दिलेला असेल अशा प्रत्येक प्रकरणी या प्रमाणे हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींना एकतर व्यक्तिशः नोटीस बजावून अथवा व्यक्तींच्या संख्येमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव अशा प्रकारे नोटीस बजावणे वाजवीरीत्या व्यवहार्य नसेल तर, न्यायालय अशा प्रत्येक प्रकरणी निदेश देईल त्यानुसार सार्वजनिक जाहिरात देऊन न्यायालयाने दावा दाखल करण्यात आल्याची नोटीस वादीच्या खर्चाने दिली पाहिजे.

(३) पोटनियम (१) खाली ज्या व्यक्तीच्या वतीने किंवा जिच्या लाभार्थ दावा दाखल करण्यात आला असेल किंवा बचाव देण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशा दाव्यामध्ये आपल्याला पक्षकार करण्यात यावे, असा अर्ज न्यायालयाकडे करता येईल.

(४) अशा प्रकारे हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींना न्यायालयाने वादीच्या खर्चाने पोटनियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने नोटीस दिल्याखेरीज, आदेश तेवीस मधील नियम १ च्या पोटनियम (१) खाली अशा कोणत्याही दाव्यामधील हक्कमागणीचा कोणताही भाग सोडून देण्यात येणार नाही व त्यातील पोटनियम (३) खाली असा कोणताही दावा मागे घेण्यात येणार नाही, आणि त्या आदेशातील नियम ३ खाली अशा कोणत्याही दाव्यामध्ये कोणताही करार, तडजोड किंवा पूर्ती झाल्याची नोंद करण्यात येणार नाही.

(५) अशा कोणत्याही दाव्यामध्ये दावा दाखल करणाऱ्या किंवा दाव्यात बचाव देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने दाव्याच्या किंवा बचावाच्या कामी यथायोग्य तत्परता दाखवली नाही तर त्या बाबतीत, न्यायालयास त्या दाव्यामध्ये तसाच हितसंबंध असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीला त्या व्यक्तीच्या जागी नेमता येईल.

(६) या नियमाखालील दाव्यामध्ये काढलेला हुकूमनामा ज्यांच्या वतीने किंवा ज्यांच्या लाभार्थ दावा दाखल करण्यात आला असेल किंवा, प्रकरणपरत्वे, दाव्यात बचाव देण्यात आला असेल, अशा सर्व व्यक्तींवर बंधनकारक असेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ५२(चार) अन्वये बदलीदाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड १ द्वारे बदलीदाखल करण्यात आले.

स्पष्टीकरण.—ज्या व्यक्ती दावा दाखल करतील किंवा ज्यांच्या विरुद्ध दावा दाखल करण्यात येईल अथवा ज्या व्यक्ती दाव्यात बचाव देतील, अशा व्यक्तींचा एखाद्या दाव्यामध्ये सारखाच हितसंबंध आहे किंवा कसे हे निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ ज्यांच्यावतीने किंवा ज्यांच्या लाभार्थ ते दावा दाखल करतील किंवा ज्यांच्याविरुद्ध दावा दाखल केला गेला असेल किंवा, प्रकरणपरत्वे, त्या दाव्यामध्ये बचाव देण्यात आला असेल, त्या व्यक्तीप्रमाणेच याही व्यक्तींना तेच वादकारण आहे हे शाबीत करण्याची आवश्यकता नाही.]

[1][८क. एखाद्या दाव्याची संपरीक्षा करताना जो प्रश्न दाव्यामध्ये प्रत्यक्षपणे व सारतः वादग्रस्त आहे अशा कोणत्याही कायद्देविषयक प्रश्नामध्ये एखादी व्यक्ती किंवा व्यक्तींचा संस्था संबंधित आहे आणि त्या कायदेविषयक प्रश्नावर त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या संस्थेला आपले मत मांडण्याची परवानगी देणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. याबद्दल न्यायालयाची खात्री पटल्यास, न्यायालयास त्या व्यक्तीला किंवा त्या व्यक्तींच्या संस्थेला असे मत मांडण्यास आणि न्यायालय विनिर्दिष्ट करील अशा प्रकारे दाव्यातील कार्यवाहीमध्ये भाग घेण्यास परवानगी देता येईल.] एखाद्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या संस्थेला मत मांडण्यास किंवा कार्यवाहीत भाग घेण्यास परवानगी देण्याची न्यायालयाची शक्ती.

९. पक्षकारांचे अपसंयोजन किंवा असंयोजन या कारणामुळे कोणताही दावा विफल होता कामा नये आणि न्यायालयास प्रत्येक दाव्यामध्ये त्याच्यासमोर प्रत्यक्ष असलेल्या पक्षकाराचे हक्क व हितसंबंध यांचा संबंध असेल तेथवर, या विवाद्य बाबींचा परामर्श घेता येईल; अपसंयोजन व असंयोजन.

[2][परंतु, या नियमातील कोणतीही गोष्ट आवश्यक पक्षकाराच्या असंयोजनास लागू होणार नाही.]

१०. (१) वादी म्हणून एखाद्या चुकीच्या व्यक्तीच्या नावे दावा दाखल करण्यात आला असेल त्या बाबतीत किंवा योग्य वादीच्या नावे दावा दाखल करण्यात आला आहे किंवा कसे याबद्दल शंका असेल त्याबाबतीत दावा दाखल करताना प्रामाणिक चूक झालेली आहे, आणि दाव्यातील खऱ्या वाद-विषयाचा निर्णय करण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे, याबद्दल न्यायालयाची खात्री पटल्यास, न्यायालयास दाव्याच्या कोणत्याही टप्प्याला, स्वतःला न्याय्य वाटतील अशा अटींवर, अन्य कोणत्याही व्यक्तीला मूळच्या वादीऐवजी किंवा जादा वादी म्हणून सामील करून घेण्याचा आदेश देता येईल. चुकीच्या वादीच्या नावे दावा.

(२) कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षकाराकडून आलेल्या अर्जावरून किंवा तसा अर्ज आला नसतानाही आणि न्यायालयास न्याय वाटतील अशा अटींवर वादी म्हणून किंवा प्रतिवादी म्हणून अयोग्यपणे सामील करून घेतलेल्या एखाद्या पक्षकाराचे नाव खोडून टाकण्यात यावे, आणि ज्या व्यक्तीला वादी म्हणून किंवा प्रतिवादी म्हणून सामील करून घ्यावयास हवे होते किंवा दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पूर्णपणे अभिनिर्णय करून ते निकालात काढणे न्यायालयाला शक्य होण्यासाठी ज्या व्यक्तीची न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असेल अशा कोणत्याही व्यक्तीचे नाव जादा दाखल करण्यात यावे असा आदेश न्यायालयास देता येईल. न्यायालय पक्षकारांची नावे खोडून टाकू शकेल किंवा जादा दाखल करू शकेल.

(३) कोणत्याही व्यक्तीला वादमित्राविना दावा लावणारा वादी म्हणून किंवा कोणत्याही प्रकारे निःसमर्थ असलेल्या वादीचा वादमित्र म्हणून तिच्या संमतीवाचून दाखल करून घेण्यात येणार नाही.

(४) एखाद्या प्रतिवादीला जादा दाखल करून घेण्यात आले असेल त्याबाबतीत न्यायालयाने अन्य आदेश दिला नाही तर, आवश्यक असेल अशा प्रकारे वादपत्रात दुरुस्ती करावी लागेल आणि समन्सच्या व वादपत्राच्या सुधारित प्रती नवीन प्रतिवादीवर आणि न्यायालयाला योग्य वाटल्यास, मूळ प्रतिवादीवर बजावण्यात येतील. प्रतिवादी जादा दाखल करून घेतल्यास वादपत्रात दुरुस्ती करणे.

(५) [3]भारतीय मुदत अधिनियम, १८७७, (१९८७ चा १५) कलम २२ च्या उपबंधांच्या अधीनतेने, प्रतिवादी म्हणून जादा दाखल करून घेतलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध होणारी कार्यवाही समन्स बजावल्यानंतरच सुरू झाल्याचे मानण्यात येईल.

[4][१०क. कोणत्याही दाव्यामधील अथवा कार्यवाहीमधील कोणत्याही वादग्रस्त बाबींवरील न्याया-लयाच्या निर्णयामुळे कोणत्याही हितसंबंधावर परिणाम होण्याची शक्यता असून, असा कोणताही हित-संबंध असणाऱ्या पक्षकाराचे प्रतिनिधित्व करणारा कोणीही वकील नसेल तर, न्यायालयास विवेकाधिकारा-नुसार कोणत्याही वकिलाला त्याने त्या हितसंबंधाविषयी आपल्याला उद्देशून वादकथन करावे अशी विनंती करता येईल.] एखाद्या वकिलाला आपल्याला उद्देशून वादकथन करावे अशी विनंती करण्याची न्यायालयाची शक्ती.

११. न्यायालयास त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीला [5][दावा] चालवण्यास सांगता येईल. दावा चालवणे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ५२, (पाच) अन्वये घालण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ५२(सहा) अन्वये जादा दाखल करण्यात आले.
३. पहा :—मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा अधिनियम क्र. ३६) कलम २१.
४. १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ५२ (सात) अन्वये समाविष्ट करण्यात आला.
५. सन १९७६ अधिनियम १०४ च्या कलम ५२ (आठ) अन्वये "दावा" हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

अनेक वादी किंवा प्रतिवादी यांच्यापैकी एकाची इतरांकरिता उपस्थिती.

१२. (१) एकापेक्षा अधिक प्रतिवादी असतील त्याबाबतीत, त्यांच्यापैकी एकाला किंवा अनेकांना अशा कोणत्याही कार्यवाहीला उपस्थित राहण्यास, वाद कथन करण्यास किंवा काम चावलण्यास प्राधिकृत करता येईल ; आणि त्याचप्रमाणे एकापेक्षा अधिक प्रतिवादी असतील त्या बाबतीत त्यांच्यापैकी एकाला किंवा अनेकांना, त्यांच्यापैकी इतर कोणालाही अशा कोणत्याही कार्यवाहीत उपस्थित राहण्यास, वाद कथन करण्यास किंवा काम चालवण्यास प्राधिकृत करता यईल.

(२) प्राधिकारपत्र लेखी असेल आणि ते देणाऱ्या पक्षकाराला स्वाक्षरित करावे लागेल व ते न्यायालयात दाखल करावे लागेल.

असंयोजन किंवा अपसंयोजन यासंबंधातील आक्षेप.

१३. पक्षकारांचे असंयोजन किंवा अपसंयोजन या कारणास्तव घ्यावयाचे सर्व आक्षेप लवकरात लवकरची संधी मिळेल तेव्हा व वादमुद्दे निश्चित होतील अशा सर्व प्रकरणी, अशा निश्चितीच्या वेळी किंवा तत्पूर्वी घ्यावे लागतील. मात्र आक्षेप कारण भागाहून उद्भवले असेल तर गोष्ट वेगळी आणि असा कोणताही आक्षेप याप्रमाणे न घेतल्यास तो सोडून देण्यात आला आहे, असे मानण्यात येईल.

आदेश दुसरा

दाव्याची रचना

दाव्याची रचना.

१. व्यवहार्थ होईल तेथपर्यंत, दाव्याची रचना अशाप्रकारे करण्यात येईल की, जेणेकरून विवाद्य विषयांवर अंतिम निर्णय होण्यास आधार मिळू शकेल आणि त्यासंबंधात आणखी कोर्ट-कचेऱ्या होणार नाहीत:

दाव्यामध्ये संपूर्ण हक्कमागणी समाविष्ट असणे.

२. (१) वादकारणाच्या संबंधात वादी जी हक्कमागणी करण्यास हक्कदार असेल ती संपूर्ण हक्कमागणी प्रत्येक दाव्यामध्ये समाविष्ट असली पाहिजे. पण दावा एखाद्या न्यायालयाच्या अधिकारिते-मध्ये आणण्यासाठी वादीस आपल्या हक्कमागणीचा कोणताही भाग सोडून देता येईल.

हक्कमागणीचा एखादा भाग सोडून देणे.

(२) जर वादीने आपल्या हक्कमागणीच्या एखाद्या भागाच्या संबंधात दावा लावण्यात कसूल केली किंवा तो भाग बुद्धिपुरःसर सोडून दिला तर त्याबाबतीत, अशा प्रकारे त्याने ज्या भागाच्या बाबतीत ती कसूर केली असेल किंवा जो भाग त्याने सोडून दिला असेल त्याच्या संबंधात त्यानंतर त्याला दावा दाखल करता येणार नाही.

अनेकांपैकी एखाद्या अनुतोषाकरता दावा दाखल करण्यात कसूर.

(३) एकाच वादकारणाच्या संबंधात एकापेक्षा अनेक अनुतोषाकरिता हक्कदार असलेल्या एखाद्या व्यक्तीस अशा सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही अनुतोषाकरिता दावा दाखल करता येईल; पण न्यायालयाची परवानगी घेतली असल्यास तेवढी बाब वगळून एरव्ही, त्याने अशा सर्व अनुतोषांकरिता दावा लावण्यात कसूर केल्यास अशा प्रकारे कसूर केलेल्या कोणत्याही अनुतोषासाठी त्यानंतर त्याला दावा दाखल करता येणार नाही.

स्पष्टीकरण.—या नियमाच्या प्रयोजनार्थ, एखादे आबंधन आणि त्याच्या पालनार्थ असलेली सांपार्श्विक प्रतिभूती व त्याच आबंधनातून उद्भवणाऱ्या अनुवर्ती हक्कमागण्या या अनुक्रमे एकच वादकारण गठित करतात असे मानण्यात येईल.

उदाहरण

'क' एक घर 'ख' ला वर्षाला १,२०० रुपये इतक्या भाड्याने देतो. १९०५, १९०६ व १९०७ या संपूर्ण वर्षाचे भाडे देय असून, चुकते झालेले नाही. १९०८ साली 'क' हा १९०६ सालच्या येणे भाड्याकरता 'ख' विरुद्ध दावा दाखल करतो. १९०५ किंवा १९०७ सालच्या येणे भाड्याकरता 'क' ला मागाहून 'ख' विरुद्ध दावा दाखल करता येणार नाही.

वादकारणांचे संयोजन.

३. (१) अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, वादी एकाच प्रतिवादीच्या किंवा त्याच संयुक्त प्रतिवादीच्या विरुद्ध निरनिराळी वादकारणे एकाच दाव्यात एकत्र करू शकेल ; आणि कोणत्याही वादींना ज्यामध्ये प्रतिवादीच्या विरुद्ध किंवा त्याच संयुक्त प्रतिवादीच्या विरुद्ध ते संयुक्तपणे हितसंबंधित असतील अशी वादकारणे एकाच दाव्यात एकत्र करता येतील.

(२) वादकारणे एकत्रित करण्यात आली असतील त्या बाबतीत, दाव्याच्या संबंधातील न्यायालयाची अधिकारिता ही दावा सुरू करण्याच्या तारखेस दाव्याच्या एकूण विषयवस्तूच्या रकमेवर किंवा मूल्यावर अवलंबून राहील.

केवळ स्थावर मालमता परत मिळविण्यासाठी विवक्षित हक्कमागण्या एकत्रित करणे.

४. स्थावर मालमत्ता परत मिळविण्यासाठी दावा दाखल केला असता,—

(क) मागणी केलेल्या मालमत्तेचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे दरम्यानचे नफे किंवा भाड्याची थकबाकी यांसाठी करावयाच्या हक्कमागण्या ;

(ख) ज्या कोणत्याही संविदेअन्वये मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग धारण करण्यात आला असेल अशा कोणत्याही संविदेच्या भंगादद्दल नुकसानी मिळविण्यासाठी करावयाच्या हक्कमागण्या ; आणि

(ग) ज्या हक्कमागण्यामध्ये मागितलेला अनुतोष त्याच वादकारणावर आधारित असेल अशा हक्कमागण्या,

यांव्यतिरिक्त कोणतेही वादकारण न्यायालयाच्या परवानगीशिवाय अशा दाव्यामध्ये सामील करता येणार नाही :

परंतु, पुरोबंधासाठी किंवा विमोचनासाठी लावलेल्या दाव्यातील कोणत्याही पक्षकाराला आपणास गहाण मालमत्तेचा कब्जा मिळावा अशी मागणी करण्यास या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही.

निष्पादक, प्रशासक किंवा वारसदार यांनी किंवा त्यांच्या विरुद्ध केलेल्या हक्कमागण्या.

५. निष्पादक, प्रशासक किंवा वारसदार या नात्याने त्याने किंवा त्याच्याविरुद्ध केलेली कोणतीही हक्कमागणी त्याने किंवा त्याच्याविरुद्ध वैयक्तिक नात्याने केलेल्या हक्कमागण्यांच्या जोडीला एकत्रित करता येणार नाही. मात्र नंतर उल्लेखिलेल्या हक्कमागण्या निष्पादक, प्रशासक किंवा वारसदार म्हणून ज्या संपदेविरुद्ध वादीने दावा लावला असेल किंवा प्रतिवादीविरुद्ध दावा गुदरण्यात आला असेल त्या संपदेच्या संबंधात त्या उद्भवल्या असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल अथवा ज्या मयत व्यक्तीचे तो प्रतिनिधित्व करीत आहे त्या व्यक्तीच्या समवेत संयुक्तपणे तो हक्कदार होता अथवा दायी होता अशा स्वरूपाच्या त्या असतील तर गोष्ट वेगळी.

वेगवेगळ्या संपरीक्षा करण्याचा आदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.

[१][६. एका दाव्यात वादकारणांच्या संयोजनामुळे संपरीक्षेमध्ये अडचण उद्भवेल किंवा त्याकामी विलंब होईल असे न्यायालयास वाटले तर, न्यायालयास वेगवेगळ्या संपरीक्षा करण्याचा आदेश देता येईल किंवा न्यायाच्या हिताच्या दृष्टीने समयोचित असेल असा अन्य आदेश देता येईल].

अपसंयोजनाच्या संबंधातील हरकती.

७. वादकारणांच्या अपसंयोजनाच्या कारणावरून घ्यावयाचे सर्व आक्षेप लवकरात लवकरची संधी मिळेल तेव्हा घेतले पाहिजेत आणि असे वादमुद्दे निश्चित होतील अशा सर्व प्रकरणी ते त्याप्रमाणे निश्चित होण्याच्या वेळी किंवा तत्पूर्वी घ्यावे लागतील. मात्र आक्षेपाचे कारण मागाहून उद्भवलेले असेल तर गोष्ट वेगळी आणि अशा प्रकारे न घेतलेला कोणताही आक्षेप सोडून दिला असल्याचे मानण्यात येईल.

आदेश तिसरा

मान्यताप्राप्त अभिकर्ते व प्लीडर

उपस्थिती, इत्यादी, व्यक्तिशः किंवा मान्यताप्राप्त अभिकर्त्यामार्फत किंवा प्लीडरमार्फत होऊ शकते.

१. पक्षकाराने कोणत्याही न्यायालयात उपस्थित होणे, त्याकडे अर्ज करणे किंवा तेथे कोणतीही कृती करणे हे कायद्याने आवश्यक किंवा प्राधिकृत असेल तेव्हा, पक्षकाराची अशा न्यायालयामधील उपस्थिती, त्याने करावयाचा अर्ज किंवा कृती, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये स्पष्टपणे अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे सोडून एरव्ही, पक्षकाराला जातीने किंवा त्याच्यावतीने, [२][उपस्थित राहणाऱ्या, अर्ज करणाऱ्या किंवा, प्रकरणपरत्वे, कृती करणाऱ्या] त्याच्या मान्यताप्राप्त अभिकर्त्यामार्फत किंवा प्लीडरमार्फत करता येईल :

परंतु, न्यायालयाने तसा निदेश दिल्यास, त्या पक्षकाराला याबाबतीत जातीने उपस्थित रहावे लागेल.

मान्यताप्राप्त अभिकर्ते.

२. अशी उपस्थिती, अर्ज किंवा कृती ज्यांच्यामार्फत करता येईल असे पक्षकारांचे मान्यताप्राप्त अभिकर्ते म्हणजे पुढील व्यक्ती असतील,—

(क) अशा पक्षकारांच्या वतीने उपस्थित राहण्यास, अर्ज किंवा कृती करण्यास प्राधिकृत करणारे मुख्त्यारनामे धारण करणाऱ्या व्यक्ती;

(ख) केवळ व्यापार किंवा धंदा यांच्याशी निगडित असलेल्या अशाच कामामध्ये अशा प्रकारे उपस्थित राहण्यास, अर्ज किंवा कृती करण्यास अन्य कोणत्याही अभिकर्त्याला स्पष्टपणे प्राधिकृत करण्यात आलेले नसेल तर त्याबाबतीत, अशी उपस्थिती, अर्ज किंवा कृती न्यायालयाच्या अधिकारितेच्या ज्या स्थानिक मर्यादांमध्ये करावयाची असेल, त्या मर्यादांमध्ये न राहणाऱ्या व्यक्तींकरिता आणि त्यांच्या नावाने असा व्यापार किंवा धंदा चालवणाऱ्या व्यक्ती.

मान्यताप्राप्त अभिकर्त्यावर आदेशिका बजावणे.

३. (१) पक्षकाराच्या मान्यताप्राप्त अभिकर्त्यावर बजावलेली आदेशिका, न्यायालयाने अन्यथा आदेश दिलेला नसेल तर, ती व्यक्तिशः त्या पक्षकारावर बजावण्यात आलेली असली त्याप्रमाणे परिणामक असेल.

(२) दाव्यातील पक्षकारावर आदेशिका बजावण्यासंबंधीचे उपबंध त्यांच्या अभिकर्त्यावरील आदेशिकेच्या बजावणीस लागू होतील.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ५३ द्वारे नियम ६ ऐवजी घातले. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. सन १९२६ चा अधिनियम २२, कलम २ द्वारे "कृती करण्यासाठी योग्य रीत्या नेमणूक केलेल्या" याऐवजी बदली दाखल करण्यात आले.

प्लीडरची नेमणूक.

[१][४. (१) एखाद्या व्यक्तीकरिता काम चालवण्यासाठी अशा व्यक्तीने किंवा तिच्या मान्यताप्राप्त अभिकर्त्याने किंवा अशी नेमणूक करण्यास मुख्यत्यारनाम्याद्वारे अगर त्याखाली प्राधिकृत झालेल्या अन्य एखाद्या व्यक्तीने सही केलेल्या दस्तऐवजाद्वारे नेमणूक झाली असल्याशिवाय, कोणत्याही प्लीडरने कोणत्याही न्यायालयात एखाद्या व्यक्तीसाठी याप्रमाणे काम चालवता कामा नये.

(२) असे प्रत्येक नेमणूकपत्र [२][न्यायालयात दाखल करावे लागेल आणि पोटनियम (१) च्या प्रयोजनार्थ,] ही नेमणूक अशिलाने किंवा, प्रकरणपरत्वे, प्लीडरने स्वाक्षरी केलेल्या आणि न्यायालयात दाखल केलेल्या लेखाद्वारे न्यायालयाच्या परवानगीने समाप्त करण्यात येईपर्यंत अथवा अशील किंवा प्लीडर मृत्यू पावेतोपर्यंत अथवा दाव्यामधील सर्व कार्यवाही अशिलापुरती समाप्त होईपर्यंत अंमलात असल्याचे मानण्यात येईल.

[३][स्पष्टीकरण.—या पोटनियमाच्या प्रयोजनार्थ, पुढील गोष्टी या दाव्यामधील कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल :—

(क) दाव्यातील हुकूमनामा अथवा आदेश याच्या पुनर्विलोकनासाठी केलेला अर्ज;

(ख) दाव्यामध्ये केलेला कोणताही हुकूमनामा अथवा आदेश याच्या संबंधात या संहितेच्या कलम १४४ खालील किंवा कलम १५२ खालील अर्ज;

(ग) दाव्यातील कोणताही हुकूमनामा किंवा आदेश यांच्याविरुद्ध केलेले अपील; आणि

(घ) दाव्यामध्ये हजर केलेल्या किंवा दाखल केलेल्या दस्तऐवजाच्या प्रती मिळवण्यासाठी किंवा ते दस्तऐवज परत मिळवण्यासाठी किंवा दाव्याच्या संबंधात न्यायालयामध्ये भरलेले पैसे परत मिळवण्यासाठी केलेला कोणताही अर्ज किंवा कृती.

[४][(३) पोटनियम (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे,—

(क) प्लीडर व त्याचे अशील यांच्यापुरती, त्या प्लीडरची नेमणूक जितक्या कालावधीकरिता आहे तो कालावधी वाढतो; किंवा

(ख) प्लीडरला ज्या न्यायालयाकरिता नेमण्यात आले असेल त्या न्यायालयाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही न्यायालयाने काढलेली कोणतीही नोटीस अथवा दस्तऐवज यांची प्लीडरवर बजावणी करण्यास पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजामध्ये अशिलाने स्पष्ट संमती दिली असल्याखेरीज, अशी बजावणी प्राधिकृत होते,

असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.]

[५][(३) वरील पोटनियम (२) च्या प्रयोजनार्थ (एक) या संहितेतील कलमे २३, २४ किंवा २५ यां अनुसार हस्तांतरणासाठी केलेला अर्ज किंवा कार्यवाही, (दोन) या संहितेतील नवव्या आदेशातील नियम ९ किंवा नियम १३ अनुसार केलेला अर्ज, (तीन) या संहितेतील अडतिसाव्या आदेशामधील नियम ४ अनुसार केलेला अर्ज, (चार) न्यायनिर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी केलेला अर्ज, (पाच) या संहितेतील कलम १५२ अनुसार केलेला अर्ज, (सहा) दाव्यामुळे किंवा दाव्यामधून उद्भवणारा निर्देश, (सात) दाव्यामधील किंवा अपिलातील हुकूमनामा किंवा आदेश किंवा अभिलेख यामध्ये सुधारणा करण्यासाठी अर्ज किंवा दाव्यामुळे किंवा दाव्यामधून उद्भवणारे अपील, निर्देश किंवा पुनरीक्षण, (आठ) दाव्यामधील कोणताही हुकूमनामा किंवा आदेश यांची अंमल-बजावणी करण्यासाठीचा अर्ज, (नऊ) या संहितेतील कलम १४४ अनुसार केलेला अर्ज, (दहा) दाव्यामधील हुकूमनामा किंवा आदेश यासंबंधाने कोणतेही अपील (उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटन्ट खालील अपिलाखेरीज) किंवा पुनरीक्षण अर्ज किंवा दाव्यामुळे किंवा दाव्यामधून उद्भवणारे अपील, (अकरा) अशा अपिलांच्या किंवा पुनर्विलोकना-साठी संबंधातील किंवा त्यांच्याशी आनुषंगिक असे किंवा त्यातून किंवा त्याकरता उद्भवणारे कोणतेही अर्ज किंवा दाव्यामुळे किंवा दाव्यामधून उद्भवणारा निर्देश (उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटन्टनुसार अपील करण्याची परवानगी मागणारा अर्ज किंवा सर्वोच्च

---

१. सन १९२६चा अधिनियम २२, कलम २ द्वारे मूळच्या नियम ४ ऐवजी बदली दाखल करण्यात आले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५४(एक) (क) (एक) द्वारे "न्यायालयात दाखल करावे लागेल" याऐवजी बदली दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या, कलम ५४ (एक) (क) (दोन) द्वारे जादा दाखल करण्यात आले.

४. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५४ (एक) (ख) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

५. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ४ ऑगस्ट, १९७२, सुधारणा क्रमांक १ द्वारे बदली दाखल करण्यात आले.

न्यायालयाकडे अपील करण्याची परवानगी मागणारा अर्ज, यासहित), (बारा) कोणत्याही दाव्याच्या किंवा यांत यापूर्वी उल्लेखिलेल्या कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ च्या प्रकरण पस्तीस अनुसार खटला चालविण्यास मंजुरीसाठी केलेला अर्ज किंवा कार्यवाही किंवा अशा अर्जाच्या किंवा कार्यवाहीच्या संबंधात काढलेल्या कोणत्याही आदेशामुळे किंवा त्यामधून उद्भवणारे कोणतेही अपील किंवा पुनरीक्षण, (तेरा) दाव्यामध्ये किंवा यात यापूर्वी उल्लेखिलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये सादर केलेल्या किंवा दाखल केलेल्या दस्तऐवजांच्या प्रती मिळविण्यासाठी किंवा दस्तऐवज परत मिळण्यासाठी केलेला कोणताही अर्ज किंवा कोणतीही कृती, (चौदा) दाव्याच्या किंवा यापूर्वी उल्लेखिलेल्या कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात (सर्वोच्च न्यायालयाकडे केलेल्या अपिलाचा अनुलिपी अभिलेख तयार करणे, तो मुद्रित करून घेणे आणि तो पुढे पाठविणे यासंबंधीच्या खर्चासाठी किंवा खर्चाचा समावेश करण्यासाठी, तारण म्हणून रक्कम ठेवणे किंवा अशा रकमेतून रक्कम काढून घेणे, परतावा देणे किंवा प्रदान करणे यांसहित) न्यायालयाकडे भरणा केलेली किंवा ठेव म्हणून ठेवलेली रक्कम काढण्यासाठी किंवा तिचा परतावा मिळण्यासाठी किंवा या रकमेतून प्रदान करण्यासाठी केलेला कोणताही अर्ज, (पंधरा) दाव्यामध्ये किंवा दाव्यामुळे किंवा दाव्यामधून उद्भवणाऱ्या कोणत्याही अपिलामध्ये, पुनरीक्षणामध्ये, निर्देशामध्ये किंवा पुनर्विलोकनामध्ये दिलेल्या न्याय-निर्णयाच्या अभिलेखावर किंवा त्यामध्ये दिलेला कोणताही शेरा किंवा अभिप्राय काढून टाकण्यासाठी केलेला कोणताही अर्ज, (सोळा) दाव्यामधून उद्भवणाऱ्या, सर्वोच्च न्यायालयाकडे केलेल्या अपिलामध्ये, वारस बदलण्यासंबंधीच्या प्रमाणपत्रासाठी केलेला कोणताही अर्ज, आणि (सतरा) या संहितेतील आदेश पंचेचाळीस मधील नियम १५ अनुसार केलेला कोणताही अर्ज, हे या दाव्यातील कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल :

[परंतु, दाव्याचे किंवा कार्यवाहीचे ठिकाण एका न्यायालयातून दुसऱ्या (दुय्यम किंवा अन्य) न्यायालयाकडे बदली करण्यात येते त्याबाबतीत, पूर्वीच्या न्यायालयामध्ये पोटनियम (२) मध्ये निर्देशिलेले नेमणूकपत्र दाखल करणारा प्लीडर, त्याला त्याच्या अशिलाकडून दुसऱ्या न्यायालयात उपस्थित होण्याची, काम चालवण्याची आणि युक्तिवाद करण्याची सूचना देण्यात आली आहे, असे सूचित करणारे आपल्या सहीचे शपथ त्याने दाखल केल्याखेरीज किंवा यापूर्वीच दाखल केलेले असल्याखेरीज, तो दुसऱ्या न्यायालयात उपस्थित होण्यास, काम चालवण्यास किंवा युक्तिवाद करण्यास बांधील असणार नाही.]

(४) उच्च न्यायालय, सर्वसाधारण आदेशाद्वारे असे निर्देशित करू शकेल की, ज्या व्यक्तीने प्लीडरची नेमणूक केली आहे, ती व्यक्ती आपले नाव लिहिण्यास असमर्थ असेल त्याबाबतीत, प्लीडरची नेमणूक करणाऱ्या दस्तऐवजावरील तिची निशाणी आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा व्यक्तीकडून व अशा रीतीने साक्षांकित करण्यात येईल.

(५) केवळ युक्तिवादाच्या प्रयोजनार्थ नेमलेल्या कोणत्याही प्लीडरला, त्याने स्वाक्षरित केलेले—

(क) दाव्यातील पक्षकारांची नावे,

(ख) ज्या पक्षकाराकरिता तो उपस्थित राहणार असेल त्याचे नाव आणि

(ग) उपस्थित राहण्यासाठी ज्या व्यक्तीने त्याला प्राधिकृत केले असेल, त्या व्यक्तीचे नाव,–

नमूद करणारे उपस्थितिपत्र न्यायालयामध्ये दाखल केल्याखेरीज कोणत्याही पक्षकाराच्यावतीने युक्तिवाद करता येणार नाही :

परंतु, ज्या प्लीडरला एखाद्या पक्षकाराच्या वतीने न्यायालयात काम चालवण्यासाठी रीतसर नेमलेल्या अन्य कोणत्याही प्लीडरने, अशा पक्षकाराच्यावतीने काम चालवण्याकरिता नेमलेले असेल अशा कोणत्याही प्लीडरला या पोटनियमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

प्लीडरवर आदेशिका बजावणे.

५. [१][कोणत्याही पक्षकाराकरिता न्यायालयामध्ये काम चालवण्यासाठी रीतसर नेमलेल्या प्लीडरवर बजावलेली] किंवा अशा प्लीडरच्या कार्यालयात अगर त्याच्या नेहमीच्या निवासस्थानी दिलेली [कोणतीही आदेशिका] मग ती पक्षकाराने व्यक्तिशः उपस्थित राहण्यासाठी असो वा नसो, प्लीडर ज्या पक्षकारांचे प्रतिनिधित्व करीत असेल त्या पक्षकाराला रीतसर कळवली असल्याचे व विदित केली असल्याचे गृहीत धरण्यात येईल व न्यायालयाने अन्य निदेश दिला नसेल तर, ती त्या पक्षकाराला व्यक्तिशः दिलेली किंवा बजावलेली असावी, त्याप्रमाणे सर्व प्रयोजनार्थ परिणामक असेल.

[१][५. कोणत्याही पक्षकाराकरिता काम चालवण्यासाठी नेमलेल्या प्लीडरवर बजावलेली किंवा अशा प्लीडरच्या कार्यालयात किंवा त्याच्या नेहमीच्या निवासस्थानी दिलेली आदेशिका मग ती पक्षकाराने व्यक्तिशः उपस्थित राहण्यासाठी असो किंवा नसो, प्लीडर ज्या पक्षकारांचे प्रतिनिधित्व करीत असेल त्या पक्षकाराला रीतसर कळवली असल्याचे व विदित केली असल्याचे मानण्यात येईल व न्यायालयाने अन्य निदेश दिला नसेल तर, ती त्या पक्षकाराला व्यक्तिशः दिलेली किंवा त्याच्यावर बजावलेली असावी, त्याप्रमाणे सर्व प्रयोजनार्थ परिणामक असेल.] **प्लीडरवर आदेशिका बजावणे.**

बजावणी स्वीकारण्यासाठी अभिकर्ता.

६. (१) नियम २ मध्ये वर्णन केलेल्या मान्यताप्राप्त अभिकर्त्यांव्यतिरिक्त न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची, आदेशिकेची बजावणी स्वीकारण्याकरिता अभिकर्ता म्हणून नेमणूक करता येईल.

नेमणूक लेखी असावी व ती न्यायालयात दाखल करावी.

(२) अशी नेमणूक सर्वसाधारण किंवा विशेष असू शकेल व ती प्रकर्त्याने स्वाक्षरित केलेल्या लेखी संलेखाद्वारे करावी लागेल व असा संलेख किंवा नेमणूक सर्वसाधारण असेल तर, त्याची प्रमाणित प्रत न्यायालयात दाखल करावी लागेल.

न्यायालय, आपल्या अधिकारितेमध्ये, बजावणी स्वीकारण्यासाठी अभिकर्त्याची नेमणूक करण्याचा आदेश देऊ शकेल.

[२][(३) दाव्यामधील ज्या कोणत्याही पक्षकाराचा, न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये राहणारा मान्यताप्राप्त अभिकर्ता नसेल किंवा त्याच्यावतीने न्यायालयात कामकाज करण्यास यथोचितरीत्या नेमणूक केलेला असा प्लीडर नसेल, अशा पक्षकारास न्यायालय आदेशाद्वारे, त्याच्यावतीने आदेशिकेची बजावणी स्वीकारण्यासाठी, न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये राहणाऱ्या एखाद्या अभिकर्त्याची नेमणूक (पक्षकाराने) विनिर्दिष्ट कालावधीमध्ये करावी, असा आदेश दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये देऊ शकेल.]

[२][(३) दाव्यामधील ज्या कोणत्याही पक्षकाराचा, न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये राहणारा मान्यताप्राप्त अभिकर्ता नसेल किंवा त्याच्यावतीने न्यायालयात कामकाज करण्यास यथोचितरीत्या नेमणूक केलेला असा प्लीडर नसेल, अशा पक्षकारास न्यायालय, आदेशाद्वारे, त्याच्यावतीने आदेशिकेची बजावणी स्वीकारण्यासाठी न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये राहणाऱ्या एखाद्या अभिकर्त्याची नेमणूक (पक्षकाराने) विनिर्दिष्ट कालावधीमध्ये करावी, असा आदेश दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये देऊ शकेल.] **न्यायालय आपल्या अधिकारितेमध्ये बजावणी स्वीकारण्यासाठी अभिकर्त्याची नेमणूक करण्याचा आदेश देऊ शकेल.**

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५४ (दोन) द्वारे "कोणत्याही पक्षकाराच्या प्लीडरवर बजावण्यात आलेली कोणतीही आदेशिका" याऐवजी बदली दाखल करण्यात आले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५४ (तीन) द्वारे जादा दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ३ द्वारे बदली दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ४ द्वारे जादा दाखल करण्यात आले.

आदेश चौथा

दावे दाखल करणे

दावा वादपत्राद्वारे सुरू करणे.

१. (१) प्रत्येक दावा न्यायालयाकडे किंवा याबाबतीत ते नेमील अशा अधिकाऱ्याकडे वादपत्र सादर करून दाखल केला पाहिजे.

(२) आदेश सहा व सात यांमध्ये अंतर्भूत असलेले नियम जेथवर लागू होत असतील तेथवर, प्रत्येक वादपत्र त्यानुसार केले पाहिजे.

[१][१. (१) (क) प्रत्येक दावा न्यायालयाकडे किंवा याबाबतीत ते नेमील अशा अधिकाऱ्याकडे वादपत्र सादर करून दाखल केला पाहिजे. दावा वादपत्राद्वारे सुरू करणे.

(ख) वादीने, मुंबई शहर दिवाणी न्यायालय वगळून अन्यत्र, प्रतिवादींवर समन्स बजावता यावे म्हणून जेवढे प्रतिवादी असतील तेवढ्या वादपत्राच्या व जोडपत्रांच्या, कोऱ्या कागदावरील सत्य प्रती दाखल केल्या पाहिजेत; मात्र वादपत्राचा विस्तार किंवा प्रतिवादींची संख्या या कारणामुळे किंवा अन्य कोणत्याही पुरेशा कारणामुळे न्यायालय, केलेल्या दाव्याच्या अथवा दाव्यामध्ये मागितलेल्या अनुतोषाच्या स्वरूपाबद्दल तेवढीच संक्षिप्त निवेदने प्रस्तुत करण्याची वादीला परवानगी देईल तर ती गोष्ट वेगळी; मग अशा प्रकरणी तो अशी निवेदने प्रस्तुत करील. अशा प्रती किंवा निवेदने वादपत्राबरोबरच दाखल केली पाहिजेत. मात्र सबळ असे कारण दाखविल्यानंतर न्यायालयाने त्या प्रती किंवा निवेदने दाखल करण्यास मुदत दिल्यास गोष्ट वेगळी.

(२) वादीने प्रतिनिधी म्हणून हा दावा दाखल केल्यास किंवा प्रतिवादीवर अथवा प्रतिवादींपैकी कोणत्याही प्रतिवादीवर प्रतिनिधी म्हणून दावा दाखल केला गेल्यास अशा निवेदनामध्ये वादीने कोणत्या नात्याने दावा दाखल केला किंवा प्रतिवादीवर कोणत्या नात्याने दावा दाखल करण्यात आला ते नमूद केले पाहिजे.

(३) वादीस, न्यायालयाच्या परवानगीने, अशी निवेदने वादपत्राशी मिळतीजुळती होतील अशा प्रकारे त्यामध्ये सुधारणा करता येईल.

(४) प्रतिवादीवर समन्स बजावण्यासाठी आकारावयाची फी वादपत्र दाखल केल्यानंतर किंवा न्यायालयाकडून वाढवण्यात येईल अशा मुदतीत भरली पाहिजे.

(५) प्रत्येक वादपत्रामध्ये आदेश सहा व सात यामध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांचे पालन केले पाहिजे.]

दाव्यांची नोंदवही.

२. प्रत्येक दाव्याचा तपशील नोंदण्यासाठी ठेवावयाच्या व दिवाणी दाव्यांची नोंदवही म्हणून संबोधल्या जाणाऱ्या नोंदपुस्तकामध्ये न्यायालयाने प्रत्येक दाव्याचा तपशील नोंदण्याची व्यवस्था केली पाहिजे व वादपत्रे ज्या क्रमाने स्वीकारण्यात येतील त्यानुसार प्रत्येक दाव्याच्या अशा नोंदींना क्रमांक दिले पाहिजेत.

आदेश पाचवा

समन्स काढणे व बजावणे

समन्स काढणे.

समन्स.

१. (१) दावा रीतसर दाखल करण्यात आला असेल तेव्हा, प्रतिवादीवर समन्स काढून त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी उपस्थित होऊन दाव्यातील हक्कमागणीचा जाब द्यावा, यासाठी याला बोलावता येईल :

---

१ मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पो-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ अन्वये दाखल केला.

परंतु, वादपत्र सादर केले जाण्याच्या वेळी, प्रतिवादी उपस्थित राहिला असेल व त्याने वादीची हक्कमागणी मान्य केली असेल तर, असे कोणतेही समन्स काढता कामा नये :

[1][परंतु आणखी असे की, असे समन्स काढण्यात आले असेल त्याबाबतीत, प्रतिवादी ज्या दिवशी न्यायालयात उपस्थित राहाणार असेल, त्या दिवशी त्याने, त्याला बचावाचे कोणतेही प्रतिवादपत्र द्यावयाचे असल्यास ते दाखल करावे, असा न्यायालयास निदेश देता येईल आणि समन्समध्ये तसे नमूद करण्याची व्यवस्था करता येईल.]

(२) पोटनियम (१) खाली ज्या प्रतिवादीवर समन्स काढण्यात आले असेल, त्या प्रतिवादीस—

(क) जातीने, किंवा

(ख) ज्याला रीतसर सूचना देण्यात आलेल्या आहेत व दाव्याच्या संबंधातील सर्व महत्त्वाच्या प्रश्नांना जो उत्तरे देऊ शकेल, अशा प्लीडरमार्फत, किंवा

(ग) अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणाऱ्या व्यक्तींसह असलेल्या प्लीडरमार्फत—

उपस्थित राहता येईल.

(३) अशा प्रत्येक समन्सवर न्यायाधीशाने किंवा तो नेमील अशा अधिकाऱ्याने सही केली पाहिजे व त्यावर न्यायालयाची मोहोर उमटवण्यात आली पाहिजे.

समन्सला जोडावयाची प्रत किंवा निवेदन.

२. प्रत्येक समन्ससोबत वादपत्राची एक प्रत किंवा तशी परवानगी देण्यात आल्यास, संक्षिप्त निवेदन जोडले पाहिजे.

[1][(२) नगर दिवाणी न्यायालयाने काढलेले समन्स बगळता, प्रत्येक समन्ससोबत, वादपत्रे व जोडपत्रे यांची एक प्रत किंवा तशी परवानगी देण्यात आल्यास, संक्षिप्त निवेदनही जोडले पाहिजे.]

प्रतिवादीने किंवा वादीने जातीने उपस्थित राहावे असा आदेश न्यायालयास देता येईल.

३. (१) प्रतिवादीने जातीने उपस्थित राहावे असे फर्माविण्यास कारण असल्याचे न्यायालयास वाटत असेल तर, समन्समध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी त्याने जातीने उपस्थित राहावे असा आदेश न्यायालयाने समन्सद्वारे दिला पाहिजे.

(२) वादीने त्याच दिवशी जातीने उपस्थित राहावे असे फर्माविण्यास कारण असल्याचे न्यायालयास वाटत असेल तर, त्याच्या अशा उपस्थितीसाठी न्यायालयाने आदेश काढला पाहिजे.

विवक्षित मर्यादांच्या आत न राहणाऱ्या पक्षकारास जातीने हजर राहण्याचा आदेश देऊ नये.

४. कोणताही पक्षकार—

(क) तो न्यायालयाच्या साधारण मूळ अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये, किंवा

(ख) अशा मर्यादांच्या बाहेर, परंतु न्यायालयाच्या गृहापासून पन्नास मैलांच्या आत किंवा (तो राहत असेल ती जागा आणि न्यायालय जेथे असेल ती जागा यांच्यामधील अंतराच्या ५/६ अंतराकरिता रेल्वेने किंवा आगबोटीने ये-जा करण्याची सोय अथवा सार्वजनिक वाहतुकीची अन्य प्रस्थापित सोय उपलब्ध असेल त्याबाबतीत) दोनशे मैलांच्या आत एखाद्या ठिकाणी—

राहात असल्याशिवाय त्याने जातीने उपस्थित राहावे असा आदेश देता येणार नाही.

[1][४. कोणताही पक्षकार—

(क) तो न्यायालयाच्या साधारण मूळ अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये, किंवा

(ख) अशा मर्यादांच्या बाहेर, परंतु न्यायालयापासून १०० किलोमीटरच्या आत किंवा (तो राहत असेल ती जागा आणि न्यायालय जेथे असेल ती जागा यांच्यामधील अंतराच्या ५/६ अंतराकरिता रेल्वेने किंवा आगबोटीने ये-जा करण्याची सोय अथवा सावजनिक वाहतुकीची अन्य प्रस्थापित सोय उपलब्ध असेल त्याबाबतीत) पाचशे किलोमीटरच्या आत एखाद्या ठिकाणी—

राहत असल्याशिवाय त्याने जातीने उपस्थित राहावे, असा आदेश देता येणार नाही.

समन्स वादमुद्दे निश्चित करण्यासाठी किंवा अंतिम निकालासाठी असणे.

५. न्यायालयाने, समन्स काढतेवेळी ते केवळ वादमुद्दे निश्चित करण्यासाठी असेल की दाव्याच्या अंतिम निकालासाठी असेल ते ठरविले पाहिजे आणि त्यानुसार समन्समध्ये निदेश अंतर्भूत असला पाहिजे :

[(५. न्यायालयाने समन्स काढतेवेळी ते केवळ प्रतिवादपत्र दाखल करण्यासाठी व वाद मुद्दे निश्चित करण्यासाठी असेल की दाव्याच्या अंतिम निकालासाठी असेल ते ठरविले पाहिजे आणि त्यानुसार समन्समध्ये निदेश अंतर्भूत असला पाहिजे :

समन्स, वादमुद्दे निश्चित करण्यासाठी किंवा अंतिम निकालासाठी असणे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५५(एक) द्वारे घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (२) अन्वये बदली दाखल करण्यात आला.

३. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (३) अन्वये हा नियम बदली दाखल करण्यात आला.

परंतु, लघुवाद न्यायालयामध्ये सुनावणी केल्या जाणाऱ्या प्रत्येक दाव्यामध्ये समन्स दाव्याच्या अंतिम निकालासाठी असेल.

परंतु लघुवाद न्यायालयामध्ये सुनावणी केल्या जाणाऱ्या प्रत्येक दाव्यामध्ये समन्स दाव्याच्या अंतिम निकालासाठी असेल.]

६. प्रतिवादीने उपस्थित राहण्याचा दिवस हा, न्यायालयातील चालू कामकाज, प्रतिवादीचे राहण्याचे ठिकाण आणि समन्स बजावण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी यांच्या संदर्भात निश्चित केला पाहिजे; आणि हा दिवस असा निश्चित करावा की, त्या दिवशी प्रतिवादीने हजर होऊन जाब देण्यास त्यास पुरेसा वेळ मिळावा. — प्रतिवादीने उपस्थित राहण्यासाठी दिवस निश्चित करणे.

७. उपस्थित राहून जाब देण्यासाठी काढलेल्या समन्सद्वारे, आपल्या बाजूच्या पुष्टयर्थ ज्या दस्तऐवजांवर विसंबून राहण्याचा प्रतिवादीचा इरादा असेल असे त्याच्या कब्जातील किंवा नियंत्रणाखालील सर्व दस्तऐवज त्याने हजर करावेत, असा आदेश त्याला दिला पाहिजे. — प्रतिवादी ज्या दस्तऐवजांवर विसंबून राहिला असेल, असे दस्तऐवज हजर करण्याचा आदेश देण्यासाठी समन्स.

८. दाव्याच्या अंतिम निकालासाठी समन्स असल्यास, आपल्या बाजूच्या पुष्टचर्थ ज्यांच्या साक्षीपुराव्यावर विसंबून राहण्याचा प्रतिवादीचा इरादा असेल, त्या सर्व साक्षीदारांना त्यांच्या उपस्थितीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिवशी त्याने हजर करावे, असाही त्या समन्साद्वारे निदेश दिला पाहिजे. — अंतिम निकालासाठी समन्स काढले असता, प्रतिवादीने आपले साक्षीदार हजर करावेत असा त्याला निदेश देणे.

समन्स बजावणे

९. (१) ज्या न्यायालयात दावा दाखल करण्यात आला असेल, त्या न्यायालयाच्या अधिकार-क्षेत्रामध्ये प्रतिवादी राहत असेल किंवा समन्स स्वीकारण्यासाठी अधिकार दिलेला त्याचा अभिकर्ता त्याच अधिकारक्षेत्रात राहत असेल तेव्हा न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नाही तर एरव्ही, योग्य अधिकाऱ्याने किंवा त्यास दुय्यम असलेल्यांपैकी कोणाही एकाने समन्सची बजावणी करावी, म्हणून ते त्या अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात येईल किंवा पाठवण्यात येईल. — बजावणीसाठी समन्स सुपूर्द करणे किंवा रवाना करणे.

(२) योग्य अधिकारी हा ज्या न्यायालयात दावा दाखल करण्यात आला असेल त्याहून अन्य न्यायालयाचा अधिकारी असू शकेल, आणि तो असा अधिकारी असेल तर, समन्स त्याच्याकडे डाकेने किंवा न्यायालय निदेशित करील अशा अन्य रीतीने पाठवता येईल.

१०. न्यायाधीशाने किंवा याबाबतीत तो नेमील अशा अधिकाऱ्याने सही केलेली व न्यायालयाची मोहोर अंकित केलेली त्याची प्रत सुपूर्द करून किंवा देऊ करून समन्सची बजावणी केली पाहिजे. — बजावण्याची पद्धती.

११. अन्यथा विहित केले असेल त्याव्यतिरिक्त, एकापेक्षा अधिक प्रतिवादी असल्यास, समन्सची बजावणी प्रत्येक प्रतिवादीवर केली पाहिजे. — निरनिराळ्या प्रतिवादींवर समन्स बजावणे.

१२. व्यवहार्य असेल तेव्हा, तेव्हा समन्सची बजावणी प्रतिवादींवर व्यक्तिशः केली पाहिजे. मात्र समन्स स्वीकारण्यासाठी प्रतिवादीने अभिकर्त्याला अधिकार दिलेला असल्यास, त्याबाबतीत अशा अभि-कर्त्यावर केलेली समन्सची बजावणी पुरेशी असेल. — व्यवहार्य असेल तेव्हा प्रतिवादीवर व्यक्तिशः किंवा त्याच्या अभिकर्त्यांवर बजावणी करणे.

१३. (१) एखाद्या व्यक्तीच्या विरुद्ध कोणत्याही धंदयाच्या किंवा कामाच्या संबंधात दावा दाखल केला असून समन्स ज्या न्यायालयाने काढले असेल त्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा-मध्ये ती राहत नसेल तर, अशा व्यक्तीकरिता अशा स्थानिक मर्यादांमध्ये समन्स बजावणीच्या वेळी जो व्यक्तिशः धंदा किंवा काम चालवत असेल अशा कोणत्याही व्यवस्थापकावरील किंवा अभिकर्त्यावरील बजावणी ही योग्य बजावणी असल्याचे मानण्यात येईल. — प्रतिवादी ज्यांच्या-मार्फत धंदा चालवीत असेल अशा अभि-कर्त्यांवर समन्स बजावणी करणे.

(२) या नियमाच्या प्रयोजनार्थ, नौकाधिपती हा मालकाचा किंवा भाडेकऱ्याचा अभिकर्ता असल्याचे मानण्यात येईल.

१४. स्थावर मालमत्तेच्या संबंधांत अनुतोष मिळवण्यासाठी किंवा तिला केलेल्या अपकृत्याबद्दल भरपाई मिळवण्यासाठी गुदरलेल्या दाव्यात प्रतिवादीवर व्यक्तिशः समन्स बजावणे शक्य नसेल, आणि समन्स बजावणी स्वीकारण्यासाठी प्रतिवादीने अधिकार दिलेला कोणी अभिकर्ता नसेल तर, प्रतिवादीचा जो कोणताही अभिकर्ता मालमत्तेचा प्रभारी असेल त्याच्यावर बजावणी करता येईल. — स्थावर मालमत्तेसंबंधीच्या दाव्यांमध्ये प्रभारी अभिकर्त्यांवर बजावणी करणे.

कोणत्या बाबतीत प्रतिवादीच्या कुटुंबातील प्रौढ व्यक्तीवर समन्स बजावता येईल.

[1][१५. कोणत्याही दाव्यामध्ये प्रतिवादीवर त्याच्या निवासस्थानी समन्स बजावावयाचे असताना, त्या वेळी प्रतिवादी त्याच्या निवासस्थानी नसेल आणि वाजवी अवधीमध्ये तो त्याच्या निवासस्थानी सापडण्याची शक्यता नसेल व आपल्या वतीने समन्सची बजावणी स्वीकारण्यासाठी त्याने अधिकार दिलेला असा कोणी अभिकर्ता नसेल तर, त्याच्या समवेत राहणाऱ्या कोणत्याही प्रौढ कुटुंबीय व्यक्तीवर—मग ती पुरुष असो वा स्त्री असो—बजावणी करता येईल.

स्पष्टीकरण.—या नियमाच्या अर्थानुसार नोकर हा कुटुंबीय नाही.]

[1][१५. कोणत्याही कारणांमुळे प्रतिवादीवर व्यक्तिशः समन्स बजावणे शक्य नसेल आणि त्याने आपल्या वतीने समन्सची बजावणी स्वीकारण्यासाठी अधिकार दिलेला कोणताही अभिकर्ता नसेल तर, त्याच्या समवेत राहणाऱ्या कोणत्याही प्रौढ पुरुष कुटुंबीय व्यक्तीवर समन्सची बजावणी करता येईल.

स्पष्टीकरण.—या नियमाच्या अर्थानुसार नोकर हा कुटुंबीय नाही.]

कोणत्या बाबतीत प्रतिवादीच्या कुटुंबातील पुरुष व्यक्तीवर समन्स बजावता येईल.

ज्या व्यक्तीवर समन्स बजावले असेल त्या व्यक्तीने पोचपावतीवर सही करणे.

१६. बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने समन्सची प्रत खुद्द प्रतिवादीकडे अथवा त्याच्या वतीने अभिकर्त्याकडे किंवा अन्य व्यक्तीकडे सुपूर्द करील किंवा देऊ करील तेव्हा त्याने ज्या व्यक्तीकडे ती प्रत अशाप्रकारे सुपूर्द केली असेल किंवा देऊ केली असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीला मूळ समन्सवर पृष्ठांकित केलेल्या समन्सच्या पोचपावतीवर सही करण्यास फर्माविले पाहिजे.

प्रतिवादीने समन्स घेण्यास नकार दिल्यास किंवा तो न सापडल्यास त्या बाबतीतील कार्यपद्धती.

१७. प्रतिवादीने किंवा त्याच्या अभिकर्त्याने किंवा पूर्वोक्त अशा अन्य व्यक्तीने पोचपावतीवर सही करण्यास नकार दिल्यास अथवा समन्स बजावणाऱ्या अधिकाऱ्याला [1][प्रतिवादीवर त्याच्या निवासस्थानी समन्स बजावायचे असताना त्या त्या वेळी प्रतिवादी त्याच्या निवासस्थानी नसल्यामुळे शक्य तेवढी वाजवी तत्परता दाखवूनही तो सापडू शकला नाही आणि वाजवी अवधीमध्ये तो त्याच्या निवासस्थानी सापडण्याची शक्यता नसेल] व आपल्या वतीने समन्सची बजावणी स्वीकारण्यासाठी प्रतिवादीने अधिकार दिलेला कोणी अभिकर्ता नसेल किंवा ज्या व्यक्तीवर बजावणी करता येईल अशी अन्य कोणतीही व्यक्ती नसेल तर, समन्स बजावणाऱ्या अधिकाऱ्याने प्रतिवादी नेहमी जेथे राहत असेल किंवा धंदा करत असेल अथवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत असेल अशा जागेच्या बाहेरच्या दरवाज्यावर किंवा अन्य ठळक ठिकाणी समन्सची प्रत चिकटवली पाहिजे आणि अशा प्रकारे प्रत चिकटवली असल्याचे वृत्त व कोणत्या परिस्थितीमध्ये आपण तसे केले ती परिस्थिती आणि ज्या व्यक्तीने त्याचे घर शोधून दाखवले व जिच्या समक्ष प्रत चिकटवण्यात आली (अशी कोणी व्यक्ती असल्यास) त्या व्यक्तीचे नाव व पत्ता नमूद करणारा वृत्तांत नमूद करून किंवा जोडून समन्सची मूळ प्रत ते ज्या न्यायालयाने काढले असेल, त्या न्यायालयाकडे परत पाठविली पाहिजे.

समन्स बजावण्याची वेळ व पद्धती पृष्ठांकित करणे.

१८. नियम १६ खाली समन्स बजावण्यात आले असेल अशा सर्व प्रकरणांमध्ये, समन्स बजावणाऱ्या अधिकाऱ्याने मूळ समन्सवर, समन्स केव्हा व कोणत्या पद्धतीने बजावण्यात आले ती वेळ व पद्धती आणि ज्या व्यक्तीवर समन्स बजावायचे ती व्यक्ती ओळखून देणाऱ्या व ज्याने ते समन्स देताना किंवा देऊ करताना पाहिले अशी जी व्यक्ती असेल तिचे नाव व पत्ता नमूद करणारे विवरण पृष्ठांकित केले पाहिजे किंवा त्यास जोडले पाहिजे अथवा पृष्ठांकित करण्याची किंवा जोडण्याची व्यवस्था केली पाहिजे.

समन्स बजावणाऱ्या अधिकाऱ्याची तपासणी.

१९. नियम १७ खाली समन्स परत पाठवण्यात आले असेल तर, याबाबतीत समन्स बजावणाऱ्या अधिकाऱ्याने त्या नियमाखालील प्रतिवेदन प्रतिज्ञालेखाद्वारे सत्यापित केलेले नसेल तर बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याची व ते त्याने याप्रमाणे सत्यापित केले असेल तर, न्यायालयाला, बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याची त्याच्या कार्यवाहीच्या संबंधाने शपथेवर तपासणी करता येईल, किंवा त्याच्या कार्यवाहीशी संबंध येणाऱ्या दुसऱ्या न्यायालयाकरवी त्याची याप्रमाणे तपासणी करविता येईल; आणि त्याबाबतीत त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करता येईल आणि त्यानंतर न्यायालयाने समन्स रीतसर बजावण्यात आले आहे, असे घोषित तरी केले पाहिजे किंवा त्यास योग्य वाटेल अशा प्रकारे समन्स बजावण्याचा आदेश तरी दिला पाहिजे.

समन्सची व्यक्तिशः अंमलबजावणी करून त्या शिवाय त्याच वेळी डाकेने समन्स पाठवणे.

[2][१९क. (१) नियम ९ ते १९ (दोन्ही धरून) त्यामध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने बजावणी करण्यासाठी समन्स काढण्याव्यतिरिक्त व त्याचवेळी न्यायालयाला असाही निदेश देता येईल की, प्रतिवादीला किंवा बजावणी स्वीकारण्यासाठी प्राधिकृत

[2][१९क. (१) नियम ९ ते १९ (दोन्ही धरून) यांमध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने बजावणी करण्यासाठी समन्स काढण्याव्यतिरिक्त व त्याचवेळी न्यायालयाला असाही निदेश- [3][देता येईल] की, प्रतिवादीला किंवा बजावणी स्वीकारण्यासाठी

समन्सची व्यक्तिशः बजावणी करून शिवाय त्याच वेळी डाकेने समन्स पाठविणे.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५५ (तीन) अन्वये बदली दाखल करण्यात आला.

२. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५५ (तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५५ (चार) अन्वये घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी० ०१०२/७७ दिनांक, ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (४) अन्वये घालण्यात आले.

२. १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४, कलम ५५ (तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा ५, (डाक) अन्वये "देईल" या शब्दाऐवजी घालण्यात आले.

केलेल्या त्याच्या अभिकर्त्याला उद्देशून प्रतिवादी किंवा त्याचा अभिकर्ता ज्या ठिकाणी प्रत्यक्षपणे व स्वेच्छेने राहत असेल किंवा धंदा चालवीत असेल किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत असेल अशा ठिकाणी समन्स पोचदेय नोंदणी डाकेने पाठवण्यात यावे :

अभिकर्त्याला प्राधिकृत केलेल्या त्याच्या अभिकर्त्याला उद्देशून प्रतिवादी अथवा त्याचा अभिकर्ता ज्या ठिकाणी प्रत्यक्षपणे व स्वेच्छेने राहत असेल किंवा धंदा चालवीत असेल किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत असेल अशा ठिकाणी समन्स पोचदेय नोंदणी डाकेने पाठवण्यात यावे :

[१][* * * * * * * *]

(२) प्रतिवादीने अथवा त्याच्या अभिकर्त्याने स्वाक्षरित केल्याप्रमाणे दिसणारी पोचपावती न्यायालयाला मिळाली असेल तर, अथवा आत समन्स असलेली डाकवस्तू देऊ करण्यात आली असता, प्रतिवादीने किंवा त्याच्या अभिकर्त्याने ती स्वीकारण्यास नकार दिला अशा आशयाचे पृष्ठांकन ज्यावर डाक कर्मचाऱ्याने नमूद केले असल्याचे दिसते ती डाकवस्तू न्यायालयाकडे परत आल्यास समन्स काढणाऱ्या न्यायालयाने ते समन्स प्रतिवादीवर रीतसर बजावले गेले होते असे घोषित केले पाहिजे :

परंतु, समन्स योग्य व्यक्तीला उद्देशून पाठवले असेल, त्याचा टपालखर्च अगोदरच भरलेला असेल आणि ते पोचदेय डाकेने पाठवलेले असेल त्याबाबतीत, पोचपावती हरवली किंवा चुकून भलतीकडे गेली या किंवा अन्य कोणत्याही कारणस्तव ती, समन्स काढल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत न्यायालयाला मिळाली नसती तरीही, या पोटनियमाखालील घोषणा करण्यात येईल.]

पर्यायी बजावणी.

२०. (१) समन्सची बजावणी टाळण्यासाठी प्रतिवादी तोंड चुकवीत असल्याचे समजण्यास न्यायालयास कारण आहे किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नेहमीच्या पद्धतीने समन्स बजावणे शक्य नाही, अशी न्यायालयाची खात्री पटली तर, न्यायगृहातील एखाद्या ठळक ठिकाणी आणि लगतपूर्वी प्रतिवादी जेथे राहत होता किंवा धंदा चालवीत होता किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत होता असे माहीत असेल अशा घरात (तसे घर असल्यास) ठळक ठिकाणी समन्सची प्रत चिकटवून किंवा न्यायालयास योग्य वाटेल अशा अन्य रीतीने समन्स बजावण्याचा आदेश न्यायालयाने दिला पाहिजे.

[२][(१क) पोटनियम (१) खाली काम करताना, न्यायालयाने वर्तमानपत्रात जाहिरात देऊन समन्स बजावण्याचा आदेश दिल्यास ते वर्तमानपत्र हे प्रतिवादी लगतपूर्वी जेथे प्रत्यक्षपणे व स्वेच्छेने राहत होता किंवा धंदा चालवीत होता किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत होता असे माहीत आहे अशा स्थानिक भागात खप असणारे दैनिक वर्तमानपत्र असेल.]

पर्यायी बजावणीचा परिणाम.

(२) न्यायालयाच्या आदेशानुसार केलेली पर्यायी बजावणी ही ती प्रतिवादीवर व्यक्तिशः करण्यात आली असल्याप्रमाणे परिणामक असेल.

पर्यायी बजावणी केली असेल त्याबाबतीत, उपस्थित राहण्याची वेळ निश्चित करणे.

(३) न्यायालयाच्या आदेशानुसार पर्यायी बजावणी करण्यात आली असेल त्याबाबतीत, न्यायालयाने परिस्थितीनुरूप जरूर असेल त्याप्रमाणे, प्रतिवादीने उपस्थित राहण्याची वेळ निश्चित केली पाहिजे.

२०क. डाकेने समन्सची बजावणी.

[१९७६ चा अधिनियम १०४, कलम ५५ (सहा) अन्वये वगळण्यात आले.]

प्रतिवादी अन्य न्यायालयाच्या अधिकारितेत राहत असेल त्याबाबतीत समन्सची बजावणी.

२१. समन्स ज्या न्यायालयाने काढले असेल त्या न्यायालयाला—मग ते राज्यात असो वा राज्याबाहेर असो—प्रतिवादी ज्या ठिकाणी राहत असेल त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या (उच्च न्यायालय सोडून अन्य) कोणत्याही न्यायालयाकडे स्वतःच्या अधिकाऱ्यांपैकी कोणाहीकरवी किंवा डाकेने पाठवता येईल.

न्यायालयास, अन्य पद्धतीव्यतिरिक्त किंवा अन्य पद्धतीऐवजी नोंदणीकृत डाकेने बजावणी करण्याचा आदेश देता येईल.

[१][२१क. पूर्वगामी नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही आणि प्रतिवादी न्यायालयाच्या अधिकारितेत रहात असला किंवा नसला तरीही, न्यायालयास, बजावणीच्या अन्य कोणत्याही पद्धतीव्यतिरिक्त किंवा अन्य कोणत्याही पद्धतीऐवजी, प्रतिवादी [३][ज्या ठिकाणी रहात होता किंवा सर्वसामान्यपणे धंदा चालवीत होता किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत होता] त्या ठिकाणी त्याला उद्देशून, पावतीसाठी टपालखर्च अगोदर भरून

---

१. उच्च न्यायालय अधिसूचना पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ विशोधन ५(दोन) द्वारे गाळण्यात आले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५५(पाच) अन्वये घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड १० द्वारे घालण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ४ ऑगस्ट, १९७२, सुधारणा क्र. ३(तीन)द्वारे "ज्याठिकाणी तो रहात होता किंवा सर्वसामान्यपणे धंदा करीत होता" या शब्दांऐवजी बदलीदाखल करण्यात आले.

समन्स पोचदेय नोंदणी डाकेने पाठवता येईल. मात्र, अशा ठिकाणी नियमित डाक सेवा असली पाहिजे. प्रतिवादीने स्वाक्षरी केल्याचे दिसणारी पोचपावती बजावणीचा प्रथमदर्शनी पुरावा असल्याचे समन्स काढणाऱ्या न्यायालयाकडून मानण्यात येईल. अन्य सर्व प्रकरणांमध्ये, न्यायालय, त्यास योग्य वाटेल, तशी चौकशी करील आणि समन्स योग्य रीत्या बजावण्यात आले आहे, असे जाहीर करील किंवा त्याच्या मते आवश्यक असेल, अशी आणखी बजावणी करण्याचा आदेश देईल.]

बाहेरच्या न्यायालयांनी काढलेल्या समन्सची इलाखा शहरात बजावणी.

२२. कलकत्ता, मद्रास [१][व मुंबई] या शहरांच्या मर्यादांबाहेर स्थापन केलेल्या कोणत्याही न्यायालयाने काढलेल्या समन्सची अशा मर्यादांमध्ये बजावणी करावयाची असेल तर, त्याची बजावणी ज्याच्या अधिकारितेत करावयाची त्या लघुवाद न्यायालयाकडे ते पाठविले पाहिजे.

२२. कलकत्ता, मद्रास [१][व मुंबई] या शहरांच्या मर्यादांबाहेर स्थापन केलेल्या कोणत्याही न्यायालयाने काढलेल्या समन्सची अशा मर्यादांमध्ये बजावणी करावयाची असेल तर, त्याची बजावणी ज्याच्या अधिकारितेत करावयाची त्या लघुवाद न्यायालयाकडे ते पाठवले पाहिजे [२][:

बाहेरच्या न्यायालयांनी काढलेल्या समन्सची इलाखा शहरांत बजावणी.

परंतु, अशा कोणत्याही समन्सची बृहन्मुंबईच्या मर्यादांमध्ये बजावणी करावयाची असेल तर, अशा मर्यादांमधील [३][ज्या ठिकाणी तो राहत होता किंवा ज्या ठिकाणी तो सर्वसामान्यपणे धंदा चालवीत होता किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत होता] त्याठिकाणी, प्रतिवादीला उद्देशून बजावणी करण्यात येईल आणि ती न्यायालयाला त्याच्याकडे नोंदणीकृत पोचदेय डाकेने पाठवता येईल. प्रतिवादीने स्वाक्षरी केल्याचे दिसणारी पोचपावती किंवा प्रतिवादीने बजावणी नाकारल्याबाबतचे डाक कर्मचाऱ्याचे पृष्ठांकन समन्स काढणाऱ्या न्यायालयाकडून, बजावणीचा प्रथमदर्शनी पुरावा मानण्यात येईल. अन्य सर्व प्रकरणांमध्ये न्यायालय, त्यास योग्य वाटेल तशी चौकशी करील आणि एकतर, समन्स योग्य रीत्या बजावण्यात आले आहे असे जाहीर करील किंवा त्याच्या मते आवश्यक असेल, अशी आणखी बजावणी करण्याचा आदेश देईल.]

ज्या न्यायालयाकडे समन्स पाठविण्यात आले असेल त्या न्यायालयाचे कर्तव्य.

२३. नियम २१ किंवा नियम २२ खाली ज्या न्यायालयाकडे समन्स पाठविण्यात आले असेल त्या न्यायालयाने समन्स मिळाल्यानंतर, जणू काही, ते समन्स आपणच काढले असल्याप्रमाणे कार्यवाही पुरी केली पाहिजे आणि समन्सच्या संबंधातील त्याच्या कार्यवाहीचा अभिलेख (असल्यास) त्या अभिलेखासह ज्या न्यायालयाने ते समन्स काढले असेल त्या न्यायालयाकडे पाठविले पाहिजे.

तुरुंगात असलेल्या प्रतिवादीवरील बजावणी.

२४. प्रतिवादी तुरुंगात असेल तेव्हा प्रतिवादीवर समन्स बजावण्याकरिता ते तुरुंगाच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या स्वाधीन केले पाहिजे किंवा त्या अधिकाऱ्याकडे डाकेने अथवा अन्य प्रकारे पाठविले पाहिजे.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "मुंबई आणि रंगून" याऐवजी बदलीदाखल करण्यात आले.

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "मुंबई आणि रंगून" याऐवजी बदलीदाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६० दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ११ अन्वये जादा दाखल करण्यात आले.

३. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ४ ऑगस्ट, १९७२ सुधारणा ३ (तीन) अन्वये मूळ मजकुराऐवजी घातला.

प्रतिवादी भारताच्या बाहेर राहात असेल व त्याचा अभिकर्ता नसेल त्याबाबतीत बजावणी.

२५. प्रतिवादी [१][भारताच्या] बाहेर राहात असेल आणि समन्स स्वीकारण्यासाठी अधिकार दिलेला असा त्याचा कोणताही अभिकर्ता [१][भारतात] नसेल त्याबाबतीत, प्रतिवादी जेथे राहतो ते ठिकाण व न्यायालय जेथे असेल ते ठिकाण यांच्या दरम्यान डाकसेवा उपलब्ध असेल तर, प्रतिवादीच्या त्या ठिकाणच्या पत्त्यावर डाकेने असे समन्स पाठविले पाहिजे :

[१][परंतु असा कोणताही प्रतिवादी [१][बांगला देश किंवा पाकिस्तान येथे राहत असेल,] तर समन्स व त्याची एक प्रत, प्रतिवादी ज्या ठिकाणी राहत असेल त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या (उच्च न्यायालय सोडून अन्य) अशा त्या देशातील कोणत्याही न्यायालयाकडे ते प्रतिवादीवर बजावण्यासाठी पाठविता येईल :

परंतु आणखी असे की, असा कोणताही प्रतिवादी [१][(बांगला देशाच्या किंवा, प्रकरणपरत्वे पाकिस्तानच्या लष्करात, नौदलात किंवा हवाईदलात नसलेला असा) बांगला देश किंवा पाकिस्तान येथील] लोक अधिकारी असेल तर, अथवा त्या देशातील रेल्वे कंपनीचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा सेवक असेल तर, प्रतिवादीवर समन्स बजावण्यासाठी ते व त्याची एक प्रत, केंद्र शासन, याबाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे पाठविता येईल.]

[१][२५. प्रतिवादी भारताच्या बाहेर राहत असेल आणि समन्स स्वीकारण्यासाठी अधिकार दिलेला त्याचा कोणताही अभिकर्ता भारतात नसेल, त्याबाबतीत, प्रतिवादी जेथे राहतो ते ठिकाण व न्यायालय जेथे असेल ते ठिकाण यांच्या दरम्यान डाकसेवा उपलब्ध असेल तर, प्रतिवादीच्या त्या ठिकाणच्या पत्त्यावर डाकेने असे समन्स पाठवले पाहिजे :

परंतु, असा कोणताही प्रतिवादी पाकिस्तान येथे राहत असेल तर समन्स व त्याची एक प्रत, प्रतिवादी ज्या ठिकाणी राहत असेल त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या (उच्च न्यायालय सोडून अन्य) अशा त्या देशातील कोणत्याही न्यायालयाकडे ते प्रतिवादीवर बजावण्यासाठी पाठवता येईल :

परंतु आणखी असे की, असा कोणताही प्रतिवादी (पाकिस्तानच्या लष्करात, नौदलात किंवा हवाईदलात नसलेला असा) पाकिस्तान येथील लोक अधिकारी असेल तर अथवा त्या देशातील रेल्वे कंपनीचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा सेवक असेल तर, प्रतिवादीवर समन्स बजावण्यासाठी ते व त्याची एक प्रत केंद्र शासन, याबाबतीत शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे पाठविता येईल.]

प्रतिवादी भारताच्या बाहेर राहत असेल व त्याचा अभिकर्ता नसेल त्याबाबतीत बजावणी.

परकीय राज्यक्षेत्रात राजकीय प्रतिनिधी किंवा न्यायालय यांच्यामार्फत बजावणी.

[१][२६. (क) प्रतिवादी येथे प्रत्यक्षपणे आणि स्वेच्छेने राहत असेल, धंदा चालवत असेल अथवा प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करीत असेल अशा कोणत्याही परकीय राज्यात, केंद्र शासनाकडे निहित असलेल्या कोणत्याही परदेशविषयक अधिकारितेचा वापर करून, एखादा राजकीय प्रतिनिधी नेमण्यात आलेला असेल अथवा तेथे एखादे न्यायालय स्थापन करण्यात आले असेल किंवा चालू ठेवण्यात आले असेल, त्याला या संहितेखाली एखाद्या न्यायालयाने काढलेले समन्स बजावण्याचा अधिकार असेल अशा बाबतीत, किंवा

(ख) अशा कोणत्याही राज्यक्षेत्रामध्ये असलेल्या आणि पूर्वोक्त अशा कोणत्याही अधिकारितेचा वापर करून स्थापन न केलेल्या किंवा चालू न ठेवलेल्या कोणत्याही न्यायालयाच्या संबंधात

[१][२६. (क) प्रतिवादी जेथे राहत असेल अशा कोणत्याही परकीय राज्यक्षेत्रात, केंद्र शासनाकडे निहित असलेल्या कोणत्याही परदेशविषयक अधिकारितेचा वापर करून एखादा राजकीय प्रतिनिधी नेमण्यात आलेला असेल अथवा तेथे एखादे न्यायालय स्थापन करण्यात आले असेल किंवा चालू ठेवण्यात आले असेल, त्याला या संहितेखाली एखाद्या न्यायालयाने काढलेले समन्स बजावण्याचा अधिकार असेल अशा बाबतीत, किंवा

(ख) अशा कोणत्याही राज्यक्षेत्रामध्ये असलेल्या आणि पूर्वोक्त अशा कोणत्याही अधिकारितेचा वापर करून स्थापन न केलेल्या किंवा चालू न ठेवलेल्या कोणत्याही न्यायालयाच्या संबंधात राज्य

परकीय राज्यक्षेत्रात राजकीय प्रतिनिधी किंवा न्यायालय यांच्यामार्फत बजावणी.

---

१. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ३ द्वारे "राज्ये" याऐवजी बदली दाखल करण्यात आले.

२. सन १९५१ चा अधिनियम १९, कलम २ द्वारे घालण्यात आले.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५५ (सात) (क) द्वारे "पाकिस्तान येथे राहत असेल" या शब्दांऐवजी बदली दाखल करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ५५ (सात) (ख) द्वारे "पाकिस्तान (पाकिस्तानच्या लष्करात, नौदलात किंवा हवाईदलात नसलेल्या)" या शब्दाऐवजी बदली दाखल केले.

५. वरील अधिनियमाच्या, कलम ५५ (आठ) द्वारे बदली दाखल केले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड १२ द्वारे बदलीदाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड १२ द्वारे बदली दाखल करण्यात आले.

केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा न्यायालयाने या संहितेखाली एखाद्या न्यायालयाने काढलेल्या कोणत्याही समन्सची बजावणी केल्यास ती बजावणी विधिग्राह्य मानली जाईल असे घोषित केले असल्यास त्याबाबतीत,

प्रतिवादीवर बजावण्यासाठी ते समन्स, अशा राजकीय प्रतिनिधीकडे किंवा न्यायालयाकडे डाकेने किंवा अन्य प्रकारे किंवा केंद्र शासनाने तसा निदेश दिल्यास त्या शासनाच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या मार्फत किंवा केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा अन्य रीतीने पाठवता येईल आणि ते समन्स राजकीय प्रतिनिधीने किंवा न्यायालयाने परत पाठविले व त्यात यापूर्वी निदेशित केलेल्या रीतीने प्रतिवादीवर समन्स बजावण्यात आले आहे अशा आशयाचे पृष्ठांकन अशा राजकीय प्रतिनिधीने किंवा न्यायाधीशाने अथवा न्यायालयाच्या अन्य अधिकाऱ्याने त्यावर केले असल्याचे दिसत असेल तर, असे पृष्ठांकन हा बजावणीचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल.]

शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा न्यायालयाने राज्याच्या न्यायालयाने काढलेल्या कोणत्याही समन्सची बजावणी केल्यास, ती बजावणी विधिग्राह्य मानली जाईल, असे घोषित केले असल्यास त्याबाबतीत,

प्रतिवादीवर बजावण्यासाठी ते समन्स, नियम २५ द्वारे विहित केलेल्या पद्धतीव्यतिरिक्त किंवा पद्धती ऐवजी, अशा राजकीय प्रतिनिधीकडे किंवा न्यायालयाकडे डाकेने किंवा अन्य प्रकारे पाठवता येईल; आणि ते समन्स राजकीय प्रतिनिधीने किंवा न्यायालयाने परत पाठवले व त्यात, यापूर्वी निदेशित केलेल्या रीतीने प्रतिवादीवर समन्स बजावण्यात आले आहे, अशा आशयाचे पृष्ठांकन, अशा राजकीय प्रतिनिधीने किंवा न्यायाधीशाने किंवा न्यायालयाच्या अन्य अधिकाऱ्याने केले असल्याचे दिसत असेल, तर असे पृष्ठांकन हा बजावणीचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल.]

परदेशाच्या अधिकाऱ्यांना समन्स पाठवणे.

२६क. जर केंद्र शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कोणत्याही एखाद्या परकीय राज्यक्षेत्राच्या संबंधात असे घोषित केले असेल की, त्या परकीय राज्यक्षेत्रात प्रत्यक्षपणे आणि स्वेच्छेने राहत असलेल्या किंवा धंदा चालवत असलेल्या किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिश: कामधंदा करीत असलेल्या प्रतिवादींवर बजावावयाची समन्से केंद्र शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या परकीय राज्यक्षेत्रातील शासनाच्या अधिकाऱ्याकडे पाठवण्यात यावीत तर अशा बाबतीत, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या मार्फत किंवा केंद्र शासन विनिर्दिष्ट करील अशा अन्य प्रकारे, अशा अधिकाऱ्याकडे समन्से पाठविता येतील; आणि अशा अधिकाऱ्याने असे कोणतेही समन्स परत पाठवले व प्रतिवादीवर समन्स बजावण्यात आले आहे अशा आशयाचे पृष्ठांकन त्यावर केले असल्याचे दिसत असेल तर, असे पृष्ठांकन हा बजावणीचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल.

मुलकी लोक अधिकाऱ्यावर अथवा रेल्वे कंपनीचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी यांवर बजावणी करणे.

२७. प्रतिवादी हा [1][(भारतीय भूसेनेत,] [2][नौसेनत किंवा वायुसेनेत] [3]* * * नसलेला) लोक अधिकारी असेल, अथवा रेल्वे कंपनीचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा सेवक असेल त्याबाबतीत, प्रतिवादी ज्या कार्यालयात नोकरीला असेल त्या कार्यालयाच्या प्रमुखाकडे समन्स बजावणीसाठी पाठवणे अत्यंत सोयीचे आहे असे न्यायालयास वाटल्यास, न्यायालयास असे समन्स, व प्रतिवादीने ठेऊन घ्यावयाची एक प्रत बजावणीसाठी पाठविता येईल.

[1][२७. प्रतिवादी हा भारतीय भूसेनेत, नौसेनेत किंवा वायुसेनेत नसलेला लोक अधिकारी असेल अथवा रेल्वे कंपनीचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा सेवक असेल, त्याबाबतीत, प्रतिवादी ज्या कार्यालयात नोकरीला असेल, त्या कार्यालयाच्या प्रमुखाकडे, समन्स बजावणीसाठी पाठवणे, अत्यंत सोयीचे आहे असे न्यायालयास वाटल्यास, न्यायालयास असे समन्स टपाल खर्च अगोदर भरून, नोंदणीकृत पोचदेय डाकेने पाठवता येईल आणि त्यासोबत प्रतिवादीने ठेऊन घ्यावयाची त्याची एक प्रत पाठवता येईल.]

मुलकी लोक अधिकाऱ्यावर अथवा रेल्वे कंपनीचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी यांवर बजावणी करणे.

भूसैनिक, नौसैनिक व वायुसैनिक यांच्यावर बजावणी करणे.

२८. प्रतिवादी हा, भूसैनिक, [4][नौसैनिक] [5][किंवा वायुसैनिक] असेल त्याबाबतीत, समन्स व प्रतिवादीने ठेऊन घ्यावयाची एक प्रत बजावणीसाठी न्यायालयाने समादेशक अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे.

[4][२८. प्रतिवादी हा, भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक असेल त्याबाबतीत, न्यायालयाने समन्स व प्रतिवादीने ठेऊन घ्यावयाची त्याची एक प्रत, टपाल खर्च अगोदर भरून नोंदणीकृत पोचदेय डाकेने, प्रतिवादीवर बजावण्यासाठी त्याच्या समावेशक अधिकाऱ्याकडे पाठविली पाहिजे.]

भूसैनिक, नौसैनिक व वायुसैनिक यांच्यावर बजावणी करणे.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे " हिजमॅजेस्टी " याऐवजी बदली दाखल करण्यात आले.

२. सन १९२७ चा अधिनियम १०, कलम २ आणि अनुसूची १ द्वारे " किंवा नौदलात " याऐवजी बदली दाखल केले.

३. सन १९३४ चा अधिनियम ३५, कलम २ आणि अनुसूचीद्वारे " हिजमॅजेस्टीज इंडीयन मरीन सर्व्हीस " हा मजकूर गाळण्यात आला.

४. सन १९३४ चा अधिनियम ३५, कलम २ आणि अनुसूची द्वारे घालण्यात आले.

५. सन १९२७ चा अधिनियम १०, कलम २ आणि अनुसूची १ द्वारे घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (६) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (७) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

बजावणीसाठी ज्या व्यक्तीकडे समन्स सुपूर्द केले असेल किंवा पाठवले असेल त्या व्यक्तीचे कर्तव्य.

२९. (१) नियम २४, नियम २७ किंवा नियम २८ खाली एखादे समन्स बजावणीकरिता एखाद्या व्यक्तीकडे सुपूर्द करण्यात किंवा पाठवण्यात आले असेल त्याबाबतीत, अशी व्यक्ती शक्य असल्यास, ते समन्स बजावण्यास आणि प्रतिवादीच्या लेखी पोचपावतीसह स्वतःच्या सहीने परत पाठवण्यास बांधलेली असेल व अशी सही हा बजावणीचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल.

(२) कोणत्याही कारणास्तव बजावणी अशक्य असेल तर, असे कारण कोणते व बजावणी शक्य व्हावी म्हणून काय कार्यवाही करण्यात आली, त्याबाबतच्या संपूर्ण निवेदनासह समन्स न्यायालयाकडे परत पाठवावे लागेल आणि असे निवेदन हा बजावणी न झाल्याचा पुरावा असल्याचे मानण्यात येईल.

समन्सऐवजी पत्र पाठवणे.

३०. (१) यात यापूर्वी काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयाच्या मते प्रतिवादीला समन्स ऐवजी पत्र पाठवून, त्या रूपाने सन्मानदर्शक वागणूक देण्यास तो पात्र असण्याइतपत त्याचा दर्जा असल्यास न्यायालयास, समन्स ऐवजी न्यायाधीशाने किंवा त्याने याबाबतीत नेमलेल्या अधिकाऱ्याने सही केलेले पत्र पाठविता येईल.

(२) पोटनियम (१) खालील समन्स ऐवजी पाठवावयाच्या पत्रामध्ये, समन्स मध्ये नमूद करणे आवश्यक असलेला सर्व तपशील समाविष्ट असला पाहिजे व पोटनियम (३) च्या उपबंधांच्या अधीनतेने, ते सर्व बाबतीत समन्स असल्याचे समजण्यात येईल.

(३) अशा प्रकारे समन्स ऐवजी पाठवावयाचे पत्र प्रतिवादीकडे डाकेने किंवा न्यायालय निवड करील अशा विशेष दूताकरवी, किंवा न्यायालयास योग्य वाटेल अशा अन्य रीतीने पाठविता येईल; आणि समन्स स्वीकारण्यासाठी प्रतिवादीने एखाद्या अभिकर्त्याला अधिकार दिलेला असेल तर, असे पत्र अशा अभिकर्त्याकडे सुपूर्द करता येईल अथवा पाठविता येईल.

आदेश सहावा

सर्वसाधारणत: वादकथने

वादकथन.

१. "वादकथन" याचा अर्थ, वादपत्र किंवा प्रतिवादपत्र, असा असेल.

वादकथनामध्ये महत्त्वाची तथ्ये नमूद करावयाची, पुरावा नव्हे.

[१][२. (१) पक्षकार त्याच्या हक्कमागणीसाठी किंवा, प्रकरणपरत्वे, बचावासाठी ज्यावर विसंबून असेल अशा महत्त्वाच्या तथ्यांचे संक्षिप्त निवेदन प्रत्येक वादकथनामध्ये अंतर्भूत असेल व त्यात तेवढेच देता येईल. परंतु ज्याच्या आधारे ती तथ्ये शाबीत करावयाची, तो पुरावा त्यात असता कामा नये.

(२) प्रत्येक वादकथन आवश्यकतेनुसार परिच्छेदांमध्ये विभागून त्यांना अनुक्रमांक दिले पाहिजेत. प्रत्येक अभिकथन सोयीस्कर होईल तितपत स्वतंत्र परिच्छेदामध्ये नमूद करण्यात येईल.

(३) वादकथनातील दिनांक, रकमा व आकडे संख्येमध्ये व त्याचप्रमाणे अक्षरी दाखविले पाहिजेत.]

वादकथनाचे नमुने.

३. परिशिष्ट "क" मधील नमुने जेव्हा लागू असतील तेव्हा आणि ते नमुने लागू होत नसतील तेव्हा शक्य तेथवर तशाच प्रकारचे नमुने सर्व प्रकारच्या वादकथनांकरता वापरावे.

आवश्यक असेल तेव्हा तपशील द्यावयाचा.

४. ज्या बाबतीत वादकथन करणारा पक्षकार, हा अपवेदन, कपट, विश्वासघात, बुद्धिपुरस्सर कसूर किंवा गैरवाजवी दडपण यावर विसंबून असेल, अशा सर्व प्रकरणांमध्ये आणि उपरोक्त नमुन्यांमध्ये सोदाहरण दिलेले आहेत, त्याव्यतिरिक्त काही तपशील ज्या प्रकरणी आवश्यक असेल अशा अन्य सर्व प्रकरणी वादकथनात (आवश्यक असल्यास तारीखवार व बाबवार) तपशील नमूद केला पाहिजे.

आणखी व अधिक चांगले निवेदन किंवा तपशील.

५. (१) कोणत्याही वादकथनात नमूद केलेल्या हक्कमागणीच्या किंवा बचावाच्या स्वरूपासंबंधी आणखी व अधिक चांगले निवेदन अथवा एखाद्या वादकथनात नमूद केलेल्या कोणत्याही बाबतीत आणखी व अधिक चांगला तपशील खर्चासंबंधीच्या आणि अन्य प्रकारच्या न्याय्य असतील अशा अटींवर सर्व बाबतीत आदेशाद्वारे मागवता येईल.

[१][५. (१) कोणत्याही वादकथनात नमूद केलेल्या हक्कमागणीच्या किंवा बचावाच्या स्वरूपासंबंधी आणखी व अधिक चांगले निवेदन अथवा एखाद्या वादकथनात नमूद केलेल्या कोणत्याही बाबतीत आणखी व अधिक चांगला तपशील खर्चासंबंधीच्या आणि अन्य प्रकारच्या न्याय्य असतील अशा अटींवर सर्व बाबतीत आदेशाद्वारे मागवता येईल. आणखी व अधिक चांगले निवेदन किंवा तपशील.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५६ (एक) अन्वये हा नियम बदली दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा १ अन्वये बदली दाखल करण्यात आला.

(२) समन्स बजावणी अहवालासह परत करण्याच्या तारखेस किंवा तत्पूर्वी प्रतिवादीने दिलेला अर्ज अथवा प्रतिवादपत्र दाखल केल्यानंतर सुनावणीकरिता ठरवलेल्या पहिल्या तारखेस किंवा तत्पूर्वी वादीने दिलेला अर्ज सोडून, वादीच्या अथवा प्रतिवादीच्या, आणखी व अधिक चांगला तपशील देण्याबाबतचा कोणताही विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही; मात्र त्यासाठी वादीने किंवा प्रतिवादीने सबळ कारण दिले असेल तर अलाहिदा.

(३) प्रतिवादपत्र दाखल केल्यानंतर, न्यायालयाने, (एक) पक्षकारांच्या ताब्यातील किंवा अधिकारातील, कागदपत्रे सोडून अन्य कागदपत्रे स्वीकारण्यासाठी, आणि (दोन) अर्ज किंवा सवालपट्टी, दस्तऐवज शोधणे व त्यांची तपासणी यांसाठी एक तारीख निश्चित केली पाहिजे. न्यायालयाचे समाधान होईल असे सबळ कारण दाखवून विल्याखेरीज त्यानंतर आलेले असे अर्ज विचारार्थ स्वीकारण्यात येऊ नये.]

पूर्ववर्ती शर्त.

६. ज्या शर्तीचे पालन करण्याबाबत किंवा ती घडून येण्याबाबत वाद उपस्थित करण्याचा इरादा असेल अशी कोणतीही पूर्ववर्ती शर्त, वादीला किंवा, प्रकरणपरत्वे, प्रतिवादीला त्याच्या वादकथनात स्पष्टपणे विनिर्दिष्ट करावी लागेल, आणि त्याच्या अधीनतेने वादीची किंवा प्रतिवादीची बाजू मांडण्यासाठी सर्व पूर्ववर्ती शर्तीचे पालन होण्यासंबंधीचे किंवा त्या घडून येण्यासंबंधीचे प्रकथन त्याच्या वादकथनामध्ये उपलक्षित केले पाहिजे.

विचलन.

७. सुधारणेद्वारे असेल ते वगळता, कोणत्याही वादकथनामध्ये हक्कमागणीचे कोणतेही नवे आधारकारण उपस्थित करता येणार नाही अथवा ते वादकथन करणाऱ्या पक्षकाराच्या पूर्वीच्या वादकथनाशी विसंगत असलेले कोणतेही तथ्यविषयक अभिकथन त्यात समाविष्ट करता येणार नाही.

संविदेची नाकबुली.

८. संविदा झाली असल्याचे कोणत्याही वादकथनामध्ये अभिकथन करण्यात आले असल्यास, विरुद्ध पक्षकाराने त्या संविदेची नुसती नाकबुली केली तर, अशा संविदेच्या कायदेशीरपणाबाबतची किंवा ती कायद्याप्रमाणे पुरेशी असण्याबाबतची नाकबुली नव्हे तर, अभिकथन केल्यानुसार स्पष्ट संविदा किंवा अशी संविदा ज्यावरून उपलक्षित होऊ शकेल, अशी वस्तुस्थिती प्रत्यक्षात नव्हती, अशा अर्थाची ती नाकबुली असल्याप्रमाणे तिचा अर्थ लावण्यात येईल.

दस्तऐवजाचा आशय नमूद करणे.

९. कोणत्याही दस्तऐवजातील मजकूर महत्त्वाचा असेल त्याबाबतीत, त्यातील नेमका मजकूर किंवा त्याचा एखादा भाग महत्त्वाचा नसेल तर, संपूर्ण मजकूर अथवा त्याचा कोणताही भाग, उद्धृत न करता शक्य तितक्या संक्षिप्तपणे त्याचा आशय कोणत्याही वादकथनांमध्ये नमूद केल्यास पुरेसे होईल.

दुर्भाव, जाणीव, इत्यादी.

१०. कोणत्याही व्यक्तीच्या मनातील दुर्भाव, कपटपूर्ण उद्देश किंवा जाणीव अथवा तिची अन्य प्रकारची मानसिक स्थिती यांविषयीचे अभिकथने करणे, महत्त्वाचे असेल तेव्हा तेव्हा, ज्या परिस्थितीवरून त्याचे अनुमान काढावयाचे ती निवेदन न करता तशी स्थिती होती एवढे अभिकथन केल्यास पुरेसे होईल.

नोटीस.

११. कोणत्याही व्यक्तीला एखादी वस्तुस्थिती, बाब किंवा गोष्ट यासंबंधीची नोटीस मिळाली असल्याचे अभिकथन करणे महत्त्वाचे असेल त्याबाबतीत, अशा नोटिशीचा नमुना किंवा नेमका मजकूर अथवा ज्या परिस्थितीवरून अशा नोटिशीचे अनुमान करावयाचे ती परिस्थिती महत्त्वाची नसेल तर, अशी नोटीस मिळाली होती हे तथ्य म्हणून अभिकथन केल्यास पुरेसे होईल.

उपलक्षित संविदा किंवा नाते.

१२. कोणत्याही व्यक्ती-व्यक्तीमधील कोणतीही संविदा किंवा नाते, एखाद्या पत्रव्यवहारावरून किंवा संभाषणमालिकेवरून अथवा अनेक परिस्थितिविशेषांवरून उपलक्षित धरावयाचे असल्यास, अशी संविदा किंवा नाते होते, हे तथ्य म्हणून अभिकथन केल्यास आणि अशी पत्रे, संभाषणे किंवा परिस्थिती विशेष तपशीलवार उद्धृत न करता, त्यांचा निर्देश केल्यास पुरेसे होईल आणि जर असे वादकथन करणारी व्यक्ती, अशा परिस्थितीवरून उपलक्षित होणाऱ्या अशा एकाहून अधिक पर्यायी संविदा किंवा नाती यांवर विसंबून राहू इच्छित असेल तर, तिला ते पर्याय नमूद करता येतील.

कायद्यांची गृहीतके.

१३. कोणत्याही पक्षकाराने कायद्याद्वारे आपल्या बाजूने जी वस्तुस्थिती गृहीत धरलेली असेल अथवा जी शाबीत करण्याचा भार दुसऱ्या पक्षावर असेल अशी कोणतीही वस्तुस्थिती, त्या वस्तुस्थितीचा प्रथम खास करून इन्कार करण्यात आला नसेल तर, कोणत्याही वादकथनात अभिकथन करण्याची आवश्यकता नाही. (उदाहरणार्थ, विनियमपत्राचे प्रतिफल—हक्कमागणीचे मुख्य आधारकारण म्हणून वादी प्रतिफलावरून नव्हे तर फक्त विनिमयपत्रावरून दावा दाखल करतो त्या बाबतीत.)

वादकथनावर सही करणे.

१४. प्रत्येक वादकथनावर पक्षकाराने व त्याचा प्लीडर असल्यास त्या प्लीडरने सही केली पाहिजे : परंतु, वादकथनार्थी पक्षकार हजर नसल्यामुळे किंवा अन्य सबळ कारणास्तव वादकथनावर सही करू शकत नसेल तर, त्याने स्वतःच्या वतीने वादकथनावर सही करण्यास अथवा दावा चालवण्यास किंवा त्यात बचाव देण्यास रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला त्यावर सही करता येईल.

नोटीस बजावण्याकरिता पत्ता.

[1][१४ क. (१) पक्षकाराकडून दाखल करण्यात आलेल्या प्रत्येक वादकथनासोबत विहित नमुन्यातील व नियम १४ मध्ये उपबंध केल्याप्रमाणे सही केलेले पक्षकाराच्या पत्त्यासंबंधीचे विवरण जोडावे लागेल.

(२) रीतसर भरलेल्या व पक्षकाराचा नवा पत्ता नमूद करणाऱ्या नमुन्यासोबत सत्यापित केलेला विनंती अर्ज न्यायालयामध्ये दाखल करून असा पत्ता वेळोवेळी बदलता येईल.

(३) पोटनियम (१) खाली जोडलेल्या विवरणात दिलेला पत्ता पक्षकाराचा "नोंदीव पत्ता" म्हणून संबोधण्यात येईल, आणि उपरोक्तप्रमाणे त्यात रीतसर बदल करण्यात येईपर्यंत, दाव्यामधील अथवा त्यामध्ये काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या विरुद्ध केलेल्या कोणत्याही अपिलातील सर्व आदेशिका बजावण्याच्या प्रयोजनार्थ, आणि अंमल बजावणीच्या प्रयोजनार्थ, तो पक्षकाराचा पत्ता असल्याचे मानण्यात येईल, आणि वादकारणाचा किंवा त्या प्रकरणाचा अंतिम निकाल झाल्यानंतर दोन वर्षांच्या कालावधीपर्यंत तो कायम राहील.

(४) कोणत्याही आदेशिकेची बजावणी सर्व बाबतीत पक्षकाराच्या नोंदीव पत्त्यावर, तो नेहमीच तेथे राहत होता असे समजून करता येईल.

[1][१४ क. (१) पक्षकाराकडून दाखल करण्यात आल्यावर प्रत्येक वादकथनासोबत विहित नमुन्यातील व नियम १४ मध्ये उपबंध केल्याप्रमाणे सही केलेले पक्षकारांच्या पत्त्यासंबंधीचे विवरण जोडावे लागेल. नंतर जादा दाखल केलेल्या पक्षकारांना अशा रीतीने दाखल केल्यानंतर तात्काळ या स्वरूपाचे लेखी ज्ञापन दाखल करावे लागेल.

(२) रीतसर भरलेल्या व पक्षकाराचा नवा पत्ता नमूद करणाऱ्या नमुन्यासोबत सत्यापित केलेला विनंती अर्ज न्यायालयामध्ये दाखल करून असा पत्ता वेळोवेळी बदलता येईल. न्यायालयास योग्य वाटेल अशा अन्य पक्षकारांना अशा बदलाची सूचना दिली पाहिजे आणि बदल दर्शविणारा नमुना एकतर वकिलांवर किंवा अशा पक्षकारांवर बजावला पाहिजे किंवा न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यांना, पोच मिळण्यासाठी आगाऊ टपालखर्च भरून नोंदणीकृत डाकेने पाठविला पाहिजे.

(३) पोटनियम (१) अन्वये जोडलेल्या विवरणात दिलेला पत्ता पक्षकाराचा "नोंदीव पत्ता" म्हणून संबोधण्यात येईल आणि उपरोक्तप्रमाणे त्यात रीतसर बदल करण्यात येईपर्यंत, दाव्यामधील अथवा त्यामध्ये काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या विरुद्ध केलेल्या कोणत्याही अपिलातील सर्व आदेशिका बजावण्याच्या प्रयोजनार्थ आणि अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ तो पक्षकाराचा पत्ता असल्याचे मानण्यात येईल आणि उपरोक्तप्रमाणे अधीन राहून, वादकारणाचा किंवा त्या प्रकरणाचा अंतिम निकाल झाल्यानंतर सहा वर्षांच्या कालावधीपर्यंत कायम राहील.

(४) (एक) पक्षकार नोंदीव पत्त्यावर न आढळल्यास, आणि ज्यावर नोटीस अथवा आदेशिका बजावता येईल असा कोणताही प्रतिनिधी किंवा त्याच्या कुटुंबातील कोणतीही प्रौढ पुरुष व्यक्ती हजर नसल्यास, त्या नोटिशीची किंवा आदेशिकेची एक प्रत घराच्या बाहेरच्या दारावर चिकटवण्यात यावी. जर ठरलेल्या तारखेस असा पक्षकार उपस्थित नसेल, तर, दुसरी तारीख ठरविण्यात यावी आणि नोटिशीची, समन्सची किंवा अन्य आदेशिकेची एक प्रत त्या पक्षकाराच्या नोंदीव पत्त्यावर, पावतीसाठी टपालखर्च अगोदर भरून नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात यावी. (बजावणीसाठी मुळात ठरविलेल्या तारखेपासून एका महिन्याच्या आत अशा रीतीने आगाऊ टपालखर्च भरण्यात आला पाहिजे) आणि अशी बजावणी ही, जणू नोटीस किंवा आदेशिका व्यक्तिशः बजावल्याप्रमाणे परिणामक असेल.

(दोन) जेव्हा पक्षकाराने प्लीडर नेमला असेल तेव्हा, पक्षकारावर बजावण्यासाठी काढलेली नोटीस किंवा आदेशिका, न्यायालयाने पक्षकाराच्या नोंदीव पत्त्यावर पाठविण्याबाबत निदेश दिलेले नसल्यास, आदेश तिसरा, नियम ५ अनुसार विहित केलेल्या पद्धतीने बजावण्यात यावी.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५६ (दोन) अन्वये हा नियम जादा दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (२) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

नोटीस बजावण्याकरिता पत्ता.

(५) पक्षकाराचा नोंदीव पत्ता अपुरा, खोटा किंवा काल्पनिक असल्याचे न्यायालयास आढळून आल्यास, स्वत: होऊन किंवा कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून न्यायालयास,—

(क्) असा नोंदीव पत्ता वादीने दिलेला असेल त्याबाबतीत, दावा स्थगित करण्याचा, किंवा

(ख्) असा पत्ता प्रतिवादीने दिलेला असेल त्याबाबतीत, त्याचा बचाव काढून टाकण्यात यावा आणि जणू काही त्याने कोणताही बचाव दिलेला नसल्याप्रमाणे, त्यास त्याचस्थितीत आणण्यात यावे,—

असा आदेश देता येईल.

(६) पोटनियम (५) खालील दावा स्थगित करण्यात आल्यास, किंवा बचाव काढून टाकण्यात आल्यास, स्वत:चा खरा पत्ता दिल्यानंतर वादीस किंवा, प्रकरणपरत्वे, प्रतिवादीस स्थगिती आदेश किंवा, प्रकरणपरत्वे, बचाव काढून टाकणारा आदेश रद्द करण्यात यावा म्हणून न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

(७) कोणत्याही पुरेशा कारणामुळे पक्षकार वेळेवर खरा पत्ता सादर करू शकला नाही अशी खात्री पटल्यास, न्यायालयाने दावाखर्चासंबंधीच्या किंवा अन्य प्रकारच्या त्यास योग्य वाटतील अशा अटींवर स्थगिती आदेश किंवा बचाव काढून टाकण्यासंबंधीचा आदेश रद्द केला पाहिजे आणि दाव्याच्या अथवा प्रकरणपरत्वे, बचावाच्या कार्यवाहीचा दिवस निश्चित केला पाहिजे.

(८) कोणत्याही कारणास्तव, न्यायालयाला योग्य वाटल्यास, अन्य कोणत्याही पत्त्यावर आदेशिकांची बजावणी करण्याचा निदेश देण्यास, या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायालयास प्रतिबंध होणार नाही.]

(५) पक्षकाराचा नोंदीव पत्ता विनिर्दिष्ट मुदतीत दाखल केला नाही, किंवा तो अपुरा, खोटा किंवा काल्पनिक असल्याचे न्यायालयास आढळून आल्यास, स्वत: होऊन किंवा कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून न्यायालयास—

(क्) नोंदीव पत्ता दाखल करण्यात वादीने कसूर केल्यास किंवा असा नोंदीव पत्ता वादीने दिलेला असेल त्याबाबतीत, दावा फेटाळण्याचा, किंवा

(ख्) नोंदीव पत्ता दाखल करण्यात प्रतिवादीने कसूर केल्यास किंवा असा नोंदीव पत्ता प्रतिवादीने दिलेला असेल त्या बाबतीत, त्याचा बचाव काढून टाकण्यात यावा आणि जणू काही त्याने कोणताही बचाव दिलेला नसल्याप्रमाणे त्यास त्याचस्थितीत आणण्यात यावे,

असा आदेश देता येईल.

(६) पोटनियम (५) खाली दावा फेटाळण्यात आल्यास किंवा बचाव काढून टाकण्यात आल्यास, स्वत:चा खरा पत्ता दिल्यानंतर वादीस किंवा, प्रकरणपरत्वे, प्रतिवादीस फेटाळणी आदेश किंवा, प्रकरणपरत्वे, बचाव काढून टाकणारा आदेश रद्द करण्यात यावा म्हणून न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

(७) कोणत्याही पुरेशा कारणामुळे पक्षकार वेळेवर खरा पत्ता सादर करू शकला नाही अशी खात्री पटल्यास, न्यायालयाने दावाखर्चासंबंधीच्या किंवा अन्य प्रकारच्या त्यास योग्य वाटतील अशा अटींवर फेटाळणी आदेश किंवा बचाव काढून टाकण्यासंबंधीचा आदेश रद्द केला पाहिजे आणि दाव्याच्या अथवा, प्रकरणपरत्वे, बचावाच्या कार्यवाहीचा दिवस निश्चित केला पाहिजे.

(८) पक्षकार नोंदीव पत्त्यावर न आढळल्यास, आणि ज्यावर नोटीस अथवा आदेशिका बजावता येईल असा कोणताही प्रतिनिधी किंवा त्याच्या कुटुंबातील कोणतीही प्रौढ पुरुष व्यक्ती हजर नसल्यास, त्या नोटिशीची किंवा आदेशिकेची एक प्रत घराच्या बाहेरच्या दारावर चिकटवण्यात यावी. जर ठरवलेल्या तारखेस असा पक्षकार उपस्थित नसेल तर दुसरी तारीख ठरविण्यात यावी आणि नोटिशीची, समन्सची किंवा अन्य आदेशिकेची एक प्रत त्या पक्षकाराच्या नोंदीव पत्त्यावर, पावतीसाठी टपालखर्च आगाऊ भरून नोंदणीकृत डाकेने पाठवण्यात यावी. (सुनावणीसाठी मुळात ठरविलेल्या तारखेपासून एका महिन्याच्या आत अशा रीतीने आगाऊ टपाल खर्च भरण्यात आला पाहिजे.) आणि अशी बजावणी ही जणू नोटीस किंवा आदेशिका व्यक्तिश: बजावल्याप्रमाणे परिणामक असेल.

(९) पोटनियम (५) अन्वये न्यायालयाने बचाव काढून टाकले असतील आणि परिणामी हुकूमनामा किंवा आदेश काढला असेल त्याबाबतीत, प्रतिवादीस किंवा, प्रकरणपरत्वे, विरुद्ध पक्षकारास, ज्या न्यायालयाने हुकूमनामा किंवा आदेश काढला असेल त्या न्यायालयाकडे तो हुकूमनामा किंवा आदेश रद्द करण्याबद्दल अर्ज करता येईल आणि जर त्याने नोंदीव पत्ता दाखल केला आणि त्याला पत्ता दाखल करण्यास कोणत्याही पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झालेला होता असे जर त्याने याबाबतीत न्यायालयाचे समाधान केले तर, न्यायालयाने त्यासाठी आपणांस योग्य वाटेल अशी, जामिनाबद्दलची किंवा अन्य अटही घालून त्याच्या

विरुद्धचा हुकूमनामा किंवा आदेश रद्द करण्याचा आदेश दिला पाहिजे आणि दावा किंवा कार्यवाही पुढे चालू करण्यासाठी एक दिवस नेमला पाहिजे. परंतु, जर हुकूमनाम्याचे किंवा आदेशाचे स्वरूप असे असेल की, केवळ अशा प्रतिवादीच्या किंवा विरुद्ध पक्षकाराच्या बाबतीत, तो रद्द करून चालणार नाही तर न्यायालयास, सर्व किंवा कोणतेही प्रतिवादी किंवा विरुद्ध पक्षकार यांच्याबाबतीत तो रद्द करता येईल.

(१०) कोणत्याही कारणास्तव न्यायालयास योग्य वाटल्यास अन्य कोणत्याही पत्त्यावर आदेशिकांची बजावणी करण्याचा निदेश देण्यास या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायालयास प्रतिबंध होणार नाही.

(११) पक्षकाराने प्लीडर नेमल्यास, पक्षकाराविरुद्ध काढलेली नोटीस किंवा आदेशिका, पक्षकाराच्या नोंदीव पत्त्यावर बजावण्याचा निदेश न्यायालयाने दिला नसेल तर, आदेश तीन, नियम ५ द्वारे विहित केलेल्या पद्धतीने बजावण्यात येईल.]

वादकथनांचे सत्यापन.

१५. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये अन्यथा उपबंध केला असेल, त्याव्यतिरिक्त, वादकथनार्थी पक्षकाराला किंवा अशा पक्षकारांपैकी एकाला अथवा प्रकरणाची सर्व तथ्ये एखाद्या अन्य व्यक्तीला माहीत आहेत, अशी न्यायालयाची खात्री करून दिल्यास, अशा अन्य व्यक्तीला प्रत्येक वादकथनाच्या तळाशी सत्यापन करावे लागेल.

वादकथनांचे सत्यापन.

१५. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये अन्यथा उपबंध केला असेल त्या व्यतिरिक्त, वादकथनार्थी पक्षकाराला किंवा अशांपैकी एका पक्षकाराला अथवा प्रकरणाची सर्व तथ्ये एखाद्या अन्य व्यक्तीला माहीत आहेत, अशी न्यायालयाची खात्री करून दिल्यास, अशा अन्य व्यक्तीला प्रत्येक वादकथनाच्या तळाशी सत्यापन करावे लागेल :

[१][परंतु, मुंबई शहर दिवाणी न्यायालयामध्ये दाखल करावयाच्या वादकथनांबाबत, असे सत्यापन, न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेमध्ये शपथ देवविण्याचा अधिकार असणाऱ्या उक्त न्यायालयाच्या एका अधिकाऱ्यासमोर आणि इतरत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम १३९ मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यासमोर केले पाहिजे.]

(२) सत्यापन करणाऱ्या व्यक्तीला वादकथनातील क्रमांकित परिच्छेदांचा निर्देश करून, स्वत:च्या माहितीनुसार आपण काय सत्यापित करीत आहोत व स्वत:ला मिळालेल्या व ती सत्य असल्याचे मानलेल्या माहितीनुसार काय सत्यापित करीत आहोत ते विनिर्दिष्ट करावे लागेल.

(२) सत्यापन करणाऱ्या व्यक्तीला वादकथनातील क्रमांकित परिच्छेदांचा निर्देश करून, स्वत:च्या माहितीनुसार आपण काय सत्यापित करीत आहोत व स्वत:ला मिळालेल्या व ती सत्य असल्याचे मानलेल्या माहितीनुसार, काय सत्यापित करीत आहोत, ते विनिर्दिष्ट करावे लागेल.

(३) सत्यापन करणाऱ्या व्यक्तीला सत्यापनावर सही करावी लागेल आणि कोणत्या तारखेस व कोणत्या ठिकाणी सही केली ते नमूद करावे लागेल.

(३) सत्यापन करणाऱ्या व्यक्तीला सत्यापनावर सही करावी लागेल आणि कोणत्या तारखेस व कोणत्या ठिकाणी सही केली ते नमूद करावे लागेल.

वादकथने काढून टाकणे.

[१][१६. न्यायालयास कोणत्याही वादकथनातील जी बाब—

(क) अनावश्यक, अपप्रवादात्मक, क्षुल्लक किंवा तापदायक असेल, अथवा

(ख) दाव्याच्या रास्त संपरीक्षेस बाधक, अडचणीची किंवा विलंबकारी ठरू शकेल,

अथवा

(ग) जिच्यामुळे न्यायालयाच्या आदेशिकेचा अन्यथा दुरुपयोग केल्यासारखा होईल,

अशी कोणतीही बाब काढून टाकण्याचा अथवा तीमध्ये सुधारणा करण्याचा आदेश, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर देता येईल.]

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५६ (तीन) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (२) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

वादकथनातील सुधारणा.

१७. न्यायालयास, कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर, दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या, वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत.

[1][१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. तथापि, जेव्हा समन्स बजावण्यात येऊन देखील प्रतिवादी हजर राहिला नसेल, अशा दाव्यात वादीने सुधारणा अर्ज केला असेल, आणि ज्या बाबतीत न्यायालयाच्या मते अर्ज केलेली सुधारणा महत्त्वाची असेल त्याबाबतीत, न्यायालयाने सुधारणेची परवानगी देण्यापूर्वी त्या अर्जाची नोटीस प्रतिवादीला दिली पाहिजे आणि ज्या बाबतीत प्रतिवादीच्या गैरहजेरीमध्ये प्रतिवादीला ज्या सुधारणेची नोटीस देण्यात आली आहे त्यापेक्षा बऱ्याच वेगळ्या स्वरूपाच्या कोणत्याही सुधारणेस न्यायालय परवानगी देईल त्या बाबतीत सुधारित वादपत्राची एक प्रत प्रतिवादीवर बजावली पाहिजे.] वादकथनातील सुधारणा.

आदेश निघाल्यानंतर सुधारणा करण्यात कसूर.

१८. ज्या पक्षकाराने सुधारणा करण्याच्या परवानगीचा आदेश मिळविला असेल त्या पक्षकाराने, आदेशाद्वारे त्या प्रयोजनार्थ नेमून दिलेल्या कालमर्यादेत, आणि किंवा कालमर्यादा दिली नसल्यास, आदेशाच्या दिनांकापासून चौदा दिवसांच्या आत, त्यानुसार सुधारणा केली नाही तर, उपरोक्तप्रमाणे अशी कालमर्यादा किंवा, प्रकरणपरत्वे, असा चौदा दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, न्यायालयाने मुदत वाढवून न दिल्यास, त्या पक्षकारास त्यात सुधारणा करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

आदेश सातवा

वादपत्र

वादपत्रात अंतर्भूत असावयाचे तपशील.

१. वादपत्रात पुढील तपशील अंतर्भूत असले पाहिजे :—

(क) दावा ज्या न्यायालयात लावला असेल, त्या न्यायालयाचे नाव ;

(ख) वादीचे नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण ;

(ग) प्रतिवादीचे नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण—त्याबाबत खातरजमा करून घेता येत असेल तेथवर ;

(घ) वादी किंवा प्रतिवादी अज्ञान किंवा विकल मनाची व्यक्ती असल्यास, तशा अर्थाचे निवेदन ;

(ङ) वादकारणास घटकभूत असलेली तथ्ये व ते केव्हा उद्भवले ते ;

(च) न्यायालयाला अधिकारिता असल्याचे दर्शविणारी तथ्ये ;

(छ) वादीने कोणता अनुतोष मागितला आहे ते ;

(ज) वादीने वजावट केली असेल अथवा त्याने आपल्या हक्कमागण्यांपैकी काही भाग सोडून दिला असेल तर, याप्रमाणे वजावट केलेली किंवा सोडून दिलेली रक्कम; आणि

वादपत्रात अंतर्भूत असावयाचा तपशील.

१. वादपत्रात पुढील तपशील अंतर्भूत असले पाहिजे :—

(क) दावा ज्या न्यायालयात लावला असेल त्या न्यायालयाचे नाव ;

(ख) वादीचे नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण;

(ग) प्रतिवादीचे नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण—त्याबाबत खातरजमा करून घेता येत असेल तेथवर ;

(घ) वादी किंवा प्रतिवादी अज्ञान किंवा विकल मनाची व्यक्ती असल्यास, तशा अर्थाचे निवेदन;

(ङ) वादकारणास घटकभूत असलेली तथ्ये व ते केव्हा उद्भवले ते ;

(च) न्यायालयाला अधिकारिता असल्याचे दर्शवणारी तथ्ये ;

(छ) वादीने कोणता अनुतोष मागितला आहे ते ;

(ज) वादीने वजावट केली असेल अथवा त्याने आपल्या हक्कमागण्यांपैकी काही भाग सोडून दिला असेल तर, त्याप्रमाणे वजावट केलेली किंवा सोडून दिलेली रक्कम; आणि

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (३) द्वारे मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आले.

(झ) अधिकारितेच्या व न्यायालय फीच्या प्रयोजनार्थ, दाव्याच्या विषयवस्तूंच्या मूल्यांसंबंधीचे निवेदन—त्या त्या प्रकरणी शक्य असेल तितपत.

[१][(झ) अधिकारितेच्या व न्यायालय फीच्या प्रयोजनार्थ, दाव्याच्या विषयवस्तूंच्या मूल्यासंबंधीचे न्यायालय फी आणि अधिकारिता यांचे मूल्य ज्या कायद्याच्या अनुसार स्वतंत्रपणे करण्यात आले असेल, त्या कायद्याचे उपबंध दर्शवणारे निवेदन—त्या त्या प्रकरणी शक्य असेल तितपत.]

पैशांबाबतच्या दाव्यामध्ये.

२. वादी पैशांची वसुली करू पाहत असेल त्याबाबतीत, वादपत्रामध्ये मागणी केलेली नेमकी रक्कम नमूद करावी लागेल :

परंतु, वादीने, दरम्यानच्या नफ्यासाठी अथवा वादी आणि प्रतिवादी यांच्यामधील नक्की न झालेले हिशेब पुरे झाल्यावर वादीला देय असल्याचे आढळून येईल, अशा रकमेसाठी [१][अथवा प्रतिवादीच्या कब्जात असलेल्या जंगम वस्तूंसाठी अथवा वाजवी तत्परता दाखवूनही ज्या ऋणांचे मूल्य त्याला ठरवता येणे शक्य नसेल, अशा ऋणांसाठी दावा लावला असेल त्या बाबतीत, जेवढ्या रकमेसाठी किंवा मूल्यासाठी दावा लावला असेल ती रक्कम किंवा मूल्य वादपत्रामध्ये अंदाजे नमूद करावे लागेल.].

दाव्यातील विषयवस्तू ही स्थावर मालमत्ता असेल त्याबाबतीत.

३. दाव्यातील विषयवस्तू ही स्थावर मालमत्ता असेल त्याबाबतीत, वादपत्रामध्ये मालमत्तेची ओळख पटवण्याइतपत पुरेसे वर्णन समाविष्ट असावे लागेल, आणि अशी मालमत्ता जमाबंदीच्या किंवा जमीन मोजणीच्या दफ्तरातील हद्दीवरून किंवा क्रमांकावरून ओळखता येण्याजोगी असेल, तर वादपत्रामध्ये अशा हद्दी किंवा क्रमांक नमूद केले पाहिजेत.

[१][३. दाव्यातील विषयवस्तू ही स्थावर मालमत्ता असेल त्याबाबतीत, वादपत्रामध्ये मालमत्तेची ओळख पटवण्याइतपत पुरेसे वर्णन समाविष्ट असावे लागेल आणि अशी मालमत्ता जमाबंदीच्या किंवा जमीन मोजणीच्या दफ्तरातील हद्दीवरून किंवा क्रमांकावरून ओळखता येण्याजोगी असेल तर, वादपत्रामध्ये अशा हद्दी किंवा क्रमांक नमूद केले पाहिजेत. अतिक्रमण झालेले असल्यास, वादपत्राच्या सोबत अतिक्रमणांचे स्थान व व्याप्ती दर्शविणारे शक्यतोवर अचूक रेखाचित्रही जोडले पाहिजे.]

दाव्यातील विषयवस्तू ही स्थावर मालमत्ता असेल त्या बाबतीत.

वादी प्रतिनिधी म्हणून दावा दाखल करील तेव्हा.

४. वादीने प्रातिनिधिक भूमिकेतून दावा लावल्यास, दाव्याच्या विषयवस्तूमध्ये त्याचा प्रत्यक्ष विद्यमान हितसंबंध आहे, एवढेच नव्हे तर, त्यासंबंधात दावा सुरू करणे त्यास शक्य व्हावे यासाठी त्याने आवश्यक असेल अशी कोणतीही कार्यवाही (असल्यास) ती त्याने केली आहे हेसुद्धा वादपत्रात दाखवून दर्शवे लागेल.

प्रतिवादीचा हितसंबंध व दायित्व दाखवणे.

५. प्रतिवादीचा दाव्याच्या विषयवस्तूमध्ये हितसंबंध आहे किंवा तशी त्याची मागणी आहे आणि वादीच्या मागणीला जाब द्यायला सांगितले जाण्यास तो दायी आहे, हे वादपत्रात दाखवून दर्शवे लागेल.

मुदतीबाबतच्या कायद्यामधून सूट मिळण्याकरिता आधारकारणे.

६. मुदतीबाबतच्या कायद्याने विहित केलेला कालावधी संपल्यानंतर, दावा दाखल केला असल्यास अशा कायद्यामधून ज्या कारणाच्या आधारे सूट मागितली असेल, ते आधारकारण वादपत्रात दाखवून द्यावे लागेल :

[१][परंतु, वादपत्रात नमूद न केलेल्या एखादया कारणाच्या आधारे मुदतीच्या कायद्यातून सूट मागण्यासाठी, असे कारण वादपत्रात नमूद केलेल्या कारणांशी विसंगत नसेल तर, न्यायालयास वादीला परवानगी देता येईल.]

मागावयाचा अनुतोष स्पष्टपणे नमूद करणे.

७. वादीला जो अनुतोष मागावयाचा असेल, तो प्रत्येक वादपत्रामध्ये स्पष्टपणे नमूद करावा लागेल—साधा असो किंवा पर्यायी म्हणून असो— आणि जो सर्वसाधारण किंवा अन्य प्रकारचा अनुतोष

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५७ अन्वये " जेवढ्या रकमेसाठी दावा लावला असेल ती रक्कम वादपत्रामध्ये अंदाजे नमूद करावी. लागेल" या मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड २१ अन्वये बदली दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (१) अन्वये बाब (झ) समाविष्ट करण्यात आली.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी–०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (२) अन्वये नियम ३ बदली दाखल करण्यात आला.

मागितलेलाच आहे असे समजून, तितक्याच मर्यादेपर्यंत, न्यायालयास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे नेहमी देता येतो अशा प्रकारचा अनुतोष मिळण्याची मागणी करण्याची आवश्यकता असणार नाही आणि प्रतिवादीने त्याच्या लेखी प्रतिवादपत्रात जो कोणताही अनुतोष मागितला असेल, त्याला हाच नियम लागू होईल.

वेगवेगळ्या कारणांवर आधारलेला अनुतोष.

८. वादीला वेगवेगळ्या व विभिन्न कारणांवर आधारलेल्या हक्कमागण्यांच्या किंवा वादकारणांच्या संबंधात अनुतोष मागावयाचा असेल त्याबाबतीत, ती कारणे शक्यतोवर वेगवेगळी व स्पष्टपणे नमूद केली पाहिजेत.

वादपत्र स्वीकृत करून घेतल्यानंतरची कार्यपद्धती.

९. (१) वादीने वादपत्रांच्या सोबत, त्याने जे कागदपत्र सादर केले असतील (केले असल्यास) त्या कागदपत्रांची यादी वादपत्रात पृष्ठांकित केली पाहिजे किंवा त्याला जोडली पाहिजे आणि वादपत्र स्वीकृत करून घेण्यात आले तर, जितके प्रतिवादी असतील तितक्या, वादपत्राच्या साध्या कागदावरील [१][प्रती न्यायालय निश्चित करील किंवा वेळोवेळी वाढवून देईल अशा मुदतीत सादर कराव्या लागतील], मात्र वादपत्राच्या लांबीमुळे किंवा प्रतिवादींच्या संख्येमुळे किंवा अन्य कोणत्याही पुरेशा कारणास्तव न्यायालयाने, करण्यात आलेल्या हक्कमागणीच्या स्वरूपाबाबत किंवा दाव्यामध्ये जो अनुतोष मागितला असेल त्याच्या स्वरूपाबाबत तेवढ्याच संख्येइतकी संक्षिप्त निवेदने सादर करण्यास वादीला परवानगी दिली असेल तर त्या बाबतीत, त्याने अशी निवेदने सादर केली पाहिजेत.

संक्षिप्त निवेदने.

[१][(१क) पोटनियम (१) खाली न्यायालयाने निश्चित केलेल्या किंवा वाढवून दिलेल्या मुदतीत वादीने प्रतिवादीवर समन्स बजावण्याकरिता आवश्यक असलेली फी भरली पाहिजे.]

(२) वादीने प्रातिनिधिक भूमिकेतून दावा दाखल केल्यास अथवा प्रतिवादीच्या किंवा प्रतिवादींपैकी कोणाच्याही विरुद्ध अशा प्रकारे वादीने दावा दाखल केल्यास कोणत्या नात्याने दावा दाखल केला आहे किंवा प्रतिवादीच्या विरुद्ध कोणत्या नात्याने दावा दाखल करण्यात आला आहे, ते अशा निवेदनांमध्ये दाखवून दिले पाहिजे.

(३) अशा निवेदनांमध्ये न्यायालयाच्या परवानगीने, वादीला वादपत्राशी जुळतील अशा तऱ्हेने सुधारणा करता येतील.

(४) अशी यादी व प्रती किंवा निवेदने यांची तपासणी केल्यानंतर ती बरोबर असल्याचे आढळून आले तर न्यायालयाच्या मुख्य प्रशासी अधिकाऱ्याने त्यावर सही केली पाहिजे.

[१][९ (१) वादीने वादपत्रासह कोणतीही कागदपत्रे प्रस्तुत केली असतील तर त्याची यादी त्याने वादपत्रावर पृष्ठांकित केली पाहिजे किंवा त्याला जोडली पाहिजे.

मुख्य प्रशासी अधिकाऱ्याने वादपत्रासोबत प्रस्तुत करण्यात आलेल्या याद्यांवर व प्रतींवर सही करणे.

(२) अशा याद्या व आदेश चौथा, नियम १ अन्वये प्रस्तुत केलेली जोडपत्रे यांच्यासह वादपत्रांच्या प्रती मुख्य प्रशासी अधिकाऱ्याने तपासून पाहिल्यानंतर बिनचूक आढळल्या, तर त्याने त्यावर सही केली पाहिजे.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५७, (तीन) अन्वये " तितक्या प्रती सादर करील " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाचे कलम ५७, पोटकलम (पाच) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५, सप्टेंबर १९८३ सुधारणा (३) अन्वये बदली दाखल करण्यात आला.

कागदपत्र परत करणे.

[१०. (१) [नियम १० क च्या उपबंधांच्या अधीनतेने वादपत्र] ज्या न्यायालयामध्ये दावा दाखल करावयास हवा होता त्या व न्यायालयात दाखल करण्यासाठी दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर परत करण्यात येईल.

[१०. (१) नियम १०क च्या उपबंधांना अधीन राहून वादपत्र ज्या न्यायालयामध्ये दावा दाखल करावयास हवा होता त्या न्यायालयात दाखल करण्यासाठी दाव्याच्या कोणत्याही टप्प्यावर परत करण्यात येईल. वादीला किंवा त्याच्या प्लीडरला वादपत्र परत पाठविण्याच्या ठरवलेल्या तारखेविषयी कळवण्यात येईल.]

वादपत्र परत करणे.

[**स्पष्टीकरण.**— शंकानिरसनार्थ याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, अपील किंवा पुनरीक्षण न्यायालयास दाव्यामध्ये काढलेला हुकूमनामा अपास्त केल्यानंतर या पोटनियमाखाली वादपत्र परत करण्याचा नीदेश देता येईल.]

(२) वादपत्र परत करताना न्यायाधीश, त्यावर ते दाखल केल्याची व ते परत केल्याची तारीख, दाखल करणाऱ्या पक्षकाराचे नाव आणि परत करण्याच्या कारणांसंबंधीचे संक्षिप्त निवेदन नमूद करील.

वादपत्र परत करतानाची कार्यपद्धती.

[१० क. (१) एखाद्या दाव्यामध्ये प्रतिवादी न्यायालयात उपस्थित झाल्यानंतर, वादपत्र परत करण्यात यावे, असे न्यायालयाचे मत झाल्यास तसे करण्यापूर्वी न्यायालयाने आपला निर्णय वादीला कळविला पाहिजे.

वादपत्र परत करण्यात आल्यानंतर ज्या न्यायालयात ते दाखल करावयाचे त्या न्यायालयात उपस्थित राहण्याची तारीख निश्चित करण्याची न्यायालयाची शक्ती.

(२) पोटनियम (१) खाली वादीला कळविण्यात आल्यानंतर वादोस,—

(क) वादपत्र परत करण्यात आल्यानंतर कोणत्या न्यायालयात ते सादर करण्याचा आपला विचार आहे ते विनिर्दिष्ट करणारा,

(ख) उक्त न्यायालयामध्ये पक्षकारांनी उपस्थित राहण्यासाठी न्यायालयाने तारीख निश्चित करावी अशी विनंती करणारा, व

(ग) अशा प्रकारे निश्चित केलेल्या तारखेची नोटीस त्याला व प्रतिवादीला देण्यात यावी, अशी विनंती करणारा,—

अर्ज न्यायालयाकडे करता येईल.

(३) पोटनियम (२) खाली वादीने अर्ज केला असेल तेव्हा वादपत्र परत करण्यापूर्वी व दाव्याची संपरिक्षा करण्याची अधिकारिता आपणांस नाही या कारणावरून वादपत्र परत करण्याचा आदेश न्यायालयाकडून देण्यात आलेला असला तरीही न्यायालयाने,—

(क) वादपत्र ज्या न्यायालयात दाखल करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या न्यायालयात पक्षकारांनी उपस्थित होण्याकरिता तारीख निश्चित केली पाहिजे; आणि

(ख) वादीला आणि प्रतिवादीला उपस्थितीच्या अशा तारखेची नोटीस दिली पाहिजे.

(४) पोटनियम (३) खाली उपस्थितीच्या तारखेची नोटीस देण्यात आली असेल तेव्हा,—

(क) वादपत्र सादर करण्यात आल्यानंतर ते ज्या न्यायालयात दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाने लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव अन्यथा निदेश दिला असल्याखेरीज, दाव्यामध्ये उपस्थित होण्यासंबंधीचे समन्स प्रतिवादीवर बजावण्याची आवश्यकता असणार नाही; आणि

(ख) उक्त नोटीस ही वादपत्र परत करणाऱ्या न्यायालयाने निश्चित केलेल्या तारखेस वादपत्र ज्या न्यायालयात दाखल करावयाचे असेल, त्या न्यायालयात प्रतिवादीने उपस्थित होण्याकरिता काढलेले समन्स असल्याचे मानण्यात येईल.

(५) पोटनियम (२) खाली वादीने केलेला अर्ज न्यायालयाने मान्य केला असेल अशा बाबतीत, वादपत्र परत करण्याच्या आदेशाच्या विरुद्ध अपील करण्याचा हक्क वादीला असणार नाही.

---

१. छोटा नागपूर कूळवहिवाट अधिनियम, १९०८ (१९०८ चा बंगाल अधिनियम क्रमांक ६) च्या कलम २६५ अन्वयेच्या वसुलीच्या दाव्यांना हा नियम लागू करण्यात येतो.

२. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५७ (सहा) अन्वये "वादपत्र असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५७ (पाच) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

४. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५७ (सात) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (४) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

योग्य त्या न्यायालयाकडे दावा वर्ग करण्याचा अपील न्यायालयाची शक्ती.

१०ख. (१) वादपत्र परत करण्याच्या आदेशाच्या विरुद्ध अपील करण्यात आले असता, अपिलाची सुनावणी करणाऱ्या न्यायालयाने असा आदेश कायम केल्यास, वादीने अर्जाद्वारे तशी इच्छा व्यक्त केल्यास, वादपत्र परत करताना अपील न्यायालयास दावा ज्या न्यायालयात दाखल करावयास हवा होता त्या न्यायालयात (मग असे न्यायालय हे अपिलाची सुनावणी करणारे न्यायालय ज्या राज्यात असेल त्या राज्यामध्ये असो वा नसो) वादपत्र, मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ४६) याच्या उपबंधांच्या अधीनतेने दाखल करण्यात यावे असा निदेश देता येईल आणि ज्या न्यायालयात वादपत्र दाखल करण्यात यावे असा निदेश देण्यात आला असेल, त्या न्यायालयामध्ये पक्षकारांनी उपस्थित होण्याकरिता तारीख निश्चित करता येईल. अशी तारीख निश्चित करण्यात येईल तेव्हा मात्र ज्या न्यायालयात वादपत्र सादर केले असेल त्या न्यायालयाने काही कारणास्तव कारणे लेखी नमूद करून अन्यथा निदेश दिला असल्याखेरीज, ज्या न्यायालयात वादपत्र दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाने दाव्यामध्ये उपस्थित राहण्या-संबंधीचे समन्स प्रतिवादीवर बजावण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) पोटनियम (१) खाली न्यायालयाने दिलेल्या निदेशामुळे, ज्या न्यायालयात वादपत्र दाखल केले असेल त्या न्यायालयाला असलेल्या दाव्याची संपरीक्षा करण्याच्या अधिकारितेला आक्षेप घेण्याचा पक्षकारांच्या हक्कांना कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही.]

वादपत्र फेटाळणे.

११. पुढील प्रकरणी वादपत्र फेटाळण्यात येईल,—

(क) जेव्हा त्यातून काही वादकारण दिसून येत नसेल ;

(ख) जो अनुतोष मागितला असेल त्याचे मूल्य कमी दाखविले गेले असेल व न्यायालय निश्चित करील अशा मुदतीच्या आत न्यायालयाने त्याला मूल्यांकनात सुधारणा करण्यास सांगितले असता वादीने तसे करण्यात कसूर केली असेल ;

(ग) मागितलेल्या अनुतोषाचे योग्य मूल्यांकन करण्यात आले असले, तरी वादपत्र अपुऱ्या मूल्याचा मुद्रांक लावलेल्या कागदावर लिहिलेले असेल आणि न्यायालय निश्चित करील अशा मुदतीत न्यायालयाने त्याला आवश्यक तो मुद्रांकित कागद सादर करण्यास सांगितले असता, वादीने तसे करण्यात कसूर केली असेल ;

(घ) वादपत्रात केलेल्या निवेदनावरून दाव्याला एखाद्या कायद्यानुसार रोध आहे असे दिसत असेल :

[1][परंतु, मूल्यांकनात सुधारणा करण्यासाठी किंवा आवश्यक तो मुद्रांकित कागद पुरवण्यासाठी न्यायालयाने निश्चित केलेल्या मुदतीच्या आत, वादी मूल्यांकनात सुधारणा करू शकला नाही किंवा आवश्यक तो मुद्रांकित कागद पुरवू शकला नाही याला एखादे अपवादात्मक स्वरूपाचे कारण होते आणि अशी मुदत वाढविण्यास नकार दिला तर वादीवर घोर अन्याय होईल अशी न्यायालयाची सकारण (ती कारणे नमूद करावी लागतील) खात्री पटल्याशिवाय न्यायालयाद्वारे निश्चित केलेली मुदत वाढवली जाणार नाही.]

वादपत्र फेटाळल्या-नंतरची कार्यपद्धती.

१२. वादपत्र फेटाळण्यात आल्यास न्यायाधीशाने तशा अर्थाचा आदेश व त्याबरोबरच अशा आदेशामागील कारणे नमूद केली पाहिजेत.

वादपत्र फेटाळल्या-मुळे नवीन वादपत्र सादर करण्यास केव्हा प्रतिबंध होत नाही.

१३. यात यापूर्वी निर्दिष्ट केलेल्या कारणां-पैकी कोणत्याही कारणास्तव वादपत्र फेटाळले गेल्यास तेवढ्याच कारणामुळे त्याच वादकारणाच्या संबंधात नवीन वादपत्र सादर करण्यास वादीला प्रतिबंध होणार नाही.

[1][**१३. यात यापूर्वी निर्दिष्ट केलेल्या कारणां-पैकी कोणत्याही कारणास्तव किंवा आदेश सहा, नियम १४क(५) (क) मध्ये उल्लेख केलेल्या कारणास्तव वादपत्र फेटाळले गेले तर, ते तेवढ्याच कारणांमुळे त्याच वादकारणाच्या संबंधात नवीन वादपत्र सादर करण्यास वादीला प्रतिबंध होणार नाही.**]

वादपत्र फेटाळल्या-मुळे नवीन वादपत्र सादर करण्यात केव्हा प्रतिबंध होत नाही.

वादपत्रात ज्यावर भरवसा ठेवला ती कागदपत्रे

ज्या आधारे वादीने दावा दाखल केला असेल तो दस्तऐवज व अन्य दस्तऐवजांची यादी.

१४. (१) वादीने आपल्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या एखाद्या दस्तऐवजाच्या आधारे दावा दाखल केल्यास, वादपत्र सादर करतेवेळी त्याला तो दस्तऐवज न्यायालयात हजर करावा लागेल आणि त्याचवेळी वादपत्रासोबत दाखल करण्यासाठी तो दस्तऐवज किंवा त्याची प्रत सुपूर्द करावी लागेल.

(२) आपल्या मागणीच्या पुष्टचर्थ पुरावा म्हणून तो अन्य कोणत्याही दस्तऐवजांवर (मग ते त्याच्या कब्जात अथवा नियंत्रणाखाली असोत वा नसोत) विसंबून असेल त्या बाबतीत, वादपत्रामध्ये समाविष्ट करण्यासाठी किंवा त्यासोबत जोडण्यासाठी त्याला एका यादीमध्ये अशा दस्तऐवजाची नोंद करावी लागेल.

वादीच्या कब्जामध्ये किंवा नियंत्रणाखाली नसलेल्या दस्त-ऐवजांच्या बाबतीत निवेदन.

१५. असा एखादा दस्तऐवज वादीच्या कब्जामध्ये किंवा नियंत्रणाखाली नसेल त्या बाबतीत, तो दस्तऐवज कोणाच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली आहे ते शक्यतो त्याला नमूद करावे लागेल.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५७ (आठ) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (५) अन्वये हा नियम समाविष्ट करण्यात आला.

१६. एखादा दावा परक्राम्य संलेखांवर आधारलेला असेल आणि संलेख गहाळ झाला आहे असे शाबीत झाले असेल व अशा संलेखावरील अन्य कोणत्याही व्यक्तीच्या हक्कमागण्यांबाबत वादीने न्यायालयाला समाधानकारक वाटेल अशा प्रकारे हानिरक्षणाचे अभिवचन दिलेले असेल तर, वादीने वादपत्र सादर करताना तो संलेख हजर केला असता आणि त्याचवेळी वादपत्राबरोबर दाखल करण्यासाठी संलेखाची प्रत सुपूर्द केली असती तर, न्यायालयाने जशा प्रकारचा हुकूमनामा काढला असता तसाच हुकूमनामा न्यायालयास काढता येईल. गहाळ झालेल्या परक्राम्य संलेखांवर आधारलेले दावे.

दुकानवही हजर करणे.

१७. (१) बँककार वही पुरावा अधिनियम, १८९१ (१८९१ चा १०) यामध्ये अन्यथा उपबंध केलेला असेल त्या व्यतिरिक्त, ज्याच्या आधारे वादीने दावा दाखल केला असेल तो दस्तऐवज म्हणजे त्याच्या कब्जातील किंवा नियंत्रणाखालील दुकानवहीतील किंवा अन्य हिशेब पुस्तकातील नोंद असेल तर, वादी ज्या नोंदीवर विसंबून असेल त्या नोंदीच्या प्रतीसह ती वही किंवा ते हिशेबपुस्तक, वादीला वादपत्र दाखल करण्याच्या वेळी हजर करावे लागेल.

मूळ नोंद चिन्हांकित करून परत करणे.

(२) न्यायालयाने किंवा ते याबाबत नेमील अशा अधिकाऱ्याने तो दस्तऐवज ओळखू यावा म्हणून ताबडतोब तो चिन्हांकित केला पाहिजे आणि त्याच्या प्रतीची तपासणी करून व मूळ कागदाशी ताडून पाहिल्यावर ती बरोबर असल्याचे आढळल्यास त्याने तसे प्रमाणित केले पाहिजे व पुस्तक वादीला परत केले पाहिजे आणि प्रत दाखल करण्याची तजवीज केली पाहिजे.

दुकानवही हजर करणे.

१७. (१) बँककार वही पुरावा अधिनियम, १८९१ यामध्ये अन्यथा उपबंध केलेला असेल त्या व्यतिरिक्त, ज्याच्या आधारे वादीने दावा दाखल केला असेल तो दस्तऐवज म्हणजे त्याच्या कब्जातील किंवा नियंत्रणाखालील दुकानवहीतील किंवा अन्य हिशेब पुस्तकातील नोंद असेल, तर वादी ज्या नोंदीवर विसंबून असेल त्या नोंदीच्या प्रतीसह ती वही किंवा ते हिशेबपुस्तक, वादीला वादपत्र दाखल करण्याच्या वेळी हजर करावे लागेल.

मूळ नोंद चिन्हांकित करून परत करणे.

(२) न्यायालयाने किंवा ते याबाबत नेमील अशा अधिकाऱ्याने तो दस्तऐवज ओळखू यावा म्हणून ताबडतोब तो चिन्हांकित केला पाहिजे आणि त्याच्या प्रतीची तपासणी करून व मूळ कागदाशी ताडून पाहिल्यावर तो बरोबर असल्याचे आढळल्यास त्याने तसे प्रमाणित केले पाहिजे व पुस्तक वादीला परत केले पाहिजे आणि प्रत दाखल करण्याची व्यवस्था केली पाहिजे[1]] :

परंतु, या नियमात निर्दिष्ट केलेली नोंद ही इंग्रजी व्यतिरिक्त किंवा त्या न्यायालयाच्या भाषेव्यतिरिक्त दुसऱ्या एखाद्या भाषेत असेल तर, वादीने त्या नोंदीची एक सत्य प्रत आणि एकतर तिचा इंग्रजीत किंवा न्यायालयाच्या भाषेत केलेला अनुवाद वादपत्रासोबत दाखल केला पाहिजे. अनुवाद करणाऱ्या व्यक्तीने असा अनुवाद बिनचूक असल्याचे शपथपत्रावर सत्यापित केले पाहिजे :

परंतु आणखी असे की, न्यायालयास वादपत्र अनुवादाशिवाय स्वीकारता येईल आणि न्यायालयाकडून ठरवण्यात येईल अशा मुदतीत उक्त अनुवाद सादर करण्याची परवानगी पक्षकारास देता येईल.

वरील पैकी कोणत्याही प्रकरणांमध्ये न्यायालयाने किंवा त्याच्या अधिकाऱ्याने मूळप्रत तपासण्याची व ती मूळ कागदाशी ताडून पाहण्याची आणि ती बरोबर असल्याचे प्रमाणित करण्याची आवश्यकता नाही.]

वादपत्र दाखल करताना हजर न केलेल्या दस्तऐवजांची अग्राह्यता.

१८. (१) वादपत्र सादर करताना, वादीने जो दस्तऐवज हजर करावयास हवा असताना अथवा वादपत्रात समाविष्ट करावयाच्या किंवा त्यास जोडावयाच्या यादीमध्ये नोंदावयास हवा असताना, तो त्यानुसार हजर करण्यात किंवा नोंदण्यात आला नसेल तो दस्तऐवज न्यायालयाचा परवानगीखेरीज दाव्याच्या सुनावणीच्या वेळी त्याच्या वतीने पुराव्यात दाखल करता येणार नाही.

(२) या नियमातील कोणतीही गोष्ट, प्रतिवादीच्या साक्षीदारांच्या उलट तपासणीसाठी किंवा प्रतिवादीने मांडलेल्या कोणत्याही बाजूला प्रत्युत्तर म्हणून हजर केलेल्या अथवा साक्षीदाराला केवळ स्वतःच्या स्मृतीला उजाळा देणे शक्य व्हावे म्हणून त्याच्याकडे देण्यात आलेल्या, दस्तऐवजांना लागू होणार नाही.

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (६) द्वारे पूर्णविरामाच्या ऐवजी विसर्ग व त्यानंतर परंतुके दाखल केली.

[१] १९. (१) प्रत्येक वादपत्राबरोबर किंवा विनंतीअर्जाबरोबर एक लेखी ज्ञापन असले पाहिजे ज्यामध्ये वादीवर किंवा विनंती अर्जदारावर नोटीस, समन्स किंवा इतर कार्यवाही ज्या पत्त्यावर बजावता येईल तो पत्ता देण्यात आला पाहिजे. नंतर जादा दाखल केलेल्या वादीने किंवा विनंती अर्जदारानेही अशाप्रकारे जादा दाखल करून घेतल्यावर लगेच अशा स्वरूपाचे ज्ञापन दाखल केले पाहिजे. वादपत्र किंवा मूळ विनंतीअर्ज याबरोबर पत्ता दाखल करणे.

(२) हा पत्ता, "नोंदीव पत्ता" म्हणून संबोधण्यात येईल आणि या आदेशातील नियम २४ च्या अधीनतेने तो, दाव्यातील सर्व कार्यवाहीमध्ये आणि अपिलांमध्ये आणि तसेच अंतिम निर्णयाच्या तारखेपासून सहा वर्षांच्या पुढील कालावधीसाठी अंमलबजावणीसह सर्व प्रयोजनांसाठी विधिग्राह्य समजण्यात येईल. नोंदीव पत्ता.

२०. पूर्वगामी नियमान्वये दाखल करावयाचा नोंदीव पत्ता हा ज्या जिल्हा न्यायालयामध्ये दावा किंवा विनंतीअर्ज दाखल करण्यात आला असेल अशा न्यायालयाच्या स्थानिक मर्यादांमधील असावा किंवा जर एखादया पक्षकाराला उपरोक्तप्रमाणे पत्ता सोयीस्करपणे देता येत नसेल तर, तो पक्षकार सर्वसाधारणपणे जेथे राहातो त्या ठिकाणाचा पत्ता द्यावा. दाखल करावयाच्या पत्त्याचे स्वरूप.

२१. (१) एखाद्या वादीला किंवा अर्जदाराला विनिर्दिष्ट कालावधीत नोंदीव पत्ता देण्यास फर्मावण्यात आले असता नोंदीव पत्ता देण्यात कसूर केली तर, त्याचे वादपत्र किंवा अर्ज न्यायालयाकडून स्वाधिकारे फेटाळला जाण्यास तो दायी ठरेल किंवा तशा आशयाचा आदेश काढण्यासाठी कोणत्याही पक्षकाराला अर्ज करता येईल आणि न्यायालयाला त्याला स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणे आदेश काढता येईल. पत्ता देण्यात कसूर केल्याचा परिणाम.

(२) पोटनियम (१) अन्वये वादपत्र किंवा अर्ज फेटाळण्यात आला असेल अशा बाबतीत, वादीला किंवा अर्जदाराला असे फेटाळले रद्द करणारा आदेश काढण्यासाठी अर्ज करता येईल आणि त्याने नोंदीव पत्ता दाखल केला व योग्य वेळेत पत्ता दाखल करण्यास त्याला पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता याबाबत न्यायालयाचे समाधान केले तर, न्यायालयाला, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे वादखर्चाच्या किंवा अन्य शर्तीवर असे फेटाळून लावणे रद्द करता येईल आणि दावा किंवा विनंतीअर्जाच्या कार्यवाहीची तारीख नेमून देता येईल. कसूर केव्हा क्षमापित करता येईल.

२२. एखादा पक्षकार त्याच्या नोंदीव पत्त्यावर सापडला नाही आणि ज्याच्यावर नोटीस किंवा आदेशिका बजावता येईल असा त्याचा अभिकर्ता किंवा त्याच्या कुटुंबातील प्रौढ पुरुष व्यक्ती उपस्थित नसेल तर, नोटिशीची किंवा आदेशिकेची प्रत त्याच्या घराच्या बाहेरच्या दरवाजावर चिकटवण्यात यावी. निश्चित केलेल्या तारखेला असा पक्षकार उपस्थित राहिला नाही तर दुसरी तारीख निश्चित करण्यात येईल आणि त्या नोटिशीची, समन्सची किंवा इतर आदेशिकेची एक प्रत पक्षकाराच्या नोंदीव पत्त्यावर, पाठवीसाठी टपालखर्च अगोदर भरून नोंदणीकृत, डाकेने पाठवण्यात येईल. पक्षकार नोंदीव पत्त्यावर सापडला नाही तर अनुसरावयाची कार्यपद्धती.

---

१. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक एफ. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड २५ द्वारे समाविष्ट केले.

(हे पूर्वप्रदान सुनावणीसाठी मुळात निश्चित केलेल्या एका महिन्याच्या आत करण्यात आले पाहिजे.) आणि अशी बजावणी ही, नोटीस किंवा आदेशिका ही व्यक्तिशः बजावण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

पक्षकाराने प्लीडर नेमला असेल अशा बाबतीत आदेशिकेची बजावणी.

२३. एखाद्या पक्षकाराने प्लीडर नेमला असेल अशा बाबतीत, त्या पक्षकाराविरुद्ध काढलेली नोटीस किंवा आदेश हा त्याच्या नोंदीव पत्त्यावर बजावावा असा निदेश न्यायालयाने दिला नसेल तर, तो निदेश आदेश तिसरा, नियम ५ याद्वारे विहित केलेल्या पद्धतीने बजावण्यात यावा.

नोंदीव पत्त्यातील बदल.

२४. ज्या पक्षकाराला त्याने उपरोक्तप्रमाणे दिलेला नोंदीव पत्ता बदलण्याची इच्छा असेल त्याने तशा आशयाचे नवीन लेखी ज्ञापन दाखल केले पाहिजे आणि न्यायालयाला तदनुसार अभिलेख सुधारण्याचे निदेश देता येतील. अशा ज्ञापनाची नोटीस न्यायालयाला माहिती देणे योग्य वाटेल अशा इतर पक्षकारांना देण्यात येईल आणि ती न्यायालयाला योग्य वाटेल त्याप्रमाणे,एकतर प्लीडरवर किंवा अशा पक्षकारांवर बजावण्यात येईल किंवा पोचपावतीसाठी टपालखर्च अगोदर भरून नोंदणीकृत डाकेने त्यांच्याकडे पाठविण्यात येईल.

नियम न्यायालयावर बंधनकारक नसणे.

२५. नोटीस किंवा आदेशिका इतर कोणत्याही पद्धतीने बजावणे योग्य आहे असे न्यायालयाचे मत असेल तर, या आदेशातील नियम १९, २२, २३ आणि २४ यांमधील कोणत्याही गोष्टीनुळे न्यायालयास तसे करण्यास प्रतिबंध होणार नाही.]

आदेश एकविसावा, नियम २२ याखालील नोटिशीबाबत प्रयोज्यता.

२६. या आदेशाचे नियम १९, २२, २३ व २४ यांमधील कोणतीही गोष्ट, या संहितेमधील आदेश एकविसावा, नियम २२, पोटनियम (१), खंड (ख) द्वारे विहित केलेल्या नोटिशीला लागू होणार नाही.]

आदेश आठवा

[1][प्रतिवादपत्र, बजावट व प्रतिहक्कमागणी]

[1][प्रतिवादपत्र, बजावट व प्रतिहक्कमागणी आणि त्यासंबंधी व्यवस्था व्यवतीबाबत कार्यपद्धती.]

प्रतिवादपत्र.

[1][(१)] प्रतिवादीस पहिल्या सुनावणीच्या वेळी किंवा त्याआधी किंवा न्यायालय अनुज्ञा देईल अशा मुदतीत, आपल्या बचावाचे प्रतिवादपत्र सादर करता येईल किंवा न्यायालयाने तसे करण्यास फर्मावल्यास त्याला ते सादर करावे लागेल.

प्रतिवादपत्र.

[2][(१) न्यायालयाने तसे करण्यास फर्मावले असता प्रतिवादीला त्याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत किंवा न्यायालय परवानगी देईल अशा वाढीव मुदतीत आपल्या बचावाचे प्रतिवादपत्र प्रस्तुत करावे लागेल. तत्पूर्वी तो ती न्यायालयात प्रस्तुत करण्यासाठी ठरवलेल्या तारखेस किंवा त्याआधी प्रतिवादपत्राची एक प्रत वादीवर किंवा त्याच्या वकिलावर बजावील किंवा न्यायालयात प्रतिवादपत्र दाखल करताना वादीच्या उपयोगासाठी त्याची एक प्रत दाखल करील :

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५८(एक) अन्वये बदली दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५८ (दोन) (क) अन्वये नियम १ ला त्या नियमाचा पोटनियम (१) असा नवीन क्रमांक दिला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (१) द्वारे बदली दाखल केले.

२. वरील अधिसूचना, सुधारणा (२) द्वारे बदली दाखल केले.

परंतु, प्रतिवादपत्र दाखल करण्यासाठी पहिले स्थगन साधारणत: चार आठवड्यांपेक्षा अधिक असता कामा नये आणि लेखी नमूद करावयाच्या कारणांवरून असेल ते वगळता, आणखी कोणत्याही स्थगनास परवानगी देण्यात येणार नाही.]

[१][(२) नियम ८क मध्ये उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, प्रतिवादी आपला बचाव, वजावटीची हक्कमागणी किंवा प्रतिहक्कमागणी यांच्या पुष्टचर्थ एखाद्या दस्तऐवजावर (मग तो त्याच्या कब्जात किंवा अधिकाराखाली असो वा नसो) विसंबून असल्यास त्याने असे दस्तऐवज यादीमध्ये नोंदले पाहिजेत, आणि—

(२) प्रतिवादीचा बचाव किंवा वजावटीची हक्कमागणी किंवा प्रतिहक्कमागणी त्याच्या कब्जात किंवा अधिकाराखाली असलेल्या दस्तऐवजावर आधारलेली असेल तर, त्याने प्रतिवादपत्र सादर करताना तो दस्तऐवज न्यायालयात सादर केला पाहिजे आणि त्याचवेळी प्रतिवादपत्रासोबत दाखल करण्यासाठी तो दस्तऐवज किंवा त्याची प्रत सुपूर्द केली पाहिजे.

(क) प्रतिवादपत्र सादर केलेले असल्यास त्या प्रतिवादपत्रात अशी यादी जोडली पाहिजे :

परंतु, प्रतिवादीने आपल्या कब्जात किंवा अधिकाराखाली असलेल्या दस्तऐवजाच्या आधारे आपल्या प्रतिवादपत्रात वजावटीची हक्कमागणी केल्यास अथवा प्रतिहक्कमागणी केल्यास त्याने प्रतिवादपत्र सादर करण्याच्या वेळी तो दस्तऐवज न्यायालयात सादर केला पाहिजे आणि त्याचवेळी प्रतिवादपत्रासोबत दाखल करण्यासाठी तो दस्तऐवज किंवा त्याची प्रत सुपूर्द केली पाहिजे;

(ख) प्रतिवादपत्र सादर केलेले नसल्यास, दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी त्याने अशी यादी सादर केली पाहिजे.

(३) असा एखादा दस्तऐवज प्रतिवादीच्या कब्जात किंवा अधिकाराखाली नसेल तर, तो कोणाच्या कब्जात किंवा अधिकाराखाली आहे ते त्याने त्याला शक्य असेल तेव्हा तेव्हा नमूद केले पाहिजे.

(३) जेव्हा तो बचावाच्या किंवा वजावटीच्या हक्कमागणीच्या किंवा प्रतिहक्कमागणीच्या, पुष्टचर्थ पुरावा म्हणून इतर कोणत्याही दस्तऐवजावर (मग ते त्याच्या कब्जात किंवा अधिकाराखाली असो वा नसो) विसंबून असेल तर, त्याने प्रतिवादपत्रात घालावयाच्या किंवा त्याला जोडावयाच्या सूचीमध्ये अशा दस्तऐवजांची नोंद केली पाहिजे.

(४) अशी कोणतीही यादी जोडण्यात आली नसेल अथवा सादर करण्यात आली नसेल तर त्या प्रयोजनार्थ, न्यायालयास, त्यास योग्य वाटेल अशी आणखी मुदत त्याला देता येईल.

(४) असा एखादा दस्तऐवज प्रतिवादीच्या कब्जात किंवा अधिकाराखाली नसेल तर, तो कोणाच्या कब्जात किंवा अधिकाराखाली आहे ते त्याने त्याला शक्य असेल तेव्हा तेव्हा नमूद केले पाहिजे.

(५) पोटनियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादींमध्ये नोंदावयास हवा होता असा जो दस्तऐवज अशा प्रकारे नोंदण्यास आला नसेल तो न्यायालयाच्या परवानगीखेरीज, दाव्याच्या सुनावणीच्या वेळी प्रतिवादीच्या वतीने पुराव्यात दाखल करून घेतला जाणार नाही.

(५) प्रतिवादीने त्याच्या प्रतिवादपत्राबरोबर न्यायालयास सादर करणे आवश्यक असलेला किंवा प्रतिवादपत्रामध्य घालावयाच्या किंवा त्याला जोडावयाच्या सूचीमध्ये नोंद करणे आवश्यक असलेला दस्तऐवज जर तदनुसार सादर करण्यात किंवा नोंदण्यात आला नसेल तर, न्यायालयाच्या परवानगीखेरीज तो, दाव्याच्या सुनावणीच्या वेळी त्याच्या वतीने पुराव्यात दाखल करून घेतला जाणार नाही.

(६) पोटनियम (५) मधील कोणतीही गोष्ट, वादीच्या साक्षीदारांच्या उलट तपासणीसाठी किंवा वादपत्र दाखल केल्यानंतर वादीने प्रतिवादी-दाखल मांडलेल्या कोणत्याही बाजूला प्रत्युत्तर म्हणून हजर केलेल्या अथवा साक्षीदाराला केवळ स्वत:च्या स्मृतीला उजाळा देणे शक्य व्हावे म्हणून त्याच्याकडे देण्यात आलेल्या दस्तऐवजांना लागू होणार नाही.

(६) या नियमाच्या पूर्वगामी पोटनियमातील कोणतीही गोष्ट, वादीच्या किंवा इतर प्रतिवादींच्या किंवा त्यांच्या साक्षीदारांच्या उलट तपासणीसाठी हजर केलेल्या किंवा साक्षीदाराला केवळ त्याच्या स्मृतीला उजाळा देणे शक्य व्हावे म्हणून दिलेल्या दस्तऐवजांना लागू होणार नाही.

---

१. सन १९७६ चा अधि १०४, च्या कलम ५८ (दोन) (ख) अन्वये समाविष्ट केला.

(७) न्यायालय पोटनियम (५) खाली परवानगी देईल तेव्हा त्याने तसे करण्याबद्दलची आपली कारणे नमूद केली पाहिजेत आणि पोटनियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या यादीमध्ये दस्तऐवज न नोंदण्याबद्दल न्यायालयाचे समाधान होईल असे सबळ कारण दाखवून दिल्याखेरीज, अशी कोणतीही परवानगी दिली जाणार नाही.]

नवीन तथ्यासंबंधी विशेषकरून वादकथन केले पाहिजे.

२. दावा टिकण्यासारखा नाही किंवा कायद्याच्या दृष्टीने तो संव्यवहारशून्य किंवा शून्यकरणीय आहे हे दर्शविणाऱ्या बाबी आणि बचावाची जी आधारकारणे उदघृत केली नाहीत तर विरुद्ध पक्ष चकित होईल किंवा त्यामुळे कपट, मुदतमर्यादा, हक्कवर्जन, प्रदानपालन किंवा बेकायदेशीरपणाची निदर्शक अशी तथ्ये यांसारखे वादपत्रातून न उद्भवणारे तथ्यविषयक वादमुद्दे निर्माण होऊ शकतील अशी बचावाची सर्व आधारकारणे प्रतिवादीने आपल्या वादकथनाद्वारे मांडली पाहिजेत.

इन्कार विनिर्दिष्ट असावा.

३. वादीने अभिकथन केलेली कारणे प्रतिवादीने आपल्या प्रतिवादपत्रात मोघमपणे नाकबूल करणे पुरेसे होणार नाही तर नुकसानीच्या बाबी व्यतिरिक्त ज्याची सत्यता त्याला मान्य नसेल अशा प्रत्येक अभिकथित तथ्याचा प्रतिवादीने स्पष्टपणे परामर्श घेतला पाहिजे.

उडवाउडवीचा इन्कार.

४. वादपत्रामध्ये अभिकथन केलेल्या तथ्याचा प्रतिवादीला इन्कार करावयाचा असेल तर, त्याने उडवाउडवी करून इन्कार करता कामा नये तर, सारभूत मुद्याला उत्तर दिले पाहिजे. म्हणजे असे की, जर त्याला विवक्षित रक्कम मिळाल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तर, आपणांस विशिष्ट रक्कम मिळाल्याचा केवळ इन्कार करणे हे पुरेसे होणार नाही, तर त्याला ती विशिष्ट रक्कम किंवा तिचा कोणताही भाग मिळाला या गोष्टीचा त्याने इन्कार केला पाहिजे किंवा त्याला किती रक्कम मिळाली हे त्याने नमूद केले पाहिजे आणि भिन्न भिन्न परिस्थितीमध्ये अभिकथन करण्यात आले असेल तर त्या परिस्थितीसह त्याचा इन्कार करणे पुरेसे होणार नाही.

स्पष्ट इन्कार.

५. [१][(१)] वादपत्रातील प्रत्येक अभिकथित तथ्याचा, जर स्पष्टपणे किंवा आवश्यक त्या ध्वनितार्थाने इन्कार करण्यात आला नाही तर, किंवा प्रतिवादीच्या वादकथनात स्वीकृत न केल्याचे नमूद केलेले नसेल तर, ते स्वीकृत केले असल्याचे मानण्यात येईल. मात्र अपंग व्यक्तीच्या विरुद्ध असे मानले जाणार नाही :

परंतु, न्यायालयास स्वविवेकानुसार, अशा प्रकारे स्वीकृत केलेले कोणतेही तथ्य अशा स्वीकृती-व्यतिरिक्त अन्य प्रकारे शाबीत करण्यास फर्मविता येईल.

[२][(२)] प्रतिवादीने वादकथन दाखल केले नसेल तर, वादपत्रामध्ये अंतर्भूत असलेल्या तथ्यांच्या आधारे न्यायालयाने न्यायनिर्णय अधिघोषित करणे कायदेशीर असेल. मात्र अपंग व्यक्तीच्या विरुद्ध असे करता येणार नाही. परंतु स्वविवेकानुसार न्यायालयास असे कोणतेही तथ्य शाबीत करण्यास फर्माविता येईल.

(३) न्यायालयाने पोटनियम (१) च्या परंतुकान्वये किंवा पोटनियम (२) अन्वये आपल्या स्वविवेकाचा वापर करताना प्रतिवादी प्लीडरची नेमणूक करू शकला असता काय किंवा त्याने तसे केले आहे काय या गोष्टीचा योग्य तो विचार केला पाहिजे.

(४) या नियमाखाली न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात येईल तेव्हा तेव्हा हुकूमनामा अशा न्यायनिर्णयास अनुसरून तयार करण्यात येईल आणि अशा हुकूमनाम्यावर ज्या तारखेस न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात आला असेल तीच तारीख नमूद केली पाहिजे.]

वजावटीचा तपशील प्रतिवादपत्रात देणे.

६. (१) पैशांच्या वसुलीसाठी दाखल केलेल्या दाव्यामध्ये वादीच्या मागणीविरुद्ध प्रतिवादीने वादीकडून त्याला कायदेशीरपणे वसूल करता येण्याजोगा व न्यायालयाच्या अधिकारितेच्या द्रव्यविषयक मर्यादेपेक्षा अधिक नसेल एवढचा कोणत्याही विवक्षित रकमेच्या वजावटीची हक्कमागणी केली असेल आणि वादीच्या दाव्यामध्ये दोन्ही पक्षकारांचे जे नाते आहे तेच येथेही कायम असल्यास प्रतिवादीस तो वजावाट करू इच्छित असलेल्या ऋणांचा तपशील समाविष्ट असणारे प्रतिवादपत्र दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी सादर करता येईल. मात्र न्यायालयाने तशी परवानगी दिल्याशिवाय नंतर असे प्रतिवादपत्र सादर करता येणार नाही.

वजावटीचा प्रभाव.

(२) मूळ हक्कमागणीच्या व वजावटीच्या संबंधात अंतिम न्यायनिर्णय अधिघोषित करणे न्यायालयाला शक्य व्हावे यासाठी ते प्रतिवादपत्र उलट दाव्यामधील वादपत्राप्रमाणेच परिणामक होईल, मात्र त्यामुळे हुकूमनाम्याअन्वये कोणत्याही प्लीडरला येणे असलेल्या दावाखर्चाच्या रकमेच्या संबंधात, त्याचा हुकूमनाम्यातील रकमेवर जो धारणाधिकार असेल त्यावर परिणाम होणार नाही.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५८ (तीन) अन्वये नियम ५ ला त्या नियमाचा पोटनियम (१) असा पुनः क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५८ (तीन) द्वारे समाविष्ट केले.

(३) प्रतिवादीच्या प्रतिवादपत्रासंबंधीचे नियम वजावटीच्या उत्तरादाखल दिलेल्या प्रतिवादपत्रास लागू होतात.

उदाहरणे

(क्) "क" हा "ख" च्या नावे २,००० रुपयांचे मृत्युपत्रित दान देतो आणि "ग" ला आपला मृत्युपत्रव्यवस्थापक व अवशिष्ट उत्तरदानग्राही म्हणून नेमतो. "ख" मृत्यू पावतो आणि "घ" हा "ख" च्या मालमत्तेसंबंधीचे प्रशासनपत्र मिळवतो. "घ" साठी जामीनदार म्हणून "ग" १,००० रुपये भरतो, नंतर "घ" हा उत्तरदानासाठी "ग" विरुद्ध दावा दाखल करतो. "ग" आपले १,००० रुपयांचे ऋण उत्तरदानातून वळते करू शकत नाही. कारण १,००० रुपये या रकमेच्या संबंधात "ग" व "ख" यांचे जे नाते आहे तेच नाते उत्तरदानाच्या संबंधात त्यांच्यामध्ये नाही.

(ख्) "क" हा मृत्युपत्र न करता व "ख" चे ऋण मागे ठेऊन मरण पावतो. "ग" हा "क" च्या मालमत्तेसंबंधीचे प्रमाणपत्र मिळवतो आणि "ख" हा "ग" कडून मालमत्तेचा काही भाग खरेदी करतो. "ग" ने खरेदी रकमेकरिता "ख" विरुद्ध दाखल केलेल्या दाव्यात, "ख" ते ऋण किमतीतून वळते करू शकत नाही, कारण "ग" हा दोन भूमिकांमध्ये वावरत आहे. एक म्हणजे "ख" ला मालमत्ता विकणारा म्हणून त्या भूमिकेतून तो "ख" विरुद्ध दावा दाखल करतो. आणि दुसरे म्हणजे "क" चा प्रतिनिधी म्हणून.

(ग्) "क" हा "ख" विरुद्ध एका विनिमयपत्रावरून दावा दाखल करतो. "क" ने "ख" च्या मालाचा विमा उतरवण्याच्या कामी उपेक्षा करण्याचे गैरकृत्य केले आहे आणि म्हणून तो आपणास भरपाई देण्यास दायी आहे असे अभिकथन करून "क" त्याबद्दल वजावट मागतो. ही रक्कम किती ते निश्चित झालेले नसल्याने ती वळती करता येत नाही.

(घ्) "क" हा "ख" विरुद्ध एका विनिमयापत्रावरून ५०० रुपयांकरता दावा दाखल करतो. "ख" कडे "क" विरुद्ध मिळालेला १,००० रुपयांचा न्यायनिर्णय आहे. या दोन्ही हक्कमागण्या निश्चित असल्याने या पैशासंबंधीच्या मागण्यांची एकमेकांशी वजावट होऊ शकते.

(ङ्) अतिक्रमण केल्याबद्दल भरपाई मिळण्यासाठी "क" हा "ख" विरुद्ध दावा दाखल करतो. "ख" कडे "क" कडून मिळालेली १,००० रुपयांची वचनचिठ्ठी आहे व दाव्यामध्ये जी कोणतीही रक्कम "क" वसूल करील तिच्यातून ही रक्कम वळती करावी अशी "ख" हक्कमागणी करतो. "ख" ला तसे करता येईल. कारण "क" ने ती रक्कम वसूल केली की, लगेच हया दोन्ही रकमा म्हणजे निश्चित स्वरूपाच्या पैशाच्या मागण्या होतील.

(च्) "क" आणि "ख" १,००० रुपयांकरता "ग" विरुद्ध दावा दाखल करतात. "ग" हा याला फक्त "क" कडून येणे असलेले ऋण वळते करून घेऊ शकत नाही.

(छ्) "क" हा १,००० रुपयांकरता "ख" आणि "ग" यांच्याविरुद्ध दावा दाखल करतो. "ख" हा त्याला फक्त "क" कडून येणे असलेले ऋण वळते करून घेऊ शकत नाही.

(ज्) "क" हा "ख" आणि "ग" यांच्या भागीदारी संस्थेचे १,००० रुपये देणे लागतो. "ख" मरण पावतो व "ग" मागे हयात राहतो. "क" हा "ग" कडून वेगळ्या भूमिकेतून त्याला येणे असलेल्या १,५०० रुपयांच्या ऋणाकरता दावा दाखल करतो. "ग" ला १,००० रुपयांचे ऋण वळते करता येईल.

प्रतिवादीची प्रतिहक्कमागणी.

[1][६क. (१) दाव्यामधील प्रतिवादीस नियम ६ खाली वादकथनात वजावट मागण्याचा त्याला जो हक्क आहे त्याच्याशिवाय आणखी वादीच्या हक्कमागणीविरुद्ध प्रतिहक्कमागणी म्हणून दावा दाखल करण्यापूर्वी किंवा त्यानंतर परंतु, प्रतिवादीने त्याचा बचाव देण्यापूर्वी अथवा त्याचा बचाव देण्यासाठी विहित केलेली मुदत संपण्यापूर्वी, वादीच्याविरुद्ध प्रतिवादीला उपलब्ध होणाऱ्या वादकारणाच्या संबंधात कोणताही हक्क किंवा हक्कमागणी सादर करता येईल—मग अशी प्रतिहक्कमागणी नुकसानी बद्दलच्या हक्क-मागणीच्या स्वरूपाची असो वा नसो :

परंतु, अशी प्रतिहक्कमागणी न्यायालयाच्या अधिकारितेच्या द्रव्यविषयक मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये.

(२) अशी प्रतिहक्कमागणी उलट दाव्याप्रमाणेच परिणामकारक होईल, ज्यामुळे त्याच दाव्यामध्ये मूळ हक्कमागणी व प्रतिहक्कमागणी या दोहोंवरील अंतिम न्यायनिर्णय अधिघोषित करणे न्यायालयास शक्य होईल.

(३) न्यायालयाकडून निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत वादीला प्रतिवादीच्या प्रतिहक्कमागणी-च्या उत्तराबाबत प्रतिवादपत्र दाखल करण्याची मोकळीक असेल.

(४) अशी प्रतिहक्कमागणी ही वादपत्र म्हणून समजण्यात येईल व वादपत्रांना लागू असलेल्या नियमाद्वारे तिचे नियमन होईल.

प्रतिहक्कमागणी नमूद करणे.

६ख. एखादा प्रतिवादी प्रतिहक्कमागणीच्या पुष्टयर्थ एखाद्या कारणाचा आधार घेऊ पहात असल्यास प्रतिहक्कमागणीच्या स्वरुपात आपण तसे करत आहोत असे त्याला आपल्या प्रतिवादपत्रात स्पष्टपणे नमूद करावे लागेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५८ (चार) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

प्रतिहक्कमागणी वगळणे.

६ग. प्रतिवादीने प्रतिवादार्थ प्रतिहक्कमागणी सादर केल्यास आणि त्याद्वारे प्रस्तुत केलेल्या हक्कमागणीचा निकाल प्रतिहक्कमागणी म्हणून नव्हे तर स्वतंत्र दाव्यामध्ये करावयास हवा असे वादीचे म्हणणे असल्यास, प्रतिहक्कमागणी संबंधातील वादमुद्दे निश्चित करण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी वादी अशी मागणी वगळण्यात यावी अशा अर्थाच्या आदेशासाठी न्यायालयाकडे अर्ज करू शकेल आणि अशा अर्जाची सुनावणी केल्यानंतर न्यायालयास स्वतःला योग्य वाटेल असा आदेश काढता येईल.

दावा बंद पडल्याचा प्रभाव.

६घ. प्रतिवादी प्रतिहक्कमागणी सादर करील अशा कोणत्याही प्रकरणामध्ये वादीचा दावा स्थगित, बंद किंवा फेटाळण्यात आला तरीही प्रतिहक्कमागणीसंबंधीची कार्यवाही पुढे चालवता येईल.

प्रतिहक्कमागणीस उत्तर देण्यात वादीची कसूर.

६ङ. प्रतिवादीने केलेल्या प्रतिहक्कमागणीस उत्तर देण्यात वादीने कसूर केल्यास, न्यायालयास वादीच्या विरुद्ध करण्यात आलेल्या प्रतिहक्कमागणीसंबंधात त्याच्याविरुद्ध न्यायनिर्णय अधिघोषित करता येईल किंवा प्रतिहक्कमागणीच्या संबंधात स्वतःला योग्य वाटेल असा आदेश काढता येईल.

प्रतिहक्कमागणी सफल झाल्यास प्रतिवादीला अनुतोष मिळणे.

६च. कोणत्याही दाव्यामध्ये, वादीच्या हक्कमागणीविरुद्ध वजावटीचा हक्क किंवा प्रतिहक्कमागणी बचाव म्हणून शाबीत करण्यात आली आणि वादीला किंवा, प्रकरणपरत्वे, प्रतिवादीला काही येणे बाकी असल्याचे आढळून आल्यास न्यायालयास अशा बाकी रकमेस हक्कदार असलेल्या पक्षकाराच्या बाजूने न्यायनिर्णय देता येईल.

प्रतिवादपत्रासंबंधीचे नियम लागू असणे.

६छ. प्रतिहक्कमागणीला उत्तर म्हणून दाखल केलेल्या प्रतिवादपत्राला, प्रतिवादीच्या प्रतिवादपत्रासंबंधीचे नियम लागू होतील.]

वेगवेगळ्या कारणांवर आधारलेला बचाव, वजावट किंवा [प्रतिहक्कमागणी.]

७. वेगवेगळ्या व विभिन्न तथ्यांवर आधारलेल्या बचावाच्या किंवा वजावटीच्या [1][किंवा प्रतिहक्कमागणीच्या] निरनिराळ्या कारणांवर प्रतिवादी विसंबून असल्यास ती कारणे त्याने शक्यतोवर वेगवेगळी व विभिन्नपणे नमूद केली पाहिजेत.

बचावाचे नवीन आधारकारण.

८. दावा दाखल करण्यात आल्यानंतर अथवा वजावट मागणारे [2][किंवा प्रतिहक्कमागणी] करणारे प्रतिवादपत्र सादर करण्यात आल्यानंतर उद्भवलेले बचावाचे कोणतेही आधारकारण, प्रतिवादीला किंवा, प्रकरणपरत्वे, वादीला आपल्या प्रतिवादपत्रामध्ये उपस्थित करता येईल.

ज्या दस्तऐवजांच्या आधारे प्रतिवादीने अनुतोष मागितला असेल ते कागदपत्र सादर करण्याचे प्रतिवादीचे कर्तव्य.

[3][८क. (१) प्रतिवादीचा बचाव त्याच्या कब्जामध्ये किंवा अधिकाराखाली असलेल्या एखाद्या दस्तऐवजावर आधारलेला असल्यास, तो आपले प्रतिवादपत्र सादर करील त्यावेळी त्याला न्यायालयात तो दस्तऐवज हजर करावा लागेल आणि त्याचवेळी प्रतिवादपत्राबरोबर सादर करण्यासाठी तो दस्तऐवज किंवा त्यांची प्रत सुपूर्द करावी लागेल.

(२) या नियमान्वये प्रतिवादीने न्यायालयात जो दस्तऐवज हजर करावयास हवा असतानाही हजर केलेला नसेल तर तो दस्तऐवज न्यायालयाच्या परवानगीखेरीज दाव्याच्या सुनावणीच्या वेळी त्याच्या वतीने पुरावा म्हणून स्वीकारण्यात येणार नाही.

(३) या नियमातील कोणतीही गोष्ट,—

(क) वादीच्या साक्षीदारांच्या उलटतपासणीसाठी हजर केलेल्या किंवा,

(ख) वादपत्र दाखल केल्यानंतर वादीने मांडलेल्या कोणत्याही बाजूच्या उत्तरादाखल हजर केलेल्या, किंवा

(ग) साक्षीदाराला केवळ त्याच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी दिलेल्या दस्तऐवजांना लागू होणार नाही.]

नंतरची वादकथने.

९. प्रतिवादीने प्रतिवादपत्र दिल्यानंतर वजावट [4][किंवा प्रतिहक्कमागणी] याविरुद्ध बचाव म्हणून द्यावयाचे वादकथन सोडून अन्य कोणतेही

[1][९. प्रतिवादीने प्रतिवादपत्र दिल्यानंतर वजावट किंवा प्रतिहक्कमागणी याविरुद्ध बचाव म्हणून द्यावयाचे वादकथन सोडून अन्य कोणतेही

---

१. सन १९७६ च्या अधिनियम १०४, कलम ५८(पाच) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५८(सहा) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५८(सात) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९७६ चा अधिनियम १०४ कलम ५८(आठ) अन्वये समाविष्ट केले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड २८ द्वारे बदली घालण्यात आली.

वादकथन न्यायालयाच्या परवानगीखेरीज आणि न्यायालयास योग्य वाटेल अशा शर्तीवर असेल त्याखेरीज एरव्ही, सादर करता येणार नाही, परंतु न्यायालयास कोणत्याहीवेळी कोणत्याही पक्षकाराकडून एखादे प्रतिवादपत्र किंवा जादा प्रतिवादपत्र मागविता येईल व ते सादर करण्यासाठी वेळ ठरवून देता येईल.

वादकथन न्यायालयाच्या परवानगीखेरीज आणि न्यायालयास योग्य वाटेल अशा शर्तीवर असेल त्याखेरीज एरव्ही सादर करता येणार नाही, परंतु न्यायालयास कोणत्याही वेळी कोणत्याही पक्षकाराकडून एखादे प्रतिवादपत्र किंवा जादा प्रतिवादपत्र मागविता येईल व ते सादर करण्यासाठी वेळ ठरवून देता येईल.]

न्यायालयाने मागवलेले प्रतिवादपत्र सादर करण्यात पक्षकाराने कसूर केल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.

१०. एखाद्या पक्षकाराकडून [१][नियम १ किंवा नियम ९ खाली प्रतिवादपत्र मागविलेले असताना] [१][न्यायालयाने अनुज्ञात केलेल्या किंवा, प्रकरणपरत्वे, ठरवून दिलेल्या मुदतीत ते सादर करण्यात त्या पक्षकाराने कसूर केल्यास न्यायालयाने] त्यांच्याविरुद्ध न्यायनिर्णय अधिघोषित केला पाहिजे किंवा दाव्याच्या संबंधात स्वत:ला योग्य वाटेल असा आदेश काढला पाहिजे [१][आणि असा न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात आल्यानंतर हुकूमनामा तयार करण्यात येईल.]

पक्षकारांनी पत्ता दाखल करणे.

[१][११. (१) (क) कोणत्याही दाव्यात किंवा इतर कार्यवाहीमध्ये उपस्थिती दाखल करणाऱ्या प्रत्येक पक्षकाराने—मग तो मूळ पक्षकार असो, जादा दाखल केलेला असो वा ऐवजी दाखल केलेला असो—त्याच्यावर बजावलेल्या समन्समध्ये किंवा नोटिशीत त्याने उपस्थित होण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेला किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालय परवानगी देईल अशा पुढील कालावधीत, ज्यावर नोटीस बजावता येईल असा त्याचा पत्ता नमूद केलेले लेखी ज्ञापन न्यायालयात दाखल केले पाहिजे.

नोंदीव पत्ता.

(ख) या पत्त्याला 'नोंदीव पत्ता' असे संबोधण्यात येईल आणि आदेश सातवा, नियम २४ व या आदेशाचा नियम १२ यांच्या अधीनतेने, दाव्यातील सर्व कार्यवाहींमध्ये आणि अपिलांमध्ये आणि तसेच अंतिम निर्णयाच्या तारखेपासून सहा वर्षांच्या पुढील कालावधीसाठी अंमलबजावणीसह सर्व प्रयोजनांसाठी तो वैध मानण्यात येईल.

नोंदीव पत्ता दाखल करण्यात कसूर केल्याचे परिणाम.

(ग) विनिर्दिष्ट कालावधीत नोंदीव पत्ता दाखल करण्यास फर्मावण्यात आल्यानंतर तो तसे करण्यात कसूर करील तर, त्याचा बचाव, कोणताही असल्यास, तो काढून टाकला जाण्यास आणि त्याने बचाव दिलाच नसल्याप्रमाणे त्याच स्थितीत ठेवला जाण्यास तो पात्र ठरेल या बाबतीत, न्यायालयाला स्वाधिकारे किंवा कोणत्याही पक्षकाराने तशा आशयाचा आदेश काढण्यासाठी अर्ज केल्यावरून अशी कृती करता येईल आणि न्यायालयाला त्याला योग्य वाटेल असा आदेश काढता येईल.

कसूर केव्हा क्षमापित करता येईल.

(२) न्यायालयाने पोटनियम (१) अन्वये बचाव काढून टाकला असेल आणि दाव्याची किंवा कार्यवाहीची सुनावणी स्थगित केली असेल आणि प्रतिवादी किंवा विरुद्ध पक्षकार अशा सुनावणीच्या

---

१. [सन] १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५८ (नऊ) (क) अन्वये "मागवलेली असताना" या मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५८ (नऊ) (ख) अन्वये बदली दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५८ (नऊ) (ग) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड २९ अन्वये समाविष्ट केले.

वेळी किंवा त्यापूर्वी उपस्थित झाला असेल आणि नोंदीव पत्ता त्याने दाखल न करण्याबाबतचे पुरेसे कारण निदर्शनास आणून दिले असेल आणि तसेच नोंदीव पत्ता दाखल केला असेल तर अशा बाबतीत, खर्च व इतर बाबतीत न्यायालय निर्देशित करील अशा शर्तींस अधीन राहून, दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या उत्तरादाखलचे तिचे म्हणणे जणू काही बचाव काढून टाकण्यात आला नसल्याप्रमाणे ऐकता येईल.

कसूर केल्यामुळे काढलेला हुकूमनामा रद्द ठरवता येईल.

(३) न्यायालयाने पोटनियम (१) अन्वये बचाव काढून टाकला असेल आणि परिणामी हुकूमनामा किंवा आदेश काढला असेल अशा बाबतीत प्रतिवादीला किंवा विरुद्ध पक्षकाराला, तो हुकूमनामा किंवा आदेश काढणाऱ्या न्यालयायाकडे तो हुकूमनामा किंवा आदेश रद्द करणारा आदेश काढण्यासाठी अर्ज करता येईल आणि जर त्याने नोंदीव पत्ता दाखल केला आणि पत्ता दाखल करण्यास पुरेशा कारणामुळे त्याला प्रतिबंध झाला होता याबाबत त्याने न्यायालयाचे समाधान केले तर न्यायालय, खर्च व इतर बाबतीत, स्वतःला योग्य वाटतील अशा शर्तींवर, त्यांच्याविरुद्धचा हुकूमनामा किंवा आदेश रद्द करणारा आदेश काढील आणि दावा किंवा कार्यवाही चालविण्याची तारीख नेमून देईल:

परंतु, हुकूमनामा किंवा आदेश फक्त अशा प्रतिवादीच्या किंवा विरुद्ध पक्षकाराच्या संबंधात रद्द करता येणार नाही अशा स्वरूपाचा असेल तर, तो सर्व प्रतिवादी किंवा विरुद्ध पक्षकारांच्यासाठी रद्द करण्यात येईल.

आदेश सातवा याचे नियम २० व २२ ते २६ यांची प्रयोज्यता.

१२. आदेश सातचे नियम २०, २२, २३, २४, २५ व २६ हे जेथवर लागू होण्याजोगे असतील तेथवर, लगतपूर्वीच्या नियमान्वये दाखल केलेल्या नोंदीव पत्त्याला लागू होतील.

प्रतिहक्कमागणी

प्रतिवादीला वजावटीव्यतिरिक्त वादीच्या हक्कमागणीविरुद्ध प्रतिहक्कमागणी मांडता येईल.

१३. प्रतिवादीला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याचा आदेश आठवा, नियम ६ खाली दाव्यामध्ये वजावट मागण्याच्या हक्काव्यतिरिक्त, वादीच्या अधिकाराच्या हक्कमागणीच्या किंवा दावा दाखल करण्यापूर्वी किंवा नंतर, मात्र प्रतिवादीने आपला बचाव देण्यापूर्वी आणि बचाव देण्याची त्याची मुदत संपण्यापूर्वी प्रतिवादीला उद्भवणाऱ्या वादकारणाच्या संबंधातील हक्कमागणीच्या विरुद्ध प्रतिहक्कमागणी मांडता येईल—मग अशी प्रतिहक्कमागणी, नुकसानभरपाई सूचक असो वा नसो आणि न्यायालयाला मूळ दावा आणि उलट दावा या दोहोंचा अंतिम न्यायनिर्णय एकाच दाव्यात घोषित करणे शक्य व्हावे म्हणून अशा प्रतिहक्कमागणीला उलट दाव्याचाच प्रभाव असेल आणि प्रतिवादीच्या प्रतिहक्कमागणीची प्रत वादीवर किंवा त्याच्या प्लीडरवर बजावण्यात आल्यापासून चार आठवड्यांत प्रतिवादीच्या प्रतिहक्कमागणीच्या उत्तरादाखल प्रतिहक्कमागणी सादर करण्याची मोकळीक वादीला (जर त्याला तसा सल्ला देण्यात आला असेल तर) असेल; आणि वादीने संपरीक्षेपूर्वी अर्ज केल्यावरून न्यायालयाचे किंवा न्यायाधीशाचे असे मत झाले की, ती हक्कमागणी प्रलंबित दाव्याबरोबर निकालात काढता येणार नाही किंवा तिला अनुमती देता कामा नये तर, त्या न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला प्रतिवादीला त्याचा

फायदा करून घेण्यास परवानगी देण्याचे नाकारता येईल आणि त्याला त्या संबंधात स्वतंत्र दावा दाखल करण्यास फर्मावता येईल.

प्रतिहक्कमागणी मांडणाऱ्या प्रतिवादीने प्रतिवादपत्रामध्ये तसे स्पष्टपणे नमूद करणे.

१४. कोणत्याही प्रतिवादीचा प्रतिहक्कमागणीच्या अधिकाराला आधार म्हणून कोणत्याही कारणांवर विसंबून राहाण्याचा उद्देश असेल तर, त्याने प्रतिहक्कमागणीद्वारे तसे केले असल्याचे त्याच्या प्रतिवादपत्रामध्ये स्पष्टपणे नमूद केले पाहिजे.

प्रतिहक्कमागणीमध्ये वादीबरोबर इतर व्यक्तींचाही समावेश असेल अशा बाबतीत, प्रतिवादीने प्रतिवादपत्राच्या शीर्षकामध्ये आणखी शीर्षक दाखल करावयाच्या आणि आपल्या प्रतिवादपत्राच्या प्रतिदाव्यात यापूर्वीच पक्षकार असलेल्या व्यक्तींना द्यावयाच्या.

१५. एखाद्या प्रतिवादीने प्रतिवादपत्राद्वारे एखादी प्रतिहक्कमागणी मांडली असेल, जिच्यात तो स्वतः व वादी यांच्यामध्ये इतर कोणत्याही व्यक्तींबरोबर प्रश्न उपस्थित झाला असेल अशा बाबतीत, त्याने त्याच्या प्रतिवादपत्रास वादपत्रातील शीर्षकाशी समरूप असे सर्व व्यक्तींची नावे, पुढे मांडणारे आणखी शीर्षक जादा दाखल केले पाहिजे व त्यामध्ये जर अशी प्रतिहक्कमागणी प्रतिदाव्याद्वारे अंमलात आणावयाची असेल तर, ज्या व्यक्ती अशा प्रतिदाव्यामध्ये, प्रतिवादी झाल्या असत्या अशा सर्व व्यक्तींची नावे दिली पाहिजेत आणि त्याने त्याच्या प्रतिवादपत्राच्या प्रती जे आधीच दाव्यातील पक्षकार असतील अशा व्यक्तींना, त्या ज्या कालावधीत वादीला देणे आवश्यक असेल त्याच कालावधीत दिल्या पाहिजे.

दाव्यात अगोदरच पक्षकार नसणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रतिहक्कमागणी असेल तेव्हा समन्स बजावणे.

१६. लगतपूर्ववर्ती नियमामध्ये नमूद केलेली व्यक्ती दाव्यात अगोदरच पक्षकार नसेल तर, प्रतिवादपत्राच्या प्रतीची बजावणी करून त्याद्वारे त्याला उपस्थित होण्यासाठी बोलावण्यात यावे आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये लेखी समन्सच्या बजावणीचे जे नियम आहेत, त्याद्वारे अशा बजावणीचे नियमन करण्यात यावे.

प्रतिहक्कमागणी बजावण्यात आली असता, दाव्यातील प्रतिवादी खेरीज इतर व्यक्तींनी उपस्थित राहणे.

१७. दाव्यामध्ये प्रतिवादी नसलेल्या कोणत्याही व्यक्तीवर उपरोक्तप्रमाणे प्रतिवादपत्र आणि प्रतिहक्कमागणी बजावण्यात आली असेल तर, दाव्यामध्ये उपस्थित होण्यासाठी लेखी समन्स बजावण्यात आल्याप्रमाणे त्याने उपस्थित राहिले पाहिजे.

प्रतिहक्कमागणीला उत्तर.

१८. एखाद्या प्रतिवादपत्रात, त्याद्वारे केलेल्या प्रतिहक्कमागणीचा पक्षकार म्हणून ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव दिले असेल, अशा व्यक्तीने जर ते वादपत्र असते तर, जितक्या वेळेत प्रतिवादपत्र दिले असते तितक्याच वेळेत तिला उत्तर देता येईल.

दाव्यामध्ये मांडण्यास परवानगी दिलेल्या प्रतिहक्कमागणी वरील हरकती.

१९. प्रतिवादीने प्रतिहक्कमागणी मांडली असेल अशा बाबतीत, जर वादीने किंवा अशा प्रतिहक्कमागणीचा पक्षकार म्हणून उपरोक्त रीतीने नाव दिलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने असा झगडा उपस्थित केला की, त्याद्वारे मांडलेल्या प्रतिहक्कमागणीचा निकाल प्रतिहक्कमागणी म्हणून न लावता स्वतंत्र दावा म्हणून लावला गेला पाहिजे तर, त्याला उत्तर देण्यापूर्वी कोणत्याही वेळी, अशी प्रतिहक्कमागणी वगळता येईल असा आदेश काढण्यासाठी न्यायालयाकडे किंवा न्यायाधीशाकडे अर्ज करता येईल आणि अशा अर्जाची

सुनावणी केल्यानंतर न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला स्वतःला योग्य वाटेल असा आदेश काढता येईल.

दावा स्थगित करण्यात आला, तहकूब करण्यात आला किंवा फेटाळण्यात आला तरीही प्रतिहक्कमागणीवर कार्यवाही करता येणे.

२०. ज्यामध्ये प्रतिवादीने प्रतिहक्कमागणी मांडली असेल अशा एखाद्या बाबतीत, वादीचा दावा स्थगित करण्यात आला असेल, तहकूब करण्यात आला असेल किंवा फेटाळण्यात आला असेल तरीही प्रतिहक्कमागणीवर कार्यवाही करता येईल.

प्रतिहक्कमागणीला उत्तर देण्यात कसूर केल्यास प्रतिहक्कमागणी न्यायनिर्णयासाठी स्थगित ठेवता येईल.

२१. प्रतिहक्कमागणीचा प्रतिवादी प्रतिहक्कमागणीला उत्तर देण्यात कसूर करील तर, दाव्यातील प्रतिवादी, जो प्रतिहक्कमागणीचा दावी आहे त्याला प्रतिहक्कमागणीच्या न्यायनिर्णयांसाठी असा दावा स्थगित ठेवून घेता येईल आणि न्यायालय, त्याला जितपत हक्कदार मानेल तदनुसार असा न्यायनिर्णय देईल.

वजावट किंवा प्रतिहक्कमागणी सिद्ध केली असेल अशा बेळेचा न्यायनिर्णय.

२२. कोणत्याही दाव्यात वजावट किंवा प्रतिहक्कमागणी ही, वादीच्या हक्कमागणी विरुद्धचा बचाव म्हणून सिद्ध करण्यात आली असेल तर, जर शिल्लक रक्कम प्रतिवादीच्या नावाने असेल तर, न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला अशा शिल्लक रकमेसाठी प्रतिवादीच्या बाजूने न्यायनिर्णय देता येईल किंवा प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार प्रतिवादी हक्कदार असेल अशा अनुतोष देण्याबाबत न्यायनिर्णय देता येईल.

त्रयस्थ पक्ष कार्यपध्दती.

त्रयस्थ पक्ष नोटीस.

२३. (१) एखाद्या दाव्यात, प्रतिवादी, दाव्यात आधीच पक्षकार नसलेल्या एखाद्या व्यक्तीच्या बाबतीत, (यात यापुढे जिचा उल्लेख त्रयस्थ पक्ष असा केलेला आहे)—

(क) ती, अंशदानास किंवा क्षतिपूर्तीस हक्कदार आहे असा, किंवा,

(ख) दाव्याच्या मूळ विषयवस्तूशी संबंधित अशा आणि त्याच्याशी संबध्द असलेल्या कोणत्याही अनुतोषास आणि उपाययोजनेस आणि वादीने कोणत्याही अनुतोषाची किंवा उपाययोजनेची हक्कमागणी केली असल्यास तो भरीवपणे त्याच अनुतोषास हक्कदार असल्याचा; किंवा

(ग) उक्त विषयवस्तूशी संबंधित असलेला किंवा संबध्द असलेला कोणताही प्रश्न किंवा वादमुद्दा हा बऱ्याच प्रमाणात वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये उद्भवणाऱ्या काही प्रश्नांसारखा किंवा वादमुद्द्यासारखा आहे आणि तो फक्त वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये निर्धारित न करता, तो, वादी व प्रतिवादी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यामध्ये किंवा त्यांच्यापैकी कोणाहीमध्ये किंवा प्रत्येकामध्ये योग्य रीतीने निर्धारित करण्यात यावा अशी मागणी करील अशा बाबतीत, त्याला, न्यायालयाच्या किंवा न्यायाधीशाच्या परवानगीने न्यायालयाची मोहोर लावलेली तशा आशयाची नोटीस (यात यापुढे त्रयस्थ पक्ष नोटीस म्हणून संबोधलेली) काढता येईल. अशी नोटीस प्रबंधकाकडे किंवा न्यायालय लिपिकाकडे किंवा

न्यायालय याबाबतीत नेमणूक करील अशा इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडे दाखल केली पाहिजे आणि तिची एक प्रत समन्सचे रिट बजावण्यासंबंधीच्या नियमानुसार अशा व्यक्तीवर बजावण्यात आली पाहिजे.

नोटिशीचा नमुना आणि बजावणी.

(२) नोटिशीमध्ये, हक्कमागणीचे स्वरूप आणि आधार किंवा मागणी करण्यात आलेल्या अनुतोषाचे किंवा उपाययोजनेचे स्वरूप व व्याप्ती किंवा निर्धारित करावयाचे ठरविलेल्या प्रश्नाचे किंवा वादमुद्द्याचे स्वरूप नमूद करण्यात येईल आणि न्यायालयाने किंवा न्यायाधीशाने अन्य प्रकारचा आदेश दिला नसेल तर, बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्यासाठी मर्यादित केलेल्या वेळेतच ती त्रयस्थ पक्षावर बजावण्यात येईल आणि त्याबरोबर वादपत्राची प्रतही बजावण्यात येईल.

नोटीस बजावणीचा परिणाम.

(३) त्रयस्थ पक्षावर नोटीस बजावणीच्या वेळेपासून त्रयस्थ पक्षकार हा, दाव्यात त्याच्याविरुद्ध केलेल्या कोणत्याही हक्कमागणीविरुद्धच्या त्याच्या बचावाच्या संबंधात तेच अधिकार असणारा दाव्यातील पक्षकार असेल आणि अन्यथा प्रतिवादीने जणू काही सर्वसाधारण मार्गाने योग्य रीतीने दावा दाखल केल्याप्रमाणे तो दाव्यातील पक्षकार असेल.

त्रयस्थ पक्षाची उपस्थिती आणि उपस्थितीत कसूर केल्याचे परिणाम.

२४. जर दाव्यात पक्षकार नसलेल्या एखाद्या व्यक्तीवर (यात यापुढे त्रयस्थ पक्ष म्हणून उल्लेखिलेल्या) नियम २३ खाली नमूद केल्याप्रमाणे बजावणी करण्यात आली असता ज्याच्या वतीने नोटीस देण्यात आली असेल त्या प्रतिवादीच्या, विरुद्ध वादीच्या दाव्यातील हक्कमागणीबाबत किंवा प्रतिवादीबाबतचे त्याचे स्वत:चे दायित्व याबाबतीत विवाद करण्याची इच्छा असल्यास त्रयस्थ पक्षाने जर तो न्यायालयाच्या स्थानिक अधिकारितेमध्ये राहत असेल किंवा व्यवसाय करीत असेल किंवा प्राप्तीसाठी व्यक्तिश: कामधंदा करीत असेल तर, नोटीस बजावल्यापासून आठ दिवसात किंवा जर तो अशा अधिकारितेत राहत नसेल किंवा व्यवसाय करीत नसेल किंवा प्राप्तीसाठी कामधंदा करीत नसेल तर, नोटीस बजावल्यापासून पंधरा दिवसात, दाव्यात उपस्थिती नोंदली पाहिजे किंवा वकालतनामा दाखल केला पाहिजे. त्याने असे करण्यात कसूर केल्यास, अशा प्रतिवादीविरुद्ध त्याच्या संमतीने किंवा अन्यप्रकारे काढलेल्या हुकूमनाम्याची वैधता आणि त्रयस्थ पक्ष नोटिशीमध्ये मागणी केलेल्या मर्यादेपर्यंत अंशदान किंवा, प्रकरणपरत्वे, क्षतिपूर्ती करण्याचे त्याचे स्वत:चे दायित्व त्याने स्वीकारल्याचे मानण्यात येईल :

परंतु असे की, अशाप्रकारे बजावणी करण्यात आलेल्या आणि प्रकरणपरत्वे, उक्त आठ किंवा, पंधरा दिवसांत उपस्थित राहण्यात कसूर करणाऱ्या व्यक्तीला उपस्थित राहण्यासाठी परवानगी मागण्यासाठी न्यायालयाकडे किंवा न्यायाधीशाकडे अज करता येईल आणि अशी परवानगी न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला स्वत:ला योग्य वाटेल अशा शर्तींवर देता येईल.

त्रयस्थ पक्ष उपस्थित राहण्यात कसूर करील अशा वेळेचा हुकूमनामा.

२५. त्रयस्थ पक्ष, दाव्यामध्ये उपस्थिती नोंदण्यात किंवा वकालतनामा दाखल करण्यात कसूर करील तर,—

(१) दाव्याची संपरीक्षा झाली असेल आणि वादींच्या बाजूने निकाल लागला असेल तर अशा

बाबतीत, दाव्याची संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला, प्रतिवादीला त्रयस्थ पक्षाविरुद्ध नोटीस काढण्यासाठी आवश्यक असेल अशा प्रकरणाच्या स्वरूपानुसार असलेला हुकूमनामा काढता येईल :

परंतु असे की, अशा प्रतिवादीने त्याच्या विरुद्धच्या अशा हुकूमनाम्याची पूर्ती केल्याशिवाय, न्यायालयाच्या किंवा न्यायाधीशाच्या परवानगीशिवाय अशा हुकूमनाम्याचे निष्पादन करण्यात येणार नाही; आणि

(२) जर दावा संपरीक्षा न करता अन्य प्रकारे वादीच्या बाजूने अंतिमरित्या निकालात काढला असेल तर, प्रतिवादीविरुद्ध वादीच्या नावाने हुकूमनामा काढलेली रक्कम प्रतिवादीने भरल्यानंतर कोणत्याही वेळी अर्ज केल्यावरून त्रयस्थ पक्षाला नोटीस देण्यासाठी प्रकरणाच्या स्वरूपावरून प्रतिवादीला आवश्यक असेल असा हुकूमनामा, न्यायाधीशाला किंवा न्यायालयाला काढता येईल.

त्रयस्थ पक्षाची उपस्थिती आणि निदेशनासाठी अर्ज.

२६. त्रयस्थ पक्षाने उपस्थिती नोंदली असेल किंवा वकालतनामा दाखल केला असेल तर, नोटीस देणाऱ्या प्रतिवादीला अर्ज करण्याचा उद्देश असल्याबाबतची नोटीस वादी, त्रयस्थ पक्ष व इतर कोणताही प्रतिवादी यांच्यावर बजावल्यानंतर न्यायालयाकडे किंवा न्यायाधीशाकडे निदेशनासाठी अर्ज करता येईल आणि न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला,—

(क) अर्जाची सुनावणी केल्यानंतर, नोटीस देणाऱ्या प्रतिवादीबाबतचे त्रयस्थ पक्षाचे दायित्व सिद्ध झाले असेल अशा बाबतीत, त्रयस्थ पक्षाच्या विरुद्ध नोटीस काढणाऱ्या प्रतिवादीच्या नावाने, प्रकरणाच्या स्वरूपानुसार, आवश्यक असेल असा हुकूमनामा काढता येईल ; किंवा

(ख) प्रतिवादीचे वादीविषयीचे दायित्व किंवा मागणी केलेले अंशदान किंवा क्षतिपूर्ती पूर्णपणे किंवा अंशतः देयकाच्या संबंधातील त्रयस्थ पक्षाचे दायित्व किंवा प्रतिवादीने नोटीशीमध्ये मागणी केलेला कोणताही इतर अनुतोष किंवा उपाययोजना या-संबंधात, वादी आणि प्रतिवादी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यात किंवा त्यांपैकी कोणीही किंवा प्रत्येकजण यांच्यात संपरीक्षा करणे योग्य ठरेल असा एखादा प्रश्न किंवा वादमुद्दा आहे याबाबत किंवा नोटीशीमध्ये नमूद केलेला प्रश्न किंवा वादमुद्दा हा फक्त वादी व प्रतिवादी यांच्यामध्येच निर्धारित करावयाचा नसून तो वादी, प्रतिवादी व त्रयस्थ पक्ष यांच्यामध्ये किंवा त्यांच्यापैकी कोणाहीमध्ये किंवा प्रत्येकामध्ये निर्धारित करावयाचा आहे याबाबत, न्यायालयाचे किंवा न्यायाधीशाचे समाधान झाले असेल तर, त्या प्रश्नाची किंवा वादमुद्याची संपरीक्षा न्यायाधीश किंवा न्यायालय निदेश देईल त्याप्रमाणे दाव्याच्या संपरीक्षेपूर्वी, संपरीक्षेच्या वेळी किंवा त्यानंतर करावी असा आदेश देता येईल; किंवा

(ग) अर्ज फेटाळता येईल.

द्यावयाचे निदेशन.

२७. नियम २६ मध्ये नमूद केलेल्या अर्जाची सुनावणी केल्यानंतर न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला तसे करणे योग्य वाटले तर, न्याय्य होतील अशा शर्तींवर दाव्याचा एकतर एकट्याने किंवा मूळ

प्रतिवादीबरोबर संयुक्तपणे बचाव करण्याचे किंवा दाव्यात उपस्थित होण्याचे आणि त्यात न्याय्य ठरेल असा भाग घेण्याचे स्वातंत्र्य त्रयस्थ पक्षाला देता येईल आणि अनुसरावयाची कार्यवाही, द्यावयाचा वाद, प्रतिवादपत्र किंवा दस्तऐवज किंवा करावयाची विशोधने याबाबत सर्वसाधारण आदेश देता यतील आणि प्रश्न, अधिकार आणि दायित्वे सोयीस्करपणे निर्धारित करून घेण्यासाठी आणि त्यांची अंमल-बजावणी करून घेण्यासाठी आणि ज्यासाठी किंवा ज्यामध्ये त्रयस्थ पक्ष बांधील असेल आणि त्याला दाव्यातील हुकूमनाम्याद्वारे जबाबदार धरण्यात येईल अशा पद्धतीच्या आणि मर्यादेच्या संबंधात न्यायालय किंवा न्यायाधीश यांना योग्य वाटतील असे निदेश देता येतील.

दावा खर्च.

२८. दाव्यातील त्रयस्थ पक्ष आणि इतर पक्ष यांच्यामधील दावाखर्चाबाबतच्या सर्व प्रश्नांचा निर्णय न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला करता येईल आणि कोणाही एकाला किंवा अधिक व्यक्तींना इतर कोणाचाही किंवा इतरांचा दावा खर्च भरण्याचा आदेश देता येईल किंवा प्रकरणाच्या न्यायानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे दावा खर्चाबाबतचे निदेश देता येतील.

त्रयस्थ पक्ष नोटीस बजावण्यात आलेला पक्षकार नसलेल्या एखाद्या व्यक्ती-विरुद्ध त्रयस्थ पक्ष नोटीस काढण्यासाठी अर्ज करु शकेल.

२९. (१) प्रतिवादीने ज्याच्यावर त्रयस्थ पक्ष नोटीस बजावली आहे अशा एखाद्या व्यक्तीने दाव्यामध्ये यापूर्वीच पक्षकार नसलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नियम २३ मध्ये व्याख्या दिलेल्या अशा हक्क मागण्या केल्या असतील तर, त्याला न्यायालयाच्या किंवा न्यायाधीशाच्या परवानगीने तशा आशयाची त्रयस्थ पक्ष नोटीस काढता येईल आणि त्रयस्थ पक्ष नोटिशीच्या संबंधातील पूर्ववर्ती नियम योग्य त्या फेरफारांसह अशा प्रत्येक नोटिशीला लागू होतील आणि "त्रयस्थ पक्ष नोटीस" आणि "त्रयस्थ पक्ष" यांच्या या नियमातील संज्ञा याला लागू होतील आणि अनुक्रमे अशा प्रकारे काढलेल्या इतर नोटिशींचा आणि अशी नोटीस बजावलेल्या प्रत्येक व्यक्तीचा त्यात अंतर्भाव होईल.

(२) या नियमाखाली जिच्यावर त्रयस्थ पक्षाकडून नोटीस बजावण्यात आली असेल अशा व्यक्तीने त्या बदल्यात नियम २३ मध्ये व्याख्या दिलेली आहे अशी हक्कमागणी दाव्यामध्ये पक्षकार नसलेल्या दुसऱ्या व्यक्तीविरुद्ध केली असेल तर, आधीच्या नियमामध्ये विहित केलेली कार्यपद्धती अशा आणखी व्यक्तीच्या बाबतीत किंवा अशा प्रकारे बजावणी, इत्यादी केलेल्या इतर कोणत्याही आणखी व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या बाबतीत क्रमशः अनुसरण्यात येईल.

सहप्रतिवादीविरुद्ध हक्कमागणी करणारा प्रतिवादी.

३०. एखाद्या प्रतिवादीने दुसऱ्या प्रतिवादी-विरुद्ध हक्कमागणी केली असेल की,

(क) अंशदान किंवा क्षतिपूर्ती करण्यासाठी तो हक्कदार आहे, किंवा

(ख) दाव्याच्या मूळ विषयवस्तूंशी संबंधित असा कोणताही अनुतोष किंवा उपाययोजना यास तो हक्कदार आहे आणि वादीने हक्कमागणी केलेल्या अनुतोषास किंवा उपाययोजनेत तो सारतः हक्कदार आहे, किंवा

(ग) विषयवस्तूंशी संबंधित असलेला किंवा संबद्ध असलेला कोणताही प्रश्न किंवा वादमुद्दा हा

वादी व हक्कमागणी करणारा प्रतिवादी यांच्यामधील काही प्रश्न किंवा वादमुद्दा यांच्याशी सारतः मिळताजुळता आहे आणि तो वादी आणि हक्कमागणी करणारा प्रतिवादी यांच्यातच नव्हे तर वादी आणि प्रतिवादी आणि दुसरा प्रतिवादी यांच्यात किंवा त्यांच्यापैकी कोणाहीमध्ये किंवा त्यांच्यापैकी प्रत्येकामध्ये निर्धारित केला पाहिजे,

तर, हक्कमागणी करणाऱ्या प्रतिवादीला न्यायालयाच्या किंवा न्यायाधीशाच्या परवानगीशिवाय, अशा इतर प्रतिवादीवर अशी हक्कमागणी करणारी किंवा असा प्रश्न किंवा वादमुद्दा विनिर्दिष्ट करणारी नोटीस काढता किंवा बजावता येईल आणि अशा प्रतिवादींमधील असे प्रश्न निर्धारित करण्यासाठी अशा इतर प्रतिवादींच्या संबंधात जी कार्यपद्धती अनुसरली असती तीच कार्यपद्धती जणू काही असा शेवटी नमूद केलेला प्रतिवादी हा त्रयस्थ पक्ष असल्याप्रमाणे त्याच्याबाबतीत अनुसरण्यात येईल; मात्र, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे दाव्यातील कोणत्याही प्रतिवादीच्या विरुद्धच्या वादीच्या हक्कांना बाध येणार नाही.]

आदेश नववा

पक्षकारांची उपस्थिती व अनुपस्थिती याचा परिणाम

प्रतिवादीने उपस्थित राहून जाब द्यावा यासाठी समन्समध्ये निश्चित केलेल्या दिवशी पक्षकारांनी उपस्थित राहणे.

१. प्रतिवादीने उपस्थित राहून जाब द्यावा, यासाठी समन्समध्ये निश्चित केलेल्या दिवशी पक्षकारांना न्यायगृहात जातीने किंवा त्यांच्या प्लीडरांमार्फत उपस्थित राहावे लागेल, आणि न्यायालयाने निश्चित केलेल्या नंतरच्या दिवसापर्यन्त सुनावणी तहकूब करण्यात न आल्यास त्यावेळी दाव्याची सुनावणी करण्यात येईल.

खर्च देण्यात वादीने कसूर केल्याच्या परिणामी समन्स बजावण्यात आले नसेल त्याबाबतीत दावा फेटाळणे.

२. वादीने न्यायालय फी किंवा बजावणीबद्दल आकारण्याजोगे डाकहशील (असल्यास) ते भरण्यात [१][किंवा सातव्या आदेशातील नियम ९ अनुसार आवश्यक असलेल्या वादपत्राच्या प्रती किंवा संक्षिप्त निवेदने सादर करण्यात] कसूर केल्याच्या परिणामी, प्रतिवादीवर समन्स बजावण्यात आलेले नाही असे निश्चित केलेल्या दिवशी न्यायालयाला आढळून आल्यास, दावा फेटाळण्यात यावा असा आदेश न्यायालयास देता येईल:

[२][परंतु, अशी कसूर झालेली असली तरीही, प्रतिवादी, त्याने उपस्थित राहून जाब द्यावा यासाठी निश्चित केलेल्या दिवशी जातीने (किंवा अभिकर्त्यामार्फत उपस्थित राहण्याची त्यास परवानगी देण्यात आलेली असल्यास अभिकर्त्यामार्फत) उपस्थित राहिला तर, असा कोणताही आदेश देता येणार नाही.]

कोणताही पक्षकार उपस्थित राहिला नाही तर दावा फेटाळणे.

३. दावा सुनावणीसाठी पुकारला जाईल तेव्हा, कोणताही पक्षकार उपस्थित राहिला नाही तर, दावा फेटाळण्यात यावा असा आदेश न्यायालयास देता येईल.

वादीला नवीन दावा आणता येईल किंवा न्यायालयाला दावा पुन्हा फाईलवर घेता येईल.

४. नियम २ किंवा नियम ३ खाली दावा फेटाळण्यात आला असेल अशा बाबतीत, वादीला (मुदत कायद्याच्या अधीनतेने) नवीन दावा आणता येईल किंवा दाव्याचे फेटाळणे रद्द करणारा आदेश मिळण्यासाठी अर्ज करता येईल, आणि [३][नियम २ मध्ये निर्दिष्ट केलेली कसूर होण्यास,] किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या अनुपस्थितीस पुरेसे कारण होते अशी न्यायालयाची त्याने खात्री पटवून दिल्यास, न्यायालयाने फेटाळणारा आदेश रद्द ठरवणारा आदेश काढला पाहिजे आणि दाव्याचे कामकाज पुढे सुरू करण्यासाठी दिवस नियत केला पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५९ (एक) (क्) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५९ (एक) (ख्) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५९ (दोन) अन्वये, "समन्स बजावण्यापूर्वी, निश्चित केलेल्या कालावधीत आवश्यक असलेली न्यायालय फी व डाकहशील (कोणतेही असल्यास) त्याने न दिल्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

समन्स बजावणी न होता परत आल्यानंतर वादीने नवीन समन्ससाठी तीन महिन्यांपर्यन्त अर्ज न केल्यास दावा फेटाळणे.

५. [१][(१) प्रतिवादीवर किंवा निरनिराळ्या प्रतिवादीपैकी कोणा एकावर समन्स काढलेले असून त्याची बजावणी न होता ते प्रतिवेदनासह परत पाठवण्यात आल्यानंतर, समन्स बजावणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिलेली प्रतिवेदने सर्वसामान्यपणे जो अधिकारी न्यायालयाला कळवतो त्या अधिकाऱ्याने समन्स न्यायालयाकडे प्रतिवेदनासहित परत पाठवल्याच्या तारखेपासून [२][एक महिन्याच्या] कालावधीत वादीने नवीन समन्स काढण्यासाठी अर्ज केला नाही तर, न्यायालयाने अशा प्रतिवादीपुरता दावा फेटाळण्यात यावा अशा अर्थाचा आदेश काढला पाहिजे,

मात्र,.....

(क्) ज्या प्रतिवादीवर समन्स बजावण्यात आलेले नाही त्याचे निवासस्थान शोधून काढण्यासाठी वादीने सर्वतोपरी प्रयत्न करूनही त्याला यश आले नाही; किंवा

(ख्) असा प्रतिवादी आदेशिकेची बजावणी टाळत आहे; अथवा

(ग्) मुदत वाढवून देण्यास अन्य एखादे पुरेसे कारण आहे,

याबाबत वादीने उक्त कालावधीमध्ये न्यायालयाची खात्री पटवून दिली तर त्याबाबतीत, न्यायालयास असा अर्ज करण्याची मुदत स्वतःस योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत वाढवून देता येईल.]

(२) अशा प्रकरणी वादीला (मुदत कायद्याच्या अधीनतेने) नवीन दावा आणता येईल.

समन्स बजावणी न होता परतआल्यानंतर वादीने नवीन समन्ससाठी तीन महिन्यापर्यन्त अर्ज न केल्यास दावा फेटाळणे.

५. [१][(१) प्रतिवादीवर किंवा निरनिराळ्या प्रतिवादीपैकी कोणा एकावर समन्स काढलेले असून त्याची बजावणी न होता ते प्रतिवेदनासह परत पाठवण्यात आल्यानंतर, समन्स बजावणाऱ्या अधिकाऱ्यांनी दिलेली प्रतिवेदने सर्वसामान्यपणे जो अधिकारी न्यायालयाला कळवतो त्या अधिकाऱ्याने समन्स न्यायालयाकडे प्रतिवेदनासहित परत पाठवल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या कालावधीत वादीने नवीन समन्स काढण्यासाठी अर्ज केला नाही तर, न्यायालयाने अशा प्रतिवादीपुरता दावा फेटाळण्यात यावा अशा अर्थाचा आदेश काढला पाहिजे,

मात्र,.....

(क्) ज्या प्रतिवादीवर समन्स बजावण्यात आलेले नाही त्याचे निवासस्थान शोधून काढण्यासाठी वादीने सर्वतोपरी प्रयत्न करूनही त्याला यश आले नाही; किंवा

(ख्) असा प्रतिवादी आदेशिकेची बजावणी टाळत आहे; अथवा

(ग्) मुदत वाढवून देण्यास अन्य एखादे पुरेसे कारण आहे,

याबाबत वादीने उक्त कालावधीमध्ये न्यायालयाची खात्री पटवून दिली तर त्याबाबतीत, न्यायालयास असा अर्ज करण्याची मुदत स्वतःस योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत वाढवून देता येईल.

(२) अशा प्रकरणी वादीला (मुदत कायद्याच्या अधीनतेने) नवीन दावा आणता येईल.]

फक्त वादीच उपस्थित राहतो त्याबाबतीतील कार्यपद्धती.

६. (१) दावा सुनावणीसाठी पुकारण्यात येईल तेव्हा, वादी उपस्थित राहिला व प्रतिवादी उपस्थित राहिला नाही तर त्याबाबतीत,—

समन्स रीतसर बजावलेले असेल अशा बाबतीत.

[१][(क्) समन्स रीतसर बजावण्यात आले होते असे शाबीत झाल्यास दाव्याची सुनावणी एकतर्फी करण्यात यावी असा आदेश न्यायालयास देता येईल;]

समन्स रीतसर बजावलेले नसेल अशा बाबतीत.

(ख्) समन्स रीतसर बजावण्यात आले होते असे शाबीत न झाल्यास दुसरे समन्स काढण्यात यावे व प्रतिवादीवर बजावण्यात यावे असा निदेश न्यायालयाने दिला पाहिजे;

समन्स बजावलेले असेल पण योग्य वेळेच्या आत बजावलेले नसेल अशा बाबतीत.

(ग्) समन्स प्रतिवादीवर बजावण्यात आले होते, परंतु समन्समध्ये निश्चित केलेल्या दिवशी उपस्थित राहून जाब देणे प्रतिवादीला शक्य होईल इतपत वेळेवर ते बजावलेले नाही असे शाबीत झाल्यास न्यायालयाने दाव्याची सुनावणी न्यायालयाने निश्चित करावयाच्या अशा नंतरच्या एखाद्या दिवसापर्यन्त पुढे ढकलली पाहिजे आणि अशा दिवसाची नोटीस प्रतिवादीला देण्यात यावी असा निदेश दिला पाहिजे.

(२) वादीच्या कसुरीमुळे समन्स रीतसर बजावले गेले नसेल किंवा पुरेशा अवधीत बजावले नसेल तर, न्यायालयाने सुनावणी पुढे ढकलण्यामुळे उद्भवलेला खर्च देण्याचा आदेश वादीला दिला पाहिजे.

---

१. सन १९२० चा अधिनियम २४, कलम २ अन्वये मूळ पोटनियम (१) ऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५९ (तीन) अन्वये "तीन महिन्यांच्या" या ऐवजी बदली दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ५९ (चार) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

७. न्यायालयाने दावा एकतर्फी सुनावणीसाठी तहकूब केला असेल, आणि प्रतिवादीने अशा सुनावणीच्या वेळी किंवा त्यापूर्वी उपस्थित होऊन, आपल्या पूर्वीच्या अनुपस्थितीबद्दल सबळ कारण दाखवून दिल्यास खर्चाच्या किंवा अन्य बाबतीत, न्यायालय निदेश देईल अशा अटींवर त्याच्या उपस्थिती-करिता निश्चित केलेल्या दिवशी जणू काही ती उपस्थित राहिला असल्याप्रमाणे, त्याची उत्तरादाखल जबानी ऐकून घेता येईल. तहकूब केलेली सुनावणी ज्या दिवशी व्हावयाची त्या दिवशी प्रतिवादी उपस्थित झाला आणि मागील अनुपस्थिती-बद्दल त्याने सबळ कारण दिले तर त्याबाबतीतील कार्यपद्धती.

८. दावा सुनावणीसाठी पुकारण्यात येईल तेव्हा प्रतिवादी उपस्थित राहिला व वादी उपस्थित राहिला नाही तर दावा फेटाळण्यात यावा, असा आदेश न्यायालयाने काढला पाहिजे. मात्र, प्रतिवादीने ती हक्कमागणी किंवा तिचा कोणताही भाग कबूल केल्यास त्याबाबतीत, अशा कबुलीनंतर न्यायालयाने प्रतिवादीच्याविरुद्ध हुकूमनामा काढला पाहिजे व हक्कमागणीचा केवळ काही भागच कबूल करण्यात आल्यास, हक्कमागणीच्या उर्वरित भागाशी संबंधित नसेल तेथवर तो दावा फेटाळला पाहिजे. फक्त प्रतिवादीच उपस्थित राहतो त्याबाबतीतील कार्यपद्धती.

९. (१) नियम ८ खाली एखादा दावा पूर्णत: किंवा अंशत: फेटाळला असेल त्या बाबतीत, त्याच वादकारणाच्या संबंधात नवीन दावा आणण्यास वादीला प्रतिबंध होईल. परंतु, फेटाळण्याचा आदेश रद्द ठरवणारा आदेश मिळण्यासाठी त्याला अर्ज करता येईल आणि दावा सुनावणीसाठी पुकारण्यात आला तेव्हा, तो अनुपस्थित होता याला पुरेसे कारण होते याबद्दल त्याने न्यायालयाची खात्री पटवून दिल्यास, न्यायालयाने खर्चाच्या व अन्य बाबतीत स्वत:स योग्य वाटेल अशा अटींवर दावा फेटाळणारा आदेश रद्द करणारा आदेश काढला पाहिजे आणि दाव्याचे कामकाज पुढे सुरू करण्यासाठी दिवस नियत केला पाहिजे. अनुपस्थित राहिल्याच्या कारणास्तव वादी विरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्यामुळे नवीन दाव्यास रोध.

(२) अर्जाची नोटीस विरुद्ध पक्षकारावर बजावण्यात आल्याखेरीज या नियमाखाली कोणताही आदेश काढता येणार नाही.

१०. जर एकपेक्षा अधिक वादी असतील, आणि त्यांच्यापैकी एक किंवा अधिक वादी उपस्थित राहिले व बाकीचे उपस्थित राहिले नाहीत तर त्याबाबतीत, उपस्थित राहिलेल्या वादीच्या किंवा वादींच्या विनंतीवरून न्यायालयास जणू काही सर्वच वादी उपस्थित असावेत त्याप्रमाणे दाव्याचे कामकाज पुढे चालू ठेवण्याची परवानगी देता येईल, आणि स्वत:स योग्य वाटेल असा आदेश काढता येईल. निरनिराळ्या वादींपैकी एक किंवा अनेक वादी अनुपस्थित असतील त्या बाबतीतील कार्यपद्धती.

११. जर एकापेक्षा अधिक प्रतिवादी असतील आणि त्याच्यांपैकी एक किंवा अधिक प्रतिवादी उपस्थित राहिले व बाकीचे उपस्थित राहिले नाहीत तर त्या बाबतीत, दाव्याचे कामकाज पुढे चालू राहिल, व न्यायनिर्णय अधिघोषित करण्याच्या वेळी न्यायालयाने जे प्रतिवादी उपस्थित नव्हते त्यांच्या संबंधात स्वत:स योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे. निरनिराळ्या प्रति-वादींपैकी एक किंवा अनेक प्रति-वादी अनुपस्थित असतील त्या बाबतीतील कार्यपद्धती.

१२. ज्याला जातीने उपस्थित राहण्याच्या आदेश देण्यात आला असेल असा वादी किंवा प्रतिवादी जातीने उपस्थित राहिला नाही किंवा याप्रमाणे उपस्थित न राहण्यास पुरेसे कारण होते अशी न्यायालयाची खात्री पटेल अशाप्रकारे त्याने दाखवून दिले नाही तर, जे वादी किंवा प्रतिवादी उपस्थित राहत नाहीत त्या त्या वादींना किंवा प्रतिवादींना पूर्ववर्ती नियमांपैकी लागू असलेल्या सर्व उपबंधांच्या ते अधीन असतील. जातीने उपस्थित राहण्यासाठी ज्या पक्षकारास आदेश देण्यात आला असेल तो पुरेसे कारण न दाखवता अनुपस्थित राहिल्यास त्याचा परिणाम.

एकतर्फी हुकूमनामे रद्द करणे

प्रतिवादीच्या विरुद्ध काढलेला एकतर्फी हुकूमनामा रद्द करणे.

[1][१३. प्रतिवादीच्या विरुद्ध एकतर्फी हुकूमनामा काढण्यात आला असेल अशा कोणत्याही प्रकरणी, तो हुकूमनामा रद्द करणारा आदेश मिळण्याकरिता प्रतिवादीस, हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला

[1][१३. प्रतिवादीच्या विरुद्ध एकतर्फी हुकूमनामा काढण्यात आला असेल अशा कोणत्याही प्रकरणी, तो हुकूमनामा रद्द करणारा आदेश मिळण्याकरिता प्रतिवादीस, हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला

प्रतिवादीच्या विरुद्ध काढलेला एकतर्फी हुकूमनामा रद्द करणे.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

असेल त्या न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि समन्स रीतसर बजावण्यात आले नव्हते किंवा एखाद्या पुरेशा कारणामुळे तो दावा सुनावणीसाठी पुकारला गेला तेव्हा उपस्थित राहू शकला नाही अशी त्याने न्यायालयाची खात्री पटवली तर, न्यायालयाने खर्च, न्यायालयातील भरणा याबाबतीत किंवा अन्य बाबतीत स्वत:ला योग्य वाटेल अशा अटींवर, त्याच्यापुरता तो हुकूमनामा रद्द करणारा आदेश काढला पाहिजे, आणि दाव्याचे कामकाज पुढे सुरू करण्यासाठी दिवस नियत केला पाहिजे :

काढला असेल त्या न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि समन्स रीतसर बजावण्यात आले नव्हते किंवा एखाद्या पुरेशा कारणामुळे तो दावा सुनावणीसाठी पुकारला गेला तेव्हा उपस्थित राहू शकला नाही अशी त्याने न्यायालयाची खात्री पटवली तर, न्यायालयाने खर्च, न्यायालयातील भरणा याबाबतीत किंवा अन्य बाबतीत स्वत:ला योग्य वाटेल अशा अटींवर, त्यांच्यापुरता तो हुकूमनामा रद्द करणारा आदेश काढला पाहिजे आणि दाव्याचे कामकाज पुढे सुरू करण्यासाठी दिवस नियत केला पाहिजे :

परंतु, हुकूमनामा केवळ अशाच प्रतिवादीपुरता रद्द करता येणार नाही अशा स्वरूपाचा असेल तर, तो अन्य सर्व प्रतिवादींच्या बाबतीत किंवा त्यापैकी कोणत्याही प्रतिवादीच्या पुरता रद्द करता येईल :

परंतु, हुकूमनामा केवळ अशाच प्रतिवादीपुरता रद्द करता येणार नाही अशा स्वरूपाचा असेल तर, तो अन्य सर्व प्रतिवादींच्या बाबतीत किंवा त्यापैकी कोणत्याही प्रतिवादीच्या पुरता रद्द करता येईल :

[१][परंतु, आणखी असे की, प्रतिवादीला सुनावणीच्या तारखेबद्दलची नोटीस मिळाली होती आणि उपस्थित होऊन वादीच्या हक्कमागणीला जाब देण्यास त्याला पुरेसा अवधी मिळाला होता यासंबंधी न्यायालयाची खात्री पटल्यास, एकतर्फी काढलेला हुकूमनामा कोणत्याही न्यायालयाने, केवळ बजावण्यामध्ये नियमबाह्यता होती एवढ्या कारणावरून रद्द करता कामा नये.]

परंतु, आणखी असे की, प्रतिवादीला सुनावणीची तारीख त्याला उपस्थित होण्यास पुरेशा इतक्या कालावधीत माहीत होती किंवा त्याने बुद्धिपुरस्सर वर्तन केले नसते तर माहीत झाली असती यासंबंधी न्यायालयाची खात्री पटल्यास केवळ समन्स बजावण्यामध्ये नियमबाह्यता होती एवढ्या कारणावरून कोणताही हुकूमनामा न्यायालयाने रद्द करता कामा नये.

स्पष्टीकरण एक.—आदेश पाचवा, नियम १५ अन्वये समन्स हे दाव्याच्या विषयवस्तूमध्ये प्रतिवादीच्या विरुद्ध हितसंबंध असणाऱ्या प्रौढ पुरुष व्यक्तीवर बजावण्यात आले असेल त्याबाबतीत ते या नियमाच्या अर्थानुसार रीतसर बजावण्यात आले आहे असे मानण्यात येणार नाही.

[२][स्पष्टीकरण.—या नियमाखाली एकतर्फी काढलेल्या हुकूमनाम्याच्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल आणि अपीलकर्त्याने अपील मागे घेतले याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव अपील निकालात काढलेले असेल तर, तो एकतर्फी हुकूमनामा रद्द करण्यासाठी या नियमासाठी कोणताही अर्ज करता येणार नाही.]

स्पष्टीकरण दोन.—या नियमाखाली एकतर्फी काढलेल्या हुकूमनाम्याच्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल आणि अपीलकर्त्याने अपील मागे घेतले याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव अपील निकालात काढलेले असेल तर, तो एकतर्फी हुकूमनामा रद्द करण्यासाठी या नियमाखाली कोणताही अर्ज करता येणार नाही.]

विरुद्ध पक्षकाराला नोटीस दिल्याखेरीज कोणताही हुकूमनामा रद्द करता येणार नाही.

१४. विरुद्ध पक्षकारावर नोटीस बजावल्याखेरीज पूर्वोक्त अशा कोणत्याही अर्जावरून कोणताही हुकूमनामा रद्द करता कामा नये.

या आदेशाचे उपबंध अपिलांना लागू असणे

[१][१५. हा आदेश अपिलांना लागू असेल तेथवर, "वादी" या शब्दामध्ये "अपीलकार" या शब्दाचा, "प्रतिवादी" या शब्दामध्ये "उत्तरवादी" या शब्दाचा आणि "दावा" या शब्दामध्ये "अपील" या शब्दाचा अंतर्भाव होतो, असे समजण्यात येईल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ५९ (पाच) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ५९ (सहा) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (२) याद्वारे समाविष्ट केले.

आदेश दहावा

न्यायालयाकडून पक्षकारांची तपासणी

न्यायालयातील अभिकथने कबूल करण्यात आली आहेत की नाकबूल करण्यात आली आहेत यासंबंधी खात्री करून घेणे.

१. दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी न्यायालय प्रत्येक पक्षकाराकडून किंवा त्याच्या प्लीडर कडून वादपत्रात किंवा विरुद्ध पक्षकाराने दिलेल्या प्रतिवादपत्रात (कोणतीही असल्यास) केलेली असतील अशी आणि जी अभिकथने एखाद्या पक्षकाराविरुद्ध केलेली असून ती त्या पक्षकाराने स्पष्टपणे किंवा अपरिहार्य उपलक्षणेने कबूल केलेली किंवा नाकबूल केलेली नसतील अशी सध्याची अभिकथने त्याला कबूल आहेत की नाकबूल आहेत, यासंबंधी खात्री करून घेईल. न्यायालय अशा कबुलींची किंवा नाकबुलींची नोंद करील.

पक्षकाराची अथवा पक्षकाराच्या सोबत्यांची मौखिक तपासणी.

[१][२. (१) दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी न्यायालय,—

(क) दाव्यातील वादग्रस्त बाबी स्पष्ट करून घेण्याच्या दृष्टीने न्यायालयात जातीने उपस्थित राहिलेल्या किंवा न्यायालयात हजर असणाऱ्या पक्षकारांपैकी स्वत:स योग्य वाटेल अशा पक्षकारांची मौखिक तपासणी करील ; आणि

(ख) जी व्यक्ती न्यायालयात जातीने उपस्थित होणाऱ्या किंवा न्यायालयात हजर असणाऱ्या कोणत्याही पक्षकाराच्या अथवा त्याच्या प्लीडरच्या सोबत आलेली असून दाव्याच्या संबंधात कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नांचे उत्तर देण्यास समर्थ असेल, अशा कोणत्याही व्यक्तीची मौखिक तपासणी करू शकेल.

(२) नंतरच्या कोणत्याही सुनावणीच्या वेळी, न्यायालयात जातीने उपस्थित होणाऱ्या किंवा न्यायालयात हजर असणाऱ्या कोणत्याही पक्षकाराची अथवा जी व्यक्ती अशाच पक्षकाराच्या किंवा त्याच्या प्लीडरच्या सोबत आलेली असून दाव्याच्या संबंधात, कोणत्याही महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर देण्यास समर्थ असेल अशा कोणत्याही व्यक्तीची मौखिक तपासणी करू शकेल.

(३) न्यायालय, स्वत:ला योग्य वाटल्यास, या आदेशातील तपासणीच्या वेळी कोणत्याही पक्षकाराने सूचित केलेले प्रश्न विचारू शकेल.]

तपासणीचा आशय लेखी नमूद करणे.

[१][३. तपासणीचा आशय न्यायाधीश लेखी नमूद करील व तो अभिलेखाचा भाग बनेल.]

उत्तर देण्यास प्लीडरने नकार दिल्यास किंवा तो असमर्थ ठरल्यास त्याचा परिणाम.

४. (१) जो पक्षकार प्लीडरमार्फत उपस्थित होतो अशा कोणत्याही पक्षकाराच्या प्लीडरने किंवा नियम २ मध्ये निर्दिष्ट अशा प्लीडरच्या सोबत आलेल्या कोणत्याही व्यक्तीने, तो ज्या पक्षकाराचे प्रतिनिधित्व करीत असेल त्या पक्षकाराने दाव्याच्या संबंधातील ज्या महत्त्वाच्या प्रश्नाचे उत्तर द्यावयास हवे आणि खुद्द त्याला परिप्रश्न केल्यानंतर तो उत्तर देऊ शकेल असे न्यायालयास वाटत असेल अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्यास नकार दिला किंवा उत्तर देण्यास तो असमर्थ असेल तर, न्यायालय दाव्याची सुनावणी नंतरच्या एखाद्या दिवसापर्यंत पुढे ढकलू शकेल आणि अशा पक्षकाराने अशा दिवशी जातीने उपस्थित राहावे असा निदेश देऊ शकेल.

(२) कायदेशीर सबब नसताना असा पक्षकार अशा नियत दिवशी जातीने उपस्थित राहण्यात कसूर करील तर, न्यायालय त्याच्याविरुद्ध, न्यायनिर्णय अधिघोषित करू शकेल किंवा दाव्याच्या संबंधात न्यायालय स्वत:ला योग्य वाटेल, असा आदेश काढू शकेल.

आदेश अकरावा

शोध व निरीक्षण

परिप्रश्नाद्वारे शोध.

१. कोणत्याही दाव्यामध्ये वादी किंवा प्रतिवादी न्यायालयाच्या परवानगीने विरुद्ध पक्षकारांची किंवा अशा पक्षकारांपैकी एकाची अथवा अनेकांची तपासणी करण्यासाठी लेखी परिप्रश्नपत्रिका सुपूर्द करू शकेल आणि अशी परिप्रश्नपत्रिका सुपूर्द करण्यात आल्यानंतर अशा व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्तीने अशांपैकी कोणत्या परिप्रश्नांना उत्तर द्यावयाचे ते परिप्रश्नपत्रिकेच्या तळाशी नमूद करण्यात येईल :

परंतु, कोणत्याही पक्षकार त्या प्रयोजनार्थ, आदेश काढलेला असल्याखेरीज त्या पक्षकाराला परिप्रश्नाचे एकापेक्षा अधिक संच सुपूर्द करणार नाही :

परंतु आणखी असे की, दाव्यातील वादग्रस्त बाबींशी, जे संबंधित नाहीत ते परिप्रश्न त्या साक्षीदाराच्या तोंडी उलट तपासणीच्या वेळी अनुज्ञेय असले तरीही असंबद्ध असल्याचे मानण्यात येईल.

---

१. सन १९७६ चा केंद्रीय अधिनियम १०४ च्या कलम ६० अन्वये बदली दाखल करण्यात आले.

२. हा नियम औधच्या मुख्य न्यायालयास लागू होणार नाही, पहा "औध न्यायालय अधिनियम, १९२५" (१९२५ चा उ.प्र. ४) यांचे कलम १६(२).

विशिष्ट परिप्रश्न-पत्रिका सादर करावयाच्या.

२. परिप्रश्नपत्रिका सुपूर्द करण्याच्या परवानगीसाठी अर्ज करण्यात आल्यानंतर सुपूर्द करण्याचे ठरवलेले विशिष्ट परिप्रश्न न्यायालयाकडे सादर करावे लागतील. अशा अर्जाचा निर्णय करताना न्यायालय, ज्याला अजून परिप्रश्न करावयाचे आहेत त्या पक्षकाराने तपशील देण्याची किंवा कबुली देण्याची किंवा याविषयी किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींशी संबंधित कागदपत्रे सादर करण्याची तयारी दर्शवल्यास, तो प्रस्ताव विचारात घेईल आणि सादर केलेल्या परिप्रश्नपत्रिकांपैकी दावा रास्तपणे निकालात काढण्यासाठी किंवा खर्च वाचविण्यासाठी आवश्यक असल्याचे न्यायालयास वाटेल अशाच परिप्रश्नपत्रिकांना परवानगी देण्यात येईल.

परिप्रश्नपत्रिकांचा खर्च.

३. दाव्याच्या खर्चाचा मेळ घालताना, अशा परिप्रश्नपत्रिका निशाणी म्हणून दाखल करण्यात कितपत औचित्य होते यासंबंधी कोणत्याही पक्षकाराच्या विनंतीवरून चौकशी करण्यात येईल, आणि चौकशीकरिता अर्ज करण्यात आला असता किंवा आला नसता तरीही, अशा परिप्रश्नपत्रिका गैरवाजवीपणे किंवा ताप देण्याकरता दाखल केल्या आहेत किंवा त्या भलत्याच लांबलचक आहेत असे परिव्यय निर्धारण-अधिकाऱ्याचे किंवा न्यायालयाचे मत असेल तर, सदर परिप्रश्नपत्रिकांमुळे व त्यांना उत्तरे द्यावी लागल्या-मुळे उद्भवलेला खर्च काहीही झाले तरी, कसूरदार पक्षकाराला भरावा लागेल.

परिप्रश्नपत्रिकांचा नमुना.

४. परिप्रश्नपत्रिका परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक २ मध्ये परिस्थितीनुसार आवश्यक असतील अशा फेरबदलांसह द्याव्या लागतील.

महामंडळे.

५. दाव्यातील एखादा पक्षकार म्हणजे एखादे महामंडळ किंवा व्यक्तीनिकाय असून—मग तो निर्गमित असो वा नसो—स्वत:च्या नावे अथवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा अन्य व्यक्तीच्या नावे स्वत: दावा लावण्याचा किंवा स्वत:विरुद्ध दावा लावला जाण्याची त्याला कायद्याने सक्ती असेल त्याबाबतीत, कोणताही विरुद्ध पक्षकार अशा महामंडळाच्या किंवा निकायाच्या कोणत्याही सदस्याकडे अथवा अधिकाऱ्याकडे परिप्रश्नपत्रिका सुपूर्द करण्याची आपणास परवानगी देण्यास आदेश मिळण्यासाठी अर्ज करू शकेल व त्यानुसार आदेश काढता येईल.

परिप्रश्नांच्या हरकती उत्तराने देणे.

६. एखादा परिप्रश्न बदनामीकारक आहे किंवा असंबद्ध आहे किंवा दाव्याच्या खऱ्याखुऱ्या प्रयोजनार्थ किंवा ज्याबाबतीत चौकशी चालू असेल त्या बाबी दाव्याच्या त्या टप्प्याला पुरेशा महत्त्वाच्या नाहीत या कारणास्तव [1][अथवा विशेषाधिकाराच्या कारणास्तव किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव] त्या परिप्रश्नाचे उत्तर देण्यास घेण्यात आलेली कोणतीही हरकत उत्तरादाखल दिलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये समाविष्ट करता येईल.

परप्रश्नपत्रिका रद्द ठरवणे आणि काढून टाकणे.

७. कोणतीही परिप्रश्नपत्रिका ती गैरवाजवीपणे किंवा ताप देण्याच्या हेतूने दाखल करण्यात आली आहे. या कारणावरून रद्द ठरवता येईल, अथवा ती पाल्हाळीक, जुलमी, अनावश्यक किंवा बदनामीकारक आहे या कारणावरून काढून टाकता येईल ; आणि या प्रयोजनार्थ, करावयाचा कोणताही अर्ज परिप्रश्नपत्रिका बजावण्यात आल्यानंतर सात दिवसांच्या आत करता येईल.

उत्तराचे शपथपत्र दाखल करणे.

८. परिप्रश्नपत्रिकांना शपथपत्राच्या द्वारे उत्तर द्यावे लागेल व ते दहा दिवसांच्या आत किंवा न्यायालय मंजूर करील अशा अन्य मुदतींच्या आत दाखल करावे लागेल.

उत्तराच्या शपथ-पत्राचा नमुना.

९. परिप्रश्नांच्या उत्तराचे शपथपत्र परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक ३ मध्ये परिस्थितीनुसार आवश्यक असतील अशा फेरबदलांसह द्यावे लागेल.

कोणताही आक्षेप घ्यावयाचा नाही.

१०. उत्तराच्या शपथपत्राला कोणताही आक्षेप घेता येणार नाही. पण असा कोणतेही शपथ-पत्र अपुरे आहे, असा आक्षेप घेतला गेल्यास, ते पुरेसा आहे किंवा कसे याचा निर्णय न्यायालय करील.

उत्तर देण्याचा किंवा खुलासेवार उत्तर देण्याचा आदेश.

११. ज्या व्यक्तीला परिप्रश्नपत्रिका देण्यात आली आहे त्या व्यक्तीने उत्तर देण्याचे टाळले, किंवा अपुरे उत्तर दिले तर, परिप्रश्न करणारा पक्षकार, त्या व्यक्तीने उत्तर द्यावे किंवा, प्रकरण-परत्वे, खुलासेवार उत्तर द्यावे, असे तिला फर्मावणारा आदेश काढला जावा यासाठी न्यायालयाकडे अर्ज करू शकेल आणि न्यायालय निदेश देईल त्यानुसार शपथपत्राद्वारे किंवा तोंडी तपासणीमध्ये उत्तर देण्यास किंवा खुलासेवार उत्तर देण्यास तिला फर्मावणारा आदेश काढता येईल.

दस्तऐवजांच्या शोधासाठी अर्ज.

१२. कोणताही पक्षकार, शपथपत्र दाखल न करता, कोणत्याही दाव्यामधील कोणत्याही दुसऱ्या पक्षकारास, त्यातील कोणत्याही वादग्रस्त बाबींशी संबंधित असे जे दस्तऐवज त्याच्या कब्जात किंवा अखत्याराखाली आहेत किंवा होते याचा शपथेवर शोध करावयास सांगणारा आदेश मिळण्यासाठी अर्ज करू शकेल. अशा अर्जाची सुनावणी झाल्यावर ते दस्तऐवजाचा याप्रमाणे शोध करवून घेण्याची आव-श्यकता नाही किंवा दाव्याच्या त्या टप्प्याला ती आवश्यकता नाही अशी न्यायालयाची खात्री झाल्यास,

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६१(एक) अन्वये बदली दाखल करण्यात आला.

ते तो अर्ज नाकारू शकेल किंवा त्याचे कामकाज तहकूब करू शकेल अथवा त्यास स्वविवेकानुसार योग्य वाटेल त्याप्रमाणे एक सर्वसाधारण अथवा दस्तऐवजांच्या विवक्षित वर्गापुरता मर्यादित असा आदेश काढू शकेल :

परंतु, दाव्याचा रास्त निर्णय करण्यासाठी किंवा खर्च वाचवण्यासाठी ते आवश्यक नाही असे न्यायालयाचे मत असेल तेव्हा आणि तेवढया मर्यादेपर्यंत असा शोधाबाबतचा आदेश देण्यात येणार नाही.

दस्तऐवजांबाबत शपथपत्र.

१३. लगतपूर्व नियमामध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे ज्या पक्षकाराच्या विरुद्ध असा आदेश काढण्यात आला असेल त्या पक्षकाराने करून द्यावयाच्या शपथपत्रामध्ये त्याला त्यात निर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणतेही दस्तऐवज (कोणतेही असल्यास) हजर करण्यास त्याची हरकत आहे ते विनिर्दिष्ट करावे लागेल आणि तो परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक ५ मध्ये परिस्थितीनुसार आवश्यक असतील त्या फेरबदलांसह करून द्यावा लागेल.

दस्तऐवज हजर करणे.

१४. एखादा दावा प्रलंबित असताना त्यामधील कोणत्याही पक्षकाराला दाव्यात वादग्रस्त असलेल्या कोणत्याही बाबीशी संबंधित असे त्याच्या कब्जातील किंवा अखत्याराखालील दस्तऐवज सादर करावेत असा आदेश न्यायालयाने देणे हे कायदेशीर असेल, आणि असे दस्तऐवज हजर करण्यात आल्यावर न्यायालय त्यास न्याय्य वाटेल अशा रीतीने त्याच्या संबंधात कार्यवाही करू शकेल.

वादकथने किंवा शपथपत्र यामध्ये निर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांचे निरीक्षण.

१५. दाव्यामधील प्रत्येक पक्षकार ज्याच्या वादकथनामध्ये किंवा शपथपत्रामध्ये कोणत्याही दस्तऐवजाचा उल्लेख करण्यात आला असेल अशा [१][किंवा ज्याने आपल्या वादकथनांना जोडलेल्या एखाद्या सूचीमध्ये कोणत्याही दस्तऐवजाचा समावेश केला असेल] अशा अन्य कोणत्याही पक्षकारास अशी नोटीस देण्यास हक्कदार असेल की, त्याने नोटीस देणाऱ्या पक्षकाराला किंवा त्याच्या प्लीडरला असा दस्तऐवज निरीक्षणासाठी हजर करावा आणि त्याला किंवा त्यांना त्याच्या प्रती काढून घेण्याची परवानगी द्यावी, आणि अशा नोटिशीचे पालन न करणाऱ्या कोणत्याही पक्षकारास अशा दाव्यामध्ये मागाहून स्वतःच्या वतीने असा कोणताही दस्तऐवज पुराव्यात दाखल करण्याची मुभा असणार नाही. मात्र तो दाव्यामधील प्रतिवादी असून असा दस्तऐवज फक्त त्याच्या स्वतःच्या स्वत्वाधिकाराशी संबंधित आहे असे अथवा अशा नोटिशीचे पालन न करण्यास न्यायालयास पुरेसे वाटेल असे दुसरे कोणतेही कारण किंवा सबब होती अशी त्याने न्यायालयाची खात्री पटवून दिल्यास त्याबाबतीत, न्यायालय दावा खर्चासंबंधी किंवा अन्यथा स्वतःस योग्य वाटतील अशा अटींवर तो दस्तऐवज पुराव्यात दाखल करण्याची मुभा देऊ शकेल.

हजर करण्याची नोटीस.

१६. कोणत्याही पक्षकाराला त्याच्या वादकथनात किंवा शपथपत्रात निर्दिष्ट केलेले कोणतेही दस्तऐवज हजर करावयास सांगणारी नोटीस परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक ७ मध्ये परिस्थितीनुसार आवश्यक असतील अशा फरकासह द्यावी लागेल.

नोटीस दिलेली असेल तेव्हा निरीक्षण करण्याची वेळ.

१७. ज्या पक्षकाराला अशी नोटीस देण्यात आली असेल त्या पक्षकाराला अशी नोटीस मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत ती नोटीस देणाऱ्या पक्षकाराकडे एक नोटीस सुपूर्द करून तीमध्ये नोटीस सुपूर्द केल्यापासून तीन दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, ते दस्तऐवज किंवा त्यांपैकी जे दस्तऐवज हजर करण्यास त्याची हरकत नसेल असे दस्तऐवज त्याच्या प्लीडरच्या कार्यालयात अथवा बँकेची पुस्तके किंवा अन्य हिशेब पुस्तके अगर कोणताही व्यापार किंवा धंदा याच्या प्रयोजनार्थ नेहमी वापरावी लागणारी पुस्तके ती ज्या ठिकाणी नेहमी अभिरक्षेत ठेवण्यात येतात त्या ठिकाणी निरीक्षण करता येतील ते नमूद करावे लागेल व त्यापैकी कोणते दस्तऐवज हजर करण्यास त्याची हरकत आहे (काही असल्यास) व ती कोणत्या कारणांवरून तेही नमूद करावे लागेल. अशी नोटीस परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक ८ मध्ये परिस्थितीनुसार आवश्यक असतील अशा फरकासह द्यावी लागेल.

निरीक्षणाचा आदेश.

१८. (१) नियम १५ खाली या पक्षकारास नोटीस बजावण्यात आली असेल असा पक्षकार, निरीक्षणाच्या वेळेसंबंधीची नोटीस देण्यास चुकला किंवा निरीक्षणास त्याने हरकत घेतली किंवा त्याच्या प्लीडरच्या कार्यालयाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी त्याने निरीक्षण करू देण्याची तयारी दर्शवली तर, न्यायालय ज्या पक्षकाराची त्या निरीक्षणाची इच्छा असेल त्या पक्षकाराच्या अर्जावरून स्वतःस योग्य वाटेल अशा ठिकाणी व अशा रीतीने निरीक्षण करण्यासंबंधीचा आदेश काढू शकेल :

परंतु, दाव्याचा रास्त निर्णय होण्यासाठी किंवा खर्च वाचवण्यासाठी ते आवश्यक नाही असे न्यायालयाचे मत असेल तेव्हा आणि तेवढया मर्यादेपर्यंत असा आदेश काढण्यात येणार नाही.

(२) दस्तऐवजांच्या निरीक्षणासाठी केलेला अर्ज ज्या पक्षकाराच्या विरुद्ध करण्यात आला असेल अशा पक्षकाराने दिलेल्या वादकथनांमध्ये, तपशिलांमध्ये किंवा शपथपत्रांमध्ये जे निर्दिष्ट केलेले आहेत किंवा त्याच्या दस्तऐवजविषयक शपथपत्रामध्ये उघड केलेले आहेत त्याखेरीज अन्य दस्तऐवज निरीक्षणासाठी सादर केलेला असेल तो अर्ज ज्या दस्तऐवजाचे निरीक्षण करावयाचे आहे ते दस्तऐवज कोणते, अर्ज करणारा पक्षकार त्यांची पाहणी करण्यास हक्कदार आहे आणि ते विरुद्ध पक्षकाराच्या कब्जामध्ये किंवा अखत्याराखाली आहेत हे दर्शवणाऱ्या शपथपत्रावर आधारलेला असावा लागेल. रास्त निर्णय होण्यासाठी किंवा खर्च वाचवण्यासाठी ते आवश्यक नाही असे न्यायालयाचे मत असेल तेव्हा व तेवढया मर्यादेपर्यंत न्यायालय अशा दस्तऐवजांच्या निरीक्षणासाठी असा आदेश काढणार नाही.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६१ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

सत्यापित प्रती.

१९. (१) खंडाच्या संबंधातील कोणत्याही पुस्तकांच्या निरीक्षणासाठी अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, न्यायालय स्वत:ला योग्य वाटल्यास, मूळ पुस्तकांच्या पाहणीचा आदेश देण्याच्या ऐवजी त्यामधील कोणत्याही नोंदीची प्रत पुरवण्यात यावी व ज्या व्यक्तीने प्रत मूळ नोंदीबरोबर तपासून पाहिली असेल त्या व्यक्तीच्या शपथपत्राद्वारे सत्यापित करण्यात यावी असा आदेश देऊ शकेल व मूळ पुस्तकात कोणत्याही खाडाखोडी झाल्या आहेत काय, ओळींच्या मध्ये मजकूर समाविष्ट केला आहे काय किंवा काही फेरबदल करण्यात आले आहेत काय व ते कोणत्या प्रकारचे ते शपथपत्रामध्ये नमूद करावे लागेल :

परंतु, अशी प्रत पुरवण्यास आलेली असली तरीही, ज्या पुस्तकावरून ती प्रत काढण्यात आली असेल त्या पुस्तकाच्या निरीक्षणाचा आदेश न्यायालय देऊ शकेल.

(२) निरीक्षणाच्या आदेशाकरिता अर्ज करण्यात आला असता, एखाद्या दस्तऐवजाच्या संबंधात विशेषाधिकार असल्याचा दावा सांगण्यात येईल त्याबाबतीत, [१][तो दस्तऐवज शासकीय बाबींशी संबंधित नसेल तर] विशेषाधिकारासंबंधी सांगितलेला दावा कितपत विधिग्राह्य आहे ते ठरवण्यासाठी न्यायालयाने दस्तऐवजाचे निरीक्षण करणे हे कायदेशीर असेल.

(३) दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने कोणत्याही वेळी अर्ज केला असता आणि दस्तऐवजविषयक शपथपत्र करून देण्याचे आदेश अगर ते शपथपत्र अगोदरच देण्यात आलेले असेल वा नसेल तरीही न्यायालय आदेश काढून त्याद्वारे दुसऱ्या कोणत्याही पक्षकाराला त्या अर्जात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्यांपैकी कोणताही एक अथवा अनेक दस्तऐवज त्याच्या कब्जामध्ये, अखत्याराखाली आहे किंवा आहेत अथवा केव्हातरी होता किंवा होते किंवा कसे आणि ते आपल्या/त्याच्या कब्जात नसतील तर त्याचा/त्यांचा कब्जा त्याने केव्हा सोडला व त्याचे पुढे काय झाले ते शपथपत्राद्वारे निवेदन करण्यास फर्मावू शकेल. असा अर्ज तो ज्या पक्षकाराच्या विरुद्ध करण्यात आला असेल त्याच पक्षकाराच्या कब्जामध्ये किंवा अखत्याराखाली अर्जामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला दस्तऐवज किंवा आलेले दस्तऐवज आहेत किंवा केव्हातरी होते अशी जबानीदाराची समजूत आहे आणि ते दाव्यातील वादग्रस्त बाबींशी किंवा त्यांपैकी काहींशी संबंधित आहेत असे निवेदन करणाऱ्या शपथपत्राच्या आधारे करावा लागेल.

अकाली शोध.

२०. ज्या पक्षकाराकडून कोणत्याही प्रकारचा शोध करून घ्यावयाचा आहे किंवा ज्याच्याकडील दस्तऐवज निरीक्षणासाठी मागवावयाचे आहेत तो पक्षकार त्यास किंवा त्याच्या कोणत्याही भागास हरकत घेईल त्याबाबतीत, शोधासंबंधीचा किंवा निरीक्षणाचा हक्क दाव्यामध्ये वादग्रस्त असलेल्या कोणत्याही मुद्द्याच्या किंवा प्रश्नाच्या निर्णयावर अवलंबून आहे याबद्दल अथवा शोध करण्यासंबंधीचा किंवा निरीक्षण करण्याच्या हक्काचा निर्णय करण्यापूर्वी दाव्यामध्ये वादग्रस्त असलेल्या कोणत्याही मुद्द्याचा किंवा प्रश्नाचा निर्णय करणे अन्य काही कारणास्तव इष्ट आहे याबद्दल न्यायालयाची खात्री पटल्यास, ते प्रथम अशा मुद्द्याचा किंवा प्रश्नाचा निर्णय करण्याचा आदेश देऊ शकेल आणि शोधाचा व निरीक्षणाचा प्रश्न राखून ठेवू शकेल.

शोधाबाबतच्या आदेशांचे पालन न करणे.

२१. [१][(१)] परिप्रश्नांना उत्तर देण्याच्या संबंधीच्या अथवा दस्तऐवजांचा शोध किंवा निरीक्षण यासंबंधीच्या आदेशांचे अनुपालन करण्यास कोणताही पक्षकार चुकला तर, तो पक्षकार वादी असेल त्याबाबतीत, त्याने फिर्याद चालवली नाही या कारणास्तव त्याचा दावा फेटाळला जाण्यास पात्र होईल आणि, तो प्रतिवादी असेल त्याबाबतीत, त्याने कोणताही बचाव दिलेला असल्यास तो काढून टाकला जाण्यास आणि त्याने बचाव दिलाच नव्हता असे समजून त्याप्रमाणे तो मूळ पदावर आणला जाण्यास पात्र होईल, व परिप्रश्न देणारा अथवा शोध किंवा निरीक्षणाची मागणी करणारा पक्षकार तशा अर्थाचा आदेश मिळण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करू शकेल व [२][पक्षकारांना नोटीस दिल्यानंतर आणि त्यांना आपले म्हणणे मांडण्याची योग्य संधी दिल्यानंतर अशा अर्जावरून तदनुसार आदेश काढता येईल.]

[२][(२) पोटनियम (१) खाली एखादा दावा फेटाळणारा आदेश काढण्यात आला असेल त्याबाबतीत, त्याच वादकारणावरून नवीन दावा लावण्यास वादीला प्रतिबंध होईल.]

परिप्रश्नांच्या उत्तरांचा उपयोग संपरीक्षेच्या वेळी करणे.

२२. कोणताही पक्षकार विरुद्ध पक्षकाराने परिप्रश्नांना दिलेल्या उत्तरांपैकी कोणतेही एक किंवा अनेक उत्तरे अथवा एखाद्या उत्तराचा भाग दाव्याच्या संपरीक्षेच्या अन्य उत्तराचा किंवा उत्तराच्या संपूर्ण भागाचा समावेश न करता पुरावा म्हणून उपयोगात आणू शकेल :

परंतु, नेहमीची शर्त अशी की, अशा प्रकरणी न्यायालय संपूर्ण उत्तरे विचारात घेऊ शकेल व यांपैकी इतर काही उत्तरे पुराव्यात दाखल केलेल्या उत्तरांशी इतकी निगडीत आहेत की, लगतपूर्वी उल्लेखिलेली उत्तरे त्याच्याशिवाय उपयोगात आणू नयेत असे न्यायालयाचे मत असेल तर, न्यायालय त्या उत्तरांचा समावेश करण्याचा निदेश देऊ शकेल.

---

१. सन १९७६ च्या अधिनियम क्रमांक १०४ च्या कलम ६१ (चार) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६१ (चार) अन्वये नियम २१ ला, त्या नियमाचा पोटनियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६१ (चार) (क) अन्वये ऐवजी दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ६१ (चार) (ख) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

२३. ही नियमावली अज्ञान वादींना व प्रतिवादींना आणि नि:समर्थ व्यक्तींच्या दाव्यांच्या संबंधातील त्यांच्या वादमित्रांना व पालकांना लागू होईल. नियमावली अज्ञान व्यक्तींना लागू असणे.

आदेश बारावा

कबुली

१. दाव्यातील कोणत्याही पक्षकारास, दुसऱ्या कोणत्याही पक्षकाराच्या संपूर्ण हकीकतीत किंवा तिच्या कोणत्याही भागात तथ्य असल्याचे आपणास कबूल आहे, अशी आपल्या वादकथनाद्वारे किंवा अन्य प्रकारे लेखी नोटीस देता येईल. हकीकत कबूल असल्याविषयी नोटीस.

२. कोणताही पक्षकार दुसऱ्या पक्षकाराने [१][नोटीस बजावल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत सर्व न्याय्य अपवाद वगळता, एखादा दस्तऐवज] कबूल करावा असे त्यास सांगू शकेल, आणि अशी नोटीस दिल्यानंतर कबुली देण्यास नकार देण्यात आल्यास किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्यास त्याबाबतीत, असा कोणताही दस्तऐवज शाबीत करण्याचा खर्च, न्यायालयाने अन्यथा निदेश दिलेला नसेल तर, याप्रमाणे नकार देणाऱ्या किंवा दुर्लक्ष करणाऱ्या पक्षकाराला भरावा लागेल—मग दाव्याचा निकाल काहीही होवो—आणि नोटीस न देण्याने खर्चात बचत होते असे न्यायालयाचे मत असेल तेव्हाची बाब वगळून एरव्ही, अशी नोटीस दिल्याशिवाय कोणताही दस्तऐवज शाबीत करण्याचा खर्च देववण्यात येणार नाही. दस्तऐवज कबूल करण्यासाठी नोटीस.

[२][२क. (१) पक्षकाराला जो दस्तऐवज कबूल करण्याविषयी सांगण्यात आले असेल असा प्रत्येक दस्तऐवज विनिर्देशपूर्वक किंवा अपरिहार्य उपलक्षणेने नाकबूल करण्यात आला नसेल, अथवा त्या पक्षकाराच्या वादकथनात किंवा दस्तऐवज कबूल करण्याविषयीच्या नोटिशीच्या उत्तरामध्ये, तो कबूल न केल्याचे नमूद करण्यात आले नसेल तर, तो दस्तऐवज नि:समर्थ व्यक्तीची बाब वगळून एरव्ही, कबूल केला असल्याचे मानण्यात येईल : दस्तऐवज कबूल करण्यासाठी नोटीस बजावल्यानंतर नाकबूल करण्यात आले नाही तर ते मान्य करण्यात आल्याचे समजण्यात यावयाचे.

परंतु, न्यायालय स्वविवेकानुसार व कारणे लेखी नमूद करून अशा प्रकारे कबूल करण्यात आलेला कोणताही दस्तऐवज, अशा कबुली व्यतिरिक्त अन्य प्रकारे शाबीत करण्यास फर्माबू शकेल.

(२) एखादा पक्षकार, दस्तऐवज कबूल करण्यासंबंधीची नोटीस त्याच्यावर बजावण्यात आल्यानंतर तो दस्तऐवज कबूल करण्याकडे गैरवाजवी दुर्लक्ष करील किंवा त्यास नकार देईल त्याबाबतीत, न्यायालय, त्याने दुसऱ्या पक्षकारास भरपाई म्हणून खर्च द्यावा लागेल असा निदेश त्यास देऊ शकेल.]

३. दस्तऐवज कबूल करण्यासाठी द्यावयाची नोटीस परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक ९ मध्ये परिस्थितीनुसार त्यात आवश्यक असतील त्या फेरबदलांसह द्यावी लागेल. नोटीशीचा नमुना.

[३][३क. नियम २ खाली दस्तऐवज कबूल करण्यासाठी कोणतीही नोटीस देण्यात आलेली नसली तरीही, न्यायालय त्याच्यासमोर चालू असलेल्या कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला स्वत: होऊन कोणत्याही पक्षकाराला कोणताही दस्तऐवज कबूल करण्यास सांगू शकेल, आणि अशा बाबतीत पक्षकार असा दस्तऐवज कबूल करतो किंवा तो कबूल करण्यास नकार देतो अथवा त्याकडे दुर्लक्ष करतो किंवा कसे ते नमूद करील.] कबुलीची नोंद करण्याची न्यायालयाची शक्ती.

४. कोणताही पक्षकार लेखी नोटीशीद्वारे अन्य कोणत्याही पक्षकाराला सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाच्या किमान नऊ दिवस आधी कोणत्याही वेळी, अशा नोटीशीमध्ये उल्लेखिलेले एखादे विनिर्दिष्ट तथ्य किंवा तथ्ये केवळ दाव्याच्या प्रयोजनार्थ कबूल करण्यास सांगू शकेल, आणि अशी नोटीस बजावण्यात आल्यानंतर सहा दिवसात किंवा न्यायालय मंजूर करील अशा वाढीव मुदतीत ते तथ्य कबूल करण्यास पक्षकार नकार देईल किंवा त्याकडे दुर्लक्ष करील त्याबाबतीत, असे तथ्य किंवा अशी तथ्ये शाबीत करण्याचा खर्च, न्यायालयाने अन्यप्रकारे निदेश दिलेला नसेल तर, याप्रमाणे नकार देणाऱ्या किंवा दुर्लक्ष करणाऱ्या पक्षकाराला भरावा लागेल—मग दाव्याचा निकाल काहीही होवो : तथ्ये कबूल करण्यासाठी नोटीस.

परंतु, अशा नोटीशीच्या अनुरोधाने दिलेली कबुली त्या पक्षकाराच्या विरुद्ध अन्य कोणत्याही प्रसंगी किंवा नोटीस देणाऱ्या पक्षकाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीच्या बाजूने उपयोगात आणावयाची कबुली म्हणून नव्हे तर, ती केवळ विशिष्ट दाव्याच्या प्रयोजनार्थ दिलेली कबुली असल्याचे मानण्यात येईल :

परंतु आणखी असे की, न्यायालय कोणत्याही पक्षकाराला त्याने याप्रमाणे दिलेल्या कोणत्याही कबुलीमध्ये सुधारणा करण्यास अथवा ती मागे घेण्यास न्याय असतील अशा अटींवर परवानगी देऊ शकेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६२ (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६२ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९५६ चा अधिनियम ६६ च्या कलम १४ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

कबुलींचा नमुना.

५. तथ्ये कबूल करण्यासाठी द्यावयाची नोटीस परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक १० मध्ये आणि तथ्याची कबुली परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक १ मध्ये परिस्थितीनुसार त्यात आवश्यक असलेल्या फेरबदलांसह द्यावी लागेल.

कबुलींच्या आधारे न्यायनिर्णय.

[१][६. (१) वादकथनामध्ये किंवा अन्यत्र तथ्यांना कबुली देण्यात आलेली असेल—मग ती तोंडी असो वा लेखी असो—न्यायालय दाव्यातील कोणत्याही टप्प्याला, कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून किंवा स्वत: होऊन आणि पक्षकारांमधील अन्य कोणत्याही प्रश्नाच्या निर्णयासाठी न थांबता अशा कबुली विचारात घेऊन, स्वत:स योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल किंवा न्यायनिर्णय देऊ शकेल.

(२) पोटनियम (१) खाली न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात येईल तेव्हा तेव्हा न्यायनिर्णयानुसार हुकूमनामा रीतसर तयार करण्यात येईल आणि हुकूमनाम्यावर ज्या दिवशी न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात आला असेल त्या दिवसाची तारीख असेल.]

स्वाक्षरीविषयक शपथपत्र.

७. दस्तऐवज किंवा तथ्ये कबूल करण्याच्या कोणत्याही नोटिशीला अनुसरून केलेल्या कोणत्याही कबुलीसंबंधी पुरावा मागण्यात आला असेल तर, त्याखाली योग्य ती स्वाक्षरी असल्याबद्दल प्लीडरचे अथवा त्याच्या कारकुनाचे शपथपत्र हा त्यासंबंधी अशा कबुलीचा पुरेसा पुरावा असेल.

दस्तऐवज हजर करण्यासाठी नोटीस.

८. दस्तऐवज हजर करण्यासाठी द्यावयाची नोटीस परिशिष्ट 'ग' मधील नमुना क्रमांक १२ मध्ये परिस्थितीनुसार त्यात आवश्यक असलेल्या फेरबदलांसह द्यावी लागेल. दस्तऐवज हजर करण्याची कोणतीही नोटीस बजावण्यात आली असल्याबद्दल व ती केव्हा बजावण्यात आली त्या वेळेबद्दल प्लीडरने किंवा याच्या कारकुनाने करून दिलेले शपथपत्र व सोबत दस्तऐवज हजर करण्याविषयीच्या नोटिशीची प्रत या गोष्टी सर्व बाबतीत नोटीस बजावण्याचा व ती केव्हा बजावली असेल त्या वेळेसंबंधीचा पुरेसा पुरावा असेल.

खर्च.

९. दस्तऐवज कबूल करण्याच्या किंवा ते हजर करण्याच्या नोटिशीमध्ये जे दस्तऐवज विनिर्दिष्ट करण्यात आले असतील ते अनावश्यक असल्यास त्यामुळे उद्भवणारा खर्च, अशी नोटीस देणाऱ्या पक्षकाराला सोसावा लागेल.

आदेश तेरावा

दस्तऐवज हजर करणे, ते अडकवून ठेवणे व ते परत करणे

[१][वादमुद्द्यांच्या निश्चितीच्या वेळी किंवा त्यापूर्वी] कागदोपत्री लेखी पुरावा सादर करावा.

१. (१) पक्षकार किंवा त्यांचे प्लीडर यांना, ज्या कागदोपत्री पुराव्याचा आधार घेण्याचा त्यांचा इरादा असेल व जो अगोदरच न्यायालयात दाखल केलेला नसेल असा त्याच्या कब्जातील किंवा अधिकाराखालील सर्व कागदोपत्री पुरावा आणि न्यायालयाने जे दस्तऐवज हजर करण्याचा आदेश दिला असेल असे सर्व दस्तऐवज [१][वादमुद्द्यांच्या निश्चितीच्या वेळी किंवा त्यापूर्वी] हजर करावे लागतील.

(२) अशा प्रकारे हजर केलेले कागदपत्र न्यायालय स्वीकारील. मात्र त्यासोबत उच्च न्यायालय निदेशित करील अशा नमुन्यात तयार केलेली त्यांची बिनचूक यादी जोडावी लागेल.

कागदपत्र हजर न केल्याचा परिणाम.

२. [१][(१)] कोणत्याही पक्षकाराच्या कब्जात किंवा अधिकाराखाली असलेला जो लेखी कागदोपत्री पुरावा नियम १ च्या आवश्यकतांनुसार हजर करावयास हवा होता पण तसा तो केलेला नाही,

[१][१. (१) पक्षकार किंवा त्यांचे प्लीडर यांना, ज्या कागदोपत्री पुराव्याचा आधार घेण्याचा त्यांचा इरादा असेल व जो अगोदरच न्यायालयात दाखल केलेला नसेल असा त्यांच्या कब्जातील किंवा अधिकाराखालील सर्व कागदोपत्री पुरावा आणि न्यायालयाने जे दस्तऐवज हजर करण्याचा आदेश दिला असेल असे सर्व दस्तऐवज वादमुद्द्यांच्या निश्चितीच्या वेळी किंवा त्यापूर्वी हजर करावे लागतील.

(२) अशाप्रकारे हजर केलेले दस्तऐवज न्यायालय स्वीकारील. मात्र, त्यासोबत, उच्च न्यायालय निदेशित करील अशा नमुन्यात तयार केलेली त्यांची बिनचूक यादी जोडावी लागेल.]

वादमुद्द्यांच्या निश्चितीच्या वेळी किंवा त्यापूर्वी कागदोपत्री लेखी पुरावा सादर करावा.

[१][२. कोणत्याही पक्षकाराच्या कब्जात किंवा अधिकाराखाली असलेला जो कागदोपत्री पुरावा नियम १ च्या आवश्यकतांनुसार हजर करावयास हवा होता पण तसा तो केलेला नाही असा कोणताही

कागदपत्र हजर न केल्याचा परिणाम.

---

१. सन १९७६ चा अधिनियम क्र. १०४, कलम ६२ (तीन) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६३ (एक) (क) अन्वये "पहिल्या सुनावणीच्या वेळी" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६३ (एक) (ख) अन्वये "दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ६३ (दोन) अन्वये पोटनियम (१) यास नियम २ असा पुन्हा क्र. देण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ३३ द्वारे ऐवजी दाखल करण्यात आले.

२. वरील अधिसूचनेच्या खंड ३४ द्वारे ऐवजी दाखल करण्यात आला.

असा कोणताही कागदोपत्री पुरावा, तो हजर न करण्याबद्दल न्यायालयाची खात्री पटेल असे सबळ कारण दाखवून दिल्याशिवाय, कार्यवाहीच्या नंतरच्या कोणत्याही टप्प्यात स्वीकारता येणार नाही. आणि असा कोणताही पुरावा स्वीकारणाऱ्या न्यायालयाने तसे करण्याबद्दलची कारणे नमूद केली पाहिजेत.

[१][(२) पोटनियम (१) मधील कोणतीही गोष्ट,—

(क्) अन्य पक्षकारांच्या साक्षीदारांच्या उलटतपासणीकरिता सादर केलेल्या, किंवा

(ख्) एखाद्या साक्षीदाराला केवळ त्याच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी दिलेल्या,

दस्तऐवजांना लागू होणार नाही.]

कागदोपत्री पुरावा, तो हजर न करण्याबद्दल न्यायालयाची खात्री पटेल असे सबळ कारण दाखवून दिल्याशिवाय, कार्यवाहीच्या नंतरच्या कोणत्याही टप्प्यात स्वीकारता येणार नाही आणि असा कोणताही पुरावा स्वीकारणाऱ्या न्यायालयाने तसे करण्याबद्दलची कारणे नमूद केली पाहिजेत.

(२) या नियमातील कोणतीही गोष्ट, साक्षीदारांच्या उलटतपासणीच्या वेळी वापरावयाच्या किंवा साक्षीदाराला केवळ त्याच्या स्मृतीला उजाळा देण्यासाठी म्हणून दिलेल्या दस्तऐवजांना लागू होणार नाही.]

असंबद्ध किंवा अग्राह्य दस्तऐवज नाकारणे.

३. न्यायालयास स्वत:ला असंबद्ध किंवा अन्यथा अग्राह्य वाटेल असा कोणताही दस्तऐवज दाव्याच्या कोणत्याही टप्प्याला अशा नाकारण्याची कारणे नमूद करून नाकारता येईल.

पुराव्यामध्ये स्वीकारलेल्या दस्तऐवजांवरील पृष्ठांकने.

४. (१) लगतनंतरच्या पोटनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, जो जो दस्तऐवज दाव्यामध्ये पुराव्यात स्वीकारलेला असेल अशा प्रत्येक दस्तऐवजावर पुढील तपशील पृष्ठांकित केला पाहिजे :—

(क्) दाव्याचा क्रमांक व सरनामा,

(ख्) दस्तऐवज हजर करणाऱ्या व्यक्तीचे नाव,

(ग्) ज्या तारखेला तो हजर केला असेल ती तारीख, आणि

(घ्) तो अशा प्रकारे स्वीकृत केला असल्यासंबंधीचे विधान,

आणि अशा पृष्ठांकनावर न्यायाधीशाने सही किंवा आद्याक्षरी केली पाहिजे.

(२) अशाप्रकारे स्वीकारलेला दस्तऐवज म्हणजे एखाद्या पुस्तकातील, हिशेबातील किंवा अभिलेखातील नोंद असेल व लगतनंतरच्या नियमाखाली मूळ नोंदीऐवजी तिची प्रत सादर केली असेल तर, उपरोक्त तपशील त्या प्रतीवर पृष्ठांकित केला पाहिजे आणि त्यावरील पृष्ठांकनावर न्यायाधिशाने सही किंवा आद्याक्षरी केली पाहिजे.

पुराव्यामध्ये स्वीकारलेल्या दस्तऐवजांवरील पृष्ठांकने.

[१][४. (१) लगतनंतरच्या पोटनियमांच्या उपबंधांच्या अधीनतेने, जो जो दस्तऐवज दाव्यामध्ये पुराव्यात स्वीकारलेला असेल अशा प्रत्येक दस्तऐवजावर पुढील तपशील पृष्ठांकित केला पाहिजे :—

(क्) दाव्याचा क्रमांक व सरनामा,

(ख्) दस्तऐवज हजर करणाऱ्या व्यक्तीचे नाव,

(ग्) ज्या तारखेस हजर केला असेल ती तारीख, आणि

(घ्) तो अशा प्रकारे स्वीकृत केला असल्यासंबधीचे निवेदन,

आणि अशा पृष्ठांकनावर न्यायाधीशाने सही किंवा आद्याक्षरी केली पाहिजे [२][:

परंतु, मुंबई शहर दिवाणी न्यायालयातील कार्यवाहीमध्ये, अशा पृष्ठांकनावर, मुख्य न्यायाधीश याबाबतीत प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याला सही किंवा आद्याक्षरी करता येईल.]

(२) अशाप्रकारे स्वीकारलेल्या दस्तऐवज म्हणजे एखाद्या पुस्तकातील, हिशेबातील किंवा अभिलेखातील नोंद असेल व लगतनंतरच्या नियमाखाली मूळ नोंदीऐवजी तिची प्रत सादर केली असेल तर, उपरोक्त तपशील त्या प्रतीवर पृष्ठांकित केला पाहिजे आणि त्यावरील पृष्ठांकनावर न्यायाधीशाने सही किंवा आद्याक्षरी केली पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम क्र. १०४ च्या कलम ६३ (दोन) अन्वये समाविष्ट केला.

१. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक पी ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ३५ द्वारे ऐवजी दाखल केला.

२. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (१) द्वारे पूर्णविरामाच्या ऐवजी विसर्ग घातला आणि यापुढे परंतुक दाखल करण्यात आले.

पुस्तकातील, हिशेबातील आणि अभिलेखातील स्वीकारलेल्या नोंदीच्या प्रतींचे पृष्ठांकन

५. (१) बँककार वही पुरावा अधिनियम, १८९१ (१८९१ चा १८) यामध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, दाव्यामध्ये पुराव्यात स्वीकृत केलेला दस्तऐवज म्हणजे एखाद्या पत्रवहीतील किंवा दुकानवहीतील किंवा वापर चालू असलेल्या अन्य हिशेबवहीतील नोंद असेल त्याबाबतीत, वही किंवा हिशेब ज्या पक्षकाराच्या वतीने हजर केला असेल तो पक्षकार नोंदीची प्रत पुरवू शकेल.

(२) असा दस्तऐवज म्हणजे शासकीय कार्यालयाकडून किंवा शासकीय अधिकाऱ्याने हजर केलेल्या सार्वजनिक अभिलेखातील एखादी नोंद असेल अथवा ज्या पक्षकाराच्या वतीने वही किंवा हिशेब हजर करण्यात आला असेल त्या पक्षकाराव्यतिरिक्त अन्य व्यक्तीच्या मालकीच्या वहीतील किंवा हिशेबातील नोंद असेल त्याबाबतीत :—

(क) अभिलेख, वही किंवा हिशेब एखाद्या पक्षकाराच्या वतीने हजर करण्यात आला असेल त्याबाबतीत, त्या पक्षकाराने, किंवा

(ख) अभिलेख, वही किंवा हिशेब न्यायालयाने स्वतः होऊन काढलेल्या आदेशाचे पालन म्हणून हजर करण्यात आला असेल त्याबाबतीत, प्रत्येकाने किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही पक्षकाराने नोंदीची प्रत पुरवावी असे न्यायालय फर्मावू शकेल.

(३) या नियमातील पूर्ववर्ती उपबंधान्वये एखाद्या नोंदीची प्रत सादर करण्यात आली असेल तेव्हा, न्यायालयाने सातव्या आदेशातील नियम १७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने त्या प्रतीची तपासणी करून व मूळ प्रतीशी ती ताडून पाहून ती प्रमाणित करण्याची व्यवस्था केल्यानंतर नोंदीवर खूण केली पाहिजे व ती ज्या वहीत, हिशेबात किंवा अभिलेखात असेल ती वही, हिशेबवही किंवा अभिलेख हजर करणाऱ्या व्यक्तीला परत करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

पुस्तकातील, हिशेबातील आणि अभिलेखातील स्वीकारलेल्या नोंदीच्या प्रतींचे पृष्ठांकन.

५. (१) बँककार वही पुरावा अधिनियम, १८९१ (१८९१ चा १८) यामध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त, दाव्यामध्ये पुराव्यात स्वीकृत केलेला दस्तऐवज म्हणजे एखाद्या पत्रवहीतील किंवा दुकान वहीतील किंवा वापर चालू असलेल्या अन्य हिशेबवहीतील नोंद असेल त्याबाबतीत, वही किंवा हिशेब ज्या पक्षकाराच्या वतीने हजर केला असेल तो पक्षकार नोंदीची प्रत पुरवू शकेल.

(२) असा दस्तऐवज म्हणजे शासकीय कार्यालयाकडून किंवा शासकीय अधिकाऱ्याने हजर केलेल्या सार्वजनिक अभिलेखातील एखादी नोंद असेल अथवा ज्या पक्षकाराच्या वतीने वही किंवा हिशेब हजर करण्यात आला असेल त्या पक्षकाराव्यतिरिक्त अन्य व्यक्तीच्या मालकीच्या वहीतील किंवा हिशेबातील नोंद असेल त्याबाबतीत :—

(क) अभिलेख, वही किंवा हिशेब एखाद्या पक्षकाराच्या वतीने हजर करण्यात आला असेल त्याबाबतीत त्या पक्षकाराने, किंवा

(ख) अभिलेख, वही किंवा हिशेब न्यायालयाने स्वतः होऊन काढलेल्या आदेशाचे पालन म्हणून हजर करण्यात आला असेल त्याबाबतीत, प्रत्येकाने किंवा त्याच्यापैकी कोणत्याही पक्षकाराने, नोंदीची प्रत पुरवावी असे न्यायालय फर्मावू शकेल.

(३) या नियमातील पूर्ववर्ती उपबंधान्वये एखाद्या नोंदीची प्रत सादर करण्यात आली असेल तेव्हा, न्यायालयाने सातव्या आदेशातील नियम १७ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने त्या प्रतीची तपासणी करून व मूळ प्रतीशी ती ताडून पाहून ती प्रमाणित करण्याची व्यवस्था केल्यानंतर, नोंदीवर खूण केली पाहिजे व ती नोंद ज्या वहीत, हिशेबात किंवा अभिलेखात असेल ती वही, हिशेबवही किंवा अभिलेख हजर करणाऱ्या व्यक्तीला परत करण्याची व्यवस्था केली पाहिजे [१][:

परंतु, या नियमात निर्दिष्ट केलेली नोंद ही इंग्रजी भाषा किंवा त्या न्यायालयाची भाषा यांखेरीज अन्य भाषेत असेल अशाबाबतीत, आदेश सातवा, नियम १७ याच्या पोटनियम (१) च्या परंतुकामध्ये अंतर्भूत असलेले उपबंध योग्य त्या फेरफारांसह अशा नोंदीला लागू होतील.]

पुराव्यात अग्राह्य म्हणून नाकारलेल्या दस्तऐवजांवरील पृष्ठांकन.

६. कोणत्याही पक्षकाराने पुरावा म्हणून ज्याचा आधार घेतला असेल तो दस्तऐवज पुराव्यामध्ये अग्राह्य आहे असे न्यायालयाला वाटल्यास, नियम ४, पोटनियम (१) चे खंड (क्), (ख्) व (ग्) मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील व सोबत, तो नाकारण्यात आल्यासंबंधीचे निवेदन पृष्ठांकित केले पाहिजे व त्या पृष्ठांकनावर न्यायाधीशाने सही किंवा आद्याक्षरी केली पाहिजे.

पुराव्यात अग्राह्य म्हणून नाकारलेल्या दस्तऐवजांवरील पृष्ठांकन.

६. कोणत्याही पक्षकाराने पुरावा म्हणून ज्याचा आधार घेतला असेल तो दस्तऐवज पुराव्यामध्ये अग्राह्य आहे असे न्यायालयाला वाटल्यास, नियम ४, पोटनियम (१) चे खंड (क्), (ख्) व (ग्) मध्ये निर्दिष्ट केलेला तपशील व सोबत तो नाकारण्यात आल्यासंबंधीचे निवेदन पृष्ठांकित केले पाहिजे व त्या पृष्ठांकनावर न्यायाधीशाने सही किंवा आद्याक्षरी केली पाहिजे [२][:

---

१. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (२) द्वारे पूर्ण विरामाच्या ऐवजी विसर्ग घातला आणि परंतुक दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्र. पी.०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (३) अन्वये पूर्ण विरामाच्या ऐवजी विसर्ग घातला आणि परंतुक जादा दाखल करण्यात आले.

परंतु असे की, मुंबई शहर दिवाणी न्यायालयांमध्ये दाखल केलेल्या कार्यवाहीमधील पृष्ठांकनांवर याबाबतीत मुख्य न्यायाधीशाने प्राधिकृत केले असेल अशा अधिकाऱ्याला सही करता येईल.]

स्वीकृत दस्तऐवज अभिलेख म्हणून ठेवणे व नाकारलेले दस्तऐवज परत करणे.

७. (१) पुराव्यामध्ये स्वीकारलेला प्रत्येक दस्तऐवज, किंवा नियम ५ खाली मूळ दस्तऐवजाऐवजी त्याची प्रत देण्यात आली असेल तर त्याची प्रत दाव्याच्या अभिलेखाचा भाग बनेल.

(२) पुराव्यामध्ये न स्वीकारलेले दस्तऐवज हे अभिलेखाचा भाग बनणार नाहीत व ते हजर करणाऱ्या त्या त्या व्यक्तींना परत दिले जातील.

७. (१) पुराव्यामध्ये स्वीकारलेला प्रत्येक दस्तऐवज, किंवा नियम ५ खाली मूळ दस्तऐवजाऐवजी त्याची प्रत देण्यात आली असेल तर त्याची प्रत दाव्याच्या अभिलेखाचा भाग बनेल.

(२) पुराव्यामध्ये न स्वीकारलेले दस्तऐवज हे अभिलेखाचा भाग बनणार नाहीत व ते हजर करणाऱ्या त्या त्या व्यक्तींना परत दिले जातील.

इंग्रजी किंवा न्यायालयाच्या भाषेव्यतिरिक्त अन्य भाषेतील किंवा देवनागरी खेरीज अन्य लिपीतील दस्तऐवज.

[१][(३) पुराव्यामध्ये हजर केलेले जे दस्तऐवज न्यायालयाच्या भाषेत किंवा इंग्रजी भाषेत लिहिलेले नसतील अशा प्रत्येक दस्तऐवजाचा न्यायालयाच्या भाषेतील किंवा इंग्रजी भाषेतील अचूक अनुवाद सोबत जोडावा आणि न्यायालयाच्या भाषेत लिहिलेला जो देवनागरी लिपीमध्ये लिहिलेला नसेल अशा प्रत्येक दस्तऐवजाचे देवनागरी लिपीतील अचूक लिप्यांतर सोबत जोडावे. दस्तऐवज पुराव्यात स्वीकारण्यात आला असेल तर, विरुद्ध पक्षकाराने एकतर अनुवादाचा किंवा लिप्यांतरांचा अचूकपणा मान्य केला पाहिजे किंवा स्वतःचे अनुवादित किंवा लिप्यांतरित दस्तऐवज सादर केले पाहिजेत.]

न्यायालय कोणताही दस्तऐवज अडकवून ठेवण्याचा आदेश देऊ शकेल.

८. या आदेशातील नियम ५ किंवा नियम ७ मध्ये किंवा सातव्या आदेशातील नियम १७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कारण पुरेसे वाटल्यास, न्यायालयास, कोणत्याही दाव्यामध्ये त्याच्यासमोर हजर केलेला कोणताही दस्तऐवज किंवा पुस्तक त्यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत आणि अशा शर्तींवर अडकवून ठेवण्याचा व ते न्यायालयीन अधिकाऱ्याच्या ताब्यात सुरक्षित ठेवण्याचा निदेश देता येईल.

स्वीकृत दस्तऐवज परत करणे.

९. (१) कोणतीही व्यक्ती-मग ती दाव्यामधील पक्षकार असो वा नसो-तिने दाव्यामध्ये हजर केलेला व अभिलेखावर ठेवलेला कोणताही दस्तऐवज परत मिळवू इच्छित असेल त्याबाबतीत, नियम ८ खाली तो दस्तऐवज अडकवून ठेवलेला नसल्यास,-

(क) अपील करण्यास मुभा नसलेला दावा असेल त्याबाबतीत, दावा निकालात काढण्यात येईल तेव्हा, आणि

(ख) अपील करण्यास मुभा असलेला दावा असेल त्याबाबतीत, अपील करण्याची मुदत टळून गेली तरी अपील दाखल करण्यात आलेले नाही अशी न्यायालयाची खात्री पटेल तेव्हा किंवा अपील केलेले असल्यास ते निकालात काढण्यात येईल तेव्हा,

तो दस्तऐवज परत मिळण्यास हक्कदार असेल :

[१][परंतु, दस्तऐवज परत मिळवण्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीला,—

(क) (एक) ती व्यक्ती दाव्यातील पक्षकार असल्यास, दस्तऐवजाची प्रमाणित प्रत, आणि

स्वीकृत दस्तऐवज परत करणे.

[२][९(१) कोणतीही व्यक्ती—मग ती दाव्यामधील पक्षकार असो वा नसो—तिने दाव्यामध्ये हजर केलेला व अभिलेखावर ठेवलेला कोणताही दस्तऐवज परत मिळवू इच्छीत असेल त्याबाबतीत, नियम ८ खाली तो दस्तऐवज अडकवून ठेवलेला नसल्यास,—

(क) अपील करण्यास मुभा नसलेल्या दावा असेल त्याबाबतीत, दावा निकालात काढण्यात येईल तेव्हा, आणि

(ख) अपील करण्यास मुभा असलेला दावा असेल त्याबाबतीत, अपील करण्याची मुदत टळून गेली तरी अपील दाखल करण्यात आलेले नाही अशी न्यायालयाची खात्री पटेल तेव्हा किंवा अपील केलेले असल्यास ते निकालात काढण्यात येईल तेव्हा,

तो दस्तऐवज परत मिळण्यास हक्कदार असेल :

परंतु, दस्तऐवज परत मिळविण्यासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तीला,—

(क) (एक) ती व्यक्ती दाव्यातील पक्षकार असल्यास, दस्तऐवजाची प्रमाणित प्रत, आणि

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६३ (तीन) अन्वये बदली दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (४) द्वारे जादा दाखल केला.

२. वरील अधिसूचनेच्या सुधारणा (५) अन्वये दाखल करण्यात आला.

(दोन) ती अन्य कोणतीही व्यक्ती असल्यास, सातव्या आदेशातील नियम १७ मधील पोट-नियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने तपासलेली, ताडून पाहिलेली व प्रमाणित केलेली साधी प्रत, तिने मूळ दस्तऐवजाच्या जागी दाखल करण्यासाठी ती योग्य अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली तर, आणि

(ख) मूळ प्रत सादर करण्यास फर्माविल्यास ती हजर करण्याची हमी घेतली तर, या नियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपूर्वी केव्हाही तो दस्तऐवज परत करता येईल :]

परंतु आणखी असे की, जो दस्तऐवज हुकूमनाम्याच्या परिणामामुळे पूर्णतया शून्य अथवा निरुपयोगी ठरला असेल असा कोणताही दस्तऐवज परत करण्यात येणार नाही.

(२) पुराव्यात स्वीकारलेला दस्तऐवज परत दिल्यानंतर ज्या व्यक्तीला तो मिळेल त्या व्यक्तीने त्याची पावती दिली पाहिजे.

(दोन) ती अन्य कोणतीही व्यक्ती असल्यास, सातव्या आदेशातील नियम १७ मधील पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने तपासलेली, ताडून पाहिलेली व प्रमाणित केलेली साधी प्रत, तिने मूळ दस्तऐवजांच्या जागी दाखल करण्यासाठी ती योग्य अधिकाऱ्याकडे सुपूर्द केली तर, आणि

(ख) मूळ प्रत सादर करण्यास फर्माविल्यास ती हजर करण्याची हमी घेतली तर, या नियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपूर्वी केव्हाही तो दस्तऐवज परत करता येईल :]

परंतु आणखी असे की, आदेश एकेचाळिसावा, नियम १ खालील अपील अर्जासोबत दाखल केलेली हुकूमनाम्याची प्रत किंवा न्यायनिर्णयाची प्रत न्यायालयाने अपील निकालात काढल्यानंतर परत करता येईल :

परंतु आणखी असेही की, जो दस्तऐवज हुकूमनाम्याच्या परिणामी पूर्णतया शून्य अथवा निरुपयोगी ठरला असेल असा कोणताही दस्तऐवज परत करण्यात येणार नाही.

(२) पुराव्यात स्वीकारलेला दस्तऐवज परत दिल्यानंतर ज्या व्यक्तीला तो मिळेल त्या व्यक्तीने त्याची पावती दिली पाहिजे.

न्यायालयाला स्वत:च्या अभिलेखातून किंवा अन्य न्यायालयांकडून कागदपत्रे मागविता येतील.

१०. (१) न्यायालयास स्वत: होऊन आणि दाव्यामधील कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून स्वविवेकानुसार स्वत:च्या अभिलेखातून किंवा अन्य कोणत्याही न्यायालयाकडून अन्य कोणत्याही दाव्याचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागविता येईल व त्याची तपासणी करता येईल.

(२) या नियमाखाली केलेल्या प्रत्येक अर्जासोबत (न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नसेल तर) त्याच्या पुष्टयर्थ एक शपथपत्र सादर केले पाहिजे व ज्या दाव्यामध्ये अर्ज करण्यात आला असेल त्या दाव्याच्या संबंधात तो अभिलेख कशा प्रकारे महत्वाचा आहे ते आणि अर्जदारास हवी असलेली रीतसर अधिप्रमाणित केलेली अभिलेखाची किंवा त्याच्या भागाची प्रत गैरवाजवी विलंब किंवा खर्च केल्याशिवाय मिळविणे शक्य नाही, किंवा न्यायाच्या प्रयोजनार्थ मूळ प्रत हजर करणे आवश्यक आहे असे त्या शपथपत्रात दाखवून द्यावे लागेल.

(३) पुराव्याच्या कायद्यानुसार दाव्यामध्ये जो अग्राह्य ठरू शकेल असा कोणताही दस्तऐवज पुराव्यामध्ये वापरण्यास, न्यायालयाला, या नियमात अंतर्भुत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे शक्य होते असे मानण्यात येणार नाही.

दस्तऐवजांच्या संबंधातील उपबंध मूर्त वस्तूंना लागू.

११. दस्तऐवजांच्या संबंधात यात अंतर्भुत असलेले उपबंध, पुरावा म्हणून हजर करण्याजोग्या अन्य सर्व मूर्त वस्तूंना शक्य तेथवर लागू होतील.

आदेश चौदावा

वादमुद्यांची निश्चिती आणि कायदेविषयक वादमुद्यांच्या आधारे किंवा संमत वादमुद्यांच्या आधारे दाव्यांची निर्मिती

वाद मुद्दे ठरविणे.

१. (१) तथ्यविषयक अथवा कायदेविषयक अशा एखाद्या महत्त्वाच्या विधानाचे एखाद्या पक्षकाराने दृढकथन केले व ते दुसऱ्या पक्षकाराने नाकबूल केले की, वादमुद्दे उपस्थित होतात.

(२) महत्त्वाची विधाने म्हणजे वादीने त्याला दावा दाखल करण्याचा हक्क आहे हे दर्शवण्यासाठी जी अभिकथने केली पाहिजेत किंवा प्रतिवादीने त्याचा बचाव तयार करण्यासाठी जी अभिकथने केली पाहिजेत अशी कायदेविषयक किंवा तथ्यविषयक विधाने होत.

(३) एका पक्षकाराने दृढकथन केलेले व दुसऱ्या पक्षकाराने नाकबूल केलेले प्रत्येक महत्त्वाचे विधान स्वतंत्र वादमुद्याचा विषय होईल.

(४) वादमुद्दे दोन प्रकारचे असतात :—

(क) तथ्यविषयक वादमुद्दे,

(ख) कायदेविषयक वादमुद्दे.

(५) दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी, न्यायालयाने वादपत्र आणि काही प्रतिवादपत्रे असल्यास, ती वाचल्यानंतर आणि [1][आदेश दहावा, नियम २ खाली तपासणी केल्यानंतर व पक्षकारांचे किंवा त्यांच्या प्लीडरांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर] कोणत्या तथ्यविषयक किंवा कायदेविषयक महत्त्वाच्या विधानांबाबत पक्षकारांमध्ये मतभेद आहे त्याची खातरजमा करून घेतली पाहिजे आणि त्यानंतर प्रकरणाचा योग्य निर्णय ज्यावर अवलंबून आहे असे वादमुद्दे ठरवून ते नोंदवून घेण्याच्या कामाला लागले पाहिजे.

(६) दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी प्रतिवादीने बचाव दिला नाही तर, या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायालयाने वादमुद्दे ठरवून ते नोंदवणे आवश्यक ठरत नाही.

न्यायालयाने सर्व वादमुद्दयांवर न्यायनिर्णय अधिघोषित करणे.

[1][२. (१) एखाद्या प्रारंभिक वादमुद्याच्या आधारे प्रकरण निकालात काढता येण्यासारखे असले. तरी, न्यायालयाने पोटनियम (२) मधील उपबंधांच्या अधीनतेने, सर्व वादमुद्यांवर न्यायनिर्णय अधिघोषित केला पाहिजे.

(२) एकाच दाव्यामध्ये तथ्यविषयक किंवा कायदेविषयक असे दोन्ही प्रकारचे वादमुद्दे उपस्थित झाल्यास आणि त्या प्रकरणाचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा केवळ कायदेविषयक वादमुद्यावरच निकाल करता येईल असे न्यायालयाचे मत झाल्यास जर तो वादमुद्दा—

(क) न्यायालयाच्या अधिकारितेशी, किंवा

(ख) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे दाव्यास झालेल्या रोधाशी,

संबंधित असेल तर, न्यायालयास प्रथम त्या वादमुद्द्याची संपरीक्षा करता येईल आणि त्या प्रयोजनार्थ, स्वत:ला योग्य वाटल्यास ते न्यायालय त्या वादमुद्द्याची निर्णीती होईपर्यंत अन्य वादमुद्द्याची निर्णीती लांबणीवर टाकू शकेल, आणि त्या वादमुद्द्यावरील निर्णयाच्या अनुरोधाने दाव्याचा परामर्श घेईल.]

ज्यावरून वादमुद्दे ठरविता येतील असे साहित्य.

३. न्यायालयास पुढील सर्व साहित्यावरून किंवा त्यापैकी कोणत्याही साहित्यावरून वादमुद्दे ठरविता येतील :—

(क) पक्षकारांनी किंवा त्यांच्या वतीने हजर असलेल्या कोणत्याही व्यक्तींनी शपथेवर केलेली किंवा अशा पक्षकारांच्या प्लीडरांनी केलेली अभिकथने ;

(ख) वादकथनांमध्ये केलेली किंवा दाव्यामध्ये दिलेल्या परिप्रश्नांच्या उत्तरादाखल केलेली अभिकथने ;

(ग) दोहोंपैकी कोणत्याही पक्षकाराने हजर केलेल्या दस्तऐवजांमधील मजकूर.

वादमुद्दे ठरविण्यापूर्वी न्यायालय साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करू शकेल.

४. न्यायालयासमोर उपस्थित नसणाऱ्या एखाद्या व्यक्तीची तपासणी केल्याशिवाय किंवा दाव्यामध्ये हजर न केलेल्या एखाद्या दस्तऐवजाची पाहणी केल्याशिवाय वादमुद्दे अचूकपणे ठरविणे शक्य नाही असे न्यायालयाचे मत झाल्यास, त्याला वादमुद्दे काढण्याचे काम पुढच्या एखाद्या दिवसापर्यंत तहकूब करता येईल आणि (त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या अधीनतेने) समन्सद्वारे किंवा अन्य आदेशिकेद्वारे कोणत्याही व्यक्तीला न्यायालयात हजर राहण्याची अथवा ज्या व्यक्तीच्या कब्जामध्ये किंवा अधिकाराखाली असा एखादा दस्तऐवज असेल त्या व्यक्तीला तो न्यायालयात हजर करण्याची सक्ती करता येईल.

वादमुद्दे विशोधित करण्याची किंवा ते खोडून टाकण्याची शक्ती.

५. (१) न्यायालयास, हुकूमनामा काढण्यापूर्वी कोणत्याही वेळी स्वत:स योग्य वाटेल अशा अटींवर वादमुद्यात विशोधन करता येईल किंवा जादा वादमुद्दे ठरविता येतील आणि पक्षकारांमधील वादग्रस्त बाबींचा निर्णय करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा किंवा जादा वादमुद्दे अशा प्रकारे अनुक्रमे करण्यात किंवा ठरविण्यात येतील.

(२) त्याचप्रमाणे वादमुद्दे चुकीच्या तऱ्हेने ठरविले आहेत किंवा उपस्थित केले आहेत असे न्यायालयास वाटेल असे कोणतेही वादमुद्दे हुकूमनामा काढण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्याला खोडून टाकता येतील.

तथ्यविषयक किंवा कायदेविषयक प्रश्न मतैक्याने वादमुद्द्याच्या स्वरूपात मांडता येतील.

६. कोणत्या तथ्यविषयक किंवा कायदेविषयक प्रश्नावर दाव्यातील पक्षकारांमध्ये निर्णय घ्यावयाचा त्यासंबंधी त्या पक्षकारांचे एकमत झाले असेल तर, त्यांना तो प्रश्न वादमुद्द्याच्या स्वरूपात मांडता येईल आणि त्यांना असा लेखी करार करता येईल की, न्यायालयाने अशा वादमुद्द्यावर होकारार्थी किंवा नकारार्थी निर्णय दिल्यावर—

(क) करारामध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम अथवा न्यायालयाने किंवा न्यायालय निदेशित करील अशा रीतीने निश्चित करावयाची एखादी पैशाची रक्कम पक्षकारांपैकी एकाने दुसऱ्याला द्यावी अथवा त्यांच्यापैकी एक पक्षकार करारामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या हक्कास पात्र किंवा अशा एखाद्या दायित्वास अधीन असल्याचे जाहीर करण्यात यावे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६४(एक) अन्वये "आवश्यक वाटल्यास पक्षकारांचे म्हणणे तपासून पाहिल्यानंतर" याऐवजी सदर मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६४(दोन) अन्वये मूळ कलमाऐवजी बदली दाखल करण्यात आले.

(ख) करारामध्ये विनिर्दिष्ट केलेली आणि दाव्यामध्ये वादग्रस्त असलेली एखादी मालमत्ता पक्षकारांपैकी एकाने दुसऱ्या पक्षकाराकडे किंवा तो दुसरा पक्षकार निदेश देईल त्याप्रमाणे सुपूर्द करावी, किंवा

(ग) पक्षकारांपैकी एकाने किंवा अधिक पक्षकारांनी करारामध्ये विनिर्दिष्ट केलेली व वादविषयाशी संबंधित अशी एखादी कृती करावी किंवा ती करण्यापासून परावृत्त रहावे.

करारनामा सद्भावपूर्वक केलेला आहे याबद्दल न्यायालयाची खात्री पटल्यास त्यास न्यायनिर्णय अधिघोषित करता येईल.

७. न्यायालयाने स्वतःस योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर—

(क) पक्षकारांनी करारनामा रीतसर केला होता ;

(ख) पूर्वोक्त अशा प्रश्नाच्या निर्णयामध्ये त्यांना भरोव हितसंबंध आहे ; आणि

(ग) संपरीक्षा होण्यास व त्यावर निर्णय होण्यास तो प्रश्न नायक आहे.

अशी न्यायालयाची खात्री पटल्यास, त्याने तो वादमुद्दा नोंदवून घेऊन त्याची संपरीक्षा करण्याच्या कामाला लागले पाहिजे आणि न्यायालयानेच जणू काही तो वादमुद्दा ठरविलेला असावा त्याप्रमाणे त्यावरील आपला निष्कर्ष व निर्णय नमूद केला पाहिजे.

आणि अशा वादमुद्द्याचा निष्कर्ष काढल्यावर किंवा निर्णय केल्यावर करारातील अटींनुसार न्याया निर्णय अधिघोषित केला पाहिजे आणि न्यायनिर्णय याप्रमाणे अधिघोषित झाल्यावर त्यानुसार हुकूमनामा काढण्यात येईल.

आदेश पंधरावा

पहिल्या सुनावणीच्या वेळी दावा निकालात काढणे.

पक्षकारांमध्ये वादमुद्दा नसेल तर.

१. दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी, पक्षकारांमध्ये कोणत्याही तथ्यविषयक किंवा कायदेविषयक प्रश्नावर वादमुद्दा नाही असे दिसून आल्यास न्यायालयाने तात्काळे न्यायनिर्णय अधिघोषित केला पाहिजे.

अनेक प्रतिवादींपैकी एकाशी वादमुद्दा नसेल तर.

२. [(१)] एकापेक्षा अधिक प्रतिवादी असतील व प्रतिवादींपैकी एकजण आणि वादी यांच्यामध्ये कोणत्याही कायदेविषयक किंवा तथ्यविषयक प्रश्नावर वादमुद्दा नसल्यास, न्यायालयाने एकदम अशा प्रतिवादीच्या बाजूने किंवा त्याच्याविरुद्ध न्यायनिर्णय अधिघोषित केला पाहिजे आणि दावा फक्त इतर प्रतिवादींच्या विरुद्ध पुढे चालू राहील.

[(२) या नियमाखाली न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात येईल तेव्हा तेव्हा, हुकूमनामा अशा न्यायनिर्णयानुसार रीतसर तयार केला पाहिजे व ज्या दिवशी न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात आला असेल त्या दिवसाची तारीख हुकूमनाम्यावर असली पाहिजे.]

पक्षकारांमध्ये वादमुद्दा असेल तर.

३. (१) पक्षकारांमध्ये कायदेविषयक किंवा तथ्यविषयक प्रश्नावर वादमुद्दा असेल, आणि यात यापूर्वी उपबंधित केल्याप्रमाणे न्यायालयाने वादमुद्दे ठरविले असतील त्याबाबतीत, दाव्यांचा निर्णय करण्यासाठी जे पुरेसे असतील अशा वादमुद्द्यांपैकी पक्षकार एकदम सादर करू शकतील त्या व्यतिरिक्त आणखी कोणता युक्तिवाद किंवा पुरावा आवश्यक नाही याविषयी, आणि दाव्याची कार्यवाही तशीच पुढे चालवण्याने कोणताही अन्याय होणार नाही, याविषयी न्यायालयाची खात्री पटली तर, न्यायालयास असे वादमुद्दे निर्णीत करण्याच्या कामाला लागता येईल आणि त्यावरील निष्कर्ष निर्णयासाठी पुरेसा असेल तर, त्यास त्यानुसार न्यायनिर्णय अधिघोषित करता येईल—मग समन्स वादमुद्द्यांच्या निश्चितीसाठीच फक्त काढलेले असो वा दावा अंतिमतः निकालात काढण्यासाठी काढलेले असो :

मात्र, केवळ वादमुद्द्यांच्या निश्चितीसाठी समन्स काढण्यात आले असल्यास, पक्षकार किंवा त्यांचे प्लीडर हजर असले पाहिजेत व त्यांच्यापैकी कोणीही त्यास हरकत घेतलेली असू नये.

(२) तो निष्कर्ष निर्णय करण्यास पुरेसा नसेल तर, न्यायालयाने दाव्याची पुढील सुनावणी पुढे ढकलली पाहिजे व त्या प्रकरणी आवश्यक असेल असा आणखी पुरावा हजर करण्यासाठी किंवा असा आणखी युक्तिवाद सादर करण्यासाठी दिवस निश्चित केला पाहिजे.

पुरावा हजर न करणे.

४. दावा अंतिमतः निकालात काढण्यासाठी समन्स काढण्यात आले असेल आणि दोहोंपैकी कोणताही पक्षकार ज्या पुराव्याचा तो आधार घेत असेल तो पुरावा हजर करण्यात त्याने पुरेशा कारणाशिवाय कसूर केली तर, न्यायालयास एकदम न्यायनिर्णय अधिघोषित करता येईल किंवा याला तसे योग्य वाटल्यास, वादमुद्दे ठरवून व ते नोंदवून घेतल्यानंतर त्यास, अशा वादमुद्द्यांवरील त्याच्या निर्णयाकरिता आवश्यक असेल असा पुरावा हजर केला जाण्यासाठी दावा तहकूब करता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६५ अन्वये नियम २ पोटनियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६५ अन्वये पोटनियम (२) समाविष्ट करण्यात आला.

[1]आदेश पंधरा—क

दाव्यामध्ये पट्टाकाराने बचाव काढून टाकणे

१. (१) पट्टाकाराने पट्टेकारास काढून टाकावयाच्या किंवा खंड आणि पुढील काळातील दरम्यानचा लाभ वसूल करण्याच्या कोणत्याही दाव्यात, प्रतीवादीने आदेशाच्या तारखेपर्यंतची थकबाकी म्हणून न्यायालय सांगेल तितकी रक्कम (न्यायालय नेमून देईल तेवढ्या मुदतीत) भरली पाहिजे आणि त्यानंतर लगतमंतरच्या प्रत्येक महिन्यात, न्यायालय निदेश देईल त्याप्रमाणे, दाव्यामध्ये मागणी केलेले भाडे भरले पाहिजे. प्रतिवादीस अन्यथा निदेश देण्यात आले असतील त्या व्यतिरिक्त, दाव्याचा निर्णय होईपर्यंत त्याने अशी रक्कम भरत राहिले पाहिजे.

वर उल्लेखिल्याप्रमाणे रक्कम भरण्यात कसुर झाल्यास न्यायालयास पोट-नियम (२) च्या उपबंधानुसार बचाव काढून टाकता येईल.

(२) बचाव काढून टाकण्याचा आदेश देण्यापुर्वी न्यायालयाने, बचाव काढून का टाकू नये यासंबंधी कारणे दाखविण्याविषयी नोटीस प्रतिवादीवर किंवा त्याच्या वकिलावर बजावली पाहिजे आणि प्रतीवादीला बचाव काढून टाकण्याच्या आदेशातून मुक्त करावे किंवा नाही यावर निर्णय घेताना न्यायालयाने अशा प्रकारचे कोणतेही कारण दिले असेल तर ते विचारात घेतले पाहिजे.

(३) या नियमान्वये भरलेली रक्कम पट्टाकार वादीला किंवा [1][त्याच्या वकिलाला दिली पाहिजे आणि अशी रक्कम स्वीकारल्यामुळे वादीच्या मागणीला कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही तसेच त्यामुळे भाडेपट्टी संपल्याची नोटीस रद्द केल्याचे मानता येणार नाही.]

आदेश सोळावा

साक्षीदारांना समन्स काढणे व त्यांची हजेरी

साक्षीदारांची यादी आणि साक्षीदारांना समन्स काढणे.

[2][१. (१) न्यायालय नेमील अशा तारखेस किंवा त्यापूर्वी मात्र, ज्या तारखेस वादप्रश्न निश्चित करण्यात येतील त्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत पक्षकारांनी पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी ज्या व्यक्तींना बोलावण्याचा त्यांचा विचार असेल त्या व्यक्तींची यादी न्यायालयास सादर केली पाहिजे व त्या व्यक्तींनी न्यायालयात हजर रहावे यासाठी त्यांनी समन्स मिळविली पाहिजेत.

[2][१. दावा दाखल करण्यात आल्यानंतर कोणत्याही वेळी पक्षकारांना, न्यायालयाकडे किंवा त्याने याबाबतीत नेमला असेल अशा अधिकाऱ्याकडे अर्ज करून, पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी ज्यांची हजेरी आवश्यक आहे अशा व्यक्तींसाठी समन्से मिळवता येतील :

साक्षीदारांची यादी आणि साक्षीदारांना समन्स काढणे.

परंतु, मुंबई शहर दिवाणी न्यायालयात प्लीडरने अर्ज केल्यास न्यायालयाचा प्रबंधक, त्या न्यायालयाच्या नियमानुसार, सुनावणीची तारीख प्लीडरने साक्षीदारावर बजावण्यापूर्वी त्यात भरण्यासाठी जागा कोरी ठेवून, अशी समन्से आगाऊ देऊ शकतील.]

(२) कोणत्याही व्यक्तीच्या हजेरीकरिता समन्स मिळवू इच्छिणाऱ्या पक्षकाराने साक्षीदाराला कोणत्या प्रयोजनार्थ बोलावयाचे आहे ते नमूद करून एक अर्ज न्यायालयाकडे दाखल केला पाहिजे.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६६ (एक) अन्वये दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक पी.०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ द्वारे आदेश पंधरा क समाविष्ट करण्यात आला.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र.पी.०११३/६८, दिनांक २१ नोव्हेंबर १९७२, सुधारणा क्र. चार द्वारे दाखल करण्यात आला.

(३) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट यादीत ज्यांची नांवे आहेत त्या साक्षीदारांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही साक्षीदाराला बोलवावयाचे असेल तेव्हा, अशा साक्षीदाराचे नांव सदर यादीत उल्लेखिण्याचे का राहून गेले याबद्दल पक्षकाराने पुरेसे कारण दाखविल्यास, न्यायालयास, कारणे नमूद करून, न्यायालयामार्फत समन्स काढून किंवा अन्य प्रकारे कोणत्याही साक्षीदाराला बोलावण्यास अशा पक्षकाराला परवानगी देता येईल.

(४) पोटनियम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, या नियमात निर्दिष्ट केलेली समन्से पक्षकारास, न्यायालयाकडे किंवा न्यायालय या संबंधात नेमील अशा अधिकाऱ्याकडे अर्ज करून मिळविता येतील.]

साक्षीदारांना समन्सशिवाय हजर करणे.

[१][१क. नियम १ च्या पोटनियम (३) च्या अधीनतेने, दाव्यातील कोणत्याही पक्षकारास, नियम १ खाली समन्ससाठी अर्ज न करता पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी कोणत्याही साक्षीदाराला आणता येईल.]

[१][१ ख. (१) कोणत्याही व्यक्तीने हजर होण्यासाठी पक्षकाराने अर्ज केला असता, न्यायालय अशा पक्षकाराद्वारेच अशा समन्सची बजावणी केली जाण्यास परवानगी देऊ शकेल.

न्यायालयास, समन्ससाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराद्वारेच समन्स बजावले जाण्यास परवानगी देता येईल.

(२) जेव्हा न्यायालयाने असा निदेश दिला असेल की, समन्ससाठी अर्ज करणाऱ्या पक्षकारानेच त्याची बजावणी करावी आणि अशी बजावणी करण्यात आली नसेल तेव्हा, न्यायालयाचे जर याबाबतीत समाधान झाले असेल की, अशा पक्षकाराने अशी बजावणी करण्यासाठी वाजवी तत्परता वापरलेली आहे तर, ते न्यायालयाच्या एखाद्या अधिकाऱ्यांद्वारे बजावणी केली जाण्यास परवानगी देऊ शकेल.]

[१९७६ चा केंद्रीय अधिनियम क्र. १०४ यांचे मागील पृष्ठ.....वर पुनर्स्थापित केलेले कलम ९७ चे पोट-कलम (१) पहावे.]

समन्ससाठी अर्ज केल्यावर साक्षीदारांच्या खर्चाची रक्कम न्यायालयात भरणे.

२. (१) समन्सासाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराने समन्स मंजूर करण्यात येण्यापूर्वी व निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत समन्सद्वारे बोलवावयाच्या व्यक्तीला, ज्या न्यायालयात हजर राहण्यास फर्माविण्यात येईल त्या न्यायालयातील तिचा येण्याजाण्याचा खर्च व इतर खर्च आणि एका दिवसाच्या हजेरीचा खर्च भागविण्यासाठी पुरेशी असल्याचे न्यायालयास वाटेल अशी रक्कम न्यायालयात भरली पाहिजे.

२. (१) समन्ससाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराने समन्स मंजूर करण्यात येण्यापूर्वी व निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत, समन्सद्वारे बोलवावयाच्या व्यक्तीला ज्या न्यायालयात हजर राहण्यास फर्माविण्यात येईल त्या न्यायालयात तिचा येण्याजाण्याचा खर्च व इतर खर्च आणि एका दिवसाच्या हजेरीचा खर्च भागविण्यासाठी पुरेशी असल्याचे न्यायालयास वाटेल अशी रक्कम न्यायालयात भरली पाहिजे][२]:

समन्ससाठी अर्ज केल्यावर साक्षीदारांच्या खर्चाची रक्कम न्यायालयात भरणे.

परंतु, जेथे शासन किंवा शासनाने लोक अधिकारी म्हणून खटल्यामध्ये पाठींबा दिलेला लोक अधिकारी दाव्यात किंवा कार्यवाहीत पक्षकार असेल तेथे, ज्याला नागरी सेवा विनियम लागू होतात अशा कोणत्याही लोकअधिकाऱ्याला त्याला लोकअधिकारी म्हणून माहित झालेली तथ्ये किंवा त्याने कार्यवाही केली असेल अशा बाबी यांबाबत पुरावा देण्यासाठी किंवा शासकीय अभिलेखातील कोणतेही दस्तऐवज सादर करण्यासाठी समन्स काढण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल तर, अशा साक्षीदाराच्या प्रवासासाठी किंवा इतर खर्चासाठी शासनाने किंवा उपरोक्त अधिकाऱ्यास कोणतीही रक्कम भरण्यास फर्माविण्यात येणार नाही.

तज्ञ.

(२) या नियमाखाली प्रदेय असलेली रक्कम निश्चित करताना, न्यायालयास तज्ञ म्हणून पुरावा

(२) या नियमाखाली देय असलेली रक्कम निश्चित करताना, न्यायालयास तज्ञ म्हणून

---

१. १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४, कलम ६६ (दोन) अन्वये ऐवजी दाखल केला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६ च्या खंड ४० अन्वये जादा दाखल केले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१) द्वारे पूर्णविरामाऐवजी विसर्ग घालण्यात आला आणि परंतुक जादा दाखल केले.

देण्यांसाठी बोलावलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, पुरावा देण्यासाठी आणि तज्ञ म्हणून खटल्यासाठी आवश्यक असलेले काम करण्यासाठी जितका वेळ जाईल तितक्या वेळाबद्दल वाजवी पारिश्रमिक मंजूर करता येईल.

खर्चाचे प्रमाण. (३) उच्च न्यायालयास दुय्यम असणाऱ्या न्यायालयाच्या बाबतीतील, अशा खर्चाचे प्रमाण निश्चित करताना त्यासंबंधात केलेले कोणतेही नियम विचारात घेतले पाहिजेत.

[१][(४) पक्षकाराने थेट साक्षीदारावर समन्स बजावले असेल त्याबाबतीत, पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला खर्च पक्षकार किंवा त्याचा अभिकर्ता यांच्याकडून साक्षीदाराला दिला जाईल.]

साक्षीदाराला खर्च देणे. ३. अशा प्रकारे न्यायालयात भरलेली रक्कम, समन्स व्यक्तिशः बजावणे शक्य असेल तर, समन्स बजावण्याच्या वेळी, समन्सद्वारे बोलावलेल्या व्यक्तीला देण्यात येईल.

पुरावा देण्यासाठी बोलावलेल्या कोणत्याही व्यक्तींच्या बाबतीत, साक्षीपुरावा देण्यासाठी आणि तज्ञ म्हणून खटल्यासाठी आवश्यक असलेले काम करण्यासाठी जितका वेळ जाईल तितक्या वेळाबद्दल वाजवी पारिश्रमिक मंजूर करता येईल.

(३) उच्च न्यायालयास दुय्यम असणाऱ्या न्यायालयाच्या बाबतीतील अशा खर्चाचे प्रमाण निश्चित करताना त्यासंबंधात केलेले कोणतेही नियम विचारात घेतले पाहिजेत. **खर्चाचे प्रमाण.**

खर्च थेट साक्षीदारांना देणे.

साक्षीदाराला खर्च देणे.

३. अशा प्रकारे न्यायालयात भरलेली रक्कम, समन्स व्यक्तिशः बजावणे शक्य असेल तर, समन्स बजावण्याच्या वेळी, समन्सद्वारे बोलावलेल्या व्यक्तीला देण्यात येईल. [१][:

परंतु, साक्षीदार हा ज्याला नागरी सेवा विनियम लागू होतात असा लोक अधिकारी असेल आणि पदीय नात्याने त्याच्या निदर्शनास आलेल्या तथ्यांचा किंवा त्याला ज्यांवर कार्यवाही करावी लागली असेल अशा तथ्यांचा पुरावा देण्यासाठी किंवा शासकीय अभिलेखामधील दस्तऐवज सादर करण्यासाठी त्याला बोलावण्यात आले असेल तर, त्याचा प्रवास खर्च आणि इतर खर्च यांसाठी समन्स मिळविणाऱ्या पक्षकाराने द्यावयाची रक्कम, त्याला देण्यात येऊ नये. तथापि, अशा अधिकाऱ्याला दौऱ्यावरील प्रवासासाठी अनुज्ञेय असलेले प्रवास भत्त्याचे आणि इतर भत्त्यांचे वर दर्शविणारे त्याच्या कार्यालय प्रमुखाने स्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र सादर करण्यास या अधिकाऱ्याला फर्मावण्यात येईल.]

शासन ज्यामध्ये पक्षकार नाही अशा दाव्यांमध्ये साक्षीदार म्हणून बोलावलेल्या लोकसेवकांसाठी विशेष उपबंध.

[२][३क (१) पूर्वगामी नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्यामध्ये शासन पक्षकार नसेल अशा सर्व दाव्यांमध्ये किंवा कार्यवाहींमध्ये, केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्याला किंवा रेल्वे कर्मचाऱ्याला त्याच्या पदीय नात्याने दस्तऐवज सादर करण्यासाठी बोलावण्यात आले असेल तर, संबंधित अधिकाऱ्याचा दौऱ्यावरील प्रवासाचा खर्च भागविण्यासाठी न्यायालयाच्या मते पुरेशी ठरेल अशी रक्कम भरण्याचे निदेश न्यायालयाने समन्ससाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराला दिले पाहिजेत आणि अशी रक्कम जमा करण्यात आल्यानंतर न्यायालयाने समन्स काढण्यासंबंधीचे निदेश दिले पाहिजेत. आणि अशा प्रकारे जमा करण्यात आलेल्या रकमेतून किंवा न्यायालय समन्ससाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराला नंतर भरण्याचे निदेश देईल अशा कोणत्याही आणखी रकमेतून, समन्स काढून बोलावलेल्या व्यक्तीला, ती न्यायालयासमोर उपस्थित झाल्यानंतर, तिला लागू असलेल्या नियमांन्वये दौऱ्यावरील प्रवासासाठी

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ६६ (तीन) द्वारे समाविष्ट केले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (२) द्वारे पूर्णविरामाऐवजी विसर्ग घातला आणि परंतुक जादा केले.

२. वरील अधिसूचनेच्या सुधारणा (३) द्वारे जादा दाखल केले.

तिला अनुज्ञेय असेल अशी प्रवास खर्चाची व इतर खर्चाची रक्कम न्यायालय देईल.

(२) पोट-नियम (१) अन्वये न्यायालयासमोर उपस्थित होणाऱ्या अधिकाऱ्याने, त्याला दौऱ्याच्या प्रवासासाठी अनुज्ञेय असलेले प्रवासभत्त्याचे आणि इतर भत्त्यांचे दर दर्शविणारे त्याच्या कार्यालय अधिकाऱ्याने रीतसर सही केलेले प्रमाणपत्र सादर केले पाहिजे आणि न्यायालयाने त्याला द्यावयाची रक्कम अशा प्रमाणपत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांच्या आधारावर संगणित करण्यात येईल.]

भरलेली रक्कम अपुरी असेल अशा बाबतीतील कार्यपद्धती.

४. (१) न्यायालयात भरण्यात आलेली रक्कम असे खर्च भागविण्यास अथवा वाजवी पारिश्रमिक देण्यास पुरेशी नाही असे न्यायालयास किंवा ते याबाबतीत नेमील अशा अधिकाऱ्यास वाटल्यास, न्यायालयास त्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी रक्कम समन्स काढून बोलावलेल्या व्यक्तीला देण्यात यावी असा निदेश देता येईल आणि ती रक्कम देण्यात कसूर झाल्यास, समन्स मिळविणाऱ्या पक्षकाराची जंगम मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून अशी रक्कम वसूल करण्यात यावी असा निदेश त्यास देता येईल. नाहीतर न्यायालयास, समन्सद्वारे बोलावलेल्या त्या व्यक्तीला तिचा पुरावा न घेता दायित्वमुक्त करता येईल किंवा पूर्वोक्तानुसार अशा वसुलीचा आदेश देणे आणि अशा व्यक्तीला दायित्वमुक्त करणे अशा दोन्ही गोष्टी करता यतील.

एक दिवसापेक्षा अधिक काळ थांबवून ठेवलेल्या साक्षीदारांचा खर्च.

(२) समन्स काढून बोलावलेल्या व्यक्तीला एक दिवसापेक्षा अधिक काळ थांबवून घेणे आवश्यक असल्यास, न्यायालयास त्या व्यक्तीला याप्रमाणे अधिक काळ थांबवून घेण्यामुळे येणारा खर्च भागविण्यास पुरेशी असेल एवढी रक्कम ज्या पक्षकाराच्या सांगण्यावरून त्या व्यक्तीला बोलावण्यात आले असेल त्या पक्षकाराने न्यायालयात भरावी असा आदेश वेळोवेळी देता येईल, आणि असा भरणा करण्यास कसूर झाल्यास, अशा पक्षकाराची जंगम मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून अशी रक्कम वसूल करण्यास यावी असा आदेश त्यास देता येईल; नाहीतर न्यायालयास समन्सद्वारे बोलावलेल्या त्या व्यक्तीला तिचा पुरावा न घेता दायित्वमुक्त करता येईल, किंवा पूर्वोक्तानुसार अशा वसुलीचा आदेश देणे आणि अशा व्यक्तीला दायित्वमुक्त करणे या दोन्ही गोष्टी करता येतील.

समन्समध्ये हजर राहण्याची वेळ, ठिकाण व प्रयोजन विनिर्दिष्ट करणे.

५. एखाद्या व्यक्तीने पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी समक्ष हजर रहावे म्हणून काढलेल्या प्रत्येक समन्समध्ये कोणत्या वेळी व कोणत्या ठिकाणी तिने हजर राहणे आवश्यक आहे ते व त्याप्रमाणे तिची हजेरी पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी किंवा दोन्ही प्रयोजनांसाठी आवश्यक आहे तेसुद्धा व जो कोणताही विशिष्ट दस्तऐवज हजर करण्यासाठी त्या व्यक्तीला समन्स देऊन बोलावले असेल त्याचे समन्समध्ये वाजवी मर्यादेपर्यंत यथार्थ वर्णन केले पाहिजे.

दस्तऐवज हजर करण्यासाठी समन्स.

६. कोणत्याही व्यक्तीला पुरावा देण्यासाठी न बोलावता दस्तऐवज हजर करण्यासाठी समन्सद्वारे बोलवता येईल. आणि केवळ दस्तऐवज हजर करण्यासाठी समन्सद्वारे बोलावलेल्या व्यक्तीने तो दस्तऐवज हजर करण्यासाठी जातीने हजर राहण्याऐवजी तिने तो दस्तऐवज हजर करण्याची व्यवस्था केली तर, तिने समन्सचे अनुपालन केले असल्याचे मानण्यात येईल.

न्यायालयात हजर असणाऱ्या व्यक्तींना पुरावा देण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास फर्माविण्याची शक्ती.

७. न्यायालयात हजर असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, तिच्या कब्जातील किंवा अधिकाराखालील कोणत्याही दस्तऐवज तेथल्या तेथे हजर करण्यास न्यायालयास फर्मावता येईल.

बजावणीकरिता पक्षकाराकडे दिलेले समन्स.

[१][७क. (१) एखाद्या व्यक्तीने हजर रहावे म्हणून समन्स काढावे यासाठी एखाद्या पक्षकाराने अर्ज केल्यावर, न्यायालयास, त्या पक्षकाराला अशा व्यक्तीवर अशा समन्सची बजावणी करण्याची परवानगी देता येईल आणि अशा बाबतीत, बजावणीसाठी ते समन्स अशा पक्षकाराकडे न्यायालयाने सुपूर्द केले पाहिजे.

(२) न्यायाधीशाने किंवा न्यायाधीश याबाबतीत नेमील अशा न्यायालयाच्या अन्य अधिकाऱ्याने सही केलेली आणि न्यायालयाची मोहोर लावलेली समन्सची प्रत, अशा पक्षकाराने किंवा त्याच्या वतीने सुपूर्द करून किंवा देऊ करून अशा समन्सची बजावणी केली पाहिजे.

(३) या नियमाखाली समन्सची बजावणी करणारी व्यक्ती ही, जणु काही, बजावणी अधिकारी आहे असे समजून, पाचव्या आदेशातील नियम १६ व १८ यांचे उपबंध व्यक्तिश: बजावण्यात आलेल्या समन्सला लागू होतील.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ६६ (चार) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(४) असे समन्स ते जेव्हा देऊ केले जाईल तेव्हा, नाकारण्यात आले तर, अथवा ज्या व्यक्तीवर ते बजावण्यात आले असेल त्या व्यक्तीने पोचपावतीवर सही करण्यास नकार दिला तर, अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव समन्सची व्यक्तिशः बजावणी करणे शक्य न झाल्यास, पक्षकाराने तसा अर्ज केल्यावर, न्यायालयाने प्रतिवादीसाठी समन्स काढावे त्याप्रमाणे न्यायालयाद्वारे बजावणी करण्यासाठी असे समन्स पुन्हा काढले पाहिजे.

(५) या नियमाखाली पक्षकाराकडून समन्स बजावले जाते तेव्हा, समन्सच्या बजावणीसाठी एरव्ही आकारणीयोग्य असलेली फी पक्षकाराला द्यावी लागणार नाही.]

समन्स कसे बजावले जाते.

८. [१][नियम ७क खाली बजावणीसाठी पक्षकाराकडे सुपूर्द केलेल्या समन्सहून अन्य असे या आदेशाखालील] प्रत्येक समन्स प्रतिवादीवर ज्या पद्धतीने समन्स बजावण्यात येते, त्याच पद्धतीने शक्यतोवर बजावले पाहिजे आणि बजावणीच्या शाबितीसंबंधीचे पाचव्या आदेशामध्ये असलेले नियम या नियमाखाली बजावलेल्या सर्व समन्सना लागू होतील.

समन्स बजावणी साठीचा वेळ.

९. समन्स काढून बोलावलेल्या प्रत्येक बाबतीत, व्यक्तींच्या हजेरीसाठी समन्समध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या पुरेशा आधी समन्स बजावले पाहिजे. ज्यामुळे तयारीसाठी आणि ज्या ठिकाणी हजर राहणे आवश्यक आहे त्या ठिकाणी जाण्यासाठी प्रवास करण्यासाठी तिला पुरेसा अवधी मिळेल.

समन्सचे अनुपालन करण्यास साक्षीदाराने कसूर केल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.

१०. [१][(१) पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी न्यायालयात उपस्थित राहण्याकरता ज्या व्यक्तीवर समन्स बजावण्यात आले असेल ती व्यक्ती, अशा समन्स अनुसार न्यायालयात हजर राहिली नाही किंवा तिने दस्तऐवज सादर केले नाहीत तर,—

(क) बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र शपथपत्राद्वारे सत्यापित केलेले नसेल अथवा समन्सची बजावणी पक्षकारांकडून किंवा त्याच्या अभिकर्त्याकडून करण्यात आली असेल अशा बाबतीत,

न्यायालयाने, ज्याने बजावणी केली असेल त्या बजावणी अधिकाऱ्याची किंवा पक्षकाराची किंवा, प्रकरणपरत्वे, त्याच्या अभिकर्त्याची समन्सच्या बजावणीसंबंधी किंवा बजावणी न होण्यासंबंधी शपथेवर तपासणी केली पाहिजे किंवा कोणत्याही न्यायालयामार्फत तशी तपासणी करवून घेतली पाहिजे, अथवा

(ख) बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अशाप्रकारे सत्यापित करण्यात आले असेल तर, न्यायालयास बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याची किंवा त्या पक्षकाराची किंवा त्याच्या अभिकर्त्याची समन्सच्या बजावणीसंबंधी किंवा बजावणी न होण्यासंबंधी शपथेवर तपासणी करता येईल किंवा कोणत्याही न्यायालयामार्फत तशी तपासणी करवून घेता येईल.]

(२) असा पुरावा देणे किंवा दस्तऐवज हजर करणे महत्वाचे आहे आणि अशा समन्स अनुसार हजर राहण्यात किंवा दस्तऐवज हजर करण्यात अशा व्यक्तीने कोणत्याही कायदेशीर सबबीशिवाय कसूर केली आहे किंवा तिने समन्सची बजावणी बुद्धिपुरस्पर टाळली आहे असे न्यायालयास सकारण वाटल्यास, न्यायालयास, जाहीरनामा काढून त्या मध्ये नमूद केलेल्या वेळी व ठिकाणी पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी हजर राहण्यास तिला फर्मावता येईल व अशा जाहीरनाम्याची एक प्रत ती व्यक्ती नेहमी ज्या ठिकाणी रहात असेल त्या घराच्या बाहेरच्या दरवाजावर किंवा अन्य ठळक जागी चिकटवली पाहिजे.

(३) असा जाहीरनामा काढण्याऐवजी किंवा तो काढण्याच्या वेळी किंवा त्यानंतर केव्हाही न्यायालयास, स्वविवेकानुसार अशा व्यक्तीच्या अटकेसाठी जामिनी किंवा बिनजामिनी अधिपत्र काढता येईल आणि त्यास योग्य वाटेल एवढ्या रकमेपर्यंत त्या व्यक्तीच्या मालमत्तेच्या जप्तीचा आदेश काढता येईल, मात्र ती रक्कम जप्तीच्या खर्चाच्या व नियम १२ खाली बसवावयाच्या द्रव्यदंडांच्या रकमेपेक्षा अधिक होता कामा नये :

परंतु, कोणत्याही लघुवाद न्यायालयास स्थावर मालमत्तेच्या जप्तीचा आदेश काढता येणार नाही.

साक्षीदार उपस्थित झाल्यास जप्ती मागे घेता येईल.

११. मालमत्ता जप्त झाल्यानंतर कोणत्याही वेळी जर, अशी व्यक्ती उपस्थित राहिली आणि,—

(क) तिने समन्सचे अनुपालन करण्यात कायदेशीर सबबीशिवाय कसूर केलेली नाही किंवा तिने बजावणी टाळलेली नाही ; आणि,

(ख) लगतपूर्व नियमाखाली काढलेल्या जाहीरनाम्यामध्ये नमूद केलेल्या वेळी व ठिकाणी हजर राहण्यास तिने कसूर केली असेल त्याबाबतीत, वेळेवर हजर राहण्यासाठी अशा जाहीरनाम्याबाबत तिला पुरेसे आधी समजले नव्हते ;

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ६६ (पाच) द्वारे 'या आदेशाखाली' या मजकुराऐवजी दाखल केले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ६६ (सहा) द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले.

अशी तिने न्यायालयाची खात्री पटवून दिल्यास, न्यायालयाने अशी मालमत्ता जप्तीमधून मुक्त करण्यात यावी असा निदेश दिला पाहिजे आणि जप्तीच्या खर्चाच्या संबंधात त्याला योग्य वाटेल असा आदेश काढला पाहिजे.

साक्षीदार हजर न राहिल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.

१२. [१][(१)] अशी व्यक्ती हजर न राहिल्यास किंवा हजर राहूनही न्यायालयाची खात्री पटवून देऊ न शकल्यास, न्यायालयास, तिचे जीवनमान व त्या त्या प्रकरणातील परिस्थिती लक्षात घेऊन, न्यायालयाला योग्य वाटेल त्याप्रमाणे, जास्तीत जास्त पाचशे रुपयांपर्यंत द्रव्यदंड बसविता येईल अथवा तिची मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग जप्त करून विकण्यात यावा अथवा तो जर नियम १० खाली अगोदरच जप्त करण्यात आला असेल तर, अशा जप्तीचा संपूर्ण खर्च व असा द्रव्यदंड असल्यास, त्या द्रव्यदंडाची रक्कम वसूल होण्यासाठी विकण्यात यावा असा आदेश देता येईल:

परंतु, ज्या व्यक्तीची हजेरी आवश्यक आहे अशा व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे खर्च व द्रव्यदंड न्यायालयात भरल्यास न्यायालयाने ती मालमत्ता जप्तीमधून मुक्त करण्याचा आदेश दिला पाहिजे.

[२][(२) नियम १०, पोटनियम (२) खाली न्यायालयाने जाहीरनामा काढलेला नसता व तसेच त्या नियमाच्या पोटनियम (३) खाली त्याने वॉरंट किंवा जप्तीचा आदेश काढलेला नसला तरीही न्यायालयास द्रव्यदंड का बसवू नये यासंबंधी 'कारण दाखवा' नोटीस अशा व्यक्तीला दिल्यानंतर द्रव्यदंड बसविता येईल.]

जप्तीची पद्धत.

१३. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये मालमत्तेची जप्ती व विक्री करण्याच्या संबंधातील उपबंध जेथवर लागू होत असतील तेथवर, ते या आदेशामधील कोणत्याही जप्तीस व विक्रीस, ज्या व्यक्तीची मालमत्ता अशाप्रकारे जप्त करण्यात आली असेल ती व्यक्ती जणू काही न्यायनिर्णीत ऋणको असावी त्याप्रमाणे लागू होतील.

दाव्याच्या संबंधात तिऱ्हाईत असलेल्यांना साक्षीदार म्हणून न्यायालयास स्वत:हून बोलावून घेता येईल.

१४. न्यायालयात हजर होऊन तेथील कामात भाग घेण्याच्या संबंधात या संहितेमध्ये असलेल्या उपबंधाच्या आणि त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या अधीनतेने, [१][दाव्यातील पक्षकारांसहित दाव्यातील पक्षकाराने साक्षीदार म्हणून न बोलावलेल्या कोणत्याही व्यक्तीची तपासणी] करणे आवश्यक आहे असे न्यायालयास वाटल्यास, न्यायालयास केव्हाही स्वत: होऊन, नियत करण्यात येईल अशा दिवशी अशा व्यक्तीला समन्स काढून साक्षीदार म्हणून पुरावा देण्यासाठी किंवा तिच्या कब्जातील एखादा दस्तऐवज हजर करण्यासाठी बोलावण्याची व्यवस्था करता येईल आणि साक्षीदार म्हणून तिची तपासणी करता येईल अथवा असा दस्तऐवज हजर करण्यास तिला फर्मावता येईल.

समन्सद्वारे बोलावलेल्या व्यक्तीने पुरावा अथवा दस्तऐवज हजर करणे हे तिचे कर्तव्य.

१५. लगतपूर्वी शेवटी सांगितल्याप्रमाणे उपबंधांच्या व कायद्याच्या अधीनतेने, दाव्यामध्ये उपस्थित राहून पुरावा देण्यासाठी समन्सद्वारे बोलावण्यात आलेल्या व्यक्तीला समन्समध्ये त्या प्रयोजनासाठी विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी व वेळी हजर राहावे लागेल आणि दस्तऐवज हजर करण्यासाठी समन्सद्वारे बोलावण्यात आलेल्या व्यक्तीला अशा वेळी व अशा ठिकाणी एकतर जो दस्तऐवज हजर करण्यासाठी स्वत: हजर राहावे लागेल किंवा दस्तऐवज हजर करण्याची व्यवस्था करावी लागेल.

त्यांना केव्हा जाता येईल.

१६. (१) याप्रमाणे समन्स काढून बोलावलेल्या व हजर होणाऱ्या व्यक्तीला, न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नाही तर, दाव्याचा निकाल होईपर्यंत प्रत्येक सुनावणीच्या वेळी हजर राहावे लागेल.

(२) कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून आणि सर्व आवश्यक खर्च (कोणताही असल्यास) तो दिल्यानंतर न्यायालयास अशाप्रकारे समन्सद्वारे बोलावण्यात आलेल्या व हजर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने पुढील किंवा अन्य कोणत्याही सुनावणीच्या वेळी किंवा दाव्याचा निकाल होईपर्यंत हजर राहाण्याकरता तिने प्रतिभूती द्यावी असे फर्मावता येईल; आणि अशी प्रतिभूती देण्यात तिने कसूर केल्यास तिला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्याचे आदेश न्यायालयास देता येतील.

नियम १० ते १३. यांची प्रयुक्ती.

१७. समन्सच्या अनुपालनार्थ हजर राहिलेली कोणतीही व्यक्ती, नियम १६ चे उल्लंघन करून, कोणत्याही कायदेशीर सबबीशिवाय निघून जाईल तिच्या बाबतीत, नियम १० ते १३ चे उपबंध ते जितपत लागू होतात तितपत, लागू असल्याचे मानण्यात येईल.

पकडून आणलेला साक्षीदार पुरावा देऊ शकत नसेल किंवा दस्तऐवज हजर करू शकत नसेल त्या बाबतीतील कार्यपद्धती.

१८. वारंट अन्वये अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस न्यायालयासमोर अभिरक्षेत आणले जाईल तेव्हा पक्षकारांच्या किंवा त्यांच्यापैकी कोणाच्याही गैरहजेरीमुळे जो पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी तिला बोलावण्यात आले असेल तो पुरावा ती देऊ शकली नाही किंवा तो दस्तऐवज ती हजर करू शकली नाही तर त्याबाबतीत न्यायालयास, योग्य वाटेल अशा वेळी व ठिकाणी तिने उपस्थित राहण्याकरिता वाजवी जामीन अथवा अन्य प्रतिभूती द्यावी असे तिला फर्मावता येईल आणि असा जामीन अथवा प्रतिभूती दिल्यानंतर तिला सोडून देता येईल आणि तिने असा जामीन अथवा प्रतिभूती न दिल्यास तिला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्याचा आदेश देता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ६६(सात) द्वारे नियम १२ ला त्या नियमाचा पोटनियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाद्वारे समाविष्ट केले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६६(आठ) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

कोणताही साक्षीदार विवक्षित सीमांमध्ये राहत असल्याखेरीज त्याला जातीने हजर राहण्याचा आदेश न देणे.

१९. कोणतीही व्यक्ती,—

(क) न्यायालयाच्या मूळ साधारण अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहत असल्याखेरीज, किंवा—

(ख) अशा सीमांच्या बाहेर परंतु न्यायगृहापासून [१][शंभर किलोमीटर] पेक्षा कमी अथवा (जेथे तो राहते ते ठिकाण व न्यायालयाचे ठिकाण यांमधील अंतराच्या पाचषष्ठांश एवढ्या अंतरापर्यंत आगगाडीच्या किंवा आगबोटीच्या मार्गाने दळणवळण अगर अन्य सार्वजनिक वाहन सेवा पूर्वापार उपलब्ध असेल त्याबाबतीत) न्यायगृहापासून [१][पाचशे किलोमीटर] पेक्षा कमी अंतरावरील एखाद्या ठिकाणी राहत असल्याखेरीज तिला पुरावा देण्यासाठी जातीने हजर राहण्याचा आदेश देता येणार नाही :

[१][१९. कोणतीही व्यक्ती,—

(क) न्यायालयाच्या मूळ अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहत असल्याखेरीज, किंवा

(ख) अशा सीमांच्या बाहेर परंतु न्यायगृहापासून शंभर किलोमीटर पेक्षा कमी अथवा (जेथे तो राहते ते ठिकाण व न्यायालयाचे ठिकाण यांमधील अंतराच्या पाचषष्ठांश एवढ्या अंतरापर्यंत आगगाडीच्या किंवा आगबोटीच्या मार्गाने दळणवळण असेल अगर अन्य सार्वजनिक वाहन सेवा पूर्वापार उपलब्ध असेल त्याबाबतीत) न्यायगृहापासून पाचशे किलोमीटर पेक्षा कमी अंतरावरील एखाद्या ठिकाणी राहत असल्याखेरीज तिला पुरावा देण्यासाठी जातीने हजर राहण्याचा आदेश देता येणार नाही.]

कोणताही साक्षीदार विवक्षित सीमांमध्ये राहत असल्याखेरीज त्याला जातीने हजर राहण्याचा आदेश न देणे.

[१][परंतु, या नियमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या दोन ठिकाणांमध्ये हवाई वाहतुकीची सोय असेल आणि साक्षीदाराला विमान प्रवासाचा खर्च देण्यात आला असेल त्याप्रकरणी, जातीने हजर राहण्याचा आदेश देता येईल.]

यायालयाने फर्मावले असता पक्षकाराने पुरावा देण्यास नकार दिल्यास त्याचा परिणाम.

२०. दाव्यामधील कोणत्याही पक्षकाराने न्यायालयामध्ये हजर असूनही न्यायालयाने, पुरावा देण्यास अथवा त्याच्या कब्जातील किंवा अखत्यारातील कोणताही दस्तऐवज तेथल्या तेथे हजर करण्यास फर्मावले असता कायदेशीर सबबीशिवाय नकार दिल्यास, न्यायालयास त्याच्या विरुद्ध न्यायनिर्णय अधिघोषित करता येईल किंवा दाव्याच्या संबंधात स्वतःला योग्य वाटेल असा आदेश काढता येईल.

साक्षीदारांच्या संबंधातील नियम समन्सद्वारे बोलावलेल्या पक्षकारांना लागू असणे.

२१. दाव्यातील एखाद्या पक्षकारास पुरावा देण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास फर्मावले जाईल अशा बाबतीत, साक्षीदारांच्या बाबतीतील उपबंध जेथवर लागू होतात तेथवर, ते अशा व्यक्तीस लागू होतील.

[४][आदेश सोळा—क

कारागृहांमध्ये बंदिवान केलेल्या किंवा स्थानबद्ध केलेल्या साक्षीदारांची हजेरी

व्याख्या.

१. या आदेशात,—

(क) "स्थानबद्ध" यामध्ये, प्रतिबंधक स्थानबद्धतेकरिता उपबंध करणाऱ्या कोणत्याही कायद्याखालील स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीचा समावेश होतो.

(ख) "कारागृह" यामध्ये,—

(एक) राज्य शासनाने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे दुय्यम कारागृह म्हणून घोषित केलेली कोणतीही जागा, आणि

(दोन) कोणतेही सुधारगृह, बोर्स्टल संस्था किंवा तशाच प्रकारची अन्य संस्था, यांचा समावेश होतो.

पुरावा देण्यासाठी कैद्यांनी उपस्थित राहावे म्हणून फर्मावण्याची शक्ती.

२. राज्यातील एखाद्या कारागृहामध्ये बंदिवान असलेल्या अथवा स्थानबद्ध असलेल्या व्यक्तीचा पुरावा दाव्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे असे न्यायालयास वाटल्यास, न्यायालयास, कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याने त्या व्यक्तीला पुरावा देण्यासाठी न्यायालयासमोर हजर करावे असे फर्मावणारा आदेश काढता येईल :

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ६६(नऊ) द्वारे 'पन्नास' याऐवजी हा मजकूर दाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६६(नऊ) द्वारे 'दोनशे मैल' या ऐवजी हा मजकूर दाखल केला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६६(दहा) द्वारे जादा दाखल केला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ६७ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ४४ अन्वये दाखल केले.

परंतु, कारागृहापासून न्यायगृहापर्यंतचे अंतर २५ किलोमीटरपेक्षा अधिक असेल तर, आयोगपत्र पाठवून अशा व्यक्तीची तपासणी करणे पुरेसे होणार नाही अशी न्यायालयाची खात्री पटल्याखेरीज, असा आदेश काढता येणार नाही.

खर्चाची रक्कम न्यायालयात भरणे.

३. (१) नियम २ खाली कोणताही आदेश काढण्यापूर्वी ज्या पक्षकाराच्या सांगण्यावरून किंवा ज्याच्या लाभार्थ आदेश काढावयाचा असेल त्या पक्षकाराला न्यायालयाने साक्षीदाराचा प्रवास खर्च व त्याच्या नेण्या-आणण्याच्या बंदोबस्तासाठीचा अन्य खर्च यासुद्धा आदेशाच्या अंमलबजावणीचा खर्च भागवण्यास न्यायालयास पुरेशी वाटेल एवढी रक्कम न्यायालयात भरण्यास फर्माविले पाहिजे.

(२) जर ते न्यायालय उच्च न्यायालयास दुय्यम असेल तर, अशा खर्चाचे प्रमाण निश्चित करताना उच्च न्यायालयाने त्याबाबतीत केलेले कोणतेही नियम विचारात घेतले पाहिजेत.

नियम २ च्या प्रवर्तनातून विवक्षित व्यक्तींना वगळण्याची राज्य शासनाची शक्ती.

४. (१) पोटनियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबी विचारात घेऊन, राज्य शासनास, केव्हाही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे एखाद्या व्यक्तीला किंवा एखाद्या वर्गातील व्यक्तींना ज्या कारागृहात बंदिवान केलेले असेल किंवा स्थानबद्ध केलेले असेल त्या कारागृहातून त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना हलवण्यात येऊ नये असा निदेश देता येईल व त्यानंतर आदेश अंमलात असेतोपर्यंत, नियम २ खाली काढलेला कोणताही आदेश—मग तो राज्य शासनाच्या आदेशाच्या तारखेपूर्वीचा किंवा नंतरचा असो—अशा व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाच्या बाबतीत प्रभावी असणार नाही.

(२) पोटनियम (१) खाली आदेश काढण्यापूर्वी राज्य शासनाने पुढील गोष्टी विचारात घेतल्या पाहिजेत, त्या अशा :—

(क) कोणत्या स्वरूपाच्या अपराधाबद्दल किंवा कोणत्या कारणांच्या आधारावर त्या व्यक्तीला किंवा त्या वर्गातील व्यक्तींना बंदिवान करण्याचा किंवा स्थानबद्ध करण्याचा आदेश दिलेला आहे;

(ख) त्या व्यक्तीला किंवा त्या वर्गातील व्यक्तींना कारागृहातून हलविण्यास परवानगी दिल्याने सार्वजनिक सुव्यवस्थेला धोका पोहोचण्याची शक्यता कितपत आहे; आणि

(ग) सर्वसाधारणपणे सार्वजनिक हित.

कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याने विवक्षित प्रकरणी आदेशाचे पालन करू नये.

५. ज्या व्यक्तीच्या बाबतीत, नियम २ खाली आदेश काढण्यात आला असेल ती व्यक्ती,—

(क) आजारपणामुळे अथवा विकलांगतेमुळे कारागृहातून हलविली जाण्यास असमर्थ आहे असे कारागृहाशी संलग्न असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याने प्रमाणित केले तर; किंवा

(ख) संपरीक्षेसाठी संप्रेषित केली गेली असेल अथवा संपरीक्षा होईपर्यंत किंवा प्रारंभिक अन्वेषण होईपर्यंत परत पाठवण्याच्या आदेशास अधीन असेल तर; किंवा

(ग) आदेशांचे पालन करण्यासाठी आणि ज्या कारागृहात तिला बंदिवान किंवा स्थानबद्ध करण्यात आले असेल त्या कारागृहात तिला परत नेण्यासाठी लागणाऱ्या कालावधीपूर्वीच तिचा अभिरक्षेतील कालावधी संपत असेल तर; किंवा

(घ) नियम ४ खाली राज्य शासनाने काढलेला आदेश जिला लागू होतो अशी व्यक्ती असेल तर;

कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याने न्यायालयाच्या आदेशाचे पालन करू नये व त्याने तसे न करण्याबद्दलच्या कारणांचे निवेदन न्यायालयाकडे पाठविले पाहिजे.

कैद्याला न्यायालयात बंदोबस्तानिशी आणावयाचे.

६. अन्य कोणत्याही प्रकरणी, न्यायालयाचा आदेश सुपूर्द करण्यात आल्यानंतर कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याने त्या आदेशामध्ये नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीला अशा आदेशात निर्दिष्ट केलेल्या वेळी न्यायालयात हजर राहणे शक्य व्हावे अशाप्रकारे तिला न्यायालयात नेण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि तिची तपासणी होईपर्यंत अथवा ज्या कारागृहात बंदिवान किंवा स्थानबद्ध केले असेल त्या कारागृहात तिला परत पाठवण्यासाठी न्यायालय प्राधिकार देईपर्यंत तिला त्या न्यायालयामध्ये अथवा त्याच्या आसपास अभिरक्षेत ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

कारागृहातील साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढण्याची शक्ती.

७. (१) राज्यामधील किंवा भारतात अन्य ठिकाणी असलेल्या कारागृहात बंदिवान किंवा स्थानबद्ध असलेल्या व्यक्तीचा पुरावा घेणे हे दाव्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे असे जर न्यायालयास वाटले, परंतु या आदेशातील पूर्ववर्ती उपबंधांखाली अशा व्यक्तीला हजर करवणे शक्य होणार नसेल तर, ज्या कारागृहात त्या व्यक्तीला बंदिवान किंवा स्थानबद्ध करण्यात आले असेल त्या कारागृहात तिची तपासणी करण्यासाठी न्यायालयास आयोगपत्र काढता येईल.

(२) सविस्तराच्या आदेशाचे उपबंध आयोगपत्र पाठवून केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीच्या तपासणीस जसे लागू होतात तसे ते कारागृहातील अशा व्यक्तीला आयोगपत्र पाठवून केलेल्या तिच्या तपासणीस शक्य तेवढ्यावर लागू होतील.]

न्यायालय वेळ देऊन सुनावणी तहकूब करू शकेल.

१. (१) पुरेसे कारण दाखवून दिले तर, दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये न्यायालयास, पक्षकारांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही वेळ देता येईल, व दाव्याची सुनावणी वेळोवेळी तहकूब करता येईल.

१. [(१) पुरेसे कारण दाखवून दिले तर, दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये न्यायालयास, पक्षकारांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही वेळ देता येईल व दाव्याची सुनावणी वेळोवेळी तहकूब करता येईल :

परंतु, एखादे प्रकरण पुरावे घेण्यासाठी निश्चित करण्यात आले असेल अशा बाबतीत, सुनावणी करणाऱ्या न्यायालयाला लेखी नमूद करावयाच्या कारणास्तव व सुनावणी तहकूब करणे आवश्यक आहे असे वाटत नसल्यास, प्रत्येक पक्षकारासाठी सादर केलेल्या सर्व साक्षीदारांचे पुरावे न्यायालयाने नोंदवले पाहिजेत.

न्यायालय वेळ देऊन सुनावणी तहकूब करू शकेल.

तहकुबीचा खर्च.

(२) अशा प्रत्येक प्रकरणी, न्यायालयाने दाव्याच्या पुढील सुनावणीसाठी एक दिवस निश्चित केला पाहिजे व तहकुबीमुळे उद्भवलेल्या खर्चाच्या संबंधात, स्वतःला योग्य वाटेल असा आदेश त्यास काढता येईल:

[परंतु, ...

(क) दाव्याची सुनावणी सुरू झालेली असल्यास व अपवादात्मक कारणास्तव (जी अभिलिखित करावी लागतील) ती सुनावणी पुढील दिवसांच्याही नंतर लांबणीवर टाकून तहकूब करणे आवश्यक आहे असे न्यायालयाला आढळून न आल्यास, हजर असणाऱ्या सर्व साक्षीदारांची तपासणी होईपर्यंत दररोज सुनावणी चालू राहिली पाहिजे.

(ख) पक्षकारांच्या आटोक्याबाहेरील परिस्थिती असेल ती बाब वगळता एरव्ही, न्यायालयाने पक्षकाराच्या विनंतीवरून कोणत्याही तहकुबीस मंजुरी देता कामा नये.

(ग) पक्षकाराचा प्लीडर दुसऱ्या न्यायालयात गुंतला आहे हे तहकुबीचे कारण होऊ शकणार नाही.

(घ) प्लीडरचे आजारपण अथवा तो दुसऱ्या न्यायालयात गुंतला आहे या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव त्याची या दाव्याचे काम चालवण्याबाबतची असमर्थता ही बाब तहकुबीचे कारण म्हणून पुढे मांडण्यात आल्यास, तहकुबीसाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराने वेळेवर दुसरा प्लीडर नेमणे शक्य नव्हते अशी न्यायालयाची खात्री पटल्यावेरीज, त्या न्यायालयाने तहकुबीस मंजुरी देता कामा नये.

(ङ) साक्षीदार न्यायालयात हजर असूनही पक्षकार किंवा त्याचा प्लीडर हजर नसल्यास अथवा पक्षकार किंवा त्याचा प्लीडर न्यायालयात हजर असूनही तो साक्षीदाराची तपासणी किंवा उलटतपासणी घेण्यास तयार नसल्यास न्यायालयास, त्यास योग्य वाटल्यास, साक्षीदाराचे निवेदन अभिलिखित करून घेता ५ ७ व उपरोक्तप्रमाणे हजर नसलेल्या किंवा तयार नसलेल्या पक्षकाराच्या किंवा त्याच्या प्लीडरच्या करवी व्हावयाची साक्षीदाराची सरतपासणी किंवा, प्रकरणपरत्वे, उलटतपासणी अनावश्यक ठरवून स्वतःला योग्य वाटतील असे आदेश काढता येतील.]

तहकुबीचा खर्च.

(२) अशा प्रत्येक प्रकरणी, न्यायालयाने दाव्याच्या पुढील सुनावणीसाठी एक दिवस निश्चित केला पाहिजे व तहकुबीमुळे उद्भवलेल्या खर्चाच्या संबंधात स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणे सर्वसाधारणपणे साधारण दाव्यांमध्ये जास्तीत जास्त पन्नास रुपये असा आणि विशेष दाव्यामध्ये जास्तीत जास्त शंभर रुपये असा आदेश त्यास काढता येईल :

परंतु, पुराव्यांची सुनावणी सुरू झालेली असेल तर, अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी ती सुनावणी पुढील दिवसांच्याही नंतर लांबणीवर टाकून तहकूब करणे आवश्यक आहे असे न्यायालयाला आढळून न आल्यास, हजर असणाऱ्या सर्व साक्षीदारांची तपासणी होईपर्यंत दररोज दाव्याची सुनावणी चालू राहिली पाहिजे.]

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ६८ (एक) अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

१. उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ४५ द्वारे ऐवजी सादर केले.

निश्चित केलेल्या दिवशी पक्षकार हजर न राहिल्यास त्या संबंधातील कार्यपद्धती.

२. दाव्याची सुनावणी तहकूब करून ती ज्या दिवशी ठेवण्यात आलेली असेल अशा कोणत्याही दिवशी, पक्षकार किंवा त्यांच्यापैकी कोणीही हजर न राहिल्यास न्यायालयास, नवव्या आदेशामध्ये त्याबाबतीत सांगितलेल्यापैकी एका पद्धतीने दावा निकालात काढण्याची कार्यवाही करता येईल किंवा स्वतःस योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

[१][स्पष्टीकरण.—कोणत्याही पक्षकाराचा पुरावा किंवा त्याचा भाग अगोदरच सारतः नोंदवून घेतलेला असेल आणि दाव्याची सुनावणी तहकूब करण्यात येऊन ती ज्या तारखेला ठेवण्यात आली असेल अशा कोणत्याही दिवशी असा पक्षकार हजर न राहिल्यास, न्यायालयास स्वविवेकानुसार, जणू काही तो पक्षकार हजर आहे असे समजून त्याप्रमाणे काम पुढे चालविता येईल.]

कोणत्याही पक्षकाराने पुरावा, इत्यादी दाखल केला नाही तरीही न्यायालय काम पुढे चालवू शकते.

३. दाव्यातील ज्या कोणत्याही पक्षकाराला मुदत देण्यात आली असेल त्याने आपला पुरावा दाखल केला नाही किंवा आपल्या साक्षीदारांना हजर केले नाही किंवा दावा पुढे चालवण्यासाठी अन्य एखादी कृती करणे आवश्यक असून त्यासाठी वेळ देण्यात आली असूनही ती कृती केली नाही तर [१][अशी कसूर करण्यात आलेली असली तरीही न्यायालयास,—

(क) पक्षकार हजर असल्यास, ताबडतोब दाव्याचा निर्णय करण्यासाठी कार्यवाही करता येईल, किंवा

(ख) पक्षकार किंवा त्यांच्यापैकी कोणीही गैरहजर असल्यास नियम २ खाली कार्यवाही करता येईल.]

आदेश अठरावा

दाव्याची सुनावणी व साक्षीदारांची तपासणी

सुरू करण्याचा अधिकार.

१. वादीला प्रारंभ करण्याचा अधिकार असेल—मात्र वादीने अभिकथन केलेली तथ्ये प्रतिवादीने मान्य केली आणि वादीने जो अनुतोष मागितला आहे त्याच्या एखादया भागास तो कायदेविषयक मुदयाचा किंवा प्रतिवादीने अभिकथन केलेल्या जादा तथ्यांचा विचार करता हक्कदार होत नाही असा प्रतिवादीने दावा केला तर त्याबाबतीत, प्रतिवादीला प्रारंभ करण्याचा अधिकार असेल.

बाजू मांडणे व पुरावा हजर करणे.

२. (१) दाव्याच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवशी किंवा सुनावणी तहकूब करण्यात येऊन ज्या दिवशी ठेवण्यात आली असेल अशा अन्य कोणत्याही दिवशी दावा सुरू करण्याचा अधिकार असलेल्या पक्षकारास आपली बाजू मांडावी लागेल व जे वादमुद्दे शाबीत करण्यास तो बांधलेला आहे त्यांच्या पुष्टयर्थ आपला पुरावा सादर करावा लागेल.

(२) त्यानंतर दुसऱ्या पक्षकाराला आपली बाजू मांडून आपला पुरावा (काही असल्यास) सादर करावा लागेल व त्यानंतर त्याला न्यायालयाला उद्देशून सर्वसाधारणपणे संपूर्ण प्रकरणासंबंधी भाषण करता येईल.

(३) दाव्यास प्रारंभ करणारा पक्षकार त्यानंतर सर्वसाधारणपणे संपूर्ण प्रकरणासंबंधी उत्तर देऊ शकेल.

[१][(४) या नियमात काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायालयास कारणे नमूद करून दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये, कोणत्याही पक्षकारास कोणत्याही साक्षीदाराची तपासणी करण्याचा निदेश किंवा परवानगी देता येईल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ ज्या कलम ६८ (दोन) अन्वये समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६८ (तीन) अन्वये "अशी कसूर करण्यात आली असली तरीही न्यायालय ताबडतोब दाव्याचा निर्णय करण्याच्या कामाला लागू शकेल." या ऐवजी दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६९ (एक) द्वारे समाविष्ट केले.

बाजू मांडणे व पुरावा हजर करणे.

२. (१) दाव्याच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवशी किंवा सुनावणी तहकूब करण्यात येऊन ज्या दिवशी ठेवण्यात आली असेल अशा अन्य कोणत्याही दिवशी दावा सुरू करण्याचा हक्क असलेल्या पक्षकारास आपली बाजू मांडावी लागेल व जे वादमुद्दे शाबीत करण्यास तो बांधलेला आहे त्याच्या पुष्टयर्थ आपला साक्षीपुरावा सादर करावा लागेल.

(२) त्यानंतर दुसऱ्या पक्षकाराला आपली बाजू मांडून आपला साक्षीपुरावा (काही असल्यास) सादर करावा लागेल व त्यानंतर त्याला न्यायालयाला उद्देशून सर्वसाधारणपणे संपूर्ण प्रकरणासंबंधी भाषण करता येईल.

(३) दाव्यास प्रारंभ करणारा पक्षकार त्यानंतर सर्वसाधारणपणे संपूर्ण प्रकरणासंबंधी उत्तर देऊ शकेल.

[१][स्पष्टीकरण.—या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही साक्षीदाराची कोणत्याही टप्प्यावर तपासणी करण्यासाठी कारणे नमूद करून कोणत्याही पक्षकाराला निदेश देण्याच्या न्यायालयाच्या अधिकारितेवर परिणाम होणार नाही.]

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ४६ द्वारे समाविष्ट केले.

अनेक वादमुद्दे असतील त्याबाबतीतील पुरावा.

३. अनेक वादमुद्दे असून त्यांपैकी काही वादमुद्दे शाबीत करण्याचे दायित्व दुसऱ्या पक्षकारावर असेल तेव्हा, दाव्यास प्रारंभ करणाऱ्या पक्षकारास स्वत:च्या विकल्पानुसार त्या वादमुद्द्यावरील आपला पुरावा एकतर सादर करता येईल किंवा दुसरा पक्षकार सादर करील त्या पुराव्याला उत्तर म्हणून राखून ठेवता येईल आणि अशा नंतरच्या बाबतीत, प्रारंभ करणाऱ्या पक्षकारास दुसऱ्या पक्षकाराने त्याचा पुरावा सादर केल्यानंतर त्या वादमुद्द्यावरील पुरावा सादर करता येईल. आणि त्यानंतर दुसऱ्या पक्षकारास प्रारंभ करणाऱ्या पक्षकाराने अशा प्रकारे सादर केलेल्या पुराव्यास विशेष उत्तर देता येईल :

परंतु, मग प्रारंभ करणारा पक्षकार सर्वसाधारणपणे संपूर्ण प्रकरणाच्या संदर्भात उत्तर देण्यास हक्कदार असेल.

पक्षकाराने अन्य साक्षीदारांपूर्वी उपस्थित व्हावयाचे.

[१][३क. पक्षकार स्वत:च साक्षीदार म्हणून उपस्थित होऊ इच्छित असेल तर, त्याच्यावतीने अन्य कोणत्याही साक्षीदाराची तपासणी होण्यापूर्वी त्याने स्वत: याप्रमाणे उपस्थित झाले पाहिजे–मात्र न्यायालयाने कारणे नमूद करून दाव्याच्या नंतरच्या टप्प्याला त्याला स्वत:चा साक्षीदार म्हणून उपस्थित राहण्याची परवानगी दिली तर गोष्ट वेगळी.]

साक्षीदारांची तपासणी खुल्या न्यायालयात करावयाची.

४. हजर असणाऱ्या साक्षीदारांचा पुरावा खुल्या न्यायालयात न्यायाधीशाच्या समक्ष, त्याच्या वैयक्तिक निदेशानुसार व त्याच्या देखरेखीखाली तोंडी घेण्यात येईल.

अपीलपात्र प्रकरणांमध्ये पुरावा कसा घ्यावा.

[२][५. ज्या प्रकरणामध्ये अपील करण्यास मुभा आहे त्या प्रकरणामध्ये, प्रत्येक साक्षीदाराचा पुरावा,—

(क्) न्यायालयाच्या भाषेमध्ये,—

(एक) न्यायाधीशाकडून किंवा त्यांच्या समक्ष आणि त्यांच्या वैयक्तिक निदेशनानुसार व देखरेखीखाली, लिहून घेतला पाहिजे, अथवा

(दोन) न्यायाधीशाने तोंडी सांगितल्यावर हुकूम थेट टंकलेखन यंत्रावर; किंवा

(ख्) न्यायाधीशाने अभिलिखित करावयाच्या कारणांस्तव तसा निदेश दिल्यास, न्यायाधीशाच्या समक्ष न्यायालयाच्या भाषेत यांत्रिकपणे अभिलिखित केला पाहिजे.

५. ज्या प्रकरणामध्ये अपील करण्यास मुभा आहे त्या प्रत्येक प्रकरणामध्ये, प्रत्येक साक्षीदाराचा पुरावा,—

(क्) न्यायालयाच्या भाषेमध्ये,—

(एक) न्यायाधीशाकडून किंवा त्याच्या समक्ष आणि त्याच्या वैयक्तिक निदेशनानुसार व देखरेखीखाली, लिहून घेतला पाहिजे; अथवा

(दोन) न्यायाधीशाने तोंडी सांगितल्यावर हुकूम थेट टंकलेखन यंत्रावर, किंवा

(ख्) न्यायाधीशाने अभिलिखित करावयाच्या कारणांस्तव तसा निदेश दिल्यास न्यायाधीशाच्या समक्ष न्यायालयाच्या भाषेत यांत्रिकपणे अभिलिखित केला पाहिजे [१][:

परंतु असे की, मुंबई शहर दिवाणी न्यायालयातील कोणत्याही दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या सुनावणीनंतर, साक्षीदाराचा पुरावा न्यायाधीशांच्या समक्ष आणि त्यांच्या वैयक्तिक निदेशनानुसार व देखरेखीखाली, लिहून घेतला पाहिजे आणि तो नेहमीच्या प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात नव्हे तर, वृत्तांतकथनाच्या स्वरूपात घ्यावा व अशाप्रकारे घेतलेल्या टिप्पण्या या सर्व प्रयोजनांसाठी पुरेशा ठरतील व त्या अभिलेखाचा भाग असतील.]

अपीलपात्र प्रकरणांमध्ये पुरावा कसा घ्यावा.

जबानी केव्हा भाषांतरित करून सांगावयाची.

६. पुरावा ज्या भाषेमध्ये दिलेला असेल त्या भाषेहून अन्य भाषेत तो लिहून घेण्यात आला असेल, आणि तो ज्या भाषेत लिहून घेण्यात आला आहे ती भाषा साक्षीदाराला समजत नसेल तर, लिहून घेतलेला पुरावा तो ज्या भाषेत देण्यात आला होता त्या भाषेमध्ये त्या साक्षीदाराला भाषांतरित करून सांगितला पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६९ (दोन) अन्वये समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६९ (तीन) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड (४) द्वारे पूर्णविरामाऐवजी विसर्ग घालण्यात आला आणि परंतुक जादा दाखल करण्यात आले.

कलम १३८ खालील पुरावा.

७. कलम १३८ खाली लिहून घेतलेला पुरावा नियम ५ मध्ये विहित केलेल्या नमुन्यात असला पाहिजे आणि तो वाचून दाखवण्यात येऊन त्यावर सही केली पाहिजे आणि, तो जणू काही, त्या नियमाखाली घेतलेला पुरावा असल्याप्रमाणे प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे भाषांतरित केला पाहिजे आणि त्यात दुरुस्त्या केल्या पाहिजेत.

न्यायाधीशाने पुरावा लिहून घेतला नसेल त्याबाबतीत टाचण काढणे.

८. पुरावा न्यायाधीशाने लिहून घेतला नसेल [१][अथवा त्याने तोंडी सांगितल्याबरहुकूम तो खुल्या न्यायालयात लिहून घेण्यात आला नसेल अथवा त्याच्या समक्ष यांत्रिकपणे अभिलिखित केला नसेल] तर, जसजशी प्रत्येक साक्षीदाराची तपासणी होईल तसतसे प्रत्येक साक्षीदार जी जबानी देईल त्या जबानीच्या मुख्य आशयाचे टाचण न्यायाधीशाने तयार केले पाहिजे. असे टाचण न्यायाधीशाने लिहून काढून त्यावर सही केली पाहिजे व ते टाचण अभिलेखाचा भाग बनेल.

[१][८. पुरावा न्यायाधीशाने लिहून घेतला नसेल तर, जसजशी प्रत्येक साक्षीदाराची तपासणी होईल तसतसा प्रत्येक साक्षीदार जी जबानी देईल त्या जबानीच्या मुख्य आशयाचे टाचण न्यायाधीशाने तयार केले पाहिजे. असे टाचण न्यायाधीशाने लिहून काढून त्यावर सही केली पाहिजे. व ते टाचण अभिलेखाचा भाग बनेल.] न्यायाधीशाने पुरावा लिहून घेतला नसेल त्याबाबतीत टाचण काढणे.

पुरावा इंग्रजीतून केव्हा घेता येईल.

[२][९. (१) जेव्हा न्यायालयाची भाषा इंग्रजी नसेल, पण दाव्यातील जे पक्षकार जातीने उपस्थित राहतील त्या सर्व पक्षकारांनी आणि प्लीडरमार्फत उपस्थित राहणाऱ्या पक्षकारांच्या प्लीडरांनी, इंग्रजीमध्ये दिला जाणारा पुरावा इंग्रजीमध्येच लिहून घेतला जाण्यास हरकत घेतली नसेल तेव्हा, न्यायाधीशाने तो तसा लिहून घेतला पाहिजे किंवा लिहून घेण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) जेव्हा पुरावा इंग्रजीमध्ये दिलेला नसेल, पण दाव्यातील जे पक्षकार जातीने उपस्थित राहतील त्या सर्व पक्षकारांनी आणि प्लीडरमार्फत उपस्थित राहणाऱ्या पक्षकारांच्या प्लीडरांनी असा पुरावा इंग्रजीमध्ये लिहून घेतला जाण्यास हरकत घेतली नसेल तेव्हा, न्यायाधीशाने असा साक्षीपुरावा इंग्रजीमध्ये लिहून घेतला पाहिजे किंवा लिहून घेण्याची व्यवस्था केली पाहिजे.]

कोणताही विशिष्ट प्रश्न व उत्तर लिहून घेता येईल.

१०. न्यायालयास स्वतः होऊन किंवा कोणत्याही पक्षकाराच्या किंवा त्याच्या प्लीडरच्या अर्जावरून कोणताही विशिष्ट प्रश्न आणि उत्तर किंवा कोणत्याही प्रश्नावरील कोणतीही हरकत लिहून घेण्यास विशेष कारण असल्याचे त्यास दिसून आल्यास ते लिहून घेता येईल.

हरकत घेण्यात आलेले व न्यायालयाने मुभा दिलेले प्रश्न.

११. एखादया साक्षीदाराला विचारलेल्या कोणत्याही प्रश्नास, पक्षकाराने किंवा त्याच्या प्लीडरने हरकत घेतली असेल व न्यायालयाने तो प्रश्न विचारण्यास मुभा दिल्यास, न्यायाधीशाने तो प्रश्न, त्याचे उत्तर, घेतलेली हरकत व हरकत घेणाऱ्या व्यक्तीचे नाव व त्याचवरील न्यायालयाने त्यावर दिलेला निर्णय, हे सर्व लिहून ठेवले पाहिजे.

साक्षीदाराच्या वागणुकीबद्दलचे शेरे.

१२. कोणत्याही साक्षीदाराची तपासणी चालू असताना, त्याच्या वागणुकीच्या संबंधात न्यायालयास महत्त्वाचे वाटतील असे शेरे न्यायालयाने नमूद केले पाहिजेत.

अपीलास अपात्र प्रकरणी पुराव्याचे टाचण.

[१][१३. अपील करण्यास मुभा नसलेल्या प्रकरणांमध्ये साक्षीदारांचा पुरावा सविस्तर लिहून घेण्याची किंवा तोंडी सांगून लिहवून घेण्याची अथवा अभिलिखित करण्याची आवश्यकता असणार नाही; परंतु, जसजशी प्रत्येक साक्षीदाराची तपासणी होत जाईल तसतसे साक्षीदार जबानीमध्ये जे काही सांगेल त्यांच्या मुख्य आशयाचे टाचण न्यायाधीशाने लिहून घेतले पाहिजे किंवा टंकलेखकास समक्ष तोंडी सांगितले पाहिजे किंवा यांत्रिकपणे अभिलिखित करण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि अशा टाचणावर न्यायाधीशाने सही केली पाहिजे किंवा ते अन्यथा अधिप्रमाणित केले पाहिजे व हे टाचण अभिलेखाचा भाग बनेल.]

१४. न्यायाधीश असे टाचण करण्यास असमर्थ असेल तर, त्याने आपल्या असमर्थतेची कारणे नमूद केली पाहिजेत. [सन १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४ च्या कलम ६९ (आठ) द्वारे वगळला.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ६९ (चार) अन्वये दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६९ (पाच) द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६९ (सहा) अन्वये दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक ६३२४/६, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ४८ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल केला.

दुसऱ्या न्यायाधीशासमोर घेतलेल्या पुराव्यावर कार्यवाही करण्याची शक्ती.

१५. (१) मृत्यूच्या, बदलीच्या किंवा अन्य कोणत्याही कारणांमुळे ज्यावेळी एखादा न्यायाधीश दाव्याची संपरीक्षा पूर्ण करू शकला नसेल त्यावेळी त्याच्या उत्तराधिकाऱ्यास पूर्ववर्ती नियमांखाली लिहून घेतलेला पुरावा किंवा केलेले टाचण जणूकाही त्याने सदर नियमान्वये स्वतःच्या निदेशनाखाली लिहून घेतले किंवा तयार केले असल्याप्रमाणे अशा कोणत्याही पुराव्यावर किंवा टाचणावर कार्यवाही करता येईल आणि त्यांच्या पूर्वाधिकाऱ्याने ज्या टप्प्यावर दाव्याचे काम सोडून दिले असेल तेथून ते त्याला पुढे चालू करता येईल.

(२) पोटनियम (१) चे उपबंध, ते जेथवर लागू होत असतील तेथवर, कलम २४ खाली वर्ग केलेल्या दाव्यांमध्ये घेतलेल्या पुराव्यास लागू होत असल्याचे मानण्यात येईल.

साक्षीदाराची ताबडतोब तपासणी करण्याची शक्ती.

१६. (१) ज्यावेळी एखाद्या साक्षीदार न्यायालयाचे अधिकारक्षेत्र सोडून जाणार असेल किंवा त्याचा पुरावा ताबडतोब का घेण्यात यावा यासंबंधी अन्य पुरेसे कारण न्यायालयाची खात्री पटेल अशाप्रकारे दाखवून दिलेले असेल त्याबाबतीत, कोणत्याही पक्षकाराच्या किंवा साक्षीदाराच्या अर्जावरून न्यायालयास, दावा दाखल करण्यात आल्यानंतर कोणत्याही वेळी, यात यापूर्वी उपबंधित केलेल्या रीतीने, अशा साक्षीदाराचा पुरावा घेता येईल.

(२) अशा पुरावा ताबडतोब आणि पक्षकारांच्या समक्ष घेण्यात न आल्यास, तपासणीसाठी निश्चित केलेल्या दिवसासंबंधी न्यायालयास पुरेशी वाटेल अशी नोटीस पक्षकारांना दिली पाहिजे.

(३) अशा प्रकारे घेतलेला पुरावा साक्षीदारास वाचून दाखविला पाहिजे. आणि जर त्याने तो बरोबर असल्याचे मान्य केले तर त्याला त्यावर सही करावी लागेल आणि आवश्यक वाटल्यास न्यायाधीशाने त्यात दुरुस्त्या केल्या पाहिजेत व त्यावर सही केली पाहिजे व त्यानंतर दाव्याच्या कोणत्याही सुनावणीच्या वेळी तो वाचून दाखवता येईल.

न्यायालयास, साक्षीदाराला पुन्हा बोलावून त्याची तपासणी करता येईल.

१७. दाव्याच्या कोणत्याही टप्प्याला न्यायालयास ज्या साक्षीदारांची अगोदर तपासणी झालेली आहे अशा कोणत्याही साक्षीदारास पुन्हा बोलावता येईल आणि (पुराव्यासंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या अधीनतेने) न्यायालय स्वतःला योग्य वाटतील असे प्रश्न त्याला विचारू शकेल.

पूर्वी माहीत नसलेला किंवा योग्य ती तत्परता दाखवूनही जो हजर करता आला नाही असा पुरावा हजर करणे.

[१][१७क. योग्य ती तत्परता दाखवूनही, एखादा पुरावा आपणास माहीत नव्हता किंवा आपण पुरावा देत होतो त्यावेळी तो पुरावा आपण हजर करू शकलो नाही याबद्दल पक्षकाराने न्यायालयाची खात्री पटवून दिल्यास, न्यायालयास, स्वतःला न्याय्य वाटतील अशा अटींवर त्या पक्षकाराला नंतरच्या टप्प्याला तो पुरावा हजर करण्याची परवानगी देता येईल.]

न्यायालयाची तपासणी करण्याची शक्ती.

१८. दाव्याच्या कोणत्याही टप्प्याला, ज्यासंबंधी कोणताही प्रश्न उद्भवेल अशा कोणत्याही मालमत्तेची किंवा वस्तूची न्यायालयास तपासणी करता येईल [२][आणि न्यायालय कोणत्याही मालमत्तेची किंवा वस्तूची तपासणी करील तेव्हा, व्यवहार्य होईल तितक्या लवकर, अशा तपासणीच्या वेळी नजरेला आलेल्या कोणत्याही संबद्ध तथ्यांचे एक टाचण त्याने तयार केले पाहिजे व असे टाचण हा दाव्याच्या अभिलेखाचा भाग बनेल.]

आदेश एकोणिसावा

शपथपत्र

कोणताही मुद्दा शपथपत्राद्वारे शाबीत करण्याचा आदेश देण्याची शक्ती.

१. एखादे विशिष्ट तथ्य किंवा तथ्ये शपथपत्राद्वारे शाबीत करण्यात यावीत किंवा न्यायालयास रास्त वाटतील अशा शर्तींवर, एखाद्या साक्षीदाराचे शपथपत्र सुनावणीच्या वेळी वाचण्यात यावे असा आदेश कोणत्याही न्यायालयास, पुरेशा कारणास्तव कोणत्याही वेळी देता येईल :

परंतु, एखाद्या साक्षीदाराला उलटतपासणीसाठी पुन्हा हजर करण्यात यावे अशी कोणत्याही पक्षकाराची खरीखुरी इच्छा आहे व अशा साक्षीदारास हजर करणे शक्य आहे असे न्यायालयाला वाटले तर, अशा साक्षीदाराचा पुरावा शपथपत्राद्वारे दिला जाण्यास प्राधिकृत करणारा आदेश काढता येणार नाही.

जबानीदारास उलटतपासणीसाठी हजर राहण्याचा आदेश देण्याची शक्ती.

२. (१) कोणत्याही अर्जावर शपथपत्राद्वारे पुरावा देता येईल, परंतु न्यायालयास, कोणत्याही पक्षकाराच्या विनंतीवरून जबानीदाराने उलटतपासणीसाठी हजर रहावे असा आदेश देता येईल.

(२) जबानीदाराला, न्यायालयात जातीने उपस्थित राहण्याच्या संबंधात सूट मिळालेली नसेल किंवा न्यायालयाने अन्यथा निदेश दिलेला नसेल तर, त्याला न्यायालयात प्रत्यक्ष हजर व्हावे लागेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ६९ (आठ) अन्वये समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ६९ (नऊ) अन्वये समाविष्ट केला.

शपथपत्रे कोणत्या बाबींपुरती मर्यादित असतील.

३. (१) शपथपत्र हे जबानीदार त्याच्या स्वत:च्या माहितीच्या आधारे शाबीत करू शकेल अशा तथ्यांपुरतेच मर्यादित असेल. फक्त अंतर्वादिक अर्जावर जबानीदाराचे स्वत:च्या समजुतीनुसारचे म्हणणे स्वीकारता येईल—मात्र त्यासंबंधीची कारणे नमूद करावी लागतील.

(२) ज्या शपथपत्रामध्ये उगीचच ऐकीव किंवा वादविवादाचा मजकूर घातला असेल अशा प्रत्येक शपथपत्राचा अथवा दस्तऐवजांच्या नकलांचा किंवा त्यातील उताऱ्यांचा खर्च (न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नसेल तर) तो दाखल करणाऱ्या पक्षकाराने दिला पाहिजे.

आदेश विसावा

न्यायनिर्णय व हुकूमनामा

न्यायनिर्णय केव्हा अधिघोषित करावयाचा.

[१][१. [२][(१)] प्रकरणाची सुनावणी झाल्यानंतर, न्यायालयाने ताबडतोब किंवा, त्यानंतर व्यवहार्य असेल तितक्या लवकरच्या नंतरच्या एखाद्या दिवशी न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित केला पाहिजे; आणि नंतरच्या एखाद्या दिवशी न्यायनिर्णय अधिघोषित करावयाचा असेल त्याबाबतीत, न्यायालयाने त्या प्रयोजनार्थ दिवस निश्चित केला पाहिजे व त्यासंबंधी पक्षकारांना किंवा त्यांच्या प्लीडरांना यथायोग्य नोटीस दिली पाहिजे:]

[१][परंतु, न्यायनिर्णय ताबडतोब अधिघोषित करण्यात न आल्यास, दाव्याची सुनावणी समाप्त झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत न्यायनिर्णय अधिघोषित करण्यासाठी न्यायालयाने सर्वतोपरी प्रयत्न केला पाहिजे, परंतु असे करणे शक्य नसेल तेव्हा, न्यायनिर्णय अधिघोषित करण्यासाठी न्यायालयाने नंतरचा एखादा दिवस निश्चित केला पाहिजे आणि असा दिवस हा सर्वसाधारणपणे दाव्याची सुनावणी, ज्या तारखेस समाप्त झाली असेल त्या तारखेनंतरच्या तीस दिवसांच्या पलीकडचा असता कामा नये, आणि अशा प्रकारे निश्चित केलेल्या दिवसासंबंधी पक्षकारांना व त्यांच्या प्लीडरांना यथायोग्य नोटीस दिली पाहिजे:

परंतु आणखी असे की, दाव्याची सुनावणी ज्या तारखेस समाप्त झाली असेल त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात न आल्यास न्यायालयाने अशा विलंबाची कारणे नमूद केली पाहिजेत व न्यायनिर्णय ज्या दिवशी अधिघोषित करण्यात येईल असा नंतरचा एक दिवस निश्चित केला पाहिजे आणि अशा निश्चित केलेल्या दिवसासंबंधी पक्षकारांना व त्यांच्या प्लीडरांना यथायोग्य नोटीस दिली पाहिजे.]

[४][(२) लेखी न्यायनिर्णय अधिघोषित करावयाचा असल्यास, प्रत्येक वादमुद्यावरील न्यायालयाचे निष्कर्ष आणि दाव्यामध्ये दिलेला अंतिम आदेश वाचून दाखवणे पुरेसे होईल. संपूर्ण न्यायनिर्णय न्यायालयाने वाचून दाखवण्याची जरुरी असणार नाही, परंतु न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात आल्यानंतर ताबडतोब संपूर्ण न्यायनिर्णयाची प्रत पक्षकार किंवा त्यांचे प्लीडर यांना अवलोकनार्थ उपलब्ध करून द्यावी लागेल.

(३) उच्च न्यायालयाने याबाबतीत न्यायाधीशास खास शक्ती प्रदान केलेल्या असतील तर, न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लघुलेखकास तोंडी मजकूर सांगून अधिघोषित करता येईल:

[४][(३) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लघुलेखकास तोंडी मजकूर सांगून अधिघोषित करता येईल.

[५]* * *

परंतु, खुल्या न्यायालयात तोंडी मजकूर सांगून न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात येईल त्याबाबतीत, अशा प्रकारे अधिघोषित केलेल्या न्यायनिर्णयाच्या प्रतिलेखात आवश्यक असतील त्या दुरुस्त्या करण्यात आल्यावर न्यायाधीशाने त्यावर सही केली पाहिजे. ज्या तारखेस तो अधिघोषित करण्यात आला असेल ती तारीख त्यावर नमूद केली असली पाहिजे व तो प्रतिलेख अभिलेखाचा भाग बनेल.]

न्यायाधीशाच्या पूर्वाधिकाऱ्याने लिहिलेला न्यायनिर्णय अधिघोषित करण्याची शक्ती.

२. आपल्या पूर्वाधिकाऱ्याने लिहिलेला परंतु अधिघोषित न केलेला न्यायनिर्णय [५][न्यायाधीशाने अधिघोषित केला पाहिजे.]

---

१. सन १९५६ चा अधिनियम ६६, कलम १४ द्वारे मूळ नियमाऐवजी हा नियम दाखल करण्यात आला.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७० (एक) द्वारे नियम १ ला त्या नियमाचा पोट-नियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७० (एक) (क्) द्वारे जादा दाखल केला.

४. सन १९७६ चा अधिनियम १०४ याचे कलम ७०(एक) (ख्) द्वारे समाविष्ट केले.

५. सन १९७६ च्या अधिनियम १०४, कलम ७० (दोन) द्वारे 'न्यायाधीशाला अधिघोषित करता येईल' याऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

न्यायनिर्णय स्वाक्षरित करावयाचा.

३. न्यायनिर्णय अधिघोषित करतेवेळी न्यायाधीशाने खुल्या न्यायालयात त्यावर तारीख घालून सही केली पाहिजे आणि एकदा त्यावर सही करण्यात आली की, कलम, १५२ द्वारे उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त किंवा पुनर्विलोकनाव्यतिरिक्त एरव्ही मागाहून त्यात कोणताही बदल करता येणार नाही किंवा त्यात कोणतीही भर घालता येणार नाही.

३. न्यायनिर्णय अधिघोषित करतेवेळी न्यायाधीशाने खुल्या न्यायालयात त्यावर तारीख घालून सही केली पाहिजे आणि एकदा त्यावर सही करण्यात आली की, कलम १५२ द्वारे उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त किंवा पुनर्विलोकनाव्यतिरिक्त एरव्ही मागाहून त्यात कोणताही बदल करता येणार नाही किंवा त्यात कोणतीही भर घालता येणार नाही [१][:

परंतु, खुल्या न्यायालयात लघुलेखकाला तोंडी मजकूर सांगून न्यायनिर्णय अधिघोषित केला असेल अशा बाबतीत, अशाप्रकारे अधिघोषित केलेल्या न्यायनिर्णयाच्या प्रतिलेखात आवश्यक त्या दुरुस्त्या केल्यानंतर न्यायाधीशाने त्यावर सही केली पाहिजे आणि ज्या तारखेला तो अधिघोषित करण्यात आला असेल ती तारीख घातली पाहिजे आणि अशाप्रकारे न्यायनिर्णयावर एकदा सही करण्यात आल्यावर कलम १५२ च्या उपबंधानुसार असेल किंवा पुनर्विलोकन करण्यात आले असेल ते खेरीज-करून, त्यात कोणताही बदल करण्यात येता किंवा त्यात भर घालण्यात येता कामा नये.]

न्यायनिर्णय स्वाक्षरित करावयाचा.

लघुवाद न्यायालयाचे न्यायनिर्णय.

४. (१) लघुवाद न्यायालयाच्या न्यायनिर्णयांमध्ये निर्णीत करावयाचे मुद्दे व त्यावरील निर्णय यांपेक्षा कोणताही अधिक मजकूर समाविष्ट असता कामा नये.

अन्य न्यायालयांचे न्यायनिर्णय.

(२) अन्य न्यायालयांच्या न्यायनिर्णयांमध्ये प्रकरणाचे संक्षिप्त परिकथन, निर्णीत करावयाचे मुद्दे, त्यांवरील निर्णय आणि अशा निर्णयांची कारणे समाविष्ट असली पाहिजेत.

न्यायालयाने प्रत्येक वादमुद्द्यावर आपला निर्णय नमूद करावयाचा.

५. ज्या दाव्यांमध्ये वादमुद्दे काढण्यात आले असतील अशा दाव्यांमध्ये, अशा कोणत्याही एका किंवा अधिक वादमुद्द्यांवरील निष्कर्ष त्या दाव्याच्या निर्णयासाठी पुरेसा नसेल तर, न्यायालयाने प्रत्येक अलग-अलग वादमुद्द्यावरील आपला निष्कर्ष किंवा निर्णय त्यामागील कारणांसह नमूद केला पाहिजे.

पक्षकारांचे प्रतिनिधित्व प्लीडरांनी केलेले नसेल तर अशा प्रकरणी अपील कोठे होऊ शकते, ह्या-संबंधीची माहिती न्यायालयाने त्या पक्षकारांना कळवणे.

[१][५क. दोन्ही पक्षकारांचे प्रतिनिधित्व प्लीडरांनी केले असेल तेवढी बाब वगळून एरव्ही, न्यायालय अपीलपात्र अशा एखाद्या प्रकरणी आपला न्यायनिर्णय अधिघोषित करील त्याबाबतीत, कोणत्या न्यायालयाकडे अपील होऊ शकते व असे अपील दाखल करण्याची मुदत मर्यादा किती, यासंबंधीची माहिती न्यायालयात हजर असणाऱ्या पक्षकारांना कळविली पाहिजे व पक्षकारांना न्यायालयाने दिलेली अशी माहिती अभिलेखात ठेवली पाहिजे.]

हुकूमनाम्यातील मजकूर.

६. (१) हुकूमनामा न्यायनिर्णयाशी जुळणारा असला पाहिजे. त्यामध्ये दाव्याचा क्रमांक, [२][पक्षकारांची नावे, त्यांची वर्णने व त्यांचे नोंदीव पत्ते] आणि हक्कमागणीचा तपशील समाविष्ट असला पाहिजे. आणि कोणत्या प्रकारचा अनुतोष दिला ते किंवा दाव्यामधील अन्य निर्णय स्पष्टपणे विनिर्दिष्ट केलेला असला पाहिजे.]

६. [(१) हुकूमानामा न्यायनिर्णयाशी जुळणारा असला पाहिजे. त्यामध्ये वादपत्र सादर केल्याचा दिनांक, दाव्याचा क्रमांक, [२][पक्षकारांची नावे, त्यांची वर्णने व त्यांचे नोंदीव पत्ते] आणि हक्क-मागणीचा तपशील असला पाहिजे आणि कोणत्या प्रकारचा अनुतोष दिला ते किंवा दाव्यामधील अन्य निर्णय स्पष्टपणे विनिर्दिष्ट केलेला असला पाहिजे.

हुकूमनाम्यातील मजकूर.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७० (तीन) द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७० (चार) द्वारे 'पक्षकारांची नावे व वर्णने' याऐवजी हा मजकूर दाखल केला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ४९ द्वारे पूर्णविरामाऐवजी विसर्ग घातला व परंतुक जादा दाखल केले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (३) द्वारे ऐवजी दाखल केला.

(२) त्याचप्रमाणे दाव्यामध्ये आलेल्या खर्चाची रक्कम व असा खर्च कोणी किंवा कोणत्या मालमत्तेमधून व कोणत्या प्रमाणात द्यावयाचा तेही हुकूमनाम्यात नमूद केले पाहिजे.

(३) एका पक्षकाराला दुसऱ्या पक्षकाराने द्यावयाच्या दावा खर्चाची रक्कम ह्या पहिल्या पक्षकारास दुसऱ्या पक्षकाराकडून देय असल्याचे कबूल करण्यात आलेल्या किंवा ठरवण्यात आलेल्या कोणत्याही रकमेमधून वळती करण्यात यावी असे न्यायालयास निदेशित करता येईल.

(२) त्याचप्रमाणे दाव्यामध्ये आलेल्या खर्चाची रक्कम व असा खर्च कोणी किंवा कोणत्या मालमत्तेमधून व कोणत्या प्रमाणात द्यावयाचा तेही हुकूमनाम्यात नमूद केले पाहिजे.

(३) एका पक्षकाराला दुसऱ्या पक्षकाराने द्यावयाची दावा खर्चाची रक्कम त्या पहिल्या पक्षकारास दुसऱ्या पक्षकाराकडून देय असल्याचे कबूल करण्यात आलेल्या किंवा ठरविण्यात आलेल्या कोणत्याही रकमेमधून वळती करण्यात यावी असे न्यायालयास निदेशित करता येईल.]

कोणकोणत्या प्रकारचा अनुतोष मंजूर करण्यात आला आहे ते न्यायनिर्णयाच्या अखेरच्या परिच्छेदामध्ये नेमक्या शब्दात निर्दिष्ट करावयाचे.

[1][६क. (१) न्यायनिर्णयाच्या अखेरच्या परिच्छेदामध्ये, अशा न्यायनिर्णयाद्वारे कोणकोणत्या प्रकारचा अनुतोष मंजूर करण्यात आला आहे ते नेमक्या शब्दांत नमूद केले पाहिजे.

(२) हुकूमनामा शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही परिस्थितीत, न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात आल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत, रीतसर तयार करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येईल; परंतु उपरोक्त कालावधीत हुकूमनामा तयार करण्यात न आल्यास, हुकूमनाम्याच्या विरुद्ध अपील करू इच्छिणाऱ्या पक्षकाराने तशी विनंती केल्यास, न्यायालयाने हुकूमनामा तयार करण्यात आला नसल्याचे प्रमाणित केले पाहिजे आणि विलंबाबद्दलची कारणे त्या प्रमाणपत्रात नमूद केली पाहिजेत आणि त्यानंतर,—

(क) हुकूमनाम्याची प्रत दाखल न करता, हुकूमनाम्याच्या विरुद्ध अपील सादर करता येईल आणि अशा प्रकरणी ४१ व्या आदेशामधील नियम १ च्या प्रयोजनार्थ, न्यायनिर्णयाचा अखेरचा परिच्छेद हा हुकूमनामा असल्याचे समजण्यात येईल, आणि

(ख) हुकूमनामा रीतसर तयार करण्यात येत नाही तोपर्यंत, न्यायनिर्णयाचा अखेरचा परिच्छेदच अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ, हुकूमनामा असल्याचे मानण्यात येईल आणि त्यामध्ये हितसंबंध असलेल्या पक्षकारास संपूर्ण न्यायनिर्णयाच्या प्रतीकरिता अर्ज न करता केवळ त्या परिच्छेदाच्या प्रतीकरिता अर्ज करण्याचा हक्क असेल, पण एकदा हुकूमनामा तयार करण्यात आला की, न्यायनिर्णयाच्या अखेरच्या परिच्छेदास, अंमलबजावणीच्या किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनार्थ, हुकूमनामा समजण्याचे बंद होईल :

परंतु, न्यायनिर्णयाच्या केवळ अखेरच्या परिच्छेदाची प्रत मिळवण्यासाठी अर्ज करण्यात आला असल्यास, अशा प्रतीमध्ये दाव्यामधील सर्व पक्षकारांची नावे व पत्ते निर्दिष्ट केले पाहिजेत.

न्यायनिर्णयाच्या टंकलिखित प्रती केव्हा उपलब्ध करावयाच्या.

६ख. न्यायनिर्णय टंकलिखित असल्यास, टंकलिखित न्यायनिर्णयाच्या प्रती उपलब्ध करून देणे शक्य असेल तेव्हा, न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात आल्यानंतर, अशा प्रतींसाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराने उच्च न्यायालयाकडून करण्यात आलेल्या नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले असेल,असे शुल्क भरल्यानंतर, ताबडतोब पक्षकारांना उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.]

हुकूमनाम्याची तारीख.

७. न्यायनिर्णय ज्या तारखेस अधिघोषित करण्यात आला असेल ती तारीख हुकूमनाम्यात असली पाहिजे आणि हुकूमनामा न्यायनिर्णयानुसार तयार केलेला आहे, अशी न्यायाधीशाची खात्री पटल्यास, त्याने हुकूमनाम्यावर सही केली पाहिजे.

[1][परंतु असे की, मुंबई शहर दिवाणी न्यायालयात कार्यवाही केलेली असेल तर, हुकूमनाम्यावर, न्यायनिर्णय ज्या तारखेला अधिघोषित करण्यात आला असेल ती तारीख असली पाहिजे आणि प्रबंधकाच्या कार्यालयात त्याची स्वच्छ प्रत काढण्यात आली पाहिजे आणि त्याने त्यावर सही केली पाहिजे आणि न्यायालयाची मुद्रा लावली पाहिजे.]

हुकूमनाम्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी न्यायाधीशाचे पद रिक्त केले असल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.

८. न्यायनिर्णय अधिघोषित केल्यानंतर पण हुकूमनाम्यावर सही न करता, न्यायाधीशाने पद रिक्त केल्यास अशा न्यायनिर्णयानुसार रीतसर तयार केलेल्या हुकूमनाम्यावर त्याच्या उत्तराधिकाऱ्यास सही करता येईल किंवा, त्या न्यायालयाचे अस्तित्व संपुष्टात आल्यास, ते ज्या न्यायालयास दुय्यम असेल अशा कोणत्याही न्यायालयाच्या न्यायाधीशास त्यावर सही करता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७० (पाच) द्वारे समाविष्ट केला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (३) द्वारे भर घातली.

स्थावर मालमत्ता परत मिळवण्यासाठी हुकूमनामा.

९. स्थावर मालमत्ता ही दाव्याची विषयवस्तू असल्यास, त्या मालमत्तेची ओळख पटण्यास पुरेसे असे वर्णन हुकूमनाम्यामध्ये समाविष्ट असले पाहिजे, आणि अशी मालमत्ता चतुःसीमांच्या द्वारे किंवा जमाबंदीच्या अथवा जमीनमोजणीच्या दप्तरातील क्रमांकाद्वारे ओळखता येणे शक्य असेल तर, हुकूमनाम्यामध्ये अशा सीमा किंवा क्रमांक विनिर्दिष्ट केले पाहिजेत.

जंगम मालमत्ता सुपूर्द करण्यासाठी हुकूमनामा.

१०. दावा जंगम मालमत्तेसाठी लावलेला असून, अशी मालमत्ता सुपूर्द करण्यासाठी हुकूमनामा काढण्यात आला असल्यास, अशी मालमत्ता सुपूर्द करण्यात आली नाही तर, त्याला पर्याय म्हणून द्यावयाची रक्कमही हुकूमनाम्यामध्ये नमूद केली पाहिजे.

हुकूमनाम्याद्वारे रक्कम हप्त्याहप्त्यांनी देण्याचा निदेश देता येईल.

११. (१) हुकूमनामा पैसे देण्यासाठी असेल त्याबाबतीत, आणि तेथवर, न्यायालयास कोणत्याही पुरेशा कारणास्तव, [१][अखेरच्या सुनावणीच्या वेळी पक्षकारांपैकी जे जातीने किंवा प्लीडरमार्फत उपस्थित राहिले असतील अशांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, न्यायनिर्णयापूर्वी, हुकूमनाम्यामध्ये असा आदेश अंतर्भूत करता येईल की,] हुकूमनाम्याद्वारे देवविलेल्या रकमेचे प्रदान लांबणीवर टाकण्यात यावे किंवा व्याजासहित किंवा बिनव्याजी हप्त्याहप्त्यांनी देण्यात यावे. मग ज्या संविदेअन्वये पैसे प्रदेय असतील त्या संविदेत काहीही अंतर्भूत असेल तरी हरकत नाही.

हप्त्याहप्त्यांनी रक्कम देण्याचा हुकूमनामा आल्यानंतरचा आदेश.

(२) असा कोणताही हुकूमनामा काढल्यानंतर न्यायालयास, न्यायनिर्णीत ऋणकोच्या अर्जावरून व हुकूमनामाधारकाच्या संमतीने, असा आदेश देता येईल की, हुकूमनाम्याद्वारे देवविलेल्या रकमेचे प्रदान लांबणीवर टाकण्यात यावे किंवा व्याज देणे, न्यायनिर्णीत ऋणकोची मालमत्ता जप्त करणे किंवा त्याच्याकडून प्रतिभूती घेणे यासंबंधी किंवा अन्यथा न्यायालयास योग्य वाटतील अशा अटींवर प्रदान हप्त्याहप्त्यांनी करण्यात यावे.

मालमत्तेचा कब्जा व दरम्यानचे नफे यांसाठी हुकूमनामा.

१२. (१) स्थावर मालमत्तेचा कब्जा परत मिळविण्यासाठी आणि भाडे किंवा दरम्यानचे नफे यांसाठी दावा असल्यास, न्यायालयास,—

(क) मालमत्तेच्या कब्जासाठी;

[२][(ख) दावा दाखल करण्यापूर्वीच्या काळात त्या मालमत्तेवर प्रोद्भूत झालेल्या भाडयाकरिता अथवा अशा भाडयाबद्दल चौकशी करण्याचा निदेश देणारा,

(खक) दरम्यानच्या नफ्यांसाठी अथवा अशा दरम्यानच्या नफ्यांबद्दल चौकशी करण्याचा निदेश देणारा,]

(ग) दावा दाखल केल्यापासून,—

(एक) हुकूमनामाधारकास कब्जा सुपूर्द केला जाणे,

(दोन) न्यायनिर्णीत ऋणकोने न्यायालयामार्फत हुकूमनामाधारकास नोटीस देऊन कब्जा सोडून देणे, किंवा

(तीन) हुकूमनाम्याच्या तारखेपासून तीन वर्षे समाप्त होणे,

यापैकी सर्वात अगोदर घडणारी घटना घडेपर्यंतचे भाडे किंवा दरम्यानचे नफे यांच्यासंबंधी चौकशीचा निदेश देणारा,

हुकूमनामा काढता येईल.

(२) खंड (ख) किंवा खंड (ग) खाली चौकशी करण्याचा निदेश देण्यात आला असल्यास, भाडयाच्या किंवा दरम्यानच्या नफ्याच्या संबंधातील अंतिम हुकूमनामा अशा चौकशीच्या निष्कर्षानुसार काढला पाहिजे.

[१][१२. (१) स्थावर मालमत्तेचा कब्जा परत मिळविण्यासाठी आणि भाडे किंवा दरम्यानचे नफे यासाठी दावा असल्यास, न्यायालयास,— **मालमत्तेचा कब्जा व दरम्यानचे नफे यांसाठी हुकूमनामा.**

(क) मालमत्तेच्या कब्जासाठी;

(ख) दावा दाखल करण्यापूर्वीच्या काळात त्या मालमत्तेवर प्रोद्भूत झालेल्या अशा भाडयाकरिता किंवा दरम्यानच्या नफ्यांकरिता अथवा अशा भाडयाबद्दल किंवा दरम्यानच्या नफ्यांबद्दल चौकशी करण्याचा निदेश देणारा,

(ग) दावा दाखल केल्यापासून,—

(एक) हुकूमनामाधारकास कब्जा सुपूर्द केला जाईपर्यंतचे,

(दोन) न्यायनिर्णीत ऋणकोने न्यायालयामार्फत हुकूमनामाधारकास नोटीस देऊन कब्जा सोडून देईपर्यंतचे,

भाडे किंवा दरम्यानचे नफे यांच्यासंबंधी चौकशीचा निदेश देणारा,

हुकूमनामा काढता येईल.

(२) पोटकलम (१) चा खंड (ख) किंवा खंड (ग) खाली चौकशी करण्याचा निदेश देण्यात आला, असल्यास भाडयाच्या किंवा दरम्यानच्या नफ्याच्या संबंधातील अंतिम हुकूमनामा अशा चौकशीच्या निष्कर्षानुसार काढला पाहिजे.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७० (सहा) द्वारे 'न्यायनिर्णय देताना असा आदेश देता येईल की' या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७० (सात) द्वारे बदली दाखल केला.

१. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (४) द्वारे ऐवजी दाखल केले.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या किंवा भाडेपट्टयाच्या संविदेचे विनिर्दिष्ट पालन होण्याकरिता हुकूमनामा.

[१] [१२क. स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या किंवा भाडेपट्टयाच्या संविदेचे विनिर्दिष्ट पालन करण्यासाठी काढण्यात आलेल्या हुकूमनाम्यात, खरेदी रक्कम किंवा अन्य रक्कम खरेदीदाराने अथवा पट्टेदाराने द्यावी असा आदेश देण्यात आला असल्यास, रक्कम कोणत्या कालावधीत देण्यात यावी ते त्यात विनिर्दिष्ट केले पाहिजे.]

प्रशासनासंबंधीच्या दाव्यामधील हुकूमनामा.

१३. (१) एखादया मालमत्तेचा हिशेब मिळण्यासाठी आणि तिचे न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये प्रशासन होण्यासाठी दावा दाखल करण्यात आला असल्यास, अंतिम हुकूमनामा काढण्यापूर्वी न्यायालयाने, असे हिशेब देण्यात यावेत व अशा चौकश्या केल्या जाव्यात असे आदेश देणारा आणि त्यास योग्य वाटतील असे अन्य निदेश देणारा प्रारंभिक हुकूमनामा काढला पाहिजे.

(२) एखादया मयत व्यक्तीच्या मालमत्तेचे न्यायालयाकडून प्रशासन होत असताना, जर अशी मालमत्ता, त्याची ऋणे व दायित्वे यांची संपूर्णत: फेड करण्यास अपुरी असल्याचे शाबीत झाले तर, ज्या न्यायालयात प्रशासन दावा प्रलंबित असेल त्या न्यायालयाच्या स्थानिक मर्यादांमध्ये, दिवाळखोर म्हणून न्यायनिर्णीत झालेल्या किंवा जाहीर करण्यात आलेल्या व्यक्तींच्या संपदासंबंधी त्या त्या काळी जे नियम अंमलात असतील तेच नियम प्रतिभूत व अप्रतिभूत धनकोने त्यांच्या अधिकारांसंबंधात आणि शाबीत होऊ शकणारी ऋणे व दायित्वे त्यांच्या संबंधात व अनुक्रमे वर्षासने व भावी आणि समाश्रित दायित्वे यांच्या संबंधात पाळले पाहिजेत, आणि अशा कोणत्याही बाबतीत अशा मालमत्तेमधून प्रदान केले जाण्यास पात्र असतील अशा सर्व व्यक्ती प्रारंभिक हुकूमनाम्याखाली येऊ शकतील, व या संहितेच्या आधारे त्या व्यक्तींना जसजसे हक्क असतील त्याप्रमाणे त्या व्यक्तींना अशा मालमत्तेविरुद्ध त्या त्या हक्कमागण्या करता येतील.

अग्रक्रयाच्या दाव्यातील हुकूमनामा.

१४. (१) एखादया विशिष्ट मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत, अग्रक्रयाची हक्कमागणी न्यायालयाने हुकूमनाम्याद्वारे मान्य केलेली असेल व खरेदी रक्कम न्यायालयात भरलेली नसेल तर हुकूमनाम्यामध्ये,—

(क) कोणत्या दिवशी किंवा दिवसापूर्वी खरेदी रक्कम अशाप्रकारे भरावी ते विनिर्दिष्ट केले पाहिजे, आणि

(ख) वादीविरुद्ध हुकूमनाम्यात देवघिलेल्या खर्चासकट (तसा खर्च असल्यास), अशी खरेदी रक्कम खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दिवशी किंवा तत्पूर्वी न्यायालयात भरण्यात आल्यावर प्रतिवादीने मालमत्तेचा कब्जा वादीला द्यावा व त्याला त्या मालमत्तेवरील स्वामित्वाधिकार अशा प्रदानाच्या तारखेपासून उपार्जित झाला असल्याचे मानण्यात येईल, मात्र जर खरेदी रक्कम व खर्च (असल्यास) अशाप्रकारे देण्यात आला नाही तर, दावा खर्चासह फेटाळण्यात यावा, असा निदेश दिला पाहिजे.

१४. (१) एखादया विशिष्ट मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत, अग्रक्रयाची हक्कमागणी न्यायालयाने हुकूमनाम्याद्वारे मान्य केलेली असेल व खरेदी रक्कम न्यायालयात भरलेली नसेल तर, हुकूमनाम्यामध्ये,—

अग्रक्रयाच्या दाव्यातील हुकूमनामा.

(क) कोणत्या दिवशी किंवा दिवसापूर्वी खरेदी रक्कम अशाप्रकारे भरावी ते निर्दिष्ट केले पाहिजे, आणि

(ख) वादीविरुद्ध हुकूमनाम्यात देवघिलेल्या खर्चासकट (तसा खर्च असल्यास) अशी खरेदी रक्कम खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या दिवशी किंवा तत्पूर्वी न्यायालयात भरण्यात आल्यावर प्रतिवादीने मालमत्तेचा कब्जा वादीला द्यावा व त्याला त्या मालमत्तेवरील स्वामित्वाधिकार अशा प्रदानाच्या तारखेपासून उपार्जित झाला असल्याचे मानण्यात येईल, मात्र जर खरेदी रक्कम व खर्च (असल्यास) अशाप्रकारे देण्यात आला नाही तर, दावा खर्चासह फेटाळण्यात यावा असा निदेश दिला पाहिजे [१] :

परंतु असे की, मालमत्तेवर पीक उभे असेल तर, पिकाची कापणी करण्यात येईपर्यंत वादीला मालमत्तेचा कब्जा देण्यात येणार नाही. तथापि,त्याने न्यायालयात भरलेल्या रकमेवर, खरेदीची रक्कम आणि खर्च (असल्यास) याची रक्कम भरल्याची तारीख आणि प्रतिवादीकडून त्याला ज्या तारखेला कब्जा देण्यात येईल ती तारीख यांमधील कालावधीच्या संबंधात, न्यायालयाच्या स्वविवेकानुसार प्रतिवर्षी ६ टक्क्यांपेक्षा अधिक नाही इतक्या दराने सरळ व्याज मिळण्यास वादी हक्कदार असेल.]

---

१. सन १९७६ च्या अधिनियम १०४ च्या कलम ७० (आठ) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (५) द्वारे पूर्ण विरामाऐवजी विसर्ग व परंतुक समाविष्ट केले.

(२) न्यायालयाने अग्रक्रयासंबंधी प्रतिस्पर्धी हक्कमागण्यांचा अभिनिर्णय केला असेल, तेव्हा हुकूमनाम्याद्वारे असा निदेश दिला पाहिजे की,—

(क) हुकूमनाम्यामध्ये मान्य केलेल्या हक्कमागण्या समान दर्जाच्या असतील तर आणि तेथवर, प्रत्येक अग्रक्रयाधिकाऱ्याची जी हक्कमागणी पोटनियम (१) च्या उपबंधांनुसार असेल ती, मालमत्तेपैकी प्रमाणशीर हिश्शाच्या संबंधात अंमलात येईल—यामध्ये ज्या उक्त उपबंधाचे पालन करण्यात कसूर करणाऱ्या एखाद्या अग्रक्रयाधिकाऱ्याने अशी कसूर केली नसती तर, ज्या प्रमाणशीर हिश्शाच्या संबंधात त्याची हक्कमागणी अंमलात आली असती तोही हिस्सा समाविष्ट आहे; आणि

(ख) हुकूमनाम्यामध्ये मान्य केलेल्या हक्कमागण्या वेगवेगळ्या दर्जाच्या असतील तर आणि तेथवर, वरिष्ठ अग्रक्रयाधिकाऱ्याकडून उक्त उपबंधांचे पालन करण्यात कसूर झाली नाही तर व तोपर्यंत, कनिष्ठ अग्रक्रयाधिकाऱ्याची हक्कमागणी अंमलात येणार नाही.

(२) न्यायालयाने अग्रक्रयासंबंधी प्रतिस्पर्धी हक्कमागण्यांचा अभिनिर्णय केला असेल, तेव्हा हुकूमनाम्याद्वारे असा निदेश दिला पाहिजे की,—

(क) हुकूमनाम्यामध्ये मान्य केलेल्या हक्कमागण्या समान दर्जाच्या असतील तर आणि तेथवर, प्रत्येक अग्रक्रयाधिकाऱ्याची जी हक्कमागणी पोटनियम (१) च्या उपबंधानुरूप असेल ती मालमत्तेपैकी प्रमाणशीर हिश्शाच्या संबंधात अंमलात येईल—यामध्ये ज्या उक्त उपबंधांचे पालन करण्यात कसूर करणाऱ्या एखाद्या अग्रक्रयाधिकाऱ्याने, अशी कसूर केली नसती तर, ज्या प्रमाणशीर हिश्शाच्या संबंधात त्याची हक्कमागणी अंमलात आली असती तोही हिस्सा समाविष्ट आहे; आणि

(ख) हुकूमनाम्यामध्ये मान्य केलेल्या हक्कमागण्या वेगवेगळ्या दर्जाच्या असतील तर आणि तेथवर, वरिष्ठ अग्रक्रयाधिकाऱ्याकडून उक्त उपबंधांचे पालन करण्यात कसूर झाली नाहीतर व तोपर्यंत कनिष्ठ अग्रक्रयाधिकाऱ्याची हक्कमागणी अंमलात येणार नाही.

भागीदारीच्या विसर्जनासाठी दाखल केलेल्या दाव्यामधील हुकूमनामा.

१५. भागीदारीच्या विसर्जनासाठी, किंवा भागीदारीचे हिशेब घेण्यासाठी दावा दाखल केला असल्यास न्यायालयास, अंतिम हुकूमनामा काढण्यापूर्वी, पक्षकारांचे प्रमाणशीर हिस्से जाहीर करणारा, भागीदारी कोणत्या दिवशी विसर्जित होईल किंवा विसर्जित झाल्याचे समजण्यात येईल तो दिवस निश्चित करणारा, आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे असे हिशेब घेण्याचा आणि अशा अन्य कृती करण्याचा निदेश देणारा प्रारंभिक हुकूमनामा काढता येईल.

प्रकर्ता व अभिकर्ता यांच्यामधील हिशेबासंबंधीच्या दाव्यातील हुकूमनामा.

१६. प्रकर्ता व त्याचा अभिकर्ता यांच्यामधील पैशांच्या संव्यवहाराच्या हिशेबासंबंधीच्या दाव्यामध्ये व यात यापूर्वी त्यासंबंधी उपबंध केलेला नाही अशा अन्य कोणत्याही दाव्यामध्ये, कोणत्याही पक्षकारास किंवा ज्याच्याकडून किती रक्कम देय आहे हे निश्चित करण्यासाठी हिशेब मागवणे किंवा घेणे आवश्यक असेल तेव्हा, अंतिम हुकूमनामा काढण्यापूर्वी न्यायालयाने त्यास योग्य वाटेल असे हिशेब देण्याचा निदेश देणारा प्रारंभिक हुकूमनामा काढला पाहिजे.

हिशेबाच्या संबंधातील विशेष निदेश.

१७. न्यायालयास हिशेब देण्याचा निदेश देण्याच्या हुकूमनाम्याद्वारे किंवा त्यानंतरच्या कोणत्याही आदेशाद्वारे हिशेब कशा पद्धतीने द्यावयाचे किंवा प्रमाणित करावयाचे त्या पद्धतीसंबंधी विशेष निदेश देता येईल आणि विशेषत: हिशेब देताना ज्या हिशेबवह्यांमध्ये वादग्रस्त हिशेब ठेवण्यात आले असतील त्या वह्या त्यामध्ये समाविष्ट असलेल्या बाबींच्या सत्यतेबद्दलचा प्रथमदर्शनी पुरावा समजण्यात यावा व त्यामध्ये हितसंबंध असणाऱ्या पक्षकारांना जसा सल्ला मिळेल, तशी त्यास हरकत घेण्याची मोकळीक असावी असा निदेश देता येईल.

मालमत्तेच्या विभाजनासाठी किंवा तीमधील एखाद्या हिश्शाच्या अलग कब्जासाठी दाखल केलेल्या दाव्यामधील हुकूमनामा.

१८. न्यायालयाने मालमत्तेच्या विभाजनासाठी किंवा तीमधील एखाद्या हिश्शाच्या अलग कब्जासाठी हुकूमनामा काढल्यास,—

(१) तो हुकूमनामा सरकारला महसूल देण्यास पात्र म्हणून निर्धारण केलेल्या संपदेशी संबंधित असेल तर आणि तेथवर, मालमत्तेमध्ये हितसंबंध असणाऱ्या निरनिराळ्या पक्षकारांचे हक्क हुकूमनाम्याद्वारे घोषित केले पाहिजेत. परंतु, असे विभाजन किंवा अलगीकरण जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा त्याने याबाबतीत प्रतिनियुक्त केलेल्या कोणत्याही दुय्यम राजपत्रित अधिकाऱ्याकडून अशा घोषणेनुसार व कलम ५४ च्या उपबंधांनुसार करण्यात यावे असे याद्वारे निदेशित केले पाहिजे.

(२) असा हुकूमनामा अन्य कोणत्याही स्थावर मालमत्तेशी किंवा जंगम मालमत्तेशी संबंधित असेल तर आणि तेथवर, न्यायालयास अधिक चौकशी कैल्याखेरीज विभाजन किंवा अलगीकरण सोयीस्करपणे करता येणे शक्य नसल्यास त्याबाबतीत, मालमत्तेमध्ये हितसंबंध असलेल्या निरनिराळ्या पक्षकारांचे अधिकार घोषित करणारा व आवश्यक असतील असे आणखी निदेश देणारा प्रारंभिक हुकूमनामा काढता येईल.

वजावटीला किंवा प्रतिहक्कमागणीला परवानगी देण्यात आली असेल याबाबतीतील हुकूमनामा.

१९. (१) वादीच्या हक्कमागणीच्या विरुद्ध प्रतिवादीस वजावटीची [१][किंवा प्रतिहक्कमागणीची] परवानगी देण्यात आली असेल त्याबाबतीत, वादीला किती रक्कम येणे आहे व प्रतिवादीला किती रक्कम देणे आहे ते हुकूमनाम्यात नमूद केले पाहिजे व कोणत्याही पक्षकारास देय असल्याचे दिसत असेल अशा कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी तो हुकूमनामा असेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७० (नऊ) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

वजावट किंवा प्रतिहक्कमागणी याच्याशी संबंधित हुकूमनाम्याविरुद्ध अपील.

(२) ज्या दाव्यांमध्ये वजावटीची [१][किंवा प्रतिहक्कमागणीची] मागणी केलेली असेल अशा दाव्यांमध्ये काढलेला कोणताही हुकूमनामा अपिलाच्या संबंधात, जर कोणत्याही वजावटीची [१][किंवा प्रतिहक्कमागणीची] मागणी केली नसती तर, तो ज्या उपबंधांस अधीन झाला असता त्याच उपबंधांस अधीन असेल.

(३) आठव्या आदेशातील नियम ६ अन्वये वजावट अनुज्ञेय असली किंवा नसली तरी, या नियमांचे उपबंध लागू होतील.

न्यायनिर्णय व हुकूमनामा यांच्या प्रमाणित प्रती पुरविणे.

२०. पक्षकारांनी न्यायालयास अर्ज केल्यास व खर्च दिल्यास त्यांना न्यायनिर्णयाच्या व हुकूमनाम्याच्या प्रमाणित प्रती पुरविण्यात येतील.

२०. [१][(१) पक्षकारांनी न्यायालयास अर्ज केल्यास व खर्च दिल्यास त्यांना न्यायनिर्णयाच्या व हुकूमनाम्याच्या प्रमाणित प्रती पुरविण्यात येतील.

(२) अर्जदाराला स्वत: किंवा त्याच्या मान्यताप्राप्त अभिकर्त्यामार्फत किंवा त्याच्या प्लीडरमार्फत अर्ज करता येईल किंवा तो डाकेने पाठवता येईल. असा अर्ज डाकेने पाठविण्यात आला असेल अशाबाबतीत, तो पोचपावतीसाठी टपालखर्च अगोदर भरून पाठविण्यात आला पाहिजे. अर्ज डाकेने पाठविण्यात आला असेल अशा बाबतीत, जर तो अर्ज नोंदणीकृत डाकेने पाठविण्यात आला असेल तर, तो पाठविण्यासाठी पोस्टात जमा केल्याची तारीख ही अर्ज केल्याची तारीख मानण्यात येईल. मात्र नोंदणीकृत डाकेखेरीज अन्य प्रकारे तो पाठविण्यात आला असल्यास, न्यायालयाच्या कार्यालयात तो पोहोचल्याची तारीख हीच अर्ज केल्याची तारीख मानण्यात येईल.]

न्यायनिर्णय व हुकूमनामा यांच्या प्रमाणित प्रती पुरविणे.

[१][आदेश विसावा–क

खर्च

विदक्षित बाबींच्या संबंधातील उपबंध.

१. खर्चासंबंधी या संहितेत असलेल्या उपबंधांच्या व्यापकतेला बाध न येता, न्यायालय पुढील बाबींच्या संबंधात खर्च देववू शकेल :—

(क) दावा दाखल करण्यापूर्वी कायद्याने जी नोटीस देणे आवश्यक आहे अशी कोणतीही नोटीस देण्यासाठी आलेला खर्च;

(ख) कायद्याने देणे आवश्यक नसेल तरी दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने दावा दाखल करण्यापूर्वी दुसऱ्या कोणत्याही पक्षकाराला दिलेली असेल अशी कोणतीही नोटीस देण्यासाठी आलेला खर्च;

(ग) कोणत्याही पक्षकाराने दाखल केलेल्या वादकथनांचे टंकलेखन, लेखन किंवा मुद्रण यासाठी आलेला खर्च;

(घ) दाव्याच्या प्रयोजनार्थ, न्यायालयाच्या दप्तराची पाहणी करण्यासाठी पक्षकाराने दिलेला आकार;

(ङ) साक्षीदारांना न्यायालयामार्फत बोलावण्यात आलेले नसले तरी, त्यांना हजर करण्यासाठी पक्षकाराला आलेला खर्च; आणि

(च) अपिलांच्या बाबतीत अपील अर्जासोबत ज्यांच्या प्रती दाखल करणे आवश्यक असेल त्या न्यायनिर्णयाच्या व हुकूमनाम्याच्या कोणत्याही प्रती मिळवण्यासाठी पक्षकाराला भरावा लागलेला आकार.

उच्च न्यायालयाने केलेल्या नियमांच्या अनुसार खर्च देववणे.

२. या नियमाखाली देवविण्यात यावयाचा खर्च उच्च न्यायालय त्याबाबतीत करील अशा नियमांच्या अनुसार असेल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७० (नऊ) अन्वये समाविष्ट केला.

२. वरील अधिनियमाचा कलम ७१ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (६) द्वारे ऐवजी दाखल केले.

आदेश एकविसावा

हुकूमनामे व आदेश यांची अंमलबजावणी

हुकूमनाम्याखालील प्रदान

हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली पैसे देण्याच्या पद्धती.

[१][१. (१) हुकूमनाम्याखाली द्यावयाचे सर्व पैसे पुढीलप्रमाणे द्यावे लागतील, ते असे :—

(क) हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणे हे ज्या न्यायालयाचे कर्तव्य असेल त्या न्यायालयात जमा करून, किंवा पोस्टामार्फत मनिऑर्डरद्वारे किंवा बँकेमार्फत त्या न्यायालयाकडे पाठवून; अथवा

(ख) न्यायालयाच्या मार्फतीशिवाय, पोस्टामार्फत मनिऑर्डरद्वारे किंवा बँकेमार्फत किंवा जेणेकरून प्रदान केल्याचा लेखी पुरावा मिळू शकेल अशा अन्य कोणत्याही पद्धतीने हुकूमनामाधारकाकडे पोचते करून; अथवा

(ग) ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला असेल ते निर्देशित करील त्यानुसार; अन्यथा

(२) पोटनियम (१) मधील खंड (क) किंवा खंड (ग) अन्वये कोणतेही प्रदान करण्यात आले असेल तेव्हा, निर्णीत ऋणको हुकूमनामाधारकाला न्यायालयामार्फत अगर पोचदेय नोंदणी डाकेने थट त्याला त्यासंबंधी नोटीस देईल.

(३) जेव्हा पोटनियम (१) च्या खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये पोस्टामार्फत मनिऑर्डरद्वारे किंवा बँकेमार्फत रक्कम देण्यात आली असेल तेव्हा, मनीऑर्डरमध्ये किंवा प्रकरणपरत्वे, बँकेमार्फत केलेल्या प्रदानामध्ये पुढील तपशील बिनचूकपणे देण्यात आला पाहिजे, तो असा :—

(क) मूळ दाव्याचा क्रमांक;

(ख) पक्षकारांची नावे किंवा, प्रकरणपरत्वे जेव्हा दोनपेक्षा अधिक वादी अथवा, दोनपेक्षा अधिक प्रतिवादी असतील तेव्हा पहिल्या दोन वादींची आणि पहिल्या दोन प्रतिवादींची नावे;

(ग) प्रेषित रक्कम कशी समायोजित करावयाची आहे ते, म्हणजे मुद्दलापोटी, व्याजापोटी की खर्चापोटी.

(घ) ज्या न्यायालयात असे प्रकरण प्रलंबित असेल, त्या न्यायालयाच्या अंमलबजावणीच्या प्रकरणाचा क्रमांक; आणि

(ङ) प्रदानकर्त्याचे नाव व पत्ता.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (एक) द्वारे घालण्यात आले.

हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली पैसे देण्याच्या पद्धती.

[१][१. (१) हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली द्यावयाचे सर्व पैसे पुढीलप्रमाणे द्यावे लागतील, ते असे :—

(क) हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करणे हे, ज्या न्यायालयाचे कर्तव्य असेल, त्या न्यायालयात जमा करून किंवा पोस्टामार्फत मनिऑर्डरद्वारे पाठवून; किंवा

(ख) न्यायालयाच्या मार्फतीशिवाय, हुकूमनामाधारकाकडे पोचते करून; किंवा

(ग) ज्या न्यायालयाने हुकूमनामा किंवा आदेश काढला आहे, ते निर्देशित करील अशा अन्य कोणत्याही प्रकारे.

(२) जेव्हा पोटनियम (१) च्या खंड (क) खाली कोणतेही प्रदान करण्यात आले असेल तेव्हा, त्याबाबतची नोटीस, निर्णीत ऋणको, हुकूमनामाधारकाला, एकतर न्यायालयामार्फत किंवा हुकूमनामाधारकाच्या नोंदीव पत्त्यावर नोंदणीकृत डाकेने थेट पाठवील आणि अशा नोटिशीच्या शाबितीनंतर अशाप्रकारे जमा किंवा प्रदान करण्यात आलेल्या हुकूमनाम्याच्या रकमेवर, कोणतेही व्याज देय असल्यास, ते अशी नोटीस बजावल्याच्या तारखेपासून देय होण्याचे बंद होईल.]

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६ द्वारे दाखल करण्यात आले.

(४) पोटनियम (१) च्या खंड (क्) किंवा खंड (ग्) अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही रकमेवर कोणतेही व्याज देय असल्यास ते, पोटनियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या नोटिशीच्या बजावणीच्या तारखेपासून देय होण्याचे बंद होईल.

(५) पोटनियम (१) च्या खंड (ख्) अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही रकमेवर कोणतेही व्याज देय असल्यास ते अशा प्रदानाच्या तारखेपासून देय होण्याचे बंद होईल :

परंतु, हुकूमनामाधारक पोस्टामार्फत मनि-ऑर्डरने किंवा बँकेमार्फत केलेले प्रदान स्वीकारण्यास नकार देईल तेव्हा, ज्या तारखेस त्याला रक्कम देऊ करण्यात आली असेल, त्या तारखेपासून व्याज देय होण्याचे बंद होईल, अथवा तो पोस्टामार्फत मनि-ऑर्डरने किंवा बँकेमार्फत केलेले प्रदान स्वीकारण्याची टाळाटाळ करील तेव्हा, डाक प्राधिकरणाच्या किंवा, प्रकरणपरत्वे बँकेच्या कामकाजाच्या सामान्य ओघात, त्याला ज्या तारखेस ती रक्कम देण्यात आली असती, त्या तारखेपासून व्याज देय होण्याचे बंद होईल.]

न्यायालयाच्या मार्फतीशिवाय हुकूमनामाधारकास प्रदान.

२. (१) कोणत्याही प्रकारच्या हुकूमनाम्या-अन्वये प्रदेय असलेल्या कोणत्याही पैशांचे प्रदान न्यायालयाच्या मार्फतीशिवाय करण्यात आले असेल तर [१][अथवा कोणत्याही प्रकारचा हुकूमनामा हुकूम-नामाधारकाचे समाधान होईल अशा अन्य प्रकारे संपूर्णत: किंवा अंशत: समायोजित केला] तर, हुकूम-नामाधारकालाच असे प्रदान किंवा समायोजन झाल्याचे वृत्त, हुकूमनाम्याची अंमलबजावणी कर-ण्याचे कर्तव्य ज्या न्यायालयाचे असेल त्या न्यायालया-कडे प्रमाणित करावे लागेल, आणि न्यायालय त्याप्रमाणे त्याची नोंद करील.

न्यायालयाच्या मार्फतीशिवाय हुकूमनामाधारकास प्रदान.

२. (१) कोणत्याही प्रकारच्या हुकूमनाम्या-अन्वये प्रदेय असलेल्या कोणत्याही पैशांचे प्रदान न्यायालयाच्या मार्फतीशिवाय करण्यात आले असेल तर अथवा कोणत्याही प्रकारचा हुकूमनामा हुकूम-नामाधारकाचे समाधान होईल अशा अन्य प्रकारे संपूर्णत: किंवा अंशत: समायोजित केला तर, हुकूम-नामाधारकालाच असे प्रदान किंवा समायोजन झाल्याचे वृत्त, हुकूमनाम्याची अंमलबजावणी कर-ण्याचे कर्तव्य ज्या न्यायालयाचे असेल त्या न्यायालया-कडे प्रमाणित करावे लागेल, आणि न्यायालय त्याप्रमाणे त्याची नोंद करील.

(२) न्यायनिर्णीत ऋणको किंवा [२][जी व्यक्ती न्यायनिर्णीत ऋणकोचा जामीनदार असेल ती व्यक्ती] सुद्धा असे प्रदान किंवा समायोजन झाल्याचे वृत्त न्यायालयाला कळवू शकेल, आणि त्या हुकूम-नामाधारकाला, असे प्रदान किंवा समायोजन हे प्रमाणित केलेले आहे अशी नोंद का करू नये याबद्दल न्यायालय निश्चित करील त्या दिवशी कारण दाखवा नोटीस देण्यात यावी असा न्यायालयाकडे अर्ज करू शकेल; आणि अशी नोटीस बजावण्यात आल्यानंतर जर, असे प्रदान किंवा समायोजन हे प्रमाणित केलेले आहे अशी नोंद का करू नये, याबाबत हुकूमनामाधारक कारण दाखविण्यास चुकला तर, न्यायालय त्याची त्याप्रमाणेच नोंद घेईल.

[१][(२) न्यायनिर्णीत ऋणको किंवा जी व्यक्ती न्यायनिर्णीत ऋणकोचा जामीनदार असेल ती व्यक्ती सुद्धा असे प्रदान किंवा समायोजन झाल्याचे वृत्त एक लेखी आवेदन पत्र आणि त्याच्या पुष्टयर्थ शपथ-पत्र पाठवून न्यायालयाला कळवू शकेल, आणि त्या हुकूमनामाधारकाला, असे प्रदान किंवा समायोजन हे प्रमाणित केलेले आहे, अशी नोंद का करू नये, याबद्दल न्यायालय निश्चित करील त्या दिवशी कारण दाखवा नोटीस देण्यात यावी असा न्यायालयाकडे अर्ज करू शकेल; आणि अशी नोटीस बजावण्यात आल्या-नंतर जर, असे प्रदान किंवा समायोजन हे प्रमाणित केलेले आहे अशी नोंद का करू नये याबाबत हुकूम-नामाधारक कारण दाखविण्यास चुकला तर, न्यायालय त्याची त्याप्रमाणेच नोंद घेईल.]

[१][(२क) (क्) प्रदान, नियम १ मध्ये उपबंधित रीतीने करण्यात आले आहे; किंवा

(ख्) प्रदान किंवा समायोजन, कागदोपत्री पुराव्याने शाबीत करण्यात आले आहे, किंवा

(ग्) प्रदान किंवा समायोजन, हुकूमनामाधारकाद्वारे किंवा त्याच्या वतीने, नियम १ च्या पोटनियम (२) अन्वये देण्यात आलेल्या नोटिशीला त्याने दिलेल्या उत्तरात, किंवा न्यायालयासमोर, कबूल करण्यात आले आहे,

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (दोन) (क्) अन्वये घालण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (दोन) (ख्) अन्वये घालण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (दोन) (ग्) अन्वये घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (१) द्वारे बदली दाखल करण्यात आली.

असे असल्याशिवाय न्यायनिर्णीत ऋणकोच्या विनंतीवरून कोणतेही प्रदान किंवा समायोजन नोंदण्यात येता कामा नये.]

(३) पूर्वोक्तानुसार जे प्रमाणित केलेले नाही किंवा ज्याची नोंद केलेली नाही असे प्रदान किंवा समायोजन याला, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या कोणत्याही न्यायालयाची मान्यता मिळणार नाही.

हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करणारी न्यायालये

एकापेक्षा जास्त अधिकारिता क्षेत्रांमध्ये असलेल्या जमिनी.

३. जेव्हा स्थावर मालमत्ता म्हणजे सगळी एकत्र संपदा किंवा धारणाधिकार असून, ती दोन किंवा अधिक न्यायालयांच्या अधिकारितांच्या स्थलसीमांमध्ये असेल तेव्हा, यांपैकी कोणतेही एक न्यायालय तो संपूर्ण संपदा किंवा धारणाधिकार जप्त करून विक शकेल.

लघुवाद न्यायालयाकडे वर्ग करणे.

४. ज्याचे दावा-अर्जामध्ये दाखवण्यात आलेले मूल्य दोन हजार रुपयांपेक्षा जास्त नसेल, आणि ज्याची विषयवस्तू लक्षात घेता, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये इलाखा शहर किंवा प्रांतीय लघुवाद न्यायालय यांच्या दखलगिरीतून ज्यास वगळण्यात आलेले नाही अशा एखाद्या दाव्यात एखादा हुकूमनामा काढण्यात आला असेल, आणि ज्या न्यायालयाने तो काढला असेल त्यास कलकत्ता, मद्रास [किंवा मुंबई] येथे त्याची अंमलबजावणी व्हावी अशी इच्छा असेल तेव्हा, असे न्यायालय, कलकत्ता, मद्रास [किंवा, प्रकरणपरत्वे, मुंबई] येथील लघुवाद न्यायालयाकडे नियम ६ मध्ये उल्लेखिलेल्या अशा प्रती व प्रमाणपत्रे पाठवू शकेल, आणि तदनंतर असे लघुवाद न्यायालय, जणू काही तो हुकूमनामा त्याने स्वतःच काढलेला असावा त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करील.

[४. (१) ज्याचे दावा-अर्जामध्ये दाखवण्यात आलेले मूल्य दोन हजार रुपयांपेक्षा जास्त नसेल, आणि ज्याची विषयवस्तू लक्षात घेता, त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये इलाखा शहर किंवा प्रांतीय लघुवाद न्यायालय यांच्या दखलगिरीतून ज्यास वगळण्यात आलेले नाही अशा एखाद्या दाव्यात एखादा हुकूमनामा काढण्यात आला असेल, आणि ज्या न्यायालयाने तो काढला असेल त्यास कलकत्ता, किंवा मद्रास येथे त्याची अंमलबजावणी व्हावी अशी इच्छा असेल तेव्हा, असे न्यायालय, कलकत्ता किंवा, प्रकरणपरत्वे, मद्रास येथील लघुवाद न्यायालयाकडे नियम ६ मध्ये उल्लेखिलेल्या अशा प्रती व प्रमाणपत्रे पाठवू शकेल, आणि तदनंतर असेच लघुवाद न्यायालय, जणू काही तो हुकूमनामा त्याने स्वतःच काढलेला असावा त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी करील. लघुवाद न्यायालयाकडे वर्ग करणे.

(२) पोट-नियम (१) मध्ये वर्णन केलेल्या स्वरूपाच्या असलेल्या पण, ज्याच्या दावा-अर्जामध्ये दाखवण्यात आलेले मूल्य दहा हजार रुपयांहून जास्त नसेल अशा दाव्यांमधील हुकूमनामा, मुंबई येथील इलाखा शहर लघुवाद न्यायालयाकडे अंमलबजावणीसाठी पाठविता येईल आणि त्या न्यायालयाकडून त्याची, पोट-नियम (१) मध्ये विहित केलेल्या रीतीने अंमलबजावणी केली जाऊ शकेल.]

वर्ग करण्याची पद्धती.

[५. जेव्हा हुकूमनामा अंमलबजावणीसाठी दुसऱ्या न्यायालयाकडे पाठवावयाचा असेल तेव्हा, ज्या न्यायालयाने असा हुकूमनामा काढला असेल, ते न्यायालय तो हुकूमनामा थेट अशा दुसऱ्या न्यायालयाकडे पाठवील—मग असे न्यायालय त्याच राज्यात असो वा नसो—पण ज्या न्यायालयाकडे हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पाठवलेला असेल, ते न्यायालय, जर त्याला स्वतःला त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याची अधिकारिता नसेल तर, अशी अधिकारिता असणाऱ्या न्यायालयाकडे तो पाठवील.]

[५. हुकूमनामा अंमलबजावणीसाठी ज्या न्यायालयाकडे पाठवावयाचा असेल ते न्यायालय, हुकूमनामा काढणारे न्यायालय ज्या राज्यात आहे त्याच राज्यात असेल तर हुकूमनामा काढणारे न्यायालय तो थेट अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाकडे पाठवील, मात्र हुकूमनामा अंमलबजावणीसाठी ज्या न्यायालयाकडे पाठवावयाचा असेल ते न्यायालय वेगळ्या राज्यात असेल तर, तो हुकूमनामा काढणाऱ्या न्यायालयाने त्याची अंमलबजावणी ज्या जिल्ह्यात करावयाची असेल.] वर्ग करण्याची पद्धती.

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "मुंबई किंवा रंगून" याऐवजी घालण्यात आले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (तीन) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी.-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (२) द्वारे बदली दाखल करण्यात आली.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी.-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ५८ द्वारे बदली दाखल करण्यात आले.

जेव्हा आपल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी दुसऱ्या न्यायालयाने करावी अशी न्यायालयाची इच्छा असेल, त्यावेळची कार्यपद्धती.

६. हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पाठवणाऱ्या न्यायालयाने पुढील कागदपत्रे पाठवली पाहिजेत,—

(क) त्या हुकूमनाम्याची एक प्रत;

(ख) ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला असेल त्याच्या अधिकारितेत अंमलबजावणीद्वारे त्याची पूर्तता करवून घेतलेली नाही हे निवेदन करणारे किंवा हुकूमनाम्याची अंशतः अंमलबजावणी झाली असेल तर, कितपत पूर्तता झाली आहे आणि हुकूमनाम्याची अंमलबजावणी किती अंशी व्हावयाची राहिली आहे, हे निवेदन करणारे प्रमाणपत्र; आणि

(ग) हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासंबंधीच्या आदेशाची प्रत, किंवा, असा कोणताही आदेश देण्यात आलेला नसेल तर, तशा आशयाचे प्रमाणपत्र.

हुकूमनाम्याच्या प्रती, इत्यादी स्वीकारणाऱ्या न्यायालयाने शाबिती दाखल करून घेणे.

७. अशाप्रकारे ज्या न्यायालयाकडे हुकूमनामा पाठविण्यात येईल ते न्यायालय, हुकूमनामा किंवा अंमलबजावणीचा आदेश यासंबंधी किंवा त्यांच्या प्रतीसंबंधी आणखी शाबिती शिवाय, अशा प्रती व प्रमाणपत्रे दाखल करवून घेईल-मात्र काही विशेष कारणांस्तव न्यायालयास अशी शाबिती आवश्यक वाटली तर, ती कारणे न्यायाधीशाला सहीनिशी नोंदवावी लागतील.

हुकूमनामा किंवा आदेश ज्या न्यायालयाकडे पाठविण्यात आला असेल त्याच्याकडून त्याची अंमलबजावणी.

८. या प्रती अशा प्रकारे दाखल करण्यात येतील तेव्हा, ज्या न्यायालयाकडे हुकूमनामा किंवा आदेश पाठवला असेल, ते जिल्हा न्यायालय असेल तर, त्याची अंमलबजावणी अशा न्यायालयाकडून केली जाऊ शकेल किंवा सक्षम अधिकारितेच्या एखाद्या दुय्यम न्यायालयाकडे अंमलबजावणीसाठी तो वर्ग केला जाऊ शकेल.

अन्य न्यायालयाने वर्ग केलेल्या हुकूमनाम्यांची उच्च न्यायालयाकडून अंमलबजावणी.

९. ज्या न्यायालयाकडे हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पाठवण्यात आला असेल ते उच्च न्यायालय असेल तर, जणू काही, तो हुकूमनामा त्या न्यायालयाने स्वतःच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेचा वापर करून काढलेला असावा त्याप्रमाणे अशा न्यायालयाकडून त्याची अंमलबजावणी केली जाईल.

अंमलबजावणीसाठी अर्ज

अंमलबजावणीसाठी अर्ज.

१०. हुकूमनामाधारक त्याची अंमलबजावणी करवून घेऊ इच्छित असेल तर, ज्या न्यायालयाने तो काढला त्या न्यायालयाकडे अथवा या संबंधात जो अधिकारी नेमला असेल (कोणी असल्यास) त्या अधिकाऱ्याकडे, अथवा यात यापूर्वी अंतर्भूत असलेल्या उपबंधांन्वये हुकूमनामा अन्य न्यायालयाकडे पाठविला असेल तर, अशा न्यायालयाकडे अथवा त्याच्या योग्य अधिकाऱ्याकडे, त्याला अर्ज करावा लागेल.

तोंडी अर्ज.

११. (१) जेव्हा पैसे भरण्यासाठी हुकूमनामा काढलेला असेल तेव्हा, हुकूमनामाधारकाने केलेल्या तोंडी अर्जावरून, न्यायालय, हुकूमनामा काढताना, न्यायनिर्णित ऋणको न्यायालयाच्या आवारात असेल तर, वॉरंट तयार करण्याअगोदर त्याला अटक करून हुकूमनाम्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याचा आदेश देऊ शकेल.

११. (१) जेव्हा पैसे भरण्यासाठी हुकूमनामा काढलेला असेल तेव्हा, हुकूमनामाधारकाने केलेल्या तोंडी अर्जावरून, न्यायालय, हुकूमनामा काढताना, न्यायनिर्णित ऋणको न्यायालयाच्या आवारात असेल तर, वॉरंट तयार करण्याअगोदर त्याला अटक करून हुकूमनाम्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याचा आदेश देऊ शकेल. तोंडी अर्ज.

लेखी अर्ज.

(२) पोटनियम (१) अन्वये अन्यथा उपबंधित केले असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी द्यावयाचा प्रत्येक अर्ज लेखी असावा लागेल आणि अर्जदाराला किंवा जी व्यक्ती प्रकरणातील तथ्यांशी परिचित असल्याबद्दल न्यायालयाची खात्री पटेल अशाप्रकारे शाबीत करण्यात आले आहे अशा एखादया व्यक्तीला त्यावर सही करून तो सत्यापित करावा लागेल

(२) पोटनियम (१) अन्वये अन्यथा उपबंधित केल असेल तेवढ खेरीजकरून एरव्ही, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी द्यावयाचा प्रत्येक अर्ज लेखी असावा लागेल आणि अर्जदाराला किंवा जी व्यक्ती या प्रकरणातील तथ्यांशी परिचित असल्याबद्दल न्यायालयाची खात्री पटेल अशाप्रकारे शाबीत करण्यात आले आहे अशा एखाद्या व्यक्तीला त्यावर सही करून तो सत्यापित करावा लागेल आणि त्यात लेखी अर्ज.

आणि त्यात कोष्टकरूपाने पुढील तपशील अंतर्भूत करावा लागेल, तो असा :—

(क) दाव्याचा क्रमांक;

(ख) पक्षकारांची नावे;

(ग) हुकूमनाम्याचा दिनांक;

(घ) हुकूमनाम्याच्या विरुद्ध कोणतेही अपील करण्यात आले आहे किंवा कसे;

(ङ) हुकूमनामा काढण्यात आल्यानंतर पक्षकारांमध्ये वादग्रस्त बाबीसंबंधी कोणत्याही रकमेचे प्रदान किंवा अन्य काही समायोजन करण्यात आले आहे किंवा काय, आणि (असल्यास) किती;

(च) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी पूर्वी काही अर्ज करण्यात आले होते का आणि (असल्यास) कोणते, अशा अर्जांचे दिनांक आणि त्यांचे निकाल;

(छ) तसेच, हुकूमनाम्याखाली देय असलेली रक्कम व्याजाच्या रकमेसह (असल्यास) किंवा त्याद्वारे देण्यात आलेला अन्य प्रकारचा अनुतोष व सोबत कोणत्याही प्रतिहुकूमनाम्याचा तपशील—मग तो अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याच्या दिनांकाच्या आधी काढलेला असो वा नंतर काढलेला असो;

(ज) जो दावा खर्च देवविला असेल (काही असल्यास) त्याची रक्कम;

(झ) ज्या व्यक्तीविरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याची मागणी असेल त्या व्यक्तीचे नाव; आणि

(ञ) कोणत्या प्रकारे न्यायालयाची मदत लागेल ते, म्हणजे,—

(एक) विनिर्देशपूर्वक ज्या मालमत्तेबाबत हुकूमनामा काढला असेल तिची सुपूर्दगी करून;

[१][(दोन) एखाद्या मालमत्तेची जप्ती करून, अथवा जप्ती व विक्री करून, अथवा जप्तीशिवाय विक्री करून;]

(तीन) एखाद्या व्यक्तीला अटक करून आणि तिला कारागृहात स्थानबध्द करून;

(चार) प्रापकाची नियुक्ती करून;

(पाच) ज्या प्रकारचा अनुतोष देण्यात आला असेल त्याच्या स्वरूपानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे अन्यथा.

(३) पोटनियम (२) खाली ज्या न्यायालयाकडे अर्ज केलेला असेल ते न्यायालय अर्जदाराला त्या हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत हजर करण्यास फर्मावू शकेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (चार) द्वारे बदलीकरावल करण्यात आले.

कोष्टकरूपाने पुढील तपशील अंतर्भूत करावा लागेल, तो असा :—

(क) दाव्याचा क्रमांक;

(ख) पक्षकारांची नावे;

(ग) हुकूमनाम्याचा दिनांक;

(घ) हुकूमनाम्याच्या विरुद्ध कोणतेही अपील करण्यात आले आहे किंवा कसे;

(ङ) हुकूमनामा काढण्यात आल्यानंतर पक्षकारांमध्ये वादग्रस्त बाबीसंबंधी कोणत्याही रकमेचे प्रदान किंवा अन्य काही समायोजन करण्यात आले आहे किंवा काय, आणि (असल्यास) किती;

(च) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी पूर्वी काही अर्ज करण्यात आले होते का आणि (असल्यास) कोणते, अशा अर्जांचे दिनांक आणि त्यांचे निकाल;

(छ) तसेच, हुकूमनाम्यानुसार देय असलेली रक्कम व्याजाच्या रकमेसह (असल्यास) किंवा त्याद्वारे देण्यात आलेला अन्य प्रकारचा अनुतोष व सोबत कोणत्याही प्रतिहुकूमनाम्याचा तपशील--- मग तो अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याच्या दिनांकाच्या आधी काढलेला वा नंतर काढलेला असो.

(ज) जो दावा खर्च देवविला असेल (काही असल्यास) त्याची रक्कम;

(झ) ज्या व्यक्तीविरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याची मागणी असेल त्या व्यक्तीचे नाव; आणि

(ञ) कोणत्या प्रकारे न्यायालयाची मदत लागेल, ते म्हणजे,---

(एक) विनिर्देशपूर्वक ज्या मालमत्तेबाबत हुकूमनामा काढला असेल तिची सुपूर्दगी करून;

[१][(दोन) एखाद्या मालमत्तेची जप्ती करून, अथवा जप्ती व विक्री करून, अथवा जप्तीशिवाय विक्री करून;]

(तीन) एखाद्या व्यक्तीला अटक करून आणि तिला कारागृहात स्थानबध्द करून;

(चार) प्रापकाची नियुक्ती करून;

(पाच) ज्या प्रकारचा अनुतोष देण्यात आला असेल त्याच्या स्वरूपानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे अन्यथा.

(३) पोटनियम (२) खाली ज्या न्यायालयाकडे अर्ज केलेला असेल ते न्यायालय अर्जदाराला त्या हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत हजर करण्यास फर्मावू शकेल.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६ याच्या खंड ५९ द्वारे घालण्यात आले.

अटकेच्या अर्जामध्ये कारणे नमूद करावयाची

[1][११क. न्यायनिर्णीत ऋणकोला अटक करून कारागृहात स्थानबद्ध करण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल तेव्हा, ज्या कारणांच्या आधारे अटक करण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल ती कारणे हुकूमनामधारकाने त्या अर्जात नमूद केली पाहिजेत किंवा ती नमूद करणारे शपथपत्र त्या अर्जासोबत जोडले पाहिजे.]

न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जात नसलेली जंगम मालमत्ता जप्त करण्यासाठी अर्ज.

१२. जेव्हा न्यायनिर्णीत ऋणकोच्या मालकीची पण त्याच्या कब्जात नसलेली एखादी जंगम मालमत्ता जप्त करण्यासाठी अर्ज केलेला असेल तेव्हा हुकूमनामाधारक अर्जाला, जप्त करावयाच्या मालमत्तेचे वाजवी मर्यादेपर्यंत यथातथ्य वर्णन असलेली एक मालमत्तेची जंत्री जोडील.

स्थावर मालमत्ता जप्त करण्यासाठी केलेल्या अर्जात विवक्षित तपशील अंतर्भूत असणे.

१३. न्यायनिर्णीत ऋणकोच्या मालकीची एखादी स्थावर मालमत्ता जप्त करण्यासाठी अर्ज करण्यात येईल तेव्हा, त्याच्या तळाशी,—

(क) अशा मालमत्तेची ओळख पटण्याइतपत पुरेसे असे तिचे वर्णन आणि चतुःसीमांच्या सहाय्याने अथवा जमाबंदीच्या किंवा जमीन मोजणीच्या दप्तरातील क्रमांकांच्या सहाय्याने अशा मालमत्तेची ओळख पटणे शक्य असेल तर, अशा सीमांचा किंवा क्रमांकाचा विनिदेश; आणि

(ख) न्यायनिर्णीत ऋणकोला अशा मालमत्तेतील हिस्सा किंवा हितसंबंध किती आहे त्यासंबंधी अर्जदाराच्या उत्तम समजुतीप्रमाणे आणि याबाबत तो खातरजमा करू शकला असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत विनिर्देश द्यावा लागेल.

विवक्षित प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांच्या नोंदवहीमधील प्रमाणित उतारा मागवण्याची शक्ती.

१४. जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात नोंदलेली कोणतीही जमीन जप्त करण्यासाठी अर्ज केलेला असेल तर, न्यायालय त्या अर्जदाराला, त्या जमिनीचे किंवा तिच्या महसुलांचे मालक म्हणून, त्यामध्ये आपला हस्तांतरणीय हितसंबंध असलेला म्हणून, अथवा जमिनीचा महसूल भरण्यास दायी म्हणून नोंदलेल्या व्यक्ती व नोंदलेल्या मालकांचे हिस्से विनिर्दिष्ट करणारा, अशा कार्यालयाच्या नोंदवहीतील प्रमाणित उतारा हजर करण्यास फर्मावू शकेल.

संयुक्त हुकूमनामाधारकांकडून अंमलबजावणीसाठी अर्ज.

१५. (१) जेव्हा एकापेक्षा जास्त व्यक्तींच्या बाजूने संयुक्तपणे हुकूमनामा काढलेला असेल तेव्हा, हुकूमनाम्यामध्ये विरुद्ध अशी कोणतीही शर्त लावलेली नसेल तर, अशांपैकी कोणाही एका किंवा अधिक व्यक्तींना त्या सर्वांच्या लाभार्थ किंवा त्यांपैकी एखादी व्यक्ती मरण पावली असेल तर, मागे हयात असलेल्या व्यक्तींच्या आणि मृत व्यक्तीच्या वैध प्रतिनिधींच्या लाभार्थ, त्या संपूर्ण हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज करता येईल.

(२) या नियमान्वये दिलेल्या अर्जावरून हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यास परवानगी देण्यास पुरेसे कारण आहे, असे न्यायालयाला वाटले तर, ज्या व्यक्ती अर्ज करण्यात सामील झालेल्या नव्हत, त्या व्यक्तींचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी न्यायालय स्वतःला आवश्यक वाटेल असा आदेश देईल.

हुकूमनाम्याच्या हस्तांतरितीकडून अंमलबजावणीसाठी अर्ज.

१६. जेव्हा एखादा हुकूमनामा किंवा जर एखादा हुकूमनामा दोन किंवा अधिक व्यक्तींच्या बाजूने संयुक्तपणे काढण्यात आला असेल तर, एखाद्या हुकूमनामाधारकाचा त्या हुकूमनाम्यामधील हितसंबंध लेखी अभिहस्तांकनाद्वारे किंवा कायद्याच्या प्रवर्तनामुळे हस्तांतरित झालेला असेल तेव्हा, हस्तांतरिती, ज्याने हुकूमनामा काढला असेल त्या न्यायालयाकडे त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज देऊ शकेल आणि जणू काही, तो अर्ज हुकूमनामाधारकाने केलेला असावा अशा रीतीने व तशाच शर्तीवर त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी केली जाऊ शकेल :

परंतु, जर हुकूमनामा किंवा पूर्वोक्त असा हितसंबंध अभिहस्तांकनाद्वारे हस्तांतरित केलेला असेल तर, हस्तांतरक आणि न्यायनिर्णीत ऋणको यांना अशा अर्जाची नोटीस द्यावी लागेल, आणि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीला त्यांनी घेतलेले आक्षेप

हुकूमनाम्याच्या हस्तांतरितीकडून अंमलबजावणीसाठी अर्ज.

[1][१६. जेव्हा एखादा हुकूमनामा किंवा जर एखादा हुकूमनामा दोन किंवा अधिक व्यक्तींच्या बाजूने संयुक्तपणे काढण्यात आला असेल तर, एखाद्या हुकूमनामाधारकाचा हुकूमनाम्यामधील हितसंबंध लेखी अभिहस्तांकनाद्वारे किंवा कायद्याच्या प्रवर्तनामुळे हस्तांतरित झालेला असेल तेव्हा, ज्याने हुकूमनामा काढला असेल, त्या न्यायालयाकडे किंवा अंमलबजावणीसाठी तो ज्या न्यायालयाकडे पाठवण्यात आला असेल त्या न्यायालयाकडे हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी हस्तांतरिती अर्ज करू शकेल. आणि जणू काही तो अर्ज हुकूमनामाधारकाने केलेला असावा अशारीतीने व तशाच शर्तीवर त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी केली जाऊ शकेल :

परंतु, जर हुकूमनामा किंवा पूर्वोक्त असा हितसंबंध अभिहस्तांकनाद्वारे हस्तांतरित केलेला असेल तर, हस्तांतरक आणि न्यायनिर्णीत ऋणको यांना अशा अर्जाची नोटीस द्यावी लागेल आणि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीला त्यांनी घेतलेले

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७२ (ग) द्वारे घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा ३ द्वारे मूळ नियमा ऐवजी नियम १६ घालण्यात आला.

(काही अपवादात्मक) न्यायालयाने ऐकून घेईपर्यंत हुकूमनाम्याची अंमलबजावणी केली जाता कामा नये :

परंतु आणखी असे की, जर दोन किंवा अधिक व्यक्तींच्या विरुद्ध रकमेचा भरणा करण्यासाठी काढलेला एखादा हुकूमनामा त्यांपैकी एका व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यात आला असेल तर, अन्य व्यक्तींच्या विरुद्ध त्याची अंमलबजावणी केली जाता कामा नये.

[1][स्पष्टीकरण :—या नियमातील कोणत्याही गोष्टींचा कलम १४६ च्या उपबंधांवर परिणाम होणार नाही आणि या दाव्याची विषयवस्तू असणाऱ्या मालमत्तेमधील अधिकारांचा हस्तांतरिती, या नियमानुसार आवश्यक असल्याप्रमाणे हुकूमनाम्याचे स्वतंत्रपणे अभिहस्तांकन केल्याशिवाय हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी अर्ज करू शकेल.]

हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज मिळाल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.

१७. (१) नियम ११, पोटनियम (२) याद्वारे उपबंधित केल्याप्रमाणे हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज आल्यावर, नियम ११ ते १४ यांमधील ज्या आवश्यक बाबी त्या प्रकरणी लागू असतील त्यांचे अनुपालन करण्यात आले आहे किंवा काय याबाबत न्यायालयाने खातरजमा करून घेतली पाहिजे; आणि, त्यांचे अनुपालन करण्यात आले नसेल तर, ताबडतोब व तेथेच किंवा न्यायालयाने निश्चित करावयाच्या अवधीत ती उणीव दूर करण्यास [2][न्यायालयाने परवानगी दिली पाहिजे.]

[1][(१क) जर अशा प्रकारे उणीव दूर करण्यात आली नाही तर, न्यायालय अर्ज फेटाळील :

परंतु, न्यायालयाच्या मते, नियम ११ च्या पोटनियम (२) मधील खंड (छ) व (ज) मध्ये

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (सहा) द्वारे घालण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (दोन) (क) द्वारे घालण्यात आले.

३. वरील अधिनियम कलम ७२ (सात) (ख) अन्वये "न्यायालय अर्ज फेटाळू शकेल किंवा परवानगी देऊ शकेल" या मजकुराऐवजी घालण्यात आले.

आक्षेप (काही अपवादात्मक) न्यायालयाने ऐकून घेईपर्यंत हुकूमनाम्याची अंमलबजावणी केली जाता कामा नये :

परंतु आणखी असे की, जर हस्तांतरिती न्यायालय, अभिहस्तांकन शाबीत झाले आहे असे मानील तर ते न्यायालय, त्याबाबतचा आपला निर्णय, हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला, त्या न्यायालयाला तात्काळ कळवील आणि हुकूमनामा काढणारे न्यायालय, दाव्यांच्या नोंदवहीमध्ये, हे अभिहस्तांकन शाबीत झाल्याचे मानण्यात आले आहे, असे दर्शवणारी नोंद करील :

परंतु आणखी असे की, जर दोन किंवा अधिक व्यक्तींच्या विरुद्ध रकमेचा भरणा करण्यासाठी काढलेला एखादा हुकूमनामा त्यांपैकी एका व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यात आला असेल तर, अन्य व्यक्तींच्या विरुद्ध त्याची अंमलबजावणी केली जाता कामा नये.

स्पष्टीकरण एक.—या नियमाखालील अर्जामध्ये, हुकूमनाम्याखाली केलेले पैशांचे कोणतेही प्रदान किंवा हुकूमनाम्याधारकाचे समाधान होईल, अशाप्रकारे केलेले हुकूमनाम्याचे संपूर्ण किंवा अंशतः समायोजन, जे प्रदान किंवा जे समायोजन, न्यायालयाने, या आदेशामधील नियम २ अन्वये प्रमाणित किंवा अभिलिखित केलेले नाही, त्याची अर्ज स्वीकारणारे न्यायालय दखल घेणार नाही.]

[1][स्पष्टीकरण दोन.— या नियमातील कोणतीही गोष्ट कलम १४६ च्या उपबंधांवर परिणाम करू शकणार नाही आणि या दाव्याची विषयवस्तू असणाऱ्या मालमत्तेमधील अधिकारांचा हस्तांतरिती या नियमानुसार आवश्यक असल्याप्रमाणे हुकूमनाम्याचे स्वतंत्रपणे अभिहस्तांकन न करता, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी अर्ज करू शकेल.]

हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज मिळाल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.

[1][१७. (१) नियम ११, पोटनियम (२) याद्वारे उपबंधित केल्याप्रमाणे, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज आल्यावर, नियम ११ ते १४ यांमधील ज्या आवश्यक बाबी त्याप्रकरणी लागू असतील, त्यांचे अनुपालन करण्यात आले आहे किंवा काय, याबाबत न्यायालयाने खातरजमा करून घेतली पाहिजे आणि त्यांचे अनुपालन करण्यात आले नसेल तर, तात्काळ आणि तेथेच किंवा न्यायालय निश्चित करील अशा अवधीत ती उणीव दूर करण्यास न्यायालय परवानगी देऊ शकेल आणि जर अशा मुदतीत ही उणीव दूर करण्यात हुकूमनामाधारकाने कसूर केली तर, न्यायालय अर्ज फेटाळू शकेल.]

[1][(१क) जर अशाप्रकारे उणीव दूर करण्यात आली नाही तर, न्यायालय अर्ज फेटाळील:

परंतु, न्यायालयाच्या मते, नियम ११ च्या पोटनियम (२) मधील खंड (छ) व (ज) मध्ये

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६. खंड ६१ अन्वये बदली दाखल करण्यात आले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (सात) (ख) अन्वये घालण्यात आले.

निर्दिष्ट केलेल्या रकमेत काही चूक असेल तर, न्यायालयाने अर्ज फेटाळण्याऐवजी ती रक्कम (कार्यवाहीच्या ओघात रक्कम अंतिमरीत्या निश्चित करून घेण्याच्या पक्षकारांच्या अधिकारास बाध न आणता) तात्पुरती निश्चित केली पाहिजे, आणि अशाप्रकारे तात्पुरत्या निश्चित केलेल्या रकमेच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी आदेश दिला पाहिजे.]

(२) जेव्हा पोटनियम (१)च्या उपबंधांन्वये अर्जात सुधारणा करण्यात येईल तेव्हा, तो अर्ज कायद्यानुसार असल्याचे आणि ज्या दिनांकास तो प्रथम सादर केलेला होता त्या दिनांकास सादर केला असल्याचे मानण्यात येईल.

(३) या नियमाखाली करण्यात आलेल्या प्रत्येक सुधारणेवर न्यायाधीश स्वाक्षरी किंवा आद्याक्षरी करील.

(४) जेव्हा अर्ज दाखल करून घेण्यात येईल तेव्हा, न्यायालय योग्य त्या नोंदवहीमध्ये अर्जाचे टिपण आणि कोणत्या तारखेस तो दिला ती तारीख नोंदवील, आणि यात यापुढे अंतर्भूत केलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, अर्जाच्या स्वरूपानुसार हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचा आदेश देईल :

परंतु, पैसे भरण्यासंबंधीचा हुकूमनामा असेल त्या बाबतीत, जप्त केलेल्या मालमत्तेचे मूल्य शक्यतो हुकूमनाम्याखाली देय असलेल्या रकमेइतके असावे लागेल.

निर्दिष्ट केलेल्या रकमेत काही चूक असेल तर, न्यायालयाने अर्ज फेटाळण्याऐवजी ती रक्कम (कार्यवाहीच्या ओघात रक्कम अंतिमरीत्या निश्चित करून घेण्याच्या पक्षकारांच्या अधिकारास बाध न आणता) तात्पुरती निश्चित केली पाहिजे, आणि अशा प्रकारे तात्पुरत्या निश्चित केलेल्या रकमेच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी आदेश दिला पाहिजे.]

(२) जेव्हा पोटनियम (१) च्या उपबंधांन्वये अर्जात सुधारणा करण्यात येईल तेव्हा, तो अर्ज कायद्यानुसार असल्याचे आणि ज्या दिनांकास तो प्रथम सादर केलेला होता, त्या दिनांकास सादर केला असल्याचे मानण्यात येईल.

(३) या नियमाखाली करण्यात आलेल्या प्रत्येक सुधारणेवर न्यायाधीश स्वाक्षरी किंवा आद्याक्षरी करील.

(४) जेव्हा अर्ज दाखल करून घेण्यात येईल तेव्हा, न्यायालय योग्य त्या नोंदवहीमध्ये अर्जाचे टिपण आणि कोणत्या तारखेस तो दिला ती तारीख नोंदवील, आणि यात यापुढे अंतर्भूत केलेल्या उपबंधांच्या अधीनतेने, अर्जाच्या स्वरूपानुसार हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचा आदेश देईल :

परंतु, पैसे भरण्यासंबंधीचा हुकूमनामा असेल त्या बाबतीत, जप्त केलेल्या मालमत्तेचे मूल्य शक्यतो हुकूमनाम्याखाली देय असलेल्या रकमेइतके असावे लागेल.

प्रतिहुकूमनाम्याच्या बाबतीत अंमलबजावणी.

१८. (१) जेव्हा, पैशाच्या दोन रकमांच्या प्रदानासाठी वेगवेगळ्या दाव्यांमध्ये त्याच पक्षकारांमध्ये काढण्यात आलेल्या आणि अशा न्यायालयामध्ये एकाच वेळी अंमलबजावणी करण्यायोग्य असलेल्या प्रतिहुकूमनाम्यांच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाकडे अर्ज केले असतील तेव्हा,—

(क) जर त्या दोन्ही रकमा सारख्याच असतील तर, दोन्ही हुकूमनाम्यांवर पूर्तता झाल्याची नोंद करण्यात येईल, आणि

(ख) जर त्या दोन रकमा असमान असतील तर, केवळ मोठ्या रकमेचा हुकूमनामा धारण करणाऱ्यालाच फक्त आणि लहान रक्कम वजा केल्यानंतर उरेल तेवढ्याच रकमेसाठी फक्त अंमलबजावणी करून घेता येईल. आणि लहान रकमेची पूर्तता झाल्याची नोंद मोठ्या रकमेच्या हुकूमनाम्यावर केली जाईल, तसेच लहान रकमेच्या हुकूमनाम्यावरही पूर्तता झाल्याची नोंद केली जाईल.

(२) दोहोंपैकी कोणताही पक्षकार हा त्यांपैकी एका हुकमनाम्याचा अभिहस्तांकिती असेल त्या बाबतीत, आणि ज्याप्रमाणे मूळ अभिहस्तांकनकर्त्याकडून देय असलेल्या न्यायनिर्णीत ऋणाच्या बाबतीत, त्याचप्रमाणे खुद्द अभिहस्ताकितींकडून देय असलेल्या न्यायनिर्णीत ऋणांच्या बाबतीतही हा नियम लागू असल्याचे मानण्यात येईल.

(३) (क) ज्यामध्ये हुकूमनामे करण्यात आलेले आहेत, अशांपैकी एका दाव्यामधील हुकूमनामाधारक हा दुसऱ्यामध्ये न्यायनिर्णीत ऋणको आहे आणि दोन्ही दाव्यांमध्ये प्रत्येक पक्षकार एकाच भूमिकेवर आहे; आणि

(ख) हुकूमनाम्यान्वये देय असलेल्या रकमा निश्चित आहेत, असे झाल्याशिवाय हा नियम लागू असल्याचे मानले जाणार नाही.

(४) अनेक व्यक्तींविरुद्ध संयुक्तपणे आणि पृथकपणे काढण्यात आलेल्या हुकूमनाम्याच्या धारकाला, तशा व्यक्तींपैकी एकाच्या किंवा अनेकांच्या बाजूने खुद्द त्याच्या एकट्याच्या विरुद्ध काढण्यात आलेल्या हुकूमनाम्याच्या संदर्भात तो प्रतिहुकूमनामा आहे, असे समजून चालता येईल.

उदाहरणे

(क) "क" जवळ "ख" विरुद्ध १,००० रुपयांचा हुकूमनामा आहे. भविष्यकाळातील एका नियमित दिवशी "क" विवक्षित माल सुपूर्द करण्यास चुकला तर, त्याने १,००० रुपये द्यावयाचे असे "क" विरुद्धचा हुकूमनामा "ख" जवळ आहे. "ख" ला आपला हुकूमनामा हा या नियमाखाली प्रतिहुकूमनामा असल्याचे समजून चालता येणार नाही.

(ख) "क" आणि "ख" हे सहवादी "ग" विरुद्ध १,००० रुपयांचा हुकूमनामा मिळवतात आणि "ग" हा "ख" विरुद्ध १,००० रुपयांचा हुकूमनामा मिळवतो. "ग" ला आपला हुकूमनामा या नियमाखाली प्रतिहुकूमनामा असल्याचे समजून चालता येणार नाही.

(ग) "क" हा "ख" विरुद्ध १,००० रुपयांचा हुकूमनामा मिळवतो. "ग" हा "ख" चा न्यासी असून तो "ख" च्या वतीने "क" च्या विरुद्ध १,००० रुपयांचा हुकूमनामा मिळवतो. "ख" ला "ग" चा हुकूमनामा या नियमाखाली प्रतिहुकूमनामा असल्याचे समजून चालता येणार नाही.

(घ) "च" ने मिळवलेल्या हुकूमनाम्याअन्वये "क", "ख", "ग", "घ" आणि "ङ." हे संयुक्तपणे आणि पृथक्‌पणे १,००० रुपये भरण्यास दायी आहेत. एकटा "क" हा "च" विरुद्ध १०० रुपयांचा हुकूमनामा मिळवितो, आणि ज्या न्यायालयात संयुक्त हुकूमनाम्याची अंमलबजावणी चालू आहे त्या न्यायालयाकडे अंमलबजावणीसाठी अर्ज करतो. "च" ला आपला संयुक्त हुकूमनामा हा या नियमाखालील प्रतिहुकूमनामा असल्याचे समजून चालता येईल.

एकाच हुकूमनाम्याखालील प्रतिहक्कमागण्यांच्या बाबतीतील अंमलबजावणी.

१९. ज्या हुकूमनाम्याअन्वये दोन पक्षकार एकमेकांकडून पैसे वसूल करण्यास हक्कदार असतील, अशा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाकडे अर्ज करण्यात येईल, तेव्हा—

(क) त्या दोन्ही रकमा सारख्याच असतील तर, दोन्हींची पूर्तता झाल्याची नोंद हुकूमनाम्यावर करण्यात येईल, आणि

(ख) त्या दोन रकमा असमान असतील तर, मोठ्या रकमेला हक्कदार असलेल्या पक्षकारालाच फक्त आणि लहान रक्कम वजा केल्यानंतर उरेल तेवढ्याच रकमेसाठी फक्त अंमलबजावणी करून घेता येईल, आणि लहान रकमेची पूर्तता झाल्याची नोंद हुकूमनाम्यावर करण्यात येईल.

गहाणविषयक दाव्यांमध्ये प्रतिहुकूमनामे आणि प्रतिहक्कमागण्या.

२०. नियम १८ व १९ मध्ये अंतर्भूत असलेले उपबंध, गहाण किंवा प्रभार बजावून घेण्यासाठी विक्री करण्यासंबंधीच्या हुकूमनाम्यांना लागू होतील.

एकाच वेळी अंमलबजावणी.

२१. न्यायालयास स्वविवेकानुसार, स्वत: न्यायनिर्णीत ऋणको आणि त्याची मालमत्ता याविरुद्ध एकाच वेळी अंमलबजावणीस नकार देता येईल.

विवक्षित प्रकरणी अंमलबजावणीविरुद्ध कारणे दाखवा नोटीस.

२२. (१) अंमलबजावणीसाठी दाव्याचा अर्ज,—

(क) हुकूमनाम्याच्या तारखेनंतर [१][दोन वर्षांपेक्षा] उशिरा दिलेला असेल तर, किंवा

(ख) हुकूमनाम्यातील एखाद्या पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधीविरुद्ध दिलेला असेल तर, [२][किंवा कलम ४४ क च्या उपबंधांअन्वये दाखल करण्यात आलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज दिलेला असेल तर,]

(ग) जेव्हा हुकूमनाम्यातील पक्षकारास दिवाळखोर म्हणून अभिनिर्णित करण्यात आले असेल तेव्हा, अभिहस्तांकितीच्या किंवा दिवाळखोरीच्या प्रापकाच्याविरुद्ध दिलेला असेल तर, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणारे न्यायालय, ज्या व्यक्तीविरुद्ध अंमलबजावणीसाठी अर्ज देण्यात आला आहे, तिच्याविरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी का करू नये त्यासंबंधी, नियत करावयाच्या तारखेस तिने

[२२. (१) अंमलबजावणीसाठी दाव्याचा अर्ज,—

(क) हुकूमनाम्याच्या तारखेनंतर दोन वर्षांपेक्षा उशिरा दिलेला असेल तर, किंवा

(ख) त्या हुकूमनाम्यातील एखाद्या पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधीविरुद्ध दिलेला असेल तर, किंवा कलम ४४ क च्या उपबंधान्वये दाखल करण्यात आलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज दिलेला असेल तर, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणारे न्यायालय, ज्या व्यक्तीविरुद्ध अंमलबजावणीसाठी अर्ज देण्यात आला आहे, तिच्याविरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी का करू नये, त्यासंबंधी, नियत करावयाच्या तारखेस, तिने कारण दाखवावे असे तिला फर्मावणारी नोटीस देईल :

विवक्षित प्रकरणी, अंमलबजावणीविरुद्ध कारणे दाखवा नोटीस.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (आठ) (क) द्वारे "एक वर्ष" याऐवजी घालण्यात आले.

२. सन १९३७ चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ६२ द्वारे बदली दाखल करण्यात आले.

कारण दाखवावे, असे तिला फर्मावणारी नोटीस देईल :

परंतु, ज्याच्याविरुद्ध अंमलबजावणीसाठी अर्ज दिलेला आहे त्या पक्षकाराविरुद्ध पूर्वी करण्यात आलेल्या अंमलबजावणीच्या एखाद्या अर्जावर देण्यात आलेल्या शेवटच्या आदेशाच्या तारखेपासून [१][दोन वर्षांच्या] आतच अंमलबजावणीसाठी अर्ज करण्यात आलेला असेल तर, किंवा न्यायनिर्णीत ऋणकोच्या कायदेशीर प्रतिनिधीविरुद्ध अर्ज केल्याच्या परिणामी, त्याच व्यक्तीविरुद्ध पूर्वी करण्यात आलेल्या अंमलबजावणीसाठीच्या एखाद्या अर्जावर न्यायालयाने तिच्याविरुद्ध अंमलबजावणी सुरू करण्याचा आदेश दिलेला असेल तर, हुकूमनाम्याची तारीख आणि अंमलबजावणीसाठी दिलेल्या अर्जाची तारीख यामध्ये [१][दोन वर्षांपेक्षा] जास्त काळ लोटल्याच्या परिणामी, अशी कोणतीही नोटीस आवश्यक असणार नाही. [२][किंवा]

[१][(ग्) हुकूमनाम्यातील पक्षकार नादार म्हणून अभिनिर्णीत झाला असेल तर त्या बाबतीत नादारीच्या कार्यवाहीतील अभिहस्तांकितीच्या किंवा प्रापकांच्याविरुद्ध दिली असेल तर.]

(२) मागील पोटनियमात विहित केलेली नोटीस काढण्याने गैरवाजवी विलंब लागेल किंवा न्यायाचा उद्दिष्टे फसतील असे न्यायालयाला सकारण वाटल्यास, अशी नोटीस न देता, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत एखादी आदेशिका काढण्यास न्यायालयाला त्या पोटनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होतो, असे मानले जाणार नाही.

परंतु, ज्याच्याविरुद्ध अंमलबजावणीसाठी अर्ज दिलेला आहे त्या पक्षकाराविरुद्ध पूर्वी करण्यात आलेल्या अंमलबजावणीच्या एखाद्या अर्जावर देण्यात आलेल्या शेवटच्या आदेशाच्या तारखेपासून (दोन वर्षांच्या) आतच अंमलबजावणीसाठी अर्ज करण्यात आलेला असेल तर, किंवा न्यायनिर्णीत ऋणकोच्या, कायदेशीर प्रतिनिधीविरुद्ध अर्ज केल्याच्या परिणामी, त्याच व्यक्तीविरुद्ध पूर्वी करण्यात आलेल्या अंमलबजावणीसाठीच्या एखाद्या अर्जावर न्यायालयाने तिच्याविरुद्ध अंमलबजावणी सुरू करण्याचा आदेश दिलेला असेल तर, हुकूमनाम्याची तारीख आणि अंमलबजावणीसाठी दिलेल्या अर्जाची तारीख यामध्ये (दोन वर्षांपेक्षा) जास्त काळ, लोटल्याच्या परिणामी अशी कोणतीही नोटीस आवश्यक असणार नाही.

(२) मागील पोटनियमांत विहित केलेली नोटीस काढण्याने गैरवाजवी विलंब लागेल किंवा न्यायाची उद्दिष्टे फसतील असे न्यायालयाला सकारण वाटल्यास, अशी नोटीस न देता हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत एखादी आदेशिका काढण्यास न्यायालयाला त्या पोटनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होतो, असे मानले जाणार नाही.

(३) वरील पोटनियम (१) आणि (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासंबंधीचा कोणताही आदेश, केवळ, या नियमाखालील नोटीस देण्यात कसूर झाल्याच्या कारणावरून विधिग्राह्य ठरणार नाही, मात्र, न्यायनिर्णीत ऋणकोला, अशा कसुरीच्या कारणायकन भरीव नुकसान पोचले असता कामा नये.

विक्रीपूर्वी परंतु विक्रीचा जाहीरनामा बजावल्यानंतर न्यायनिर्णीत ऋणको मृत्यू पावल्यास, विक्री रद्द न ठरवणे.

[१][२२क. जेव्हा एखाद्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना कोणत्याही मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल तेव्हा, विक्रीचा जाहीरनामा काढल्याची तारीख व विक्रीची तारीख या दरम्यान न्यायनिर्णीत ऋणको मृत्यू पावला असल्यास, केवळ तेवढ्याच कारणावरून विक्री रद्द करण्यात येणार नाही— मग हुकूमनामाधारकाने अशा मयत न्यायनिर्णीत ऋणकोच्या जागी त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीला आणण्यात कसूर केली असेल तरी हरकत नाही.— परंतु अशी कसूर झाली असेल त्या बाबतीत, अशा विक्रीमुळे मयत न्यायनिर्णीत ऋणकोच्या कायदेशीर प्रतिनिधीला नुकसान पोहोचले आहे अशी न्यायालयाची खात्री पटली तर, न्यायालयाला विक्री रद्द ठरवता येईल.]

नोटीस दिल्यानंतरची कार्यपद्धती.

२३. (१) [१][नियम २२] खाली ज्या व्यक्तीला नोटीस देण्यात आली आहे ती व्यक्ती उपस्थित राहिली नाही तर किंवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी का करू नये याबाबत तिने न्यायालयाचे समाधान होईल असे कारण दाखवले नाही तर, न्यायालय, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याचा आदेश देईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (आठ) (क्) द्वारे घालण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (आठ) (ख्) द्वारे घालण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (आठ) (ग्) द्वारे घालण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (नऊ) द्वारे घालण्यात आले

५. सन १९७८ चा अधिनियम १८, कलम ३ आणि दुसऱ्या अनुसूचीद्वारे, "लगतपूर्वीचा नियम" या शब्दांऐवजी "नियम २२" हे शब्द घालण्यात आले.

(२) जेव्हा अशी व्यक्ती हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीला कोणताही आक्षेप घेईल तेव्हा, न्यायालय तो आक्षेप विचारात घेईल आणि स्वत:ला योग्य वाटेल असा आदेश देईल.

अंमलबजावणी करण्यासाठी आदेशिका

अंमलबजावणी करण्यासाठी आदेशिका.

२४. (१) जेव्हा मागील नियमांद्वारे आवश्यक असेल अशी प्रारंभिक कार्यवाही (कोणतीही असल्यास) करण्यात आली असेल तेव्हा, न्यायालय त्याला तद्विरुध्द कारणे न आढळल्यास, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी आपली आदेशिका काढील.

(२) अशा प्रत्येक आदेशिकेवर, ज्या दिवशी ती काढण्यात आली असेल तो दिवस व तारीख असेल आणि न्यायाधीशाने किंवा याबाबत न्यायालय ज्याला नेमील अशा अधिकाऱ्याने त्यावर स्वाक्षरी केली पाहिजे, आणि तीवर न्यायालयाची मोहोर लावून ती मोहोरबंद करण्यात येईल व अंमलबजावणी करण्यासाठी ती योग्य अधिकाऱ्याकडे सुपूर्द केली जाईल.

[१][(३) अशा प्रत्येक आदेशिकेमध्ये कोणत्या दिवशी किंवा कोणत्या दिवसापूर्वी तिची अंमलबजावणी करण्यात यावी, तो दिवस विनिर्दिष्ट करण्यात येईल, तसेच, कोणत्या दिवशी किंवा कोणत्या दिवसापूर्वी ती न्यायालयाला परत करावी, तोही दिवस विनिर्दिष्ट करण्यात येईल, पण आदेशिका परत करण्याचा दिवस तीत विनिर्दिष्ट केलेला नसला तरी त्यामुळे ती शून्य असल्याचे मानले जाणार नाही.]

आदेशिकेवर पृष्ठांकन.

२५. (१) अंमलबजावणीचे काम ज्याच्यावर सोपवण्यात आले असेल त्या अधिकाऱ्याने, कोणत्या दिवशी व कोणत्या पद्धतीने त्या आदेशिकेची अंमलबजावणी करण्यात आली ते आणि आदेशिका परत करण्याची जी शेवटची तारीख तीत विनिर्दिष्ट केलेली असेल ती उलटून गेली असल्यास, विलंब होण्याचे कारण, किंवा, तिची अंमलबजावणी झाली नाही तर, ती अंमलबजावणी का झाली नाही, ते कारण त्यावर नमूद करावे. आणि अशा पृष्ठांकनासह ती आदेशिका न्यायालयाकडे परत पाठवावी.

(२) असा अधिकारी आदेशिकेची अंमलबजावणी करण्यास असमर्थ आहे अशा आशयाचे, ते पृष्ठांकन असेल तेव्हा, न्यायालय, त्याच्या या कथित असमर्थतेबाबत त्याची तपासणी घेईल, आणि स्वत:ला योग्य वाटेल तर, अशा असमर्थतेच्या मुद्यावर साक्षीदारांना बोलावून त्यांची तपासणी करून निष्कर्ष नमूद करु शकेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (दहा) द्वारे बदलीदाखल करण्यात आले.

---

[१][२४. (१) जेव्हा मागील नियमांद्वारे आवश्यक असेल अशी प्रारंभिक कार्यवाही (कोणतीही असल्यास) करण्यात आली असेल तेव्हा, न्यायालय, त्याला तद्विरुध्द कारणे न आढळल्यास, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी आपली आदेशिका काढील.

अंमलबजावणी करण्यासाठी आदेशिका.

(२) अशा प्रत्येक आदेशिकेवर, ज्या दिवशी ती काढण्यात आली असेल, तो दिवस व तारीख असेल आणि न्यायाधीशाने किंवा याबाबत न्यायालय ज्याला नेमील, अशा अधिकाऱ्याने त्यावर स्वाक्षरी केली पाहिजे, आणि तीवर न्यायालयाची मोहोर लावून ती मोहोरबंद करण्यात येईल व अंमलबजावणी करण्यासाठी ती योग्य अधिकाऱ्याकडे सुपूर्द केली जाईल:

परंतु, दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठस्तर, आपल्या विशेष अधिकारितेमध्ये ही आदेशिका, त्या न्यायालयातील योग्य अधिकाऱ्यामार्फत, अंमलबजावणीसाठी त्याच जिल्ह्यातील अन्य न्यायालयाकडे पाठवू शकेल.

(३) अशा प्रत्येक आदेशिकेमध्ये कोणत्या दिवशी किंवा कोणत्या दिवसापूर्वी तिची अंमलबजावणी करण्यात यावी, तो दिवस विनिर्दिष्ट करण्यात येईल तसेच, कोणत्या दिवशी किंवा कोणत्या दिवसापूर्वी ती न्यायालयाला परत करावी, तोही दिवस विनिर्दिष्ट करण्यात येईल, पण आदेशिका परत करण्याचा दिवस तीत विनिर्दिष्ट केलेला नसला तरी त्यामुळे ती शून्य असल्याचे मानले जाणार नाही.]

आदेशिकेवर पृष्ठांकन.

२५. (१) अंमलबजावणीचे काम ज्याच्यावर सोपविण्यात आले असेल त्या अधिकाऱ्याने, कोणत्या दिवशी व कोणत्या पद्धतीने त्या आदेशिकेची अंमलबजावणी करण्यात आली ते आणि आदेशिका परत करण्याची जी शेवटची तारीख तीत विनिर्दिष्ट केलेली असेल ती उलटून गेली असल्यास, विलंब होण्याचे कारण, किंवा तिची अंमलबजावणी झाली नाही तर, ती अंमलबजावणी का झाली नाही ते कारण त्यावर नमूद करावे. आणि अशा पृष्ठांकनासह ती आदेशिका न्यायालयाकडे परत पाठवावी.

(२) असा अधिकारी आदेशिकेची अंमलबजावणी करण्यास असमर्थ आहे अशा आशयाचे ते पृष्ठांकन असेल तेव्हा, न्यायालय, त्याच्या या कथित असमर्थतेबाबत त्याची तपासणी घेईल, आणि स्वत:ला योग्य वाटेल तर, अशा असमर्थतेच्या मुद्यावर साक्षीदारांना बोलावून त्यांची तपासणी करून निष्कर्ष नमूद करु शकेल :[२]

परंतु, न्यायालयाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार नाझर किंवा उप नाझर यांनी

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (४) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (५) द्वारे मूळ बदलीदाखल करण्यात आले.

आदेशिकेची अंमलबजावणी ज्याच्यावर सोपवली आहे, त्या अधिकाऱ्याची तपासणी करणे, हे या नियमाखालील आवश्यक गोष्टींचे पुरेसे अनुपालन असल्याचे मानण्यात येईल.]

अंमलबजावणीची स्थगिती

न्यायालयास अंमलबजावणी केव्हा स्थगित करता येईल.

२६. (१) हुकूमनामा अंमलबजावणीसाठी ज्याच्याकडे पाठविण्यात आला असेल ते न्यायालय, न्यायनिर्णीत ऋणकोला, ज्याने हुकूमनामा काढला त्या न्यायालयाकडे अथवा हुकूमनामा किंवा त्याची अंमलबजावणी याबाबत, अपील अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे अंमलबजावणी स्थगित करण्याच्या आदेशासाठी अथवा अशा प्रारंभिक न्यायालयाने किंवा अपील न्यायालयाने अंमलबजावणी आदेश काढला असता, किंवा त्याच्याकडे अंमलबजावणीसाठी अर्ज करण्यात आला असता तर ते हुकूमनामा किंवा अंमलबजावणी यासंबंधी जो आदेश देऊ शकले असते अशा अन्य कोणत्याही आदेशासाठी अर्ज करणे शक्य व्हावे म्हणून, पुरेसे कारण दाखवण्यात आल्यावर, अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी वाजवी मुदतीपर्यंत स्थगित करील.

(२) जेव्हा अंमलबजावणीअन्वये न्यायनिर्णीत ऋणकोची मालमत्ता किंवा खुद्द ती व्यक्ती सक्तीने ताब्यात घेण्यात आली असेल तेव्हा, ज्या न्यायालयाने ती अंमलबजावणी दिलेली असेल ते न्यायालय, अर्जाचा निकाल होईपर्यंत, मालमत्ता परत देण्याचा किंवा अशा व्यक्तीला सोडण्याचा आदेश देऊ शकेल.

न्यायनिर्णीत ऋणकोला प्रतिभूती देण्यास फर्मावण्याची किंवा त्याच्यावर शर्ती लादण्याची शक्ती.

(३) अंमलबजावणी स्थगित करण्याचा किंवा मालमत्ता परत करण्याचा किंवा न्यायनिर्णीत ऋणकोला सोडण्याचा आदेश देण्यापूर्वी, [१][न्यायालय] स्वतःला योग्य वाटेल, अशी प्रतिभूती देण्यास न्यायनिर्णीत ऋणकोला फर्मावील किंवा त्याच्यावर अशा शर्ती लादील.

२६. (१) हुकूमनामा अंमलबजावणीसाठी ज्याच्याकडे पाठवण्यात आला असेल ते न्यायालय, न्यायनिर्णीत ऋणकोला, ज्याने हुकूमनामा काढला त्या न्यायालयाकडे अथवा हुकूमनामा किंवा त्याची अंमलबजावणी याबाबत अपील अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे अंमलबजावणी स्थगित करण्याच्या आदेशासाठी अथवा अशा प्रारंभिक न्यायालयाने किंवा अपील न्यायालयाने अंमलबजावणी आदेश काढला असता, किंवा त्याच्याकडे अंमलबजावणीसाठी अर्ज करण्यात आला असता तर, ते हुकूमनामा किंवा अंमलबजावणी यासंबंधी जो आदेश देऊ शकले असते अशा, अन्य कोणत्याही आदेशासाठी अर्ज करणे शक्य व्हावे म्हणून, पुरेसे कारण दाखवण्यात आल्यावर, अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी वाजवी मुदतीपर्यंत स्थगित करील.

(२) जेव्हा अंमलबजावणीअन्वये न्यायनिर्णीत ऋणकोची मालमत्ता किंवा खुद्द ती व्यक्ती सक्तीने ताब्यात घेण्यात आली असेल तेव्हा, ज्या न्यायालयाने अंमलबजावणी दिलेली असेल ते न्यायालय, अर्जाचा निकाल होईपर्यंत, मालमत्ता परत देण्याचा किंवा अशा व्यक्तीला सोडण्याचा आदेश देऊ शकेल.

[१][(३) अंमलबजावणी स्थगित करण्याचा किंवा मालमत्ता परत करण्याचा किंवा न्यायनिर्णीत ऋणकोला सोडण्याचा आदेश देण्यापूर्वी, एतद्विरुद्ध योग्य कारण दर्शविण्यात आले नाही तर, न्यायालय स्वतःला योग्य वाटेल अशी प्रतिभूती, देण्यास न्यायनिर्णीत ऋणकोला फर्मावील किंवा त्याच्यावर अशा शर्ती लादील.]

न्यायालयास अंमलबजावणी केव्हा स्थगित करता येईल.

न्यायनिर्णीत ऋणकोला प्रतिभूती देण्यास फर्मावण्याची किंवा त्याच्यावर शर्ती लादण्याची शक्ती.

सोडून दिलेल्या न्यायनिर्णीत ऋणकोचे दायित्व.

२७. नियम २६ खाली मालमत्ता परत देण्यासंबंधीच्या किंवा न्यायनिर्णीत ऋणकोला सोडण्यासंबंधीच्या कोणत्याही आदेशामुळे अंमलबजावणीसाठी पाठविलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये त्या ऋणकोची मालमत्ता किंवा खुद्द त्या व्यक्तीला पुन्हा सक्तीने ताब्यात घेण्यास प्रतिबंध होणार नाही.

हुकूमनामा काढणाऱ्या न्यायालयाचा किंवा अपील न्यायालयाचा आदेश, ज्या न्यायालयाकडे वर्ग करण्यात आला असेल त्यावर बंधनकारक असेल.

२८. ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला असेल त्या न्यायालयाने किंवा पूर्वोक्त अशा अपील न्यायालयाने अशा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या संबंधात दिलेला आदेश, ज्या न्यायालयाकडे हुकूमनामा अंमलबजावणीसाठी पाठविलेला होता त्याच्यावर बंधनकारक असेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (अकरा) या अन्वये बदली दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ६५ द्वारे बदलीदाखल करण्यात आले.

हुकूमनामाधारक आणि न्यायनिर्णीत ऋणको यांच्यामध्ये दावा प्रलंबित असेपर्यंत अंमलबजावणीची स्थगिती.

२९. ज्या व्यक्तीच्या विरुद्ध हुकूमनामा काढण्यात आला आहे त्या व्यक्तीव्यतिरिक्त एखाद्या न्यायालयात अशा न्यायालयाचा हुकूमनामा [१][किंवा अशा न्यायालयाकडून ज्याची अंमलबजावणी चालू आहे असा हुकूमनामा] धारण करणाऱ्याविरुद्ध दावा प्रलंबित असेल तेव्हा, ते न्यायालय स्वत:ला योग्य वाटेल, अशा प्रतिभूतीवर किंवा अन्य कोणत्याही अटींवर प्रलंबित दाव्याचा निकाल लागेपर्यंत हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करू शकेल :

[१][परंतु, हुकूमनामा पैशांच्या प्रदानासंबंधीचा असेल तेव्हा, न्यायालयाने प्रतिभूती न मागवता स्थगिती दिली असेल तर, ते न्यायालय तसे करण्याबद्दलची आपली कारणे नमूद करील.]

अंमलबजावणीची पद्धती

पैशांच्या प्रदानासंबंधीचा हुकूमनामा.

३०. पैशांच्या प्रदानासंबंधीचा प्रत्येक हुकूमनामा-अन्य प्रकारच्या अनुतोषाला पर्याय म्हणून दिलेला पैशांच्या प्रदानासंबंधीचा हुकूमनामासुद्धा यात समाविष्ट आहे.—त्याची अंमलबजावणी न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून किंवा त्याच्या मालमत्तेची जप्ती आणि विक्री करून किंवा दोन्हीप्रकारे करता येईल.

विनिर्दिष्ट जंगम मालमत्तेकरिता हुकूमनामा.

३१. (१) जेव्हा हुकूमनामा कोणत्याही विनिर्दिष्ट जंगम (मालमत्तेकरता) किंवा विनिर्दिष्ट जंगम (मालमत्तेतील) कोणत्याही हिश्शाकरिता असेल तेव्हा, व्यवहार्य असल्यास, जंगम (मालमत्तेचे) किंवा तिच्यातील हिश्शाचे अभिग्रहण करून, आणि ज्या पक्षकाराकरिता ती अभिनिर्णीत करण्यात आली असेल, त्या पक्षकाराकडे किंवा त्याच्यावतीने सुपूर्दगी स्वीकारण्यासाठी तो नियुक्त करील अशा व्यक्तीकडे सुपूर्द करून किंवा न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून किंवा त्याची मालमत्ता जप्त करून किंवा दोन्ही प्रकारे त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता येईल.

(२) पोटनियम (१) खालील कोणतीही जप्ती [३][तीन महिने] अंमलात राहिली असेल त्याबाबतीत, न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याचे पालन केले नसेल आणि जप्त केलेली मालमत्ता विकण्यात यावी असा अर्ज हुकूमनामाधारकाने केला असेल तर, अशी मालमत्ता विकता येईल आणि त्या उत्पन्नातून न्यायालय, जंगम मालमत्तेच्या सुपूर्दगीचा पर्याय म्हणून कोणतीही रक्कम हुकूमनाम्याद्वारे निश्चित करण्यात आली असेल अशा बाबतीत, अशी रक्कम आणि इतर प्रकरणी स्वत:ला योग्य वाटेल अशी भरपाई निवाडयाने देऊ शकेल, आणि शिल्लक रक्कम, (काही असल्यास), न्यायनिर्णीत ऋणकोने अर्ज केल्यास त्याला देईल.

(३) न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याचे पालन केले असेल आणि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी जो खर्च देण्यास तो बांधलेला आहे असा सर्व खर्च त्याने दिला असेल किंवा जप्तीच्या तारखेपासून [३][तीन महिन्यांच्या] अखेरपर्यंत

विनिर्दिष्ट जंगम मालमत्तेकरिता हुकूमनामा.

(१) जेव्हा हुकूमनामा कोणत्याही विनिर्दिष्ट जंगम (मालमत्तेकरिता) किंवा विनिर्दिष्ट जंगम मालमत्तेतील कोणत्याही हिश्शाकरिता असेल तेव्हा, व्यवहार्य असल्यास, जंगम (मालमत्तेचे) किंवा तिच्यातील हिश्शाचे अभिग्रहण करून आणि ज्या पक्षकाराकरिता ती अभिनिर्णीत करण्यात आली असेल, त्या पक्षकाराकडे किंवा त्याच्यावतीने सुपूर्दगी स्वीकारण्यासाठी तो नियुक्त करील, अशा व्यक्तीकडे सुपूर्द करून किंवा न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून किंवा त्याची मालमत्ता जप्त करून किंवा दोन्ही प्रकारे त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता येईल.

[१][(२) पोटनियम (१) खालील कोणतीही जप्ती तीन महिने (किंवा न्यायालय कोणत्याही विशेष प्रकरणात, दर्शवलेल्या सबळ कारणासाठी निदेश देईल अशा आणखी कालावधीसाठी) अंमलात राहिली असेल त्याबाबतीत, न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याचे पालन केले नसेल आणि जप्त केलेली मालमत्ता विकण्यात यावी असा अर्ज हुकूमनामाधारकाने केला असेल तर, अशी मालमत्ता विकता येईल, आणि त्या उत्पन्नातून, न्यायालय जंगम मालमत्तेच्या सुपूर्दगीचा पर्याय म्हणून कोणतीही रक्कम हुकूमनाम्याद्वारे निश्चित करण्यात आली असेल अशाबाबतीत, अशी रक्कम आणि इतर प्रकरणी स्वत:ला योग्य वाटेल अशी भरपाई निवाडयाने देऊ शकेल, आणि शिल्लक रक्कम, (काही असल्यास), न्यायनिर्णीत ऋणकोने अर्ज केल्यास त्याला देईल.

(३) न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याचे पालन केले असेल आणि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी जो खर्च देण्यास तो बांधलेला आहे, असा सर्व खर्च त्याने दिला असेल किंवा जप्तीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या (किंवा न्यायालय कोणत्याही विशेष

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (अकरा) या अन्वये "न्यायालय मागवू शकेल" या मजकुराऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (बारा) (ख) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (तेरा) अन्वये "सहा महिन्यांच्या" याऐवजी बदली दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ६६ द्वारे बदलीदाखल करण्यात आले.

लमामत्तेच्या विक्रीसाठी कोणताही अर्ज करण्यात आलेला नसेल किंवा आलेला असल्यास तो नाकारण्यात आला असेल तर, जप्ती संपुष्टात येईल.

प्रकरणात, दर्शवलेल्या सबळ कारणासाठी निदेश देईल अशा आणखी कालावधीच्या) अखेरपर्यंत मालमत्तेच्या विक्रीसाठी कोणताही अर्ज करण्यात आलेला नसेल किंवा आलेला असल्यास, तो नाकारण्यात आला असेल तर, जप्ती संपुष्टात येईल.]

दांपत्य अधिकाराच्या प्रत्यास्थापनाचे यथोक्त पालन करण्यासाठी किंवा मनाई हुकमासाठी हुकूमनामा.

३२. (१) ज्या पक्षकाराविरुद्ध एखाद्या संविदेचे यथोक्त पालन करण्यासाठी किंवा दांपत्याधिकारांचे प्रत्यास्थापत करण्यासाठी किंवा मनाई हुकूमासाठी हुकूमनामा काढण्यात आला असेल, त्या पक्षकाराला हुकूमनाम्याचे पालन करण्याची संधी मिळालेली असतानाही त्याने त्याचे पालन करण्यात बुद्धिपुरःसर कसूर केली असेल तर, [1][दांपत्याधिकारांच्या प्रत्यास्थापनासाठी केलेल्या हुकूमनाम्याच्या बाबतीत त्याची मालमत्ता जप्त करून अथवा संविदेच्या यथोक्त पालनासाठी किंवा मनाई हुकूमासाठी केलेल्या हुकूमनाम्याच्या बाबतीत] त्याला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून त्याची मालमत्ता जप्त करून किंवा दोन्ही प्रकारे हुकूमनामा बजावता येईल.

(२) ज्याच्याविरुद्ध यथोक्त पालनाकरिता किंवा मनाई हुकमाकरिता हुकूमनामा काढण्यात आला असेल, तो पक्षकार म्हणजे एखादा निगम असेल तर, निगमाची मालमत्ता जप्त करून अथवा न्यायालयाच्या परवानगीने त्याचे संचालक किंवा अन्य प्रधान अधिकारी यांना दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून, अथवा जप्ती व स्थानबद्धता अशा दोन्ही मार्गांनी हुकूमनामा बजावता येईल.

(३) पोटनियम (१) किंवा पोटनियम (२) खालील कोणताही जप्तीचा हुकूमनामा [2][सहा महिन्यांकरिता] अंमलात राहिला असेल त्याबाबतीत, न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याचे पालन केलेले नसेल व जप्त मालमत्तेची विक्री केली जावी, म्हणून हुकूमनामाधारकाने अर्ज केला असेल तर, अशा मालमत्तेची विक्री करता येईल आणि विक्रीच्या उत्पन्नातून न्यायालय, स्वतःस योग्य वाटेल अशी भरपाईची रक्कम हुकूमनामाधारकास निवाडयाने देववू शकेल, व शिल्लक रक्कम (काही असल्यास), न्यायनिर्णीत ऋणकोने अर्ज केल्यास, त्याला देईल.

(४) न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याचे पालन केले असेल आणि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचा जो खर्च देण्यास तो बांधलेला आहे असा सर्व खर्च त्याने दिला असेल किंवा जप्तीच्या तारखेपासून [2][सहा महिन्यांच्या] अखेरपर्यंत मालमत्तेच्या विक्रीसाठी कोणताही अर्ज करण्यात आलेला नसेल किंवा करण्यात आलेला असल्यास तो नाकारण्यात आला असेल तर, जप्ती संपुष्टात येईल.

(५) संविदेच्या यथोक्त पालनासाठी किंवा एखाद्या मनाई हुकूमासाठी काढलेल्या हुकूमनाम्याचे पालन करण्यात आलेले नसेल तर, न्यायालय उपरोक्त सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही आदेशिकांच्या ऐवजी किंवा त्यांच्या जोडीला असा निदेश देऊ शकेल की, जी कृती करणे आवश्यक असेल अशी कृती, व्यवहार्य असेल तेथवर, हुकूमनामाधारकाने किंवा न्यायालयाकडून नेमणूक करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने न्यायनिर्णीत ऋणकोच्या खर्चाने करावी, आणि ती कृती करण्यात आल्यानंतर, आलेला खर्च न्यायालय निदेश देईल अशा रीतीने निश्चित करता येईल आणि तो खर्च हुकूमनाम्यात समाविष्ट असावा त्याप्रमाणे वसूल करता येईल.

उदाहरण

'क' हा एक सुथार ऐपतीचा मनुष्य असून तो एक इमारत बांधतो. त्यामुळे 'ख' च्या कुटुंबाचे घर राहण्यास अयोग्य बनते. ती इमारत काढून टाकण्याचा आदेश देण्यासाठी 'ख' ने 'क' विरुद्ध मिळवलेल्या हुकूमनाम्याचे पालन करण्यास 'क' हा, त्याला तुरुंगात टाकले व त्याची मालमत्ता जप्त केली, तरीही नकार देतो. 'क' ची मालमत्ता विकून मिळणाऱ्या रकमेमुळे, 'ख' च्या वाडयाच्या मूल्यात जी घट झाली आहे, ती भरून येणार नाही, असे न्यायालयाचे मत आहे. इमारत काढून टाकण्यात यावी म्हणून 'ख' न्यायालयाकडे अर्ज करू शकेल व ती काढून टाकण्याचा खर्च अंमलबजावणी कार्यवाहीमध्ये 'क' कडून वसूल करू शकेल.

---

१. सन १९२३ चा अधिनियम २९, कलम २ द्वारे घातले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (चौदा) अन्वये "एका वर्षाकरिता" याऐवजी बदलीदाखल केले.

दांपत्याधिकाराच्या प्रत्यास्थापनाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत न्यायालयाचा विवेकाधिकार.

३३. (१) नियम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दांपत्य अधिकाराच्या प्रत्यास्थापनाकरिता [१][पतीच्या विरुद्ध] हुकूमनामा काढतेवेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, न्यायालय [२][या नियमात उपबंध केलेल्या रीतीने हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यात यावी] असा आदेश देऊ शकेल.

(२) पोटनियम (१) खाली न्यायालयाने आदेश काढला असेल [३][* * *] त्याबाबतीत, न्यायालय, यासंबंधात निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत हुकूमनाम्याचे पालन करण्यात न आल्यास, न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनामाधारकाला न्याय्य असतील त्याप्रमाणे नियतकालिक प्रदाने करावीत असा आदेश देऊ शकेल आणि, न्यायालयाला योग्य वाटल्यास, न्यायालयाची खात्री पटेल अशा रीतीने, न्यायनिर्णीत ऋणकोने अशा नियतकालिक प्रदानांची हुकूमनामाधारकाला हमी द्यावी, असे फर्मावू शकेल.

(३) पैशांच्या नियतकालिक प्रदानासाठी पोटनियम (२) खाली काढलेल्या कोणत्याही आदेशात, प्रदानाच्या वेळा बदलून अथवा रकमेत वाढ किंवा घट करून न्यायालयास फेरबदल किंवा आपरिवर्तन करता येईल, अथवा जितके पैसे देण्याचा आदेश झाला आहे, ती संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही अंश याच्यासंबंधात, तो हुकूमनामा तात्पुरता स्थगित करता येईल आणि स्वतःस योग्य वाटेल त्याप्रमाणे संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही अंश यांच्याबाबत तो हुकूमनामा पुनरुज्जीवित करता येईल.

(४) या नियमाखाली ज्या रकमेच्या प्रदानाचा आदेश देण्यात आला असेल, ती रक्कम पैशांच्या प्रदानाच्या हुकूमनाम्याखाली देय असावी त्याप्रमाणे वसूल करता येईल.

दस्तऐवजाचे निष्पादन किंवा परक्राम्य संलेखाचे पृष्ठांकन याकरिता हुकूमनामा.

३४. (१) दस्तऐवजाचे निष्पादन किंवा परक्राम्य संलेखाचे पृष्ठांकन यासाठी हुकूमनामा काढण्यात आला असेल आणि न्यायनिर्णीत ऋणकोने हुकूमनाम्याचे पालन करण्याची उपेक्षा केली किंवा त्यास नकार दिला तर त्याबाबतीत, हुकूमनामाधारकास हुकूमनाम्याच्या अटींनुसार दस्तऐवज किंवा पृष्ठांकन याचा मसुदा तयार करता येईल आणि तो न्यायालयाकडे सादर करता येईल.

(२) त्यानंतर न्यायालय न्यायनिर्णीत ऋणकोवर तो मसुदा व सोबत, याबाबतीत न्यायालय निश्चित करील अशा मुदतीत त्याने आपल्या हरकती (काही असल्यास) दाखल कराव्यात असे फर्माविणारी नोटीस बजावण्याची व्यवस्था करील.

(३) न्यायनिर्णीत ऋणकोची मसुद्याला हरकत असेल तेव्हा, ऋणकोला आपल्या हरकती अशा मुदतीत लेखी स्वरूपात द्याव्या लागतील आणि योग्य वाटेल त्याप्रमाणे ते न्यायालय मसुदा मान्य करणार किंवा त्यात फेरबदल करण्याचा आदेश काढील.

(४) न्यायालयाने जे फेरबदल करावयास सांगितले असतील असे फेरबदल (काही असल्यास) करून त्या फेरबदलांसह मसुद्याची प्रत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार जर मुद्रांक आवश्यक असेल तर, योग्य त्या मुद्रांक पत्रावर लिहिलेली एक प्रत हुकूमनामाधारक न्यायालयास सादर करील आणि न्यायाधीश किंवा याबाबतीत नियुक्त करण्यात येईल असा अधिकारी अशा प्रकारे सादर केलेला दस्तऐवज निष्पादित करून देईल.

(५) या नियमाखालील दस्तऐवजाचे निष्पादन किंवा परक्रास्य संलेखाचे पृष्ठांकन पुढील नमुन्यात करता येईल, ते असे :—

"ग, घ,———— न्यायालयाचा न्यायाधीश (किंवा, प्रकरणपरत्वे,) क, ख विरुद्ध ङ, च याने लावलेल्या दाव्यामध्ये क ख करिता" आणि दस्तऐवजाचे निष्पादन किंवा पृष्ठांकन करण्याचा ज्या पक्षकाराला आदेश देण्यात आला असेल, त्या पक्षकाराने त्याचे निष्पादन किंवा पृष्ठांकन केलेले असावे, त्याप्रमाणे परिणामक होईल.

[४][(६) (क) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वये, त्या दस्तऐवजाची नोंदणी आवश्यक असेल तर, न्यायालय किंवा याबाबतीत न्यायालयाकडून प्राधिकृत करण्यात येईल असा अधिकारी, त्या दस्तऐवजाची अशा कायद्यानुसार नोंदणी करून घेण्याची व्यवस्था करील.

(ख) याप्रमाणे दस्तऐवजाची नोंदणी आवश्यक नसली, तरी पण हुकूमनामाधारक त्याची नोंदणी करून घेऊ इच्छित असेल तर, न्यायालयास स्वतःला योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(ग) जेव्हा न्यायालय कोणत्याही दस्तऐवजाच्या नोंदणीचा आदेश काढील तेव्हा, ते नोंदणीच्या खर्चासंबंधी स्वतःला योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल.]

स्थावर मालमत्तेकरिता हुकूमनामा.

३५. (१) हुकूमनामा एखाद्या स्थावर मालमत्तेच्या सुपूर्दगीकरिता असेल त्याबाबतीत, ज्याच्या बाजूने अभिनिर्णय करून तो हुकूमनामा काढण्यात आला असेल त्या पक्षकाराकडे किंवा याबाबतीत स्वतःच्या वतीने सुपूर्दगी स्वीकारण्यासाठी तो नियुक्त करील अशा व्यक्तीकडे, आणि आवश्यक असेल्यास हुकूमनाम्याने बांधील असलेली जी कोणतीही व्यक्ती मालमत्तेची जागा रिक्त करून देण्यास नकार देईल अशा कोणत्याही व्यक्तीस काढून लावून त्या मालमत्तेचा कब्जा सुपूर्दगी करण्यात येईल.

---

१. सन १९२३ चा अधिनियम २९ कलम ३ अन्वये घालण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये बदलीदाखल करण्यात आला.
३. वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये "आणि हुकूमनामाधारक पत्नी असेल" हा मजकूर वगळण्यात आला.
४. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (पंधरा) अन्वये बदलीदाखल केले.

(२) हुकूमनामा स्थावर मालमत्तेच्या संयुक्त कब्जाकरिता असेल त्याबाबतीत, मालमत्तेच्या जागेतील एखाद्या ठळक ठिकाणी वॉरंटची प्रत चिकटवून अथवा एखाद्या सोईस्कर ठिकाणी दवंडी पिटवून किंवा अन्य शिरस्तेवाईक पद्धतीने हुकूमनाम्याचे सार अधिघोषित करून असा कब्जा सुपूर्द करण्यात येईल.

(३) कोणतीही इमारत किंवा बंदिस्त जागा यांचा कब्जा सुपूर्द करण्यात यावयाचा असेल आणि कब्जाधारक व्यक्ती हुकूमनाम्याने बांधील असूनही तिने त्या जागी प्रवेशास मुक्तद्वार ठेवले नाही तर, न्यायालय, आपल्या अधिकाऱ्यांच्या मार्फत, वाजवी इशारा देऊन आणि देशाच्या रूढीनुसार चारचौघात समोर न येणाऱ्या कोणत्याही स्त्रीला तेथून निघून जाण्याची सुविधा देऊन, तेथील कोणतेही कुलूप किंवा कडी काढून टाकू शकेल किंवा उघडू शकेल किंवा कोणताही दरवाजा फोडून उघडू शकेल किंवा हुकूमनामाधारकाला कब्जा मिळवून देण्यासाठी आवश्यक असेल अशी अन्य कोणतीही कृती करू शकेल.

भाडेकरूच्या भोगवटयात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या सुपूर्दगीचा हुकूमनामा.

३६. हुकूमनामा कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या सुपूर्दगीकरता असेल व ती मालमत्ता भाडेकरू किंवा त्या स्थावर मालमत्तेचा भोगवटा करण्यास हक्कदार असलेली अन्य व्यक्ती यांच्या भोगवटयात असून, हुकूमनाम्यानुसार असा भोगवटा सोडून देण्यास तो बांधील नसेल त्याबाबतीत, न्यायालय, मालमत्तेच्या ठिकाणी एखाद्या ठळक जागी, वॉरंटची प्रत चिकटवून अथवा एखाद्या सोईस्कर ठिकाणी दवंडी पिटवून किंवा अन्य शिरस्तेवाईक पद्धतीने मालमत्तेसंबंधीच्या हुकूमनाम्याचे सार भोगवटादाराला अधिघोषित करून, सुपूर्दगी करण्यात यावी असा आदेश देईल.

अटक व दिवाणी कारागृहात स्थानबद्धता

न्यायनिर्णीत ऋणकोला, दिवाणी कारागृहातील स्थानबद्धतेच्या विरुद्ध कारणे दाखवण्याची परवानगी देण्याचा विवेकाधिकार.

३७. (१) या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा न्यायनिर्णीत ऋणकोला अटक करून आणि त्याला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून त्याद्वारे पैशांचे प्रदान करण्याबाबतच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याकरता अर्ज दिलेला असून, त्यानुसार न्यायनिर्णीत ऋणको अटक होण्यास पात्र असेल तेव्हा, न्यायालय त्याच्या अटकेचे वॉरंट काढण्याऐवजी, एक नोटीस काढून, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी त्याने न्यायालयासमोर उपस्थित व्हावे आणि त्याला दिवाणी कारागृहात का पाठविण्यात येऊ नये यासंबंधी कारण दाखवावे असे त्यास [1][फर्मावील.] :

[1][परंतु, न्यायनिर्णीत ऋणको फरारी होण्याची किंवा तो न्यायालयाच्या स्थानिक सीमांच्या बाहेर जाण्याची शक्यता असून त्यामागे हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस विलंब लावण्याचा उद्देश आहे किंवा परिणामी तसे घडणार आहे अशी, शपथपत्राद्वारे किंवा अन्यप्रकारे न्यायालयाची खात्री पटविल्यास, अशा नोटिशीची आवश्यकता असणार नाही.]

(२) न्यायनिर्णीत ऋणको नोटिशीला अनुसरून उपस्थित झाला नसेल त्याबाबतीत, हुकूमनामाधारकाने तशी मागणी केली तर, न्यायालय, न्यायनिर्णीत ऋणकोच्या अटकेचे वॉरंट काढील.

न्यायनिर्णीत ऋणकोला न्यायालयासमोर उपस्थित करण्याचा निदेश देण्यासाठी अटकेचे वॉरंट.

३८. न्यायनिर्णीत ऋणकोच्या अटकेकरिता काढलेल्या प्रत्येक वॉरंटमध्ये, त्याला जी रक्कम भरण्याचा आदेश दिलेला आहे ती रक्कम तीवरील व्याजासह व तो जो दावा खर्च देण्यास दायी होईल असा दावा खर्च (असल्यास) यांचा त्याने आधी भरणा केला नाही तर, सोईस्कर असेल तितक्या त्वरेने, त्याला न्यायालयासमोर उपस्थित करावे असा निदेश ज्याच्याकडे वॉरंटची अंमलबजावणी सोपवण्यात आली असेल त्या अधिकाऱ्याला देण्यात येईल.

निर्वाह भत्ता.

३९. (१) कोणत्याही न्यायनिर्णीत ऋणकोला, त्याच्या अटकेपासून त्याला न्यायालयासमोर उपस्थित करणे शक्य होईपर्यंतच्या त्याच्या निर्वाहाकरिता न्यायाधीशास पुरेशी वाटेल अशी रक्कम हुकमनामाधारकाने न्यायालयात भरल्याखेरीज, हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून अटक करण्यात येणार नाही.

(२) हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात पाठवण्यात आले असेल त्याबाबतीत, न्यायालय, कलम ५७ खाली निश्चित केलेल्या श्रेणीनुसार तो हक्कदार असेल त्याप्रमाणे, किंवा अशा श्रेणी करण्यात आल्या नसतील तर, तो ज्या वर्गातील असेल,

निर्वाह भत्ता.

[1][३९. (१) कोणत्याही न्यायनिर्णीत ऋणकोला, त्याच्या अटकेपासून त्याला न्यायालयासमोर उपस्थित करणे शक्य होईपर्यंत त्याच्या निर्वाहाकरिता न्यायाधीशास पुरेशी वाटेल इतकी रक्कम आणि न्यायनिर्णीत ऋणकोला अटक केल्याच्या ठिकाणापासून न्यायगृहापर्यंत नेण्याच्या वाहनखर्चाची रक्कम हुकूमनामाधारकाने न्यायालयात भरल्याखेरीज, हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून अटक करण्यात येणार नाही.

(२) हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात पाठवण्यात आले असेल त्याबाबतीत, न्यायालय, कलम ५७ खाली निश्चित केलेल्या श्रेणीनुसार तो हक्कदार असेल त्याप्रमाणे, किंवा अशा श्रेणी निश्चित करण्यात आल्या नसतील तर, तो ज्या

---

१. सन १९३६ चा अधिनियम २१, कलम ३ अन्वये 'फर्मावू शकेल' याऐवजी हा मजकूर बदलीदाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (६) अन्वये बदली दाखल केले.

तो वर्ग लक्षात घेऊन न्यायालयाला पुरेसा वाटेल असा मासिक भत्ता त्याच्या निर्वाहाकरिता निश्चित करील.

(३) न्यायालयाने निश्चित केलेला मासिक भत्ता, ज्याच्या अर्जानुसार न्यायनिर्णीत ऋणकोला अटक करण्यात आली असेल अशा पक्षकाराकडून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवसापूर्वी आगाऊ मासिक प्रदानाच्या स्वरूपात दिला गेला पाहिजे.

(४) पहिले प्रदान, न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात पाठवण्यात येण्यापूर्वी, ते चालू महिन्याच्या उर्वरित कालावधीपुरते न्यायालयाच्या योग्य अधिकाऱ्याकडे करावे लागेल आणि त्यानंतरची प्रदाने (असल्यास) ती दिवाणी कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे करावी लागतील.

(५) न्यायनिर्णीत ऋणको दिवाणी कारागृहामध्ये असताना, त्याच्या निर्वाहाकरिता हुकूमनामधारकाने संवितरित केलेल्या रकमा म्हणजे दाव्यामधील खर्च असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, अशाप्रकारे संवितरित केलेल्या कोणत्याही रकमांबद्दल न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्यात येणार नाही किंवा त्याला अटक करण्यात येणार नाही.

नोटिशीला अनुसरून न्यायनिर्णीत ऋणको उपस्थित झाल्यावरची किंवा त्याला अटक केल्यानंतरची कार्यवाही.

[१][४०. (१) नियम ३७ खाली काढलेल्या नोटिशीला अनुसरून न्यायनिर्णीत ऋणको न्यायालयासमोर उपस्थित होईल, किंवा पैशाच्या प्रदानाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून त्याला अटक करून न्यायालयासमोर आणण्यात येईल तेव्हा, न्यायालय हुकूमनामाधारकाचे म्हणणे ऐकून घेण्यास सुरुवात करील आणि त्याने दिलेल्या अंमलबजावणीच्या अर्जाच्या पुष्टयर्थ त्याच्याकडून सादर करण्यात येईल असा सर्व पुरावा घेईल व त्यानंतर न्यायनिर्णीत ऋणकोला, त्याला दिवाणी कारागृहात का पाठवण्यात येऊ नये, त्याचे कारण दाखवण्याची संधी देईल.

(२) पोटनियम (१) खालील चौकशी प्रलंबित असेतोवर न्यायालय स्वविवेकानुसार, एकतर न्यायनिर्णीत ऋणकोला एखाद्या न्यायालयीन अधिकाऱ्याच्या हवाली करून स्थानबद्ध करण्यात यावे असा आदेश देऊ शकेल किंवा आवश्यक असेल तेव्हा त्याने उपस्थित व्हावे यासाठी त्याने न्यायालयाला समाधानकारक वाटेल अशी प्रतिभूती सादर केल्यानंतर त्यास मुक्त करू शकेल.

---

१. सन १९३६ चा अधिनियम २१, कलम ४ याद्वारे मूळ नियम ४० ऐवजी बदलीदाखल केला.

वर्गातील असेल, तो वर्ग लक्षात घेऊन न्यायालयास पुरेसा वाटेल असा मासिक भत्ता त्याच्या निर्वाहाकरिता निश्चित करील.

(३) न्यायालयाने निश्चित केलेला मासिक भत्ता, ज्याच्या अर्जानुसार न्यायनिर्णीत ऋणकोला अटक करण्यात आली असेल अशा पक्षकाराकडून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवसापूर्वी आगाऊ मासिक प्रदानाच्या स्वरूपात दिला गेला पाहिजे.

(४) न्यायनिर्णीत ऋणकोचा निर्वाह आणि त्यास न्यायगृह ते दिवाणी कारागृह आणि त्याच्या सुटकेनंतर दिवाणी कारागृह ते त्याचे नेहमीचे राहण्याचे ठिकाण या प्रवासासाठी येणारा वाहनखर्च यासाठी न्यायाधीशास पुरेशी वाटेल अशी रक्कम (काही असल्यास), व न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात पाठवण्यात येण्यापूर्वी चालू महिन्याच्या उर्वरित कालावधीपुरते, पोट-नियम (३) अन्वये द्यावयाचे पहिले आगाऊ प्रदान यासह न्यायालयाच्या योग्य त्या अधिकाऱ्याकडे दिले पाहिजे आणि त्यानंतरची प्रदाने (काही असल्यास) ती दिवाणी कारागृहाच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे करावी लागतील.

(५) या नियमान्वये न्यायनिर्णीत ऋणकोचा निर्वाह आणि वाहन खर्च (काही असल्यास) यासाठी हुकूमनामाधारकाने संवितरित केलेल्या रकमा म्हणजे दाव्यामधील खर्च असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, अशाप्रकारे संवितरित केलेल्या रकमांबद्दल कोणत्याही न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्यात येणार नाही किंवा त्याला अटक करण्यात येणार नाही.]

नोटिशीला अनुसरून न्यायनिर्णीत ऋणको उपस्थित झाल्यावरची किंवा त्याला अटक केल्यानंतरची कार्यवाही.

[१][४०. (१) नियम ३७ खाली काढलेल्या नोटिशीला अनुसरून न्यायनिर्णीत ऋणको न्यायालयासमोर उपस्थित होईल, किंवा पैशाच्या प्रदानाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी म्हणून त्याला अटक करून न्यायालयासमोर आणण्यात येईल तेव्हा, न्यायालय हुकूमनामाधारकाचे म्हणणे ऐकून घेण्यास सुरुवात करील आणि त्याने दिलेल्या अंमलबजावणीच्या अर्जाच्या पुष्टयर्थ त्याच्याकडून सादर करण्यात येईल असा सर्व पुरावा घेईल व त्यानंतर न्यायनिर्णीत ऋणकोला, त्याला दिवाणी कारागृहात का पाठवण्यात येऊ नये, त्याचे कारण दाखवण्याची संधी देईल.

(२) पोटनियम (१) खालील चौकशी प्रलंबित असेतोवर न्यायालय, स्वविवेकानुसार, एकतर न्यायनिर्णीत ऋणकोला न्यायालयीन अधिकाऱ्याच्या हवाली करून स्थानबद्ध करण्यात यावे असा आदेश देऊ शकेल किंवा आवश्यक असेल तेव्हा त्याने उपस्थित व्हावे यासाठी त्याने न्यायालयाला समाधानकारक वाटेल अशी प्रतिभूती सादर केल्यानंतर त्यास मुक्त करू शकेल.

---

१. सन १९३६ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ४ याद्वारे मूळ नियम ४० ऐवजी बदली दाखल केला.

(३) पोटनियम (१) खालील चौकशी संपल्यानंतर न्यायालयास कलम ५१ च्या आणि या संहितेच्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, न्यायालय, न्यायनिर्णीत ऋणकोस दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्यात यावे असा आदेश देऊ शकेल आणि तसे झाल्यास, त्याला अगोदरच अटक करण्यात आलेली नसेल, तर त्याला अटक करविण्याची व्यवस्था करील :

परंतु, न्यायनिर्णीत ऋणकोला हुकूमनाम्याची पूर्तता करण्याची संधी देण्याकरिता, न्यायालय, स्थानबद्धतेचा आदेश काढण्यापूर्वी, न्यायनिर्णीत ऋणकोला जास्तीत जास्त पंधरा दिवस एवढ्या विनिर्दिष्ट मुदतीपर्यंत, एखाद्या न्यायालयीन अधिकाऱ्याच्या हवाली करू शकेल किंवा विनिर्दिष्ट मुदत संपण्यापूर्वी हुकूमनाम्याची पूर्तता झाली नाही तर, ती मुदत संपताच त्याने न्यायालयासमोर उपस्थित व्हावे याकरिता न्यायालयाला समाधानकारक वाटेल अशी प्रतिभूती त्याने सादर केल्यास त्याला मुक्त करू शकेल.

(४) या नियमाखाली मुक्त केलेल्या न्यायनिर्णीत ऋणकोस पुन्हा अटक करता येईल.

(५) न्यायालयाने पोटनियम (३) खाली स्थानबद्धतेचा आदेश काढला नसेल तेव्हा, न्यायालय अर्ज नामंजूर करील आणि न्यायनिर्णीत ऋणको अटकेत असल्यास, त्याला मुक्त करण्याचा निदेश देईल.]

(३) पोटनियम (१) खालील चौकशी संपल्यानंतर न्यायालयास कलम ५१ च्या आणि या संहितेच्या अन्य उपबंधांच्या अधीनतेने, न्यायालय न्यायनिर्णीत ऋणकोस दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्यात यावे असा आदेश देऊ शकेल आणि तसे झाल्यास, त्याला अगोदरच अटक करण्यात आलेली नसेल, तर याला अटक करविण्याची व्यवस्था करील :

परंतु, न्यायनिर्णीत ऋणकोला हुकूमनाम्याची पूर्तता करण्याची संधी देण्याकरिता, न्यायालय, स्थानबद्धतेचा आदेश काढण्यापूर्वी, न्यायनिर्णीत ऋणकोला जास्तीत जास्त पंधरा दिवस एवढ्या विनिर्दिष्ट मुदतीपर्यंत, एखाद्या न्यायालयीन अधिकाऱ्याच्या हवाली करू शकेल किंवा विनिर्दिष्ट मुदत संपण्यापूर्वी हुकूमनाम्याची पूर्तता झाली नाही तर, ती मुदत संपताच त्याने न्यायालयासमोर उपस्थित व्हावे याकरिता न्यायालयाला समाधानकारक वाटेल अशी प्रतिभूती त्याने सादर केल्यास त्याला मुक्त करू शकेल.

(४) या नियमाखाली मुक्त केलेल्या न्यायनिर्णीत ऋणकोस पुन्हा अटक करता येईल.

(५) न्यायालयाने पोटनियम (३) खाली स्थानबद्धतेचा आदेश काढला नसेल तेव्हा, न्यायालय अर्ज नामंजूर करील आणि न्यायनिर्णीत ऋणको अटकेत असल्यास, त्याला मुक्त करण्याचा निदेश देईल.]

[१][(६) जेव्हा उपरोल्लिखित पोटनियम (२) अन्वये किंवा पोटनियम (३) च्या परंतुकान्वये न्यायनिर्णीत ऋणकोला न्यायालयाच्या एखाद्या अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत ठेवण्याचा आदेश देण्यात आला असेल, तेव्हा न्यायालयास स्थानबद्धतेचा विनिर्दिष्ट अथवा संभाव्य कालावधी लक्षात घेऊन, हुकूमनामाधारकाला पुढील गोष्टींसाठी रक्कम भरण्याबाबत निदेश देता येईल :—

(क) कलम ५७ खाली निश्चित केलेल्या श्रेणीनुसार तो हक्कदार असेल त्या दराने न्यायनिर्णीत ऋणकोच्या निर्वाहासाठी, आणि

(ख) न्यायनिर्णीत ऋणकोला न्यायालयाच्या ज्या अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत ठेवण्यात आले असेल, त्या अधिकाऱ्याला न्यायालय, आदेशांद्वारे निश्चित करील अशा त्याबाबतच्या शुल्काचे (निवास खर्च धरून) प्रदान करण्यासाठी :

परंतु—

(एक) निर्वाह भत्ता आणि न्यायालयाच्या अधिकाऱ्याला देय असलेले शुल्क, एकावेळी एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी वसूल करण्यात येता कामा नये, आणि

(दोन) न्यायालय, त्यास वेळोवेळी आवश्यक वाटेल अशी आणखी रक्कम, हुकूमनामाधारकाला भरावयास फर्माविू शकेल.

(७) जर उपरोल्लिखित पोटनियम (६) अन्वये आवश्यक असलेल्या कोणत्याही रकमेचा भरणा

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (७) अन्वये घालण्यात आले.

हुकूमनामाधारकाने केला नाही तर, न्यायालय अर्ज नामंजूर करू शकेल आणि न्यायनिर्णीत ऋणकोला मुक्त करण्याचा निदेश देऊ शकेल.

(८) पोटनियम (६) अन्वये हुकूमनामाधारकाने संवितरित केलेल्या रकमा म्हणजे दाव्यामधील खर्च असल्याचे समजण्यात येईल :

परंतु, अशाप्रकारे संवितरित केलेल्या रकमांसाठी कोणत्याही न्यायनिर्णीत ऋणकोला दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करता येणार नाही किंवा त्याला अटक करता येणार नाही.]

मालमत्ता जप्त करणे

न्यायनिर्णीत ऋणकोची त्याच्या मालमत्तेच्या संबंधात तपासणी.

४१. [१][(१)] हुकूमनामा पैशांच्या प्रदानाकरिता असेल त्याबाबतीत, हुकूमनामाधारकांस,—

(क) न्यायनिर्णीत ऋणको, किंवा

(ख) [२][न्यायनिर्णीत ऋणको हा एखादा निगम असेल तेव्हा] त्याचा कोणताही अधिकारी, किंवा

(ग) अन्य कोणतीही व्यक्ती,

यांची न्यायनिर्णीत ऋणकोला काही कर्जे फेडावयाची आहेत काय आणि असल्यास कोणती आणि हुकूमनाम्याची पूर्तता करण्यासाठी न्यायनिर्णीत ऋणकोकडे अन्य काही मालमत्ता किंवा साधनसंपत्ती आहे का ? आणि असल्यास कोणती ? यासंबंधी तोंडी तपासणी करण्यात यावी असा आदेश मिळविण्याकरिता न्यायालयाकडे अर्ज करता येईल, आणि न्यायालय, अशा न्यायनिर्णीत ऋणकोने किंवा अधिकाऱ्याने किंवा अन्य व्यक्तीने हजर राहावे व त्याची तपासणी केली जावी याकरिता, व कोणत्याही वह्या किंवा दस्तऐवज सादर करण्याकरिता आदेश काढू शकेल.

[१][(२) पैशांच्या प्रदानाकरिता काढलेल्या हुकूमनाम्याची तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत पूर्तता व्हावयाची राहिली असेल, तेव्हा न्यायालय, हुकूमनामाधारकाच्या अर्जावरून व पोटनियम (१) खालील आपल्या शक्तीस बाध न येऊ देता, न्यायनिर्णीत ऋणकोला किंवा न्यायनिर्णीत ऋणको हा एखादा निगम असेल तर, त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याला, त्याने न्यायनिर्णीत ऋणकोच्या मत्तांचा तपशील नमूद करणारे शपथपत्र करून द्यावे असे फर्मावू शकेल.

(३) पोटनियम (२) खाली काढलेल्या कोणत्याही आदेशाची अवज्ञा झाल्यास, आदेश काढणारे न्यायालय किंवा ज्याच्याकडे कार्यवाही वर्ग झालो असेल, असे कोणतेही न्यायालय, आदेशाची अवज्ञा करणाऱ्या व्यक्तीला जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या मुदतीपर्यंत दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करून ठेवावे असा आदेश देऊ शकेल. मात्र, अशी मुदत संपण्यापूर्वी न्यायालयाने त्या व्यक्तीला मुक्त करण्याचा निदेश दिला तर गोष्ट वेगळी.]

ज्याची रक्कम मागाहून निश्चित करण्यात यावयाची असेल, असे भाडे किंवा दरम्यानचे नफे, किंवा अन्य बाब यांकरिता काढलेल्या हुकूमनाम्याच्या बाबतीत जप्ती.

४२. एखाद्या हुकूमनाम्यामध्ये भाडे किंवा दरम्यानचे नफे किंवा अन्य कोणतीही बाब यांच्या संबंधात चौकशी करण्याचा निदेश देण्यात आलेला असेल तर, न्यायनिर्णीत ऋणकोकडून येणे असलेली रक्कम निश्चित करण्यात येण्यापूर्वी, त्याची मालमत्ता पैशांच्या प्रदानाकरिता असलेल्या सर्वसाधारण हुकूमनाम्याच्या बाबतीत करतात त्याप्रमाणे जप्त करता येईल.

---

१. सन १९७६ च्या अधिनियम १०४, कलम ७२ (सोळा). अन्वये नियम ४१ ला त्या नियमाचा पोटकलम (१) असा पुनः क्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (सोळा) (क्) अन्वये "निगमाच्या बाबतीत" या मजकुराऐवजी बदली दाखल केले.

३. वरील अधिनियमाचे कलम ७२ (सोळा) (ख्) अन्वये समाविष्ट केला.

न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जामधील शेतमालाव्यतिरिक्त अन्य जंगम मालमत्तेची जप्ती.

४३. जप्त करावयाची मालमत्ता[1] म्हणजे न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जातील शेतमाला-व्यतिरिक्त अन्य जंगम मालमत्ता असेल त्याबाबतीत, प्रत्यक्ष अभिग्रहणाने जप्ती करण्यात येईल आणि जप्तीदार अधिकारी, ती मालमत्ता स्वत:च्या अभिरक्षेत किंवा त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांपैकी एका अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत ठेवील, आणि मालमत्ता योग्य प्रकारे सांभाळून ठेवण्यास तो जबाबदार असेल :

परंतु, अभिग्रहण केलेली मालमत्ता लवकर व नैसर्गिकपणे नाश पावणारी असेल तर, किंवा ती सांभाळून ठेवण्यासंबंधीचा खर्च, तिच्या मूल्यापेक्षा अधिक होण्याची शक्यता असेल तर, जप्तीदार अधिकारी ताबडतोब तिची विक्री करू शकेल.

न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जामधील शेतमालाव्यतिरिक्त अन्य जंगम मालमत्तेची जप्ती.

[1][४३. (१) जप्त करावयाची मालमत्ता म्हणजे न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जातील शेतमालाव्यतिरिक्त अन्य जंगम मालमत्ता असेल त्याबाबतीत, प्रत्यक्ष अभिग्रहणाने जप्ती करण्यात येईल आणि जप्तीदार अधिकारी, ती मालमत्ता स्वत:च्या अभिरक्षेत किंवा त्याच्या दुय्यम अधिकाऱ्यांपैकी एका अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत ठेवील आणि मालमत्ता योग्य प्रकारे सांभाळून ठेवण्यास तो जबाबदार असेल :

परंतु, अभिग्रहण केलेली मालमत्ता लवकर व नैसर्गिकपणे नाश पावणारी असेल तर, किंवा ती सांभाळून ठेवण्यासंबंधीचा खर्च, तिच्या मूल्यापेक्षा अधिक होण्याची शक्यता असेल तर, जप्तीदार अधिकारी ताबडतोब तिची विक्री करू शकेल :

परंतु आणखी असे की, जेव्हा जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये, पशुधनाचा किंवा सहज हलवणे शक्य नसेल, अशा अन्य वस्तूंचा समावेश असेल आणि जप्तीदार अधिकारी या नियमाच्या पहिल्या परंतुकानुसार कार्यवाही करीत नसेल, तेव्हा तो, न्यायनिर्णीत ऋणकोच्या किंवा हुकूमनामाधारकाच्या किंवा अशा मालमत्तेमध्ये हितसंबंधित असल्याचे म्हणवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून, ती गावातच किंवा जेथून जप्त करण्यात आली असेल त्याच ठिकाणी, कोणी कोंडवाडा-रक्षक असल्यास, त्याच्या प्रभारात ठेवील किंवा असे करणे शक्य नसेल तर, हुकूमनामाधारकाच्या किंवा न्यायनिर्णीत ऋणकोच्या किंवा अशा मालमत्तेमध्ये हितसंबंधित असल्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या प्रभारात ठेवील किंवा जी व्यक्ती, अशा मालमत्तेच्या मूल्याहून कमी नसेल इतक्या रकमेचे एक किंवा अधिक जामीन असलेले बंधपत्र करून त्या मालमत्तेची राखण करण्याची, तिची योग्य काळजी घेण्याची व मागणी करण्यात येईल त्याबेळी ती सादर करण्याची हमी देईल अशा एखाद्या संभावित व्यक्तीच्या प्रभारात ठेवील.

(२) जप्तीदार अधिकारी, जप्त केलेल्या मालमत्तेची सूची तयार करील आणि ज्याच्या अभिरक्षेत ती ठेवण्यात आली असेल त्या व्यक्तीची आणि शक्य असेल तर, दाव्यामधील पक्षकारांची आणि कमीत कमी एका संभावित व्यक्तीची, सूचीच्या अचूकतेचे साक्षांकन म्हणून अभिस्वीकृती मिळवील. जर जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये, पशुधन आणि अन्य वस्तू, अशा दोहोंचा समावेश असेल तर, पशुधनाची वेगळी सूची तशाच प्रकारे तयार करण्यात येईल व ती सुद्धा वरीलप्रमाणे साक्षांकित करून घेण्यात येईल.]

जंगम मालमत्तेची अभिरक्षा.

[1][४३क. (१) जप्त केलेली मालमत्ता ही पशुधन, शेतीची अवजारे किंवा अन्य वस्तू मिळून बनलेली असेल व ती सोईस्कररीत्या हलवता येणे

जंगम मालमत्तेची अभिरक्षा.

[1][४३क. (१) जेव्हा पशुधन जप्त करण्याबाबत अर्ज करण्यात येईल, तेव्हा न्यायालय, जिल्हा न्यायाधीशाची मंजुरी घेऊन न्यायालयांनी दर सहा

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (सतरा) अन्वये घालण्यात आल.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, क्र. पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ६९ द्वारे समाविष्ट केले.

२. वरील अधिसूचनेच्या खंड ७० द्वारे समाविष्ट केले.

शक्य नसेल आणि जप्तीदार अधिकारी, नियम ४३ च्या परंतुकान्वये कार्यवाही करीत नसेल तेव्हा, तो न्याय-निर्णीत ऋणकोच्या किंवा हुकूमनामाधारकाच्या किंवा अशा मालमत्तेत हितसंबंधित असल्याचे म्हणणाऱ्या अन्य कोणाही व्यक्तीच्या विनंतीवरून तो मालमत्ता जेथे ती जप्त केली असेल त्याच गावात किंवा त्याच ठिकाणी ठेवून, एखादया संभावित व्यक्तीच्या (यात यापुढे 'अभिरक्षक' म्हणून निर्दिष्ट) हवाली करू शकेल.

(२) रीतसर नोटीस दिल्यानंतरही, जर तो अभिरक्षक, न्यायालयाने निर्दिष्ट केलेल्या ठिकाणी त्या प्रयोजनाकरता प्रतिनियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यासमोर अशी मालमत्ता हजर करण्यास अगर ज्या व्यक्तीला ती परत करण्याबद्दल न्यायालयाने आदेश दिलेला आहे, तिला ती परत करण्यास चुकला तर, अथवा ती मालमत्ता याप्रमाणे हजर किंवा परत करण्यात आली असली तरी, जेव्हा ती त्याच्याकडे सोपवण्यात आली तेव्हा ज्या स्थितीत होती त्याच स्थितीत ती राहिलेली नसेल तर,—

महिन्यांनी किंवा आवश्यक असल्यास, अधिक वेळा, निश्चित केलेल्या दरांनी, जप्तीच्या संभाव्य काळा-पासून विक्रीच्या संभाव्य कालावधीपर्यंत पशुधनाचे परिरक्षण करण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेची आगाऊ रोख मागणी करू शकेल किंवा त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार अशा कालावधीच्या भागांकरिता एकापाठोपाठ एक अशा मागण्या करू शकेल. या दरांमध्ये—वैरण, राखण, त्यांची ने-आण आणि पशुधनाच्या परिरक्षणासाठी आणि अभिरक्षेसाठी आवश्यक असणारे इतर सर्व खर्च यांचा अंतर्भाव असेल.

(२) न्यायनिर्णीत ऋणकोव्यतिरिक्त, इतर कोणत्याही व्यक्तीकडे हे पशुधन सोपवण्यात आले असेल तर, हुकूमनामाधारकाने पशुधनाच्या परि-रक्षणासाठी प्रदान केलेली रक्कम किंवा त्या रकमेचा काही भाग, न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयानुसार पशुधन अभिरक्षकाला पशुधनाच्या परिरक्षणासाठी देता येईल. पशुधनापासून मिळणाऱ्या दूध, अंडी इत्यादीसारख्या बाबी, काही असल्यास, त्या एकतर न्यायनिर्णीत ऋणकोच्या फायद्यासाठी, शक्य तितक्या त्वरेने, विकता येतील किंवा न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयानुसार, पशुधनाच्या परिरक्षण खर्चातून त्याची वजावट करता येईल.]

(क्) अभिरक्षक स्वत:च्या कसुरीमुळे, काहीही हानी किंवा नुकसान झाल्याबद्दल, हुकूमनामाधारक किंवा न्यायनिर्णीत ऋणको किंवा ती मालमत्ता परत मिळण्यास हक्कदार असल्याचे आढळून आलेली अन्य कोणतीही व्यक्ती यांना भरपाई देण्यास दायी असेल; आणि

(ख्) असे दायित्व—

(एक) हुकूमनामाधारकाच्या विनंतीनुसार, अभिरक्षक हा जणू काही कलम १४५ खालील जामीनदार असावा त्याप्रमाणे;

(दोन) न्यायनिर्णीत ऋणकोच्या किंवा अशा अन्य व्यक्तीच्या विनंतीनुसार, अंमलबजावणी-विषयक अर्जावरून;

बजावून घेता येईल, आणि

(ग्) असे दायित्व निश्चित करणारा कोणताही आदेश हुकूमनाम्याप्रमाणे अपीलपात्र असेल.]

पशुधन जप्त करणे.

[1][४३ख. (१) जेव्हा पशुधन जप्त करण्याबाबत अर्ज करण्यात येईल तेव्हा न्यायालय, जिल्हा न्यायाधीशाची मंजुरी घेऊन न्यायालयांनी, दर सहा महिन्यांनी किंवा आवश्यक असल्यास अधिक वेळा निश्चित केलेल्या दरांनी, जप्तीच्या संभाव्य काला-पासून विक्रीच्या संभाव्य कालावधीपर्यंत पशुधनाचे परिरक्षण करण्यासाठी आवश्यक असेल अशा रकमेची आगाऊ रोख मागणी करू शकेल किंवा त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार अशा कालावधीच्या काही भागाकरिता एकापाठोपाठ एक अशा मागण्या करू शकेल. या दरांमध्ये—वैरण, राखण, त्यांची ने-आण आणि पशुधनाच्या परिरक्षणासाठी व अभिरक्षेसाठी आवश्यक असणारे इतर सर्व खर्च यांचा अंतर्भाव असेल.

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (८) अन्वये घालण्यात आले.

(२) न्यायनिर्णीत ऋणकोव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीकडे हे पशुधन सोपवण्यात आले असेल तर, हुकूमनामाधारकाने पशुधनाच्या परिरक्षण खर्चासाठी प्रदान केलेली रक्कम किंवा त्या रकमेचा काही भाग, न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयानुसार पशुधन अभिरक्षकाकडे पशुधनाच्या परिरक्षणासाठी देता येईल. पशुधनापासून मिळणाऱ्या बाबी, उदा. दूध, अंडी इत्यादी, काही असल्यास, त्या न्यायनिर्णीत ऋणकोच्या फायद्यासाठी, शक्य तितक्या त्वरेने विकता येतील किंवा न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयानुसार पशुधनाच्या परिरक्षण खर्चातून वजा करता येतील.]

शेतमालाची जप्ती.

४४. जप्त करावयाची मालमत्ता ही शेतमाल असेल तेव्हा,--

(क्) असा माल म्हणजे वाढते पीक असेल तर, असे पीक ज्या जमिनीवर वाढले असेल त्या जमिनीवर, किंवा

(ख्) अशा शेतमालाची कापणी किंवा वेचणी झालेली असेल तर, झोडणीच्या खळ्यात किंवा धान्य मळणीच्या जागेत किंवा तत्सम जागी अथवा ते जेथे जमा करून ठेवण्यात आले असेल त्या गव्हाणीच्या जागेत, जप्तीच्या वॉरंटची एक प्रत चिकटवून आणि दुसरी प्रत न्यायनिर्णीत ऋणको सर्वसाधारणपणे ज्या ठिकाणी राहत असेल त्या घराच्या बाहेरच्या दरवाजावर किंवा दुसऱ्या एखाद्या ठळक भागात अथवा न्यायालयाच्या परवानगीने, तो ज्या ठिकाणी त्याचा धंदा चालवत असेल किंवा प्राप्तीसाठी तो व्यक्तिशः कामधंदा करीत असेल अशा घराच्या किंवा ज्या ठिकाणी लगतपूर्वी तो राहात होता किंवा तो धंदा चालवत होता किंवा प्राप्तीसाठी तो व्यक्तिशः कामधंदा करीत होता, असे ज्ञात असेल अशा घराच्या बाहेरच्या दरवाजावर किंवा दुसऱ्या एखाद्या ठळक भागावर चिकटवून जप्ती करण्यात येईल आणि त्यानंतर तो शेतमाल न्यायालयाच्या कब्जात गेला असल्याचे समजण्यात येईल.

[1][४४-क. जप्त करावयाची मालमत्ता ही शेतमाल असेल तेव्हा, जप्तीच्या वॉरंटची किंवा आदेशाची एक प्रत, तो जमीन ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयास टपालाने पाठवली पाहिजे.] शेतमाल जप्त करण्यात आला असेल तेव्हा, जप्तीच्या वॉरंटची प्रत जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवणे.

जप्तीखालील शेतमालाच्या संबंधातील उपबंध.

४५. (१) शेतमालावर जप्ती आणावयाची असेल त्याबाबतीत, तो सांभाळून ठेवण्यासाठी न्यायालय स्वतःला पुरेशी वाटेल अशी व्यवस्था करील, आणि न्यायालयास अशी व्यवस्था करणे शक्य व्हावे यासाठी वाढत्या पिकांच्या जप्तीकरिता करावयाच्या प्रत्येक अर्जामध्ये त्या पिकाची कापणी किंवा वेचणी कोणत्या वेळी होण्याची शक्यता आहे ते विनिर्दिष्ट करावे लागेल.

[2][४५. (१) शेतमालावर जप्ती आणावयाची असेल त्याबाबतीत, तो सांभाळून ठेवण्यासाठी, न्यायालय, स्वतःला पुरेशी वाटेल अशी व्यवस्था करील, आणि न्यायालयास अशी व्यवस्था करणे शक्य व्हावे यासाठी, वाढत्या पिकांच्या जप्तीकरिता करावयाच्या प्रत्येक अर्जामध्ये त्या पिकाची कापणी किंवा वेचणी कोणत्या वेळी होण्याची शक्यता आहे ते विनिर्दिष्ट करावे लागेल. आणि अशा वेळेपर्यंत पिकाची देखभाल व राखण करण्याचा खर्च भागवण्यासाठी न्यायालयास जी पुरेशी वाटेल अशी रक्कम अर्जदाराने अर्ज करतेवेळी न्यायालयात भरली पाहिजे]. जप्तीखालील शेतमालाच्या संबंधातील उपबंध.

(२) न्यायालयाकडून एकतर जप्तीच्या आदेशात किंवा त्यानंतरच्या कोणत्याही आदेशात याबाबतीत घालण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, न्यायनिर्णीत ऋणको त्या पिकाची देखभाल, कापणी, वेचणी व साठवण करू शकेल आणि ते तयार होण्याकरिता किंवा टिकवून ठेवण्याकरिता आवश्यक असे अन्य कोणतेही काम करू शकेल, आणि न्यायनिर्णीत ऋणको अशी सर्व कामे किंवा त्यांपैकी कोणतेही

(२) न्यायालयाकडून एकतर जप्तीच्या आदेशात किंवा त्यानंतरच्या कोणत्याही आदेशात याबाबतीत घालण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, न्यायनिर्णीत ऋणको त्या पिकाची देखभाल, कापणी, वेचणी व साठवण करू शकेल आणि ते तयार होण्याकरिता किंवा टिकवून ठेवण्याकरिता आवश्यक असे अन्य कोणतेही काम करू शकेल, आणि न्यायनिर्णीत ऋणको अशी सर्व कामे किंवा त्यांपैकी कोणतेही

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (९) अन्वये घालण्यात आले.

२. वरील अधिसूचनेच्या सुधारणा (१०) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

काम करण्यास चुकला तर, हुकूमनामाधारक न्यायालयाच्या परवानगीने आणि तत्सम शर्तींच्या अधीन तेनें, स्वत: जातीने किंवा त्याने याबाबतीत नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीकरवी, ती सर्व किंवा त्यापैकी कोणतेही काम करू शकेल, आणि हुकूमनामाधारकाला आलेला खर्च हा जणू काही, हुकूमनाम्यामध्ये समाविष्ट असावा किंवा त्याचा भाग असावा त्याप्रमाणे न्यायनिर्णीत ऋणकोकडून वसूल करता येण्यासारखा असेल.

(३) वाढते पीक म्हणून जप्त केलेला शेतमाल, तो केवळ जमिनीपासून अलग काढण्यात आला आहे एवढ्याच कारणास्तव जप्तीखाली असण्याचे बंद झाले आहे किंवा तो पुन्हा जप्त करण्याची आवश्यकता आहे असे समजण्यात येणार नाही.

(४) वाढत्या पिकाच्या जप्तीचा आदेश, ते पीक कापणीयोग्य किंवा वेचणीयोग्य होण्यापूर्वी बराच काळ अगोदर काढण्यात आला असेल तर, न्यायालय त्यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत आदेशाची अंमलबजावणी निलंबित करू शकेल आणि स्वविवेकानुसार ते, जप्तीच्या आदेशाची अंमलबजावणी होईपर्यंत पीक काढून नेण्यास मनाई करणारा आणखी एखादा आदेश काढू शकेल.

(५) एखादे वाढते पीक साठवून ठेवणे शक्य नाही अशा स्वरूपाचे असेल तर, ते कापणीस किंवा वेचणीस योग्य होण्याची शक्यता असेल त्या वेळेच्या लगतपूर्वी वीस दिवसांपेक्षा कमी मुदतीत केव्हाही ते या कलमाखाली जप्त करण्यात येणार नाही.

काम करण्यास चुकला तर, हुकूमनामाधारक न्यायालयाच्या परवानगीने आणि तत्सम शर्तींच्या अधीनतेने, स्वत: जातीने किंवा त्याने याबाबतीत नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीकरवी, ती सर्व किंवा त्यापैकी कोणतेही काम करू शकेल, आणि हुकूमनामाधारकाला आलेला खर्च हा जणू काही, हुकूमनाम्यामध्ये समाविष्ट असावा किंवा त्याचा भाग असावा त्याप्रमाणे न्यायनिर्णीत ऋणकोकडून वसूल करता येण्यासारखा असेल.

(३) वाढते पीक म्हणून जप्त केलेला शेतमाल, तो केवळ जमिनीपासून अलग काढण्यात आला आहे एवढ्याच कारणास्तव जप्तीखाली असण्याचे बंद झाले आहे किंवा तो पुन्हा जप्त करण्याची आवश्यकता आहे असे समजण्यात येणार नाही.

(४) वाढत्या पिकाच्या जप्तीचा आदेश, ते पीक कापणीयोग्य किंवा वेचणीयोग्य होण्यापूर्वी बराच काळ अगोदर काढण्यात आला असेल तर, न्यायालय त्यास योग्य वाटेल अशा मुदतीपर्यंत आदेशाची अंमलबजावणी निलंबित करू शकेल आणि स्वविवेकानुसार ते, जप्तीच्या आदेशाची अंमलबजावणी होईपर्यंत पीक काढून नेण्यास मनाई करणारा आणखी एखादा आदेश काढू शकेल.

(५) एखादे वाढते पीक साठवून ठेवणे शक्य नाही अशा स्वरूपाचे असेल तर, ते कापणीस किंवा वेचणीस योग्य होण्याची शक्यता असेल त्या वेळेच्या लगतपूर्वी वीस दिवसांपेक्षा कमी मुदतीत केव्हाही ते या कलमाखाली जप्त करण्यात येणार नाही.

न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जामध्ये नसलेले ऋण, शेअर आणि अन्य मालमत्ता यांची जप्ती.

४६. (१) (क) परक्राम्य संलेखाद्वारे प्रतिभूत न केलेले ऋण,

(ख) एखाद्या महामंडळाच्या भांडवलातील शेअर,

(ग) कोणत्याही न्यायालयामध्ये जमा केलेली किंवा त्याच्या अभिरक्षेत असलेली मालमत्ता खेरीज करून, न्यायनिर्णीत ऋणकोच्या कब्जामध्ये नसलेली अन्य जंगम मालमत्ता यांच्याबाबतीत,

(एक) ऋणाच्या बाबतीत, न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत धनकोने ऋण वसूल करू नये म्हणून त्याला आणि ऋणकोने त्याची फेड करू नये म्हणून त्याला;

(दोन) शेअरच्या बाबतीत, ज्या व्यक्तीच्या नावे तो शेअर असेल तिने तो हस्तांतरित करू नये किंवा त्यावरील लाभांश घेऊ नये म्हणून त्या व्यक्तीला;

(तीन) उपरोक्त खेरीजकरून अन्य जंगम मालमत्तेच्या बाबतीत, ती ज्या व्यक्तीच्या कब्जात असेल त्या व्यक्तीने ती न्यायनिर्णीत ऋणकोस देऊ नये म्हणून, त्या व्यक्तीला—मनाई करणाऱ्या लेखी आदेशाद्वारे जप्ती करण्यात येईल.

(२) अशा आदेशाची एक प्रत न्याय-गृहाच्या इमारतीच्या एखाद्या ठळक भागी चिकटविण्यात येईल आणि दुसरी प्रत, ऋणाच्या बाबतीत ऋणकोकडे, शेअरच्या बाबतीत महामंडळाच्या योग्य अधिकाऱ्याकडे, आणि अन्य जंगम मालमत्तेच्या (उपरोक्त खेरीजकरून) बाबतीत ती जिच्या कब्जात असेल त्या व्यक्तीकडे पाठवण्यात येईल.

(३) पोटनियम (१) च्या खंड (एक) खाली ज्याला मनाई करण्यात आली असेल, त्या ऋणकोला आपल्या ऋणाची रक्कम न्यायालयात भरता येईल आणि ती रक्कम घेण्यास हक्कदार असलेल्या पक्षकाराला ती प्रदान करण्यात आली असल्याप्रमाणे तितक्याच परिणामकारक रीतीने तो असे करण्यामुळे दायित्वमुक्त होईल.

गारनिशीस नोटीस.

[१][४६-क. (१) नियम ४६ अन्वये जप्त करण्यात आलेल्या (गहाण किंवा प्रभार यांद्वारे प्रतिभूत ऋणाव्यतिरिक्त अन्य) ऋणाच्या बाबतीत, न्यायालय, जप्ती आणणाऱ्या ऋणकोने अर्ज केल्यावर, असे ऋण चुकते करण्यास दायी असलेल्या गारनिशीस नोटीस देऊ शकेल आणि तीद्वारे एकतर त्याने स्वत:कडून न्यायनिर्णीत ऋणकोस देय असलेली ऋणाची रक्कम किंवा त्यापैकी, हुकूमनामा व अंमलबजावणीचा खर्च यांची पूर्तता करण्यास पुरेशी होईल इतकी रक्कम न्यायालयात भरावी, किंवा न्यायालयात उपस्थित होऊन आपण तसे का करू नये याविषयी कारण दाखवावे, असे त्यास फर्मावू शकेल.

(२) पोटनियम (१) खालील अर्ज, अभिकथित तथ्ये सत्यापित करणाऱ्या आणि जबानीदाराच्या समजुतीप्रमाणे गारनिशी हा न्यायनिर्णीत ऋणकोचा ऋणाईत आहे, असे नमूद करणाऱ्या शपथपत्राद्वारे करण्यात येईल.

(३) गारनिशी हा, त्याच्याकडून न्यायनिर्णीत ऋणकोस देय असलेली रक्कम किंवा त्यापैकी, हुकूमनामा व अंमलबजावणीचा खर्च यांची पूर्तता करण्यास पुरेशी होईल, इतकी रक्कम न्यायालयात भरील तेव्हा, ती रक्कम हुकूमनामा व अंमलबजावणीचा खर्च यांच्या पूर्ततेदाखल हुकूमनामाधारकास देण्यात यावी, असे न्यायालय निदेशित करू शकेल.

[१][४६-क (१) हुकूमनामाधारकाने अर्ज केल्यावर, न्यायालयास,—

(१) दिवाणी न्यायालयांना त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे अभिनिर्णय देण्यापासून अवरोधित करण्यात आलेले नाही अशा आणि या आदेशाच्या नियम ४६ अन्वये जप्त केलेल्या कोणत्याही ऋणाच्या (गहाण किंवा प्रभार याद्वारे किंवा परक्राम्य संलेखाद्वारे प्रतिभूत ऋणाव्यतिरिक्त) बाबतीत; किंवा

(२) या आदेशाच्या नियम ४६ अन्वये जप्त करण्यात आलेल्या, न्यायनिर्णीत ऋणकोच्या ताब्यात नसलेल्या कोणत्याही जंगम मालमत्तेबाबत; किंवा

(३) या आदेशाच्या नियम ५१ अन्वये जप्त केलेल्या कोणत्याही परक्राम्य संलेखाच्या बाबतीत; किंवा

(४) या आदेशाच्या नियम ५२ अन्वये जप्त केलेल्या वरील (१) ते (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या, न्यायालयाच्या अधिकाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही लोक अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असलेल्या कोणत्याही जंगम मालमत्तेबाबत,—

न्यायनिर्णीत ऋणकोला असे ऋण किंवा, परक्राम्य संलेखाखाली देय असलेली रक्कम देण्यास दायी असलेल्या किंवा अशी जंगम मालमत्ता त्याला सुपूर्द करण्यास किंवा तिच्याबाबतचा हिशेब देण्यास दायी असलेल्या कोणत्याही व्यक्तीस (यात यापुढे जिचा 'गारनिशी' असा निर्देश केला आहे) नोटीस पाठविता येईल व त्याद्वारे त्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, न्यायालयात उक्त ऋणाची परतफेड करण्यास किंवा उक्त परक्राम्य संलेखान्वये देय असलेली रक्कम देण्यास किंवा प्रकरणपरत्वे, उक्त जंगम मालमत्ता न्यायालयाकडे सुपूर्द करण्यास किंवा त्यापैकी हुकूमनाम्याची अथवा आदेशाची पूर्तता करण्यास आणि अंमलबजावणीच्या खर्चाची फेड करण्यास पुरेशी होईल इतकी रक्कम भरण्यास, किंवा न्यायालयासमोर उपस्थित होऊन त्याला असे करण्याबाबत आदेश का देण्यात येऊ नये, याबाबत कारण दाखवण्यास त्यास फर्माविता येईल.

गारनिशीवर नोटीस बजावण्यात येईल आणि जर न्यायालयाने तसा निदेश दिल्यास, न्यायनिर्णीत ऋणकोवरदेखील नोटीस बजावण्यात येईल. परत

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (अठरा) अन्वये घालण्यात आले.

१. नियम ४६क ते ४६ल हे, मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा क्रमांक (११) द्वारे घालण्यात आले.

करण्यायोग्य दिनांकाच्या अगोदर आठ पूर्ण दिवसांची नोटीस बजावण्यात आली पाहिजे :

परंतु, नियम ४६ग च्या परंतुकास अधीन राहून, जर त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार ऋण, परक्राम्य संलेख अथवा पूर्वी म्हटल्याप्रमाणे ज्याबाबत अर्ज दाखल केला आहे अशी जंगम मालमत्ता यासंबंधीच्या दाव्यांत अभिनिर्णय देण्याची अधिकारिता जर, अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाव्यतिरिक्त अन्य दिवाणी न्यायालयास प्रदान करण्यात आली असेल, तर ते न्यायालय, उक्त न्यायालय ज्यास दुय्यम आहे अशा जिल्हा न्यायालयाकडे अंमलबजावणीचे प्रकरण पाठवील आणि त्यानंतर जिल्हा न्यायालय हे प्रकरण सक्षम न्यायालयाकडे पाठवील आणि त्याप्रमाणे प्रकरण पाठविल्यानंतर ज्या न्यायालयाकडे ते प्रकरण पाठवले आहे ते न्यायालय, जणू काही, हे प्रकरण मूलतः त्याच न्यायालयात सुरू करण्यात आले असावे, अशा पद्धतीने त्याबाबत कार्यवाही करील.

स्पष्टीकरण.—जेव्हा जिल्हा न्यायालय हेच सक्षम न्यायालय असेल तेव्हा, जणू काही, ते प्रकरण मूलतः त्याच न्यायालयात सुरू करण्यात आले असावे, अशा पद्धतीने ते त्याबाबत कार्यवाही करील.

(२) असा अर्ज त्यातील कथित तथ्ये सत्यापित करणाऱ्या शपथपत्रावर असला पाहिजे आणि गारनिशी हा न्यायनिर्णीत ऋणकोचा ऋणाईत आहे किंवा ती मालमत्ता न्यायनिर्णीत ऋणकोच्या मालकीची आहे असे जबानीदाराला वाटत असल्याचे निवेदन त्यात असले पाहिजे.

गारनिशी विरुद्ध आदेश.

४६-ख. गारनिशीने त्याच्याकडून न्यायनिर्णीत ऋणकोस देय असलेली रक्कम किंवा त्यापैकी हुकूमनामा व अंमलबजावणीचा खर्च यांची पूर्तता करण्यास पुरेशी होईल इतकी रक्कम न्यायालयात ताबडतोब भरली नाही आणि न्यायालयात उपस्थित होऊन नोटिशीच्या उत्तरादाखल कारण दाखवले नाही तर, न्यायालय, गारनिशीला अशा नोटिशीतील अटीचे पालन करण्याविषयी आदेश देऊ शकेल आणि असा आदेश दिल्यावर, असा आदेश हा त्याच्याविरुद्ध काढलेला हुकूमनामा असावा त्याप्रमाणे अंमलबजावणीचा आदेश काढता येईल.

४६-ख. गारनिशीने, नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत किंवा न्यायालयाने उक्त ऋण किंवा उक्त परक्राम्य संलेखान्वये देय असलेली रक्कम न्यायालयात भरण्यास दिलेल्या मुदतीच्या आत, भरली नाही किंवा उक्त मालमत्ता किंवा हुकूमनाम्याची किंवा आदेशाची पूर्तता होण्यास पुरेसा होईल इतका ऋणाचा भाग आणि अंमलबजावणीच्या खर्चाची रक्कम न्यायालयात भरली नाही, किंवा नोटिशीला उत्तर म्हणून न्यायालयात उपस्थित राहून कारण दाखवले नाही, तर न्यायालय, गारनिशीला अशा नोटिशीमधील अटींचे पालन करण्याविषयी किंवा न्यायालयाला योग्य वाटेल असा एखादा आदेश देऊ शकेल. गारनिशी विरुद्ध आदेश.

विवादग्रस्त प्रश्नांची संपरीक्षा.

४६-ग. दायित्वाच्या बाबतीत गारनिशी वाद उपस्थित करील तेव्हा, न्यायालय दायित्वाचा निर्णय करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही वादमुद्याची किंवा प्रश्नाची, तो जणू काही एखाद्या दाव्यातील वादमुद्दा असावा त्याप्रमाणे संपरीक्षा करण्यात यावी असा आदेश देऊ शकेल, आणि अशा वादमुद्याचा निर्णय करण्यात आल्यावर स्वतःस योग्य वाटेल असा आदेश किंवा असे आदेश देईल :

परंतु, ज्या ऋणाच्या बाबतीत नियम ४६-क अन्वये अर्ज केला आहे, ते ऋण न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेच्या पलिकडील रकमेच्या बाबतीत असेल, तर ते न्यायालय ज्याला ते दुय्यम असेल अशा जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयाकडे अंमलबजावणीचे

४६-ग. गारनिशी स्वतःच्या दायित्वाच्या बाबतीत वाद उपस्थित करील तेव्हा असा आदेश काढण्याऐवजी, न्यायालय, त्याचे दायित्व निर्णीत करण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही वादमुद्याची किंवा प्रश्नाची, तो जणू काही एखाद्या दाव्यातील वादमुद्दा असावा त्याप्रमाणे संपरीक्षा करण्यात यावी असा आदेश देईल, आणि असा वादमुद्दा निर्णीत करण्यात आल्यावर स्वतःस योग्य वाटेल असा आदेश नोटिशीवर देईल : विवादग्रस्त प्रश्नाची संपरीक्षा.

परंतु, ऋणाची रक्कम, किंवा परक्राम्य संलेखान्वये देय असलेली रक्कम किंवा ज्या मालमत्तेच्या संबंधात उक्त अर्ज करण्यात आला आहे, अशा मालमत्तेचे मूल्य न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेच्या मर्यादेपलिकडील असेल तर ते

प्रकरण पाठवील आणि त्यानंतर जिल्हा न्यायाधीशाचे न्यायालय किंवा जिल्हा न्यायाधीश ते प्रकरण ज्याच्याकडे वर्ग करील असे अन्य कोणतेही सक्षम न्यायालय, जणू काही, ते प्रकरण मुळातच त्या न्यायालयात दाखल करण्यात आले असावे, अशा रीतीने त्यावर कार्यवाही करील.

न्यायालय, ज्याला ते दुय्यम असेल अशा जिल्हा न्यायालयाकडे अंमलबजावणीचे प्रकरण पाठवील आणि त्यानंतर जिल्हा न्यायालय, किंवा ते प्रकरण ज्याच्याकडे हस्तांतरित करण्यात आले आहे असे अन्य कोणतेही सक्षम न्यायालय, जणू काही, ते प्रकरण मुळातच त्या न्यायालयात दाखल करण्यात आले असावे अशा रीतीने त्यावर कार्यवाही करील.

ऋण त्रयस्थ पक्षाचे असेल तेव्हाची कार्यपद्धती.

४६-घ. ऋण एखाद्या त्रयस्थ पक्षाचे आहे, अथवा कोणत्याही त्रयस्थ पक्षाचा अशा ऋणावर धारणाधिकार किंवा प्रभार आहे किंवा त्यात अन्य हितसंबंध आहे असे सूचित करण्यात आले असेल किंवा तसे संभवनीय असल्याचे दिसत असेल तेव्हा, न्यायालय, अशा त्रयस्थ पक्षास न्यायालयात उपस्थित होऊन अशा ऋणाबाबत त्याची काही हक्कमागणी असल्यास तिचे स्वरूप व तपशील यांविषयी निवेदन करण्याचा व ते शाबीत करण्याचा आदेश देऊ शकेल.

४६-घ. जर गारनिशी नोटिशीला उत्तर म्हणून उपस्थित झालेल्या गारनिशीने न्यायालयाचे समाधान होईल असे कारण दाखवले तर, नोटीस काढून टाकली जाईल, आणि अशा प्रकारे नोटीस काढून टाकण्याने या आदेशाच्या नियम ४६, ५१ किंवा ५२ अन्वये आदेश दिलेली जप्ती उठवण्यात येईल आणि मनाई आदेश कोणताही असल्यास तो रद्द होईल.

त्रयस्थ पक्षाच्या संबंधात आदेश.

४६-ङ. अशा त्रयस्थ पक्षाचे किंवा ज्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना त्यानंतर न्यायालयात उपस्थित होण्याचा आदेश देण्यात येईल अशा व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे म्हणणे ऐकल्यानंतर, किंवा अशा रीतीने आदेश दिला असता असा त्रयस्थ पक्ष किंवा अशी अन्य व्यक्ती अथवा अशा अन्य व्यक्ती न्यायालयात उपस्थित राहिल्या नाहीत तर, न्यायालय यात यापूर्वी उपबंध केल्याप्रमाणे किंवा अशा त्रयस्थ पक्षाचा किंवा अन्य व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा धारणाधिकार, प्रभार किंवा, प्रकरणपरत्वे, हितसंबंध यांच्यासंबंधात कोणत्याही अटी असल्यास, अशा अटींवर त्यास योग्य व उचित वाटेल असा अन्य आदेश किंवा असे अन्य आदेश देऊ शकेल.

४६-ङ. गारनिशीविरुद्ध कार्यवाही चालू असताना, जेव्हा जेव्हा न्यायनिर्णीत ऋणकोव्यतिरिक्त एखादी अन्य व्यक्ती, जप्त केलेले ऋण किंवा, परक्राम्य संलेखान्वये द्यावयाची रक्कम किंवा जप्त केलेली मालमत्ता यांस हक्कदार आहे किंवा हक्कदार असल्याचा दावा करते किंवा असे ऋण किंवा अशी रक्कम किंवा मालमत्ता यांवर प्रभार किंवा धारणाधिकार किंवा त्यात हितसंबंध असल्याचा दावा करते असे अभिकथित केले गेले किंवा तसे संभवनीय असल्याचे न्यायालयाला दिसून आले तर न्यायालय, अशा त्रयस्थ व्यक्तीस आपल्यासमोर उपस्थित होण्याचा व आपल्या दाव्याचे स्वरूप त्यासंबंधीच्या तपशीलासह नमूद करण्याचा व आवश्यकता असल्यास, तो शाबीत करण्याचा आदेश देईल.

गारनिशीने प्रदान करणे ही विधिग्राह्य ऋणमुक्तता असेल.

४६-च. नियम ४६-क अन्वये नोटीस दिल्यावर किंवा पूर्वोक्त अशा कोणत्याही आदेशान्वये गारनिशीने केलेल्या प्रदानामुळे चुकत्या झालेल्या किंवा वसूल केलेल्या रकमेच्या संबंधात, न्यायनिर्णीत ऋणकोपासून किंवा वर सांगितल्याप्रमाणे न्यायालयात उपस्थित होण्याचा आदेश दिलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीपासून त्याला विधिग्राह्य मुक्तता मिळेल; मग ज्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी नियम ४६-क खाली अर्ज करण्यात आला होता तो हुकूमनामा किंवा अशा अर्जावरील कार्यवाहीत देण्यात आलेला आदेश रद्द ठरवण्यात आला असला किंवा फिरवण्यात आला असला तरी हरकत नाही.

४६-च. अशा त्रयस्थ व्यक्तीचे किंवा मागाहून उपस्थित राहण्याचा आदेश दिलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर किंवा आदेश दिल्यानंतर अशी त्रयस्थ व्यक्ती किंवा इतर व्यक्ती उपस्थित राहिली नसेल अशा बाबतीत, न्यायालय, नियम ४६-ख, ४६-ग किंवा ४६-घ यांअन्वये उपबंध केलेला आदेश किंवा, अशा त्रयस्थ किंवा इतर व्यक्तीचा धारणाधिकार, प्रभार किंवा कोणताही हितसंबंध असल्यास त्यांच्याबाबतीत कोणत्याही शर्ती असल्यास, त्यानुसार त्यास योग्य आणि इष्ट वाटेल, असा इतर आदेश, किंवा असे इतर आदेश काढू शकेल व त्यांमध्ये, त्रयस्थ किंवा इतर व्यक्तीच्या हक्काची विधिग्राह्यता निर्णीत करण्यासंबंधी आवश्यक असलेल्या कोणत्याही वादाची किंवा वादप्रश्नाची तो दाव्यातील वादप्रश्न असल्याप्रमाणे संपरीक्षा करावी असे सांगणाऱ्या आदेशाचा समावेश असेल.

दावा खर्च.

४६-छ. नियम ४६-क अन्वये केलेल्या कोणत्याही अर्जाचा आणि त्यापासून उद्भवणाऱ्या किंवा त्याच्याशी आनुषंगिक असणाऱ्या कोणत्याही कार्यवाहीचा दावा खर्च किती, हे न्यायालयाच्या स्वविवेकाधिकारात ठरेल.

४६-छ. (क) गारनिशीविरुद्ध न्यायालयाने, नियम ४६-ख, ४६-ग किंवा ४६-च अन्वये दिलेला आदेश, हुकूमनामाधारकाच्या नावे न्यायालयाने जणू काही हुकूमनामा काढला असल्याप्रमाणे अंमलबजावणीयोग्य असेल.

(ख) जेव्हा वरील नियम ४६-ख, ४६-ग किंवा ४६-च अन्वये काढलेल्या आदेशाच्या परिणामी,

पैसे किंवा परक्राम्य संलेख किंवा मालमत्ता न्यायालयामध्ये भिळाली असेल तेव्हा, उक्त आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्याचा कालावधी संपेपर्यंत आणि तेव्हा अपील दाखल केले असेल तेव्हा, अपील न्यायालयाचे पुढील आदेश मिळेपर्यंत पैसे भरण्यात येणार नाहीत आणि परक्राम्य संलेख किंवा मालमत्ता यांच्यासंबंधीतील अंमलबजावणीची पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही.

अपिले.

४६-ज. नियम ४६ख, नियम ४६ग किंवा नियम ४६ङ अन्वये दिलेला आदेश हुकूमनाम्याप्रमाणे अपीलपात्र असेल.

४६-ज. गारनिशी नोटीस किंवा या आदेशाच्या नियम ४६-ख, ४६-ग, किंवा ४६-च यांअन्वये, त्याच्याविरुद्ध काढलेला आदेश यांचे अनुपालन करून गारनिशीने केलेले कोणतेही प्रदान किंवा सुपूर्दगी, किंवा या नियमान्वये दिलेल्या आदेशाचे पालन करून वसूल झालेले कोणतेही पैसे किंवा मालमत्ता, ही न्यायनिर्णीत ऋणकोस, व या आदेशाच्या नियम ४६-ङ किंवा ४६-च यांअन्वये उपस्थित राहण्याचा आदेश दिलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीस दिलेल्या किंवा वसूल केलेल्या रकमेच्या किंवा सुपूर्द केलेल्या मालमत्तेच्या किंवा अंमलबजावणी करताना वसूल केलेल्या मालमत्तेबाबत असलेल्या गारनिशीच्या दायित्वापासून विधिग्राह्य मुक्तता देतील मग, ज्याची-अंमलबजावणी करताना नियम ४६-क अन्वये अर्ज करण्यात आला होता असा हुकूमनामा किंवा, अशा अर्जावरील कार्यवाहीत काढलेला आदेश रद्द करण्यात आलेला असो किंवा फिरवण्यात आलेला असो.

परक्राम्य संलेखांना लागू होणे.

४६-झ. नियम ४६क ते ४६ज (दोन्ही धरून) यांचे उपबंध हे ऋणांच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे, शक्य असेल तेथवर, ते नियम ५१ अन्वये जप्त केलेल्या परक्राम्य संलेखांच्या संबंधातही लागू होतील.]

४६-झ. न्यायनिर्णीत ऋणकोला एखाद्या भागीदारी संस्थेकडून देय असलेले ऋण जप्त केले असेल तर, या आदेशाच्या नियम ४६-क ते ४६-ज अन्वये सर्वसामान्य गारनिशीच्या बाबतीत असेल त्याच रीतीने त्यावर कार्यवाही केली जाईल, आणि या संहितेच्या तिसाव्या आदेशाचे उपबंध हे लागू असतील तेथवर, अशा कार्यवाहीस लागू होतील, मग अशा भागीदारी संस्थेचा एक किंवा अधिक भागीदार, न्यायालयाच्या अधिकारितेबाहेर राहत असला तरी हरकत नाही: परंतु, भागीदारी व्यवसायाचे नियंत्रण किंवा व्यवस्थापन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा जो न्यायालयाच्या अधिकारितेत आहे अशा भागीदारी संस्थेच्या कोणत्याही भागीदाराला गारनिशी नोटीस दिली पाहिजे. अशा नोटिशीच्या अनुषंगाने कोणत्याही भागीदार उपस्थित राहिला तरी तो भागीदारी संस्थेची पुरेशी उपस्थिती ठरेल.

४६-ञ. या आदेशाच्या नियम ४६-क अन्वये केलेल्या कोणत्याही अर्जाचा किंवा त्याच्यामुळे उद्भवलेल्या किंवा त्याच्या अनुषंगाने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा खर्च, न्यायालयाच्या स्वविवेकाधिकारात ठरेल.

४६-ट. या आदेशाच्या नियम ४६-ख, ४६-ग, ४६-च किंवा ४६-छ अन्वये, काढलेला कोणताही आदेश हुकूमनाम्याप्रमाणे अपीलपात्र असेल.]

जंगम मालमत्तेतील हिश्शाची जप्ती

४७. जप्त करावयाची मालमत्ता म्हणजे न्यायनिर्णीत ऋणको व दुसरी एखादी व्यक्ती यांच्या संयुक्त मालकीच्या जंगम मालमत्तेतील न्यायनिर्णीत ऋणकोचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल तेव्हा, न्यायनिर्णीत ऋणकोने आपला हिस्सा किंवा हितसंबंध हस्तांतरित करू नये किंवा कोणत्याही प्रकारे त्यावर प्रभार निर्माण करू नये म्हणून त्यास मनाई करणारी नोटीस देऊन जप्ती करण्यात येईल.

शासनाचा किंवा रेल्वे कंपनीचा अथवा स्थानिक प्राधिकरणाचा कर्मचारी याचा पगार किंवा भत्ते यांची जप्ती.

४८. (१) जप्त करावयाची मालमत्ता म्हणजे [१][शासकीय कर्मचाऱ्याचा] अथवा रेल्वे कंपनीच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्याचा [२][अथवा कोणत्याही व्यापारात किंवा उद्योगात गुंतलेले जे महामंडळ, केंद्रीय, प्रांतीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे स्थापन झालेले आहे, त्याच्या कर्मचाऱ्याचा अथवा कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) याच्या कलम ६१७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या शासकीय कंपनीतील कर्मचाऱ्याचा] पगार किंवा भत्ते असेल, तर—मग न्यायनिर्णीत ऋणको किंवा संवितरण अधिकारी न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये असो वा नसो—न्यायालयास असा आदेश देता येईल की, कलम ६० च्या उपबंधांच्या अधीनतेने, असा पगार किंवा भत्ते यातून ती रक्कम किंवा भत्ते न्यायालय निदेश देईल त्याप्रमाणे एकरकमी किंवा मासिक हप्त्याहप्त्यांनी रोखून ठेवण्यात यावेत आणि [३][समुचित शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे] [४][त्याबाबतीत नेमील अशा अधिकाऱ्याला आदेशाची नोटीस दिल्यानंतर,

(क्) असा पगार किंवा भत्ते यांचे संवितरण ही संहिता त्या त्या वेळी ज्या ठिकाणी लागू असेल त्या स्थानिक मर्यादांच्या आत करावयाचे असेल त्याबाबतीत ते संवितरित करणे हे ज्याचे कर्तव्य असेल अशा अधिकाऱ्याने किंवा अशा अन्य व्यक्तीने आदेशानुसार देय असलेली रक्कम, किंवा, प्रकरणपरत्वे, मासिक हप्त्याची रक्कम रोखून ठेवली पाहिजे व ती न्यायालयात भरली पाहिजे;

(ख्) असा पगार किंवा भत्ते यांचे संवितरण उक्त मर्यादांबाहेर करावयाचे असेल त्याबाबतीत, संवितरित करावयाचा पगार व भत्ते यांच्यासंबंधी संवितरण प्राधिकाऱ्यास निदेश देणे हे ज्याचे कर्तव्य असेल अशा त्या मर्यादांच्या आतील अधिकाऱ्याने किंवा अन्य व्यक्तीने आदेशानुसार देय असलेली रक्कम किंवा, प्रकरणपरत्वे, मासिक हप्त्यांची रक्कम न्यायालयात भरली पाहिजे आणि न्यायालयात वेळोवेळी जितक्या रकमा भरल्या जातील तेवढ्या मिळून होणारी एकूण रक्कम वेळोवेळी संवितरित करावयाच्या रकमा मिळून होणाऱ्या एकूण रकमेतून वजा करून, ती तेवढी कमी करण्यात यावी, असा संवितरण प्राधिकाऱ्यास त्याने निदेश दिला पाहिजे.]

(२) असा पगार किंवा भत्ते यांपैकी जप्तीयोग्य भाग पूर्वी काढलेल्या व पूर्तता न झालेल्या एखाद्या जप्ती आदेशानुसार अगोदरच रोखून ठेवण्यात व न्यायालयाकडे भरण्यात येत असेल तर त्याबाबतीत, [५][समुचित शासनाने] नियुक्त केलेला अधिकारी, नंतरचा आदेश काढणाऱ्या न्यायालयाला विद्यमान जप्तीच्या समग्र तपशीलांच्या संपूर्ण विवरणासह परत करील.

[६][(३) या नियमाखाली काढलेला प्रत्येक आदेश, पोटनियम (२) च्या उपबंधांच्या अनुसार विवरणासह परत पाठवण्यात आला नसेल तर एरव्ही, पुढील नोटीस किंवा अन्य आदेशिका यांशिवाय असा प्रत्येक आदेश हा, न्यायनिर्णीत ऋणको सदर संहिता ज्या ठिकाणी लागू असेल त्या स्थानिक सीमांमध्ये असेतोवर आणि तो या मर्यादांच्या बाहेर असताना च्या काळात भारताचा एकत्रित निधी किंवा राज्याचा एकत्रित निधी यातून अगर भारतातील रेल्वे कंपनी किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा निगम किंवा शासकीय कंपनी यांच्या निधीतून देय असलेला पगार किंवा भत्ते त्याला मिळत असतील तर, समुचित शासन, किंवा रेल्वे कंपनी किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा महामंडळ किंवा, प्रकरणपरत्वे, शासकीय कंपनी यांवर बंधनकारक असेल; आणि समुचित शासन किंवा रेल्वे कंपनी किंवा स्थानिक प्राधिकरण या नियमाचे व्यतिक्रमण करून दिलेल्या कोणत्याही रकमेबद्दल दायी असेल.]

[७][**स्पष्टीकरण.**—या नियमात "समुचित शासन" याचा अर्थ,—

(एक) केंद्र शासनाच्या सेवेतील कोणतीही व्यक्ती अथवा रेल्वे प्रशासन किंवा छावणी प्राधिकरण किंवा मोठ्या बंदराचे बंदर प्राधिकरण यांचा कोणताही कर्मचारी, अथवा कोणत्याही व्यापारात किंवा उद्योगात गुंतलेले जे महामंडळ केंद्रीय अधिनियमाद्वारे स्थापन झालेले असेल,

---

१. १९४३ चा अधिनियम ५, कलम ३ अन्वये "सरकारी अधिकारी" या मजकुराऐवजी वरील मजकूर घालण्यात आला.

२. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (एकोणीस) (क्) अन्वये वरील मजकूर घालण्यात आला.

३. १९४२ चा अधिनियम २५, कलम ३ आणि अनुसूची दोन अन्वये "केंद्र शासन किंवा प्रांतिक शासन त्यांच्या शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे" या मजकुराऐवजी वरील मजकूर घालण्यात आला.

४. १९३९चा अधिनियम २६, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर घालण्यात आला.

५. १९४२ चा अधिनियम २५, कलम ३ आणि अनुसूची दोन अन्वये "केंद्र शासन किंवा प्रांतिक शासन त्यांच्या शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे" या मजकुराऐवजी वरील मजकूर घालण्यात आला.

६. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (एकोणीस) (ख्) अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर घालण्यात आला.

७. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (एकोणीस) (ग्) अन्वये बदली दाखल केले.

त्याचा कोणताही कर्मचारी अथवा ज्या शासकीय कंपनीतील भाग भांडवलाचा कोणताही हिस्सा, केंद्र शासनाने किंवा एकाहून अधिक राज्य शासनांनी किंवा अंशतः केंद्र शासनाने एका अगर अधिक राज्य शासनांनी धारण केलेला असेल, त्या कंपनीचा कोणताही कर्मचारी यांच्या संबंधात, केंद्र शासन, असा आहे;

(दोन) अन्य कोणताही शासकीय कर्मचारी अथवा अन्य कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाचा कर्मचारी, अथवा कोणत्याही व्यापारात किंवा उद्योगात गुंतलेले जे महामंडळ प्रांतिक किंवा राज्य अधिनियमाद्वारे स्थापन झालेले असेल, त्याचा कोणताही कर्मचारी यांच्या संबंधात, राज्य शासन, असा आहे.]

खाजगी कर्मचाऱ्यांचे पगार किंवा भत्ते यांची जप्ती.

[1][४८ क. (१) जप्त करावयाची मालमत्ता म्हणजे ज्याला नियम ४८ लागू होतो अशा कर्मचाऱ्या- व्यतिरिक्त अन्य कर्मचाऱ्याचा पगार किंवा भत्ते असेल तर, अशा कर्मचाऱ्यांचा संवितरण अधिकारी न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांसीमांमध्ये असेल, अशाबाबतीत न्यायालय असा आदेश देऊ शकेल की, कलम ५० च्या उपबंधांच्या अधीनतेने, असा पगार किंवा भत्ते यातून ती रक्कम न्यायालय निदेश देईल त्याप्रमाणे, एकरकमी किंवा मासिक हप्त्याहप्त्यांनी रोखून ठेवण्यात यावी, आणि अशा संवितरण अधिकाऱ्याला आदेशाची नोटीस मिळाल्यानंतर, असा संवितरण अधिकारी आदेशानुसार देय असलेली रक्कम किंवा; प्रकरणपरत्वे, मासिक हप्ते यांचा न्यायालयाकडे भरणा करील.

(२) असा पगार किंवा भत्ते यांपैकी जप्तीयोग्य भाग पूर्वी काढलेल्या व पूर्तता न झालेल्या एखाद्या जप्ती आदेशानुसार अगोदरच रोखून ठेवण्यात आलेला किंवा न्यायालयाकडे भरण्यात आलेला असेल तर, संवितरण अधिकारी नंतरचा आदेश तो काढणाऱ्या न्यायालयाला विद्यमान जप्तीच्या समग्र तपशीलांच्या संपूर्ण विवरणा- सह ताबडतोब परत करील.

(३) या नियमाखाली काढलेला प्रत्येक आदेश, पोटनियम (२) च्या उपबंधांच्या अनुसार परत पाठवण्यात आला नसेल तर एरव्ही, आपली नोटीस किंवा अन्य आदेशिका याशिवाय न्यायनिर्णीत ऋणको सदर संहिता ज्या ठिकाणी लागू असेल त्या स्थानिक मर्यादांमध्ये असेतोवर आणि तो या मर्यादांच्या बाहेर असतानाच्या काळात भारताच्या कोणत्याही भागात नियोक्त्याच्या निधीतून देय असलेला पगार किंवा भत्ते त्याला मिळत असतील तर, नियोक्त्यावर बंधनकारक असेल आणि नियोक्ता या नियमाचे व्यतिक्रमण करून दिलेल्या कोणत्याही रकमेबद्दल दायी असेल.]

भागीदारी मालमत्तेची जप्ती.

४९. (१) या नियमात अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, भागीदाराच्या मालकीची मालमत्ता भागीदारी संस्थेच्या विरुद्ध किंवा भागीदारी संस्थेतील भागीदार म्हणून त्यांच्या विरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्याखेरीज अन्य हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये जप्त करण्यात येणार नाही किंवा विकण्यात येणार नाही.

(२) भागीदारांच्या विरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्याच्या धारकाने केलेल्या अर्जावरून न्यायालय अशा भागीदारांचा भागीदारी मालमत्तेतील किंवा नफ्यामधील जो हितसंबंध असेल त्यावर, हुकूमनाम्यान्वये देय असलेल्या रकमेचे दायित्व ठेवणारा आदेश काढू शकेल, आणि, त्याच आदेशाद्वारे किंवा मागाहून काढलेल्या आदेशाद्वारे अशा भागीदाराचा नफ्यामधील (अगोदरच घोषित केलेला असो वा उपार्जित असो) हिस्सा किंवा भागीदारीच्या संबंधात त्याच्याकडे येणारा अन्य कोणताही पैसा स्वीकारण्यासाठी प्रापकाची नियुक्ती करू शकेल, आणि अशा भागीदाराने हुकूमनामाधारकाच्या बाजूने प्रभार ठेवला असता तर, ज्या प्रकारचे निदेश देता आले असते किंवा प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक होतील तसे हिशेब सादर करण्याचा किंवा चौकशी करण्यासंबंधीचा निदेश देऊ शकेल अथवा तशा हितसंबंधाच्या विक्रीचा आदेश किंवा अन्य आदेश काढू शकेल.

(३) अन्य भागीदाराला किंवा भागीदारांना प्रभारित हितसंबंधांचे विमोचन करण्याचा किंवा विक्रीचा निदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, त्याची खरेदी करण्याची मोकळीक राहील.

(४) पोटनियम (२) खालील आदेशाकरिता केलेला प्रत्येक अर्ज, न्यायनिर्णीत ऋणकोवर आणि त्याच्या भागीदारांवर किंवा त्यांच्यापैकी जे [2][भारतामध्ये] असतील त्यांच्यावर बजावण्यात येईल.

(५) पोटनियम (३) खाली न्यायनिर्णीत ऋणकोच्या कोणत्याही भागीदाराने केलेला प्रत्येक अर्ज, हुकूमनामाधारकावर आणि न्यायनिर्णीत ऋणकोवर व अर्जामध्ये सहभागी झाले नसतील आणि [2][भारतामध्ये] असतील अशा अन्य भागीदारांवर बजावण्यात येईल.

---

१. १९७६चा अधिनियम १०४, कलम ७२ (वीस) अन्वये घालण्यात आले.

२. १९५१ चा अधिनियम २, कलम ३ अन्वये "राज्यामध्ये" या मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

(६) पोटनियम (४) किंवा पोटनियम (५) खालील बजावणी केली की, ती सर्व भागीदारांवर केलेली बजावणी असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा अर्जावर काढलेले सर्व आदेश अशाचप्रकारे बजावण्यात येतील.

भागीदारी संस्थेविरुद्धच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी.

५०. (१) एखाद्या भागीदारी संस्थेच्या विरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी हुकूमनामा काढण्यात आला असेल त्याबाबतीत,—

(क्) भागीदारी संस्थेच्या कोणत्याही मालमत्तेविरुद्ध;

(ख्) तिसाव्या आदेशातील नियम ६ किंवा नियम ७ खाली जी व्यक्ती स्वत:च्या नावाने उपस्थित झाली असेल अथवा ज्या व्यक्तीने आपण भागीदार असल्याचे किंवा भागीदार म्हणून न्यायनिर्णीत झाल्याचे वादकथनात कबूल केले असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध;

(ग्) खुद्द ज्या व्यक्तीवर भागीदार म्हणून समन्स बजावण्यात आले असताना, उपस्थित होण्यास जिने कसूर केली असेल, अशा व्यक्तीच्या विरुद्ध;

अंमलबजावणी आदेश देता येईल :

परंतु, या पोटनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे [१][भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) यातील कलम ३०] याच्या उपबंधांवर मर्यादा पडते किंवा अन्यथा त्यावर परिणाम होतो असे मानले जाणार नाही.

(२) भागीदारी संस्थेतील भागीदार म्हणून पोटनियम (१), खंड (ख्) व (ग्) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अशा व्यक्तीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीच्या विरुद्ध हुकूमनाम्याची अंमलबजावणी करवून घेण्याचा आपणास हक्क आहे असा हुकूमनामाधारक दावा सांगत असेल त्याबाबतीत, ज्या न्यायालयाने हुकूमनामा काढला असेल, त्या न्यायालयाकडे तो परवानगीसाठी अर्ज करू शकेल आणि असे ते दायित्व वादातीत असले तर, असे न्यायालय अशी परवानगी देऊ शकेल किंवा असे दायित्व वादग्रस्त असेल तर, तशा व्यक्तीच्या दायित्वाची एखाद्या दाव्यामधील कोणत्याही वादमुद्याची ज्या पद्धतीने संपरीक्षा व निर्धारण करण्यात येते त्याच पद्धतीने संपरीक्षा व निर्धारण करण्यात यावे, असा आदेश देऊ शकेल.

(३) पोटनियम (२) खाली कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वाची संपरीक्षा आणि निर्धारण करण्यात आले असेल त्याबाबतीत, त्यावर काढलेला आदेश हा जणू काही हुकूमनामा असावा त्याप्रमाणे तितकाच प्रभावी असेल व दायित्वासंबंधी किंवा अन्यथा त्याच शर्तींच्या अधीन असेल.

(४) हुकूमनामा कोणत्याही भागीदारी मालमत्तेच्याविरुद्ध असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, भागीदारी संस्थेविरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्यामुळे त्या भागीदारी संस्थेतील कोणत्याही भागीदारावर उपस्थित होऊन जाब देण्याकरिता समन्स बजाविण्यात आल्याखेरीज, तो मुक्त होणार नाही किंवा दायी होणार नाही अथवा त्याच्यावर अन्यथा परिणाम होणार नाही.

[२][(५) या कलमातील कोणतीही गोष्ट, तिसाव्या आदेशातील नियम १० च्या उपबंधांच्या आधारे हिंदू अविभक्त कुटुंबाविरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्यास लागू होणार नाही.]

परक्राम्य संलेखांची जप्ती.

५१. जेव्हा मालमत्ता म्हणजे न्यायालयाकडे दाखल न केलेला व शासकीय अधिकाऱ्यांच्या अभिरक्षेत नसलेला परक्राम्य संलेख असेल तेव्हा, प्रत्यक्ष अभिग्रहणाद्वारे जप्ती करण्यात येईल, आणि संलेख न्यायालयात आणण्यात येईल व तो न्यायालयाच्या पुढील आदेशांच्या अधीनतेने धारण करण्यात येईल.

न्यायालयाच्या किंवा अशासकीय अधिकाऱ्यांच्या अभिरक्षेत असलेल्या मालमत्तेची जप्ती.

५२. जप्त करावयाची मालमत्ता कोणत्याही न्यायालयाच्या किंवा अशासकीय अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असेल त्याबाबतीत, अशा न्यायालयाला किंवा अधिकाऱ्याला नोटीस पाठवून व अशी मालमत्ता आणि त्यावर देय होईल असे कोणतेही व्याज किंवा लाभांश ज्या न्यायालयाकडून नोटीस काढण्यात येते, त्या न्यायालयाच्या पुढील आदेशांच्या अधीनतेने, धारण करण्यात यावे, अशी तीद्वारे विनंती करण्यात येऊन त्यायोगे जप्ती करण्यात येईल :

परंतु, अशी मालमत्ता न्यायालयाच्या अभिरक्षेत असेल त्याबाबतीत, हुकूमनामाधारक आणि कोणतेही अभिहस्तांकन, जप्ती यांच्या आधारे किंवा अन्यथा अशा मालमत्तेमध्ये हितसंबंध सांगणारी न्यायनिर्णीत ऋणकोखेरीज अन्य कोणतीही व्यक्ती, याच्या दरम्यान हक्क किंवा अग्रक्रम यासंबंधीचा कोणताही प्रश्न अशा न्यायालयाकडून निर्णीत करण्यात येईल.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (एकवीस) (क्) अन्वये, "भारतीय संविदा अधिनियम, १९७२ याच्या कलम २४७" या मजकुराऐवजी वरील मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (एकवीस) (ख्) अन्वये हा पोटनियम घालण्यात आला.

हुकूमनाम्यांची जप्ती.

५३. (१) जप्त करावयाची मालमत्ता म्हणजे पैशांच्या प्रदानाचा अथवा गहाण किंवा प्रभार बजावून घेण्यासाठी करावयाच्या विक्रीचा हुकूमनामा असेल त्या बाबतीत,—

(क्) हुकूमनामे त्याच न्यायालयाने काढले असतील तर, अशा न्यायालयाच्या आदेशाद्वारे, आणि

(ख्) जप्त करावयाचा हुकूमनामा दुसऱ्या न्यायालयाने काढलेला असेल तर, अंमलबजावणी करावयाचा हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला असेल त्या न्यायालयाने अशा अन्य न्यायालयास नोटीस पाठवून व त्याने,—

(एक) अंमलबजावणी करावयाचा हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला असेल, ते न्यायालय नोटीस रद्द करीपर्यंत, किंवा

[१][(दोन) (क्) अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याच्या धारकाने, किंवा

(ख्) अशा हुकूमनामाधारकाच्या लेखी पूर्व संमतीने किंवा जप्ती आणणाऱ्या न्यायालयाच्या परवानगीने त्याच्या न्यायनिर्णीत ऋणकोने—

जप्त केलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासंबंधी अशी नोटीस मिळालेल्या न्यायालयाकडे अर्ज केल्याखेरीज व करीपर्यंत,]

त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करावी, अशी तीद्वारे विनंती करून त्यायोगे जप्ती करण्यात येईल.

(२) पोटनियम (१) च्या खंड (क्) खाली न्यायालय आदेश काढील तेव्हा, किंवा उक्त पोटनियमातील खंड (ख्) च्या उप शीर्ष (दोन) खाली त्याच्याकडे अर्ज येईल तेव्हा त्याबाबतीत, ज्याने हुकूमनामा जप्त केला असेल त्या धनकोच्या किंवा त्याच्या न्यायनिर्णीत ऋणकोच्या अर्जावरून न्यायालय जप्तीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी सुरू करील आणि त्याचे निव्वळ उत्पन्न अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याची पूर्तता करण्याच्या कामी उपयोजित करील.

(३) पोटनियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या अन्य हुकूमनाम्याच्या जप्तीद्वारे अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याचा धारक हा जप्तीच्या हुकूमनाम्याच्या धारकाचा प्रतिनिधी असल्याचे आणि अशा जप्तीच्या हुकूमनाम्याची, त्याचा धारक म्हणून जी कोणतीही कायदेशीर पद्धत असेल त्या पद्धतीने अंमलबजावणी करण्यास तो हक्कदार असल्याचे समजण्यात येईल.

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (बावीस) (क्) अन्वये हा मजकूर घालण्यात आला.

हुकूमनाम्यांची जप्ती.

५३. (१) जप्त करावयाची मालमत्ता म्हणजे पैशांच्या प्रदानाचा अथवा गहाण किंवा प्रभार बजावून घेण्यासाठी करावयाच्या विक्रीचा हुकूमनामा असेल त्या बाबतीत,—

(क्) हुकूमनामे त्याच न्यायालयाने काढले असतील तर, अशा न्यायालयाच्या आदेशाद्वारे, आणि

[१][(ख्) जप्त करावयाचा हुकूमनामा दुसऱ्या न्यायालयाने काढलेला असेल तर, अंमलबजावणी करावयाचा हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला असेल त्या न्यायालयाला आणि हुकूमनामा ज्या न्यायालयाकडे अंमलबजावणी करण्यासाठी हस्तांतरित करण्यात आला असेल अशा अन्य कोणत्याही न्यायालयाला,—

(एक) अंमलबजावणी करावयाचा हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला असेल, त्या न्यायालयाकडून नोटीस रद्द करण्यात येईपर्यंत, किंवा

(दोन) (क्) अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याच्या धारकाने, किंवा

(ख्) अशा हुकूमनामाधारकाच्या लेखी पूर्व संमतीने किंवा जप्ती आणणाऱ्या न्यायालयाच्या परवानगीने जप्त केलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासंबंधीची नोटीस मिळालेल्या अशा न्यायालयाकडे लेखी अर्ज केल्याखेरीज आणि करीपर्यंत त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करावी अशी तीद्वारे विनंती करून त्यायोगे जप्ती करण्यात येईल.]

(२) पोटनियम (१) च्या खंड (क्) खाली न्यायालय आदेश काढील तेव्हा, किंवा उक्त पोटनियमातील खंड (ख्) च्या उप शीर्ष (दोन) खाली त्याच्याकडे अर्ज येईल तेव्हा त्या बाबतीत, ज्याने हुकूमनामा जप्त केला असेल त्या धनकोच्या किंवा त्याच्या न्यायनिर्णीत ऋणकोच्या अर्जावरून न्यायालय जप्तीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी सुरू करील आणि त्याचे निव्वळ उत्पन्न अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याची पूर्तता करण्याच्या कामी उपयोजित करील.

(३) पोटनियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या अन्य हुकूमनाम्याच्या जप्तीद्वारे अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याचा धारक हा, जप्तीच्या हुकूमनाम्याच्या धारकाचा प्रतिनिधी असल्याचे आणि जप्तीच्या हुकूमनाम्याची त्याचा धारक म्हणून जी कोणतीही कायदेशीर पद्धत असेल त्या पद्धतीने अंमलबजावणी करण्यास तो हक्कदार असल्याचे समजण्यात येईल.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१२) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

(४) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये जप्त करावयाची मालमत्ता म्हणजे पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या हुकूमनाम्या-व्यतिरिक्त अन्य स्वरूपाचा हुकूमनामा असेल तर, अंमलबजावणी करावयाचा हुकूमनामा ज्या न्याया-लयाने काढला असेल त्या न्यायालयाने जप्त करावयाच्या हुकूमनाम्याच्या धारकाला, त्याने तो कोणत्याही प्रकारे हस्तांतरित किंवा प्रभारित करू नये म्हणून त्यास मनाई करणारी नोटीस पाठवून, आणि असा हुकूमनामा अन्य कोणत्याही न्यायालयाने काढला असेल त्याबाबतीत, अशा अन्य न्यायालयासुद्धा ज्या न्यायालयाने नोटीस पाठवली आहे ते न्यायालय अशी नोटीस रद्द करीपर्यंत, जप्त करावयाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यापासून त्याने परावृत्त राहावे अशी नोटीस पाठवून त्यायोगे जप्ती करण्यात येईल.

[१][(४) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये जप्त करावयाची मालमत्ता पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाच्या हुकूमनाम्याव्यतिरिक्त अन्य स्वरूपाचा हुकूमनामा असेल तर, अंमलबजावणी करावयाचा हुकूमनामा ज्या न्यायालयाने काढला असेल त्या न्यायालयाने जप्त करावयाच्या हुकूमनाम्याच्या धारकाला त्याने तो कोणत्याही प्रकारे हस्तांतरित किंवा प्रभारित करू नये म्हणून त्यास मनाई करणारी नोटीस पाठवून आणि असा हुकूमनामा अन्य कोणत्याही न्यायालयाने काढला असेल तर त्या अन्य न्यायालयाला आणि अंमलबजावणी करण्यासाठी हुकूमनामा ज्या न्यायालयाकडे हस्तांतरित करण्यात आला असेल त्या न्यायालयालाही, ज्या न्यायालयाने नोटीस पाठवली असेल ते न्यायालय ती नोटीस रद्द करीपर्यंत जप्त करावयाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्या-पासून त्याने परावृत्त राहावे अशी नोटीस पाठवून त्यायोगे जप्ती करण्यात येईल].

(५) या नियमाखाली जप्त केलेल्या हुकूम-नाम्याच्या धारकाने हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयास, वाजवी रीत्या मागवण्यात येईल अशी माहिती व मदत दिली पाहिजे.

(५) या नियमाखाली जप्त केलेल्या हुकूमनाम्याच्या धारकाने हुकूमनाम्याची अंमल-बजावणी करणाऱ्या न्यायालयास वाजवी रीत्या मागवण्यात येईल अशी माहिती व मदत दिली पाहिजे.

(६) दुसऱ्या हुकूमनाम्याच्या जप्तीद्वारे अंमल-बजावणी करावयाच्या हुकूमनाम्याच्या धारकाने अर्ज केला असता, या नियमाखाली जप्तीचा आदेश देणारे न्यायालय जप्त हुकूमनाम्याद्वारे बांधल्या गेलेल्या न्यायनिर्णीत ऋणकोला अशा आदेशाची नोटीस देईल आणि अशा आदेशाची [१][माहिती असताना किंवा] त्याबाबतची नोटीस मिळाल्यानंतर त्याचे व्यतिक्रमण करून न्यायनिर्णीत ऋणकोने, न्यायालयामार्फत किंवा अन्यथा, जप्त हुकूमनाम्यासंबंधात केलेले कोणतेही प्रदान किंवा समायोजन यास जप्ती अंमलात असेपर्यंत कोणत्याही न्यायालयाकडून मान्यता मिळणार नाही.

(६) दुसऱ्या हुकूमनाम्याच्या जप्तीद्वारे अंमलबजावणी करावयाच्या हुकूमनाम्याच्या धारकाने अर्ज केला असता, या नियमाखाली जप्तीचा आदेश देणारे न्यायालय जप्त हुकूमनाम्याद्वारे बांधल्या गेलेल्या न्यायनिर्णीत ऋणकोला अशा आदेशाची नोटीस देईल, आणि अशा आदेशाची [२][माहिती असताना किंवा त्याबाबतची नोटीस मिळाल्यानंतर त्याचे व्यतिक्रमण करून न्यायनिर्णीत ऋणकोने, न्यायालया-मार्फत किंवा अन्यथा, जप्त हुकूमनाम्यासंबंधात केलेले कोणतेही प्रदान किंवा समायोजन यास जप्ती अंमलात असेपर्यंत कोणत्याही न्यायालयाकडून मान्यता मिळणार नाही.

स्थावर मालमत्तेची जप्ती.

५४. (१) मालमत्ता स्थावर असेल त्याबाबतीत, मालमत्ता कोणत्याही प्रकारे हस्तांतरित किंवा प्रभारित करण्यास न्यायनिर्णीत ऋणकोला आणि असे हस्तांतरण किंवा प्रभार यापासून लाभ घेणाऱ्या सर्व व्यक्तींना मनाई करणारा आदेश काढून जप्ती करण्यात येईल.

[१][५४. (१) मालमत्ता स्थावर असेल त्याबाबतीत, न्यायनिर्णीत ऋणकोला, मालमत्ता कोणत्याही प्रकारे हस्तांतरित किंवा प्रभारित करण्यास आणि सर्व व्यक्तींना असे हस्तांतरण किंवा प्रभार यांपासून लाभ घेण्यास मनाई करणाऱ्या आदेशाद्वारे जप्ती करण्यात येईल. असे हस्तांतरण किंवा प्रभार यासाठी कोणतेही प्रतिफल नसेल तर, अशा आदेशाची अंमलबजावणी अशा आदेशाच्या तारखेपासून आणि असे हस्तांतरण किंवा प्रभार यासाठी प्रतिफल असेल तर, ती मालमत्ता ज्या व्यक्तीकडे किंवा जिच्यासाठी हस्तांतरित किंवा प्रभारित करण्यात आली असेल त्या व्यक्तीला अशा आदेशांसंबंधीची माहिती ज्या तारखेस झाली असेल त्या तारखेपासून होईल.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (बावीस) (ख) याद्वारे जादा दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१३) अन्वये वरील मजकूर घालण्यात आला.

२. १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४ कलम ७२ (बावीस), (ख), याद्वारे जादा दाखल करण्यात आले.

३. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (१४) द्वारे बदली दाखल केले.

[१][(१क) विक्रीच्या जाहीरनाम्याच्या अटी ठरवण्यासाठी कोणती तारीख निश्चित करण्यात यावयाची आहे त्यासंबंधीची नोटीस घेण्यासाठी एका विनिर्दिष्ट तारखेला न्यायालयात हजर राहावे, असेही त्या आदेशाद्वारे न्यायनिर्णीत ऋणकोला फर्मावण्यात येईल.]

(१क) विक्रीच्या जाहीरनाम्याच्या अटी ठरवण्यासाठी कोणती तारीख निश्चित करण्यात यावयाची आहे त्यासंबंधीची नोटीस घेण्यासाठी एका विनिर्दिष्ट तारखेला न्यायालयात हजर राहावे, असेही त्या आदेशाद्वारे न्यायनिर्णीत ऋणकोला फर्मावण्यात येईल.

(२) अशा मालमत्तेच्या ठिकाणी किंवा अशा मालमत्तेच्या लगतच्या ठिकाणी, दवंडी पिटवून किंवा अन्य शिरस्तेवाईक पद्धतीने आदेश जाहीर करण्यात येईल आणि आदेशाची एक प्रत, मालमत्तेतील एखाद्या ठळक जागेवर आणि नंतर न्यायगृहात ठळक जागी आणि तसेच, ती मालमत्ता शासनाला महसूल देणारी जमीन असेल, तर ती जमीन ज्या जिल्ह्यात असेल, त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात, [२][आणि, ती मालमत्ता एखाद्या गावातील जमीन असेल तर, त्या गावावर अधिकारिता असलेली एखादी ग्रामपंचायत असल्यास, तिच्या कार्यालयात चिकटवण्यात येईल.]

(२) [१][विशिष्ट प्रकरणी आवश्यक असेल त्यानुसार महसुली अभिलेख, नगर सर्वेक्षण अभिलेख किंवा ग्रामपंचायत अभिलेख यांमध्ये मालमत्तेवरील जप्ती दर्शविण्याच्या योग्य त्या नोंदी करविण्यात याव्यात अशी विनंती करून त्या आदेशांच्या प्रती जिल्हाधिकाऱ्याकडेही पाठवण्यात येतील.

(३) अशा मालमत्तेच्या ठिकाणी किंवा अशा मालमत्तेच्या लगतच्या ठिकाणी दवंडी पिटवून किंवा अन्य शिरस्तेवाईक पद्धतीने आदेश जाहीर करण्यात येईल आणि आदेशाची एक प्रत, मालमत्तेतील एखाद्या ठळक जागेवर आणि नंतर न्यायगृहात ठळक जागी आणि तसेच, ती मालमत्ता शासनाला महसूल देणारी जमीन असेल तर ती जमीन ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात व त्याचप्रमाणे ती मालमत्ता कटक क्षेत्राच्या हद्दीमध्ये असेल तर स्थानिक कटक मंडळ आणि संबंधित सैनिकी वसाहत अधिकारी यांच्या कार्यालयात, ती मालमत्ता एखाद्या गावातील जमीन असेल तर त्या गावावर अधिकारिता असलेली एखादी ग्रामपंचायत असल्यास तिच्या कार्यालयात चिकटवण्यात येईल.]

हुकूमनाम्याच्या पूर्ततेनंतर जप्ती दूर करणे.

५५. (क) दावाखर्च आणि कोणत्याही मालमत्तेच्या जप्तीमधून उद्भवलेला सर्व खर्च व आकार धरून हुकूमनाम्याद्वारे देववलेली रक्कम न्यायालयात भरण्यात आली असेल तर, किंवा

(ख) हुकूमनाम्याची पूर्तता अन्यथा न्यायालयाच्या मार्फत करण्यात आली असेल किंवा न्यायालयाला प्रमाणित करण्यात आली असेल तर, किंवा

(ग) हुकूमनामा रद्द ठरवण्यात किंवा फिरवण्यात आला असेल तर,

जप्ती मागे घेण्यात आल्याचे मानण्यात येईल, आणि स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, न्यायनिर्णीत ऋणकोची तशी इच्छा असेल तर, जप्ती मागे घेतल्याचा जाहीरनामा त्याच्या खर्चाने करण्यात येईल, आणि लगतपूर्व नियमामध्ये विहित केलेल्या रीतीने जाहीरनाम्याची प्रत चिकटवण्यात येईल.

हुकूमनाम्याअन्वये हक्कदार असलेल्या पक्षकारास नाणी किंवा चलनी नोटा देण्याबाबत आदेश.

५६. जप्त केलेली मालमत्ता ही चालू नाणी किंवा चलनी नोटा या स्वरूपात असेल, तर न्यायालय जप्ती चालू असताना कोणत्याही वेळी अशी नाणी किंवा नोटा अथवा हुकूमनाम्याची पूर्तता करण्यासाठी पुरेसा असा त्यापैकी काही भाग, तो स्वीकारण्यास हुकूमनाम्याअन्वये हक्कदार असलेल्या पक्षकारास देण्यात यावा, असा निदेश देऊ शकेल.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (तेवीस) (क) याद्वारे जादा दाखल करण्यात आले.

२. वरिल अधिनियमाच्या कलम ७२ (तेवीस) (ख) द्वारे जादा दाखल करण्यात आले.

जप्तीची समाप्ती.

[१][५७. (१) एखादी मालमत्ता हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत जप्त करण्यात आली असताना, काही कारणास्तव न्यायालयाने हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेला अर्ज फेटाळून लावणारा आदेश काढला तर, न्यायालय, जप्ती चालू ठेवावी की बंद करावी, त्याबाबत निदेश देईल व तसेच, कोणत्या तारखेपर्यंत अशी जप्ती चालू राहील किंवा कोणत्या तारखेस ती संपुष्टात येईल, याबाबतही निदेश देईल.

(२) न्यायालयाने असा निदेश दिला नाही तर, जप्ती संपुष्टात आली असल्याचे मानले जाईल.]

[१][५७. एखादी मालमत्ता हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये जप्त करण्यात आली असताना, काही कारणास्तव न्यायालयाने, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी करण्यात आलेला अर्ज फेटाळून लावणारा आदेश काढला तर, न्यायालय, अशी जप्ती चालू ठेवावी की बंद करावी त्याबाबत निदेश देईल. न्यायालयाने आदेश काढला नाही तर, आणि अंमलबजावणीचा अर्ज फेटाळून लावणारा आदेश अपील योग्य असेल तर अपील दाखल करण्यास विहित करण्यात आलेला कालावधी समाप्त होईपर्यंत किंवा अपील दाखल करण्यात आलेले असेल तर, अपील न्यायालय निदेश देईल, असा पुढील कालावधी समाप्त होईपर्यंत जप्ती चालू राहील.] जप्तीची समाप्ती.

[१][हक्कमागण्या व हरकती यांसंबंधी अभिनिर्णय.

मालमत्तेसंबंधीच्या हक्कमागण्या व तिच्या जप्तीबंधीच्या हरकती यांचा अभिनिर्णय.

५८. (१) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये जप्त केलेल्या एखाद्या मालमत्तेच्या संबंधात, अशी मालमत्ता अशा जप्तीस पात्र नाही, या कारणावरून कोणतीही हक्कमागणी करण्यात आली असेल किंवा कोणतीही हरकत घेण्यात आली असेल तर, न्यायालय यामध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार त्या हक्कमागणीचा किंवा हरकतीचा अभिनिर्णय करण्याची कार्यवाही करील :

परंतु,—

(क्) अशी हक्कमागणी किंवा हरकत दाखल करण्यात येण्यापूर्वीच जप्त मालमत्ता विकण्यात आली असेल तर; अथवा

(ख्) हक्कमागणी किंवा हरकत दाखल करण्याच्या कामी योजनापूर्वक किंवा विनाकारण विलंब लावण्यात आला आहे, असे न्यायालयास वाटेल तर,—

अशी कोणतीही हक्कमागणी किंवा हरकत विचारार्थ स्वीकारली जाणार नाही.

(२) या नियमाखालील कार्यवाहीतील पक्षकारांमध्ये किंवा त्यांच्या प्रतिनिधींमध्ये उद्भवणाऱ्या आणि हक्कमागणी किंवा हरकत यासंबंधीच्या अभिनिर्णयाशी संबंध असणारे (जप्त मालमत्तेतील अधिकार, हक्क किंवा हितसंबंध यासंबंधीचे प्रश्न धरून) सर्व प्रश्न हे हक्कमागणी किंवा हरकत यावर कार्यवाही करणाऱ्या न्यायालयाकडून निर्णीत केले जातील, ते स्वतंत्र दाव्याद्वारे निर्णीत केले जाणार नाहीत.

(३) पोटनियम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रश्नांचा निर्णय करण्यात आल्यानंतर न्यायालय अशा निर्णयास अनुसरून,—

(क्) हक्कमागणी किंवा हरकत मान्य करील आणि मालमत्ता, जप्तीतून एकतर पूर्णपणे किंवा त्यास योग्य वाटेल इतक्या मर्यादेपर्यंत मुक्त करील; किंवा

(ख्) हक्कमागणी किंवा हरकत अमान्य करील; किंवा

(ग्) कोणत्याही व्यक्तीच्या बाजूने कोणतेही गहाण, प्रभार किंवा अन्य हितसंबंध यांच्या अधीनतेने जप्ती चालू ठेवील; किंवा

(घ्) प्रकरणाच्या परिस्थितीत त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे आदेश देईल.

(४) या नियमान्वये कोणत्याही हक्कमागणीचा किंवा हरकतीचा अभिनिर्णय करण्यात आला असेल तेव्हा, त्यावर दिलेला आदेश जणूकाही तो हुकूमनामा असावा त्याप्रमाणे तितकाच प्रभावी असेल व तो अपिलाच्या बाबतीत किंवा अन्यथा त्याच शर्तींच्या अधीन असेल.

(५) हक्कमागणी किंवा हरकत दाखल करण्यात आली असता, न्यायालयाने ती विचारार्थ स्वीकारण्यास पोटनियम (१) च्या परंतुकान्वये नकार दिला तर, ज्याच्याविरुद्ध असा आदेश देण्यात आला असेल तो पक्षकार, विवादग्रस्त मालमत्तेसंबंधी त्याने जो अधिकार असल्याचा दावा सांगितलेला असेल तो अधिकार शाबीत करण्यासाठी दावा दाखल करू शकेल, परंतु अशा प्रकारे हक्कमागणी किंवा हरकत विचारार्थ स्वीकारण्यास

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (चोवीस) द्वारे मजकूर घालण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (पंचवीस) द्वारे, मूळ कलमे ५८ ते ६३ यांऐवजी कलमे ५८ व ५९ घालण्यात आली.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (१५) द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले.

नकार देणारा आदेश हा असा कोणताही दावा दाखल केला असल्यास, त्याच्या निकालाच्या अधीनतेने, निर्णायक असेल.

५९. हक्कमागणी दाखल करण्यापूर्वी किंवा हरकत घेण्यापूर्वी, जप्त मालमत्ता विकण्यासाठी अगोदरच जाहिरात देण्यात आली असेल तेव्हा, न्यायालय,— विक्रीस स्थगिती.

(क) जर मालमत्ता जंगम असेल तर, हक्कमागणीचा किंवा हरकतीचा अभिनिर्णय होईपर्यंत विक्री लांबणीवर टाकणारा आदेश देऊ शकेल; किंवा

(ख) जर मालमत्ता स्थावर असेल तर, हक्कमागणीचा किंवा हरकतीचा अभिनिर्णय होईपर्यंत मालमत्ता विकण्यात येऊ नये असा, किंवा असा अभिनिर्णय होईपर्यंत मालमत्ता विकण्यात यावी, परंतु अशी विक्री कायम करू नये असा आदेश देऊ शकेल,

आणि असा कोणताही आदेश, प्रतिभूतीच्या बाबतीत किंवा अन्यथा, न्यायालयास योग्य वाटतील अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने देता येईल.]

विक्री—सर्वसाधारण

६४. हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणारे कोणतेही न्यायालय, त्याने जप्त केलेली आणि विक्रीस पात्र असलेली एखादी मालमत्ता किंवा हुकूमनाम्याची पूर्तता करण्यास आवश्यक वाटेल असा तिचा भाग विकण्यात यावा आणि अशा विक्रीचे उत्पन्न किंवा त्याचा पुरेसा भाग तो स्वीकारण्यास हुकूमनाम्याच्या अनुसार हक्कदार असलेल्या व्यक्तीस देण्यात यावा, असा आदेश देऊ शकेल. जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री करण्याचा आणि हक्कदार व्यक्तीस उत्पन्न देण्याचा आदेश देण्याची शक्ती.

६५. अन्यथा विहित केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमधील प्रत्येक विक्री न्यायालयाचा अधिकारी किंवा याबाबतीत न्यायालयाकडून नियुक्त करण्यात येईल असा अधिकारी, यांच्याकडून करण्यात येईल, आणि ती विहित रीतीने जाहीर लिलावाद्वारे करण्यात येईल. विक्री कोणाकडून व कशी करावयाची.

६६. (१) जेव्हा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये एखाद्या मालमत्तेची जाहीर लिलावाने विक्री करण्याचा आदेश देण्यात आला असेल तेव्हा, न्यायालय नियोजित विक्रीचा जाहीरनामा अशा न्यायालयाच्या भाषेमध्ये करण्याची व्यवस्था करील. जाहीर लिलावाद्वारे करावयाच्या विक्रीचा जाहीरनामा.

(२) असा जाहीरनामा, हुकूमनामाधारक व न्यायनिर्णीत ऋणको यांना नोटीस दिल्यानंतर तयार करण्यात येईल आणि त्यामध्ये विक्रीची वेळ व ठिकाण नमूद करण्यात येईल व शक्य तितक्या रास्तपणे व बिनचूकपणे पुढील तपशील विनिर्दिष्ट करण्यात येईल :—

(क) विकावयाची मालमत्ता—[१][किंवा, हुकूमनाम्याची पूर्तता करण्यास त्या मालमत्तेचा काही भाग पुरेसा असेल तर, असा भाग;]

(ख) विकावयाची मालमत्ता म्हणजे शासनाला महसूल देणाऱ्या संपदेतील किंवा अशा संपदेच्या भागातील हितसंबंध असेल तर त्या संपदेवर किंवा संपदेच्या भागावर आकारणी केलेला महसूल;

(ग) मालमत्ता ज्यास दायी असेल असा कोणताही भार;

(घ) ज्या रकमेच्या वसुलीकरिता विक्रीचा आदेश देण्यात आला असेल, ती रक्कम; आणि

(ङ) मालमत्तेचे स्वरूप व मूल्य अजमावण्यासाठी, खरेदीदाराला जी गोष्ट माहीत असणे महत्त्वाचे आहे, असे न्यायालयास वाटेल अशी अन्य प्रत्येक गोष्ट :

[१][परंतु, जाहीरनाम्याच्या अटी ठरवण्याच्या तारखेबद्दल नियम ५४ खालील आदेशाद्वारे न्यायनिर्णीत ऋणकोला नोटीस देण्यात आलेली असेल तेव्हा, न्यायालयाने अन्य निदेश न दिल्यास एरव्ही, या नियमाखाली नोटीस देण्याची आवश्यकता असणार नाही :

परंतु आणखी असे की, विक्रीच्या जाहीरनाम्यात न्यायालयाने मालमत्तेच्या मूल्यासंबंधी स्वतःचा अंदाज देणे आवश्यक ठरेल, अशा प्रकारे या नियमातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ लावला जाणार नाही, मात्र, पक्षकारांपैकी कोणीही किंवा दोघांनी असा कोणताही अंदाज दिलेला असल्यास, तो जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात येईल.]

(३) या नियमाखालील विक्रीच्या आदेशासाठीच्या प्रत्येक अर्जासोबत वादकथनावर स्वाक्षरी करण्यासाठी व सत्यापित करण्यासाठी यात यापूर्वी विहित केलेल्या रीतीने स्वाक्षरित व सत्यापित केलेले आणि पोटनियम (२) द्वारे जाहीरनाम्यात ज्या बाबी विनिर्दिष्ट करणे आवश्यक असतील त्या बाबी सत्यापन करणाऱ्या व्यक्तीला ज्ञात असतील किंवा तिला खातरजमा करून घेणे शक्य असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत अशा बाबी समाविष्ट असलेले निवेदन जोडावे लागेल.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (सव्वीस) (क) अन्वये हा मजकूर घालण्यात आला.
२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (सव्वीस) (ख) अन्वये दाखल केले.

(४) जाहीरनाम्यामध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या बाबींची खातरजमा करण्याकरिता न्यायालय अशा कोणत्याही बाबीसंबंधी ज्या व्यक्तीस समन्स पाठवून बोलावणे त्यास आवश्यक वाटेल, अशा कोणत्याही व्यक्तीस समन्स पाठवू शकेल आणि तिची तपासणी करू शकेल व त्या बाबीसंबंधीचा जो दस्तऐवज तिच्या कब्जात किंवा तिच्या अखत्यारात असेल असा कोणताही दस्तऐवज सादर करण्यास तिला फर्मावू शकेल.

जाहीरनामा काढण्याची पद्धती.

६७. (१) प्रत्येक जाहीरनामा शक्यतोवर नियम ५४, पोटनियम (२) द्वारे विहित केलेल्या रीतीने काढण्यात व प्रकाशित करण्यात येईल.

(२) न्यायालयाने तसा निदेश दिला तर, असा जाहीरनामा शासकीय राजपत्रात किंवा एखाद्या स्थानिक वृत्तपत्रात किंवा दोहोंमध्ये प्रकाशित करण्यात येईल आणि अशा प्रकाशनाचा खर्च हा, विक्रीचा खर्च असल्याचे समजण्यात येईल.

(३) मालमत्तेची लॉटवार विक्री करण्याच्या प्रयोजनार्थ, ती विभागण्यात येऊन, वेगवेगळे लॉट पाडण्यात आले असतील, त्याबाबतीत, प्रत्येक लॉटकरिता वेगवेगळा जाहीरनामा काढण्याची आवश्यकता असणार नाही. मात्र, तसे केल्याशिवाय विक्रीची योग्य नोटीस देणे शक्य होणार नाही असे न्यायालयाचे मत असेल तर गोष्ट वेगळी.

जाहिरनामा काढण्याची पध्दती.

६७. (१) प्रत्येक जाहीरनामा शक्यतोवर [१][नियम ५४, पोटनियम (३) द्वारे विहित केलेल्या] रीतीने काढण्यात व प्रकाशित करण्यात येईल.

(२) न्यायालयाने तसा निदेश दिला तर, असा जाहीरनामा शासकीय राजपत्रात किंवा एखाद्या स्थानिक वृत्तपत्रात किंवा दोहोंमध्ये प्रकाशित करण्यात येईल आणि अशा प्रकाशनाचा खर्च हा, विक्रीचा खर्च असल्याचे समजण्यात येईल.

(३) मालमत्तेची लॉटवार विक्री करण्याच्या प्रयोजनार्थ, ती विभागण्यात येऊन, वेगवेगळे लॉट पाडण्यात आले असतील त्याबाबतीत, प्रत्येक लॉटकरिता वेगवेगळा जाहीरनामा काढण्याची आवश्यकता असणार नाही. मात्र, तसे केल्याशिवाय, विक्रीची योग्य नोटीस देणे शक्य होणार नाही, असे न्यायालयाचे मत असेल तर गोष्ट वेगळी.

विक्रीची वेळ.

६८. नियम ४३ च्या परंतुकामध्ये वर्णन केलेल्या प्रकारच्या मालमत्तेची बाब खेरीजकरून एरव्ही, या नियमाखाली कोणतीही विक्री करावयाची झाल्यास विक्रीचा आदेश देणाऱ्या न्यायाधीशाच्या न्यायगृहाच्या ठिकाणी जाहीरनाम्याची प्रत ज्या दिवशी लावण्यात येईल त्या दिवसापासून स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, निदान [१][पंधरा दिवसांची] व जंगम मालमत्तेच्या बाबतीत निदान [२][सात दिवसांची] मुदत संपल्याखेरीज, न्यायनिर्णीत ऋणकोच्या लेखी संमतीवाचून तिची विक्री करण्यात येणार नाही.

विक्रीला तहकुबी किंवा अटकाव.

६९. (१) न्यायालय स्वविवेकाधिकारानुसार या खालील कोणतीही विक्री विनिर्दिष्ट दिवसापर्यंत व वेळेपर्यंत तहकूब करू शकेल आणि अशा कोणत्याही विक्रीचे संचालन करणारा अधिकारी, तहकुबी संबंधीची आपली कारणे नमूद करून स्वविवेकाधिकारानुसार अशी विक्री तहकूब करू शकेल :

परंतु, विक्री न्याय-गृहात किंवा त्याच्या आवारात करण्यात येणार असेल तर, न्यायालयाच्या परवानगीशिवाय अशी तहकूबी करण्यात येणार नाही.

(२) पोटनियम (१) खाली [१][तीस] दिवसांपेक्षा अधिक काळपर्यंत विक्री तहकूब करण्यात आली असेल तर, नियम ६७ खाली नव्याने जाहीरनामा काढावा लागेल. मात्र, ही अट सोडून देण्यास न्यायनिर्णीत ऋणकोने संमती दिली तर गोष्ट वेगळी.

विक्रीला तहकुबी किंवा अटकाव,

६९. [१][(१) न्यायालय स्वविवेकाधिकारानुसार याखालील कोणतीही विक्री विनिर्दिष्ट दिवसापर्यंत व वेळेपर्यंत तहकूब करू शकेल आणि अशा कोणत्याही विक्रीचे संचालन करणारा अधिकारी तहकुबीसंबंधीची आपली कारणे नमूद करून स्वविवेकाधिकारानुसार विनिर्दिष्ट दिवसापर्यंत व वेळेपर्यंत विक्री तहकूब करू शकेल :

परंतु, विक्री न्याय-गृहात किंवा त्याच्या आवारात करण्यात येणार असेल तर, न्यायालयाच्या परवानगीशिवाय अशी तहकुबी करण्यात येणार नाही.

(२) पोटनियम (१) खाली विक्री ३० दिवसांपेक्षा अधिक काळपर्यंत तहकूब करण्यात आली असेल तर, नियम ६७ खाली नव्याने जाहीरनामा काढावा लागेल. मात्र ही अट सोडून देण्यास न्यायनिर्णीत ऋणकोने संमती दिली तर, गोष्ट वेगळी.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (सत्तावीस) (क) अन्वये "तीस दिवसांची" या शब्दांऐवजी घालण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२, (सत्तावीस) (ख) अन्वये "पंधरा दिवसांची" या शब्दांऐवजी घालण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (अठ्ठावीस) अन्वये "सात" या शब्दांऐवजी घालण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी-६३२४/६०, दि. १ ऑगस्ट १९७४, सुधारणा क्र. ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी.-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१६) द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले.

(३) लॉटचे तीनवार होण्यापूर्वी ऋण व खर्च (विक्रीच्या खर्चासह) यांच्या रकमा विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याला देऊ करण्यात आल्यास किंवा ज्या न्यायालयाने विक्रीचा आदेश दिला असेल, त्या न्यायालयात असे ऋण व खर्च यांची रक्कम भरण्यात आली असल्याबाबत त्याचे समाधान होईल असा पुरावा देण्यात आल्यास, अशी प्रत्येक विक्री थांबवण्यात येईल.

(३) लॉटचे तीनवार होण्यापूर्वी, ऋण व खर्च (विक्रीच्या खर्चासह) यांच्या रकमा विक्री करणाऱ्या अधिकाऱ्याला देऊ करण्यात आल्यास, किंवा ज्या न्यायालयाने विक्रीचा आदेश दिला असेल, त्या न्यायालयात असे ऋण व खर्च यांची रक्कम भरण्यात आली असल्याबाबत त्याचे समाधान होईल असा पुरावा देण्यात आल्यास, अशी प्रत्येक विक्री थांबवण्यात येईल.

७०. [विवक्षित विक्री व्यवहारांची व्यावृत्ती] दिवाणी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९५६, (१९५६ चा ६६) कलम १४ द्वारे निरसित.

कसूर करणारा खरेदीदार फेरविक्रीतील तोटयाबद्दल जबाबदार.

७१. फेरविक्री केली असता, खरेदीदाराच्या कसुरीमुळे, किंमतीमध्ये जी कोणतीही खोट येईल ती आणि अशा फेरविक्रीच्या अनुषंगाने येणारा सर्व खर्च विक्री व्यवहार करणारा अधिकारी किंवा अन्य व्यक्ती यांच्याकडून न्यायालयाला [१]* * * * प्रमाणित करण्यात येईल, आणि हुकूमनामाधारक किंवा न्यायनिर्णीत ऋणको यांच्यापैकी कोणाच्याही विनंतीवरून तो पैशांच्या प्रदानाकरिता काढलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेल्या उपबंधान्वये कसूरदार खरेदीदाराकडून वसूल करता येण्यासारखा असेल.

हुकूमनामाधारकाने परवानगीशिवाय बोली बोलायची नाही किंवा मालमत्ता विकत घ्यावयाची नाही.

७२. (१) ज्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये मालमत्तेची विक्री करण्यात येते त्या हुकूमनाम्याच्या कोणत्याही धारकाला न्यायालयाच्या स्पष्ट परवानगीवाचून बोली बोलता येणार नाही किंवा मालमत्ता खरेदी करता येणार नाही.

(२) अशा परवानगीने हुकमनामाधारक खरेदी करील तेव्हा, खरेदी किंमत व हुकूमनाम्यावर देय असलेली रक्कम यांची कलम ७३ च्या उपबंधांच्या अधीनतेने एकमेकाशी वजावट करता येईल, आणि हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणारे न्यायालय तदनुसार हुकूमनाम्याच्या रकमेची संपूर्णतः किंवा अंशतः पूर्तता झाल्याची नोंद करील.

हुकूमनामाधारक खरेदी करील तेव्हा, हुकूमनाम्याची रक्कम हीच दिलेली किंमत म्हणून समजणे.

(३) हुकूमनामाधारक स्वतः किंवा दुसऱ्या व्यक्तीमार्फत अशा परवानगीशिवाय खरेदी करील तेव्हा, न्यायालय त्यास योग्य वाटल्यास, न्यायनिर्णीत ऋणको किंवा विक्रीमुळे जिच्या हितसंबंधास बाधा पोहोचली असेल अशी अन्य व्यक्ती यांच्या अर्जावरून विक्री रद्द ठरवू शकेल. आणि असा अर्ज व आदेश यांचा खर्च व फेरविक्रीच्या किंमतीमध्ये जी काही खोट येईल तेवढी रक्कम व सर्व तदनुषंगिक खर्च हुकूमनामाधारकाला भरावी लागेल.

गहाणधारकाने न्यायालयाच्या परवानगीशिवाय विक्रीच्या वेळी बोली न बोलणे.

[१][७२क. (१) नियम ७२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, स्थावर मालमत्तेच्या गहाणधारकास मालमत्तेसाठी बोली बोलण्यास किंवा ती खरेदी करण्यास न्यायालयाने परवानगी दिली नसेल तर, त्यास गहाणावरील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत विकलेल्या मालमत्तेसाठी बोली बोलता येणार नाही किंवा ती खरेदी करता येणार नाही.

(२) जर अशा गहाणधारकास बोली बोलण्यास परवानगी देण्यात आली तर, न्यायालय त्यानंतर गहाणधारकाच्या संबंधात राखीव किंमत निश्चित करील, आणि न्यायालयाने अन्यथा निदेशित केले नाही तर, राखीव किंमत ही,—

(क) जर संपूर्ण मालमत्ता एका लॉट मध्ये विकण्यात आली असेल तर, गहाणाच्या बाबतीत मुद्दल, व्याज आणि खर्च यांपोटी तेव्हा देय असलेल्या रकमेपेक्षा कमी असणार नाही, आणि

(ख) एखादी मालमत्ता अनेक लॉटमध्ये विकली असेल अशा प्रकरणी, गहाणावरील मुद्दल, व्याज आणि खर्च यांपोटी त्या त्या वेळी देय असलेल्या

[७२क. स्थावर मालमत्तेच्या गहाणधारकास बोली बोलण्याची परवानगी दिली असेल तर, त्याच्या संबंधातील राखीव किंमतही (न्यायालयाला अन्यथा योग्य वाटत नसेल तर), मालमत्ता एका लॉटमध्ये विकली असेल अशा बाबतीत, मुद्दल, व्याज व खर्च यांपोटी त्याच्याकडून येणे असलेल्या रकमेपेक्षा आणि (मालमत्ता अनेक लॉटमध्ये विकण्यात आली असेल) अशाबाबतीत पूर्वोक्त रकमेच्या संबंधात प्रत्येक लॉटला जितकी रक्कम संबंधनीय असेल त्यापेक्षा कमी नाही अशी निश्चित करण्यात येईल.]

न्यायालयाने गहाणधारकास बोली बोलण्याची परवानगी दिली असेल तेव्हा न्यायालयाने राखीव किंमत निश्चित करावयाची.

---

१. १९५६ चा अधिनियम ६६, कलम १४ अन्वये विवक्षित मजकूर वगळण्यात आला.

२. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (एकोणतीस) द्वारे जादा दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी.-६३२४/६०, दि. २० सप्टेंबर १९६६, खंड ७८ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

रकमेच्या संबंधात प्रत्येक लॉटला जितकी रक्कम संबंधनीय असल्याचे न्यायालयास वाटेल तितक्या रकमेपेक्षा कमी असणार नाही.

(३) अन्य बाबतीत, नियम ७२ च्या पोट-नियम (२) व (३) चे उपबंध हे, हुकूमनामा-धारकाने त्या नियमाखाली केलेल्या खरेदीच्या संबंधात लागू होतील.]

अधिकाऱ्यांनी बोली बोलणे किंवा खरेदी करणे यावर निर्बंध.

७३. कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कोणत्याही विक्रीच्या संबंधात ज्या व्यक्तीस कोणतेही कर्तव्य करावयाचे असेल अशा अन्य व्यक्तीला, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे विकाऊ मालमत्तेकरता बोली बोलता येणार नाही किंवा तीमध्ये कोणताही हितसंबंध संपादन करता येणार नाही किंवा संपादन करण्याचा प्रयत्न करता येणार नाही.

जंगम मालमत्तेची विक्री

शेतमालाची विक्री.

७४. (१) विकावयाची मालमत्ता म्हणजे शेतमाल असेल त्याबाबतीत,—

(क) असा माल म्हणजे वाढते पीक असेल तर, असे पीक ज्या जमिनीवर वाढलेले असेल त्या जमिनीवर किंवा तिच्या जवळपास, किंवा

(ख) अशा पिकांची कापणी किंवा वेचणी करण्यात आली असेल तर, झोडणीचे खळे किंवा धान्य मळणीची जागा किंवा तत्सम जागा किंवा जेथे वैरण जमा करण्यात आली असेल अशी गव्हाणीची जागा, याठिकाणी किंवा त्याच्या जवळपास, त्याची विक्री करण्यात येईल :

परंतु, जेथे सार्वजनिक रावता असतो अशा सर्वांत नजीकच्या ठिकाणी पिकाच्या विक्रीमध्ये अधिक फायदा होण्याची शक्यता आहे असे न्यायालयास वाटेल तर, अशा रावत्याच्या ठिकाणी विक्री करण्यात यावी अशा निदेश ते देऊ शकेल.

(२) शेतमाल विक्रीसाठी काढण्यात आल्यानंतर,—

(क) विक्री करणाऱ्या व्यक्तीच्या मते रास्त किंमत देऊ करण्यात आली नाही तर, आणि

(ख) शेतमालाचा मालक किंवा त्याच्या वतीने काम पाहण्यास प्राधिकृत केलेली एखादी व्यक्ती यांनी विक्री पुढच्या दिवसापर्यंत किंवा विक्रीच्या ठिकाणी बाजार भरवण्यात येत असेल तर नंतरच्या बाजाराच्या दिवसापर्यंत पुढे ढकलण्यात यावी असा अर्ज केला तर,

त्यानुसार विक्री पुढे ढकलण्यात येईल आणि त्यानंतर शेतमालास जी कोणतीही किंमत देऊ केली जाईल, तेवढ्या किंमतीला विक्री पूर्ण करण्यात येईल.

वाढत्या पिकांच्या संबंधात विशेष उपबंध.

७५. (१) विकावयाची मालमत्ता म्हणजे वाढते पीक असेल आणि स्वरूपतः ते साठवण्याजोगे असूनही ते अद्याप साठवण्यात आले नसेल तर, विक्रीच्या दिवसाच्यापूर्वी ते साठवण्याइतपत तयार होईल अशा बेताने विक्रीचा दिवस निश्चित करण्यात येईल आणि पिकाची कापणी किंवा वेचणी होऊन ते साठवण्याजोगे होईपर्यंत विक्री करण्यात येणार नाही

(२) एखादे पीक स्वरूपतः साठवण्याजोगे नसेल तर, त्याची कापणी किंवा वेचणी करण्यात येण्यापूर्वी ते विकता येईल आणि खरेदीदार त्या जमिनीवर प्रवेश करण्यास आणि ते राखण्यासाठी व त्याची कापणी किंवा वेचणी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्यास हक्कदार असेल.

वाढत्या पिकांच्या संबंधात विशेष उपबंध.

७५. (१) विकावयाची मालमत्ता म्हणजे वाढते पीक असेल आणि स्वरूपतः ते साठवण्याजोगे असूनही ते अद्याप साठवण्यात आले नसेल तर, विक्रीच्या दिवसापूर्वी ते साठवण्याइतपत तयार होईल, अशा बेताने विक्रीचा दिवस निश्चित करण्यात येईल आणि पिकाची कापणी किंवा वेचणी होऊन ते साठवण्याजोगे होईपर्यंत विक्री करण्यात येणार नाही.

[(२) एखादे पीक स्वरूपतः साठवण्याजोगे नसेल किंवा तयार होण्यापूर्वी अधिक लवकर त्याची विक्री करण्यात यावी असे न्यायालयास वाटत असेल तर, त्याची कापणी आणि वेचणी करण्यात येण्यापूर्वी ते विकता येईल आणि खरेदीदार त्या जमिनीवर प्रवेश करण्यास आणि ते राखण्यासाठी व त्याची कापणी किंवा वेचणी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्यास हक्कदार असेल].

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (१७) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

७६. विकावयाची मालमत्ता म्हणजे एखादा परक्राम्य संलेख किंवा निगमाचा शेअर असेल त्याबाबतीत, न्यायालय जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचा निदेश देण्याऐवजी दलालाच्यामार्फत अशा संलेखाची किंवा शेअरची विक्री प्राधिकृत करू शकेल. परक्राम्य संलेख व निगमांचे शेअर्स.

७७. (१) जंगल मालमत्ता जाहीर लिलावाद्वारे विकण्यात येईल त्यावेळी, प्रत्येक लॉटची किंमत विक्रीच्या वेळी, किंवा विक्री चालवणारा अधिकारी किंवा अन्य व्यक्ती निदेश देईल त्याप्रमाणे त्यानंतर शक्य तितक्या लवकर, द्यावी लागेल आणि किंमत चुकती करण्यात कसूर झाल्यास त्या मालमत्तेची ताबडतोब फेरविक्री करण्यात येईल. जाहीर लिलावाद्वारे विक्री.

(२) खरेदीची किंमत चुकती करण्यात आल्यानंतर, विक्री चालवणारा अधिकारी किंवा अन्य व्यक्ती त्याची पावती देईल आणि मग विक्री कायम होईल.

(३) जर विक्री करावयाची जंगम मालमत्ता म्हणजे न्यायनिर्णीत ऋणको व सहमालक यांच्या मालकीच्या वस्तूंमधील हिस्सा असेल, आणि ज्यांच्यापैकी एक व्यक्ती असा सहमालक असेल अशा दोन किंवा अधिक व्यक्तींपैकी प्रत्येकजण अशा मालमत्तेकरिता किंवा कोणत्याही लॉटकरिता एकाच रकमेची बोली बोलला तर, अशी बोली ही सहमालकाची बोली असल्याचे समजण्यात येईल.

७८. जंगम मालमत्तेची विक्री जाहीर करताना किंवा चालवताना कोणतीही नियमबाह्य गोष्ट घडल्यामुळे विक्रीला बाध येणार नाही, परंतु, अन्य कोणत्याही व्यक्तीकडून घडलेल्या अशा कोणत्याही नियमबाह्य गोष्टीमुळे ज्या कोणत्याही व्यक्तीस नुकसान सोसावे लागेल ती व्यक्ती त्या व्यक्तीविरुद्ध भरपाईकरिता किंवा (जर अशी अन्य व्यक्ती खरेदीदार असेल तर) विनिर्दिष्ट मालमत्ता परत मिळविण्याकरिता आणि ती न मिळाल्यास भरपाईकरिता दावा दाखल करू शकेल. नियमबाह्यतेमुळे विक्रीला बाध नाही, परंतु नुकसान पोचलेली कोणतीही व्यक्ती दावा दाखल करू शकेल.

७९. (१) विकण्यात आलेली मालमत्ता ही, जंगम मालमत्ता असून तिचे प्रत्यक्ष अभिग्रहण करण्यात आले असेल तर, ती खरेदीदाराकडे सुपूर्द करण्यात येईल. जंगम मालमत्ता, ऋणे व शेअर्स यांची सुपूर्दगी.

(२) विकण्यात आलेली मालमत्ता ही, जंगम मालमत्ता असून ती न्यायनिर्णीत ऋणकोव्यतिरिक्त अन्य व्यक्तीच्या कब्जामध्ये असेल तर, कब्जाधारक व्यक्तीने खरेदीदाराव्यतिरिक्त अन्य कोणाकडेही मालमत्तेचा कब्जा सुपूर्द करू नये म्हणून कब्जाधारकाला मनाई करणारी नोटीस देऊन तीद्वारे खरेदीदाराकडे मालमत्ता सुपूर्द करण्यात येईल.

(३) विकण्यात आलेली मालमत्ता म्हणजे परक्राम्य संलेखाद्वारे प्रतिभूत नसलेले ऋण असेल किंवा एखाद्या निगमाचा शेअर असेल तर, धनकोने ऋण किंवा त्यावरील कोणतेही व्याज स्वीकारू नये म्हणून त्याला अथवा ऋणकोने खरेदीदाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस त्याची फेड करू नये म्हणून त्याला मनाई करणाऱ्या अथवा शेअर ज्या व्यक्तीच्या नावावर असेल त्या व्यक्तीने खरेदीदाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडे तो शेअर हस्तांतरित करू नये किंवा त्यावरील कोणताही लाभांश किंवा त्यावरील व्याज यांची रक्कम घेऊ नये म्हणून त्या व्यक्तीला आणि निगमाचा व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य योग्य अधिकारी याने खरेदीदाराव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडे असे हस्तांतरण करण्यास किंवा असे कोणतेही प्रदान करण्यास परवानगी देऊ नये म्हणून त्याला मनाई करणाऱ्या लेखी न्यायालयीन आदेशाद्वारे त्या मालमत्तेची सुपूर्दगी करण्यात येईल.

८०. (१) एखादा परक्राम्य संलेख किंवा निगमाचा शेअर एखाद्या व्यक्तीच्या नावावर असून अशा परक्राम्य संलेख किंवा शेअर यांच्या हस्तांतरणाकरिता त्या व्यक्तीने एखादा दस्तऐवज निष्पादित करणे किंवा पृष्ठांकन करणे जरूरीचे असेल त्याबाबतीत, न्यायाधीश किंवा त्याने याबाबतीत नेमलेला असा अधिकारी आवश्यक असेल त्याप्रमाणे दस्तऐवज निष्पादित करू शकेल किंवा असे पृष्ठांकन करू शकेल, आणि असे निष्पादन किंवा असे पृष्ठांकन हे त्या व्यक्तीने केलेले निष्पादन किंवा पृष्ठांकन असल्याप्रमाणे तितकेच परिणामक असेल. परक्राम्य संलेख व शेअर्स यांचे हस्तांतरण.

(२) असे निष्पादन किंवा पृष्ठांकन पुढील नमुन्यात असू शकेल, तो असा,—

क ख यांच्याकरिता ग घ न्यायालयाच्या न्यायाधीशाकडून (किंवा, प्रकरणपरत्वे,) क ख यांच्याविरुद्ध इ च यांनी लावलेल्या दाव्यामध्ये.....

(३) असा परक्राम्य संलेख किंवा शेअर यांचे हस्तांतरण होईपर्यंत, न्यायालय आदेशाद्वारे, त्यावर देय असलेले कोणतेही व्याज किंवा लाभांश घेण्याकरिता व त्याबद्दलच्या त्या पावतीवर सही करण्याकरिता एखाद्या व्यक्तीला नियुक्त करू शकेल आणि अशा प्रकारे सही केलेली कोणतीही पावती, तीखुद्द पक्षकाराने स्वाक्षरित केलेली असल्याप्रमाणे सर्व प्रयोजनार्थ विधिग्राह्य व परिणामक असेल.

८१. यात यापूर्वी जिच्या बाबतीत उपबंध करण्यात आलेले नाहीत, अशा कोणत्याही जंगम मालमत्तेच्या बाबतीत, न्यायालय अशी मालमत्ता खरेदीदाराकडे किंवा तो निदेश देईल त्याप्रमाणे निहित करणारा आदेश काढू शकेल, आणि अशी मालमत्ता त्यानुसार निहित होईल. अन्य मालमत्तेच्या बाबतीत निहित होण्याचा आदेश.

स्थावर मालमत्तेची विक्री

कोणती न्यायालये विक्रीचा आदेश देऊ शकतील.

८२. हुकूमनाम्यांच्या अंमलबजावणीमध्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे आदेश लघुवाद न्यायालया-व्यतिरिक्त अन्य कोणतेही न्यायालय देऊ शकेल.

न्यायनिर्णीत ऋणकोला हुकूमनाम्याची रक्कम उभी करता यावी म्हणून विक्री पुढे ढकलणे.

८३. (१) स्थावर मालमत्तेच्या विक्रीचा आदेश काढण्यात आला असेल त्याबाबतीत, अशी मालमत्ता किंवा तिचा काही भाग किंवा न्यायनिर्णीत ऋणकोची अन्य कोणतीही स्थावर मालमत्ता गहाण ठेवून किंवा भाडेपट्ट्याने देऊन किंवा तिची खाजगीरीत्या विक्री करून हुकूमनाम्याची रक्कम उभी करता येईल, असे समजण्यास कारण असल्याबद्दल न्यायनिर्णीत ऋणको न्यायालयाची खात्री पटवून देऊ शकला तर, न्यायालय त्याने केलेल्या अर्जावरून, त्याला रक्कम उभी करणे शक्य व्हावे म्हणून विक्रीच्या आदेशा-मध्ये समाविष्ट असलेल्या मालमत्तेची विक्री त्यास योग्य वाटेल अशा अटींवर व अशा मुदतीपर्यंत लांबणी-वर टाकू शकेल.

(२) अशा बाबतीत न्यायालय, न्यायनिर्णीत ऋणकोला एक प्रमाणपत्र देऊन त्यात नमूद करण्यात येईल अशा मुदतीत व कलम ६४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, प्रस्तावित गहाण, भाडेपट्टा किंवा विक्री करण्यास त्याला प्राधिकृत करील :

परंतु, असे गहाण, भाडेपट्टा किंवा विक्री या अन्वये देय होणाऱ्या सर्व रकमा न्यायनिर्णीत ऋणकोस नव्हे तर, नियम ७२ च्या उपबंधांखाली हुकूमनामाधारक अशा रकमांची वजावट करण्यास हक्कदार असेल, तेवढी मर्यादा सोडून, न्यायालयात भरण्यात येतील :

परंतु आणखी असे की, या नियमाखालील कोणतेही गहाण, भाडेपट्टा किंवा विक्री न्यायालयाकडून कायम करण्यात येईपर्यंत अबाधित होणार नाही.

(३) या नियमातील कोणतीही गोष्ट, अशा मालमत्तेवरील गहाण किंवा तीवरील प्रभार यांच्या बजावणीदाखल करावयाच्या विक्रीसाठी केलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये जी मालमत्ता विकण्याचा निदेश देण्यात आलेला असेल, त्या मालमत्तेच्या विक्रीस लागू होणार नाही.

खरेदीदाराने रक्कम अनामत भरणे व कसूर झाल्यास फेरविक्री.

८४. (१) स्थावर मालमत्तेची विक्री होईल तेव्हा प्रत्येक वेळी, खरेदीदार म्हणून घोषित झालेल्या व्यक्तीला, अशा घोषणेनंतर, विक्री चालवणाऱ्या अधिकाऱ्याकडे किंवा अशा अन्य व्यक्तीकडे खरेदी किंमतीच्या २५ टक्के इतकी रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल व अशी अनामत न भरल्यास, मालमत्तेची ताबडतोब फेरविक्री करण्यात येईल.

(२) हुकूमनामाधारक हा खरेदीदार असून, नियम ७२ खाली खरेदी किंमतीची वजावट करण्यास हक्कदार असेल त्याबाबतीत, न्यायालय या नियमाच्या शर्तींना फाटा देऊ शकेल.

खरेदी रक्कम संपूर्णपणे चुकती करण्याची मुदत.

८५. प्रदेय असलेल्या खरेदी किंमतीची संपूर्ण रक्कम, मालमत्तेच्या विक्रीच्या दिवसापासून पंधराव्या दिवशी न्यायालयाचे कामकाज संपण्यापूर्वी खरेदीदाराकडून न्यायालयामध्ये भरण्यात आली पाहिजे:

परंतु, अशाप्रकारे न्यायालयात भरावयाच्या रकमेची परिगणना करताना, नियम ७२ खाली खरेदीदार ज्यास हक्कदार असेल अशा कोणत्याही वजावटीचा लाभ त्याला मिळेल.

[१][८५. प्रदेय असलेल्या खरेदी किंमतीची संपूर्ण रक्कम, नियम ९४ खालील प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या मुद्रांकित कागदासाठी लागणाऱ्या रकमेसह, खरेदीदाराकडून, मालमत्तेची विक्री करण्यात आल्याच्या तारखेपासून पंधराव्या दिवशी न्यायालयाचे काम संपण्याच्या वेळेपर्यंतचा कालावधी संपण्यापूर्वी भरण्यात येईल:

परंतु, खरेदीच्या रकमेच्या संबंधात, नियम ७२ खाली खरेदीदार ज्यास हक्कदार असेल अशा कोणत्याही वजावटीचा लाभ त्याला मिळेल:

परंतु आणखी असे की, एखाद्या खऱ्याखुऱ्या चुकीच्या किंवा चुकीच्या परिगणनेच्या परिणामी अनामत रक्कम खरेदीच्या संपूर्ण रकमेपेक्षा कमी होत असेल तर, न्यायालयास स्वविवेकानुसार अशा तुटीच्या रकमेची विक्रीपासून १५ दिवसांनंतर भरपाई करण्याची मुभा देता येईल आणि खरेदीची संपूर्ण रक्कम न्यायालयाने दिलेल्या कालावधीत भरण्यात आली तर न्यायालय, त्यास तसे करणे न्याय्य व योग्य वाटले तर, विलंब माफ करू शकेल.] **खरेदी रक्कम संपूर्णपणे चुकती करण्याची मुदत.**

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा क्र. (१८) द्वारे मूळ मजकुराऐवजी घालण्यात आले.

स्पष्टीकरण.—कोणत्याही दिवशी दुपारी १ वाजल्यानंतर एखादी रक्कम न्यायालयात देऊ करण्यात आली परंतु, न्यायालयाने ती स्वीकारली नाही व ती नंतरच्या कामाच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी १ या दरम्यान देण्यात आली तर, असे प्रदान, रक्कम ज्या दिवशी देऊ करण्यात आली त्या दिवशी करण्यात आले असल्याचे समजण्यात येईल.]

[१][८५क. नियम ८४ व ८५ यांच्या प्रयोजनार्थ, अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्याकडे हस्तांतरित केलेली असेल अशा बाबतीत, खरेदीदार, जर त्याने, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाकडून तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर केले तर, कलम ७२ खाली वजावटीस हकदार असल्याचे मानण्यात येईल.] अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्याकडे हस्तांतरित केली असेल, तेव्हा वजावट करणे.

प्रदानात कसूर झाल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.

८६. लगतपूर्व नियमामध्ये निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत प्रदान करण्यात कसूर झाल्यास, न्यायालयास योग्य वाटेल तर, विक्रीचा खर्च भागवल्यानंतर अनामत रक्कम जप्त करून सरकारजमा करता येईल व त्या मालमत्तेची फेरविक्री करण्यात येईल आणि खरेदीदाराला मालमत्तेवरील किंवा ती त्यानंतर ज्या किंमतीस विकण्यात येईल त्या रकमेच्या कोणत्याही भागावरील आपला सर्व हक्क गमवावा लागेल.

फेरविक्रीची अधिसूचना.

८७. स्थावर मालमत्तेची खरेदी किंमत भरण्याकरिता दिलेल्या मुदतीमध्ये ती चुकती करण्यात कसूर झाल्यास, करावयाची अशी प्रत्येक फेरविक्री यात यापूर्वी विक्रीकरिता विहित केलेल्या रीतीने व विहित अशा मुदतीकरिता नवीन जाहीरनामा काढल्यानंतर करण्यात येईल.

८७. स्थावर मालमत्तेची [१][नियम ८५ मध्ये नमूद केलेली रक्कम] भरण्याकरिता दिलेल्या मुदतीमध्ये ती चुकती करण्यात कसूर झाल्यास करावयाची अशी प्रत्येक फेरविक्री यात यापूर्वी विक्रीकरिता विहित केलेल्या रीतीने व विहित अशा मुदतीकरिता नवीन जाहीरनामा काढल्यानंतर करण्यात येईल. फेरविक्रीची अधिसूचना.

सहहिस्सेदाराच्या बोलीस अधिमान देणे.

८८. विकाऊ मालमत्ता म्हणजे स्थावर मालमत्तेतील अविभक्त हिस्सा असेल आणि ज्यांच्यापैकी एक सहहिस्सेदार आहे अशा दोन किंवा अधिक व्यक्तींपैकी प्रत्येकजण अशा मालमत्तेकरिता किंवा कोणत्याही लॉटकरिता एकाच रकमेची बोली बोलल्यास, ती बोली ही सहहिस्सेदाराची बोली असल्याचे समजण्यात येईल.

रक्कम जमा केल्यानंतर विक्री रद्द ठरवण्यासाठी अर्ज.

८९. (१) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल त्याबाबतीत, [१][विकलेल्या मालमत्तेमध्ये विक्रीच्या वेळी किंवा अर्ज करण्याच्या वेळी आपला हितसंबंध असल्याचा दावा सांगणारी अथवा अशा व्यक्तीकरिता किंवा तिच्या हिताकरिता कार्य करणारी कोणतीही व्यक्ती,]—

(क) खरेदी किंमतीच्या पाच टक्क्यांएवढी रक्कम खरेदीदाराला देण्यासाठी, आणि

८९. [३][(१) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल त्याबाबतीत, विकलेल्या मालमत्तेमध्ये विक्रीच्या वेळी किंवा विनंतीअर्ज करण्याच्या वेळी आपला हितसंबंध असल्याचा दावा सांगणारी किंवा अशा व्यक्तीकरिता किंवा तिच्या हिताकरिता कार्य करणारी कोणतीही व्यक्ती,—

(क) खरेदी किंमतीच्या पाच टक्क्यांएवढी रक्कम खरेदीदाराला देण्यासाठी, आणि रक्कम जमा केल्यानंतर विक्री रद्द ठरवण्यासाठी अर्ज.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (तीस) अन्वये "एकतर अशा मालमत्तेची मालकी असलेली किंवा विक्रीपूर्वी संपादन केलेल्या हक्कानुसार त्यामध्ये हितसंबंध धारण करणारी एखादी व्यक्ती" या मजकुराऐवजी बदलीदाखल केले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ८१ द्वारे जादा दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा क्रमांक (१९) "द्वारे खरेदी किंमत" या मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

३. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र.पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड ८१ द्वारे बदली दाखल करण्यात आला.

(ख) ज्या रकमेच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला असेल, अशा विक्रीच्या जाहीरनाम्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेतून विक्रीच्या अशा जाहीरनाम्याच्या तारखेपासून हुकूमनामाधारकाला मिळाली असेल अशी रक्कम वजा जाता राहणारी रक्कम हुकूमनामाधारकाला देण्यासाठी, न्यायालयात जमा केल्यानंतर विक्री रद्द ठरवण्यात यावी, याकरिता अर्ज करू शकेल.

(ख) ज्या रकमेच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला असेल, अशा विक्रीच्या जाहीरनाम्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेतून विक्रीच्या अशा जाहीरनाम्याच्या तारखेपासून हुकूमनामाधारकाला मिळाली असेल, अशी रक्कम वजा जाता राहणारी रक्कम हुकूमनामाधारकाला देण्यासाठी, न्यायालयात जमा केल्यानंतर विक्री रद्द ठरवण्यात यावी, याकरिता अर्ज करू शकेल :

परंतु, एखाद्या खऱ्याखुऱ्या चुकीच्या किंवा चुकीच्या परिगणनेच्या परिणामी, अर्ज करण्याच्या वेळी, या नियमानुसार न्यायालयात अनामत ठेवणे आवश्यक असलेली रक्कम संपूर्णपणे भरण्यात आली असेल आणि ही चूक किंवा चुकीची परिगणना उघडकीस आल्याच्या दिनांकापासून एक आठवड्याच्या आत तुटीची रक्कम भरण्यात आली असेल तर, न्यायालय त्याला तसे करणे न्याय्य व योग्य वाटत असेल तर विलंब माफ करू शकेल.]

(२) एखादी व्यक्ती नियम ९० खाली आपल्या स्थावर मालमत्तेची विक्री रद्द ठरवण्यासाठी अर्ज करील त्याबाबतीत, तिने तो अर्ज मागे घेतला नाही तर, तिला या नियमाखाली अर्ज करण्याचा किंवा अर्जाचे काम पुढे चालवण्याचा हक्क असणार नाही.

(२) एखादी व्यक्ती नियम ९० खाली आपल्या स्थावर मालमत्तेची विक्री रद्द ठरवण्यासाठी अर्ज करील त्याबाबतीत, तिने तो अर्ज मागे घेतला नाही तर, तिला या नियमाखाली अर्ज करण्याचा किंवा अर्जाचे काम पुढे चालवण्याचा हक्क असणार नाही.

(३) विक्रीच्या जाहीरनाम्यात समाविष्ट नसलेला खर्च व व्याज यांच्या संबंधात, न्यायनिर्णीत ऋणको ज्या कोणत्याही दायित्वाच्या अधीन असेल, त्यापासून त्याला या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे मुक्तता मिळणार नाही.

(३) विक्रीच्या जाहीरनाम्यात समाविष्ट नसलेला खर्च व व्याज यांच्या संबंधात, न्यायनिर्णीत ऋणको ज्या कोणत्याही दायित्वाच्या अधीन असेल त्यापासून त्याला या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे मुक्तता मिळणार नाही.

नियमबाह्य गोष्ट किंवा कपट या कारणावरून विक्री रद्द ठरवण्यासाठी अर्ज.

[1][९०. (१) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये एखाद्या स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल त्याबाबतीत, हुकूमनामाधारक किंवा खरेदीदार किंवा मत्तेच्या यथाप्रमाण विभागणीत हिस्सा मिळण्यास हक्कदार असलेली किंवा जिच्या हितसंबंधावर विक्रीमुळे परिणाम होत असेल अशी कोणतीही व्यक्ती, विक्रीची जाहीरात करताना किंवा तिचे संचालन करताना एखाद्या महत्त्वाच्या बाबीसंबंधी नियमबाह्य गोष्ट घडली किंवा कपट करण्यात आले या कारणावरून विक्री रद्द ठरवण्यात यावी असा न्यायालयाकडे अर्ज करू शकेल.

(२) विक्रीची जाहिरात किंवा संचालन करताना घडलेल्या नियमबाह्य गोष्टीमुळे किंवा कपटामुळे अर्जदारास बरीच हानी सोसावी लागली याबाबत शाबीत झालेल्या तथ्यांवरून न्यायालयाची खात्री पटल्याखेरीज, अशी नियमबाह्य गोष्ट किंवा कपट घडल्याच्या कारणावरून कोणतीही विक्री रद्द ठरवण्यात येणार नाही.

(३) विक्रीचा जाहीरनामा तयार करण्यात आला त्या तारखेस किंवा त्या तारखेपूर्वी अर्जदाराला ज्या कारणाचा आधार घेता आला असता, अशा कोणत्याही

[1][९०. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये एखाद्या स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल त्याबाबतीत, हुकूमनामाधारक किंवा मत्तेच्या यथाप्रमाण विभागणीत हिस्सा मिळण्यास हक्कदार असलेली किंवा जिच्या हितसंबंधावर विक्रीमुळे परिणाम होत असेल, अशी कोणतीही व्यक्ती, विक्रीची जाहीरात करताना, किंवा तिचे संचालन करताना एखाद्या महत्त्वाच्या बाबीसंबंधी नियमबाह्य गोष्ट घडली किंवा कपट करण्यात आले, या कारणावरून विक्री रद्द ठरवण्यात यावी, असा न्यायालयाकडे अर्ज करू शकेल :

नियमबाह्य गोष्ट किंवा कपट या कारणावरून विक्री रद्द ठरवण्यासाठी अर्ज.

परंतु, अशा नियमबाह्य गोष्टीमुळे किंवा कपटामुळे अर्जदारास बरीच हानी सोसावी लागली आहे याबाबत, शाबीत झालेल्या तथ्यांवरून न्यायालयाची खात्री पटल्याखेरीज, अशी नियमबाह्य गोष्ट किंवा कपट घडल्याच्या कारणावरून कोणतीही विक्री रद्द ठरवता येणार नाही :

परंतु आणखी असे की, विक्री रद्द ठरवल्यासंबंधीचा असा कोणताही अर्ज, अशी विक्री सुरू होण्यापूर्वी अर्जदाराला जे मांडता आले असते परंतु, अर्जदाराने

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (एकतीस) अन्वये बदलीदाखल केले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ८३ द्वारे बदलीदाखल केले.

कारणावरून विक्री रद्द ठरवण्यासाठी या नियमाखाली करण्यात आलेला अर्ज विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.

स्पष्टीकरण.—विकलेल्या मालमत्तेची जप्ती करण्यात आली नव्हती किंवा तीत काही उणीव होती, केवळ एवढेच कारण या नियमाखाली विक्री रद्द ठरवण्यास पुरेसे होणार नाही.]

मांडले नसतील अशा कोणत्याही कारणावरून विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.]

न्यायनिर्णीत ऋणकोला विक्रेय हितसंबंध नाही या कारणावरून विक्री रद्द ठरवण्याकरिता खरेदीदाराने केलेला अर्ज.

९१. हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये होणाऱ्या अशा कोणत्याही विक्रीमधील खरेदीदार न्यायनिर्णीत ऋणकोला, विकलेल्या मालमत्तेमध्ये विक्रेय हितसंबंध नव्हता, या कारणावरून विक्री रद्द ठरवण्याकरिता न्यायालयाकड अर्ज करू शकेल.

अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्यांकडे हस्तांतरित केली असेल त्याबाबतीत, अनामत रकमा कशा ठेवावयाच्या.

[१][९१ क. हुकूमनाम्याची अंमलबजावणी जिल्हाधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात आलेली असेल आणि विक्री जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा जिल्हाधिकाऱ्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्याकडून करण्यात येत असेल, तर नियम ८९, ९० किंवा ९१ खालील कोणताही अर्ज आणि नियम ८९ खालील अर्जाच्या बाबतीत, या नियमानुसार आवश्यक असलेली अनामत रक्कम जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा संहितेच्या कलम ७० खाली राज्य शासनाने तयार केलेल्या कोणत्याही नियमानुसार, हुकूमनामा ज्या अधिकाऱ्याकडे निर्देशित केला असेल, त्या अधिकाऱ्याकडे भरण्यात आली असेल तर, ती अनामत रक्कम, नियम ८९, ९० आणि ९१ च्या अर्थांतर्गत न्यायालयाकडे किंवा न्यायालयात भरली असल्याचे मानण्यात येईल.]

विक्री केव्हा अबाधित व्हावयाची किंवा रद्द व्हावयाची.

९२. (१) नियम ८९, नियम ९० किंवा नियम ९१ याखाली कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात येऊन तो नामंजूर करण्यात आला असेल त्याबाबतीत, न्यायालय विक्री कायम करण्यात आल्याचा आदेश काढील व त्यानंतर विक्री अबाधित होईल :

[१][परंतु, एखादी मालमत्ता हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये विकण्यात आली असता, अशा मालमत्तेसंबंधीच्या हक्कमागणीचा अगर तिच्या जप्तीस घेतलेल्या हरकतीचा अंतिम निकाल व्हावयाचा असेल तेव्हा, अशी हक्कमागणी किंवा हरकत अंतिमरीत्या निकालात काढली जाईपर्यंत, न्यायालय विक्री कायम करणार नाही.]

विक्री केव्हा अबाधित व्हावयाची किंवा रद्द व्हावयाची.

९२(१) नियम ८९, नियम ९० किंवा नियम ९१ याखाली कोणताही अर्ज करण्यात आला नसेल किंवा असा अर्ज करण्यात येऊन तो नामंजूर करण्यात आला असेल त्याबाबतीत, न्यायालय विक्री कायम करण्यात आल्याचा आदेश काढील व त्यानंतर विक्री अबाधित होईल.

[१][परंतु, विक्री कायम करण्यापूर्वी न्यायालय नियम ९४ खाली द्यावयाच्या प्रमाणपत्राकरिता लागणाऱ्या सर्वसाधारण मुद्रांकित कागदाच्या खरेदीकरिता नियम ८५ खाली दिलेली रक्कम, विक्री कायम करण्याच्या वेळी अंमलात असलेल्या दरांनुसार त्या उद्देशासाठी पुरेशी आहे याबद्दल स्वत:ची खात्री करून घेईल आणि नियम ८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, खरेदीदाराला कोणतीही तूट भरून काढण्यासाठी, त्याला योग्य वाटेल इतका वेळ देईल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (बत्तीस) (क्) अन्वये घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ८४ द्वारे घालण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा क्रमांक (२०) अन्वये घालण्यात आले.

(२) असा अर्ज करण्यात येऊन तो मंजूर करण्यात आला असेल आणि नियम ८९ खाली केलेल्या अर्जाच्या बाबतीत, त्या नियमाखाली आवश्यक असलेली अनामत रक्कम विक्रीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत जमा करण्यात आली असेल [१][अथवा, नियम ८९ खाली जमा केलेली रक्कम अनामतदाराची लिहिण्यातील किंवा आकडेमोडीतील चूक यामुळे कमी पडल्याचे आढळून आले व न्यायालय निश्चित करील अशा मुदतीत ती तूट भरून काढण्यात आली तर, न्यायालय विक्री रद्द ठरवणारा आदेश काढील]:

परंतु, अर्जामुळे ज्या व्यक्तींवर परिणाम झाला असेल, त्या सर्व व्यक्तींना अर्जाची नोटीस देण्यात आल्याखेरीज आदेश काढण्यात येणार नाही.

(३) ज्या व्यक्तीच्या विरुद्ध असा आदेश काढण्यात आला असेल, अशा कोणत्याही व्यक्तीला या नियमाखाली काढलेला आदेश रद्द ठरवण्याकरिता दावा लावता येणार नाही.

[२][(४) जेव्हा तिसरा पक्षकार लिलाव-खरेदीदाराच्या विरुद्ध दावा दाखल करून न्यायनिर्णीत ऋणकोच्या हक्काला आव्हान देईल अशा बाबतीत, हुकूमनामाधारक व न्यायनिर्णीत ऋणको दाव्यातील आवश्यक ते पक्षकार असतील.

(५) जर पोटनियम (४) खाली निर्देशिलेल्या दाव्यावर हुकूमनामा देण्यात आला तर न्यायालय, हुकूमनामाधारकाला लिलाव-खरेदीदाराला रक्कम परत करण्याचा आदेश देईल, आणि जेथे असा आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, ज्यामध्ये विक्री करण्यात आली होती ती अंमलबजावणीची कार्यवाही, न्यायालयाने अन्यथा आदेश दिलेला नसल्यास ज्यामध्ये विक्रीचा आदेश देण्यात आला होता त्या टप्प्यावर पुनरुज्जीवित करण्यात येईल.]

विवक्षित प्रकरणात खरेदीची किंमत परत करणे.

९३. नियम ९२ खाली स्थावर मालमत्तेची विक्री रद्द ठरवण्यात आली असेल त्याबाबतीत, खरेदीदार आपली खरेदीची किंमत, ज्या व्यक्तीला ती देण्यात आली असेल तिच्याकडून न्यायालय निदेश देईल त्याप्रमाणे व्याजासह किंवा व्याजाशिवाय परत मिळण्याचा आदेश मिळण्यास हक्कदार असेल.

खरेदीदारास प्रमाणपत्र.

९४. स्थावर मालमत्तेची विक्री अबाधित झाली असेल त्याबाबतीत, न्यायालय, विकलेली मालमत्ता व विक्रीच्या वेळी खरेदीदार म्हणून घोषित केलेल्या व्यक्तीचे नाव विनिर्दिष्ट करणारे प्रमाणपत्र देईल. अशा प्रमाणपत्रावर, ज्या दिवशी विक्री अबाधित झाली असेल, त्या दिवसाची तारीख नमूद करण्यात येईल.

[१][**९४. स्थावर मालमत्तेची विक्री अबाधित झाली असेल त्याबाबतीत, न्यायालय, विकलेली मालमत्ता, खरेदीची रक्कम व विक्रीच्या वेळी खरेदीदार म्हणून घोषित केलेल्या व्यक्तीचे नाव विनिर्दिष्ट करणारे प्रमाणपत्र देईल. अशा प्रमाणपत्रावर, ज्या दिवशी विक्री अबाधित झाली असेल, त्या दिवसांची तारीख नमूद करण्यात येईल.**]

न्यायनिर्णीत ऋणकोच्या भोगवटचात असलेल्या मालमत्तेची सुपूर्दगी.

९५. विकलेली स्थावर मालमत्ता ही न्यायनिर्णीत ऋणकोच्या किंवा त्यांच्या वतीने एखाद्या अन्य व्यक्तीच्या किंवा अशी मालमत्ता जप्त केल्यानंतर न्यायनिर्णीत ऋणकोने निर्माण केलेल्या हक्कापोटी, हक्क सांगणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या भोगवटचात असेल व त्यासंबंधात नियम ९४ खाली प्रमाणपत्र देण्यात आलेले असेल तर, खरेदीदाराने अर्ज केल्यानंतर न्यायालय असा खरेदीदार किंवा तो आपल्या वतीने सुपूर्दगी स्वीकारण्यासाठी नेमील, अशी व्यक्ती यांच्याकडे मालमत्तेचा कब्जा देऊन व कब्जा सोडण्यास नकार देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, आवश्यक तर, काढून लावून सुपूर्दगी करावी असा आदेश देईल.

भाडेकरूंच्या भोगवटचातील मालमत्तेची सुपूर्दगी.

९६. विकलेली मालमत्ता ही, भाडेकरूच्या किंवा तिचा भोगवटा करण्यास हक्कदार असलेल्या अन्य व्यक्तीच्या भोगवटचात असेल व त्यासंबंधात नियम ९४ खाली प्रमाणपत्र देण्यास आलेले असेल त्याबाबतीत, न्यायालय खरेदीदाराच्या अर्जावरून मालमत्तेतील ठळक ठिकाणी विक्रीच्या प्रमाणपत्राची प्रत चिकटवून आणि न्यायनिर्णीत ऋणकोचा हितसंबंध खरेदीदाराकडे हस्तांतरित करण्यात आला आहे, असे एखाद्या सोईस्कर जागी दवंडी पिटवून किंवा अन्य शिरस्तेवाईक पद्धतीने जाहीर करून सुपूर्दगीचा आदेश देईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (बत्तीस) (ख) अन्वये "न्यायालय विक्री रद्दबातल करणारा आदेश काढील" या मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. वरिल अधिनियमाच्या कलम ७२ (बत्तीस) (ग) अन्वये घालण्यात आले.

१. **मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (२१) द्वारे बदली दाखल केले.**

हुकूमनामाधारक किंवा खरेदीदार यांच्याकडे कब्जा सुपूर्द करण्याला प्रतिकार.

स्थावर मालमत्तेचा कब्जा देण्यास प्रतिकार किंवा अडथळा.

९७. (१) स्थावर मालमत्तेच्या कब्जाच्या संबंधातील हुकूमनामाधारक किंवा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत विकलेल्या मालमत्तेचा खरेदीदार यांना मालमत्तेचा कब्जा मिळवत असताना, कोणत्याही व्यक्तीने प्रतिकार केला किंवा अडथळा केला तर, त्यास असा प्रतिकार किंवा अडथळा याबद्दल तक्रार करणारा अर्ज न्यायालयाकडे करता येईल.

अभिनिर्णयानंतरचे आदेश.

[१][(२) पोटनियम (१) खाली कोणताही अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, न्यायालय यात अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार अर्जाचा अभिनिर्णय करण्याची कार्यवाही करील.]

[२][९८. (१) नियम १०१ मध्ये निर्देशिलेल्या प्रश्नांचा निर्णय केल्यावर न्यायालय, अशा निर्णयानुसार व पोटनियम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने,

(क्) अर्ज मंजूर करून अर्जदाराकडे मालमत्तेचा कब्जा द्यावा असा, किंवा अर्ज फेटाळून लावणारा आदेश देईल ; किंवा

(ख्) प्रकरणाच्या परिस्थितीत, त्यास योग्य वाटेल असा अन्य आदेश देईल; किंवा

(२) अशा निर्णयान्ती जर, कोणतेही न्याय्य कारण नसताना, न्यायनिर्णीत ऋणकोने अथवा त्याच्या चिथावणीवरून किंवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने अथवा दावा किंवा अंमलबजावणीची कार्यवाही प्रलंबित असताना त्याने हस्तांतरण केले असेल, तर त्यांच्या हस्तांतरितीने प्रतिकार केला किंवा अडथळा केला आहे अशी न्यायालयाची खात्री पटली तर, अर्जदाराला मालमत्तेचा कब्जा देण्यात यावा असे न्यायालय निदेशित करील,आणि त्यानंतरही अर्जदाराला कब्जा मिळवण्याच्या कामी प्रतिकार किंवा अडथळा करण्यात आला तर, अर्जदाराच्या विनंतीवरून न्यायालय न्यायनिर्णीत ऋणकोला अथवा त्याच्या चिथावणीवरून किंवा त्याच्या वतीने तसे कृत्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला तीस दिवसांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीपर्यंत दिवाणी न्यायालयात स्थानबद्ध करण्याचाही आदेश देऊ शकेल.]

[१][९८. (१) अशा निर्णयान्ती जर, कोणतेही न्यायनिर्णित ऋणकोने न्याय्यकारण नसताना न्यायनिर्णीत ऋणकोने किंवा केलेला प्रतिकार त्याच्या चिथावणीवरून किंवा त्याच्यावतीने अन्य किंवा अडथळा. कोणत्याही व्यक्तीने प्रतिकार केला किंवा अडथळा केला आहे अशी न्यायालयाची खात्री पटली तर, अर्जदाराला मालमत्तेचा कब्जा देण्यात यावा असे न्यायालय निदेशित करील ,आणि त्यानंतरही अर्जदाराला कब्जा मिळवण्याच्या कामी प्रतिकार किंवा अडथळा करण्यात आला तर, अर्जदाराच्या विनंतीवरून न्यायालय न्यायनिर्णीत ऋणकोला अथवा त्याच्या चिथावणीवरून किंवा यांच्यावतीने तसे कृत्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला तीस दिवसांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीपर्यंत दिवाणी न्यायालयात स्थानबद्ध करण्याचाही आदेश देऊ शकेल. आणि असा प्रतिकार किंवा अडथळा करण्यासंबंधात ज्याला न्यायालयाने जबाबदार धरले आहे अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींना न्यायालय हुकूमनामाधारक किंवा, प्रकरणपरत्वे, खरेदीदार यांना खर्चाबरोबरच ताबा मिळवताना त्याला झालेल्या विलंबासाठी योग्य ती भरपाईही संयुक्तपणे किंवा पृथकपणे देण्याचा आदेश देऊ शकेल. या नियमाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाला तोच प्रभाव असेल व तो अपिलाच्या बाबतीत किंवा अन्य बाबतीत तो जणू काही हुकूमनामा असल्याप्रमाणे त्याच शर्तींना अधीन असेल.]

[१][(२) अशा निर्णयान्ती जर, कोणतेही न्याय्य कारण नसताना, न्यायनिर्णीत ऋणकोने अथवा त्याच्या चिथावणीवरून किंवा त्याच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने अथवा दावा किंवा अंमलबजावणीची कार्यवाही प्रलंबित असताना त्याने हस्तांतरण केले असेल तर, त्याच्या हस्तांतरितीने प्रतिकार केला किंवा अडथळा केला आहे अशी न्यायालयाची खात्री पटली तर, अर्जदाराला मालमत्तेचा कब्जा देण्यात यावा असे न्यायालय निदेशित करील, आणि त्यानंतरही अर्जदाराला कब्जा मिळवण्याच्या कामी प्रतिकार किंवा अडथळा करण्यात आला तर, अर्जदाराच्या विनंतीवरून न्यायालय न्यायनिर्णीत ऋणकोला अथवा त्याच्या चिथावणीवरून किंवा त्याच्यावतीने तसे कृत्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला तीस दिवसांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीपर्यंत दिवाणी न्यायालयात स्थानबद्ध करण्याचाही आदेश देऊ शकेल. (असा प्रतिकार किंवा अटकाव करण्यासंबंधात ज्याला न्यायालयाने जबाबदार धरले आहे) अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींना न्यायालय

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (तेहतीस) अन्वये बदलीदाखल केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७२ (चौतीस) द्वारे मूळ नियम ९८ ते १०३ याऐवजी घालण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ८६ द्वारे बदली दाखल घालण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा २२ द्वारे बदली दाखल केले.

हुकूमनामाधारक किंवा, प्रकरणपरत्वे, खरेदीदार यांना खर्चाबरोबरच ताबा मिळवताना त्याला झालेल्या विलंबासाठी योग्य ती भरपाईही संयुक्तपणे किंवा पृथकपणे देण्याचा आदेश देऊ शकेल. या नियमाखाली दिलेल्या कोणत्याही आदेशाला तोच प्रभाव असेल व तो अपिलाच्या बाबतीत किंवा अन्य बाबतीत तो जणू काही हुकूमनामा असल्याप्रमाणे त्याच शर्तींच्या अधीन असेल.)]

हुकूमनामाधारक किंवा खरेदीदार यांच्याद्वारे कब्जा काढून घेतला जाणे.

९९. (१) न्यायनिर्णीत ऋणकोव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडून स्थावर मालमत्तेचा कब्जा, अशा मालमत्तेच्या कब्जाकरिता काढलेल्या हुकूमनामाधारकाने किंवा, अशी मालमत्ता हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत विकण्यात आली असेल तर, तिच्या खरेदीदाराने काढून घेतला असेल तर, ती याप्रमाणे आपणास बेदखल करण्यात आल्याची तक्रार करणारा अर्ज न्यायालयाकडे करू शकेल.

[१][९९. न्यायनिर्णीत ऋणकोव्यतिरिक्त अन्य व्यक्तीकडे किंवा स्वत:कडे मालमत्तेचा कब्जा असल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने (नियम ९५ किंवा ९८ मध्ये उल्लेख केलेल्या व्यक्ती वगळून) प्रतिकार किंवा अडथळा केला अशी न्यायालयाची खात्रीपटल्यास, न्यायालय असा अर्ज फेटाळून लावणारा आदेश काढू शकेल.]

खऱ्याखुऱ्या दावाधारकाकडून प्रतिकार किंवा अडथळा.

(२) असा अर्ज करण्यात आला असता, न्यायालय, यात अंतर्भूत असलेल्या उपबंधाच्या अनुसार, त्या अर्जावर अभिनिर्णय करण्याची कार्यवाही करील.

बेदखल करण्यात आल्याची तक्रार करणारा अर्ज आल्यावर द्यावयाचा आदेश.

१००. नियम १०१ मध्ये निर्देशिलेल्या प्रश्नांचा निर्णय केल्यावर, अशा निर्णयाच्या अनुसार, न्यायालय,—

(क) अर्ज मंजूर करून, अर्जदाराकडे मालमत्तेचा कब्जा देण्यात यावा असे निदेशित करणारा किंवा अर्ज फेटाळून लावणारा आदेश काढील ; अथवा

(ख) प्रकरणाच्या परिस्थितीत त्यास योग्य वाटेल असा अन्य आदेश काढील.

[२][ज्यामध्ये हुकूमनामा देण्यात आला आहे असा दावा दाखल केल्यानंतर, जिच्याकडे न्यायनिर्णीत ऋणकोने मालमत्ता हस्तांतरित केली आहे अशा व्यक्तीनेच अर्ज केला आहे असा निर्णय घेण्यात आला असेल त्याबाबतीत, न्यायालय वरील पोटनियम (क) अन्वये अर्ज फेटाळून लावील.]

निर्णीत करावयाचे प्रश्न.

१०१. नियम ९७ किंवा नियम ९९ खाली करण्यात आलेल्या अर्जावरील कार्यवाहीतील पक्षकार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या दरम्यान उद्भवणारे आणि त्या अर्जाच्या अभिनिर्णयाच्या दृष्टीने संबद्ध असलेले (मालमत्तेवरील हक्क, स्वत्वाधिकार किंवा हितसंबंध यासंबंधीच्या प्रश्नासह) सर्व प्रश्न अर्जाचा परामर्श घेणाऱ्या न्यायालयाकडून निर्णीत केले जातील. स्वतंत्र दाव्याद्वारे नव्हे—आणि या प्रयोजनार्थ, न्यायालयास अशा प्रश्नांचा निर्णय करण्याची अधिकारिता आहे, असे मानले जाईल—मग त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात एतद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी हरकत नाही

[१][परंतु, जेव्हा न्यायालय, द्रव्यविषयक अधिकारितेच्या अभावी, अशा प्रश्नावर निर्णय घेण्यास सक्षम नसेल तेव्हा, ते न्यायालय, ज्या न्यायालयाला दुय्यम असेल अशा जिल्हा न्यायाधीशाच्या न्यायालयाकडे हे अंमलबजावणीचे प्रकरण पाठवील आणि त्यानंतर, जिल्हा न्यायाधीशाचे न्यायालय, ते प्रकरण मुळात त्याच न्यायालयात दाखल केले असावे, त्याच पद्धतीने त्यावर कार्यवाही करील.]

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, सुधारणा (८७) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (२३) द्वारे जादा दाखल केले.

३. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (२४) द्वारे परंतुक जादा दाखल केले.

दावा प्रलंबित असताना ज्याच्याकडे हस्तांतरण करण्यात आले त्या हस्तांतरितीला नियम लागू नसणे.

१०२. ज्या दाव्यात हुकूमनामा दण्यात आला तो दावा दाखल करण्यात आल्यानंतर. न्यायनिर्णीत ऋणकोने जिच्याकडे मालमत्ता हस्तांतरित केली असेल अशा व्यक्तीकडून, स्थावर मालमत्तेच्या कब्जाच्या हुकूमनाम्याच्या अंमबजावणीस होणारा प्रतिकार किंवा अडथळा अथवा अशा कोणत्याही व्यक्तीला वेदखल केले जाणे याबाबत, नियम ९८ व १०० यांमधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

स्पष्टीकरण.—या नियमात " हस्तांतरण " या संज्ञेत कायद्याच्या प्रवर्तनामुळे होणारे हस्तांतरण समाविष्ट आहे.

[१][१०२. **वगळण्यात आले.**]

आदेश हुकूमनाम्याप्रमाणे समजणे.

१०३. नियम ९८ किंवा नियम १०० खाली एखाद्या अर्जाचा अभिनिर्णय करण्यात आला असेल त्याबाबतीत, त्यावर दिलेला आदेश हा जणू काही, एखादा हुकूमनामा असावा त्याप्रमाणे तितकाच प्रभावी असेल आणि अपिलासंबंधी किंवा अन्यथा त्याच शर्तींना अधीन असेल.]

नियम १०१ किंवा नियम १०३ खालील आदेश. प्रलंबित दाव्याच्या निकालाच्या अधीन असणे.

[१][१०४. नियम १०१ किंवा नियम १०३ खालील आदेश, ज्या पक्षकाराच्या विरुद्ध काढण्यात आला आहे, त्या पक्षकाराने मालमत्तेचा वर्तमान कब्जा आपणास मिळण्याचा अधिकार सांगितला असेल व तो अधिकार अशा दाव्यामध्ये तो प्रस्थापित करू इच्छित असेल तर, नियम १०१ किंवा नियम १०३ खालील असा प्रत्येक आदेश, ज्या कार्यवाहीत असा आदेश देण्यात आला त्या कार्यवाहीच्या प्रारंभाच्या तारखेस जो कोणताही दावा प्रलंबित असेल, त्या दाव्याच्या निकालाच्या अधीन असेल.

अर्जाची सुनावणी.

१०५. (१) या आदेशामधील कोणत्याही पूर्ववर्ती नियमाखालील अर्ज ज्या न्यायालयात प्रलंबित असेल, ते न्यायालय त्या अर्जाच्या सुनावणीसाठी दिवस निश्चित करू शकेल.

(२) निश्चित केलेल्या दिवशी किंवा ज्या दिवसापर्यंत सुनावणी तहकूब केली असेल अशा अन्य कोणत्याही दिवशी, खटला सुनावणीला आलेला असताना अर्जदार उपस्थित झाला नाही तर, न्यायालय, अर्ज खारीज करण्याचा आदेश देऊ शकेल.

(३) अर्जदार उपस्थित राहिला पण न्यायालयाने ज्याला नोटीस दिली असेल असा विरुद्ध पक्षकार अनुपस्थित राहिला तर, न्यायालय अर्जाची एकतर्फी सुनावणी करू शकेल व त्यास योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल.

स्पष्टीकरण.—पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या 'अर्ज' या संज्ञेत, नियम ५८ खाली दाखल केल्या जाणाऱ्या हक्कमागणीचा किंवा हरकतीचा समावेश होतो.

एकतर्फी, इत्यादी, काढलेले आदेश रद्द करणे.

१०६. (१) नियम १०५ च्या पोटनियम (२) खाली ज्या अर्जदाराच्या विरुद्ध आदेश काढण्यात आला असेल, तो अर्जदार, अथवा त्या नियमाच्या पोटनियम (३) खाली किंवा नियम २३ च्या पोटनियम (१) खाली ज्याच्याविरुद्ध एकतर्फी आदेश काढण्यात आला असेल, तो विरुद्ध पक्षकार, आदेश रद्द करण्यात यावा, म्हणून न्यायालयाकडे अर्ज करू शकेल आणि अर्ज सुनावणीस घेतला त्या दिवशी तो अनुपस्थित राहण्यास पुरेसे कारण होते, याबद्दल त्यान न्यायालयाची खात्री पटवून दिल्यास, न्यायालय त्यास योग्य वाटेल अशा खर्चविषयक किंवा अन्य अटींवर आदेश रद्द ठरवील, व अर्जाच्या पुढील सुनावणीसाठी दिवस निश्चित करील.

(२) पोटनियम (१)खाली अर्ज करण्यात आला असता, अर्जाची नोटीस दुसऱ्या पक्षकारास दिली असल्याखेरीज, त्या अर्जावर कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(३) पोटनियम (१) खालील अर्ज, आदेशाच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, किंवा नोटीस रीतसर बजावण्यात न आल्याने एकतर्फी आदेश काढला गेला असेल त्याबाबतीत, त्या आदेशाबद्दल अर्जदारास कळले असेल त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, करावा लागेल.]

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७२ (पस्तीस) द्वारे समाविष्ट केले.

१. **मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (२५) द्वारे वगळले.**

आदेश बाविसावा

पक्षकारांचा मृत्यू, विवाह आणि दिवाळखोरी

दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास पक्षकाराच्या मृत्यूनंतर दावा अवसान न होणे.

१. एखादा वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास त्यामुळे, दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास दावा अवसान होणार नाही.

अनेक वादी किंवा प्रतिवादी यांपैकी एखाद्याचा मृत्यू झाल्यास आणि दावा चालू ठेवण्याचा अधिकार टिकून राहिल्यास, त्या संबंधातील कार्यपद्धती.

२. एकापेक्षा अधिक वादी किंवा प्रतिवादी असून त्यांच्यापैकी एखाद्याचा मृत्यू झाला आणि उत्तरजीवी वादीकडे किंवा वादींकडेच फक्त अथवा उत्तरजीवी प्रतिवादीच्या किंवा प्रतिवादींच्या विरुद्धच फक्त, दावा चालू ठेवण्याचा अधिकार टिकून राहिला असेल त्याबाबतीत, न्यायालयाने दप्तरात तशा अर्थाची नोंद करण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि उत्तरजीवी वादीच्या किंवा वादींच्या विनंतीनुसार किंवा उत्तरजीवी प्रतिवादीच्या किंवा प्रतिवादींच्या विरुद्ध दावा पुढे चालवण्यात येईल.

अनेक वादींपैकी एकाचा किंवा एकमेव वादीचा मृत्यू झाल्यास त्या संबंधातील कार्यपद्धती.

३. (१) दोन किंवा अधिक वादींपैकी एकाचा मृत्यू झाला आणि दावा चालवण्याचा अधिकार फक्त उत्तरजीवी वादीकडे किंवा वादींकडेच टिकून राहिला नाही अथवा एकमेव वादीचा किंवा एकमेव उत्तरजीवी वादीचा मृत्यू झाला आणि दावा चालवण्याचा अधिकार टिकून राहिला तर, त्याबाबतीत, तसा अर्ज करण्यात आल्यास, न्यायालयाने मृत वादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस पक्षकार करण्याची व्यवस्था केली पाहिजे व दावा पुढे चालू ठेवला पाहिजे.

(२) कायद्याने विहित केलेल्या कालमर्यादेत पोटनियम (१) खाली कोणताही अर्ज करण्यात आला नाही तर, मृत वादीशी संबंधित असेल तेथवर, दावा अवसान होईल, आणि प्रतिवादीने अर्ज केल्यास न्यायालयास, प्रतिवादीला दाव्यातील बचावाकरिता जो खर्च करावा लागला असेल तो देऊन मृत वादीच्या संपदेमधून तो वसूल करण्याची मुभा निवाड्याने देता येईल.

अनेक प्रतिवादींपैकी एकाचा किंवा एकमेव प्रतिवादीचा मृत्यू झाल्यास त्या संबंधातील कार्यपद्धती.

४. (१) दोन किंवा अधिक प्रतिवादींपैकी एकाचा मृत्यू झाला आणि दावा दाखल करण्याचा अधिकार फक्त उत्तरजीवी प्रतिवादीच्या किंवा प्रतिवादींच्याच विरुद्ध टिकून राहिला नाही अथवा एकमेव प्रतिवादीचा किंवा एकमेव उत्तरजीवी प्रतिवादीचा मृत्यू झाला आणि दावा चालवण्याचा अधिकार टिकून राहिला तर त्याबाबतीत, तसा अर्ज करण्यात आल्यास न्यायालयाने मृत प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस पक्षकार करण्याची व्यवस्था केली पाहिजे व दावा पुढे चालू ठेवला पाहिजे.

(२) याप्रमाणे पक्षकार करून घेण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, मृत प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीच्या भूमिकेस अनुरूप असेल असा कोणताही बचाव देता येईल.

(३) कायद्यामध्ये विहित केलेल्या कालमर्यादेत पोटनियम (१) खाली कोणताही अर्ज केला गेला नाही तर, मृत प्रतिवादीशी संबंधित असेल तेथवर, दावा अवसान होईल.

[१][(४) ज्याने प्रतिवादपत्र दाखल केले नसेल किंवा ते दाखल केले असूनही ज्याने सुनावणीच्या वेळी न्यायालयात उपस्थित राहून दावा लढविला नसेल, अशा कोणत्याही प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस पक्षकार करून घेण्याच्या आवश्यकतेपासून न्यायालयास, योग्य वाटेल तेव्हा तेव्हा वादीस सूट देता येईल, आणि अशा प्रतिवादीचा मृत्यू झाला असला तरीही, अशा प्रकरणी उक्त प्रतिवादी विरुद्ध न्यायनिर्णय अधिघोषित करता येईल, आणि तो जणू काही प्रतिवादीचा मृत्यू होण्यापूर्वी अधिघोषित करण्यात आला असावा त्याप्रमाणे तितकाच प्रभावी व परिणामक असेल.

(५) (क) एखादा प्रतिवादी मरण पावल्याचे वादीला माहीत नसेल आणि त्या कारणामुळे या नियमाखाली प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस पक्षकार करून घेण्यासाठी मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) यात्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत तो अर्ज करू शकला नसेल व परिणामी, दावा अवसान झाला असेल, आणि

(ख) असे अवसान रद्द ठरवण्यासाठी आणि तसेच, मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) यात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत अर्ज न करण्यास अशी माहिती नसल्याने आपणास पुरेसे कारण होते या आधारावर त्या अधिनियमाच्या कलम ५ खालील अर्ज दाखल करून घेण्यासाठी उक्त अधिनियमात अर्ज स्वीकारण्यासाठी

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७३ (एक) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यानंतर वादीने अर्ज केल्यास, न्यायालयाने उक्त कलम ५ खालील अर्ज विचारात घेतांना, अशी माहिती नसल्याचे शाबीत झाले असल्यास, ती वस्तुस्थिती यथायोग्यपणे लक्षात घेतली पाहिजे.]

कोणीही कायदेशीर प्रतिनिधी नसेल तेव्हाची कार्यपद्धती.

[1][४क. (१) एखाद्या दाव्यात, दावा प्रलंबित असताना मरण पावलेल्या एखाद्या पक्षकाराचा कोणीही कायदेशीर प्रतिनिधी नाही असे न्यायालयास दिसून आल्यास, त्या न्यायालयास, दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावर, मृत व्यक्तीच्या संपदेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीच्या अनुपस्थितीत दावा पुढे चालू ठेवता येईल, किंवा आदेशाद्वारे, दाव्याच्या प्रयोजनार्थ, मृत व्यक्तीच्या संपदेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी महाप्रशासकाची, किंवा न्यायालयाच्या एखाद्या अधिकाऱ्याची किंवा त्यास योग्य वाटेल अशा अन्य व्यक्तीची नेमणूक करता येईल, आणि दाव्यात त्यानंतर दिलेला कोणताही न्याय निर्णय किंवा काढलेला कोणताही आदेश हा, जर मृत व्यक्तीचा वैयक्तिक प्रतिनिधी दाव्यातील एक पक्षकार असता तर त्याच्यावर जितक्या मर्यादेपर्यंत बंधनकारक राहिला असता तितक्याच मर्यादेपर्यंत मृत व्यक्तीच्या संपदेवर बंधनकारक राहील.

(२) या नियमान्वये कोणताही आदेश काढण्यापूर्वी, न्यायालय,—

(क्) असा आदेश मिळण्यासाठी आलेल्या अर्जाची नोटीस मृत व्यक्तीच्या संपदेमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींपैकी त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तींना (तशा व्यक्ती असल्यास) देण्यास फर्मावू शकेल; आणि

(ख्) मृत व्यक्तीच्या संपदेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नेमणूक करण्यासाठी योजलेली व्यक्ती अशा रीतीने नेमणूक होण्यास राजी आहे आणि मृत व्यक्तीच्या हितसंबंधास विरोधी असा तिचा कोणताही हितसंबंध नाही याविषयी खात्री करून घेईल.]

कायदेशीर प्रतिनिधीसंबंधीच्या प्रश्नाचा निर्णय.

५. एखादी व्यक्ती ही, मृत वादीची किंवा मृत प्रतिवादीची कायदेशीर प्रतिनिधी आहे किंवा नाही यासंबंधी प्रश्न उपस्थित झाल्यास, न्यायालयाने त्या प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे :

[2][परंतु, अपील न्यायालयापुढे असा प्रश्न उपस्थित झाल्यास, त्या न्यायालयास त्या प्रश्नाचा निर्णय करण्यापूर्वी, कोणत्याही दुय्यम न्यायालयाला त्या प्रश्नाची संपरीक्षा करण्याचा व अशा संपरीक्षेच्या वेळी काही पुरावा नोंदलेला असेल तर तो पुरावा, आपले निष्कर्ष आणि त्याबद्दलची कारणे यांसह ते कागदपत्र परत करण्याचा निदेश देता येईल, आणि अपील न्यायालयास त्या प्रश्नांचा निर्णय करताना ते विचारात घेता येतील.]

सुनावणीनंतर मृत्यू झाल्यास दावा समाप्त न होणे.

६. पूर्ववर्ती नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सुनावणीच्या समाप्तीपासून निर्णय अधिघोषित होईपर्यंतच्या दरम्यान दोहोंपैकी कोणत्याही पक्षकाराचा मृत्यू झाल्यास—मग त्याच्यामागे वादकारण टिकून राहो वा न राहो—तेवढचा कारणाने दावा समाप्त होणार नाही. परंतु, अशा प्रकरणात पक्षकाराचा मृत्यू झालेला असला तरीही निर्णय अधिघोषित करण्यात येईल आणि तो जणू काही पक्षकाराचा मृत्यू होण्यापूर्वीच अधिघोषित केलेला असावा त्याप्रमाणे तितकाच प्रभावी व परिणामक असेल.

स्त्री पक्षकाराच्या विवाहामुळे दावा समाप्त न होणे.

७. (१) वादी किंवा प्रतिवादी स्त्रीच्या विवाहामुळे दावा समाप्त होणार नाही तर निर्णय होईपर्यंत दावा तसाच पुढे चालू ठेवला पाहिजे व स्त्री प्रतिवादीच्या विरुद्ध हुकूमनामा काढण्यात आल्यास त्याची अंमलबजावणी केवळ तिच्या विरुद्धच करता येईल.

(२) पती त्याच्या पत्नीच्या ऋणांबद्दल कायद्याने दायी असेल त्याबाबतीत, न्यायालयाच्या परवानगीने, पतीच्या विरुद्धही हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता येईल आणि विवाहित स्त्रीच्या बाजूने निर्णय देण्यात आल्यास हुकूमनाम्याच्या विषयवस्तूस पती कायद्याने हक्कदार असेल तर, त्याच्या अर्जावरुन, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचा आदेश काढता येईल.

वादीच्या दिवाळखोरीमुळे दाव्यावर केव्हा रोध येतो.

८. (१) कोणत्याही दाव्यात वादी दिवाळखोर असल्याचे प्रतिकथन अभिहस्तांकितीने किंवा प्रापकाने त्याच्या धनकोंच्या फायद्यासाठी ठामपणे मांडले तरी, अशा दिवाळखोरीने दावा समाप्त होणार नाही, मात्र अशा अभिहस्तांकितीने किंवा प्रापकाने दावा पुढे चालू न ठेवल्यास, किंवा (कोणत्याही विशेष कारणामुळे न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नसेल तर), न्यायालय निदेश देईल इतक्या मुदतीच्या आत त्याच्या खर्चाबद्दल प्रतिभूती देण्यास नकार दिला तर गोष्ट वेगळी.

अभिहस्तांकितीने दावा पुढे चालू न ठेवल्यास किंवा प्रतिभूती न दिल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.

(२) अभिहस्तांकितीने किंवा प्रापकाने दावा पुढे चालू ठेवण्यास किंवा अशा प्रकारे आदेश दिलेल्या मुदतीच्या आत प्रतिभूती देण्यात हयगय केल्यास किंवा त्यास नकार दिल्यास, प्रतिवादीस, वादी दिवाळखोर असल्याच्या कारणावरून दावा फेटाळून लावण्यासाठी अर्ज करता येईल आणि न्यायालयास दावा फेटाळून लावणारा व दाव्यात बचाव देताना प्रतिवादीस जो खर्च आला असेल तो वादीच्या संपदेविरुद्ध असलेले ऋण म्हणून शाबीत झालेला खर्च म्हणून त्यास देववणारा आदेश देता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७३ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७३(तीन) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

दावा समाप्त झाल्यास किंवा तो फेटाळला गेल्यास होणारा परिणाम.

९. (१) या आदेशाखाली दावा समाप्त झाल्यास किंवा तो फेटाळला गेल्यास त्याच वादकारणावरून दुसरा दावा दाखल करता येणार नाही.

(२) वादी किंवा मृत वादीचा कायदेशीर प्रतिनिधी असल्याचा दावा सांगणारी व्यक्ती किंवा दिवाळखोर वादीच्या बाबतीत, अभिहस्तांकिती किंवा प्रापक यांना दावा समाप्ती किंवा फेटाळणे रद्द ठरवणारा आदेश मिळविण्याकरता अर्ज करता येईल आणि दावा पुढे चालू ठेवण्यास कोणत्याही पुरेशा कारणाने त्याला प्रतिबंध झाला होता असे शाबीत झाले तर, न्यायालयाने त्यास योग्य वाटेल अशा खर्चविषयक किंवा अन्य अटींवर ती समाप्ती किंवा फेटाळणे रद्द ठरविले पाहिजे.

(३) [1]भारतीय मुदत अधिनियम, १८७७ (१८७७ चा १५) याच्या कलम ५ चे उपबंध पोटनियम (२) खालील अर्जांना लागू होतील.

[2][स्पष्टीकरण.—जो दावा या आदेशाखाली समाप्त झाला असेल किंवा फेटाळला गेला असेल, त्यामध्ये वादकारणास घटकभूत आलेल्या तथ्यांच्या आधारे, नंतरच्या कोणत्याही दाव्यात बचाव देण्यास या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे मनाई होते असा तिचा अर्थ लावता कामा नये.]

दाव्यातील अंतिम आदेशापूर्वी अभिहस्तांकने झाल्यास त्या बाबतीतील कार्यपध्दती.

१०. (१) एखादा दावा प्रलंबित असताना कोणत्याही हितसंबंधाचे अभिहस्तांकन, निर्मिती किंवा प्रक्रांती झाल्यास ज्या व्यक्तीकडे असा हितसंबंध आला असेल किंवा प्रक्रांत झाला असेल त्या व्यक्तीला किंवा तिच्याविरुद्ध, न्यायालयाच्या परवानगीने, दावा चालू ठेवता येईल.

(२) एखाद्या हुकूमनाम्याच्या विरुद्ध केलेले अपील प्रलंबित असताना, हुकूमनाम्यावर आणलेली जप्ती म्हणजे ज्या व्यक्तीने जप्ती आणवली असेल त्या व्यक्तीला पोटनियम (१) च्या लाभास हक्कदार करणारा हितसंबंध होय असे मानले जाईल.

पक्षकाराच्या मृत्यूबद्दल न्यायालयास कळविणे हे प्लीडरचे कर्तव्य.

[3][१०-क. दाव्यातील एखाद्या पक्षकाराच्या बाजूने काम चालवणाऱ्या प्लीडरला जेव्हा केव्हा त्या पक्षकाराच्या मृत्यूचे वृत्त कळेल तेव्हा, त्याने न्यायालयाला ते कळविले पाहिजे आणि, त्यानंतर न्यायालयाने अशा मृत्यूसंबंधी दुसऱ्या पक्षकाराला नोटीस दिली पाहिजे, आणि या प्रयोजनार्थ, प्लीडर व मयत पक्षकार यांच्याभधील संविदा अस्तित्वात असल्याचे मानण्यात येईल.]

हा आदेश अपिलांना लागू करणे.

११. हा आदेश अपिलांना लागू करताना, शक्य तेथवर, "वादी" या शब्दात अपीलकर्त्याचा आणि "प्रतिवादी" या शब्दात उत्तरवादीचा आणि "दावा" या शब्दात अपिलाचा समावेश होतो असे समजण्यात येईल.

हा आदेश कार्यवाहींना लागू करणे.

१२. नियम ३, ४ व ८ यांतील कोणतीही गोष्ट, हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीतील कार्यवाहींना लागू होणार नाही.

आदेश तेविसावा

दावे मागे घेणे व त्यांचे समायोजन करणे.

दावा मागे घेणे किंवा दाव्यातील हक्कमागणीचा काही भाग सोडून देणे.

[4][१. (१) दावा दाखल केल्यानंतर कोणत्याही वेळी, वादीस सर्व प्रतिवादींवरील किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रतिवादीवरील आपला दावा सोडून देता येईल किंवा आपल्या दाव्यातील हक्कमागणीचा एखादा भाग सोडून देता येईल :

परंतु, वादी अज्ञान असेल अगर बत्तिसाव्या आदेशातील नियम १ ते १४ यांमध्ये अंतर्भूत असलेले उपबंध ज्या व्यक्तीला लागू होतात अशी व्यक्ती असेल तेव्हा, दावा किंवा दाव्यातील हक्कमागणीचा कोणताही भाग न्यायालयाच्या परवानगी शिवाय सोडून देता येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या परंतुकाखाली परवानगीसाठी अर्ज करताना, सोबत त्याच्या वादमित्राचे शपथपत्र आणि, तसेच अज्ञान किंवा अशा अन्य व्यक्तीचे प्रतिनिधित्व प्लीडर करीत असेल तर, संबंधित दावा सोडून देणे हे, त्याच्या मते, अज्ञान किंवा अशा अन्य व्यक्तीच्या हिताचे आहे अशा अर्थाचे प्लीडरचे प्रमाणपत्रदेखील जोडावे लागेल.

(३) (क्) काही औपचारिक दोषामुळे दावा निष्फळ होणे अटळ आहे, किंवा

(ख्) दाव्याच्या विषयवस्तूंकरिता किंवा दाव्यातील हक्कमागणीच्या भागाकरिता नवीन दावा सुरू करण्यास वादीला परवानगी देण्याजोगी इतर पुरेशी आधारकारणे आहेत,

अशी न्यायालयाची खात्री पटल्यास, न्यायालय, स्वत:ला योग्य वाटतील अशा अटींवर, वादीला असा दावा किंवा दाव्यातील हक्कमागणी मागे घेण्याची परवानगी देऊन, अशा दाव्यातील विषयवस्तूच्या किंवा अशा हक्कमागणीच्या भागाच्या संबंधात नवीन दावा सुरू करण्याची मोकळीक देऊ शकेल.

---

१. आता, मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) कलमे ४ व ५ पहा.
२. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७३ (चार) अन्वये समाविष्ट करण्यात आले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ७३(पाच) अन्वये समाविष्ट करण्यात आले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ७४ (एक) अन्वये दाखल करण्यात आले.

(४) जर वादीने,—

(क) पोटनियम (१) अन्वये एखादा दावा किंवा दाव्यातील हक्कमागणीचा भाग सोडून दिला तर, किंवा

(ख) पोटनियम (३) मध्ये निर्देशिल्याप्रमाणे परवानगी घेतल्याशिवाय, एखादा दावा किंवा त्यातील हक्कमागणीचा भाग मागे घेतला तर,

न्यायालय निवाडयाने देववील असा खर्च देण्यास तो दायी असेल आणि अशी विषयवस्तू किंवा दाव्यातील हक्कमागणीचा असा भाग यांच्या संबंधात कोणताही नवीन दावा सुरू करण्यास त्यास प्रतिबंध होईल.

(५) अनेक वादींपैकी एका वादीला, पोटनियम (१) खाली दावा किंवा दाव्यातील हक्कमागणीचा भाग सोडून देण्याची अथवा पोटनियम (३) खाली अन्य वादींच्या संमतीखेरीज, तो मागे घेण्याची परवानगी देण्यास, या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायालयास प्राधिकार मिळतो असे समजण्यात येणार नाही.]

[1][१क. वादीने नियम १ खाली दावा मागे घेतला असेल किंवा सोडून दिला आणि प्रतिवादीने पहिल्या आदेशातील नियम १० खाली वादीच्या जागी आपल्याला स्थानापन्न करावे असा अर्ज दिल्यास, अशा अर्जाचा विचार करताना न्यायालयाने, इतर प्रतिवादींच्या पैकी कोणाच्याही विरुद्ध अर्जदाराच्या एखाद्या सारवान प्रश्नाचा निर्णय करावयाचा आहे किंवा काय याकडे यथायोग्य लक्ष पुरविले पाहिजे.] प्रतिवादींना वादी म्हणून स्थानापन्न करण्याची परवानगी केव्हा देता येईल.

२. लगतपूर्व नियमाखाली दिलेल्या परवानगीने सुरू केलेल्या कोणत्याही नवीन दाव्यामध्ये, पहिला दावा जणू काही दाखल केलाच नव्हता अशा प्रकारे वादीवर मुदतीचा कायदा बंधनकारक असेल. पहिल्या दाव्यामुळे मुदत कायद्यावर परिणाम न होणे.

३. [2][लेखी व पक्षकारांनी सह्या केलेला] कोणताही कायदेशीर करारनामा किंवा तडजोडनामा याद्वारे दावा संपूर्णत: किंवा अंशत: समायोजित करण्यात आला आहे असे न्यायालयाची खात्री होईल अशा प्रकारे शाबीत झाल्यास, अथवा दाव्याच्या संपूर्ण विषयवस्तूच्या किंवा त्यापैकी काही अंशाच्या बाबतीत, प्रतिवादीने वादीचे समाधान केल्यास त्याबाबतीत, न्यायालयाने असा करारनामा किंवा तडजोडनामा अथवा समाधान यांची नोंद करण्याचा आदेश दिला पाहिजे. [3][आणि दाव्यातील पक्षकारांशी ते संबंधित असेल तेथवर,] त्यानुसार हुकूमनामा काढला पाहिजे —मग करारनामा, तडजोडनामा किंवा समाधान यांची विषयवस्तू हीच दाव्याची विषयवस्तू असो वा नसो]: दाव्याची तडजोड.

[4][परंतु, समायोजन किंवा समाधान करण्याचे ठरले होते असे एका पक्षकाराने अभिकथन केले व दुसऱ्याने ते नाकबूल केले तर, न्यायालयाने त्या प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे; पण त्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी तहकुबी दिली जाणार नाही. मात्र लेखी नमूद करावयाच्या काही कारणांस्तव तशी तहकुबी देणे न्यायालयाला योग्य वाटले तर गोष्ट वेगळी.]

[5][स्पष्टीकरण.—जो करारनामा किंवा तडजोडनामा "भारतीय संविदा अधिनियम, १८७२," (१८७२ चा ९) या अन्वये रद्दबातल किंवा रद्दबातल होण्याजोगा असेल तो या नियमाच्या अर्थान्तर्गत कायदेशीर असल्याचे मानले जाणार नाही.]

[6][३क. हुकूमनामा ज्या तडजोडीवर आधारित असेल ती तडजोड कायदेशीर नव्हती या कारणावरून हुकूमनामा रद्द ठरवण्यासाठी कोणताही दावा दाखल करता येणार नाही. दाव्यांस रोध.

३ख. (१) कामकाजवृत्तामध्ये न्यायालयाची परवानगी स्पष्टपणे नमूद केलेली असल्याशिवाय प्रातिनिधिक दाव्यात कोणताही करार किंवा तडजोड करता येणार नाही आणि न्यायालयाची परवानगी अशा रीतीने नमूद केलेली नसताना केलेला असा कोणताही करार किंवा तडजोड रद्दबातल ठरेल. न्यायालयाच्या परवानगीशिवाय प्रातिनिधिक दाव्यात कोणताही करार किंवा तडजोड न करणे.

(२) अशी परवानगी देण्यापूर्वी, न्यायालयाने ज्या व्यक्तींचा दाव्यात हितसंबंध आहे असे त्यास वाटेल अशा व्यक्तींना, स्वत:स योग्य वाटेल अशा रीतीने नोटीस दिली पाहिजे.

स्पष्टीकरण.—या नियमातील, "प्रातिनिधिक दावा" याचा अर्थ, पुढीलप्रमाणे आहे :—

(क) कलम ९१ किंवा कलम ९२ खालील दावा,

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७४ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ७४ (तीन) (क) अन्वये समाविष्ट करण्यात आले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ७४ (तीन) (ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी घातले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ७४(चार) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
५. वरील अधिनियमाच्या कलम ७४(पाच) अन्वये समाविष्ट करण्यात आले.
६. वरील अधिनियमाच्या कलम ७४(सहा) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

(ख) पहिल्या आदेशातील नियम ८ खालील दावा,

(ग) अविभक्त हिंदू कुटुंबाचा कर्ता हा कुटुंबातील इतर व्यक्तींचे प्रतिनिधित्व करणारा म्हणून त्याने जो दावा लावला असेल किंवा त्याच्या विरुद्ध जो लावण्यात आला असेल असा दावा,

(घ) ज्या दाव्यात दिलेला हुकूमनामा, या संहितेतील किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील उपबंधांच्या आधारे, ज्या व्यक्तीला दाव्यातील पक्षकार म्हणून नामनिर्दिष्ट केलेले नाही अशा कोणत्याही व्यक्तीवर बंधनकारक असेल असा अन्य कोणताही दावा.]

हुकूमनाम्यांच्या अंमलबजावणीतील कार्यवाहींवर परिणाम न होणे.

४. या आदेशातील कोणत्याही गोष्टीमुळे हुकूमनामा किंवा आदेश यांच्या अंमलबजावणीतील कोणत्याही कार्यवाहींवर परिणाम होणार नाही.

आदेश चोविसावा

न्यायालयात प्रदान

प्रतिवादीने दाव्यातील हक्कमागणीच्या पूर्ततेकरता रक्कम जमा करणे.

१. ऋण किंवा नुकसानी वसूल करण्यासाठी लावलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये, प्रतिवादीस दाव्याच्या कोणत्याही टप्प्यात, त्याच्या मते दाव्यातील हक्कमागणीची पूर्णतः पूर्तता करण्याइतपत आवश्यक अशी पैशांची रक्कम न्यायालयात जमा करता येईल.

रक्कम जमा करण्याबद्दलची नोटीस.

२. रक्कम जमा करण्यात येत असल्याबद्दलची नोटीस प्रतिवादीने न्यायालयामार्फत वादीला दिली पाहिजे आणि जमा केलेली रक्कम (न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नसेल तर) वादीच्या अर्जावरून त्याला देण्यात येईल.

जमा केलेल्या रकमेवर नोटीस दिल्यानंतर वादीला व्याज न देणे.

३. प्रतिवादीने जमा केलेल्या कोणत्याही रकमेवर, अशी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून वादीला कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.– मग ती जमा केलेली रक्कम दाव्यातील हक्कमागणीच्या संपूर्ण रकमेएवढी असो वा त्यापेक्षा कमी असो.

जमा केलेली रक्कम वादीने अंशतः पूर्तता म्हणून स्वीकारल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.

४. (१) वादीने अशी रक्कम आपल्या हक्कमागणीची केवळ अंशतः पूर्तता म्हणून स्वीकारल्यास त्याला शिल्लक रकमेसाठी दावा पुढे चालविता येईल, आणि जर प्रतिवादीने भरलेली रक्कम वादीच्या हक्कमागणीची संपूर्ण पूर्तता होय असे न्यायालयाने ठरवले तर, रक्कम जमा करण्यात आल्यानंतर आलेला दाव्याचा खर्च आणि हे जेथवर वादीच्या अतिरिक्त मागणीमुळे उद्भवले असतील तेथवर, त्यापूर्वी झालेला खर्च, वादीने दिले पाहिजे.

त्याने ती रक्कम संपूर्णतः पूर्तता म्हणून स्वीकारल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.

(२) वादीने अशी रक्कम आपल्या हक्कमागणीची संपूर्ण पूर्तता म्हणून स्वीकारल्यास त्याला तशा अर्थाचे निवेदन न्यायायाकडे सादर करावे लागेल, आणि तसे निवेदन दाखल केले पाहिजे व न्यायालयाने त्यानुसार न्यायनिर्णय अधिघोषित केला पाहिजे, आणि प्रत्येक पक्षकाराचा खर्च कोणी द्यावयाचा यासंबंधी निदेश देताना न्यायालयाने, या कज्जा खटल्याबद्दल पक्षकारांपैकी कोणता पक्षकार सर्वाधिक दोषी आहे त्याचा विचार केला पाहिजे.

उदाहरणे

(क) "अ" हा "ब" ला १०० रुपये देणे लागतो. प्रदानासाठी कोणतीही मागणी न करता, आणि मागणी करण्यामुळे झालेल्या विलंबामुळे स्वतःचा तोटा होईल असे मानण्यास कोणतेही कारण नसताना, "ब" हा "अ" वर दावा लावतो. वादपत्र दाखल केल्यावर, "अ" न्यायालयात पैसे भरतो. "ब" आपल्या मागणीच्या संपूर्ण पूर्ततेदाखल ती रक्कम स्वीकारतो, परंतु त्याने कारणाशिवाय कज्जा खटला केल्याचे गृहीत धरून न्यायालयाने त्यास कोणताही वादखर्च मंजूर करता कामा नये.

(ख) उदाहरण (क) मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत, "ब" हा "अ" विरुद्ध दावा दाखल करतो. वादपत्र दाखल केल्यावर "अ" मागणीस हरकत घेतो. त्यानंतर "अ" न्यायालयात पैसे भरतो. "ब" आपल्या मागणीच्या संपूर्ण पूर्ततेदाखल ती रक्कम स्वीकारतो. वादपत्र आवश्यक होते असे "अ" च्या वर्तणुकीवरून दिसून आल्यामुळे, न्यायालयाने "ब" ला त्याचा वादखर्चही दिला पाहिजे.

(ग) "अ" हा "ब" ला १०० रुपये देणे लागतो, आणि तो दाव्याविना ती रक्कम त्यास देण्यास राजी आहे. "ब" १५० रुपयांची मागणी करतो आणि "अ" वर त्या रकमेसाठी दावा दाखल करतो. वादपत्र दाखल केल्यावर "अ" न्यायालयात १०० रुपये भरतो, आणि केवळ बाकीचे ५० रुपये भरण्याच्या आपल्या दायित्वास हरकत घेतो. "ब" आपल्या मागणीच्या संपूर्ण पूर्ततेदाखल १०० रुपये स्वीकारतो. न्यायालयाने "ब" ला "अ" चा वादखर्च देण्याचा आदेश दिला पाहिजे.

आदेश पंचविसावा

दावाखर्चासाठी प्रतिभूती

वादीकडून खर्चासाठी प्रतिभूती केव्हा घेता येईल.

[1][१. (१) दाव्याच्या कोणत्याही टप्प्याला, स्वतः होऊन किंवा कोणत्याही प्रतिवादीच्या अर्जावरून, न्यायालयास, कारणे नोंदवून, त्याने निश्चित केलेल्या मुदतीमध्ये, वादीने, जो कोणताही खर्च प्रतिवादीला आला असेल किंवा येण्याचा संभव असेल तो सर्व खर्च देण्यासाठी प्रतिभूती द्यावी असा आदेश देता येईल :

परंतु, वादी एकच असेल आणि तो भारताच्या बाहेर राहत असेल किंवा (एकापेक्षा अधिक वादी असल्यास) ते सर्व वादी भारताच्या बाहेर राहत असतील आणि अशा वादीकडे किंवा अशा वादींपैकी कोणाकडेही, दाव्यातील मालमत्तेव्यतिरिक्त भारतामध्ये कोणतीही पुरेशी स्थावर मालमत्ता नाही असे न्यायालयास दिसून आल्यास, अशा सर्व प्रकरणी असा आदेश काढला पाहिजे.

(२) एखाद्याला जेव्हा जेव्हा वाद खर्च देण्यास फर्मावण्यात येईल तेव्हा तेव्हा तो उपस्थित राहू शकणार नाही अशी वाजवी शक्यता तो भारत सोडून गेल्यामुळे निर्माण झाली असेल तर, अशा परिस्थितीत तो पोटनियम (१) च्या परंतुकात अभिप्रेत असल्याप्रमाणे भारताबाहेर राहत असल्याचे समजण्यात येईल.]

प्रतिभूती देण्यात कसूर झाल्यास त्याचा परिणाम.

२. (१) निश्चित केलेल्या मुदतीत अशी प्रतिभूती न दिल्यास, न्यायालयाने, वादीला किंवा वादींना दावा मागे घेण्याची परवानगी दिली नसेल तर, दावा फेटाळल्याचा आदेश काढला पाहिजे.

(२) या नियमाखाली दावा फेटाळण्यात आल्यास, वादीस दावा फेटाळण्याचा आदेश रद्द ठरविण्याचा आदेश मिळण्याकरिता अर्ज करता येईल, आणि दिलेल्या मुदतीत प्रतिभूती देण्यास पुरेशा कारणामुळे त्यास प्रतिबंध झाला होता असे न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने शाबीत करण्यात आल्यास, न्यायालयाने प्रतिभूती, दावा खर्च याबाबतीत किंवा अन्य कारणासाठी, त्यास योग्य वाटेल अशा अटींवर, फेटाळण्याचा आदेश रद्द केला पाहिजे व दाव्याचे कामकाज पुढे चालविण्याकरिता दिवस निश्चित केला पाहिजे.

(३) प्रतिवादींवर अशा अर्जाची नोटीस बजावल्याखेरीज, फेटाळण्याचा आदेश रद्द करता येणार नाही.

खटल्यामध्ये वित्तसहाय्य करणाऱ्या त्रयस्थ व्यक्तीस पक्षकार बनविण्याची आणि त्या व्यक्तीकडून प्रतिभूती मागण्याची शक्ती.

[1][३. (१) जेव्हा कोणत्याही वादीने, दाव्यासंबंधात वित्तसहाय्य मिळण्याच्या प्रयोजनासाठी आधीपासून त्या दाव्यात पक्षकार नसलेल्या एखाद्या व्यक्तीला दाव्यातील मालमत्तेमध्ये असलेला कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध हस्तांतरित केला असेल किंवा करण्याचे कबूल केले असेल त्याबाबतीत, न्यायालयास असा आदेश देता येईल की, अशा व्यक्तीची संमती असल्यास, तिला त्या दाव्यात पक्षकार करून घ्यावे आणि एकतर स्वतः होऊन किंवा कोणत्याही प्रतिवादीच्या अर्जावरून न्यायालयास अशा व्यक्तीला, असा आदेश देता येईल की, कोणत्याही प्रतिवादीला आलेल्या किंवा येण्याचा संभव असलेल्या सर्व खर्चाच्या प्रदाना दाखल अशा व्यक्तीने, न्यायालयाने ठरवावयाच्या मुदतीत प्रतिभूती द्यावी. ठरविलेल्या मुदतीत अशी प्रतिभूती प्रस्तुत न केल्यास, न्यायालयास आदेश काढून दाव्यातील मालमत्तेत असणाऱ्या त्या व्यक्तीच्या अधिकारांचा किंवा हितसंबंधाचा संबंध असेल तेथवर, तो दावा फेटाळता येईल, किंवा दाव्यातील मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा हितसंबंध सांगण्यास तिला प्रतिबंध होईल असे जाहीर करता येईल.

(२) जर अशा व्यक्तीने वादी होण्यास नकार दिला तर, न्यायालयास तिला प्रतिवादी करता येईल आणि तिला इतर कोणत्याही प्रतिवादीला आलेला किंवा येण्याचा संभव असलेला सर्व खर्च देण्याकरिता, न्यायालयाने ठरवावयाच्या मुदतीत

---

१. सन १९५६ चा अधिनियम ६६ च्या कलम १४ अन्वये मूळ नियमाऐवजी दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१) द्वारे भर घातली.

प्रतिभूती देण्याबाबत आदेश देता येईल. ठरविलेल्या मुदतीत अशी प्रतिभूती भरण्यात आली नसेल अशा बाबतीत, न्यायालयास आदेश काढून त्या व्यक्तीला दाव्यातील मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा हि संबंध सांगण्यास प्रतिबंध होईल असे जाहीर करता येईल.

(३) या नियमाखाली ज्याच्याविरुद्ध आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही वादीला किंवा प्रतिवादीला तो आदेश रद्द केला जाण्यासाठी अर्ज करता येईल आणि अशा अर्जाला नियम २ च्या पोटनियम (२) व (३) चे उपबंध योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

आदेश सव्विसावा

आयोगपत्रे

साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे

साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी कोणत्या प्रकरणी न्यायालयास आयोगपत्रे काढता येतील.

१. कोणत्याही न्यायालयास, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहणाऱ्या ज्या व्यक्तीला न्यायालयात हजर राहण्यापासून सूट मिळाली असेल अथवा अशी जी व्यक्ती आजारपण किंवा दुर्बलता यामुळे न्यायालयात हजर राहण्यास असमर्थ असेल अशा कोणत्याही व्यक्तीची परिप्रश्नांच्याद्वारे किंवा अन्यथा तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढता येईल :

[1][परंतु, परिप्रश्नांच्याद्वारे तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे आवश्यक आहे असे वाटल्या शिवाय व न्यायालयाने ती कारणे नमूद केल्याशिवाय, आयोगपत्र काढता येणार नाही.

स्पष्टीकरण.—या नियमाच्या प्रयोजनार्थ, न्यायालयास एखाद्या व्यक्तीच्या आजारपणाच्या किंवा दुर्बलतेच्या पुराव्यासाठी, वैद्यक व्यवसायीला साक्षीदार म्हणून न बोलावता, जे प्रमाणपत्र नोंदणीकृत वैद्यक व्यवसायीच्या सहीचे असल्याचे दिसून येत असेल असे प्रमाणपत्र पुरावा म्हणून स्वीकारता येईल.]

आयोगपत्रासाठी आदेश.

२. साक्षीदाराची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढण्याचा आदेश न्यायालयास स्वत: होऊन किंवा दाव्यातील कोणताही पक्षकार अथवा ज्याची तपासणी व्हावयाची आहे असा साक्षीदार यांनी अर्ज करून सोबत शपथपत्राद्वारे किंवा अन्यथा पुष्टी दिल्यास त्यानुसार, काढता येईल.

साक्षीदार न्यायालयाच्या अधिकारितेतील क्षेत्रात राहत असेल तेव्हा.

३. आयोगपत्र काढणाऱ्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांमध्ये राहणाऱ्या व्यक्तीच्या तपासणीचे आयोगपत्र, न्यायालयाच्या मते अंमलबजावणी करण्यास जी व्यक्ती योग्य असेल अशा व्यक्तीकडे देता येईल.

कोणत्या व्यक्तींच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढता येईल.

४. (१) कोणत्याही न्यायालयास, कोणत्याही दाव्यामध्ये,—

(क) त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांपलिकडे राहणारी कोणतीही व्यक्ती,

(ख) जी व्यक्ती न्यायालयामध्ये तिला ज्या दिवशी तपासणीसाठी बोलावले असेल, त्या तारखेपूर्वी अशा स्थानिक सीमा सोडून जाण्याची शक्यता असेल अशी कोणतीही व्यक्ती, आणि,

(ग) [2][शासकीय सेवेतील एखादी व्यक्ती] हजर राहिल्यास, लोकसेवेची हानी झाल्याबद्दल वाचून राहणार नाही असे न्यायालयाचे मत असेल तर, अशी व्यक्ती;

यांची [3][परिप्रश्नांद्वारे किंवा अन्यथा तपासणी करण्यासाठी] आयोगपत्र काढता येईल :

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७५ (एक) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

२. विधी अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये "शासनाचा कोणताही नागरी किंवा सैनिकी अधिकारी" याऐवजी दाखल करण्यात आले.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७५ (दोन) (क) अन्वये ".....ची तपासणी करण्यासाठी" या ऐवजी दाखल करण्यात आले.

[१][परंतु, सोळाव्या आदेशातील, नियम १९ याखाली एखाद्या व्यक्तीला न्यायालयात जातीने उपस्थित राहण्यास फर्माविणे शक्य नसेल तेव्हा, न्यायहितार्थ तिचा पुरावा आवश्यक वाटल्यास, तिच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढण्यात येईल :

परंतु आणखी असे की, परिप्रश्नांच्या द्वारे अशा व्यक्तीची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र काढणे आवश्यक आहे असे वाटल्याशिवाय व न्यायालयाने ती कारणे नमूद केल्याशिवाय, आयोगपत्र काढता कामा नये.]

(२) अशी व्यक्ती ज्या न्यायालयाच्या आधिकारितेच्या स्थानिक सिमांमध्ये राहत असेल असे, उच्च न्यायालयाव्यतिरिक्त कोणतेही न्यायालय, अथवा आयोगपत्र पाठवणारे न्यायालय ज्यास नेमील असा कोणताही प्लीडर किंवा अशी अन्य व्यक्ती यांना, आयोगपत्र देता येईल.

(३) या नियमाखाली आयोगपत्र काढल्यानंतर आयोगपत्र प्रतिवेदनासह त्याच्याकडे परत पाठविण्यात यावे किंवा एखाद्या दुय्यम न्यायालयाकडे त्यासंबंधी त्या न्यायालयाने निदेश दिला पाहिजे.

भारतामध्ये नसलेल्या साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्र किंवा विनंतीपत्र.

५. [२][भारतामध्ये] नसलेल्या कोणत्याही ठिकाणी राहणाऱ्या व्यक्तीच्या तपासणीचे आयोगपत्र काढण्यासाठी ज्या न्यायालयाकडे अर्ज करण्यात आला असेल त्या न्यायालयाची अशा व्यक्तीचा पुरावा घेणे आवश्यक आहे अशी खात्री पटल्यास, न्यायालयास असे आयोगपत्र किंवा विनंतीपत्र पाठविता येईल.

न्यायालयाने आयोगपत्रानुसार साक्षीदाराची तपासणी करणे.

६. ज्या न्यायालयाकडे कोणत्याही व्यक्तीच्या तपासणीचे आयोगपत्र येईल त्या न्यायालयाने त्यानुसार तिची तपासणी केली पाहिजे किंवा करविली पाहिजे.

साक्षीदारांच्या जबान्यांसह आयोगपत्र परत पाठविणे.

७. आयोगपत्राची यथोचितरीत्या अंमलबजावणी करण्यात आली असेल तर, ज्या न्यायालयाने ते काढले असेल त्या न्यायालयाकडे ते त्यानुसार घेतलेल्या पुराव्यांसह परत केले पाहिजे, मात्र आयोगपत्र काढणाऱ्या आदेशामध्ये अन्यथा निदेशित केले असेल तर, ते त्या आदेशाबरहुकूम परत केले पाहिजे; आणि आयोगपत्र व त्यांचे प्रतिवेदन व त्या आयोगपत्रान्वये घेतलेला पुरावा [३][(नियम ८ च्या उपबंधांच्या अधीनतेने)] दाव्याच्या अभिलेखाचा भाग होईल.

पुराव्यामध्ये जबान्या केव्हा वाचता येतील.

८. (क) ज्या व्यक्तीने आयोगपत्रान्वये पुरावा दिला असेल ती व्यक्ती, न्यायालयाच्या अधिकारितेच्या बाहेर आहे, किंवा मृत्यू पावली आहे अथवा जातीने तपासणीकरिता हजर राहण्यास आजारपण अथवा दुर्बलता यामुळे असमर्थ आहे, किंवा त्या व्यक्तीला न्यायालयात जातीने उपस्थित राहण्यापासून सूट मिळालेली आहे किंवा [४][ती व्यक्ती शासकीय नोकरीत] असून, ती हजर राहिल्यास लोकसेवेची हानी झाल्यावाचून राहणार नाही, असे न्यायालयाचे मत आहे, अथवा,

(ख) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही परिस्थितीविषयीच्या शाबितीवाचून न्यायालयाने स्वविवेकानुसार काम भागवले आहे, आणि एखाद्या व्यक्तीचा पुरावा दाव्यातील पुरावा म्हणून वाचणे प्राधिकृत केले आहे—मग त्याचे वाचन करतेवेळी असा पुरावा आयोगपत्राद्वारे घेण्यामागील कारण संपुष्टात आले असल्याबद्दलचा पुरावा असला तरी हरकत नाही—असे घडले नसेल तर, आयोगपत्रान्वये घेतलेला पुरावा तो ज्या व्यक्तीच्या विरुद्ध देण्यात आला असेल त्या व्यक्तीच्या संमतीखेरीज दाव्यामध्ये पुरावा म्हणून वाचता येणार नाही.

स्थानिक अन्वेषणांकरिता आयोग

स्थानिक अन्वेषणे करण्याकरिता आयोगपत्रे काढणे.

९. ज्या दाव्यामध्ये एखाद्या वादग्रस्त बाबीवर अधिक प्रकाश पाडण्यासाठी अथवा कोणत्याही मालमत्तेचे बाजारमूल्य, अगर कोणतेही दरम्यानचे नफे किंवा नुकसान किंवा वार्षिक निव्वळ नफा यांची रक्कम निश्चितपणे आजमावण्यासाठी स्थानिक अन्वेषण आवश्यक किंवा उचित आहे असे न्यायालयास वाटेल त्या दाव्यात, न्यायालयास त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीला, असे अन्वेषण करण्याचा व त्यावरील प्रतिवृत्त न्यायालयास कळवण्याचा आदेश देणारे आयोगपत्र काढता येईल :

परंतु अशी, आयोगपत्रे कोणत्या व्यक्तींना पाठविण्यात यावीत यासंबंधी राज्य शासनाने नियम केलेले असल्यास, न्यायालय अशा नियमांस बांधलेले असेल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७५ (दोन) (ख) अन्वये समाविष्ट करण्यात आले

२. सन १९५१ चा अधिनियम २ च्या कलम ३ अन्वये "राज्यामध्ये" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७५ (तीन) अन्वये "लगत नंतरच्या नियमांच्या तरतुदींच्या अधीनतेने" या ऐवजी बदली दाखल करण्यात आले.

४. विधी अनुकूलन आदेश १९३७ अन्वये "शासनाचा नागरी किंवा सैनिकी अधिकारी" या ऐवजी दाखल करण्यात आले.

आयुक्ताची कार्यपद्धती.

१०. (१) स्वत:स आवश्यक वाटेल असे स्थानिक अन्वेषण केल्यानंतर व आपण घेतलेला पुरावा लिहून काढल्यानंतर, आयुक्ताने, त्याच्या सहीच्या लेखी प्रतिवृत्तासह असा पुरावा न्यायालयाकडे पाठविला पाहिजे.

प्रतिवृत्त व जबान्या दाव्यामध्ये पुरावा असणे. खुद्द आयुक्ताची जातीने तपासणी होऊ शकणे.

(२) आयुक्ताचे प्रतिवृत्त व त्याने घेतलेला पुरावा --मात्र प्रतिवृत्ताविना असलेला पुरावा नव्हे--हा दाव्यातील पुरावा असेल व तो अभिलेखाचा भाग होईल; परंतु न्यायालयास किंवा न्यायालयाच्या परवानगीने दाव्यातील कोणत्याही पक्षकारास, आयुक्ताकडे निर्देशित केलेल्यांपैकी किंवा त्याच्या प्रतिवृत्तात उल्लेखिलेल्यापैकी कोणत्याही बाबीच्या संबंधात किंवा त्याच्या प्रतिवृत्तासंबंधात किंवा त्याने ज्या प्रकारे अन्वेषण केले असेल त्या पद्धतीच्या संबंधात, खुद्द आयुक्ताची खुल्या न्यायालयात जातीने तपासणी करता येईल.

(३) आयुक्ताच्या कामकाजाबद्दल न्यायालयाचे कोणत्याही कारणास्तव समाधान झाले नसेल त्याबाबतीत, त्यास स्वत:ला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करण्याचा निदेश देता येईल.

[१][शास्त्रोक्त अन्वेषण करणे, प्रशासी कार्य करणे आणि जंगम मालमत्तेची विक्री करणे यांसाठी आयोगपत्रे.

शास्त्रोक्त अन्वेषणासाठी आयोगपत्र.

१०-क. (१) जेव्हा दाव्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रश्नात, न्यायालयाच्या मते जे न्यायालयासमोर करणे सोईस्कर होणार नाही असे कोणतेही शास्त्रोक्त अन्वेषण अंतर्भूत असेल तेव्हा, न्यायालयास स्वत:स योग्य वाटेल अशा व्यक्तीने अशा प्रश्नाची चौकशी करावी व त्याबाबत न्यायालयास प्रतिवृत्त द्यावे असा तिला निदेश देणारे आयोगपत्र काढणे न्यायहितार्थ आवश्यक किंवा समयोचित आहे असे न्यायालयाचे मत पडल्यास, त्यास तसे आयोगपत्र काढता येईल.

(२) या आदेशातील नियम १० चे उपबंध, नियम ९ अन्वये नेमलेल्या आयुक्ताच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते या नियमान्वये नेमलेल्या आयुक्ताच्या संबंधात, शक्य असेल तेथवर, लागू होतील.

प्रशासी कार्य करण्यासाठी आयोगपत्र.

१०-ख. (१) जेव्हा दाव्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रश्नात, न्यायालयाच्या मते जे न्यायालयासमोर करणे सोईस्कर होणार नाही असे कोणतेही प्रशासी कार्य अंतर्भूत असेल तेव्हा, न्यायालयास स्वत:स योग्य वाटेल अशा व्यक्तीने ते प्रशासी कार्य करावे व त्याबाबत न्यायालयास प्रतिवृत्त द्यावे असा तिला निदेश देणारे आयोगपत्र काढणे न्यायहितार्थ आवश्यक किंवा समयोचित आहे असे न्यायालयाचे मत असल्यास, त्याबद्दलची कारणे नमूद करून, त्यास तसे आयोगपत्र काढता येईल.

(२) या आदेशातील नियम १० चे उपबंध, नियम ९ अन्वये नेमलेल्या आयुक्ताच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे ते या नियमान्वये नेमलेल्या आयुक्ताच्या संबंधात लागू होतील.

(३) अशी प्रत्येक विक्री, शक्य असेल तेथवर, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी मध्ये जंगम मालमत्तेची विक्री करण्यासाठी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.]

जंगम मालमत्तेच्या विक्रीसाठी आयोगपत्र.

१०-ग. (१) जेव्हा कोणत्याही दाव्यात, जी जंगम मालमत्ता दाव्याचा निकाल लागेपर्यंत न्यायालयाच्या ताब्यात असेल आणि जी जतन करणे सोईस्कर नसेल अशी कोणतीही जंगम मालमत्ता विकणे आवश्यक ठरेल तेव्हा, स्वत:ला योग्य वाटेल अशा व्यक्तीने अशी विक्री करावी व त्याबाबत न्यायालयास प्रतिवृत्त द्यावे असा तिला निदेश देणारे आयोगपत्र काढणे न्यायहितार्थ आवश्यक किंवा समयोचित आहे असे न्यायालयाचे सकारण मत पडल्यास, त्याबद्दलची कारणे नमूद करून, त्यास तसे आयोगपत्र काढता येईल.

(२) या आदेशातील नियम १० चे उपबंध, नियम ९ अन्वये नेमलेल्या आयुक्ताच्या संबंधात, ज्याप्रमाणे लागू होतात त्याप्रमाणे ते या नियमान्वये नेमलेल्या आयुक्ताच्या संबंधात लागू होतील.

(३) अशी प्रत्येक विक्री, शक्य असेल तेथवर, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये जंगम मालमत्तेची विक्री करण्यासाठी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार केली पाहिजे.

हिशेब तपासण्यासाठी आयोगपत्रे

हिशेब तपासणीसाठी किंवा समायोजित करण्यासाठी आयोगपत्र.

११. ज्या दाव्यामध्ये हिशेबांची तपासणी करणे किंवा त्यांचे समायोजन करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही दाव्यामध्ये न्यायालयास अशी तपासणी करण्यासाठी किंवा समायोजन करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीला निदेश देणारे आयोगपत्र काढता येईल.

न्यायालयाने आयुक्ताला आवश्यक ते अनुदेश देणे.

१२. (१) न्यायालय त्यास आवश्यक वाटतील असे कामकाजवृत्ताचे भाग आयुक्तास उपलब्ध करून देईल व तसे अनुदेश देईल, आणि आयुक्त जी चौकशी करील तिचे त्याने नुसतेच कामकाजवृत्त पाठवून द्यावयाचे किंवा त्याच्याकडे तपासणीकरिता निर्देशित केलेल्या मुद्यावर त्याने आपले मतसुद्धा द्यावयाचे आहे किंवा कसे हे त्या अनुदेशामध्ये स्पष्टपणे विनिर्दिष्ट केले पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७५ (चार) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

(२) आयुक्ताने केलेल्या कामकाजाचे वृत्त व त्यावरील त्याचे प्रतिवृत्त (तसे प्रतिवृत्त असल्यास) हा दाव्यातील पुरावा असेल, परंतु त्यामुळे न्यायालयाचे समाधान न होण्याजोगे कारण असेल तर, न्यायालयास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे आणखी चौकशी करण्याचा निदेश देता येईल. कामकाजवृत्त व प्रतिवृत्त हा पुरावा असणे. न्यायालयास आणखी चौकशी करण्याचा निदेश देता येईल.

विभाजन करण्यासाठी आयोगपत्रे

१३. विभाजन करण्याकरिता प्राथमिक हुकूमनामा काढण्यात आला असेल तेव्हा, कलम ५४ मध्ये उपबंधित न केलेल्या कोणत्याही बाबतीत न्यायालयास, अशा हुकूमनाम्यामध्ये घोषित केलेल्या अधिकारांनुसार विभाजन किंवा विलगीकरण करण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा व्यक्तीला आयोगपत्र देता येईल. स्थावर मालमत्तेचे विभाजन करण्यासाठी आयोगपत्र.

१४. (१) आवश्यक असेल अशी चौकशी केल्यानंतर, आयुक्ताने ज्या आदेशान्वये आयोगपत्र पाठवले असेल त्या आदेशाद्वारे निदेशित करण्यात येईल त्याप्रमाणे तेवढ्या हिश्शामध्ये मालमत्तेचे विभाजन केले पाहिजे आणि असे हिस्से पक्षकारांना नेमून दिले पाहिजेत, आणि उक्त आदेशाद्वारे तसे प्राधिकृत करण्यात आल्यास, हिश्शांचे मूल्य समसमान करण्यासाठी द्यावयाच्या रकमांबाबत तो निवाडा देऊ शकेल. आयुक्ताची कार्यपद्धती.

(२) नंतर प्रत्येक पक्षकाराचा हिस्सा नियत करून (आदेशाद्वारे तसे फर्माविण्यात आले असल्यास) प्रत्येक हिस्सा मापन व सीमांकन करून वेगळा दाखवण्यासाठी आयुक्ताने एक अहवाल तयार करून त्यावर सही केली पाहिजे अथवा आयुक्तांनी (आयोगपत्र एकापेक्षा अधिक व्यक्तींना दिलेले असून त्यांच्यामध्ये मतैक्य न झाल्यास) असे वेगवेगळे अहवाल तयार करून त्यांवर सही केली पाहिजे. असा किंवा असे अहवाल आयोगपत्रांना जोडले पाहिजेत आणि न्यायालयाकडे पाठविले पाहिजेत. त्या अहवालावर किंवा अहवालांवर पक्षकार ज्या कोणत्याही हरकती घेतील त्या ऐकून घेतल्यानंतर, न्यायालयाने तो किंवा ते अहवाल कायम केले पाहिजेत किंवा त्यात फेरबदल केले पाहिजेत किंवा ते रद्द ठरवले पाहिजेत.

(३) न्यायालयाने तो किंवा ते अहवाल कायम केले किंवा त्यांत फेरबदल केले की, त्या कायम केलेल्या किंवा फेरबदल केलेल्या अहवालानुसार, न्यायालयाने हुकूमनामा काढला पाहिजे; परंतु न्यायालयाने तो किंवा ते अहवाल रद्द ठरवले तर त्याबाबतीत, त्याने एकतर नवीन आयोगपत्र काढले पाहिजे किंवा त्यास योग्य वाटेल असा अन्य आदेश काढला पाहिजे.

सर्वसाधारण उपबंध

१५. या आदेशाखाली कोणतेही आयोगपत्र काढण्यापूर्वी, न्यायालयास ज्या पक्षकाराच्या विनंतीवरून किंवा ज्याच्या हितार्थ आयोगपत्र काढण्यात आले असेल त्या पक्षकाराने, आयोगपत्राच्या खर्चादाखल न्यायालयास वाजवी वाटेल अशी रक्कम (तशी रक्कम असल्यास), निश्चित करण्यात येईल त्या मुदतीत, न्यायालयामध्ये भरावी असा आदेश देता येईल. आयोगपत्राचा खर्च न्यायालयात भरणे.

१६. या आदेशाखाली नेमलेल्या कोणत्याही आयुक्तास, नेमणुकीच्या आदेशात अन्यथा निदेश दिला नसेल तर,— आयुक्तांच्या शक्ती.

(क) खुद्द पक्षकारांचा अथवा त्यांनी किंवा त्यांच्यापैकी कोणीही हजर केलेल्या अशा कोणत्याही साक्षीदाराची, अथवा त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेल्या कोणत्याही बाबतीत पुरावा देण्यासाठी ज्या व्यक्तीला बोलावणे आयुक्ताला योग्य वाटेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीची तपासणी करता येईल;

(ख) चौकशीच्या विषयाशी संबंधित दस्तऐवज व अन्य वस्तू मागवून त्यांची तपासणी करता येईल;

(ग) आदेशात उल्लेखिलेल्या कोणत्याही जमिनीवर किंवा इमारतीत कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करता येईल.

[१][१६-क. (१) या आदेशाखाली नेमलेल्या आयुक्तापुढे चालणाऱ्या कार्यवाहींमध्ये साक्षीदाराला विचारलेल्या कोणत्याही प्रश्नाला पक्षकाराने किंवा त्याच्या प्लीडरने हरकत घेतल्यास, आयुक्ताने तो प्रश्न, उत्तर, हरकती आणि अशाप्रकारे हरकत घेणाऱ्या पक्षकाराचे किंवा, प्रकरणपरत्वे, प्लीडरचे नाव लिहून घेतले पाहिजे : आयुक्ताच्यासमोर हरकत घेतलेले प्रश्न.

परंतु, ज्या प्रश्नास विशेषाधिकाराच्या आधारे हरकत घेण्यात आली असेल अशा प्रश्नाचे उत्तर आयुक्ताने लिहून घेता कामा नये. मात्र विशेषाधिकाराचा प्रश्न न्यायालयाकडून निर्णीत करून घेण्याची जबाबदारी त्या पक्षकारावर सोपवून साक्षीदाराची तपासणी त्याला पुढे चालू ठेवता येईल आणि विशेषाधिकाराचा कोणताही प्रश्न गुंतलेला नाही असा न्यायालयाने निर्णय दिल्यास आयुक्तास, साक्षीदारास पुन्हा बोलावून त्याची तपासणी करता येईल अथवा विशेषाधिकाराच्या कारणावरून ज्या प्रश्नास हरकत घेण्यात आली असेल त्या प्रश्नाच्या संबंधात न्यायालयास त्या साक्षीदाराची तपासणी करता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७६ (पाच) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

(२) पोटनियम (१) अन्वये लिहून घेतलेले कोणतेही उत्तर, न्यायालयाच्या आदेशाशिवाय, दाव्यात पुरावा म्हणून वाचता येणार नाही.]

आयुक्तासमोर साक्षीदारांची हजेरी व तपासणी.

१७. (१) साक्षीदारांना समन्स पाठवून बोलावणे, त्यांची हजेरी, त्यांची तपासणी, त्यांना द्यावयाचे पारिश्रमिक व त्यांच्यावर बसवावयाच्या शास्ती यांच्याशी संबंधित असलेले या संहितेचे उपबंध, या आदेशान्वये ज्या व्यक्तींना पुरावा देण्यास किंवा दस्तऐवज हजर करण्यास फर्मावण्यात आले असेल अशा व्यक्तींना लागू होतील—मग ज्या आयोगपत्राच्या अंमलबजावणीदाखल त्यांना अशी आज्ञा करण्यात आली आहे ते आयोगपत्र काढणारे न्यायालय [१][भारतातील] असो वा [१][भारताच्या] सीमांबाहेरील असो—आणि या नियमाच्या प्रयोजनार्थ, आयुक्त म्हणजे दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल :

[२][परंतु, आयुक्त हा दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश नसेल तेव्हा, तो शास्ती बसवण्यास सक्षम असणार नाही; पण ज्या न्यायालयाने आयोगपत्र काढले असेल त्या न्यायालयास अशा आयुक्ताच्या अर्जावरून अशी शास्ती बसविता येईल.]

(२) ज्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये साक्षीदार राहत असेल अशा (उच्च न्यायालयाव्यतिरिक्त अन्य) कोणत्याही न्यायालयाकडे आयुक्तास, अशा साक्षीदाराच्या नावाने किंवा त्याच्याविरुद्ध जी आदेशिका निघणे त्याला आवश्यक वाटेल अशी कोणतीही आदेशिका काढण्यासाठी अर्ज करता येईल, आणि अशा न्यायालयास, स्वविवेकानुसार, त्याला वाजवी व योग्य वाटेल अशी आदेशिका काढता येईल.

पक्षकारांनी आयुक्तासमोर उपस्थित राहणे.

१८. (१) या आदेशान्वये आयोगपत्र काढण्यात आल्यास, दाव्यातील पक्षकारांनी आयुक्तासमोर जातीने किंवा आपल्या अभिकर्त्यांमार्फत किंवा प्लीडरमार्फत उपस्थित रहावे असा निदेश न्यायालयाने दिला पाहिजे.

(२) सर्वच्या सर्व किंवा त्यांपैकी काही पक्षकार अशा प्रकारे उपस्थित राहिले नाहीत, तर आयुक्तास त्यांच्या अनुपस्थितीत कामकाज पुढे चालवता येईल.

[४][विदेशी न्यायाधिकरणांच्या विनंतीवरून काढलेली आयोगपत्रे

आदेश, अंमलबजावणीच्या कार्यवाहीस लागू असणे.

[३][१८-क. या आदेशाचे उपबंध, शक्य होईल तेथवर, हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीच्या कार्यवाहीस लागू होतील.

आयोगपत्र परत करण्यासाठी न्यायालयाने मुदत निश्चित करणे.

१८-ख. आयोगपत्र काढणाऱ्या न्यायालयाने अंमलबजावणीनंतर आयोगपत्र कोणत्या तारखेस किंवा तारखेपूर्वी त्याच्याकडे परत केले पाहिजे ती तारीख निश्चित केली पाहिजे, आणि अशा प्रकारे निश्चित केलेली तारीख वाढवून देण्यात येणार नाही,—मात्र तारीख वाढवण्यासाठी पुरेसे कारण आहे अशी न्यायालयाची खात्री झाल्यास, त्यास, त्याबद्दलची कारणे नमूद करून, अशी तारीख वाढविता येईल.]

साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी कोणत्या प्रकरणी उच्च न्यायालयास आयोगपत्र काढता येईल.

१९. (१) (क्) एखादे परदेशातील विदेशी न्यायालय त्याच्यापुढे चालू असलेल्या कोणत्याही कार्यवाहीमध्ये एखाद्या साक्षीदाराची साक्ष काढू इच्छिते,

(ख्) कार्यवाही दिवाणी स्वरुपाची आहे, आणि

(ग्) साक्षीदार उच्च न्यायालयाच्या अपील अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहत आहे,

अशी उच्च न्यायालयाची खात्री पटल्यास त्यास, नियम २० च्या उपबंधांच्या अधीनतेने, अशा साक्षीदाराच्या तपासणीकरिता आयोगपत्र काढता येईल.

(२) पोटनियम (१) च्या खंड (क्), (ख्) व (ग्) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात,—

(क्) त्या परदेशाच्या, भारतामधील वाणिज्य दूतावासातील सर्वोच्च दर्जाच्या अधिकाऱ्याने सही केलेल्या व केंद्र शासनामार्फत उच्च न्यायालयाकडे पाठवलेल्या प्रमाणपत्राद्वारे, किंवा

(ख्) विदेशी न्यायालयाने दिलेल्या व केंद्र शासनामार्फत उच्च न्यायालयाकडे पाठविण्यात आलेल्या विनंतीपत्राद्वारे, किंवा

(ग्) विदेशी न्यायालयाने दिलेल्या व कार्यवाहीतील पक्षकाराने उच्च न्यायालयापुढे हजर केलेल्या विनंतीपत्राद्वारे,

पुरावा देता येईल.

---

१. सन १९५१ चा अधिनियम २ च्या कलम ३ अन्वये अनुक्रमे "राज्यातील" व "राज्याच्या" या शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७५ (सहा) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७५ (सात) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

४. १९३२ चा अधिनियम १० च्या कलम ३ अन्वये नियम १९ ते २२ आणि त्यावरील शीर्षक समाविष्ट करण्यात आले.

२०. उच्च न्यायालयास, नियम १९ खाली,—

(क्) विदेशी न्यायालयासमोरील कार्यवाहीमधील पक्षकाराच्या अर्जावरून, किंवा

(ख्) राज्य शासनाच्या निदेशांनुसार कार्य करणाऱ्या राज्य शासनाच्या कोणत्याही विधि अधिकाऱ्याच्या अर्जावरून,

आयोगपत्र काढता येईल. आयोगपत्र काढण्याकरिता अर्ज.

२१. नियम १९ खालील आयोगपत्र, ज्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये साक्षीदार राहत असेल अशा कोणत्याही न्यायालयाच्या नावाने किंवा [१][* * * साक्षीदार [२][उच्च न्यायालयाच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या] स्थानिक सीमांमध्ये राहत असेल तर, न्यायालयाच्या मते, आयोगपत्राची अंमलबजावणी करण्यास जी व्यक्ती योग्य असेल अशा व्यक्तीच्या नावाने काढता येईल. आयोगपत्र कोणाच्या नावे काढता येईल.

२२. या आदेशातील नियम ६, १५, [३][१६क चा पोटनियम (१), १७, १८, आणि १८ख] यांचे उपबंध अशी आयोगपत्रे काढणे, त्यांची अंमलबजावणी करणे व ती परत करणे यांच्या बाबतीत लागू करण्याजोगे असतील तेथवर, लागू होतील आणि जेव्हा अशा कोणत्याही आयोगपत्राची यथायोग्य अंमलबजावणी करण्यात येईल तेव्हा ते, त्याखाली घेतलेल्या पुराव्यासह उच्च न्यायालयाकडे परत करण्यात येईल आणि उच्च न्यायालयाने, विदेशी न्यायालयाकडे पाठविण्याची विनंती करणाऱ्या पत्रासह, ते केंद्र शासनाकडे पाठविले पाहिजे.] आयोगपत्र काढणे, त्यांची अंमलबजावणी करणे व ती परत करणे आणि पुरावा विदेशी न्यायालयाकडे पाठवणे.

आदेश सत्ताविसावा

शासनाकडून किंवा शासनाविरुद्ध किंवा पदीय नात्याने लोक अधिकाऱ्यांकडून किंवा त्यांच्याविरुद्ध दावे

१. [४][शासनाने] किंवा त्याच्याविरुद्ध लावलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये वादपत्रावर किंवा प्रतिवाद-पत्रावर शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे नेमील अशा व्यक्तीने सही केली पाहिजे आणि शासन अशा प्रकारे नेमील अशा व प्रकरणाची तथ्ये माहीत असणाऱ्या व्यक्तीने त्याचे सत्यापन केले पाहिजे. शासनाकडून किंवा शासनाविरुद्ध दावा.

२. कोणत्याही न्यायिक कार्यवाहीमध्ये शासनाच्यावतीने काम चालवण्यास पदतः किंवा अन्यथा प्राधिकृत असलेल्या व्यक्ती, म्हणजे मान्यताप्राप्त अभिकर्ते असल्याचे समजण्यात येईल व त्यांना या संहितेनुसार शासनाच्यावतीने उपस्थित राहता येईल, काम चालविता येईल व अर्ज करता येतील. शासनाच्या वतीने काम चालविण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्ती.

३. शासनाने किंवा [४][त्याच्याविरुद्ध] लावलेल्या दाव्यांमध्ये, वादपत्रात वादी किंवा प्रतिवादी याचे नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण नमूद करण्याऐवजी [५][कलम ७९ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे समुचित नाव [६][* * *] नमूद करणे पुरेसे होईल. शासनाने किंवा त्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या दाव्यामधील वादपत्रे.

[७][४. कोणत्याही न्यायालयातील शासकीय वकील हा, अशा न्यायालयाने शासनाच्या विरुद्ध काढलेल्या आदेशिका स्वीकारण्यासाठी शासनाचा अभिकर्ता असेल.] आदेशिका स्वीकारण्यासाठी शासनाचा अभिकर्ता.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ या अन्वये "भारतीय उच्च न्यायालय अधिनियम, १८६१ किंवा भारत सरकारचा अधिनियम, १९१५ अन्वये उच्च न्यायालय प्रस्थापित करण्यात आले" हे शब्द वगळण्यात आले.

२. सन १९३७ च्या अनुकूलन आदेशान्वये "त्याच्या साधारण मूळ दिवाणी अधिकारितेच्या" या शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७५ (आठ) अन्वये "१६, १७ व १८" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

४. विधि अनुकूलन आदेश, १९३७ या अन्वये "सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल" याऐवजी दाखल करण्यात आले.

५. वरील आदेशान्वये "सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल" याऐवजी दाखल करण्यात आले.

६. विधि अनुकूलन आदेश, १९४८ याअन्वये "किंवा जर दावा सेक्रेटरी ऑफ स्टेटच्याविरुद्ध असेल तर सेक्रेटरी ऑफ स्टेट असे" हा मजकूर निरसित करण्यात आला.

७. विधि अनुकूलन आदेश, १९३७ याअन्वये मूळ नियमाऐवजी दाखल करण्यात आला.

शासनाच्यावतीने उपस्थित राहण्यासाठी दिवस निश्चित करणे.

५. [१][शासनाकडून] वादपत्राला उत्तर दिले जाण्यासाठी दिवस निश्चित करताना न्यायालयाने योग्य त्या मार्गाने शासनाशी आवश्यक तो संपर्क साधता यावा यासाठी व [२][* * * * [३][शासकीय वकिलाला] [४][शासनाच्या] वतीने उपस्थित राहून उत्तर देण्यास फर्मावणारे निदेश देण्याकरिता वाजवी मुदत दिली पाहिजे आणि त्यास स्वविवेकानुसार अशी मुदत वाढवून देता येईल [५][मात्र याप्रमाणे वाढवलेली एकूण मुदत दोन महिन्यांपेक्षा अधिक असता कामा नये.]

लोक अधिकाऱ्याविरुद्ध दाखल केलेल्या दाव्यात शासनाला पक्षकार म्हणून सामील करून घेणे.

[६][५-क. एखाद्या लोक अधिकाऱ्याने जे कृत्य आपल्या पदीय नात्याने केले असल्याचे अभिकथित करण्यात आले असेल अशा कोणत्याही कृत्याच्या बाबतीत, नुकसानी किंवा अन्य दाद मागण्यासाठी त्याच्याविरुद्ध दावा दाखल करण्यात आला असेल तेव्हा, शासनाला दाव्यातील पक्षकार म्हणून सामील करून घेतले पाहिजे.

शासन किंवा लोक अधिकारी यांच्याविरुद्ध दाव्यांमध्ये समझोता करण्यासाठी सहाय्य करणे हे न्यायालयाचे कर्तव्य.

५-ख. (१) शासन किंवा आपल्या पदीय नात्याने काम करणारा लोक अधिकारी हा एक पक्षकार असेल अशा प्रत्येक दाव्यात किंवा कार्यवाहीत, प्रथमत: प्रकरणाचे स्वरूप व परिस्थिती यानुसार तसे करणे सुसंगतपणे शक्य असेल तेव्हा, दाव्याच्या विषयवस्तूच्या बाबतीत, समझोता करण्यासाठी पक्षकारांना सहाय्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे हे न्यायालयाचे कर्तव्य असेल.

(२) जर अशा कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत, कोणत्याही टप्प्याला पक्षकारांमध्ये समझोता होण्याची वाजवी शक्यता आहे असे न्यायालयास दिसून आल्यास, त्यास, असा समझोता घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे शक्य व्हावे म्हणून, त्यास स्वत:स योग्य वाटेल इतक्या कालावधीपर्यंत कार्यवाही तहकूब करता येईल.

(३) पोटनियम (२) अन्वये दिलेली शक्ती ही, कार्यवाही तहकूब करण्याच्या न्यायालयाच्या अन्य कोणत्याही शक्तीव्यतिरिक्त असेल.]

शासनाच्याविरुद्ध दाखल केलेल्या दाव्याशी संबंधित प्रश्नांना उत्तरे देऊ शकणाऱ्या व्यक्तींची उपस्थिती.

६. ज्या प्रकरणी [७][शासनाच्या] वतीने दाव्याशी संबंधित महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशी कोणतीही व्यक्ती [८][शासकीय वकिलाच्या] सोबत नसेल अशा प्रकरणी, न्यायालयास अशा व्यक्तीने हजर राहावे असाही निदेश देता येईल.

लोक अधिकाऱ्यास शासनाकडे निर्देश करणे शक्य व्हावे म्हणून मुदत वाढवणे.

७. (१) प्रतिवादी लोक अधिकारी असेल आणि समन्स मिळाल्यानंतर वादपत्रास उत्तर देण्यापूर्वी शासनाकड निर्देश करणे उचित आहे असे त्याला वाटले तर, शासनाकडे असा निर्देश करणे आणि योग्य मार्गाने त्यावर आदेश मिळवणे शक्य व्हावे म्हणून आवश्यक असेल त्याप्रमाणे, समन्समध्ये निश्चित केलेली मुदत अशा प्रकारे वाढवून मिळण्यासाठी त्याला अर्ज करता येईल.

(२) असा अर्ज केल्यानंतर न्यायालयाने ती मुदत त्यास आवश्यक वाटेल इतकी वाढविली पाहिजे.

लोक अधिकाऱ्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या दाव्यातील कार्यपद्धती.

८. (१) लोक अधिकाऱ्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या दाव्यातील बचावाची जबाबदारी शासनाने स्वीकारली तर त्याबाबतीत, [९][शासकीय वकिलाला] उपस्थित राहून वादपत्राला उत्तर द्यावे यासाठी प्राधिकारपत्र देण्यात आल्यानंतर त्याने न्यायालयाकडे अर्ज केला पाहिजे व असा अर्ज करण्यात आल्यानंतर न्यायालयाने दिवाणी दाव्याच्या नोंदवहीमध्ये त्याच्या प्राधिकारपत्राची नोंद घेण्याची व्यवस्था केली पाहिजे.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ याअन्वये "सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल" याऐवजी दाखल करण्यात आले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९४८ याअन्वये "शासनाला किंवा" हे शब्द निरसित करण्यात आले.

३. विधि अनुकूलन आदेश, १९३७ याअन्वये "सरकारी वकिलाला" याऐवजी "क्राऊन प्लीडर" असे दाखल करण्यात आले होते. त्याऐवजी "विधी अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये" हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. विधि अनुकूलन आदेश, १९३७ या अन्वये "उक्त सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल" याऐवजी दाखल करण्यात आले.

५. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७६(एक) याअन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ७६(दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

७. विधि अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये "सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल" या ऐवजी दाखल करण्यात आले.

८. विधि अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये "सरकारी वकील" याऐवजी घेतलेल्या "क्राऊन प्लीडर" याऐवजी विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये सदर शब्द घेण्यात आला.

९. विधि अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये "सरकारी वकील" या ऐवजी घेतलेल्या "क्राऊन प्लीडर" याऐवजी विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये सदर शब्द घेण्यात आला.

(२) प्रतिवादीने उपस्थित राहून उत्तर द्यावे यासाठी दिलेल्या नोटिशीत निश्चित केलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी पोटनियम (१) खाली [१][शासकीय वकिलाने] कोणताही अर्ज न केल्यास, खाजगी पक्षकारामधील दाव्याप्रमाणे त्या दाव्याचे कामकाज पुढे चालू ठेवण्यात येईल :

परंतु, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, प्रतिवादीला अटक होऊ शकणार नाही किंवा त्याची मालमत्ताही जप्त करता येणार नाही.

[२][८क. एकेचाळिसाव्या आदेशातील नियम ५ व ६ मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही प्रतिभूती, शासनाकडून किंवा लोक अधिकाऱ्याने आपल्या पदीय नात्याने केल्याचे अभिकथन करण्यात आलेल्या कृत्याच्या संबंधात त्याच्याविरुद्ध दावा दाखल करण्यात आला असून दाव्यामध्ये शासनाने बचावाची जबाबदारी स्वीकारली असेल तर, अशा कोणत्याही लोक अधिकाऱ्याकडून, मागता येणार नाही. विवक्षित प्रकरणी शासन किंवा लोक अधिकारी यांच्याकडून प्रतिभूती मागता न येणे.

८ख. या आदेशामध्ये, [१][अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केले नसेल तर एरव्ही], " शासन " व " [१][शासकीय वकील]" या शब्दांचे अर्थ अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत :— " शासन " व " शासकीय वकील " यांच्या व्याख्या.

(क) [४][* * * *] केंद्र शासनाने किंवा त्याच्याविरुद्ध अथवा त्या शासनाच्या सेवेतील लोक अधिकाऱ्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या कोणत्याही दाव्याच्या संबंधात, केंद्र शासन आणि या आदेशाच्या प्रयोजनार्थ, ते शासन सर्वसाधारणपणे किंवा विशेषेकरून नेमील असा प्लीडर;

[१]* * * *

(ग) राज्य शासनाने किंवा त्याच्याविरुद्ध अथवा राज्य शासनाच्या सेवेतील लोक अधिकाऱ्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या कोणत्याही दाव्याच्या संबंधात, राज्य शासन आणि [६][कलम २ च्या खंड (७) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे] शासकीय वकील किंवा या आदेशाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन सर्वसाधारणपणे किंवा विशेषेकरून नेमील असा अन्य प्लीडर.]

[७][आदेश सत्तावीसावा—क

[८][संविधानाचा] अर्थ लावण्यासंबंधीचा [९][किंवा कोणत्याही सांविधिक संलेखाच्या विधिग्राह्यतेसंबंधीचा] कोणताही सारभूत कायदेविषयक प्रश्न अंतर्भूत असलेले दावे.

१. ज्या कोणत्याही दाव्यात, [१०][[११][संविधानाच्या अनुच्छेद १४७ सहित अनुच्छेद १३२ च्या खंड (१) मध्ये] निर्देशिलेला असा कोणताही प्रश्न] अंतर्भूत आहे असे न्यायालयास वाटेल त्यामध्ये, तो कायदेविषयक प्रश्न केंद्र शासनाशी संबंधित असेल तर [१२][भारताच्या महान्यायवादीस] आणि तो कायदेविषयक प्रश्न राज्य शासनाशी संबंधित असेल तर राज्याच्या महाअधिवक्त्यास नोटीस देण्यात आल्याखेरीज, न्यायालयाने त्या प्रश्नाचा निर्णय करण्याच्या कामाला लागता कामा नये. महान्यायवादीस किंवा महाअधिवक्त्यास नोटीस.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये "सरकारी वकील" याऐवजी घेतलेल्या "क्राऊन प्लीडर" याऐवजी विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये सदर शब्द घेण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये नियम ८क व ८ख समाविष्ट करण्यात आले.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये सदर मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. विधि अनुकूलन आदेश, १९४८ अन्वये " दि सेक्रेटरी ऑफ स्टेट किंवा " हे शब्द निरसित करण्यात आले.

५. विधि अनुकूलन आदेश, १९४८ अन्वये खंड (ख) निरसित करण्यात आला.

६. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये समाविष्ट करण्यात आला.

७. १९४२ चा अधिनियम २३ च्या कलम २ अन्वये आदेश सत्तावीस—क समाविष्ट करण्यात आला.

८. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ किंवा त्याखाली केलेली कोणतीही ऑर्डर इन् कौन्सिल " या शब्दांऐवजी दाखल करण्यात आला.

९. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७७ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१०. विधि अनुकूलन आदेश, १९४८ अन्वये " गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ किंवा त्याखाली केलेली कोणतीही ऑर्डर इन कौन्सिल याच्या अन्वयार्थानुसार महत्त्वाचा विधिविषयक प्रश्न " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

११. विधि अनुकूलन आदेश १९५० अन्वये " गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ च्या कलम २०५ च्या पोटकलम (१) मध्ये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१२. वरील आदेशान्वये " ॲडव्होकेट जनरल ऑफ इंडिया " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

एखाद्या सांविधिक संलेखाच्या विधिग्राह्यतेसंबंधीच्या दाव्यामधील कार्यपद्धती.

[1][१क. नियम १ मध्ये उल्लेखिलेल्या स्वरूपाचा असा नव्हे, परंतु कोणत्याही सांविधिक संलेखासंबंधी असलेला एखादा प्रश्न ज्यामध्ये गुंतलेला आहे अशा कोणत्याही दाव्यात,—

(क्) तो प्रश्न शासनाशी संबंधित असेल तर, शासकीय वकिलाला, किंवा

(ख्) तो प्रश्न शासनाखेरीज अन्य प्राधिकरणाशी संबंधित असेल तर, ज्याने तो सांविधिक संलेख काढला त्या प्राधिकरणाला;

नोटीस दिल्याखेरीज न्यायालयाने त्या प्रश्नाचा निर्णय करण्याची कार्यवाही सुरू करता कामा नये.]

न्यायालय शासनास पक्षकार म्हणून सामील करून घेऊ शकेल.

२. ज्या कोणत्याही दाव्यात [2][संविधानाच्या अनुच्छेद १४७ सहित अनुच्छेद १३२, च्या खंड (१) मध्ये [3][निर्दिष्ट केलेला असा कोणताही प्रश्न] अंतर्भूत असेल त्यामध्ये केंद्र शासनाला किंवा राज्य शासनाला प्रतिवादी म्हणून सामील करून घेण्यात यावे असा [4][भारताच्या महान्यायवादीने] किंवा, प्रकरणपरत्वे, राज्याच्या महाअधिवक्त्याने, नियम १ खालील नोटीस मिळाल्यानंतर किंवा अन्यथा, अर्ज केल्यास आणि अंतर्भूत असलेल्या कायदेविषयक प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी अशा प्रकारे त्यांचा समावेश करून घेणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी न्यायालयाची खात्री पटल्यास, ते, त्याप्रमाणे, त्यांचा समावेश करून घेण्यात यावा असा आदेश कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला देऊ शकेल.

कोणत्याही सांविधिक संलेखाच्या विधिग्राह्यतेसंबंधीच्या दाव्यामध्ये शासनास किंवा अन्य प्राधिकरणास प्रतिवादी म्हणून समाविष्ट करून घेण्याची न्यायालयाची शक्ती.

[5][२क. ज्या कोणत्याही दाव्यात नियम १क मध्ये निर्देशिलेला असा कोणताही प्रश्न अंतर्भूत असेल त्यामध्ये, शासनाला किंवा अन्य प्राधिकरणाला प्रतिवादी म्हणून समाविष्ट करून घेण्यात यावे असा शासकीय वकिलाने किंवा त्या प्रकरणात त्या प्राधिकरणाच्या वतीने काम चालवणाऱ्या प्लीडरने, नियम १क खालील नोटीस मिळाल्यानंतर किंवा अन्यथा, अर्ज केल्यास आणि त्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी अशा प्रकारे त्यांचा समावेश करून घेणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी न्यायालयाची खात्री पटल्यास, ते, त्याप्रमाणे, त्यांचा समावेश करून घेण्यात यावा असा आदेश कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्याला देऊ शकेल.]

दावाखर्च.

[6][३. नियम २ किंवा नियम २क अन्वये एखाद्या दाव्यामध्ये शासनास किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणास प्रतिवादी म्हणून सामील करून घेण्यात आल्यास, महान्यायवादी, महाअधिवक्ता किंवा शासकीय वकील किंवा अन्य प्राधिकरण, ज्या न्यायालयाने त्यांचा असा समावेश करण्याचा आदेश दिला असेल त्या न्यायालयातील दावाखर्चास हक्कदार किंवा दायी असणार नाही; मात्र न्यायालयाने ह्या प्रकरणातील समग्र परिस्थितीचा विचार करून अन्य आदेश दिला असेल तर गोष्ट वेगळी.]

हा आदेश अपिलांना लागू करणे.

४. हा आदेश अपिलांना लागू करताना, "प्रतिवादी" या शब्दात उत्तरवादीचा आणि "दावा" या शब्दात अपिलाचा समावेश होतो असे समजण्यात येईल.

[7][**स्पष्टीकरण.**—या आदेशातील "सांविधिक संलेख" याचा अर्थ, कोणत्याही अधिनियमितीअन्वये काढलेला किंवा विनिर्दिष्ट केलेला नियम, अधिसूचना, पोटनियम, आदेश, योजना किंवा नमुना असा आहे.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७७ (दोन) अन्वये सदर मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९४८ अन्वये "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ किंवा त्याखाली केलेली कोणतीही ऑर्डर इन कौन्सिल याच्या अन्वयार्थानुसार महत्त्वाचा विधीविषयक प्रश्न" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ च्या कलम २०५ च्या पोटकलम (१) मध्ये या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील आदेशान्वये "ॲडव्होकेट जनरल ऑफ इंडिया" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७७ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ७७ (चार) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम ७७ (पाच) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

आदेश अठ्ठाविसावा

भूसैनिक [१][किंवा नौसैनिक] [२][किंवा वायुसैनिक] यांच्याकडून किंवा त्यांच्याविरुद्ध दावे.

ज्यांना रजा मिळू शकत नाही असे अधिकारी, भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक त्यांच्यावतीने दावा लावण्यास किंवा त्यात बचाव देण्यास कोणत्याही व्यक्तीला प्राधिकृत करू शकतील.

१. (१) जर कोणताही अधिकारी, [३][भूसैनिक, नौसैनिक किंवा वायुसैनिक] [४][अशा] नात्याने प्रत्यक्षत: [५][शासनाच्या अखत्याराखाली सेवा बजावत असून] दाव्यामध्ये पक्षकार असेल आणि जातीने दावा चालवण्यासाठी किंवा त्यात बचाव देण्यासाठी त्याला अनुपस्थिती रजा मिळू शकत नसेल तर त्याला, दावा चालवण्यासाठी किंवा त्यात बचाव देण्यासाठी आपल्याऐवजी कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करता येईल.

(२) प्राधिकारपत्र लेखी असले पाहिजे आणि त्या अधिकाऱ्याला, [६][भूसैनिकाला, नौसैनिकाला किंवा वायुसैनिकाला], (क्) त्याचा समादेशक अधिकारी, किंवा पक्षकार हाच खुद्द समादेशक अधिकारी असेल तर त्याच्या लगतनंतरचा दुय्यम अधिकारी, किंवा (ख्) [१][तो अधिकारी, भूसैनिक, [३][नौसैनिक] किंवा वायुसैनिक] भूसैनिकी [३][नौसैनिकी] [३][किंवा वायुसैनिकी] कार्यालयाच्या नोकरीत असेल तर, त्याला जेथे नेमलेले असेल त्या कार्यालयाचा प्रमुख किंवा अन्य वरिष्ठ अधिकारी याच्या समक्ष ते स्वाक्षरित करावे लागेल. असा समादेशक अधिकारी किंवा अन्य अधिकारी याला प्राधिकारपत्रावर प्रतिस्वाक्षरी करावी लागेल व ते प्राधिकारपत्र न्यायालयात दाखल करावे लागेल.

(३) प्राधिकारपत्र अशा प्रकारे दाखल करण्यात आल्यानंतर, ते यथोचितरीत्या निष्पादित करण्यात आले होते आणि ज्याने ते दिले असेल तो अधिकारी, [१][भूसैनिक, [३][नौसैनिक] किंवा वायुसैनिक] जातीने दावा चालवण्यासाठी किंवा त्यात बचाव देण्यासाठी अनुपस्थिती रजा मिळवू शकला नाही याचा तो पुरेसा पुरावा असेल.

स्पष्टीकरण.—या आदेशामधील "समादेशक अधिकारी" याचा अर्थ, तो अधिकारी [१][भूसैनिक, [३][नौसैनिक] किंवा वायुसैनिक] ज्या रेजिमेंट मध्ये, सैन्यदलामध्ये, [७][जहाजात], सैन्य तुकडीत किंवा आगारात असेल, त्याचा त्या त्या वेळी असलेला प्रत्यक्ष समादेशक अधिकारी असा आहे.

अशाप्रकारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस जातीने काम करता येईल किंवा प्लीडरची नेमणूक करता येईल.

२. दावा चालवण्यासाठी किंवा त्यात बचाव देण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्याने, [१][भूसैनिकाने, [३][नौसैनिकाने] किंवा वायुसैनिकाने] आपल्या ऐवजी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, तो अधिकारी, [१][भूसैनिक, [३][नौसैनिक] किंवा वायुसैनिक] हजर असता तर, तो जसे करू शकला असता त्याप्रमाणे, त्याच पद्धतीने स्वत: जातीने दावा चालविता येईल किंवा बचाव करता येईल किंवा असा अधिकारी [१][भूसैनिक, [३][नौसैनिक] किंवा वायुसैनिक] याच्या वतीने दावा चालवण्यासाठी किंवा बचाव करण्यासाठी त्या व्यक्तीस प्लीडरची नेमणूक करता येईल.

अशाप्रकारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीवरील किंवा तिच्या प्लीडरवरील बजावणी ही सुयोग्य बजावणी असणे.

३. नियम १ खाली एखाद्या अधिकाऱ्याने, [१][भूसैनिकाने, [३][नौसैनिकाने] किंवा वायुसैनिकाने] प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीवर किंवा अशा व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे नेमलेल्या कोणत्याही प्लीडरवर बजावलेल्या आदेशिका या, खुद्द पक्षकारावरच बजावलेल्या असाव्यात त्याप्रमाणे परिणामक असतील.

आदेश एकोणतिसावा

महामंडळांकडून किंवा त्यांच्याविरुद्ध दावे

वादकथन स्वाक्षरित व सत्यापित करणे.

१. एखादचा महामंडळाने किंवा त्याच्या विरुद्ध दाखल केलेल्या दाव्यांमध्ये, कोणतेही वादकथन महामंडळाच्या वतीने त्याच्या सचिवाला, त्याच्या कोणत्याही संचालकाला किंवा प्रकरणाच्या तथ्यांविषयी जबानी देऊ शकणाऱ्या अन्य प्रधान अधिकाऱ्याला स्वाक्षरित व सत्यापित करता येईल.

---

१. सन १९३४ चा अधिनियम ३५ च्या कलम २ आणि अनुसूची याद्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. १९२७ चा अधिनियम १०, कलम २ आणि अनुसूची एक याद्वारे समाविष्ट करण्यात आला.

३. "भूसैनिक व वायुसैनिक" हे शब्द वरील अधिनियमाच्या कलम २ आणि अनुसूची एक अन्वये किंवा "सैनिक" या शब्दाऐवजी आणि सन १९३४ चा अधिनियम ३५ च्या कलम २ आणि अनुसूची अन्वये "नौसैनिक" हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

४. सन १९३४ चा अधिनियम ३५ च्या कलम २ आणि अनुसूची अन्वये "भूसैनिक किंवा वायुसैनिक" याऐवजी दाखल करण्यात आले.

५. विधि अनुकूलन आदेश, १९३७ अन्वये बदली दाखल करण्यात आला.

६. सन १९२७ चा अधिनियम १० च्या कलम २ आणि अनुसूची अन्वये "किंवा भूसैनिक" या शब्दाऐवजी "भूसैनिक किंवा वायुसैनिक" हे शब्द आणि १९३४ चा अधिनियम ३५ च्या कलम २ आणि अनुसूची अन्वये 'नौसैनिक' हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

७. सन १९३४ चा अधिनियम ३५ च्या कलम २ आणि अनुसूची अन्वये समाविष्ट करण्यात आले.

महामंडळावर बजावणी.

२. दावा महामंडळाविरुद्ध असेल त्याबाबतीत, आदेशिकेची बजावणी विनियमित करणाऱ्या कोणत्याही सांविधिक उपबंधांच्या अधीनतेने, समन्स,—

(क्) महामंडळाच्या सचिवावर किंवा कोणत्याही संचालकावर किंवा अन्य प्रधान अधिकाऱ्यावर, किंवा

(ख्) महामंडळाच्या नोंदीव कार्यालयाकडे किंवा नोंदीव कार्यालय नसल्यास, महामंडळाकडून ज्या ठिकाणी धंदा चालवला जातो त्या ठिकाणी सुपूर्द करून किंवा महामंडळाच्या पत्त्यावर डाकेने पाठवून, बजावता येईल.

महामंडळाच्या अधिकाऱ्यास जातीने हजर राहण्यास फर्मावण्याची शक्ती.

३. न्यायालयास, दाव्याच्या कोणत्याही टप्प्याला, महामंडळाच्या सचिवाला किंवा कोणत्याही संचालकाला किंवा दाव्यासंबंधीच्या महत्वाच्या प्रश्नांना उत्तरे देऊ शकेल अशा अन्य कोणताही प्रधान अधिकाऱ्याला जातीने उपस्थित राहण्यास फर्मावता येईल.

आदेश तिसावा

भागीदारी संस्थांनी आणि स्वतःच्या नावाव्यतिरिक्त अन्य नावाने धंदा चालवणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्याविरुद्ध लावलेले दावे.

भागीदारी संस्थेच्या नांवे भागीदारांवर दावा लावणे.

१. (१) भागीदार म्हणून दावा सांगणाऱ्या किंवा त्या नात्याने दायी असलेल्या व [१][भारतात] धंदा चालवणाऱ्या कोणत्याही दोन किंवा अधिक व्यक्तींना, वादकारण उद्भवले त्यावेळी अशा व्यक्ती ज्या भागीदारी संस्थेच्या (तशी भागीदारी संस्था असल्यास) भागीदार होत्या त्या भागीदारी संस्थेच्या नांवे दावा लावता येईल किंवा त्या नावावर त्यांच्याविरुद्ध दावा लावता येईल, आणि अशा प्रकरणी, दाव्यातील कोणत्याही पक्षकारास, वादकारण उद्भवले त्यावेळी ज्या व्यक्ती अशा भागीदारी संस्थेतील भागीदार होत्या त्या व्यक्तींची नावे व पत्ते याबाबतचे निवेदन न्यायालय निदेश देईल त्या पद्धतीने सादर केले जाऊन सत्यापित करण्यात यावे म्हणून न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

(२) पोटनियम (१) खाली भागीदारी संस्थेतील भागीदार म्हणून काही व्यक्तींनी आपल्या भागीदारी संस्थेच्या नावे दावा लावला असेल किंवा त्या नावावर त्यांच्याविरुद्ध दावा लावण्यात आला असेल तेव्हा, या संहितेच्या अनुसार किंवा त्याखाली, वादीने किंवा प्रतिवादीने वादकथन किंवा अन्य दस्तऐवज स्वाक्षरित करणे, सत्यापित करणे किंवा प्रमाणित करणे आवश्यक असेल त्याबाबतीत, अशा व्यक्तीपैकी कोणत्याही एका व्यक्तीने असे वादकथन किंवा अन्य दस्तऐवज स्वाक्षरित, सत्यापित किंवा प्रमाणित केल्यास तेवढे पुरेसे होईल.

भागीदारांची नावे उघड करणे.

२. (१) आपल्या भागीदारी संस्थेच्या नावे भागीदारांनी दावा दाखल केला असेल त्याबाबतीत, वादीने किंवा त्याच्या प्लीडरने, कोणत्याही प्रतिवादीकडून किंवा त्याच्यावतीने लेखी मागणी करण्यात आल्यास, ज्या भागीदारी संस्थेच्या वतीने दावा दाखल केला असेल, अशी भागीदारी संस्था ज्या व्यक्तींची बनलेली आहे त्या सर्व व्यक्तींची नावे व राहण्याची ठिकाणे ताबडतोब लेखी जाहीर केली पाहिजेत.

(२) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रकारची कोणतीही मागणी पूर्ण करण्यात वादींनी किंवा त्यांच्या प्लीडरने कसूर केल्यास, त्या प्रयोजनार्थ अर्ज करण्यात आल्यास, दाव्यातील सर्व कार्यवाही न्यायालय निदेश देईल अशा अटींवर व त्याप्रमाणे स्थगित करता येईल.

(३) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने भागीदारांची नावे जाहीर करण्यात आल्यास, जणू काही त्यांची नावे वादपत्रातच वादी म्हणून समाविष्ट केलेली असावीत त्याप्रमाणे व त्याच पद्धतीने दाव्याची कार्यवाही पुढे चालेल, व सर्व बाबतीत तेच परिणाम घडून येतील :

[२][परंतु, तरीसुद्धा सर्व कार्यवाही भागीदारी संस्थेच्याच नावे चालू राहील, मात्र पोटनियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने उघड करण्यात आलेली भागीदारांची नावे हुकूमनाम्यात समाविष्ट केली पाहिजेत.]

बजावणी.

३. भागीदारी संस्थेतील व्यक्तींवर भागीदार म्हणून त्या संस्थेच्या नावाने दावा लावण्यात आला असेल त्याबाबतीत, समन्सची बजावणी न्यायालय निदेश देईल त्याप्रमाणे एकतर—

(क्) भागीदारांपैकी कोणाही एकावर किंवा एकापेक्षा अधिक भागीदारांवर, किंवा

---

१. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ३ अन्वये "राज्यात" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

२. १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७८ (क) अन्वये दाखल करण्यात आले.

(ख) [१][भारतामध्ये] ज्या ठिकाणी भागीदारीचा धंदा चालवण्यात येत असेल अशा प्रधान ठिकाणी, बजावणीच्या वेळी भागीदारी धंद्याचे नियंत्रण किंवा व्यवस्थापन ज्या व्यक्तीकडे असेल अशा कोणत्याही व्यक्तीवर,

समन्सची बजावणी करता येईल; आणि अशी बजावणी ज्या भागीदारी संस्थेवर असा दावा लावण्यात आला असेल त्या भागीदारी संस्थेवर सुयोग्य रीतीने केली असल्याचे समजण्यात येईल—मग तिचे सर्वच्या सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही भागीदार [१][भारतामध्ये] असोत किंवा [१][भारताबाहेर] असोत :

परंतु, दावा दाखल करण्यात येण्यापूर्वी भागीदारी विसर्जित करण्यात आली असून ते वादीला माहीत असेल तर, ज्या व्यक्तीला दायी करावयाचे असेल अशा [१][भारतात] असलेल्या प्रत्येक व्यक्तीवर समन्स बजावले पाहिजे.

भागीदाराच्या मृत्यूनंतर दाव्याचा अधिकार.

४. (१) 'भारतीय संविदा अधिनियम, १८७२' (१८७२ चा ९) याच्या कलम ४५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पूर्ववर्ती उपबंधांखाली दोन किंवा अधिक व्यक्ती भागीदारी संस्थेच्या नावे दावा दाखल करू शकत असतील किंवा त्यांच्या विरुद्ध दावा दाखल करता येत असेल आणि अशांपैकी कोणतीही व्यक्ती दावा सुरू केला जाण्यापूर्वी वा तो प्रलंबित असताना मृत्यू पावली तर त्याबाबतीत, दाव्यातील पक्षकार म्हणून मृताच्या कायदेशीर प्रतिनिधीला दाव्यामध्ये सामील करून घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(२) मृताच्या कायदेशीर प्रतिनिधीला,—

(क) दाव्यामध्ये आपल्याला पक्षकार म्हणून सामील करून घेण्यासाठी अर्ज करण्याचा, किंवा

(ख) उत्तरजीवी व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या विरुद्ध एखादा मागणीहक्क बजावून घेण्याचा जो कोणताही हक्क असेल त्यावर पोटनियम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे मर्यादा पडणार नाही किंवा अन्यथा परिणाम होणार नाही.

नोटीस कोणत्या नात्याने बजावली ते.

५. समन्स एखाद्या भागीदारी संस्थेला पाठवण्यात आले असून, नियम ३ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने ते बजावण्यात आल्यास, ते ज्या ज्या व्यक्तींवर बजावण्यात आले असेल अशा प्रत्येक व्यक्तीला अशी बजावणी करतेवेळी, त्या व्यक्तीवर समन्सची बजावणी भागीदार म्हणून करण्यात येत आहे की, भागीदारी धंद्याचे नियंत्रण किंवा व्यवस्थापन करणारी व्यक्ती म्हणून करण्यात येत आहे किंवा या दोन्ही नात्यांनी समन्स बजावण्यात येत आहे ते लेखी नोटिशीद्वारे कळविले पाहिजे आणि अशी नोटीस बजावण्यात कसूर झाल्यास, त्या व्यक्तीवर भागीदार म्हणून नोटीस बजावली असल्याचे समजण्यात येईल.

भागीदारांची उपस्थिती.

६. जेव्हा भागीदार व्यक्तींविरुद्ध त्या नात्याने त्यांच्या भागीदारी संस्थेच्या नावे दावा लावला गेल्यास, त्या व्यक्ती आपापल्या नावानी व्यक्तिश: उपस्थित राहतील, तथापि, त्यानंतरचे सर्व कामकाज भागीदारी संस्थेच्या नावे चालू ठेवले पाहिजे.

भागीदार असल्याखेरीज उपस्थिती नाही.

७. भागीदारी धंद्याचे नियंत्रण व व्यवस्थापन करणाऱ्या व्यक्तीवर, नियम ३ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने समन्स बजावण्यात आले असेल तेव्हा, ज्या भागीदारी संस्थेविरुद्ध दावा दाखल करण्यात आला त्या भागीदारी संस्थेची ती भागीदार नसेल तर, तिने उपस्थित राहण्याची आवश्यकता असणार नाही.

सनिषेध उपस्थिती.

[२][८. (१) नियम ३ खाली भागीदार म्हणून समन्स बजावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, आपण विशिष्ट संबंधित वेळी भागीदार असल्याचे नाकबूल करून सनिषेध उपस्थितिपत्र दाखल करता येईल.

(२) अशा प्रकारे उपस्थित झाल्यावर, दाव्याची सुनावणी करून तो अंतिमरीत्या निकालात काढण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी केव्हाही, वादी किंवा उपस्थितिपत्र दाखल करणारी व्यक्ती यापैकी कोणीही, ती व्यक्ती भागीदारी संस्थेचा भागीदार होती किंवा कसे आणि भागीदार म्हणून दायी होती किंवा कसे हे ठरवण्यासाठी, न्यायालयाकडे अर्ज करू शकेल.

[१][८. नियम ३ खाली भागीदार म्हणून समन्स बजावण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, आपण विशिष्ट संबंधित वेळी भागीदार असल्याचे नाकबूल करून सनिषेध उपस्थितिपत्र दाखल करता येईल. अशाप्रकारे उपस्थितिपत्र दाखल झाल्यावर, दावा सुनावणीसाठी येण्यापूर्वी आणि तो अंतिम रीत्या निकालात काढण्यापूर्वी केव्हाही वादी किंवा उपस्थितिपत्र दाखल करणारी व्यक्ती यांपैकी कोणीही अशी बजावणी केलेली व्यक्ती भागीदारी संस्थेचा भागीदार होती किंवा कसे आणि भागीदार म्हणून दायी होती किंवा कसे हे ठरवण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करू शकेल. अशा प्रकारे अर्ज करण्यात आल्यावर, न्यायालयाने, ती व्यक्ती त्या विशिष्ट संबंधित वेळी भागीदार होती असा निर्णय दिल्यास, त्यामुळे वादीच्या हक्कमागणीच्या सनिषेध उपस्थिती.

---

१. १९५१ चा अधिनियम २ च्या कलम ३ अन्वये "राज्याच्या" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

२. १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७८ अन्वये मूळ नियमाऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ८९ अन्वये बदली दाखल करण्यात आले.

(३) अशा प्रकारे अर्ज करण्यात आल्यावर न्यायालयाने ती व्यक्ती त्या विशिष्ट संबंधित वेळी भागीदार होती असा निर्णय दिल्यास, प्रतिवादी-विरुद्ध असलेल्या हक्कमागणीच्या बाबतीत, भागीदारी संस्थेचे दायित्व नाकबूल करणारा बचाव दाखल करण्यास अशा व्यक्तीस त्यामुळे कोणताही प्रतिबंध होणार नाही.

(४) तथापि, न्यायालयाने ती व्यक्ती भागीदारी संस्थेचा भागीदार नव्हती आणि भागीदार म्हणून दायी नव्हती असा निर्णय दिल्यास, त्यामुळे त्या भागीदारी संस्थेवर अन्यथा समन्स बजावण्यास आणि दावा पुढे चालवण्यास वादीला प्रतिबंध होणार नाही; परंतु तसे झाल्यास, भागीदारी संस्थेविरुद्ध काढण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत भागीदारी संस्थेचा भागीदार म्हणून त्या व्यक्तीवर दायित्व असल्याचे अभिकथन करण्यास वादीला प्रतिबंध करण्यात येईल.]

बाबतीत, भागीदारीसंस्थेचे दायित्व नाकबूल करणारा बचाव दाखल करण्यास अशा व्यक्तीस कोणताही प्रतिबंध होणार नाही. तथापि, न्यायालयाने ती व्यक्ती भागीदारी संस्थेचा भागीदार नव्हती आणि भागीदार म्हणून दायी नव्हती असा निर्णय दिल्यास, त्यामुळे त्या भागीदारी संस्थेवर अन्यथा समन्स बजावण्यास आणि दावा पुढे चालवण्यास वादीला प्रतिबंध होणार नाही; परंतु तसे झाल्यास, त्या भागीदारी संस्थेविरुद्ध काढण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत त्या भागीदारी संस्थेचा भागीदार म्हणून त्या व्यक्तीवर दायित्व असल्याचे अभिकथन करण्यास वादीला प्रतिबंध करण्यात येईल.]

सहभागीदारांमधील दावे.

९. भागीदारी संस्था व त्यातील एक किंवा अनेक भागीदार यांच्यामधील दावे व एक किंवा अनेक सामायिक भागीदार असलेल्या भागीदारी संस्थांमधील दावे यांना हा आदेश लागू होईल; परंतु, अशा दाव्यांमध्ये न्यायालयाच्या परवानगीखेरीज कोणताही अंमलबजावणी आदेश काढता येणार नाही, आणि असा अंमलबजावणी आदेश काढण्याची परवानगी मिळवण्याकरता अर्ज करण्यात आल्यानंतर, योग्य असेल त्याप्रमाण, असे सर्व हिशेब घेण्यात यावेत व अशी सर्व प्रकारची चौकशी करण्यात यावी असे सांगता येईल आणि न्याय्य असे निदेश देता येतील.

स्वत:च्या नावाव्यतिरिक्त अन्य नावाने धंदा चालवणाऱ्या व्यक्तीविरुद्ध दावा.

[१][१०. स्वत:चे नाव किंवा नामाभिधान या व्यतिरिक्त अन्य नावाने धंदा चालवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या, अथवा कोणत्याही नावाने धंदा चालवणाऱ्या अविभक्त हिंदू कुटुंबाच्या विरुद्ध, असे नाव किंवा नामाभिधान हे जणू काही भागीदारी संस्थेचे नाव असावे त्याप्रमाणे दावा लावता येईल, आणि प्रकरणाच्या स्वरूपानुसार शक्य असेल तेथवर, या आदेशाखालील सर्व नियम तदनुसार लागू होतील.]

आदेश एकतिसावा

विश्वस्त, मृत्यूपत्रव्यवस्थापक व प्रशासक यांच्याकडून किंवा त्यांच्याविरुद्ध दावे

विश्वस्त, इत्यादींकडे निहित असलेल्या मालमत्तेसंबंधीच्या दाव्यामध्ये लाभाधिकाऱ्यांचे प्रतिनिधित्व.

१. विश्वस्त, मृत्यूपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक यांच्याकडे निहित असलेल्या मालमत्तेसंबंधीच्या सर्व दाव्यांमध्ये, अशा मालमत्तेमध्ये लाभप्रद हितसंबंध असलेल्या व्यक्ती आणि व्रयस्थ व्यक्ती यांच्यामध्ये विवाद असल्यास विश्वस्ताने, मृत्यूपत्रव्यवस्थापकाने किंवा प्रशासकाने अशाप्रकारे हितसंबंधित असलेल्या व्यक्तीचे प्रतिनिधित्व केले पाहिजे, आणि सामान्यत: त्यांना दाव्यातील पक्षकार करण्याची आवश्यकता असणार नाही. परंतु स्वत:ला योग्य वाटल्यास, न्यायालयास, त्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणालाही पक्षकार करून घेण्याचा आदेश देता येईल.

विश्वस्त, मृत्यूपत्र-व्यवस्थापक व प्रशासक यांना पक्षकार म्हणून सामील करून घेणे.

२. विश्वस्त, मृत्यूपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक अनेक असल्यास, त्यांच्यापैकी एखाद्याच्या किंवा काहींच्या विरुद्ध असलेल्या दाव्यामध्ये त्या सर्वांना पक्षकार केले पाहिजे:

परंतु, ज्या मृत्यूपत्रव्यवस्थापकांनी त्यांच्या मृत्यूपत्रकर्त्यांचे मृत्युपत्र शाबीत केलेले नसेल ते मृत्यूपत्र-व्यवस्थापक आणि [२][भारताबाहेरील] विश्वस्त, मृत्यूपत्रव्यवस्थापक व प्रशासक यांना पक्षकार करण्याची आवश्यकता नाही.

विवाहित मृत्युपत्र-व्यवस्थापिकेच्या, पतीला सामील करून न घेणे.

३. न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नाही तर एरव्ही, विश्वस्त, मृत्यूपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक असलेल्या विवाहित स्त्रीच्या पतीला, तिने किंवा तिच्याविरुद्ध लावलेल्या दाव्यात त्या नात्याने पक्षकार होता येणार नाही.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७८ (तीन) अन्वये मूळ नियमाऐवजी दाखल करण्यात आला.

२. सन १९५१ चा अधिनियम क्रमांक २, कलम ३ अन्वये "राज्याबाहेरील" या शब्दाऐवजी वरील शब्द समाविष्ट करण्यात आला.

आदेश बत्तिसावा

अज्ञान व्यक्तीकडून किंवा मनोविकल व्यक्तीकडून किंवा तिच्याविरुद्ध दावे

अज्ञान व्यक्तीने वादमित्रामार्फत दावा लावणे.

१. अज्ञान व्यक्तीने लावावयाचा प्रत्येक दावा, तिच्या नावाने एखाद्या व्यक्तीला दाखल करावा लागेल व अशा दाव्यामध्ये तिला त्या अज्ञान व्यक्तीचा वादमित्र म्हणून संबोधण्यात येईल.

[१][*स्पष्टीकरण.*—भारतीय सज्ञानता अधिनियम, १८७५ (१८७५ चा ९), याच्या कलम २ च्या खंड (क्) व (ख्) मध्ये नमूद केलेल्यांपैकी कोणत्याही बाबींशी किंवा अन्य कोणत्याही बाबींशी दावा संबंधित असेल तेव्हा, या आदेशातील " अज्ञान व्यक्ती " याचा अर्थ, ज्या व्यक्तीला त्या अधिनियमाच्या कलम ३ च्या अर्थांतर्गत सज्ञानता प्राप्त झालेली नाही ती व्यक्ती, असा आहे.]

वादमित्राशिवाय दावा दाखल केला असेल त्याबाबतीत, वादपत्र फायलीतून काढून घेणे.

२. (१) अज्ञान व्यक्तीकडून किंवा तिच्या वतीने वादमित्राशिवाय दावा दाखल करण्यात आला असेल तर, वादपत्र फायलीतून काढून घेण्यात यावे व तसेच, ज्या प्लीडरने किंवा अन्य व्यक्तीने तो दाखल केला असेल तिने खर्च द्यावा म्हणून वादीला अर्ज करता येईल.

(२) अशा अर्जाची नोटीस अशा व्यक्तीला देण्यात येईल, आणि त्या व्यक्तीचे आक्षेप (कोणतेही असल्यास) ऐकून घेतल्यानंतर, न्यायालयास, त्याबाबतीत स्वतःला योग्य वाटेल असा आदेश काढता येईल.

तसा आदेश देण्यात येईल तेव्हा, वादमित्राने प्रतिभूती सादर करणे.

[२][२क. (१) एखाद्या अज्ञान व्यक्तीच्या वतीने तिच्या वादमित्राने दावा दाखल केला असेल तेव्हा, न्यायालयास, दाव्याच्या कोणत्याही टप्प्याला, एकतर आपणहून किंवा कोणत्याही प्रतिवादीच्या अर्जावरून आणि कारणे नमूद करून, प्रतिवादीला आलेला किंवा येण्याचा संभव असेल तो सर्व खर्च दिला जावा यासाठी प्रतिभूती देण्याबाबत वादमित्रास आदेश देता येईल.

(२) असा दावा एखाद्या निर्धन व्यक्तीने दाखल केला असेल तेव्हा, प्रतिभूतीमध्ये शासनाला प्रदेय असलेल्या न्यायालय फीचा समावेश असेल.

(३) न्यायालय, या नियमान्वये, प्रतिभूती सादर करावयास सांगणारा आदेश देईल तेव्हा, पंचविसाव्या आदेशातील नियम २ चे उपबंध शक्य असेल तेथवर, दाव्यास लागू होतील].

न्यायालयाला खर्चाकरिता प्रतिभूती देण्यासाठी वादमित्राला माग पाडता येईल.

[१][२क. (१) एखाद्या अज्ञान व्यक्तीच्या वतीने तिच्या वादमित्राने दाखल केलेला दावा अयोग्य रीतीने किंवा अवाजवीपणे दाखल केला असल्याचे न्यायालयास दाव्याच्या कोणत्याही टप्प्यात आढळून येईल तेव्हा न्यायालयास, एकतर आपणहून किंवा कोणत्याही प्रतिवादीच्या अर्जावरून प्रतिवादीला आलेला किंवा येण्याचा संभव असेल तो सर्व खर्च दिला जावा यासाठी प्रतिभूती देण्याबाबत वादमित्रास आदेश देता येईल.

असा दावा निर्धन व्यक्ती म्हणून दाखल करण्यात आला असेल तेव्हा, प्रतिभूतीमध्ये शासनाला प्रदेय असलेल्या न्यायालय फीचा समावेश असेल.

(२) न्यायालय, या नियमान्वये, प्रतिभूती सादर करावयास सांगणारा आदेश देईल तेव्हा, पंचविसाव्या आदेशातील नियम २ चे उपबंध दाव्यास लागू होतील.

दाव्यामध्ये अज्ञान प्रतिवादीकरिता न्यायालयाने दाव्यापुरता पालक नियुक्त करणे.

३. (१) प्रतिवादी अज्ञान व्यक्ती असेल त्याबाबतीत, तिच्या अज्ञानतेबद्दल खात्री पटल्यानंतर न्यायालयाने, अशा अज्ञान व्यक्तीचा दाव्यापुरता पालक म्हणून योग्य व्यक्तीला नेमले पाहिजे.

(२) दाव्यापुरता पालक म्हणून नेमणूक करण्यासंबंधीचा आदेश अज्ञान व्यक्तीच्या नावाने आणि तिच्या वतीने किंवा वादीकडून अर्ज करण्यात आल्यानंतर मिळवता येईल.

दाव्यामध्ये अज्ञान प्रतिवादीकरिता न्यायालयाने दाव्यापुरता पालक नियुक्त करणे.

३. (१) प्रतिवादी अज्ञान व्यक्ती असेल त्याबाबतीत, तिच्या अज्ञानतेबद्दल खात्री पटल्यानंतर, न्यायालयाने अशा अज्ञान व्यक्तीचा दाव्यापुरता पालक म्हणून योग्य व्यक्तीला नेमले पाहिजे.

(२) दाव्यापुरता पालक म्हणून नेमणूक करण्यासंबंधीचा आदेश अज्ञान व्यक्तीच्या नावाने आणि तिच्या वतीने किंवा वादीकडून अर्ज करण्यात आल्यानंतर मिळवता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७९ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७९ (एक) द्वारे समाविष्ट केले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ९० द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(३) प्रस्तावित पालकाचा दाव्यामधील वादग्रस्त बाबींमध्ये अज्ञान व्यक्तींच्या हितसंबंधास प्रतिकूल अशा प्रकारचा कोणताही हितसंबध नाही व अशाप्रकारे नेमणूक होण्यास ती योग्य व्यक्ती आहे ही गोष्ट सत्यापित करणाऱ्या शपथपत्राद्वारे अशा अर्जाला पुष्टी द्यावी लागेल.

(४) या नियमाखाली कोणत्याही अर्जाच्या संबंधात, आदेश काढावयाचा झाल्यास, [१]* * * अज्ञान व्यक्तीचा पालक म्हणून नेमणूक करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने त्याप्रमाणे नेमलेल्या किंवा घोषित केलेल्या कोणत्याही पालकास नोटीस दिल्यावाचून अथवा असा कोणताही पालक नसल्यास, अज्ञान व्यक्तीच्या [२][वडिलाला किंवा वडिल नसेल तर आईला किंवा आई वा वडिल नसतील तर अन्य नैसर्गिक पालकास], अथवा, [३][आई, वडिल वा अन्य नैसर्गिक पालक] नसेल तर, अज्ञान व्यक्ती ज्या व्यक्तीच्या छत्राखाली असेल त्या व्यक्तीस नोटीस दिल्यावाचून, आणि या पोटनियमाखाली नोटीस देण्यात आलेल्या व्यक्तीच्यावतीने कोणतीही हरकत घेण्यात येईल ती ऐकून घेतल्याखेरीज, तसा आदेश काढण्यात येणार नाही.

[४][(४क) एखाद्या प्रकरणी स्वतःला योग्य वाटले तर, न्यायालयास, पोट-नियम (४) खाली अज्ञान व्यक्तीवर सुद्धा नोटीस काढता येईल.]

[५][(५) पोटनियम (१) खाली अज्ञान व्यक्तीचा दाव्यापुरता पालक म्हणून नेमलेली व्यक्ती, सेवानिवृत्ती, बडतर्फी किंवा मृत्यू यामुळे तिची नियुक्ती संपुष्टात आली नाही तर एरव्ही, कोणत्याही अपीलीय किंवा पुनरीक्षण न्यायालयातील सर्व कार्यवाही आणि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीतील कोणतीही कार्यवाही, यासुद्धा दाव्यामधून उद्भवणारी संपूर्ण कार्यवाही चालू असेपावेतो असा पालक म्हणून राहील.]

(३) प्रस्तावित पालकाचा दाव्यामधील वादग्रस्त बाबींमध्ये अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधाल प्रतिकूल अशाप्रकारचा कोणताही हितसंबंध नाही, व अशाप्रकारे नेमणूक होण्यास ती योग्य व्यक्ती आहे ही गोष्ट सत्यापित करणाऱ्या शपथपत्राद्वारे अशा अर्जाला पुष्टी द्यावी लागेल.

[१][(४) या नियमाखाली कोणत्याही अर्जाच्या संबंधात, आदेश काढावयाचा झाल्यास, अज्ञान व्यक्ती १४ वर्षांपेक्षा जास्त वयाची असल्यास अज्ञान व्यक्तीस आणि अज्ञान व्यक्तीचा पालक म्हणून नेमणूक करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने त्याप्रमाणे नेमलेल्या किंवा घोषित केलेल्या कोणत्याही पालकास नोटीस दिल्यावाचून अथवा असा कोणताही पालक नसल्यास, अज्ञान व्यक्तीच्या वडिलाला किंवा वडिल नसेल तर अन्य नैसर्गिक पालकास, अथवा वडिल वा अन्य नैसर्गिक पालक नसेल तर अज्ञान व्यक्ती ज्या व्यक्तीच्या छत्राखाली असेल त्या व्यक्तीस नोटीस दिल्यावाचून, आणि या पोटनियमाखाली नोटीस देण्यात आलेल्या व्यक्तीच्यावतीने कोणतीही हरकत घेण्यात येईल ती ऐकून घेतल्याखेरीज, तसा आदेश काढण्यात येणार नाही.]

[२][(४क) एखाद्या प्रकरणी स्वतःला योग्य वाटले तर, न्यायालयास, पोटनियम (४) खाली अज्ञान व्यक्तीवर सुद्धा नोटीस काढता येईल.]

[३][(५) पोटनियम (१) खाली अज्ञान व्यक्तीचा दाव्यापुरता पालक म्हणून नेमलेली व्यक्ती, सेवानिवृत्ती, बडतर्फी किंवा मृत्यू यामुळे तिची नियुक्ती संपुष्टात आली नाही तर एरव्ही, कोणत्याही अपीलीय किंवा पुनरीक्षण न्यायालयातील सर्व कार्यवाही आणि हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीतील कोणतीही कार्यवाही यासुद्धा दाव्यामधून उद्भवणारी संपूर्ण कार्यवाही चालू असेपावेतो असा पालक म्हणून राहील.]

अज्ञान व्यक्तीच्या विरुद्ध काढलेला हुकूमनामा तिच्या हितसंबंधास बाध आल्याखेरीज रद्द न ठरवणे.

[४][३क. (१) अज्ञान व्यक्तीविरुद्ध काढलेला कोणताही हुकूमनामा अज्ञान व्यक्तीच्या वादमित्राचा किंवा दाव्यापुरत्या पालकाचा दाव्याच्या विषयवस्तूत अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधाला प्रतिकूल असा हितसंबंध होता एवढ्याच केवळ कारणावरून रद्द ठरवण्यात येणार नाही, परंतु वादमित्राचा किंवा दाव्यापुरत्या पालकाच्या अशा प्रतिकूल हितसंबंधामुळे अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधास बाध आला आहे ही वस्तुस्थिती हुकूमनामा रद्द ठरवण्याचे आधारकारण होईल.

(२) वादमित्राच्या किंवा दाव्यापुरत्या पालकाच्या गैरवर्तनामुळे किंवा अक्षम्य हयगयीमुळे अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधास बाध आल्याकारणाने, कोणत्याही कायद्याअन्वये उपलब्ध असलेला कोणताही अनुतोष मिळण्यास अज्ञान व्यक्तीला या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ७९ (तीन) (क) (एक) द्वारे "त्या अज्ञान व्यक्तीला आणि " हे शब्द वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७९ (तीन) (क) (दोन) द्वारे विवक्षित शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७९ (तीन) (क) (तीन) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ७९ (तीन) (ख) द्वारे दाखल करण्यात आले.

५. सन १९३७ चा अधिनियम १६, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

६. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७९, (चार) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६ च्या खंड ९१ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४ कलम ७९ (तीन) (ख) द्वारे दाखल करण्यात आले.

३. सन १९३७ चा अधिनियम १६, कलम २ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

वादमित्र म्हणून कोण काम चालवू शकेल किंवा दाव्यापुरता पालक म्हणून कोण नेमला जाऊ शकेल.

४. (१) जी व्यक्ती निकोप मनाची असून सज्ञान झाली असेल अशी कोणतीही व्यक्ती, अज्ञान व्यक्तीची वादमित्र म्हणून किंवा तिचा दाव्यापुरता पालक म्हणून काम चालवू शकेल :

परंतु, अशा व्यक्तीचा हितसंबंध हा अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधास प्रतिकूल असता कामा नये आणि ती वादमित्र असल्यास ती प्रतिवादी नसावी, किंवा, ती दाव्यापुरता पालक असल्यास ती वादी नसावी.

(२) अज्ञान व्यक्तीच्या बाबतीत, सक्षम प्राधिकरणाने एखादा पालक नियुक्त किंवा घोषित केला असेल तर, अशा पालकाखेरीज अन्य कोणत्याही व्यक्तीला अज्ञान व्यक्तीचा वादमित्र म्हणून काम चालवता येणार नाही किंवा त्या दाव्यापुरता पालक म्हणून तिची नेमणूक होऊ शकणार नाही—मात्र अज्ञान व्यक्तीच्या कल्याणाकरिता अशा दुसऱ्या व्यक्तीला काम चालवण्याची किंवा, प्रकरणपरत्वे, तिची अशी नेमणूक करण्याची परवानगी द्यावी असे न्यायालयास वाटले तर त्याला, कारणे नमूद करून, तसे करता येईल.

(३) कोणत्याही व्यक्तीला, तिच्या [१][लेखी] संमतीखेरीज दाव्यापुरता पालक म्हणून नेमता येणार नाही.

(४) दाव्यापुरता पालक म्हणून काम चालवण्यासाठी अन्य कोणतीही व्यक्ती योग्य किंवा तयार नसल्यास, न्यायालयास, आपल्या अधिकाऱ्यांपैकी कोणासही असा पालक म्हणून नेमता येईल, आणि असा पालक म्हणून आपली कर्तव्ये पार पाडताना अशा अधिकाऱ्याला जो खर्च येईल तो दाव्यातील पक्षकारांनी किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकाने किंवा अनेकांनी सोसावा अथवा ज्या निधीमध्ये अज्ञान व्यक्तीचा हितसंबंध असेल अशा न्यायालयातील कोणत्याही निधीमधून [२][किंवा अज्ञान व्यक्तीच्या मालमत्तेतून] करण्यात यावा असा निदेश देता येईल, आणि त्या प्रकरणी न्यायाच्या दृष्टीने व परिस्थितीनुसार आवश्यक असेल असा खर्च भरून देण्याचा किंवा मंजूर करण्याचा निदेश देता येईल.

वादमित्राने किंवा दाव्यापुरत्या पालकाने अज्ञान व्यक्तीचे प्रतिनिधित्व करणे.

५. (१) नियम १०, पोटनियम (२) खालील अर्जाव्यतिरिक्त अज्ञान व्यक्तीच्या वतीने न्यायालयाकडे करावयाचा प्रत्येक अर्ज, तिच्या वादमित्राने किंवा दाव्यापुरत्या नेमलेल्या पालकाने केला पाहिजे.

(२) ज्यामध्ये अज्ञान व्यक्ती कोणत्याही प्रकारे संबंधित असेल अथवा ज्यामुळे तिच्यावर परिणाम होणार असेल असा न्यायालयापुढे असलेला प्रत्येक दावा किंवा अर्ज यामध्ये वादमित्र किंवा, प्रकरणपरत्वे, दाव्यापुरता पालक यांच्यामार्फत अज्ञान व्यक्तीचे प्रतिनिधित्व झालेले नसताना, काढण्यात आलेला प्रत्येक आदेश रद्द करता येईल, आणि ज्या पक्षकाराच्या विनंतीवरून असा आदेश मिळवण्यात आला होता त्याच्या प्लीडरला अशी व्यक्ती अज्ञान असण्याची वस्तुस्थिती ज्ञात असेल किंवा वाजवीरीत्या ज्ञात होऊ शकली असती असे असल्यास, अशा प्लीडरने तो खर्च द्यावा असाही हुकूम त्याबरोबर देता येईल.

अज्ञान व्यक्तीच्या बाजूने काढलेल्या हुकूमनाम्यानुसार वादमित्राने किंवा दाव्यापुरत्या पालकाने मालमत्ता स्वीकारणे.

६. (१) वादमित्राला किंवा दाव्यापुरत्या पालकाला न्यायालयाच्या परवानगीखेरीज,—

(क) हुकूमनामा किंवा आदेश काढण्यात येण्यापूर्वी तडजोड म्हणून, किंवा

(ख) अज्ञान व्यक्तीच्या बाजूने काढलेला हुकूमनामा किंवा आदेश याअन्वये

अज्ञान व्यक्तीच्या वतीने कोणतीही रक्कम किंवा अन्य जंगम मालमत्ता स्वीकारता येणार नाही.

(२) वादमित्रास किंवा दाव्यापुरत्या पालकास सक्षम प्राधिकरणाने अज्ञान व्यक्तीच्या मालमत्तेचा पालक म्हणून नेमले नसेल किंवा घोषित केले नसेल, अथवा अशी नेमणूक किंवा घोषणा करण्यात आली असूनही, ती रक्कम किंवा अन्य जंगम मालमत्ता स्वीकारण्यास तो असमर्थ असल्याचे न्यायालयाला माहीत असेल तेव्हा, ती मालमत्ता स्वीकारण्यास न्यायालयाने त्यास परवानगी दिली तर, त्याच्या मते ज्यायोगे मालमत्तेचा अपक्षय होण्यापासून पुरेसे संरक्षण होईल आणि निश्चितपणे तिचा योग्यप्रकारे विनियोग होईल अशा प्रकारची प्रतिभूती मागविली पाहिजे आणि तशा प्रकारचे निदेश दिले पाहिजेत :

[३][परंतु, वादमित्र किंवा दाव्यातील पालक हा—

(क) हिंदू अविभक्त कुटुंबाचा कर्ता असेल आणि हुकूमनामा किंवा आदेश हा त्या कुटुंबाच्या मालमत्तेशी किंवा धंद्याशी संबंधित असेल तेव्हा; किंवा

(ख) अज्ञान व्यक्तीची माता वा पिता असेल तेव्हा,

हुकूमनामा किंवा आदेश याअन्वये रक्कम किंवा अन्य जंगम मालमत्ता स्वीकारण्यासाठी अशा वादमित्रास किंवा पालकास परवानगी देताना, न्यायालयास, कारणे नमूद करून, अशा प्रतिभूतीशिवाय भागवता येईल.]

वादमित्र किंवा दाव्यातील पालक यांच्याकडून करार किंवा तडजोड.

७. (१) कोणत्याही वादमित्राला किंवा दाव्यातील पालकाला, न्यायालयाची परवानगी कामकाजवृत्तात स्पष्टपणे नमूद केलेली असल्याखेरीज, तो ज्या दाव्यामध्ये असा वादमित्र किंवा पालक म्हणून काम चालवत असेल त्या दाव्याच्या संदर्भात, अज्ञान व्यक्तीच्या वतीने कोणताही करार किंवा तडजोड करता येणार नाही.

[४][(१क) पोटनियम (१) खाली परवानगीसाठी करावयाच्या अर्जासोबत, प्रस्तावित करार किंवा तडजोड ही, आपल्या मते, अज्ञान व्यक्तीच्या फायद्यासाठी आहे अशा अर्थाचे वादमित्राचे किंवा, प्रकरणपरत्वे, दाव्यातील पालकाचे शपथपत्र आणि जर एखाद्या प्लीडरमार्फत अज्ञान व्यक्तीचे प्रतिनिधित्व करण्यात येत असेल तर, अशा प्लीडरचेही तशाच अर्थाचे प्रमाणपत्र जोडावे लागेल :

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७९ (पाच) (क) द्वारे समाविष्ट केले.
२. वरील अधिनियमाच्या कलम ७९ (पाच) (ख) द्वारे समाविष्ट केले.
३. वरील अधिनियमाच्या कलम ७९ (सहा) द्वारे जादा दाखल केले.
४. वरील अधिनियमाच्या कलम ७९ (सात) द्वारे समाविष्ट केले.

परंतु, शपथपत्रात वा प्रमाणपत्रात अशा प्रकारचे मत व्यक्त करण्यात आल्यास प्रस्तावित करार किंवा तडजोड ही अज्ञान व्यक्तीच्या फायद्यासाठी आहे किंवा नाही याची तपासणी करण्यास न्यायालयास प्रतिबंध होणार नाही.]

(२) न्यायालयाची अशी परवानगी नमूद केलेली नसताना, केलेला कोणताही करार किंवा तडजोड, अज्ञान व्यक्तीखेरीज सर्व पक्षकारांच्या बाबतीत शून्यकरणीय असेल.

वादमित्राची निवृत्ती.

८. (१) न्यायालयाने अन्यथा आदेश दिला नसेल तर एरव्ही, वादमित्राने आपल्या जागी योग्य व्यक्ती उपलब्ध करून दिल्याखेरीज आणि अगोदरच आलेल्या खर्चाबद्दल प्रतिभूती दिल्याखेरीज त्याला निवृत्त होता येणार नाही.

(२) नवीन वादमित्राच्या नेमणुकीसाठी करावयाच्या अर्जाला, प्रस्तावित व्यक्ती पात्र आहे आणि अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधास प्रतिकूल असा तिचा हितसंबंध नाही हे दर्शवणाऱ्या शपथपत्राद्वारे पुष्टी द्यावी लागेल.

वादमित्राला काढून टाकणे.

९. (१) अज्ञान व्यक्तीच्या वादमित्राचा हितसंबंध अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधास प्रतिकूल असेल तर, अथवा ज्याचा हितसंबंध अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधास प्रतिकूल आहे अशा प्रतिवादीशी त्याची इतकी घनिष्टता आहे की, त्यामुळे अज्ञान व्यक्तीच्या हितसंबंधाचे रक्षण योग्यप्रकारे होणे असंभवनीय आहे असे असेल तर, अथवा तो आपले कर्तव्य पार पाडीत नसेल तर, अथवा त्याने दावा प्रलंबित असताना [१][भारतात] राहण्याचे सोडून दिले असेल तर, किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव त्याला काढून टाकण्याकरिता अज्ञान व्यक्तीच्या वतीने किंवा प्रतिवादीला अर्ज करता येईल; आणि दाखवलेले कारण पुरेसे असल्याबद्दल न्यायालयाची खात्री पटल्यास, त्यास त्यानुसार वादमित्राला काढून टाकण्याचा आदेश देता येईल आणि स्वतःस योग्य वाटेल त्याप्रमाणे खर्चासंबंधी अन्य आदेश देता येईल.

(२) जेव्हा वादमित्र हा त्याबाबत सक्षम असलेल्या प्राधिकरणाने नेमलेला किंवा घोषित केलेला पालक नसेल आणि अशा प्रकारे नेमलेल्या किंवा घोषित केलेल्या ज्या पालकास वादमित्राच्या जागी आपली नेमणूक व्हावी अशी इच्छा असेल त्या पालकाने अर्ज केला असेल तेव्हा, न्यायालयाने वादमित्रास काढून टाकले पाहिजे, आणि त्यानंतर दाव्यामध्ये अगोदरच आलेल्या खर्चाच्या संबंधात स्वतःस योग्य वाटतील अशा अटी घालून, न्यायालयाने स्वतः त्याच्या जागी वादमित्र म्हणून अर्जदाराची नेमणूक केली पाहिजे—मात्र पालकास अज्ञान व्यक्तीचा वादमित्र म्हणून नेमण्यात येऊ नये असे न्यायालयास वाटत असेल तर, त्याची कारणे त्याला नमूद करावी लागतील.

वादमित्राला काढून टाकणे, इत्यादी, नंतर कार्यवाही स्थगित करणे.

१०. (१) अज्ञान व्यक्तीचा वादमित्र निवृत्त झाल्यानंतर, त्याला काढून टाकण्यात आल्यानंतर किंवा त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या जागी दुसऱ्या वादमित्राची नेमणूक होईपर्यंत पुढील कार्यवाही स्थगित करण्यात येईल.

(२) अशा अज्ञान व्यक्तीच्या प्लीडरने नवीन वादमित्राची नेमणूक वाजवी मुदतीत करण्याकरिता उपाययोजना केली नाही तर, अज्ञान व्यक्तीमध्ये किंवा वादमुद्द्यामध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, एखाद्या वादमित्राची नेमणूक व्हावी यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल, आणि न्यायालयास स्वतःला योग्य वाटेल अशा व्यक्तीला नेमता येईल.

दाव्यापुरता पालक निवृत्त होणे, त्याला काढून टाकणे किंवा त्याचा मृत्यू होणे.

११. (१) दाव्यापुरता पालक निवृत्त होऊ इच्छीत असेल, किंवा तो आपले कर्तव्य पार पाडत नसेल किंवा अन्य पुरेसे कारण दाखवून देण्यात आले तर, न्यायालयास अशा पालकास निवृत्त होण्याची परवानगी देता येईल किंवा त्याला काढून टाकता येईल, आणि खर्चाच्या संबंधात स्वतःला योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(२) दावा प्रलंबित असताना दाव्यापुरता पालक निवृत्त झाला किंवा मृत्यू पावला किंवा न्यायालयाने त्याला काढून टाकले असेल तर त्याबाबतीत, न्यायालयाने त्याच्या जागी नवीन पालकास नेमले पाहिजे.

अज्ञान वादी किंवा अर्जदार सज्ञान झाल्यानंतर त्याने अनुसरावयाची कार्यपद्धती.

१२. (१) अज्ञान वादी किंवा जिच्यावतीने केलेला अर्ज प्रलंबित असेल अशी दाव्यामध्ये पक्षकार नसलेली अज्ञान व्यक्ती सज्ञान झाल्यावर, त्या व्यक्तीने आपण दावा किंवा अर्जाविरील कार्यवाही पुढे चालू ठेवावयाची किंवा कसे याचा निर्णय केला पाहिजे.

(२) त्याने दावा किंवा अर्जाची कार्यवाही चालू ठेवण्याचा निर्णय घेतला तर त्याबाबतीत, वादमित्राला मुक्त करणारा आदेश मिळवण्याकरिता व स्वतःच्या नावाने कार्यवाही चालू ठेवण्याची परवानगी मिळवण्याकरिता त्याला अर्ज करावा लागेल.

(३) अशा प्रकरणी दाव्याचे किंवा अर्जाचे शीर्षक पुढीलप्रकारे सुधारण्यात येईल:—

"अगदी अलिकडे पर्यंत अज्ञान असल्याने आपला वादमित्र ग. घ. याच्यामार्फत काम चालवणारा, परंतु आता सज्ञान झालेला क. ख."

---

१. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ३, द्वारे "राज्यात" याऐवजी दाखल करण्यात आला

(४) त्याने दावा किंवा अर्जाची कार्यवाही सोडून देण्याचा निर्णय केला असेल तेव्हा, तो जर एकमेव वादी किंवा अर्जदार असेल तर, प्रतिवादी किंवा विरुद्ध पक्षकार यांना आलेल्या किंवा त्याच्या वादमित्राने दिलेल्या अशा खर्चाच्या रकमा फेडल्यानंतर दावा किंवा अर्ज फेटाळणारा आदेश मिळावा यासाठी त्याने अर्ज केला पाहिजे.

(५) या नियमाखालील कोणताही अर्ज एकतर्फी करता येईल. परंतु, वादमित्राला मुक्त करणारा आणि अज्ञान वादीला स्वत:च्या नावे दावा किंवा अर्ज पुढे चालवण्यास परवानगी देणारा कोणताही आदेश वादमित्राला नोटीस दिल्याखेरीज काढता येणार नाही.

अज्ञान सहवादी सज्ञान झाल्यावर दावा प्रत्यादिष्ट करू इच्छित असेल ती बाब.

१३. (१) अज्ञान सहवादी सज्ञान झाल्यानंतर दावा प्रत्यादीष्ट करू इच्छीत असेल त्याबाबतीत, त्याने सहवादी म्हणून आपले नाव काढून टाकण्यात यावे असा अर्ज केला पाहिजे, आणि तो आवश्यक पक्षकार नाही असे न्यायालयास आढळून आले तर, खर्चासंबंधी किंवा अन्यथा स्वत:स योग्य वाटेल अशा अटींवर त्याने त्याला काढून टाकले पाहिजे.

(२) त्या अर्जाची नोटीस वादमित्रावर, कोणत्याही सहवादीवर आणि प्रतिवादीवर बजावण्यात येईल.

(३) अशा अर्जाच्या संबंधातील सर्व पक्षकारांचा आणि दाव्यामध्ये तेव्हापावेतो झालेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही कार्यवाहीचा खर्च न्यायालय निदेश देईल अशा व्यक्तीने दिला पाहिजे.

(४) अर्जदार हा दाव्यातील आवश्यक पक्षकार असेल त्याबाबतीत, न्यायालयास, त्याला प्रतिवादी करून घेण्याचा निदेश देता येईल.

गैरवाजवी किंवा अयोग्य दावा.

१४. (१) अज्ञान व्यक्ती सज्ञान झाल्यावर, ती एकमेव वादी असल्यास, तिला तिच्या वादमित्राने तिच्या नावाने सुरू केलेला दावा गैरवाजवी व अयोग्य असल्यामुळे तो फेटाळण्यात यावा असा अर्ज करता येईल.

(२) त्या अर्जाची नोटीस सर्व संबंधित पक्षकारांवर बजावली पाहिजे आणि अशा गैरवाजवीपणाबाबत किंवा अयोग्यपणाबद्दल न्यायालयाची खात्री पटल्यानंतर, त्यास अर्ज मंजूर करता येईल व अर्जाच्या संबंधात सर्व पक्षकारांना आलेला व दाव्यामध्ये केलेल्या कोणत्याही गोष्टीचा खर्च देण्याविषयी वादमित्राला आदेश देता येईल, किंवा स्वत:ला योग्य वाटेल असा अन्य आदेश काढता येईल.

नियम १ ते १४ (नियम २क खेरीज करून) विकल मनाच्या व्यक्तींना लागू असणे.

[१][१५. नियम १ ते १४ (नियम २क खेरीजकरून) हे, दावा सुरू होण्यापूर्वी किंवा प्रलंबित असताना मनोविकल व्यक्ती म्हणून अभिनिर्णीत केलेल्या व्यक्तींना शक्य तेथवर लागू होतील आणि याप्रमाणे अभिनिर्णीत केले नसले तरी, ज्या व्यक्ती दावा लावताना किंवा स्वत: विरुद्ध दावा लावला गेला असताना आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यास असमर्थ आहेत असे न्यायालयास चौकशीअंती आढळून येईल त्यांनाही ते लागू होतील.]

व्यावृत्ती.

[२][१६. (१) एखाद्या परकीय राज्याचा जो अधिपती आपल्या राज्याच्या नावे दावा लावील अथवा त्या नावावर ज्याच्याविरुद्ध दावा लावण्यात येईल, अगर ज्याच्याविरुद्ध केंद्र शासनाच्या निदेशानुसार एखाद्या प्रतिनिधीच्या नावावर किंवा अन्य कोणत्याही नावावर दावा लावण्यात येईल त्या-अधिपतीला या आदेशात असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

(२) अज्ञान व्यक्तींनी किंवा त्यांच्याविरुद्ध अथवा वेडया व्यक्तींनी किंवा त्यांच्या विरुद्ध अथवा अन्य मनोविकल व्यक्तींनी किंवा त्यांच्याविरुद्ध लावलेले दावे यासंबंधी त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही स्थानिक कायद्याच्या उपबंधांवर या आदेशात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम होतो किंवा तीमुळे त्याचे न्यूनीकरण होते असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.]

[३][आदेश बत्तिसावा—क

कुटुंबविषयक बाबींशी संबंधित असलेले दावे

आदेश लागू असणे.

१. (१) या आदेशाचे उपबंध, कुटुंबविषयक बाबींशी संबंधित असलेल्या दाव्यांना किंवा कार्यवाहींना लागू होतील.

(२) विशेषत: आणि पोटनियम (१) मधील उपबंधांच्या सर्वसाधारणतेस बाध न येऊ देता, या आदेशाचे उपबंध, कुटुंबांसंबंधीच्या पुढील दाव्यांना किंवा कार्यवाहींना लागू होतील :—

(क) कोणत्याही व्यक्तीच्या विवाहाची विधिग्राह्यता किंवा तिची विवाहविषयक स्थिती यांच्या बाबतीतील घोषणेसाठी केलेला दावा किंवा कार्यवाही धरून, विवाहविषयक अनुतोषासाठी केलेला दावा किंवा कार्यवाही;

(ख) कोणत्याही व्यक्तीच्या औरसतेविषयक घोषणेसाठी केलेला दावा किंवा कार्यवाही;

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ७९ (आठ) द्वारे मूळ नियमाऐवजी दाखल केले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ७९ (नऊ) अन्वये हा आदेश समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८० अन्वये समाविष्ट केले.

(ग) कोणत्याही व्यक्तीचे पालकत्व किंवा कुटुंबातील कोणत्याही अज्ञान व्यक्तीची किंवा अन्य निःसमर्थ व्यक्तीची अभिरक्षा यांच्या संबंधात केलेला दावा किंवा कार्यवाही;

(घ) निर्वाहासाठी केलेला दावा किंवा कार्यवाही;

(ङ) दत्तकग्रहणाची विधिग्राह्यता किंवा त्याचा परिणाम यांच्या बाबतीत केलेला दावा किंवा कार्यवाही;

(च) मृत्युपत्रे, विनामृत्युपत्रता व उत्तराधिकार यांसंबंधी कुटुंबातील व्यक्तीने दाखल केलेला दावा किंवा कार्यवाही;

(छ) ज्या कोणत्याही कुटुंबविषयक बाबीच्या संबंधात पक्षकारांना त्यांचा व्यक्तिगत कायदा लागू होत असेल, अशा कोणत्याही अन्य बाबीच्या संबंधात केलेला दावा किंवा कार्यवाही.

(३) कोणत्याही दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या संबंधातील एखाद्या विशेष कायद्याद्वारे उपबंधित करण्यात आलेल्या बाबीशी या आदेशाच्या जेवढ्या भागाचा संबंध येत असेल, तेवढा भाग त्या दाव्यास किंवा कार्यवाहीस लागू होणार नाही.

कार्यवाही कक्षांतर्गत चालवणे.

२. हा आदेश लागू होणाऱ्या प्रत्येक दाव्यामध्ये किंवा कार्यवाहीमध्ये, न्यायालयाची तशी इच्छा असल्यास, कार्यवाही कक्षातर्गत चालविता येईल आणि दोन पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराची तशी इच्छा असल्यास, अशी कार्यवाही त्याप्रमाणे चालविली पाहिजे.

समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न करणे हे न्यायालयाचे कर्तव्य.

३. (१) हा आदेश लागू होणाऱ्या प्रत्येक दाव्यात किंवा कार्यवाहीत, न्यायालय, प्रकरणाचे स्वरूप आणि परिस्थिती यांच्याशी सुसंगत ठरेल अशा रीतीने दाव्याच्या विषयवस्तूच्या संबंधात समझोता घडवून आणण्याच्या कामी पक्षकारांना सहाय्य करणे, जेथे शक्य असेल तेथे असा समझोता घडवून आणण्यासाठी सहाय्य करण्याचा प्रथमतः प्रयत्न करील.

(२) अशा कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत, त्यामधील पक्षकारांमध्ये समझोता घडून येण्याची वाजवी शक्यता आहे असे त्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर न्यायालयास दिसून येईल तर, असा समझोता घडवून आणण्यासाठी प्रयत्न करता यावेत म्हणून, न्यायालय, त्यास योग्य वाटेल अशा कालावधीसाठी अशी कार्यवाही स्थगित करू शकेल.

(३) पोटनियम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेली शक्ती ही, कार्यवाही स्थगित करण्याच्या संबंधात न्यायालयास असलेल्या अन्य कोणत्याही शक्तीव्यतिरिक्त आणखी शक्ती म्हणून असेल आणि त्यामुळे अशा शक्तीचे न्यूनीकरण होणार नाही.

कल्याण कार्यविषयक तज्ञांचे सहाय्य.

४. हा आदेश लागू होणाऱ्या प्रत्येक दाव्यात किंवा कार्यवाहीत, या आदेशाच्या नियम ३ अन्वये सोपवण्यात आलेली कर्तव्ये पार पाडताना, न्यायालयास सहाय्य करण्याच्या प्रयोजनासाठी, न्यायालयास, त्यास योग्य वाटेल अशा, कुटुंब कल्याणाच्या संवर्धनाचे काम व्यवसाय म्हणून करणारी व्यक्ती धरून कोणत्याही व्यक्तीची सेवा (विशेषतः उपलब्ध होईल तेथे एखाद्या स्त्रीची सेवा) मिळवण्याची मुभा राहील— मग अशी व्यक्ती पक्षकारांच्या नात्यातील असो वा नसो.

तथ्यांबाबत चौकशी करण्याचे कर्तव्य.

५. हा आदेश लागू होणाऱ्या प्रत्येक दाव्यात किंवा कार्यवाहीत, वादीने अभिकथित केलेली तथ्ये आणि प्रतिवादीने अभिकथित केलेली कोणतीही तथ्ये यांची वाजवीरीत्या शक्य होईल तेथवर, चौकशी करणे हे न्यायालयाचे कर्तव्य असेल.

"कुटुंब" या शब्दाचा अर्थ.

६. या आदेशांच्या प्रयोजनार्थ, पुढील व्यक्तींपैकी प्रत्येक व्यक्ती मिळून कुटुंब होते असे मानण्यात येईल, त्या व्यक्ती म्हणजे :—

(क) (एक) एखादा पुरुष आणि त्याच्याबरोबर एकत्र राहणारी त्याची पत्नी,

(दोन) त्या दोघांची संतती म्हणून किंवा त्या पुरुषाची किंवा त्या पत्नीची संतती म्हणून असणारे कोणतेही मूल किंवा मुले,

(तीन) असा पुरुष आणि पत्नी ज्याचे पालनपोषण करीत असतील असे कोणतेही मूल किंवा अशी मुले,

(ख) पत्नी नसलेला किंवा आपल्या पत्नीबरोबर एकत्र राहत नसलेला पुरुष, त्याची संतती म्हणून असणारे कोणतेही मूल किंवा मुले, आणि तो ज्याचे पालनपोषण करीत असेल असे कोणतेही मूल किंवा मुले,

(ग) पती नसलेली किंवा आपल्या पतीबरोबर एकत्र राहत नसलेली स्त्री, तिची संतती म्हणून असणारे कोणतेही मूल किंवा मुले आणि ती ज्याचे पालनपोषण करीत असेल असे कोणतेही मूल किंवा मुले,

(घ) एखादा पुरुष किंवा स्त्री आणि त्याच्याबरोबर किंवा तिच्याबरोबर राहणारा त्याचा किंवा तिचा भाऊ, बहीण, पूर्वज किंवा रेषीय वंशज ; आणि

(ङ) या नियमाचा खंड (क), खंड (ख), खंड (ग) किंवा खंड (घ) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गटांपैकी कोणत्याही एका किंवा अनेक गटांचा कोणताही संयोग.

स्पष्टीकरण :—शंकानिरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, नियम ६ मधील उपबंधामुळे कोणत्याही व्यक्तिगत कायद्यातील किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यातील "कुटुंबाच्या" संकल्पनेस कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही.]

आदेश तेहतिसावा

[1][निर्धन व्यक्तींकडून दावे]

निर्धन व्यक्ती म्हणून दावे दाखल करता येतील.

१. पुढील उपबंधांच्या अधीनतेने, एखाद्या [2][निर्धन व्यक्तीस] कोणताही दावा दाखल करता येईल.

[3][स्पष्टीकरण एक—एखादी व्यक्ती,—

(क) अशा दाव्यामध्ये वादपत्राकरिता कायद्याने विहित केलेली फी भरण्यास पुरेशी साधने (हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या संबंधात जप्तीपासून सूट देण्यात आलेली आहे अशा आणि दाव्याचा वादविषय असलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त) तिच्याकडे नसतील तर, किंवा

(ख) अशी फी विहित केलेली नसेल त्याबाबतीत, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या संबंधात जप्तीपासून सूट देण्यात आलेली आहे अशा आणि दाव्याचा वादविषय असलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त ती व्यक्ती एक हजार रुपयांच्या मालमत्तेस हक्कदार नसेल तर,

ती व्यक्ती निर्धन व्यक्ती होय.

निर्धन व्यक्ती म्हणून दावे दाखल करता येतील.

१. पुढील उपबंधांच्या अधीनतेने एखाद्या [2][निर्धन व्यक्तीस] कोणताही दावा दाखल करता येईल.

[3][स्पष्टीकरण एक : —एखाद्या व्यक्तीकडे एक हजार रुपये किंमतीपेक्षा अधिक किंमतीची साधने नसतील किंवा तिच्याकडे एक हजार रुपये किंमतीपेक्षा अधिक किंमतीची साधने असतील अशा बाबतीत त्या वादपत्राकरिता कायद्याने विहित केलेली फी भरण्यास ती पुरेशी नसेल तर, ती व्यक्ती निर्धन व्यक्ती समजली जाईल.

या स्पष्टीकरणाच्या प्रयोजनांसाठी एखाद्या व्यक्तीकडे असलेल्या साधनांमध्ये, हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या संबंधात जप्तीपासून सूट देण्यात आलेली आहे अशा आणि दाव्याची विषयवस्तू असलेल्या मालमत्तेचा अंतर्भाव असल्याचे मानण्यात येणार नाही.]

स्पष्टीकरण दोन :—एखाद्या व्यक्तीने निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याच्या परवानगीसाठी अर्ज केल्यानंतर आणि त्या अर्जाचा निर्णय होण्यापूर्वी संपादन केलेली कोणतीही मालमत्ता, अर्जदार निर्धन व्यक्ती आहे की नाही या प्रश्नाचा विचार करताना, विचारात घेतली जाईल.

स्पष्टीकरण तीन :—वादीने प्रतिनिधी या नात्याने दावा दाखल केल्यास, प्रतिनिधी या नात्याने त्याच्याकडे असलेल्या साधनांच्या संदर्भात, तो निर्धन आहे की नाही या प्रश्नावर निर्णय घेण्यात येईल.]

निर्धन व्यक्तीच्या साधनसंपत्तीच्या संबंधात चौकशी.

[4][१क. एखादी व्यक्ती ही निर्धन व्यक्ती आहे किंवा नाही या प्रश्नाच्या बाबतीत न्यायालयाने अन्यथा निदेश दिलेला नसेल तर, प्रथमतः न्यायालयाच्या मुख्य प्रशासी अधिकाऱ्यांकडून चौकशी करण्यात येईल, आणि अशा अधिकाऱ्याचा अभिप्राय हा स्वतःचा निष्कर्ष असल्याप्रमाणे न्यायालयास तो स्वीकारता येईल किंवा न्यायालयास स्वतः अशा प्रश्नाबाबात चौकशी करता येईल.]

---

१. १९७६ चा अधिनियम १०४ कलम ८१ (एक) अन्वये "नादारांकडून दावे" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (तीन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (चार) अन्वये समाविष्ट करण्यात आले.(१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

५. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (एक) द्वारे मूळ स्पष्टीकरणा ऐवजी दाखल केले.

अर्जातील मजकूर.

२. निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याच्या परवानगीसाठी केलेल्या प्रत्येक अर्जामध्ये दाव्यांतील वादपत्राच्या संबंधात आवश्यक असलेला तपशील समाविष्ट असला पाहिजे. अर्जदाराच्या मालकीच्या कोणत्याही स्थावर किंवा जंगम मालमत्तेची अनुसूची तिच्या अंदाजित मूल्यासह त्यास जोडली पाहिजे आणि वादकथनावर सही करण्याकरिता व त्यांची पडताळणी करण्याकरिता विहित करण्यात आलेल्या रीतीने तिच्यावर सही केली पाहिजे व तिची पडताळणी केली पाहिजे.

अर्ज सादर करणे.

३. या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, न्यायालयात हजर होण्यापासून सूट मिळालेली नसल्यास, अर्जदाराने जातीने अर्ज सादर केला पाहिजे. सूट मिळालेली असल्यास, अर्जाच्या संबंधातील सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल आणि अभिकर्त्याने प्रतिनिधित्व केलेला पक्षकार जातीने उपस्थित असता तर त्याची जशी तपासणी करण्यात आली असती, त्याच रीतीने ज्याची तपासणी करता येईल अशा अधिकृत अभिकर्त्याकडून अर्ज सादर केला जाऊ शकेल.

[१][परंतु, एकापेक्षा अधिक वादी असल्यास, वादींपैकी एकाने अर्ज सादर केल्यास ते पुरेसे होईल.]

अर्जदाराची तपासणी.

४. (१) अर्ज योग्य नमुन्यात व यथोचित रीत्या सादर करण्यात आला असल्यास, न्यायालयास, त्यास योग्य वाटल्यास, हक्कमागणीचे गुणावगुण आणि अर्जदाराची मालमत्ता यांच्या संबंधी, अर्जदाराची किंवा अभिकर्त्यामार्फत उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली असेल तर, त्याच्या अभिकर्त्याची तपासणी करता येईल.

अभिकर्त्याकडून प्रतिनिधित्व करण्यात आल्यास, अर्जदाराची तपासणी आयोगपत्राद्वारे करण्यात यावी असा आदेश न्यायालयास देता येईल.

(२) अर्ज अभिकर्त्याकडून सादर करण्यात आला असेल त्याबाबतीत, न्यायालयास, त्यास योग्य वाटल्यास, अनुपस्थित साक्षीदाराची तपासणी ज्या पद्धतीने करण्यात येते त्याच पद्धतीने आयोगपत्राद्वारे अर्जदाराची तपासणी करण्यात यावी असा आदेश देता येईल.

अर्ज फेटाळणे.

५. निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याच्या परवानगीसाठी केलेला अर्ज,—

(क) नियम २ व ३ द्वारे विहित करण्यात आलेल्या पद्धतीने तयार करण्यात किंवा सादर करण्यात आला नसेल त्याबाबतीत, किंवा

(ख) अर्जदार निर्धन व्यक्ती नसेल त्या बाबतीत, किंवा

(ग) त्याने, अर्ज सादर करण्यापूर्वी, लगतच्या दोन महिन्यांत कोणत्याही मालमत्तेची कपटाने किंवा निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याच्या परवानगीसाठी अर्ज करणे शक्य व्हावे म्हणून, विल्हेवाट लावली असेल त्याबाबतीत, किंवा

[२][परंतु, अर्जदाराने, विल्हेवाट लावलेल्या मालमत्तेचे मूल्य विचारात घेतल्यानंतरदेखील अर्जदार निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यास हक्कदार राहणार असेल तर, कोणताही अर्ज फेटाळला जाता कामा नये,]

(घ) त्यांच्या अभिकथनांमध्ये वादकारण दिसून येत नसेल त्याबाबतीत, किंवा

(ङ) प्रस्तावित दाव्याच्या विषयवस्तूच्या संदर्भात त्याने असा कोणताही करार केला असेल की, त्यामुळे अन्य कोणत्याही व्यक्तीने त्यात हितसंबंध मिळवला असेल त्याबाबतीत, [३][किंवा]

[४][(च) अर्जदाराने अर्जामध्ये केलेल्या अभिकथनांवरून त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यानुसार दाव्यास रोध होणार असेल तर, किंवा

(छ) अन्य कोणत्याही व्यक्तीने खटल्याच्या खर्चासाठी पैसे पुरविण्याचा करार तिच्याबरोबर केलेला असेल तर,]

न्यायालयाने नाकारला पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ कलम ८१ (पाच) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (सहा) (क) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (सहा) (ख) अन्वये समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

४. वरील अधिनियमाचे कलम ८१ (सहा) (ग) अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

६. अर्ज नाकारण्यासाठी नियम ५ मध्ये नमूद केलेल्या कारणांपैकी कोणतेही कारण न्यायालयास दिसून येत नसल्यास, अर्जदाराकडून तो सादर करील असा पुरावा घेण्यासाठी आणि तो नाशाबीत करण्याकरिता जो कोणताही पुरावा सादर करण्यात येईल त्याच्या सुनावणीकरिता न्यायालयाने दिवस निश्चित केला पाहिजे. (यासंबंधात विरुद्ध पक्षकाराला आणि शासकीय वकिलाला कमीतकमी दहा पूर्ण दिवसांची नोटीस दिली पाहिजे.) अर्जदाराच्या निर्धनपणाचा पुरावा घेण्याच्या दिवसाची नोटीस.

७. (१) अशाप्रकारे निश्चित केलेल्या दिवशी किंवा त्यानंतर लगेच सोयीस्कर असेल त्यावेळी न्यायालयाने प्रत्येक पक्षकाराने आणलेल्या साक्षीदारांची (तसे साक्षीदार असल्यास) तपासणी केली पाहिजे आणि त्यास अर्जदाराची किंवा त्याच्या अभिकर्त्याची तपासणी करता येईल. आणि [१][त्यांच्या पुराव्याचा संपूर्ण अभिलेख तयार केला पाहिजे]. सुनावणीची कार्यपद्धती.

[२][(१क) पोटनियम (१) खाली केलेली साक्षीदारांची तपासणी नियम ५ चे खंड (ख्), खंड (ग्) आणि खंड (घ्) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींपुरती मर्यादित असली पाहिजे. परंतु, अर्जदाराची किंवा त्यांच्या अभिकर्त्याची तपासणी नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबींशी संबंधित असू शकेल].

(२) परंतु अर्जावरून दर्शनीच आणि न्यायालयाने [३][नियम ६ खाली किंवा या नियमांखाली] घेतलेल्या पुराव्यावरून (तसा पुरावा असल्यास) अर्जदार नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रतिषेधाच्या अधीन आहे किंवा नाही हे दिसून येते की नाही याविषयीच्या प्रश्नाबाबत पक्षकारांना कोणताही युक्तिवाद करावयाचा असेल तर न्यायालयाने तो ऐकून घेतला पाहिजे.

(३) त्यानंतर न्यायालयाने अर्जदारास निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यास परवानगी दिली पाहिजे, किंवा परवानगी नाकारली पाहिजे.

८. अर्ज मंजूर करण्यात आला असेल तर, त्यास क्रमांक देऊन त्याची नोंदणी केली पाहिजे आणि तो दाव्यातील वादपत्र असल्याचे समजण्यात यावे आणि दावा नित्याच्या पद्धतीने सुरू केल्याप्रमाणे इतर सर्व बाबतीत, दाव्याचे कामकाज चालू ठेवण्यात येईल. मात्र कोणताही विनंतीअर्ज प्लीडरची नियुक्ती किंवा दाव्यासंबंधातील कोणतीही इतर कार्यवाही यांच्या खर्चाच्या संबंधात कोणतीही न्यायालय फी [४][किंवा आदेशिका बजावण्याकरिता प्रदेय असलेली फी] देण्यास वादी दायी असणार नाही. अर्ज स्वीकारल्यास त्याबद्दलची कार्यपद्धती.

९. (क्) वादी दाव्याच्या कामकाजाच्या वेळी तापदायक किंवा अयोग्य वर्तणुकीबद्दल दोषी असेल तर,
(ख्) निर्धन व्यक्ती म्हणून दावा पुढे चालवू नये अशाप्रकारची साधने त्याच्याकडे आहेत असे आढळून आले तर, किंवा
(ग्) दाव्याच्या विषयवस्तुच्या संदर्भात त्याने असा कोणताही करार केला असेल की, त्यामुळे अन्य कोणत्याही व्यक्तीने त्यात हितसंबंध मिळवला असेल तर,

प्रतिवादीने किंवा शासकीय वकिलाने केलेल्या अर्जावर, वादीला सात पूर्ण दिवसांची नोटीस देऊन. वादीला निर्धन व्यक्ती म्हणून दावा करण्यास दिलेली परवानगी मागे घेण्याचा आदेश न्यायालयास देता येईल. निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याची परवानगी मागे घेणे.

[५][९क (१) निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यास परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तीचे प्रतिनिधित्व प्लीडर करीत नसेल त्याबाबतीत, प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असेल तर, न्यायालयाने त्या व्यक्तीसाठी एखादा प्लीडर नेमून दिला पाहिजे. प्रतिनिधी नसलेल्या निर्धन व्यक्तीसाठी न्यायालयाने प्लीडर नेमून देणे.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ८१; (सात) (क्) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (सात) (ख्) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाचे कलम ८१ (सात) (ग्) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (आठ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (नऊ) अन्वये हा पोटनियम समाविष्ट करण्यात आला.

(२) उच्च न्यायालयास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने, पुढील गोष्टींसाठी उपबंध करणारे नियम करता येतील,—

(क्) पोटनियम (१) खाली नेमावयाच्या प्लीडरांची निवड करण्याची पद्धती;

(ख्) अशा प्लीडरांना न्यायालयाने पुरावावयाच्या सोयी;

(ग्) पोटनियम (१) च्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी नियमांद्वारे उपबंध करणे आवश्यक असेल किंवा उपबंध करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.]

निर्धन व्यक्ती यशस्वी झाल्यास त्याबाबतीतील खर्चाबाबत.

१०. दाव्यामध्ये वादी यशस्वी झाल्यास निर्धन व्यक्ती म्हणून दावा चालवण्यास तिला परवानगी दिली नसती तर तिला न्यायालय-फी म्हणून जी रक्कम घ्यावी लागली असती तिची न्यायालयाने गणना केली पाहिजे; अशी रक्कम, हुकूमनाम्याद्वारे ती ज्या पक्षकाराने द्यावयाचा आदेश देण्यात आला असेल अशा कोणत्याही पक्षकाराकडून राज्य शासनास वसुलीयोग्य असेल आणि दाव्याच्या विषयवस्तूवरील तो पहिला भार असेल.

निर्धन व्यक्ती अयशस्वी झाल्यास त्याबाबतीतील कार्यपद्धती.

११. वादी दाव्यामध्ये अयशस्वी झाल्यास किंवा त्याला निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यासाठी दिलेली परवानगी मागे घेतली गेल्यास किंवा दावा मागे घेण्यात किंवा फेटाळण्यात आल्यास,—

(क्) वादीने न्यायालय-फी किंवा बजावणीचा टपालखर्च असल्यास, तो टपालखर्च देण्यात [१][किंवा वादपत्राच्या किंवा संक्षिप्त निवेदनाच्या प्रती सादर करण्यात] कसूर केल्याच्या परिणामी, प्रतिवादीने उपस्थित राहण्यासाठी व जबाब देण्यासाठी त्यांच्यावर समन्स बजावण्यात आले नव्हते म्हणून, किंवा

(ख्) दाव्याच्या सुनावणीच्या वेळी वादी उपस्थित राहिला नाही म्हणून,

न्यायालयाने निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यास वादीला जर परवानगी देण्यात आली नसती तर, त्याला जी न्यायालय-फी द्यावी लागली असती ती न्यायालय-फी देण्यास, वादीला किंवा सहवादी म्हणून सामील करून घेतलेल्या कोणत्याही व्यक्तीला, आदेश दिला पाहिजे.

दावा समाप्तीच्या बाबतीतील कार्यपद्धती.

[२][११क. वादी किंवा सहवादी म्हणून सामील करून घेतलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूमुळे वादाची समाप्ती झाल्यास न्यायालयाने असा आदेश दिला पाहिजे की, निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यास वादीला परवानगी देण्यात आली नसती तर, तिला जेवढी न्यायालय-फी द्यावी लागली असती तेवढी रक्कम मृत वादीच्या संपदेमधून राज्य शासनास वसुलीयोग्य असेल.]

न्यायालय-फीच्या प्रदानासाठी राज्य शासन अर्ज करू शकेल.

१२. राज्य शासनाला, नियम १०, [३][नियम ११ किंवा ११क] खालील न्यायालय-फीच्या प्रदानाच्या आदेशासाठी कोणत्याही वेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे.

राज्य शासनास पक्षकार समजणे.

१३. राज्य शासन व नियम १०, नियम ११, [४][नियम ११क] किंवा नियम १२ खालील दाव्यातील कोणताही पक्षकार यांच्यामध्ये उद्भवणाऱ्या सर्व बाबी, कलम ४७ च्या अर्थान्तर्गत दाव्यातील पक्षकारांमध्ये उद्भवणारे प्रश्न असल्याचे समजण्यात येईल.

न्यायालय-फीच्या रकमेची वसुली.

[१][१४. नियम १०, नियम ११ किंवा नियम ११-क खाली, आदेश काढण्यात आला असेल त्याबाबतीत, न्यायालयाने हुकूमनाम्याची किंवा आदेशाची प्रत ताबडतोब जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवण्याची व्यवस्था केली पाहिजे व जिल्हाधिकाऱ्यास, वसुलीच्या अन्य कोणत्याही पद्धतीस बाध न येऊ देता, त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या न्यायालय-फीच्या रकमेची वसुली प्रदानास दायी असलेल्या व्यक्तीकडून किंवा मालमत्तेमधून, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे करता येईल.]

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८१ (दहा) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. १९४२ चा अधिनियम २४, कलम २ अन्वये हा नियम समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल केला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये मूळ नियमाऐवजी दाखल केला.

निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यासाठी परवानगी नाकारल्यामुळे मागाहून तशाच स्वरूपाचा अर्ज करण्यास रोध.

१५. अर्जदारास निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यास परवानगी नाकारणाऱ्या आदेशामुळे दावा करण्याच्या अधिकाराच्या संबंधात, अर्जदाराच्या तशाच स्वरूपाच्या नंतरच्या कोणत्याही अर्जाला रोध होईल; परंतु, अशा अधिकारासंबंधी नेहमीच्या रीतीने दावा दाखल करण्याची अर्जदारास मोकळीक राहील: [1][परंतु, निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याची परवानगी मिळवण्याकरिता अर्जदाराने केलेल्या अर्जास विरोध करताना राज्य शासनास आणि विरुद्ध पक्षकारास आलेला खर्च (असल्यास) तो खर्च अर्जदाराने असा दावा दाखल करण्याच्या वेळी किंवा त्यानंतर न्यायालय मंजूर करील] त्या वेळेच्या आत भरला नाही तर वादपत्र फेटाळण्यात येईल.

न्यायालय-फीची रक्कम भरण्यासाठी मुदत मंजूर करणे.

[2][१५क. नियम ५ अन्वये अर्ज फेटाळण्यात आला असेल किंवा नियम ७ अन्वये तो नाकारण्यात आला असेल अशा वेळी, न्यायालय निश्चित करून देईल अशा किंवा ते वेळोवेळी वाढवून देईल अशा मुदतीच्या आत न्यायालय-फीची आवश्यक ती रक्कम भरण्याकरिता अर्जदारास मुदत मंजूर करण्यास, नियम ५, नियम ७ किंवा नियम १५ यांमधील कोणत्याही गोष्टीमुळे, न्यायालयास प्रतिबंध होणार नाही; आणि अशी रक्कम आणि तसेच नियम [4][* * * *] मध्ये उल्लेखिलेल्या खर्चाची रक्कम अशा मुदतीत भरण्यात आल्यानंतर, निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी ज्या दिवशी अर्ज दाखल करण्यात आला असेल त्या दिवशीच असा दावा दाखल करण्यात आल्याचे मानले जाईल.]

खर्च.

१६. निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याची परवानगी मिळवण्यासाठी केलेल्या अर्जाचा खर्च आणि निर्धनपणाच्या संबंधात केलेल्या चौकशीचा खर्च दाव्यातील खर्च असेल.

निर्धन व्यक्तीद्वारे बचाव.

[3][१७. कोणत्याही प्रतिवादीची एखादी वजावट मागण्याच्या किंवा एखादी प्रतिहक्कमागणी मांडण्याच्या संबंधात, वादकथन करण्याची इच्छा असेल तर, त्यास निर्धन व्यक्ती म्हणून अशा प्रकारची हक्कमागणी मांडण्याची अनुज्ञा देता येईल आणि या आदेशात अंतभूत असलेले नियम, हे शक्य तेथवर, जणू काही असा प्रतिवादी हा वादी व त्याचे लेखी निवेदन हे वादपत्र असावे त्याप्रमाणे, त्यास लागू होतील.

[1][१७. कोणत्याही प्रतिवादीची एखादी वजावट मागण्याच्या किंवा एखादी प्रतिहक्कमागणी मांडण्याच्या संबंधात वादकथन करण्याची इच्छा असेल तर, त्यास निर्धन व्यक्ती म्हणून अशी हक्कमागणी मांडण्याची अनुज्ञा देता येईल आणि या आदेशात अंतर्भूत असलेले नियम हे, शक्य तेथवर, जणू काही असा प्रतिवादी हा वादी व त्याचे लेखी निवेदन हे वादपत्र असावे त्याप्रमाणे त्यास लागू होतील आणि जर त्याला त्रयस्थ पक्ष नोटीस देणे आवश्यक असेल तर, अशी त्रयस्थ पक्ष नोटीसही, या नियमाच्या प्रयोजनासाठी वादपत्र असल्याचे समजण्यात येईल.

प्रतिवादीस निर्धन म्हणून दाव्यात बचाव देण्याची परवानगी देता येईल.

निर्धन व्यक्तींना मोफत कायदेविषयक सेवा उपलब्ध करून देण्याची शासनाची शक्ती.

१८. (१) या आदेशातील उपबंधांच्या अधीनतेने, केंद्र शासनास किंवा राज्य शासनास, निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्याची ज्यांना परवानगी देण्यात आलेली आहे अशा व्यक्तींना मोफत कायदेविषयक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे पूरक उपबंध करता येतील.

(२) पोटनियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निर्धन व्यक्तींना मोफत कायदेविषयक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र किंवा राज्य शासनाने केलेल्या पूरक उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी उच्च न्यायालयास, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने

१८. निर्धन वादीने किंवा प्रतिवादीने सुरू केलेला किंवा पुढे चालवलेला कोणताही वाद, दावा किंवा बाब याबाबतीत, कक्षातील किंवा न्यायालयातील न्यायाधीशाची प्रथम परवानगी घेतली असल्याखेरीज कोणत्याही लेख्याच्या संबंधात तडजोड करता कामा नये.]

न्यायालयाच्या परवानगीशिवाय निर्धन व्यक्तीने दाव्यात तडजोड न करणे.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८१ (दहा) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (बारा) अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८१ (तेरा) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. १९८८ चा अधिनियम १९ याच्या कलम ३ अन्वये हे शब्द गाळण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (२) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

नियम करता येतील आणि अशा नियमांमध्ये, अशा कायदेविषयक सेवांचे स्वरुप व व्याप्ती, ज्या शर्तीवर त्या उपलब्ध होऊ शकतील त्या शर्ती, ज्या बाबींच्या संबंधांत आणि ज्या अभिकरणांमार्फत त्या देण्यांत येतील त्या बाबींचा व अभिकरणांचा समावेश असेल.]

न्यायालयाच्या परवानगीशिवाय निर्धन व्यक्तीने दाव्यात तडजोड न करणे.

[1][१९. निर्धन वादीने किंवा प्रतिवादीने सुरू केलेला किंवा पुढे चालविलेला कोणताही वाद, दावा किंवा दावा याबाबतीत कक्षातील किंवा न्यायालयातील न्यायाधीशाची प्रथम मंजुरी घेतली असल्याखेरीज कोणत्याही लेख्याच्या संबंधीत तडजोड करता कामा नये.]

आदेश चौतिसावा
स्थावर मालमत्तेच्या गहाणासंबंधी दावे

पुरोबंध, विक्री व विमोचन यासंबंधीच्या दाव्यातील पक्षकार.

१. या संहितेच्या उपबंधास अधीन राहून, गहाणाच्या स्वरुपातील प्रतिभूतीमध्ये किंवा विमोचनाच्या अधिकारात हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना ग्रहाणांच्या संबंधातील कोणत्याही दाव्यामध्ये पक्षकार म्हणून सामील करून घेता येईल.

स्पष्टीकरण.—पूर्ववर्ती गहाणदारास दाव्यात पक्षकार म्हणून सामील करून न घेता, एखाद्या अनुवर्ती गहाणदारास पुरोबंधासाठी किंवा विक्रीसाठी दावा दाखल करता येईल; एखाद्या अनुवर्ती गहाणाचे विमोचन करण्याच्या संबंधातील एखाद्या दाव्यात पूर्ववर्ती गहाणदारास सामील करून घेण्याची आवश्यकता असणार नाही.

पुरोबंधासंबंधीच्या दाव्यात प्रारंभिक हुकूमनामा.

[1][२. (१) पुरोबंधाच्या संबंधातील दाव्यात वादी यशस्वी झाल्यास, न्यायालयाने एक प्रारंभिक हुकूमनामा काढला पाहिजे आणि त्याद्वारे,—

(क्) (एक) गहाणावर दिलेले मुद्दल आणि त्यावरील व्याज.

(दोन) दाव्याचा जो कोणताही खर्च वादीस देण्यात आला असेल, तो खर्च, आणि

(तीन) त्याच्या गहाणाच्या स्वरूपातील प्रतिभूतीवरील व्याजासह त्या गहाणाच्या स्वरूपातील प्रतिभूतीच्या संबंधात अशा हुकूमनाम्याच्या दिनांकापर्यंत त्याने योग्य रीतीने केलेला इतर वादखर्च आकार व खर्च,

याबद्दल अशा हुकूमनाम्याच्या दिनांकास वादीला जी रक्कम देय होती तिचा हिशेब करण्यात यावा असा आदेश दिला पाहिजे; किंवा,

(ख्) त्या दिनांकास अशा रीतीने देय असलेली रक्कम घोषित केली पाहिजे; आणि

(ग्) पुढीलप्रमाणे निदेश दिला पाहिजे :—

(एक) अशा रीतीने देय असल्याचे आढळलेली किंवा घोषित केलेली रक्कम, न्यायालय खंड (क्) खाली करण्यात आलेला हिशेब कायम करून त्यावर प्रतिस्वाक्षरी करील त्या दिनांकापासून किंवा, प्रकरणपरत्वे, खंड (ख्) खाली अशी रक्कम न्यायालयात घोषित करण्यात येईल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आतील जो दिनांक न्यायालय निश्चित करील त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी प्रतिवादी न्यायालयात भरील आणि त्यानंतर नियम १० मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे नंतरचा वादखर्च, आकार आणि खर्च यांच्या संबंधात, देय असल्याचे न्यायनिर्णीत करण्यात आलेल्या रकमा, नियम ११ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे होणाऱ्या, त्यांच्यावरील त्या नंतरच्या व्याजासह भरील तर, वादीने, गहाण ठेवलेल्या मालमत्तेबाबतचे त्याच्या कब्जात किंवा अधिकारात असलेले सर्व दस्तऐवज प्रतिवादीच्या किंवा प्रतिवादी नेमील अशा व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत आणि ती मालमत्ता आपल्या खर्चाने गहाणापासून व वादीने किंवा त्यांच्या वतीने हक्कभागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा जेथे वादी प्राप्त-अधिकारावरून मागणी करत असेल तेथे, तो ज्यांच्या वतीने हक्कभागणी करत असेल त्या व्यक्तींनी निर्माण केलेल्या सर्व भारांपासून मुक्त अशी प्रतिवादीकडे पुन्हा स्हस्तांतरित करण्यास फर्माविण्यात आल्यास, तसे केले पाहिजे आणि आवश्यक असल्यास, मालमत्ता प्रतिवादीच्या कब्जात दिली पाहिजे; आणि

(दोन) प्रारंभिक हुकूमनाम्याखाली किंवा त्याद्वारे देय असल्याचे आढळलेल्या किंवा घोषित केलेल्या रकमेचे प्रदान अशा रीतीने निश्चित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी केले नाही, अथवा नंतरचा वादखर्च, आकार आणि खर्च व व्याज यांच्या संबंधात देय असल्याचे

---

१. सन १९२९ चा अधिनियम २१ या च्या कलम ४ अन्वये मूळ नियम २ ते ८ ऐवजी बदली दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालयात अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (३) द्वारे जादा दाखल केले.

न्यायनिर्णीत केलेली रक्कम न्यायालय निश्चित करील अशा मुदतीच्या आत भरण्यात प्रतिवादीने कसूर केल्यास, प्रतिवादीला मालमत्तेचे विमोचन करण्याच्या सर्व अधिकारांना मनाई करण्याचा अंतिम हुकूमनामा मिळावा यासाठी अर्ज करण्याचा वादीला हक्क असेल.

(२) सबळ कारण दाखवण्यात आल्यास, आणि न्यायालयाने वेळोवेळी निश्चित करावयाच्या अटींवर, अंतिम हुकमनामा देण्यापूर्वी कोणत्याही वेळी, न्यायालयास, पोटनियम (१) खाली देय असल्याचे आढळलेल्या किंवा घोषित केलेल्या रकमेच्या किंवा नंतरचा वादखर्च, आकार, खर्च, व व्याज यांच्या संबंधात देय असल्याचे न्यायनिर्णीत केलेल्या रकमेच्या प्रदानासाठी निश्चित केलेली मुदत वाढवता येईल.

(३) पुरोबंधाबद्दलच्या दाव्यात, उत्तरवर्ती गहाणदार किंवा अशा कोणत्याही गहाणदारांकडून स्वत्वाधिकार प्राप्त करणाऱ्या अथवा अशा कोणत्याही गहाणदारांच्या अधिकारांसाठी प्रत्यासीन केलेल्या व्यक्तींना पक्षकार म्हणून सामील करून घेण्यात आले असल्यास, प्रारंभिक हुकूमनाम्यामध्ये दाव्यातील पक्षकारांचे आपापले अधिकार आणि दायित्वे ही, प्रकरणाच्या परिस्थितिनुसार आवश्यक असतील अशा बदलांसह, परिशिष्ट "घ" च्या नमुना क्र. ९ मध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, नमुना क्र. १० मध्ये घालून दिलेल्या रीतीने व त्या नमुन्यात अभिनिर्णीत करण्यासाठी उपबंध करण्यात येईल.

पुरोबंधासाठीच्या दाव्यामधील अंतिम हुकूमनामा.

३. (१) गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे विमोचन करण्याच्या सर्व अधिकारास प्रतिवादीला मनाई करणारा अंतिम हुकूमनामा दिला जाण्यापूर्वी, प्रतिवादीने नियम २ च्या पोटनियम (१) खाली त्याच्याकडून देय असलेल्या सर्व रकमांचे न्यायालयात प्रदान केल्यास, न्यायालयाने, प्रतिवादीने या संबंधात केलेल्या अर्जावरून अंतिम हुकूमनामा काढून त्याद्वारे,—

(क) प्रारंभिक हुकूमनाम्यात निर्देशिलेले दस्तऐवज स्वाधीन करण्याचा आदेश वादीला दिला पाहिजे, आणि आवश्यक असल्यास,

(ख) उक्त हुकूमनाम्यात दिलेल्या निदेशाप्रमाणे गहाण ठेवलेली मालमत्ता प्रतिवादीच्या खर्चाने पुन्हा हस्तांतरित करण्याचा आदेश वादीला दिला पाहिजे, आणि तसेच, आवश्यक असल्यास,

(ग) मालमत्ता प्रतिवादीच्या कब्जात देण्याचा आदेश देखील वादीला दिला पाहिजे.

(२) पोटनियम (१) अनुसार प्रदान करण्यात आलेले नसेल तेथे, वादीने या संबंधात केलेल्या अर्जावरून न्यायालयाने अंतिम हुकूमनामा काढून त्याद्वारे प्रतिवादीला आणि त्याच्या मार्फत किंवा त्याच्या वतीने हक्कमागणी करणाऱ्या सर्व व्यक्तींना गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे विमोचन करण्याच्या सर्व अधिकारास मनाई करण्यात येत असल्याचे घोषित केले पाहिजे आणि तसेच, आवश्यक वाटल्यास, प्रतिवादीला मालमत्तेचा कब्जा वादीकडे देण्याचा आदेश देखील दिला पाहिजे.

(३) पोटनियम (२) खाली अंतिम हुकूमनामा काढण्यात आल्यानंतर, गहाणाच्या संबंधात किंवा दाव्याच्या कारणाने प्रतिवादी ज्या दायित्वांच्या अधीन असेल ती सर्व दायित्वे पार पाडण्यात आल्याचे मानण्यात येईल.

विक्रीबद्दलच्या दाव्यांमधील प्रारंभिक हुकूमनामा.

४. (१) विक्रीबद्दलच्या दाव्यांमध्ये वादी यशस्वी झाला तर, न्यायालयाने नियम २ च्या पोटनियम (१) चे खंड (क) (ख) आणि (ग) (एक) यामध्ये नमूद केलेल्या आशयाचा हुकूमनामा काढला पाहिजे आणि त्याद्वारे आणखी असा निदेश दिला पाहिजे की, त्यात नमूद केल्याप्रमाणे रकमेचे प्रदान करण्यात प्रतिवादीने कसूर केल्यास, गहाण ठेवलेली मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा व विक्रीचे उत्पन्न (विक्रीचा खर्च त्यामधून वजा केल्यानंतर) न्यायालयात भरण्यात यावे व प्रारंभिक हुकूमनाम्याखाली किंवा त्याअन्वये जे काही वादीला देय असल्याचे आढळून आले असेल किंवा घोषित केले असेल त्याबरोबर, नंतरचा दावाखर्च, आकार, खर्च व व्याज यांच्या संबंधात देय असल्याचे न्यायनिर्णीत करण्यात आली असेल अशी रक्कम यांचे प्रदान करण्यासाठी उक्त विक्री उत्पन्न उपयोजण्यात यावे आणि कोणतीही शिल्लक राहिल्यास, ती प्रतिवादीला किंवा ती घेण्यास हक्कदार असलेल्या अन्य व्यक्तींना देण्यात यावी असा निदेश देणारा अंतिम हुकूमनामा मिळण्यासाठी अर्ज करण्याचा वादीस हक्क असेल.

(२) न्यायालयास, सबळ कारण दाखवण्यात आल्यावरून आणि न्यायालय वेळोवेळी निश्चित करील अशा अटींवर, विक्रीचा अंतिम हुकूमनामा दिला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी, पोटनियम (१) खाली देय असल्याचे आढळलेल्या किंवा घोषित केलेल्या रकमेच्या किंवा नंतरच्या दावाखर्च, आकार, खर्च व व्याज यांच्या संबंधात देय असल्याचे न्यायनिर्णीत केलेल्या रकमेच्या प्रदानासाठी निश्चित केलेली मुदत वाढवता येईल.

पुरोबंध दाव्यामध्ये विक्रीचा हुकूमनामा देण्याची शक्ती.

(३) असमलक्षण गहाणाच्या बाबतीतील पुरोबंध दाव्यामध्ये वादी यशस्वी झाल्यास, न्यायालयाला दाव्यामधील कोणत्याही पक्षकाराच्या किंवा गहाणाच्या स्वरूपातील प्रतिभूतीमध्ये अथवा विमोचनाच्या अधिकारामध्ये हितसंबंधित असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीच्या सांगण्यावरून, योग्य वाटेल अशा अटींवर, (पुरोबंधाबद्दलच्या हुकूमनाम्याऐवजी) तशाच प्रकारचा हुकूमनामा देता येईल. विक्रीचा खर्च भागवण्यासाठी आणि अटींचे पालन केले जाईल याची सुनिश्चिती करण्यासाठी न्यायालय निश्चित करील अशी वाजवी रक्कम न्यायालयामध्ये जमा करण्याचा उक्त अटींमध्ये समावेश आहे.

(४) विक्रीबद्दलच्या दाव्यामध्ये किंवा ज्यामध्ये विक्रीचा आदेश देण्यात आलेला असेल अशा पुरोबंधाच्या दाव्यामध्ये उत्तरवर्ती गहाणदारांना किंवा अशा कोणत्याही गहाणदारांकडून स्वत्वाधिकार प्राप्त करणाऱ्या अथवा गहाणदारांच्या अधिकारांसाठी प्रत्यासीन केलेल्या व्यक्तींना पक्षकार म्हणून सामील

करून घेण्यात आले असल्यास, पोटनियम (१) मध्ये निर्देशिलेल्या प्रारंभिक हुकूमनाम्यामध्ये, दाव्यातील पक्षकारांचे आपापले अधिकार आणि दायित्वे ही प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असतील अशा बदलांसह, परिशिष्ट "घ" च्या नमुना क्रमांक ९ मध्ये किंवा नमुना क्र. १० मध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, नमुना क्र. ११ मध्ये घालून दिलेल्या रीतीने व त्या नमुन्यात अभिनिर्णीत करण्यासाठी उपबंध केले पाहिजेत.

विक्रीच्या दाव्यामधील अंतिम हुकमनामा.

५. (१) निश्चित करण्यात आलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी अथवा या नियमाच्या पोटनियम (३) खाली देण्यात आलेल्या अंतिम हुकूमनाम्यानुसार केलेली विक्री कायम करण्यापूर्वी कोणत्याही वेळी, प्रतिवादीने नियम ४ च्या पोटनियम (१) अन्वये त्याच्याकडून देय असलेल्या सर्व रकमांचे न्यायालयात प्रदान केल्यास, प्रतिवादीने या संबंधात केलेल्या अर्जावरून, न्यायालयाने अंतिम हुकमनामा दिला पाहिजे किंवा असा हुकूमनामा देण्यात आलेला असेल तर, एक आदेश दिला पाहिजे आणि, त्याद्वारे :—

(क्) प्रारंभिक हुकूमनाम्यात निर्देशिलेले दस्तऐवज सुपूर्द करण्याचा आदेश वादीला दिला पाहिजे.

आणि आवश्यक असल्यास,—

(ख्) गहाण ठेवलेली मालमत्ता उक्त हुकूमनाम्यात दिलेल्या निदेशाप्रमाणे हस्तांतरित करण्याचा आदेश वादीला दिला पाहिजे.

आणि तसेच आवश्यक असल्यास,—

(ग्) मालमत्ता प्रतिवादीच्या कब्जात देण्याचा आदेश देखील दिला पाहिजे.

(२) गहाण ठेवलेली मालमत्ता किंवा तिचा भाग, या नियमाच्या पोटनियम (३) खाली देण्यात आलेल्या हुकूमनाम्यानुसार विकण्यात आला असल्यास, प्रतिवादीने, पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या रकमेचा आणि तिच्याबरोबर खरेदीदाराने न्यायालयात प्रदान केलेल्या खरेदीच्या रकमेच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम खरेदीदाराला प्रदान करण्यासाठी त्या रकमेचा न्यायालयात भरणा केलेला नसेल तर, न्यायालयाने या नियमाच्या पोटनियम (१) अन्वये आदेश देता कामा नये.

असा भरणा करण्यात आलेला असल्यास, खरेदीदाराने न्यायालयात प्रदान केलेल्या रकमेच्या व तिच्याबरोबर तिच्या पाच टक्क्यांइतक्या रकमेच्या परतफेडीचा आदेश मिळण्याचा खरेदीदारास हक्क असेल.

(३) पोटनियम (१) अनुसार प्रदान करण्यात आलेले नसेल अशाबाबतीत, वादीने यासंबंधात केलेल्या अर्जावरून, न्यायालयाने, गहाण ठेवलेली मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा आणि विक्रीच्या उत्पन्नावर नियम ४ च्या पोटनियम (१) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने कार्यवाही करण्यात यावी असा निदेश देणारा हुकूमनामा दिला पाहिजे.

विक्रीच्या दाव्यामध्ये गहाणावर देय असलेल्या शिल्लक रकमेची वसुली.

६. [१][नियम ५] खाली केलेल्या कोणत्याही विक्रीचे निव्वळ उत्पन्न हे, वादीला देय असलेल्या रकमेचे प्रदान करण्यासाठी अपुरे असल्याचे आढळून आल्यास, शिल्लक रक्कम विक्री केलेल्या मालमत्तेमधून वसूल करण्याव्यतिरिक्त, अन्य प्रकारे प्रतिवादीकडून कायदेशीर रीतीने वसुलीयोग्य असेल तर, वादीने केलेल्या अर्जावरून, न्यायालयाला, अशा शिल्लक रकमेसाठी हुकूमनामा काढता येईल.

विमोचनाच्या दाव्यामधील प्रारंभिक हुकमनामा.

७. (१) विमोचनासाठी असलेल्या दाव्यामध्ये वादी यशस्वी झाल्यास, न्यायालयाने, एक प्रारंभिक हुकूमनामा काढून त्याद्वारे,—

(क्) (एक) गहाणावरील मुद्दल आणि व्याज,

(दोन) दाव्याचा कोणताही खर्च प्रतिवादीला निवाडयाने देण्यात आला असेल तर तो खर्च, आणि

(तीन) प्रतिवादीच्या गहाणाच्या स्वरूपातील प्रतिभूतीवरील व्याजासह त्या गहाणाच्या स्वरूपातील प्रतिभूतीच्या संबंधात अशा हुकूमनाम्याच्या दिनांकापर्यंत त्याने योग्य रीतीने केलेला इतर दावाखर्च, आकार व खर्च,

यापोटी अशा हुकूमनाम्याच्या दिनांकास प्रतिवादीला जी रक्कम देय असेल तिचा हिशेब करण्यात यावा असा आदेश दिला पाहिजे, किंवा

(ख्) त्या दिनांकास अशा रीतीने देय असलेली रक्कम घोषित केली पाहिजे; आणि

(ग्) पुढीलप्रमाणे निदेश दिला पाहिजे :—

(एक) अशा रीतीने देय असल्याचे आढळलेली किंवा घोषित केलेली रक्कम वादीने न्यायालयात, न्यायालय खंड (क्) खाली करण्यात आलेला हिशेब कायम करून त्यावर प्रतिस्वाक्षरी करील त्या दिनांकापासून, किंवा, प्रकरणपरत्वे, खंड (ख्) खाली अशी रक्कम न्यायालयात घोषित करण्यात येईल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आतील जो दिनांक न्यायालय निश्चित करील त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी भरली असेल आणि त्यानंतर, नियम १० मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे नंतरचा दावाखर्च, आकार आणि खर्च यांच्या संबंधात देय असल्याचे न्यायनिर्णीत करण्यात आलेली रक्कम नियम ११ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे त्या त्या रकमांवरील नंतरच्या व्याजासह भरल्यास, प्रतिवादीने, गहाण ठेवलेल्या मालमत्तेबाबतचे त्याच्या कब्जात किंवा अधिकारात असलेले सर्व दस्तऐवज

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८२ (एक) अन्वये 'लगतपूर्वीच्या नियमाऐवजी घालण्यात आले. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून).

वादीच्या किंवा वादी नेमील अशा व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत, आणि ती मालमत्ता प्रतिवादीच्या खर्चाने गहाणापासून व प्रतिवादीने किंवा त्याच्या वतीने हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा प्रतिवादी प्राप्त केलेल्या अधिकारावरून हक्कमागणी करत असेल तेथे तो ज्याच्या वतीने हक्कमागणी करत असेल त्या व्यक्तींनी निर्माण केलेल्या सर्व भारांपासून मुक्त अशी मालमत्ता वादीकडे पुन्हा हस्तांतरित करण्यास फर्मावण्यात आल्यास, तसे केले पाहिजे आणि आवश्यक असल्यास, मालमत्ता वादीच्या कब्जात दिली पाहिजे, आणि—

(दोन) प्रारंभिक हुकूमनाम्याखाली किंवा त्याद्वारे देय असल्याचे आढळलेल्या किंवा घोषित केलेल्या रकमेचे प्रदान अशा रीतीने निश्चित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी केले नाही अथवा नंतरचा दावाखर्च, आकार आणि खर्च व व्याज यांच्या संबंधात देय असल्याचे न्यायनिर्णीत केलेली रक्कम न्यायालय निश्चित करील अशा मुदतीत वादीने कसूर केल्यास, प्रतिवादीला,—

(क) उपभोग्य गहाण, सशर्त विक्रीद्वारे गहाण, किंवा ज्याच्या अटींमध्ये विक्रीची नव्हे तर केवळ पुरोबंधाची तरतूद असेल असे असमलक्षण गहाण याव्यतिरिक्त अन्य गहाणाच्या बाबतीत, गहाण ठेवलेली मालमत्ता विकण्यात यावी असा, अथवा

(ख) सशर्त विक्रीद्वारे गहाणाच्या किंवा पूर्वोक्त अशा असमलक्षण गहाणाच्या बाबतीत वादीला मालमत्तेचे विमोचन करण्याच्या सर्व अधिकारास मनाई करण्यात यावी असा, अंतिम हुकूमनामा मिळण्यासाठी अर्ज करण्याचा हक्क असेल.

(२) न्यायालयास, सबळ कारण दाखवण्यात आल्यावरून आणि न्यायालय वेळोवेळी निश्चित करील अशा अटींवर, पुरोबंधाचा किंवा प्रकरणपरत्वे, विक्रीचा अंतिम हुकूमनामा देण्यापूर्वी कोणत्याही वेळी, पोटनियम (१) खाली देय असल्याचे आढळलेल्या किंवा घोषित केलेल्या रकमेच्या किंवा नंतरचा दावाखर्च, आकार आणि खर्च व व्याज यांच्या संबंधात देय असल्याचे न्यायनिर्णीत केलेल्या रकमेच्या प्रदानासाठी निश्चित केलेली मुदत वाढवता येईल.

विमोचनाच्या अंतिम हुकूमनाम्यामधील अंतिम हुकूमनामा.

८. (१) वादीला गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे विमोचन करण्याच्या सर्व अधिकारास मनाई करणारा अंतिम हुकूमनामा दिला जाण्यापूर्वी किंवा या नियमाच्या पोटनियम (३) खाली देण्यात आलेल्या हुकूमनाम्यानुसार केलेली विक्री कायम केली जाण्यापूर्वी, वादीने नियम ७ च्या पोटनियम (१) खाली त्याच्याकडून देय असलेल्या सर्व रकमांचे न्यायालयात प्रदान केल्यास, वादीने यासंबंधात केलेल्या अर्जावरून, न्यायालयाने अंतिम हुकूमनामा किंवा असा हुकूमनामा देण्यात आलेला असेल तर, एक आदेश दिला पाहिजे आणि त्याद्वारे,—

(क) प्रारंभिक हुकूमनाम्यात निर्देशिलेले दस्तऐवज स्वाधीन करण्याचा आदेश प्रतिवादीला दिला पाहिजे,

आणि आवश्यक असल्यास,—

(ख) गहाण ठेवलेली मालमत्ता उक्त हुकूमनाम्यात दिलेल्या निदेशाप्रमाणे वादीच्या खर्चाने पुन्हा हस्तांतरित करण्याचा आदेश प्रतिवादीला दिला पाहिजे,

आणि तसेच, आवश्यक असल्यास,—

(ग) मालमत्ता वादीच्या कब्जात देण्याचा आदेश देखील प्रतिवादीला दिला पाहिजे.

(२) गहाण ठेवलेली मालमत्ता किंवा तिचा भाग, या नियमाच्या पोटनियम (३) खाली देण्यात आलेल्या हुकूमनाम्यानुसार विकण्यात आला असल्यास, वादीने, पोटनियम (१) मध्ये नमूद केलेल्या रकमेचा आणि तिच्याबरोबर, खरेदीदाराने न्यायालयात प्रदान केलेल्या रकमेच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम खरेदीदाराला प्रदान करण्यासाठी त्या रकमेचा न्यायालयात भरणा केलेला नसेल तर, न्यायालयाने या नियमाच्या पोटनियम (१) खाली आदेश देता कामा नये.

असा भरणा करण्यात आलेला असल्यास, अशा बाबतीत खरेदीदाराने न्यायालयात प्रदान केलेल्या रकमेच्या व तिच्याबरोबर, तिच्या पाच टक्क्यांइतक्या रकमेच्या परतफेडीचा आदेश मिळण्याचा खरेदीदारास हक्क असेल.

(३) पोटनियम (१) अनुसार प्रदान करण्यात आलेले नसेल अशा बाबतीत, प्रतिवादीने यासंबंधात केलेल्या अर्जावरून, न्यायालयाने,—

(क) सशर्त विक्रीद्वारे गहाणाच्या किंवा यात यापूर्वी नियम ७ मध्ये निर्देश केलेल्या अशा असमलक्षण गहाणाच्या बाबतीत, वादी आणि त्याच्या वतीने हक्कमागणी करणाऱ्या व्यक्ती यांना गहाण मालमत्तेचे विमोचन करण्याच्या सर्व अधिकारांना मनाई केली असल्याचे घोषित करणारा आणि तसेच, आवश्यक असल्यास, गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा कब्जा प्रतिवादीकडे द्यावा असा वादीला आदेश देणारा अंतिम हुकूमनामा दिला पाहिजे; किंवा

(ख) उपभोग्य गहाण नसेल अशा इतर कोणत्याही गहाणाच्या बाबतीत गहाण ठेवलेली मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा आणि विक्रीचे उत्पन्न (त्यामधून विक्रीचा खर्च वजा केल्यानंतर) न्यायालयात भरण्यात यावे आणि जी रक्कम प्रतिवादीला देय असल्याचे आढळले असेल त्या रकमेचे प्रदान करण्यासाठी त्या उत्पन्नाचे उपयोजन करण्यात यावे व काही शिल्लक उरल्यास, वादीला किंवा ती घेण्यास हक्कदार असलेल्या अन्य व्यक्तींना तिचे प्रदान करण्यात यावे असा अंतिम हुकूमनामा दिला पाहिजे.]

विमोचनाबद्दलच्या दाव्यात गहाणावर देय असलेल्या शिल्लक रकमेची वसुली.

[१][८क. [२][नियम ८] खाली करण्यात आलेल्या कोणत्याही विक्रीचे निव्वळ उत्पन्न प्रतिवादीला देय असलेल्या रकमेचे प्रदान करण्यासाठी अपुरे असल्याचे आढळून आल्यास [३][प्रतिवादीने अर्ज केल्यास] विकलेल्या मालमत्तेतून असेल त्या व्यतिरिक्त, अन्य प्रकारे वादीकडून शिल्लक रक्कम कायद्याप्रमाणे वसूल करता येण्याजोगी असेल तर अंमलबजावणी करतांना न्यायालयास अशा शिल्लक रकमेसाठी हुकूमनामा काढता येईल.]

काहीही देय असल्याचे आढळले नसल्यास किंवा गहाणदारास अतिप्रदान करण्यात आले असल्यास हुकूमनामा.

९. यात यापूर्वी काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, नियम ७ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे हिशेब केल्यानंतर, प्रतिवादीला काहीही देय नाही किंवा त्याला अतिप्रदान करण्यात आले आहे असे दिसून आल्यास, न्यायालयाने, प्रतिवादीने मालमत्ता पुन्हा हस्तांतरित करणे व जी रक्कम वादीला देय असल्याचे आढळून येईल ती रक्कम वादीला देणे आवश्यक असल्यास, प्रतिवादीला तसे करण्याचा निदेश देणारा हुकूमनामा काढला पाहिजे; आणि आवश्यक असल्यास, गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा कब्जा वादीकडे दिला पाहिजे.

हुकूमनाम्यानंतरचा गहाणदाराचा दावा-खर्च.

[४][१०. पुरोबंध, विक्री किंवा विमोचनाच्या बाबतीत, गहाणदाराला प्रदान करावयाच्या रकमेचे अंतिमतः समायोजन करताना, गहाणदाराचे वर्तन दाव्याच्या खर्चावरील त्याच्या हक्कापासून त्याला वंचित करणारे असे नसेल तर, गहाणदाराने पुरोबंध, विक्री किंवा विमोचन याबद्दलच्या प्रारंभिक हुकूमनाम्याच्या दिनांकापासून प्रत्यक्ष प्रदानाच्या वेळेपर्यंत, योग्य रीतीने केलेला दावाखर्च आणि इतर खर्च, आकार आणि खर्च यांची भर न्यायालयाने गहाणाच्या रकमेमध्ये घातली पाहिजे:

[५][परंतु, दावा दाखल करण्याच्या वेळेपूर्वी किंवा त्यावेळी गहाणकाराने गहाणावर देय असलेली रक्कम किंवा न्यायालयाच्या मते जी सारतः तुटीची नसेल अशी रक्कम देऊ केल्यास किंवा तिचा निक्षेप केल्यास गहाणकाराने गहाणदाराला दाव्याचा खर्च द्यावा असा आदेश गहाणकाराला देता येणार नाही आणि न्यायालयाने, लेखी कारणे नमूद करून, अन्यथा निदेश दिला नाही, तर गहाणकारास गहाणदाराकडून त्याचा स्वतःचा दाव्याचा खर्च वसूल करण्याचा हक्क असेल.]

दरम्यानच्या लाभाचे प्रदान करण्याचा निदेश गहाणदाराला देण्याची न्यायालयाची शक्ती.

[६][१० क. पुरोबंधाच्या दाव्यामध्ये गहाणकाराने, दावा दाखल करण्याच्या वेळेपूर्वी किंवा त्यावेळी, गहाणावर देय असलेली रक्कम किंवा न्यायालयाच्या मते सारतः तुटीची नसेल अशी रक्कम देऊ केल्यास किंवा निक्षिप्त केल्यास दावा दाखल केल्यापासून सुरू होणाऱ्या कालावधीच्या दरम्यानच्या लाभाचे प्रदान गहाणदाराने गहाणकाराला करावे असा निदेश न्यायालयाने गहाणदाराला दिला पाहिजे.]

व्याजाचे प्रदान.

११. पुरोबंध, विक्री किंवा विमोचन यासाठीच्या दाव्यामध्ये काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यामध्ये, व्याज कायदेशीर रीत्या वसूल करण्याजोगे असल्यास, गहाणदाराला पुढीलप्रमाणे व्याज देण्यात यावे असा न्यायालयास आदेश देता येईल :—

(क्) (एक) गहाणावर देय असल्याचे आढळून आलेल्या किंवा घोषित केलेल्या मुद्दलाच्या रकमेवर—मुद्दलावर प्रदेय असलेल्या दराने किंवा असा कोणताही दर निश्चित केलेला नसल्यास न्यायालयाला वाजवी वाटेल अशा दराने,

* * * * * आणि

(तीन) प्रारंभिक हुकूमनाम्याच्या तारखेपर्यंत गहाणदाराने गहाण-प्रतिभूतीच्या संबंधात, योग्य रीतीने केलेला दावाखर्च, आकार आणि खर्च यांसाठी गहाणदाराला देय असल्याचे न्यायनिर्णीत केलेल्या आणि गहाणाच्या रकमेमध्ये भर घातलेल्या रकमेवर—पक्षकारांनी परस्पर संमत केलेल्या दराने किंवा असा दर नसेल तर [७][न्यायालयास वाजवी वाटेल त्याप्रमाणे दर वर्षाला सहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल अशा दराने];

गहाणकाराने किंवा गहाणाचे विमोचन करणाऱ्या अन्य व्यक्तीने, प्रारंभिक हुकूमनाम्यान्वये देय असल्याचे आढळलेल्या किंवा घोषित केलेल्या रकमेचे प्रदान ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकापूर्वी करावयाचे त्या दिनांकापर्यंतचे व्याज;

---

१. सन १९२९ चा अधिनियम २१ च्या कलम ५ अन्वये हा नियम समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८२ (दोन) (क्) अन्वये मूळ मजकुराऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८२ (दोन) (ख्) अन्वये मूळ मजकुराऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

४. सन १९२९चा अधिनियम २१, कलम ६ अन्वये मूळ नियम १० व ११ ऐवजी समाविष्ट करण्यात आले.

५. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८२ (तीन) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

६. वरील अधिनियमाच्या कलम ८२ (चार) अन्वये घालण्यात आले.

७. सन १९५६ चा अधिनियम ६६ च्या कलम १४, मूळखंड (ख्) ऐवजी बदली दाखल केला.

८. वरील अधिनियमाच्या कलम २४ अन्वये विवक्षित शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

[१][(ख) खंड (क) अनुसार परिगणित केलेल्या, त्या खंडात विनिर्दिष्ट केलेल्या मुदलांच्या रकमांच्या एकूणातीवर न्यायालयास वाजवी वाटेल अशा दराने वसुलीच्या किंवा प्रत्यक्ष प्रदानाच्या दिनांकापर्यंतचे नंतरचे व्याज.]

पूर्ववर्ती गहाणास अधीन असलेल्या मालमत्तेची विक्री.

१२. ज्या कोणत्याही मालमत्तेची विक्री करण्याचा निदेश या आदेशाखाली दिलेला असेल ती मालमत्ता पूर्ववर्ती गहाणास अधीन असल्यास, अशा पूर्ववर्ती गहाणदाराचा, विकलेल्या मालमत्तेमध्ये जो हितसंबंध होता तोच हितसंबंध विक्रीच्या उत्पन्नामध्ये त्याला देऊन न्यायालयास पूर्ववर्ती गहाणदारांच्या संमतीने असा निदेश देता येईल की, ती मालमत्ता त्या गहाणापासून मुक्त करून विकण्यात यावी.

उत्पन्नाचे उपयोजन.

१३. (१) असे उत्पन्न न्यायालयात आणून त्याचे पुढीलप्रमाणे उपयोजन केले पाहिजे :—

प्रथमत: विक्रीस आनुषंगिक अशा किंवा विक्रीच्या कोणत्याही प्रयत्नात योग्य रीतीने केलेल्या अशा सर्व खर्चाचे प्रदान करण्यासाठी;

दुसरे म्हणजे, पूर्ववर्ती गहाण आणि त्याच्या संबंधात योग्य रीतीने केलेला खर्च यांबद्दल पूर्ववर्ती गहाणदाराला जी काही रक्कम देय असेल त्या रकमेचे प्रदान करण्यासाठी;

तिसरे म्हणजे, ज्या गहाणाच्या परिणामी, विक्रीचा निदेश देण्यात आला होता त्या गहाणापोटी देय असलेल्या सर्व व्याजाचे आणि विक्रीचा निदेश देणारा हुकूमनामा ज्या दाव्यात देण्यात आला होता त्या दाव्याच्या खर्चाचे प्रदान करण्यासाठी ;

चौथे म्हणजे, त्या गहाणापोटी देय असलेल्या मुदलाच्या रकमेचे प्रदान करण्यासाठी ; आणि

शेवटी, काही रक्कम शिल्लक राहिल्यास, विकलेल्या मालमत्तेमध्ये स्वत:चा हितसंबंध असल्याचे सिद्ध करणाऱ्या व्यक्तीला किंवा अशा व्यक्ती एकापेक्षा अधिक असतील तर अशा व्यक्तींना, त्या मालमत्तेमधील त्यांच्या त्यांच्या हितसंबंधानुसार किंवा त्यांच्याकडून संयुक्त पावती घेऊन, त्या शिल्लक रकमेचे प्रदान केले पाहिजे.

१८८२ चा ४. (२) या नियमातील किंवा नियम १२ मधील कोणतीही गोष्ट, संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२, याच्या कलम ५७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींवर परिणाम करते असे मानण्यात येणार नाही.

गहाण ठेवलेली मालमत्ता विक्रीस आणण्यासाठी विक्रीबद्दलचा दावा आवश्यक असणे.

१४. (१) गहाणाद्वारे उद्भवणाऱ्या हक्कमागणीची पूर्ती करण्यासाठी पैशाचे प्रदान केले जावे म्हणून गहाणदाराने हुकूमनामा मिळवला असल्यास, गहाण अंमलात आणण्यासाठी विक्री होण्याबद्दलचा दावा दाखल करण्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे गहाण ठेवलेली मालमत्ता विक्रीस आणण्याचा गहाणदारास हक्क असणार नाही आणि आदेश दुसरा, नियम २ यात काहीही अंतर्भूत असले तरी, त्याला असा दावा दाखल करता येईल.

१८८२ चा ४. (२) संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ हा ज्या राज्यक्षेत्रांवर विस्तारित करण्यात आलेला नसेल अशा कोणत्याही राज्यक्षेत्रांना पोटनियम (१) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

एकाच हुकूमनाम्यात प्रारंभिक आणि अंतिम हुकूमनामा असलेल्या संयुक्त हुकूमनाम्याच्या संबंधातील विशेष उपबंध.

[१][१४क. (१) यापूर्वी येथे कोणत्याही गोष्टीचा अंतर्भाव केलेला असला तरीही, जेव्हा, पक्षकारांमध्ये झालेल्या समझोत्याप्रमाणे किंवा कोणत्याही विशेष कायद्यान्वये किंवा दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा असल्याचे मानण्यात आले आहे किंवा हुकूमनामा म्हणून किंवा जणू दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा म्हणून अंमलबजावणी करणे आवश्यक आहे असा आदेश, निवाडा किंवा अभिनिर्णय या अन्वये आवश्यक किंवा अनुज्ञेय असल्याप्रमाणे, प्रारंभिक त्याच प्रमाणे अंतिम हुकूमनामा एकत्रित करणाऱ्या कोणत्याही संयुक्त हुकूमनाम्यान्वये, कोणत्याही गहाण मालमत्तेची विक्री करण्याचा हुकूमनामा दिलेला असेल आणि न्यायनिर्णीत ऋणकोने (गहाणकाराने) त्यासाठी निश्चित केलेल्या दिवसापूर्वी किंवा असा हुकूमनामा, आदेश, निवाडा किंवा अभिनिर्णय यांच्या अनुषंगाने झालेली विक्री पूर्ण करण्यापूर्वी कोणत्याही वेळी, उक्त हुकूमनामा, आदेश, निवाडा किंवा अभिनिर्णय या अन्वये, त्या दिवशी त्याच्याकडून हुकूमनामाधारकाला (गहाणदाराला) देय असलेल्या सर्व रकमा, उत्तरवर्ती किंमत, आकार, खर्च आणि व्याज यासहित न्यायालयात प्रदान केलेल्या असतील आणि त्याचप्रमाणे, खरेदीदाराला प्रदान करण्यासाठी म्हणून

---

१. सन १९५६ चा अधिनियम ६६ च्या कलम १४ अन्वये मूळ खंड (ख) ऐवजी बदली दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (१) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

त्या खरेदीदाराने न्यायालयात भरणा केलेल्या खरेदी रकमेच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम भरणा केलेली असेल तेव्हा, न्यायालयाने, न्यायनिर्णीत ऋणकोने (गहाणकाराने) या संबंधात केलेल्या अर्जावरुन तो विक्री रद्द केली पाहिजे आणि हुकूमनामा, आदेश, निवाडा किंवा अभिनिर्णय यांची पूर्ती झाली आहे अशी नोंद केली पाहिजे व पुढीलप्रमाणे आदेश दिला पाहिजे, —

(क) हुकूमनामाधारकाने (गहाणदाराने) न्यायनिर्णीत ऋणकोला (गहाणकाराला) किंवा त्याच्या नामनिर्देशितीला, गहाण मालमत्ते-संबंधीचे त्यांच्या ताब्यातील किंवा अधिकारातील सर्व कागदपत्र द्यावेत असा आदेश, आणि आवश्यक असल्यास,

(ख) हुकूमनामाधारकाने (गहाणदाराने) न्यायनिर्णीत ऋणकोला (गहाणकाराला) किंवा त्याच्या नामनिर्देशितीला, हुकूमनामाधारकाच्या खर्चाने गहाणवटीपासून मुक्त, आणि हुकूम-नामाधारकाने (गहाणदाराने) किंवा त्याच्या-तर्फे हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जेव्हा हुकूमनामाधारक (गहाणदार), व्युत्पन्न हक्काने हक्क सांगत असेल तेव्हा, जेव्हा तो हक्क सांगेल तेव्हा, त्याच्यातर्फे, हक्क सांगणाऱ्या व्यक्तीने, निर्माण केलेल्या सर्व भारांपासून मुक्त, अशी गहाण मालमत्ता पुन्हा हस्तांतरित करावी असा आदेश, आणि शिवाय आवश्यक असल्यास;

(ग) हुकूमनामाधारकाने (गहाणदाराने) न्यायनिर्णीत ऋणकोला (गहाणकाराला) किंवा त्याच्या नामनिर्देशितीस मालमत्तेचा ताबा द्यावा असा आदेश.

(२) जेव्हा असा भरणा केला असेल तेव्हा खरेदी-दाराला, त्याने न्यायालयात भरणा केलेल्या खरेदी रकमेच्या पाच टक्क्यांइतक्या रकमेसहित परतफेडीचा आदेश मिळवण्याचा हक्क असेल.

(३) न्यायालयास, योग्य कारण दाखवले असता, आणि न्यायालयाने वेळोवेळी निश्चित करावयाच्या शर्तीवर, विक्री पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही वेळी, वेळोवेळी हुकूमनामा, आदेश, निवाडा, किंवा अभि-निर्णय याअन्वये देय असलेल्या रकमेचे प्रदान, सर्व उत्तरवर्ती किंमत, आकार, खर्च व व्याज यांसह, करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी वाढविता येईल.]

स्वत्वाधिकारलेखाचा निक्षेप करून ठेवलेले गहाण आणि प्रभार.

[१][१५. [२][(१)] या आदेशामध्ये अंतर्भूत असलेले साध्या गहाणाला लागू होणारे सर्व उपबंध शक्य असेल तेथवर, संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १८८२ याच्या कलम ५८ च्या अर्थान्वये स्वत्वाधिकारलेखाचा निक्षेप करून ठेवलेल्या गहाणाला आणि कलम १०० च्या अर्थान्वये असलेल्या प्रभाराला लागू होतील.] १८८२ चा ४

---

१. सन १९२९ चा अधिनियम २१ च्या कलम ७ अन्वये मूळ नियम १५ ऐवजी बदलीदाखल करण्यात आला.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८२ (पाच) अन्वये नियम १५ ला पोट-नियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[1][(२) हुकूमनाम्याद्वारे, पैशाचे प्रदान करण्याचा आदेश दिलेला असेल व ते प्रदान करण्यात कसूर झाल्यास, त्याचा प्रभार स्थावर मालमत्तेवर टाकला असेल तर, ती रक्कम या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना त्या मालमत्तेची विक्री करून त्याद्वारे वसूल करता येईल.]

आदेश पस्तिसावा

अंतर्वाद

अंतर्वाद दाव्यातील वादपत्र.

१. अंतर्वादविषयक प्रत्येक दाव्यामध्ये, वादपत्रांसाठी आवश्यक असलेल्या इतर विवरणपत्रांबरोबरच आणखी पुढील गोष्टी वादपत्रांमध्ये नमूद केल्या पाहिजेत :—

(क) वादी, विवादग्रस्त विषयवस्तूमध्ये आकार किंवा खर्च यावाचून अन्य कोणत्याही हितसंबंधाची हक्कमागणी करीत नाही;

(ख) प्रतिवादींनी पृथ्कपणे केलेल्या हक्कमागण्या, आणि

(ग) वादी आणि प्रतिवादींपैकी कोणताही प्रतिवादी यांच्यामध्ये कोणतेही संगनमत झालेले नाही.

मागणी करण्यात आलेल्या गोष्टीचे न्यायालयात प्रदान करणे.

२. ज्या गोष्टीच्या संबंधात मागणी करण्यात आली असेल ती न्यायालयात प्रदान करण्याजोगी किंवा न्यायालयाच्या ताब्यात देण्याजोगी असल्यास, वादीला, दाव्यामध्ये कोणताही आदेश मिळण्यास हक्कदार होण्यापूर्वी, त्या गोष्टीचे तसे प्रदान करण्यास किंवा ती तशी ताब्यात देण्यास फर्माविता येईल.

प्रतिवादी वादीवर दावा दाखल करीत असेल त्याबाबतची कार्यपद्धती.

३. अंतर्वाद दाव्यातील प्रतिवादींपैकी कोणताही प्रतिवादी अशा दाव्याच्या विषयवस्तूच्या संबंधात, वादीवर प्रत्यक्षात दावा दाखल करीत असल्यास, वादीविरुद्धचा दावा ज्या न्यायालयामध्ये प्रलंबित असेल त्या न्यायालयाने, अंतर्वाद दावा ज्या न्यायालयात सुरू करण्यात आला त्या न्यायालयाने कळवल्यानंतर, वादीविरुद्ध चालू असलेली कार्यवाही स्थगित केली पाहिजे, आणि अशा रीतीने स्थगित केलेल्या दाव्यातील वादीच्या दावाखर्चासाठी अशा दाव्यामध्ये उपबंध करता येईल; परंतु, त्या दाव्यामध्ये त्या खर्चासाठी उपबंध केलेला नसेल तर आणि असे उपबंध करण्यात येतील तोवर, तो दावाखर्च अंतर्वाद दाव्यामध्ये वादीने केलेल्या खर्चामध्ये समाविष्ट करता येईल.

पहिल्या सुनावणीच्या वेळीची कार्यपद्धती.

४. (१) पहिल्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाला,—

(क) हक्कमागणी करण्यात आलेल्या गोष्टीच्या संबंधातील प्रतिवादीच्या प्रती असलेल्या सर्व दायित्वातून वादीला मुक्त करण्यात आले असल्याचे घोषित करता येईल, वादीला त्याचा दावाखर्च देवविता येईल आणि त्याला दाव्यातून काढून टाकता येईल ; किंवा

(ख) दावा अंतिमरीतीने निकालात काढण्यात येईपर्यंत सर्व पक्षकारांना दाव्यात ठेवून घेणे न्यायाच्या किंवा सोयीच्या दृष्टीने आवश्यक आहे, असे वाटले तर न्यायालयाला तसे करता येईल.

(२) पक्षकारांची कबुली किंवा अन्य पुरावा यावरून, हक्कमागणी करण्यात आलेल्या गोष्टीबाबतचा स्वत्वाधिकार अभिनिर्णीत करणे शक्य आहे, असे न्यायालयाला आढळून आल्यास त्याला तसे करता येईल.

(३) पक्षकारांच्या कबुलीमुळे अशा रीतीने अभिनिर्णय करणे न्यायालयास शक्य नसेल तर न्यायालयास,—

(क) पक्षकारांमधील वादमुद्दा किंवा वादमुद्दे तयार करण्यात यावे व त्यांची संपरीक्षा करण्यात यावी, आणि

(ख) कोणत्याही हक्कमागणीदाराला, मूळ वादीच्या ऐवजी किंवा त्याच्या जोडीला, वादी करण्यात यावे,

असा निदेश देता येईल आणि न्यायालयाने त्या दाव्याची नेहमीच्या रीतीने संपरीक्षा केली पाहिजे.

अभिकर्ते आणि कुळे यांना अंतर्वाद दावे सुरू करता येणार नाहीत.

५. प्रकर्त्यांच्या किंवा जमीनमालकांच्या मार्फत हक्कमागणी करणाऱ्या व्यक्तींव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तींबरोबर अंतर्वाद करण्यास प्रकर्त्यांना किंवा जमीनमालकांना भाग पाडण्यासाठी, आपल्या प्रकर्त्यांवर दावा लावणे अभिकर्त्यांना, किंवा आपल्या जमीनमालकांवर दावा लावणे कुळांना, या आदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे शक्य होते, असे मानण्यात येणार नाही.

उदाहरणे

(क) रत्नांची एक पेटी "क" आपला अभिकर्ता "ख" याच्याकडे ठेव म्हणून ठेवतो. "क" ने ती रत्ने आपल्याकडून गैरपणे मिळवली होती असे अभिकथन "ग" करतो आणि ती मिळावी अशी "ख" कडे मागणी करतो. "क" आणि "ग" यांच्याविरुद्ध "ख" अंतर्वाद दावा सुरू करू शकत नाही.

---

१. सन १९७६ च्या अधिनियम १०४ च्या कलम ८२ (पाच) अन्वये हा मजकूर सामाविष्ट करण्यात आला.

(ख) रत्नांची एक पेटी "क" आपला अभिकर्ता "ख" कडे ठेव म्हणून ठेवतो. "क" त्यानंतर, त्याने "ग" ला देय असलेल्या ऋणासाठी प्रतिभूती म्हणून ती रत्ने देण्यासाठी "ग" ला पत्र लिहितो. त्यानंतर "ग" ला देय असलेल्या आपल्या ऋणाची फेड झाली आहे असे अभिकथन "क" करतो आणि "ग" त्याविरुद्ध अभिकथन करतो. दोघेही "ख" कडून रत्ने मिळण्यासाठी हक्क मागणी करतात. "ख" ला, "क" आणि "ग" यांच्याविरुद्ध अंतर्वाद दावा दाखल करता येईल.

वादीच्या खर्चाचा प्रभार.

६. दावा योग्य रीतीने दाखल करण्यात आला असल्यास, न्यायालयाला, हक्कमागणी करण्यात आलेल्या गोष्टींवर मूळ वादीचा प्रभार ठेवून किंवा इतर कोणत्याही परिणामकारक रीतीने मुळ वादीच्या खर्चासाठी तरतूद करता येईल.

आदेश छत्तिसावा

विशेष प्रकरणे

न्यायालयाच्या अभिप्रायासाठी प्रकरणाचे निवेदन करण्याची शक्ती.

१. (१) कोणत्याही तथ्यविषयक किंवा कायदेविषयक प्रश्नाच्या निर्णयामध्ये हितसंबंध असल्याचा हक्कमागणी करणाऱ्या पक्षकारांना लेखी करार करून त्याद्वारे न्यायालयाच्या अभिप्रायासाठी अशा प्रश्नाचे प्रकरणाच्या स्वरूपात निवेदन करता येईल आणि असे उपबंध करता येतील की, अशा प्रश्नाच्या संबंधात न्यायालयाने निष्कर्ष काढल्यानंतर,—

(क) पक्षकारांनी निश्चित केलेली किंवा न्यायालयाने ठरवून द्यावयाची पैशाची रक्कम पक्षकारांपैकी एका पक्षकाराने त्यांपैकी दुसऱ्या पक्षकारास दिली पाहिजे; किंवा

(ख) करारामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली जंगम अथवा स्थावर अशी कोही मालमत्ता पक्षकारांपैकी एका पक्षकाराने त्यांपैकी दुसऱ्या पक्षकाराकडे सुपूर्द केली पाहिजे; किंवा

(ग) पक्षकारांपैकी एका किंवा अधिक पक्षकारांनी, करारामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली अन्य एखादी विशिष्ट कृती केली पाहिजे किंवा ती करण्यापासून परावृत्त राहिले पाहिजे.

(२) या नियमान्वये निवेदन करण्यात आलेल्या प्रत्येक प्रकरणाची परिच्छेदांमध्ये विभागणी करून त्यांना पाठोपाठचे क्रमांक दिले पाहिजेत आणि त्या प्रकरणाद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाचा निर्णय न्यायालयाला करता यावा यासाठी आवश्यक असतील अशा तथ्यांचे त्या प्रकरणात संक्षिप्तपणे कथन केले पाहिजे आणि आवश्यक अशा दस्तऐवजांचा त्यात विनिदश केला पाहिजे.

विषयवस्तूंच्या मूल्यांचे कथन केल्हा केले पाहिजे.

२. कोणत्याही मालमत्तेच्या सुपूर्दगीसाठी किंवा कोणतीही विशिष्ट कृती करण्यापासून परावृत्त राहण्यासाठी करार करण्यात आलेला असल्यास, सुपूर्द करावयाचा मालमत्तेचा किंवा विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कृतीचा जिच्याशी संबंध आहे त्या मालमत्तेच्या, अंदाजित मूल्याचे त्या करारामध्ये कथन केले पाहिजे.

करार दाखल करून त्याची दावा म्हणून नोंद करणे.

३. (१) यात यापूर्वी अंतर्भूत केलेल्या नियमांनुसार करार तयार करण्यात आलेला असेल तर, तो करार [१][एका अर्जासह], कराराच्या विषयवस्तूच्या रकमेइतकी किंवा मूल्याइतकी रक्कम किंवा मूल्य ज्या दाव्याच्या विषयवस्तूचे असेल तो दावा विचारार्थ स्वीकारण्यास ज्या न्यायालयास अधिकारिता असेल, त्या न्यायालयात दाखल करता येईल.

(२) [२][अर्ज] अशा रीतीने दाखल करण्यात आल्यानंतर हितसंबंधित असल्याचा दावा सांगणाऱ्या पक्षकारांपैकी एक किंवा अधिक पक्षकार वादी म्हणून आणि दुसरा किंवा दुसरे पक्षकार प्रतिवादी म्हणून असतील असा दावा म्हणून त्या अर्जास क्रमांक देऊन त्याची नोंद केली पाहिजे, आणि [३][तो अर्ज ज्याने सादर केला होता] तो किंवा ते पक्षकार यांव्यतिरिक्त करारातील अन्य सर्व पक्षकारांना नोटीस दिली पाहिजे.

पक्षकार न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असणे.

४. करार दाखल करण्यात आला असल्यास त्या करारातील पक्षकार न्यायालयाच्या अधिकारितेस अधीन असतील आणि त्यात अंतर्भूत असलेली कथने त्यांच्यावर बंधनकारक असतील.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८३(एक)(क) अन्वये सदर मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. (वरील अधिनियमाच्या) कलम ८३ (एक) (ख) (एक) अन्वये "करारपत्र" याऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

३. वरील अधिनियमाच्या कलम ८३ (एक) (ख) (दोन) अन्वये "तो सादर केला होता" याऐवजी दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून.)

५. (१) नेहमीच्या रीतीने सुरू करण्यात आलेल्या दाव्याप्रमाणे असे प्रकरण सुनावणीसाठी ठेवले पाहिजे, आणि या संहितेचे उपबंध अशा दाव्याला, ते लागू होण्याजोगे असतील तेथवर, लागू केले पाहिजेत. प्रकरणाची सुनावणी आणि ते निकालात काढणे.

(२) पक्षकारांची तपासणी केल्यानंतर, किंवा न्यायालयास योग्य वाटेल असा पुरावा घेतल्यानंतर, न्यायालयाची जेव्हा अशी खात्री होईल की,—

(क) पक्षकारांनी तो करार यथोचित रीतीने निष्पादित करून दिलेला होता,

(ख) प्रकरणामध्ये कथन केलेल्या प्रश्नामध्ये पक्षकारांचा खराखुरा हितसंबंध आहे, आणि

(ग) तो प्रश्न निर्णय करण्यास योग्य आहे,

तेव्हा न्यायालयाने, सर्वसाधारण दाव्यात ज्या रीतीने न्यायनिर्णय अधिघोषित करण्यात येतो त्याच रीतीने त्या प्रकरणात न्यायनिर्णय अधिघोषित करण्याची कार्यवाही केली पाहिजे आणि अशा रीतीने जाहीर करण्यात आलेल्या न्यायनिर्णयानुसार हुकूमनामा नंतर काढण्यात येईल.

[१][६. नियम ५ अन्वये देण्यात आलेल्या हुकूमनाम्याविरुद्ध कोणतेही अपील करता येणार नाही.] नियम ५ अन्वये देण्यात आलेल्या हुकूमनाम्यावर अपील नाही.

आदेश सदतिसावा

[२]* * * संक्षिप्त प्रक्रिया

[१][संक्षिप्त प्रक्रिया]

हा आदेश ज्यांना लागू व्हावयाचा ती न्यायालये आणि ते दाव्यांचे वर्ग.

[३][१. (१) हा आदेश पुढील न्यायालयांना लागू केला पाहिजे, ती न्यायालये म्हणजे,—

(क) उच्च न्यायालये, शहर दिवाणी न्यायालये व लघुवाद न्यायालये ; आणि

(ख) इतर न्यायालये :

परंतु, खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या न्यायालयांच्या बाबतीत, उच्च न्यायालयास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या आदेशाचे लागू होणे त्यास योग्य वाटेल अशा प्रवर्गातील दाव्यांपुरतेच केवळ निर्बंधित करता येईल आणि प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे शासकीय राजपत्रातील नंतरच्या अधिसूचनेद्वारे वेळोवेळी त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, हा आदेश लागू करण्याच्या कक्षेत आणावयाचे दाव्यांचे प्रवर्ग आणखी निर्बंधित करता येतील, वाढविता येतील किंवा त्यात बदल करता येईल.

[३][१. (१) हा आदेश पुढील न्यायालयांना लागू केला पाहिजे तो न्यायालये म्हणजे,—

(क) उच्च न्यायालये, शहर दिवाणी न्यायालये व लघुवाद न्यायालये; आणि

(ख) उच्च न्यायालयाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, या बाबतीत विशेष रीत्या अधिकार दिले असतील अशी इतर न्यायालये :

परंतु, खंड (ख) मध्ये निर्देशिलेल्या न्यायालयांच्या बाबतीत, उच्च न्यायालयास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या आदेशाचे लागू होणे केवळ त्यास योग्य वाटेल अशा प्रवर्गातील दाव्यांपुरतेच निर्बंधित करता येईल आणि प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे शासकीय राजपत्रातील त्यानंतरच्या अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे हा आदेश लागू करण्याच्या कक्षेत आणावयाचे दाव्यांचे प्रवर्ग आणखी निर्बंधित करता येतील, वाढविता येतील किंवा त्यात बदल करता येईल.]

(२) पोटनियम (१) च्या उपबंधांना अधीन राहून, हा आदेश पुढील वर्गातील दाव्यांना लागू आहे :—

(क) विनिमयपत्रे, हुंड्या आणि वचनचिठ्ठ्या यांच्या वरील दावे;

(ख) ज्या दाव्यांमध्ये वादीला,—

(एक) लेखी संविदेवरून; अथवा

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८३ (दोन) अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

२. (वरिल अधिनियमाच्या) कलम ८४ (एक) द्वारे "परक्राम्य लेखांवरील" हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८४ (दोन) द्वारे मूळ नियम १ ऐवजी दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६ खंड ९५ अन्वये बदली दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

(दोन) वसूल करून मागितलेली रक्कम ही पैशाची ठराविक रक्कम असेल किंवा शास्ती व्यतिरिक्त अन्य ऋणाच्या स्वरूपाची रक्कम असेल तेथे अधिनियमितीवरून; अथवा

(तीन) मुद्दलावरील हक्क मागणी केवळ ऋणाच्या किंवा निर्धारित मागणीच्या संबंधात असेल तेथे हमीवरून उद्भवणारे, प्रतिवादीकडून व्याजासह किंवा व्याजाविना प्रदेय असलेले ऋण किंवा पैशाच्या स्वरूपातील निर्धारित मागणी केवळ वसूल करावयाची असेल ते दावे.]

संक्षिप्त दावे दाखल करणे.

[२. (१) हा आदेश लागू होणारा असा एखादा दावा याखालील पद्धतीने चालू ठेवण्याची वादीची इच्छा असेल तर, तो दावा पुढील गोष्टी अंतर्भूत असलेले वादपत्र सादर करून दाखल करता येईल, त्या गोष्टी म्हणजे,—

(क) दावा या आदेशान्वये दाखल करण्यात आला आहे अशा आशयाचे विशेष प्रकथन ;

(ख) या आदेशाच्या कक्षेत येत नसलेल्या कोणत्याही वादीची हक्कमागणी वादपत्रामध्ये करण्यात आलेली नाही, असा मजकूर ; आणि

(ग) दाव्याच्या शीर्षकामध्ये दाव्याच्या क्रमांकाच्या लगेच खाली पुढील उत्कीर्ण लेख :—

"(दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश सदतीस अन्वये)."

संक्षिप्त दावे दाखल करणे.

[२. (१) विनिमयपत्रे, हुंड्या आणि वचन् चिठ्ठ्या यांच्यावरील सर्व दावे किंवा ज्या दाव्यांमध्ये लेखी संविदेवरून किंवा वसूल करून मागितलेली रक्कम ही पैशाची ठराविक रक्कम असेल किंवा शास्ती-व्यतिरिक्त अन्य ऋणाच्या स्वरूपाची रक्कम असेल तेथे अधिनियमितीवरून, किंवा मुद्दलावरील हक्क-मागणी केवळ ऋणाच्या किंवा निर्धारित मागणीच्या संबंधात असेल तेथे हमीवरून उद्भवणारे, वादीला प्रतिवादीकडून व्याजासह किंवा व्याजाविना प्रदेय असलेले ऋण किंवा पैशाच्या स्वरूपातील निर्धारित मागणी केवळ वसूल करावयाची असेल असे सर्व दावे, जर याखालील पद्धतीने चालू ठेवण्याची वादीची इच्छा असेल तर, तो दावा या आदेशान्वये दाखल करण्यात आला आहे अशा आशयाचे विशेष प्रकथन, या आदेशाच्या कक्षेत येत नसलेल्या कोणत्याही वादीची हक्कमागणी वादपत्रामध्ये करण्यात आलेली नाही आणि दाव्याच्या शीर्षकामध्ये दाव्याच्या क्रमांकाच्या लगेच खाली पुढील उत्कीर्ण लेख "(दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश सदतीस अन्वये)" हा मजकूर अंतर्भूत असलेले वादपत्र सादर करून दावा दाखल करता येईल, मात्र समन्स परिशिष्ट 'ख' मधील नमुना क्रमांक ४ मध्ये किंवा वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा इतर नमुन्यात असले पाहिजे.

(२) दाव्याचे समन्स परिशिष्ट "ख" मधील नमुना क्रमांक ४ मध्ये किंवा वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा इतर नमुन्यात असले पाहिजे.

(२) समन्स विहित नमुन्यात (म्हणजे, परिशिष्ट 'ख' मधील नमुना क्रमांक ४ मध्ये) असेल अशा बाबतीत, प्रतिवादीने उपस्थितिपत्र दाखल केल्याखेरीज आणि असा प्रतिवाद करण्यासाठी पात्र ठरूदे उपबंधित केल्याप्रमाणे न्यायालयाची किंवा न्यायाधीशाची परवानगी घेतल्याखेरीज, दाव्यात बचाव करता येणार नाही, आणि त्याने उपस्थितिपत्र दाखल करण्यात आणि बचावासाठी अशी परवानगी घेण्यास कसूर केल्यास, वादपत्रातील अभिकथने कबूल करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि समन्समध्ये नमूद केलेल्या रकमेपेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम व तिच्यावरोबर (कोणताही दर विनिर्दिष्ट केलेला असल्यास) विनिर्दिष्ट दराने हुकूमनाम्याच्या दिनांकापर्यंतचे व्याज व उच्च न्यायालय त्या संबंधात करण्यात आलेल्या नियमांनुसार वेळोवेळी ठरवील अशी खर्चाबद्दल द्यावयाची रक्कम, यासाठी हुकूमनामा मिळविण्याचा वादीस हक्क असेल आणि अशा हुकूम-नाम्याची अंमलबजावणी साबडतोब करता येईल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८४ (तीन) अन्वये बदलीदाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी ६३२४/६० दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ९७ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

(३) प्रतिवादीने उपस्थितिपत्र दाखल केलेले नसेल तर, त्याला पोटनियम (१) मध्ये निर्देशिलेल्या दाव्यामध्ये बचाव करता येणार नाही ; आणि त्याने उपस्थितिपत्र दाखल करण्यात कसूर केल्यास, वादपत्रातील अभिकथने कबूल करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि समन्समध्ये नमूद केलेल्या रकमेपेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम व तिच्यावरोबर, कोणताही दर विनिर्दिष्ट करण्यात आलेला असल्यास त्या दराने हुकूमनाम्याच्या दिनांकापर्यंतचे व्याज व उच्च न्यायालय, त्या संबंधात करण्यात आलेल्या नियमांनुसार वेळोवेळी ठरवील अशी खर्चाबद्दल द्यावयाची रक्कम, यांसाठी हुकूमनामा मिळण्यास वादी हक्कदार असेल आणि अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी ताबडतोब करता येईल.]

प्रतिवादीच्या उपस्थितीसाठी कार्यपद्धती.

[१][३. (१) हा आदेश लागू होणाऱ्या दाव्यामध्ये वादीने प्रतिवादीवर नियम २ अन्वयेच्या समन्सबरोबर वादपत्र आणि त्याची जोडपत्रे यांची प्रत बजावली पाहिजे आणि प्रतिवादीला, अशा बजावणीपासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही वेळी स्वत: जातीने किंवा वकिलामार्फत, उपस्थितिपत्र दाखल करता येईल; आणि दोहोंपैकी कोणत्याही बाबतीत त्याने त्याच्यावर बजावावयाच्या नोटिसांसाठी न्यायालयामध्ये त्याचा पत्ता दप्तरदाखल केला पाहिजे.

[१][३. (१) वादीने प्रतिवादीवर नियम २ अन्वये समन्स प्राधिलेखाबरोबर वादपत्र आणि त्यासोबत जोडलेल्या निशाण्या यांची प्रतही बजावली पाहिजे आणि प्रतिवादीला, अशा बजावणीपासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही वेळी उपस्थितिपत्र दाखल करता येईल. प्रतिवादीला उपस्थितिपत्र एकतर स्वत: जातीने किंवा वकिलामार्फत दाखल करता येईल. यांपैकी कोणत्याही बाबतीत, बजावणीसाठीचा त्याचा पत्ता उपस्थिती ज्ञापनात दिला पाहिजे आणि अन्य प्रकारे आदेश देण्यात आले नसतील तर, प्रतिवादीवर बजावणे आवश्यक असलेली सर्व समन्से, नोटिसा किंवा इतर न्यायिक आदेशिका या जर पत्त्यावर बजावणीसाठी पाठविण्यात आल्या असतील तर त्यांची रीतसर बजावणी करण्यात आली असल्याचेमानण्यात येईल. उपस्थितिपत्र दाखल केल्याच्या दिवशी उपस्थितीची नोटीस वादीच्या वकिलाला (किंवा वादीने स्वत: जातीने दावा दाखल केला असेल तर वादीला स्वत:ला) दिली पाहिजे. ही नोटीस वादीच्या वकिलाच्या किंवा, प्रकरणपरत्वे वादीच्या पत्त्यावर सुपूर्द केली पाहिजे किंवा अगाऊ टपाल हशील भरलेल्या पत्राद्वारे पाठविली पाहिजे.

प्रतिवादीवर समन्स प्राधिलेख बजावणे व प्रतिवादीची उपस्थिती.

(२) अन्यथा आदेश देण्यात आलेला नसेल तर, प्रतिवादीवर बजावणे आवश्यक असलेली सर्व समन्से, नोटिसा आणि अन्य न्यायिक आदेशिका, या अशा बजावणीसाठी त्याने दिलेल्या पत्त्यावर ठेऊन देण्यात आल्या असतील तर, त्या त्याच्यावर रीतसर बजावण्यात आलेल्या आहेत, असे मानण्यात येईल.

(२) प्रतिवादीने उपस्थितिपत्र दाखल केले तर, वादीने त्यानंतर परिशिष्ट "ख" मधील नमुना क्रमांक ४ मध्ये किंवा वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा इतर नमुन्यामध्ये, न्यायनिर्णयासाठीचे समन्स बजावले पाहिजे. हे समन्स कारवाईचे कारण आणि हक्कमागणी केलेली रक्कम यांचे सत्यापन करणाऱ्या व त्याच्या विश्वासाप्रमाणे दाव्यात कोणत्याही बचावास वाव नाही असे नमूद करणाऱ्या शपथाद्वारे पुष्टी देऊन बजावणीच्या दिनांकापासून दहापेक्षा कमी नसतील इतक्या दिवसांत परत पाठवण्यायोग्य असेल.

न्यायनिर्णयासाठी समन्स.

(३) उपस्थितिपत्र दाखल केल्याच्या दिवशी प्रतिवादीने अशा उपस्थितिपत्राची नोटीस वादीच्या वकिलाला किंवा वादीने स्वत: जातीने दावा दाखल केला असेल तर, वादीला स्वत:ला दिली पाहिजे. ही नोटीस वादीच्या वकिलाच्या किंवा, प्रकरणपरत्वे वादीच्या पत्त्यावर सुपूर्द केली पाहिजे किंवा आगाऊ टपाल हशील भरलेल्या पत्राद्वारे पाठविली पाहिजे.

(३) प्रतिवादीला अशा न्यायनिर्णयासाठीच्या समन्सच्या बजावणीपासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, त्याला बचावास हक्कदार करण्यास पुरेशी असल्याचे मानण्यात येईल अशी तथ्ये शपथपत्राद्वारे किंवा अन्यथा उघड करून, अशा दाव्यामध्ये बचाव करण्याच्या परवानगीसाठी अशा समन्सवर अर्ज करता येईल. त्याला बचावाची परवानगी बिनशर्त किंवा न्यायालयाला किंवा न्यायधीशाला योग्य वाटतील अशा शर्तींवर दिली जाऊ शकेल.

प्रतिवादीने बचावाच्या परवानगीसाठी अर्ज करणे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८४(चार) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६३२४/६०, दिनांक ३० जून १९६६, खंड ९८ द्वारे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

(४) प्रतिवादीने उपस्थितिपत्र दाखल केले तर वादीने त्यानंतर परिशिष्ट "ख." मधील नमुना क्रमांक ४ क मध्ये किंवा वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा इतर नमुन्यामध्ये न्यायनिर्णयासाठीचे समन्स बजावले पाहिजे. हे समन्स, कारवाईचे कारण आणि हक्कमागणी केलेली रक्कम यांचे सत्यापन करणाऱ्या व त्याच्या विश्वासाप्रमाणे दाव्यात कोणत्याही बचावास वाव नाही असे नमूद करणाऱ्या शपथपत्राद्वारे पुष्टी देऊन, बजावणीच्या दिनांकापासून दहापेक्षा कमी नसतील इतक्या दिवसांत परत पाठवण्यायोग्य असेल.

(४) न्यायनिर्णयासाठीच्या समन्सच्या सुनावणीच्या वेळी,—

सुनावणी व न्यायनिर्णय.

(क) प्रतिवादीने बचावाच्या परवानगीसाठी अर्ज केला नसेल किंवा असा अर्ज करण्यात आला असून तो नाकारण्यात आला असेल तर वादीला ताबडतोब न्यायनिर्णय मिळण्याचा हक्क असेल; किंवा

(ख) प्रतिवादीला संपूर्ण हक्कमागणीबाबत किंवा तिच्या भागाबाबत बचाव करण्याची परवानगी दिलेली असल्यास न्यायालय किंवा न्यायाधीश असे निदेश देऊ शकेल की, त्याने प्रतिभूती देण्यात (कोणतीही असल्यास) किंवा न्यायालयाने किंवा न्यायाधीशाने दिलेले असतील अशा इतर निदेशांचे, आदेशामध्ये मर्यादित केलेल्या मुदतीत पालन करण्यात, कसूर घडल्यास, वादीला ताबडतोब न्यायनिर्णय मिळण्याचा हक्क असेल.

(५) प्रतिवादीला, अशा न्यायनिर्णयासाठीच्या समन्सच्या बजावणीपासून दहा दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, त्याला बचावास हक्कदार करण्यास पुरेशी असल्याचे मानण्यात येईल अशी तथ्ये शपथपत्राद्वारे किंवा अन्यथा उघड करून, अशा दाव्यामध्ये बचाव करण्याच्या परवानगीसाठी अशा समन्सवर अर्ज करता येईल आणि त्याला अशी बचावाची परवानगी बिनशर्त किंवा न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला योग्य वाटतील अशा अटींवर दिली जाऊ शकेल :

परंतु, प्रतिवादीला भरीव बचाव देणे शक्य नाही किंवा त्याने प्रस्तुत करण्याचे ठरवलेला बचाव क्षुल्लक किंवा तापदायक आहे असे, त्याने उघड केलेली तथ्ये दर्शवत नाहीत, अशी न्यायालयाची खात्री झाल्यास, बचावाची परवानगी नाकारता येणार नाही :

परंतु आणखी असे की, वादीने हक्कमागणी केलेल्या रकमेचा एखादा भाग आपणाकडून देय असल्याचे प्रतिवादीने कबूल केल्यास, अशा रीतीने देय असल्याचे कबूल केलेल्या रकमेचा प्रतिवादीने न्यायालयात भरणा केल्याशिवाय दाव्यामध्ये बचाव करण्याची परवानगी देता येणार नाही.

(५) या नियमाच्या पोट नियम (१) खाली उपस्थितिपत्र दाखल करण्यास किंवा पोट नियम (३) खाली दाव्यात बचाव करण्यास परवानगी मागण्यास झालेला विलंब पुरेशा कारणावरून न्यायालयाला माफ करता येईल.]

उपस्थितिपत्र दाखल करण्यातील किंवा बचावासाठी परवानगी मागण्यातील विलंब क्षमापित करता येईल.

(६) न्यायनिर्णयासाठीच्या अशा समन्सच्या सुनावणीच्या वेळी,—

(क) प्रतिवादीने बचावाच्या परवानगीसाठी अर्ज केलेला नसेल किंवा असा अर्ज केलेला असेल व तो नाकारण्यात आला असेल तर वादीला ताबडतोब न्यायनिणय मिळण्याचा हक्क असेल ; किंवा

(ख) संपूर्ण हक्कमागणीबाबत किंवा तिच्या कोणत्याही भागाबाबत बचाव करण्याची परवानगी प्रतिवादीला दिलेली असल्यास न्यायालय किंवा न्यायाधीश निश्चित करील अशी प्रतिभूती, निश्चित करण्यात येईल अशा मुदतीत देण्याचा निदेश न्यायालय किंवा न्यायाधीश त्याला देऊ शकेल आणि न्यायालयाने किंवा न्यायाधीशाने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत अशी प्रतिभूती देण्यात किंवा न्यायालयाने किंवा न्यायाधीशाने दिलेले असतील अशा इतर निदेशांचे पालन करण्यात कसूर केल्यास, वादीला ताबडतोब न्यायनिर्णय मिळण्याचा हक्क असेल.

(७) प्रतिवादीने दाखवलेल्या पुरेशा कारणासाठी न्यायालयाला किंवा न्यायाधीशाला, उपस्थितिपत्र दाखल करण्यात किंवा दाव्यात बचाव करण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज करण्यात झालेला विलंब माफ करता येईल.]

४. हुकूमनामा दिल्यानंतर न्यायालयाला खास परिस्थितीत तो रद्द करता येईल, आणि आवश्यक असल्यास, त्याची अंमलबजावणी स्थगित किंवा रद्द करता येईल आणि प्रतिवादीला, समन्स मिळाल्यावरून उपस्थित राहण्याची व दाव्यात बचाव देण्याची परवानगी देणे न्यायालयाला उचित वाटल्यास, न्यायालयाला, त्यास योग्य वाटतील अशा अटींवर तसे करता येईल. हुकूमनामा रद्द करण्याची शक्ती.

५. या आदेशान्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीत, न्यायालयाला, तो वाद ज्यावर आधारलेला असेल ते विपत्र, हुंडी किंवा चिठ्ठी याचा, न्यायालयाच्या एखाद्या अधिकाऱ्याकडे ताबडतोब भरणा करावा असा आदेश देता येईल आणि वादी सर्व कार्यवाहीच्या खर्चासाठी प्रतिभूती देईपर्यंत ती कार्यवाही स्थगित करण्यात आली पाहिजे, असा आणखी आदेश देता येईल. विपत्र, इत्यादींचा न्यायालयाच्या अधिकाऱ्याकडे भरणा करण्याचा आदेश देण्याची शक्ती.

६. अवमानलेल्या प्रत्येक विपत्राच्या किंवा वचनचिठ्ठीच्या धारकाला अशा विपत्राच्या किंवा चिठ्ठीच्या रकमेच्या वसुलीसाठी या नियमावलीअन्वये जे उपाय योजण्याची शक्ती आहे, तेच उपाय योजण्याची शक्ती, अशा अवमानण्यामुळे त्या विपत्राचा किंवा चिठ्ठीचा अस्वीकार झाल्याबद्दल किंवा प्रदान न झाल्याबद्दल किंवा अन्य काही झाल्याबद्दल त्याबाबत अधिटिप्पणी करण्यासाठी केलेल्या खर्चाची वसुली करण्यासाठी असेल. अवमानलेले विपत्र किंवा चिठ्ठी यांच्या अस्वीकाराची अधिटिप्पणी करण्याच्या खर्चाची वसुली.

७. या आदेशान्वये उपबंधित करण्यात आले असेल त्याव्यतिरिक्त, याखालील दाव्यांमधील कार्यपद्धती ही सर्वसाधारण रीतीने सुरू करण्यात आलेल्या दाव्यांतील कार्यपद्धतीप्रमाणेच असेल. दाव्यामधील कार्यपद्धती.

आदेश अडतिसावा

न्यायनिर्णयापूर्वी अटक करणे व जप्त करणे

न्यायनिर्णयापूर्वी अटक करणे

१. कलम १६, खंड (क्) ते (घ्) यांमध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाच्या दाव्याव्यतिरिक्त, अन्य दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये शपथपत्रावरून किंवा अन्य रीतीने न्यायालयाची जर अशी खात्री होईल की,— उपस्थित राहण्याबद्दल प्रतिभूती देण्यास प्रतिवादीला कोणत्या बाबतीत आज्ञा करता येईल.

(क्) प्रतिवादी हा, वादीला विलंब करण्याच्या किंवा न्यायालयाची कोणतीही आदेशिका चुकवण्याच्या किंवा त्याविरुद्ध देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याच्या बजावणीत अडथळा आणण्याच्या अथवा त्या बजावणीला विलंब लावण्याच्या उद्देशाने,—

(एक) पराग़ंदा झालेला आहे किंवा त्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधून निघून गेलेला आहे, अथवा

(दोन) परागंदा होण्याच्या किंवा न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधून निघून जाण्याच्या बेतात आहे, अथवा

(तीन) त्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधून त्याने त्याच्या मालमत्तेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा विनियोग केलेला आहे किंवा ती मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग हलवलेला आहे, अथवा

(ख्) प्रतिवादी भारतातून निघून गेल्यामुळे, दाव्यात प्रतिवादीच्या विरुद्ध देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यात वादीला अडथळा येईल किंवा विलंब होईल किंवा तसे होण्याची शक्यता असेल अशी रास्त संभाव्यता निर्माण होईल अशा परिस्थितीत प्रतिवादी [1][भारतातून] निघून जाण्याच्या बेतात आहे,

अशा बाबतीत, न्यायालयाला प्रतिवादीच्या अटकेचे वॉरंट काढता येईल आणि प्रतिवादीने त्याच्या उपस्थितीसाठी प्रतिभूती का देऊ नये याबाबतचे कारण दाखवण्यासाठी त्याला न्यायालयासमोर आणता येईल :

---

१. सन १९५१ चा अधिनियम २, कलम ३ अन्वये "राज्यातून" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

परंतु, वादीची हक्कमागणी पूर्ण करण्यास जी रक्कम पुरेशी असल्याचे वॉरंटामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले असेल अशा कोणत्याही रकमेचे प्रदान प्रतिवादीने, त्या वॉरंटाच्या बजावणीचे काम सोपवण्यात आलेल्या अधिकाऱ्याला केले, तर प्रतिवादीला अटक करता कामा नये; आणि न्यायालयाने, अशी रक्कम, दावा निकालात काढण्यात येईपर्यंत किंवा न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत निक्षेप म्हणून ठेवून घेतली पाहिजे.

प्रतिभूती.

२. (१) प्रतिवादीने असे कारण दाखवण्यात कसूर केली तर न्यायालयाने प्रतिवादीला, त्याच्या विरुद्ध असलेली हक्कमागणी पूर्ण करण्यास पुरेसे असतील इतक्या पैशांचा किंवा अन्य मालमत्तेचा न्यायालयात निक्षेप करण्याचा, किंवा दावा प्रलंबित असेपर्यंत आणि दाव्यामध्ये त्याच्याविरुद्ध देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याची पूर्ती करण्यात येईपर्यंत ज्या कोणत्याही वेळी त्याला बोलावण्यात येईल त्यावेळी तो उपस्थित राहील याबद्दल प्रतिभूती देण्याचा आदेश दिला पाहिजे किंवा लगतपूर्व नियमाच्या परंतुकान्वये प्रतिवादीने प्रदान केलेली असेल अशा रकमेच्या संबंधात न्यायालयाने, त्यास योग्य वाटेल असा आदेश दिला पाहिजे.

(२) प्रतिवादीच्या उपस्थितीसाठी जामीन राहणाऱ्या प्रत्येक जामीनदाराने, अशा उपस्थितीत कसूर केल्यास, प्रतिवादीला दाव्यात पैशाच्या ज्या कोणत्याही रकमेचे प्रदान करण्याचा आदेश देण्यात येईल त्या रकमेचे प्रदान करण्याचे बंधन स्वत:वर घालून घेतले पाहिजे.

आबंधनातून मुक्त करण्यात यावे यासाठी जामीनदाराने केलेल्या अर्जावरील कार्यपद्धती.

३. (१) प्रतिवादीच्या उपस्थितीसाठी जामीन राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, ज्या न्यायालयात ती व्यक्ती अशा रीतीने जामीन राहिली त्या न्यायालयाकडे, तिला तिच्या आबंधनातून मुक्त केले जावे म्हणून अर्ज करता येईल.

(२) असा अर्ज करण्यात आल्यानंतर न्यायालयाने, प्रतिवादीला उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठविले पाहिजे किंवा न्यायालयाला, तसे करणे योग्य वाटले तर प्रथमत: प्रतिवादीच्या अटकेचे वॉरंट काढता येईल.

(३) समन्सानुसार किंवा वॉरंटानुसार प्रतिवादी उपस्थित झाल्यानंतर, किंवा तो स्वेच्छेने स्वाधीन झाल्यानंतर न्यायालयाने, जामीनदाराला त्याच्या आबंधनातून मुक्त करण्यात यावे असा निदेश दिला पाहिजे, आणि प्रतिवादीला नवीन प्रतिभूती शोधण्यासाठी आज्ञा केली पाहिजे.

प्रतिवादीने प्रतिभूती देण्यात किंवा नवीन प्रतिभूती शोधण्यात कसूर केल्यास त्याबाबतीत करावयाची कार्यपद्धती.

४. नियम २ किंवा नियम ३ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यात प्रतिवादीने कसूर केल्यास न्यायालयाला, दाव्याचा निर्णय होईपर्यंत, किंवा प्रतिवादीविरुद्ध हुकूमनामा देण्यात आला असल्यास, हुकूमनाम्याची पूर्ती होईपर्यंत, प्रतिवादीला दिवाणी कारागृहात पाठविता येईल :

परंतु, कोणत्याही प्रकरणी, कोणत्याही व्यक्तीला या नियमान्वये सहा महिन्यांपेक्षा अधिक काळपर्यंत त्याचप्रमाणे दाव्याच्या विषयवस्तूची रक्कम किंवा मूल्य पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल तेव्हा सहा आठवड्यांपेक्षा अधिक काळपर्यंत कारागृहात ठेवता कामा नये :

परंतु असेही की, कोणत्याही व्यक्तीने अशा आदेशांचे अनुपालन केल्यानंतर तिला या नियमान्वये कारागृहात अडकवून ठेवता कामा नये :

न्यायनिर्णयापूर्वीची जप्ती

प्रतिवादीला मालमत्ता हजर करण्याबद्दल प्रतिभूती देण्याची आज्ञा केव्हा करता येईल.

५. (१) दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये, शपथपत्रावरून किंवा अन्यथा न्यायालयाची जर अशी खात्री झाली की, प्रतिवादीविरुद्ध देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत अडथळा करण्याच्या किंवा त्या अंमलबजावणीस विलंब लावण्याच्या उद्देशाने, प्रतिवादी,—

(क) त्याच्या संपूर्ण मालमत्तेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा विनियोग करण्याच्या बेतात आहे, किंवा

(ख) त्याची संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमधून हलवण्याच्या बेतात आहे,

तर न्यायालयास प्रतिवादीला असा निदेश देता येईल की, प्रतिवादीने न्यायालय निश्चित करील अशा मुदतीत, उक्त मालमत्ता किंवा तिचे मूल्य किंवा हुकूमनाम्याची पूर्ती करण्यास पुरेसा होईल इतका त्या मालमत्तेचा भाग, फर्माविण्यात येईल तेव्हा हजर करून न्यायालयाच्या स्वाधीन करण्यासाठी, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेची प्रतिभूती द्यावी किंवा, प्रतिवादीने प्रतिभूती का देऊ नये याबद्दलचे कारण स्वत: उपस्थित होऊन द्यावे.

(२) न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नाही तर वादीने, जप्त करणे आवश्यक असलेली मालमत्ता व तिचे अंदाजित मूल्य यांचा विनिर्देश केला पाहिजे.

(३) न्यायालयाला अशा आदेशात अशा रीतीने विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या संपूर्ण मालमत्तेच्या किंवा तिच्या भागाच्या सशर्त जप्तीचा निदेश देता येईल.

[१][(४) या नियमाच्या पोटनियम (१) च्या उपबंधांचे अनुपालन न करता जप्तीचा आदेश देण्यात आल्यास अशी जप्ती रद्दबातल ठरेल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८५ (एक) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

कारण दाखवण्यात आलेले नसल्यास किंवा प्रतिभूती देण्यात आलेली नसल्यास जप्ती.

६. (१) न्यायालयाने निश्चित केलेल्या मुदतीत प्रतिवादीने प्रतिभूती का देऊ नये याबद्दलचे कारण दाखवण्यात कसूर केल्यास किंवा फर्मावण्यात आलेली प्रतिभूती देण्यात कसूर केल्यास, न्यायालयाला विनिर्दिष्ट करण्यात आलेली मालमत्ता किंवा तिचा जो भाग, दाव्यात देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याची पूर्ती करण्यास पुरेसा असल्याचे दिसत असेल तो भाग, जप्त करण्यात यावा असा आदेश देता येईल.

(२) प्रतिवादीने असे कारण दाखविल्यास किंवा आवश्यक असलेली प्रतिभूती दिल्यास आणि विनिर्दिष्ट करण्यात आलेली मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग जप्त करण्यात आलेला असल्यास न्यायालयाने जप्ती मागे घेण्याचा आदेश दिला पाहिजे किंवा त्याला आवश्यक वाटेल असा अन्य आदेश दिला पाहिजे.

कारण दाखवण्यात आलेले नसल्यास किंवा प्रतिभूती देण्यात आलेली नसल्यास जप्ती.

६. (१) न्यायालयाने निश्चित केलेल्या मुदतीत प्रतिवादीने प्रतिभूती का देऊ नये याबद्दलचे कारण दाखवण्यात कसूर केल्यास किंवा फर्माविण्यात आलेली प्रतिभूती देण्यात कसूर केल्यास, न्यायालयाला विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता, किंवा तिचा जो भाग, दाव्यात देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याची पूर्ती करण्यास पुरेसा असल्याचे दिसत असेल तो भाग, जप्त करण्यात यावा असा आदेश देता येईल.

[१][(२) प्रतिवादीने असे कारण दाखविल्यास किंवा आवश्यक असलेली प्रतिभूती दिल्यास किंवा एखादी गोष्ट करण्याची किंवा न करण्याची न्यायालयाला हमी दिल्यास आणि विनिर्दिष्ट करण्यात आलेली मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग जप्त करण्यात आलेला असल्यास न्यायालयाने जप्ती मागे घेण्याचा आदेश दिला पाहिजे किंवा त्याला आवश्यक वाटेल असा अन्य आदेश दिला पाहिजे.]

जप्ती करण्याची पद्धती.

७. अन्यथा स्पष्टपणे उपबंधित केली असेल त्याव्यतिरिक्त, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना मालमत्ता जप्त करण्यासाठी उपबंधित केलेल्या रीतीने जप्ती करण्यात आली पाहिजे.

न्यायनिर्णयापूर्वी जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेवरील हक्कमागणीचा अभिनिर्णय.

[१][८. न्यायनिर्णय होण्यापूर्वी जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेवर कोणतीही हक्कमागणी दाखल करण्यात आली असल्यास त्या हक्कमागणीचा अभिनिर्णय, पैशाच्या प्रदानासाठी देण्यात आलेल्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेवरील हक्कमागण्यांच्या अभिनिर्णयासाठी यात यापूर्वी जी रीत उपबंधित केलेली असेल त्याच रीतीने करण्यात आला पाहिजे.]

प्रतिभूती दिल्यास किंवा दावा फेटाळल्यास जप्ती दूर करणे.

९. न्यायनिर्णय होण्यापूर्वी जप्तीचा आदेश देण्यात आलेला असल्यास, जर प्रतिवादीने जप्तीच्या खर्चासाठी द्यावयाच्या प्रतिभूतीसह आवश्यक ती प्रतिभूती दिली किंवा दावा फेटाळण्यात आला तर, न्यायालयाने जप्ती मागे घेण्याचा आदेश दिला पाहिजे.

न्यायनिर्णयापूर्वीच्या जप्तीमुळे तिऱ्हाईतांच्या अधिकारांवर परिणाम होणार नाही किंवा हुकूमनामाधारकाला विक्रीसाठी अर्ज करण्यास प्रतिबंध होणार नाही.

१०. न्यायनिर्णय होण्यापूर्वी करण्यात आलेल्या जप्तीमुळे त्या दाव्यातील पक्षकार नसलेल्या व्यक्तींचे जे अधिकार जप्तीपूर्वी अस्तित्वात होते त्या अधिकारावर परिणाम होणार नाही, किंवा प्रतिवादीविरुद्ध देण्यात आलेला हुकूमनामा धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करून जप्त करावयाच्या मालमत्तेची विक्री करण्यात यावी असा अर्ज करण्यास प्रतिबंध होणार नाही.

न्यायनिर्णयापूर्वी जप्त केलेली मालमत्ता हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना पुन्हा जप्त न करणे.

११. या आदेशाच्या उपबंधांच्या आधारे, एखादी मालमत्ता जप्त झालेली असल्यास आणि त्यानंतर वादीच्या बाजूने हुकूमनामा देण्यात आला असल्यास, अशा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज करण्यात आला असताना त्या मालमत्तेची पुन्हा जप्ती करण्यासाठी अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८५ (दोन) अन्वये बदलीदाखल करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी--०१०२/७७, दि. ५ सप्टेंबर १९८३ सुधारणा (१) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

जप्तीला उपबंध लागू असणे.

[1][११क. (१) हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या जप्तीस लागू होणारे या संहितेचे उपबंध, न्यायनिर्णयापूर्वी केलेली जी जप्ती नियम ११ च्या उपबंधांच्या आधारे न्यायनिर्णयानंतर चालू राहते त्या जप्तीला शक्य होईल तेथवर लागू होतील.

(२) कसुरीमुळे फेटाळण्यात आलेल्या दाव्यामध्ये न्यायनिर्णयापूर्वी केलेली जप्ती, केवळ कसुरीमुळे दावा फेटाळण्याचा आदेश बाजूला सारण्यात आला आहे व दावा प्रत्यास्थापित करण्यात आला आहे या कारणावरून पुनरुज्जीवित करता येणार नाही.]

कृषि उत्पन्न न्यायनिर्णयापूर्वी जप्त करता येण्याजोगे नसणे.

१२. या आदेशामधील कोणतीही गोष्ट, शेतकऱ्याच्या कब्जात असलेले कोणतेही कृषि उत्पन्न जप्त करण्यात यावे यासाठी अर्ज करण्यास वादीला प्राधिकृत करते किंवा न्यायालयाला असे उत्पन्न जप्त अथवा हजर करण्याचा आदेश देण्याची शक्ती प्रदान करते, असे मानण्यात येणार नाही.

लघुवाद न्यायालयाने स्थावर मालमत्ता जप्त न करणे.

[2][१३. या आदेशामधील कोणतीही गोष्ट कोणत्याही, लघुवाद न्यायालयाला स्थावर मालमत्तेच्या जप्तीचा आदेश देण्याची शक्ती प्रदान करते, असे मानण्यात येणार नाही.]

आदेश एकोणचाळिसावा

तात्पुरते मनाईहुकूम आणि वादकालीन आदेश

तात्पुरते मनाईहुकूम

ज्या प्रकरणांमध्ये तात्पुरते मनाईहुकूम देता येतील ती प्रकरणे.

१. कोणत्याही दाव्यात शपथपत्रावरून किंवा अन्यथा,—

(क) एखाद्या दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेचा दाव्यातील कोणत्याही पक्षकाराकडून अपव्यय केला जाण्याचा, तिचे नुकसान केले जाण्याचा किंवा ती अन्यक्रामित केली जाण्याचा अथवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना तिची गैरपणे विक्री केली जाण्याचा धोका असल्याचे, अथवा

(ख) प्रतिवादी त्याच्या धनकोची [3][फसवणूक करण्याच्या] दृष्टीने त्याची मालमत्ता हलवण्याची किंवा तिची विल्हेवाट लावण्याची धमकी देत आहे किंवा ती मालमत्ता तशा रीतीने हलवण्याचा किंवा तिची विल्हेवाट लावण्याचा त्याचा उद्देश असल्याचे,

[4][(ग) दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात प्रतिवादी, वादीला त्याचा कब्जा काढून घेण्याची धमकी देत आहे अथवा त्याविषयी अन्यथा वादीला क्षती पोचवत आहे,]

असे सिद्ध करण्यात आल्यास न्यायालयाला, दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाईपर्यंत, अशी कृती निरुद्ध करण्यासाठी आदेशाद्वारे तात्पुरता मनाईहुकूम देता येईल, किंवा अशा मालमत्तेचा अपव्यय, नुकसान, अन्यक्रामण, विक्री, ती हलवणे अथवा तिची विल्हेवाट लावणे, [5][किंवा दाव्यातील कोणत्याही वादग्रस्त मालमत्तेच्या संबंधात वादीकडून कब्जा काढून घेणे किंवा अन्यथा वादीला क्षती पोचवणे] या गोष्टी स्थगित करण्याच्या आणि त्यांना प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनासाठी, न्यायालयाला योग्य वाटेल असा अन्य आदेश देता येईल.

संविदेच्या भंगाची पुनरावृत्ती किंवा भंग करण्याचे चालू ठेवणे निरुद्ध करण्यासाठी मनाईहुकूम.

२. (१) संविदेचा भंग करण्यास किंवा कोणत्याही प्रकारची अन्य क्षती पोचवण्यास प्रतिवादीला निरुद्ध करण्यासाठी केलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये,—मग त्या दाव्यामध्ये भरपाईची मागणी करण्यात आलेली असो वा नसो,—दावा सुरू करण्यात आल्यानंतर कोणत्याही वेळी आणि एकतर न्यायनिर्णय होण्यापूर्वी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, ज्याबद्दल तक्रार करण्यात आली तो करार भंग करण्यास किंवा ती क्षती पोचवण्यास, किंवा त्याच करारातून उद्भवणाऱ्या किंवा त्याच मालमत्तेशी अथवा अधिकाराशी संबंधित अशा त्याचप्रकारच्या संविदेचा कोणत्याही प्रकारे भंग करण्यास किंवा क्षती पोचवण्यास प्रतिवादीला निरुद्ध करण्यासाठी तात्पुरता मनाईहुकूम मिळावा म्हणून वादीला न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८५ (तीन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९२६ चा अधिनियम १, कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८६ (एक) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ८६ (एक) (ख) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ८६ (एक) (ग) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

(२) न्यायालयाला, आदेश काढून त्याद्वारे, असा मनाईहुकूम, मनाईहुकूमाचा कालावधी, हिशेब ठेवणे, प्रतिभूती देणे किंवा अन्यथा याबाबत न्यायालयास योग्य वाटतील अशा अटींवर, देता येईल.

[१][* * * * *]

[१][* * * *]

मनाईहुकमाची अवज्ञा अथवा भंग केल्याचा परिणाम.

[२][२ क. (१) नियम १ किंवा नियम २ अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही मनाईहुकूमाची किंवा काढण्यात आलेल्या अन्य आदेशाची अवज्ञा अथवा मनाईहुकूम किंवा आदेश ज्या अटींवर देण्यात आला त्यापैकी कोणत्याही अटीचा भंग होईल त्या प्रकरणी, मनाईहुकूम देणाऱ्या किंवा आदेश काढणाऱ्या न्यायालयास अथवा दावा किंवा कार्यवाही ज्याच्याकडे हस्तांतरित करण्यात आली असेल त्या कोणत्याही न्यायालयास, अशा अवज्ञेबद्दल किंवा भंगाबद्दल दोषी असलेल्या व्यक्तीची मालमत्ता जप्त करण्याचा आदेश देता येईल आणि तसेच, अशा व्यक्तीला तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतीकरिता दिवाणी कारागृहात स्थानबद्ध करण्याचा आदेश देता येईल. मात्र, दरम्यानच्या काळात न्यायालयाने त्या व्यक्तीला सोडून देण्याचा निदेश दिला नसेल तर,

(२) या नियमान्वये करण्यात आलेली कोणतीही जप्ती एक वर्षापेक्षा अधिक काळ अंमलात राहणार नाही ; या काळाच्या अखेरीस अवज्ञा किंवा भंग चालू राहिला तर जप्त करण्यात आलेली मालमत्ता विकता येईल आणि आलेल्या उत्पन्नातून न्यायालयाने, त्यास योग्य वाटेल अशी भरपाई क्षतिग्रस्त पक्षकाराला देवविली पाहिजे आणि काही शिल्लक राहिल्यास ती, त्या शिलकीस हक्कदार असलेल्या पक्षकाराला दिली पाहिजे.]

मनाईहुकूम देण्यापूर्वी न्यायालयाने, विरुद्ध पक्षकाराला नोटीस देण्याविषयी निदेश देणे.

३. सर्व प्रकरणांमध्ये न्यायालयाने, मनाईहुकूम देण्यापूर्वी मनाईहुकूमासाठी आलेल्या अर्जाबद्दलची नोटीस विरुद्ध पक्षकाराला देण्याविषयी निदेश दिला पाहिजे, मात्र, विलंब झाल्यास व्यादेश देण्याचा उद्देश विफल होईल असे दिसत असेल तेव्हा नोटीस दिली नाही तरी चालेल :

[३][परंतु, विरुद्ध पक्षकाराला अर्जाबद्दलची नोटीस न देता मनाईहुकूम देण्याचे प्रस्तावित केले असेल त्याबाबतीत न्यायालयाने, विलंब झाल्यास मनाईहुकूम देण्याचा उद्देश विफल होईल असे आपले मत होण्याची कारणे अभिलिखित केली पाहिजेत आणि अर्जदारास असे फर्माविले पाहिजे की,—

(क) मनाईहुकूमाचा आदेश काढण्यात आल्यानंतर अर्जदाराने ताबडतोब,—

(एक) अर्जाच्या पुष्टचर्थ दाखल केलेल्या शपथपत्राची प्रत ;

(दोन) वादपत्राची प्रत ; आणि

(तीन) अर्जदार ज्यांच्यावर अवलंबून असेल त्या दस्तऐवजांच्या प्रती,

यांसह, मनाईहुकूम मिळण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत विरुद्ध पक्षकाराकडे सुपूर्द करावी किंवा त्याच्याकडे नोंदणीकृत डाकेने पाठवावी, आणि

(ख) असा मनाईहुकूम ज्या दिवशी दिला असेल त्याच दिवशी किंवा त्या दिवसांच्या लगतनंतरच्या दिवशी अर्जदाराने पूर्वोक्त प्रती अशा रीतीने सुपूर्द करण्यात किंवा पाठवण्यात आल्या आहेत असे नमूद केलेले शपथपत्र अर्जदाराने दाखल करावे.]

मनाईहुकमासाठी करण्यात आलेला अर्ज न्यायालयाने तीस दिवसांच्या आत निकालात काढावा.

[४][३ क. विरुद्ध पक्षकाराला नोटीस न देता मनाईहुकूम दिलेला असल्यास, मनाईहुकूम ज्या दिवशी दिला होता त्या दिवसापासून तीस दिवसांच्या आत अर्ज अंतिमरीत्या निकालात काढण्यासाठी न्यायालयाने प्रयत्न केले पाहिजेत, आणि तसे करणे न्यायालयाला शक्य न झाल्यास, अशा असमर्थतेबद्दलची आपली कारणे अभिलिखित केली पाहिजेत.]

मनाईहुकमाचा आदेश काढून टाकता येईल, त्यात बदल करता येईल किंवा तो रद्द ठरविता येईल.

४. मनाईहुकूमाच्या कोणत्याही आदेशामुळे असंतुष्ट झालेल्या कोणत्याही पक्षकाराने न्यायालयाकडे केलेल्या अर्जावरून न्यायालयाला असा आदेश काढून टाकता येईल किंवा त्यात बदल करता येईल किंवा तो रद्द ठरविता येईल :

---

१. सन १९७६ च्या अधिनियम १०४ च्या कलम ८६ (दोन) अन्वये पोटनियम (३) व (४) वगळण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८६ (तीन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८६ (चार) अन्वये समाविष्ट करण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

४. वरील अधिनियमाच्या कलम ८६ (पाच) अन्वय समाविष्ट करण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

[१][परंतु, तात्पुरत्या मनाईहुकुमासाठी करण्यात आलेल्या एखाद्या अर्जात किंवा अशा अर्जाला पुष्टी देणाऱ्या कोणत्याही शपथपत्रात एखाद्या पक्षकाराने महत्त्वाच्या तपशिलाच्या संबंधात खोटे किंवा दिशाभूल करणारे कथन जाणूनबुजून केलेले असेल आणि विरुद्ध पक्षकाराला नोटीस न देता मनाईहुकूम देण्यात आलेला असेल तर, न्यायालयाने तो रहित केला पाहिजे. न्यायाचे हित लक्षात घेता, मनाईहुकूम रहित करण्याची आवश्यकता नाही असे न्यायालयाला वाटले तर कारणे अभिलिखित करून असा मनाईहुकम चालू ठेवता येईल :

परंतु आणखी असे की, एखाद्या पक्षकाराला आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्यानंतर मनाईहुकुमाचा आदेश देण्यात आला असल्यास, त्या पक्षकाराने केलेल्या अर्जावरून असा आदेश काढून टाकणे, त्यात बदल करणे किंवा तो रद्द ठरविणे, हे परिस्थितीत झालेल्या बदलामुळे आवश्यक झाले असेल किंवा अशा आदेशामुळे त्या पक्षकाराला गैरवाजवी कष्टावस्था प्राप्त झालेली आहे अशी न्यायालयाची खात्री झाली असेल त्या व्यतिरिक्त इतर प्रकरणी, असा आदेश अशा प्रकारे काढून टाकता येणार नाही, त्यात बदल करता येणार नाही किंवा तो रद्द ठरविता येणार नाही.]

महामंडळाला देण्यात आलेला मनाईहुकूम त्याच्या अधिकाऱ्यांवर बंधनकारक असणे.

५. महामंडळाला उद्देशून काढण्यात आलेला मनाईहुकूम केवळ खुद्द महामंडळावरच नव्हे तर, मनाईहुकूम ज्यांच्या वैयक्तिक कृती विरुद्ध करू पाहत असेल त्या, महामंडळाच्या सर्व सदस्यांवर आणि अधिकाऱ्यांवर देखील बंधनकारक राहील.

वाद्कालीन आदेश

अंतरिम विक्रीचा आदेश देण्याची शक्ती.

६. दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने केलेल्या अर्जावरून न्यायालयाला असा आदेश देता येईल की, अशा दाव्याची विषयवस्तू असलेली किंवा अशा दाव्यात न्यायनिर्णयापूर्वी जप्त करण्यात आलेली जी कोणतीही जंगम मालमत्ता वेगाने आणि निसर्गतःच नाश पावण्यासारखी असेल, किंवा इतर कोणत्याही न्याय्य व पुरेशा कारणासुळे जिची ताबडतोब विक्री करणे इष्ट असेल त्या जंगम मालमत्तेची, उक्त आदेशात नाव देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने, न्यायालयास योग्य वाटेल अशा रीतीने व अशा अटींवर विक्री करावी.

दाव्याची विषयवस्तू अटकावून ठेवणे, तिचे जतन करणे, पहाणी करणे, इत्यादी.

७. (१) एखाद्या दाव्यातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावरून आणि न्यायालयास योग्य वाटतील अशा अटींवर, न्यायालयाला,—

(क्) अशा दाव्याची विषयवस्तू असलेली किंवा त्या दाव्यात जिच्या संबंधात कोणताही प्रश्न उपस्थित होईल अशी कोणतीही जंगम मालमत्ता अटकावून ठेवणे, तिचे जतन किंवा पहाणी करणे, इत्यादीसाठी आदेश देता येईल ;

(ख्) पूर्वोक्त अशा सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी, कोणत्याही व्यक्तीला अशा दाव्यातील इतर कोणत्याही पक्षकाराच्या कब्जात असलेल्या कोणत्याही जमिनीवर किंवा इमारतीमध्ये प्रवेश करण्याचा प्राधिकार देता येईल ; आणि

(ग्) पूर्वोक्त अशा सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी, संपूर्ण माहिती किंवा पुरावा मिळण्यासाठी आवश्यक किंवा समयोचित वाटेल त्याप्रमाणे कोणतेही नमुने घेण्याचा किंवा कोणतेही अभिक्षण करण्याचा किंवा प्रयोग करून बघण्याचा प्राधिकार देता येईल.

(२) आदेशिकेच्या बजावणीबाबतचे उपबंध योग्य त्या फेरफारांसह, या नियमान्वये प्रवेश करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींना लागू होतील.

अशा आदेशासाठी करावयाचा अर्ज नोटिशीनंतर करणे.

८. (१) नियम ६ किंवा नियम ७ अन्वयेच्या आदेशाकरिता वादीने करावयाचा अर्ज [२][* * *] दावा दाखल केल्यानंतर कोणत्याही वेळी करता येईल.

(२) तशाच आदेशाकरिता प्रतिवादीने करावयाचा अर्ज, [३][* * *] उपस्थित झाल्यानंतर कोणत्याही वेळी करता येईल.

[४][(३) नियम ६ किंवा नियम ७ अन्वयेच्या आदेशासाठी करण्यात आलेल्या अर्जावरून त्या प्रयोजनार्थ आदेश देण्यापूर्वी न्यायालयाने त्या आदेशाची नोटीस विरुद्ध पक्षकाराला देण्यात यावी असा निदेश दिला पाहिजे. मात्र विलंब झाल्यास असा आदेश देण्याचा उद्देश विफल होईल असे दिसत असेल तेव्हा नोटीस दिली नाही तरी चालेल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८६ (सहा) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८६ (सहा) (क्) अन्वये " प्रतिवादीला-नोटीस दिल्यानंतर " हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अ‍ॅ नियमांच्या कलम ८६ (सहा) (ख्) अन्वये " वादीला नोटीस दिल्यानंतर " हा मजकूर वगळण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

४. वरील अधिनियमाच्या कलम ८६ (सहा) (ग्) अन्वये समाविष्ट करण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

दाव्याची विषयवस्तू असलेली जमीन पक्षकाराच्या तात्काळ कब्जात केव्हा देता येईल.

९. शासनाला महसूल देणारी जमीन किंवा विक्रीस पात्र असलेली भूधृती एखाद्या दाव्याची विषयवस्तू असल्यास, अशा जमिनीचा किंवा भूधृतीचा कब्जा असलेल्या पक्षकाराने शासकीय महसुलाचे, किंवा प्रकरणपरत्वे, भूधृतीच्या मालकाच्या देय असलेल्या खंडाचे प्रदान करण्यात हयगय केली आणि परिणामी अशा जमिनीची किंवा भूधृतीची विक्री करण्याचा आदेश देण्यात आला, तर अशा जमिनीमध्ये किंवा भूधृतीमध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगणाऱ्या, दाव्यातील अन्य कोणत्याही पक्षकाराकडे, त्याने विक्रीच्या अगोदर देय असलेल्या महसुलाचे किंवा खंडाचे प्रदान केल्यानंतर (आणि न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयानुसार प्रतिभूती देऊन किंवा प्रतिभूतीविना) जमिनीचा किंवा भूधृतीचा तात्काळ कब्जा देता येईल ;

आणि न्यायालयाला, कसूरदाराने अशा रीतीने प्रदान करण्यात आलेली रक्कम तिच्यावर न्यायालयास योग्य वाटेल अशा दराने होणाऱ्या व्याजासह द्यावी, असा कसूरदाराविरुद्ध हुकूमनामा काढता येईल किंवा न्यायालयाला अशा रीतीने प्रदान करण्यात आलेल्या रकमेचा, न्यायालय आदेश देईल अशा दराने त्यावरील व्याजासह, दाव्यामध्ये देण्यात आलेल्या हुकूमनाम्यात लेख्यांचे जे कोणतेही समायोजन करण्याचा निदेश देण्यात येईल त्या समायोजनात प्रभार ठेवता येईल.

न्यायालयात पैसा, इत्यादींचा निक्षेप करणे.

१०. एखाद्या दाव्याची विषयवस्तू, पैसा असेल किंवा जी सुपूर्द करता येईल अशी अन्य एखादी वस्तू असेल आणि त्या दाव्यातील कोणताही पक्षकार, दुसऱ्या पक्षकाराचा विश्वस्त म्हणून त्याने असा पैसा किंवा अन्य वस्तू जवळ ठेवलेली आहे अथवा ती दुसऱ्या पक्षकाराच्या मालकीची किंवा त्याला देय आहे असे कबूल करीत असेल त्याबाबतीत, न्यायालयाला असा आदेश देता येईल की, न्यायालय आणखी निदेश देईल त्यांच्या अधीन राहून, त्या पशाचा किंवा त्या वस्तूचा, न्यायालयात निक्षेप करण्यात यावा किंवा प्रतिभूतीसह किंवा प्रतिभूतीविना तो पैसा किंवा ती वस्तू अशा शेवटी नाव दिलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द करण्यात यावी.

न्यायालयाच्या आदेशांचा भंग करणाऱ्या आणि न्यायालयाला दिलेल्या अभिवचनाचा भंग करणाऱ्या पक्षकारासंबंधीची कार्यपद्धती.

[१][११. (१) जेव्हा न्यायालयाने कोणत्याही दाव्यातील किंवा कार्यवाहीतील पक्षकाराला दावा किंवा कार्यवाही प्रलंबित असताना एखादी गोष्ट करण्याचा किंवा न करण्याचा आदेश दिला असेल किंवा जेव्हा कोणत्याही दाव्यातील किंवा कार्यवाहीतील पक्षकाराने, दावा किंवा कार्यवाही प्रलंबित असताना एखादी गोष्ट करण्याची किंवा न करण्याची हमी दिली असेल अशा पक्षकाराने त्या आदेशाच्या बाबतीत एखादी कसूर केली किंवा आदेशांचे उल्लंघन केले किंवा अशा अभिवचनाचा भंग वादी कडून किंवा अपीलदाराकडून झाला असेल तर दावा किंवा कार्यवाही फेटाळून लावता येईल किंवा जर अशी कसूर किंवा उल्लंघन किंवा अभिवचनाचा भंग, प्रतिवादी किंवा प्रतिपक्षाकडून झाला असेल तर त्याचा बचाव काढून टाकता येईल.

(२) न्यायालयाला, पुरेसे कारण दाखवण्यात आल्यास, आणि त्याला लादण्यास योग्य वाटतील अशा अटी व शर्ती लादून जर वर उल्लेख केलेल्या कसुरीसाठी किंवा उल्लंघनासाठी किंवा अभिवचनाच्या भंगासाठी जबाबदार असलेल्या पक्षकाराने न्यायालयाचे समाधान होईल अशा रीतीने कसुरीची किंवा उल्लंघनाची किंवा अभिवचनाच्या भंगाची सुधारणा केली तर प्रकरणपरत्वे, दावा किंवा कार्यवाही परत चालवता येईल किंवा प्रतिवादीची बाजू ऐकता येईल :

परंतु, या पोटनियमानुसार, असा आदेश देण्यापूर्वी, असा आदेश दिल्यामुळे बाधा पोचणाऱ्या पक्षकाराला नोटीस दिली पाहिजे.]

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (एक) अन्वये भर घालण्यात आली.

आदेश वीसावा

प्रापकांची नियुक्ती

प्रापकांची नियुक्ती.

१. (१) न्यायालयास, त्याला न्याय्य व सोयीचे वाटेल तेथे आदेशाद्वारे,—

(क) कोणत्याही मालमत्तेच्या प्रापकाची हुकूमनाम्याच्या पूर्वी किंवा त्यानंतर नियुक्ती करता येईल,

(ख) कोणत्याही व्यक्तीच्या कब्जातून किंवा अभिरक्षेतून अशी मालमत्ता काढून घेता येईल,

(ग) ती मालमत्ता प्रापकाच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा व्यवस्थापनात देता येईल, आणि

(घ) दावे दाखल करणे व दाव्यात बचाव देणे यासंबंधात आणि मालमत्तेचे स्थावरीकरण, व्यवस्थापन, संरक्षण, जतन व तिची सुधारणा, तिचा खंड व नफा गोळा करणे, असा खंड व नफा यांचे उपयोजन आणि विनियोग व दस्तऐवज निष्पादित करणे यांसाठी खुद्द मालकाला ज्या शक्ती असतात त्या सर्व शक्ती किंवा अशा शक्तींपैकी न्यायालयाला योग्य वाटतील त्या शक्ती, प्रापकास प्रदान करता येतील.

(२) ज्या कोणत्याही व्यक्तीच्या कब्जातून किंवा अभिरक्षेतून मालमत्ता काढून घेण्याचा वर्तमान अधिकार दाव्यातील कोणत्याही पक्षकाराला नसेल त्या व्यक्तीच्या कब्जातून किंवा अभिरक्षेतून अशा प्रकारे मालमत्ता काढून घेण्याचा प्राधिकार न्यायालयाला या नियमातील कोणत्याही गोष्टीमुळे मिळणार नाही.

पारिश्रमिक.

२. न्यायालयाला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, प्रापकाच्या सेवेसाठी पारिश्रमिक म्हणून प्रदान करावयाची रक्कम निश्चित करता येईल.

कर्तव्ये.

३. अशा रीतीने नियुक्त करण्यात आलेल्या प्रत्येक प्रापकाने,—

(क) मालमत्तेच्या संबंधात त्याला जे मिळेल त्याचे रीतसर हिशेब देण्यासाठी न्यायालयास योग्य वाटेल अशी प्रतिभूती (असल्यास) दिली पाहिजे;

(ख) न्यायालय निदेश देईल अशा कालावधींनी आणि अशा नमुन्यात त्याचे लेखे सादर केले पाहिजेत;

(ग) न्यायालय निदेश देईल अशा, त्याच्याकडून देय असलेल्या रकमेचे प्रदान केले पाहिजे, आणि

(घ) त्याच्या बुद्धिपुरस्सर कसुरीमुळे किंवा अक्षम्य हयगयीमुळे मालमत्तेला जी कोणतीही हानी पोचली असेल त्याबाबत जबाबदार राहिले पाहिजे.

प्रापकाच्या कर्तव्यांची बजावणी.

४. एखादा प्रापक,—

(क) न्यायालय निदेश देईल अशा कालावधीनी आणि अशा नमुन्यात, त्याचे हिशेब देण्यात कसूर करील, किंवा

(ख) न्यायालय निदेश देईल अशा त्याने देय असलेल्या रकमेचे प्रदान करण्यात कसूर करील, किंवा

(ग) त्याच्या बुद्धिपुरस्सर कसुरीमुळे किंवा अक्षम्य हयगयीमुळे मालमत्तेला हानी पोचवील,

तर न्यायालयाला, प्रापकाची मालमत्ता जप्त करण्यात यावी, असा निदेश देता येईल आणि अशा मालमत्तेची विक्री करता येईल आणि प्रापकाकडून येणे असल्याचे आढळून आलेल्या कोणत्याही रकमेची किंवा त्याने पोचवलेल्या कोणत्याही हानीची भरपाई करण्यासाठी ती उपयोजित करता येईल आणि काही शिल्लक राहिल्यास न्यायालयाने तिचे प्रदान प्रापकाला केले पाहिजे.

प्रापकाच्या कर्तव्यांची अंमलबजावणी.

[१][४. (१) प्रापकाने त्याचे हिशेब, न्यायालय निदेश देईल अशा कालावधीत आणि अशा स्वरूपात सादर करण्यामध्ये कसूर केल्यास न्यायालयास, त्याने त्याचे हिशेब, आदेश दिलेल्या स्वरूपात सविस्तर सादर करीपर्यंत, त्याची मालमत्ता जप्त करण्याचा आदेश देता येईल.

(२) न्यायालयास, ज्यामध्ये प्रापकाची नियुक्ती करण्यात आली असेल अशा कोणत्याही दाव्यातील किंवा कार्यवाहीतील कोणत्याही पक्षकाराच्या सांगण्यावरून किंवा आपण होऊन, न्यायालयाद्वारे त्याला कार्यमुक्त केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांपेक्षा अधिक नसलेल्या अशा कोणत्याही वेळी, त्याच्या हिशेबाद्वारे किंवा अन्यथा दाखवल्याप्रमाणे, प्रापकाकडून किती रक्कम, तशी रक्कम असल्यास, देय आहे किंवा मालमत्तेची कोणतीही हानी त्याच्या हेतुपुरस्सर कसुरीमुळे किंवा अक्षम्य हयगयीमुळे झाली आहे किंवा काय, यासंबंधी चौकशी करता येईल आणि प्रापकाकडून देय असल्याचे आढळून आलेली रक्कम किंवा अशा प्रकारे झालेल्या हानीची रक्कम प्रापकाने न्यायालयामध्ये किंवा अन्यथा, न्यायालयाने निश्चित करावयाच्या कालावधीत देण्याबाबत आदेश देता येईल. अशा कोणत्याही चौकशीमध्ये दाव्यातील किंवा कार्यवाहीतील सर्व

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा, (१) अन्वये बदली दाखल करण्यात आले.

पक्षकारांना व प्रापकांना पक्षकार केले जाईल. चौकशीची नोटीस पूर्वप्रदान केलेल्या नोंदणीकृत टपालाने, प्रापकाकरिता कोणताही जामीनदार असल्यास त्याच्या पोचपत्राकरिता दिली पाहिजे. मात्र, न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नसल्यास, जामीनदाराने त्याच्या उपस्थितीचा खर्च स्वत: सोसला पाहिजे :

परंतु असे की, जेथे हिशेबांवर पक्षकारांनी हरकत घेतली असेल आणि ते गुंतागुंतीच्या स्वरूपाचे असतील किंवा जेथे, प्रापकाच्या हेतुपुस्सर कसुरीमुळे किंवा अक्षम्य हयगयीमुळे मालमत्तेस हानी पोहोचल्याचे अभिकथित केले असेल तेथे, न्यायालयास पक्षकाराकडे निर्देश करता येईल अशा सर्व प्रकरणांत, न्यायालयाने अशा निर्देशाची कारणे लेखी नमूद केली पाहिजेत.

(३) या नियमाच्या पोटनियम (२) अन्वये, प्रापकाने, त्याने द्यावी म्हणून त्याला आदेश दिलेली कोणतीही रक्कम आदेशात निश्चित केलेल्या कालावधीत देण्यात कसूर केल्यास न्यायालयास, अशी रक्कम एकतर, त्याने नियम ३ अन्वये दिलेल्या प्रतिभूतीतून (तशी प्रतिभूती असल्यास) किंवा तिची जप्ती आणि विक्री करून किंवा, जर या नियमाच्या पोटनियम (१) अन्वये मालमत्ता जप्त करण्यात आली असेल तर, अशा जप्त केलेल्या मालमत्तेची विक्री करून, वसूल करण्याचा आदेश देता येईल आणि विक्रीची रक्कम, त्याच्याकडून देय असलेली कोणतीही रक्कम किंवा त्याच्याकडून झालेल्या कोणत्याही हानीची रक्कम वसूल करण्यासाठी उपयोजिता येईल, आणि विक्रीच्या उत्पन्नातील शिल्लक रक्कम (तशी रक्कम असल्यास) ती न्यायालयाने प्रापकाला दिली पाहिजे.]

जिल्हाधिकाऱ्याची प्रापक म्हणून केव्हा नियुक्ती करता येईल.

५. मालमत्ता म्हणजे शासनाला महसूल देणारी जमीन, किंवा जिचा महसूल अभिहस्तांकित करण्यात आला आहे किंवा त्याचे विमोचन करण्यात आले आहे अशी जमीन असेल आणि जिल्हाधिकाऱ्याने त्या मालमत्तेची व्यवस्था पाहिल्यास संबंधितांच्या हितसंबंधांचे प्रवर्धन होईल, असे न्यायालयास वाटेल तेथे, न्यायालयास, जिल्हाधिकाऱ्याच्या संमतीने त्याची अशा मालमत्तचा प्रापक म्हणून नेमणूक करता येईल.

[१][आदेश चाळीसावा-क

मत्वधानपत्र नियम

१. कलम १४८-क खालील प्रत्येक सावधान-पत्रावर सावधानकर्त्याची किंवा त्याच्या अधिवक्त्याची स्वाक्षरी असेल आणि ते विहित नमुन्यात असेल.

२. प्रत्येक सावधानपत्र, सावधानकर्त्याने व्यक्तिश: किंवा त्याच्या अधिवक्त्यामार्फत न्याया-लयात किंवा सावधानपत्र स्वीकारण्यास प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे दाखल केले पाहिजे. जेव्हा, सावधानकर्त्याचे प्रतिनिधित्व अधिवक्ता करीत असेल

---

१. मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ च्या अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७ द्वारे आदेश चाळीस-क ने दाखल करण्यात आले.

तेव्हा, त्याच्या सावधानपत्रावरोबर त्याचा वकालतनामा असला पाहिजे. जेव्हा अधिवक्त्याला एखाद्या प्रकरणाच्या संबंधात एखाद्या पक्षकाराने काम करण्यास किंवा उपस्थित राहण्यास सांगितले असेल आणि त्याला अशिलाकडून योग्य प्रकारे स्वाक्षरी केलेल्या विहित नमुन्यातील वकालतनामा मिळवणे शक्य झाले नसेल तर, त्याला त्या प्रकरणाच्या बाबतीत काम करण्यास किंवा उपस्थित राहण्यास अशिलाकडून किंवा त्याच्यायतीने सूचना मिळाल्या असल्याचे प्रतिवादपत्र त्याला दाखल करता येईल आणि त्याचबरोबर पक्षकाराची योग्य प्रकारे स्वाक्षरी असलेला विहित नमुन्यातील वकालतनामा एक आठवड्याच्या आत सादर करण्याची हमी देता येईल.

३. नियम २ अन्वये दाखल करण्यात आलेल्या सावधानपत्राची खाली दर्शवण्यात आलेल्या नमुन्यातील नोंदणीपुस्तकात नोंद केली पाहिजे. कार्यवाहींच्या संबंधात कोणत्याही अनुतोषासाठी न्यायालयाला अर्ज करण्यापूर्वी त्यावर, न्यायालयाच्या कार्यालयाकडून सावधानपत्र सादर करण्यात आले आहे किंवा नाही या विषयीची नोंद असली पाहिजे.

४. (१) कलम १४८-क (२) अन्वये बजावणे आवश्यक असलेल्या नोटिशीबरोबर सावधानपत्राची प्रत बजावली पाहिजे.

(२) सावधानपत्राची नोटीस मिळाल्यावर, अर्जदाराने किंवा त्याच्या अधिवक्त्याने, सावधानकर्त्याला किंवा त्याच्या अधिवक्त्याला, त्याच्या प्रती पुरवण्याबद्दलचा खर्च कळविला पाहिजे आणि त्याला उक्त खर्च भरुन प्रती, घेऊन जाण्याची विनंती केली पाहिजे. हा खर्च, कागदाच्या खर्चासह, १०० शब्दांच्या एका फोलीओला २५ पैसे या दराने आकारण्यात येईल.

५. कोणत्याही कार्यवाहीतील अनुतोषासाठी केलेल्या प्रत्येक अर्जासोबत, कलम १४८-क(२) अन्वये अर्जदाराला कोणतीही नोटीस मिळालेली नाही किंवा मिळाली असल्यास, अर्जदाराने सावधानकर्त्याला कलम १४८-क(४) द्वारे आवश्यक असलेल्या अर्जाच्या पृष्टयर्थ सादर केलेल्या कागदपत्राच्या किंवा दस्तऐवजांच्या प्रतींसह अर्जाच्या प्रती पुरवल्या आहेत किंवा नाहीत, याबाबतचे अर्जदाराचे शपथपूर्वक केलेले निवेदन असले पाहिजे.

६. कलम १४८-क(३) खालील नोटीस, सावधानकर्त्यावर किंवा त्याच्या अधिवक्त्यावर व्यक्तिशः किंवा टपाल दाखला घेऊन, टपालाने बजावता येईल. सावधानकर्त्याने दिलेल्या पत्त्यावर, टपाल दाखला घेऊन टपालाने पाठवलेली नोटीस, त्याच्यावर नोटीस बजावल्याबद्दलचा पुरेसा पुरावा असल्याचे समजण्यात येईल.

७. अंतरिमकालीन अनुतोषासाठी अर्ज केल्यावर, तो मंजूर करण्यास विलंब झाल्यास, त्यामागील हेतू साध्य होणार नाही असे न्यायालयाला वाटल्यास, असे मत होण्याबद्दलची कारणे न्यायालयाला नमूद करता येतील आणि अर्जदाराने अंतरिमकालीन अनुतोषासाठी केलेल्या अर्जानुसार सावधानकर्त्याला त्याचे म्हणणे ऐकण्याची संधी दिल्यानंतर पुढील आदेश देईपर्यंत, अर्जदाराला अंतरिमकालीन अनुतोष मंजूर करता येईल.

(सावधानपत्राचा नमुना)

..... येथील ..... यांच्या

न्यायालयात .....१९ चा दावा/विनंतीअर्ज/अपील क्रमांक .....

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १४८-क खालील सावधानपत्राच्या संबंधात.

..... सावधानकर्ता.

या न्यायालयाच्या १९....च्या दावा/विनंतीअर्ज/अपील क्रमांक ..... च्या प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या (किंवा त्या न्यायालयाच्या दावा/विनंतीअर्ज/अपील क्रमांक ..... याच्या संबंधात दाखल करण्यात येण्याची शक्यता असलेल्या) आणि ज्यामध्ये ..... वादी/विनंतीअर्जदार/अपीलकर्ता आहे/असेल आणि ..... हा, प्रतिवादी/उत्तरवादी आहे किंवा असेल अशा ..... करिता केलेल्या (येथे विनंती करण्यात येणाऱ्या अनुतोषाची थोडक्यात माहिती द्यावी) विनंतीअर्जाच्या संबंधात अशी प्रार्थना करण्यात येत आहे की, उपरिनामित सावधानकर्त्याला, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम १४८-क अन्वये योग्य प्रकारे नोटीस दिल्याशिवाय कोणतेही आदेश देण्यात येऊ नयेत.

बजावणीसाठी सावधानकर्त्याचा पत्ता :

.....

सावधानकर्ता न्यायालयाला अशी हमी देत आहे की, उपरोल्लिखित वादी/विनंतीअर्जदार/अपीलकार ..... यांना पोचदेय नोंदणीकृत डाकेने पुढील पत्त्यावर नोटीस पाठवील.

सावधानपत्राची नोंदवही (आदेश चाळीस-क, नियम ३)

..... येथील ..... यांचे न्यायालय,

१९..... मधील सावधानपत्रांची नोंदवही.

अनुक्रमांक	सावधानपत्राचा दिनांक	सावधान-कर्त्याचे नाव व पत्ता-व्यवहाराचा पत्ता.	सावधान-कर्त्याला अपेक्षित असलेल्या कार्यवाहीचे स्वरूप आणि ती दाखल केल्यास, तिचा क्रमांक	स्तंभ ४ मधील कार्यवाहीतील वादी अर्जदाराचे नाव	स्तंभ ४ मधील कार्यवाहीतील प्रतिवादी उत्तरवादीचे नाव	सावधान-कर्त्याने अपेक्षित केल्याप्रमाणे दाखल करण्यात आलेल्या कार्यवाहीचा दिनांक व क्रमांक	सावधान-कर्त्यावर नोटीस बजावण्याचा दिनांक	शेरा
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)

मूळ हुकूमनाम्यांवरील अपिले

अपिलाचा नमुना. ज्ञापनाबरोबर काय जावयाचे.

१. (१) प्रत्येक अपील, अपीलकर्त्याने किंवा त्याच्या वकिलाने सही केलेल्या ज्ञापनाच्या स्वरूपात दाखल करण्यात येईल आणि ते न्यायालयाकडे किंवा ते या संबंधात नेमील अशा अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल. ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याची प्रत आणि तो हुकूमनामा ज्या न्यायनिर्णयावर आधारित असेल त्या न्याय-निर्णयाची प्रत (ती प्रत नसली तरी चालू शकेल असे न्यायालयाने सांगितलेले नसेल तर), ज्ञापनाच्या सोबत सादर केली पाहिजे :

[१][परंतु, दोन किंवा अधिक दाव्यांची एकत्रित संपरीक्षा करण्यात आली असेल आणि त्यावर सामाईक न्यायनिर्णय देण्यात आलेला असेल व त्या न्यायनिर्णयामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यावर दोन किंवा अधिक अपिले दाखल करण्यात आली असतील—मग ती अपिले एकाच अपीलकर्त्याने केलेली असोत किंवा भिन्नभिन्न अपील-कर्त्यांनी केलेली असोत—तेथे अपील न्यायालयाला न्यायनिर्णयाच्या एकापेक्षा अधिक प्रती दाखल केल्या नाहीत तरी चालू शकेल, असे सांगता येईल].

ज्ञापनाचा आशय.

(२) ज्यावर अपील करण्यात आले त्या हुकूम-नाम्याबाबतच्या आक्षेपाची कारणे ज्ञापनामध्ये, कोणताही युक्तिवाद किंवा वृत्तांत न देता, थोडक्यात व विभिन्न शीर्षांखाली नमूद केलेली असली पाहिजेत, आणि अशा कारणांना पाठोपाठचे क्रमांक देण्यात आले पाहिजेत.

[२][(३) पैशाचे प्रदान करण्याबाबतच्या हुकूम-नाम्याविरुद्ध अपील करण्यात आलेले असेल तेथे, अपीलकर्त्याने अपील न्यायालय मुभा देईल अशा मुदतीत, अपिलातील वादग्रस्त रकमेचा निक्षेप केला पाहिजे किंवा तिच्या संबंधात न्यायालयास योग्य वाटेल अशी प्रतिभूती दिली पाहिजे.]

[१][१. (१) प्रत्येक अपील, अपीलकर्त्याने किंवा त्याच्या वकिलाने सही केलेल्या ज्ञापनाच्या स्वरूपात दाखल करण्यात येईल आणि ते न्यायालयाकडे किंवा ते या संबंधात नेमील अशा अधिकाऱ्याकडे सादर करण्यात येईल. ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याची प्रत आणि तो हुकूमनामा ज्या न्यायनिर्णयावर आधारित असेल त्या न्याय-निर्णयाची प्रत (ती प्रत नसली तरी चालू शकेल असे न्यायालयाने सांगितलेले नसेल तर), ज्ञापनाच्या सोबत सादर केली पाहिजे :

परंतु, दोन किंवा अधिक दाव्यांची एकत्रित संपरीक्षा करण्यात आली असेल आणि त्यावर सामाईक न्यायनिर्णय देण्यात आलेला असेल व त्या न्यायनिर्णयामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही हुकूमनाम्यावर दोन किंवा अधिक अपिले दाखल करण्यात आली असतील—मग ती अपिले एकाच अपीलकर्त्याने केलेली असोत किंवा भिन्नभिन्न अपील-कर्त्यांनी केलेली असोत—तेथे अपील न्यायालयाला, न्यायनिर्णयाच्या एकापेक्षा अधिक प्रती दाखल केल्या नाहीत तरी चालू शकेल, असे सांगता येईल.

(२) ज्यावर अपील करण्यात आले त्या हुकूम-नाम्याबाबतच्या आक्षेपाची कारणे ज्ञापनामध्ये, कोणताही युक्तिवाद किंवा वृत्तांत न देता, थोडक्यात व विभिन्न शीर्षांखाली नमूद केलेली असली पाहिजेत, आणि अशा कारणांना पाठोपाठचे क्रमांक देण्यात आले पाहिजेत.

ज्ञापनाचा आशय.

(३) पैशाचे प्रदान करण्याबाबतच्या हुकूम-नाम्याविरुद्ध अपील करण्यात आलेले असेल तेथे, अपीलकर्त्याने अपील न्यायालय मुभा देईल अशा मुदतीत, अपिलातील वादग्रस्त रकमेचा निक्षेप केला पाहिजे किंवा तिच्या संबंधात न्यायालयास योग्य वाटेल अशी प्रतिभूती दिली पाहिजे :

परंतु, न्यायालयाला पुरेशा कारणावरून योग्य वाटल्यास, ठेव किंवा प्रतिभूती माफ करता येईल.

(४) जितके उत्तरवादी असतील, त्या सर्वांवर बजावण्यासाठी अपिलांच्या संक्षेपलेखांच्या साध्या कागदावरील प्रती अपीलकर्त्याने, अपिलाच्या नोटिशीसह सादर केल्या पाहिजेत :

परंतु, अपील दाखल करून घेतल्यानंतर न्यायालय त्याबाबतीत ठरवील अशा कालावधीत अपिलाच्या संक्षेपलेखाच्या आवश्यक तितक्या प्रती दाखल करण्याची न्यायालयाला स्वेच्छानिर्णयानुसार अपीलकर्त्याला परवानगी देता येईल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८७ (एक) (क्) अन्वये जादा दाखल करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८७ (एक) (ख्) अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (१) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

अपिलात कोणती कारणे घेता येतील.

२. अपीलकर्त्याला, न्यायालयाच्या परवानगीवाचून, अपिलाच्या ज्ञापनामध्ये नमूद न केलेल्या कोणत्याही आक्षेप-कारणाच्या पुष्टयर्थ आपले म्हणणे मांडण्याचा आग्रह धरता येणार नाही किंवा त्याचे म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही, मात्र अपील न्यायालयाने, अपिलाचा निर्णय करताना, अपिलाच्या ज्ञापनामध्ये नमूद करण्यात आलेल्या किंवा या नियमान्वये न्यायालयाच्या परवानगीने घेण्यात आलेल्या आक्षेप-कारणांवरच अवलंबून राहता कामा नये :

परंतु असे की, न्यायालयाचा निर्णय ज्यास बाधक होईल त्या पक्षकाराला अन्य कोणत्याही कारणावरून त्या प्रकरणात दुरुस्त घेण्याची पुरेशी संधी मिळाल्याखेरीज न्यायालयाला आपल्या निर्णयासाठी त्या कारणाचा आधार घेता येणार नाही.

ज्ञापन फेटाळणे किंवा त्यात विशोधन करणे.

३. (१) अपिलाचे ज्ञापन यात यापूर्वी विहित केलेल्या रीतीने तयार करण्यात आलेले नसेल तेथे ते फेटाळता येईल किंवा न्यायालय निश्चित करील अशा मुदतीत त्यामध्ये विशोधन करण्यासाठी ते अपीलकर्त्याकडे परत पाठवता येईल किंवा त्यामध्ये तेथल्या तेथे विशोधन करता येईल.

(२) न्यायालय कोणतेही ज्ञापन फेटाळील तेथे ज्ञापन अशा रीतीने फेटाळण्याबाबतची कारणे त्याने अभिलिखित केली पाहिजेत.

(३) अपिलाच्या ज्ञापनामध्ये विशोधन करण्यात येईल तेथे न्यायालयाने, किंवा ते यां संबंधात नियुक्त करील अशा अधिकाऱ्याने त्यावर सही केली पाहिजे किंवा विशोधनावर आद्याक्षरी केली पाहिजे.

उशीर क्षमापित करण्यासाठी अर्ज.

[३क. (१) अपिलासाठी विनिर्दिष्ट केलेली मुदतमर्यादा संपल्यानंतर अपील सादर करण्यात येईल तेव्हा त्यासोबत एका शपथपत्राद्वारे पुष्टी देण्यात आलेला अर्ज असला पाहिजे. अपीलकर्त्यास अशा मुदतीत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबद्दल न्यायालयाची खात्री पटवण्यासाठी, अपीलकर्ता ज्या तथ्यांवर अवलंबून असेल ती तथ्ये शपथपत्रामध्ये नमूद केलेली असली पाहिजेत.

(२) उत्तरवादीला नोटीस न पाठवता अर्ज नाकारण्याचे कोणतेही कारण न्यायालयाला दिसत नसेल तर, उत्तरवादीला, अर्ज नाकारल्याबद्दलची नोटीस पाठवण्यात आली पाहिजे आणि न्यायालयाने नियम ११, किंवा, प्रकरणपरत्वे, नियम १३ याअन्वये अपिलावर कार्यवाही सुरू करण्यापूर्वी त्या बाबीचा अंतिमत: निर्णय केला पाहिजे.

(३) पोटनियम (१) अन्वये अर्ज करण्यात आलेला असेल अशा बाबतीत, नियम ११ अन्वये सुनावणी केल्यानंतर न्यायालय अपिलाची सुनावणी करण्याचे ठरवत नाही तोपर्यंत, न्यायालयाने, ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्याचे योजण्यात आले असेल त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या स्थगितीचा आदेश देता कामा नये.]

[३क. अपीलकर्ता, अंमलबजावणी करावयाचे अपील दाखल करण्यात आलेल्या उशीराबद्दल अर्ज करील अशा बाबतीत, उत्तरवादीला उशीराबद्दलची कारणे दाखवण्याची नोटीस देण्यात आली पाहिजे आणि ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर नियम १३ अन्वये अपील करण्यात आले असेल त्याला नोटीस देण्यापूर्वी अर्जाचा निर्णय करण्यात आला पाहिजे.]

अपीलकर्त्याने अपील दाखल करण्यात झालेला उशीर क्षमापित करण्यासाठी केलेला अर्ज.

सर्व वादींना किंवा प्रतिवादींना सामाईक अशा कारणावरून हुकूमनामा देण्यात आला असेल तेथे अनेक वादींपैकी किंवा प्रतिवादींपैकी एकाला संपूर्ण हुकूमनामा फिरवून घेता येईल.

४. एखाद्या दाव्यामध्ये एकापेक्षा अधिक वादी किंवा प्रतिवादी असतील, आणि ज्यावर अपील करण्यात आले तो हुकूमनामा सर्व वादींना किंवा सर्व प्रतिवादींना सामाईक अशा कोणत्याही कारणावरून देण्यात आलेला असेल तेथे, वादींपैकी किंवा प्रतिवादींपैकी कोणत्याही एका वादीला किंवा प्रतिवादीला संपूर्ण हुकूमनाम्यावर अपील करता येईल आणि त्यानंतर अपील न्यायालयाला सर्व वादींच्या किंवा, प्रकरणपरत्वे, प्रतिवादींच्या बाजूने हुकूमनामा फिरवता येईल किंवा त्यात फेरफार करता येईल.

कार्यवाहीची आणि अंमलबजावणीची स्थगिती

अपील न्यायालयाने दिलेली स्थगिती.

५. (१) एखादे अपील हे, न्यायालय आदेश देईल तेवढचा मर्यादेपर्यंत असेल ती बाब वगळून इतर बाबतीत, ज्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्यान्वयेच्या

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८७ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

१. उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी.-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड १०३ द्वारे समाविष्ट केले.

किंवा आदेशान्वयेच्या कार्यवाहीची स्थगिती म्हणून प्रवर्तित होणार नाही, किंवा हुकमनाम्यावर अपील दाखल करण्यात आलेले असल्याच्याच केवळ कारणावरून हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित केली जाणार नाही : परंतु, अपील न्यायालयास पुरेशा कारणावरून, अशा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या स्थगितीचा आदेश देता येईल.

[1][**स्पष्टीकरण.**—हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या स्थगितीसाठी अपील न्यायालयाने दिलेला आदेश हा, असा आदेश प्रारंभिक न्यायालयाला कळवल्याच्या दिनांकापासून परिणामकारक होईल, मात्र, अंमलबजावणीच्या स्थगितीचा आदेश किंवा त्याविरुद्ध अर्थाचा कोणताही आदेश मिळाल्याची पोच अपील न्यायालयाकडून मिळेपर्यंत, अपीलकर्त्याने त्याच्या वैयक्तिक माहितीच्या आधारे शपथेवर करून दिलेल्या, अपील न्यायालयाने हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या स्थगितीचा आदेश दिलेला आहे असे नमूद करणाऱ्या शपथपत्रावरून प्रारंभिक न्यायालयाने कार्यवाही केली पाहिजे.]

ज्याने हुकमनामा दिला त्या न्यायालयाने दिलेली स्थगिती.

(२) अपीलयोग्य हुकूमनाम्यावर अपील करण्यासाठी देण्यात आलेली मुदत संपण्यापूर्वी त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीची स्थगिती करण्यात यावी म्हणून अर्ज करण्यात आला असेल अशा बाबतीत, ज्याने हुकूमनामा दिला त्या न्यायालयाला, त्यास पुरेसे कारण दाखवण्यात आल्यावरून, अंमलबजावणी स्थगित करण्यात यावी असा आदेश देता येईल.

(३) अंमलबजावणीच्या स्थगितीचा आदेश देणाऱ्या न्यायालयाची पुढील गोष्टींबाबत खात्री झाल्याखेरीज, त्या न्यायालयाने पोटनियम (१) किंवा पोटनियम (२) अन्वये असा कोणताही आदेश देता कामा नये. त्या गोष्टी अशा—

(क्) आदेश देण्यात आला नाही तर अंमलबजावणीच्या स्थगितीसाठी अर्ज करणाऱ्या पक्षकाराला बरीच हानी सोसावी लागेल;

(ख्) गैरवाजवी विलंब न लावता अर्ज करण्यात आलेला आहे; आणि

(ग्) असा हुकूमनामा किंवा आदेश यथोचितरीत्या अमलात आणला जावा यासाठी अर्जदाराने शेवटी त्यांच्यावर बंधनकारक होईल अशी प्रतिभूती दिलेली आहे.

(४) [2][पोटनियम (३) च्या उपबंधांना अधीन राहून,] न्यायालयाला, अर्जाची सुनावणी होईपर्यंत अंमलबजावणीच्या स्थगितीचा एकतर्फी आदेश देता येईल.

[3][(५) पूर्ववर्ती पोटनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नियम १ च्या पोटनियम (३) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अशा रकमेचा निक्षेप करण्यात किंवा अशी प्रतिभूती देण्यात अपीलकर्ता कसूर करील तेथे, न्यायालयाने हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करण्याचा आदेश देता कामा नये.]

ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचा आदेश होईल त्या प्रकरणी द्यावयाची प्रतिभूती.

६. (१) ज्या हुकूमनाम्यावर करण्यात आलेले अपील प्रलंबित असेल त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीचा आदेश देण्यात आला असेल अशा बाबतीत, अपीलकर्त्याने पुरेसे कारण दाखवल्यानंतर, ज्याने हुकमनामा दिला त्या न्यायालयाने, त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना, ताब्यात घेता येईल अशी किंवा ताब्यात घेण्यात आलेली अशी कोणतीही मालमत्ता परत करण्यासाठी किंवा अशा मालमत्तेच्या मूल्याचे प्रदान करण्यासाठी व अपील न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश योग्यरीतीने अमलात आणला जावा यासाठी, प्रतिभूती घेण्यात यावी, असे फर्माविले पाहिजे, किंवा अपील न्यायालयाला अशाच कारणांसाठी, ज्याने हुकूमनामा दिला त्या न्यायालयाला अशी प्रतिभूती घेण्याचा निदेश देता येईल.

(२) हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना स्थावर मालमत्तेची विक्री करण्याचा आदेश देण्यात आलेला असेल आणि अशा हुकमनाम्यावर करण्यात आलेले अपील प्रलंबित असेल अशा बाबतीत, ज्यांने आदेश दिला त्या न्यायालयाकडे, न्यायनिर्णीत ऋणकोने केलेल्या अर्जावरून, अपील निकालात काढण्यात येईपर्यंत, न्यायालयास योग्य वाटतील अशा, प्रतिभूती देण्याबाबतच्या किंवा अन्य अटींवर, विक्री स्थगित करण्यात येईल.

७. [4][विवक्षित प्रकरणी शासनाकडून किंवा लोक अधिकाऱ्याकडन कोणत्याही प्रतिभूतीची मागणी करता येणार नाही.] अनुकूलन आदेश, १९३७ यांद्वारे निरसित.

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना दिलेल्या आदेशावरील अपिलामध्ये शक्तींचा वापर.

८. हुकूमनाम्यावर नव्हे तर अशा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना काढण्यात आलेल्या आदेशावर अपील दाखल करता येईल किंवा दाखल करण्यात आलेले असेल तेथे, नियम ५ आणि ६ याअन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्ती वापरण्याजोग्या असतील.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८७ (तीन) (क्) अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरिल अधिनियमाच्या कलम ८७ (तीन) (ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आले.

३. वरील अधिनियमांच्या ममल ८७ (चार) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

४. पूर्वी आलेला आदेश सत्तावीस नियम ८-क पहा.

अपील स्वीकृत केल्यानंतरची कार्यपद्धती

अपिलाच्या ज्ञापनाची नोंदणी.

९. (१) अपिलाचे ज्ञापन स्वीकृत करण्यात आले असेल अशा बाबतीत, अपील न्यायालयाने किंवा त्या न्यायालयाच्या योग्य त्या अधिकाऱ्याने त्या ज्ञापनावर ते सादर करण्यात आल्याचा दिनांक पृष्ठांकित केला पाहिजे आणि अपिलाची नोंद करण्यासाठी ठेवावयाच्या पुस्तकात त्याची नोंद केली पाहिजे

अपील नोंदवही.

(२) अशा पुस्तकास अपील नोंदवही असे म्हणण्यात येईल.

अपीलकर्त्याने खर्चासाठी प्रतिभूती द्यावी असे, अपील न्यायालयाला फर्मावता येईल.

१०. (१) अपील न्यायालयाला त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार, उत्तरवादीला उपस्थित राहून उत्तर देण्याची आज्ञा करण्यापूर्वी किंवा नंतर, उत्तरवादीने केलेल्या अर्जावरून अपीलकर्त्याकडून अपिलाच्या किंवा मूळ वादाच्या किंवा दोन्हींच्या खर्चासाठी प्रतिभूतीची मागणी करता येईल :

अपीलकर्ता भारताबाहेर निवास करत असेल तेव्हा.

परंतु, अपीलकर्ता [१][भारता] बाहेर निवास करत असेल, आणि अपील जिच्याशी संबंधित आहे ती मालमत्ता (कोणतीही असल्यास) त्या मालमत्तेव्यतिरिक्त त्याच्याकडे [१][भारतात] कोणतीही पुरेशी स्थावर मालमत्ता नसेल अशा सर्व प्रकरणांमध्ये, न्यायालयाने अशा प्रतिभूतीची मागणी केली पाहिजे.

(२) न्यायालय आदेश देईल अशा मुदतीत अशी प्रतिभूती देण्यात येणार नाही तेथे न्यायालयाने अपील फेटाळले पाहिजे.

निम्न न्यायालयाकडे नोटीस न पाठवता अपील खारीज करण्याची शक्ती.

११. (१) अपील न्यायालयास अभिलेख मागवणे योग्य वाटल्यास, अभिलेख तशा प्रकारे मागवल्यानंतर, आणि अपीलकर्त्याच्या किंवा त्याच्या वकिलाच्या सुनावणीसाठी एक दिवस निश्चित केल्यानंतर व त्याप्रमाणे अपीलकर्ता/वकील त्या दिवशी उपस्थित राहिल्यास त्याची सुनावणी केल्यानंतर, अपील न्यायालयाला, ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले त्या न्यायालयाला नोटीस न पाठवता आणि उत्तरवादीवर किंवा त्याच्या वकिलावर नोटीस न बजावता, ते अपील खारीज करता येईल.

(२) निश्चित करण्यात आलेल्या दिवशी किंवा सुनावणी ज्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात येईल त्या इतर कोणत्याही दिवशी, अपील सुनावणीसाठी पुकारण्यात येईल तेव्हा, अपीलकर्ता उपस्थित राहिला नाही तर, न्यायालयाला अपील खारीज करण्यात यावे, असा आदेश देता येईल.

(३) ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाला, ते अपील या नियमान्वये खारीज केल्याचे अधिसूचित करण्यात आले पाहिजे.

[२][(४) जे अपील न्यायालय म्हणजे उच्च न्यायालय नसेल असे अपील न्यायालय पोटनियम (१) अन्वये एखादे अपील खारीज करील तेव्हा, त्या अपील न्यायालयाने आपला न्यायनिर्णय दिला पाहिजे आणि त्या न्यायनिर्णयात, तो देण्याची आपली कारणे थोडक्यात अभिलिखित केली पाहिजेत व न्यायनिर्णयानुसार एक हुकूमनामा तयार करण्यात आला पाहिजे.]

नियम ११ अन्वयेची सुनावणी कोणत्या मुदतीच्या आत समाप्त करण्यात यावी.

[२][११क. कलम ११ अन्वये प्रत्येक अपिलाची, शक्य असेल तितक्या शीघ्रतेने सुनावणी करण्यात आली पाहिजे आणि अपिलाचे ज्ञापन दाखल करण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत अशी सुनावणी समाप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.]

अपिलाच्या सुनावणीसाठी दिवस.

१२. (१) अपील न्यायालयाने नियम ११ अन्वये अपील खारीज केले नसेल तर, त्याने अपिलाच्या सुनावणीसाठी एक दिवस निश्चित केला पाहिजे.

(२) असा असा न्यायालयाचे चालू कामकाज, उत्तरवादीचे निवासस्थान, आणि अपिलाच्या नोटिशीची बजावणी करण्यासाठी आवश्यक असलेला वेळ, या गोष्टींच्या संदर्भात निश्चित करण्यात आला पाहिजे; यामुळे उत्तरवादीला अशा दिवशी उपस्थित राहून अपिलास उत्तर देण्यास पुरेसा वेळ मिळेल.

ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या न्यायालयाला अपील न्यायालयाने नोटीस द्यावयाची.

१३. (१) नियम ११ अन्वये अपील खारीज करण्यात आले नसेल त्याबाबतीत, अपील न्यायालयाने, ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले असेल, त्या न्यायालयाला त्या अपिलाची नोटीस पाठवली पाहिजे.

---

१. सन १९५१ चा अधिनियम २ च्या कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४ चे कलम ८७(पाच) अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. वरिल अधिनियमाच्या कलम ८७ (पाच-क) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

कागदपत्रे अपील न्यायालयाकडे पाठवणे.

(२) एखाद्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आलेले असून त्या न्यायालयाचा अभिलेख अपील न्यायालयात ठेवण्यात आला नसेल त्याबाबतीत, अशी नोटीस मिळणाऱ्या न्यायालयाने दाव्यातील सर्व महत्त्वाची कागदपत्रे किंवा अपील न्यायालय विशेषेकरून मागवून घेईल अशी कागदपत्रे, शक्य असेल तितक्या त्वरेने पाठवली पाहिजेत.

ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आलेले असेल त्या न्यायालयातील निशाण्यांच्या प्रती.

(३) ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले असेल त्या न्यायालयाकडे दोन्ही पक्षांपैकी कोणत्याही एका पक्षाला अर्ज करता येईल व अशा न्यायालयात असलेल्या कागदपत्रांपैकी ज्यांच्या[1] प्रती त्याला काढावयाच्या असतील ती कोणतीही कागदपत्रे अर्जात विनिर्दिष्ट करता येतील; आणि अर्जदाराच्या खर्चाने अशा प्रती काढून त्या त्याला देण्यात आल्या पाहिजेत.

अपिलाच्या सुनावणीच्या दिवसाची नोटीस प्रसिद्ध करणे व ती बजावणे.

१४. (१) नियम १२ अन्वये निश्चित केलेल्या दिवसाबद्दलची नोटीस अपील न्याय-गृहात लावण्यात आली पाहिजे, आणि तशीच एक नोटीस अपील न्यायालयाने, ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले असेल, त्या न्यायालयाला पाठवली पाहिजे, आणि उपस्थित राहून उत्तर देण्याबाबतचे समन्स प्रतिवादीवर बजावण्यासाठी तरतूद करण्यात आलेल्या रीतीने अपील न्यायालयातील उत्तरवादीवर किंवा त्याच्या वकिलावर अशी नोटीस बजावण्यात आली पाहिजे ; आणि अशा समन्सांना व त्यांच्या बजावणीच्या संबंधातील कार्यवाहींना लागू असणारे सर्व उपबंध अशा नोटिशीच्या बजावणीला लागू होतील.

स्वत: अपील न्यायालयालाच नोटीस बजावण्याची व्यवस्था करता येईल.

(२) ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाला नोटीस पाठवण्याऐवजी अपील न्यायालयाला स्वत:च उपरिनिर्दिष्ट उपबंधांन्वये उत्तरवादीवर किंवा त्याच्या वकिलावर नोटीस बजावण्याची व्यवस्था करता येईल.

[1][(३) उत्तरवादीवर बजावावयाच्या नोटिशीबरोबर अपील ज्ञापनाची एक प्रत पाठवण्यात आली पाहिजे.

(४) पोटनियम (१) मध्ये विरुद्धार्थी असे काहीही अंतर्भूत असले तरी, अपिलाशी आनुषंगिक अशा कोणत्याही कार्यवाहीची नोटीस, अपील न्यायालयात कार्यवाहीत प्रथमच सामील करून घेण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीव्यतिरिक्त अन्य कोणत्याही उत्तरवादीवर बजावण्याची आवश्यकता असणार नाही, मात्र, त्या उत्तरवादीने प्रारंभिक न्यायालयात उपस्थित राहून (नोटिशीच्या) बजावणीसाठी पत्ता दाखल केला असेल किंवा तो उत्तरवादी उपस्थित राहिलेला असेल, तर गोष्ट वेगळी;

(५) पोटनियम (४) मधील कोणत्याही गोष्टीमुळे त्या अपिलात निर्दिष्ट करण्यात आलेल्या उत्तरवादीला अपिलामध्ये बचाव करण्यास आडकाठी होणार नाही.].

नोटिशीचा मजकूर.

१५. उत्तरवादीला पाठवावयाच्या नोटिशीमध्ये, अशा निश्चित केलेल्या दिवशी उत्तरवादी अपील न्यायालयात उपस्थित राहिला नाही तर, अपिलाची सुनावणी एकतर्फी करण्यात येईल, असे घोषित केले पाहिजे.,

[1][**१५ क. अपील स्वीकारण्यात आल्यानंतर खटल्याअभावी अपील फेटाळणे.**

नियमानुसार किंवा न्यायालयाच्या विशेष निदेशानुसार अपीलकाराने नियत तारखेपूर्वी खटल्यातील कोणतीही कार्यवाही करणे आवश्यक असेल आणि करावयाच्या उपाययोजनेबाबतची योग्य नोटीस देण्यात आल्यानंतर अपीलकाराने नियमांद्वारे विहित केलेल्या किंवा न्यायालयाने परवानगी दिलेल्या वेळेत अशी कार्यवाही करण्यात कसूर केली तर, न्यायालयाला, खटल्याअभावी अपील फेटाळण्यात यावे, असे निदेश देता येतील किंवा त्याला योग्य वाटतील असे इतर आदेश देता येतील.]

सुनावणीची कार्यपद्धती

प्रारंभ करण्याचा अधिकार.

१६. (१) निश्चित करण्यात आलेल्या दिवशी किंवा सुनावणी ज्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात येईल त्या इतर कोणत्याही दिवशी, अपिलाच्या पुष्टयर्थ अपीलकर्त्याचे म्हणणे ऐकून घेण्यात आले पाहिजे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८७ (सहा) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६ खंड १०४ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

(२) त्यानंतर, न्यायालयाने, त्याने ते अपील तावडतोब फेटाळले नाही तर, उत्तरवादीचे अपिला-विरुद्धचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे, आणि अशा प्रकरणात उत्तरवादी उत्तर देण्यास हक्कदार असेल.

अपीलकर्त्याच्या कसुरीबद्दल अपील फेटाळणे.

१७. (१) निश्चित करण्यात आलेल्या दिवशी किंवा सुनावणी ज्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात येईल त्या इतर कोणत्याही दिवशी, अपिलाच्या सुनावणीसाठी ते पुकारण्यात येईल तेव्हा अपीलकर्ता उपस्थित न राहील अशा बाबतीत, न्यायालयाला अपील फेटाळण्यात यावे, असा आदेश देता येईल.

[स्पष्टीकरण.—या पोटनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायालयाला अपील त्याच्या गुणदोषांवरून फेटाळण्याची शक्ती प्रदान केली जाते, असा त्या गोष्टीचा अर्थ लावता कामा नये.]

अपिलाची एकतर्फी सुनावणी करणे.

(२) अपीलकर्ता उपस्थित राहील आणि उत्तरवादी उपस्थित राहणार नाही तेथे अपिलाची सुनावणी एकतर्फी करण्यात आली पाहिजे.

अपीलकर्त्याने खर्चाची रक्कम ठेव म्हणून ठेवण्यात कसूर केल्यामुळे नोटीस बजावण्यात आली नसेल अशा बाबतीत अपील फेटाळणे.

१८. निश्चित करण्यात आलेल्या दिवशी किंवा सुनावणी ज्या दिवसापर्यंत तहकूब करण्यात आलेली असेल अशा इतर कोणत्याही दिवशी, नोटीस बजावण्याचा खर्च भागवण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम, निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ठेव म्हणून ठेवण्यात अपीलकर्त्याने कसूर केल्यामुळे उत्तरवादीवर नोटीस बजावण्यात आलेली नाही, असे आढळून येईल [किंवा नोटीस तिची बजावणी न करता परत पाठवण्यात आली असेल आणि नोटीस बजावण्याचा आणखी कोणताही प्रयत्न करण्याचा खर्च भागवण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम, नंतर निश्चित करण्यात आलेल्या कोणत्याही कालावधीत ठेव म्हणून ठेवण्यात अपीलकर्त्याने कसूर केल्यामुळे उत्तरवादीस पाठवावयाची नोटीस काढण्यात आलेली नाही असे आढळून येईल] अशा बाबतीत, अपील फेटाळण्यात यावे असा आदेश न्यायालयाला काढता येईल.

[१८क. अपील स्वीकारण्यात आल्यानंतर, नियमानुसार किंवा न्यायालयाच्या विशेष निदेशानुसार अपीलकाराने नियत तारखेपूर्वी खटल्यातील कोणतीही कार्यवाही करणे आवश्यक असेल आणि कार्यवाहीच्या उपाययोजनेबाबतची योग्य नोटीस देण्यात आल्यानंतर अपीलकाराने नियमाद्वारे विहित केलेल्या किंवा न्यायालयाने परवानगी दिलेल्या वेळेत अशी कार्यवाही करण्यात कसूर केली तर, न्यायालयाला, खटल्याअभावी अपील फेटाळण्यात यावे, असे निदेश देता येतील किंवा त्याला योग्य वाटतील असे इतर आदेश देता येतील.] खटल्याअभावी फेटाळणे.

कसुरीमुळे फेटाळण्यात आलेले अपील पुन्हा स्वीकृत करणे.

१९. नियम ११ चा पोटनियम (२) किंवा नियम १७ किंवा नियम १८ याअन्वये अपील फेटाळण्यात येईल तेव्हा अपीलकर्त्याला अपील न्यायालयाकडे अपील पुन्हा स्वीकृत करण्यासाठी अर्ज करता येईल, आणि अपीलकर्त्याला अपील सुनावणीसाठी पुकारण्यात आले होते तेव्हा उपस्थित राहण्यास किंवा अशा प्रकारे आवश्यक असलेल्या रकमेची ठेव ठेवण्यास कोणत्याही पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता, असे सिद्ध करण्यात येईल तेव्हा, न्यायालयाने खर्चाबाबतच्या किंवा अन्यथा त्यास योग्य वाटतील अशा अटींवर ते अपील पुन्हा स्वीकृत केले पाहिजे.

[१९. नियम ११ चा पोटनियम (२) किंवा नियम १८क किंवा नियम १७ किंवा नियम १८ अन्वये अपील खारीज करण्यात येईल तेव्हा अपीलकर्त्याला अपील न्यायालयाकडे अपील पुन्हा स्वीकृत करण्यासाठी अर्ज करता येईल, आणि, अपीलकर्त्याला अपील सुनावणीसाठी पुकारण्यात आले होते तेव्हा उपस्थित राहण्यास किंवा अपिलाच्या कार्यवाहीतील आवश्यक ती पाऊले उचलण्यास किंवा अशा प्रकारे आवश्यक असलेल्या रकमेचा निक्षेप करण्यास कोणत्याही पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता असे सिद्ध करण्यात येईल तेव्हा, न्यायालयाने, खर्चाबाबतच्या किंवा अन्यथा त्यास योग्य वाटतील अशा अटींवर ते अपील पुन्हा स्वीकृत केले पाहिजे.] कसुरीमुळे फेटाळण्यात आलेले अपील पुन्हा स्वीकृत करणे.

सुनावणी तहकूब करण्याची आणि हितसंबंधित असणाऱ्या व्यक्तींना उत्तरवादी करण्याचे निदेश देण्याची शक्ती.

२०. [(१)] ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले, त्या न्यायालयातील वादामध्ये जी कोणतीही व्यक्ती पक्षकार होती परंतु, जिला अपिलातील पक्षकार बनवण्यात आलेले नाही, ती व्यक्ती अपिलाच्या निर्णयात हितसंबंधित आहे, असे न्यायालयास सुनावणीच्या वेळी दिसेल अशा बाबतीत, न्यायालयास ती सुनावणी, न्यायालयाने निश्चित करावयाच्या अशा भविष्यकाळातील दिवसापर्यंत तहकूब करता येईल आणि अशा व्यक्तीला उत्तरवादीपैकी एक ठरविण्याचा निदेश देता येईल.

---

१. सन १९७६ चा अधिनियम, १०४ च्या कलम ८७ (सात) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८७ (आठ) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९६३, सुधारणा (२) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

४. वरील अधिसूचनेच्या सुधारणा (३) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

५. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८७ (नऊ) द्वारे नियम २० ला पोटनियम (१) असा नंबर क्रमांक देण्यात आला.

[१][(२) अपिलासाठी देण्यात आलेली मुदतमर्यादा समाप्त झाल्यानंतर, न्यायालयाने कारणे अभिलिखित करून तसे करण्यास, त्याला योग्य वाटतील अशा खर्चाबाबतच्या अटींवर परवानगी दिली असेल तर, या नियमान्वये अशा कोणत्याही उत्तरवादीला अपिलामध्ये जादा दाखल करण्यात येता कामा नये.]

ज्याच्या विरुद्ध एकतर्फी हुकूमनामा देण्यात आलेला आहे त्या उत्तरवादीच्या अर्जावरून पुन्हा सुनावणी करणे.

२१. एखाद्या अपिलाची एकतर्फी सुनावणी करण्यात येईल आणि उत्तरवादीच्याविरुद्ध हुकूमनामा देण्यात येईल अशा बाबतीत, उत्तरवादीला, अपील न्यायालयाकडे अपिलाची पुन्हा सुनावणी करण्यासाठी अर्ज करता येईल; आणि, नोटीस रीतसर बजावण्यात आली नव्हती किंवा अपील सुनावणीसाठी पुकारण्यात आले त्यावेळी उपस्थित राहण्यास त्याला पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता याबद्दल उत्तरवादीने न्यायालयाची खात्री पटवली तर, न्यायालयाने, खर्चाच्याबाबतीत किंवा अन्यथा ज्या शर्ती उत्तरवादीस घालणे न्यायालयास योग्य वाटेल, त्या अटींवर अपिलाची पुन्हा सुनावणी केली पाहिजे.

सुनावणी झाल्यानंतर उत्तरवादीला, त्याने स्वतंत्र अपील दाखल केलेले असावे त्याप्रमाणे हुकूमनाम्यास आक्षेप घेता येईल

२२. (१) कोणत्याही उत्तरवादीने जरी हुकूमनाम्याच्या कोणत्याही भागावर अपील केलेले नसले तरी, त्याला हुकूमनाम्याला केवळ पुष्टीच देता येईल असे नाही [२][तर कोणत्याही वादप्रश्नाच्या संबंधात खालच्या न्यायालयात त्याच्याविरुद्ध काढण्यात आलेला निष्कर्ष त्याच्या बाजूने देण्यात यायला हवा होता असेही उत्तरवादीला नमूद करता येईल; आणि त्याला अपिलाच्या रूपाने हुकूमनाम्यास जे प्रतिआक्षेप घेता आले असते ते कोणतेही प्रतिआक्षेप देखील उत्तरवादीला घेता येतील :] परंतु, उत्तरवादीने असे आक्षेप, अपिलाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस उत्तरवादीवर किंवा त्याच्या वकिलावर बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, किंवा अपील न्यायालयाला ज्या आणखी मुदतीची मुभा देणे योग्य वाटेल त्या मुदतीत अपील न्यायालयात सादर केलेले असले पाहिजे.

आक्षेपाचा नमुना व त्यास लागू करण्यायोग्य उपबंध

(२) असा प्रतिआक्षेप ज्ञापनाच्या स्वरूपात असला पाहिजे, आणि नियम १ चे उपबंध अपिलाच्या ज्ञापनाच्या नमुन्याशी व आशयाशी जेथवर संबंधित आहेत तेथवर, ते अशा आक्षेपास लागू करण्यात आले पाहिजेत.

[१][स्पष्टीकरण.—ज्यावर अपील करण्यात आले तो हुकूमनामा न्यायालयाच्या न्यायनिर्णयातील ज्या निष्कर्षावर आधारित असेल त्या निष्कर्षामुळे स्वतःवर अन्याय झालेला आहे असे वाटणाऱ्या एखाद्या उत्तरवादीला त्या हुकूमनाम्याच्या संबंधात, त्या निष्कर्षावर आधारित असेल असा प्रतिआक्षेप दाखल करता येईल, मात्र, वादाच्या निर्णयासाठी पुरेसा असेल अशा इतर कोणत्याही निष्कर्षावर आधारित असलेल्या न्यायालयाच्या निर्णयामुळे तो हुकूमनामा पूर्णपणे किंवा अंशतः त्या उत्तरवादीच्या बाजूचा असला तरी हरकत नाही.]

(३) उत्तरवादीने आक्षेपाबरोबर, असा आक्षेप ज्यास बाधक होऊ शकेल अशा पक्षकाराने किंवा त्याच्या वकिलाने अशा आक्षेपाची प्रत मिळाल्याबद्दल दिलेली लेखी पोचपावती दाखल केली नाही तर, अपील न्यायालयाने, आक्षेप दाखल करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, अशी एक प्रत उत्तरवादीच्या खर्चाने अशा पक्षकारावर किंवा त्याच्या वकिलावर बजावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(४) कोणत्याही उत्तरवादीने या नियमान्वये अपिलाचे ज्ञापन दाखल केलेले असेल अशा कोणत्याही प्रकरणात, मूळ अपील काढून घेण्यात आले असेल किंवा कसुरीबद्दल फेटाळण्यात आले असेल अशा बाबतीत, अशी परिस्थिती असली तरी, अशा रीतीने दाखल करण्यात आलेल्या आक्षेपाची सुनावणी, न्यायालयास योग्य वाटेल अशी नोटीस इतर पक्षकारांना देण्यात आल्यानंतर, करता येईल.

(५) निर्धन व्यक्तींनी केलेल्या अपिलांसंबंधीचे उपबंध लागू करता येतील तेथवर, या नियमाखालील आक्षेपास लागू करण्यात आले पाहिजेत.

अपील न्यायालयाने प्रकरण परत पाठवणे.

२३. ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाने, प्रारंभिक मुद्द्यावरून वाद निकालात काढला असेल आणि हुकूमनामा अपिलात फिरवण्यात आला असेल अशा बाबतीत, अपील न्यायालयाला त्यास योग्य वाटले तर आदेश देऊन प्रकरण परत पाठवता येईल, आणि अशा रीतीने परत पाठवलेल्या प्रकरणात कोणत्या वादप्रश्नाची किंवा वादप्रश्नांची संपरीक्षा करण्यात आली पाहिजे याबाबत आणखी निदेश देता येईल, आणि न्यायालयाने त्याच्या न्यायनिर्णयाची व आदेशाची एक प्रत, ते अपील ज्याच्या हुकूमनाम्यावर दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाकडे पाठवली पाहिजे आणि त्याबरोबर तो वाद दिवाणी दाव्यांच्या नोंदवहीतील त्याच्या मूळ क्रमांकाखाली पुन्हा स्वीकृत करण्याचा व वादाचा निर्णय करण्याच्या कामास प्रारंभ करण्याचा निदेश दिला पाहिजे; आणि मूळ संपरीक्षेच्या वेळी कोणताही पुरावा अभिलिखित करण्यात आलेला असल्यास तो, सर्व न्याय्य अपवादांस अधीन राहून, प्रकरण परत पाठवल्यानंतर करावयाच्या संपरीक्षेमधील पुरावा असेल.

इतर बाबतीत प्रकरणे परत पाठवणे.

[४][२३-क. ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाने प्रारंभिक मुद्द्यावरून असेल त्याव्यतिरिक्त अन्य प्रकारे प्रकरण निकालात काढलेले असेल आणि अपिलात हुकमनामा फिरवण्यात आलेला असून पुनःसंपरीक्षा करणे आवश्यक वाटत असेल तेथे, अपील न्यायालयाला, नियम २३ अन्वये त्याला ज्या शक्ती असतात त्याच शक्ती असतील.]

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८७ (तऊ) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ८७ (दहा) (क) द्वारे विवक्षित मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८७ (दहा) (ख) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ८७ (अकरा) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

अभिलेखांतर्गत पुरावा पुरेसा असेल अशाबाबतीत, अपील न्यायालयाला प्रकरणाचा अंतिम निर्णय करता येईल.

२४. अभिलेखांतर्गत पुरावा हा, अपील न्यायालयाला न्यायनिर्णय देणे शक्य होण्याइतपत पुरेसा असेल अशाबाबतीत, त्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आलेले असेल त्या न्यायालयाने, अपील न्यायालय ज्या कारणाबरहुकूम कार्यवाही करत असेल त्याव्यतिरिक्त अन्य कारणावर पूर्णपणे अवलंबून राहून कार्यवाही केलेली असली तरी, अपील न्यायालयाला, आवश्यक असल्यास वादप्रश्नांची पुनर्निश्चिती केल्यानंतर वादाचा अंतिम निर्णय करता येईल.

अपील न्यायालयाला कोठे वादमुद्दे काढता येतील व ते वादमुद्दे ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या न्यायालयाकडे संपरीक्षेसाठी निर्देशित करता येतील.

२५. ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले त्या न्यायालयाने, वादाचा त्याच्या गुणदोषांनुसार उचित निर्णय देण्यासाठी अपील न्यायालयाला अत्यावश्यक वाटेल असा कोणताही वादमुद्दा काढलेला नसेल किंवा त्या वादमुद्याची संपरीक्षा केलेली नसेल अथवा अशा कोणत्याही तथ्याच्या प्रश्नाचा निर्णय केला नसेल अशाबाबतीत, आवश्यक असल्यास, अपील न्यायालयाला वादमुद्दे काढता येतील आणि संपरीक्षेसाठी त्यांचा निर्देश, ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाकडे करता येईल, आणि अशा प्रकरणात अपील न्यायालयाने अशा न्यायालयाला आवश्यक तो जादा पुरावा घेण्याचा निदेश दिला पाहिजे;

आणि अशा न्यायालयाने अशा वादमुद्यांच्या संपरीक्षेची कार्यवाही केली पाहिजे, आणि त्याने घेतलेला पुरावा, त्यावरील त्याचा निष्कर्ष व त्याबाबतची कारणे यांसह अपील न्यायालयाकडे [1][अपील न्यायालय निश्चित करील किंवा ते वेळोवेळी वाढवून देईल अशा मुदतीत] परत पाठवला पाहिजे.

निष्कर्ष आणि पुरावा अभिलिखित करणे. निष्कर्षाबाबतचे आक्षेप. अपिलाचा निर्णय.

२६. (१) असा पुरावा आणि निष्कर्ष हे वादातील अभिलेखाचा भाग बनतील आणि उभय पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराला अपील न्यायालयाने निश्चित करावयाच्या अशा मुदतीत कोणत्याही निष्कर्षांबाबतच्या कोणत्याही आक्षेपांचे ज्ञापन सादर करता येईल.

(२) असे ज्ञापन सादर करण्यासाठी अशा रीतीने निश्चित केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर, अपील न्यायालयाने अपीलाचा निर्णय करण्याची कार्यवाही केली पाहिजे.

प्रकरण परत पाठवण्यासंबंधीच्या आदेशामध्ये पुढच्या सुनावणीचा दिनांक नमूद केला पाहिजे.

[1][२६-क. अपील न्यायालय, नियम २३ अन्वये किंवा नियम २३-क अन्वये एखादे प्रकरण परत पाठवील, किंवा नियम २५ अन्वये वादमुद्दे काढून संपरीक्षेसाठी त्यांचा निर्देश करील तेथे, त्या न्यायालयाने, ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले होते त्या न्यायालयाकडून वादातील पुढील कार्यवाहीबद्दल निदेश प्राप्त करण्यासाठी त्या न्यायालयासमोर पक्षकारांनी ज्या दिनांकास उपस्थित व्हावयाचे, तो दिनांक निश्चित केला पाहिजे.]

अपील न्यायालयात जादा पुरावा सादर करणे.

२७. (१) अपिलातील पक्षकार मौखिक किंवा कागदोपत्री असा कोणताही जादा पुरावा अपील न्यायालयात सादर करण्यास हक्कदार असणार नाहीत, मात्र—

(क) ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले त्या न्यायालयाने, जो पुरावा स्वीकृत करायला पाहिजे होता तो पुरावा स्वीकृत करण्याचे नाकारले असेल, किंवा

[2][(कक) जादा पुरावा सादर करू पहाणाऱ्या पक्षकाराने असे सिद्ध केले की, यथायोग्य तत्परता दाखवून देखील त्याला अशा पुराव्याची माहिती मिळाली नाही किंवा यथायोग्य तत्परता दाखवल्यानंतरही, ज्याविरुद्ध अपील करण्यात आले तो हुकूमनामा ज्यावेळी देण्यात आला त्यावेळी अशा पक्षकाराला तो पुरावा सादर करता आला नाही, किंवा]

(ख) अपील न्यायालयाला न्यायनिर्णय घोषित करणे शक्य व्हावे म्हणून किंवा इतर कोणत्याही महत्त्वाच्या कारणासाठी ते न्यायालय, कोणतीही

अपील न्यायालयात जादा पुरावा सादर करणे.

[1][२७. (१) अपिलातील पक्षकार मौखिक किंवा कागदोपत्री असा कोणताही जादा पुरावा अपील न्यायालयात सादर करण्यास हक्कदार असणार नाहीत, मात्र—

(क) ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले त्या न्यायालयाने, जो पुरावा स्वीकृत करायला पाहिजे होता तो पुरावा स्वीकृत करण्याचे नाकारले असेल, किंवा

(ख) जादा पुरावा दाखल करू पहाणाऱ्या पक्षकाराने, अपील न्यायालयाचे या बाबतीत समाधान केले की, यथायोग्य तत्परता दाखवून देखील त्याला अशा पुराव्याची माहिती मिळाली नाही किंवा यथायोग्य तत्परता दाखवल्यानंतरही ज्याविरुद्ध अपील करण्यात आले तो हुकूमनामा ज्यावेळी देण्यात आला त्यावेळी अशा पक्षकाराला तो पुरावा सादर करता आला नाही, किंवा

(ग) अपील न्यायालयाला न्यायनिर्णय घोषित करणे शक्य व्हावे म्हणून किंवा इतर कोणत्याही महत्त्वाच्या कारणासाठी जे न्यायालय कोणतीही

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ८७ (बारा) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ७८ (तेरा) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ८७ (चौदा) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी ६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर, १९६६, खंड १०६ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

कागदपत्रे सादर करण्यात यावीत किंवा कोणत्याही साक्षीदाराची तपासणी करण्यात यावी असे फर्मावील, तर, अपील न्यायालयाला असा पुरावा किंवा दस्तऐवज सादर करण्याची अथवा अशा साक्षीदाराची तपासणी करण्याची मुभा देता येईल.

(२) अपील न्यायालयाने जादा पुरावा सादर करण्याची मुभा दिलेली असेल तेथे तेथे त्या न्यायालयाने त्या पुराव्याच्या स्वीकृतीची कारणे अभिलिखित केली पाहिजेत.

कागदपत्रे सादर करण्यात यावीत किंवा कोणत्याही साक्षीदाराची तपासणी करण्यात यावी असे फर्मावील तर, अपील न्यायालयाला असा पुरावा किंवा दस्तऐवज सादर करण्याची अथवा अशा साक्षीदाराची तपासणी करण्याची मुभा देता येईल.

(२) अपील न्यायालयाने जादापुरावा सादर करण्याची मुभा दिलेली असेल तेथे तेथे त्या न्यायालयाने त्या पुराव्याच्या स्वीकृतीची कारणे अभिलिखित केली पाहिजेत.]

जादा पुरावा घेण्याची पद्धत.

२८. जादा पुरावा सादर करण्याची मुभा देण्यात आली असेल अशा सर्व बाबतीत, अपील न्यायालयाला असा पुरावा घेता येईल किंवा त्याला, ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले त्या न्यायालयाला, किंवा इतर कोणत्याही दुय्यम न्यायालयाला असा पुरावा घेण्याचा व तो घेतल्यानंतर अपील न्यायालयाकडे पाठवण्याचा निदेश देता येईल.

मुद्दे निश्चित व अभिलिखित करावयाचे.

२९. जादा पुरावा घेण्याचा निदेश देण्यात आलेला असेल किंवा असा पुरावा घेण्याची मुभा देण्यात आलेली असेल तेथे, अपील न्यायालयाने पुरावा ज्या मुद्यांपुरता मर्यादित ठेवायचा ते मुद्दे विनिर्दिष्ट केले पाहिजेत आणि असे विनिर्दिष्ट केलेले मुद्दे आपल्या कार्यवृत्तामध्ये अभिलिखित केले पाहिजेत.

अपिलातील न्यायनिर्णय

न्यायनिर्णय केव्हा व कोठे उद्घोषित करावयाचा.

३०. [१][(१)] अपील न्यायालयाने, पक्षकारांची किंवा त्यांच्या वकिलांची सुनावणी केल्यानंतर, आणि अपिलाच्या किंवा ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले त्या न्यायालयातील कार्यवाहीच्या कोणत्याही भागाचा संदर्भ करणे आवश्यक असेल त्या भागाचा संदर्भ केल्यानंतर, ताबडतोब किंवा पक्षकारांना अथवा त्यांच्या वकिलांना भविष्यातील ज्या एखाद्या दिवसाची नोटीस देण्यात येईल त्या दिवशी, खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय उद्घोषित केला पाहिजे.

[१][(२) लेखी न्यायनिर्णय उद्घोषित करावयाचा असेल अशा बाबतीत, ज्यांचा निर्णय करावयाचा ते मुद्दे, त्यावरील निर्णय आणि अपिलात देण्यात आलेला अंतिम आदेश हे वाचून दाखवण्यात आले तरी पुरेसे होईल आणि न्यायालयाने संपूर्ण न्यायनिर्णय वाचून दाखवण्याची आवश्यकता असणार नाही, मात्र, न्यायनिर्णय उद्घोषित करण्यात आल्यानंतर ताबडतोब संपूर्ण न्यायनिर्णयाची एक प्रत पक्षकारांना किंवा त्यांच्या वकिलांना अवलोकनार्थ उपलब्ध करून देण्यात आली पाहिजे.]

न्यायनिर्णयातील मजकूर, त्याचा दिनांक व त्यावरील सही.

३१. अपील न्यायालयाचा न्यायनिर्णय लेखी असला पाहिजे व त्यात,—

(क) ज्यांचा निर्णय करावयाचा ते मुद्दे;

(ख) त्यांवरील निर्णय;

(ग) त्या निर्णयासागील कारणे ; आणि

(घ) ज्याच्यावर अपील करण्यात आले तो हुकूमनामा फिरवण्यात आला असेल किंवा त्यात फेरफार करण्यात आला असेल तेथे, अपीलकर्ता ज्यास हक्कदार असेल तो अनुतोष,

नमूद करण्यात आला पाहिजे आणि तो न्यायनिर्णय उद्घोषित करण्यात येईल त्यावेळी, त्यावर त्या न्यायाधीशाची दिनांकित स्वाक्षरी किंवा त्यात सहमत

३१. अपील न्यायालयाचा न्यायनिर्णय लेखी असला पाहिजे व त्यात,—

(क) ज्यांचा निर्णय करावयाचा ते मुद्दे;

(ख) त्यांवरील निर्णय ;

(ग) त्या निर्णयामागील कारणे; आणि

(घ) ज्याच्यावर अपील करण्यात आले तो हुकूमनामा फिरवण्यात आला असेल; किंवा त्यात फेरफार करण्यात आला असेल तेथे, अपीलकर्ता ज्यास हक्कदार असेल तो अनुतोष,

नमूद करण्यात आला पाहिजे आणि तो न्यायनिर्णय उद्घोषित करण्यात येईल त्यावेळी, त्यावर त्या न्यायाधीशाची दिनांकित स्वाक्षरी किंवा त्यात सहमत

न्यायनिर्णयातील मजकूर, त्याचा दिनांक व त्यावरील सही.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८७ (पंधरा) अन्वये नियम ३० ला त्याच नियमाचा पोटनियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. वरील अधिनियमाच्या कलम ८७ (पंधरा) अन्वये समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

असणाऱ्या न्यायाधीशांची दिनांकित स्वाक्षरी असली पाहिजे.

असणाऱ्या न्यायाधीशांची दिनांकित स्वाक्षरी असली पाहिजे, [1] :

परंतु, जर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लघुलेखकाला श्रुतलेखन सांगून उद्घोषित करण्यात आला असेल, तर अशा रीतीने उद्घोषित करण्यात आलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुलिपीवर, त्यात आवश्यक असतील अशा दुरुस्त्या केल्यानंतर, संबंधित न्यायाधीशाने किंवा न्यायाधीशांनी स्वाक्षरी केली पाहिजे आणि त्यावर त्यांच्या उद्घोषणेचा दिनांक असला पाहिजे.]

३२. ज्यावर अपील दाखल करण्यात आलेले असेल तो हुकूमनामा न्यायनिर्णयाद्वारे कायम, करता न्यायनिर्णयाद्वारे येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो फिरवता येईल, किंवा अपिलातील पक्षकारांचे, अपिलातील काय निदेश देता हुकूमनाम्याचे स्वरूप काय असावे याबाबत किंवा अपिलात देण्यात यावयाच्या आदेशाबाबत एकमत येईल. होईल तर, अपील न्यायालयाला त्याप्रमाणे हुकूमनामा किंवा आदेश देता येईल.

३३. जो हुकूमनामा किंवा आदेश दिला जायला हवा होता, तो कोणताही हुकूमनामा किंवा अपील न्यायालयाची आदेश आणि त्या प्रकरणात आवश्यक असेल असा पुढील किंवा अन्य हुकूमनामा किंवा आदेश देण्याची शक्ती. शक्ती अपील न्यायालयास असेल, आणि अपील हे हुकूमनाम्याच्या केवळ एका भागापुरते मर्यादित असले तरी न्यायालयाला या शक्तीचा वापर करता येईल आणि उत्तरवादीपैकी किंवा पक्षकारांपैकी सर्व किंवा कोणत्याही पक्षकारांनी कोणतेही अपील किंवा आक्षेप दाखल केलेला नसला तरीही, अशा उत्तरवादींच्या किंवा पक्षकारांच्या बाजूने न्यायालयाला अशा शक्तीचा वापर करता येईल, [2][आणि, प्रतिवादामध्ये हुकूमनामे देण्यात आले असतील तेथे किंवा एकाच वादामध्ये दोन किंवा अधिक हुकूमनामे देण्यात आले असतील तेथे, अशा हुकूमनाम्यांवर एखादे अपील दाखल करण्यात आलेले नसले तरी अशा सर्व किंवा कोणत्याही हुकूमनाम्याच्या संबंधात न्यायालयाला अशा शक्तीचा वापर करता येईल] :

[3][परंतु, ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आलेले असेल त्या न्यायालयाने ज्या आक्षेपावर कलम ३५ क अन्वये कोणताही आदेश दिलेला नसेल किंवा आदेश देण्याचे नाकारले असेल त्या कोणत्याही आक्षेपाच्या अनुरोधाने न्यायालयाने असा आदेश देता कामा नये.]

उदाहरण

'भ' किंवा 'म' कडून आपल्याला पैशाची रक्कम येणे आहे असा दावा 'क' करतो, आणि त्या दोघांविरुद्धच्या वादात 'भ' विरुद्ध हुकूमनामा मिळवतो. 'भ' अपील करतो आणि 'क' व 'ख' हे उत्तरवादी आहेत. अपील न्यायालय 'भ' च्या बाजूने निर्णय देते त्या न्यायालयाला 'म' विरुद्ध हुकूमनामा देण्याची शक्ती आहे.

३४. एकापेक्षा अधिक न्यायाधीशांनी अपिलाची सुनावणी केलेली असेल तेथे, न्यायालयाच्या भिन्न मते नोंदवणे. न्यायनिर्णयापेक्षा भिन्न मत असणाऱ्या कोणत्याही न्यायाधीशाने त्यास अपिलावर जो निर्णय किंवा आदेश देण्यात यावा असे वाटेल तो निर्णय किंवा आदेश लेखी नमूद केला पाहिजे आणि त्याबद्दलची त्याची कारणे नमूद केली पाहिजेत.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८७ अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. सन १९२२ चा अधिनियम ९ च्या कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आले असून या अधिनियमाच्या कलम १ (२) अन्वये कोणत्याही प्रांतात, तेथील प्रांतीय सरकारला कोणत्याही विनिर्दिष्ट दिनांकास अंमलात आणता येईल. हा अधिनियम मुंबई, बंगाल, उत्तर प्रदेश, पंजाब, बिहार, मध्य प्रांत, आसाम, ओरिसा व मद्रास येथे अंमलात आला आहे.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (४) अन्वये पूर्ण विरामाऐवजी विसर्ग व नंतर परंतुक जादा दाखल करण्यात आले.

अपिलातील हुकूमनामा

हुकूमनाम्याचा दिनांक व त्यातील मजकूर.

[१] ३५. (१) अपील न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर, न्यायनिर्णय ज्या दिवशी उद्घोषित करण्यात आला होता ती दिनांक असला पाहिजे.

(२) हुकूमनाम्यामध्ये अपिलाचा क्रमांक, अपीलकर्ता आणि उत्तरवादी यांची नावे व वर्णन, आणि मंजूर करण्यात आलेल्या अनुतोषाचा किंवा देण्यात आलेल्या अन्य अभिनिर्णयाचा स्पष्ट विनिर्देश या गोष्टी अंतर्भूत केलेल्या असल्या पाहिजेत.

(३) अपिलामध्ये करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम, आणि असा खर्च व वादातील खर्च कोणी, किंवा[०] कोणत्या मालमत्तेमधून, आणि कोणत्या प्रमाणात द्यावयाचा, हे देखील हुकूमनाम्यात नमूद करण्यात आले पाहिजे.

(४) ज्या न्यायाधीशाने किंवा न्यायाधीशांनी हुकूमनामा दिला त्या न्यायाधीशाने किंवा न्यायाधीशांनी त्यावर सही करून दिनांक घातला पाहिजे :

न्यायनिर्णयापेक्षा भिन्न मत असणाऱ्या न्यायाधीशाने हुकूमनाम्यावर सही करण्याची गरज नाही.

परंतु, एकापेक्षा अधिक न्यायाधीश असतील आणि त्यांच्यामध्ये मतभेद असेल तेथे, न्यायालयाच्या न्यायनिर्णयापेक्षा भिन्न मत असणाऱ्या कोणत्याही न्यायाधीशाने हुकूमनाम्यावर सही करण्याची आवश्यकता असणार नाही.

न्यायनिर्णयाच्या व हुकूमनाम्याच्या प्रती पक्षकारांना देण्यात याव्यात.

३६. पक्षकारांनी अपील न्यायालयाकडे अर्ज केल्यास त्यांना त्यांच्या खर्चाने अपीलातील न्यायनिर्णयाच्या व हुकूमनाम्याच्या प्रमाणित प्रती देण्यात आल्या पाहिजेत.

ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले असेल त्याला हुकूमनाम्याची प्रमाणित प्रत पाठविण्यात यावी.

३७. अपील न्यायालयाने किंवा ते यासंबंधात नियुक्त करील अशा अधिकाऱ्याने प्रमाणित केलेली न्यायनिर्णयाची व हुकूमनाम्याची एक प्रत, ज्यावर अपील करण्यात आले तो हुकूमनामा ज्या न्यायालयाने दिला, त्या न्यायालयाकडे पाठविण्यात आली पाहिजे आणि अशी प्रत वादाच्या मूळ कार्यवृत्तांबरोबर फाईल करण्यात आली पाहिजे व अपील न्यायालयाच्या न्यायनिर्णयाची नोंद दिवाणी वादाच्या नोंदवहीमध्ये करण्यात आली पाहिजे.

अपील कार्यवाहीच्या कालावधीत नोंदणीकृत पत्ता अधिकृत असेल.

[१][३८. (१) मूळ वादाच्या किंवा विनंतीअर्जाच्या सर्व अपील कार्यवाहीच्या कालावधीत, आदेश सहा, नियम १४ क अन्वये नमूद करण्यात आलेला नोंदणीकृत पत्ता, त्या नियमाच्या पोटनियम (३) अन्वये केलेल्या कोणत्याही बदलांच्या अधीन, अधिकृत असेल.

(२) अपिलाच्या प्रत्येक ज्ञापनावर, खालच्या न्यायालयात विरुद्ध पक्षकारांनी दिलेला नोंदणीकृत पत्ता नमूद केलेला असेल आणि अपील न्यायालयाकडून अशा पत्त्यावर नोटिसा आणि कार्यवाहीपत्रे पाठवण्यात येतील.

---

१. औध मुख्य न्यायालयाची अपिल अधिकारिता असणाऱ्या भागात हा नियम लागू होणार नाही पहा. औध न्यायालय अधिनियम, १९२५ (उत्तर प्रदेशचा १९२५ चा ४) कलम १६ (३) पहा.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी.०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (५) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

३. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी.०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (६) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

(३) आदेश सहाव्या नियम १४ क चे पोटनियम (२) आणि (४) (एक) आणि (दोन) हे शक्य तेथवर, अपील कार्यवाहींना लागू असतील.

आदेश बेचाळिसावा

अपिलातील हुकूमनाम्यांवरील अपिले

कार्यपद्धती.

१. आदेश एकेचाळीसचे नियम, शक्य अशातील तेथवर, अपिलातील हुकूमनाम्यांवर करण्यात आलेल्या अपिलांना लागू करण्यात येतील.

न्यायालयाने तयार केलेल्या प्रश्नावर अपिलाची सुनावणी करण्याचा निदेश देण्याची न्यायालयाची शक्ती.

[१][२. दुसऱ्या अपिलाच्या सुनावणीसाठी आदेश एकेचाळीस, नियम ११ अन्वये आदेश काढताना, कलम १०० द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे न्यायालयाने कायद्याचा सारभूत प्रश्न तयार केला पाहिजे आणि तसे करताना, न्यायालयाला अशा रीतीने तयार करण्यात आलेल्या प्रश्नावर दुसऱ्या अपिलाची सुनावणी करण्यात यावी असा निदेश देता येईल आणि कलम १०० च्या उपबंधानुसार न्यायालयाची परवानगी घेतल्याखेरीज, अपिलात दुसरे कोणतेही कारण उपस्थित करण्याची मुभा अपीलकर्त्याला असणार नाही.

आदेश एकेचाळीस चा नियम १४ लागू करणे.

३. अपिलीय हुकूमनामा किंवा आदेश यावर करण्यात आलेल्या अपिलाच्या बाबतीत, आदेश एकेचाळीस, नियम १४ चा पोटनियम (४) मध्ये केलेल्या प्रारंभिक न्यायालयाच्या निर्देशाचा अर्थ, मूळ हुकमनामा किंवा आदेश यावरील अपील ज्या न्यायालयाकडे निर्देशित केले असेल त्या न्यायालयाचा निदेश असल्याप्रमाणे लावण्यात येईल.]

आदेश बेचाळिसावा

आदेशांतर करण्यात आलेली अपिले

आदेशांवर करण्यात आलेले अपील.

१. कलम १०४ च्या उपबंधांन्वये पुढील आदेशांवर अपील करता येईल. ते आदेश असे :—

(क) एखादे वादपत्र योग्य त्या न्यायालयाकडे सादर करण्यासाठी ते वादपत्र परत पाठवणारा, आदेश सात, नियम १० अन्वये देण्यात आलेला आदेश; [१][मात्र, आदेश सात, नियम १० क मध्ये विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरण्यात आली असेल ती बाब यास अपवाद असेल];

(ख)[१] * * * * *

(ग) दावा फेटाळणारा आदेश रद्द करणारा आदेश मिळावा म्हणून (अपील करण्याची मोकळीक असेल अशा प्रकरणात) करण्यात आलेला अर्ज नाकारणारा, आदेश नऊच्या नियम ९ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(घ) एकतर्फी देण्यात आलेला हुकूमनामा रद्द करणारा आदेश मिळावा म्हणून (अपील करण्याची मोकळीक असेल अशा प्रकरणात) करण्यात आलेला अर्ज नाकारणारा, आदेश नऊच्या नियम १३ अन्वये देण्यात आलेला आदेश;

१. कलम १०४ च्या उपबंधांन्वये पुढील आदेशांवर अपील करता येईल. ते आदेश असे :— **आदेशांवर करण्यात आलेले अपील.**

(क) एखादे वादपत्र योग्य त्या न्यायालयाकडे सादर करण्यासाठी ते वादपत्र परत पाठवणारा, आदेश सात, नियम १० अन्वये दिलेला आदेश; मात्र, आदेश सात, नियम १० क मध्ये विनिर्दिष्ट कार्यपद्धती अनुसरण्यात आली असेल ती बाब यास अपवाद असेल;

(ख)[१] * * * * *

(ग) दावा फेटाळणारा आदेश रद्द करणारा आदेश मिळावा म्हणून (अपील करण्याची मोकळीक असेल अशा प्रकरणात) करण्यात आलेला अर्ज नाकारणारा, आदेश नऊच्या नियम ९ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(घ) एकतर्फी देण्यात आलेला हुकूमनामा रद्द करणारा आदेश मिळावा म्हणून (अपील करण्याची मोकळीक असेल अशा प्रकरणात) करण्यात आलेला अर्ज नाकारणारा, आदेश नऊच्या नियम १३ अन्वये देण्यात आलेला आदेश;

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ८८ द्वारे समाविष्ट करण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८९ अन्वये (एक) (क) समाविष्ट करण्यात आले (१फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८९(एक) (ख) अन्वये खंड (ख), (झ), (छ) आणि (ज) हे वगळण्यात आले (१फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून).

(ङ.)[१] * * * *

(च) आदेश अकराच्या नियम २१ अन्वये देण्यांत आलेला आदेश,

(छ)[१] * * * *

(ज)[१] * * * *

(झ) दस्तऐवजाच्या किंवा पृष्ठांकनाच्या मसुद्यात घेण्यात आलेल्या आक्षेपावर आदेश एकवीसच्या नियम ३४ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(ञ) विक्री रद्द करणारा किंवा विक्री रद्द करण्यास नकार देणारा, आदेश एकवीसच्या नियम ७२ किंवा नियम ९२ अन्वये देण्यात आलेला आदेश;

[२][(ञक्) आदेश एकवीसच्या नियम १०६, पोट नियम (१) अन्वये करण्यात आलेला अर्ज नाकारणारा आदेश; मात्र, मूळ अर्जावरील म्हणजेच त्या आदेशाच्या नियम १०५, पोट नियम (१) मध्ये निर्देशिलेल्या अर्जावरील आदेश अपीलयोग्य असला पाहिजे.]

(ट) दाव्याची समाप्ती करणारा किंवा तो फेटाळणारा आदेश रद्द करण्यास नकार देणारा, आदेश बावीसच्या नियम ९ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(ठ) परवानगी देणारा किंवा परवानगी देण्यास नकार देणारा, आदेश बावीसच्या नियम १० अन्वये देण्यात आलेला आदेश;

(ड)[१] * * * *

(ढ) दावा फेटाळणारा आदेश रद्द करणारा आदेश मिळावा म्हणून (अपील करण्याची मोकळीक असेल अशा प्रकरणात) करण्यात आलेला अर्ज नाकारणारा, आदेश पंचवीसच्या नियम २ अन्वये देण्यात आलेला आदेश;

[३][(ढक्) निर्धन व्यक्ती म्हणून दावा लावण्याची परवानगी मिळण्यासाठी करण्यात आलेला अर्ज नाकारणारा, आदेश तेहतीसच्या नियम ५ किंवा नियम ७ अन्वये देण्यात आलेला आदेश];

(ण)[३] * * * *

(त) आदेश पस्तीसच्या नियम ३, नियम ४ किंवा नियम ६ अन्वये आंतर्वादिक दाव्यांमध्ये देण्यात आलेले आदेश,

(थ) आदेश अडतीसच्या नियम २, नियम ३ किंवा नियम ६ अन्वये देण्यात आलेला आदेश,

(द) आदेश एकोणचाळीसच्या नियम १, नियम २, [४][नियम २क] नियम ४ किंवा नियम १० अन्वये देण्यात आलेला आदेश;

(ङ)[१] * * * *

(च) आदेश अकराच्या नियम २१ अन्वये देण्यात आलेला आदेश,

(छ)[१] * * * *

(ज)[१] * * * *

(झ) दस्तऐवजाच्या किंवा पृष्ठांकनाच्या मसुद्यात घेण्यात आलेल्या आक्षेपावर आदेश एकवीसच्या नियम ३४ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(ञ) विक्री रद्द करणारा किंवा विक्री रद्द करण्यास नकार देणारा, आदेश एकवीसच्या नियम ७२ किंवा नियम ९२ अन्वये देण्यात आलेला आदेश;

[२][(ञक्) आदेश एकवीसच्या नियम १०६, पोट नियम (१) अन्वये करण्यात आलेला अर्ज नाकारणारा आदेश; मात्र मूळ अर्जावरील म्हणजेच, त्या आदेशाच्या नियम १०५, पोटनियम (१) मध्ये निर्देशिलेल्या अर्जावरील आदेश अपीलयोग्य असला पाहिजे.]

(ट) दाव्याची समाप्ती करणारा किंवा तो फेटाळणारा आदेश रद्द करण्यास नकार देणारा, आदेश बावीसच्या नियम ९ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(ठ) परवानगी देणारा किंवा परवानगी देण्यास नकार देणारा, आदेश बावीसच्या नियम १० अन्वये देण्यात आलेला आदेश;

(ड)[१] * * * *

(ढ) दावा फेटाळणारा आदेश रद्द करणारा आदेश मिळावा म्हणून (अपील करण्याची मोकळीक असेल अशा प्रकरणात) करण्यात आलेला अर्ज नाकारणारा, आदेश पंचवीसच्या नियम २ अन्वये देण्यात आलेला आदेश;

[३][(ढक्) निर्धन व्यक्ती म्हणून दावा लावण्याची परवानगी मिळण्यासाठी करण्यात आलेला अर्ज नाकारणारा, आदेश तेहतीसच्या नियम ५ किंवा नियम ७ अन्वये देण्यात आलेला आदेश;]

(ण)[३] * * * *

(त) आदेश पस्तीसच्या नियम ३, नियम ४ किंवा नियम ६ अन्वये आंतर्वादिक दाव्यांमध्ये देण्यात आलेले आदेश;

(थ) आदेश अडतीसच्या नियम २, नियम ३ किंवा नियम ६ अन्वये देण्यात आलेला आदेश;

[५][(द) आदेश एकोणचाळीसच्या नियम १, नियम २, नियम ४, नियम १० किंवा नियम ११ अन्वये देण्यात आलेला आदेश.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ८९ (एक) (ख) अन्वये खंड (ख), (ङ), (छ) आणि (ज) हे वगळण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८९ (एक) (घ) अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८९ (एक) (ख) अन्वये खंड (ङ) (ण) (फ) हे वगळण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ८९ (एक) (ङ) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

(ध) आदेश चाळीसच्या नियम १ किंवा नियम ४ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(न) अपील पुन्हा स्वीकृत करण्यास नकार देणारा, आदेश एकेचाळीसच्या नियम १९ अन्वये देण्यात आलेला आदेश किंवा अपिलाची पुन्हा सुनावणी करण्यास नकार देणारा, आदेश एकेचाळीसच्या नियम २१ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(प) अपील न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील करता येत असेल त्याबाबतीत, प्रकरण परत पाठविणारा, आदेश एकेचाळीसच्या नियम २३ [१][किंवा नियम २३क] अन्वये देण्यात आलेला आदेश;

[१] * * * * *

(ब) पुनर्विलोकनासाठी करण्यात आलेला अर्ज मंजूर करणारा, आदेश सत्तेचाळीसच्या नियम ४ अन्वये देण्यात आलेला आदेश.

(ध) आदेश चाळीसच्या नियम १ किंवा नियम ४ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(न) अपील पुन्हा स्वीकृत करण्यास नकार देणारा, आदेश एकेचाळीसच्या नियम १९ अन्वये देण्यात आलेला आदेश किंवा अपिलाची पुन्हा सुनावणी करण्यास नकार देणारा, आदेश एकेचाळीसच्या नियम २१ अन्वये देण्यात आलेला आदेश;

(प) अपील न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर अपील करता येत असेल त्याबाबतीत, प्रकरण परत पाठवणारा, आदेश एकेचाळीसच्या नियम २३ [१][किंवा नियम २३क] अन्वये देण्यात आलेला आदेश;

(फ) आदेश पंचेचाळीसच्या नियम ६ अन्वये प्रमाणपत्र देण्यास नकार देणारा, उच्च न्यायालया-व्यतिरिक्त इतर कोणत्याही न्यायालयाने दिलेला आदेश;

(ब)[१] * * * * *

हुकूमनाम्यांविरुद्ध करण्यात आलेल्या अपिलातील अपील-योग्य नसलेल्या आदेशांना आक्षेप घेण्याचा अधिकार.

[१][१क. (१) या संहितेअन्वये एखाद्या पक्षकाराविरुद्ध कोणताही आदेश देण्यात आला असेल आणि त्यानंतर अशा पक्षकाराविरुद्ध कोणताही न्यायनिर्णय उद्घोषित करण्यात येऊन एक हुकूमनामा तयार करण्यात आल्यास, अशा पक्षकाराला त्या हुकूमनाम्याविरुद्धच्या अपिलामध्ये असा आदेश दिला जायला नको होता, आणि तो न्यायनिर्णय उद्घोषित केला जायला नको होता, असे प्रतिपादन करता येईल.

(२) एखाद्या वादामध्ये, तडजोड झाल्याचे अभिलिखित करण्यात आल्यानंतर किंवा तडजोड झाल्याचे अभिलिखित करण्यास नकार देण्यात आल्यानंतर, देण्यात आलेल्या हुकूमनाम्यावरील अपिलामध्ये अपीलकर्त्याला, तडजोड अभिलिखित केली जायला पाहिजे होती किंवा अभिलिखित केली जायला नको होती, या कारणावरून हुकूमनाम्यास हरकत घेण्याची मोकळीक राहील.]

कार्यपद्धती.

२. आदेश एकेचाळीसचे नियम, शक्य असेल तेथवर, आदेशावर करण्यात आलेल्या अपिलांना लागू होतील.

आदेश चव्वेचाळिसावा

[१][निर्धन व्यक्तींची अपिले]

[१][निर्धन व्यक्ती म्हणून] कोणाला अपील करता येईल.

१. [१][(१)] अपिलाच्या ज्ञापनासाठी आवश्यक असलेली फी भरण्यास असमर्थ अशी जी कोणतीही व्यक्ती अपील दाखल करण्यास हक्कदार असेल त्या व्यक्तीला अपिलाचे ज्ञापन जोडून एक अर्ज सादर

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८९ (एक)(च) अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८९ अन्वये खंड (ड), (ग) आणि (फ) वगळण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ८९ (दोन) अन्वये समाविष्ट करण्यात आले (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ९० (एक) अन्वये "अकिंचन व्यक्तींनी केलेली अपिले" याऐवजी दाखल करण्यात आले. (१ फब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

५. हे शब्द वरील अधिनियमाच्या कलम ९० (दोन) (क) अन्वये "अकींचन व्यक्ती" म्हणून याऐवजी दाखल करण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

६ १९५६ चा अधिनियम ६६ च्या कलम १४ अन्वये या नियमाला त्या नियमाचा पोट-नियम (१) म्हणून पुन्हा क्रमांक देण्यात आला.

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ८९ (एक) (च) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ६२२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड ११० द्वारे वगळण्यात आले.

करता येईल, आणि [१][निर्धन व्यक्ती] म्हणून अपील करण्याची मुभा त्याला देता येईल, मात्र असा अर्ज सादर करण्याच्या बाबीसह सर्व बाबींमध्ये अशी मुभा ही [१][निर्धन व्यक्तींना] दाखल केलेल्या दाव्यांशी संबंधित उपबंध, जेथवर लागू करण्यायोग्य असतील तेथवर, अशा उपबंधांना अनुसरून दिली पाहिजे.

* * * * *

[१][(२)] * * * *

न्यायालय फी भरण्यासाठी मुदत मंजूर करणे.

[२][२. एखादा अर्ज, नियम १ अन्वये नाकारण्यात आल्यास न्यायालयास, तो अर्ज नाकारताना न्यायालय निश्चित करील किंवा ते वेळोवेळी वाढवील अशा मुदतीत आवश्यक ती न्यायालय फी भरण्याची मुभा अर्जदाराला देता येईल, आणि अशी फी भरल्यानंतर ती फी ज्या अपील ज्ञापनाच्या संबंधात देणे असेल त्या अपील ज्ञापनाचा, अशी फी सुरुवातीला भरली असती तर जसा अंमल व परिणाम झाला असता, तसाच अंमल व परिणाम होईल.

अर्जदार निर्धन व्यक्ती आहे किंवा कसे याबद्दल चौकशी.

३.(१) नियम १ मध्ये निर्देशिलेल्या एखाद्या अर्जदाराला, ज्याच्या हुकूमनाम्यावर अपील दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयात निर्धन व्यक्ती म्हणून दावा दाखल करण्यास किंवा अपील करण्यास मुभा देण्यात आलेली होती, तेथे अर्जदाराने, ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याच्या दिनांकानंतर तो निर्धन व्यक्ती असण्याचे बंद झालेले नाही असे निवेदन असलेले शपथपत्र करून दिलेले असेल तर, तो अर्जदार निर्धन व्यक्ती आहे किंवा नाही या प्रश्नाबाबत आणखी चौकशी करण्याची आवश्यकता असणार नाही, मात्र, अशा शपथपत्रात करण्यात आलेल्या निवेदनांच्या खरेपणास सरकारी वकिलाने किंवा उत्तरवादीने हरकत घेतली तर अपील न्यायालयाने, किंवा अपील न्यायालयाच्या आदेशावरून त्या न्यायालयाच्या एखाद्या अधिकाऱ्याने पूर्वोक्त प्रश्नाबाबत चौकशी केली पाहिजे.

(२) नियम ११ मध्ये निर्देशिलेला अर्जदार हा, ज्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याच्या दिनांकानंतर निर्धन व्यक्ती बनलेला आहे असे अभिकथित करण्यात येईल तेथे अर्जदार निर्धन व्यक्ती आहे किंवा नाही या प्रश्नाबाबतची चौकशी, त्या प्रकरणाच्या परिस्थितीत ती चौकशी ज्याच्या निर्णयावर अपील दाखल करण्यात आले असेल त्या न्यायालयाने करणे आवश्यक आहे असे अपील न्यायालयास वाटत नसेल तर, अपील न्यायालयाने किंवा त्या न्यायालयाच्या एखाद्या अधिकाऱ्याने केली पाहिजे.]

आदेश पंचेचाळिसावा

[३][सर्वोच्च न्यायालयाकडे] करावयाची अपिले

"हुकूमनामा" या संज्ञेची व्याख्या.

१. या आदेशामध्ये, विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर, "हुकूमनामा" या संज्ञेमध्ये अंतिम आदेशाचा समावेश असेल.

ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याबद्दल तक्रार करावयाची आहे त्या न्यायालयाकडे अर्ज.

२. [१][(१)] [३][सर्वोच्च न्यायालयाकडे] अपील करण्याची ज्याची इच्छा असेल त्याने, ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याबद्दल तक्रार करावयाची आहे त्या न्यायालयाकडे विनंतीअर्ज केला पाहिजे.

[४][२. (१) सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची ज्याची इच्छा असेल त्याने, ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याबद्दल तक्रार करावयाची आहे त्या न्यायालयाकडे विनंतीअर्ज केला पाहिजे.

ज्या न्यायालयाकडे हुकूमनाम्याबद्दल तक्रार करावयाची आहे त्या न्यायालयाकडे अर्ज.

---

१. हे शब्द १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ९० (दोन) (ख) अन्वये "अकिंचन" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आले.

२. १९५६ चा अधिनियम ६६ याच्या कलम १४ अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

३. १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ९० (दोन) (ग) अन्वये वगळण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ९० (तीन) अन्वये नियम २ ऐवजी दाखल करण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

५. १९५० च्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आले.

६. सन १९७६ चा अधिनियम १०४ च्या कलम ९१ अन्वये नियम २ ला, पोटनियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

७. १९५० च्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी.-६३२४/६०, दिनांक ३० सप्टेंबर १९६६, खंड १११ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[1][(२) पोटनियम (१) अन्वये करण्यात आलेल्या प्रत्येक विनंतीअर्जाची सुनावणी शक्य असेल तितक्या शीघ्रतेने करण्यात आली पाहिजे आणि पोटनियम (१) अन्वये विनंतीअर्ज न्यायालयाकडे ज्या दिवशी सादर करण्यात आला असेल, त्यादिवसापासून साठ दिवसांच्या आत तो विनंतीअर्ज निकालात काढण्याचे काम संपविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे.]

(२) पोटनियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीला, न्यायालयाने न्यायनिर्णय घोषित केल्यावर तात्काळ तोंडी अर्ज करता येईल आणि न्यायालयाला त्या पक्षकाराला सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची परवानगी देता येईल किंवा नाकारता येईल किंवा पोटनियम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे विनंतीअर्ज दाखल करण्याचे निदेश पक्षकारास देता येतील :

परंतु, पोटनियम (२) अन्वये परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असेल आणि तो नाकारण्यात आला असेल तर पोटनियम (१) खाली लेखी विनंतीअर्ज करता येणार नाही.]

[3][(३) (एक) सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची ज्याची इच्छा असेल त्याने ज्या न्यायालयाच्या हुकुमाम्याबद्दल तक्रार करावयाची आहे त्या न्यायालयाकडे विनंती अर्ज केला पाहिजे.

ज्या न्यायालयाच्या हुकूमाम्याबद्दल तक्रार करावयाची आहे त्या न्यायालयाकडे अर्ज.

(दोन) पोटनियम (१) काहीही अंतर्भूत असले तरी, सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तीला न्यायालयाने न्यायनिर्णय घोषित केल्यावर तात्काळ तोंडी अर्ज करता येईल आणि न्यायालयाला त्या पक्षकाराला सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची परवानगी देता येईल किंवा नाकारता येईल किंवा पोटनियम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे विनंती अर्ज दाखल करण्याचे निदेश पक्षकारास देता येतील:

परंतु, पोटनियम (२) अन्वये परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असेल आणि तो नाकारण्यात आला असेल तर, पोटनियम (१) खाली लेखी विनंती अर्ज करता येणार नाही.]

मूल्य किंवा योग्यता-विषयीचे प्रमाणपत्र.

३. [1][(१) प्रत्येक विनंतीअर्जामध्ये अपिलाबद्दलची कारणे नमूद केली पाहिजेत आणि खालील आशयाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विनंती केली पाहिजे :—

(एक) प्रकरणामध्ये सर्वसाधारण महत्त्व असलेला विधिविषयक सारभूत प्रश्न अंतर्भूत आहे, आणि

(दोन) उक्त प्रश्नाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने करणे आवश्यक आहे असे न्यायालयाचे मत आहे.]

[2] (२) असा विनंतीअर्ज मिळाल्यानंतर न्यायालयाने, उक्त प्रमाणपत्र का देण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दाखवण्याची नोटीस विरुद्ध पक्षकारावर बजावण्यात यावी, असा निदेश दिला पाहिजे.

३. [1][(१) प्रत्येक विनंतीअर्जामध्ये अपिलाबद्दलची कारणे नमूद करण्यात आली पाहिजेत आणि खालील आशयाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विनंती केली पाहिजे :-

(एक) प्रकरणामध्ये सर्वसाधारण महत्त्व असलेला विधिविषयक सारभूत प्रश्न अंतर्भूत आहे, आणि

(दोन) उक्त प्रश्नाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने करणे आवश्यक आहे असे न्यायालयाचे मत आहे].

[4][(२) असा विनंतीअर्ज मिळाल्यानंतर न्यायालयाने, उक्त प्रमाणपत्र का देण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दाखवण्याची नोटीस विरुद्ध पक्षकारावर बजावण्यात यावी, असा निदेश दिला पाहिजे, मात्र असे प्रमाणपत्र नाकारणे योग्य होईल असे न्यायालयास वाटल्यास गोष्ट वेगळी.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ यांच्या कलम ९१ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (१) द्वारा पोटनियम (३) समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९७३ चा अधिनियम ४९ च्या कलम ४ (१) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आले.

४. वरील अधिसूचनेच्या सुधारणा (२) द्वारे समाविष्ट करण्यात आले.

४. [दाव्यांचे एकत्रीकरण—दिवाणी प्रक्रिया संहिता, (दिशोधन) अधिनियम, १९७३ (१९७३ चा ४९) कलम ४ द्वारे निरसित करण्यात आले. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)].

५. [विवाद प्रारंभिक न्यायालयाकडे परत पाठवणे.] १९७३ चा अधिनियम ४९ याच्या कलम ४ द्वारे निरसित. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

प्रमाणपत्र नाकारल्यास त्याचा परिणाम.

६. असे प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्यास विनंतीअर्ज फेटाळला पाहिजे.

प्रमाणपत्र देण्यात आल्यानंतर आवश्यक असलेली प्रतिभूती व निक्षेप.

७. (१) प्रमाणपत्र मंजूर करण्यात येईल तेथे अर्जदाराने ज्या हुकूमनाम्याबद्दल तक्रार करण्यात आलेली असेल त्या हुकूमनाम्याच्या दिनांकापासून [१][नव्वद दिवस किंवा न्यायालय त्याला दाखवण्यात आलेल्या कारणावरून मुभा देईल अशा ६० दिवसांपेक्षा जास्त नसेल इतका आणखी कालावधी], किंवा प्रमाणपत्र देण्यात आल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यांचा कालावधी यापैकी जो नंतरचा असेल त्या कालावधीत,—

(क) उत्तरवादीच्या खर्चासाठी [२][रोख रकमेच्या किंवा शासकीय रोख्यांच्या स्वरूपात] प्रतिभूती दिली पाहिजे, आणि

(ख) (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या [३][सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्याही न्यादेशान्वये] जे औपचारिक दस्तऐवज वगळण्याचा निदेश असेल ते दस्तऐवज,

(२) जी कागदपत्रे वगळण्याबाबत पक्षकारांचे एकमत होईल ती कागदपत्रे,

(३) न्यायालयाने त्या प्रयोजनार्थ अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास जे लेखे किंवा लेख्यांचे भाग अनावश्यक वाटत असतील आणि पक्षकारांनी ज्यांचा समावेश करण्याची मागणी विनिर्देशपूर्वक केलेली नसेल ते लेखे किंवा लेख्यांचे भाग; आणि

(४) उच्च न्यायालय जे दस्तऐवज वगळण्याचा निदेश देईल असे इतर दस्तऐवज,

याव्यतिरिक्त, वादाच्या संपूर्ण अभिलेखाच्या प्रतीचा अनुवाद करणे, त्यांचे लिप्यंतर करणे, निर्देशसूची तयार करणे, [४][मुद्रण करणे] व ती प्रत सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवणे या गोष्टींचा खर्च भागवण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम अनामत ठेवली पाहिजे :

[५][परंतु, न्यायालयास, जो कोणताही विरुद्ध पक्षकार हजर राहील त्याचे म्हणणे ऐकून घेतल्यावर असे प्रमाणपत्र देतेवेळी, विशेष कष्टावस्थेस तोंड द्यावे लागेल अशा कारणास्तव, दुसऱ्या कोणत्या तरी स्वरूपातील प्रतिभूती द्यावी असा आदेश देता येईल :

परंतु आणखी असे की, एखाद्या विरुद्ध पक्षकाराला अशा प्रतिभूतीच्या स्वरूपाबाबत हरकत घेण्यासाठी कोणतीही तहकुबी दिली जाणार नाही.]

* * * * *

[६][७-क. केंद्र किंवा राज्य शासन किंवा केंद्र किंवा राज्य शासन किंवा एखाद्या लोकसेवकाने त्याच्या (वर्तनाचा) भाग म्हणून केलेल्या एखाद्या कृतीच्या बाबतीत, त्याच्याविरुद्ध दावा दाखल करण्यात आला असता त्यात शासनाकडून बचाव करण्यात येणारे त्याचा बचाव करण्यात येत असेल अशा बाबतीत, शासकीय कर्मचारी वरील नियम ७ च्या पोटनियम (१) मधील यांच्याकडून प्रतिभूती खंड (क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणतीही प्रतिभूती न मागणे. आवश्यक असणार नाही.]

अपील स्वीकृत करणे व त्यावरील कार्यपद्धती.

८. जेव्हा न्यायालयाचे समाधान होईल अशा प्रकारे अशी प्रतिभूती देण्यात आलेली असेल व अशी अनामत निक्षेप करण्यात आलेली असेल तेव्हा न्यायालयाने—

(क) अपील स्वीकृत करण्यात आले असल्याचे घोषित केले पाहिजे;

---

१. सन १९२० चा अधिनियम २६ याच्या कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आले.

२. सन १९२० चा अधिनियम २६ याच्या कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

३. १९५० च्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे "हिज मॅजेस्टी इन कौन्सिल" या ऐवजी दाखल करण्यात आला.

४. वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

५. सन १९२० चा अधिनियम २६ याच्या कलम ३ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

६. १९५० याच्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे, पोटनियम (२) गाळण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३, सुधारणा (३) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

(ङ) त्याबद्दलची नोटीस प्रतिवादीला दिली पाहिजे;

(ग) पूर्वोक्त बाबींव्यतिरिक्त उक्त अभिलेखाची अचूक प्रत न्यायालयाच्या मुद्रेसहित [१][सर्वोच्च न्यायालयाकडे] पाठविली पाहिजे; आणि

(घ) उभय पक्षकारांपैकी कोणीही दाव्यातील कागदपत्रांपैकी कोणत्याही कागदपत्रांच्या एक किंवा अधिक अधिप्रमाणित प्रती मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर आणि त्या प्रती तयार करण्यासाठी झालेला वाजवी खर्च भरल्यानंतर त्या पक्षकाराला त्याची एक प्रत किंवा अधिक प्रती दिल्या पाहिजेत.

प्रतिभूतीचा स्वीकार रद्द करणे.

९. न्यायालयाला, अपील स्वीकृत करण्यापूर्वी कोणत्याही वेळी, कारण दाखवण्यात आल्यास अशा कोणत्याही प्रतिभूतीचा स्वीकार रद्द करता येईल, आणि त्याबाबत आणखी निदेश देता येतील.

मृत पक्षकारांच्या बाबतीत नोटीस अनावश्यक करण्याची शक्ती.

[२][९क. ज्याच्या हुकूमनाम्याबाबत तक्रार करण्यात आलेली असेल त्या न्यायालयातील सुनावणीच्या वेळी किंवा त्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यानंतरच्या कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी कोणताही विरुद्ध पक्षकार किंवा उत्तरवादी हजर राहिलेला नसेल अशा प्रकरणात, या नियमातील ज्या गोष्टींमुळे एखाद्या विरुद्ध पक्षकारावर किंवा उत्तरवादीवर कोणतीही नोटीस बजावणे किंवा त्याला ती नोटीस देणे आवश्यक आहे, त्या कोणत्याही गोष्टींमुळे अशा मृत विरुद्ध पक्षकाराच्या किंवा मृत उत्तरवादींच्या कायदेशीर प्रतिनिधीवर कोणतीही नोटीस बजावणे आवश्यक आहे असे मानता कामा नये :

परंतु, नियम ३, पोटनियम (२) अन्वये आणि नियम ८ अन्वये द्यावयाच्या नोटिसा, जिल्ह्याच्या ज्या न्यायाधीशाच्या न्यायगृहात दावा मूलतः आणला गेला होता त्या न्यायगृहातील एखाद्या ठळक ठिकाणी चिकटवून, आणि न्यायालय निदेश देईल अशा वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करून त्या दिल्या पाहिजेत.]

आणखी प्रतिभूती देण्याचा किंवा रक्कम प्रदान करण्याचा आदेश देण्याची शक्ती.

१०. एखादे अपील स्वीकृत करण्यात आल्यानंतर, परंतु, पूर्वोक्ताव्यतिरिक्त अशी अभिलेखाची प्रत [१][सर्वोच्च न्यायालयाकडे] पाठवण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी अशी प्रतिभूती अपुरी असल्याचे दिसेल,

किंवा पूर्वोक्ताव्यतिरिक्त अशा अभिलेखाच्या प्रतीचा अनुवाद करणे, लिप्यंतर करणे, तिचे मुद्रण करणे, तिची निर्देशसूची तयार करणे किंवा ती पाठवणे या प्रयोजनार्थ, आणखी रक्कम प्रदान करणे आवश्यक असेल,

अशा बाबतीत न्यायालयाला अपीलकर्त्याला असा आदेश देता येईल की, अपीलकर्त्याने, न्यायालयाने निश्चित करावयाच्या अशा मुदतीत, दुसरी आणि पुरेशी प्रतिभूती द्यावी, किंवा तशाच मुदतीत आवश्यक ते प्रदान करावे.

आदेशाचे अनुपालन करण्यात आलेल्या कसुरीचा परिणाम.

११. अपीलकर्त्याने अशा आदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केल्यास, कार्यवाही स्थगित केली जाईल, आणि या बाबतीत [१][सर्वोच्च न्यायालयाने] आदेश दिल्याखेरीज अपिलाचे काम पुढे चालवता येणार नाही, आणि दरम्यान, ज्यावर अपील करण्यात आले, त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित होणार नाही.

शिल्लक निक्षेप रकमेचा परतावा.

१२. पूर्वोक्ताव्यतिरिक्त अशी अभिलेखाची प्रत [१][सर्वोच्च न्यायालयाकडे] पाठवण्यात आलेली असेल तेव्हा अपीलकर्त्याला, त्याने नियम ७ अन्वये जिचा निक्षेप करण्यात आला त्या रकमेतून काही शिल्लक राहिल्यास त्या शिलकीचा परतावा मिळवता येईल.

अपील प्रलंबित असतानाची न्यायालयाची शक्ती.

१३. (१) कोणतेही अपील स्वीकृत करण्यासाठी प्रमाणपत्र देण्यात आलेले असले तरीही, न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, ज्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याची बिनशर्त अंमलबजावणी केली जाईल.

(२) दाव्यामध्ये हितसंबंधित असलेल्या कोणत्याही पक्षकाराने एखादे विशेष कारण दाखविल्यावरून किंवा असे कारण अन्यथा न्यायालयाला दिसून आल्यावरून न्यायालयाला योग्य वाटल्यास त्याला पुढील गोष्टी करता येतील,—

(क) विवादग्रस्त अशी कोणतीही जंगम मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग अवरुद्ध करून ठेवणे, किंवा

(ख) अपिलात [१][सर्वोच्च न्यायालय] जो कोणताही आदेश देईल त्या आदेशाची यथोचितरीत्या अंमलबजावणी केली जावी यासाठी न्यायालयास योग्य वाटेल अशी प्रतिभूती उत्तरवादीकडून घेतल्यानंतर अशा हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस अनुज्ञा देणे, किंवा

(ग) ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले, त्या हुकूमनाम्याची किंवा [१][सर्वोच्च न्यायालय] त्या अपिलावर देईल अशा [१][कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची] यथोचित रीत्या अंमलबजावणी केली जावी यासाठी न्यायालयास योग्य वाटेल अशी प्रतिभूती अपीलकर्त्याकडून घेतल्यानंतर, ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले, त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करणे; किंवा

---

१. १९५० च्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला.
२. सन १९२० चा अधिनियम २६ च्या कलम ४ अन्वये समाविष्ट करण्यात आले.
३. १९५० च्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला.
४. वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला.
५. वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट करण्यात आला.

(घ) न्यायालयाचे सहाय्य मागणाऱ्या कोणत्याही पक्षकाराला, प्रापकाची नेमणूक करून किंवा अन्यथा, अपिलाच्या विषयवस्तूच्या संबंधात, न्यायालयास योग्य वाटतील अशा शर्ती घालणे किंवा असा अन्य निदेश देणे.

प्रतिभूती अपुरी असल्याचे आढळल्यास ती वाढविणे.

१४. (१) अपील प्रलंबित असताना कोणत्याही वेळी, उभय पक्षकारांपैकी कोणत्याही एका पक्षकाराने दिलेली प्रतिभूती अपुरी असल्याचे न्यायालयाला दिसून आल्यास, त्यास दुसऱ्या पक्षकाराने अर्ज केला असता आणखी प्रतिभूती मागता येईल.

(२) न्यायालयाने मागणी केल्याप्रमाणे अशी आणखी प्रतिभूती देण्यात कसूर करण्यात आल्यास,—

(क) मूळ प्रतिभूती अपीलकर्त्याने दिलेली असेल तर, न्यायालयाला, उत्तरवादीने केलेल्या अर्जावरून, अपीलकर्त्याने अशी कोणतीही प्रतिभूती दिलेली नव्हती अशाच रीतीने, ज्या हुकूमनाम्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करता येईल,

(ख) मूळ प्रतिभूती प्रतिवादीने दिलेली असेल तर, न्यायालयाने हुकूमनाम्याची पुढील अंमलबजावणी व्यवहार्य असेल तेथवर, स्थगित केली पाहिजे, आणि अपुरी असल्याचे दिसणारी प्रतिभूती देण्यात आली होती, त्यावेळी पक्षकार ज्या स्थितीत होते त्याच स्थितीत त्यांना परत आणले पाहिजे, किंवा अपिलाच्या विषयवस्तूच्या संबंधात न्यायालयाने, त्यास योग्य वाटेल असा निदेश दिला पाहिजे.

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश अंमलात आणण्याची कार्यपद्धती.

१५. (१) [१][सर्वोच्च न्यायालयाच्या] [२][कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची] अंमलबजावणी करवून घेण्याची ज्याची इच्छा असेल त्याने एक विनंतीअर्ज, ज्या न्यायालयाच्या निर्णयावर [३][सर्वोच्च न्यायालयाकडे] अपील दाखल करण्यात आले होते त्या न्यायालयाकडे पाठवला पाहिजे. या विनंतीअर्जासोबत, अपिलात देण्यात आलेल्या व ज्याची अंमलबजावणी करवून घेण्याची इच्छा असेल त्या हुकूमनाम्याची किंवा आदेशाची प्रमाणित प्रत जोडली पाहिजे.

(२) अशा न्यायालयाने [१][सर्वोच्च न्यायालयाचा] [४][हुकूमनामा किंवा आदेश], ज्यावर अपील करण्यात आले तो पहिला हुकूमनामा ज्या न्यायालयाने दिला त्या न्यायालयाकडे किंवा [३][सर्वोच्च न्यायालय] अशा [४][हुकूमनाम्याद्वारे किंवा आदेशांद्वारे] निदेश देईल अशा अन्य न्यायालयाकडे पाठवला पाहिजे आणि (उभय पक्षकारांपैकी कोणत्याही एका पक्षकाराने केलेल्या अर्जावरून) त्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असतील असे निदेश दिले पाहिजेत, आणि उक्त [४][हुकूमनामा किंवा आदेश] अशा रीतीने ज्याच्याकडे पाठवण्यात आला असेल त्या न्यायालयाने तदनुसार, त्याच्या मूळ

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश अंमलात आणण्याची कार्यपद्धती.

[१][(१५. (१) (क) सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या अपील अधिकारितेमधील शक्तींचा वापर करून, त्या न्यायालयातील कार्यवाहीच्या खर्चाबाबतच्या किंवा तदनुषंगिक खर्चाबाबतच्या कोणत्याही आदेशासह, दिलेला कोणताही हुकूमनामा किंवा आदेश हा, ज्या न्यायालयाकडून किंवा न्यायाधिकरणाकडून सर्वोच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्यात आले होते किंवा करण्याचे योजिले होते त्या न्यायालयाच्या किंवा न्यायाधिकरणाच्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीसाठी त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या उपबंधांनुसार अंमलबजावणी करण्याजोगा असेल.

(ख) सर्वोच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्यासाठी परवानगी मागण्यासाठी केलेल्या अर्जाच्या खर्चासह सर्वोच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्याच्या अनुषंगाने उच्च न्यायालयात केलेला खर्च, निवाडयाने दिला असेल तर, ज्या उच्च न्यायालयाकडून, सर्वोच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्यात आले होते किंवा करण्याचे योजिले होते, त्या उच्च न्यायालयाच्या हुकूमनाम्याची किंवा आदेशाची ज्या तऱ्हेने अंमलबजावणी झाली असती त्याच तऱ्हेने उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करून, वसूल करण्याजोगा असेल.

(२) सर्वोच्च न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, त्या न्यायालयाने दिलेला कोणताही हुकूमनामा किंवा आदेश, मृत विरुद्ध पक्षकाराच्या किंवा मृत उत्तरदात्याच्या कायदेशीर प्रतिनिधीवर नोटीस बजावण्यात आली नव्हती किंवा ती त्याला देण्यात आली नव्हती किंवा ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याबद्दल तक्रार आहे त्या न्यायालयात अशा प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी किंवा त्या न्यायालयाच्या हुकूमनाम्यानंतरच्या कार्यवाहीच्या वेळी असा विरुद्ध पक्षकार किंवा उत्तरदादी हजर नव्हता, या कारणावरून अंमलात येण्याचे बंद होणार नाही आणि असा आदेश जणू काही मृत्यू होण्यापूर्वीच

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

२. वरील आदेशाअन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

३. वरील आदेशाअन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

४. वरील आदेशाअन्वये मूळ मजकुराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (४) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस लागू असेल त्या रीतीने व त्या उपबंधांनुसार उक्त हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी केली पाहिजे.

देण्यात आला आहे अशा रीतीने प्रभावी राहील व अंमलात राहील.]

[१]* * * * * *

[२][(४) [३][सर्वोच्च न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नसेल तर, त्या न्यायालयाने दिलेला कोणताही हुकूमनामा किंवा आदेश] विरुद्ध पक्षकाराच्या किंवा मृत उत्तरवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीवर कोणतीही नोटीस बजावण्यात आली नव्हती किंवा ती त्याला देण्यात आली नव्हती किंवा ज्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याबद्दल तक्रार आहे त्या न्यायालयात अशा प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी किंवा त्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याच्या नंतरच्या कार्यवाहीच्या वेळी असा विरुद्ध पक्षकार किंवा उत्तरवादी हजर नव्हता या कारणावरून अंमलात येण्याचे बंद होणार नाही आणि असा आदेश जणू काही मृत्यू होण्यापूर्वी देण्यात आला आहे अशा रीतीने प्रभावी व अंमलात राहील.]

१६. [४][सर्वोच्च न्यायालयाच्या] [५][हुकूमनाम्यांची किंवा आदेशांची] [६]अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाने अशा अंमलबजावणीच्या संबंधात दिलेले आदेश, अशा न्यायालयाच्या स्वत:च्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीच्या संबंधातील त्या न्यायालयाचे आदेश ज्या रीतीने व ज्या नियमांस अनुसरून योग्य असतील त्याच रीतीने व त्याच नियमांस अनुसरून अपीलयोग्य असतील.

अंमलबजावणीशी संबंधित आदेशावरील अपील.

१७. [संघ न्यायालयाकडे केलेली अपिले] संघ न्यायालय अधिनियम, १९४१ (सन १९४१ चा २१) कलम २ अन्वये निरसित.

आदेश शेहेचाळिसावा

निर्देशन

१. ज्या दाव्यातील किंवा अपिलातील हुकूमनाम्यावर अपील होऊ शकत नसेल त्या दाव्याची किंवा अपिलाची सुनावणी होण्यापूर्वी अथवा सुनावणी चालू असताना किंवा अशा कोणत्याही हुकूमनाम्याची अमलबजावणी होत असताना, कोणताही कायदेविषयक किंवा कायद्याइतक्याच प्रभावी असलेल्या परिपाठाविषयीचा असा कोणताही प्रश्न उद्भवेल की ज्या प्रश्नाबाबत, दाव्याची किंवा अपिलाची संपरीक्षा करणाऱ्या अथवा हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला रास्त शंका असेल तेथे, न्यायालयाला, स्वत: होऊन किंवा पक्षकारांपैकी कोणत्याही पक्षकाराने केलेल्या अर्जावरून प्रकरणातील तथ्यांचे आणि ज्याबाबत शंका असेल त्या मुद्याचे विवरणपत्र तयार करता येईल आणि अशा विवरणपत्राचा निर्देश त्या मुद्यावरील त्याच्या स्वत:च्या अभिप्रायासह उच्च न्यायालयाकडे करता येईल.

उच्च न्यायालयाकडे प्रश्नाचा निर्देश करणे.

२. न्यायालयाला कार्यवाही स्थगित करता येईल किंवा असा निर्देश करण्यात आलेला असला तरी प्रकरणाचे काम पुढे चालवता येईल, आणि न्यायालयाला, निर्देशित मुद्यावरील उच्च न्यायालयाच्या निर्णयावर समाश्रित असलेला हुकूमनामा किंवा आदेश देता येईल;

मात्र, असा निर्देश करण्यात आलेला असेल अशा कोणत्याही प्रकरणात, त्या निर्देशावरील उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाची प्रत मिळेपर्यंत कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करता कामा नये.

न्यायालयाला, उच्च न्यायालयाच्या निर्णयावर समाश्रित असलेला हुकूमनामा देता येईल.

३. पक्षकार उपस्थित झाले आणि आपली बाजू मांडण्याची त्यांची इच्छा असली तर, त्या पक्षकाराची सुनावणी केल्यानंतरच उच्च न्यायालयाने, अशा निर्देश करण्यात आलेल्या मुद्याचा निर्णय दिला पाहिजे आणि आपल्या न्यायनिर्णयाची एक प्रत प्रबंधकाच्या सहीने, ज्या न्यायालयाने निर्देश केलेला होता त्या न्यायालयाकडे पाठविली पाहिजे, आणि अशा न्यायालयाने ती प्रत मिळाल्यावर उच्च न्यायालयाच्या निर्णयाला अनुसरुन ते प्रकरण निकालात काढले पाहिजे.

उच्च न्यायालयाचा न्यायनिर्णय पाठवणे व तदनुसार प्रकरण निकालात काढणे.

४. उच्च न्यायालयाच्या निर्णयासाठी निर्देश केल्यामुळे आलेला खर्च (असल्यास;) तो त्या प्रकरणाचा दावाखर्च असेल.

उच्च न्यायालयाकडे निर्देश करण्याचा खर्च.

---

१. १९५० च्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे पोटनियम (३) वगळण्यात आले.

२. १९२० चा अधिनियम २६, कलम ५ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

४. वरील आदेशाद्वारे "हिज मॅजेस्टी इन कौन्सिल" याऐवजी दाखल करण्यात आले.

५. वरील आदेशाद्वारे 'आदेश' या मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

कलम ११३ च्या परंतुकान्वये उच्च न्यायालयाकडे निर्देश करणे.

[१][४क. नियम २, ३ आणि ४ चे उपबंध, नियम १ अन्वये करण्यात आलेल्या निर्देशास जसे लागू होतात तसेच त्या न्यायालयाने कलम ११२ च्या परंतुकान्वये केलेल्या कोणत्याही निर्देशास लागू होतील.]

निर्देश करणाऱ्या न्यायलयाच्या हुकूमनाम्यात फेरबदल करणे, इत्यादीची शक्ती.

५. नियम १ अन्वये [१][किंवा कलम ११३ च्या परंतुकान्वये] एखाद्या प्रकरणाचा उच्च न्यायालयाकडे निर्देश करण्यात आला असेल अशा बाबतीत, उच्च न्यायालयाला ते प्रकरण त्यात सुधारणा करण्यासाठी परत पाठवता येईल आणि ज्या प्रकरणातून तो निर्देश उद्भवला असेल त्या प्रकरणात असा निर्देश करणाऱ्या न्यायालयाने जो हुकूमनामा किंवा आदेश दिलेला असेल त्या हुकूमनाम्यात उच्च न्यायालयास फेरबदल करता येईल, तो रद्द करता येईल किंवा बाजूस सारता येईल, आणि त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

लघुवादविषयक अधिकारितेबाबतच्या प्रश्नांचा उच्च न्यायालयाकडे निदश करण्याची शक्ती.

६. (१) ज्या न्यायालयात एखादा दावा सुरू करण्यात आलेला असेल त्या न्यायालयास न्याय-निर्णय देण्यापूर्वी कोणत्याही वेळी, तो दावा लघुवाद न्यायालयाने दखल घेण्यायोग्य आहे किंवा नाही अशी शंका वाटल्यास त्या न्यायालयाला त्या दाव्याच्या स्वरूपाबाबतच्या शंकेबद्दलच्या आपल्या कारणांच्या निवेदनासह दाव्याचा अभिलेख उच्च न्यायालयाकडे सादर करता येईल.

(२) असा अभिलेख आणि निवेदन मिळाल्यानंतर उच्च न्यायालयास, एकतर त्या दाव्याचे काम पुढे चालवण्याचा किंवा उच्च न्यायालय, अशा दाव्याची दखल घेण्यास जे न्यायालय [१]सक्षम असल्याचे आपल्या आदेशात घोषित करील अशा अन्य न्यायालयाकडे ते वादपत्र सादर करण्यासाठी परत पाठवण्याचा आदेश त्या न्यायालयाला देता येईल.

लघुवादविषयक अधिकारिते-संबंधीच्या चूकभुलीमुळे करण्यात आलेल्या कार्यवाहीचे कागदपत्र पुनरीक्षणासाठी सादर करण्याची जिल्हा न्यायालयाची शक्ती.

७. (१) एखाद्या जिल्हा न्यायालयास दुय्यम असलेल्या एखाद्या न्यायालयाने, लघुवाद न्यायालयाने दखल घेण्याजोगा किंवा अशा रीतीने दखल न घेण्याजोगा दावा चुकीने चालवल्या कारणाने त्या न्यायालयाने त्यांच्याकडे कायद्याद्वारे निहित करण्यात आलेल्या अधिकारितेचा वापर केलेला नाही किंवा अशा रीतीने निहित न केलेल्या अधिकारितेचा वापर केलेला आहे, असे त्या जिल्हा न्यायालयास दिसून आल्यास, जिल्हा न्यायालयाला दाव्याच्या स्वरूपासंबंधीचे दुय्यम न्यायालयाचे मत चुकीचे आहे असे ज्या कारणांवरून वाटते त्या आपल्या कारणांच्या निवेदनासह अभिलेख उच्च न्यायालयाकडे सादर करता येईल आणि एखाद्या पक्षकाराने असे करण्याची विनंती केली तर जिल्हा न्यायालयाने तसे केले पाहिजे.

(२) असा अभिलेख आणि निवेदन मिळाल्यानंतर उच्च न्यायालयाला त्या प्रकरणात त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(३) या नियमान्वये उच्च न्यायालयाकडे सादर करण्यात आलेल्या कोणत्याही प्रकरणातील हुकूमनाम्यानंतरच्या कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात उच्च न्यायालयाला त्या परिस्थितीत त्याला न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(४) जिल्हा न्यायालयाला दुय्यम असलेल्या न्यायालयाने, जिल्हा न्यायालय या नियमाच्या प्रयोजनार्थ, ज्या कोणत्याही अभिलेखाची किंवा माहितीची मागणी करील त्या मागणीचे अनुपालन केले पाहिजे.

आदेश एकेचाळीस, नियम ३८ लागू होते.

[१][८. आदेश एकेचाळीसमधील नियम ३८ हा या नियमाखालील कार्यवाहीस, शक्य होईल तेथवर, लागू होईल.]

आदेश सत्तेचाळीसावा

पुनर्विलोकन

न्यायनिर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी केलेला अर्ज.

१. (१) जी व्यक्ती,—

(क) ज्या कोणत्याही हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर अपील करण्याची मुभा आहे, परंतु अपील करण्यात आलेले नसेल, अशा हुकूमनाम्यामुळे किंवा आदेशामुळे,

(ख) ज्यावर अपील करण्याची मुभा देण्यात आलेली नसेल, अशा हुकूमनाम्यामुळे किंवा आदेशामुळे, किंवा

---

१. १९५१ चा अधिनियम २४, कलम २ अन्वये हा नियम समाविष्ट करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालयाची अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ अन्वये हा नियम समाविष्ट करण्यात आला.

(ग) लघुवाद न्यायालयाने केलेल्या निर्देशावर देण्यात आलेल्या निर्णयामुळे,

स्वत:ला व्यथित झालेली समजत असेल आणि जेव्हा हुकूमनामा किंवा आदेश देण्यात आला त्यावेळी योग्य ती तत्परता दाखवून देखील ज्या बाबीची किंवा पुराव्याची माहिती त्या व्यक्तीला मिळवता आली नाही व त्यामुळे जी बाब किंवा पुरावा त्याला सादर करता आला नाही अशी नवीन आणि महत्त्वाची बाब किंवा पुरावा आढळून आल्यामुळे, अथवा अभिलेखात सकृतदर्शनी दिसणाऱ्या काही चुकीमुळे किंवा दोषामुळे अथवा इतर कोणत्याही पुरेशी कारणामुळे त्या व्यक्तीची जर अशी इच्छा असेल की, तिच्याविरुद्ध देण्यात आलेल्या हुकूमनाम्याचे किंवा आदेशाचे पुनर्विलोकन करण्यात यावे, तर अशा व्यक्तीला तो हुकूमनामा किंवा आदेश देणाऱ्या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचे पुनर्विलोकन करण्यात यावे, यासाठी अर्ज करता येईल.

(२) जो पक्षकार एखाद्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर अपील करत नसेल त्या पक्षकाराला, अशा अपिलाचे कारण हे, अर्जदार आणि अपीलकर्ता या दोघांना सारखेच लागू असेल किंवा तो पक्षकार उत्तरवादी झाल्यामुळे ज्या प्रकरणाच्या आधारे तो पुनर्विलोकनासाठी अर्ज करत असेल ते प्रकरण तो अपील न्यायालयाकडे सादर करू शकत असेल, अशा बाबी वगळून एरव्ही, दुसऱ्या एखाद्या पक्षकाराने केलेले अपील प्रलंबित असले तरी, न्यायनिर्णयाचे पुनर्विलोकन करण्यात यावे यासाठी अर्ज करता येईल.

[१][स्पष्टीकरण.—एखाद्या कायदेविषयक प्रश्नाच्या ज्या निर्णयावर न्यायालयाचा न्यायनिर्णय आधारित असेल तो निर्णय वरिष्ठ न्यायालयाने दुसऱ्या एखाद्या प्रकरणात दिलेल्या नंतरच्या न्यायनिर्णयामुळे फिरवण्यात आलेला आहे किंवा त्यात फेरबदल करण्यात आलेला आहे, ही गोष्ट अशा न्यायनिर्णयाच्या पुनर्विलोकनास कारण होणार नाही.]

२. [पुनरीक्षणासाठीचे अर्ज कोणाकडे करता येतील] दिवाणी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९५६ (सन १९५६ चा ६६), कलम १४ अन्वये निरसित.

पुनर्विलोकनाच्या अर्जाचा नमुना.

३. अपिले दाखल करण्यासंबंधीच्या नमुन्याबाबतचे उपबंध योग्य त्या फेरफारांसह पुनर्विलोकना-संबंधीच्या अर्जांना लागू असतील.

अर्ज केव्हा फेटाळता येईल.

४. (१) पुनर्विलोकन करण्यास पुरेसा आधार नाही असे न्यायालयास दिसल्यास न्यायालयाने तो अर्ज फेटाळला पाहिजे.

अर्ज केव्हा मंजूर करता येईल.

(२) पुनर्विलोकनासंबंधीचा अर्ज मंजूर करण्यात यावा असे न्यायालयाचे मत असल्यास, न्याया-लयाने तो अर्ज मंजूर केला पाहिजे :

परंतु,—

(क) विरुद्ध पक्षकाराला उपस्थित राहणे आणि ज्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी अर्ज करण्यात आलेला असेल त्या हुकूमनाम्यास किंवा आदेशास पुष्टी देण्यासाठी हजर राहून स्वत:ची बाजू मांडणे शक्य व्हावे यासाठी त्या विरुद्ध पक्षकाराला आधी नोटीस दिल्याखेरीज असा अर्ज मंजूर करता कामा नये; आणि

(ख) हुकूमनामा किंवा आदेश देण्यात आला त्यावेळी अर्जदाराला ज्या बाबीची किंवा पुराव्याची माहिती मिळवता आली नव्हती किंवा जी बाब किंवा पुरावा त्याला दाखल करता आला नव्हता, असे अर्जदार अभिकथन करत असेल ते अभिकथन काटेकोरपणे सिद्ध करण्यात आल्याखेरीज, ती नवीन बाब किंवा पुरावा आढळून आल्याच्या कारणावरून असा अर्ज मंजूर करता कामा नये.

दोन किंवा अधिक न्यायाधीश असतील अशा न्यायालयात पुनर्विलोकनाचा अर्ज.

५. ज्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी अर्ज करण्यात आलेला असेल तो हुकूमनामा किंवा आदेश देणारा किंवा देणारे न्यायाधीश किंवा त्या न्यायाधीशांपैकी कोणताही एक न्यायाधीश पुनर्विलोकनासंबंधीचा अर्ज सादर करण्यात येईल त्यावेळी त्या न्यायालयाला संलग्न असण्याचे चालू राहील किंवा राहतील आणि अनुपस्थितीमुळे किंवा अन्य कारणामुळे, अर्जानंतरच्या सहा महिन्यांच्या कालावधीत, तो अर्ज ज्याच्याशी संबंधित असेल तो हुकूमनामा किंवा आदेश विचारात घेण्यास त्या न्यायाधीशास किंवा न्यायाधीशांना प्रतिबंध झालेला नसेल त्याबाबतीत, अशा न्याया-धीशाने किंवा न्यायाधीशांनी किंवा त्या न्यायाधीशांपैकी कोणत्याही एका न्यायाधीशाने, अर्जाची सुनावणी

दोन किंवा अधिक न्यायाधीश असतील अशा न्यायालयात पुनर्विलोकनाचा अर्ज.

५. [ज्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या पुनर्विलोकनासाठी अर्ज करण्यात आलेला असेल तो हुकूमनामा किंवा आदेश देणारा किंवा देणारे न्यायाधीश किंवा त्या न्यायाधीशांपैकी कोणताही एक न्यायाधीश पुनर्विलोकनासंबंधीचा अर्ज सादर करण्यात येईल त्यावेळी त्या न्यायालयाला संलग्न असण्याचे चालू राहील किंवा राहतील आणि अनुपस्थितीमुळे किंवा अन्य कारणांमुळे अर्जानंतरच्या दोन महिन्यांच्या कालावधीत तो अर्ज ज्याच्याशी संबंधित असेल तो हुकूमनामा किंवा आदेश विचारात घेण्यास त्या न्यायाधीशास किंवा न्यायाधीशांना प्रतिबंध झालेला नसेल त्याबाबतीत, अशा न्यायाधीशाने किंवा न्यायाधीशांनी किंवा त्या न्यायाधीशांपैकी कोणत्याही एका न्यायाधीशाने अर्जाची सुनावणी केली पाहिजे.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ९२ (एक) अन्वये हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

केली पाहिजे. त्या न्यायालयाच्या अन्य कोणत्याही न्यायाधीशाने किंवा न्यायाधीशांनी त्या अर्जाची सुनावणी करता कामा नये

त्या न्यायालयाच्या अन्य कोणत्याही न्यायाधीशाने किंवा न्यायाधीशांनी त्या अर्जाची सुनावणी करता कामा नये:

परंतु, महाराष्ट्र राज्यात कोठेही बैठक असणाऱ्या उच्च न्यायालयाच्या दोन किंवा अधिक न्यायाधीशांच्या विभागीय खंडपीठाने पास केलेल्या हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या बाबतीत, पुनर्विलोकनाचा अर्ज सुनावणीसाठी तयार असताना उक्त सर्व न्यायाधीश एका ठिकाणी बैठकीस उपलब्ध नसतील तर, दोन किंवा अधिक न्यायाधीशांच्या विभागीय खंडपीठाला त्या अर्जाची सुनावणी करता येईल, मात्र उपलब्ध असल्यास त्यापैकी एक न्यायाधीश हा, ज्यावर पुनर्विलोकनासाठी अर्ज करण्यात आला आहे असा हुकूमनामा किंवा आदेश काढणारा न्यायाधीश असला पाहिजे.]

अर्ज केव्हा फेटाळावयाचा.

६. (१) एकापेक्षा अधिक न्यायाधीशांनी पुनर्विलोकनासबंधीच्या अर्जाची सुनावणी केली असेल आणि न्यायालयात समान मतभिन्नता निर्माण झाली असेल तेथे अर्ज फेटाळण्यात आला पाहिजे.

(२) न्यायालयात बहुमत होईल तेथे, बहुसंख्यांच्या मतानुसार निर्णय देण्यात आला पाहिजे.

फेटाळण्याबाबतचा आदेश अपीलयोग्य नसणे.

७. [१][(१) अर्ज फेटाळल्याबद्दलचा न्यायालयाचा आदेश अपीलयोग्य असणार नाही, परंतु अर्ज मंजूर केल्याबद्दलच्या आदेशास, तो अर्ज मंजूर केल्यावद्दलच्या आदेशाविरुद्ध अपील करून किंवा दाव्यामध्ये अंतिमरीत्या देण्यात आलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलात, आक्षेप घेता येईल.]

अर्ज मंजूर केल्याबद्दलच्या आदेशास आक्षेप.

(२) अर्जदार उपस्थित न राहिल्यामुळे अर्ज फेटाळण्यात आल्यास, अर्जदाराला फेटाळण्यात आलेला अर्ज फाईलमध्ये पूर्ववत अंतर्भूत करण्याचा आदेश मिळण्यासाठी अर्ज करता येईल, आणि असा अर्ज सुनावणीसाठी पुकारण्यात आला होता त्यावेळी उपस्थित राहण्यास अर्जदाराला पुरेशा कारणामुळे प्रतिबंध झाला होता असे, न्यायालयाची खात्री पटेल अशा रीतीने सिद्ध केल्यास, न्यायालयाने, त्यास योग्य वाटतील अशा खर्चासंबंधीच्या अटींवर किंवा अन्यथा असा अर्ज फाईलमध्ये पूर्ववत अंतर्भूत करण्याचा आदेश दिला पाहिजे आणि त्या अर्जाच्या सुनावणीचा दिवस नेमून दिला पाहिजे.

(३) अर्जाबद्दलची नोटीस विरुद्ध पक्षकारावर बजावण्यात आलेली असल्याखेरीज, पोटनियम (२) अन्वये कोणताही आदेश देता कामा नये.

मंजूर करण्यात आलेल्या अर्जाची नोंदणी आणि फेरसुनावणीचा आदेश.

८. पुनरीक्षणासंबंधीचा अर्ज मंजूर करण्यात येईल तेव्हा, त्याबद्दलची नोंद नोंदवहीमध्ये करण्यात आली पाहिजे आणि न्यायालयाला ताबडतोब त्या प्रकरणाची फेरसुनावणी करता येईल किंवा अशा फेरसुनावणीच्या संबंधात, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

विवक्षित अर्जांस रोध.

९. पुनर्विलोकनासंबंधीच्या अर्जावर देण्यात आलेल्या आदेशाचे किंवा पुनर्विलोकनानंतर देण्यात आलेल्या हुकूमनाम्याचे किंवा आदेशाचे पुनर्विलोकन करण्यात यावे यासाठी करण्यात आलेला कोणताही अर्ज विचारार्थ स्वीकारता कामा नये.

[१][१०. आदेश एकेचाळीसचा नियम ३८, हा शक्य असेल तितपत, या आदेशाखालील कार्यवाहीला लागू होईल].

आदेश एकेचाळीस चा नियम ३८ लागू असणे.

[१][आदेश सत्तेचाळीस क

पुनरीक्षण

१. आदेश एकेचाळीस चा नियम ३८ शक्य असेल तितपत या संहितेच्या कलम ११५ खालील कार्यवाहीला लागू होईल.]

आदेश एकेचाळीसचा नियम ३८ लागू असणे.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ९२ दोन अन्वये दाखल करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी.-०१०२/७७, दिनांक५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (२) द्वारे भर घालण्यात आली.

२. वरील अधिसूचनेद्वारे ही भर घालण्यात आली.

आदेश अठ्ठेचाळिसावा

तंकीर्ण

आदेशिका काढणाऱ्या पक्षकाराच्या खर्चाने तिची बजावणी करावयाची.

१. (१) या संहितेखाली काढण्यात आलेली प्रत्येक आदेशिका न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नाही तर, ज्याच्या वतीने अशी आदेशिका काढण्यात आली असेल त्या पक्षकाराच्या खर्चाने बजावण्यात आली पाहिजे.

बजावणीचा खर्च.

(२) अशा बजावणीसाठी आकारण्यायोग्य असलेली न्यायालय फी, अशी आदेशिका काढण्यापूर्वी निश्चित करावयाच्या अशा मुदतीत भरण्यात आली पाहिजे.

आदेशिका काढणाऱ्या पक्षकाराच्या खर्चाने तिची बजावणी करावयाची.

१. (१) या संहितेखाली काढण्यात आलेली प्रत्येक आदेशिका न्यायालयाने अन्यथा निदेश दिला नाही तर, ज्याच्या वतीने अशी आदेशिका काढण्यात आली असेल त्या पक्षकाराच्या खर्चाने बजावण्यात आली पाहिजे.

बजावणीचा खर्च.

[(२) न्यायालयाच्या आदिशिकेच्या बजावणीसाठी आकारणीयोग्य असलेली न्यायालय फी, आदेश चार चा नियम (१), पोट नियम (२) मध्ये उपबंधित करण्यात आले असेल त्याव्यतिरिक्त, आदेशिकेचा अर्ज करण्यात येईल त्यावेळी, किंवा न्यायालयाकडून निश्चित करण्यात येईल अशा कालावधीत भरली पाहिजे.]

आदेश व नोटिसा कशाप्रकारे बजावावयाच्या.

२. या संहितेअन्वये कोणत्याही व्यक्तीला देणे किंवा तिच्यावर बजावणे आवश्यक असतील असे सर्व आदेश, नोटिसा आणि इतर दस्तऐवज हे, समन्साच्या बजावणीसाठी तरतूद करण्यात आलेल्या रीतीने देण्यात आले पाहिजेत किंवा बजावण्यात आले पाहिजेत.

परिशिष्टांमधील नमुन्यांचा वापर.

३. परिशिष्टामध्ये देण्यात आलेले नमुने प्रत्येक प्रकरणाच्या परिस्थितीनुसार आवश्यक असतील अशा बदलांसह, त्या त्या नमुन्यात नमूद करण्यात आलेल्या प्रयोजनांसाठी वापरण्यात आले पाहिजेत.

आदेश एकोणपन्नासावा

सनदी उच्च न्यायालये

उच्च न्यायालयाच्या आदेशिका कोणास बजावता येतील.

१. प्रतिवादींना द्यावयाची समन्से, बजावणी प्राधिलेख आणि उत्तरवादींना पाठवावयाच्या नोटिसा याव्यतिरिक्त दस्तऐवज हजर करण्याबद्दलची नोटीस, साक्षीदारांना पाठवायची समन्से, आणि उच्च न्यायालयाच्या मूळ दिवाणी अधिकारितेचा व त्याच्या विवाहविषयक, मृत्युपत्रीय आणि विना मृत्युपत्रीय अधिकारितांचा वापर करून काढण्यात आलेली इतर प्रत्येक न्यायिक आदेशिका यांची बजावणी, वादांतील न्यायवादींना, किंवा त्यांनी नोकरीस लावलेल्या व्यक्तींना, किंवा उच्च न्यायालय कोणत्याही नियमाद्वारे अथवा आदेशाद्वारे निदेश देईल अशा अन्य व्यक्तीला करता येईल.

सनदी उच्च न्यायालयांच्या संबंधातील व्यावृत्ती.

२. सनदी उच्च न्यायालयाने पुरावा घेणे किंवा न्यायनिर्णय आणि आदेश अभिलिखित करणे या संबंधात, या संहितेचा प्रारंभ होतेवेळी अंमलात असलेले कोणतेही नियम या अनुसूचीमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे सीमित केले जातात किंवा त्यांच्यावर त्या गोष्टींचा अन्यथा परिणाम होतो, असे मानण्यात येणार नाही.

नियम लागू होणे.

३. कोणतेही सनदी उच्च न्यायालय साधारण किंवा असाधारण मूळ दिवाणी अधिकारितेचा ज्या प्रकरणांत वापर करील त्या प्रकरणांना, पुढील नियम लागू होणार नाहीत :—

(१) आदेश सात, नियम १० व नियम ११, खंड (ख) आणि (ग),

(२) आदेश दहा, नियम २;

नियम लागू होणे.

[३. कोणतेही सनदी उच्च न्यायालय साधारण किंवा असाधारण मूळ दिवाणी अधिकारितेचा ज्या प्रकरणांत वापर करील त्या प्रकरणांना, पुढील नियम लागू होणार नाहीत :—

(१) आदेश पाच, नियम १९क,

(२) आदेश सहा, नियम १०, नियम ११ मधील खंड (ख) आणि (ग) आणि नियम १४क,

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३, सुधारणा (२) द्वारे बदली दाखल करण्यात आले.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ सुधारणा (१) अन्वये हा नियम बदली दाखल करण्यात आला.

(३) आदेश सोळा, नियम २;

(४) आदेश अठरा, नियम ५,६,८,९,१०,११, १३,१४,१५ आणि १६ (त्याचा पुरावा घेण्याच्या रीतीशी संबंध असेल तेथवर).

(५) आदेश वीस, नियम १ ते ८; आणि

(६) आदेश तेहतीस, नियम ७ (त्याचा ज्ञापन तयार करण्याशी संबंध असेल तेथवर);

आणि आदेश एकेचाळीसचा नियम ३५ हा, अशा कोणत्याही उच्च न्यायालयाला ते आपल्या अपील अधिकारितेचा वापर करील अशा प्रकरणात लागू होणार नाही.

(३) आदेश सहा, नियम १४क,

(४) आदेश दहा, नियम ३,

(५) आदेश सोळा, नियम २,

(६) आदेश अठरा, नियम ५,६,८,९,१०,, ११,१३,१४,१५ आणि १६ (पुरावा घेण्याच्या पद्धतीशी त्याचा संबंध असेल तेथवर);

(७) आदेश वीस, नियम १ ते ८ (दोन्हीही धरून);

(८) आदेश एकवीस, नियम ७२क;

(९) आदेश तेहतीस, नियम ७ (त्याचा ज्ञापन करण्याशी जेथवर संबंध असेल तेथवर); आणि,

(१०) आदेश एकेचाळीस, नियम ३८;

आणि आदेश ४१ मधील नियम ३१ आणि ३५ (४) हे कोणत्याही उच्च न्यायालयाला ते आपल्या अपील अधिकारितेचा वापर करील अशा प्रकरणात लागू होणार नाहीत.]

[१][४. अपील अर्ज सादर करण्यासाठी विहित करण्यात आलेल्या कालावधीत तो सादर करण्यात आल्यानंतर, न्यायालय फीच्या संबंधात वेळोवेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार विहित करण्यात आलेली संपूर्ण फी किंवा तिचा कोणताही भाग देण्यात आला नाही तर प्रबंधक, अपील अर्ज सादर करण्यात आल्यानंतर अपीलकर्त्यास संपूर्ण न्यायालय फी किंवा, यथास्थिति, तिचा भाग देण्याची मुभा स्वेच्छा-निर्णयाने देऊ शकेल आणि न्यायालय फी किंवा तिचा भाग अपील अर्ज सादर करण्यासाठी विहित केलेल्या कालावधीनंतर देण्यात आलेला असला तरीही अपील नोंदवहीत दाखल करून घेऊ शकेल.] अपील सादर केल्यानंतर न्यायालय फी स्वीकारण्याची, उच्च न्यायालयाच्या प्रबंधकाची शक्ती.

आदेश पन्नासावा

प्रांतिक लघुवाद न्यायालये

प्रांतिक लघुवाद न्यायालये.

१. यात याखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेले उपबंध, प्रांतिक लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८७ (१८८७ चा ९) [१][किंवा वऱ्हाड लघुवाद न्यायालय कायदा, १९०५] याअन्वये रचना करण्यात आलेल्या न्यायालयांना किंवा [२][उक्त अधिनियमान्वये किंवा कायद्यान्वये] लघुवाद न्यायालयाची

---

१. १९४१ चा अधिनियम ४, कलम २ आणि अनुसूची तीन अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २ आणि अनुसूची तीन अन्वये "त्या अधिनियमान्वये" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी-०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर १९८३ अन्वये हा नियम समाविष्ट करण्यात आला.

अधिकारिता वापरणाऱ्या न्यायालयांना [१][किंवा [२][भारताच्या ज्या भागाला उक्त अधिनियम लागू नसेल अशा कोणत्याही भागातील] जी न्यायालये तदनुरूप अधिकारिता वापरत असतील त्या न्यायालयांना] लागू होणार नाहीत. ते उपबंध म्हणजेच,—

(क्) (एक) लघुवाद न्यायालयाने दखल घ्यावयाच्या दाव्यांमधून वगळलेले दावे आणि अशा दाव्यांमधील हुकूमनाम्यांची अंमलबजावणी,

(दोन) स्थावर मालमत्तेविरुद्ध देण्यात आलेल्या हुकूमनाम्यांची अंमलबजावणी किंवा भागीदारी मालमत्तेमधील भागीदाराचा हितसंबंध,

(तीन) वादप्रश्न निश्चित करणे, यांच्याशी या अनुसूचीचा जेवढा भाग संबंधित असेल तेवढा भाग, आणि

(ख्) पुढील नियम आणि आदेश,—

आदेश दोन, नियम १ (दाव्याची रचना);

आदेश दहा, नियम ३ (पक्षकारांच्या तपासणीची नोंद);

आदेश पंधरा, नियम ४ च्या ज्या भागाअन्वये न्यायनिर्णय ताबडतोब उद्घोषित करण्याची तरतूद करण्यात आली असेल तेवढा भाग वगळून,;

आदेश अठरा, नियम ५ ते १२ (पुरावा),

आदेश एकेचाळीस ते पंचेचाळीस (अपिले),

आदेश सत्तेचाळीस, नियम २,३,५,६,७ (पुनर्विलोकन),

आदेश एकावन्न.

आदेश एकावन्नावा

इलाखा शहर लघुवाद न्यायालये

इलाखा शहर लघुवाद न्यायालये.

१. आदेश पाच मधील नियम २२ व २३, आदेश एकवीसमधील नियम ४ व ७ आणि आदेश सव्वीस मधील नियम ४ यामध्ये व इलाखा शहर लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८२ (१८८२ चा १५.) द्वारे उपबंधित केली असेल त्याव्यतिरिक्त ही अनुसूची, कलकत्ता, मद्रास व मुंबई या शहरांमध्ये स्थापन केलेल्या कोणत्याही लघुवाद न्यायालयामधील कोणत्याही दाव्यास किंवा कार्यवाहीस लागू होणार नाही.

---

१. १९५१ चा अधिनियम २, कलम १८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५६ (क्रमांक २) द्वारे "ख वर्गीय राज्ये" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

पहिल्या अनुसूचीचे परिशिष्टे

नमुने

परिशिष्ट "क"

वादकथने

(१) दाव्यांचे सरनामे

.....यांच्या न्यायालयात.

अ, ब (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे) .. .. .. वादी.

विरुद्ध

क, ड (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे) .. .. .. प्रतिवादी

(२) विशिष्ट बाबतीत पक्षकारांचे वर्णन

[1][भारतीय संघराज्य किंवा, प्रकरणपरत्व,.....राज्य].

महाअधिवक्ता,.....

जिल्हाधिकारी,.....

.....(राज्य).

.....येथे नोंदीव कार्यालय असलेली अ व कंपनी, मर्यादित

क, ड या कंपनीचा अ, ब हा लोक अधिकारी.

अ, ब (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे) त्याच्या वतीने व मयत क, ड (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे) यांच्या इतर सर्व धनकोंच्या वतीने.

अ, ब (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे) त्यांच्या वतीने व..... कंपनी मर्यादित यांनी काढलेले ऋणरोखे धारण करणाऱ्या इतर सर्वांच्या वतीने.

पदस्थ प्रापक.....

अ, ब, अज्ञान (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे) क, ड तर्फे (किंवा पाल्याधिकरणातर्फे), त्याचा इष्ट मित्र.

अ, ब (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे), विकल मनाची व्यक्ती (किंवा कमकुवत मनाची व्यक्ती), यांच्यातर्फे क, ड त्याचा इष्ट मित्र.

अ, ब.....येथे भागीदारीने धंदा करणारी भागीदारी संस्था.

अ, ब (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे), यांच्यातर्फे त्याचा नेमलेला मुखत्यार.

क, ड (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे).

अ, ब (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे), ठाकूरचा शेबैट.

अ, ब (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे), मयत क, ड चे मृत्युपत्रव्यवस्थापक.

अ, ब (वर्णन व राहण्याचे ठिकाण लिहावे), मयत क, ड चे वारस.

---

(३) वादपत्रे

क्रमांक १

कर्जाऊ दिलेल्या पैशांबद्दल

(सरनामा)

अ.ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक .....माहे.....सन १९.. रोजी, वादीने प्रतिवादीला .....रुपये कर्जाऊ दिले असून प्रतिवादीने त्याची दिनांक ..... माहे ..... सन १९.., रोजी परतफेड करावी असे ठरले होते.

२. प्रतिवादीने दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजी .... इतके रुपये दिले असून ठरलेल्या पैशांची परतफेड केली नाही. (मुदतीच्या कोणत्याही कायद्यापासून आपणास सूट मिळावी असा वादीचा दावा असेल तर, तसे नमूद करावे).

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

३. दिनांक ..... पासून दिनांक ..... पर्यंत वादी अज्ञान होता (किंवा वेडा होता.)

४. (दाव्याचे कारण केव्हा उद्भवले ते, आणि न्यायालयाला तो दावा चालवण्याची अधिकारिता आहे हे दर्शवणारी सत्ये).

५. दाव्याच्या विषयवस्तुची किंमत अधिकारितेच्या प्रयोजनासाठी रुपये ..... इतकी असून न्यायालय फीच्या प्रयोजनासाठी रुपये ..... इतकी आहे.

६. दिनांक .. माहे ..... सन १९.. पासून ..... टक्के या दराने आपणास व्याजासहित रक्कम मिळावी अशी वादीची हक्कमागणी आहे.

क्रमांक २

जादा दिलेल्या रकमेबद्दल

(सरनामा)

अ. ब., उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजी वादीने, शुद्ध चांदीच्या दर तोळ्यास .... आणे प्रमाणे चांदीच्या .... लगडी खरेदी करण्याचे व प्रतिवादीने ते विकण्याचे कबूल केले.

२. वादीने इ. फ. कडून उक्त लगडींची पारख करून घेतली. लगडींची अशाप्रकारे पारख केल्याबद्दल प्रतिवादीने इ. फ. ला पैसे देऊन टाकले आणि प्रत्येक लगडीत १,५०० तोळे चांदी आहे, असे इ. फ. ने जाहीर केल्यावर त्याप्रमाणे वादीने प्रतिवादीला .... रुपये दिले.

३. उक्त प्रत्येक लगडीत केवळ १,२०० तोळे शुद्ध चांदी होती आणि प्रदान करतेवेळी वादीला सदर वस्तुस्थितीची कल्पना नव्हती.

४. अशा रीतीने प्रतिवादीने त्याला जादा दिल्या गेलेल्या रकमेची परतफेड केली नाही.

(येथे नमुना क्रमांक १ मधील परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व जो अनुतोष मागितला असेल तो लिहावा.)

क्रमांक ३

ठराविक किंमतीत माल विकून तो स्वाधीन केल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब., उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजी इ. फ. ने प्रतिवादीला (शिंपाची शंभर पिंपे, किंवा यासोबत जोडलेल्या अनुसूचीत नमूद केलेला माल किंवा किरकोळ माल) विकून तो प्रतिवादीच्या स्वाधीन केला.

२. उक्त माल स्वाधीन झाल्यावर (किंवा दिनांक .. माहे .... रोजी किंवा वादपत्र दाखल करण्यापूर्वी काही दिवस अगोदर प्रतिवादीने ..... रुपये देण्याचे अभिवचन दिले.)

३. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

४. इ. फ. दिनांक .. माहे .... सन १९.. रोजी मरण पावला. त्याच्या अखेरच्या मृत्यु-पत्रानुसार त्याने त्याच्या भावाला म्हणजे वादीला त्याचा मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नेमले आहे.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा).

७. इ. फ. चा मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून वादीने हक्कमागणी केली आहे. (मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक ४

वाजवी किंमतीत माल विकून तो स्वाधीन केल्याबद्दल

(सरनामा)

अ.ब., उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजी, वादीने प्रतिवादीला (घरगुती फर्निचर-च्या किरकोळ वस्तू) विकून त्याच्या स्वाधीन केल्या. परंतु किंमतीसंबंधी कोणताही व्यक्त करार करण्यात आला नाही.

२. मालाची वाजवी किंमत ····· रुपये होती.

३. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

(नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक ५

प्रतिवादीच्या विनंतीवरून तयार केलेला माल त्याने न स्वीकारल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब., उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी, वादीने इ. फ. साठी (सहा टेबल व पन्नास खुर्च्या) करून द्याव्यात आणि त्या वस्तू स्वाधीन केल्यावर इ. फ. ने ···· रुपये द्यावेत अशा प्रकारचा इ.फ. चा व वादीचा आपसात करार झाला होता.

२. त्याप्रमाणे वादीने वरील फर्निचर तयार केले आणि दिनांक ·· माहे ·····. सन १९.. रोजी ते इ.फ. च्या स्वाधीन करण्यासाठी त्याला देऊ केले आणि तेव्हापासून वादी, फर्निचर स्वाधीन करून देण्यास तयार व इच्छुक आहे.

३. परंतु इ. फ. ने सदर फर्निचर स्वीकारले नाही किंवा त्याने त्याची किंमतही दिली नाही.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक ६

(लिलावात विकलेल्या मालाच्या) पुनर्विक्रीत आलेल्या तुटीबद्दल

(सरनामा)

अ. ब., उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ····· माहे ····· सन १९ ····· रोजी, वादीने किरकोळ (माल) लिलावात ठेवला, त्यासाठी अशी शर्त होती की, विक्रीनंतर खरेदीदाराने (दहा दिवसांच्या) आत मालाची किंमत दिली नाही किंवा तो माल नेला नाही तर खरेदीदाराच्या लेख्यावर त्या सर्व मालाची पुनर्विक्री व्हावी व ही शर्त प्रतिवादीला ठाऊक होती.

२. प्रतिवादीने लिलावात रुपये ····· इतक्या किंमतीला ½ (चिनी मातीच्या भांड्यांची एक पेटी) खरेदी केली.

३. सदर माल विक्रीच्या दिवशी व त्यानंतर (दहा दिवसां) पर्यंत प्रतिवादीच्या हवाली करण्यास वादी तयार व इच्छुक होता.

४. खरेदी केलेला माल प्रतिवादीने (दहा दिवसांच्या) आत किंवा त्यानंतरही नेला नाही किंवा त्या मालाची किंमतही दिली नाही.

५. दिनांक ····· माहे ····· सन १९ ····· रोजी, वादीने, प्रतिवादीच्या लेख्यावर (चिनी मातीच्या भांड्यांच्या पेटीची) जाहीर लिलावाद्वारे ····· इतक्या रुपयांस पुनर्विक्री केली.

६. अशी पुनर्विक्री करण्यासाठी ····· रुपये इतका खर्च आला.

७. अशा प्रकारे पुनर्विक्रीतून उद्‌भवलेली तूट रुपये ····· प्रतिवादीने भरून दिलेली नाही.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक ७

वाजवी किंमतीत सेवा

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

(१) दिनांक.....माहे.....सन १९..... आणि दिनांक.....माहे.....सन १९.....या दरम्यान.....

येथे वादीने प्रतिवादीच्या विनंतीवरून त्याला (नानाविध प्रकारची रेखाचित्रे, संकल्पचित्रे व रेखाकृती) तयार करून दिल्या, परंतु अशा सेवेबद्दल द्यावयाच्या रकमेसंबंधी कोणताही व्यक्त करार करण्यात आला नाही.

(२) सदर सेवांची वाजवी किंमत.....रुपये इतकी होती.

(३) परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक ८

वाजवी किंमतीत सेवा व सामग्री पुरवल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक.....माहे.....सन १९.....रोजी.....

.....येथे वादीने [.....क्रमांकाचे.....मध्ये असलेले म्हणून ओळखले जाणारे] घर बांधले आणि त्या बांधकामाकरिता प्रतिवादीच्या विनंतीवरून त्याने त्याला सामग्री पुरवली. परंतु, अशा कामासाठी व पुरविलेल्या सामग्रीसाठी द्यावयाच्या रकमेसंबंधी कोणताही व्यक्त करार करण्यात आला नाही.

२. केलेल्या कामाची व पुरविलेल्या सामग्रीची वाजवी किंमत.....रुपये इतकी होती.

३. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक ९

वापर व भोगवटा

(सरनामा)

अ. ब. मयत क्ष. य. चा मृत्युपत्रव्यवस्थापक असलेल्या उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. प्रतिवादीने उक्त क्ष. य. च्या परवानगीने दिनांक .. माहे ..... सन १९..पासून दिनांक ..... माहे ..... सन १९.. पर्यंत (..... रस्त्यावरील ..... क्रमांकाच्या घराचा) भोगवटा केला आणि उक्त घराच्या वापराबद्दल करावयाच्या प्रदानासंबंधी कोणताही करार केला नाही.

२. उक्त कालावधीसाठी, उक्त घराच्या भोगवटाबद्दलची वाजवी किंमत ..... होये इतकी होती.

३. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

(नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये अ

४. वादीने क्ष. य. चा मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून पुढील अनुतोष मागितला आहे (येथे मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक १०

पंचांच्या निवाडयावरून

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी (वादीने प्रतिवादीकडे तेलाच्या दहा पिंपांच्या किंमतीसंबंधी मागणी केली. परंतु प्रतिवादीने ती किंमत देण्यास नकार दिल्यामुळे) वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले. त्यांनी हा मतभेद इ. फ. आणि ग. ह. यांच्या लवादाकडे सोपवण्यास एकमेकास लेखी कबुली दिली. यासोबत मूळ दस्तऐवज जोडला आहे.

२. दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी, प्रतिवादीने (वादीला ····· इतके रुपये द्यावेत) असा लवादांनी निवाडा दिला.

३. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

(नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा आणि मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक ११

विदेशी न्यायनिर्णयावरून

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी ····· राज्यातील (संस्थानातील) ·····च्या न्यायालयात त्या राज्यातील (किंवा संस्थानातील) वादी व प्रतिवादी यांच्यात चालू असलेल्या दाव्यात प्रतिवादीने वादीला ·····उक्त तारखेपासून व्याजासहित ····· इतके रुपये द्यावेत असा त्या न्यायालयाने न्यायनिर्णय दिला.

२. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

(नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक १२

जामीनदाराविरुद्ध भाडयाच्या प्रदानासंबंधी

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी, इ. फ. ने वादीकडून ····· वर्षांच्या मुदतीसाठी [····· रस्त्यावरील ····· क्रमांकाचे घर] ····· रुपये इतक्या वार्षिक भाडयाने (दरमहा), द्यावयाच्या भाडयावर घेतले.

२. इ. फ. ला घर भाडयाने दिल्याच्या मोबदल्यात भाडे नियमितपणे मिळत जाईल या हमीसंबंधी प्रतिवादीने कबुली दिली.

३. माहे ····· १९ ··· या महिन्याचे भाडे ···· रुपये होते. परंतु ते दिले गेले नाही.

(जर मुदतीच्या करारादवारे जामीनदाराला नोटीस देणे आवश्यक असेल तर त्याप्रमाणे जादा मजकूर लिहावा).

४. दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी, वादीने प्रतिवादीला भाडे न दिल्याबद्दल नोटीस दिली आणि भाडे देण्याविषयी मागणी केली.

५. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.).

क्रमांक १३

जमीन खरेदी करण्यासंबंधीच्या करारभंगाबद्दल

(सरनामा)

अ.ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ··· माहे ····· सन १९··· रोजी, वादी व प्रतिवादी यांनी करार केला मूळ दस्तऐवज यासोबत जोडला आहे. (किंवा, दिनांक ···· माहे ····· सन १९··· रोजी, ····· या गावात ····· रुपये इतक्या किमतीला वादीने प्रतिवादीला चाळीस बिघे जमीन विकावी व प्रतिवादीने तो वादीकडून खरेदी करावी यासंबंधी दोघांचे परस्पर मतैक्य झाले.)

२. दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· रोजी, वादी सदर मालमत्तेचा पूर्णपणे मालक असून (आणि तो मालमत्ता सर्व भारांपासून मुक्त आहे असे प्रतिवादीस दर्शविले त्याप्रमाणे तिच्यावर काही भार नसून), त्या मालमत्तेचे प्रतिवादीला पुरेसे हस्तांतरणपत्र दिल्यावर किंवा प्रतिवादीने मतैक्य झालेल्या रकमेचे प्रदान केल्यावर वादी, (सदर मालमत्ता प्रतिवादीकडे पुरेशा लेखाद्वारे हस्तांतरण करून देऊ करण्यास तयार व इच्छुक होता आणि अजूनही तयार व इच्छुक आहे).

३. परंतु प्रतिवादीने पैसे दिले नाहीत.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक १४

विकलेला माल स्वाधीन न केल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· रोजी, वादी व प्रतिवादी यांच्यात परस्पर मतैक्य झाले की, प्रतिवादीने वादीला दिनांक ··· माहे ····· सन १९ ·· रोजी पिठाची शंभर पिंपे द्यावीत आणि माल स्वाधीन झाल्यावर वादीने त्याची किंमत म्हणून रुपये ····· द्यावेत, असे ठरले.

२. (उक्त) दिवशी, माल स्वाधीन झाल्यावर वादी प्रतिवादीला उक्त रक्कम देण्यास तयार व इच्छुक होता.

३. प्रतिवादीने माल स्वाधीन केला नाही आणि त्यामुळे वादीला अशा प्रकारे माल स्वाधीन न झाल्यामुळे उपार्जित होणाऱ्या नफ्यापासून वंचित व्हावे लागले.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक १५

अन्यायाने केलेली बडतर्फी

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· रोजी, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये परस्पर असे मतैक्य झाले की, वादीने प्रतिवादीकडे (लेखापाल, किंवा कार्यदेशक म्हणून किंवा, प्रकरणपरत्वे, अन्यप्रकारे) नोकरी करावी आणि अशा प्रकारे प्रतिवादीने वादीला (एक वर्षाच्या) मुदतीसाठी नोकरीवर ठेवावे आणि त्याने केलेल्या सेवेबद्दल त्याला (दरमहा) इतके ····· रुपये द्यावेत.

२. दिनांक ··· माहे ····· सन १९ ·· रोजी, वादी प्रतिवादीकडे नोकरीला लागला आणि उक्त वर्षाच्या उर्वरित कालावधीपर्यंत सदर नोकरी करावी यासंबंधी तो अजूनही तयार व इच्छुक आहे आणि प्रतिवादीलाही त्याबद्दल नेहमीच जाणीव होती.

३. दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· रोजी, प्रतिवादीने वादीला अन्यायाने नोकरीतून पदमुक्त करून त्याला पूर्वोक्ताप्रमाणे नोकरी करण्यास किंवा त्याने पार पाडलेल्या सेवेबद्दल त्याला पैसे देण्यास नकार दिला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक १६

नोकरी करण्याचा करार मोडल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ··· माहे ···· सन १९ ·· रोजी, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असे मतैक्य झाले की, वादीने प्रतिवादीला (वार्षिक) ····· रुपये इतक्या वेतनावर नोकरीवर ठेवावे आणि प्रतिवादीने वादीकडे (एक वर्षाच्या) मुदतीसाठी (कलाकार) म्हणून नोकरी करावी.

२. वादी हा आपण केलेला करार पार पाडण्यासाठी सदैव तयार व इच्छुक होता (आणि दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· रोजी, तसे करण्यास आपण तयार आहोत असेही त्याने सांगितले).

३. प्रतिवादी, वादीकडे वर नमूद केलेल्या दिवशी सेवेत (दाखल झाला), परंतु त्यानंतर दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· रोजी, त्याने पूर्वोक्ताप्रमाणे वादीकडे नोकरीवर राहण्यास नकार दिला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक १७

सदोष कारागिरीबद्दल घर बांधणाऱ्याविरुद्ध

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ··माहे ·····सन १९ ·· रोजी, वादी व प्रतिवादी यांनी परस्पर करार केला व यासोबत मूळ दस्तऐवज जोडला आहे. (किंवा येथे संविदेचा भावार्थ नमूद करावा).

[२. वादीने आपल्या वतीने कराराच्या सर्व शर्तींचे यथोचितरीत्या पालन केले.]

३. प्रतिवादीने (करारात निर्दिष्ट केल्याप्रमाणे परंतु खराब व कारागिरीची उणीव असलेले घर बांधले).

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा).

क्रमांक १८

लिपिकाच्या इमानदारी बंधपत्रावरून

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· रोजी, वादीने इ फ ला लिपिक म्हणून आपल्याकडे नोकरीवर ठेवले.

२. त्याचा मोबदला म्हणून दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· रोजी वादी व प्रतिवादी यांचे असे मतक्य झाले की, जर इ फ ने वादीचा लिपिक म्हणून निष्ठापूर्वक कार्य पार पाडले नाही तर किंवा वादीच्या उपयोगासाठी त्याला प्राप्त झालेल्या सर्व पैशांचा, कर्जासंबंधीच्या पुराव्याचा किंवा इतर मालमत्तेचा त्याने वादीला हिशेब दिला नाही तर त्यामुळे वादीचे जेवढे नुकसान होईल त्यापेक्षा जास्त नसेल इतकी ···· रक्कम त्याने प्रतिवादीला द्यावी.

[किंवा, २. त्याचा मोबदला म्हणून प्रतिवादीने त्याच्या, त्याच तारखेच्या बंधपत्राद्वारे, दंड म्हणून वादीला ···· रुपये इतकी रक्कम देण्यास स्वत:ला बांधून घेतले. त्यात शर्त अशी होती की, जर इ फ ने वादीचा लिपिक व रोखपाल म्हणून निष्ठापूर्वक काम पार पाडल्यास आणि वादीच्या विश्वासादाखल त्याने कोणत्याही वेळी वादीला सर्व पैशाचा, कर्जासंबंधीच्या पुराव्याचा किंवा अन्य मालमत्तेचा हिशेब दिल्यास सदर बंधपत्र रद्दबातल ठरेल.]

[किंवा, २. त्याचा मोबदला म्हणून त्याच तारखेला प्रतिवादीने वादीच्या बाजूने बंधपत्र निष्पादित केले. आणि मूळ दस्तऐवज यासोबत जोडला आहे.]

३. दिनांक ·· माहे ····· सन १९ ·· आणि दिनांक ·· माहे ···· सन १९ ··· या तारखांच्या दरम्यान, वादीच्या उपयोगासाठी इ फ यास पैसे व अन्य मालमत्ता मिळून एकंदर किंमत ···· इतके रुपये मिळाले. सदर रकमेसंबंधी त्याने वादीला हिशेब दिला नाही आणि सदर रक्कम अजूनही देय असून तिची फेड झाली नाही.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक १९

कुळाकडून जमीनमालकाविरुद्ध, विशेष नुकसानासह

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· सन १९··· रोजी, प्रतिवादीने नोंदणीकृत लेखाद्वारे (····· रस्त्यावरील ···· क्रमांकाचे घर) ····· वर्षांच्या मुदतीसाठी वादीला भाड्याने दिले. त्यात त्याने वादीशी अशी संविदा केली की, वादीने आणि त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीने उक्त कालावधीसाठी त्या घराचा कब्जा निर्वेधपणे उपभोगावा.

२. हा दावा चालविण्याचा वादीला हक्क प्राप्त होण्यासाठी ज्या अटी पूर्ण झाल्या पाहिजेत त्या सर्व अटी पूर्ण झाल्या आहेत व ज्या गोष्टी घडून आल्या पाहिजेत त्या सर्व गोष्टी घडून आल्या आहेत.

३. दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी उक्त कालावधीत, उक्त घराचा कायदेशीर मालक इ फ याने त्या घरातून वादीला कायदेशीरपणे काढून टाकले व तो अजूनही वादीला घराचा कब्जा देत नाही.

४. त्यामुळे वादीला (उक्त ठिकाणी शिप्याचा धंदा पुढे चालवता आला नाही, दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी त्याला ····· रुपये खर्च आला आणि अशा रीतीने दुसऱ्या ठिकाणी गेल्यामुळे त्याची ग ह आणि ज ज्ञ ही गिऱ्हाइके तुटली.)

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २०

हानिरक्षणाच्या करारावरून

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. वादी व प्रतिवादी हे अ. ब. आणि क. ड. या नावाने व्यापारात भागीदार होते आणि त्यांनी दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी आपली भागीदारी विसर्जित करून त्यांचे परस्पर असे मतैक्य झाले की, प्रतिवादीने भागीदारीची सर्व मालमत्ता घ्यावी व स्वत:कडे ठेवावी, भागीदारी संस्थेच्या सर्व कर्जाची परतफेड करावी आणि भागीदारी संस्थेच्या कोणत्याही ऋणग्रस्ततेमुळे वादीकडे कोणतीही मागणी करण्यात आली तर त्याचे हानिरक्षण करावे.

२. वादीने, कराराच्या सर्व शर्तींचे स्वत:तर्फे यथोचित रीत्या पालन केले.

३. दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी (इ फ याचे सदर भागीदारी संस्थेकडून कर्जे येणे असल्यामुळे त्याने ····· येथील उच्च न्यायालयात वादीविरुद्ध व प्रतिवादीविरुद्ध न्यायनिर्णय मिळवला. आणि) (त्यामुळे हुकूमनाम्याच्या परतफेडीसाठी वादीला) रुपये ····· इतकी रक्कम भरावी लागली.

४. परंतु प्रतिवादीने वादीला सदर रक्कम दिली नाही.

(नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २१

कपटाने मालमत्ता मिळवणे

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी, वादीने प्रतिवादीला विवक्षित माल विकावा यासाठी वादीचे मन वळवण्याच्या प्रयोजनार्थ प्रतिवादीने वादीला असे सांगितले की, (तो, म्हणजे प्रतिवादी हा पतदार असून त्याची सर्व दायित्वे वजा जाता त्याची ···· रुपयांची ऐपत आहे).

२. त्यामुळे ..... रुपये किंमतीचा (सुका माल) प्रतिवादीला विकत देण्यास (व त्याच्या स्वाधीन करण्यास) वादी प्रवृत्त झाला.

३. प्रतिवादीची उक्त अभिवेदने खोटी होती (येथे विशिष्ट खोटेपणा नमूद करावा) व ती खोटी होती हे प्रतिवादीला माहीत होते.

४. प्रतिवादीने सदर मालाचे पैसे दिले नव्हीत. (किंवा जर सदर माल स्वाधीन करण्यात आला नसेल तर) सदर माल तयार करण्यास आणि तो जहाजात भरण्यास आणि तो परत घेण्यामुळे वादीला रुपये ..... इतका खर्च आला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २२

कपटाने अन्य व्यक्तीस पतीवर माल मिळवून देण्याबाबत

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजी, प्रतिवादीने वादीला असे अभिवेदन केले की, इ फ हा पतदार असून त्याची पत चांगली आहे आणि सर्व दायित्वे वजा जाता त्याची ..... रुपयांची ऐपत आहे. (इ फ हा जबाबदारीच्या पदावर असून त्याची आर्थिक परिस्थिती चांगली आहे आणि त्याच्या पतीवर निर्धास्तपणे माल देता येईल.)

२. त्यामुळे इ फ यास रुपये ..... इतक्या किंमतीचा (तांदूळ) (..... महिन्यांच्या उधारीवर) देण्यास वादीचे मन वळवले गेले.

३. उक्त अभिवेदने खोटी होती आणि ती तशी असल्याबद्दल प्रतिवादीला कल्पना होती आणि यामाग त्याचा वादीची फसवणूक करण्याचा आणि त्याला ठकवण्याचा (किंवा वादीची फसवणूक करून त्याचे नुकसान करण्याचा) उद्देश होता.

४. इ फ याने (पूर्वोक्तप्रमाणे उधारीवर दिलेल्या मालाची मुदत संपल्यावरही पैसे दिले नाहीत किंवा) त्याने उक्त तांदळाचे पैसे दिले नाहीत आणि त्यामुळे सदरहू सर्व तांदूळ वादीने गमावले.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २३

वादीच्या जमिनीतील पाणी प्रदूषित करण्यावरून

(सरनामा).

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. ..... येथील ..... नावाची विवक्षित जमीन व त्यातील विहीर व सदर विहिरीतील पाणी यांचा कब्जा, सध्या व यात यानंतर नमूद केलेल्या सर्व काळी वादीकडे होता व आहे व सदर विहिरीचा व त्यातील पाण्याचा उपयोग करून घेण्याचा व त्यापासून होणारा फायदा मिळवण्याचा आणि सदर विहिरीत जे विवक्षित झरे व जलप्रवाह वाहून येत होते व सदर विहिरीत ज्या पाण्याचा पुरवठा होत असे ते पाणी प्रदूषित न करता किंवा घाणेरडे न करता तसेच वाहून येत राहावे असा त्याचा हक्क होता.

२. दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजी, प्रतिवादीने अन्यायाने ती विहीर व त्यातील पाणी व सदर विहिरीत जे झरे व जलप्रवाह वाहून येत होते त्यातील पाणी घाणेरडे व प्रदूषित केले.

३. त्याचाच परिणाम म्हणून त्या विहिरीतील पाणी अस्वच्छ झाल्यामुळे ते घरगुती व अन्य आवश्यक त्या प्रयोजनासाठी निरुपयोगी झाले व त्यामुळे वादीला व त्याच्या कुटुंबाला विहिरीचा व पाण्याचा उपयोग व त्यापासून होणारा फायदा यापासून वंचित व्हावे लागले.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २४

अपायकारक गोष्टीच्या निर्मितीबाबत

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. .....येथील ..... नावाच्या विवक्षित जमिनीचा कब्जा सध्या व यानंतर नमद केलेल्या सर्वकाळी वादीकडे होता व आहे.

२. दिनांक .. माहे ..... सन १९.. पासून आजपर्यंत प्रतिवादीन अन्यायाने दुर्गंधी-युक्त काम सुरू केली असून त्यातून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधीयुक्त व शरीराला अपायकारक असा धूर व अन्य वाफ आणि अपायकारक बाबी निघून त्या उक्त जमिनीवर पसरतात व हवा दुषित करतात आणि त्या जमिनीच्या पृष्ठभागावर जमा होतात.

३. त्यामुळे वादीची सदर जमिनीवर वाढणारी झाड, कुंपण, वनस्पती व पिक यांच नुकसान होऊन त्यांची किंमत कमी झाली आणि सदर जमिनीवरील वादीची गरेढोर व पशधन रोगट होऊन विषाने मरण पावली.

४. सदर जमिनीत वादीने एरव्ही आपली गुरेढोर व मजरे चराव्यास नली असती ती त्याला नेता आली नाहीत आणि त्याला तथून आपली गुरेढोरे, मेंढरे व शतीची जनावरे काढून घेण्यास भाग पडले, आणि सदर जमिनीचा त्याला एरव्ही आरोग्यकारक व हितकारकपण उपयोग व भोगवटा करता आला असता तसा तो त्याला करता आला नाही.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाण मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २५

वाटेच्या अधिकारास अटकाव करण्याबाबत

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. (:.... या गावातील घराचा) कब्जा सध्या व यानंतर नमूद केलेल्या सर्वकाळी वादीकडे होता.

२. त्याला स्वतःला व त्याच्या नोकरांना (वाहनाने किंवा पायी) वर्षाच्या कोणत्याही वेळी घरापासून विवक्षित शेतावरून सार्वजनिक महामार्गाकडे जाण्याच्या आणि सदर महामार्गापासून विवक्षित शेतावरून घराकडे परत येण्याच्या वाटेचा अधिकार होता.

३. दिनांक ....माहे .....सन १९...रोजी, प्रतिवादीने गैरपणे उक्त वाटेस अटकाव केला. त्यामुळे वादीला सदर वाटेवरून (वाहनाने किंवा पायी किंवा अन्य रीतीने) ये जा करणे अशक्य झाले (आणि प्रतिवादीने तेव्हापासून आजतागायत सदर वाटेस गैरपणे अटकाव केला आहे).

४. (कोणतेही विशेष नुकसान झाले असल्यास ते येथे नमूद करावे).

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २६

महामार्गास अटकाव केल्याबद्दल

(सरनामा)

१. प्रतिवादीने .....पासून .....कडे जाणाऱ्या महामार्गास अटकाव होईल अशा रीतीने गैरपणे त्या महामार्गावर खंदक खोदून त्यावर मातीचा व दगडांचा ढीग केला.

२. त्यामुळे उक्त महामार्गावरून वादी कायदेशीरपणे जात असताना तो उक्त माती व दगडावर (किंवा उक्त खंदकात) पडून त्याचा हात मोडला. त्यामुळे त्याला खूप वेदना सोसाव्या लागल्या आणि दीर्घकाळपर्यंत त्याला आपल्या धंद्याकडे लक्ष देता आले नाही आणि त्याला औषधोपचारासाठी खर्च करावा लागला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २७

पाण्याचा प्रवाह फिरविल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. ..... जिल्ह्यातील ..... या गावी ..... म्हणून ओळखल्या जाणाऱ्या (ओढ्यावर) एक पाणचक्की असून तिचा कब्जा सध्या व यानंतर नमूद केलेल्या काळी वादीकडे होता व आहे.

२. अशा प्रकारचा कब्जा असल्याकारणाने सदर पाणचक्की चालविण्यासाठी वादीचा त्या ओढ्यांच्या जलप्रवाहावर अधिकार होता.

३. दिनांक ... माहे ..... सन १९ .. रोजी, प्रतिवादीने ओढ्याची कडा खोदून ते पाणी गैरपणे वळविले. त्यामुळे वादीच्या पाणचक्कीमध्ये कमी पाणी येऊ लागले.

४. या कारणामुळे, उक्त पाणी वळविण्यापूर्वी वादी दर दिवसाला ..... पोती दळीत असे, परंतु त्याला आता दर दिवसाला ..... पोत्यांपेक्षा अधिक दळता येत नाही.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २८

सिंचनासाठी पाण्याचा उपयोग करण्याच्या अधिकारास अटकाव केल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. ..... येथील विवक्षित जमीन इत्यादीचा वादीकडे सध्या कब्जा आहे व यानंतर नमूद केलेल्या वेळी होता आणि त्याला उक्त जमिनीच्या सिंचनासाठी विवक्षित ओढ्यातील पाणी काही प्रमाणात घेऊन त्याचा उपयोग करण्याचा हक्क होता.

२. दिनांक ... माहे ..... सन १९ .. रोजी, प्रतिवादींनी अन्यायाने उक्त ओढ्याच्या प्रवाहास गैरपणे अटकाव करून व तो दुसरीकडे वळवून त्यांनी पूर्वोक्तप्रमाणे वादीला उक्त पाणी घेण्यास व त्याचा उपयोग करण्यास प्रतिबंध केला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक २९

आगगाडीच्या रस्त्यावर हयगयीमुळे इजा झाल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणजे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ... माहे ..... सन १९ .. रोजी, प्रतिवादी हे ..... व ..... या दोन ठिकाणांच्या दरम्यान आगगाडीने सामान्यतः उतारूंची ने-आण करणारे परिवाहक होते.

२. त्या दिवशी वादी हा प्रतिवादींच्या उक्त आगगाडीच्या रस्त्यांवरील गाड्यांपैकी एका गाडीमध्ये उतारू होता.

३. अशा प्रकारे तो उतारू असताना ..... येथे (किंवा ..... या स्थानकशेजारी किंवा ..... व ..... या स्थानकांच्या दरम्यान) प्रतिवादींच्या नोकरांच्या हयगयीमुळे व अकुशलपणामुळे उक्त आगगाडीच्या रस्त्यावर गाड्यांची टक्कर झाली, त्यामुळे वादीला फार दुखापत सोसावी लागली. (त्याचा पाय तुटला, त्याचे धोके फुटले, इत्यादी आणि कोणतेही

विशेष नुकसान झाले असल्यास ते नमूद करावे) आणि औषधोपचारासाठी खर्च आला आणि तो (विक्रेता) म्हणून आपला पूर्वीचा धंदा चालवण्यास कायमचा निकामी झाला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

(किंवा, २ : त्या दिवशी वादी आगगाडीचा रस्ता कायदेशीरपणे ओलांडत असताना, प्रतिवादीच्या नोकरांनी हयगयीनें व अकुशलपणाने आगगाडीचे इंजिन व त्याला जोडलेले आगगाडीचे डबे चालवल्यामुळे उक्त इंजिन व आगगाडीचे डबे वादीच्या अंगावर पडले व त्यामुळे ..... परिच्छेद ३ मध्ये असेल त्याप्रमाणे वगैरे)

क्रमांक ३०

हयगयीने वाहन चालवल्यामुळे झालेल्या दुखापतीबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. वादी हा चर्मकार असून तो ..... येथे धंदा चालवतो. आणि प्रतिवादी ..... चा व्यापारी आहे.

२. दिनांक ... माहे ..... सन १९ .. रोजी वादी दुपारनंतर ३ वाजण्याच्या सुमारास कलकत्ता शहरातील चौरंगीवरून दक्षिणेकडे चालला होता. तो मिडलटन रस्ता ओलांडून पलीकडे जात होता. पुढे हा रस्ता उजव्या बाजूने येऊन चौरंगीला काटकोनात भिडतो. वादी हा रस्ता ओलांडत असताना आणि सदर रस्त्यावरील पुढील बाजूच्या फरसबंद पायरस्त्यावर तो येऊन पोहाचण्यापूर्वी प्रतिवादींच्या नोकरांच्या स्वाधीन व नियंत्रणाखाली असलेली दोन घोडे जुंपलेली प्रतिवादीची गाडी मिडलटन रस्त्यावरून हयगयीमुळे, आकस्मिकपणे व कोणताही इशारा न देता जलद व भयंकर वेगाने चौरंगीवर आली. त्यामुळे वादीला गाडीचा दांडा लागून तो खाली पडला आणि तो घोड्यांच्या पायाखाली तुडवला गेला.

३. वादीला धक्का लागल्यामुळे, तो खाली पडल्यामुळे आणि तो घोड्यांच्या पायाखाली तुडवला गेल्यामुळे त्याचा डावा हात मोडला आणि त्याला कुशीत व पाठीवर, त्याचप्रमाणे त्याच्या शरीराच्या अंतर्गत भागाला बरीच दुखापत झाली आणि त्यामुळे वादी चार महिने आजारी पडला व यातना सोसत होता. त्यामुळे त्याला त्याचा धंदा चालवता आला नाही आणि त्याला औषधोपचारासाठी आणि इतर असा बराच खर्च करावा लागला आणि त्याच्या धंद्याचे व नफ्याचे बरेच नुकसान झाले.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक ३१

दुर्भावमूलक खटला भरल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालील प्रमाणे आहे :—

१. दिनांक .. माहे ..... सन १९ .. रोजी, प्रतिवादीने ..... च्या आरोपावरून (उक्त शहराचा न्यायदंडाधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे,) ... यांच्याकडून अटक करण्यासाठी वॉरंट मिळवले आणि त्यावरून वादीला अटक करण्यात आली, आणि त्याने ..... (दिवसांचा, किंवा तासांचा तुरुंगवास भोगला, आणि त्याची सुटका करण्यासाठी रुपये ..... किंमतीचा जामीन द्यावा लागला).

२. प्रतिवादीने हे कृत्य दुर्भावमूलक आणि वाजवी किंवा संभवनीय कारणाशिवाय केले.

३. दिनांक ... माहे ..... सन १९ .. रोजी न्यायदंडाधिकाऱ्यांनी प्रतिवादीची तक्रार फेटाळून लावून वादीला दोषमुक्त केले.

४. ज्या व्यक्तींशी नाते वादीला माहीत नाहीत अशा कित्येक व्यक्तींनी वादीला अटक झाल्याचे ऐकून आणि वादीला गुन्हेगार समजून त्यांनी त्याच्याशी व्यवहार करणे बंद केले; किंवा अशा प्रकारे अटक करण्यात आल्यामुळे वादीला इ. फ. यांच्याकडील लिपिकाची नोकरी गमवावी लागली ; किंवा त्यामुळे वादीला शारीरिक व मानसिक मनस्ताप सोसावा लागला व त्याला आपला धंदा करता न आल्याने त्याची धंद्याची पत कमी झाली आणि तुरुंगातून त्याची सोडवणूक करण्यासाठी आणि उक्त तक्रारीविरुद्ध स्वतःचा बचाव करण्यासाठी वादीला खर्च करावा लागला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा व मागितलेला अनुतोष लिहावा.)

क्रमांक ३२

जंगम माल गैरपणे अटकावून ठेवल्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ..... माहे ..... सन १९.. रोजी, वादपत्रासोबत जोडलेल्या अनुसूचीत नमूद केलेला माल (येथे मालाचे वर्णन करावे) वादीच्या मालकीचा होता (येथे ज्या वस्तुस्थितीवरून कब्जाचा हक्क असल्याचे दिसून येईल ती वस्तुस्थिती नमूद करावी) आणि त्याची अंदाजे किंमत रुपये ..... इतकी आहे.

२. त्या दिवसापासून या दाव्यास सुरुवात होईपर्यंत प्रतिवादीने वादीकडचा माल अटकावून ठेवला आहे.

३. या दाव्यास सुरुवात होण्यापूर्वी म्हणजे दिनांक .... माहे ..... सन १९... रोजी, वादीने प्रतिवादीकडे सदर मालाची मागणी केली. परंतु त्याने सदर माल स्वाधीन करण्यास नकार दिला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

६. वादीची हक्कमागणी खालीलप्रमाणे आहे.—

(१) मालाचा कब्जा मिळावा, किंवा कब्जा मिळाला नाही तर ..... रुपये मिळावेत ;

(२) माल अटकावून ठेवल्याबद्दल ..... रुपये इतकी भरपाई मिळावी.

अनुसूची

क्रमांक ३३

कटप्रेरित खरेदीदाराविरुद्ध व त्याची दखल असणाऱ्या त्याच्या हस्तांतरितीविरुद्ध

(सरनामा)

अ.ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

(१) दिनांक ... माहे ..... सन १९.. रोजी, वादीने आपल्याला विवक्षित माल विकण्यास प्रवृत्त व्हावे या प्रयोजनार्थ, प्रतिवादी क. ड. ने वादीकडे असे अभिवेदन केले की, (प्रतिवादी पतदार आहे व त्याची सर्व दायित्वे जाऊन त्याच्याकडे रुपये ..... इतक्या किंमतीची ऐपत आहे).

२. त्यामुळे क. ड. यास (चहाच्या शंभर पेट्या) विकण्यास व त्या त्याच्या स्वाधीन करण्यास याद्वारे वादी प्रवृत्त झाला. त्यांची अदमासे किंमत रुपये ..... इतकी आहे.

३. उक्त अभिवेदने खोटी होती व ती तशी असल्याचे त्यावेळी क. ड. यास माहीत होते (किंवा उक्त अभिवेदने करतेवेळी क. ड. हा दिवाळखोर होता व तो तसा असल्याचे त्याला माहीत होते.)

४. नंतर क. ड. याने कोणताही मोबदला न घेता उक्त माल प्रतिवादी इ. फ. यास हस्तांतरित केला (किंवा अभिवेदने खोटे असल्याचे इ. फ. यास माहीत होते.)

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

७. वादीची हक्कमागणी खालीलप्रमाणे आहे :—

(१) उक्त मालाची सुपूर्दगी व्हावी, किंवा मालाची सुपूर्दगी अशक्य असल्यास रुपये ..... द्यावेत.

(२) तो माल अटकावून ठेवल्याबद्दल रु. ..... इतकी भरपाई द्यावी.

क्रमांक ३४

चूक असल्याच्या कारणावरून करार रहित करण्याविषयी

(सरनामा)

अ.ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ... माहे ..... सन १९.. रोजी प्रतिवादीने वादीस असे अभिवेदन केले की, प्रतिवादीचा ..... येथे विवक्षित जमिनीचा तुकडा असून तो (दहा बिघे) आहे.

२. उक्त अभिवेदने खरी आहेत असे समजून वादी ती जमीन रुपये ..... इतक्या किंमतीला खरेदी करण्यास प्रवृत्त झाला व त्याने करारावर सही केली. त्याची मूळ प्रत यासोबत जोडली आहे. परंतु त्यांना सदर जमीन हस्तांतरित करण्यात आली नाही.

३. दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी वादीने प्रतिवादीला खरेदीच्या पैशाचा एक भाग म्हणून रुपये ····· इतकी रक्कम दिली.

४. वास्तविक उक्त जमिनीच्या तुकड्यातील जमीन फक्त (पाच बिघे) होती.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

७. वादीची हक्कमागणी खालीलप्रमाणे आहे :—

(१) रुपये ····· आणि दिनांक ·· माहे ····· सन १९·· पासून व्याज.

(२) उक्त कराराची प्रत त्यांच्याकडे सुपुर्द करून ती रद्द करावी.

क्रमांक ३५

अपव्ययास बंदी करण्यासाठी मनाईहुकूम मिळण्याविषयी

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. वादी हा (मालमत्तेचे वर्णन लिहावे) याचा पूर्ण मालक आहे.

२. वादीने दिलेल्या पट्टयान्वये सदर मालमत्ता प्रतिवादीच्या ताब्यात आहे.

३. प्रतिवादीने, वादीच्या संमतीशिवाय (विक्री करण्याच्या प्रयोजनार्थ बरीच मौल्यवान झाडे तोडून टाकली आणि आणखी बरीच झाडे तोडण्यासंबंधी तो धमकी देत आहे.)

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

६. प्रतिवादीने उक्त जागेत आणखी कोणताही अपव्यय करू नये किंवा करू देऊ नये म्हणून म. ना. अपव्ययास मनाईहुकूमाद्वारे बंदी करावी अशी वादीची हक्क मागणी आहे.

(आर्थिक भरपाईसंबंधी ही हक्क मागणी करता येईल.)

क्रमांक ३६

उपद्रवास बंदी करण्यासाठी मनाईहुकूम मिळण्याविषयी

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. वादी हा (कलकत्ता येथील ····· रस्त्यावरील ····· क्रमांकाच्या घराचा) यात नमूद केलेल्या सर्व काळी पूर्ण मालक होता व आहे.

२. प्रतिवादी हा त्याच रस्त्यावरील एका जमिनीच्या भूखंडाचा यात नमूद केलेल्या सर्व काळी पूर्ण मालक होता व आहे.

३. दिनांक ····· माहे ····· सन १९···· रोजी प्रतिवादीने आपल्या उक्त भूखंडामध्ये एक कत्तलखाना उभारला आहे व तो अद्याप तेथेच आहे. त्या दिवसापासून आजपर्यंत तो सतत त्या ठिकाणी गुरे आणून त्यांची कत्तल करतो (आणि तो वादीच्या घरासमोरील रस्त्यावर रक्त आणि टाकाऊ किंवा निरुपयोगी मांस टाकतो).

[४. त्यामुळे वादीस उक्त घर सोडणे भाग पडले असून सदर घर त्याला भाड्याने देणे अशक्य झाले आहे.]

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

७. प्रतिवादीने आणखी कोणताही उपद्रव करू नये किंवा करू देऊ नये म्हणून उपद्रवास बंदी करण्यासाठी मनाईहुकूम मिळण्याविषयी वादीची हक्क मागणी आहे.

क्रमांक ३७

सार्वजनिक उपद्रवाविषयी

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. प्रतिवादीने गैरपणे ····· येथील ····· रस्ता या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका सार्वजनिक रस्त्यावर जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या मार्गास अडथळा निर्माण होईल अशा रीतीने मातीचा व दगडांचा ढीग केला आहे आणि सदर गैरकृत्य करण्याबाबत प्रतिवादीस बंदी केली नाही तर ते कृत्य चालू ठेवण्याची किंवा ते पुन्हा करण्याची धमकी प्रतिवादी देतो व तसे करण्याचा त्याचा हेतू आहे.

[१] *२. हा दावा दाखल करण्याविषयी वादीने न्यायालयाची परवानगी घेतली आहे.
*असा दावा महाअधिवक्त्याने सुरू केल्यास हे लागू होत नाही.]

५. वादीने खालीलप्रमाणे हक्कमागणी केली आहे :—

(१) सदर सार्वजनिक रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या मार्गास अटकाव करण्याचा प्रतिवादीला हक्क नाही असे जाहीर करावे ;

(२) सदर सार्वजनिक रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या मार्गास प्रतिवादीने अटकाव करू नये म्हणून त्याला मनाई करण्यासाठी आणि पूर्वोक्ताप्रमाणे प्रतिवादीने गैरपणे केलेला मातीचा व दगडांचा ढीग काढून टाकण्यासंबंधी त्याला आदेश देण्यासाठी मनाईहुकूम काढण्यात यावा.

क्रमांक ३८

पाण्याच्या प्रवाहाच्या विभागणीविरुद्ध मनाईहुकूम मिळण्याविषयी

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

(येथे नमुना क्रमांक २७ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

प्रतिवादीने पूर्वोक्ताप्रमाणे पाण्याचा प्रवाह वळवू नये म्हणून त्यास बंदी करण्यासाठी मनाईहुकूम मिळण्याविषयी वादीची हक्क मागणी आहे.

क्रमांक ३९

जी जंगम मालमत्ता नष्ट केली जाईल अशी भीती आहे, ती (जंगम मालमत्ता) परत मिळण्याकरिता आणि मनाईहुकूमाकरिता.

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. (एका प्रसिद्ध चित्रकाराने काढलेल्या बादीच्या आजोबांच्या तसबिरीचा) वादी यात नमूद केलेल्या सर्व काळी मालक होता व आहे. तसेच, सदर तसबिरीची दुसरी प्रत उपलब्ध नाही (किंवा ती मालमत्ता अशा स्वरूपाची आहे की, तिचे नुकसान पैशाने भरून निघणार नाही हे दर्शविणाऱ्या गोष्टी नमूद कराव्यात).

२. दिनांक····माहे·····सन १९····रोजी वादीने सदर तसबीर सुरक्षितपणे ठेवण्यासाठी प्रतिवादीकडे दिली.

३. दिनांक····माहे·····सन १९····रोजी वादीने सदर तसबिरीची प्रतिवादीकडे मागणी केली आणि सदर तसबीर ठेवल्याबद्दलचा सर्व वाजवी खर्च देऊ केला.

४. प्रतिवादी सदर तसबीर वादीच्या हवाली करण्यास नकार देतो आणि जर ती त्याच्या हवाली करण्याची पाळी आली तर सदर तसबीर दडवून ठेवण्याची, तिची विल्हेवाट लावण्याची, ती कापून टाकण्याची किंवा तिचे नुकसान करण्याची धमकी देतो.

५. सदर (तसबीर) नाहीशी करण्यात आल्यास पैशांची रक्कम दिल्याने वादीचे नुकसान भरून येणार नाही.

(येथे नमुना क्रमांक १ चा परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

८. वादीची हक्कमागणी खालीलप्रमाणे :—

(१) प्रतिवादीने उक्त (तसबिरीची) विल्हेवाट लावू नये, तिचे नुकसान करू नये किंवा ती दडवून ठेऊ नये, म्हणून त्यास मनाईहुकूमाद्वारे बंदी करावी.

(२) त्याला ती वादीस परत देण्यास भाग पाडावे.

---

१. सन १९७६ चा अधिनियम क्रमांक १०४ च्या कलम ९३ (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

क्रमांक ४०

अंतर्दावीविषयी

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. यापुढे नमूद केलेल्या हक्कमागणीच्या तारखेपूर्वी ग. ह. ने वादीजवळ सुरक्षितपणे ठेवण्यासाठी (येथे मालमत्तेचे वर्णन करावे) दिली.

२. (ग. ह. याने सदर माल आपल्याकडे अभिहस्तांकित केला या अभिकथनाच्या अन्वये) प्रतिवादी क. ड. ने सदर मालमत्तेची हक्कमागणी केली आहे.

३. (सदर मालमत्ता आपल्याकडे हस्तांतरित करण्याच्या ग. ह. च्या आदेशाच्या आधारे) प्रतिवादी इ. फ. नेही हक्कमागणी केली आहे.

४. या प्रतिवादीचे हक्क काय आहेत ते वादीला माहीत नाहीत.

५. उक्त मालमत्तेवर भार व वादखर्चाशिवाय वादीचा अन्य कोणताही दावा नाही आणि सदर मालमत्ता न्यायालय निदेश देईल त्या व्यक्तीच्या स्वाधीन करण्यास वादी तयार व इच्छुक आहे.

६. प्रतिवादींपैकी कोणाशीही संगनमत करून हा दावा करण्यात आला नाही.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

९. वादीची हक्कमागणी खालीलप्रमाणे आहे :—

(१) यासंबंधी वादीवर कोणतीही कार्यवाही करू नये म्हणून प्रतिवादींना मनाईहुकुमाद्वारे बंदी करावी;

(२) उक्त मालमत्तेच्या हक्कमागणी दाव्यासंबंधी आपसात आंतरवाद करण्यासंबंधी त्यांना फर्मावण्यात यावे;

[(३) उक्त मालमत्तेसंबंधी वाद प्रलंबित असताना ती घेण्यासाठी एखाद्या व्यक्तीला प्राधिकृत करण्यात यावे;]

(४) सदर मालमत्ता अशा (व्यक्तीच्या) हवाली केल्यानंतर यासंबंधी प्रतिवादींच्या सर्व दायित्वातून वादीला भारमुक्त करण्यात यावे.

क्रमांक ४१

धनकोकडून स्वतःच्या वतीने व इतर सर्व धनकोंच्या वतीने कारभार

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. ..... येथील मयत इ. फ. याने मरतेवेळी वादीची रक्कम रुपये ..... (येथे कर्जाचे स्वरूप व कोणतीही प्रतिभूती असल्यास ती लिहावी) देणे होते व त्याच्या संपदेवर अजूनही ते कर्ज आहे.

२. इ. फ. दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजी किंवा त्या सुमारास मरण पावला. त्याच्या दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजीच्या शेवटच्या मृत्युपत्रानुसार त्याने क. ड. यास त्याचा मृत्युपत्र व्यवस्थापक म्हणून नेमले. (किंवा त्याने आपली संपदा मृत्युपत्राने विश्वस्त व्यवस्थेला देऊन टाकली किंवा, प्रकरणपरत्वे, तो मृत्युपत्र न करता मरण पावला.)

३. सदर मृत्युपत्र क. ड. ने शाबीत करून दाखवले (किंवा प्रशासनपत्रे देण्यात आली, इत्यादी.)

४. इ. फ. ची जंगम (आणि स्थावर मालमत्ता किंवा स्थावर मालमत्तेचे उत्पन्न) प्रतिवादीने आपल्या कब्जात घेतले व त्याने वादीचे कर्ज दिले नाही.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

७. वादीची अशी हक्कमागणी आहे की, मयत इ. फ. याच्या जंगम (आणि स्थावर) मालमत्तेचा हिशेब घेण्यात यावा आणि न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार तिचा कारभार व्हावा.

क्रमांक ४२

विनिर्दिष्ट उत्तरदानग्राहीकडून प्रशासन

(सरनामा)

(नमुना क्रमांक ४१ मध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करावा.)

(परिच्छेद १ वगळावा आणि परिच्छेद २ पासून सुरुवात करावी.) ····· येथील मयत इ. फ. हा दिनांक ··· माहे ····· सन १९ ·· रोजी किंवा त्या सुमारास मरण पावला. त्याच्या दिनांक ··· माहे ····· सन १९ ·· च्या शेवटच्या मृत्युपत्रानुसार त्याने क. ड. यास आपला मृत्युपत्रव्यवस्थापक नेमले आणि वादीस (येथे विनिर्दिष्ट मृत्युपत्रित मालमत्ता नमूद करावी) मृत्युपत्राने देऊन टाकली.

परिच्छेद ४ ऐवजी खालील मजकूर दाखल करावा :—

इ. फ. ची जंगम मालमत्ता प्रतिवादीच्या कब्जात आहे आणि सदर वस्तू इतर वस्तूंबरोबर (जी विनिर्दिष्ट वस्तू मृत्युपत्राने देण्यात आली असेल त्या वस्तूचे नाव लिहावे) प्रतिवादीच्या कब्जात आहे.

परिच्छेद ७ ची सुरुवात करण्यासाठी खालील मजकूर दाखल करावा :—

वादीची अशी मागणी आहे की, सदर (मृत्युपत्राने जी विनिर्दिष्ट वस्तू देण्यात आली असेल त्या वस्तूचे नाव लिहावे.) वादीच्या हवाली करण्याविषयी प्रतिवादीला आदेश देण्यात यावा किंवा वगैरे.

क्रमांक ४३

द्रव्यविषयक उत्तरदानग्राहीतर्फे प्रशासन

(सरनामा)

(नमुना क्रमांक ४१ मध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करावा.)—

(परिच्छेद १ वगळावा आणि परिच्छेद २ ऐवजी पुढील मजकूर दाखल करावा.) ····· येथील इ. फ. हा दिनांक ··· माहे ····· सन १९ ·· रोजी किंवा त्या सुमारास मरण पावला. त्याच्या दिनांक ··· माहे ····· सन १९ ·· च्या शेवटच्या मृत्युपत्रानुसार त्याने क. ड. यास आपला मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नेमले आणि वादीस मृत्युपत्राने ····· इतक्या रुपयांचे उत्तरदान देऊन टाकले.

परिच्छेद ४ मध्ये "कर्ज" ऐवजी "मृत्युपत्रित मालमत्ता" असे शब्द दाखल करावे.

दुसरा नमुना

(सरनामा)

इ. फ. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. क. ····· येथील अ. ब. हा दिनांक ···· माहे ····· सन १९ ·· रोजी मरण पावला. त्याच्या दिनांक ··· माहे ····· सन १९ ·· च्या मृत्युपत्रानुसार त्याने, प्रतिवादी आणि म. न. याला (तो मृत्युपत्रकर्त्याच्या हयातीत मरण पावला) आपले मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नेमले होते आणि मयताच्या मालमत्तेचे भाडे व उत्पन्न वादीला तहहयात देण्यासाठी आणि वादीच्या मृत्यूनंतर व वादीचा एखादा मुलगा एकवीस वर्षे वयाचा न झाल्यास किंवा त्याची मुलगी त्या वयाची न झाल्यास किंवा तिचे लग्न न झाल्यास सदर मृत्युपत्रकर्त्या व्यक्तीचा जो कोणी कायदेशीर वारस असेल त्यास आपली स्थावर मालमत्ता देण्यासाठी आणि वादीच्या मृत्यूच्या वेळी, आपले मृत्युपत्र न करता अ. ब. मरण पावला असता तर, त्यावेळी जी कोणी व्यक्ती त्याची निकटतम नातेवाईक असेल तीस आपली जंगम मालमत्ता देण्यासाठी आणि पूर्वोक्ताप्रमाणे अशी कोणतीही व्यक्ती वारस नसेल तर त्याने, आपल्या मृत्युपत्रव्यवस्थापकांकडे जंगम व स्थावर मालमत्ता सोपवून दिली.

२. प्रतिवादीने दिनांक ···· माहे ····· सन १९ ·· रोजी सदर मृत्युपत्र शाबित केले. वादीचे लग्न झालेले नाही.

३. मृत्युपत्र करणारा मरण पावला त्यावेळी त्याच्या मालकीची जंगम व स्थावर मालमत्ता होती. स्थावर मालमत्तेची भाडी वसूल करण्याच्या कामाला प्रतिवादी लागला आणि त्याने जंगम मालमत्ता मिळवली. स्थावर मालमत्तेचा काही भाग प्रतिवादीने विकला.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

६. वादीची हक्कमागणी पुढीलप्रमाणे आहे :—

(१) अ. ब. च्या जंगम व स्थावर मालमत्तेचे प्रशासन या न्यायालयातर्फे व्हावे आणि त्या प्रयोजनार्थ योग्य ते सर्व निदेश मिळावेत व हिशेब घेण्यात यावेत;

(२) सदर प्रकरणाच्या स्वरूपानुसार आवश्यक असेल असा आणखी किंवा इतर कोणताही अनुतोष मिळावा.

क्रमांक ४४

विश्वस्तव्यवस्थेची अंमलबजावणी करण्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. प्रतिवादीचे वडील व आई इ. फ. आणी ग. ह. यांच्या लग्नाच्या वेळी दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी किंवा त्या सुमारास एक दस्तऐवज करण्यात आला त्यात (किंवा प्रतिवादी क. ड. आणि इ. फ. चे दुसरे धनको यांच्या हिताकरिता इ. फ. ची संपदा व चीजवस्तू हस्तांतरित करून देण्याविषयी दस्तऐवज करण्यात आला) त्यासाठी नेमलेल्या विश्वस्तांपैकी वादी हा एक विश्वस्त आहे.

२. उक्त विश्वस्तव्यवस्थेचा भार अ. ब. ने स्वतःवर घेतला आणि सदर दस्तऐवजामुळे जी जंगम व स्थावर मालमत्ता हस्तांतरित करण्यात आली ती मालमत्ता (किंवा तिचे उत्पन्न) त्याच्या कब्जात आहे.

३. सदर दस्तऐवजान्वये क. ड. ला लाभप्रद हितसंबंधाचा हक्क आला असल्यासंबंधी त्याने हक्कमागणी केली आहे.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

६. उक्त स्थावर मालमत्तेच्या भाड्यांचा व लाभांचा (आणि सदर स्थावर मालमत्तेच्या विक्रीच्या उत्पन्नाचा किंवा त्यापैकी काही भागाचा किंवा जंगम मालमत्तेचा किंवा सदर जंगम मालमत्तेच्या किंवा त्यापैकी काही भागाच्या विक्रीच्या उत्पन्नाचा किंवा सदर विश्वस्तव्यवस्थेची अंमलबजावणी करताना वादीस असा विश्वस्त म्हणून प्रोद्भूत होणाऱ्या लाभांचा) हिशेब देण्यास वादी इच्छुक आहे; आणि त्याची अशी विनंती आहे की, प्रतिवादीच्या समक्ष आणि सदर विश्वस्त-व्यवस्थेची अंमलबजावणी करण्यात ज्यांचा हितसंबंध आहे म्हणून न्यायालय निदेश देईल त्या इतर व्यक्तींच्या समक्ष, न्यायालयाने सदर विश्वस्तव्यवस्थेचा हिशेब घ्यावा आणि तसेच प्रतिवादीच्या व अशा इतर व्यक्तींच्या फायद्यासाठी उक्त विश्वस्तव्यवस्थेच्या संपदेचा न्यायालयातर्फे कारभार व्हावा किंवा क. ड. ने अशा कार्यवाहीविरुद्ध चांगले कारण दाखवावे.

[टीप.—लाभाधिकाऱ्याने दावा दाखल केला असेल तेव्हा, तो उत्तरदानग्राहीने करावयाच्या वादपत्राच्या नमुन्यात योग्य ते फेरफार करून करावा].

क्रमांक ४५

पुरोबंध किंवा विक्रीबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. प्रतिवादीच्या जमिनींचा वादी हा गहाणदार आहे.

२. गहाणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

(क) (दिनांक) ;
(ख) (गहाणकाराची व गहाणदाराची नावे) ;
(ग) (प्रतिभूती म्हणून घेतलेली रक्कम) ;
(घ) (व्याजाचा दर) ;
(ङ) (गहाण ठेवलेली मालमत्ता) ;
(च) (सध्या देय असलेली रक्कम) ;
(छ) (वादीचा हक्क दुसऱ्याकडून आला असेल तर ज्या हस्तांतरणान्वये किंवा प्रक्रांतीअन्वये त्याने हक्कमागणी केली असेल ते हस्तांतरण किंवा ती प्रक्रांती थोडक्यात नमूद करावी) ;

(जर वादी कब्जेगहाणदार असेल तर तसे लिहावे).

३. वादीने दिनांक ···माहे ···सन १९ ··· रोजी गहाण मालमत्तेचा कब्जा घेतला आणि त्या वेळेपासून कब्जेगहाणदार या नात्याने तो हिशेब देण्यास तयार आहे.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

६. वादीची अशी हक्कमागणी आहे की,—

(१) पैसे मिळावेत, किंवा ते न मिळाल्यास (विक्री व्हावी किंवा) पुरोबंध व्हावा व गहाण सोडविण्याचा हक्क रद्द व्हावा (कब्जा मिळावा.)

(आदेश ३४, नियम ६ लागू असेल तेव्हा)

(२) वादीस देय असलेल्या रकमेची फेड करण्यास विक्रीचे उत्पन्न अपुरे पडत असल्याचे आढळून आले असेल तेव्हा [१][बाकी रकमेबद्दल आदेश होण्यासाठी] अर्ज करण्याची वादीला मोकळीक असावी.

क्रमांक ४६

गहाण सोडवण्याबद्दल

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. वादी हा जमिनीचा गहाणकार आहे व प्रतिवादी त्या जमिनीचा गहाणदार आहे.

२. गहाणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

(क्) (दिनांक);
(ख्) (गहाणकाराचे व गहाणदाराचे नाव);
(ग्) (प्रतिभूती म्हणून घेतलेली रक्कम);
(घ्) (व्याजाचा दर);
(ङ) (गहाण ठेवलेली मालमत्ता);
(च्) (वादीचा हक्क दुसऱ्याकडून आला असेल तर ज्या हस्तांतरणान्वये किंवा प्रक्रांती-अन्वये त्याने हक्कमागणी केली असेल ते हस्तांतरण किंवा प्रक्रांती थोडक्यात नमूद करावी); (वादी कब्जेगहाणदार असेल तर तसे लिहावे) ;

३. प्रतिवादीने गहाण मालमत्तेचा कब्जा घेतला आहे. (किंवा त्यास त्या मालमत्तेचे भाडे मिळाले आहे.)

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा).

६. वादीची हक्कमागणी अशी आहे की, उक्त मालमत्ता गहाणमुक्त करून ती त्यास परत द्यावी (आणि तिचा कब्जा त्याला [२][दरम्यानच्या उत्पन्नासह] मिळावा).

क्रमांक ४७

विनिर्दिष्ट पालन (क्रमांक १)

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. प्रतिवादीच्या सहीनिशी दिनांक ·· माहे ····· सन १९·· च्या करारानुसार त्याने ज्या स्थावर मालमत्तेचे त्यात वर्णन केले आहे व जिचा त्यात उल्लेख केला आहे ती विवक्षित स्थावर मालमत्ता रुपये ····· इतक्या किंमतीस वादीपासून खरेदी करण्याचा (किंवा त्यास विकण्याचा) करार केला.

२. प्रतिवादीने कराराचे विनिर्दिष्ट पालन करावे म्हणून वादीने त्यास विनंतीअर्ज केला, परंतु प्रतिवादीने तसे केले नाही.

३. सदर कराराचे विनिर्दिष्ट पालन करण्यास वादी अजूनही तयार व इच्छुक होता व अजूनही तयार आहे आणि प्रतिवादीस त्याबद्दल कल्पना आहे.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा).

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ९३(दोन) अन्वये "बाकी रकमेबद्दल हुकूमनामा होण्यासाठी" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ९३ (तीन) द्वारे जादा दाखल केला (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

६. वादीची हक्कमागणी अशी आहे की, कराराचे विनिर्दिष्ट पालन करण्यासाठी आणि सदर मालमत्तेचा वादीस पूर्णपणे कब्जा मिळण्यास आवश्यक ती सर्व कृत्ये करण्यासाठी [किंवा उक्त मालमत्तेचे हस्तांतरण आणि कब्जा स्वीकारण्यासाठी] आणि दाव्याचा खर्च देण्यासाठी प्रतिवादीस न्यायालयाने आदेश द्यावा.

क्रमांक ४८

विनिर्दिष्ट पालन (क्रमांक २)

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी वादी ब प्रतिवादी यांनी लेखी करार केला. त्याचा मूळ दस्तऐवज सोबत जोडला आहे. करारात वर्णन केलेल्या स्थावर मालमत्तेस प्रतिवादी पूर्ण हक्कदार होता.

२. दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी, वादीने प्रतिवादीस ····· इतके रुपये दिले आणि त्याने आवश्यक त्या दस्तऐवजासह उक्त मालमत्तेचे हस्तांतरण करावे अशी मागणी केली.

३. दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी, प्रतिवादीने असे हस्तांतरण करावे अशी वादीने पुन्हा मागणी केली (किंवा प्रतिवादीने वादीस असे हस्तांतरण करून देण्यास नकार दिला.)

४. प्रतिवादीने हस्तांतरणाचा कोणताही दस्तऐवज करून दिला नाही.

५. वादी प्रतिवादीस उक्त मालमत्तेची खरेदी रक्कम देण्यास अजूनही तयार व इच्छुक आहे.

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

८. वादीची हक्कमागणी अशी आहे की,—

(१) (कराराच्या अटींनुसार) प्रतिवादीने आवश्यक त्या दस्तऐवजांसह उक्त मालमत्तेचे वादीकडे हस्तांतरण करावे;

(२) सदर मालमत्ता अडवून धरल्याबद्दल रुपये ····· इतकी भरपाई द्यावी.

क्रमांक ४९

भागीदारीविषयी

(सरनामा)

अ. ब. उपरिनामित वादीचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे :—

१. वादी व प्रतिवादी क. ड. गेली ···· वर्षे (किंवा महिने) भागीदारीच्या नियमावली अन्वये लेखी करार करून (किंवा विलेख करून किंवा तोंडी करार करून) एकत्र भागीदारीचा धंदा चालवत होते.

२. वादी व प्रतिवादी यांच्यात भागीदार या नात्याने अनेक विवाद व मतभेद निर्माण झाल्यामुळे भागीदारीने धंदा चालवून भागीदारांना फायदा मिळणे अशक्य झाले (किंवा प्रतिवादीने खालीलप्रमाणे भागीदारीच्या नियमावलींचा भंग केला आहे :—

(१)
(२)
(३))

(येथे नमुना क्रमांक १ च्या परिच्छेद ४ व ५ मध्ये असेल त्याप्रमाणे मजकूर लिहावा.)

५. वादीची हक्कमागणी अशी आहे की,—

(१) भागीदारी विसर्जित करण्यात यावी;
(२) भागीदारीचे हिशेब घेण्यात यावेत;
(३) प्रापकाची नेमणूक करण्यात यावी.

(टीप.—कोणत्याही भागीदारीचे समापन करण्यासाठी केलेल्या दाव्यात, भागीदारी विसर्जित करण्याविषयीची हक्कमागणी वगळण्यात यावी आणि त्याऐवजी भागीदारी विसर्जित करण्यात आल्यासंबंधीची वस्तुस्थिती नमूद करणारा एक परिच्छेद त्यात घालावा.)

सामान्य बचाव

नाकबुली. प्रतिवादी (येथे वस्तुस्थिती लिहावी) नाकबूल करतो. प्रतिवादी (येथे वस्तुस्थिती लिहावी) कबूल करीत नाही.

प्रतिवादी ..... कबूल करतो परंतु ..... } म्हणतो. प्रतिवादी भागीदारी संस्थेत आपण भागीदार असल्याचे नाकबूल करतो.

हरकत वादीने अभिकथित केलेली संविदा प्रतिवादीने वादीशी केल्याचे किंवा कोणतीही संविदा केल्याचे प्रतिवादी नाकबूल करतो.

वादीने अभिकथित केल्याप्रमाणे प्रतिवादीने वादीशी संविदा केल्याचेच किंवा त्याच्याशी कोणतीही संविदा केल्याचेच प्रतिवादी नाकबूल करतो.

प्रतिवादी मत्ता कबूल करतो परंतु वादीची हक्कमागणी कबूल करत नाही. वादपत्रात नमूद केलेला माल किंवा त्यापैकी कोणताही माल वादीने आपणास विकला असल्याचे प्रतिवादी नाकबूल करतो.

मुदत मर्यादा. अधिकारिता [१][भारतीय मुदत अधिनियम, १८७७ (१८७७ चा १५) याच्या दुसऱ्या अनुसूचीच्या अनुच्छेद ... व अनुच्छेद .... अन्वये दाव्यास प्रतिबंध होतो (कारणे लिहावीत) या कारणावरून दाव्याची सुनावणी करण्याची न्यायालयास अधिकारिता नाही.

दाव्याचे जे कारण होते ते नाहीसे करण्यासाठी दिनांक ... माहे ..... सन १९ ... रोजी प्रतिवादीने वादीला एक हिऱ्याची अंगठी दिली व वादीने ती स्वीकारली.

दिवाळखोरी. प्रतिवादी दिवाळखोर असल्याचे न्यायनिर्णीत करण्यात आले.

दाव्यास सुरूवात करण्यापूर्वीच वादी दिवाळखोर असल्याचे न्यायनिर्णीत करण्यात आले होते आणि दावा करण्याचा अधिकार प्रापकाकडे निहित झाला होता.

अज्ञानावस्था. अभिकथित संविदा करण्याच्या वेळी प्रतिवादी अज्ञान होता.

न्यायालयात प्रदान. संपूर्ण मागणीसाठी म्हणून (किंवा, प्रकरणपरत्वे, मागणी केलेल्या पैशांचा भाग म्हणून रुपये .....) प्रतिवादीने रुपये ..... न्यायालयात भरले आहेत आणि प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादीची मागणी (किंवा तिचा भाग) पूर्ण करण्यास ही रक्कम पुरेशी आहे.

वचन पूर्ण करण्यास माफी देणे. अभिकथित वचन पूर्ण करण्यास दिनांक ... माहे ..... सन १९ .. रोजी माफी देण्यात आली.

विखंडन. वादी व प्रतिवादी यांच्यामधील करारानुसार संविदा विखंडित करण्यात आले.

निर्णीत गोष्ट. (येथे दाव्याचा निर्देश करावा) दाव्यातील हुकूमनाम्यानुसार वादीच्या मागणीस प्रतिबंध होतो.

प्रतिष्टंभ. (ज्यावरून प्रतिष्टंभ व्हावा अशी हक्कमागणी करण्यात आली असेल ते विधान येथे लिहावे) याचा खरेपणा नाकारण्यास वादीस प्रतिष्टंभ आहे कारण (येथे ज्या वस्तुस्थितीमुळे प्रतिष्टंभ निर्माण झाला असा भरवसा असेल ती वस्तुस्थिती लिहावी).

दावा दाखल करण्यात आल्यानंतर बचावाचे मुद्दे. दावा दाखल करण्यात आल्यापासून, म्हणजे दिनांक .... माहे ..... रोजी (येथे वस्तुस्थिती नमूद करावी.)

क्रमांक १

विक्री करून स्वाधीन केलेल्या मालाबद्दलच्या दाव्यांमधील बचाव

१. प्रतिवादीने सदर माल मागविला नाही.

२. सदर माल प्रतिवादीच्या स्वाधीन करण्यात आला नाही.

३. मालाची किंमत रुपये .... इतकी नव्हती.

(किंवा)

४. }
५. } रुपये .... ची बाब वगळता,
६. }

१. }
२. } प्रमाणे
३. }

७. प्रतिवादीने (किंवा प्रतिवादीच्या अ. ब. या अभिकर्त्याने दावा दाखल करण्यापूर्वी दिनांक ... माहे ..... सन १९.. रोजी वादीस (किंवा वादीचा अभिकर्ता क. ड. यास) पैशाचे प्रदान करून हक्कमागणी पूर्ण केली.

८. दावा दाखल करण्यात आल्यानंतर प्रतिवादीने दिनांक .... माहे ..... सन १९... रोजी वादीस पैशाचे प्रदान करून हक्कमागणी पूर्ण केली.

---

१. पहा, आता मुदत अधिनियम, १९०८ (१९०८ चा ९).

क्रमांक २

बंधपत्रांवरून केलेल्या दाव्यांमधील बचाव

१. सदर बंधपत्र हे प्रतिवादीचे बंधपत्र नव्हे.

२. बंधपत्रातील शर्तीप्रमाणे ठरलेल्या दिवशी प्रतिवादीने वादीस पैशाचे प्रदान केले.

३. सदर बंधपत्रात ठरलेल्या दिवसानंतर आणि सदर दावा दाखल करण्यात येण्यापूर्वी प्रतिवादीने वादीस दाव्यात नमूद केलेल्या मुद्दल रक्कमेचे व्याजासहित प्रदान केले.

क्रमांक ३

हमीदारांवरील दाव्यांमधील बचाव

१. दावा दाखल होण्यापूर्वी प्रकर्त्याने पैशांचे प्रदान करून हक्कमागणी पूर्ण केली.

२. बंधनकारक करारान्वये मुख्य ऋणकोस मुदत देऊन वादीने प्रतिवादीस जबाबदारीतून बंधमुक्त केले.

क्रमांक ४

कर्जाबाबतच्या कोणत्याही दाव्यामधील बचाव

१. मागितलेल्या रकमेतील रुपये २०० च्या संबंधी प्रतिवादीने वादीस विकलेल्या व त्याच्या स्वाधीन केलेल्या मालाबद्दल वजावट करण्यास प्रतिवादी हक्कदार आहे.

त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

	रुपये
२५ जानेवारी, १९०७	१५०
१ फेब्रुवारी, १९०७	५०
एकूण ..	२००

२. सदर संपूर्ण रक्कम (किंवा दाव्यात हक्क मागणी केलेल्या रकमेचा भाग रुपये ·····) यासंबंधी प्रतिवादीने दावा दाखल करण्यापूर्वी प्रतिवादीने रुपये ·····देऊ केले व त्यांचा न्यायालयात भरणा केला आहे.

क्रमांक ५

निष्काळजीपणाने वाहन चालवून झालेल्या इजेबद्दलच्या दाव्यांतील बचाव

१. दावा अर्जात नमूद करण्यात आलेले वाहन आपले होते व ते आपल्या नोकराच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली होते हे प्रतिवादी नाकबूल करतो. सदर वाहन कलकत्ता येथील ····· रस्त्यावर असलेल्या घोडयांच्या तबेल्याच्या मालकाचे असून त्यास प्रतिवादीने वाहन व घोडे पुरवण्याचे काम सोपवून दिले होते आणि ज्या व्यक्तीच्या कब्जात व नियंत्रणाखाली उक्त वाहन होते ती व्यक्ती उक्त ····· यांचा नोकर होता.

२. सदर वाहन मिडलटर्न रस्त्यावरून निष्काळजीपणाने, आकस्मिक किंवा कोणताही इशारा न देता किंवा जलद किंवा भयंकर वेगाने वळवण्यात आले ही गोष्ट प्रतिवादी कबूल करत नाही.

३. प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, वादीने वाजवी काळजी व दक्षता घेतली असती तर, सदर वाहन आपल्याकडे येत आहे हे त्याने पाहिले असते व तो पाहू शकला असता व सदर गाडीचा त्याला जो धक्का लागला तो त्याला टाळता आला असता.

४. वादपत्राच्या तिसऱ्या परिच्छेदात नमूद करण्यात आलेली विधाने प्रतिवादी कबूल करत नाही.

क्रमांक ६

अपकृतीबद्दलच्या सर्व दाव्यांतील बचाव

१. ज्या अनेक कृत्यांबद्दल (किंवा बाबींबद्दल) तक्रार करण्यात आली आहे त्यासंबंधी नाकबुली.

क्रमांक ७

माल अटकावून ठेवल्याबद्दलच्या दाव्यांतील बचाव

१. सदर माल वादीच्या मालकीचा नव्हता.

२. ज्या धारणाधिकारास प्रतिवादी हक्कदार होता त्या धारणाधिकाराबद्दल माल अटकावन ठेवण्यात आला होता.

तपशील खालीलप्रमाणे आहे :—

दिनांक ३ मे १९०७ हक्कमागणीतील माल दिल्लीहून कलकत्त्यास नेण्याबद्दल.—प्रत्येक मणास रुपये २ याप्रमाणे ४५ मणांचे रुपये ९०.

क्रमांक ८

प्रतिलिपी अधिकारांचा भंग करण्याबद्दलच्या दाव्यांतील बचाव

१. वादी हा लेखक (अभिहस्तांकिती, वगैरे) नाही.

२. पुस्तकाची नोंदणी केली नव्हती.

३. प्रतिवादीने उल्लंघन केले नाही.

क्रमांक ९

व्यापारचिन्हांचा भंग केल्याबद्दलच्या दाव्यांतील बचाव

१. सदर व्यापारचिन्ह वादीचे नव्हते.

२. अभिकथित व्यापारचिन्ह हे व्यापारचिन्ह नव्हते.

३. प्रतिवादीने उल्लंघन केले नाही.

क्रमांक १०

उपद्रवासंबंधीच्या दाव्यांतील बचाव

१. वादीचा प्रकाशमार्ग प्राचीन नाही (किंवा त्याचे जे कोणतेही अभिकथित चिरभोगाधिकार असतील ते नाकबूल करावेत).

२. प्रतिवादीच्या इमारतीमुळे वादीच्या प्रकाशमार्गास विशेषत: अडथळा होणार नाही.

३. प्रतिवादीने किंवा त्यांच्या नोकरांनी पाणी प्रदूषित केले ही गोष्ट (किंवा ज्या गोष्टीबद्दल तक्रार करण्यात आली त्या गोष्टी) प्रतिवादी नाकबल करतो.

(ज्याबद्दल फिर्याद करण्यात आली आहे ती करण्याचा आपणास चिरभोगाधिकार किंवा अन्य प्रकारे अधिकार असल्याचा प्रतिवादीचा दावा असेल तर त्याने तसे लिहिले पाहिजे आणि त्याने त्या दाव्यांची कारणे म्हणजे चिरभोगाधिकाराने, अनुदानाने किंवा कोणत्या रीतीने आहे ते नमद करावे.)

४. खाली तपशील दिल्याप्रमाणे दिरंगाई केल्याबद्दल वादी दोषी आहे :—

१८७०. वादीची गिरणी सुरू झाली.

१८७१. वादीस कब्जा मिळाला.

१८८३. पहिली फिर्याद केली.

५. वादीच्या नुकसानभरपाईच्या दाव्यासंबंधी प्रतिवादी, बचावासंबंधीच्या वरील कारणांवर भरवसा ठेवील आणि त्याचे असे म्हणणे आहे की, ज्या कृत्यांबद्दल फिर्याद करण्यात आली आहे त्या कृत्यांमुळे वादीचे कोणतेही नुकसान झालेले नाही. (जर दुसऱ्या कारणांवर भरवसा ठेवण्यात आला असेल तर, ती कारणे नमूद केली पाहिजेत. उदाहरणार्थ, मागील नुकसानीसंबंधीची मुदतमर्यादा).

क्रमांक ११

पुरोबंधाच्या दाव्यातील बचाव

१. प्रतिवादीने गहाणपत्र करून दिले नाही.

२. वादीकडे गहाण हस्तांतरित करून देण्यात आले नव्हते (एकापेक्षा अधिक हस्तांतरणे अभिकथित केली असतील तर जे हस्तांतरण नाकबूल करण्यात आले असेल, ते हस्तांतरण नमूद करावे).

३. भारतीय मुदत अधिनियम, * १८७७ (१८७७ चा १५) याच्या दुसऱ्या अनुसूचीतील अनुच्छेद ..... अन्वये या दाव्यास[1] प्रतिबंध करण्यात आला आहे.

४. खालीलप्रमाणे प्रदाने करण्यात आली, ती म्हणजे :—

	रुपये
(तारीख घालावी)	१,०००
(तारीख घालावी)	५००

५. वादीने दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी ····· चा कब्जा घेतला आणि तेव्हापासून तो भाडे देत आहे.

६. वादीने दिनांक ·· माहे ····· सन १९·· रोजी कर्ज सोडून दिले.

७. दिनांक ····· च्या दस्तऐवजाद्वारे प्रतिवादीने अ. ब. यास आपले सर्व हितसंबंध हस्तांतरित करून दिले.

क्रमांक १२

विमोचनाबद्दलच्या दाव्यातील बचाव

१. भारतीय मुदत अधिनियम, * १८७७ (१८७७ चा १५) याच्या दुसऱ्या अनुसूचीतील अनुच्छेद ..... अन्वये गहाण सोडवण्याच्या वादीच्या अधिकारास प्रतिबंध झाला.

२. वादीने मालमत्तेवरील सर्व हितसंबंध अ. ब. यांच्याकडे हस्तांतरित करून दिले.

३. प्रतिवादीने दिनांक ·· माहे ····· रोजीच्या दस्तऐवजान्वये गहाणात समाविष्ट करण्यात आलेल्या गहाणऋणावरील आणि गहाण मालमत्तेवरील आपले सर्व हितसंबंध अ. ब. कडे हस्तांतरित करून दिले.

४. प्रतिवादीने गहाण मालमत्तेचा कधीच कब्जा घेतला नाही किंवा त्याचे भाडे घेतले नाही.

(जर केवळ काही काळपर्यंतच आपल्याकडे कब्जा असल्याचे प्रतिवादी कबूल करत असेल तर, त्याने तसा काळ नमूद करावा आणि तो कबूल करत असेल त्यानंतरचा कब्जा त्याने नाकबूल करावा.)

क्रमांक १३

विनिर्दिष्ट पालनाबाबतच्या दाव्यातील बचाव

१. प्रतिवादीने करार केला नाही.

२. अ. ब. हा प्रतिवादीचा अभिकर्ता नव्हता (वादीने तसे अभिकथित केले असेल तर).

३. वादीने खालील शर्तींचे पालन केलेले नाही (शर्ती).

४. प्रतिवादीने ····· (अंशतः पूर्ण केलेली कृत्ये अभिकथित केली असतील ती कृत्ये) केली नाहीत.

५. विक्रीस काढलेल्या मालमत्तेवरील वादीचा हक्क अशा स्वरुपाचा नाही की खालील कारणामुळे प्रतिवादीला तो हक्क कबूल करण बंधनकारक आहे (का ते नमूद करावे).

६. खालील बाबींसंबंधी करार अनिश्चित आहे (त्या बाबी नमूद कराव्यात).

७. (किंवा) विलंब केल्याबद्दल वादी दोषी आहे.

८. (किंवा) कपट (किंवा विपर्यास केल्याबद्दल) वादी दोषी आहे.

९. (किंवा) करार अन्यायकारक आहे.

१०. (किंवा) करार चुकीने करण्यात आला.

११. (७), (८), (९), (१०) (किंवा, प्रकरणपरत्वे,) याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१२. विक्रीच्या शर्तींपैकी शर्त क्रमांक ११ अन्वये (किंवा परस्परांमधील करारान्वये) करार विखंडित करण्यात आला.

(ज्या बाबतीत नुकसानभरपाईची मागणी करण्यात आली असेल आणि नुकसान भरून देण्यास आपण जबाबदार नाही असे प्रतिदादीचे म्हणणे असेल त्याबाबतीत, करार किंवा जे भंग झाले असे अभिकथित असेल ते त्याने नाकबूल केले पाहिजे किंवा बचावासंबंधीच्या अन्य मुद्द्यांवर भरवसा ठेवण्याचा त्याचा हेतू असेल, ते मुद्दे म्हणजे [1]भारतीय मुदत अधिनियम, अंगीकार व फेड, हक्क सोडणे, कपट, इत्यादी दाखवले पाहिजेत.)

---

* जाता मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) पहा.

[1] पहा, मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६).

क्रमांक १४

द्रव्यविषयक उत्तरदानग्राह्यीकडून प्रशासनविषयक दाव्यांतील बचाव

१. अ. ब. च्या मृत्युपत्रात कर्जाचा भार अंतर्भूत होता; तो मरण पावला तेव्हा तो दिवाळखोर होता; तो मरण पावला तेव्हा त्याचा जो काही स्थावर मालमत्तेवर हक्क होता, ती मालमत्ता प्रतिवादीने विकून टाकली व त्यापासून रु. ..... इतकी निव्वळ रक्कम मिळाली, आणि मृत्युपत्रकर्त्याची काही जंगम मालमत्ता होती ती प्रतिवादीने हस्तगत करून टाकली व त्यापासून त्याला रुपये ..... इतकी निव्वळ रक्कम मिळाली.

२. उक्त संपूर्ण रकमा आणि जंगम मालमत्तेच्या भाडधापोटी रुपये ..... इतकी जी रक्कम मिळाली ती रक्कम प्रतिवादीने उत्तरक्रिया आणि मृत्युपत्र यासाठी खर्च केली आणि काही रक्कम मृत्युपत्रकर्त्याचे ऋण फेडण्यासाठी खर्च केली.

३. प्रतिवादीने आपले हिशेब तयार करून त्याची एक प्रत दिनांक .. माहे ..... सन १९.. रोजी वादीस पाठविली आणि अशा हिशेबांची तुम्हाला पडताळणी करायची असल्यास खर्चाची प्रमाणे तुम्हाला बिनशर्त पडताळता येईल असा वादीस देकार दिला. परंतु वादीने प्रतिवादीच्या देकाराचा फायदा करून घेण्याचे नाकारले.

४. वादीने या दाव्याचा खर्च दिला पाहिजे असे प्रतिवादीचे म्हणणे आहे.

क्रमांक १५

गांभीर्यपूर्वक घोषणेच्या नमुन्यातील मृत्युपत्राचे संप्रमाण

१८६५ ची १०. १८७० चा २१.

१. 'भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १८६५' [1][किंवा हिंदू मृत्युपत्र अधिनियम, १८७०] यांच्या उपबंधानुसार मयताचे उक्त मृत्युपत्र आणि मृत्युपत्र पुरवणी रीतसरपणे निष्पादित करण्यात आली नाही.

२. सदर मृत्युपत्र व मृत्युपत्र पुरवणी ही अनुक्रमे ज्या वेळी निष्पादित केली असल्याचे दिसते त्यावेळी मयताचे मन, स्मरणशक्ती व आकलनशक्ती निकोप नव्हती.

३. वादी (आणि ज्यांची नावे प्रतिवादीस सध्या माहीत नाहीत अशा त्याच्याबरोबर काम करणाऱ्या इतर व्यक्ती) यांच्या गैरवाजवी दडपणामुळे उक्त मृत्युपत्र व मृत्युपत्र पुरवणी निष्पादित करण्यात आली.

४. उक्त मृत्युपत्र आणि मृत्युपत्र पुरवणी प्रतिवादीच्या कपटामुळे निष्पादित करण्यात आली, आणि ते कपट प्रतिवादीच्या सध्याच्या माहितीप्रमाणे असे होते (कपटाचे स्वरूप नमूद करावे.)

५. उक्त मृत्युपत्र आणि मृत्युपत्र पुरवणी निष्पादित करण्यात आली त्यावेळी त्यातील मजकूर (किंवा, प्रकरणपरत्वे, उक्त मृत्युपत्रातील अवशिष्टविषयक खंडातील मजकूर) मृतास माहीत नव्हता किंवा तो त्यास मान्य नव्हता.

६. मृताने दिनांक १ जानेवारी, १८७३ रोजी आपले खरे मृत्युपत्र तयार केले व त्याद्वारे त्याने प्रतिवादीला एकट्यालाच मृत्युपत्रव्यवस्थापक म्हणून नेमले.

प्रतिवादीची अशी हक्कमागणी आहे की,—

(१) वादीने प्रस्तुत केलेले उक्त मृत्युपत्र आणि मृत्युपत्र पुरवणी याविरुद्ध न्यायालयाने निर्णय घोषित करावा.

(२) न्यायालयाने मृताच्या दिनांक १ जानेवारी, १८७३ च्या मृत्युपत्राचे संप्रमाण कायद्याच्या गांभीर्यपूर्वक घोषणेच्या नमुन्यात देण्यासाठी हुकूमनामा द्यावा.

क्रमांक १६

तपशील

(आ. ६, नि. ५)

(दाव्याचा सरनामा)

तपशील.

(येथे ज्या बाबींबाबत तपशील देण्याचा आदेश देण्यात आला आहे त्या बाबी येथे नमूद कराव्या) यांचा तपशील खालीलप्रमाणे असून तो दिनांक ... माहे ..... च्या आदेशान्वये स्वाधीन करण्यात आला आहे.

(येथे आदेश देण्यात आलेला तपशील, आवश्यकता असेल तर परिच्छेदवार लिहावा.)

---

१. आता पहा, भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ (१९२५ चा ३९).

परिशिष्ट ख

आदेशिका

क्रमांक १

दावा निकालात काढण्यासाठी समन्स

(आदेश ५, नियम १, ५)

(सरनामा)

प्रति

(नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण)

ज्याअर्थी ·····, राहणार ····· यांनी तुमच्याविरुद्ध, ····· बद्दल या न्यायालयात वाद दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी मध्यान्ह ····· वाजता या न्यायालयात जातीने, किंवा ····· ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो वादासंबंधीच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्याच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरवलेला दिवस दाव्याच्या अंतिम निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे, तुमच्या बचावाच्या पुष्टयर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीपुराव्याचा व ज्या दस्तऐवजांचा आधार घेऊ इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुमची तयारी असलीच पाहिजे.

उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

आज दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश

सूचना.—(१) तुमचे साक्षीदार स्वत: होऊन हजर राहणार नाहीत अशी तुम्हाला धास्ती वाटत असेल तर, तुम्ही न्यायालयाकडे अर्ज केल्यास व जरूर तेवढ्या खर्चादाखल पैसे भरल्यास कोणत्याही साक्षीदारास हजर राहण्यास व जो कोणताही दस्तऐवज हजर करण्याबद्दल साक्षीदाराकडे मागणी करण्याचा तुम्हाला अधिकार असेल तो दस्तऐवज हजर करण्यास भाग पाडण्यासाठी तुम्हाला या न्यायालयातून समन्स मिळवता येईल.

(२) सदर दावा तुम्हाला कबूल असल्यास तुमच्यावर जातीने किंवा तुमच्या मालमत्तेवर किंवा या दोन्हीवर होऊ शकणारी हुकूमनाम्याची अंमलबजावणी टाळण्यासाठी तुम्ही ती रक्कम दावाखर्चासकट न्यायालयात भरावी.

[१][**सूचना.**—तसेच तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, नमूद केलेल्या तारखेस किंवा त्यापूर्वी बजावणीसाठी पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द करण्यास पात्र होईल.]

क्रमांक २

वादप्रश्नांच्या निश्चितीसाठी समन्स

(आदेश ५, नियम १, ५.)

(सरनामा)

प्रति,

(नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण.)

ज्याअर्थी ····· यांनी तुमच्याविरुद्ध ····· बद्दल दावा दाखल केला आहे ; म्हणून, सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी मध्यान्ह ···· वाजता या न्यायालयात जातीने किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्यांच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारें बोलावण्यात

[२][**क्रमांक २**

वादप्रश्नांच्या निश्चितीसाठी समन्स

(आदेश ५, नियम १, ५.)

(सरनामा),

प्रति,

(नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण.)

ज्याअर्थी ···· यांनी तुमच्याविरुद्ध ····· बद्दल दावा दाखल केला आहे; म्हणून, सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दिनांक ·· माहे ····· १९ ·· रोजी मध्यान्ह ····· वाजता या न्यायालयात जातीने, किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीचा सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्यांच्याबरोबर असेल अशा वकीलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७ दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ द्वारे ही सूचना ज्यादा दाखल केली.

२. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ६३२४/६० दिनांक ३० सप्टेंबर, १९६९ खंड १२२ द्वारे समाविष्ट केला.

येत आहे [1][आणि उक्त दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा वजावटीची हक्कमागणी किंवा प्रतिहक्कमागणी ज्यांच्यावर आधारलेली असेल असे तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निदेश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे आणि तुमच्या बचावाच्या किंवा वजावटीच्या हक्कमागणीच्या किंवा हक्कमागणीच्या पुष्टचर्थ पुरावा म्हणून तुम्ही तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेल्या किंवा नसलेल्या अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजांवर अवलंबून असाल त्याबाबतीत, तुम्ही, प्रतिवादपत्रासोबत जोडावयाच्या यादीमध्ये अशा दस्तऐवजांची नोंद केली पाहिजे.]

यापूर्वी नमूद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दिनांक···· माहे····· १९·· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

सूचना : (१) तुमचे साक्षीदार स्वत: होऊन हजर राहणार नाहीत अशी तुम्हाला धास्ती वाटत असेल तर, तुम्ही न्यायालयाकडे अर्ज केल्यास व जरूर तेवढचा खर्चादाखल पैसे भरल्यास कोणत्याही साक्षीदारास हजर राहण्यास व जो कोणताही दस्तऐवज हजर करण्याबद्दल साक्षीदाराकडे मागणी करण्याचा तुम्हाला अधिकार असेल तो दस्तऐवज हजर करण्यास त्याला भाग पाडण्यासाठी तुम्हाला या न्यायालयातून समन्स मिळवता येईल.

(२) सदर हक्कमागणी तुम्हाला कबूल असल्यास, तुमच्यावर जातीने किंवा तुमच्या मालमत्तेवर किंवा या दोन्हीवर होऊ शकणारी हुकूमनाम्याची अंमलबजावणी टाळण्यासाठी तुम्ही ती रक्कम दावाखर्चासह न्यायालयात भरावी.

वोलावण्यात येत आहे आणि त्याच दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा वजावट किंवा प्रतिहक्कमागणी ज्याच्यावर आधारलेली असेल असे तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निदेश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे आणि तुमच्या बचावाच्या किंवा वजावटीच्या किंवा प्रतिहक्कमागणीच्या पुष्टचर्थ पुरावा म्हणून तुम्ही तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेल्या किंवा नसलेल्या अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजांवर अवलंबून असाल त्याबाबतीत, तुम्ही, प्रतिवादपत्रासोबत जादा दाखल करावयाच्या किंवा त्यासोबत जोडावयाच्या यादीमध्ये अशा दस्तऐवजांची नोंद केली पाहिजे.

यापूर्वी नमूद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दिनांक··· माहे····· १९·· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

सूचना : (१) तुमचे साक्षीदार स्वत: होऊन हजर राहणार नाहीत अशी तुम्हाला धास्ती वाटत असेल तर, तुम्ही न्यायालयाकडे अर्ज केल्यास व जरूर तेवढचा खर्चादाखल पैसे भरल्यास कोणत्याही साक्षीदारास हजर राहण्यास व जो कोणताही दस्तऐवज हजर करण्याबद्दल साक्षीदाराकडे मागणी करण्याचा तुम्हाला हक्क असेल तो दस्तऐवज हजर करण्यास त्याला भाग पाडण्यासाठी तुम्हाला या न्यायालयातून समन्स मिळविता येईल.

(२) सदर हक्कमागणी तुम्हाला कबूल असल्यास, तुमच्यावर जातीने किंवा तुमच्या मालमत्तेवर किंवा या दोन्हीवर होऊ शकणारी हुकूमनाम्याची अंमलबजावणी टाळण्यासाठी तुम्ही ती रक्कम दावा खर्चासह न्यायालयात भरावी.]

[2][सूचना:—तसेच, तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, नमूद केलेल्या तारखेस किंवा त्यापूर्वी बजावणीसाठी पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द करण्यास पात्र होईल.]

क्रमांक ३

जातीने हजर राहण्याबाबत समन्स

(आदेश ५, नियम ३)

(सरनामा)

प्रति,

(नाव, वर्णन आणि राहाण्याचे ठिकाण.)

ज्याअर्थी,····· यांनी तुमच्या विरुद्ध ····· बद्दल दावा दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याद्वारे दिनांक ·· माहे ····· १९··

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ९४ (एक) द्वारे विवक्षित मजकुराऐवजी दाखल करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून.)

२. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ अन्वये समाविष्ट केले.

रोजी, मध्यान्ह ····· वाजता ····· या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलावण्यात येत आहे, व आपल्या बचावाच्या पुष्टयर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

आज दिनांक ·· माहे ····· १९··· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

[१][सूचना.—तसेच तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठीचा पत्ता न दिल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल.]

[२][क्रमांक ४

संक्षिप्त दाव्यामधील समन्स

(आदेश ३७, नियम २)

(सरनामा)

प्रति,

(नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण)

ज्याअर्थी, ····· यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ३७ वा याखाली तुमच्याविरुद्ध रु. ····· व व्याज यांसाठी दावा दाखल केला आहे; म्हणून, हे समन्स बजावल्यापासून दहा दिवसांच्या आत तुमच्यासाठी उपस्थितिपत्र दाखल करविण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे आणि असे करण्यात तुम्ही कसूर केल्यास, उक्त दहा दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर रुपये ····· पेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम व न्यायालय आदेश देईल त्याप्रमाणे, कोणतेही व्याज असल्यास त्यासह दावा खर्चासाठी रु. ····· इतकी रक्कम यांचा हुकूमनामा मिळविण्यास वादी हक्कदार राहील.

जर तुम्ही तुमच्यासाठी उपस्थितिपत्र दाखल करविले तर, त्यानंतर वादी तुमच्यावर न्यायनिर्णयासाठी समन्स बजावील. या न्यायनिर्णयाच्या सुनावणीच्या वेळी तुम्हाला दाव्यामध्ये बचाव करण्याच्या परवानगीसाठी न्यायालयाला विनंती करण्यास हक्कदार राहील. दाव्याचा बचाव गुणवत्तेनुसार करता येईल किंवा तुम्हाला बचावाची अनुज्ञा देणे वाजवी ठरेल याबाबत, तुम्ही न्यायालयाचे शपथपत्रावर किंवा अन्यथा समाधान करू शकलात तर तुम्हाला बचावाची परवानगी मिळवता येईल.

आज दिनांक ··· माहे ····· १९··· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.]

[३][क्रमांक ४

संक्षिप्त वादामधील समन्स

(आदेश ३७, नियम २)

(सरनामा)

प्रति,

(नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण.)

ज्याअर्थी ····· यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ३७ वा याखाली तुमच्याविरुद्ध रु. ····· व व्याज यांसाठी दावा दाखल केला आहे; म्हणून, हे समन्स बजावल्यापासून दहा दिवसांच्या आत तुमच्यासाठी उपस्थितिपत्र दाखल करविण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलावण्यात येत आहे आणि असे करण्यात तुम्ही कसूर केल्यास, उक्त दहा दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर रु. ····· पेक्षा अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम न्यायालय आदेश देईल त्याप्रमाणे, कोणतेही व्याज असल्यास त्यासह दावा खर्चासाठी रुपये ····· इतकी रक्कम यांचा हुकूमनामा मिळण्यास वादी हक्कदार राहील.

न्यायालयाकडे अर्ज करून आणि तुम्ही बचावास हक्कदार आहे याबाबत न्यायालयाचे समाधान होईल अशी तथ्ये उघड करणारे शपथपत्र त्यासोबत जोडून तुम्हाला दाव्यातील बचावाची परवानगी मिळवता येईल.

आज दिनांक ··· माहे ····· १९··· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

---

१. मुंबई उच्च न्यायालय, अधिसूचना क्रमांक पी ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ द्वारे ही टिप्पणी दाखल करण्यात आली.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४ याच्या कलम ९४ (दोन) द्वारे मूळ नमुन्याऐवजी दाखल करण्यात आला.

३. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ द्वारे ऐवजी दाखल करण्यात आले.

[१][क्रमांक ४-क

संक्षिप्त दाव्यामधील न्यायनिर्णयासाठी समन्स

(आदेश ३७, नियम ३)

(सरनामा)

..... येथील .....

न्यायाधीश यांच्या न्यायालयात १९·· चा दावा क्रमांक ·····.

क ख ग } वादी
विरुद्ध
अ ब क } प्रतिवादी

वादीचे शपथपत्र (वाचल्यानंतर) न्यायालय पुढीलप्रमाणे) आदेश देत आहे :—

वादीला प्रतिवादीविरुद्धच्या (किंवा जर एकाविरुद्ध, काहीविरुद्ध किंवा अनेकांविरुद्ध दावा असेल तर, नावे समाविष्ट करावी) या दाव्यामध्ये रु. ····· साठी व व्याज आणि खर्च यांसाठी न्यायनिर्णय मिळविण्याची मोकळीक असावी. या वादीच्या अर्जाच्या सुनावणीसाठी सर्व संबंधित पक्षकारांनी दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी मध्यान्ह ····· वाजता न्यायालयामध्ये किंवा, प्रकरणपरत्वे, न्यायाधीशासमोर हजर व्हावे.

दिनांक ··· माहे ····· १९··]

सूचना

बचावाची परवानगी मागण्यासाठी करावयाच्या तुमच्या अर्जासोबत बजावणीसाठीचा पत्ता न दिल्यास उक्त अर्ज फेटाळण्यास पात्र ठरेल याची दखल घ्यावी.]

[१][सूचना.—तसेच तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, नमूद करण्यात आलेल्या तारखेला किंवा त्यापूर्वी बजावणीसाठीचा पत्ता न दिल्यास तुमचा बचाव रद्द करण्यास पात्र ठरेल.].

[१][क्रमांक ४-क

संक्षिप्त दाव्यामधील न्यायनिर्णयासाठी समन्स

(आदेश ३७, नियम ३)

(सरनामा)

..... येथील .....

न्यायाधीश यांच्या न्यायालयात १९·· चा दावा क्रमांक ·····.

क ख ग } दावी
विरुद्ध
अ ब क } प्रतिवादी

(दावीचे किंवा, प्रकरणपरत्वे, अन्य व्यक्तीचे) शपथपत्र वाचल्यानंतर न्यायालय पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :—

वादीला प्रतिवादीविरुद्धच्या (किंवा जर दावा एकाविरुद्ध, काहीविरुद्ध किंवा अनेकांविरुद्ध असेल तर नावे समाविष्ट करावी). या दाव्यामध्ये ····· साठी रुपये ··साठी व व्याज आणि खर्च यासाठीच्या न्यायनिर्णयावर सही करण्याची मोकळीक असावी. अशा वादीच्या अर्जाच्या सुनावणीसाठी सर्व संबंधित पक्षकारांनी दिनांक ·· माहे ·· १९·· रोजी मध्यान्ह ···· वाजता न्यायाधीशासमोर किंवा, प्रकरणपरत्वे, दिवाणी न्यायाधीशासमोर हजर व्हावे.

दिनांक ·· माहे ····· १९····

हे समन्स ····· येथील ····· यांनी ····· यांच्या प्लीडरने ····· साठी काढले. तसेच उक्त परि. ख मधील नमुना क्र. १, २ (वर समाविष्ट केल्याप्रमाणे) ३ व ४ (वर समाविष्ट केल्याप्रमाणे) ५ ब ६ यामध्ये खालील सूचना समाविष्ट करण्यात यावी:—

सूचना.—तसेच तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी पत्ता दाखल न केल्यास, तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल.]

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ९४ (तीन) द्वारे समाविष्ट करण्यात आला (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना, क्र. एफ. ७१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ द्वारे दाखल केले.

क्रमांक ५

ज्या व्यक्तीस सहवादी म्हणून सामील करावे असे न्यायालयास वाटते तिला नोटीस.

(आदेश १, नियम १०)

(अनुसूची एक—परिशिष्ट बी—नमुना क्रमांक ५)

(सरनामा)

प्रति,

(नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण.)

ज्याअर्थी, ... यांनी ..... यांच्याविरुद्ध, ... बद्दल वरील दावा दाखल केला आहे, आणि वरील दाव्यात उपस्थित होणारे सर्व प्रश्न परिणामकारकरीत्या व पूर्णतः न्यायनिर्णीत करण्यासाठी व त्यांची तड लावण्यासाठी वादी म्हणून तुम्हाला सामील करून घेणे जरूर वाटते :

म्हणून, तुम्हाला त्याप्रमाणे सामील करून घेण्यास तुमची संमती आहे किंवा नाही ते या न्यायालयास दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी किंवा त्यापूर्वी कळवणे जरुर आहे याची दखल घ्यावी.

आज दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

[1][**सूचना.**—तसेच तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी,तुम्ही बजावणीसाठी पत्ता दाखल न केल्यास, तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल.]

क्रमांक ६

मृत प्रतिवादीच्या वैध प्रतिनिधीला समन्स

(आदेश २२, नियम ४)

(सरनामा)

प्रति,

वादी ..... यांनी दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी या न्यायालयामध्ये प्रतिवादी ..... यांच्याविरुद्ध दावा दाखल केला असून, प्रतिवादी त्यानंतर मरण पावले आहेत आणि उक्त वादीने, तुम्ही, मयत उक्त ..... यांचे वैध प्रतिनिधी आहात असे अभिकथन करणारा व त्याच्याऐवजी तुम्हाला प्रतिवादी करावे अशी इच्छा व्यक्त करणारा अर्ज केला आहे :

म्हणून, उक्त दाव्यामध्ये बचाव देण्यासाठी तुम्हाला दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी म. पू. ····· वाजता या न्यायालयामध्ये हजर होण्यासाठी बोलावण्यात येत आहे; आणि विनिर्दिष्ट दिनांकी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल.

आज दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

[1][**सूचना.**—तसेच तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी, तुम्ही बजावणीसाठी पत्ता दाखल न केल्यास, तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल.]

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ अन्वये जादा दाखल करण्यात आले.

क्रमांक ७

अन्य न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात बजावणी करण्याकरता समन्स पाठविण्यासंबंधीचा आदेश.

(आदेश ५, नियम २१.)

(सरनामा)

ज्याअर्थी असे समजते की, वरील दाव्यातील प्रतिवादी/साक्षीदार .....हा सध्या..... येथे राहत आहे ; म्हणून उक्त प्रतिवादीवर/साक्षीदारावर समन्स बजावण्याकरता ते या कार्यवाहीपत्राच्या दुसऱ्या प्रतीसह .....च्या न्यायालयाकडे पाठवावे, असा आदेश देण्यात येत आहे; हे समन्स दिनांक ...माहे .....१९...रोजी त्या न्यायालयाने परत पाठवावयाचे आहे.

समन्सच्या संबंधात आकारावयाची न्यायालय फी या न्यायालयात मुद्रांकाच्या रुपाने वसूल करण्यात आली आहे.

दिनांक ...माहे ...१९...

न्यायाधीश.

क्रमांक ८

कैद्यावर बजावावयाचे समन्स पाठविण्यासंबंधीचा आदेश.

(आदेश ५, नियम २५)

(सरनामा)

प्रति,

अधीक्षक,

.....कारागृह

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ५ वा, नियम २४ च्या उपबंधान्वये समन्सच्या दोन प्रती कारागृहात कैदी असलेला प्रतिवादी .....याच्यावर बजावण्याकरिता यासोबत पाठवण्यात येत आहेत. सदर समन्सची एक प्रत उक्त प्रतिवादीवर बजावण्यात यावी आणि मूळ प्रतीवर उक्त प्रतिवादीची सही घेऊन व त्यावर आपण समन्स बजावल्याचा शेरा पृष्ठांकित करून ती या न्यायालयाकडे परत पाठवावी, अशी आपणांस विनंती आहे.

न्यायाधीश.

क्रमांक ९

लोकसेवक किंवा सैनिक यांच्यावर बजावावयाचे समन्स पाठविण्यासंबंधीचे आदेश.

(आदेश ५, नियम २७, २८)

(सरनामा)

प्रति,

प्रतिवादी .....हा आपल्या हातरखाली सेवेत असल्याचे समजते. म्हणून दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मधील आदेश ५ वा, नियम २७ (किंवा, प्रकरणपरत्वे, २८) च्या उपबंधान्वये, त्याच्यावर समन्स बजावण्याकरता समन्सच्या दोन प्रती यासोबत पाठवण्यात येत आहेत. सदर समन्सची एक प्रत उक्त प्रतिवादीवर बजावावी आणि मूळ प्रतीवर उक्त प्रतिवादीची सही घेऊन व तीवर आपण समन्स बजावल्याच्या शेरा पृष्ठांकित करून ती या न्यायालयाकडे परत पाठवावी, अशी आपणांस विनंती करण्यात येत आहे.

न्यायाधीश.

क्रमांक १०

अन्य. न्यायालयाच्या समन्सच्या परतीचा नमुना

(आदेश ५, नियम २३)

(सरनामा)

..... न्यायालयातील १९.. चा दावा क्रमांक ..... मधील ..... यांच्यावर बजावण्याकरता .....पाठवण्या-संबंधीचे ..... यांच्या-कडील कार्यवाहीपत्र पाहिले.

.....

.....

अशा आशयाचे बजावणी अधिकाऱ्याचे पृष्ठांकन पाहिले आणि ..... यांस व ..... यांस शपथ देऊन मी वरील गोष्टीचा पुरावा रीतसर घेतला असून, आता असा आदेश देण्यात येत आहे की, ... या कार्यवाही-पत्रासह ..... यांना परत करण्यात यावे.

न्यायाधीश

टीप.—समन्सव्यतिरिक्त ज्या अन्य आदेशिकेची अंमलबजावणी याच पद्धतीने करावी लागेल त्याच्याबाबतीत हा नमुना लागू होईल.

..... न्यायालयातील १९.. चा दावा क्रमांक ..... मधील ..... यांच्यावर बजावण्याकरता ..... पाठवण्या-संबंधीचे ..... यांच्या-कडील कार्यवाहीपत्र पाहिले.

.....

.....

अशा आशयाचे बजावणी अधिकाऱ्याचे पृष्ठांकन पाहिले आणि ..... यांस व ..... यांस शपथ देऊन मी वरील गोष्टीचा पुरावा रीतसर घेतला असून, आता असा आदेश देण्यात येत आहे की, ... या कार्यवाही-पत्रासह ..... यांना परत करण्यात यावे.

मी याद्वारे घोषित करतो की, ... यांच्यावरील उक्त समन्सची रीतसर बजावणी करण्यात आली आहे.

न्यायधीश

टीप.—समन्सव्यतिरिक्त ज्या अन्य आदेशिकेची अंमलबजावणी याच पद्धतीने करावी लागेल त्याच्याबाबतीत हा नमुना लागू होईल.

क्रमांक ११

समन्सच्या किंवा नोटीसच्या परतीसोबत पाठवावयाचे आदेशिकावाहकाचे शपथपत्र.

(आदेश ५, नियम १८)

(सरनामा)

....., वडिलांचे नाव .....यांचे शपथपत्र.

शपथेवर सांगतो / दृढकथन करतो की,— मी, ...

(१) मी या न्यायालयाचा आदेशिकावाहक आहे.

(२) .....न्यायालयामधील १९...चा दावा क्र. .....मध्ये उक्त न्यायालयाने .....यांच्यावर बजावण्यासाठी काढलेले/ली दिनांक .....माहे..... १९....चे/ची समन्स/नोटीस मला दिनांक .....माहे.....१९...रोजी मिळाली.

(३) उक्त .....हे/या त्यावेळी मला स्वतःला माहीत होते/त्या, आणि दिनांक .....माहे .....१९...रोजी .....येथे मध्यान्ह .....सुमारे .....वाजता उक्त समन्सची/नोटिशीची एक प्रत त्याला/तिला देऊ करून व मूळ समन्सावर/नोटिशीवर त्याला/तिला सही करावयास लावून मी त्यांच्यावर समन्स/नोटीस बजावले/ली.

(क्)

(ख्)

(क्) समन्स/नोटीस जिच्यावर बजावले/ली त्या व्यक्तीने आदेशिकेवर सही केली किंवा सही करण्याचे नाकारले ते आणि कोणाच्या उपस्थितीत तसे केले ते येथे नमूद करावे.

(ख्) आदेशिकावाहकाची सही.

किंवा

(३) उक्त .....मला स्वतःला माहीत नसल्यामुळे .....हे .....पर्यंत माझ्याबरोबर आले व त्यांनी मला एक व्यक्ती दाखवून ती उक्त .....असल्याचे सांगितले, आणि दिनांक ...माहे .....१९.... रोजी .....येथे मध्यान्ह .....सुमारे .....वाजता

सदर समन्सची/नोटिशीची एक प्रत त्याला/तिला देऊ करून व मूळ समन्सवर/नोटिशीवर त्याला/तिला सही करावयास लावून मी त्यांच्यावर समन्स/नोटीस बजावले/ली.

(क्)

(ख्)

(क्) समन्स/नोटीस जिच्यावर बजावले/ली त्या व्यक्तीने आदेशिकेवर सही केली किंवा सही करण्याचे नाकारले ते आणि कोणाच्या उपस्थितीत तसे केले ते येथे नमूद करावे.

(ख्) आदेशिकावाहकाची सही.

किंवा,

(३) उक्त ..... व ते/त्या नेहमी जेथे राहतात ते घर मला स्वतःला माहीत असल्यामुळे मी ..... येथील उक्त घरी गेलो आणि तेथे दिनांक ... माहे ..... १९... रोजी मध्यान्ह ..... सुमारे ..... वाजता उक्त ..... मला भेटले/ल्या नाहीत.

(क्)

(ख्)

(क्) आदेश ५, नियम १५ व १७ यांच्या विशेष संदर्भात, आदेशिका ज्या रीतीने बजावण्यात आली ती रीत संपूर्णपणे व तंतोतंत नमूद करावी.

(ख्) आदेशिकावाहकाची सही.

किंवा,

(३) ..... ही व्यक्ती माझ्याबरोबर ..... पर्यंत आली व त्यांनी मला ..... दाखवून ..... नेहमी जेथे राहतात तेच ते घर असल्याचे सांगितले. मला उक्त ..... हे तेथे भेटले नाहीत.

(क्)

(ख्)

(क्) आदेश ५, नियम १५ व १७ यांच्या विशेष संदर्भात, आदेशिका ज्या रीतीने बजावण्यात आली ती रीत संपूर्णपणे व तंतोतंत नमूद करावी.

(ख्) आदेशिकावाहकाची सही.

किंवा,

जर बजावणीचा आदेश देण्यात आलेला असेल तर, प्रतिस्थापित बजावणीच्या आदेशाच्या अटींच्या विशेष संदर्भात, समन्स ज्या रीतीने बजावण्यात आले ती रीत संपूर्णपणे व तंतोतंत नमूद करावी.

उक्त श्री. ..... यांनी दिनांक ... माहे ..... १९... रोजी माझ्यासमोर शपथपूर्वक सांगितले. गांभीर्यपूर्वक

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम १३९ अन्वये जबानीदारांची शपथ देवविण्यास शक्ती प्रदान केलेले.

क्रमांक १२

प्रतिवादीस नोटीस

(आदेश ९, नियम ६)

(सरनामा)

प्रति,

(नाव, वर्णन व राहण्याचे ठिकाण) .....

ज्याअर्थी, वरील दाव्याच्या सुनावणीसाठी आजचा दिवस नेमण्यात येऊन, तुम्हाला समन्स पाठवण्यात आले होते, आणि वादी या न्यायालयात हजर राहूनही तुम्ही हजर झाला नाहीत. पण समन्स परत पाठवतांना नाझराने दिलेल्या शेऱ्यावरून, न्यायालयाची खात्री पटेल अशा रीतीने असे सिद्ध झाले आहे की, सदर समन्स तुमच्यावर बजावले होते, परंतु, समन्सात नेमलेल्या दिवशी हजर होऊन जाब देण्या-इतका पुरेसा अवधी तुम्हास देऊन ते बजावले गेले नाही;

म्हणून सदर दाव्याची सुनावणी आज रोजी तहकूब केली असून दिनांक ... माहे ..... १९... हा दिवस त्याच्या सुनावणीसाठी निश्चित केला आहे; त्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत सदर दाव्याची सुनावणी करून निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी.

आज दिनांक ..... माहे ..... १९... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक १३

साक्षीदारास समन्स

(आदेश १६, नियम १, ५.)

(सरनामा)

प्रति,

ज्याअर्थी, वरील दाव्यात ..... साठी ..... यांच्या वतीने तुमची हजेरी आवश्यक आहे, म्हणून तुम्हास फर्मावण्यात येत आहे की, तुम्ही दिनांक .... माहे ..... १९.... रोजी मध्यान्हपूर्व ..... वाजता या न्यायालयापुढे (जातीने) हजर व्हावे व आपल्या बरोबर ..... आणावे (किंवा या ..... न्यायालयाकडे पाठवावे.)

तुमच्या प्रवासाचा व इतर खर्च म्हणून व एक दिवसाचा निर्वाह भत्ता म्हणून रुपये ..... एवढी रक्कम सोबत पाठवण्यात येत आहे. कायदेशीर सबबीवाचून तुम्ही या आदेशाचे पालन करण्यात कसूर केली तर, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश १६ वा, नियम १२ मध्ये नेमून दिल्यानुसार तुम्ही गैरहजेरीच्या परिणामास पात्र ठराल.

आज दिनांक .... माहे ..... १९.... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

सूचना :—(१) फक्त दस्तऐवज हजर करण्यासाठी तुम्हाला बोलावले असेल व साक्ष देण्यासाठी बोलावले नसेल तर, तुम्ही असा दस्तऐवज या न्यायालयात उपरोक्त दिवशी व वेळी हजर करण्याची तजवीज केल्यास तुम्ही समन्सचे अनुपालन केले आहे असे मानले जाईल.

(२) तुम्हाला उपरोक्त दिवसांनतरही अडकवण्यात आल्यास विनिर्दिष्ट केलेल्या दिवसानंतरच्या प्रत्येक दिवसाच्या हजेरीबद्दल तुम्हास रुपये ..... एवढी रक्कम देण्यात येईल.

क्रमांक १४

साक्षीदारास हजर राहण्याविषयी फर्मावणारी उद्घोषणा

(आदेश १६, नियम १०)

(सरनामा)

प्रति,

ज्याअर्थी, बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची शपथेवर तपासणी घेतल्यानंतर असे दिसते की, कायद्याने विहित केलेल्या रीतीने साक्षीदारावर समन्स बजावणे शक्य झाले नाही ; आणि असे दिसते की, साक्षीदाराची साक्ष महत्त्वाची आहे व समन्सची बजावणी चुकविण्याचे उद्देशाने तो फरारी होतो व दूर राहतो. म्हणून, साक्षीदारास दिनांक .... माहे ..... १९.... रोजी मध्यान्हपूर्व ..... वाजता व त्या दिवसापासून जाण्याची परवानगी मिळेल त्या दिवसापर्यंत या न्यायालयामध्ये हजर राहण्यास फर्मावणारी ही उद्घोषणा, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश १६ वा नियम १० खाली काढण्यात येत आहे ; आणि जर पूर्वोक्त दिवशी व वेळी हजर राहण्यास साक्षीदार चुकेल तर कायद्यानुसार त्याचा परामर्श घेण्यात येईल.

आज दिनांक .... माहे ..... १९.... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक १५

साक्षीदारास हजर राहण्यास फर्मावणारी उद्घोषणा

(आदेश १६, नियम १०)

(सरनामा)

प्रति,

ज्याअर्थी, बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांची शपथेवर तपासणी घेतल्यानंतर असे दिसते की, समन्स साक्षीदारावर रीतसर बजावण्यात आलेले आहे आणि ज्याअर्थी असे दिसते की, साक्षीदाराची साक्ष महत्त्वाची असून तो अशा समन्साचे अनुपालन करून हजर राहण्यास चुकला आहे. म्हणून, साक्षीदारास, दिनांक .... माहे ..... १९..... रोजी मध्यान्हपूर्व ..... वाजता व त्या दिवसापासून जाण्याची परवानगी मिळेल त्या दिवसापर्यंत या न्यायालयामध्ये हजर राहण्यास फर्मावणारी ही उद्घोषणा दिवाणी प्रक्रिया संहिता,

१९०८, आदेश १६ वा, नियम १० खाली काढण्यात येत आहे; आणि जर पूर्वोक्त दिवशी व वेळी हजर राहण्यास साक्षीदार चुकेल तर, कायद्यानुसार त्याचा परामर्श घेण्यात येईल.

आज दिनांक·····माहे·····१९····रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक १६

साक्षीदाराच्या मालमत्तेच्या जप्तीचे अधिपत्र

(आदेश १६, नियम १०)

(सरनामा)

प्रति,

बेलिफ,·····न्यायालय.

ज्याअर्थी,·····यांनी नामोल्लेख केलेला साक्षीदार·····त्याच्या उपस्थितीसाठी काढलेल्या उद्घोषणेमध्ये मर्यादा घालून दिलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर या न्यायालयामध्ये हजर झालेला नाही; म्हणून, उक्त साक्षीदाराची·····किंमतीची·····मालमत्ता तुम्ही जप्त म्हणून धारण करावी व तिच्या वस्तुसूचीसह एक प्रतिवेदन·····दिवसांच्या आत सादर करावे असा निदेश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे.

आज दिनांक·····माहे·····१९····रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी देण्यात आले.

न्यायाधीश.

क्रमांक १७

साक्षीदाराच्या अटकेचे अधिपत्र

(आदेश १६, नियम १०)

(सरनामा)

प्रति,

बेलिफ,·····न्यायालय.

ज्याअर्थी,·····याच्यावर रीतसर समन्स बजावण्यात आले आहे, परंतु तो हजर होण्यास चुकला असून [समन्सची बजावणी चुकविण्याच्या उद्देशाने तो फरारी होतो व त्यापासून दूर राहतो]; म्हणून, उक्त·····याला अटक करून या न्यायालयासमोर आणण्याचा आदेश याद्वारे तुम्हाला देण्यात येत आहे.

तुम्हाला आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, या वॉरंटची अंमलबजावणी कोणत्या दिवशी व कोणत्या रीतीने प्रमाणित करण्यात आली ते किंवा त्याची अंमलबजावणी का करण्यात आली नाही याचे कारण प्रमाणित करणाऱ्या पृष्ठांकनासह हे वॉरंट, दिनांक···माहे·····१९···रोजी किंवा त्यापूर्वी परत पाठवण्यात यावे.

आज दिनांक···माहे·····१९·····रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी देण्यात आले.,

न्यायाधीश.

क्रमांक १८

तुपूर्दगी अधिपत्र

(आदेश १६, नियम १६)

(सरनामा)

प्रति,

प्रभारी अधिकारी,·····कारागृह.

ज्याअर्थी, उपरोक्त दाव्यातील वादीने (किंवा प्रतिवादीने), दिनांक····माहे·····१९····
रोजी साक्ष देण्याकरिता (किंवा एखादा दस्तऐवज हजर करण्याकरिता)·····हा हजर

राहील याखातर जामीन घेण्यात यावा असा अर्ज न्यायालयाकडे केला आहे ; आणि असा जामीन देण्याचा आदेश न्यायालयाकडे उक्त ..... यास दिला असूनदेखील तो तसे करण्यास चुकला आहे ; म्हणून आपणांस फर्माविण्यात येत आहे की, उक्त ..... यास दिवाणी कारागृहात आपल्या ताब्यात ठेवावे आणि त्याला उक्त दिवशी आणि यानंतर आदेश देण्यात येईल त्याप्रमाणे अशा अन्य दिवशी ..... वाजता या न्यायालयापुढे हजर करावे.

आज दिनांक ... माहे ..... १९ ... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक १९

सुपूर्दगी अधिपत्र

(आदेश १६, नियम १८)

(सरनामा)

प्रति,

प्रभारी अधिकारी, ... कारागृह.

ज्याअर्थी, उपरोक्त दाव्यात साक्ष देण्यासाठी (किंवा दस्तऐवज हजर करण्यासाठी) ..... याची या न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असल्याने त्याला अटक करण्यात आली आहे व ताब्यात घेऊन न्यायालयासमोर आणण्यात आले आहे ; आणि वादीच्या (किंवा प्रतिवादीच्या) गैरहजेरीमुळे, उक्त ..... अशी साक्ष देऊ शकत नाही (किंवा दस्तऐवज हजर करू शकत नाही) ; व न्यायालयाने त्यास, त्याने दिनांक .. रोजी ..... येथे हजर राहण्याबद्दल जामीन द्यावा असा आदेश दिला असूनदेखील तो तसे करण्यास चुकला आहे, म्हणून आपणांस फर्माविण्यात येत आहे की, उक्त ..... यास दिवाणी कारागृहात आपल्या ताब्यात ठेवावे आणि त्याला दिनांक ... माहे ..... १९ ... या दिवशी .... वाजता या न्यायालयापुढे हजर करावे.

आज दिनांक ... माहे ..... १९ ... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

परिशिष्ट ग

शोध, तपासणी व कबुली

क्रमांक १

परिप्रश्न स्वाधीन करण्यासाठी आदेश

(आदेश ११, नियम १)

..... न्यायाधीश यांच्या न्यायालयात. ..... १९ .. चा दिवाणी दावा क्रमांक .....

क, ख } वादी.

विरुद्ध

ग, घ, च, छ आणि ज, झ } प्रतिवादी.

..... ची सुनावणी केल्यानंतर व दिनांक ... माहे ..... १९ ... रोजी दाखल केलेले ..... चे शपथपत्र वाचल्यानंतर असा आदेश देण्यात येत आहे की, ... यांना परिप्रश्न लेखी स्वरूपात ..... यांच्या स्वाधीन करण्याची मोकळीक राहील व उक्त ..... यांनी आदेश ११, नियम ८ द्वारे विहित केल्याप्रमाणे परिप्रश्नांची उत्तरे द्यावीत व अर्जाचा खर्च ..... इतका असावा.

क्रमांक २

परिप्रश्न

(आदेश ११, नियम ४)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

उपरिनामित (प्रतिवादी च, छ, आणि ज, झ, किंवा वादी) यांच्या तपासणीसाठी उपरिनामित (वादी किंवा प्रतिवादी ग, घ) यांच्या वतीने परिप्रश्न.

१. ..... केले नाही, इत्यादी

२. ..... इत्यादी, नाही काय, इत्यादी ..... इत्यादी ..... इत्यादी.

(प्रतिवादी च, छ याने ..... क्रमांकाच्या परिप्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे.)

(प्रतिवादी ज, झ याने ..... क्रमांकाच्या परिप्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे.)

क्रमांक ३

परिप्रश्नास उत्तर

(आदेश ११, नियम ९)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

उपरिनामित वादीने उपरिनामित प्रतिवादी च, छ यांच्या तपासणीसाठी दिलेल्या परिप्रश्नांना उपरिनामित प्रतिवादी च, छ चे उत्तर.

उक्त परिप्रश्नांच्या उत्तरादाखल मी, उपरिनामित च, छ शपथपूर्वक सांगतो की,—

१. } लागोपाठचे क्रमांक दिलेल्या परिच्छेदांमध्ये परिप्रश्नांच्या उत्तराची नोंद करावी.
२. }

३. ..... (आक्षेपाची कारणे नमूद करावी.) कारणावरून ..... क्रमांकाच्या परिप्रश्नाचे उत्तर देण्यास माझी हरकत आहे.

क्रमांक ४

दस्तऐवजांसंबंधीच्या शपथपत्रासाठी आदेश.

(आदेश ११, नियम १२)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

..... याची सुनावणी केल्यानंतर, असा आदेश देण्यात येत आहे की, ... याने या आदेशाच्या दिनांकापासून ..... दिवसांच्या आत शपथेवर करून देऊन उत्तर द्यावे व प्रश्नास्पद बाबींसंबंधीचे कोणते दस्तऐवज कब्जात किंवा अखत्यारात आहेत अथवा तसे राहिलेले आहेत ते नमूद करावे व या अर्जाचा खर्च ..... इतका असावा.

क्रमांक ५

दस्तऐवजांसंबंधीचे शपथपत्र.

(आदेश ११, नियम १३)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे.)

मी, उपरिनामित ग, ब शपथपूर्वक सांगतो की, —

१. याच्या पहिल्या अनुसूचीच्या पहिल्या व दुसऱ्या भागांमध्ये नमूद केलेले, या दाव्यातील प्रश्नास्पद बाबींशी संबद्ध असणारे दस्तऐवज माझ्या कब्जात किंवा अखत्यारात आहेत.

२. याच्या पहिल्या अनुसूचीच्या दुसऱ्या भागामध्ये नमूद केलेले उक्त दस्तऐवज सादर करण्यास माझी हरकत आहे (हरकतीची कारणे नमूद करावी.)

३. याच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले, या दाव्यातील प्रश्नास्पद बाबींशी संबद्ध असणारे दस्तऐवज माझ्या कब्जात किंवा अखत्यारात होते. परंतु आता ते माझ्या कब्जात किंवा अखत्यारात नाहीत.

४. शेवटी नमूद केलेले दस्तऐवज ..... रोजी शेवटी माझ्या कब्जात किंवा अखत्यारात होते (त्यांचे केव्हा व काय झाले आणि आता ते कोणाच्या कब्जात आहेत ते नमूद करावे.)

५. माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे, माझ्या कब्जात, अभिरक्षेत किंवा अखत्यारात अथवा माझ्या वकिलाच्या किंवा अभिकर्त्याच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा अखत्यारात अथवा माझ्या हस्तीने अन्य कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात, अभिरक्षेत किंवा अखत्यारात याच्या उक्त पहिल्या व दुसऱ्या अनुसूचीमध्ये नमूद केलेले दस्तऐवज खेरीजकरून व त्याव्यतिरिक्त या दाव्यातील प्रश्नास्पद बाबींशी किंवा त्यापैकी कोणत्याही प्रश्नास्पद बाबींशी संबध असणारा किंवा ज्यांमध्ये अशा बाबींशी किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींशी संबद्ध असणारी कोणतीही नोंद करण्यात आली आहे असा कोणताही लेखा, लेखापुस्तक प्रमाणक, पावती, पत्र, संक्षेपलेख, कागद किंवा लेख किंवा अशा कोणत्याही दस्तऐवजाची कोणतीही प्रत किंवा त्यामधील उतारा किंवा असा कोणताही दस्तऐवज आता नाही आणि केव्हाही नव्हता.

क्रमांक ६

तपासणीसाठी दस्तऐवज सादर करण्यासाठी आदेश

(आदेश ११, नियम १४)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

..... ची सुनावणी केल्यानंतर व दिनांक ..... माहे ..... १९ ... रोजी वाचल्या केलेले ..... चे शपथपत्र वाचल्यानंतर, असा आदेश देण्यात येतो की, ... ने योग्य प्रकारची नोटीस मिळाल्यानंतर ..... येथे स्थित असलेल्या ..... येथे सर्व वाजवी वेळी पुढील दस्तऐवज सादर करावे, ते म्हणजे ....., आणि ..... यांना, अशा प्रकारे सादर करण्यात आलेल्या दस्तऐवजांची तपासणी करण्याची व ते लक्षपूर्वक वाचण्याची मोकळीक राहील. दरम्यान असा आदेश देण्यात येतो की, पुढील सर्व कार्यवाही स्थगित करण्यात यावी व या अर्जाचा खर्च ..... इतका असावा.

क्रमांक ७

दस्तऐवज सादर करण्यासाठी नोटीस

(आदेश ११, नियम १६)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

दिनांक .... माहे ..... १९ ... च्या तुमच्या वादपत्रात किंवा लेखी जबानीत किंवा शपथपत्रात निर्देशिलेले पुढील दस्तऐवज (वादीस किंवा प्रतिवादीस) तपासता यावेत यासाठी तुम्ही ते सादर करावे अशी त्याची विनंती आहे याची दखल घ्यावी.

(आवश्यक दस्तऐवजांचे वर्णन करावे.)

क ख, ... चे वकील.

प्रति, ग, ... चे वकील.

क्रमांक ८

दस्तऐवजांच्या तपासणीसाठी नोटीस.

(आदेश ११, नियम १७)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

(दिनांक ····· माहे ····· १९ ····· च्या तुमच्या नोटिशीमधील ····· क्रमांकाच्या दस्त-ऐवजांव्यतिरिक्त) त्या नोटिशीमध्ये नमूद केलेले दस्तऐवज तुम्हाला ····· (तपासणीचे ठिकाण घालावे) येथे पुढील ····· वारी १२ ते ४ या दरम्यान ····· वाजता तपासता येतील याची दखल घ्यावी.

किंवा, तुम्हाला तुमच्या दिनांक ····· माहे ····· १९ ····· च्या नोटिशीमध्ये नमूद केलेल्या दस्तऐवजांची तपासणी करू देण्यास (वादीची किंवा प्रतिवादीची) ····· (कारण नमूद करावे) कारणासाठी हरकत आहे.

क्रमांक ९

दस्तऐवज दाखल करून घेण्यासाठी नोटीस.

(आदेश १२, नियम ३)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

या दाव्यातील वादीने (किंवा प्रतिवादीने) याखाली विनिर्दिष्ट केलेले काही दस्तऐवज पुरावा म्हणून दाखल करण्याचे योजिले आहे आणि प्रतिवादी (किंवा वादी), याचा वकील किंवा अभिकर्ता ····· येथे ····· रोजी, ····· ते ····· या दरम्यान त्यांची तपासणी करू शकेल याची दखल घ्यावी ; आणि प्रतिवादीस (किंवा वादीस) याद्वारे फर्मावण्यात येते की, शेवटी नमूद केलेल्या वेळेपासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, उक्त दस्तऐवजांपैकी जे दस्तऐवज मूळ प्रतीत असल्याचे विनिर्दिष्ट केलेले असेल ते दस्तऐवज अनुक्रमे अभिप्रेत असेल त्याप्रमाणे अनुक्रमे लिहिलेले, सही केलेले किंवा निष्पादित केलेले होते. प्रती म्हणून विनिर्दिष्ट केलेले दस्तऐवज हे खऱ्या प्रती होते ; आणि बजावणी करण्यात आलेले, पाठवण्यात आलेले किंवा स्वाधीन करण्यात आलेले असे दस्तऐवज अनुक्रमे तसे बजावले होते, पाठवले होते किंवा स्वाधीन केले होते, असे त्याने कबूल करावे ; या दाव्यामध्ये पुरावा म्हणून अशा सर्व दस्तऐवजांच्या ग्राह्यतेस असलेले सर्व योग्य अपवाद वगळून सर्व दस्तऐवजांस हे लागू आहे.

क, ख वादीचे (किंवा प्रतिवादीचे) वकील (किंवा अभिकर्ता).

प्रति, ग, घ. प्रतिवादीचे (किंवा वादीचे) वकील (किंवा अभिकर्ता).

(येथे दस्तऐवजांचे वर्णन करावे व प्रत्येक दस्तऐवजाच्या बाबतीत तो मूळ प्रतीत आहे किंवा प्रत आहे ते विनिर्दिष्ट करावे.)

क्रमांक १०

तथ्ये कबूल करण्यासाठी नोटीस

(आदेश १२, नियम ५)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

या दाव्यामधील वादीने (किंवा प्रतिवादीने) अशी विनंती केली आहे की, प्रतिवादीने (किंवा वादीने) केवळ या दाव्याच्या प्रयोजनार्थ, याखाली विनिर्दिष्ट केलेली वेगवेगळी तथ्ये कबूल करावी, याची दखल घ्यावी ; आणि प्रतिवादीस (किंवा वादीस), ही नोटीस बजावल्यापासून सहा दिवसांच्या आत या दाव्यामध्ये पुरावा म्हणून उक्त वेगवेगळ्या तथ्यांच्या ग्राह्यतेबाबत असलेले सर्व योग्य अपवाद वगळून, अशी तथ्ये कबूल करण्यास याद्वारे फर्मावण्यात येते.

क, ख, वादीचा (किंवा प्रतिवादीचा) वकील (किंवा अभिकर्ता)

प्रति, ग, घ, प्रतिवादीचा (किंवा वादीचा) वकील (किंवा अभिकर्ता).

जी तथ्ये कबूल करून घ्यावयाची आहेत ती पुढीलप्रमाणे :—

१. की, क १ जानेवारी १८९० रोजी मरण पावला.

२. की, तो विनामृत्युपत्र मरण पावला.

३. की, ख हा त्याचा एकमेव कायदेशीर मुलगा होता.

४. की, ग १ एप्रिल १८९६ रोजी मरण पावला.

५. की, घ चे कधीही लग्न झाले नव्हते.

क्रमांक ११

नोंदिशी अनुसार तथ्यांची कबुली

(आदेश १२, नियम ५)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

या दाव्यातील प्रतिवादी (किंवा वादी) केवळ या दाव्याच्या प्रयोजनार्थ, याखाली विहित केलेल्या कोणत्याही अर्हता किंवा मर्यादा असल्यास त्यांच्या अधीनतेने, याखाली विनिर्दिष्ट केलेली वेगवेगळी तथ्ये, दाव्यामध्ये पुरावा म्हणून अशा कोणत्याही तथ्यांच्या किंवा त्यांपैकी कोणत्याही तथ्यांच्या ग्राह्यतेबाबत असलेले सर्व योग्य अपवाद वगळून याद्वारे, कबूल करीत आहे :

परंतु, ही कबुली केवळ या दाव्याच्या प्रयोजनार्थ दिलेली आहे आणि ती इतर कोणत्याही प्रसंगी प्रतिवादीविरुद्ध (किंवा वादीविरुद्ध) किंवा वादी (किंवा प्रतिवादी किंवा कबुली पाहिजे असणारा पक्ष) माव्यतिरिक्त अन्य कोणीही वापरावयाची (कबुली) नाही.

क, ख प्रतिवादीचा (किंवा वादीचा) वकील (किंवा अभिकर्ता).

प्रति, ग, घ वादीचा (किंवा प्रतिवादीचा) वकील (किंवा अभिकर्ता).

कबूल केलेली तथ्ये	ज्यांच्या अधीनतेने तथ्ये कबूल करण्यात आली त्या अर्हता किंवा मर्यादा,कोणत्याही असल्यास,
१. म, १ जानेवारी १८९० रोजी मरण पावला.	१.
२. तो विनामृत्युपत्र मरण पावला.	२.
३. न हा त्याचा कायदेशीर मुलगा होता.	३. परंतु, असे नव्हे की, तो त्याचा एकमेव कायदेशीर मुलगा होता.
४. ब मरण पावला.	४. परंतु, असे नव्हे की, तो १ एप्रिल १८९६ रोजी मरण पावला.
५. ब चे केव्हाही लग्न झाले नव्हते.	५.

क्रमांक १२

हजर करण्यासाठी नोटीस (सर्वसाधारण नमुना)

(आदेश १२, नियम ८)

(सरनामा मागील क्रमांक १ प्रमाणे)

या दाव्यातील प्रश्नास्पद बाबींशी संबद्ध अशी कोणतीही नोंद, संक्षेपलेख किंवा कार्यवृत्त असलेली, तुमच्या अभिरक्षेतील, कब्जातील किंवा अखत्यारातील सर्व पुस्तके, कागद, पत्रे, पत्रांच्या प्रती आणि इतर लेख व दस्तऐवज या दाव्याच्या पहिल्या सुनावणीच्या वेळी हजर करण्यास व या न्यायालयास दाखवण्यास तुम्हाला याद्वारे फर्मावण्यात येत आहे याची दखल घ्यावी.

क, ख वादीचा (किंवा प्रतिवादीचा) वकील (किंवा अभिकर्ता).

प्रति, ग, घ प्रतिवादीचा (किंवा वादीचा) वकील (किंवा अभिकर्ता).

परिशिष्ट घ

हुकूमनामे

क्रमांक १

मूळ दाव्यामधील हुकूमनामा

(आदेश २०, नियम ६, ७)

(सरनामा)

हक्कमागणी रुपये .....

हा दावा आज ... रोजी ..... समोर वादीतर्फे ..... व प्रतिवादीतर्फे ..... यांच्या समक्ष अंतिम निकालासाठी निघाल्यावरून असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, ...आणि ..... याने ..... या दाव्याच्या खर्चाबद्दल रुपये ..... इतकी रक्कम, तिच्यावर या दिनांकापासून वसुलीच्या दिनांकापर्यंत दरवर्षी .... टक्के या दराने होणाऱ्या व्याजासह ..... यास द्यावी.

आज दिनांक .... माहे ..... १९ ... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

दाव्याचा खर्च

वादी		प्रतिवादी	
	रुपये		रुपये
१. वादपत्राला मुद्रांक		मुखत्यारनाम्याला मुद्रांक	
२. मुखत्यारनाम्याला मुद्रांक		विनंतीअर्जाला मुद्रांक	
३. दाखल झालेल्या कागदास मुद्रांक		प्लीडरची फी	
४. रु. .... रकमेवर प्लीडरची फी		साक्षीदारांचा निर्वाह खर्च	
५. साक्षीदारांचा निर्वाह खर्च		आदेशिकेची बजावणी करणे	
६. आयुक्तांची फी		आयुक्तांची फी	
७. आदेशिकेची बजावणी करणे			
एकूण ..		एकूण ..	

क्रमांक २

साधा पैशाचा हुकूमनामा

(कलम ३४)

(सरनामा)

हक्कमागणी रुपये .....

हा दावा आज .... रोजी ..... समोर वादीतर्फे ..... व प्रतिवादीतर्फे ..... यांच्या समक्ष अंतिम निकालासाठी निघाल्यावरून असा आदेश देण्यात येत आहे की, ... याने रुपये ..... इतकी रक्कम, तिच्यावर ..... पासून उक्त रकमेच्या वसुलीच्या दिनांकापर्यंत दरवर्षी .... टक्के या दराने होणाऱ्या व्याजासह ..... यास द्यावी आणि तसेच, या दाव्याचा खर्च रुपये ..... त्यावर या दिनांकापासून वसुलीच्या दिनांकापर्यंत दरवर्षी ... टक्के या दराने होणाऱ्या व्याजासह द्यावा.

आज दिनांक ... माहे ..... १९ .. रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

दाव्याचा खर्च

वादी	रुपये	प्रतिवादी	रुपये
१. वादपत्राला मुद्रांक		मुखत्यारनाम्याला मुद्रांक	
२. मुखत्यारनाम्याला मुद्रांक		विनंतीअर्जाला मुद्रांक	
३. दाखल झालेल्या कागदास मुद्रांक		प्लीडरची फी	
४. रु. . . . . रकमेवर प्लीडरची फी		साक्षीदारांचा निर्वाह खर्च	
५. साक्षीदारांचा निर्वाह खर्च		आदेशिकेची बजावणी करणे	
६. आयुक्तांची फी		आयुक्तांची फी	
७. आदेशिकेची बजावणी करणे.			
एकूण . .		एकूण . .	

[1][क्रमांक ३

पुरोबंधासाठी प्रारंभिक हुकूमनामा

(आदेश ३४, नियम २—जेव्हा हिशेब घेण्याचे निदेशित केले असेल तेव्हा)

(सरनामा)

हा दावा, आज . . . . रोजी . . . . . समोर . . . . . यांच्या समक्ष अंतिम निकालासाठी निघाल्याबरून याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, तो दावा . . . . . यांच्याकडे पुढील हिशेब घेण्यासाठी हिशेब घेणारा आयुक्त म्हणून निर्देशित करण्यात यावा, ते हिशेब :—

(एक) वादपत्रात उल्लेखिलेल्या वादीच्या गहाणावर त्यास मुद्दल व व्याज याबद्दल (असे व्याज मुद्दलावर द्यावयाच्या दराने मोजावयाचे, किंवा जेव्हा असा कोणताही दर ठरविण्यात आला नसेल तेव्हा दरसाल दरशेकडा सहा टक्के या दराने किंवा न्यायालयास वाजवी वाटेल अशा दराने मोजावयाचे) आजमितीस देय असेल अशा रकमेचा हिशेब;

(दोन) वादीस किंवा वादीच्या आदेशाने किंवा त्याच्या उपयोगाकरिता इतर कोणत्याही व्यक्तीस या तारखेपर्यंत मिळालेल्या किंवा वादीने किंवा अशा व्यक्तीने कसूर केली नसती तर, जी तशा प्रकारे मिळू शकली असती त्या गहाण मालमत्तेवरील प्राप्तीचा हिशेब;

(तीन) गहाणाच्या तारणाच्या संबंधात या तारखेपर्यंत वादीस योग्यरीत्या आलेल्या (दाव्यातील खर्चाव्यतिरिक्त) परिव्यय, आकार व खर्च याबद्दलच्या सर्व रकमांचा, त्यावरील व्याजासकट (असे व्याज पक्षकारांना संमत झालेल्या दराने किंवा असा दर नसेल तर मुद्दलावर द्यावयाच्या दराने किंवा असे दोन्ही दर नसतील तर, दरसाल दरशेकडा नऊ या दराने मोजावयाचे) हिशेब;

(चार) या तारखेपूर्वी गहाण मालमत्तेचा नाश करणाऱ्या किंवा तिची कायमची खराबी करणाऱ्या, वादीच्या कोणत्याही कृतीने वा अकृतीने किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा गहाणखताच्या अटी अन्वये त्यावर लादलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य त्याने न केल्यामुळे त्या मालमत्तेस पोचलेल्या कोणत्याही हानीचा किंवा नुकसानीचा हिशेब.

२. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, वरील खंड (दोन) खाली मिळालेली किंवा वरील खंड (चार) खाली देय म्हणून ठरवण्यात आलेली कोणतीही रक्कम त्यावरील व्याजासह, प्रथमतः खंड (तीन) खाली वादीने दिलेल्या कोणत्याही रकमांच्या त्यावरील व्याजासहित बरोबर समायोजित केली पाहिजे किंवा, प्रकरणपरत्वे, देय म्हणून ठरलेल्या मुद्दल रकमेवर वादीस व्याजादाखल देय असलेल्या रकमेची घट म्हणून आणि त्यानंतर मुद्दल रकमेची घट म्हणून किंवा तिची फेड म्हणून खर्ची टाकण्यात आली पाहिजे.

३. आणि याद्वारे असा आणखी आदेश देण्यात येत आहे की, उक्त आयुक्ताने तो हिशेब सोयीनुसार शक्य तितक्या त्वरेने, सर्व वाजवी सवलती देऊन दिनांक . . . . . पासून . . . . . १९ . . . . रोजी किंवा त्यापूर्वी या न्यायालयास सादर केला पाहिजे आणि आयुक्ताचे असे प्रतिवेदन आल्यानंतर उक्त दाव्यातील

१. सन १९२९ चा अधिनियम २१ याच्या कलम ८ च्या अनुसूचीअन्वये नमुने क्रमांक ३ ते ११ वगळी दाखल करण्यात आले.

पक्षकार ज्या ज्या हरकती सादर करतील त्यांचा विचार केल्यानंतर आवश्यक असतील अशे फेरफार करून तो हिशेब कायम करण्यात येईल व तो प्रतिस्वाक्षरित केला जाईल.

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) न्यायालय देय म्हणून ठरवील अशी रक्कम व वादीस देवविण्यात आलेली दाव्याच्या खर्चाबद्दलची रुपये ..... इतकी रक्कम, या रकमा प्रतिवादीने, तारीख ..... माहे ..... १९... रोजी किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालयाकडून पैसा भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील तारखेपर्यंत वाढविण्यात येईल त्या तारखेस किंवा त्यापूर्वी, न्यायालयात भरल्या पाहिजेत ;

(दोन) असा भरणा केल्यानंतर व न्यायालय ठरवील अशा तारखेपूर्वी दावाखर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४ वा, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यासह यासंबंधात न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर, वादीने वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधीचे आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व असे दस्तऐवज, प्रतिवादीच्या अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत व वादीस तसे फर्मावण्यात आल्यास, त्याने ती मालमत्ता उक्त गहाणविरहित व तिच्यावर वादीने किंवा वादीच्यापोटी हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जिच्यावतीने तो हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या सर्व भारातून मुक्त व भारविरहित अशी व हे गहाण किंवा हा दावा यापासून जे कोणतेही दायित्व निर्माण होईल त्यापासून मुक्त अशी पुन्हा अभिहस्तांतरित किंवा पुन्हा हस्तांतरित केली पाहिजे व त्यास तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत प्रतिवादीस दिला पाहिजे.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, वर सांगितल्याप्रमाणे भरणा करण्यात कसूर झाल्यास, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत वर्णन केलेली गहाण मालमत्ता सोडविण्याबाबतचा प्रतिवादीचा सर्व अधिकार इतःपर सर्वस्वी नाहीसा झाला आहे व ते गहाण पुरोबंधित झाले आहे अशा आशयाच्या अंतिम हुकूमनाम्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करण्याची वादीस मोकळीक असेल व प्रतिवादीला तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा वादीस बिनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे, आणि पक्षकारांस प्रसंगानुसार त्याप्रमाणे वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असेल व असा अर्ज आला असता किंवा अन्यथा, न्यायालयास त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

फर्मांक ३ क

पुरोबंधासाठी प्रारंभिक हुकूमनामा

(आदेश ३४, नियम २—जेव्हा न्यायालय देय असलेली रक्कम ठरवील तेव्हा)

(सरनामा)

हा दावा आज ..... रोजी, इत्यादी, निकालासाठी निघाला असून याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, वादीस वादपत्रात उल्लेखिलेल्या त्याच्या गहाणावर आज दिनांक ..... माहे ..... १९..... पर्यंत मोजण्यात आल्याप्रमाणे येणे असलेली रक्कम ही मुद्दलाबद्दल रु. ..... रक्कम उक्त मुद्दलावरील व्याजाबाबत रु. ..... उक्त गहाणाच्या तारणाच्या संबंधात वादीस वाजवीरीतीने आलेल्या (दाव्याच्या खर्चाव्यतिरिक्त इतर) परिव्यय, आकार व खर्च याबाबत त्यावरील व्याजासकट रु. ..... व वादीस देवविलेल्या या दाव्याच्या खर्चाबाबत रु. ..... इतकी रक्कम म्हणजेच एकण रक्कम रु. ..... इतकी आहे.

२. आणि याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे :—

(एक) दिनांक ..... माहे ..... १९... रोजी किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालयाकडून पैसा भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील दिनांकापर्यंत वाढविण्यात येईल त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी रु. ..... ची उक्त रक्कम प्रतिवादीने न्यायालयात भरली पाहिजे.

(दोन) असा भरणा केल्यानंतर व न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी दाव्याचा खर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यांसह यांच्या संबंधात न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर, वादीने वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले

सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व असे सर्व दस्तऐवज प्रतिवादीच्या अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत व वादीस, तसे फर्माविण्यात आल्यास त्याने ती मालमत्ता उक्त गहाणविरहित व तिच्यावर वादीने किंवा वादीच्यापोटी हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जिच्या वतीने तो हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या सर्व भारांतून मुक्त व विरहित अशी, हे गहाण किंवा हा दावा यांपासून जे कोणतेही दायित्व निर्माण होईल त्यापासून मुक्त अशी, पुन्हा अभिहस्तांकित किंवा पुन्हा हस्तांतरित केली पाहिजे व त्यास तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत प्रतिवादीस दिला पाहिजे.

३. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, वर सांगितल्याप्रमाणे भरणा करण्यात कसूर झाल्यास यासोबत जोडलेल्या अनुसूचीत वर्णन केलेली गहाण मालमत्ता सोडविण्याबाबतचा प्रतिवादीचा सर्व अधिकार इतःपर सर्वस्वी नाहीसा झाला आहे व ते गहाण पुरोबंधित झाले आहे अशा आशयाच्या अंतिम हुकूमनाम्यासाठी वादीस न्यायालयाकडे अर्ज करता येईल व प्रतिवादीला तसे फर्माविण्यात आल्यास, त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा वादीस बिनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे, आणि पक्षकारांस कारण असेल त्याप्रमाणे, वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असेल व असा अर्ज आला असता किंवा अन्यथा, न्यायालयास त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

क्रमांक ४

पुरोबंधासाठी अंतिम हुकूमनामा

(आदेश ३४, नियम ३)

(सरनामा)

दिनांक ..... माहे ..... १९ ..... चा या दाव्यात दिलेला प्राथमिक हुकूमनामा व दिनांक ..... माहे ..... १९ ..... चे आणखी कोणतेही आदेश (असल्यास ते आदेश) व अखेरच्या हुकूमनाम्यासाठीचा वादीचा दिनांक ..... माहे ..... १९ .. चा अर्ज वाचल्यानंतर व पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि उक्त हुकूमनामा व आदेश याद्वारे करण्याचे फर्माविण्यात आलेले प्रदान, प्रतिवादीने किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने किंवा उक्त गहाण सोडविण्यास हक्कदार असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेले नाही असे दिसून आल्यावरून,

याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, प्रतिवादी व त्याच्यामार्फत किंवा त्याच्या वतीने हक्कमागणी करणाऱ्या सर्व व्यक्ती यांचा पूर्वोक्त प्रारंभिक हुकूमनाम्यात नमूद केलेल्या मालमतेचा व मालमत्तेतील गहाण सोडविण्याबद्दलचा सर्व अधिकार सर्वस्वी नाहीसा व्हावा व याद्वारे तो तसा होत आहे व ते अशा सर्व अधिकारास मुकले पाहिजेत व याद्वारे तसे ते मुक्त आहेत; *[आणि (जर, उक्त गहाण मालमत्ता प्रतिवादीच्या कब्जात असेल तर) प्रतिवादीने वादीस उक्त गहाण मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे.]

२. आणि याद्वारे आणखी असेही जाहीर करण्यात येत आहे की, वादपत्रात नमूद केलेल्या उक्त गहाणापासून किंवा या दाव्यामधून उद्भवणारी या दिवसापर्यंतची प्रतिवादीची कोणत्याही प्रकारची संपूर्ण जबाबदारी याद्वारे पार पाडण्यात व संपविण्यात येत आहे.

क्रमांक ५

विक्री करण्याबद्दलचा प्रारंभिक हुकूमनामा

(आदेश ३४, नियम ४.—जेव्हा हिशेब घेण्याचे निदेशित करण्यात आले असेल तेव्हा.)

(सरनामा)

हा दावा आज दिनांक .. माहे ..... १९ .. रोजी इत्यादी; निकालासाठी निघाल्यावरून याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, ... याजकडे आयुक्त म्हणून पुढील हिशेब घेण्यासाठी हा दावा निर्देशित करण्यात यावा, ते हिशेब :—

(एक) वादपत्रात उल्लेखिलेल्या वादीच्या गहाणावर त्याला मुद्दल व व्याज याबद्दल (असे व्याज मुद्दलावर द्यावयाच्या व्याजाच्या दराने मोजावयाचे, किंवा जेव्हा असा कोणताही दर ठरविण्यात आला नसेल तेव्हा, दरसाल दरशेकडा सहा या दराने किंवा न्यायालयास वाजवी वाटेल अशा दराने मोजावयाचे) आजमितीस देय असेल अशा रकमेचा हिशेब;

(दोन) वादीला किंवा वादीच्या आदेशाने किंवा त्याच्या उपयोगाकरता इतर कोणत्याही व्यक्तीला या तारखेपर्यंत मिळालेल्या किंवा वादीने किंवा अशा व्यक्तीने बुद्धिपुरःसर कसूर केली नसती तर तशाप्रकारे मिळू शकली असती त्या, गहाण मालमत्तेच्या प्राप्तीचा हिशेब;

*नको असलेले शब्द वगळावे.

(तीन) गहाणाच्या तारणाच्या संबंधात ज्या तारखेपर्यंत वादीला आलेले (दाव्यातील खर्चा-व्यतिरिक्त इतर) परिव्यय, आकार व खर्च याबद्दलच्या सर्व रकमांचा, त्यावरील व्याजासह (असे व्याज, पक्षकारांना संमत झालेल्या दराने किंवा असा दर नसेल तर, मुद्दलावर द्यावयाच्या दराने किंवा असे दीन्ही दर नसल्यास, दरसाल दरशेकडा नऊ टक्के या दराने मोजावयाचे) हिशेब;

(चार) या तारखेपूर्वी गहाण मालमत्तेचा नाश करणाऱ्या किंवा तिची कायमची खराबी करणाऱ्या वादीच्या कोणत्याही कृतीने वा अकृतीने किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा गहाणखताच्या अटी अन्वये त्याच्यावर लादलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य करण्यात त्याने केलेल्या कसुरीमुळे त्या मालमत्तेला पोचलेल्या कोणत्याही हानीचा किंवा नुकसानीचा हिशेब.

२. आणि याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, वरील खंड (दोन) खाली मिळालेली किंवा खंड (चार) अन्वये देय म्हणून ठरविण्यात आलेली कोणतीही रक्कम त्यावरील व्याजासह, प्रथमतः खंड (तीन) खाली वादीने दिलेल्या कोणत्याही रकमेच्यापोटी, त्यावरील व्याजासह समायोजित केली पाहिजे व कोणतीही शिल्लक उरल्यास ती गहाण रकमेत मिळवली पाहिजे किंवा, प्रकरणपरत्वे, देय म्हणून ठरविण्यात आलेल्या मुद्दल रकमेवर वादीला व्याजादाखल देय असलेल्या रकमेची घट म्हणून व त्यानंतर मुद्दलाची घट म्हणून किंवा तिची फेड म्हणून खर्ची टाकण्यात आली पाहिजे.

३. आणि याद्वारे आणखी आदेश देण्यात येत आहे की, आयुक्ताने, तो हिशेब, सोयीनुसार शक्य तितक्या लवकर, सर्व बाजूंची सबलती देऊन, दिनांक ·· माहे ····· १९·· रोजी किंवा त्यापूर्वी या न्यायालयास सादर केला पाहिजे, आणि आयुक्ताचे असे प्रतिवेदन आल्यानंतर, तो हिशेब, उक्त वादातील पक्षकार जे जे आक्षेप सादर करतील त्यांचा विचार केल्यानंतर आवश्यक असतील असे फेरफार करून कायम करण्यात येईल व तो प्रतिस्वाक्षरित केला जाईल.

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) न्यायालय देय म्हणून ठरवील अशी रक्कम व वादीस देवविण्यात आलेली दाव्याच्या खर्चाबद्दलची रुपये ····· इतकी रक्कम—या रकमा प्रतिवादीने दिनांक ···· माहे ····· १९·· रोजी किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालयाकडून पैसा भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील तारखेपर्यंत वाढविण्यात येईल त्या तारखेस किंवा त्यापूर्वी न्यायालयात भरल्या पाहिजेत.

(दोन) असा भरणा केल्यानंतर व न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी, दावाखर्च व 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८', पहिली अनुसूची, आदेश ३४ वा, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यासह, यांच्या संबंधात न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर, वादीने वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व असे सर्व दस्तऐवज, प्रतिवादीच्या अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत व वादीला तसे फर्माविण्यात आल्यास त्याने ती मालमत्ता, उक्त गहाणविरहित व तिच्यावर वादीने किंवा वादीच्यापोटी हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, किंवा ज्याच्यावतीने तो हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या भारातून मुक्त व भारविरहित अशी पुन्हा अभिहस्तांतरित किंवा पुन्हा हस्तांतरित केली पाहिजे व तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत प्रतिवादीस दिला पाहिजे.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पूर्वोक्त-प्रमाणे भरणा करण्यात कसूर झाल्यास, उक्त गहाण मालमत्तेच्या विक्रीचा अंतिम हुकमनामा मिळण्यासाठी वादीला न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि असा अर्ज करण्यात आल्यानंतर उक्त गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्याबद्दल निदेश देण्यात येईल; आणि अशा विक्रीच्या प्रयोजनार्थ, वादीने न्यायालयापुढे किंवा न्यायालय नमील अशा अधिकाऱ्यापुढे, उक्त गहाण मालमत्तसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत.

६. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, अशा विक्रीपासून येणारा पैसा न्यायालयात भरला जाईल व या हुकूमनाम्यान्वये व या दाव्यात जे कोणतेही आणखी आदेश देण्यात येतील त्याअन्वये, वादीस देय होणारी रक्कम भरण्याच्या कामी व वादीस येणे असलेला दावाखर्च व 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८', पहिली अनुसूची, आदेश ३४ वा, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च यासंबंधात नियम ११ अन्वये द्यावयाच्या नंतरच्या व्याजासहित वादीस पण असल्याचे न्यायालयाकडून ठरविण्यात येईल अशी कोणतीही रक्कम भरण्याच्या कामी, त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्य रीत्या विनियोग केला जाईल व काही शिल्लक असल्यास, ती प्रतिवादीस किंवा ती मिळण्यास हक्कदार असणाऱ्या इतर व्यक्तींना दिली जाईल.

७. आणि याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, जर अशा विक्री-पासून येणारा पैसा, पूर्वोक्तप्रमाणे वादीला द्यावयाची रक्कम पूर्णपणे देण्यास पुरेसा झाला नाही तर, उरलेल्या रकमेबद्दल प्रतिवादीविरुद्ध व्यक्तिगत हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची (जेव्हा त्याच्या गहाणाच्या अटी अन्वये त्याला असा उपाय करण्याची मोकळीक असेल व त्याला त्या त्या वेळी अंमलात असलेल्या

कोणत्याही कायद्यान्वये मनाई करण्यात आली नसेल तेव्हा) वादीला मोकळीक असेल, आणि प्रसंगानुसार वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची पक्षकारांना मोकळीक असेल, आणि असा अर्ज आला असता किंवा अन्यथा, न्यायालयास, त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

क्रमांक ५-क

विक्रीबद्दलचा प्राथमिक हुकूमनामा

(आदेश ३४, नियम ४.—येणे असलेली रक्कम न्यायालय ठरवील अशा बाबतीत.)

(सरनामा)

हा दावा आज ···· रोजी १९ ··· इत्यादी निकालासाठी निधाल्यावरून याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, वादीस वादपत्रात उल्लेखिलेल्या त्याच्या गहाणावर आज दिनांक ····· माहे ····· १९ ·· पर्यंत भोजण्यात आल्याप्रमाणे येणे असलेली रक्कम ही, मुद्दलासाठी रुपये ···· उक्त मुद्दलावरील व्याजासाठी रुपये ····· गहाणाच्या तारणाच्या संबंधात वादीस वाजवीरीतीने आलेला (दाव्याच्या खर्चाव्यतिरिक्त इतर) परिव्यय, आकार व खर्च याबाबत व्याजासह रुपये ····· व वादीस देवविलेल्या दाव्याच्या खर्चाबाबत रुपये ····· इतकी रक्कम म्हणजेच एकूण रक्कम रुपये ····· इतकी आहे.

२. आणि याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की :—

(एक) दिनांक ··· माहे ····· १९ ··· रोजी किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालयाकडून असे भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील दिनांकापर्यंत वाढविण्यात येईल त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी रुपये ····· ची उक्त रक्कम प्रतिवादीने न्यायालयात भरली पाहिजे ;

(दोन) असा भरणा केल्यानंतर व न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी दाव्याचा खर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४ वा, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यांच्यासंबंधात न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर वादीने वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व तसे सर्व दस्तऐवज प्रतिवादीच्या अगर ती नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत व वादीस तसे फर्माविण्यात आल्यास त्याने ती मालमत्ता उक्त गहाणविरहित व त्यावर वादीने किंवा वादीच्यापोटी हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जिच्यावतीने ति हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या सर्व भारातून मुक्त व विरहित अशी, पुन्हा अभिहस्तांतरित किंवा पुन्हा हस्तांतरित केली पाहिजे व त्यास तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व बिनाहरकत प्रतिवादीस दिला पाहिजे.

३. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पूर्वोक्तप्रमाणे भरणा करण्यात कसूर झाल्यास गहाण मालमत्तेच्या विक्रीचा अंतिम हुकूमनामा मिळण्यासाठी वादीस न्यायालयाकडे अर्ज करता येईल ; आणि असा अर्ज करण्यात आल्यानंतर गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्याबद्दल निदेश देण्यात येईल ; आणि अशा विक्रीच्या प्रयोजनार्थ, वादीने न्यायालयाकडे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत.

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, अशा विक्रीपासून येणारा पैसा न्यायालयात भरला जाईल व या हुकूमनाम्यान्वये व या दाव्यात जे आणखी कोणतेही आदेश देण्यात येतील त्याअन्वये वादीस येणे असणारी रक्कम भरण्याच्या कामी व दावा खर्च आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४ वा, नियम ११ अन्वये द्यावयाच्या नंतरच्या व्याजासहित, व नियम १० अन्वये द्यावयाचा परिव्यय, आकार व खर्च यासंबंधात वादीस येणे असल्याचे न्यायालयाकडून ठरविण्यात येईल अशी कोणतीही रक्कम भरण्याच्या कामी त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्य रीतीया विनियोग केला जाईल व काही शिल्लक असल्यास, ती प्रतिवादीस, किंवा ती मिळण्यास हक्कदार असणाऱ्या इतर व्यक्तींना दिली जाईल.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, जर अशा विक्रीपासून येणारा पैसा, वर सांगितल्याप्रमाणे वादीस द्यावयाची रक्कम पूर्णपणे देण्यास पुरेसा झाला नाही, तर उरलेल्या रकमेबद्दल प्रतिवादीविरुद्ध व्यक्तीगत हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची (जेव्हा त्या गहाणाच्या अटी अन्वये त्यास असा उपाय करण्याची मोकळीक असेल व त्यास त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये, मनाई करण्यात आली नसेल तेव्हा) मोकळीक असेल ; आणि प्रसंगानुसार वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची पक्षकारांस मोकळीक असेल, आणि असा अर्ज आला असता किंवा अन्यथा, न्यायालय त्यास योग्य वाटतील असे निदेश देऊ शकेल.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

क्रमांक ६

विक्रीबाबतचा अंतिम हुकूमनामा

(आदेश ३४ वा, नियम ५)

(सरनामा)

तारीख ··· माहे ····· १९··· चा या दाव्यात दिलेला प्रारंभिक हुकूमनामा व तारीख ··· माहे ····· १९··· चे आणखी (कोणतेही आदेश असल्यास) ते आदेश व अंतिम हुकूमनाम्यासाठीचा वादीचा दिनांक ··· माहे ····· १९··· चा अर्ज वाचल्यानंतर व पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि उक्त हुकूमनामा व आदेश याद्वारे करण्याचे फर्माविण्यात आलेले प्रदान प्रतिवादीने किंवा त्याच्यावतीने कोणत्याही व्यक्तीने किंवा उक्त गहाण सोडविण्यास हक्कदार असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेले नाही असे दिसून आल्यावरून ;

याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पूर्वोक्त हुकूमनाम्यात नमूद केलेली गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा, व अशा विक्रीच्या प्रयोजनांसाठी वादीने न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे, उक्त गहाण मालमत्तेच्यासंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत.

२. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, अशा विक्री पासून येणारा पैसा न्यायालयात भरला जाईल व पूर्वोक्त प्राथमिक हुकूमनाम्यान्वये व या दाव्यात जे कोणतेही आणखी आदेश देण्यात आलेले असतील त्याअन्वये वादीस येणे असणारी रक्कम भरण्याच्या कामी व दाव्याचा खर्च आणि 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' पहिली अनुसूची, आदेश ३४ वा, नियम ११ अन्वये द्यावयाच्या नंतरच्या व्याजासहित व नियम १० अन्वये द्यावयाचा परिव्यय, आकार व खर्च यासंबंधात वादीस येणे असल्याचे न्यायालयाने ठरविलेले असेल अशी कोणतीही रक्कम भरण्याच्या कामी त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्य रीत्या विनियोग केला जाईल व काही शिल्लक असल्यास, ती प्रतिवादीस किंवा ती मिळण्यास हक्कदार असलेल्या इतर व्यक्तींना दिली जाईल.

क्रमांक ७

गहाणकाराने भरणा करण्यात कसूर केल्यामुळे पुरोबंधाचा हुकूमनामा काढण्यात आला असेल त्या बाबतीत, विमोचनाबाबतचा प्रारंभिक हुकूमनामा.

(आदेश ३४, नियम ७.—जेव्हा हिशेब घेण्याबद्दल निर्देशित करण्यात आले असेल तेव्हा.)

(सरनामा)

आज दिनांक ··· माहे ····· १९ ·· रोजी इत्यादी, हा दावा निकालासाठी निघाल्यावर याद्वारे असा आदेश देण्यात आणि हुकूमनामा काढण्यात येत आहे की, हा दावा ····· यांच्याकडे आयुक्त म्हणून खालील हिशेब घेण्यासाठी निर्देशित करण्यात येत आहे :—

(एक) वादपत्रात नमूद केलेल्या गहाणावर प्रतिवादीला मुद्दल व व्याज (मुद्दलावर द्यावयाच्या दराने आणि असा कोणताही दर ठरविण्यात आला नसेल तेव्हा दरसाल दरशेकडा सहा टक्के या दराने किंवा न्यायालयास वाजवी वाटेल त्या दराने मोजावयाचे व्याज) याबद्दल आजमितीस जी देय असेल अशा रकमेचे हिशेब;

(दोन) प्रतिवादीला किंवा प्रतिवादीच्या आदेशाने किंवा त्याच्या उपयोगाकरिता इतर कोणत्याही व्यक्तीस आजमितीस मिळालेल्या किंवा प्रतिवादीने किंवा अशा व्यक्तीने बुद्धिपुरस्सर कसूर केली नसती तर, अशा प्रकारे मिळू शकली असती अशा, त्या गहाण मालमत्तेवरील प्राप्तीचा हिशेब;

(तीन) गहाणाच्या तारणाच्या संबंधात या तारखेपर्यंत प्रतिवादीस योग्य रीत्या आलेला (दाव्याच्या खर्चाव्यतिरिक्त) परिव्यय, आकार व खर्च याबद्दलच्या सर्व रकमांच्या त्यावरील व्याजा, सह (असे व्याज पक्षकारांना संमत झालेल्या दराने किंवा असा दर नसेल तर मुद्दलावर द्यावयाच्या व्याजाच्या दराने किंवा असे दोन्हीही दर नसतील तर, दरसाल दरशेकडा नऊ या दराने मोजावयाचे) हिशेब ;

(चार) आजच्या दिनांकापूर्वी, गहाण मालमत्तेचा नाश करणाऱ्या किंवा तिची कायमची खराबी करणाऱ्या प्रतिवादीच्या कोणत्याही कृतीने किंवा अकृतीने किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याने किंवा गहाणखताच्या अटींद्वारे त्यांच्यावर लादलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य त्याने न केल्यामुळे त्या मालमत्तेस पोहोचलेल्या कोणत्याही हानीचा किंवा नुकसानीचा हिशेब ;

२. याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, वरील खंड (दोन) अन्वये मिळालेली किंवा खंड (चार) द्वारे-देय म्हणून ठरविण्यात आलेली कोणतीही रक्कम, त्यावरील व्याजासह, प्रथमतः खंड (तीन) अन्वये प्रतिवादीने दिलेल्या कोणत्याही रकमेच्यापोटी (त्यावरील

व्याजासह) विरूद्ध समायोजित केली पाहिजे व कोणतीही शिल्लक उरल्यास ती गहाण रकमेत मिळवली पाहिजे किंवा, प्रकरणपरत्वे, देय म्हणून ठरविण्यात आलेल्या मुद्दल रकमेत प्रतिवादीस व्याजादाखल देय असलेल्या रकमेची घट म्हणून व त्यानंतर मुद्दल रकमेची घट म्हणून किंवा तिची फेड म्हणून खर्ची टाकण्यात आली पाहिजे.

३. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात येत आहे की, उक्त आयुक्ताने तो हिशेब सोयीनुसार शक्य तितक्या त्वरेने, सर्व वाजवी सवलती देऊन तारीख ··· माहे ····· १९ ·· रोजी किंवा त्यापूर्वी या न्यायालयास सादर केला पाहिजे आणि आयुक्ताचे असे प्रतिवेदन आल्यानंतर, उक्त दाव्यातील पक्षकार ज्या हरकती सादर करतील त्यांचा विचार केल्यानंतर आवश्यक असतील असे फेरफार करून तो हिशेब कायम करण्यात येईल व तो प्रतिस्वाक्षरित केला जाईल.

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) न्यायालय देय म्हणून ठरवील अशी रक्कम व प्रतिवादीस देवविण्यात आलेली दाव्याच्या खर्चाबद्दलची रुपये ····· इतकी रक्कम, ह्या रकमा वादीने, तारीख ··· माहे ··१९ ·· रोजी किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालयाकडून पैसे भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील तारखेपर्यंत वाढविण्यात येईल त्या तारखेस किंवा त्यापूर्वी, न्यायालयात भरल्या पाहिजेत ;

(दोन) असे प्रदान केल्यावर आणि न्यायालय ठरवील अशा तारखेपूर्वी दावा खर्चाचा आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४ याच्या नियम ११ अन्वये भरावयाच्या नंतरच्या व्याजासह व नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च यांच्या संबंधात, न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर, प्रतिवादीने वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व असे सर्व दस्तऐवज, वादीच्या अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत व प्रतिवादीस तसे फर्माविण्यात आल्यास त्याने ती मालमत्ता, उक्त गहाणविरहित व तिच्यावर प्रतिवादीने किंवा प्रतिवादीच्यावतीने हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा ज्याच्यावतीने ती हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या सर्व भारातून मुक्त व विरहित अशी व हे गहाण, किंवा हा दावा यापासून जे कोणतेही दायित्व निर्माण होईल त्यापासून मुक्त अशी पुन्हा अभिहस्तांतरित किंवा पुन्हा हस्तांतरित केली पाहिजे व त्यास तसे फर्माविण्यात आल्यास, त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत वादीस दिला पाहिजे.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की वर सांगितल्याप्रमाणे भरणा करण्यात कसूर झाल्यास सोबत जोडलेल्या अनुसूचीत वर्णन केलेली गहाण मालमत्ता सोडविण्याबाबत वादीचा सर्व अधिकार इतःपर सर्वस्वी नाहीसा झाला आहे व ते गहाण पुरोबंधित झाले आहे अशा आशयाच्या अंतिम हुकूमनाम्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करण्याची प्रतिवादीस मोकळीक असेल व वादीस तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा प्रतिवादीस बिनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे आणि प्रसंगानुसार पक्षकारांना वेळोवेळी न्यायालयाकडे तसा अर्ज करण्याची मोकळीक असेल व असा अर्ज आला असता किंवा अन्यथा, न्यायालय त्यास योग्य वाटतील असे निदेश देईल.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

क्रमांक ७-क

गहाणकाराने भरणा करण्यात कसूर केल्यामुळे, विक्रीचा हुकूमनामा काढण्यात आला असेल त्याबाबतीत विमोचनाबाबतचा प्रारंभिक हुकूमनामा.

(आदेश ३४ नियम ७.—जेव्हा हिशेब घेण्याबद्दल निदेश देण्यात आला असेल अशाबाबतीत.)

(सरनामा)

हा दावा, आज तारीख ··· माहे ····· १९ ·· रोजी ····· अंतिम निकालासाठी निघाल्यावरून असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, तो दावा ····· यांच्याकडे आयुक्त म्हणून पुढील हिशेब घेण्यासाठी निर्देशित करण्यात यावा, ते हिशेब असे :—

(एक) प्रतिवादीस वादपत्रात नमूद केलेल्या गहाणावरील मुद्दल व व्याज याबद्दल (असे व्याज, मुद्दलावर द्यावयाच्या दराने मोजावयाचे किंवा असा कोणताही दर ठरविण्यात आला नसेल तेव्हा, दरसाल दरशेकडा सहा या दराने किंवा न्यायालयास वाजवी वाटेल अशा दराने मोजावयाचे) आजमितीस देय असेल अशा रकमेचा हिशेब;

(दोन) प्रतिवादीस किंवा प्रतिवादीच्या आदेशाने किंवा त्याच्या उपयोगाकरता इतर कोणत्याही व्यक्तीस या तारखेपर्यंत मिळालेल्या किंवा प्रतिवादीने किंवा अशा व्यक्तीने बुद्धीपुरस्सर कसूर केली नसती तर, जी अशाप्रकारे मिळू शकली असती अशा, गहाण मालमत्तेवरील प्राप्तीचा हिशेब ;

(तीन) गहाणाच्या तारणाच्या संबंधात या तारखेपर्यंत प्रतिवादीस योग्य रीत्या आलेला (दाव्यातील खर्चाव्यतिरिक्त) परिव्यय, आकार व खर्च यावद्दलच्या सर्व रकमांचा, त्यावरील व्याजासह (असे व्याज, पक्षकारांना संमत झालेल्या दराने किंवा असा दर नसेल तर मुद्दलावर द्यावयाच्या दराने किंवा असे दोन्हीही दर नसतील तर दरसाल दरशेकडा नऊ टक्के या दराने मोजावयाचे) हिशेब;

(चार) या तारखेपूर्वी गहाण मालमत्तेचा नाश करणाऱ्या, किंवा तिची कायमची खराबी करणाऱ्या, प्रतिवादीच्या कोणत्याही कृतीने वा अकृतीने किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा गहाणखताच्या अटींद्वारे त्याच्यावर लादलेल्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य त्याने न केल्यामुळे त्या मालमत्तेला पोचलेल्या कोणत्याही हानीचा किंवा नुकसानीचा हिशेब.

२. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, वरील खंड (दोन) अन्वये मिळालेली किंवा खंड (चार) अन्वये देय म्हणून ठरविण्यात आलेली कोणतीही रक्कम त्यावरील व्याजासह, प्रथम खंड (तीन) अन्वये प्रतिवादीने दिलेल्या कोणत्याही रकमांच्यापोटी (त्यावरील व्याजासह) समायोजित केली पाहिजे व कोणतीही शिल्लक उरल्यास, ती गहाण रकमेत मिळवली पाहिजे किंवा, प्रकरणपरत्वे, देय म्हणून ठरविण्यात आलेल्या मुद्दल रकमेवर प्रतिवादीस व्याजादाखल देय असलेल्या रकमेची वट म्हणून व त्यानंतर मुद्दल रकमेची वट म्हणून किंवा तिची फेड म्हणून खर्ची टाकण्यात आली पाहिजे.

३. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात येत आहे की, उक्त आयुक्ताने तो हिशेब सोबीनुसार शक्य तितक्या त्वरेने, सर्व वाजवी सवलती देऊन, दिनांक ·· माहे ····· १९ ·· रोजी किंवा त्यापूर्वी या न्यायालयास सादर केला पाहिजे आणि आयुक्ताचे असे प्रतिवेदन आल्यानंतर उक्त दाव्यातील पक्षकार ज्या ज्या हरकती सादर करतील त्यांचा विचार केल्यानंतर आवश्यक असतील असे फेरफार करून तो हिशेब कायम करण्यात येईल व प्रतिस्वाक्षरित केला जाईल.

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) न्यायालय देय म्हणून ठरवील अशी रक्कम व प्रतिवादीस देय विण्यात आलेली दाव्याच्या खर्चाबद्दलची रु. ···· इतकी रक्कम, ह्या रकमा वादीने, दिनांक ··· माहे ····· १९ ·· रोजी किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालयाकडून पैसे भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील तारखेपर्यंत वाढविण्यात येईल त्या तारखेस किंवा त्यापूर्वी न्यायालयात भरल्या पाहिजेत;

(दोन) असा भरणा केल्यानंतर व न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी दावाखर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च ····· व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यासह ····· यांच्यासंबंधात न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर प्रतिवादीने वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व असे सर्व दस्तऐवज, वादीच्या अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत, व प्रतिवादीस तसे फर्माविण्यात आल्यास त्याने ती मालमत्ता उक्त गहाणविरहित व तिच्यावर प्रतिवादीने किंवा प्रतिवादीच्यावतीने हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जिच्या वतीने तो हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या सर्व भारातून मुक्त व विरहित अशी व हे गहाण किंवा हा दावा यापासून जे कोणतेही दायित्व निर्माण होईल त्यापासून मुक्त अशी पुन्हा अभिहस्तांतरित किंवा पुन्हा हस्तांतरित केली पाहिजे किंवा त्यास तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा विनतकार व विनाहरकत वादीस दिला पाहिजे.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पूर्वोक्तप्रमाणे भरणा करण्यात कसूर झाल्यास, गहाण मालमत्तेच्या विक्रीचा अंतिम हुकूमनामा मिळण्यासाठी प्रतिवादीस न्यायालयाकडे अर्ज करता येईल; आणि असा अर्ज करण्यात आल्यानंतर, उक्त गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्याबद्दल निदेश देण्यात येईल; आणि अशा विक्रीच्या प्रयोजनार्थ, प्रतिवादीने न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत.

६. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, अशा विक्रीपासून येणारा पैसा न्यायालयात भरला जाईल व या हुकूमनाम्यान्वये व या बाबत जे आणखी कोणतेही आदेश देण्यात येतील त्या अन्वये, प्रतिवादीस देय होणारी रक्कम भरण्याच्या कामी व दावा खर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४ वा, नियम ११ अन्वये द्यावयाच्या नंतरच्या व्याजासहित, नियम १० अन्वये द्यावयाचा परिव्यय, आकार व खर्च—यासंबंधातील प्रतिवादीस येणे असल्याचे न्यायालयाकडून ठरविण्यात येईल अशी कोणतीही रक्कम भरण्याच्या कामी त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्य रीत्या विनियोग केला जाईल व काही शिल्लक उरल्यास, ती वादीला किंवा ती मिळण्यास हक्कदार असलेल्या इतर व्यक्तींना दिली जाईल.

७. आणि याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, जर अशा विक्रीपासून येणारा पैसा वर सांगितल्याप्रमाणे प्रतिवादीस द्यावयाची रक्कम पूर्णपणे देण्यास पुरेसा झाला नाही तर, उरलेल्या रकमेबद्दल वादीविरुद्ध व्यक्तिगत हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची (जेव्हा त्याच्या गहाणाच्या

अटींअन्वये त्याला असा उपाय करण्याची मोकळीक असेल व त्याला त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मनाई करण्यात आली नसेल तेव्हा) प्रतिवादीला मोकळीक असेल; आणि पक्षकारांना प्रसंगानुसार वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असेल; आणि असा अर्ज आला असता किंवा अन्यथा न्यायालयास, त्यास योग्य वाटतील असे निदेश देता येतील.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

क्रमांक ७-ख

गहाणकाराने भरणा करण्यात कसूर केल्यामुळे, पुरोबंधाचा हुकूमनामा काढण्यात आला असेल त्याबाबतीत विमोचनाबाबतचा प्रारंभिक हुकूमनामा

(आदेश ३४, नियम ७.—जेव्हा न्यायालय येणे असलेली रक्कम ठरवील अशाबाबतीत.)

(सरनामा)

हा दावा, आज दिनांक ... माहे ..... १९.. रोजी, इत्यादी, निकालात निघाला असून याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, प्रतिवादीस वादपत्रात उल्लेखिलेल्या त्याच्या गहाणावर आज दिनांक ... माहे .. १९.. पर्यंत मोजण्यात आल्याप्रमाणे येणे असलेली रक्कम ही, मुद्दलाबाबत रुपये ..... आणि उक्त मुद्दलावरील व्याजाबाबत रुपये .... उक्त गहाणाच्या तारणाच्या संबंधात प्रतिवादीस वाजवी रीतीने आलेला (दाव्याच्या खर्चाव्यतिरिक्त) परिव्यय, आकार व खर्च यांबाबत त्यावरील व्याजासकट रुपये ... व प्रतिवादीस देवविलेल्या या वादाच्या खर्चाबाबत रुपये .... इतकी रक्कम म्हणजेच एकूण रक्कम रुपये ... इतकी आहे.

२. आणि याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) दिनांक .... माहे ..... १९ ... रोजी किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालयाकडून पैसा भरण्याची मुदत, ज्या कोणत्याही पुढील दिनांकापर्यंत वाढविण्यात येईल त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी उक्त रुपये .... ची रक्कम वादीने न्यायालयात भरली पाहिजे.

(दोन) असा भरणा केल्यानंतर व न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी दाव्याचा खर्च व 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८,' पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल अशा परिव्यय, आकार व खर्च .... व त्यावरील नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यासह यांच्या संबंधात न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर प्रतिवादीने, वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व असे सर्व दस्तऐवज वादीच्या अगर तो नेमील त्या व्यक्तींच्या स्वाधीन केले पाहिजेत, व प्रतिवादीस तसे फर्माविण्यात आल्यास, त्याने ती मालमत्ता उक्त गहाणविरहित व तिच्यावर प्रतिवादीने किंवा प्रतिवादीच्या पोटी हक्कभागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जिच्यावतीने तो हक्कभागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या भारातून मुक्त व विरहित अशी पुन्हा अभिहस्तांतरित केली पाहिजे किंवा पुन्हा हस्तांतरित केली पाहिजे व त्यास तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व बिनाहरकत वादीस दिला पाहिजे.

३. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, वर पूर्वोक्ताप्रमाणे भरणा करण्यात कसूर झाल्यास, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत वर्णन केलेली गहाण मालमत्ता सोडविण्याबाबतचा वादीचा सर्व अधिकार इतःपर सर्वस्वी नाहीसा झाला आहे व ते गहाण पुरोबंधित झाले आहे अशा आशयाच्या अंतिम हुकूमनाम्यासाठी प्रतिवादी न्यायालयाकडे अर्ज करू शकेल व वादीस तसे फर्माविण्यात आल्यास त्याने मालमत्तेचा कब्जा प्रतिवादीस बिनतक्रार व बिनाहरकत वादीस दिला पाहिजे आणि पक्षकारास प्रसंगानुसार वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असेल व असा अर्ज आला असता किंवा अन्यथा, न्यायालय त्यास योग्य वाटतील असे निदेश देईल.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

क्रमांक ७-ग

गहाणकाराने भरणा करण्यात कसूर केल्यामुळे, पुरोबंधाचा हुकूमनामा काढण्यात आला असेल त्याबाबतीत विमोचनाबाबतचा प्रारंभिक हुकूमनामा

(आदेश ३४, नियम ७.—जेव्हा न्यायालय येणे असलेली रक्कम ठरवील अशा बाबतीत.)

(सरनामा)

हा दावा, आज दिनांक ... माहे ..... १९.. रोजी इत्यादी अंतिम निकालासाठी निघाला असून याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, प्रतिवादीस, वादपत्रात उल्लेखिलेल्या त्याच्या गहाणावर आज, दिनांक .... माहे ... १९.. पर्यंत मोजण्यात आल्याप्रमाणे येणे असलेली रक्कम ही, मुद्दलाबाबत

रुपये ..... उक्त मुद्दलावरील व्याजाबाबत रुपये ..... उक्त गहाणाच्या तारणाच्या संबंधात, प्रतिवादीस वाजवी रीतीने आलेला (दावाखर्चाच्या व्यतिरिक्त) परिव्यय, आकार व खर्च याबाबत यावरील व्याजासह रुपये ..... व प्रतिवादीस देवविलेल्या या दाव्याच्या खर्चाबाबत रुपये ..... इतकी रक्कम म्हणजेच एकूण रक्कम रुपये ..... इतकी आहे.

२. आणि याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) दिनांक ... माहे ..... १९ .. रोजी किंवा त्यापूर्वी किंवा न्यायालयाकडून पैसे भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील दिनांकापर्यंत वाढविण्यात येईल त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी रु. .... ची उक्त रक्कम वादीने न्यायालयात भरली पाहिजे;

(दोन) असा भरणा केल्यानंतर व न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी, दाव्याचा खर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यांसह-यांच्या संबंधात न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर प्रतिवादीने वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व असे दस्तऐवज वादीच्या अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत, व प्रतिवादीस तसे फर्माविण्यात आल्यास त्याने ती मालमत्ता उक्त गहाणविरहित व तिच्यावर प्रतिवादीने किंवा प्रतिवादीच्यावतीने हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जिच्यावतीने तो हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या भारातून मुक्त व विरहित अशी वादीकडे पुन्हा अभिहस्तांतरित किंवा पुन्हा हस्तांतरित केली पाहिजे व त्यास तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत वादीस दिला पाहिजे.

३. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पूर्वोक्ताप्रमाणे भरणा करण्यात कसूर झाल्यास गहाण मालमत्तेच्या विक्रीचा अंतिम हुकूमनामा मिळण्यासाठी प्रतिवादीस न्यायालयाकडे अर्ज करता येईल, आणि असा अर्ज करण्यात आल्यानंतर गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्याबद्दल निदेश देण्यात येईल; आणि अर्ज करण्यात आल्यानंतर, गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्याच्या प्रयोजनार्थ, प्रतिवादीने न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे गहाण मालमतेसंबंधी आपल्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत.

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, अशा विक्रीपासून येणारा पैसा न्यायालयात भरला जाईल व या हुकूमनाम्यान्वये व या दाव्यात जे आणखी कोणतेही आदेश देण्यात येतील त्याअन्वये प्रतिवादीस येणे असणारी रक्कम भरण्याच्या कामी व दाव्याचा खर्च आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम ११ अन्वये द्यावयाच्या त्यानंतरच्या व्याजासह व नियम १० अन्वये द्यावयाचा परिव्यय, आकार व खर्च यासंबंधी, प्रतिवादीस येणे असल्याचे न्यायालयाकडून ठरविण्यात येईल अशी कोणतीही रक्कम भरण्याच्या कामी, त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्य रीतीने विनियोग केला जाईल व काही शिल्लक असल्यास, ती वादीस किंवा ती मिळण्यास हक्कदार असलेल्या इतर व्यक्तींना दिली जाईल.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, जर अशा विक्रीपासून येणारा पैसा, वर सांगितल्याप्रमाणे प्रतिवादीस द्यावयाची रक्कम पूर्णपणे देण्यास पुरेसा झाला नाही तर, उरलेल्या रकमेबद्दल वादीविरुद्ध व्यक्तिगत हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची (जेव्हा त्याच्या गहाणाच्या अटीं अन्वये त्यास असा उपाय करण्याची मोकळीक असेल; व त्यांस त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मनाई करण्यात आली नसेल तेव्हा) प्रतिवादीला मोकळीक असेल; आणि पक्षकारास प्रसंगानुसार वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असेल, आणि असा अर्ज आला असता किंवा अन्यथा न्यायालय त्यास योग्य वाटतील असे निदेश देऊ शकेल.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

क्रमांक ७-घ

विमोचनाबाबतच्या दाव्यात गहाणकाराने भरणा करण्यात कसूर केली असता, पुरोबंधाबाबतचा अंतिम हुकूमनामा

(आदेश ३४, नियम ८)

(सरनामा)

दिनांक ... माहे ..... १९ ... चा या दाव्यात दिलेला प्रारंभिक हुकमनामा व दिनांक .. माहे ..... १९ .. चे आणखी (कोणतेही आदेश असल्यास ते) आदेश व अंतिम हुकूमनाम्यासाठीचा प्रतिवादीचा दिनांक ... माहे ..... १९ .. चा अर्ज वाचल्यानंतर व पक्षकारांचे म्हणणे ऐकून

घेतल्यानंतर आणि उक्त हुकूमनामा व आदेश याद्वारे करण्याचे फर्माविण्यात आलेले प्रदान वादीने किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने किंवा उक्त गहाण सोडविण्यास हक्कदार असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेले नाही असे दिसून आल्यावरून ;

याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येतो आहे की, वादी व त्याच्यामार्फत किंवा त्यांच्या वतीने हक्कसागणी करणाऱ्या सर्व व्यक्ती यांचा, पूर्वोक्त प्रारंभिक हुकूमनाम्यात नमूद केलेल्या मालमत्तेचे व मालमत्तेतील गहाण सोडविण्याबद्दलचा सर्व अधिकार नाहीसा व्हावा व याद्वारे तो तसा होत आहे व ते अशा सर्व अधिकारास मुकले पाहिजेत व याद्वारे तसे ते मुकत आहेत; *[आणि (जर उक्त गहाण मालमत्ता वादीच्या कब्जात असेल तर) वादीने प्रतिवादीस उक्त गहाण मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे.]

२. आणि याद्वारे आणखी असे जाहीर करण्यात येत आहे की, वादपत्रात नमूद केलेल्या उक्त गहाणापासून किंवा या दाव्यामधून उद्भवणारे आजमितीपर्यंतचे वादीचे कोणत्याही प्रकारचे संपूर्ण दायित्व याद्वारे पार पाडण्यात व संपविण्यात येत आहे.

क्रमांक ७-ङ

विमोचनाबाबतच्या दाव्यात गहाणकाराने कसूर केली असता विक्रीचा अंतिम हुकूमनामा

(आदेश ३४, नियम ८)

(सरनामा)

तारीख····माहे·····.१९···चा या दाव्यात दिलेला प्रारंभिक हुकूमनामा व तारीख···माहे·····१९···चे आणखी (कोणतेही आदेश असल्यास) ते आदेश व अंतिम हुकूमनाम्यासाठीचा वादीचा, दिनांक····माहे·····१९···चा अर्ज वाचल्यानंतर व पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि उक्त हुकूमनामा व आदेश याद्वारे करण्याचे फर्माविण्यात आलेले प्रदान वादीने किंवा त्याच्या वतीने कोणत्याही व्यक्तीने किंवा उक्त गहाण सोडविण्यास हक्कदार असलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेले नाही असे दिसून आल्यावरून;

याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पूर्वोक्त प्रारंभिक हुकूमनाम्यात नमूद केलेली गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा व अशा विक्रीच्या प्रयोजनांसाठी प्रतिवादीने न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यांपुढे, उक्त गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत.

२. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, अशा विक्रीपासून येणारा पैसा न्यायालयात भरला जाईल व पूर्वोक्त प्रारंभिक हुकूमनाम्यान्वये व या दाव्यात जे कोणतेही आणखी आदेश देण्यात आलेले असतील त्याअन्वये प्रतिवादीस येणे असणारी रक्कम भरण्याच्या कामी व दाव्याचा खर्च आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम ११ अन्वये द्यावयाच्या नंतरच्या व्याजासहित व नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च यासंबंधात, प्रतिवादीस येणे असल्याचे न्यायालयाने ठरविलेले असेल अशी कोणतीही रक्कम भरण्याच्या कामी त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्यरीत्या विनियोग केला जाईल व काही शिल्लक असल्यास, ती वादीस किंवा ती मिळण्यास हक्कदार असणाऱ्या इतर व्यक्तींना दिली जाईल.

क्रमांक ७-च

पुरोबंधाच्या, विक्रीच्या किंवा विमोचनाच्या दाव्यात जेव्हा गहाणकार हुकूमनाम्यातील रक्कम भरील तेव्हा अंतिम हुकूमनामा.

(आदेश ३४, नियम ३, ५ व ८)

(सरनामा)

हा दावा आज····रोजी आणखी विचारासाठी येऊन व तारीख····माहे·····१९ रोजी गहाणकाराने किंवा गहाण सोडविण्यास हक्कदार असलेली व्यक्ती·····हिने तारीख····माहे·····१९···च्या प्रारंभिक हुकूमनाम्यान्वये गहाण घेणाऱ्यास येणे असलेल्या सर्व रकमा न्यायालयात भरल्या आहेत असे दिसून आल्यावरून, यावरून असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) गहाणदाराने गहाणकाराच्या *[किंवा, प्रकरणपरत्वे,····ही मालमत्ता गहाणातून सोडविण्याच्या····याच्या] वतीने पूर्वोक्त प्रारंभिक हुकूमनाम्यात निर्दिष्ट केलेली मालमत्ता पुन्हा अभिहस्तांकरित केल्याबद्दलचा विलेख किंवा आपणास येणे असलेल्या रकमेचा भरणा झाल्याबद्दलची पावती करून दिली पाहिजे;

---

*नको असलेले शब्द गाळावे.

(दोन) गहाण घेणाऱ्याने दाव्यातील गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात किंवा अखत्याराखाली असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, गहाण घेणाऱ्याने पूर्वोक्त रीतीने मालमत्ता परत केल्याबद्दलचा विलेख किंवा पावती करून दिल्यानंतर,—

(एक) उक्त रुपये·····ची रक्कम गहाणदारास न्यायालयाबाहेर दिली पाहिजे;

(दोन) न्यायालयात आणलेले उक्त विलेख व दस्तऐवज गहाणकारास *[किंवा भरणा करणाऱ्या व्यक्तीस] न्यायालयाबाहेर दिले पाहिजेत व गहाणदारास तसे फर्मावण्यात आल्यास त्याने, गहाणकाराच्या *[किंवा भरणा करणाऱ्या अन्य व्यक्तीच्या] खर्चाने मालमत्ता परत केल्याबद्दलचा उक्त विलेख किंवा पावती·····च्या दुय्यम प्रबंधकाच्या कार्यालयात नोंदण्यास संमती दिली पाहिजे; आणि

(तीन) *[जर गहाण मालमत्ता ही गहाणदाराच्या, वादीच्या किंवा, प्रकरणपरत्वे, प्रतिवादीच्या कब्जात असेल तर] पूर्वोक्त प्रारंभिक हुकूमनाम्यात नमूद केलेल्या गहाण मालमत्तेच्या कब्जा, गहाण देणाऱ्यास *[किंवा जिने भरणा केला असेल अशा पूर्वोक्त व्यक्तीस] ताबडतोब दिला पाहिजे.

क्रमांक ८

गहाण मालमत्तेच्या विक्रीनंतर राहिलेल्या रकमेबद्दल गहाणकाराविरुद्ध व्यक्तिगत हुकूमानामा.

(आदेश ३४, नियम ६ व ८ क)

(सरनामा)

गहाणदाराचा (वादीचा किंवा, प्रकरणपरत्वे, प्रतिवादीचा) अर्ज वाचल्यावरून व तारीख····माहे ·····१९···रोजी दाव्यामध्ये दिलेला अंतिम हुकूमनामा वाचल्यावरून व पूर्वोक्त अंतिम हुकूमनाम्या-अन्वये केलेल्या विक्रीचे निव्वळ उत्पन्न रुपये·····इतके झाले व ते अर्जदारास न्यायालयाबाहेर तारीख ···माहे····· ·१९····रोजी देण्यात आले आहे व पूर्वोक्त हुकूमनाम्यान्वये त्यास आता येणे असलेली रक्कम रुपये·····इतकी आहे अशी न्यायालयाची खात्री झाल्यावरून ;

आणि ज्याअर्थी न्यायालयास असे दिसून येते की, उक्त रक्कम गहाणकाराकडून (वादीकडून किंवा प्रकरणपरत्वे, प्रतिवादीकडून) जातीने, कायदेशीरपणे वसूल करता येण्यासारखी आहे;

म्हणून याद्वारे, पुढीलप्रमाणे आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

गहाणकाराने (वादीने, किंवा, प्रकरणपरत्वे, प्रतिवादीने) उक्त रुपये·····ची रक्कम, तारीख माहे ·· ···१९···(वर निर्देशिलेली, न्यायालयाबाहेर भरणा केल्याची तारीख) पासून उक्त रक्कम वसूल होण्याच्या तारखेपर्यंतच्या, दरसाल ६ टक्के दराने पुढील व्याजासह व या अर्जाच्या खर्चासह, गहाणदारास (प्रतिवादीस किंवा, प्रकरणपरत्वे, वादीस) दिली पाहिजे.

क्रमांक ९

पुरोबंधाबाबतचा किंवा विक्रीबाबतचा प्रारंभिक हुकूमनामा.

[वादी — पहिला गहाणदार

विरुद्ध

प्रतिवादी क्रमांक १ — गहाणकार

प्रतिवादी क्रमांक २ — दुसरा गहाणदार.]

(आदेश ३४,—नियम २ व ४)

(सरनामा)

हा दावा, आज तारीख·· ·माहे····· १९···रोजी· ·····समोर वादीतर्फे····· व प्रतिवादीतर्फे·····यांच्या समक्ष अंतिम निकालासाठी निघाला असून याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, वादीस, वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाणावर आज दिनांक····माहे····· १९·· पर्यंत मोजण्यात आल्याप्रमाणे येणे असलेली रक्कम ही, मुद्दलाबाबत रुपये ····· उक्त मुद्दलावरील व्याजाबाबत रु.·····, उक्त गहाणाच्या तारणासंबंधी वादीस आलेला (दाव्याच्या खर्चाव्यतिरिक्त इतर) परिव्यय, आकार व खर्च याबाबत त्यावरील व्याजासकट रु.····· व वादीस देवविलेल्या या दाव्याच्या

* नको असलेले शब्द गाळावे.

बाबाबत रु. ..... इतकी रक्कम म्हणजेच एकूण रक्कम रु. ..... इतकी होईल.

(प्रतिवादी क्रमांक २ यास त्याच्या गहाणासंबंधी जर त्या अन्वये येणे असलेली गहाण रक्कम, दाव्याच्या दिनांकास प्रदेय झाली असेल तर देय असलेल्या रकमेसंबंधीही अशाच प्रकारची अधिकथने दिली पाहिजेत.)

२. आणखी असे जाहीर करण्यात येत आहे की, वादी हा त्यास येणे असलेली रक्कम प्रतिवादी क्रमांक २ च्या आधी मिळण्यास हक्कदार आहे *[किंवा (जर अनेक उत्तरवर्ती गहाणदार असतील तर) याबाबतचे निरनिराळे पक्षकार त्यांच्यापैकी प्रत्येकास येणे असलेल्या रकमा पुढील क्रमाने मिळण्यास हक्कदार आहेत] :—

३. आणि याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) (क) प्रतिवादींनी किंवा त्यापैकी एकाने दिनांक .....माहे ..... १९... रोजी किंवा त्यापूर्वी किंवा भरणा करण्याची मुदत न्यायालयाने ज्या दिनांकापर्यंत वाढविली असेल अशा कोणत्याही पुढील दिनांकास किंवा त्यापूर्वी, वादीस देय असलेली रु. ...ची उक्त रक्कम न्यायालयात भरली पाहिजे ; आणि

(ख) प्रतिवादी क्रमांक १ ने दिनांक .....माहे ..... १९ .... रोजी किंवा त्यापूर्वी किंवा भरणा करण्याची मुदत न्यायालयाने ज्या दिनांकापर्यंत वाढविली असेल अशा कोणत्याही पुढील दिनांकास किंवा त्यापूर्वी, प्रतिवादी क्रमांक २ ला देय असलेली रु. ..... इतकी रक्कम न्यायालयात भरली पाहिजे ; आणि

(दोन) प्रतिवादी किंवा त्यापैकी कोणाहीकडून वादीला देय म्हणून जाहीर करण्यात आलेली रक्कम, खंड (एक) (क) यात विहित केलेल्या रीतीने भरल्यावर आणि न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी दावा खर्च आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च– यांच्याबाबतीत त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यासकट ——— न्यायालय देय म्हणून ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर, वादीने, वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व असे सर्व दस्तऐवज (ज्याने भरणा केला असेल त्या) प्रतिवादी क्रमांक... अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत व तसे फर्माविण्यात आल्यास वादीने ती मालमत्ता, सदरहू गहाणविरहित व तिच्यावर वादीने किंवा वादीच्यावतीने हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जिच्यावतीने तो हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने उत्पन्न केलेल्या सर्व भारांतून मुक्त व विरहित अशी, तसेच उक्त गहाण किंवा हा दावा यापासून उत्पन्न होणाऱ्या कोणत्याही दायित्वापासून मुक्त अशी पुन्हा अभिहस्तांतरित किंवा पुन्हा हस्तांतरित करून दिली पाहिजे. व तसे फर्माविण्यात येईल तर, त्याने (ज्याने भरणा केला त्या) प्रतिवादी क्रमांक .. यास उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे. (प्रतिवादी क्रमांक २ यास देय असल्याचे आढळून आलेली किंवा घोषित करण्यात आलेली रक्कम, प्रतिवादी क्रमांक १ देईल तर, त्याच्या गहाणांचे स्वरूप लक्षात घेता, आवश्यक असतील अशा फेरबदलांसह अशाच प्रकारची अधिकथने द्यावी लागतील.)

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा करण्यात येत आहे की, वादीस देय असलेली रक्कम वरीलप्रमाणे भरण्यात कसूर झाल्यास, पुढील गोष्टींबाबत अंतिम हुकूमनाम्यासाठी न्यायालयापुढे अर्ज करण्याची वादीस मोकळीक असेल, त्या गोष्टी म्हणजे :—

(एक) *[ज्या ठिकाणी गहाणखतात ठरविलेला उपाय एकच म्हणजे पुरोबंधांचा उपाय असतो व विक्रीचा उपाय उपलब्ध नसतो अशा सशर्त विक्रीद्वारा गहाणाच्या किंवा विषम गहाणाच्या बाबतीत] यासोबत जोडलेल्या अनुसूचीत वर्णन केलेली गहाण मालमत्ता सोडवण्याबाबतचा प्रतिवादीचा सर्व अधिकार संयुक्तपणे व पृथकपणे इतःपर सर्वस्वी नाहीसा झाला आहे व ते गहाण पुरोबंधित झाले आहे व तसे फर्माविण्यात आल्यास त्यांनी, उक्त मालमत्तेचा कब्जा वादीस बिनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे; किंवा

(दोन) *[इतर कोणत्याही गहाणाच्या बाबतीत,] उक्त गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा व अशा विक्रीच्या प्रयोजनार्थ वादीने न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत; आणि

(तीन) *[वरील खंड ४ (दोन) अन्वये ज्यात विक्रीचा आदेश देण्यात आला असेल अशा बाबतीत], अशा विक्रीपासून येणारा पैसा न्यायालयात भरला जावा व या हुकूमनाम्यान्वये व या दाव्यात जे आणखी कोणतेही आदेश देण्यात आले असतील त्याअन्वये वादीस देय असणारी रक्कम भरण्याच्या कामी व दाव्याचा खर्च आणि 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८', पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये प्रदेय असेल असा परिव्यय, आकार व खर्च यांच्या बाबतीत, व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाच्या नंतरच्या व्याजासह वादीस देय असल्याचे न्यायालय ठरवील अशी

*नको असलेले शब्द गाळावे.

रक्कम देण्याच्या कामी त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्यरीत्या विनियोग केला जावा व काही शिल्लक असल्यास, प्रतिवादी क्र. २ यास देय असलेली रक्कम भरण्याच्या कामी तिचा विनियोग केला जाईल व काही शिल्लक उरल्यास, ती प्रतिवादी क्र. १ यास किंवा ती मिळण्यास हक्कदार असलेल्या इतर व्यक्तींना दिली जाईल; आणि

(चार) जर अशा विक्रीपासून येणारा पैसा, वादी व प्रतिवादी क्र. २ यांस देय असलेल्या रकमा पूर्णपणे देण्यास पुरेसा नसेल तर, वादीस किंवा प्रतिवादी क्र. २ यास किंवा, प्रकरणपरत्वे, दोघांनाही त्यांच्यापैकी प्रत्येकाला द्यावयाच्या राहिलेल्या रकमेबद्दल प्रतिवादी क्र. १ याविरुद्ध व्यक्तिलक्षी हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची (जेव्हा त्यांच्या त्यांच्या गहाणाच्या अटींअन्वये त्यांना असा उपाय करण्याची मोकळीक असेल व त्यांना त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये तो उपाय योजण्यास मनाई नसेल तेव्हा) मोकळीक असावी.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(क) जर प्रतिवादी क्र. २ याने वादीस देय म्हणून ठरविण्यात आलेली रक्कम, या दाव्याच्या जमाखाती न्यायालयात भरली परंतु प्रतिवादी क्र. १ याने उक्त रक्कम भरण्यात कसूर केली तर प्रतिवादी क्र. २ यास वादीचे गहाण आपल्या फायद्यासाठी चालू ठेवण्याबद्दल न्यायालयाकडे अर्ज करण्याची व (वरील खंड ४ अन्वये वादीने ज्याप्रमाणे केले असते त्याचप्रमाणे) पुढील गोष्टींबाबत अंतिम हुकूमनाम्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असावी म्हणजे :—

*[(एक) प्रतिवादी क्र. १ हा यासोबत जोडलेल्या अनुसूचीत वर्णन केलेली गहाण मालमत्ता सोडवण्याबाबतचे सर्व अधिकार इतःपर सर्वस्वी नाहीसे व्हावे व ते पुरोबंधित व्हावे आणि तसे फर्माविण्यात आल्यास त्याने उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत वादी क्र. २ यास द्यावा;] किंवा

*[(दोन) गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा व अशा विक्रीच्या प्रयोजनार्थ, प्रतिवादी क्र. २ याने न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे, गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करावे;] व

(ख) (जर प्रतिवादी क्र. २ याच्या अर्जावरून, पुरोबंधाचा अंतिम हुकूमनामा देण्यात आला तर,) वादीचे गहाण किंवा प्रतिवादी क्र. २ याचे गहाण किंवा हा दावा यातून उद्भवणारे प्रतिवादी क्र. १ याचे संपूर्ण दायित्व पार पाडण्यात आले आहे व संपुष्टात आले आहे असे मानण्यात यावे.

६. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, *[वरील खंड ५ अन्वये ज्यात विक्रीचा आदेश देण्यात आला असेल अशा बाबतीत,]—

(एक) अशा विक्रीपासून येणारा पैसा न्यायालयात भरला जावा व पहिल्याप्रथम प्रतिवादी क्र. २ याने वादीचे गहाण व त्यासंबंधातील दाव्याचा खर्च यासंबंधात दिलेली रक्कम देण्याच्या कामी व उक्त रकमेवरील नंतरच्या व्याजासंबंधी न्यायालय देय म्हणून ठरवील अशी रक्कम देण्याच्या कामी या (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्यरीत्या विनियोग केला जावा; व काही शिल्लक उरल्यास तिचा विनियोग, त्यानंतर या हुकूमनाम्यान्वये व आणखी कोणतेही आदेश देण्यात आले असल्यास त्याअन्वये त्याच्या स्वतःच्या गहाणासंबंधी प्रतिवादी क्र. २ यास देय म्हणून ठरवण्यात आलेली रक्कम देण्याच्या कामी आणि दाव्याचा खर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये प्रतिवादी क्र. २ यास प्रदेय असेल असा परिव्यय, आकार व खर्च———त्यांवर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल अशा नंतरच्या व्याजासकट ———यांच्या संबंधात न्यायालयाकडून देय म्हणून ठरवण्यात येईल अशी रक्कम देण्याच्या कामी करण्यात यावा व नंतर काही शिल्लक उरल्यास ती प्रतिवादी क्र. १ यास किंवा ती मिळण्यास हक्कदार असलेल्या इतर व्यक्तींना दिली जाईल ; आणि

(दोन) जर अशा विक्रीपासून येणारा पैसा, वादीचे गहाण किंवा प्रतिवादी क्र. २ चे गहाण यासंबंधी देय असलेली रक्कम पूर्णपणे भरण्यास पुरेसा नसेल तर, प्रतिवादी क्र. २ ला उरलेल्या रकमेबद्दल प्रतिवादी क्र. १ च्या विरुद्ध व्यक्तिलक्षी हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची (जेव्हा त्याच्या गहाणाच्या अटींअन्वये असा उपाय करण्याची त्यास मोकळीक असेल व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये तो उपाय योजण्याची मनाई करण्यात आली नसेल, तेव्हा) मोकळीक असावी.

७. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पक्षकारांस प्रसंगानुसार वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक आहे. व असा अर्ज आला असता किंवा अन्यथा न्यायालय, त्यास योग्य वाटतील असे निदेश देऊ शकेल.

---

* नको असलेले शब्द गाळावे.

अनुसूची

(गहाण मालमत्तेचे वर्णन)

क्रमांक १०

पूर्वीच्या गहाणाच्या विमोचनाबद्दल व नंतरच्या गहाणाच्या बाबतीत, पुरोबंधाचा किंवा विक्रीचा प्रारंभिक हुकूमनामा.

[वादी २रा गहाणदार

विरुद्ध

प्रतिवादी क्र. १ गहाणकार

प्रतिवादी क्र. २ १ ला गहाणदार]

(आदेश ३४, नियम २, ४ व ७)

(सरनामा)

हा दावा, आज दिनांक··माहे···१९··रोजी···समोर वादीतर्फे··· व प्रतिवादीतर्फे···यांच्या समक्ष अंतिम निकालासाठी निघाल्यावरून याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, प्रतिवादी क्र. २ला वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाणावर आज दिनांक··माहे··१९··पर्यंत मोजण्यात आल्याप्रमाणे येणे असलेली रक्कम ही, मुद्दलाबाबत रु.·····इतकी, उक्त मुद्दलावरील व्याजाबाबत रु.·····इतकी, उक्त गहाणाच्या तारणासंबंधी प्रतिवादी क्र. २ यास वाजवीरीतीने आलेला (दाव्याचा खर्च वगळून) परिव्यय, आकार व खर्च यांबाबत त्यावरील व्याजासह व प्रतिवादी क्र. २ ला देवविलेल्या या दाव्याच्या खर्चाबाबत रु.·····म्हणजेच एकूण रक्कम रु.·····इतकी अशी आहे.

(वादीस प्रतिवादी क्र. १ याजकडून, त्याच्या गहाणासंबंधाने अर त्याअन्वये देय असलेला गहाणांचा पैसा दाव्याच्या दिनांकास प्रदेय झालेला असेल तर, देय असलेल्या रकमेसंबंधीही अशाच प्रकारची अधिकथने दाखल केली पाहिजेत.)

२. यावरून आणखी असे जाहीर करण्यात येते की, प्रतिवादी क्र. २ हा त्याला देय असलेली रक्कम वादीच्या आधी मिळण्यास हक्कदार आहे *[किंवा (जर अनेक उत्तरवर्ती गहाणदार असतील तर) याबाबतचे निरनिराळे पक्षकार त्यांच्यापैकी प्रत्येकास अनुक्रमे येणे असलेल्या रकमा पुढील क्रमाने मिळण्यास हक्कदार असतील :—]

३. आणि याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की :—

(एक) (क्) वादी किंवा प्रतिवादी क्र. १ याने किंवा त्यांच्यापैकी एकाने, दिनांक···माहे··१९···, रोजी किंवा त्यापूर्वी किंवा पैसे भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील··· दिनांकापर्यंत न्यायालयाकडून वाढविण्यात आली असेल त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी प्रतिवादी क्रमांक २ यास देय असलेली रु.····· ची उक्त रक्कम न्यायालयात भरली पाहिजे; आणि

(ख्) प्रतिवादी क्र. १ याने, दिनांक··माहे···१९···रोजी किंवा त्यापूर्वी, किंवा रक्कम भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील दिनांकापर्यंत न्यायालयाकडून वाढविण्यात आली असेल त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी वादीस देय असलेली रु.····· रक्कम न्यायालयात भरली पाहिजे; आणि

(दोन) प्रतिवादी क्र. २ यांस, देय असल्याचे जाहीर करण्यात आलेली रक्कम, खंड (एक) (क्) यात विहित केलेल्या रीतीने वादीकडून व प्रतिवादी क्र. १ यांजकडून किंवा यांपैकी कोणाहीकडून भरण्यात आल्यानंतर व न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी, दाव्याचा खर्च व 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८'—पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च यांच्या संबंधात व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यासह देणे असल्याचे न्यायालय ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर, प्रतिवादी क्र. २ याने वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले पाहिजेत व (ज्याने कोणी पैसा भरला असेल त्या) वादीच्या किंवा प्रतिवादी क्र. १ याच्या अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या, स्वाधीन केले पाहिजेत, व प्रतिवादी क्र. २ याने तसे फर्माविण्यात आल्यास, उक्त मालमत्ता उक्त गहाणविरहित व तिच्यावर प्रतिवादी क्र. २ याने किंवा त्याच्या वतीने हक्कमागणी सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, किंवा जिच्यावतीने तो हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने जे भार उत्पन्न केले असतील त्या सर्व भारांतून मुक्त व विरहित अशी, तसेच उक्त गहाण किंवा हा दावा यापासून उत्पन्न होणाऱ्या कोणत्याही दायित्वापासून मुक्त व विरहित अशी, पुन्हा अभिहस्तांतरित किंवा पुन्हा हस्तांतरित करून दिली पाहिजे व त्याने तसे फर्माविण्यात येईल तर, उक्त मालमत्तेचा कब्जा वादी किंवा प्रतिवादी क्र. १ (ज्या कोणी पैसे भरले असतील) त्यास विनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे.

(वादीस देय असल्याचे आढळून आलेली किंवा देय ठरविण्यात आलेली रक्कम, त्याच्या गहाणाचे स्वरूप लक्षात घेऊन जरूर असतील अशा फेरबदलांनिशी प्रतिवादी क्र. १ देईल तर, अशाच प्रकारची अधिकथने दाखल केली पाहिजेत.)

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, प्रतिवादी क्रमांक २ यास देय असलेली रक्कम, वर सांगितल्याप्रमाणे भरण्यात कसूर झाल्यास, प्रतिवादी क्रमांक २ यास, उक्त दावा काढून टाकण्यात यावा, अशासाठी किंवा पुढील आशयाच्या अंतिम हुकूमनाम्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असेल :—

(एक) *[सशर्त विक्रीद्वारे गहाणाच्या बाबतीत किंवा विषम गहाणाच्या बाबतीत ज्याठिकाणी गहाणखतात ठरविलेला उपाय एकच म्हणजे पुरोबंधाबद्दलचा असतो व तो विक्रीबद्दलचा नसतो अशाबाबतीत,] वादी व प्रतिवादी क्रमांक १ यांचे, यापुढे, संयुक्तपणे व पृथकपणे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत व्यक्त केलेल्या गहाण मालमत्तेच्या विमोचनाबाबतचे सर्व अधिकार नाहीसे झाले आहेत व त्यांचे ते अधिकार पुरोबंधित झाले आहेत व त्यांनी, तसे फर्मावण्यात आल्यास प्रतिवादी क्रमांक १ यास उक्त मिळकतीचा कब्जा बिनतक्रार व विनाहरकत दिला पाहिजे ; किंवा

(दोन) *[इतर कोणत्याही गहाणाच्या बाबतीत,] उक्त गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा ; व अशा विक्रीच्या प्रयोजनार्थ, प्रतिवादी क्रमांक २ याने, न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे उक्त गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत ; आणि

(तीन) *[वरील कलम ४ (दोन) खाली विक्रीचा आदेश देण्यात आला असेल अशा बाबतीत,] अशा विक्रीपासून येणारा पैसा न्यायालयात भरला पाहिजे व उक्त हुकूमनाम्यान्वये व या दाव्यात जे आणखी कोणतेही आदेश देण्यात येतील त्याअन्वये प्रतिवादी क्रमांक २ यास देय होणारी रक्कम भरण्याच्या कामी व दाव्याचा खर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा परिव्यय, आकार व खर्च यांच्याबाबतीत, त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाच्या नंतरच्या व्याजासह प्रतिवादी क्रमांक २ याला देय असल्याचे न्यायालयाकडून ठरविण्यात येईल अशी रक्कम देण्याच्या कामी त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्यरीतीने विनियोग केला पाहिजे आणि काही शिल्लक उरल्यास वादीस परत देण्याच्या कामी तिचा विनियोग केला पाहिजे व (आणखी) काही शिल्लक उरल्यास ती प्रतिवादी क्रमांक १ यास किंवा ती मिळण्यास हक्कदार असलेल्या इतर व्यक्तींना दिली पाहिजे; आणि

(चार) आणि जर अशा विक्रीपासून मिळणारी रक्कम प्रतिवादी क्रमांक २ व वादी यास देय असलेल्या रकमा पूर्णपणे देण्यास पुरेशी नसेल तर, प्रतिवादी क्रमांक २ यास किंवा वादीस किंवा, प्रकरणपरत्वे, दोघांसही त्यांच्यापैकी प्रत्येकाला द्यावयाच्या राहिलेल्या रकमांबद्दल प्रतिवादी क्रमांक १ याविरुद्ध व्यक्तिलक्षी हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची (जेव्हा त्यांच्या त्यांच्या गहाणांच्या अटींअन्वये त्यांना असा उपाय करण्याची मोकळीक असेल व त्यांस, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये मनाई नसेल तेव्हा) मोकळीक असेल.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात आणि हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(क) जर वादी हा प्रतिवादी क्र. २ यास देणे असल्याचे ठरविण्यात आलेली रक्कम या वादाच्या खाती न्यायालयात भरील, परंतु प्रतिवादी क्र. १ हा उक्त रक्कम भरण्यात कसूर करील तर, वादीस, प्रतिवादी क्र. २ चे गहाण आपल्या फायद्यासाठी चालू ठेवण्याबद्दल न्यायालयाकडे अर्ज करण्याची व (प्रतिवादी क्र. २ याने वरील खंड ४ अन्वये ज्याप्रमाणे केले असेल त्याच रीतीने) पुढील गोष्टींसाठी अंतिम हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची मोकळीक असेल, म्हणजे—

*[(एक) प्रतिवादी क्र. १ यांचे, यापुढे यांसोबत जोडलेल्या अनुसूचीच्या परिशिष्टात वर्णन केलेल्या गहाण मालमत्तेच्या विमोचनाबाबतचे सर्व अधिकार पूर्णपणे नाहीसे होतील आणि ते पुरोबंधित होतील व तसे फर्मावण्यात आल्यास त्याने, वादीस उक्त मालमत्तेचा बिनतक्रार व विनाहरकत कब्जा दिला पाहिजे;] किंवा;

*[(दोन) उक्त गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्यात यावा व अशा विक्रीच्या प्रयोजनांसाठी वादीने न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे उक्त गहाण मालमत्तेसंबंधीचे आपल्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर केले पाहिजेत;] व

(ख) (जर प्रतिवादी क्र. २ याच्या अर्जावरून, पुरोबंधासाठी अंतिम हुकूमनामा काढण्यात येईल तर), वादीचे गहाण किंवा प्रतिवादी क्र. २ याचे गहाण किंवा हा दावा यामधून उद्भवणारे संपूर्ण दायित्व पार पाडण्यात आले आहे आणि नाहीसे झाले आहे असे समजले पाहिजे.

६. आणि यावरून आणखी असा आदेश देण्यात आणि हुकूमनामा काढण्यात येत आहे की, (वरील खंड ५ अन्वये विक्रीबद्दल आदेश देण्यात आला असेल अशा बाबतीत),—

(एक) अशा विक्रीपासून आलेला पैसा न्यायालयात भरला पाहिजे व त्यातून विक्रीचा खर्च वजा करून पहिल्याप्रथम वादीने प्रतिवादी क्र. २ चे गहाण व त्याबाबतच्या दाव्यातील खर्च यासंबंधी दिलेली रक्कम भरण्याच्या कामी व उक्त रकमेवरील नंतरच्या व्याजाच्या संबंधात देय

*नको असलेले शब्द गाळावे.

असल्याचे न्यायालय ठरवील अशी रक्कम देण्याच्या कामी, त्याचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्यरीत्या विनियोग केला पाहिजे. व नंतर काही शिल्लक उरल्यास तिचा विनियोग या हुकूमनाम्यान्वये व आणखी कोणतेही आदेश देण्यात येतील त्याअन्वये वादीस त्याच्या स्वतःच्या गहाणाच्या संबंधी देय असल्याचे ठरविण्यात आलेली रक्कम देण्याच्या कामी व दाव्याचा खर्च व 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८', पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये वादीस द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च यासंबंधी व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल अशा नंतरच्या व्याजासह, देय म्हणून न्यायालयाकडून ठरविण्यात येईल अशी कोणतीही रक्कम देण्याच्या कामी केला पाहिजे व नंतर काही शिल्लक उरल्यास, ती प्रतिवादी क्र. १ यास किंवा ती मिळण्यास हक्कदार असलेल्या इतर व्यक्तींना दिली पाहिजे; आणि,

(दोन) जर अशा विक्रीपासून आलेली रक्कम, प्रतिवादी क्र. २ चे गहाण किंवा वादीचे गहाण यासंबंधी देय असलेली रक्कम पूर्णपणे भरण्यास पुरेशी नसेल, तर प्रतिवादी क्र. २ यास उरलेल्या पैशाच्या रकमेबद्दल प्रतिवादी क्र. १ याच्याविरुद्ध व्यक्तिलक्षी हुकूमनाम्यासाठी अर्ज करण्याची (जेव्हा, त्याच्या गहाणाच्या अटींअन्वये असा उपाय करण्याची त्यास मोकळीक असेल व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये त्यास मनाई नसेल तेव्हा) मोकळीक असेल.

७. आणि यावरून आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पक्षकारांस प्रसंगानुसार वेळोवेळी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मुभा असेल व असा अर्ज आल्यावरून किंवा अन्यथा न्यायालयास त्याला योग्य वाटेल असा निदेश देता येईल.

अनुसूची

गहाण मालमत्तेचे वर्णन

क्रमांक ११

विक्रीसाठी प्रारंभिक हुकूमनामा

[वादी — पोट गहाणदार किंवा दुसऱ्याच्या अधिकारावरून अधिकार प्राप्त झालेला गहाणदार.

विरुद्ध

प्रतिवादी क्रमांक १ — गहाणकार

प्रतिवादी क्रमांक २ — मूळ गहाणदार]

(आदेश ३४, नियम ४.)

(सरनामा)

हा दावा, आज दिनांक ..... माहे ..... १९ ..... रोजी ..... इत्यादी; निकालात निघाला आहे; म्हणून याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, प्रतिवादी क्र. २ यास त्याच्या गहाणावर आज दिनांक ..... माहे ..... १९ ..... पर्यंत मोजण्यात आल्याप्रमाणे येणे असलेली रक्कम ही, मुद्दलाबाबत रु. ..... इतकी, उक्त मुद्दलावरील व्याजाबाबत रु. ..... इतकी उक्त गहाणाच्या तारणाच्या संबंधातील (दाव्याच्या खर्चाशिवाय इतर) परिव्यय, आकार व खर्च याबाबत त्यावरील व्याजासह रु. ..... इतकी व प्रतिवादी क्र. २ यास देवविलेल्या या दाव्याच्या खर्चाबाबत रु. .....म्हणजे एकूण रक्कम रु. ..... इतकी आहे.

(प्रतिवादी क्र. २ यांजकडून वादी यास त्याच्या गहाणासंबंधाने येणे असलेल्या रकमेच्या संबंधात तशाच प्रकारची अधिकथने दाखल केली पाहिजेत.)

२. आणि याद्वारे असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की,—

(एक) प्रतिवादी क्र. १ याने उक्त दिनांक ..... माहे ..... १९ ... रोजी किंवा यापूर्वी किंवा पैसे भरण्याची मुदत ज्या कोणत्याही पुढील दिनांकापर्यंत न्यायालयाकडून वाढविण्यात येईल त्या दिनांकाला किंवा त्या दिनांकापूर्वी, प्रतिवादी क्र. २ यास देय असलेली रु. .....ची उक्त रक्कम न्यायालयात भरली पाहिजे.

(वादीस देय असलेल्या रकमेसंबंधी अशीच अधिकथने दाखल केली पाहीजेत. प्रतिवादी क्र. २ यास अशी रक्कम भरण्याची मोकळीक असेल.)

(दोन) प्रतिवादी क्र. २ यास देय असल्याचे जाहीर करण्यात आलेली रक्कम, खंड (२)(एक) यात विहित केलेल्या रीतीने प्रतिवादी क्र. १ यांजकडून भरण्यात आल्यानंतर व त्यानंतर न्यायालय ठरवील अशा दिनांकापूर्वी दाव्याचा खर्च व दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च यांच्या संबंधात व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल असे नंतरचे व्याज यांसह देणे असल्याचे न्यायालय ठरवील अशा रकमेचा भरणा त्यानंतर केल्यावर, वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी वादपत्रात उल्लेखिलेल्या गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या कब्जात अगर अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज न्यायालयात आणले

पाहिजेत व असे सर्व दस्तऐवज (जे फक्त पोटगहाणासंबंधीचे असतील तेवढे खेरीज करून) प्रतिवादी क्र. १ याच्या अगर तो नेमील त्या व्यक्तीच्या स्वाधीन केले पाहिजेत व प्रतिवादी क्र. २ याने, तसे फर्माविण्यात आल्यास ती मालमत्ता उक्त गहाणविरहित व तिच्यावर प्रतिवादी क्र. २ याने किंवा त्याच्यावतीने हक्कमागणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने किंवा जिच्यावतीने तो हक्कमागणी करीत असेल त्या व्यक्तीने जे भार उत्पन्न केले असतील त्या सर्व भारातून मुक्त अशी व सदरहू गहाण किंवा हा दावा यांपासून उत्पन्न होणाऱ्या कसल्याही प्रकारच्या दायित्वापासून मुक्त अशी प्रतिवादी क्र. १ यास पुन्हा अभिहस्तांतरित करून किंवा पुन्हा हस्तांतरित करून दिली पाहिजे, व त्याने, तसे फर्माविण्यात येईल तर उक्त मालमत्तेचा कब्जा बिनतकार व विनाहरकत प्रतिवादी क्र. १ यास दिला पाहिजे; आणि

(तीन) प्रतिवादी क्र. २ यास देय असलेली रक्कम प्रतिवादी क्र. १ याने न्यायालयात भरल्यानंतर वादीस, त्यास देय असल्याचे ठरविण्यात आलेली रक्कम, दाव्याच्या नंतरच्या कोणत्याही खर्चासहित व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४ याच्या नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा परिव्यय, आकार व खर्च, आणि त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाचे असेल अशा नंतरच्या व्याजासह आपणास मिळण्याबद्दल अर्ज करण्याची मुभा असेल व कोणतीही शिल्लक उरल्यास ती, नंतर प्रतिवादी क्र. २ याला देण्यात आली पाहिजे, व जर न्यायालयात भरलेली रक्कम, वादीस देय असलेली रक्कम पूर्णपणे देण्यास पुरेशी नसेल तर, वादीस उर्वरित रकमेसाठी प्रतिवादी क्र. २ विरुद्ध व्यक्तिलक्षी हुकूमनामा मिळविण्यासाठी अर्ज करण्याची (जर अशी उपाययोजना करण्यास, गहाणाच्या अटींद्वारे त्यास मुभा असेल व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे त्यास मनाई नसेल तर), मोकळीक राहील.

३. आणि आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, जर प्रतिवादी क्र. २ हा वादीस देय असल्याचे ठरविण्यात आलेली रक्कम या दाव्याच्या जमाखाती न्यायालयात भरील तर वादीने सर्व दस्तऐवज, वगैरे [खंड २ च्या उपखंड (दोन) मध्ये सांगितल्याप्रमाणे] न्यायालयात आणले पाहिजेत.

४. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांजकडून पूर्वोक्ताप्रमाणे रक्कम भरण्यात कसूर झाल्यास, वादीस, विक्रीबद्दलच्या अंतिम हुकूमनाम्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि असा अर्ज करण्यात आल्यानंतर उक्त गहाण मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भाग विकण्याबद्दल फर्माविण्यात आले पाहिजे आणि अशा विक्रीच्या प्रयोजनासाठी वादी व प्रतिवादी क्र. २ यांनी न्यायालयापुढे किंवा न्यायालय नेमील अशा अधिकाऱ्यापुढे गहाण मालमत्तेसंबंधी आपल्या ताब्यात अगर अखत्यारात असलेले दस्तऐवज हजर केले पाहिजेत.

५. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, अशा विक्रीपासून आलेला पैसा न्यायालयात भरला पाहिजे व प्रथम, वरील खंड १ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वादीस देय असलेली रक्कम आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, पहिली अनुसूची, आदेश ३४, नियम १० अन्वये द्यावयाचा असेल असा दाव्याचा खर्च व इतर परिव्यय, आकार व खर्च व त्यावर नियम ११ अन्वये द्यावयाच्या नंतरच्या व्याजासह देण्याच्या कामी त्या पैशाचा (विक्रीचा खर्च त्यातून वजा करून) योग्य तो विनियोग केला पाहिजे व काही शिल्लक उरल्यास प्रतिवादी क्र. २ यास देय असलेली रक्कम देण्याच्या कामी तिचा विनियोग केला पाहिजे, व नंतर कोणतीही शिल्लक उरल्यास ती प्रतिवादी क्र. १ यास किंवा ती मिळण्यास हक्कदार असलेल्या इतर व्यक्तींना दिली पाहिजे.

६. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, जर अशा विक्रीपासून आलेला पैसा वादीस व प्रतिवादी क्र. २ यास द्यावयाच्या रकमा पूर्णपणे देण्यास पुरेसा नसेल तर, वादीस किंवा प्रतिवादी क्र. २ यास किंवा, प्रकरणपरत्वे, दोघांनाही प्रतिवादी क्र. २ किंवा प्रतिवादी क्र. १ यांविरुद्ध उर्वरित रकमेसाठी व्यक्तिगत हुकूमनामा मिळण्यासाठी अर्ज करण्याची (जर असा उपाय करण्याची त्याच्या गहाणाच्या अटींनुसार त्यांना मुभा असेल तर, व त्याला त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याने मनाई नसेल तर), मोकळीक असेल.

७. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, जर प्रतिवादी क्र. २ हा वादीस देय असल्याचे ठरविण्यात आलेली रक्कम या दाव्याच्या जमाखाती न्यायालयात भरील, परंतु प्रतिवादी क्र. १ हा प्रतिवादी क्र. २ यास देय असलेली रक्कम भरण्यात कसूर करील तर, प्रतिवादी क्र. २ यास गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करण्याबद्दल किंवा, प्रकरणपरत्वे, विक्रीबद्दल अंतिम हुकूमनाम्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असेल (प्रतिवादी क्र. २ यांच्या गहाणाच्या प्रकारास अनुसरून नेहमीच्या नमुन्यात असलेली अधिकथने व त्याअन्वये त्यास खुले असलेले उपाय दाखल करावयाचे).

८. आणि याद्वारे आणखी असा आदेश देण्यात व हुकूमनामा काढण्यात येत आहे की, पक्षकारांस त्यास प्रसंगानुसार न्यायालयाकडे अर्ज करण्याची मोकळीक असेल व अर्जावरून किंवा अन्यथा न्यायालय स्वतःस योग्य वाटतील ते निदेश देऊ शकेल.

अनुसूची

(गहाण मालमत्तेचे वर्णन)

क्रमांक १२

संलेखात दुरुस्ती करण्याबद्दल हुकूमनामा

(सरनामा)

याद्वारे जाहीर करण्यात येते की, तारीख ..... माहे ..... १९ ... चा, ... अशा ..... मधील पक्षकारांचा खरा उद्देश दर्शवीत नाही.

आणि असा हुकूमनामा करण्यात येतो की, उक्त ..... याने उक्त ..... दुरुस्त करावा.

क्रमांक १३

धनकोंना फसवून केलेले हस्तांतरण रद्द करण्याबाबत हुकूमनामा

(सरनामा)

याद्वारे जाहीर करण्यात येते की, तारीख ... माहे ..... १९ ... चा, ... ब ..... यांच्यामध्ये झालेले ..... बादीविरुद्ध व प्रतिवादीचे अन्य कोणतेही धनको असल्यास त्या सर्वांविरुद्ध शून्य आहे.

क्रमांक १४

खाजगी उपद्रवाविरुद्ध मनाईहुकूम

(सरनामा)

प्रतिवादी ....., त्याचे अभिकर्ते, नोकर आणि कामकारी यांना, यासोबतच्या नकाशामध्ये ख या अक्षराने दाखविलेल्या, प्रतिवादीच्या जमिनीच्या तुकड्यावर, वादपत्रात नमूद केलेल्या, वादीच्या मालकीच्या व त्याच्या ताब्यात असलेल्या राहत्या घराचा व बागेचा मालक किंवा ताबाधारक या नात्याने वादीला उपद्रव होईल अशा रीतीने विटा भाजण्यापासून किंवा विटा भाजण्याची व्यवस्था करण्यापासून कायमचा निरुद्ध केला जावो.

क्रमांक १५

पूर्वीच्या पातळीपेक्षा अधिक उंच बांधकाम करण्याविरुद्ध मनाईहुकूम

(सरनामा)

प्रतिवादी ....., त्याचे कंत्राटदार, अभिकर्ते आणि कामकरी यांना, त्यांच्या ..... येथील जागेवर पूर्वी ज्या इमारती होत्या व ज्या नुकत्याच पाडण्यात आल्या आहेत त्या इमारतींपेक्षा अधिक उंचीचे कोणतेही घर किंवा इमारत, त्याच्या उक्त जागेमधील वादीच्या ज्या खिडक्यांना पूर्वीपासून प्रकाश मिळत असेल त्या खिडक्यात काळोख येईल, त्यांना इजा होईल किंवा अडथळा येईल अशाप्रकारे त्याच्या उक्त जागेमध्ये बांधण्यापासून कायमचा निरुद्ध केला जावो.

क्रमांक १६

खाजगी रस्त्याचा वापर करण्यापासून निरुद्ध करणारा मनाईहुकूम

(सरनामा)

प्रतिवादी ....., त्याचे अभिकर्ते, नोकर आणि कामकरी यांना, ... येथील ज्या गल्ली-तील जमीन वादीची आहे त्या गल्लीच्या कोणत्याही भागाचा, या सोबतच्या नकाशात ख या अक्षराने चिन्हांकित केलेल्या जमिनीकडे किंवा जमिनीकडून जाणाऱ्या-येणाऱ्या बैलगाड्या, घोडागाड्या किंवा इतर वाहने जाण्याचा किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रयोजनासाठी गाडीरस्ता म्हणून वापर करण्यापासून किंवा वापर करण्याची परवानगी देण्यापासून कायमचे निरुद्ध केले जावो.

क्रमांक १७

प्रशासन दाव्यामधील प्रारंभिक हुकूमनामा

(सरनामा)

असा आदेश देण्यात येत आहे की, खालीलप्रमाणे हिशेब घेण्यात यावेत व चौकशी करण्यात यावी; म्हणजेच,—

धनकोंच्या दाव्यामध्ये :

१. वादीस व मृत व्यक्तीच्या इतर सर्व धनकोंस काय देय आहे याचा हिशेब घेण्यात यावा.

उत्तरदानग्राहींनी केलेल्या दाव्यांमध्ये :

२. मृत्युपत्रकर्त्याच्या मृत्युपत्राद्वारे देण्यात आलेल्या उत्तरदानाचा हिशेब घेण्यात यावा.

अनन्तर आप्तसंबंधीने केलेल्या दाव्यांमध्ये :

३. मृत्यूपत्र न करता मरण पावलेल्याचा अनन्तर आप्तसंबंधी [किंवा अनंतर आप्तसंबंधींपैकी एक या नात्याने वादी कशाचा, किंवा कोणताही शेअर असल्यास, कोणत्या शेअरचा हक्कदार आहे याची चौकशी करण्यात यावी व हिशेब घेण्यात यावा.

[हुकूमनाम्यामध्ये पहिल्या परिच्छेदानंतर, आवश्यक असेल तेथे धनकोंच्या दाव्यामध्ये उत्तरदानग्राही, विधितः वारस आणि अनंतर आप्तसंबंधी यांच्यासाठी चौकशी करण्याचा व हिशेब घेण्याचा आदेश देण्यात येईल. धनकोंव्यतिरिक्त इतर हक्कमागणीदारांनी केलेल्या दाव्यांमध्ये, सर्व प्रकरणी, पहिल्या परिच्छेदानंतर धनकोंची चौकशी करण्याचा व हिशेब घेण्याचा आदेश देण्यात येईल व त्यानंतर पहिले औपचारिक शब्द वगळून आवश्यक असतील असे इतर आदेश देण्यात येतील. धनकोंच्या दाव्यांमधील नमुन्याप्रमाणे नमुना पुढे चालू ठेवला आहे.]

४. उत्तरक्रियेचा व संबंधित मृत्युपत्राचा खर्च यांचा हिशेब.

५. मृत व्यक्तीची जी जंगम मालमत्ता प्रतिवादीच्या हाती आली असेल किंवा त्याच्या आदेशाद्वारे किंवा त्याच्या उपयोगाकरिता अन्य कोणत्याही व्यक्तीच्या हाती आली असेल त्या जंगम मालमत्तेचा हिशेब.

६. मृत व्यक्तीच्या जंगम मालमत्तेचा कोणताही भाग (तसा असल्यास) अदत्त आहे व कोणत्या भागाचा विनियोग करावयाचा राहिला आहे त्याची चौकशी.

७. आणि आणखी असा आदेश देण्यात येत आहे की, पैशाच्या ज्या रकमा, प्रतिवादीच्या हाती किंवा त्याच्या आदेशावरून किंवा त्याच्या उपयोगाकरिता कोणत्याही व्यक्तीच्या हाती आल्या असल्याचे आढळून येईल त्या सर्व रकमा, प्रतिवादीने पुढील महिन्याच्या ****तारखेस किंवा त्यापूर्वी न्यायालयात भराव्या.

८. आणि वादीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मृत व्यक्तींच्या जंगम मालमत्तेचा कोणताही भाग विकणे आवश्यक आहे असे ****तो ****यास आढळून आले तर, तो भाग त्याप्रमाणे विकण्यात येईल व उत्पन्न न्यायालयात भरण्यात येईल.

९. आणि श्री. क ख यांनी दाव्यातील (किंवा कार्यवाहीमधील) प्रापकाचे काम करावे व मृत व्यक्तीची जी कज व जी जंगम मालमत्ता अदत्त असेल ती सर्व कर्जे व जंगम मालमत्ता वसूल करावी व घ्यावी आणि तिचा ******यांच्याकडे भरणा करावा (व त्याची कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडण्याबद्दल रु.******** इतक्या रकमेचे प्रतिभूति बंधपत्र द्यावे).

१०. आणि आणखी असा आदेश देण्यात येत आहे की, दाव्याची उद्दिष्टे साध्य करण्यास मृत व्यक्तीची जंगम मालमत्ता पुरेशी नसल्याचे आढळून आले तर, पुढीलप्रमाणे आणखी चौकशी करण्यात यावी व हिशेब घेण्यात यावा, म्हणजेच,—

(क) मृत व्यक्तीच्या मृत्यूच्या वेळी कोणती स्थावर मालमत्ता त्याच्या कायदेशीर कब्जात होती किंवा कोणत्या स्थावर मालमत्तेस तो हक्कदार होता ;

(ख) मृत व्यक्तीच्या स्थावर मालमत्तेस किंवा तिच्या कोणत्याही भागास बाधक होणारे कोणते बोजे आहेत (तसे असल्यास) याची चौकशी करणे ;

(ग) निरनिराळ्या बोजाधारकांना काय काय देय आहे याचा थाक्य असेल तेथवर हिशेब आणि यात यापुढे निदेश दिलेल्या विक्रीस ज्यांची संमती असेल अशा बोजाधारकांच्या पूर्वताक्रमाचे विवरण समाविष्ट करावे.

११. आणि मृत व्यक्तीची स्थावर मालमत्ता किंवा दाव्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी न्यायालयातील निधी पुरेसा करण्यासाठी भर घालण्याकरिता आवश्यक असेल तेवढा त्या मिळकतीचा भाग, ज्या बोजाधारकांची विक्रीस संमती असेल त्यांच्या बोजांपासून (तसे असल्यास) मुक्त व ज्यांची विक्रीस संमती नसेल त्यांच्या बोजांच्या अधीनतेने, न्यायाधीशाची मान्यता मिळवून विकण्यात यावा.

१२. आणि असा आदेश देण्यात येत आहे की, स्थावर मालमत्तेच्या विक्रीचे काम ग ध यांच्याकडे राहील व तो ********च्या मान्यतेच्या अधीनतेने, विक्रीच्या शर्ती व करार तयार करील आणि एखादी शंका किंवा अडचण उद्भवल्यास, कागदपत्रे निर्णयासाठी न्यायाधीशाकडे सादर करण्यात येतील.

---

*येथे योग्य त्या अधिकाऱ्याचे नाव घालावे.

१३. आणि आणखी असा आदेश देण्यात येत आहे की, यात यापूर्वी निदेश देण्यात आलेल्या चौकश्यांच्या प्रयोजनार्थ, *..... हा, न्यायालयाच्या प्रथेनुसार वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देईल किंवा अशा चौकश्यांना ज्यामुळे सर्वात अधिक उपयुक्त प्रसिद्धी मिळेल असे *..... यास वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने अशा चौकश्या करील.

१४. आणि असा आदेश देण्यात येत आहे की, तारीख ... माहे ..... १९... पूर्वी वरील चौकश्या करण्यात याव्यात व हिशेब घेण्यात यावेत आणि ज्या कृती करण्याचा आदेश देण्यात आलेला असेल त्या सर्व इतर कृती पूर्ण करण्यात याव्यात आणि *..... याने चौकशीच्या व हिशेबांच्या निष्पन्नाबद्दल आणि आदेश देण्यात आलेल्या सर्व कृती पूर्ण करण्यात आलेल्या असल्याबद्दल प्रमाणपत्र द्यावे व त्यासंबंधातील त्याचे प्रमाणपत्र तारीख ... माहे ..... १९... रोजी पक्षकारांस पाहण्यासाठी तयार ठेवावे.

१५. आणि, शेवटी, असा आदेश देण्यात येत आहे की, अंतिम हुकूमनामा करण्यासाठी हा दावा (किंवा कार्यवाही) तारीख ... माहे ..... १९... पर्यंत तहकूब करण्यात यावा.

[या हुकूमनाम्याच्या जो भाग विशिष्ट प्रकरणास लागू असेल केवळ तोच भाग वापरण्यात यावा.]

क्रमांक १८

उत्तरदानग्राहीने केलेल्या प्रशासन दाव्यामधील अंतिम हुकूमनामा

(सरनामा)

१. आदेश देण्यात येत आहे की, मृत्युपत्रकर्ता ..... यांच्या संपदेबद्दल प्रतिवादी ..... यांच्याकडून येणे असल्याचे आढळून आलेली, उक्त प्रमाणपत्रान्वयेची शिल्लक असणारी रु. ..... इतकी रक्कम व तसेच तारीख ..... माहे ..... १९... पासून तारीख ..... माहे ..... १९... पर्यंत दरसाल ... टक्के दराने व्याजाची रक्कम मिळून एकूण रु. ..... ची रक्कम तारीख ..... माहे ..... रोजी किंवा त्यापूर्वी उक्त प्रतिवादीने न्यायालयात भरावी.

२. उक्त न्यायालयाचा *..... याने या दाव्यातील वादी व प्रतिवादी यांच्या दावाखर्चाची आकारणी करावी व अशा रीतीने आकारणी झाली म्हणजे उक्त दावाखर्चाची रक्कम पूर्वोक्ताप्रमाणे न्यायालयात भरणा करण्याचा आदेश देण्यात आलेल्या रु. ..... च्या उक्त रकमेतून पुढीलप्रमाणे भरण्यात यावी :—

(क) वादीचा दावाखर्च त्याचे मुखत्यार (किंवा प्लीडर) श्री. ..... यांस व प्रतिवादीचा दावा खर्च त्याचे मुखत्यार (किंवा प्लीडर) श्री. ..... यांस देण्यात यावा;

(ख) आणि (कोणतीही कर्जे द्यावयाची असतील तर) पूर्वोक्ताप्रमाणे वादीच्या व प्रतिवादीच्या दावा खर्चाचे प्रदान केल्यानंतर ..... रुपये उक्त रकमेतून जी शिल्लक राहील तिच्यामधून ..... यांच्या प्रमाणपत्राच्या ..... अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या निरनिराळ्या धनकोंना देय असल्याचे आढळून आलेल्या रकमा, जी कर्जे व्याजी असतील त्यांवरील नंतरच्या व्याजासह देण्यात याव्यात; आणि अशी प्रदाने केल्यानंतर, ... अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या भिन्नभिन्न उत्तरदानग्राहींना मिळावयाची रक्कम (पूर्वोक्ताप्रमाणे सत्यापित करावयाच्या) नंतरच्या व्याजासह त्यांना देण्यात यावी.

३. आणि जर त्यानंतर काही शिल्लक राहिली तर, ती अवशिष्ट उत्तरदानग्राहींना देण्यात यावी.

क्रमांक १९

उत्तरदानांच्या प्रदानासाठी मृत्युपत्र व्यवस्थापकास व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येते अशा बाबतीत, उत्तरदानग्राहीने केलेल्या प्रशासन दाव्यामधील प्रारंभिक हुकूमनामा

(सरनामा)

१. असे घोषित करण्यात येते की, वादीस मृत्युपत्राने दिलेल्या रु. ..... च्या उत्तरदानाच्या प्रदानाबद्दल प्रतिवादी व्यक्तिशः जबाबदार आहे;

२. आणि असा आदेश देण्यात येत आहे की, उक्त उत्तरदानाबाबत मुद्दल व व्याज यांसाठी किती रक्कम देय आहे याचा हिशेब घेण्यात यावा;

*येथे योग्य त्या अधिकाऱ्याचे नाव घालावे.

३. आणि असाही आदेश देण्यात येत आहे की, *.....हा मुद्दल व व्याज यांबद्दल जी रक्कम देय असल्याचे प्रमाणित करील ती रक्कम प्रतिवादीने .....याच्या प्रमाणपत्राच्या तारखेनंतर .....आठवड्यांच्या आत वादीला द्यावी ;

४. आणि असा आदेश देण्यात येत आहे की, प्रतिवादीने वादीस त्याचा दावाखर्च द्यावा, (आणि) पक्षकारांत मतभेद झाल्यास, उक्त दावाखर्चाची आकारणी करण्यात यावी.

क्रमांक २०

अनन्तर आप्तसंबंधीने केलेल्या प्रशासन दाव्यामधील अंतिम हुकूमनामा

(सरनामा)

१. उक्त न्यायालयाचा *.....याने या दाव्यामधील वादी व प्रतिवादी यांच्या दावाखर्चाची आकारणी करावी व उक्त वादीच्या दावाखर्चाच्या रकमेची अशा प्रकारे आकारणी झाल्यानंतर ती रक्कम प्रतिवादीने, विनामृत्युपत्र मरण पावलेला क ख यांच्या वैयक्तिक संपदेबद्दल उक्त प्रतिवादीकडून येणे असल्याचे उक्त प्रमाणपत्रावरून आढळून आलेल्या रु.....या शिल्लक रकमेमधून, उक्त *.....याने उक्त दावाखर्चाची आकारणी केल्यानंतर एक आठवड्याच्या आत वादीस द्यावी व प्रतिवादीने तिच्या दावाखर्चाची आकारणी झाली म्हणजे आपल्या उपयोगाकरिता तो दावाखर्च अशा रकमेमधून काढून घ्यावा.

२. आणि असा आदेश देण्यात येत आहे की, पूर्वोक्ताप्रमाणे वादीच्या व प्रतिवादीच्या दावाखर्चाचे प्रदान करण्यात आल्यानंतर .....रुपयांच्या उक्त रकमेतून राहिलेली रक्कम प्रतिवादीने द्यावी व ती पुढीलप्रमाणे उपयोगात आणावी :—

(क) पूर्वोक्ताप्रमाणे *.....याने उक्त दावाखर्चाची आकारणी केल्यानंतर एक आठवड्याच्या आत, प्रतिवादीने उक्त उर्वरित रकमेचा एक तृतीयांश हिस्सा वादी ष फ यांस व विनामृत्युपत्र मरण पावलेला उक्त क ख याची बहीण या नात्याने व अनन्तर आप्तसंबंधीपैकी एक या नात्याने असलेल्या तिच्या अधिकारानुसार त्याची पत्नी ग घ हिला द्यावा ;

(ख) प्रतिवादीने विनामृत्युपत्र मरण पावलेला उक्त क ख याची आई व अनन्तर आप्तसंबंधीपैकी एक या नात्याने उक्त उर्वरित रकमेचा आणखी एक एक-तृतीयांश हिस्सा तिच्या स्वतःच्या वापरासाठी ठेवून घ्यावा;

(ग) आणि प्रतिवादीने, पूर्वोक्ताप्रमाणे *.....याने दावाखर्चाची आकारणी केल्यानंतर एका आठवड्याच्या आत उक्त उर्वरित रकमेचा उरलेला एक-तृतीयांश हिस्सा विनामृत्युपत्र मरण पावलेला उक्त क ख याचा भाऊ व अन्य अनन्तर आप्तसंबंधी म्हणून ग घ याला द्यावा.

क्रमांक २१

भागीदारीचे विसर्जन व भागीदारीचे हिशेब घेणे यांविषयीच्या दाव्यातील प्रारंभिक हुकूमनामा

(सरनामा)

असे घोषित करण्यात येते की, भागीदारी, मधील संबंधित व्यक्तींचे प्रमाणशीर हिस्से पुढीलप्रमाणे आहेत :—

असे घोषित करण्यात येते की, ही भागीदारी, तारीख .....माहे .....१९...पासून विसर्जित होईल [किंवा विसर्जित झालेली असल्याचे मानण्यात येईल.] आणि असा आदेश देण्यात येत आहे की, त्या दिवसापासून भागीदारी विसर्जित झाल्याबद्दल .....राजपत्र, इत्यादींमध्ये जाहिरात देण्यात यावी.

आणि असा आदेश देण्यात येत आहे की, ...यांनी या दाव्यामधील भागीदारी संपदेचा व जायदादीचा प्रापक व्हावे आणि भागीदारीची सर्व अदत्त पुस्तकी ऋणे व हक्कमागणीच्या रकमा वसूल कराव्या.

आणि पुढील हिशेब घेण्यात यावेत असा आदेश देण्यात येत आहे :—

१. आता उक्त भागीदारीचा जो पैसा येणे असेल, मालमत्ता असेल व जायदाद असेल त्यांचा हिशेब ;

२. उक्त भागीदारीची कर्जे व दायित्वे यांचा हिशेब;

३. या दाव्यामध्ये प्रदर्शित केलेल्या, चुकत्या केलेल्या व (क) अशी निशाणी लावलेल्या हिशेबांच्या शेवटापासून व नंतरच्या कोणत्याही चुकत्या केलेल्या हिशेबांना धक्का न लावता, वादी व प्रतिवादी यांच्यामधील सर्व देवघेवी व व्यवहार यांचा हिशेब.

---

* येथे योग्य त्या अधिकाऱ्याचे नाव घालावे.

आणि असा आदेश देण्यात येत आहे की, वादपत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांनी चालवलेल्या धंद्याचे ख्यातिस्व आणि धंदेमाल यांची त्या धंद्याच्या जागीच विक्री करण्यात यावी आणि पक्षकारांपैकी कोणीही अर्ज केल्यावरून * हा अशा विक्रीच्या वेळी सर्व किंवा कोणत्याही भागांसाठी राखीव बोली निश्चित करू शकेल आणि पक्षकारांपैकी कोणालाही विक्रीच्या वेळी बोली बोलण्याची मोकळीक राहील.

आणि असा आदेश देण्यात येत आहे की, तारीख ..... माहे ..... १९ ..... पूर्वी वरील हिशेब घेण्यात यावेत व ज्या इतर कृती करणे आवश्यक आहे त्या सर्व कृती पूर्ण करण्यात याव्यात व हिशेबांच्या निष्पन्नाबद्दल आणि इतर सर्व कृती पूर्ण करण्यात आल्याबद्दल * याने प्रमाणपत्र द्यावे व त्यासंबंधातील त्याचे प्रमाणपत्र तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी पक्षकारांना पाहण्यासाठी तयार ठेवावे.

आणि शेवटी असा आदेश देण्यात येत आहे की, हा दावा अंतिम हुकूमनामा करण्यासाठी तारीख ..... माहे ..... १९ ..... पर्यंत तहकूब ठेवण्यात येत आहे.

क्रमांक २२

भागीदारीचे विसर्जन व भागीदारीचे हिशेब घेणे, याविषयीच्या दाव्यातील अंतिम हुकूमनामा

(सरनामा)

असा आदेश देण्यात येत आहे की, आता न्यायालयामध्ये असलेला रु. ..... इतक्या रकमेचा निधी पुढील कामी लावावा:—

१. भागीदारीकडून येणे असलेल्या, * ..... च्या प्रमाणपत्रात नमूद केलेल्या एकूण रुपये ..... इतक्या रकमेच्या कर्जाचे प्रदान करण्यासाठी.

२. या दाव्यातील सर्व पक्षकारांच्या, रुपये ..... इतक्या दावाखर्चाचे प्रदान करण्यासाठी. [हुकूमनामा तयार करण्यापूर्वी हा खर्च विनिश्चित केला पाहिजे.]

३. वादीला भागीदारी—मत्तांमधील त्याचा हिस्सा म्हणून ..... रुपयांची रक्कम देण्यासाठी आणि आता न्यायालयात असलेल्या ..... रुपयांचा उक्त रकमेपैकी उर्वरित रक्कम असलेली ..... रुपयांची रक्कम प्रतिवादीला भागीदारी मत्तांमधील त्याचा हिस्सा म्हणून देण्यासाठी.

[किंवा, आणि भागीदारी हिशेबांच्या संबंधात उक्त वादीला (किंवा प्रतिवादीला) देय असल्याचे म्हणून प्रमाणित करण्यात आलेल्या ..... रुपये रकमेचे अंशत: प्रदान करण्यासाठी त्याला ..... रुपयांच्या उक्त रकमेतील शिल्लक रक्कम देण्यात यावी.]

४. आणि वादीला किंवा प्रतिवादीला देय असलेली, जी त्यानंतर येणे होईल ती, ... रुपयांच्या उक्त रकमेतील शिल्लक रक्कम प्रतिवादीने (किंवा वादीने) तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी किंवा त्यापूर्वी वादीला (किंवा प्रतिवादीला) द्यावी.

क्रमांक २३

जमीन व दरम्यानचे लाभ यांच्या वसुलीबाबतचा हुकूमनामा

(सरनामा)

याद्वारे पुढीलप्रमाणे हुकूमनामा काढण्यात येत आहे की :—

१. यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा कब्जा प्रतिवादीने वादीला द्यावा.

२. प्रतिवादीने वादीला दावा दाखल करण्यापूर्वी म्हणून प्रोद्भूत झालेला असेल अशा दरम्यानच्या लाभाबद्दल रु. ..... इतकी रक्कम तिच्यावरील दरसाल ..... टक्के या दराने वसुलीच्या दिनांकापर्यंत होणाऱ्या व्याजासह द्यावी.

किंवा

२. दावा दाखल करण्यापूर्वी देय झाले म्हणून प्रोद्भूत असेल अशा दरम्यानच्या लाभाच्या रकमेबद्दल चौकशी करण्यात यावी.

३. दावा दाखल केल्याच्या तारखेपासून [हुकूमनामाधारकाला ताबा देईपर्यंत] [हुकूमनामाधारकाला न्यायालयामार्फत नोटीस देऊन न्यायनिर्णीत ऋणकोने ताबा सोडून देईपर्यंत] [हुकूमनाम्याच्या तारखेपासून तीन वर्षांचा कालावधी समाप्त होईपर्यंत] या काळातील दरम्यानच्या लाभाच्या रकमेबद्दल चौकशी करण्यात यावी.

---

* येथे योग्य त्या अधिकाऱ्याचे नाव घालावे.

अनुसूची

परिशिष्ट ड

अंमलबजावणी

क्रमांक १

प्रदान किंवा समायोजन याची प्रमाणित केलेले अशी नोंद का करण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याविषयी नोटीस.

(आदेश २१, नियम २)

(सरनामा)

प्रति,

ज्याअर्थी, उपरिनमित दाव्यामधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीमध्ये ..... यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे की, हुकूमनाम्याखाली वसुलीयोग्य असलेली ..... रुपयांची रक्कम भरण्यात/समायोजित करण्यात आली आहे आणि तिची 'प्रमाणित केलेली' म्हणून नोंद करण्यात यावी, त्याअर्थी, पूर्वोक्त प्रदानाची/समायोजनाची 'प्रमाणित केलेले' अशी नोंद का करण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्यासाठी तुम्ही तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी या न्यायालयासमोर हजर व्हावयाचे आहे याची तुम्ही यावरून दखल घ्यावी.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक २

आज्ञापत्र (कलम ४६)

(सरनामा)

हुकूमनामाधारकाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असा आदेश देण्यात येत आहे की, सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्याच्या व हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी हुकूमनामाधारक कोणतेही अर्ज करीतोपर्यंत ती मालमत्ता धारण करण्याच्या निदेशासह ही आज्ञापत्रे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम ४६ खाली ..... येथील ..... यांच्या न्यायालयाकडे पाठविण्यात यावी.

अनुसूची,

तारीख ..... माहे ..... १९.....

न्यायाधीश.

क्रमांक ३

हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दुसऱ्या न्यायालयाकडे पाठविण्याचा आदेश.

(आदेश २१, नियम ६)

(सरनामा)

ज्याअर्थी, वरील दाव्यामधील हुकूमनामाधारकाने, ... येथील ..... च्या न्यायालयाने वरील दाव्यामधील या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करावी म्हणून उक्त न्यायालयाकडे एक प्रमाणपत्र पाठविण्यात यावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला असून त्यात असे अभिकथन केले आहे की, न्याय-निर्णीत ऋणको, उक्त न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये राहत आहे किंवा त्याची मालमत्ता उक्त न्यायालयाच्या स्थानिक सीमांमध्ये आहे आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश २१, नियम ६ खाली उक्त न्यायालयाकडे एक प्रमाणपत्र पाठवणे आवश्यक व योग्य आहे, असे वाटते त्याअर्थी असा आदेश देण्यात येत आहे की,

हुकूमनाम्याची व त्याच्या अंमलबजावणीसाठी जो कोणताही आदेश देण्यात आला असेल त्याची एक प्रत व भरपाई न झाल्याबद्दलचे प्रमाणपत्र यांसह, या आदेशाची एक प्रत ... कडे पाठविण्यात यावी.

तारीख ..... माहे ..... १९....

न्यायाधीश.

क्रमांक ४

हुकूमनाम्याची भरपाई न झाल्याबद्दलचे प्रमाणपत्र.

(आदेश २१, नियम ६)

(सरनामा)

प्रमाणित करण्यात येते की, या न्यायालयातील १९..... चा दावा क्र. ..... यामधील हुकूमनाम्याची अंमलबजावणी या न्यायालयाच्या अधिकारितेमध्ये होऊन त्याची भरपाई झालेली* नाही; हुकूमनाम्याची एक प्रत सोबत जोडली आहे.

तारीख ..... माहे ..... १९....

न्यायाधीश.

---

*जर अंशतः भरपाई झालेली असेल तर "नाही" हा शब्द खोडून टाकावा व किती मर्यादेपर्यंत भरपाई झाली ते नमूद करावे.

क्रमांक ५

दुसऱ्या न्यायालयाकडे हस्तांतरित केलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणी बद्दलचे प्रमाणपत्र

(आदेश २१, नियम ६)

(सरनामा)

दाव्याचा क्रमांक व हुकूमनामा काढणारे न्यायालय	पक्षकारांची नावे	अंमलबजावणीसाठी केलेल्या अर्जांची तारीख	बजावणीच्या प्रकरणाचा क्रमांक	काढलेल्या आदेशिका व त्यांच्या बजावणीच्या तारखा	बजावणीचा खर्च	वसूल झालेली रक्कम	प्रकरण कशा रीतीने निकालात काढले ते	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९
					रु. न. पै.	रु. न. पै.		

प्रभारी मुहर्रीरची सही.

न्यायाधीशाची सही.

क्रमांक ६

हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज

(आदेश २१, नियम ११)

..... यांच्या न्यायालयात.

मी, ... हुकूमनामाधारक यात खाली नमूद केलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी याद्वारे अर्ज करीत आहे :—

दाव्याचा क्रमांक	पक्षकारांची नावे	हुकूमनाम्याची तारीख	हुकूमनाम्यावर एखादे अपील दाखल केले आहे किंवा कसे	केलेले प्रदान किंवा समायोजन कोणतेही असल्यास	पूर्वी एखादा अर्ज केलेला असल्यास त्याची तारीख व निष्पन्न	हुकूमनाम्यावर येणे असलेली व्याजासहित रक्कम किंवा अन्य अनुतोष दिलेला असल्यास तो व कोणताही प्रतिहुकूमनामा असेल तर त्याचा तपशील	निवाडा केलेली दावा-खर्चाची रक्कम (कोणतीही असल्यास)	कोणाविरुद्ध बजावावयाचा ते	न्यायालयान कोणत्या प्रकारे सहाय्य करावयाचे ते
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)
१८९७ चा ७८९	क ख वादी गघ प्रतिवादी	११ ऑक्टोबर १८९७	नाही.	कोणतेही नाही.	दिनांक ४ मार्च, १८९९ च्या अर्जावरून रु. ७२.४.० ची नोंद केलेली आहे.	रु. ३१४.८.२ मुद्दल (हुकूमनाम्याच्या तारखेपासून प्रदानाच्या तारखेपर्यंत ६ टक्के दराने व्याज.)	हुकूमनाम्यामध्ये निवाडा दिल्याप्रमाणे रु. आ. पै. ४७.१०.४ नंतर खर्च केलेली ८.२.० एकूण ५५.१२.४	प्रतिवादी गघ यांच्याविरुद्ध	(जंगम मालमत्ता जप्त करून तिची विक्री करण्याचा प्रयत्न केलेला असेल तेव्हा). (प्रदानाच्या तारखेपर्यंत मुद्दलाच्या रकमेवरील व्याजासह) एकूण रु. ..... ची रक्कम व ही अंमलबजावणी करण्याचा खर्च, सोबत जोडलेल्या यादीमध्ये नमूद केलेली, प्रतिवादीची जंगम मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून वसूल करण्यात यावा व तो मला देण्यात यावा अशी माझी विनंती आहे. (स्थावर मालमत्ता जप्त करून तिची विक्री करण्याचा प्रयत्न केलेला असेल तेव्हा.) (प्रदानाच्या तारखेपर्यंत मुद्दलाच्या रकमेवरील व्याजासह) एकूण रु. ..... ची रक्कम व ही बजावणी करण्याचा खर्च या अर्जाच्या शेवटी विनिर्दिष्ट केलेली प्रतिवादीची स्थावर मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून वसूल करण्यात यावा व तो माल देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

मी, ... , असे घोषित करतो की, यामध्ये नमूद केलेला तपशील माझ्या संपूर्ण माहिती-प्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

सही ..... , हुकूमनामाधारक. .. तारीख .... माहे ..... १९..... .

[स्थावर मालमत्ता जप्त करून तिची विक्री करण्याचा प्रयत्न केलेला असेल तेव्हा.]

मालमत्तेचे वर्णन व विस्तृत विवरण

गावामध्ये स्थित असलेल्या, रु. ४० इतकी किंमत असलेल्या घरामधील, न्यायनिर्णीत ऋणकोचा अविभक्त एक-तृतीयांश हिस्सा; घराच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे :—

पूर्वेला छ चे घर; पश्चिमेला ज चे घर; दक्षिणेला सार्वजनिक रस्ता व उत्तरेला खाजगी गल्ली व झ चे घर.

मी, ... , असे घोषित करतो की, वरील वर्णनामध्ये नमूद केलेल्या गोष्टी माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे आणि त्यात विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेमधील प्रतिवादीच्या हितसंबंधाबद्दल मला जेथवर निश्चित माहिती करून घेता आली आहे तेथवर खऱ्या आहेत.

सही ..... , हुकूमनामाधारक.

क्रमांक ७

अंमलबजावणीचा आदेश का देण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याविषयी नोटीस

[1][आदेश २१, नियम १६]

(सरनामा)

प्रति

..... यांस,

ज्याअर्थी, ... याने १९ .. चा दावा क्रमांक ... यामधील हुकूमनामा त्याच्याकडे अभि-हस्तांकित करून [2][किंवा अभिहस्तांकित न करता] हस्तांतरित करण्यात आला आहे या सबबीवरून, उक्त हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे; म्हणून, अंमलबजावणीचा आदेश का देण्यात येऊ नये, याचे कारण दाखविण्यासाठी तुम्हाला तारीख ... माहे ..... १९ .. रोजी या न्यायालयासमोर हजर व्हावे लागेल याची तुम्ही यावरून दखल घ्यावी.

आज तारीख ... माहे ..... १९ ... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक ८

पैशासंबंधीच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी जंगम मालमत्तेची जप्ती करण्याचे अधिपत्र.

(आदेश २१, नियम ३०)

(सरनामा)

..... यांस,

बेलिफ, : ..... न्यायालय

ज्याअर्थी, १९ .. च्या दावा क्रमांक .... मध्ये दिनांक ... माहे ..... १९ .. रोजी या न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्यान्वये, श्री. ..... यांनी समासात नमूद केल्यानुसार रु. ..... रकमेचा वादीकडे भरणा करावा असा आदेश देण्यात आला होता आणि ज्याअर्थी रु. ..... च्या उक्त रकमेचा भरणा झालेला नाही,

हुकूमनामा	रुपये	पै.
मुद्दल ..		
व्याज ..		
परिव्यय ..		
अंमलबजावणी परिव्यय ..		
पुढील व्याज ..		
एकूण ..		

म्हणून, तुम्हाला याद्वारे असे फर्मावण्यात येत आहे की, तुम्ही उक्त ..... यांची, यासोबत जोडलेल्या अनुसूचीत तपशीलवार दाखवलेली किंवा उक्त .. हे तुम्हाला दाखवतील ती जंगम मालमत्ता जप्त करावी व उक्त .. यांनी तुम्हाला रु. ..... एवढी उक्त रक्कम व सोबत या जप्तीचा परिव्यय न दिल्यास, तुम्ही ती मालमत्ता या न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत ठेवून घ्यावी.

---

१. १९१४ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूची एक याद्वारे " (आदेश २१, नियम २२) " याऐवजी घातला.

२. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ९५ (एक) द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

तुम्हाला आणखी असेही फर्माविण्यात येत आहे की, तुम्ही हे अधिपत्र, त्याची बजावणी कोणत्या रीतीने व कोणत्या दिनांकास झाली अथवा का झाली नाही तो माहिती पृष्ठांकित करून दिनांक ··· माहे ····· १९ ··· रोजी किंवा तत्पूर्वी परत करावे.

आज, दिनांक ···· माहे ··१९ ····· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

अनुसूची

न्यायाधीश.

क्रमांक ९

हुकूमनाम्याद्वारे न्यायनिर्णीत केलेल्या विनिर्दिष्ट जंगम मालमत्तेच्या कायदेशीर अभिग्रहणासाठी अधिपत्र

(आदेश २१, नियम ३१)

(सरनामा)

····· यांस,

बेलिफ, ····· न्यायालय.

ज्याअर्थी, १९ ·· चा दावा क्रमांक ····· यामध्ये तारीख ··· माहे ····· १९ ·· रोजी करण्यात आलेल्या, या न्यायालयाच्या हुकूमनाम्यान्वये ····· यांना, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जंगम मालमत्ता (किंवा जंगम मालमत्तेमधील ····· हिस्सा) वादीला सुपूर्द करण्याचा आदेश देण्यात आला होता आणि ज्याअर्थी, उक्त मालमत्ता (किंवा हिस्सा) सुपूर्द करण्यात आलेला नाही;

म्हणून, तुम्हाला उक्त जंगम मालमत्तेचे (किंवा उक्त जंगम मालमत्तेच्या ····· हिश्शाचे) कायदेशीर अभिग्रहण करण्यास व ती वादीच्या किंवा तो त्याच्यावतीने नेमील अशा व्यक्तीच्या सुपूर्द करण्यास याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

आज तारीख ···· माहे ····· १९ ·· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

अनुसूची

न्यायाधीश.

क्रमांक १०

दस्तऐवजाच्या मसुद्यास हरकत घेण्याविषयी नोटीस

(आदेश २१, नियम ३४)

(सरनामा)

····· यांस,

यात याखाली विनिर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा विलेख, ज्याचा मसुदा यासोबत जोडला आहे न्यायालयाने तुमच्यावतीने करून द्यावा म्हणून वरील दाव्यातील हुकूमनामाधारक ····· याने तारीख ····· माहे ····· १९ ····· रोजी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे. आणि उक्त अर्जाच्या सुनावणीसाठी तारीख ····· माहे ····· १९ ···· ही नेमण्यात आली आहे व उक्त दिवशी हजर राहण्याची व उक्त मसुद्याबाबतची कोणतीही हरकत लेखी नमूद करण्याची तुम्हाला मोकळीक आहे याची दखल घ्यावी.

मालमत्तेचे वर्णन

आज तारीख ····· माहे ····· १९ ····· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक ११

जमीन, इत्यादींचा कब्जा देण्याविषयी

बेलीफास अधिपत्र

(आदेश २१, नियम ३५)

(सरनामा)

प्रति,

बेलीफ, ····· न्यायालय यांस,

ज्याअर्थी, ····· यांच्या वहिवाटीमध्ये असलेली, खाली नमूद केलेली मालमत्ता या दाव्यामधील वादी ····· यांस हुकूमनाम्यात देवविण्यात आली आहे; म्हणून, तिचा कब्जा

..... यांस देण्याचा निदेश याद्वारे तुम्हाला देण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला, ती (जमीन, इत्यादी) खाली करण्याचे नाकारील अशी, हुकूमनाम्याद्वारे बांधल्या गेलेल्या कोणत्याही व्यक्तीला काढून टाकण्याचा प्राधिकार देण्यात येत आहे.

आज तारीख .. माहे ..... १९.. रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

अनुसूची

न्यायाधीश.

क्रमांक १२

अटकेचे अधिपत्र का काढण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याविषयी नोटीस

(आदेश २१, नियम ३७)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, ... याने, तुम्हाला व्यक्तिशः अटक करून व कारागृहात ठेऊन, सन १९.. चा दावा क्र. .... यामधील हुकूमनाम्याची अंमलबजावणी करावी यासाठी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे; म्हणून, उक्त हुकूमनाम्याची अंमलबजावणी करून तुम्हाला दिवाणी कारागृहात का पाठवण्यात येऊ नये याचे कारण दाखवण्यासाठी तारीख .. माहे ..... १९.. रोजी या न्यायालयासमोर हजर होण्यास तुम्हाला याद्वारे फर्मावण्यात येत आहे.

आज तारीख .. माहे ..... १९.. रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक १३

अंमलबजावणी करण्यासाठी अटकेचे अधिपत्र

(आदेश २१, नियम ३८)

(सरनामा)

वेलीफ, ... न्यायालय यांस,

ज्याअर्थी, १९.. चा दावा क्रमांक ..... मधील दिनांक .... माहे ..... १९.. च्या हुकूमनाम्याद्वारे, ... याने समासामध्ये नमूद केलेली रु. ..... इतकी रक्कम हुकूमनामाधारकास द्यावी असा निर्णय देण्यात आला होता आणि ज्याअर्थी, उक्त हुकूमनाम्याची पूर्ती करून उक्त हुकूमनामाधारकास ..... रुपयांची उक्त रक्कम देण्यात आलेली नाही; म्हणून, उक्त न्यायनिर्णीत ऋणकोस अटक करण्याचा व उक्त न्यायनिर्णीत ऋणकोने ही आदेशिका बजावण्याच्या खर्चा-दाखलच्या ..... रुपयांसह ..... रुपयांची उक्त रक्कम तुम्हाला दिली नाही तर, शक्य होईल तितक्या त्वरेने, उक्त प्रतिवादीस न्यायालयासमोर हजर करण्याचा हुकूम तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे.

हुकूमनामा			
मुद्दल			
व्याज			
खर्च			
अंमलबजावणी			
एकूण ..			

तुम्हाला आणखी असा हुकूम देण्यात येत आहे की, तुम्ही हे अधिपत्र ते कोणत्या दिवशी व कोणत्या रीतीने बजावण्यात आले असेल तो दिनांक व ती रीत किंवा ते का बजावण्यात आले नाही याचे कारण प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह तारीख ·· माहे ·····१९·· रोजी किंवा त्यापूर्वी परत करावे.

आज तारीख···माहे ····· १९·· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक १४

न्यायनिर्णीत ऋणकोस कारागृहात पाठविण्याचे अधिपत्र

(आदेश २१, नियम ४०)

(सरनामा)

·····येथील तुरुंगाचे प्रभारी अधिकारी यांस,

ज्याअर्थी, तारीख·····माहे·····१९·····रोजी या न्यायालयाने जो हुकूमनामा केला व अधिघोषित केला होता, त्याच्या अंमलबजावणीतील अधिपत्राखाली व ज्या हुकूमनाम्याद्वारे·····याने·····द्यावे असा आदेश देण्यात आला होता त्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीतील अधिपत्रान्वये उक्त·····यास आज तारीख·····माहे·····१९···· रोजी उक्त न्यायालयासमोर आणण्यात आले आहे; आणि **ज्याअर्थी,** उक्त·····याने हुकूमनाम्याचे पालन केलेले नाही किंवा अभिरक्षेतून सोडून दिले जाण्यास तो हक्कदार आहे याबद्दल न्यायालयाची खात्री करून दिलेली नाही; म्हणून उक्त·····यांस·····दिवाणी कारागृहात दाखल करून घेण्याचा व तेथे त्यास·····पेक्षा अधिक तसेच··इतक्या कालावधीपर्यंत किंवा उक्त हुकूमनाम्याची संपूर्णपणे पूर्ती होईपर्यंत किंवा उक्त·····हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, कलम ५८ याच्या अटींनुसार व उपबंधांनुसार सोडून दिला जाण्यास अन्यथा हक्कदार होईपर्यंत कैद करून ठेवण्याचा हुकूम [१]***·····याद्वारे तुम्हास देण्यात येत आहे व तसे करण्यास फर्मावण्यात येत आहे; आणि न्यायालय याद्वारे, या संप्रेषण अधिपत्राखालील उक्त·····त्याच्या बंदिवासाच्या मुदतीमध्ये त्याच्या मासिक निर्वाह भत्त्याचा दर प्रत्येक दिवशी [२][***] ····· इतका निश्चित करीत आहे.

आज तारीख·····माहे·····१९·····रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक १५

हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी कारागृहात ठेवलेल्या व्यक्तीच्या सुटकेसाठी आदेश

(कलमे ५८,५९)

(सरनामा)

·····येथील तुरुंगाचे प्रभारी अधिकारी यांस,

आज रोजी देण्यात आलेल्या आदेशांखाली, तुम्हाला याद्वारे असा निदेश देण्यात येतो की, सध्या तुमच्या ताब्यात असणारा न्यायनिर्णीत ऋणको·····यास मुक्त करण्यात यावे.

तारीख·····

न्यायाधीश.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'भारताच्या सम्राटाच्या नावाने' हे शब्द गाळले.

२. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ९५ (दोन) द्वारे "आणे" हा शब्द वगळण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून)

क्रमांक १६

अंमलबजावणीतील जप्ती

जप्त करावयाची मालमत्ता ही स्थावर मालमत्ता असेल आणि दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचा तिच्यावर धारणाधिकार असून किंवा तिचा तावडतोब कब्जा मिळवण्याचा अधिकार असून त्याच्या अधीनतेने प्रतिवादी तिला हक्कदार असेल तेव्हा द्यावयाचा प्रतिषेधक आदेश.

(आदेश २१, नियम ४६)

(सरनामा)

.....यांस,

ज्याअर्थी, १९.... चा दावा क्रमांक ..... यात तारीख ..... माहे ..... १९.... रोजी ..... यांच्या बाजूने ..... यांच्या विरुद्ध देण्यात आलेल्या ..... रुपयांच्या हुकूमनाम्याची पूर्ती करण्यास ..... हे चुकले आहेत; म्हणून, या न्यायालयाकडून पुढील आदेश देण्यात येईपर्यंत, ... यांच्या कब्जातील पुढील मालमत्ता म्हणजेच, उक्त ..... च्या कोणत्याही हक्कमागणीच्या अधीनतेने, प्रतिवादी जिचा हक्कदार आहे ती ..... (मालमत्ता) उक्त ..... कडून घेण्यास याद्वारे प्रतिवादीस प्रतिषेध केला जावो व तो निरुद्ध केला जावो आणि त्यास प्रतिषेध करण्यात व निरुद्ध करण्यात येत आहे; आणि उक्त ..... यास या न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत उक्त मालमत्ता कोणत्याही व्यक्तीला किंवा कोणत्याही व्यक्तींना सुपूर्द करण्यास याद्वारे प्रतिषेध करण्यात व निरुद्ध करण्यात येत आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

[१][क्रमांक १६-क

न्यायनिर्णीत ऋणकोने करून द्यावयाचे मत्तांसंबंधीचे शपथपत्र

[आदेश २१, नियम ४१ (२)]

..... यांच्या न्यायालयात

क ख हुकूमनामाधारक;

विरुद्ध

ग न्यायनिर्णीत ऋणको.

मी, ...राहणार .....पुढीलप्रमाणे शपथपूर्वक/गांभीर्यपूर्वक दृढकथन करून नमूद करतो की,—

१. माझे संपूर्ण नाव .....आहे.

[ठळक अक्षरात]

२. मी .....येथे राहतो.

*३. मी विवाहित/अविवाहित/विधुर/विधवा/घटस्फोटित आहे.

४. माझ्यावर पुढील व्यक्ती अवलंबून आहेत :—

५. माझी नोकरी, व्यापार किंवा व्यवसाय ..... असून ती/तो ..... येथे आहे. मी पुढील कंपन्यांचा संचालक आहे :—

६. प्राप्तिकर भरल्यानंतरची माझी सध्याची वार्षिक/मासिक/साप्ताहिक प्राप्ती पुढीलप्रमाणे आहे :—

(क्) माझी नोकरी, व्यापार किंवा व्यवसाय यापासून रुपये .....

(ख्) अन्य साधनांपासून रुपये .....

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ९५ (तीन) द्वारे समाविष्ट केला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

*लागू नसलेले शब्द खोडावे.

*७. (क्) मी जेथे राहतो ते घर माझ्या मालकीचे आहे, त्याची किंमत रु. ..... आहे.

मी पट्टा, गहाण, व्याज, इत्यादीच्या रूपातील जावक रकमा म्हणून रु. ..... इतकी वार्षिक रक्कम भरतो.

(ख्) मी भाडे म्हणून रु. ..... इतकी वार्षिक रक्कम भरतो.

८. पुढील गोष्टींचा कब्जा माझ्याकडे आहे :—

(क्) बँक खाती;
(ख्) पुंजरोखे व भाग;
(ग्) आयुर्विम्याची व सावधि विमापत्रे;
(घ्) गृह-मालमत्ता;
(ङ्) अन्य मालमत्ता;
(च्) अन्य रोखे;

} तपशील द्यावा.

९. मला पुढील कर्जे येणे आहेत :—

(तपशील द्यावा)

(क्) ....., राहणार ..... यांच्याकडून रु. .....

(ख्) ....., राहणार ..... यांच्याकडून रु. ..... इत्यादी.

माझ्या समक्ष शपथ घेतली, इत्यादी ;]

क्रमांक १७

अंमलबजावणीतील जप्ती

परक्राम्य संलेखांद्वारे प्रतिभूत न केलेली अशी कर्जे मिळून मालमत्ता बनलेली असेल अशा बाबतीत द्यावयाचा प्रतिषेधक आदेश

(आदेश २१, नियम ४६)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, सन १९.... चा दावा क्रमांक .... यामध्ये तारीख .... माहे ... १९.. रोजी ..... यांच्या बाजूने ..... रुपयांबद्दल ..... यांच्याविरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्याची पूर्ती करण्यास ..... चुकला आहे ; म्हणून, असा आदेश देण्यात येत आहे की, प्रतिवादीला सध्या तुमच्याकडून येणे असल्याचे अभिकथन करण्यात आलेले विवक्षित कर्ज तुमच्याकडून स्वीकारण्यास उक्त प्रतिवादीला या न्यायालयाचा आणखी आदेश होईपर्यंत, याद्वारे प्रतिषेध होवो व निरुद्ध करण्यात येवो आणि त्यास तसा प्रतिषध करण्यात व निरुद्ध करण्यात येत आहे आणि या न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत, कोणत्याही व्यक्तीला किंवा या न्यायालयामध्ये करण्यात येईल त्याखेरीज अन्यथा उक्त कर्जाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे प्रदान करण्यास तुम्हाला याद्वारे प्रतिषेध करण्यात येत आहे व निरुद्ध करण्यात येत आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९.... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक १८

अंमलबजावणीतील जप्ती

महामंडळाच्या भांडवलातील भाग मिळून मालमत्ता बनलेली असेल अशा बाबतीत द्यावयाचा प्रतिषेधक आदेश.

(आदेश २१, नियम ४६)

(सरनामा)

प्रतिवादी ..... व ..... महामंडळाचे सचिव ..... यांस,

ज्याअर्थी, सन १९.... चा दावा क्रमांक ..... यामध्ये तारीख ..... माहे ..... १९.. रोजी ..... यांच्या बाजूने ..... रुपयांबद्दल ..... यांच्याविरुद्ध काढलेल्या हुकूमनाम्यांची पूर्ती करण्यास ..... चुकला आहे ; म्हणून, असा आदेश देण्यात येत आहे की, पूर्वोक्त महामंडळामधील ..... भागांचे कोणतेही हस्तांतरण करण्यास, किंवा त्यांवरील कोणत्याही लाभांशांचे प्रदान स्वीकारण्यास या न्यायालयाचा आणखी आदेश होईपर्यंत, याद्वारे प्रतिवादी असणाऱ्या तुम्हाला प्रतिषेध

*लागू नसलेले शब्द खोडावे.

करण्यात येत आहे ; आणि अशा कोणत्याही हस्तांतरणास किंवा असे कोणतेही प्रदान करण्यास परवानगी देण्यास उक्त महामंडळाचे सचिव असणाऱ्या तुम्ही ..... यांना याद्वारे प्रतिषेध करण्यात येत आहे व निरुद्ध करण्यात येत आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९ ... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक १९

लोक अधिकारी किंवा रेल्वे कंपनीचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा सेवक याचा पगार जप्त करण्याचा आदेश.

(आदेश २१, नियम ४८)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, वर लिहिलेल्या प्रकरणातील न्यायनिर्णीत ऋणको ..... हा एक (न्यायनिर्णीत ऋणकोच्या पदाचे वर्णन लिहावे) ..... असून त्याला तुमच्याकडे ..... इतका पगार मिळतो (किंवा भत्ते मिळतात); आणि ज्याअर्थी, उक्त प्रकरणातील हुकूमनामाधारक ..... याने हुकूमनाम्यासाठी त्याला येणे असेल त्या ..... च्या रकमेपर्यंत उक्त ..... याचा पगार (किंवा भत्ते) जप्त करण्यासाठी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे ; म्हणून, उक्त ..... यांच्या पगारातून दरमहा ..... च्या हप्त्यांनी ..... ची उक्त रक्कम कापून घेण्यास व उक्त रकमेचा (किंवा मासिक हप्त्यांचा) या न्यायालयाकडे भरणा करण्यास तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९ ... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक २०

परक्राम्य संलेखाच्या जप्तीचा आदेश.

(आदेश २१, नियम ५१)

(सरनामा)

बेलीफ, ... न्यायालय यांस,

ज्याअर्थी, या न्यायालयाने तारीख ... माहे ..... १९ ... रोजी ..... च्या जप्तीचा आदेश काढलेला आहे ; म्हणून, उक्त ..... सक्तीने ताब्यात घेऊन ते न्यायालयाकडे आणण्याचा निदेश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे.

आज तारीख ... माहे ..... १९ ... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक २१

जप्ती

न्यायालयाच्या किंवा [1][लोक अधिकाऱ्याच्या] अभिरक्षेत असलेला पैसा किंवा कोणतीही प्रतिभूती मिळून मालमत्ता बनलेली असेल अशा बाबतीत द्यावयाचा प्रतिषेधक आदेश.

(आदेश २१, नियम ५२)

(सरनामा)

..... यांस,

महोदय,

सध्या तुमच्या ताब्यात असलेल्या विवक्षित पैशाच्या (जिच्या नावे आदेश दिला त्या व्यक्तीकडे पैसा असल्याबद्दल कसा समज झाला, तो कशाबद्दल आहे, इत्यादी येथे नमूद करावे.), जप्तीसाठी दिवाणी

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "शासकीय अधिकारी" या ऐवजी दाखल केला.

प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश २१, नियम ५२ याखाली वादीने अर्ज केल्यावरून, मी तुम्हाला अशी विनंती करतो की, या न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार व्यवस्था करण्याकरिता उक्त पैसा तुम्ही तुमच्याजवळ ठेवावा.

आपला,

तारीख ··· माहे ····· १९ ···· न्यायाधीश.

क्रमांक २२

हुकूमनामा काढणाऱ्या न्यायालयाला तो हुकूमनामा जप्त केल्याची नोटीस

(आदेश २१, नियम ५३)

(सरनामा)

न्यायाधीश,

·····न्यायालय, यांस,

महोदय,

मी आपणांस कळवू इच्छितो की, १९ ·· चा दावा क्रमांक ····· ज्यामध्ये ···· हा ··· होता व ····· हा ····· होता यात ····· याने तारीख ··· माहे ····· १९ ·· रोजी आपल्या न्यायालयामध्ये मिळवलेला हुकूमनामा त्या न्यायालयाने उपरिनिर्दिष्ट दाव्यातील ..... यांच्या अर्जावरून जप्त केलेला आहे. म्हणून, सध्याची नोटीस रद्द करण्यात आली आहे अशी सूचना या न्यायालयाकडून तुम्हाला मिळेपर्यंत किंवा आता ज्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करावयाची आहे त्याचा धारक किंवा त्याचा न्यायनिर्णीत ऋणको उक्त हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी अर्ज करीपर्यंत, आपण आपल्या न्यायालयाच्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करावी अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.

आपला,

न्यायाधीश.

तारीख ··· माहे ····· १९ ···

क्रमांक २३

हुकूमनाम्याच्या धारकाला हुकूमनाम्याच्या जप्तीची नोटीस

(आदेश २१, नियम ५३)

(सरनामा)

····· यांस,

ज्याअर्थी, १९ ····· चा दावा क्रमांक ····· यांत ····· हा ····· होता व ····· हा ····· होता आणि त्या दाव्यात तारीख ····· माहे ···· १९ ····· रोजी ····· या न्यायालयातून तुम्हाला मिळालेला हुकूमनामा जप्त करण्याविषयी वरील दाव्यातील हुकूमनामाधारकाने या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे; म्हणून, असा आदेश देण्यात येतो की, या न्यायालयाकडून पुढील आदेश होईपर्यंत तो हुकूमनामा कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास किंवा त्यावर कोणताही बोजा घालण्यास तुम्ही (म्हणजेच) उक्त ····· यास याद्वारे प्रतिषेध होवो व निरुद्ध करण्यात येवो व तुम्हास तसा प्रतिषेध करण्यात व निरुद्ध करण्यात येत आहे.

आज तारीख ····· माहे ····· १९ ····· रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक २४

अंमलबजावणीतील जप्ती

मालमत्ता ही स्थावर मालमत्ता मिळून बनलेली असेल तेव्हा द्यावयाचा प्रतिषेधक आदेश

(आदेश २१, नियम ५४)

(सरनामा)

प्रतिवादी ····· यांस,

ज्याअर्थी, १९ ····· चा दावा क्रमांक ····· यामध्ये तारीख ····· माहे ····· १९ ····· रोजी ····· यांच्या बाजूने ···· रुपयांबद्दल तुमच्याविरुद्ध देण्यात आलेल्या

हुकूमनाम्याची पूर्ती करण्यास तुम्ही चुकला आहात; म्हणून, याद्वारे असा आदेश देण्यात येतो की, या न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत, या सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता तिची विक्री करून, ती भेटीदाखल देऊन किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास किंवा तिच्यावर बोजा घालण्यास तुम्हाला (म्हणजेच) उक्त ..... यांस याद्वारे प्रतिषेध करण्यात व निरुद्ध करण्यात येत आहे आणि सर्व व्यक्तींना ती मालमत्ता खरेदी करून, भेटीदाखल घेऊन किंवा अन्यथा स्वीकारण्यास याद्वारे प्रतिषेध होवो व निरुद्ध करण्यात येवो आणि त्यांना तसा प्रतिषेध करण्यात व निरुद्ध करण्यात येत आहे.

[1][असाही आदेश देण्यात येत आहे की, विक्रीच्या उद्घोषणेच्या शर्ती ठरविण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेची माहिती करून घेण्यासाठी, दिनांक ..... १९ ..... रोजी तुम्ही न्यायालयात उपस्थित राहिले पाहिजे.]

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

अनुसूची

न्यायाधीश.

क्रमांक २५

त्रयस्थ व्यक्तीच्या हाती असलेला पैसा, इत्यादी, वादी, इत्यादींना देण्याविषयीचा आदेश

(आदेश २१, नियम ५६)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, १९ ..... चा दावा क्रमांक ..... यात तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी ..... यांच्या बाजूने देण्यात आलेल्या ..... रुपयांच्या हुकमनाम्याच्या बजावणीत पुढील मालमत्ता ..... ही जप्त करण्यात आली आहे; म्हणून, याद्वारे असा आदेश देण्यात येत आहे की, तुम्ही म्हणजे उपरोक्त ..... यांनी पैशाच्या रूपातील रु..... व चलनी नोटांच्या रूपातील रु. ..... मिळून बनलेली, अशा रीतीने जप्त केलेली मालमत्ता किंवा उक्त हुकूमनाम्याची पूर्ती करण्यासाठी तिचा पुरेसा भाग ..... यास द्यावा.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक २६

जप्ती करणाऱ्या धनकोस नोटीस

(आदेश २१, नियम ५८)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, १९ ..... चा दावा क्रमांक ..... यामधील हुकूमनाम्याच्या अमलबजावणीमध्ये तुमच्या सांगण्यावरून ..... यावर आणलेली जप्ती उठविण्यासाठी ..... याने या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे, म्हणून, जप्ती करणारा धनको म्हणून तुमच्या हक्कमागणीला पुष्टी देण्यासाठी तुम्ही एकतर जातीने किंवा यथोचितरीतीने सूचना दिलेल्या वकिलामार्फत या न्यायालयामध्ये तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी उपस्थित होणे आवश्यक आहे याची तुम्ही याद्वारे दखल घ्यावी.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४, कलम ९५ (चार) द्वारे समाविष्ट करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

क्रमांक २७

पैशाबद्दलच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत मालमत्तेच्या विक्रीचे अधिपत्र

(आदेश २१, नियम ६६)

(सरनामा)

बेलीफ, ...न्यायालय, यांस,

१९.....चा दावा क्रमांक .....यांस.....च्या बाजूने झालेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत या न्यायालयाच्या तारीख .....माहे .....१९..... च्या अधिपत्राखाली जप्त करण्यात आलेली .....मालमत्तेची किंवा उक्त हुकूमनाम्याच्या .....ची व अद्याप पूर्ती व्हावयाची राहिलेल्या खर्चाची रु. .....इतकी रक्कम ज्यामुळे वसूल होईल एवढ्या उक्त मालमत्तेच्या भागाची ....., दिवसांची आगाऊ नोटीस या न्यायालयाच्या न्यायगृहामध्ये लावल्यानंतर व यथोचित उद्घोषणा केल्यानंतर लिलावाद्वारे विक्री करावी असा याद्वारे तुम्हाला हुकूम देण्यात येत आहे.

तुम्हाला आणखी असा हुकूम देण्यात येतआहे की, हे अधिपत्र ज्या रीतीने बजावण्यात आले आहे ती रीत किंवा ते का बजावण्यात आले नाही त्याचे कारण प्रमाणित करणाऱ्या पृष्ठांकनासह हे अधिपत्र तुम्ही तारीख .....माहे .....१९.....रोजी किंवा त्यापूर्वी परत करावे.

आज तारीख .....माहे .....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक २८

विक्रीची उद्घोषणा ठरविण्यासाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस

(आदेश २१, नियम ६६)

(सरनामा)

न्यायनिर्णीत ऋणको .....यांस,

ज्याअर्थी, उपरिनामित दाव्यामध्ये हुकूमनामाधारक .....याने .....ची विक्री करण्याविषयी अर्ज केला आहे ;

म्हणून, तुम्हाला याद्वारे असे कळविण्यात येते की, विक्रीच्या उद्घोषणेच्या अटी ठरविण्यासाठी तारीख .....माहे .....१९.....हा दिवस निश्चित करण्यात आलेला आहे.

आज तारीख .....माहे .....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश

क्रमांक २९

विक्रीचा जाहीरनामा

(आदेश २१, नियम ६६)

(सरनामा)

याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, समासात नमूद केलेल्या दाव्यामधील (१) हुकूमनामा-धारकाची हक्कमागणी पूर्ण करण्याकरिता या न्यायालयाने, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश २१, नियम ६४ अन्वये, सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेल्या जप्त मालमत्तेची विक्री करण्याचा आदेश दिला असून दाव्याचा खर्च व विक्रीच्या दिनांकापर्यंतचे व्याज यांसह ती हक्कमागणी .....इतक्या रुपयांची आहे.

(१) सन १९.....चा दावा क्रमांक .....या दाव्यात .....हा वादी असून .....हा प्रतिवादी होता, या दाव्याचा न्यायनिर्णय .....येथील .....न्यायाधीशांनी दिला आहे.

ही विक्री जाहीर लिलावाद्वारे करण्यात येईल, आणि ती मालमत्ता अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे लॉटवार विक्रीसाठी मांडण्यात येईल. उपरोक्त दाव्यातील न्यायनिर्णीत ऋणकांची जी मालमत्ता खालील अनुसूचीमध्ये नमूद करण्यात आली आहे, त्या मालमत्तेची विक्री केली जाईल; आणि उक्त मालमत्तेशी संलग्न असलेली दायित्वे व तत्संबंधीच्या हक्कमागण्या ज्या मर्यादेपर्यंत निश्चित करण्यात आल्या आहेत त्या मर्यादेपर्यंत त्या गोष्टी अनुसूचीत प्रत्येक लॉटसमोर विनिर्दिष्ट केल्या आहेत.

ही विक्री पुढे ढकलण्यासंबंधी कोणताही आदेश झाला नसल्यास, ती विक्री ..... येथे ..... रोजी ..... वाजता सुरू होणाऱ्या मासिक विक्रीच्या वेळी ..... यांच्यामार्फत केली जाईल. तथापि, कोणत्याही लॉटबाबतची बोली मंजूर होण्यापूर्वी जर उपरोक्त ऋणांची आणि विक्रीच्या खर्चाची रक्कम देऊ करण्यात किंवा भरण्यात आली तर ती विक्री बंद करण्यात येईल.

विक्रीच्या वेळी आम जनतेपैकी कोणालाही, व्यक्तिशः किंवा रीतसर अधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत, बोली बोलण्याची मुभा राहील. तथापि, उपरोक्त दाव्यातील न्यायनिर्णीत धनकांनी किंवा त्यांच्या वतीने बोललेली बोली स्वीकारली जाणार नाही, तसेच, न्यायालयाने अगोदरच स्पष्टपणे परवानगी दिलेली असल्याखेरीज, त्या धनकांना केलेली कोणतीही विक्री विधिग्राह्य ठरणार नाही. विक्रीच्या आणखी काही शर्ती पुढीलप्रमाणे आहेत. :—

विक्रीच्या शर्ती

१. खालील अनुसूचीत नमूद केलेला तपशील हा न्यायालयाला असलेल्या यच्चयावत माहितीनुसार नमूद केलेला आहे. परंतु, या जाहीरनाम्यात काही चूक असल्यास, चुकीचे विधान असल्यास किंवा एखादी गोष्ट गाळली गेली असल्यास, त्याबाबत न्यायालय जबाबदार राहणार नाही.

२. दरवेळी बोली किती रकमेने वाढवावयाची हे विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी ठरवील. बोलीच्या रकमेबाबत किंवा बोलीदाराबाबत कोणताही वाद निर्माण झाला तर तो लॉट ताबडतोब पुन्हा लिलावासाठी मांडला जाईल.

३. सर्वाधिक बोली बोलणाऱ्या बोलीदारास त्या लॉटचा खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल; मात्र तो बोलीदार बोली बोलण्यास कायदेशीरपणे पात्र असला पाहिजे, आणि तसेच सर्वाधिक बोलीमध्ये देऊ केलेली किंमत अत्यंत अपुरी असल्याचे स्पष्ट दिसून आल्याने ती बोली नाकारणे इष्ट ठरेल असे न्यायालयास किंवा विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्यास वाटल्यास, न्यायालय किंवा असा अधिकारी स्वविवेकानुसार ती बोली स्वीकारण्यास नकार देऊ शकेल.

४. विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी स्वविवेकानुसार आणि कारण नमूद करून, विक्री तहकूब करू शकेल. परंतु तो अधिकार, नेहमी आदेश २१, नियम ६९ च्या उपबंधांच्या अधीन राहील.

५. जंगम मालमत्तेच्या बाबतीत, प्रत्येक लॉटची किंमत विक्रीच्या वेळी देण्यात येईल किंवा विक्रीचे कामकाज पाहणारा अधिकारी सांगेल त्याप्रमाणे विक्रीनंतर लवकरच भरावी लागेल, आणि अशी किंमत भरण्यात कसूर झाल्यास ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करून विकली जाईल.

६. स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, ज्या व्यक्तीस खरेदीदार म्हणून घोषित केले जाईल, त्या व्यक्तीने तशी घोषणा झाल्यानंतर ताबडतोब, आपल्या खरेदी किंमतीच्या २५ टक्के एवढी रक्कम, विक्रीचे कामकाज पाहणाऱ्या अधिकाऱ्याकडे अनामत म्हणून भरली पाहिजे. अशा रीतीने रक्कम भरण्यास कसूर झाल्यास, ती मालमत्ता पुन्हा ताबडतोब लिलाव करून विकली जाईल.

७. मालमत्तेची विक्री झाल्यापासून विक्रीचा दिवस वगळून पंधराव्या दिवशी न्यायालयाचे कामकाज बंद होण्यापूर्वी खरेदीदार खरेदी किंमतीची संपूर्ण रक्कम भरील, किंवा पंधरावा दिवस हा रविवार अथवा सुटीचा दिवस असल्यास पंधराव्या दिवसानंतरच्या पहिल्या कामाच्या दिवशी अशी रक्कम भरण्यात येईल.

८. खरेदी किंमतीची उर्वरित रक्कम नेमून दिलेल्या मुदतीच्या आत भरण्यात कसूर झाल्यास, विक्रीची नवीन अधिसूचना काढून त्या मालमत्तेची पुन्हा विक्री करण्यात येईल. अशा प्रसंगी अनामत रकमेमधून विक्रीचा खर्च भागवल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहील ती रक्कम न्यायालयाला उचित वाटल्यास, समपहृत केली जाईल, आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचे त्या मालमत्तेसंबंधीचे किंवा ती मालमत्ता मागाहून जितक्या रकमेस विकली जाईल त्या रकमेपकी कोणत्याही भागासंबंधीच्या सर्व हक्कमागण्या नाहीशा होतील.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

मालमत्तेची अनुसूची

लॉट क्रमांक	विकावयाच्या मालमत्तेचे वर्णन व एकाहून अधिक न्यायनिर्णीत ऋणको असल्यास प्रत्येक मालकाचे नाव.	जर विकावयाची मालमत्ता ही, ज्या संपदेवर किंवा संपदेच्या ज्या भागावर शासनाकडे महसूल भरला जातो त्या संपदेतील किंवा संपदेच्या त्या भागातील हितसंबंधाच्या स्वरूपात असेल तर, त्या संपदेवर किंवा तिच्या भागावर निर्धारित केलेला महसूल.	मालमत्तेवर जे कोणतेही बोजे असतील त्यांचा तपशील.	मालमत्तेसंबंधी काही हक्क-मागण्या करण्यात आल्या असल्यास त्यांचा तपशील आणि मालमत्तेच्या स्वरूपाविषयीचा व मूल्यांविषयीचा माहीत असलेला इतर तपशील.	[१][हुकूमनामाधारकाने नमूद केल्याप्रमाणे मालमत्तेचे मूल्य.	न्यायनिर्णीत ऋणकोने नमूद केल्याप्रमाणे मालमत्तेचे मूल्य.]

क्रमांक ३०

विक्रीच्या जाहीरनाम्याची बजावणी करण्यासाठी नाझरला आदेश

(आदेश २१, नियम ६४)

(सरनामा)

नाझर, ... न्यायालय, यांस,

ज्याअर्थी, याखाली जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या न्यायनिर्णीत ऋणकोच्या मालमत्तेच्या विक्रीसाठी आदेश देण्यात आलेला आहे, आणि ज्याअर्थी, उक्त मालमत्तेच्या विक्रीसाठी तारीख ..... माहे ..... १९ ..... हा दिवस निश्चित करण्यात आला आहे, म्हणून, विक्रीच्या जाहीरनाम्याच्या प्रती या अधिपत्राद्वारे तुमच्या ताब्यात देण्यात येत असून याद्वारे तुम्हाला आदेश देण्यात येत आहे की, तुम्ही उक्त हा जाहीरनामा, उक्त अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी प्रत्येक मालमत्तेमध्ये दवंडी पिटवून प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करावी. उक्त जाहीरनाम्याची एक प्रत उक्त

---

१. सन १९७६ चा अधिनियम १०४ याचे कलम ९५ (पाच) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला. (१ फेब्रुवारी, १९७७ रोजी व तेव्हापासून).

मालमत्तेपैकी प्रत्येक मालमत्तेच्या ठळक भागी लावून नंतर एक प्रत न्यायगृहावर लावावी आणि त्यानंतर जाहीरनामा ज्या दिनांकी व ज्या रीतीने प्रसिद्ध करण्यात आला असेल, ते दिनांक व ती रीत दर्शवणारा अहवाल या न्यायालयाकडे सादर करावा.

तारीख ..... माहे ..... १९ .....

न्यायाधीश.

अनुसूची

क्रमांक ३१

खरेदीदाराच्या कसुरीमुळे मालमत्तेची पुन्हा विक्री होऊन किंमतीमध्ये तूट आल्याबद्दलचे, विक्रीचे काम चालवणाऱ्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र

(आदेश २१, नियम ७१)

(सरनामा)

प्रमाणित करण्यात येते की, खरेदीदार ..... यांच्या कसुरीमुळे उपरिनामित दाव्यातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत मालमत्तेची पुन्हा विक्री झाली. तीत उक्त मालमत्तेच्या किंमतीमध्ये रु. ..... इतकी तूट आली होती आणि अशा फेर-विक्रीसाठी रु. ..... इतका खर्च आला; दोन्ही मिळून एकूण रु. ..... इतकी रक्कम कसूरदाराकडून वसूल करावयाची आहे.

तारीख ..... माहे ..... १९ .....

विक्रीचे काम चालवणारा अधिकारी.

क्रमांक ३२

अंमलबजावणीत विकलेल्या जंगम मालमत्तेचा कब्जा जिच्याकडे असेल त्या व्यक्तीला नोटीस

(आदेश २१, नियम ७९)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, सध्या तुमच्या कब्जात असलेली ..... हिची वरील दाव्यातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत जाहीर विक्री होऊन ती ..... याने खरेदी केलेली आहे, म्हणून, उक्त ..... खेरीज अन्य व्यक्तीस उक्त ..... चा कब्जा देण्यास तुम्हाला याद्वारे मनाई करण्यात येत आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक ३३

अंमलबजावणीमध्ये विकलेल्या कर्जाचा पैसा खरेदीदाराव्यतिरिक्त अन्य कोणालाही न द्यावा म्हणून प्रतिषेधक आदेश

(आदेश २१, नियम ७९)

(सरनामा)

..... व ..... यांस,

ज्याअर्थी, तुम्ही ..... यांजकडून तुम्ही ..... यांस येणे असलेली कर्जे ..... यांची वरील दाव्यातील हुकूमनाम्याच्या बजावणीमध्ये जाहीर विक्री होऊन ती ..... यांने खरेदी केलेली आहेत; म्हणून, असा आदेश देण्यात येतो आहे की, तुम्ही ..... यास उक्त कर्जाचे पैसे स्वीकारण्यास आणि तुम्ही ..... यांस उक्त ..... व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींना उक्त कर्जाचे पैसे देण्यास याद्वारे प्रतिषेध होवो व प्रतिषेध करण्यात येत आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक ३४

अंमलबजावणीमध्ये विकलेल्या शेअर्सचे हस्तांतरण करू नये म्हणून प्रतिषेधक आदेश

(आदेश २१, नियम ७९)

(सरनामा)

..... व .....

सचिव, ... महामंडळ, यांस,

ज्याअर्थी, तुम्ही ..... याच्या नावावर असलेले वरील महामंडळाचे काही शेअर्स म्हणजेच ..... यांची वरील दाव्यातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत जाहीर विक्री होऊन ..... यांने ते खरेदी केले आहेत, म्हणून, असा आदेश देण्यात येतो की, पूर्वोक्त खरेदीदार उक्त ..... याच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीकडे उक्त शेअर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास किंवा त्यांवरील कोणताही लाभांश स्वीकारण्यास तुम्हाला आणि उक्त महामंडळाचे सचिव तुम्ही ..... यांस पूर्वोक्त खरेदीदार उक्त ..... याच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीकडे (शेअर) अशा रीतीने हस्तांतरित करण्याची परवानगी देण्यास किंवा अशी कोणतीही रक्कम देण्यास याद्वारे प्रतिषेध होवो व प्रतिषेध करण्यात येत आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक ३५

न्यायनिर्णीत ऋणकोला मालमत्ता गहाण ठेवण्याचा, पट्टयाने देण्याचा किंवा तिची विक्री करण्याचा प्राधिकार देणारे, त्याला द्यावयाचे प्रमाणपत्र

(आदेश २१, नियम ८३)

(सरनामा)

ज्याअर्थी, वरील दाव्यात काढलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी न्यायनिर्णीत ऋणको ..... याच्या खाली नमूद केलेल्या मालमत्तेच्या विक्रीचा आदेश देण्यात आला होता आणि ज्याअर्थी, उक्त न्यायनिर्णीत ऋणकोने केलेल्या अर्जावरून, उक्त मालमत्ता किंवा तिचा काही भाग गहाण ठेवून, पट्टयाने देऊन किंवा खाजगी रीतीने विकून हुकूमनाम्याची रक्कम उभी करणे त्याला शक्य व्हावे म्हणून न्यायालयाने उक्त विक्री लांबणीवर टाकली आहे.

म्हणून, याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, न्यायनिर्णीत ऋणकोस या प्रमाणपत्राच्या तारखेपासून ..... च्या मुदतीच्या आत प्रस्तावित गहाण ठेवण्यास किंवा पट्टयाने देण्यास किंवा विक्री करण्यास न्यायालय याद्वारे प्राधिकृत करीत आहे.

मालमत्तेचे वर्णन

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक ३६

विक्री का रद्द ठरवण्यात येऊ नये याचे कारण दाखवण्याविषयी नोटीस

(आदेश २१, नियम ९०, ९२)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, खाली नमूद केलेली मालमत्ता उपरिनामित दाव्यामध्ये देण्यात आलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी विकण्यात आली होती आणि ज्याअर्थी, हुकूमनामाधारक [किंवा न्यायनिर्णीत ऋणको] ..... याने विक्रीस प्रसिद्धी देण्यात किंवा तिचे कामकाज चालवण्यात महत्त्वाची नियमबाह्य गोष्ट [किंवा लबाडी] झाल्याच्या कारणावरून उक्त मालमत्तेची विक्री रद्द ठरविण्यात यावी म्हणून या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे;

म्हणून, उक्त अर्ज का मंजूर करण्यात येऊ नये याबद्दल तुम्हाला कोणतेही कारण दाखवायचे असेल तर, तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी उक्त अर्जाची सुनावणी व निकाल होणार आहे त्यावेळी तुम्ही तुमच्या पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित रहावे याची तुम्ही दखल घ्यावी.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

मालमत्तेचे वर्णन

न्यायाधीश

क्रमांक ३७

विक्री का रद्द ठरवण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याविषयी नोटीस

(आदेश २१, नियम ९०,९२)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, उपरिनामित दाव्यामध्ये दिलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी विकलेल्या, खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा खरेदीदार ..... याने, न्यायनिर्णीत ऋणको ..... याचा त्या मालमत्तेमध्ये विक्रीयोग्य असा कोणताही हितसंबंध नव्हता या कारणावरून, उक्त मालमत्तेची विक्री रद्द ठरविण्यात यावी असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे :

म्हणून, उक्त अर्ज का मंजूर करण्यात येऊ नये याबद्दल तुम्हाला कोणतेही कारण दाखवायचे असेल तर, तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी उक्त अर्जाची सुनावणी व निकाल होणार आहे त्यावेळी तुम्ही तुमच्या पुराव्यासह या न्यायालयात उपस्थित राहावे याची तुम्ही दखल घ्यावी.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

मालमत्तेचे वर्णन

न्यायाधीश.

क्रमांक ३८

जमिनीच्या विक्रीचे प्रमाणपत्र

(आदेश २१, नियम ९४)

(सरनामा)

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, या दाव्यातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी जाहीर लिलाव होऊन झालेल्या विक्रीमध्ये ..... यांस खरेदीदार म्हणून घोषित करण्यात आलेले आहे व या न्यायालयाने उक्त विक्री यथोचितरीत्या कायम केलेली आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

[१][**क्रमांक ३८**

जमिनीच्या विक्रीचे प्रमाणपत्र

(आदेश २१, नियम ९४)

(सरनामा)

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की, या दाव्यातील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी जाहीर लिलाव होऊन झालेल्या विक्रीमध्ये ..... यास ..... रुपयांच्या मोबदल्यात खरेदीदार म्हणून घोषित करण्यात आलेले आहे व या न्यायालयाने उक्त विक्री यथोचितरीत्या कायम केलेली आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९ .. रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.]

---

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्रमांक पी.०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ द्वारे समाविष्ट केला.

क्रमांक ३९

अंमलबजावणीसाठी जमिनीच्या विक्रीच्या वेळी जमिनीचा खरेदीदार म्हणून प्रमाणित केलेल्या व्यक्तीकडे ताबा देण्याबाबतचा आदेश

(आदेश २१, नियम ९५)

(सरनामा)

बेलीफ, ... न्यायालय, यांस,

ज्याअर्थी, १९.....चा दावा क्रमांक.....यामधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत झालेल्या विक्रीच्या वेळी.....हा.....चा प्रमाणित खरेदीदार झालेला आहे; म्हणून, पूर्वोक्तप्रमाणे प्रमाणित खरेदीदार उक्त.....यास त्याचा कब्जा द्यावा असा आदेश याद्वारे तुम्हाला देण्यात येत आहे.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक ४०

हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस अडथळा केल्याच्या आरोपादाखल हजर होऊन जाब देण्यासाठी समन्स

(आदेश २१, नियम ९७)

(सरनामा)

.....यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यातील हुकूमनाम्याधारक, श्री.....यांनी या न्यायालयाकडे अशी तक्रार केली आहे की, कब्जा घेण्याबद्दलच्या अधिपत्राची अंमलबजावणी करण्याची कामगिरी ज्या अधिकाऱ्याकडे सोपवली होती त्यांना तुम्ही रोखले (किंवा अडथळा केला) ;

म्हणून, सदर तक्रारीचा जाब देण्यासाठी तुम्ही तारीख....माहे.....१९....रोजी म. पू. .....वाजता या न्यायालयात हजर राहण्यासाठी याद्वारे तुम्हाला समन्स देण्यात येत आहे.

आज तारीख....माहे.....१९....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक ४१

सुपूर्दगी अधिपत्र

(आदेश २१, नियम ९८)

(सरनामा)

प्रभारी अधिकारी, ...कारागृह, यांस,

ज्याअर्थी, खाली नमूद केलेल्या मालमत्तेच्या संबंधात या दाव्यातील वादी.....याच्या बाजूने हुकूमनामा झालेला आहे, आणि ज्याअर्थी,.....याने कोणतेही योग्य कारण नसताना उक्त..... यास मालमत्तेचा कब्जा घेण्याच्या कामात रोखले [किंवा अडथळा केला] आणि अद्याप तो तशा प्रकारे रोखत आहे [किंवा अडथळा करत आहे] याबद्दल न्यायालयाची खात्री झाली आहे, आणि ज्याअर्थी, उक्त.....याने उक्त.....यास दिवाणी कारागृहात पाठवण्यात यावे असा अर्ज या न्यायालयाकडे केलेला आहे ;

म्हणून, याद्वारे तुम्हाला आज्ञा करण्यात येते व फर्मावण्यात येते की, तुम्ही उक्त.....यास दिवाणी कारागृहात दाखल करून घ्यावे व त्याला तेथे.....दिवसांच्या कालावधीपर्यंत कारावासात ठेवावे.

आज तारीख....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक ४२

जमिनीची जाहीर विक्री स्थगित करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा प्राधिकार

(कलम ७२)

(सरनामा)

जिल्हाधिकारी, ... यांस,

महोदय,

आपल्या जिल्ह्यात असलेल्या ..... जमिनीची या दाव्यातील हुकूमनाम्याच्या बजावणीत होणारी विक्री आक्षेपार्ह आहे अशा आशयाचे आपले पत्र क्रमांक ..... याच्या संबंधात मी असे कळवू इच्छितो की, उक्त हुकूमनाम्याची पूर्ती आपण शिफारस केलेल्या रीतीने होण्यासाठी व्यवस्था करण्याचा प्राधिकार आपल्याला याद्वारे देण्यात येत आहे.

आपला,

न्यायाधीश.

परिशिष्ट 'च'

पूरक कार्यवाही

क्रमांक १

न्यायनिर्णय होण्यापूर्वी अटक करण्याचे अधिपत्र

(आदेश ३८, नियम १)

(सरनामा)

बेलीफ, ... न्यायालय यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यातील वादी ..... याने समासात नोंद केल्याप्रमाणे रु..... इतक्या रकमेचा दावा सांगितला असून, त्याने प्रतिवादी ..... हा ..... च्या बेतात आहे असे मानण्यास संभवनीय कारण आहे हे न्यायालयाची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध केलेले आहे ;

म्हणून, याद्वारे तुम्हाला असा हुकूम फर्मावण्यात येतोकी, वादीच्या हक्कमागणीची पूर्ती होईल अशा रु..... इतक्या रकमेची उक्त ..... कडे मागणी करावी व ती रक्कम तुम्ही ..... यांच्याकडून घ्यावी आणि उक्त ..... यांच्याकडून किंवा त्याच्या वतीने रु..... ची उक्त रक्कम ताबडतोब तुम्हाला देण्यात आली नाही तर, उक्त दाव्याचा पूर्णपणे व अंतिमत: निकाल होईपर्यंत ब दाव्यामध्ये त्यांच्याविरुद्ध देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याची पूर्ती होईपर्यंत, न्यायालयासमोर जातीने हजर होण्यासाठी रु..... इतक्या रकमेची प्रतिभूती त्याने का देऊ नये याचे कारण दाखवण्यासाठी तुम्ही त्याला कैद करून या न्यायालयासमोर आणावे.

मुद्दल ..			
व्याज ..			
खर्च ..			
एकूण ..			

आज तारीख ..... माहे ..... १९... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक २

न्यायनिर्णय होण्यापूर्वी अटक केलेला प्रतिवादी हजर होण्यासाठी द्यावयाची प्रतिभूती.

(आदेश ३८, नियम २)

(सरनामा)

ज्याअर्थी, वरील दाव्यातील वादी ..... याच्या सांगण्यावरून प्रतिवादी ..... यास अटक करून या न्यायालयासमोर आणले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रतिवादीने, त्याने हजर होण्यासाठी प्रतिभूती का देऊ नये याबद्दलचे कारण न दिल्यामुळे न्यायालयाने त्याला अशी प्रतिभूती देण्याचा आदेश दिलेला आहे ;

म्हणून, मी, ... स्वेच्छेने जामीन राहिलो आहे व हा दावा प्रलंबित असताना आणि उक्त दाव्यामध्ये उक्त प्रतिवादीच्या विरुद्ध जो कोणताही हुकूमनामा देण्यात येईल त्याची पूर्ती होईपर्यंत ज्या कोणत्याही वेळी फर्मावण्यात येईल त्यावेळी प्रतिवादी हजर होईल याबद्दल मी मला स्वत:ला, माझ्या वारसांना व मृत्युपत्रव्यवस्थापकांना उक्त न्यायालयाशी बद्ध करून घेत आहे ; व अशा रीतीने हजर राहण्यात त्याने कसूर केली तर, उक्त दाव्यामध्ये उक्त प्रतिवादीविरुद्ध पैशाच्या ज्या कोणत्याही रकमेचा निर्णय देण्यात येईल ती रक्कम उक्त न्यायालयाच्या आदेशावरून त्या न्यायालयाकडे भरण्यास मी मला स्वत:ला, माझ्या वारसांना व मृत्युपत्रव्यवस्थापकांना बद्ध करून घेत आहे.

याच्या पुराव्यादाखल आज तारीख ..... माहे ..... १९... रोजी मी सही केली.

(सही)

साक्षीदार :

१.

२.

क्रमांक ३

जामीनदाराने प्रतिभूती रद्द करण्याविषयी अर्ज केल्यावरून प्रतिवादीस हजर होण्याविषयी समन्स

(आदेश ३८, नियम ३)

(सरनामा)

.....यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यामध्ये तुम्ही हजर राहण्यासाठी..... यांनी तारीख..... माहे.....१९.....रोजी जामीन दिला होता आणि त्यांनी त्यांच्या आबंधनातून त्यांना मुक्त केले जावे म्हणून या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे ;

म्हणून, तारीख.....माहे.....१९.....रोजी म. पू..... वाजता उक्त अर्जाची सुनावणी व निर्णय होईल त्यावेळी या न्यायालयामध्ये हजर होण्याबिषयी तुम्हाला याद्वारे समन्स देण्यात येत आहे.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक ४

सुपूर्दगी आदेश

(आदेश ३८, नियम ४)

(सरनामा)

.....यांस,

ज्याअर्थी, या दाव्यातील वादी.....याने या दाव्यामध्ये प्रतिवादी..... याने त्याच्याविरुद्ध जो कोणताही न्यायनिर्णय देण्यात येईल त्याला उत्तर देण्यासाठी हजर राहावे म्हणून प्रतिभूती घेण्यात यावी असा अर्ज न्यायालयाकडे केला आहे; आणि ज्याअर्थी, न्यायालयाने प्रतिवादीस अशी प्रतिभूती देण्यास किंवा जामिनाऐवजी पुरेशी रक्कम अनामत देण्यास फर्माविले आहे व तसे करण्यास प्रतिवादी चुकला आहे; म्हणून, असा आदेश देण्यात येत आहे की, दाव्याचा निर्णय होईपर्यंत किंवा त्याच्याविरुद्ध न्यायनिर्णय देण्यात आला तर हुकूमनाम्याची पूर्ती होईपर्यंत उक्त प्रतिवादी..... यांस दिवाणी कारागृहात पाठवण्यात यावे.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक ५

हुकूमनाम्याच्या पूर्तीबद्दल प्रतिभूती देण्याविषयी आदेश देऊन न्यायनिर्णयापूर्वी करावयाची जप्ती.

(आदेश ३८, नियम ५)

(सरनामा)

बेलीफ,.....न्यायालय, यांस,

ज्याअर्थी,.....याने वरील दाव्यातील प्रतिवादी .....आहे असे या न्यायालयाची खात्री होईल अशा रीतीने सिद्ध केले आहे ;

म्हणून, याद्वारे तुम्हाला हुकूम फर्माविण्यात येत आहे की,.....किंवा त्याची किंमत किंवा उक्त प्रतिवादी व्यक्तीविरुद्ध देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याची पूर्ती होण्यास पुरेसा होईल इतका त्या किंमतीचा भाग, फर्माविण्यात येईल तेव्हा हजर करून या न्यायालयाच्या स्वाधीन करण्यासाठी रुपये.....इतक्या रकमेची प्रतिभूती देण्याविषयी किंवा प्रतिवादीने प्रतिभूती का देऊ नये याचे कारण दाखवण्याविषयी तुम्ही उक्त प्रतिवादीस तारीख.....माहे.....१९.....रोजी किंवा त्यापूर्वी हुकूम फर्मावावा; आणि तुम्हाला आणखी असा हुकूम फर्माविण्यात येतो की, या अधिपत्राची कोणत्या दिवशी व कोणत्या रीतीने अंमलबजावणी केलेली आहे यांचे किंवा त्याची अंमलबजावणी का केलेली नाही याचे कारण प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे अधिपत्र तारीख..... माहे.....१९.....रोजी किंवा त्यापूर्वी परत करावे.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

क्रमांक ६

मालमत्ता हजर करण्याबद्दल प्रतिभूती

(आदेश ३८, नियम ५)

(सरनामा)

ज्याअर्थी, वरील दाव्यातील वादी.....याने अर्ज केल्यावरून प्रतिवादी..... यास, यासोबत जोडलेल्या परिशिष्टात विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता हजर करून न्यायालयाच्या स्वाधीन करण्याबद्दल रु.....इतक्या रकमेची प्रतिभूती देण्याचा निदेश न्यायालयाने दिला आहे;

म्हणून, मी,.....स्वेच्छेने जामीन राहिलो आहे व उक्त परिशिष्टामध्ये विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता किंवा तिची किंमत किंवा हुकूमनाम्याची पूर्ती होण्यासाठी पुरेसा होईल असा त्या मालमत्तेचा भाग उक्त प्रतिवादी त्याला तसे फर्माविण्यात येईल तेव्हा हजर करून या न्यायालयाच्या स्वाधीन करील याबद्दल मी मला स्वत:ला, माझ्या वारसांना व माझ्या मृत्युपत्रव्यवस्थापकांना उक्त न्यायालयाशी बद्ध करून घेत आहे; आणि तसे करण्यात उक्त प्रतिवादीने कसूर केली तर उक्त रु.....ची रक्कम किंवा उक्त न्यायालय न्यायनिर्णय देईल त्याप्रमाणे उक्त रकमेपेक्षा अधिक नसेल अशी रक्कम उक्त यायालयाच्या आदेशावरून त्या न्यायालयाकडे भरण्यास मी मला स्वत:ला, माझ्या वारसांना व मृत्युपत्र-यवस्थापकांना बद्ध करून घेत आहे.

अनुसूची

यांच्या पुराव्यादाखल आज तारीख.....माहे.....१९.....रोजी मी सही केली.

साक्षीदार (सही)

१.

२.

क्रमांक ७

प्रतिभूती न दिल्याचे सिद्ध झाल्यानंतर, न्यायनिर्णयापूर्वी करावयाची जप्ती.

(आदेश ३८, नियम ६)

बेलीफ,.....न्यायालय, यांस,

ज्याअर्थी, प्रतिवादी.....यांच्याविरुद्ध या दाव्यामध्ये देण्यात येईल अशा कोणत्याही हुकूमनाम्याची पूर्ती करण्यासाठी प्रतिभूती देण्याविषयी त्याला आज्ञा करण्यात यावी असा अर्ज दाव्यातील वादी.....याने न्यायालयाकडे केलेला आहे, आणि ज्याअर्थी, न्यायालयाने उक्त..... यास अशी प्रतिभूती देण्याची आज्ञा केलेली असून त्याने तसे केलेले नाही, म्हणून, याद्वारे तुम्हाला हुकूम फर्माविण्यात येतो की, उक्त.....याची.....मालमत्ता जप्त करावी व न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत ती सुरक्षितपणे व बंदोबस्ताने तुमच्या ताब्यात ठेवावी; आणि तुम्हाला आणखी असा हुकूम फर्माविण्यात येतो की, या अधिपत्राची कोणत्या दिवशी व कोणत्या रीतीने अंमलबजावणी केलेली आहे ते किंवा त्याची अंमलबजावणी का केलेली नाही याचे कारण प्रमाणित करणाऱ्या शेऱ्यासह हे अधिपत्र तारीख.....माहे.....१९.....रोजी किंवा त्यापूर्वी परत करावे.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक ८

तात्पुरता मनाईहुकूम.

(आदेश ३९, नियम १)

(सरनामा)

वादी श्री. क ख.....यांचे वकील [किंवा समुपदेशी], श्री..... यांनी या न्यायालयास केलेल्या अर्जावरून आणि उक्त वादीने या कब्जात [आज रोजी] दाखल केलेला विनंती-अर्ज [किंवा दिनांक.....माहे.....१९.....

रोजी उक्त वादीने या दाव्यात दाखल केलेले वादपत्र किंवा दिनांक ..... माहे ..... १९ ... रोजी उक्त वादीने दाखल केलेले लेखी कथन] वाचल्यानंतर आणि त्याच्या पुष्टयर्थ ..... व ..... यांची साक्ष [नोटीस दिल्यानंतर प्रतिवादी हजर झाला नसेल तर आणखी पुढील मजकूर घालावा : आणि तसेच प्रतिवादी श्री. ग घ ..... यांच्यावर या अर्जाची नोटीस बजावण्यात आल्याबद्दल श्री. ..... यांची साक्ष ऐकल्यानंतर] हे न्यायालय असा आदेश देत आहे की, या दाव्याची सुनावणी होईपर्यंत किंवा या न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत, वादीच्या उक्त दाव्यातील वादपत्रामध्ये नमूद केलेले [किंवा वादीच्या प्रतिवाद पत्रामध्ये किंवा विनंतीअर्जामध्ये व या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी पुराव्यामध्ये नमूद केलेले] घर क्रमांक ९, तेलविक्यांची गल्ली, हिंदुपूर, तालुका ..... हे घर पाडण्यास किंवा पाडण्याची परवानगी देण्यास आणि ज्या सामानाने ते घर बांधलेले आहे ते सामान विकण्यास प्रतिवादी ग घ, त्याचे नोकर, अभिकर्ते आणि कामकरी यांना बंदी करण्यासाठी मनाईहुकूम देण्यात यावा.

आज तारीख ..... माहे ..... १९ ...

न्यायाधीश.

[चिठ्ठीचे किंवा बिलाचे परक्रामण निरुद्ध करण्यासाठी मनाईहुकूम द्यावयाचा असेल त्याबाबतीत आदेशातील आदेशविषयक भाग पुढीलप्रमाणे राहील :—]

या दाव्याची सुनावणी होईपर्यंत किंवा या न्यायालयाचा पुढील आदेश होईपर्यंत, वादीच्या वादपत्रात [किंवा विनंतीअर्जात] व या अर्जाच्या वेळी ऐकून घेतलेल्या पुराव्यात नमूद केलेली तारीख ..... ची किंवा त्या सुमाराच्या तारखेची वचनचिठ्ठी [किंवा विनिमयपत्र] आपल्या किंवा आपल्यापैकी कोणाच्याही ताब्यातून जाऊ देण्यास किंवा ती पृष्ठांकित करण्यास, अभिहस्तांकित करण्यास किंवा तिचे परक्रामण करण्यास प्रतिवादी ..... व ..... यांना निरुद्ध करण्यासाठी.

[कॉपीराईट प्रकरणांमध्ये]

..... पर्यंत ..... नावाचे पुस्तक किंवा त्याचा कोणताही भाग छापण्याची, प्रकाशित करण्याची किंवा विकण्याची, प्रतिवादी ग घ, त्याचे नोकर, अभिकर्ते किंवा कामकरी यांना बंदी करण्यासाठी.

[पुस्तकाच्या केवळ काही भागाबाबत बंदी करावयाची असेल त्या बाबतीत]

..... पर्यंत, वादपत्रात [किंवा विनंतीअर्जात आणि पुराव्यात, इत्यादी] प्रतिवादीने प्रकाशित केलेले म्हणून नमूद केलेले व यात यापुढे विनिर्दिष्ट केलेले असे पुस्तकाचे भाग म्हणजेच, उक्त पुस्तकातील ..... असे शीर्षक असलेला भाग व ..... असे शीर्षक असलेला भाग देखील [किंवा पृष्ठ ..... पासून पृष्ठ ..... पर्यंत (दोन्ही पृष्ठे धरून) असलेला भाग] छापण्यास, प्रकाशित करण्यास, विकण्यास किंवा अन्य रीतीने निकालात काढण्यास प्रतिवादी ग घ, त्याचे नोकर, अभिकर्ते किंवा कामकरी यांना बंदी करण्यासाठी.

[एकस्वाच्या प्रकरणांमध्ये]

..... सुनावणी होईपर्यंत वादीच्या वादपत्रामध्ये [किंवा, प्रकरणपरत्वे, विनंतीअर्जामध्ये अथवा प्रतिवादपत्र, इत्यादीमध्ये] नमूद केलेल्या एकस्वाच्या ज्या मुदती भरावयाच्या राहिल्या असतील त्या मुदतींमध्ये वादीच्या वादपत्रामध्ये [किंवा, प्रकरणपरत्वे,] वादीच्या किंवा त्यांपैकी एकाच्या मालकीचे नवशोध म्हणून नमूद केलेल्या नवशोधांच्या मूलतत्त्वांच्या आधारे कोणत्याही वेजलेल्या विटा [किंवा, प्रकरणपरत्वे,] तयार करण्याची किंवा विकण्याची, अथवा त्याच नवशोधांद्वारे किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही नवशोधांद्वारे तयार होणाऱ्या वस्तूसारख्या बनावट वस्तू करण्याची, त्यांची नक्कल करण्याची किंवा त्यांच्याशी साधर्म्य आणण्याची प्रतिवादी ग घ, त्याचे अभिकर्ते, नोकर आणि कामकरी यांना बंदी करण्यासाठी.

[व्यापार चिन्हांच्या प्रकरणांमध्ये]

..... पर्यंत, वादीच्या वादपत्रामध्ये [किंवा विनंतीअर्ज, इत्यादीमध्ये] नमूद केलेल्या अशा चिठ्ठ्या किंवा वादी क. ख. हा जे मिश्रण किंवा काळा रंग तयार करतो व विकतो ते व जे मिश्रण किंवा काळा रंग प्रतिवादी विकतो तेही एकच आहेत असे दर्शवण्यासाठी रंगांची नक्कल करून किंवा अन्य रीतीने युक्ती केलेल्या किंवा लिहिलेल्या कोणत्याही दुसऱ्या चिठ्ठ्या बाटल्यांवर लावून तशा बाटल्यांमधून वादी क. ख. हा जो काळा रंग तयार करतो तोच हा काळा रंग अशा वर्णनाचे किंवा आशयाचे कोणतेही मिश्रण किंवा काळा रंग [किंवा, प्रकरणपरत्वे,], विकण्याची किंवा विक्रीसाठी मांडण्याची किंवा विकण्यासाठी मिळविण्याची अथवा वादी क ख जे मिश्रण किंवा काळा रंग तयार करतो व विकतो ते आणि प्रतिवादी जे मिश्रण किंवा काळा रंग तयार करतो किंवा, जे विकण्याचे त्याने योजले आहे तेही एकच आहेत असे दर्शवण्यासाठी युक्ती केलेल्या किंवा लिहिलेल्या व्यापारी पत्रिकांचा उपयोग करण्याची प्रतिवादी ग घ, त्याचे नोकर, अभिकर्ता किंवा कामकरी यांना बंदी करण्यासाठी.

[भागीदाराला धंद्यामध्ये कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करण्यास बंदी करण्यासाठी]

..... पर्यंत, भागीदारी पेढी ख आणि ग यांच्या नावाने कोणताही करार करण्याची आणि कोणतेही विनिमयपत्र, चिठ्ठी किंवा लेखी जामीन स्वीकारण्याची, लिहून देण्याची, पृष्ठांकित करण्याची

किंवा परक्रामित करण्यास, आणि ज्यायोगे पैशाच्या कोणत्याही रकमेच्या प्रदानासाठी किंवा कोणताही करार, कबुलायत किंवा अभिवचन पूर्ण करण्यासाठी उक्त भागीदारी पेढी कोणत्याही रीतीने जबाबदार होईल किंवा तिला तसे जबाबदार धरता येईल अशा रीतीने उक्त भागीदारी पेढी ख आणि ग यांच्या नावाने किंवा त्यांच्या पतीवर कोणतेही कर्ज काढण्यास, कोणताही माल खरेदी करण्यास किंवा विकण्यास, आणि कोणत्याही प्रकारचे मौखिक किंवा लेखी वचन, कबुलायत किंवा अभिवचन करण्यास, आणि कोणतेही कृत्य करण्याची किंवा करविण्याची प्रतिवादी ग घ, त्याचा अभिकर्ता आणि नोकर यांना बंदी करण्यासाठी.

क्रमांक [१][९]

प्रापकाची नेमणूक.

(आदेश ४०, नियम १)

(सरनामा)

.....यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यामध्ये तारीख.....माहे.....१९.....रोजी.....याच्या बाजूने देण्यात आलेल्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत.....जप्त करण्यात आली आहे; म्हणून, याद्वारे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ४० याखाली व त्या आदेशाच्या उपबंधांखालील सर्व शक्तींसह उक्त मालमत्तेचा प्रापक म्हणून (न्यायालयाची खात्री पटेल अशी प्रतिभूती तुम्ही देण्याच्या अधीनतेने) तुमची नेमणूक करण्यात येत आहे.

उक्त मालमत्तेच्या संबंधात तुमच्याकडे जमा झालेल्या व तुम्ही संवितरित केलेल्या रकमांचा यथोचित व योग्य हिशेब.....रोजी देण्यास तुम्हाला फर्माविण्यात येत आहे. या नेमणुकीच्या प्राधिकाराखाली तुमच्याकडे जमा झालेल्या रकमांवर.....टक्के या दराने पारिश्रमिक मिळण्यास तुम्ही हक्कदार असाल.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी भरले.

न्यायाधीश.

क्रमांक [२][१०]

प्रापकाने छाबयाचे बंधपत्र.

(आदेश ४०, नियम ३)

(सरनामा)

याद्वारे सर्व लोकांस विदित व्हावे की, आम्ही,.....व.....व.....हे,.....न्यायालयाचा.....यांस किंवा त्यावेळी पदावर असलेला त्याचा उत्तराधिकारी यास रु.....इतकी रक्कम देण्यासाठी उक्त.....याच्याशी संयुक्तपणे व पृथकपणे बद्ध आहोत. ही रक्कम देण्यासाठी याद्वारे आम्ही आम्हांस स्वतःला आणि आमच्यापैकी प्रत्येकास संपूर्णपणे व आमचे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक आणि प्रशासक यांस आणि त्यांच्यापैकी प्रत्येकास संयुक्तपणे व पृथकपणे बद्ध करून घेत आहोत.

आज तारीख.....माहे.....१९.....

ज्याअर्थी,.....याने [येथे दाव्याचा उद्देश लिहावा] यासाठी.....याच्याविरुद्ध या न्यायालयामध्ये वादपत्र दाखल केलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोल्लिखित न्यायालयाच्या आदेशाद्वारे, उक्त वादपत्रामध्ये नामनिर्दिष्ट केलेला.....याच्या स्थावर मालमत्तेचे भाडे व लाभ घेण्यासाठी आणि येणे असलेली जंगम मालमत्ता घेण्यासाठी.....याची नेमणूक करण्यात आलेली आहे;

म्हणून, आता या आबंधनाची शर्त अशी आहे की, जर उपरिबद्ध.....हा, उक्त.....याच्या स्थावर मालमत्तेचे भाडे व लाभ यांबद्दल आणि जंगम मालमत्तेच्या संबंधात, त्याला अशा प्रकारे मिळेल त्या पैशाच्या सर्व आणि प्रत्येक रकमेचा आणि रकमांचा उक्त न्यायालय नेमून देईल अशा कालांतरांनी यथोचित हिशेब देईल आणि उक्त न्यायालयाने निदेश दिल्याप्रमाणे किंवा ते यानंतर निदेश देईल त्याप्रमाणे त्याच्याकडून येणे असल्याचे वेळोवेळी प्रमाणित करील अशा शिल्लक रकमा यथोचितरीतीने देईल तर, हे आबंधन रद्दबातल होईल, अन्यथा ते पूर्णपणे प्रभावी असेल.

.....याच्या उपस्थितीत उपरिबद्धांनी सही केली व दिले.

टीप.—जर पैसे अनामत ठेवले तर, त्याबद्दलचे ज्ञापन बंधपत्राच्या अटी व शर्तींस अनुसरून लिहावे.

---

१. मूळात ६ असा चुकीचा छापलेला नमुन्याचा क्रमांक, १९१४ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे दुरुस्त करण्यात आला.

२. मूळात ७ असा चुकीचा छापलेला नमुन्याचा क्रमांक, १९१४ चा अधिनियम १०, कलम २ व अनुसूची एक यांद्वारे दुरुस्त करण्यात आला.

परिशिष्ट 'छ'

अपील, निर्देशन व पुनर्विलोकन

क्रमांक १

अपिलाचे ज्ञापन

(आदेश ४१, नियम १)

(सरनामा)

वर, नामनिर्दिष्ट केलेला .....हा, ...१९.....चा दावा क्रमांक .....यांमधील तारीख .....माहे .....१९..... च्या हुकूमनाम्यावर .....येथील .....न्यायालयाकडे अपील करत असून, ज्या हुकूमनाम्यावर अपील केले त्यावरील आक्षेपांची पुढील कारणे नमूद करीत आहे. उदा. —

क्रमांक २

हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित करण्यासाठी आदेश झाल्यावर द्यावयाचे प्रतिभूती बंधपत्र.

(आदेश ४१, नियम ५)

(सरनामा)

.....यांस,

हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित झाल्यानंतर .....याने करून दिलेल्या या प्रतिभूति बंधपत्रावरून कळावे की:—

१९.....चा दावा क्रमांक .....यातील वादी ..... याने प्रतिवादी .....यांच्यावर या न्यायालयामध्ये दावा लावला आणि तारीख ..... माहे .....१९.....रोजी वादीच्या बाजूने हुकूमनामा देण्यात आला आणि प्रतिवादीने उक्त हुकूमनाम्यावर ..... न्यायालयामध्ये अपील केलेले असून उक्त अपील अद्याप प्रलंबित आहे.

आता, हुकूमनामाधारक वादीने हुकूमनाम्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून अर्ज केला असून, प्रतिवादीने अंमलबजावणी स्थगित करण्यासाठी अर्ज केला आहे व त्याला प्रतिभूती देण्याची आज्ञा करण्यात आली आहे. त्याप्रमाणे, मी, माझ्या राजीखुशीने, यासोबत जोडलेल्या परिशिष्टात विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता गहाण ठेवून रु..... साठी जामीन राहत आहे आणि असा करार करीत आहे की, पहिल्या न्यायालयाचा हुकूमनामा अपील न्यायालयाने कायम केला किंवा त्याने त्यात बदल केला तर, उक्त प्रतिवादी, अपील न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार यथोचित कृती करील आणि त्यानुसार त्याच्याकडून जी कोणतीही रक्कम प्रदेय असेल ती देईल आणि जर, तसे करण्यास तो चुकला तर, अशा प्रकारे प्रदेय असलेली कोणतीही रक्कम याद्वारे गहाण ठेवलेल्या मालमत्तेमधून वसूल करण्यात येईल आणि उक्त मालमत्तेच्या विक्रीचे उत्पन्न देय रकमेची भरपाई होण्यास पुरेसे झाले नाही तर, शिल्लक रक्कम भरण्यास मी व माझे कायदेशीर प्रतिनिधी व्यक्तिशः जबाबदार राहू. यासाठी आज तारीख .....माहे .....१९ .....रोजी मी हे प्रतिभूति बंधपत्र करून देत आहे.

अनुसूची

साक्षीदार : (सही)

१.

२.

.....यांस,

हुकूमनाम्याची अंमलबजावणी स्थगित झाल्यानंतर ..... याने करून दिलेल्या वा प्रतिभूति बंधपत्रावरून कळावे की :—

१९.....चा दावा क्रमांक ..... यातील वादी .....याने प्रतिवादी ..... यांच्यावर या न्यायालयामध्ये दावा लावला आणि तारीख .....माहे .....१९.....रोजी वादीच्या बाजूने हुकूमनामा देण्यात आला आणि प्रतिवादीने उक्त हुकूमनाम्यावर ..... न्यायालयामध्ये अपील केलेले असून उक्त अपील अद्याप प्रलंबित आहे.

आता, हुकूमनामाधारक वादीने हुकूमनाम्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून अर्ज केला असून, प्रतिवादीने अंमलबजावणी स्थगित करण्यासाठी अर्ज केला आहे व त्याला प्रतिभूती देण्याची आज्ञा करण्यात आली आहे. त्याप्रमाणे, मी माझ्या राजीखुशीने, यासोबत जोडलेल्या परिशिष्टात विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता गहाण ठेवून रुपये ..... साठी जामीन राहत आहे आणि असा करार करीत आहे की, पहिल्या न्यायालयाचा हुकूमनामा अपील न्यायालयाने कायम केला किंवा त्याने त्यात बदल केला तर, उक्त प्रतिवादी अपील न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार यथोचित कृती करील आणि त्यानुसार त्याच्याकडून जी कोणतीही रक्कम प्रदेय असेल ती देईल आणि जर, तसे करण्यास तो चुकला तर, अशा प्रकारे प्रदेय असलेली कोणतीही रक्कम याद्वारे गहाण ठेवलेल्या मालमत्तेमधून वसूल करण्यात येईल आणि उक्त मालमत्तेच्या विक्रीचे उत्पन्न देय रकमेची भरपाई होण्यास पुरेसे झाले नाही तर, शिल्लक रक्कम भरण्यास मी व माझे कायदेशीर प्रतिनिधी व्यक्तिशः जबाबदार राहू. यासाठी आज तारीख .....माहे .....१९..... रोजी मी हे प्रतिभूति बंधपत्र करून देत आहे.

अनुसूची

साक्षीदार : (सही)

१.

२.

[टीप.—छापील नमुन्यात समुचित फेरबदल केलेले नसतील तर, त्या नमुन्यामुळे, बंधपत्रात नमूद केलेल्या प्रत्यक्ष हुकूमनाम्यावरील अपिलाचीच फक्त प्रतिभूती मिळते, त्यात नंतरच्या कोणत्याही अपिलाच्या बाबतीतील कोणत्याही आबंधनाचा अंतर्भाव होत नाही.]

(मागील पृष्ठ पाच वर पुनरुद्धृत केलेले, १९७६ चा केंद्रीय अधिनियम १०४ च्या कलम ४७ चे पोट-कलम (१) पहा.)

क्रमांक ३

अपील प्रलंबित असताना द्यावयाचे प्रतिभूति बंधपत्र

(आदेश ४१, नियम ६)

(तरतमा)

.....यांस,

हुकमनाम्याची अंमलबजावणी स्थगित झाल्यानंतर .....याने करून दिलेल्या या प्रतिभूति बंधपत्रावरून कळावे की:—

१९... .....चा दावा क्रमांक.....
यातील वादी .....याने प्रतिवादी .....यांच्यावर या न्यायालयामध्ये दावा लावला आणि तारीख.....माहे.....१९.....रोजी वादीच्या बाजूने हुकूमनामा देण्यात आला आणि प्रतिवादीने उक्त हुकूमनाम्यावर.....न्यायालयामध्ये अपील केलेले असून उक्त अपील अद्याप प्रलंबित आहे.

आता, हुकूमनामाधारक वादीने उक्त हुकूमनाम्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून अर्ज केलेला असून त्याला प्रतिभूती देण्याचा हुकूम फर्माविण्यात आली आहे. त्याप्रमाणे, मी माझ्या राजीखुशीने यासोबत जोडलेल्या परिशिष्टात विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता गहाण ठेवून रु..... साठी जामीन राहात आहे आणि असा करार करीत आहे की, पहिल्या न्यायालयाचा हुकूमनामा अपील न्यायालयाने फिरविला किंवा त्याने त्यात बदल केला तर, उक्त हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत जी कोणतीही मालमत्ता घेण्यात येईल किंवा घेण्यात आलेली असेल, ती मालमत्ता वादी परत करील आणि अपील न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार यथोचित कृती करील आणि त्यानुसार त्यांच्याकडून जी कोणतीही रक्कम प्रदेय असेल ती रक्कम देईल आणि जर, तसे करण्यास तो चुकला तर, अशा प्रकारे प्रदेय असलेली कोणतीही रक्कम याद्वारे गहाण ठेवलेल्या मालमत्तेमधून वसूल करण्यात येईल आणि उक्त मालमत्तेच्या विक्रीचे उत्पन्न, देय रकमेची भरपाई होण्यास पुरेसे झाले नाही तर, शिल्लक रक्कम भरण्यास मी व माझे कायदेशीर प्रतिनिधी व्यक्तिशः जबाबदार राहू. यासाठी आज तारीख..... माहे.....१९...
रोजी मी हे प्रतिभूति बंधपत्र करून देत आहे.

अनुसूची

साक्षीदार: (सही)

१.

२.

.....यांस,

[हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी आदेश झाल्यानंतर.....यांने करून दिलेल्या या प्रतिभूति बंधपत्रावरून कळावे की,—]

१९.....चा दावा क्रमांक.....
यातील वादी .....यांनी प्रतिवादी .....याच्यांवर या न्यायालयामध्ये दावा लावला आणि तारीख.....माहे.....१९.....रोजी वादीच्या बाजूने हुकूमनामा देण्यात आला आणि प्रतिवादीनी उक्त हुकूमनाम्यावर.....न्यायालयामध्ये अपील केलेले असून मागील अपील अद्याप प्रलंबित आहे.

आता, हुकूमनामाधारक वादीने उक्त हुकूमनाम्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून अर्ज केलेला असून त्याला तारण देण्याची आज्ञा करण्यात आली आहे, त्याप्रमाणे, मी माझ्या राजीखुशीने या सोबत जोडलेल्या परिशिष्टात विनिर्दिष्ट केलेली मालमत्ता गहाण ठेवून रु..... साठी जामीन राहात आहे, आणि असा करार करीत आहे की, पहिल्या न्यायालयाचा हुकूमनामा अपील न्यायालयाने फिरविला किंवा त्याने त्यात बदल केला. तर, उक्त हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीत जी कोणतीही मालमत्ता घेण्यात येईल किंवा घेण्यात आलेली असेल ती मालमत्ता वादी परत करील आणि अपील न्यायालयाच्या हुकूमनाम्यानुसार यथोचित कृती करील आणि त्यानुसार त्याच्याकडून जी कोणतीही रक्कम प्रदेय असेल ती रक्कम देईल, आणि जर तसे करण्यास तो चुकला तर, अशा प्रकारे प्रदेय असलेली कोणतीही रक्कम याद्वारे गहाण ठेवलेल्या, मालमत्तेमधून वसूल करण्यात येईल आणि उक्त मालमत्तेच्या विक्रीचे उत्पन्न देय रकमेची भरपाई होण्यास पुरेसे झाले नाही तर, शिल्लक रक्कम भरण्यास मी व माझे कायदेशीर प्रतिनिधी व्यक्तिशः जबाबदार राहू. यासाठी आज तारीख.....माहे.....१९.....
रोजी मी हे प्रतिभूति बंधपत्र करून देत आहे.

अनुसूची

साक्षीदार : (सही)

(१)

(२)

---

१. मबई उच्च न्यायालयाची अधिसूचना क्र. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

क्रमांक ४

अपिलाच्या खर्चासाठी प्रतिभूति

(आदेश ४१, नियम १०)

(सरनामा)

.....यांस,

अपिलाच्या खर्चाबद्दल.....याने करून दिलेल्या या प्रतिभूति बंधपत्रावरून कळावे की,

१९.....चा दावा क्रमांक.....यामधील हुकूमनाम्यावर या अपीलकर्त्याने उत्तरवादीविरुद्ध अपील केले असून त्याला प्रतिभूति देण्याची आज्ञा करण्यात आली आहे. त्याप्रमाणे, मी माझ्या राजीखुशीने, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्ता गहाण ठेवून अपिलाच्या खर्चासाठी जामीन राहात आहे. मी उक्त मालमत्ता किंवा त्यांचा कोणताही भाग हस्तांतरित करणार नाही आणि अपीलकर्त्याकडून कोणतीही कसूर घडल्यास, मी, अपिलाच्या खर्चाच्या प्रदानाबद्दल माझ्याविरुद्ध जो कोणताही आदेश देण्यात येईल त्या आदेशाचे यथोचितरीतीने पालन करीन. अशा प्रकारे प्रदेय असलेली कोणतीही रक्कम याद्वारे गहाण ठेवलेल्या मालमत्तेमधून वसूल करण्यात येईल आणि जर उक्त मालमत्तेच्या विक्रीचे उत्पन्न प्रदेय रकमांची भरपाई करण्यास पुरेसे झाले नाही तर, शिल्लक रक्कम भरण्यास मी व माझे कायदेशीर प्रतिनिधी व्यक्तिशः जबाबदार राहू. यासाठी आज तारीख..... माहे.....१९.....रोजी मी हे प्रतिभूति बंधपत्र करून देत आहे.

अनुसूची

साक्षीदार : (सही)

१.

२.

क्रमांक ५

अपील दाखल करून घेतल्याबद्दल खालच्या न्यायालयास सूचना

(आदेश ४१, नियम १३)

(सरनामा)

.....यांस,

वरील दाव्यामध्ये.....असलेला.....याने, तारीख.....माहे.....१९.....रोजी त्या दाव्यामध्ये तुम्ही दिलेल्या हुकूमनाम्यावर अपील दाखल केलेले आहे याची तुम्ही दखल घ्यावी असा निदेश याद्वारे तुम्हाला देण्यात येत आहे.

दाव्यामधील सर्व महत्त्वाचे कागदपत्र शक्य तितक्या त्वरेने पाठवावेत अशी विनंती आहे.

तारीख.....माहे.....१९.....

न्यायाधीश.

क्रमांक ६

अपिलाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची उत्तरवादीला नोटीस

(आदेश ४१, नियम १४)

(सरनामा)

.....न्यायालयाच्या, तारीख.....माहे.....१९.....च्या..... वरील अपील.

.....उत्तरवादी, यांस,

या दाव्यामधील.....च्या हुकूमनाम्यावरील अपील.....याने दाखल केलेले असून या न्यायालयामध्ये त्यांची नोंदणी करण्यात आली आहे. आणि या अपिलाच्या सुनावणीसाठी या न्यायालयाने तारीख.....माहे.....१९.....हा दिवस निश्चित केलेला आहे याची तुम्ही दखल घ्यावी.

तुमच्या वतीने तुम्ही स्वतः, तुमचा वकील किंवा या अपिलामध्ये तुमच्यासाठी काम करण्यासाठी कायद्याद्वारे प्राधिकृत केलेली अशी कोणी व्यक्ती हजर न राहिल्यास तुमच्या अनुपस्थितीत अपिलाची सुनावणी होऊन त्याचा निर्णय देण्यात येईल.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

टीप.—अंमलबजावणीच्या स्थगितीचा आदेश देण्यात आला असेल तर, त्याबद्दलची सूचना या नोटिशीमध्ये देण्यात यावी.

क्रमांक ७

दाव्यामधील ज्या पक्षकारास अपिलामध्ये पक्षकार केलेले नसेल, परंतु न्यायालयाने उत्तरवादी म्हणून सामील केलेले असेल त्या पक्षकारास नोटीस.

(आदेश ४१, नियम २०)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, ... च्या न्यायालयातील १९ ..... च्या दावा क्रमांक ..... यामध्ये तुम्ही पक्षकार होता, आणि ज्याअर्थी, ... याने उक्त दाव्यामध्ये त्याच्याविरुद्ध देण्यात आलेल्या हुकूमनाम्यावर या न्यायालयाकडे अपील दाखल केलेले असून उक्त अपिलाचा जो निकाल होईल त्यामध्ये तुम्ही हितसंबंधित आहात असे या न्यायालयास दिसून आले आहे :

म्हणून, याद्वारे तुम्हास अशी नोटीस देण्यात येते की, उक्त अपिलामध्ये तुम्हाला उत्तरवादी करण्याचा निदेश या न्यायालयाने दिलेला आहे आणि त्या अपिलाची सुनावणी तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी मध्यान्हपूर्व ..... पर्यंत तहकूब केलेली आहे. उक्त दिवशी आणि उक्त वेळी तुमच्या वतीने कोणी हजर न राहिल्यास तुमच्या अनुपस्थितीत अपिलाची सुनावणी होऊन त्याचा निर्णय देण्यात येईल.

तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक ८

प्रति आक्षेपांचे ज्ञापन

(आदेश ४१, नियम २२)

(सरनामा)

ज्याअर्थी, ... याने १९ ..... चा दावा क्रमांक ..... यातील तारीख ..... माहे ..... १९ ..... ज्या हुकूमनाम्यावर ..... येथील ..... न्यायालयाकडे अपील दाखल केलेले आहे, आणि ज्याअर्थी, अपिलाच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाबद्दलची नोटीस तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी ..... वर बजावण्यात आली होती, म्हणून, ... हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ४१, नियम २२ खाली ही प्रतिआक्षेपांची यादी दाखल करीत आहे व ज्यावर अपील करण्यात आले त्या हुकूमनाम्याबाबतच्या आक्षेपांची पुढील कारणे नमूद करीत आहे :—

क्रमांक ९

अपिलातील हुकूमनामा

(आदेश ४१, नियम ३५)

(सरनामा)

..... न्यायालयाच्या, तारीख ..... माहे ..... १९ ..... च्या हुकूमनाम्यावरील १९ ..... चे अपील क्रमांक .....

अपिलाचे ज्ञापन

वादी.
प्रतिवादी.

वर नामनिर्दिष्ट केलेला ..... हा, वरील दाव्यामधील ..... च्या तारीख ..... माहे ..... १९ ..... च्या ..... हुकूमनाम्यावर ..... येथील ..... न्यायालयाकडे पुढील कारणांसाठी अपील करत आहे. ती कारणे अशी :—

हे अपील तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी ..... यांच्यासमोर, अपीलकर्त्यातर्फे ..... व उत्तरवादीतर्फे ..... यांच्या उपस्थितीत सुनावणी निघाल्यानंतर असा आदेश देण्यात येत आहे की, या अपिलाचा खाली तपशील दिल्याप्रमाणे रु. ..... इतका खर्च ..... याने द्यावयाचा आहे. मळ दाव्याचा खर्च ..... याने द्यावयाचा आहे.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

न्यायाधीश.

अपिलाचा खर्च

अपीलकर्ता	रक्कम		उत्तरवादी	रक्कम	
	रु.	पै.		रु.	पै.
१. अपिलाच्या ज्ञापनासाठी मुद्रांक ..			अखत्यारपत्रासाठी मुद्रांक ..		
२. अखत्यारपत्रासाठी मुद्रांक ..			विनंतीअर्जासाठी मुद्रांक ..		
३. आदेशिकांची बजावणी ..			आदेशिकांची बजावणी ..		
४. रु. .....वरील वकिलाची फी ..			रु. .....वरील वकिलाची फी		
एकूण ..			एकूण ..		

क्रमांक १०

निर्धन व्यक्ती म्हणून अपील करू देण्याबिषयी अर्ज

(आदेश ४४, नियम १)

(सरनामा)

मी ..... वर नामनिर्दिष्ट केलेला ..... वरील दाव्यातील हुकूमनाम्यावरील अपिलाचे ज्ञापन सोबत जोडीत आहे व नादार म्हणून अपील करण्याची परवानगी मिळावी म्हणून अर्ज करीत आहे.

माझ्या मालकीची सर्व जंगम आणि स्थावर मालमत्ता आणि तिचे अंदाजित मूल्य यांची संपूर्ण व सत्य अनुसूची सोबत जोडली आहे.

तारीख ..... माहे ..... १९ .....

(सही)

[टीप.—वादीने अर्ज केला असेल त्याबाबतीत, त्याने प्रथम न्यायालयाकडे निर्धन व्यक्ती म्हणून दावा करण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज केला होता किंवा कसे आणि त्याला परवानगी मिळाली होती किंवा कसे ते वादीने नमूद करावे.]

क्रमांक ११

निर्धन व्यक्तीच्या अपिलाची नोटीस

(आदेश ४४, नियम १)

(सरनामा)

ज्याअर्थी, वर नामनिर्दिष्ट केलेला ..... याने वरील दाव्यातील तारीख ..... माहे ..... १९ ..... च्या हुकूमनाम्यावर निर्धन व्यक्ती म्हणून अपील करण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे, आणि ज्याअर्थी, अर्जाच्या सुनावणीसाठी तारीख ..... माहे ..... १९ ..... ही निश्चित केलेली आहे, म्हणून, याद्वारे तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, अर्जदारास निर्धन व्यक्ती म्हणून अपील करण्याची परवानगी का देण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याची तुमची इच्छा असेल तर, पूर्वोक्त दिवशी तुम्हास तसे करण्यागी संधी देण्यात येईल.

आज तारीख ..... माहे ..... १९ ..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक १२

[१][सर्वोच्च न्यायालयाकडे] अपील करण्यासाठी प्रमाणपत्र का देण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्याविषयी नोटीस

(आदेश ४५, नियम ३)

(सरनामा)

.....यांस,

[१][.....याने,

(एक) या प्रकरणामध्ये सार्वत्रिक महत्त्व असलेला कायदेविषयक सारभूत प्रश्न अंतर्भूत आहे असे, आणि

(दोन) या न्यायालयाच्या मते, सर्वोच्च न्यायालयाने उक्त प्रश्नाचा निर्णय करणे आवश्यक आहे, असे प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे.]

म्हणून, न्यायालयाने प्रमाणपत्र का देऊ नये याचे कारण तुम्ही दाखविण्यासाठी तारीख..... माहे.....१९.....हा दिवस निश्चित केलेला आहे याची तुम्ही दखल घ्यावी.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

प्रबंधक.

क्रमांक १३

[१][सर्वोच्च न्यायालयाकडे] केलेले अपील दाखल करून घेतल्याबद्दल उत्तरवाद्दीला नोटीस

(आदेश ४५, नियम ८)

(सरनामा)

.....यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यामध्ये.....असलेला.....याने 'दिवाणी प्रक्रिया संहिता,' १९०८, आदेश ४५, नियम ७ याद्वारे आवश्यक असलेली प्रतिभूती दिलेली असून रक्कम अनामत ठेवलेली आहे.

म्हणून, उक्त.....याने [१][सर्वोच्च न्यायालयाकडे] केलेले अपील तारीख..... माहे.....१९.....रोजी दाखल करून घेण्यात आलेले आहे, याची तुम्ही दखल घ्यावी.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

प्रबंधक.

क्रमांक १४

पुनर्विलोकनास का संमती देऊ नये याचे कारण दाखविण्याविषयी नोटीस

(आदेश ४७, नियम ४)

(सरनामा)

.....यांस,

वरील प्रकरणामध्ये या न्यायालयाने त्याच्या तारीख.....माहे.....१९..... रोजी दिलेल्या हुकूमनाम्याचे पुनर्विलोकन करावे यासाठी.....याने या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे. न्यायालयाने या प्रकरणामध्ये त्याच्या हुकूमनाम्याच्या पुनर्विलोकनास संमती का देऊ नये याचे कारण तुम्ही दाखविण्यासाठी तारीख.....माहे.....१९..... ही निश्चित करण्यात आलेली आहे याची तुम्ही दखल घ्यावी.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "किंग इन कौन्सिल" याऐवजी घातले.
२. १९७३ चा अधिनियम ४९, कलम ४(२) द्वारे पूर्वीच्या परिच्छेदाऐवजी घातला.
३. 'अनुकूलन आदेश, १९५०' याद्वारे "हिज मॅजेस्टी इन कौन्सिल" याऐवजी घातले.

परिशिष्ट 'ज'

संकीर्ण

क्रमांक १

संपरीक्षा करावयाच्या वादप्रश्नाबाबत पक्षकारांचा करार

(आदेश १४, नियम ६)

(सरनामा)

ज्याअर्थी, आम्ही, वरील दाव्यातील पक्षकार यांचे, आमच्यामध्ये ज्यांचा निर्णय व्हावयाचा आहे त्या तथ्यविषयक [किंवा कायदेविषयक] प्रश्नाबाबत एकमत झालेले आहे आणि आमच्यामधील वादप्रश्न असा आहे की, तारीख .....माहे .....१९.....च्या व उक्त दाव्यामध्ये निशाणी .....म्हणून दाखल केलेल्या बंधपत्राच्या आधारे केलेली हक्कमागणी मुदत संविधीच्या बाहेर गेलेली आहे किंवा नाही (किंवा जो कोणताही वादप्रश्न असेल तो नमूद करावा);

म्हणून, अशा प्रश्नाबाबत न्यायालयाच्या होकारार्थी [किंवा नकारार्थी] निष्कर्षानंतर ..... हा उक्त .....यास रुपये .....इतकी रक्कम (किंवा त्यावर जी रक्कम देय आहे असे न्यायालय ठरवील ती रक्कम) देईल, आणि मी उक्त .....पूर्वोक्त बंधपत्रावरील माझ्या हक्कमागणीच्या संपूर्ण फेडीबद्दल उक्त रु.....ची रक्कम (किंवा न्यायालय जी रक्कम देय आहे असे ठरवील ती रक्कम) स्वीकारीन [किंवा अशा निष्कर्षानंतर मी, उक्त .....असे करीन किंवा करण्यापासून अप्रवृत्त राहीन, इत्यादी.]

वादी
प्रतिवादी

साक्षीदार :

१.

२.

तारीख .....माहे .....१९.....

क्रमांक २

दावा संपरीक्षेसाठी दुसऱ्या न्यायालयाकडे वर्ग करण्याविषयीच्या अर्जाची नोटीस

(कलम २४)

जिल्हा न्यायाधीश, ...यांच्या न्यायालयात १९.....चा क्रमांक ....यांस,

ज्याअर्थी, ...येथील .....यांच्या न्यायालयात सध्या प्रलंबित असलेला १९.....चा दावा क्रमांक .....यामध्ये .....हा वादी व ....हा प्रतिवादी असून ..... याने हा दावा संपरीक्षेसाठी .....येथील .....यांच्या न्यायालयाकडे हस्तांतरित करावा म्हणून या न्यायालयाकडे तारीख .....माहे .....१९.....या तारखेला अर्ज केलेला आहे :—

म्हणून, याद्वारे तुम्हाला कळविण्यात येते की, अर्जाच्या सुनावणीसाठी तारीख .....माहे .....१९.....ही निश्चित केलेली असून त्या अर्जावर कोणताही आक्षेप घेण्याची तुमची इच्छा असेल तर त्या दिवशी तुमचे म्हणणे ऐकून घेतले जाईल.

आज तारीख .....माहे .....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

[१] क्रमांक २क

*वादीने/प्रतिवादीने बोलावण्याचे ठरवलेल्या साक्षीदारांची सूची

(आदेश १६, नियम १)

ज्या पक्षकाराने साक्षीदार बोलावण्याचे ठरवले आहे त्या पक्षकाराचे नाव	साक्षीदाराचे नाव व पत्ता	शेरा

*लागू नसलेले शब्द खोडावे.

१. १९७६ चा अधिनियम, १०४ च्या कलम ९६ (एक) द्वारे समाविष्ट केला. (१ फेब्रुवारी १९७७ रोजी व तेव्हापासून)

क्रमांक ३

न्यायालयात प्रदान केल्याची नोटीस

(आदेश २४, नियम २)

(सरनामा)

प्रतिवादीने न्यायालयामध्ये रुपये ..... इतकी रक्कम भरलेली असून वादीच्या हक्क मागणीची पूर्णपणे फेड करण्यासाठी ही रक्कम पुरेशी आहे असे प्रतिवादीचे म्हणणे आहे, याची दखल घ्यावी.

झेड. वादीचा वकील, यांस, एक्स. वाय., प्रतिवादीचा वकील.

क्रमांक ४

कारण दाखवा नोटीस (सर्वसाधारण नमुना)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, वर नामनिर्दिष्ट केलेला ..... याने या न्यायालयाकडे ..... असा अर्ज केलेला आहे; म्हणून, याद्वारे तुम्हाला ताकीद देण्यात येते की, तारीख ..... माहे ..... १९..... रोजी मध्यान्हपूर्व ..... वाजता तुम्ही या अर्जाविरुद्ध कारण दाखविण्यासाठी या न्यायालयामध्ये हजर राहावे; तसे करण्यास तुम्ही चुकला तर, उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल.

आज तारीख ..... माहे ..... १९... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक ५

वादीने/प्रतिवादीने हजर केलेल्या दस्तऐवजांची सूची

(आदेश १३, नियम १)

(सरनामा)

क्रमांक	दस्तऐवजाचे वर्णन	दस्तऐवजावर कोणतीही तारीख असल्यास, ती तारीख	पक्षकाराची किंवा प्लीडरची सही
१	२	३	४

क्रमांक ६

(न्यायालयाचे) अधिकारिताक्षेत्र सोडून जाण्याच्या बेतात असलेल्या साक्षीदाराच्या तपासणीसाठी निश्चित केलेल्या दिवसाची पक्षकारांना नोटीस

(आदेश १८, नियम १६)

(सरनामा)

वादी (किंवा प्रतिवादी) ..... यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यामध्ये ..... यांस पाहिजे असलेला साक्षीदार ..... याच्या तपासणीचे काम ताबडतोब सुरू करण्यात यावे असा अर्ज उक्त दाव्यामधील उक्त ..... याने केला आहे; आणि उक्त साक्षीदार न्यायालयाचे अधिकारिताक्षेत्र सोडून जाण्याच्या बेतात आहे (किंवा दुसरे कोणतेही चांगले किंवा पुरेसे कारण नमूद करावे) असे न्यायालयाची खात्री होईल अशा प्रकारे दाखवन देण्यात आले आहे;

म्हणून, न्यायालय, तारीख ..... माहे ..... १९..... रोजी साक्षीदाराची तपासणी करील याची तुम्ही दखल घ्यावी.

तारीख ..... माहे ..... १९.....

न्यायाधीश.

क्रमांक ७

अनुपस्थित साक्षीदाराच्या तपासणीसाठी आयोगपत्र

(आदेश २६, नियम ४,१८)

(सरनामा)

.....यास,

ज्याअर्थी, वरील दाव्यातील.....यांस..... याची साक्ष पाहिजे आहे ; आणि ज्याअर्थी,.....म्हणून,.....या साक्षीदारास लेखी [किंवा मौखिक परिप्रश्न विचारून] त्याच्याकडून पुरावा नोंदविण्यासाठी तुम्हाला विनंती करण्यात येत आहे, आणि त्या प्रयोजनासाठी याद्वारे तुमची आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. ही साक्ष पक्षकारांच्या किंवा त्यांचे अभिकर्त हजर असल्यास अभिकर्त्यांच्या उपस्थितीत घेण्यात येईल व त्यांना, विनिर्दिष्ट केलेल्या मुद्यांबाबत साक्षीदारास प्रश्न विचारण्याची मोकळीक राहील, आणि तुम्हाला आणखी अशी विनंती करण्यात येत आहे की, अशी साक्ष घेतल्यानंतर ती ताबडतोब परत पाठवण्यात यावी.

तुम्ही अर्ज केल्यास, साक्षीदारास हजर राहण्यास भाग पाडण्यासाठी, अधिकारिता असलेले कोणतेही न्यायालय आदेशिका काढील.

सदर कामाबद्दलची तुमची फी म्हणून रु.....इतकी रक्कम सोबत पाठविली आहे.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक ८

विनंती पत्र

(आदेश २६, नियम ५)

(सरनामा)

(शीर्षक :— अध्यक्ष व न्यायाधीश, इत्यादी ..... किंवा प्रकरणपरत्वे इतर)

ज्याअर्थी,.....मध्ये एक दावा सध्या प्रलंबित असून, त्यात क ख हा वादी आहे व ग घ प्रतिवादी आहे; आणि उक्त दाव्यामध्ये वादीची अशी हक्कमागणी आहे की, ...

(हक्कमागणीचा गोषवारा)

आणि ज्याअर्थी, पक्षांमधील तंटयात न्याय व्हावा व त्यातील बाबींचा रीतसर निर्णय व्हावा याकरता अशा बाबींच्या संबंधात पुढील व्यक्तींची साक्षीदार म्हणून शपथेवर तपासणी होणे जरुर आहे असे उक्त न्यायालयाकडे अभिवेदन करण्यात आले आहे. त्या बाबी अशा .....चे चछ, ...चे जझ आणि ....चे टठ आणि हे साक्षीदार आपल्या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात वास्तव्य करीत आहेत असे समजते;

म्हणून, मी....., उक्त न्यायालयाचा.....म्हणून याद्वारे विनंती करीत आहे की, पूर्वोक्त कारणांस्तव व उक्त न्यायालयाच्या सहाय्यार्थ, तुम्ही उक्त.....चे अध्यक्ष व न्यायाधीश या नात्याने किंवा तुमच्यापैकी कोणीतरी एकाने किंवा अधिकांनी कृपया उक्त साक्षीदारास (उक्त वादीचे आणि प्रतिवादीचे अभिकर्ते ज्यांना अशा प्रकारे बोलावण्याबद्दल तुम्हांस नम्रपणे लेखी विनंती करतील अशा इतर साक्षीदारांस), तुम्ही नेमून द्याल त्यावेळी व त्या जागी तुमच्यापैकी कोणीतरी एक किंवा अधिक यांच्यासमोर किंवा तुमच्या न्यायालयाच्या कार्यपद्धतीनुसार साक्षीदारांची तपासणी करण्यास सक्षम असेल अशा अन्य व्यक्तीसमोर हजर राहण्यास बोलवावे व आपण या विनंतीपत्राबरोबर (किंवा तोंडी) प्रस्तुत बाबीसंबंधी विचारलेल्या परिप्रश्नांच्या आधारे, अशा साक्षीदारांची तपासणी, वादी-प्रतिवादींच्या अभिकर्त्यांसमक्ष किंवा रीतसर नोटीस दिल्यानंतर अशा तपासणीच्या वेळी ह्यांच्यापैकी जे हजर राहतील त्यांच्यासमक्ष करण्याची व्यवस्था करावी.

आणि मी आणखी अशी विनंती करतो की, उक्त साक्षीदारांची उत्तरे कृपया लिहून घेण्याची आणि अशा तपासणीच्या वेळी रुजू केलेली सर्व पुस्तके, पत्रे, कागदपत्रे व दस्तऐवज ओळखू येण्यासाठी त्यांवर योग्य रीतीने निशाण्या करण्याची व्यवस्था करावी आणि तसेच, कृपया आपल्या अधिकरणाचा शिक्का मारून किंवा तुमच्या कार्यपद्धतीनुसार अन्य पद्धतीने अशा तपासणीचे अधिप्रमाणन करावे व अन्य साक्षीदारांच्या तपासणीसाठी विनंती करावयाची असल्यास त्याबाबतच्या पत्रासोबत ते कागदपत्र उक्त न्यायालयाकडे परत पाठवावेत.

टीप.—जर विदेशी न्यायालयास उद्देशून विनंतीपत्र पाठवायचे असेल तर, या नमुन्याच्या अखेरच्या ओळीतील "उक्त न्यायालयाकडे" या शब्दापूर्वी [१]["भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालया] मार्फत" हे शब्द व "परत पाठवावेत" या शब्दापूर्वी "हस्तांतरित करण्यासाठी" हे शब्द घालावेत.

---

१. अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "हिज मॅजेस्टीचा सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर फॉरीन अफेअर्स" याऐवजी घातले.

क्रमांक ९

स्थानिक अन्वेषणासाठी किंवा लेखे तपासण्यासाठी आयोगपत्र

(आदेश २६, नियम ९, ११)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, या दाव्याच्या प्रयोजनार्थ, ... करता एक आयोगपत्र काढणे आवश्यक दिसते, म्हणून, ... या प्रयोजनांकरता तुम्हांस याद्वारे आयुक्त म्हणून नेमण्यात आले आहे.

तुम्ही अर्ज केल्यास, तुम्हाला ज्या साक्षीदारांची तपासणी करण्याची इच्छा असेल त्यांना तुमच्यासमोर हजर राहण्यास किंवा जे दस्तऐवज पाहण्याची इच्छा असेल ते तुमच्यासमोर दाखल केले जाण्यास भाग पाडण्यासाठी, अधिकारिता असलेले कोणतेही न्यायालय आदेशिका काढील.

सदर कामावद्दलची तुमची फी म्हणून रु. ..... एवढी रक्कम यासोबत पाठवण्यात आली आहे.

आज तारीख .... माहे ..... १९..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

क्रमांक १०

विभाजन करण्याकरिता आयोगपत्र

(आदेश २६, नियम १३)

(सरनामा)

..... यांस,

ज्याअर्थी, या दाव्याच्या प्रयोजनार्थ, या न्यायालयाच्या तारीख ... माहे ..... १९... च्या हुकूमनाम्यात विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचे, त्या हुकूमनाम्यात घोषित केलेल्या अधिकारांनुसार विभक्तीकरण किंवा विभाजन करण्यासाठी एक आयोगपत्र काढणे आवश्यक दिसते, म्हणून, उक्त प्रयोजनाकरिता याद्वारे तुमची आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येत आहे आणि तुम्हाला निदेश देण्यात येत आहे की, आवश्यक असेल ती चौकशी करून उक्त मालमत्तेची तुमच्या कुशलतेनुसार व निर्णयशक्तीनुसार उक्त हुकूमनाम्यात नमूद केलेल्या हिश्श्यांमध्ये विभागणी करावी आणि असे हिस्से वेगवेगळ्या पक्षकारांना नेमून द्यावे. हिश्शांचे मूल्य समसमान करण्यासाठी कोणत्याही पक्षकाराने अन्य कोणत्याही पक्षकारास द्यावयाच्या रकमा देववण्यास तुम्हाला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

तुम्ही अर्ज केल्यास, तुम्हाला ज्या साक्षीदाराची तपासणी करण्याची इच्छा असेल त्यांना तुमच्यासमोर हजर राहण्यास किंवा जे दस्तएवज पाहण्याची इच्छा असेल ते तुमच्यासमोर दाखल केले जाण्यास भाग पाडण्यासाठी, अधिकारिता असलेले कोणतेही न्यायालय आदेशिका काढील.

सदर कामाबद्दलची तुमची फी म्हणून रु. ..... एवढी रक्कम यासोबत पाठवण्यात आली आहे.

आज तारीख .. माहे ..... १९... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

न्यायाधीश.

[1][क्रमांक ११

प्रमाणपत्रित, नैसर्गिक, किंवा वास्तविक पालकास नोटीस

(आदेश ३२, नियम ३)

(सरनामा)

(प्रमाणपत्रित/नैसर्गिक/वास्तविक पालक)
यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यामधील *वादीने/*अज्ञान प्रतिवादीच्या वतीने, अज्ञान प्रतिवादी ..... यांच्यासाठी दाव्यापुरता पालक नेमण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे, म्हणून याद्वारे तुम्हाला ..... (येथे, न्यायालयाने नेमलेल्या किंवा घोषित केलेल्या पालकाचे किंवा नैसर्गिक पालकाचे किंवा जी व्यक्ती अज्ञानाची देखभाल करीत असेल त्या व्यक्तीचे नाव लिहावे) फर्माविण्यात येते की, या प्रकरणाच्या सुनावणीसाठी नेमलेल्या व सोबतच्या समन्सामध्ये नमूद केलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी तुम्ही या न्यायालयासमोर हजर न राहिल्यास व अज्ञानासाठी दाव्यापुरता पालक म्हणून काम करण्यास तुमची संमती न दर्शवल्यास न्यायालय, उक्त दाव्याच्या प्रयोजनांसाठी, अज्ञानाचा पालक म्हणून अन्य कोणत्यातरी व्यक्तीची नेमणूक करील याची तुम्ही दखल घ्यावी.

आज तारीख ..... माहे ..... १९..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.]

[1][क्रमांक ११

अज्ञान प्रतिवादीस व पालकास नोटीस

(आदेश ३२, नियम ३)

(सरनामा)

(१) ..... (नैसर्गिक पालक/कायदेशीर रीत्या नेमलेला पालक/अज्ञानाची देखभाल करणारी व्यक्ती) यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यातील वादीच्या वतीने, अज्ञान प्रतिवादी ..... (येथे अज्ञान प्रतिवादीचे नाव लिहावे) यांच्यासाठी दाव्यापुरता पालक नेमण्यासाठी (सोबत जोडलेल्या प्रतीनुसार) अर्ज सादर केलेला आहे आणि ज्याअर्थी वादीने त्याच्या अर्जात तुम्हाला ..... (येथे प्रस्तावित पालकाचे नाव लिहावे) असा पालक म्हणून नेमण्यात यावे असे प्रस्तावित केले आहे, म्हणून उक्त प्रस्तावित पालक म्हणून तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येते की, तुमच्याकर ही नोटीस बजावण्यात आल्यापासून ..... दिवसांच्या आत तुम्ही या न्यायालयासमोर हजर न राहिल्यास व अशा नेमणुकीस तुमची संमती न दर्शविल्यास किंवा या दाव्यासाठी अज्ञानाचा पालक म्हणून अन्य कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यासाठी या न्यायालयाकडे अर्ज न केल्यास, न्यायालय, उक्त दाव्याच्या प्रयोजनांसाठी, अज्ञानाचा पालक म्हणून त्यास योग्य वाटेल अशा अन्य कोणत्यातरी व्यक्तीची नेमणूक करील, याची तुम्ही दखल घ्यावी.

आज तारीख ..... माहे ..... १९..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.]

क्रमांक ११ क

अज्ञान प्रतिवादीस नोटीस

(आदेश ३२, नियम ३)

(सरनामा)

अज्ञान प्रतिवादी ..... यांस,

ज्याअर्थी, वरील दाव्यामधील वादीने, या दाव्यापुरता तुमच्यासाठी अज्ञान प्रतिवादीचा पालक म्हणून, ... याची नेमणूक करावी असा अर्ज केलेला आहे. म्हणून, तुम्हाला याद्वारे फर्माविण्यात येते की, अर्जाविरुद्ध कारण दाखविण्यासाठी तुम्ही तारीख ..... माहे ..... १९..... रोजी या न्यायालयात जातीने हजर राहावे व तसे करण्यास तुम्ही चुकल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी करून निर्णय देण्यात येईल याची तुम्ही दखल घ्यावी.

आज तारीख ..... माहे ..... १९..... रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

---

१. १९७६ चा अधिनियम १०४, कलम ९६ (दोन) द्वारे घातला.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी. ०१०२/७७, दिनांक ५ सप्टेंबर, १९८३ द्वारे समाविष्ट केला.

*लागू नसलेले शब्द गाळावे.

क्रमांक १२

नादारीबद्दलच्या पुराव्याच्या सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिवसांची विरुद्ध पक्षकारास नोटीस

(आदेश ३३, नियम ६)

(सरनामा)

.....यांस,

ज्याअर्थी,..... याने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश ३३ याखाली .....याच्या विरुद्ध नादारी दावा दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज केला आहे; आणि ज्याअर्थी, न्यायालयाला अर्ज फेटाळण्याचे कोणतेही कारण दिसत नाही; आणि ज्याअर्थी, अर्जदार त्याची नादारी सिद्ध करण्यासाठी दाखल करील असा पुरावा स्वीकारण्यासाठी आणि त्याच्या नादारी-विरुद्ध जो कोणताही पुरावा दाखल करण्यात येईल त्याच्या सुनावणीसाठी तारीख.....माहे..... १९.....निश्चित करण्यात आली आहे.

म्हणून, आदेश ३३, नियम ६ याखाली याद्वारे तुम्हाला नोटीस देण्यात येते की, अर्जदाराची नादारी नाशाबीत करण्यासाठी कोणताही पुरावा देऊ करण्याची तुमची इच्छा असेल तर, उक्त तारीख .....माहे.....१९.....रोजी या न्यायालयामध्ये हजर होऊन तुम्हास तसे करता येईल.

आज तारीख.....माहे.....१९....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक १३

जामीनदारास हुकूमनाम्याखालील त्याच्या जबाबदारीची नोटीस

(कलम १४५)

(सरनामा)

.....यांस,

ज्याअर्थी, तुम्ही.....तारीख....माहे.....१९....रोजी, वरील दाव्यातील उक्त प्रतिवादी.....यांच्याविरुद्ध तारीख.....माहे.....१९....रोजी जो कोणताही हुकूमनामा देण्यात येईल त्याचे पालन केले जाण्याबद्दल जामीनदार म्हणन जबाबदार झाला; आणि ज्याअर्थी, तुमच्याविरुद्ध उक्त हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यासाठी अर्ज करण्यात आलेला आहे ;

म्हणून, तुमच्याविरुद्ध उक्त हुकूमनाम्याची अंमलबजावणी का करण्यात येऊ नये याचे कारण तुम्ही तारीख.....माहे.....१९.....रोजी दाखवावे असे तुम्हाला याद्वारे फर्मावण्यात येत आहे आणि जर विनिर्दिष्ट कालावधीच्या आत न्यायालयाची खात्री पटेल असे पुरेसे कारण दाखविण्यात आले नाही तर, उक्त अर्जातील अटींप्रमाणे हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता ताबडतोब आदेश देण्यात येईल.

आज तारीख.....माहे.....१९.....रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

न्यायाधीश.

क्रमांक १४

दिवाणी दावे नोंदवही

(आदेश ४, नियम २)

..... येथील ..... चे ..... यांचे न्यायालय

१९.....वर्षातील दिवाणी दाव्यांची नोंदवही

वादपत्र दाखल केल्याची तारीख	वादी			प्रतिवादी			हक्कमागणी			हजेरी			न्यायनिर्णय			अपील		अंमलबजावणी					अंमलबजावणीचे प्रतिवेदन			
दावा क्रमांक	नाव	वर्णन	राहण्याचे ठिकाण	नाव	वर्णन	राहण्याचे ठिकाण	तपशील	रक्कम किंवा मूल्य	कार्यवाहीचे कारण केव्हा उद्भवले	पक्षकारांनी हजर राहण्याचा दिवस	वादी	प्रतिवादी	तारीख	कोणाच्या बाजूने	कशाबद्दल किंवा कोणत्या रकमेबद्दल	अपिलाच्या निर्णयाची तारीख	अपिलातील न्यायनिर्णय	अर्जाची तारीख	आदेशाची तारीख	कोणाविरुद्ध	कशाबद्दल आणि पैसे असल्यास, रक्कम	दावा खर्चाची रक्कम	न्यायालयात भरलेली रक्कम	अटक केली	प्रदान करणे किंवा अटक करणे या संबंधीच्या प्रतिवेदनाव्यतिरिक्तच्या अन्य प्रतिवेदनाचे टिपण व प्रत्येक प्रतिवेदनाची तारीख.

टीप.—अनेक वादी किंवा अनेक प्रतिवादी असतील त्या बाबतीत नोंदवहीमध्ये केवळ प्रथम वादीच्या, किंवा प्रकरणपरत्वे, प्रथम प्रतिवादीच्या नावांची नोंद केली तरी चालेल.

[1][क्रमांक १४

दिवाणी दावे नोंदवही

(आदेश ४, नियम २)

..... तेथील ..... ते ..... यांचे न्यायालय

१९..... वर्षातील दिवाणी दाव्यांची नोंदवही

वादपत्र दाखल केल्याची तारीख	वादी			प्रतिवादी			हक्कमागणी			इजेरी			न्यायनिर्णय			अपील		अंमलबजावणी					अंमलबजावणीचे प्रतिवेदन	
दावा क्रमांक	नाव	वर्णन	राहण्याचे ठिकाण	नाव	वर्णन	राहण्याचे ठिकाण	तपशील	रक्कम किंवा मूल्य	कार्यवाहीचे कारण केव्हा उद्भवले	पक्षकारांनी हजर राहण्याचा दिवस	वादी	प्रतिवादी	तारीख	कोणाच्या बाजूने	कशाबद्दल किंवा कोणत्या रकमेबद्दल	अपिलाच्या निर्णयाची तारीख	अपिलातील न्यायनिर्णय	अर्जाची तारीख	आदेशाची तारीख	कोणाविरुद्ध	कशाबद्दल आणि पैसे असल्यास रक्कम	बाकी खर्चाची रक्कम	न्यायालयात भरलेली रक्कम	अटक केली	प्रदान करणे किंवा अटक करणे यासंबंधीच्या प्रतिवेदना-व्यतिरिक्तच्या अन्य प्रतिवेदनाचे टिपण व प्रत्येक प्रतिवेदनाची तारीख.

टीप.—अनेक वादी किंवा अनेक प्रतिवादी असतील त्याबाबतीत नोंदवहीमध्ये केवळ प्रथम वादीच्या, किंवा प्रकरणपरत्वे, प्रथम प्रतिवादीच्या नावांची नोंद केली तरी चालेल.

१. मुंबई उच्च न्यायालय अधिसूचना क्र. पी-७१०२/७७, दिनांक सप्टेंबर १९८३ द्वारे समाविष्ट करण्यात आले.

क्रमांक १५

अपिलांची नोंदवही

(आदेश ४१, नियम १)

.....येथील न्यायालय (किंवा उच्च न्यायालय)

१९..... वर्षामधील हुकूमनाम्यांवरील अपिलांची नोंदवही

अनुक्रमांक	अपिलकर्ता							उत्तरवादी			ज्यावर अपील केले तो हुकूमनामा					हुजेरी		न्यायनिर्णय	
	अपिलाचा क्रमांक	नाव	वर्णन	राहण्याचे ठिकाण	नाव	वर्णन	राहण्याचे ठिकाण	अपिलाचे स्वरूप किंवा कोणत्या न्यायालयाचा	मूळ दाव्याचा क्रमांक	तपशील	दस्तऐवज किंवा मुल्य	पक्षकारांनी द्यावे राहण्याचा दिवस	अपीलकर्ता	उत्तरवादी	तारीख	कायम केला, फिरवला किंवा त्यात बदल केला.	कशावरून किंवा कोणत्या दस्तऐवजावर

दुसरी अनुसूची.—[लवाद] 'लवाद अधिनियम, १९४०' (१९४० चा १०), कलम ४९ (१) व तिसरी अनुसूची यांद्वारे निरसित.

तिसरी अनुसूची.—[जिल्हाधिकाऱ्यांनी हुकूमनाम्यांची अंमलबजावणी करणे] 'दिवाणी प्रक्रिया संहिता (विशोधन) अधिनियम, १९५६' (१९५६ चा ६६), कलम १५ द्वारे निरसित.

चौथी अनुसूची.—[अधिनियमितींचे विशोधन] 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५२' (१९५२ चा ४८), कलम २ व पहिली अनुसूची यांद्वारे निरसित.

पाचवी अनुसूची.—[अधिनियमितींचे निरसन] 'दुसरा निरसन व विशोधन अधिनियम, १९१४' (१९१४ चा १७), कलम ३ व दुसरी अनुसूची यांद्वारे निरसित.

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८

THE CODE OF CIVIL PROCEDURE, 1908

मराठी–इंग्रजी शब्दसूची

अटकावणी	distraint	[क. १६ (च्)]
अडचण	embrass	[आ. सहावा नि. १६ (ख्)]
अधिकांश भाग	substantial part thereof	[क. ५१ परंतुक (ख्)]
अनुतोष	relief	[आ. सातवा नि. ७ स. टी.]
अनुपस्थितीमुळे फेटाळणे	dismissal for default	[क. २(२) (ख्)]
अनुवर्ती गहाणदार	puisne mortgage	[आ. चौतिसावा नि. १ स्पष्टी.]
अनुवर्ती हक्कमागण्या	successive claims	[आ. पहिला नि. ३ स्पष्टी.]
अनन्तर आप्तसंबंधी	next-of-kin	[प. "घ" क्र. १७(३) चे शीर्षक]
अन्यायाने केलेली बडतर्फी	wrongful dismissal	[प. "क" क्र. १५ (३)]
अन्यायाने नोकरीतून पदमुक्त करणे.	wrongfully discharged	[प. "क" क्र. १५ (३)]
अपप्रवादात्मक	scandalous	[आ. सहावा नि. १६ (क्)]
अपर न्यायाधीश	Additional judge	[क. २४ (३) (क्)]
अपसंयोजन	Misjoinder	[क. ९९]
अपील किंवा पुनरीक्षण न्यायालय	appellate or revisional court	[क. २१ (२)]
अपिलपात्र प्रकरण	appealable case	[आ. अठरावा नि. ५ स. टी.]
अप्रवर्ती	inoperative	[क. ११३–परंतुक]
अभावित चूकभूल	accidental slip	[क. १५२]
अवशिष्ट उत्तरदानग्राही	residuary legatee	[आ. आठवा नि. ६ (३) (तीन) (क्)]
असंयोजन	non-joinder	[क. ९९]
आकडेमोडविषयक चूक	arithmetical mistake	[क. १५२]
आदेशपत्र तयार करण्यात येईल	order shall be drawn up	[क. ३५ख (२)]
आयोगपत्र परत पाठवणे	return of commission	[आ. सव्विसावा नि. ७ स. टी.]
आक्षेप	attack	[क. ११ स्पष्टी. (४)]
आज्ञापत्र	precept	[क. ४६]
उडवाउडवीचा इन्कार	evasive denial	[आ. आठवा नि. ४ स. टी.]
उत्तराचे शपथपत्र	affidavit in answer	[आ. अकरावा नि. ९]
उधार	advance	[क. ३४ (१) परंतुक]
उपलक्षित संविदा	implied contract	[आ. सहावा नि. १२ स. टी.]
उपसाधक काम	ministerial act	[क. ७५ (छ)]
उलट दावा	cross suit	[आ. आठवा नि. ६ (२)]
ऐपतीची मोजदाद	calculation of the means	[क. ५१ स्पष्टी.]
ओळींच्या मध्ये मजकूर समाविष्ट करणे.	interlineation	[आ. अकरावा नि. १९ (१)]
औपचारिक दोष	formal defect	[आ. तेविसावा नि. १(३) (क्)]
अंगभूत शक्ती	inherent power	[क. १५१ स.टी.]

अंगावरील दागदागिने	personal ornaments	[(क. ६० (१) परंतुक (क्)]
अंतर्वादि दावा	interpleader suit	[क. ८८ स.टी.]
कबुली	admission	[आदेश बारावा-शीर्षक]
कर्तव्ये पार पाडण्यास लावणे	enforce the performance of duties.	[क. ९४ (घ्)]
कल्याण कार्यविषयक तज्ज्ञ	welfare expert	[आ. बत्तिसावा क.नि. ४ स.टी.]
कसुरीबद्दल शिक्षा	penatly for default	[क. ३२ स.टी.]
कागदोपत्री पुरावा	documentary evidence	[आ. तेरावा नि. १]
कायदेशीर प्रतिनिधी	legal representative	[क. ५०]
कायदेशीर सबब नसताना	without lawful excuse	[आ. दहावा नि. ४ (२)]
कारागिरांची हत्यारे	tools of artisans	[क. ६० (१) परंतुक (ख्)]
कार्यवाही कक्षांतर्गत चालवणे	proceedings in camera (camera proceedings).	[आ. ३२ क. नि. (२)]
कोर्टकचेरी	litigation	[आ. दुसरा नि. १]
कॉमनवेल्थ देश	Common wealth country	[क. ८६ (४) (ख्)]
खरेदीदाराचा क्रमप्राप्त हक्क	purchaser's title	[क. ६५ स.टी.]
खाडाखोडी	erasures	[आ. अकरावा नि. १९ (१)]
खुले न्यायालय	open court	[आ. बारावा नि. ४ स.टी.]
खेचणावळ	towage	[क. १४० (१)]
खोटे किंवा तापदायक	false or vaxitious	[क. ३५ क. (१)]
खंड	rent	[क. ४ (२)]
गहाण सोडवणे	redemption	[प. "क" क. ४६ चे शीर्षक]
गांभीर्यपूर्वक नमुत्यातील मृत्युपत्राचे संप्रमाण.	probate of the will in solemn form.	[प. "क" ४१ (१५)] [(६) (२)]
गारनिशी	garnishee	[क. १२८ (२) (घ्)]
गौण	immaterial	[क. ९ स्पष्टी. दोन]
चरितार्थ	livilihood	[क. ६० (१) (३) स्पष्टी. पाच]
चारचौघात बावरणे	(To) appear in public	[क. ५५ (क्) परंतुक-तीन]
चुकीचा दृष्टीकोन	incorrect view	[क. १३ (ग्)]
जप्तीची समाप्ती	determination of attachment	[क. ४६ (२) (दोन) परतुक]
जबाबदारी	liability	[प. "ज" क. १३]
जबानीदारास शपथ देणे	administer the oath to the deponent.	[क. १३९]
जबानी देणे	(To) depose	[आ. एकोणतिसावा नि. १]
जहाजी मालाची बाचवणावळ इत्यादी	assessors in causes of salvage etc.	[क. १४० स.टी.]
जादा दिला गेलेला	overpaid	[प. "क" क. २]
जाहीर (करणे)	declaration	[प. "च" क. ९]
जाहीर विक्री	public sale	[प. "ड" क. ४२ चे शीर्षक]
जीवनमान	condition in life	[आ. सोळावा नि. १२ (१)]

टप्पा	point	[क. २४ (२)]
ठाकूरचा शेबेट	shebait of Thakur	[प. "क" क्र. १]
तत्सम प्रयोजन	(To be applied) cypres	[क. ९२ (३)]
तथ्यविषयक अथवा कायदेविषयक असे महत्त्वाचे विधान.	material proposition of fact or law.	[आ. चौदावा नि. १ (१)]
तथ्यविषयक वादमुद्दा	issue of fact	[क. १०३ स. टी.]
तपासणी	inspection	[प. "ग" (शीर्षक)]
तळाशी सत्यापन करणे	(To) verify at the foot	[आ. सहावा नि. १५ (१)]
ताब्यात सुरक्षित ठेवणे	(To) keep in the custody	[आ. तेरावा नि. ८]
तोंडी मजकूर सांगणे	pronounced by dictation	[आ. विसावा नि. १ (३) परंतुक]
त्याच हक्कान्वये वाद लढणारे पक्षकार.	parties litigating under the same title.	[क. १०]
दखल असणे	with notice	[प. "क" क्र. ३३ चे शीर्षक]
दफ्तरांतर्गत पुरावा	evidence of the record	[क. १०३]
दरम्यानचे लाभ	mesne profits	[क. २ (१२)]
दस्तऐवज दाखल करणे	admit documents	[प. "ग" क्र. ९ चे शीर्षक]
दस्तऐवजाचा आशय	effect of document	[आ. सहावा नि. ९. स. टी.]
दस्तऐवजाबाबत शपथपत्र	affidavit of documents	[आ. अकरावा नि. १३ स.टी.]
दावा अवसान होणे	abatement of suit	[आ. बाविसावा नि. १]
दावा खर्च	costs	[आ. अकरावा नि. १५]
दावाखर्च निकालानुसार असणार नाही.	costs shall not follow the event	[क. ३५ (२)]
दावा चालवण्यास सांगणे	give the conduct of a suit	[आ. पहिला नि. ११]
दावा चालवणे किंवा त्यामध्ये बचाव देणे.	(To) prosecute or defend a suit	[क. ८५ (१)]
दावा निष्फळ होणे	suit must fail	[आ. तेविसावा नि. १ (३) (क्)]
दावा पुन्हा फाईलवर घेणे	(To) restore suit to file	[आ. नववा नि. ४ स.टी.]
दावा विचारार्थ स्वीकारणे	(To) entertain suit	[क. ५ (२)]
दाव्याची रचना करणे	(To) frame a suit	[आ. दुसरा शीर्षक]
दाव्याची स्थगिती	stay of suit	[क. १० स.टी.]
दाव्यांचे एकत्रीकरण	consolidation of suits	[क. १२८ (२) (ज्)]
दाव्यामध्ये उपस्थित होणे	make appearance in suit	[क. ८५ (३)]
दिवाणी न्यायालय	court of civil judicature	[दीर्घ शीर्षक]
दिवाळखोरीसंबंधीचा कायदा	law of insolvency	[क. ५५ (३)]
दुकानवही	shopbook	[आ. सातवा नि. १७ (१)]
दुभाष्याचे काम करणे	(To) interpret	[क. २ (१७) (घ्)]
दुय्यम तुरुंग	subsidiary jail	[आ. सोळावा-ग नि. १ (ख्) (एक)].
दुर्भावपूर्ण कृत्य	act of bad faith	[क. ५१ परंतुक (क्) (दोन)]
द्रव्यविषयक	pecuniary	[क. १६]

द्रव्यविषयक उत्तरदानग्राही	pecuniary legatee	[प. "क" क्र. ४३ चे शीर्षक]
धारणाधिकार	tenure	[आ. एकविसावा नि. ३]
नष्ट केली जाईल अशी भीती असणे.	threatened with destruction	[प. "क" क्र. ३९ चे शीर्षक]
निम्न अपील न्यायालय	lower appellate court	[क. १०३ (क्)]
नियमाचे प्रवर्तन	operation of rule	[आ. सोळावा नि. ४ स.टी.]
निर्धन व्यक्ती	forma pauperis	[आ. तेहतिसावा नि. १. स.टी.]
निर्धारित मागणी	liquidated demand	[आ. सदतिसावा नि. १ (२) (ख्)]
निर्वाह भत्ता	subsistance allowance	[क. ५७ स.टी.]
नेमणूक पत्र	appointment	[आ. तिसरा नि. ४ (२)]
नेमलेला मुखत्यार	constituted attorney	[प. "क" क्र. १]
नौ-अधिकरण अधिकारिता	admirality jurisdiction	[क. ११२ (२)]
नौकाधिपती	master of a ship	[आ. पाचवा नि. १३ (२)]
नंतरचे भार	subsequent encumbrance	[क. ७३ परंतुक (ग्)]
न्यायगृह	court-house	[आ. नववा नि. १]
न्यायनिर्णीत ऋण	judgement debt	[आ. अकरावा नि. १८ (२)]
न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी	for the ends of justice	[क. १५१]
न्यायालयाला उद्देशून सर्वसाधारणपणे संपूर्ण प्रकरणासंबंधी भाषण करणे.	address the court generally on the whole case.	[आ. अठरावा नि. २ (२)]
न्यायालयाला प्रमाणित करणे	certified to the court	[आ. एकविसावा नि. ५५ (क्) (ख्)]
न्यायिकवत्	quasi-judicial	[क. १२८ (२) (झ्)]
न्यायिकेतर	non-judicial	[क. १२८ (२) (झ्)]
न्याय्य हक्कदार	rightful claimant	[क. ८८]
पत्रवही	letter-book	[आ. तेरावा नि. ५ (१)]
परदेशी न्यायालय	foreign court	[क. २(५)]
परस्पर टक्कर	collision	[क. १४० (१)]
परिप्रश्न	interrogatories	[क. ३० (क)]
परिप्रश्न करणे	(To) interrogate	[आ. दहावा नि. ४ (१)]
परिप्रश्न-पत्रिका सुपूर्द करणे	(To) deliver interrogatories	[आ. अकरावा नि. २]
परिव्यय निर्धारण अधिकारी	taxing officer	[आ. अकरावा नि. ३]
पाळीव पशुपक्षी	livestock	[क. १२८ (२) (ख्)]
पुढील दाव्यास रोध	bar to further suit	[क. १२ स. टी.]
पुन्हा संपरीक्षा करणे	(To) retry	[क. २४ (२)]
पुरावा	proof	[प. "ड." क्र. ३६]
पुराव्याचे टाचण	memorandum of evidence	[नि. १३]
पेहरावयाचे कपडे	wearing apparel	[क. ६० (१) परंतुक (क्)]
पृष्ठांकित करणे	(To) endorse	[आ. सातवा नि. ९(१)]
प्रकथन	averment	[आ. सहावा नि. ६]

प्रकरण प्रतिप्रेषित करणे	(To) remand a case	[क. १०७ (ख्)]
प्रकरण सादर करणे	(To) state a case	[क. ९०]
प्रक्रांत	(To) devolve	[क. २ (११)]
प्रतियोगी राज्यक्षेत्र	reciprocating territory	[क. ४४ क (१)]
प्रतिस्पर्धी हक्कमागणी	rival claim	[आ. विसावा नि. १४ (२)]
प्रतिहक्कमागणी	counter claim	[क. १२८ (२) (ग्)]
प्रतिहुकूमनामे	cross-decrees	[आ. एकविसावा नि. १८(१)]
प्रत्यक्षपणे व स्वेच्छेने राहणे	actually and voluntarily resides.	[आ. पाचवा नि. १९ क् (१)]
प्रत्यक्ष वापरात	actual occupancy	[क. ६२ (३)]
प्रत्यासीन करणे	(To) subrogate	[आ. चौतिसावा नि. २(३)]
प्रबंधक	registrar	[क. १२८ (२) (झ्)]
प्रभारकर्ता	encumbrancer	[क. ७३ परंतुक (क्)]
प्रमाणित	(To) certify	[क. ४१ स. टी.]
प्रवेश करू देण्यास नकार देणे किंवा प्रतिबंध करणे.	refuses or prevents access thereto.	[क. ५५(१) परंतुक]
प्राङन्याय	res-judicata	[भाग एक. उप शीर्षक]
प्रातिनिधिक भूमिका	representative character	[आ. सातवा नि. ४]
प्राप्ती	gain	[क. २० (क्)]
प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करणे.	personally work for gain	[क. १६ परंतुक]
प्रारंभकारी समन्सच्या स्वरूपाची कार्यपद्धती.	procedure by way of originating summons	[क. १२८ (२) (दोन) (छ्)]
प्रारंभिक न्यायालय	court of first instance	[क. ३७ (ख्)]
प्रोथोनोटरी	prothonotary	[क. १२८ (२) (झ्)]
फर्मावणे	command	[प. "ड." क्र. ९]
बचाव	defence	[क. ३५ क (१)]
बचाव काढून टाकणे	strike out the defence	[आ. सहावा नि. १४ क. (५) (ख्)]
बचाव पुढे चालू ठेवणे	further prosecution of the defence.	[क. ३५ ख (१) स्पष्टी.]
बेकायदेशीर	invalid	[क. ११३ परंतुक]
बोर्स्टल संस्था	Borstal institution	[आ. सोळावा-ग नि. १ (ख्) (दोन)]
भरून न येण्याजोगी हानी	irreparable injury	[क. ११५ (१) परंतुक (ख्)]
भाडेकरू	charterer	[आ. पाचवा नि. १३ (२)]
भार चुकता करणे	discharge of an encumbrance.	[क. ७३ परंतुक (ग्)]
मजूर	labourer	[क. ६० परंतुक (ग्)]
कामगार	labourer	[क. ६० परंतुक (ज्)]
मनाईहुकूम	injunction	[क. ७ (ख्) (दोन)]

माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी.	given under my hand and the seal of the court	[प. "ख" क्र. ४ शेवटची ओळ]
मान्य करणे	(To) sustain	[क. १३ (च्)]
मान्यताप्राप्त प्रतिनिधी	recognised agent	[क. १३५ (२)]
मालमत्ता	property	[क. २ (१२)]
मास्टर	master	[क. १२८ (२) (झ्)]
मुख्य प्रशासी अधिकारी	chief ministerial officer	[आ. सातवा नि. ९ (४)]
मुद्दल रक्कम	principal sum	[क. ३४ (१)]
मृत्युपत्र पुरवणी	condicil	[प. "क" क्र. ४९ (१५) (१)]
यांत्रिकपणे अभिलिखित करणे	(To) record mechanically	[आ. अठरावा नि. ५ (ख्)]
युद्धलूटविषयक न्यायालय	prize court	[क. ११२ (२)]
योग्य जागा	suitable accomodation	[क. ५५ (१)]
योजनापूर्वक	designedly	[आ. एकविसावा नि. ५८(१) (ख्)]
राखीव किंमत	reserve price	[आ. एकविसावा नि. ७२ क(२)]
राजनैतिक निवृत्तिवेतन	political pension	[क. ६० (१) परंतुक (छ्)]
रीतसर अभिव्यक्ती	formal expression	[क. २(२)]
रेजिमेंट	regiment	[आ. अठ्ठाविसावा नि. १ (३) स्पष्टी.]
लवकर व स्वाभाविकपणे नाश पावणारी.	subject to speedy and natural decay.	[क. ७३ (च्)]
लवाजमा	retinue	[क. ८६ (४) (ग्)]
लेखप्रमाणक	notary	[क. १३९ (क् क्)]
लेटर्स पेटन्ट	letters patent	[क. ९८ (३)]
वचन पूर्ण करण्यास माफी देणे	performance remitted	[प. "क" क्र. ४९ (४) स.टी.]
वजावट देणे	(To) allow a set off	[आ. सातवा नि. १ (ज्)]
वादकारण	cause of action	[क. १० स्पष्टी.]
वादकालीन आदेश	interlocutory order	[आ. एकोणचाळिसावा नि. ६ वरील शीर्षक]
वादपत्राशी जुळतील असे	correspond with the plaint	[आ. सातवा नि. ९ (३)]
वादप्रश्न	(1) matter in issue	[क. १०]
	(2) issue	[क. ११]
वादप्रश्न निश्चित झाले	issues are settled	[क. २१ (२)]
वादमित्र	next friend	[क. १४७]
वादमुद्दा निर्णीत करणे	(To) determine an issue	[क. १०३]
वादमुद्दे काढणे	(To) frame issue	[क. १०७ (ग्)]
वादार्थ पालक	next guardian	[क. १४७]
वादास्पद होणे	(To) contest	[क. ९ स्पष्टी. एक]
विकलांगता	infirmity	[आ. सोळावा नि. ५ (क्)]
विचलन	departure	[आ. सहावा नि ७. स.टी.

विधान	proposition	[क. ४ (२)]
विधित: वारस	heirs-at-law	[प. "घ" क्र. १७ (३)]
विनियोग करणे	(To) dispose	[क. २ (१७) (घ्)]
विनियोग करण्याची शक्ती	disposing power	[क. ६० (१)]
विनिर्दिष्ट इन्कार	specific denial	[आ. आठवा नि.३ स.टी.]
विलंब	delay	[आ. सहावा नि. १६ (ख्)]
विवादित	contentious	[क. ९२ (१)]
विवाद्य बाब	matter in controversy	[क. २(२)]
विवाहविषयक अनुतोष	matrimonial relief	[आ. बत्तिसावा क. नि. १ (२) क्]
विवाहविषयक स्थिती	matrimonial status	[आ. बत्तिसावा क. नि. १ (२) (क्)]
विवेकाधिकार	descretion	[आ. एकविसावा नि. ३३ स.टी.]
विशेष कार्यपद्धती	special form of proceduer	[क. ४]
विश्वस्त व्यवस्थेचा आशय	spirit of the trust	[क. ९२ (३) (क्) (दोन)]
विश्वस्त व्यवस्थेची अंमलबजावणी	execution of trust	[प. "क" क्र. ४४ चे शीर्षक]
विषम गहाण	anomalous mortgage	[प. "घ" क्र. १० (४) (एक)]
वृत्त	fact	[क. ४१]
वृत्तिवेतन	stipend	[क. ६० (१) परंतुक (छ्)]
व्यक्त किंवा आन्वयिक विश्वस्त	express or constructive trust	[क. ९२ (१)]
व्यक्ती किंवा जंगम मालमत्ता या संबंधीची दुष्कृत्ये	wrongs to person or movables	[क. १९ स.टी.]
व्यक्तिलक्षी हुकूमनामा	personal decree	[प. "घ" क्र.९ (४) (चार)]
व्यक्तिश: अंमलबजावणी	personal service	[आ. पाचवा नि. १९ क.स.टी.]
शक्य तेवढी वाजवी तत्परता	due and reasonable diligence	[आ. पाचवा नि. १७]
शत्रुदेशीय व्यक्ती	alien enemy	[क. ८३]
शपथपत्र	affidavit	[क. ३० (ग्)]
शेतीकामाची अवजारे	implements of husbandry	[क. ६० (१) परंतुक (ख्)]
सत्याचे अभिकथन	allegation of fact	[आ. दहावा नि.१]
सदोष कारागिरी	defective workmanship	[प. "क" क्र. १७ चे शीर्षक]
सनद	charter	[क. ११९]
सनिषेध उपस्थिती	appearance under protest	[आ. विसावा नि.८ स.टी.]
सन्मानदर्शक वागणूक	work of consideration	[आ. पाचवा नि. ३० (१)]
समन्यायिक हक्क	equities	[क. ४९]
समन्स पाठवणे	transmission of summons	[प. "ख" क्र. ८]
समादेशक अधिकारी	commanding officer	[आ. पाचवा नि. २८]
समाश्रित	contingent	[क. ६० (१) परंतुक (ड्)]
सरकारी वकील	Government pleader	[क. २(७)]
सर्व खर्चवेच धरून हुकूमनामा	amount decreed with costs	[आ. एकविसावा नि. ५५ (क)]
सर्वसाधारण दावे	suits in general	[भाग एक शीर्षक]

सर्वात कनिष्ठ न्यायालय	court of the lowest grade	[क. १५]
सांपार्श्विक प्रतिभूती	collateral security	[आ. दुसरा नि. ३ स्पष्टी.]
सांभाळून ठेवणे	custody	[क. १२८ (२) (ख्)]
सारभूत मुद्दा	point of substance	[आ. आठवा नि. ४]
सावधानपत्र दाखल करणे	(To) lodge a caveat	[क. १४८ क.स.टी.]
सांविधिक संलेख	statutory instrument	[आ. सत्ताविसावा क चे शिर्षक]
साक्षीदार	witness	[प "च" क्र. २]
साक्षीदारांचा निर्वाह खर्च	subsistance for witness	[प. "घ" तक्त्यातील नोंद क्र. ५]
सुनावणीसाठी पुकारणे	(To) call on for hearing	[आ. नववा नि. ३]
सैन्य तुकडी	detachment	[आ. अठ्ठाविसावा १ (३) स्पष्टी.]
सोडून देणे	(To) abandon	[आ. तेविसावा नि. १ (१)]
सोदाहरण	exemplified	[आ. सहावा नि. ४]
संकीर्ण	miscellaneous	[भाग अकरा शीर्षक]
संविदेचे विनिर्दिष्ट पालन	specific performance of a contract	[आ. विसावा नि. १२ क]
स्थानिक रिवाज	customs of the country	[क. ६२ (३)]
स्थावरीकरण	realization	[आ. चाळिसावा नि. १ (१) (घ्)]
स्पष्टपणे परामरी घेणे	(To) deal specifically	[आ. आठवा नि. ३]
स्वाक्षरित (करणे)	subscription	[आ. एकोणतिसावा नि. १ स.टी.]
हकीकत कबूल असल्याविषयी नोटीस	notice of admission of case	[आ. बारावा नि. १ स.टी.]
हानीरक्षण	indemnity	[आ. सहावा नि. १६]
हिस्सेराशीने वितरण	rateable distribution	[क. ६४ स्पष्टी.]
हुकूमनामा काढणे	(To) pass a decree	[आ. नववा नि. १३]
हुकूमनामा तयार करणे	(To) draw up a decree	[आ. आठवा नि. १०]
हुकूमनाम्याखालील प्रदान	payment under decree	[आ. एकवीसचे शीर्षक]
हुकूमनाम्याची फेड करण्यास पुरेल इतकी	sufficient to satisfy the decree	[क. ३९ (१) (ख्)]
हुकूमनाम्यामध्ये मान्य केलेल्या हक्क-मागण्या	claims decreed	[आ. विसावा नि. १४ (२) (क्)]
क्षतिपूरण	redress	[आ. पहिला नि. ७ स.टी.]

THE CODE OF CIVIL PROCEDURE, 1908

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८

इंग्रजी–मराठी शब्दसूची

(To) abandon	सोडून देणे	[O. XXIII R. 1 (1)]
abatement of suit	दावा अवसान होणे	[O. XXII R. 1]
accidental slip	अभावित चूकभूल	[s. 152]
act of bad faith	दुर्भावपूर्ण कृत्य	[s. 51 Prov. (a) (ii)]
actually and voluntarily resides	प्रत्यक्षपणे व स्वेच्छेने राहणे	[O.V.R. 19A (1)]
actual occupancy	प्रत्यक्ष वापरात	[S. 62 (3)]
Additional Judge	अपर न्यायाधीश	[S. 24 (3) (a)]
(To) address the court generally on the whole case	न्यायालयाला उद्देशून सर्वसाधारणपणे संपूर्ण प्रकरणासंबंधी भाषण करणे.	[O. XVIII R. 2 (2)]
administer the oath to the deponent	जबानीदारास शपथ देणे.	[s. 139]
administration	प्रशासन	]Appen. A No. 42 Heading)]
admirality jurisdiction	नौ–अधिकरण अधिकारिता	[s. 112 (2)]
admission	कबुली	[O. XII Heading]
admit documents	दस्तऐवज दाखल करणे	[Appen. 'C' No. 9 Heading]
advance	उधार	[s. 34 (1) Prov.]
affidavit	शपथपत्र	[s. 30 (c)]
affidavit of documents	दस्तऐवजाबाबत शपथपत्र	[O. XI R. 13 M.N.]
affidavit in answer	उत्तराचे शपथपत्र	[O. XI R. 9]
alien enemy	शत्रुदेशीय व्यक्ती	[S. 83]
allegation of fact	सत्याचे अभिकथन	[O. X R. 1]
(To) allow a set off	वजावट देणे	[O. VII R. 1 (h)]
amount decreed with costs	सर्व खर्चवेच धरून हुकूमनामा	[O. XXI R. 55 (*a*)]
anomalous mortgage	विषम गहाण	[Appen. ' D ' No. 10 (4) (i)]
appealable case	अपीलपात्र प्रकरण	[O. XVIII R. 5 M.N.]
appearance under protest	सनिषेध उपस्थिती	[O. XXX R. 8 M.N.]
(To) appear in public	चारचौघात वावरणे	[S. 55 (1) Prov. III]
appellate or revisional court	अपील किंवा पुनरीक्षण न्यायालय	[S. 21 (2)]
appointment	नेमणूकपत्र	[O. III R. 4 (2)]
arithmetical mistake	आकडेमोडविषयक चूक	[S. 152]
assessors in causes of salvage etc.	जहाजी मालाची वाचणावळ इत्यादी.	[S. 140 M.N.]
attack	आक्षेप	[S. 11 Expl. (4)]
averment	प्रकथन	[O. VI R. 6]
bar to further suit	पुढील दाव्यास रोध	[S. 12 M.N.]
(To be applied) cypres	तत्सम प्रयोजन	[S. 92 (3)]

books in constant use	नेहमी वापरावी लागणारी पुस्तके	[O. XI R. 17]
Borstal institution	बोर्स्टल संस्था	[O. XVIA R. 1 (*b*) (*ii*)]
calculation of the means	ऐपतीची मोजदाद	[S. 51 Expl.]
(To) call on for hearing	सुनावणीसाठी पुकारणे	[O. IX R. 3]
Cause of action	वादकारण	[S. 10 Expl.]
certified to the court	न्यायालयाला प्रमाणित करणे.	[O. XXI R. 55 (*a*) (b)]
(To) Certify	प्रमाणित करणे.	[S. 41 M.N.]
Charter	सनद	[S. 119]
charterer	भाडेकरू	[O. VR. 13 (*2*)]
chief ministerial officer	मुख्य प्रशासी अधिकारी	[O. VII R. 9 (*4*)]
claimed decreed	हुकूमनाम्यामध्ये मान्य केलेल्या हक्कमागण्या.	[O. XX R. 14 (*2*) (*a*)]
collateral security	सांपार्श्विक प्रतिभूती	[O. II R. 3 Expl.]
collision	परस्पर टक्कर	[S. 140 (*1*)]
command	फर्मावणे	[Appen. ' E ' No. 9]
commanding officer	समादेशक अधिकारी	[O. V. R. 28]
common-wealth country	कॉमन्वेल्थ देश	[S. 86 (*4*) (*b*)]
condicil	मृत्युपत्र पुरवणी	[Appen ' A ' No. 49(*15*) (*1*)]
condition in life	जीवनमान	[O. XVI R. 12 (*1*)]
consolidation of suits	दाव्यांचे एकत्रीकरण	[S. 128 (*2*) (*h*)]
constituted attorney	नेमलेला मुखत्यार	[Appen. ' A ' No. 1]
contentious	विवादित	[S. 92 (*1*)]
(To) contest	वादास्पद होणे	[S. 9 Expl. I]
contingent	समाश्रित	[S. 60 (*1*) Prov. (*M*)]
correspond with the plaint	वादपत्राशी जुळतील असे	[O. VI R. 9 (*3*)]
costs	दावा खर्च	[O. XI R. 15]
costs shall not follow the event	दावाखर्च निकालानुसार असणार नाही.	[S. 35 (*2*)]
counter claim	प्रतिहक्कमागणी	[S. 128 (*2*) (*c*)]
court-house	न्यायगृह	[O. IX R. 1]
court of civil Judicature	दिवाणी न्यायालय	[Long-title]
court of first instance	प्रारंभिक न्यायालय	[S. 37 (*b*)]
court of the lowest grade	सर्वांत कनिष्ठ न्यायालय	[S. 15]
cross-decrees	प्रतिहुकूमनामे	[O. XXI R. 18 (1)]
cross suit	उलटा दावा	[O. VIII R. 6 (*2*)]
customs of the country	स्थानिक रिवाज	[S. 62 (*3*)]
custody	सांभाळून ठेवणे	[S. 128 (*2*) (*b*)]
(To) deal specifically	स्पष्टपणे परामर्श घेणे	[O. VIII R. 3]
declaration	जाहीर (करणे)	[Appen. ' D ' No. 9]

defective workmanship	सदोष कारागिरी	[Appen. ' A ' No. 17 Heading]
defence	बचाव	[S. 35-A (*1*)]
delay	विलंब	[O. VI R. 16 (*b*)]
(To) deliver interrogatories	परिप्रश्नपत्रिका सुपूर्द करणे	[O. XI R. 2]
departure	विचलन	[O. VI R. 7 M.N.]
(To) depose	जबानी देणे	[O. XXIX R. 1]
descretion	विवेकाधिकार	[O. XXI R. 33 M.N.]
designedly	योजनापूर्वक	[O. XXI R. 58 (*1*) (*b*)]
detachment	सैन्य तुकडी	[O. XXVIII R. 1 (*3*) Expl.]
determination of attachment	जप्तीची समाप्ती	[S. 46 (*2*) (*ii*) prov.]
(To) determine issue	वादमुद्दा निर्णीत करणे	[S. 103]
(To) devolve	प्रकांत	[S. 2 (*11*)]
discharge of an encumbrance	भार चुकता करणे	[S. 73 prov. (*c*)]
dismissal for default	अनुपस्थितीमुळे फेटाळणे	[S. 2 (*2*)(*b*)]
(To) dispose	विनियोग करणे	[S. 2 (*17*) (*d*)]
disposing power	विनियोग करण्याची शक्ती	[S. 60 (*1*)]
distraint	अटकावणी	[S. 16 (*f*)]
documentary evidence	कागदोपत्री पुरावा	[O. XIII R. 1]
(To) draw up decree	हुकूमनामा तयार करणे	[O. VIII R. 10]
due and reasonable diligence	शक्य तेवढी वाजवी तत्परता	[O. V.R. 17]
effect of document	दस्तऐवजाचा आशय	[O. VI R. 9 M.N.]
embrass	अडचण	[O. VI R. 16 (*b*)]
encumbrancer	प्रभारकर्ता	[S. 73 prov. (*a*)]
(To) endorse	पृष्ठांकित करणे	[O. VII R, 9 (*1*)]
enforce the performance of duties	कर्तव्ये पार पाडण्यास लावणे	[S. 94 (*d*)]
(To) entertain suit	दावा विचारार्थ स्वीकारणे	[S. 5 (*2*)]
equities	समन्यायिक हक्क	[S. 49]
evasive denial	उडवाउडवीचा इन्कार	[O. VIII R. 4 M.N.]
evidence of the record	दफ्तरांतर्गत पुरावा	[S. 103]
execution of trust	विश्वस्त व्यवस्थेची अंमलबजावणी	[Appen. 'A' No. 44 Heading]
exemplified	सोदाहरण	[O. VI R. 4]
express or constructive trust	व्यक्त किंवा आन्विक विश्वस्त-व्यवस्था	[S. 92 (*11*)]
fact	वृत्त	[S. 41]
false or vaxitious	खोटे किंवा तापदायक	[S. 35-A (*1*)]
foreign court	परदेशी न्यायालय	[S. 2 (*5*)]
formal expression	रीतसर अभिव्यक्ती	[S. 2 (*2*)]
formal defect	औपचारिक दोष	[O. XXIII R. 1 (*3*) (*a*)]

forma pauperis	निर्धन व्यक्ती	[O. XXXIII R. 1 M.N.]
for the ends of justice	न्यायाची उद्दिष्टे साधण्यासाठी	[S. 151]
(To) frame a suit	दाव्याची रचना करणे	[O. II title]
(To) frame issues	वादमुद्दे काढणे	[S. 107 (*c*)]
further prosecution of the defence.	बचाव पुढे चालू ठेवणे	[S. 35 B (*1*) Expl.]
gain	प्राप्ती	[S. 20 (*a*)]
garnishee	गारनिशी	[S. 128 (*2*) (*a*)]
given under my hand and the seal of the court.	माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी.	[Appen. 'B' No. 4 last line]
give the conduct of a suit	दावा चालवण्यास सांगणे	[O. I.R. 11]
Government pleader	सरकारी वकील	[S. 2 (*7*)]
heirs-at-law	विधितः वारस	[Appen. ' D ' No. 17 (*3*)]
immaterial	गौण	[S. 9 Expl. II]
implements of husbandry	शेतीकामाची अवजारे	[S. 60 (*1*) Prov. (*b*)]
implied contract	उपलक्षित संविदा	[O. VI R. 12 M.N.]
incorrect view	चुकीचा दृष्टिकोन	[S. 13 (*c*)]
indemnity	हानीरक्षण	[O. VI R. 16]
infirmity	विकलांगता	[O. XVI R. 5 (*a*)]
inherent power	अंगभूत शक्ती	[S. 151 M.N.]
injunction	मनाई हुकूम	[S. 7 (*b*) (*i*)]
inoperative	अप्रवर्ती	[S. 113 Prov.]
inspection	तपासणी	[Appen. ' C ' Heading]
interlineation	ओळींच्यामध्ये मजकूर समाविष्ट करणे.	[O. XI R. 19 (*1*)]
interlocutory order	वादकालीन आदेश	[Heading above R. 6]
interpleader suit	अंतर्वाद दावा	[S. 88 M.N.]
interprete	दुभाष्याचे काम करणे	[S. 2 (*17*) (*d*)]
(To) interrogate	परिप्रश्न करणे	[O. X R. 4 (*1*)]
interrogatories	परिप्रश्न	[S. 30 (*a*)]
invalid	बेकायदेशीर	[S. 113 Prov.]
irreparable injury	भरून न येण्याजोगी हानी	[S. 115 (*1*) Prov. . (*b*)]
issue	वादप्रश्न	[S. 11]
issues are settled	वादप्रश्न निश्चित झाले	[S. 21 (*2*)]
issue of fact	तथ्यविषयक वादमुद्दा	[S. 103 M.N.]
judgement debt	न्यायनिर्णीत ऋण	[O. XXI R. 18 (*2*)]
(To) keep in the custody	ताब्यात सुरक्षित ठेवणे	[O. XIII R. 8]
Labourer	मजूर	[S. 60 Prov. (*c*)]
labourer	कामगार	[S. 60 Prov. (*h*)]
law of insolvency	दिवाळखोरीसंबंधीचा कायदा	[S. 55 (*3*)]

legal representative	कायदेशीर प्रतिनिधी	[S.50]
letter-book	पत्र - वही	[O. XIII R. 5 (*1*)]
letters patent	लेटर्स पेटन्ट	[S. 98 (*3*)]
liability	जबाबदारी	[Appen. ' H ' No. 13]
liquidated demand	निर्धारित मागणी	[O. XXXVII R. 1 (*2*) (*b*)]
litigation	कोर्टकचेरी	[O. II R. 1]
livestock	पाळीव पशुपक्षी	[S. 128 (*2*) (*b*)]
livilihood	चरितार्थ	[S. 60 (*1*) (*3*) Expl. V]
(To) lodge a caveat	सावधानपत्र दाखल करणे	[S. 148-A M.N.]
lower appellate court	निम्न अपील न्यायालय	[S. 103 (*a*)]
make appearance in suit	दाव्यामध्ये उपस्थित होणे	[S. 85 (*3*)]
mark of consideration	सन्मानदर्शक वागणूक	[O. V R. 30 (*1*)]
master	मास्टर	[S. 128 (*2*) (*i*)]
master of a ship	नौकाधिपती	[O. V R. 13 (*2*)]
material proposition of fact or law.	तथ्यविषयक अथवा कायदेविषयक असे महत्त्वाचे विधान.	[O. XIV R. 1 (*1*)]
matter in controversy	विवाद्य बाब	[S. 2 (*2*)]
matrimonial relief	विवाहविषयक अनुतोष	[O. XXXII A. R. 1 (*2*) (*a*)]
matrimonial status	विवाहविषयक स्थिती	[O. XXXII A. R. 1 (*2*) (*a*)]
matter in issue	वादप्रश्न	[S. 10]
memorandum of evidence	पुराव्याचे टाचण	[O. XVIII R. 13]
mesne profits	दरम्यानचे लाभ	[S. 2 (*12*)]
ministerial act	उपसाधक काम	[S. 75 (*g*)]
miscellaneous	संकीर्ण	[Part XI Heading]
misjoinder	अप संयोजन	[S. 99]
next friend	वादमित्र	[S. 147)]
next guardian	वादार्थ पालक	[S. 147]
next-of-kin	अनन्तर आप्तसंबंधी	[Appen. ' D ' No. 17 (*3*) Heading.]
non-joinder	असंयोजन	[S. 99]
non-judicial	न्यायिकेतर	[S. 128 (*2*) (*i*)]
notary	लेखप्रमाणक	[S. 139 (*a*) (*a*)]
notice of admission of case	हकीकत कबूल असल्याविषयी नोटीस	[O. XII R. 1 M.N.]
open court	खुले न्यायालय	[O. XII R. 4 M.N.]
operation of rule	नियमांचे प्रवर्तन	[O. XVIII R. 4 M.N.]
order shall be drawn up	आदेशपत्र तयार करण्यात येईल	[S. 35-B (*2*)]
over paid	जादा दिला गेलेला	[Appen. ' A ' No. 2]
parties litigating under the same title.	त्याच हक्कान्वये वाद लढणारे पक्षकार	[S. 10]
(To) pass a decree	हुकूमनामा काढणे	[O. IX R. 13]

payment under decree	हुकूमनाम्याखालील प्रदान	[Title of order XXI]
pecuniary	द्रव्यविषयक	[S. 16]
pecuniary legatee	द्रव्यविषयक उत्तरदानग्राही	[Appen. ' A ' No. 43 Heading].
penalty for default	कसुरीबद्दल शिक्षा	[S. 32 M.N.]
performance remitted	वचन पूर्ण करण्यास माफी देणे	[Appen. ' A ' No. 49 (4) M.N.]
personal decree	व्यक्तीलक्षी हुकूमनामा	[Appen. ' D ' No. 9 (*4*) (iv)]
personally work for gain	प्राप्तीसाठी व्यक्तिशः कामधंदा करणे	[S. 16 Prov.]
personal ornaments	अंगावरील दागदागिने	[S. 60 (*1*) Prov. (a]
personal service	व्यक्तिशः अंमलबजावणी	[O. V R. 19-A M.N.]
point	टप्पा	[S. 24 (*2*)]
point of substance	सारभूत मुद्दा	[O. VIII –7 (4)]
political pension	राजनैतिक निवृत्तिवेतन	[S. 60 (*1*) Prov. (*g*)]
precept	आज्ञापत्र	[S. 46]
principal sum	मुद्दल रक्कम	[S. 34 (*1*)]
prize court	युद्धलूटविषयक न्यायालय	[S. 112 (*2*)]
probate of the will in solemn form.	गांभीर्यपूर्वक नमुन्यातील मृत्युपत्राचे संप्रमाण.	[Appen. ' A ' No. 49 (*15*) (*6*) (2)].
procedure by way of originating summons.	प्रारंभकारी समन्सच्या स्वरूपाची कार्यपद्धती.	[S. 128 (*2*) (*ii*) (*g*)]
proceedings in camera (camera proceedings).	कार्यवाही कक्षांतर्गत चालविणे	[O. XXXII A. R. 2]
pronounced by dictation	तोंडी मजकूर सांगणे	[O. XX R. 1 (*3*) Prov.]
property	मालमत्ता	[S. 2 (*12*)]
proof	पुरावा	[Appen. ' E ' No. 26]
proposition	विधान	[S. 4 (*2*)]
(To) prosecute or defend a suit.	दावा चालविणे किंवा त्यामध्ये बचाव देणे.	[S. 85 (*1*)]
prothonotary	प्रोथोनोटरी	[S. 128 (*2*) (*i*)]
public sale	जाहीर विक्री	[Appen. ' E ' No. 42 Heading]
pusne mortgage	अनवर्ती गहाणदार	[O. XXXIV R. 1 Expl.]
purchaser's title	खरेदीदाराचा क्रमप्राप्त हक्क	[S. 65 M.N.]
quasi-judicial	न्यायिकवत्	[S. 128 (*2*) (*i*)]
rateable distribution	हिस्सेराशीने वितरण	[S. 64 Expl.]
realisation	स्थावरीकरण	[O. XL R. 1 (*1*) (*d*)]
reciprocating territory	प्रतियोगी राज्यक्षेत्र	[S. 44-A (*1*)]
recognized agent	मान्यताप्राप्त प्रतिनिधी	[S. 135 (*2*)]
(To) record mechanically	यांत्रिकपणे अभिलिखित करणे.	[O. XVIII R. 5 (*b*)]
redumption	गहाण सोडवणे	[Appen. ' A ' No. 46 Heading]
redress	क्षतिपूरण	[O. I R. 7 M.N.]

refuses or prevents access thereto	प्रवेश करू देण्यास मकार देणे किंवा प्रतिबंध करणे.	[S. 55 (1) Prou]
regiment	रेजिमेंट	[O. XXVIII R. 1 (3) Expl.]
regsitrar	प्रबंधक	[S. 128 (2) (i)]
relief	अनुतोष	[O. VII R.7 M.N.]
(To) remand a case	प्रकरण प्रतिप्रेषित करणे	[S. 107 (b)]
rent	खंड	[S. 4 (2)]
representative character	प्रातिनिधिक भूमिका	[O. VII R. (4)]
reserve price	राखीव किंमत	[O. XXI R. 72-A (2)]
residuary legatee	अवशिष्ट उत्तरदानग्राही	[O. VIII R . 6 (3) III (a)]
resjudicata	प्राङन्याय	[Part I sub-heading]
(To) restore suit to file	दावा पुन्हा फाईलवर घेणे	[O. IX R. 4 M.N.]
retinue	लवाजमा	[S. 86 (4) (c)]
(To) retry	पुन्हा संपरीक्षा करणे	[S. 24 (2)]
return of commission	आयोगपत्र परत पाठविणे	[O. XXVI R. 7 M.N.]
rightful claimant	न्याय हक्कदार	[S. 88]
rival claim	प्रतिस्पर्धी हक्कमागणी	[O. XX R. 14 (2)]
scandalous	अपप्रवादात्मक	[O. VI R. 16 (a)]
shebait of Thakur	ठाकूरचा शेबैट	[Appen. ' A ' No.1]
shop-book	दुकानवही	[O. VII R. 17 (1)]
special form of procedure	विशेष कार्यपद्धती	[S. 4]
special denial	विनिर्दिष्ट इन्कार	[O. VIII R. 3 M.N.]
specific performance of a contract	संविदेचे विनिर्दिष्ट पालन	[O. XX R. 12-A]
spirit of the trust	विश्वस्त व्यवस्थेचा आशय	[S. 92 (3) (a) (ii)]
(To) state a case	प्रकरण सादर करणे	[S. 90 M.N.]
statutory instrument	सांविधिक लेख	[O. XXVII A-Heading]
stay of suit	दाव्याची स्थगिती	[S. 10 M.N.]
stipend	वृत्तिवेतन	[S. 60 (1) Prov. (g)]
istrike out the defence	बचाव काढून टाकणे	[O. VI R. 14-A (5) (b)]
subject to speedy and natural decay	लवकर व स्वाभाविकपणे नाश पावणारी	[S. 75 (f)]
(To) subrogate	प्रत्यासीन करणे	[O. XXXIV R. 2 (3)]
subscription	स्वाक्षरित (करणे)	[O. XXIX R. M.N.]
subsequent encumbrance	नंतरचे भार	[S. 73 Prov. (c)]
subsidiary jail	दुय्यम तुरुंग	[O. XVI R. 1 (b) (i)]
subsistance allowance	निर्वाहभत्ता	(S. 57 M.N.)
subsistance for witness	साक्षीदारांचा निर्वाहखर्च	[Appen. . Table entry No. 5]
substantial part thereof	अधिकांश भाग	[S. 51 Prov. (b)]

successive claims	अनुवर्ती हक्कमागण्या	[O. I R. 3 Expl.]
sufficient to satisfy the decree	हुकूमनाम्याची फेड करेल इतकी	[S. 39 (*1*) (b)]
suitable accomodation	योग्य जागा	[S. 55 (*1*)]
suit must fail	दावा निष्फळ होणे	[O. XXIII R. 1 (3) (a)]
suits in general	सर्वसाधारण दावे	(Part I Heading)
(To) sustain	मान्य करणे	[S. 13 (f)]
taxing officer	परिव्यय निर्धारण अधिकारी	[O. XI R. 3]
tenure	धारणाधिकार	[O. XXI R. 3]
threatend with destruction	नष्ट केली जाईल अशी भीती असणे	[Appen. ' A . No. 39 Heading]
tools of artisans	कारागिरांची हत्यारे	[S. 60 (*1*) Prov. (b)]
to wage	खेचणावळ	[S. 140 (*1*)]
transmission of summons	समन्स पाठवणे	[Appen. ' B ' No. 8]
(To) verify at the foot	तळाशी सत्यापन करणे	[O. VI R. 15 (*1*]
wearing apparel	पेहरावयाचे कपडे	[S. 60 (*1*) Prov. (9)]
welfare expert	कल्याणकार्यविषयक तज्ञ	[O. XXXII A R. 4 M.N.]
with notice	दखल असणे	[Appen. ' A ' No. 33 Heading]
without lawful excuse	कायदेशीर सबब नसताना	[O. X R. 4 (2)]
witness	साक्षीदार	[Appen. ' F ' No. 2]
wrongfully discharged	अन्यायाने नोकरीतून पदमुक्त करणे	[Appen. ' A ' No. 15 (3)]
Wrongful dismissal	अन्यायाने केलेली बडतर्फी	[Appen. ' A ' No. 15 (3)]
wrongs to person or movables	व्यक्ती किंवा जंगम मालमत्ता या संबंधीची दुष्कृत्ये.	[S. 19 M.N.]